कविकुलगुरु - कालिदास - संस्कृत - विश्वविद्यालयः

This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

हस्तलिखित संग्रह

M·2516

दाखल क्र ________ विषय ________.

नांव श्रीगुरुलीलामृत

लेखक/लिपीकार वामन रावजी वैद्य

पृष्ठ ~~720~~ ९० .

काळ ________ पूर्ण/अपूर्ण पुर्ण .

ॐ श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ ॐ

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

# श्रीगुरुलीलामृत

[ श्रीमद्दत्तावतारी अक्कलकोट स्वामीमहाराजांचें चरित्र ]

लेखक

**ब्रह्मनिष्ठ कै. वा. वामन रावजी वैद्य**

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य नऊ रुपये

ॐ श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ ॐ

“ लीलामृत श्रवणें निर्वेंध ।
पिशाच्चभूतादि संबंध ।
नष्ट होती अनेकबंध ।
दुरितनिरोध ग्रंथपठणें ॥ ”

卐

“ जैसा करतलामलक ।
अनुभव स्पष्ट सम्यक् ।
तैशीं प्राप्त सौख्यें अनेक ।
एकनिष्ठें अवलोका ॥ ”

—( अ. १४, ओ. १३५।१३६ )



“ गुरुलीलामृता नित्य वारंवार ।
श्रवणद्वारें व्हावा संचार ।
तेणेंच अंतर्यामीं आत्मा गुरुवर ।
ओळखिला जाईल सत्यत्वें ॥ ”

卐

“ तरीच नरजन्माचें सार्थक ।
होईल निःशंक निश्चयात्मक ।
म्हणून लीलामृत भवतारक ।
मोक्षदायक प्राशावें ॥ ”

---( अ. १५, ओ. २।३ )

## श्री स्वामी समर्थ ध्यान

ॐ रक्ताङ्ग, रक्तवर्ण, पद्मनेत्र, सुहास्यवदन, कंथा टोपी च, माला--दण्डकमण्डलुधर, कट्यांकर, रक्षक, त्रैगुण्यरहित, त्रैलोक्यपालक, विश्वनायक, भक्तवत्सल, कलियुगे श्रीस्वामीसमर्थावतारधारक पाहि माम् ॥

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

॥ श्रीः ॥

# श्रीगुरुलीलामृत

॥ श्रीगुरुदेव दत्त स्वामीमहाराजाय नमः ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीमत्सद्गुरु दत्तदिगंबराय नमः ॥ ॥ प्रारंभीं श्रीमंगलमूर्ति । ज्याचे योगें स्फुरे चैतन्य स्फूर्ति । ब्रह्मादिक देव असुर नर जया वंदिती । त्या नमियेलें आदरें ॥ १ ॥ मंगलाचें परम मंगल । जगद्वंद्य सावधान सुमंगल । स्मरणें ज्याचिया अमंगल । स्वप्नीं देखील दिसेना ॥ २ ॥ चतुर्दशविद्या चतुःषष्ठी कळा । प्रज्ञाता आपण आदि सकलां । संसार व्याधिच्या तिडका कला । निजकृपें समूल नाशती ॥ ३ ॥ शांत मस्तकीं गंडस्थल । मद स्रवे अद्वैत ब्रह्मज्ञान निर्मल । प्रसन्न वदन सर्वकाल । विराजे सुफलित भक्तजनांसि ॥ ४ ॥ चिद्रत्नाचे अलंकार विपुल । चंद्रांकित प्रकाशमान् भाल । ज्ञान-मोदकें उदर विशाल । भरलेलें नित्य तृप्तीनें ॥ ५ ॥ ‘सूक्ष्मात्सूक्ष्मतरं महत्’ । अव्ययाधिष्ठान सदोदित । यास्तव ‘मूषकवाहन’ नाम साजत । गणाधीशा आपणांसी ॥ ६ ॥ पूर्वोत्तर मीमांसा दोन्ही । विराजती भूषणें द्वयकर्णीं । चतुर्विध पुरुषार्थ चारी पाणी । वेदवाणी सुशोभती ॥ ७ ॥ एकत्वाचा पूर्ण एकदंत । विवेक

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

परशु दिव्य झळकत। परमानंदयुक्त शुंडा झेलित। स्वात्मसुखें डुल्लत सर्वदा ॥ ८ ॥ कंठीं उपनिषदार्थ प्रकाश। साजे निज स्मरणाचा अंकुश। चरणीं सद्धर्म नूपुर गर्जतां नाश। पाखंड-मताचा होतसे ॥ ९ ॥ स्वच्छंदें करितसां तांडव नृत्य। आम्नाय अखंड वक्ते आहां सत्य। ज्ञानविज्ञान ऋद्धिसिद्धि नित्य। तिष्ठती गणराजासमीप त्या ॥ १० ॥ गजानन हेरंब लंबोदरा। विघ्नांतका सर्वविद्या-सागरा। ग्रंथ सिद्धीस नेऊनि दातारा। पूर्ण करा सविस्तर ॥ ११ ॥ ऐसें स्तवितां गजानन। तंव ते होऊनि प्रसन्न वदन। ग्रंथ सिद्ध होईल निर्विघ्न। वदती चालवी प्रियभक्ता ॥ १२ ॥ आतां भगवती सरस्वती। अनादिविद्या चिच्छक्ति। जियेचे योगें स्फुरे अंतःकरणवृत्ति। ते वंदिली प्रेमभावें ॥ १३ ॥ विलसे शुद्ध परमहंसारूढ। सारासार विवेक निगूढ। निज स्मरणें मूढ जड अमूढ। होती मूक वाचाल ते ॥ १४ ॥ अक्षर स्वर्ण वीणा शोभत। करीं पोथी वेदार्थ विहित। विरागें प्रबोध गायन करित। कल्याणार्थ जगताच्या ॥ १५ ॥ जें शब्दासी आंत बाहेर। व्यापूनि प्रतिष्ठीतसे निरंतर। निःशब्दत्व न मोडूनि साचार। अर्थविस्तार करितसे ॥ १६ ॥ मुळींचें मौन्य न मोडतां। शब्दीं दावी सत्य शब्दार्थता। या प्रकारें चालवी ग्रंथ तत्त्वता। अति श्लाघ्यता मायेची हो ॥ १७ ॥ अबोल बोल बोलवी। बोलूनि बोलणें नुरवी। अनिर्वाच्य जाड्यापहारी देवी। शुद्ध भावें संतुष्ट होतसे ॥ १८ ॥ वाचा वचन वाचकता। स्वयें होऊनि वाग्देवता। सबीज नेली कवित्व-अहंता। ऐशी प्रसन्नता जगन्मातेची ॥ १९ ॥ कामधेनूसि आदरें तृण। रत्नाकरापुढें कांच अर्पणें जाण। कुबेरासि कपर्दिका समर्पण। ज्या प्रकारें करावी ॥ २० ॥ सूर्यापुढें लाविले दीप। अमृतासि दिधलें तक्र स्वल्प। चिंतामणीसमीप शिंप। ठेविली जैशी दरिद्रें ॥ २१ ॥ तैशी माझी मंद वाणी। सरस्वती जगदंबे आपल्या स्तवनीं। विशारदे वाग्विलासिनी। विधिहरिहरादि तुज वंदिती ॥ २२ ॥ शेषासि जिव्हा सहस्र। तो जरी वर्णील अजस्र। तदपि तव गुणांचा पार चतुरस्र।

वागीशा नये कदापि ॥ २३ ॥ ऐशी जंव मी जगज्जननी वर्णी। तंव ते स्तवूं नेदी पृथक्रूपणीं। वाचा वाचक स्वयें
वचनीं। होऊनि वर्णवी गुरुलीला ॥ २४ ॥ ॐ नमः श्रीसद्गुरुनाथा। श्रीगुरुदेवदत्त स्वामी समर्था। पूर्णब्रह्म केवल
अनादि यथार्था। आपणचि एक अद्वितीय ॥ २५ ॥ गुरु परमगुरु परात्पर गुरु दत्तात्रेय। ऋषि मुनि योगी भक्तजनांचें
ध्येय। अनादि परंब्रह्माधिष्ठान अव्यय। जगदाधार असती जे ॥ २६ ॥ हरि हर देव संपूर्ण ब्रह्मादिक। हे गुरु साक्षात्
परब्रह्मोपासक। दीनानाथ अनंतकोटि ब्रह्मांडनायक। सनकादिक वंदित जो ॥ २७ ॥ त्वच्चरणकमल-मकरंद। परमहंस
मुक्त मुमुक्षु भ्रमरवृंद। सेविती अखंड परमानंद। करुणाकंद गुरुवर्या ॥ २८ ॥ खलदुष्टांचें निर्दलन। व्हावया साधूंचें
परित्राण। धर्मसंस्थापनार्थ अवतीर्ण। होतां युगायुगीं जगदीशा ॥ २९ ॥ दशावतारादि धारण करून। वेदोक्त
धर्ममार्ग सनातन। यथाविधि करवितां प्रवर्तन। वर्णाश्रम-कर्मीं जनांतें ॥ ३० ॥ दुराचरण घोर कलियुगीं।
होऊं लागलें जागोजागीं। म्हणून श्रीपादवल्लभरूप धरून जगीं। सदाचारीं जन लाविले ॥ ३१ ॥ मागुती श्रीमन्नृसिंह-
सरस्वती। अवतरले नरवेषें यति। जनांसि लावूनि सद्धर्म नीति। असंख्यात तारिले ॥ ३२ ॥ या अवतारद्वयांचें
चरित। प्रसिद्ध गुरुचरित्र ग्रंथांत। सरस्वती-गंगाधरें इत्थंभूत। वर्णिलें आहे सुरस तें ॥ ३३ ॥ पुढें कांहीं कालानें
पुनरपि। घोर कलियुगीं प्राणी होऊं लागले पापी। म्हणून दत्तात्रेय ब्रह्मस्वरूपी। अवतरले नृसिंह-यतिरूपें ॥ ३४ ॥
जगदोद्धारार्थ महीवरी संचार। करिती स्वच्छंदें गुरु नृसिंहयतीश्वर। हिमाचल जगन्नाथ हरिद्वार। द्वारका
गिरिनारपर्वतीं ॥ ३५ ॥ प्रयाग गया श्रीकाशी क्षेत्र। व्यंकटेशगिरि आदिक रामेश्वर। नारायणसरोवर बिंदुसरोवर।
पंपासरोवर मानसादिक ॥ ३६ ॥ मातुलिंग खेटक पंढरपुर। भागीरथी गोदा कृष्णातीर। कांची द्वय आणि
बदरीकेदार। अपार तीर्थें हिंडून ॥ ३७ ॥ तेचि परमात्मा नृसिंहसरस्वती। सोलापुराहूनि स्वच्छंदें पादगतीं। जगदुद्धारणार्थ

अक्कलकोटाप्रति । तिष्ठले वर्षें एकवीस ॥ ३८ ॥ तो सविस्तर कथा प्रसंग । पुढें निरूपण होईल साङ्ग । जेणें भवभय
दुःख संकट भंग । झाला होईल होतसे ॥ ३९ ॥ श्रीदत्तात्रेय गुरु समर्थ स्वामी । व्यापक असंग सर्वांतर्यामी ।
जगद्धितार्थ वसले अक्कलकोटग्रामीं । तत्पादपद्मां नमिलें अनन्य ॥ ४० ॥ गलिताहंकृति होऊनि लीन । श्रीगुरुलीलामृत
वर्णन । ग्रंथसिद्ध्यर्थ दयाळा आपलें स्तवन । करितों त्रिभुवनपालका ॥ ४१ ॥ गुरुलीला वर्णनार्थ महाराजा ।
निजाज्ञा झाली या चरणरजा । मंदमति मी ह्या ग्रंथरूपीं कार्यध्वजा । उभारण्यास नव्हें समर्थ ॥ ४२ ॥ तथापि
आज्ञा मानूनि सर्वथा शिरीं । मस्तक ठेविलें निजचरणांवरी । सत्यप्रतिज्ञ प्रणतभक्त-कैवारी । सिद्धीस नेणार आपणचि
॥ ४३ ॥ अंतर्यामीं हृदयीं प्रगटून । वदविता अन्य नसे समर्थावीण । साक्षी चेता केवळ निर्गुण । प्रज्ञान आनंद
ब्रह्मस्वरूप ॥ ४४ ॥ लोह लागतां परिसासी । तें सुवर्ण होय शीघ्र वेगेंसीं । परंतु आपणासम लोहासी । परिसाचेनि
करवेना ॥ ४५ ॥ शरणागतासी देशिक । आपणासारिखे करिती तात्कालिक । एकदेशी दृष्टान्त लौकिक ।
अलौकिक रूप सद्गुरु असती ॥ ४६ ॥ उपमेसि द्यावे चिंतामणि कल्पतरु । तरी अचिंत्य निर्विकल्प स्वरूप
सद्गुरु । अथवा कामधेनु-दृष्टान्त धरूं । परंतु निष्काम निरिच्छ गुरु असती ॥ ४७ ॥ उपमेसि द्यावें अमृत ।
तरी ते अमरचि असती मर्त्य । क्षीणपुण्यें प्रवेशती मृत्युलोकांत । गुरु अद्वैत परमामृतस्वरूपी ॥ ४८ ॥ क्षीरसागरादि
आटती कल्पांतीं । सूर्य प्रकाशीना रात्रौ जगतीं । चंद्र क्षयी अग्नि आदि निश्चिती । नसती अखंड प्रकाश ॥ ४९ ॥
अतएव सद्गुरु निरुपम । हेतु-दृष्टान्तवर्जित पुरुष परम । विराजती स्वयंप्रकाश परब्रह्म । परंधामस्वरूप जे ॥ ५० ॥
प्रार्थना परिसूनि झाले प्रसन्न । अंतरीं प्रगटूनि अत्रिनंदन । ग्रंथ सिद्धीस जाईल निर्विघ्न । आशीर्वचन बोलती ॥ ५१ ॥
ते गुरु ब्रह्मा विष्णु महेश्वर । आणि हरिहरांचे संपूर्ण अवतार । झाले असतील पुढें होणार । नमिले सुरवर सर्वत्र ते ॥ ५२ ॥

* * *

वेद साक्षान्नारायण । अपौरुषेय अनादि पूर्ण । स्वयंभू स्वतःसिद्ध प्रमाण । विश्वधारक असती निश्चयें ॥ ५३ ॥ वेद वेदांगशास्त्राविण
कांहीं । स्वार्थ परमार्थ होणार नाहीं । अर्थात् वेद वेदांगादि सर्वदाही । अगत्य वंदिले पाहिजे ॥ ५४ ॥
वेदवेदांगार्थ-पारग । कर्मयोग ज्ञाननिष्ठ करिती यज्ञयाग । दया-क्षमा-शांतियुक्त विराग । वंदिले ब्राह्मण ब्रह्मरूप ते
॥ ५५ ॥ वेदमूर्ति भूदेव वेदाधिकारी । मुख्य जाती ब्राह्मण निर्धारी । परमात्मस्वरूप नित्य गायत्री । हृदयीं तिष्ठे
जयांच्या ॥ ५६ ॥ ते प्रसिद्ध याज्ञवल्क्य योगीश्वर । वेदव्यास महाथोर । दध्यंगाथर्वण भृगु पराशर । शुक्राचार्य
कपिलमुनि ॥ ५७ ॥ भरद्वाज वसिष्ठ अत्रि विश्वामित्र । मरीचि पुलस्त्य पुलहक्रतु ब्रह्मविद्वर । जमदग्नि अगस्ति
दुर्वासऋषिवर । वामदेव गौतमांगिरस ॥ ५८ ॥ पौतिमाषि मुद्गल वत्स कौशिक । कण्व लोमेश मार्कंडेय मांडुक । कश्यप नारद
शुक शौनक । वाल्मिक वैशंपायन सूतादि ॥ ५९ ॥ सनक सनंदन सनत्कुमार । सनक सुजात धौम्य जैमिनी विद्वर ।
आश्वलायन गर्ग पतंजल योगसूत्रकार । धारण्य दलादनादिक ॥ ६० ॥ जाबाल उद्दालक गौपवन । शांडिल्य सैतव अरुण
कात्यायन । नैध्रुव कौंडिण्य आदि करून । नमिले बृहस्पति सुरगुरु ॥ ६१ ॥ इंद्र चंद्र अग्नि दिवाकर । पृथ्वी वायु
तेज नीर । यम वरुण दिक्पाल कुबेर । वंदिले सुरवर ग्रहादिक ॥ ६२ ॥ अवतार श्रीमच्छंकराचार्य । धर्मसंस्थापक
वेदविज्ञानसूर्य । प्रस्थानत्रय-भाष्यकारवर्य । ते जगद्गुरु वंदिले ॥ ६३ ॥ विद्यारण्य श्रेष्ठ संन्यासी । वेदभाष्यादिक
निर्मिली पंचदशी- । शंकरानंद श्रीधर मधुसूदनादिकांसी । संस्कृत टीकाकारांसि वंदिले ॥ ६४ ॥ कालिदास कवि श्रेष्ठ ।
दंडी बाण भवभूति वरिष्ठ । जयदेवकवि धोयादिक ज्येष्ठ । नमिले विद्वज्जन पंडित ते ॥ ६५ ॥ कवि हरि अंतरिक्ष
महान् । प्रबुद्ध पिप्पलायन । द्रुमिल आविर्होत्र चमस करभाजन । वंदिले नवयोगींद्र ते ॥ ६६ ॥ मत्स्येंद्र गोरक्षादि
नवयोगी । जपी तपी कर्मी संन्यासी विरागी । ब्रह्मचारी गृहस्थ वनस्थ विरक्त भोगी । ते सकल वंदिले ॥ ६७ ॥ श्रोते

प्राकृत कवि संत सज्जन । मुकुंदराज सत्पुरुष ज्ञानवान् । निवृत्तिनाथ ज्ञानेश्वर सोपान । मुक्ता जाण ब्रह्मकला ॥ ६८ ॥ दत्त जनार्दन एकनाथ । मुक्तेश्वर जयदेव जयराम रंगनाथ । रामदास अमृतराय दासोपंत । नामदेव तुकाराम शिवरामस्वामी ॥ ६९ ॥ चांगदेव कान्हा नरहरि सूरदास । शिवदिनकेसरी तुळशीदास । देवनाथ दामाजीपंत माधवदास । दादूसुत रोहिदास नरसीमेहता ॥ ७० ॥ केशवनाथ मध्वमुनेश्वर । रामनाथ आनंदतनय वटेश्वर । गोरा सांवता बह्लव कबीर । विसोबा खेचर सोयरा तो ॥ ७१ ॥ मयूरपंत वामनपंडित । रामजोशी रामानंद मानपुरी अनंत । उद्धवचिद्घन त्र्यंबक रघुनाथ । निरंजन निपटनिरंजन ॥ ७२ ॥ निश्चलदास विठ्ठल सजनकसाई । मिरा निरा कृष्णा जनाबाई । विठ्ठलपुरंदर मोरया गोसावी । श्रीधरस्वामी नाझरेकर ॥ ७३ ॥ माणिकप्रभु जयराम यशवंत । हंसराज सत्कवि प्रख्यात । बाळकृष्ण गंगाधर देवनाथ । संत अनंत नमियेले ॥ ७४ ॥ आतां वंदूं मातापिता । कुलदेवतादि ग्रामस्थान वास्तुदेवता । ज्यांचे कृपें इहपर साध्य तत्वतां । होयं सर्वथा निर्धारें ॥ ७५ ॥ दक्षिणेंत महाराष्ट्रदेशीं । अहमदनगर-निवासी । नगरकरवैद्य म्हणती जयासी । धारण्य गोत्री यजुर्वेदी ब्राह्मण ॥ ७६ ॥ निष्णात वैद्य जगत्प्रसिद्ध । माणिक नामें झाले सिद्ध । सदाचारी वैदिक शुद्धबोध । जे अविरोध विरागी ॥ ७७ ॥ माणिक वैद्याचे दोन कुमर । एक भट्टुवैद्य दुसरे मोरेश्वर । उभयतांसि प्रसन्न निरंतर । जगदंबा श्रीशंकर असती ॥ ७८ ॥ शके सोळाशें तिहींत । पुस्तकें रचिलीं वैद्यकादि संस्कृत । त्यांतील प्रसिद्ध वैद्यामृत । मोरेश्वररचित असे जें ॥ ७९ ॥ भट्टुवैद्यास होते चार नंदन । त्यांत श्रेष्ठ नारायण विद्वान । तयासि श्रीजगदंबा प्रसन्न । बोले चाले तत्संगें ॥ ८० ॥ सप्तशृंगनिवासिनी जगन्माता । औषधी आणून देई स्वतः । जहागीर मोकासे मिळवूनि तत्त्वतां । साक्षात्कारी जाहले ॥ ८१ ॥ नारायणासि पुत्र त्र्यंबक । जाहला प्रसिद्ध कुलदीपक । ब्रह्मज्ञानी होऊनि निःशोक । वाल्मीक ग्रामीं वसतसे ॥ ८२ ॥ वाल्मीक ऋषींचें आहे स्थान । वाल्मीकतीर्थ सुंदर असे महान । म्हणून त्या ग्रामासि सर्व

* * *

जन। बाहती 'वामोरी' ऐशा नामें ॥८३॥ ते त्र्यंबक प्रातः प्रति भौमवारीं। सप्तशृंगीं आणि त्र्यंबकेश्वरीं। दर्शन औषधी घेऊनि
माधरीं। स्वसदनीं येती सायान्हीं ॥ ८४॥ शिवशक्तीची पूर्ण कृपा। षोडशयोजन मार्ग झाला सोपा। समत्वें देखती
रंकनृपा। स्वानंदीं निमग्न झाले ते ॥ ८५ ॥ त्र्यंबक वैद्याचे पुत्र विठ्ठल। ज्योतिर्वैद्य जाणते निर्मल। समाधानी विवेक-
कुशल। पुण्यशील झाले ते ॥ ८६ ॥ विठ्ठलापासूनि रावजीभट्ट। करूनि अनेक तीर्थयात्रा श्रेष्ठ। वेदोक्त मार्गीं भक्त
अवीट। तेचि असती जनक वामनाचे ॥ ८७ ॥ कौंडिण्य गोत्री महादेव द्विज। त्यांचे पुत्र गुंड नामें ध्वज। तयांचे
चिरंजीव त्र्यंबकराज। कोलग्राम निवासी ॥ ८८ ॥ 'तरडे' इति उपनाम। यजुर्वेदी ब्राह्मण देवभक्त निस्सीम।
आचारविचार धर्मसंपन्न। वैदिक मार्गें वर्तती ॥ ८९ ॥ पुत्र कन्या तयांसि चार। त्यांत अहल्या नामें सती थोर। तियेचे
उदरीं जन्मलों साचार। त्रयबंधु-भगिनींसह ॥ ९० ॥ एवं पूर्वजादि मातापिता। मंगलार्थ वंदिलीं शिष्टाचाराकरितां।
पुढें वंदूं कुलदेवता। श्रोतीं सावधान असावें ॥ ९१ ॥ पूज्य आमुचे वंशांत। त्र्यंबकेश्वर गिरिजाकांत। सृष्टि स्थिति
संहार करित। शिव अनंत अपार जो ॥ ९२ ॥ श्रीसप्तशृंगनिवासिनी। जगदंबा प्रणवरूपिणी। आदिमाया कुलस्वामिनी।
योगीजनांचें ध्येय जी ॥ ९३ ॥ इडा ब्रह्मरूप वाम नासिकीं। दक्षिण पिंगला विष्णुरूप कीं। पुढें सुषुम्णा
रुद्ररूप त्र्यंबकीं। सोहं-हंसस्वरूपता आहे ॥ ९४ ॥ त्रिकुट श्रीहट गोल्हाट। रक्त श्वेत शामरूप वर्णत्रय स्थान श्रेष्ठ।
आणि नीलबिंदु तें औटपीठ। वरी भ्रमरगुंफा विराजित ॥ ९५ ॥ त्या दशमद्वारीं गुरुत्र्यंबक। त्यांचें दर्शन घेती
पारमार्थिक। नवमद्वार नाडी वायुमार्गें अनेक। भेदूनि जाती भाग्यवान ॥ ९६ ॥ किंवा स्थूल सूक्ष्म देह कारण। या
देहत्रयातीत साक्षी शिवाख्य पूर्ण। अकार उकार मकार यांहून। अर्धमात्रापर त्र्यंबकब्रह्म प्रकाशित ॥ ९७ ॥ याप्रकारें
नादबिंदुकलातीत। निरुपाधिक शिवाख्य ब्रह्म अनंत। त्या व्यापक ब्रह्मगिरींतून सदोदित। ज्ञानगंगा प्रवाहे ॥ ९८ ॥

त्या गंगाद्वारीं नित्य करूनि स्नाना । ब्रह्मगिरीची निःसंशय प्रदक्षिणा । करितां ब्रह्मस्वरूप होय जाणा । जीव जन्ममरणाविरहित तो ॥ ९९ ॥ अघटितघटनापटीयसी । महामाया सप्तशृंगनिवासी । करी उत्पत्ति-स्थिति-प्रलयासी । जगन्माया चिच्छक्ति ही ॥ १०० ॥ अनामासि नाम ठेविलें । अरूपासि रूप आणिलें । मूळ पुरुषासि खेळविलें । ऐसें कर्तृत्व ह्या चैतन्यशक्तीचे ॥ १ ॥ तूर्या ब्रह्म-त्रिपुरसुंदरी भुवनेश्वरी । अजा एक अनंत ब्रह्मांडोदरीं । होती जाती वरचेवरी । परी हे कुमारी तिष्ठतसे ॥ २ ॥ इच्छा हे परमपुरुषाची । नानाविध ब्रह्मांडें खेळ रची । खेळांत हरिहरविरंची । नाचवी सकल जीवांसि ॥ ३ ॥ कर्म उपासना पायऱ्या वेंघुनी । मग पहावी हृदयांतरीं विश्वजननी । चित्कला ब्रह्मविद्याविकासिनी । सर्वसाक्षी-स्वरूप ती ॥ ४ ॥ सप्तम भूमिकारूप सप्तशृंग । बीजरूप मंत्रदेवता अभंग । तिष्ठती सर्वांगीं यथासांग । निजरंग उदय होतसे ॥ ५ ॥ करूनि नवविधाभक्ति नवरात्र । नित्योत्सव-नित्यश्री-मंगल पवित्र । शृंगावरी भक्तबोध वस्तुतंत्र । लाविती निशाण ध्वजा एकत्वें ॥ ६ ॥ फडकती स्वात्मानंद वायुवेगें निशाणें । ते मूलध्वजस्तंभ पालवी खुणें । मुक्त मुमुक्षु साधकांकारणें । परमात्म अभेद दर्शनार्थ ॥ ७ ॥ एवं शिवशक्ति कुलदेवता । वंदिली प्रेमें परमार्थता । उदयोऽस्तु उदयोऽस्तु निर्भयता । वदती ग्रंथ आरंभिजे ॥ ८ ॥ नवसा पावूनि सार्थकता । नवल करितसे कुलदेवता । कुलाकुलादिक व्याकुलता । नेली अहंता समूल ॥ ९ ॥ ग्रंथारंभीं देवतावंदन । शिष्टाचार प्रवृत्तिजनन । परंपरा मंगलाचरण । अवश्य केलें पाहिजे ॥ ११० ॥ म्हणूनि वंदूं श्रोते सज्जन । हरिगुरुभक्तिपरायण । अध्यात्मश्रवणीं सावधान । असती नवविधभजनीं प्रिय जे ॥ ११ ॥ श्रोते ब्रह्मविद्येचें माहेर । तथापि सच्छास्त्र श्रवणार्थातुर । श्रोते तुम्ही रसज्ञपणाचें भांडार । विवेकचतुर आहां कीं ॥ १२ ॥ लांबविलें देवता स्तवनास । अतएव

श्रोते व्हाल उदास । अनवधानें सर्व विरस । न व्हावें म्हणून विनवितों ॥ १३ ॥ तंव श्रोते बोलती सप्रेम । एकमेवाद्वितीयं ब्रह्म । कोणीं कोणाचें स्तवन । प्रथम येथें करावें ॥ १४ ॥ हें स्तवन कीं स्वात्मानुभव । परिपाक कीं प्रमेयभाव । सिद्धान्त कीं अर्थगौरव । अद्वैतवैभव वाटतसे ॥ १५ ॥ तृप्तीचे ढेंकर जेवणार देती । तैसे तुमचे बोल निश्चितीं । परमामृतासम आम्हांप्रति । मधुर वाटती गुरुदासां ॥ १६ ॥ गणेश सरस्वति गुरु देवता । कवि श्रोते इत्यादिकां एकत्वें संतां । एके ताटीं बैसविलें परमार्थता । हे मर्यादा विशेष ॥ १७ ॥ आधींच आम्ही श्रवणातुर । गुरुलीलामृतपान त्याहीवर । दत्तात्रेयस्वामीकृपें सविस्तर । चालवीं सत्वर ग्रंथरचना ॥ १८ ॥ ऐसे सर्वत्रांचे आज्ञानुसार । ग्रंथ आरंभिला गुरुलीलामृत-सागर । सत्संकल्पसिद्धिप्रदातार । पूर्ण करील त्याचा तो ॥ १९ ॥ 'श्रीगुरुलीलामृत' । ग्रंथाचें नाम ठेविलें प्रख्यात । गुरुशिष्यसंवादरूप अद्भुत । श्रुतिशास्त्रसंमत असे हा ॥ १२० ॥ कर्म उपासना वैराग्य भक्ति ज्ञान । राजयोग हटयोगादि साधन । अनेक विषयप्रतिपादन । अत्रिनंदन करविता ॥ २१ ॥ आतां 'साधन-चतुष्टय' । तैसेचि 'अनुबंध-चतुष्टय' । ग्रंथारंभीं सांगूं शास्त्राभिप्राय– । सह सुलभत्वें कळावया ॥ २२ ॥ स्ववर्णाश्रमधर्मेंकरूनी । कृच्छ्र चांद्रायणादि तप आचरुनी । वेदविहित प्रायश्चित्त घेउनी । संतोषवावें हरीतें ॥ २३ ॥ निष्कर्म भगवत्प्रीतिकर । सर्वभूतदया-लक्षण साचार । आणि वैराग्यादि साधनचार । मोक्षसाधक धर्म आहेत ते ॥ २४ ॥ ब्रह्मलोकादि मर्त्यलोकांच्या अंतीं । पर्यंत विषयोपभोग साधनें जीं असतीं । त्या विषयभोग-साधनांत निश्चिती । कर्मजन्यत्व आणि अनित्यत्व जाणावें ॥ २५ ॥ तेंचि शुद्ध वैराग्य निर्मल । विषयेच्छाराहित्य जाणावें चिरकाल । यथा काकविष्ठा म्हणिजेल । दृष्टान्त स्पष्ट अस्पर्श असे ॥ २६ ॥ गर्दभादिविष्ठा ज्वरशांत्यर्थ । ग्रहणेच्छा होते कदाचित । म्हणूनि काकविष्ठेचा दृष्टान्त ।

घेतला स्पष्ट उमजावया ॥ २७ ॥ काकविष्ठा उपलक्षण अमंगल । देखतां वांति आदिक चिळस येते तात्काळ । स्पर्श करण्यास योग्य देखिल । काकविष्ठा नसेचि ॥ २८ ॥ तैसेचि विषयभोग कर्मजात । अमंगळ अशुचि साधनसहित । अनित्य जड असूनि करिती अंत । वारंवार जीवाचा ॥ २९ ॥ अत्यंत विरस विशुष्क विषय । त्यांत रमतां सर्वोपरी होतो क्षय । म्हणूनि सर्वदा अति विषमय । असती विषय घातक हे ॥ १३० ॥ अर्थात् न होऊं द्यावा विषयेच्छाउदय । म्हणजे चित्त रागादि-मलरहित होय । तेंचि विषयेच्छाराहित्य निरामय । ‘वैराग्य’ निर्मल म्हणावें ॥ ३१ ॥ त्या निर्मल वैराग्याचें कारण । नित्यानित्यविवेकचि मुख्य जाण । त्या मुख्य विवेकाचें सशास्त्र लक्षण । सांगूं सर्वांसी कळावया ॥ ३२ ॥ संपूर्ण विद्वदनुभव प्रसिद्ध । आत्मस्वरूप सत्य ‘नित्य शुद्ध । अविनाशी हृदयीं सर्वदा उपलब्ध । त्रिकालाबाध्य अद्वितीय असे ॥ ३३ ॥ याहून देह अमंगल विपरीत । जड दृश्य बाध्य मिथ्या नाशिवंत । क्षणभंगुर अनित्य अशुचि असत । जन्मजरामरणयुक्त असे हा ॥ ३४ ॥ ब्रह्मादि-स्थावरान्त सर्व । स्वर्गादि लोकींचें भोगवैभव । अनात्मस्वरूप ऐसा अनुभव । आहे सर्वांसी उघडपणें ॥ ३५ ॥ जैसे घटादिक पदार्थ व्यतिरेकीं केवल । तैसा देह अशाश्वत चंचल अमंगल । विष्ठामूत्रादियुक्त अनेक मल विटाळ । नखें लोम केशादि टाकित ॥ ३६ ॥ आणि आत्मा पुण्यस्वरूप सर्वकाल । नित्यश्री आहे नित्यमंगल । अखंडित शाश्वत अज निश्चल । असे सच्चिदानंदस्वरूप ॥ ३७ ॥ हाचि ‘नित्यानित्यवस्तुविवेक’ । वैराग्याचें मुख्य कारण सम्यक । सांगितलें आतां शिष्या ऐक । वैराग्य कार्य ‘शमादिषट्क’ ते ॥ ३८ ॥ सदैव वासना परित्यागणें । म्हणजे पूर्वसंस्काराची उपेक्षा करणें । अंतःकरण निग्रह करून जिंकणें । ‘शम’ शब्दार्थ बोलिला हा ॥ ३९ ॥ श्रोत्रवागादिक इंद्रियांचा । निग्रह कीजे बाह्य प्रवृत्तीचा । तिरस्कार निषिद्ध प्रवृत्तीचा । करणें तो ‘दम’ शब्दार्थ कथियेला ॥ १४० ॥ शब्द स्पर्श रूप रस

गंध बंधक । या पंचविषयांची निवृत्ति करणें आवश्यक । विषयग्रहण अनिच्छा अनित्यत्वादिक । दोषदृष्टीनें करणें जी
॥ ४१ ॥ म्हणजे विषयेच्छेची समूल निवृत्ति । करणें तीच बोलिजे योग्य ‘उपरति’ । कैशी आहे श्रवण करावी ती ।
उपरति-साधक जनांनीं ॥ ४२ ॥ परम उत्कृष्ट आत्मज्ञान । उत्पन्न होय जिच्यापासून । ऐशी उपरति ब्रह्मज्ञान ।
साधनभूत आहे ती ॥ ४३ ॥ इचे योगें सर्वकर्मसंन्यास । झाला पाहिजे गुरुकुलवास । तरीच तितिक्षा-प्राप्तीस ।
योग्य होतसे साधक तों ॥ ४४ ॥ जें सहन सर्व दुःखांचें । आणि सर्व दुःखांच्या साधनांचें । करणें शितोष्णादि द्वंद्वांचें ।
अप्रतिकारपूर्वक ॥ ४५ ॥ हीच ‘ तितिक्षा ’ शास्त्रोक्त । शुभ सुखरूप असे निश्चित । सकल विदुषां संमत । द्वंद्वादि
सहन करणें तें ॥ ४६ ॥ वेद-स्वगुरु-वचनाच्याठायीं । म्हणजे उपनिषदार्थ-उपदेशीं सर्वदाही । भक्तिपूर्वक दृढतर
विश्वास राही । तीच वेदान्तप्रसिद्ध ‘श्रद्धा’ जाणावी ॥ ४७ ॥ परब्रह्म जें प्रत्यगभिन्न । त्या ब्रह्मस्वरूपांत चित्त एकाग्र
सल्लग्न । तदेकजिज्ञासा तद्रूप-चिंतन । त्यासीच ‘ समाधान ’ बोलती ॥ ४८ ॥ याप्रकारें विवेक वैराग्य शमादि षट्क
सांगून । तत्कार्यभूत मुमुक्षुपण । सुटावया संसारबंधन । मुमुक्षु अधिकारी सांगूं तो ॥ ४९ ॥ हे कर्त्या करवित्या
परमेशा । कैशी माझी असे प्रारब्धदशा । ह्या दुस्तर संसारपाशा । वेगळा केव्हां होईन मी ॥ १५० ॥ केव्हां संसारबंध-
निर्मुक्ति । नानायोनिसंबंध-निवृत्ति । कोणत्या कालीं कोणत्या युक्तीं । होईल ऐसी जिज्ञासा ॥ ५१ ॥ ऐशी
बुद्धि बाणली दृढतर । तीच ‘ मुमुक्षुता ’ जाणावी मुक्तिकर । ही मुमुक्षुता ज्याचे अंगीं निरंतर । बाणली तोचि मुमुक्षु
म्हणावा ॥ ५२ ॥ ‘ नित्यानित्यवस्तुविवेक ’ । ‘ इहामूत्रफलभोग विराग ’ सम्यक् । ‘ मुमुक्षुता ’ सह ‘ शमादिषट्क ’ । हें
साधनचतुष्टय निरूपिलें ॥ ५३ ॥; आतां जें ‘ अनुबंधचतुष्टय ’ । सांगूं त्यांतील प्रथम विषय । गुरुलीलामृतात्मरूप तत्त्व
नित्य । हाचि ‘ विषय ’ जाणावा ॥ ५४ ॥ ब्रह्मात्मसाक्षात्कारानुभव ज्ञान । गुरुशिष्यसंवाद सिद्धान्तरहस्य प्रदर्शन ।

शंका निराकरणपूर्वक समाधान । प्रकरणेंकरून ‘विषय’ हा ॥ ५५ ॥; सांगूं ‘प्रयोजन’ म्हणजे काय। उपयोग कारण काम
विषय। येथें गुरुभक्तीनें मोक्षसिद्धि प्रयोजन होय। अनुबंधांतील दुसरें तें ॥ ५६ ॥ मोक्ष म्हणजे मोकळें बंधमुक्त ।
अनात्म देहादि स्व अविद्या-कल्पित । त्या अनात्म देहादिकीं मोहयुक्त । आत्मत्वाभिमान धरणें जो ॥ ५७ ॥ तो
अनात्मत्वाभिमानचि ‘बंध’ । तन्निवृत्तिद्वारें होय ब्रह्मविद्या बोध । नुरे देहाभिमान अनर्थद लेश गंध। तेव्हां
स्वस्वरूपावस्थान सिद्धि होते ॥ ५८ ॥ होऊनि सर्वानर्थ सबीज निवृत्ति । हृदयीं होय नित्य स्वस्वरूपप्राप्ति । ‘परमानंद
प्राप्तिरूप’ जाणावी ती। ‘मोक्षसिद्धि’ प्रयोजन तें ॥ ५९ ॥; आतां परिसा हो श्रोतेजन। मुमुक्षु मोक्षाधिकारीगुरुभक्तिमान।
नित्यानित्यविवेकादि करून। साधनचतुष्टय संपन्न जो ॥ १६० ॥ वेदविहित निष्काम कर्में करून । शुद्ध झालें जयाचें
अंतःकरण। प्रपंच संसारीं विटलें मन। विषयभान गळालें ॥ ६१ ॥ दीर्घकालाभ्यास वारंवार । परमार्थास्तव प्रयत्न करी
निरंतर । उदासीन हरिभक्ति प्रियकर । जाणावा ‘मोक्षाधिकारी’ मुमुक्षु तो ॥ ६२ ॥ परमार्थावांचून इतर। कार्यांचा
करितसे अनादर। श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ श्रीगुरुवर। केव्हां भेटेल कृपाळु तो ॥ ६३ ॥ त्या सद्गुरुमुखें वेदवेदान्त । उदनिषद्-
रहस्य ब्रह्मसिद्धान्त । महावाक्यार्थज्ञान सदोदित । केव्हां प्राप्त श्रवण होईल ॥ ६४ ॥ तें गुरुमुखें वेदान्तार्थ-श्रवण।
त्या श्रवणार्थ-निश्चयें होऊनि मनन । त्या मनननिदिध्यासें साक्षात्कारसंपन्न । गुरुकृपें केव्हां होईन मी ॥ ६५ ॥
ऐशी लागली जया तळमळ । तोचि मुमुक्षु म्हणावा निर्मल । परमेश्वर-गुरु-अनुग्रहासि पात्र केवळ । त्यावरीच
कृपा होतसे ॥ ६६ ॥; ह्याच अर्थीं पूर्वोत्तर ग्रंथकांडाचा । साध्यसाधनभाव जो साचा। तोचि ‘संबंध’ जाणावयाचा।
अनुबंधचतुष्टयांतील चतुर्थ ॥ ६७ ॥ संस्कृत ग्रंथाची सरणी पद्धत । तैशीच रचिती सुकवि प्राकृतांत । म्हणूनि
साधनचतुष्टयसहित । अनुबंधचतुष्टय आद्य निरूपिलें ॥ ६८ ॥ ग्रंथभाषा प्राकृत म्हणून । कंटाळतील विद्वज्जन ।

तथापि एकचि अर्थानुसंधान । संस्कृत-प्राकृतीं जाणावें ॥ ६९ ॥ दोन्ही चरणीं एक गति । एक क्रिया आहे दोन्ही हातीं । एक शब्दनाद द्वय श्रवणांप्रति । द्वय अधरपुटीं एक शब्द निघे ॥ १७० ॥ एक दृष्टि दोन्ही नयनीं । एक अर्थ भाषा दोन्ही । लौकिक वैदिक उभय वचनीं । उदक पाणी अर्थ एक जैसा ॥ ७१ ॥ वांकडा दिसे कृष्ण श्वेत ऊंस । परी गोडी वसे सर्वांगीं सुरस । शर्करेचें वृंदावन सकळांस । कडू न लागे कदापि ॥ ७२ ॥ समुद्रीं भरलें जरी क्षारोदक । तें उष्णकालीं मेघमंडलीं संस्कारपूर्वक । असूनि पर्जन्यकालीं सुखकारक । मधुर रुचिकर होऊनि वर्षे ॥ ७३ ॥ समुद्रीं भरलें क्षारोदक । परी त्यांतून रत्नें मौक्तिकें अमोलिक । निघतीं कैशीं सुंदर देख । तैशीं प्राकृतीं शब्दार्थरत्नें मुक्तादि ॥ ७४ ॥ मधुमक्षिका मुखांतील मध । मृगनाभींतील घेती कस्तुरी सुगंध । देवादिकांसि प्रिय असे शुद्ध । तैसें प्राकृत रसिकांसि ॥ ७५ ॥ काकविष्ठेचे होती पिंपळ । परंतु पूजिती प्रेमें सर्वकाळ । तैसें प्राकृत संस्कृत निवळ । शब्दार्थ फळ एकचि आहे ॥ ७६ ॥ ईश्वरें संस्कृत निर्माण केलें । आणि प्राकृत चोरांनीं आणिलें । ऐसें बोलणेंचि अप्रशस्त तें भले । समदर्शी न मानिती कदा ॥ ७७ ॥ परीक्षा गोडी मुख्यत्वें । हें तरी आहे अधिकारपरत्वें । जाणती अद्वेष सत्य रसज्ञत्वें । शुद्ध तत्त्वज्ञ पुरुष ते ॥ ७८ ॥ येथें द्वेष अहंकार सुटावे । वादविवाद दुःखद कलह तुटावे । संशय विटाळ सर्व फिटावे । तरीच होय जन्मसार्थक ॥ ७९ ॥ असो गुरुसंतति कुलश्रेष्ठ । अत्रिऋषि मूलपीठ । तेथून दत्तगुरु योगविद्वरिष्ठ । झाले प्रगट परमेश्वर ॥ १८० ॥ तो कथा प्रसंग रसाळ । पुढील द्वितीयाध्यायीं सकळ । गुंफियला श्रोतृजनीं निर्मळ । मानसें करूनि परिसावा ॥ ८१ ॥ स्वति श्रीगुरुलीलामृत । वेदशास्त्र पुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । मंगलाचरणाध्याय प्रथम हा ॥ १८२ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे ‘ देवतावंदनं ’नाम प्रथमोध्यायः समाप्तः ॥ १ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय दुसरा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–जन्माध्याय ॥

॥ श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरु चरणारविंदाय नमः ॥ सद्गुरुसी शिष्य विनवी । दीनावरी दया व्हावी । गुरुपरंपरा आयकावी । ऐसी उत्कंठा जाहली ॥ १ ॥ श्रीगुरुसंतती मूळपीठ । कवण स्थलीं झाले प्रकट । इत्थंभूत कथा नीट । सांगा अवीट गुरुवर्या ॥ २ ॥ पाहूनि गुरूनें योग्य जिज्ञासा । वदती श्रवण करीं रे दासा । भगवद्भक्तिज्ञानविलासा । शुद्धमानसेंकरूनी ॥ ३ ॥ पूर्णब्रह्म सनातन । निर्विकल्प निरंजन । गुणातीत अपरिच्छिन्न । भेदत्रय वर्जित ॥ ४ ॥ निराकार निरुपाधिक । परमात्मा पुरुष एक । तयासी इच्छा ‘अनेक । व्हावें’ म्हणून जाहली ॥ ५ ॥ सत्यज्ञानानंत लक्षण । सच्चिदानंदरूप निर्गुण । तया ‘अहंब्रह्मास्मि’ स्फुरण । स्वतंत्रपणें जाहलें ॥ ६ ॥ ईक्षणादि प्रवेशान्तपर्यंत । सृष्टि ईश्वरकल्पित । तस्मात् ‘एकाकी न रमत’। तोचि द्वितीय स्वेच्छित ॥ ७ ॥ माया अहंकार महत्तत्व । प्रकृति सोपाधिक शबलत्व । ब्रह्मा विष्णु महेश्वर गुणत्व । पावले ते मायिकत्वें ॥ ८ ॥ हिरण्यगर्भ विराट् नाम । समष्टी व्यष्टी स्थूल सूक्ष्म । मायाविशिष्ट-चैतन्यब्रह्म । जगत्कारण बोलती ॥ ९ ॥ अनादि स्वयंभू प्रमाण । वेद साक्षात् नारायण । पिंड ब्रह्मांड झालें निर्माण । साद्यंत वर्णी यथार्थ तें ॥ १० ॥ रजोगुणें सृष्टि रची धाता । सत्त्वगुणें विष्णु पालनकर्ता । तमोगुणें महेश्वर तत्त्वता । जगत्संहर्ता श्रुति वदे ॥ ११ ॥ त्या आनंद-ब्रह्मापासून । हीं भूतें झालीं उत्पन्न । आनंदें राहतीं निश्चयेंकरून । लयाही पावती आनंदीं ॥ १२ ॥ त्या विधात्यापासूनि मानसपुत्र । निर्माण झाले बहुत पवित्र । त्यांत सप्तऋषी विचित्र । इहामुत्रतारक ॥ १३ ॥ त्या ऋषींमाजीं श्रेष्ठ । अत्रिऋषि ब्रह्मविद्वरिष्ठ ।

पुण्यप्रौढप्रताप एकनिष्ठ । आत्मसंतुष्ट असती जे ॥ १४ ॥ ऋषिपत्नी: अनसूया सुंदर । पतिआज्ञा-सेवातत्पर । वेदोक्त
नित्य सदाचार । वास्तव्य करिती भूमंडलीं ॥ १५ ॥ त्या अत्रिऋषीनें तप केलें । जें भागवतीं चतुर्थस्कंधीं वर्णिलें ।
तेंचि येथें संक्षेपें कथिलें । प्रसंगीं संबंध कळावया ॥ १६ ॥ पूर्वीं अत्रिऋषीनें उग्रतप । कुलाद्रि पर्वतीं स्त्रीसह
अमूप । केलें शतवर्ष सानुताप । पुत्र प्राप्त व्हावया ॥ १७ ॥ पलाल अशोक काननीं । एक पायावरी उभे राहुनी ।
निर्द्वंद्व अनिलभोजनीं । अत्रिमुनी तिष्ठती ॥ १८ ॥ वाहे ‘ निर्विंध्या ’ नदी नामें । सुगंधिक स्तबक कुसुमें । तेथें वृक्षातळीं
बोधोपरमें । पत्नीसह ऋषि वसती ॥ १९ ॥ नित्य नेमें प्राणायाम । ऋषि आचरे योगसंयम । ब्रह्मपुत्र मुनिसत्तम ।
इंद्रियग्राम जिंकुनी ॥ २० ॥ प्राणायामैध अग्नि करून । त्रिभुवन दिसलें तप्यमान । मुनीच्या मूर्ध्निस्थानांतून ।
संदीपक निघतसे ॥ २१ ॥ हंसारूढ ब्रह्मदेव । वृषभारूड महादेव । सुपर्णारूढ माधव । अवलोकुनी पातले ॥ २२ ॥
महेंद्रादिक सुरवर । अप्सरा मुनि गंधर्व तुंबर । उरगासिद्ध विद्याधर । ऋषिआश्रमीं पातले ॥ २३ ॥ वस्त्रालंकार-
भूषित । कमंडलु त्रिशूल चक्र सहित । त्रैमूर्ति स्वस्वाचिन्ह गणयुक्त । ऋषिसंनिध ठाकले ॥ २४ ॥ कृपावलोकनें
हास्यवदन । भक्तवत्सल सुप्रसन्न । ऋषीनें प्रेमें विलोकून । साष्टांग नमन केलें त्या ॥ २५ ॥ पुष्पादियुक्त अंजली जोडून ।
केलें विबुधर्षभ पूजन । म्हणे धन्य भाग्य महत्सुदिन । झालों दर्शनें कृतकृत्य ॥ २६ ॥ आपण मायागुणें देवत्रय
विश्वोद्भव स्थिति प्रलय । करितां सदैव एकमय । अथवा विविध प्रधान तैं ॥ २७ ॥ जगदीश्वराख्य तत्त्व एक । तुझी
ध्यातां त्रैकालिक । तेंचि अभेद त्रयदेवात्मक । विबुध सांगती मुनिवर्या ॥ २८ ॥ तव सत्संकल्प यथाकृत । पूर्ण होईल
निश्चित । यादृशी सद्भावना मनोगत । सिद्ध होय नान्यथा ॥ २९ ॥ अथास्मदंशभूत निर्विकल्प । केवल पूर्णब्रह्म
स्वरूप । लोकविख्यात ज्ञानप्रदीप । आत्मज होतील निश्चयें ॥ ३० ॥ या प्रकारें सुरेश्वर । ऋषीस देऊनि कामवर ।

स्वस्थानीं गेले सत्वर । आनंदनिर्भर होत्साते ॥ ३१ ॥ ऐकून विबुधांचे आशीर्वचन । ऋषिपत्नीचें आनंदलें मन ।
त्रयमूर्तींचें झालें दर्शन । तप सार्थक आमुचें ॥ ३२ ॥ श्रीमद्भागवतीं चतुर्थस्कंध । मैत्रेय-विदुरसंवाद । प्रथमोध्यायीं कथा
विशद । सर्व सौख्यद असे हे ॥ ३३ ॥ श्रीगुरु वदती शिष्यालागून । मिळालें अत्रिमुनीस सुतवरप्रदान । गुरु संततीचें
मुख्य स्थान । तें केलें कथन तुज ॥ ३४ ॥ पुढें कथा वर्तली रसाळ । ऐका श्रोतेजन प्रेमळ । दत्तात्रेयोत्पत्ति निर्मळ ।
जे पुराणीं कथियेली ॥ ३५ ॥ पूर्वीं नारदें अति गहन । अपार केलें अनुष्ठान । तयासी ईश्वर झाले प्रसन्न । म्हणती
वरदान मागावें ॥ ३६ ॥ मग नारदें जोडूनि पाणी । साष्टांग नमिले चक्रपाणी । अहो विवेकचूडामणी । ब्रह्मनिर्वाणी
आपण ॥ ३७ ॥ विशुद्धसत्त्वरूप विशिष्ट । तें दर्शन व्हावें नित्य श्रेष्ठ । हेंचि वरदान मजला इष्ट । द्यावें संतुष्ट
होऊनि ॥ ३८ ॥ मग वदती शार्ङ्गधर । ब्रह्मा विष्णु महेश्वर । त्रिवर्ग होतील जरी एकत्र । कार्य साधे अनुपम ॥ ३९ ॥
हें ऐकुनी ब्रह्मवीणा वाजवित । ब्रह्मचिंतनें हर्षभरित । नारद भूमंडलीं संचरत । ऋषि-आश्रम विलोकिला ॥ ४० ॥
अत्रिऋषीच्या सदनीं । तेव्हां प्रवेशले नारदमुनी । ऋषीनें बैसवूनि आसनीं । केलें पूजन देवर्षीचें ॥ ४१ ॥ अनसूया
करीं घेउनी मुसल । कांडीत होती तंदुल । तदा अत्रिऋषि मागती जल । तृषाकुल जाहले ॥ ४२ ॥ पतिसेवाआज्ञा-तत्पर
। मुसल थांबविलें वरचेवर अधर । सुगंध शुद्धोदक रुचिकर । दिधलें सुपात्रीं आणुनी ॥ ४३ ॥ जल प्राशुनी
अत्रिमुनि शांतले । पाहुनी नारदास आश्चर्य वाटलें । धन्य पतिव्रता-सामर्थ्य चांगलें । ठेविलें मुसल अधर हें ॥ ४४ ॥
नारदऋषि कलहप्रिय । जगत्कल्याणार्थ हिंडती अक्षय । हरि गुरु नारायण जयजय । मुखें उच्चारित निघाले ॥ ४५ ॥
नारदमुनी विचारिती । आतां करावी सुलभ युक्ती । लक्ष्मीस निवेदावी सतिख्याती । वैकुंठाप्रति जाउनी ॥ ४६ ॥
नारदाचे आगमनापूर्वीं । कथा वर्तली रसिक बरवी । सावधानें श्रवण करावी । जेणें घडावी विहित पुण्यें ॥ ४७ ॥

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

विष्णुपत्नी कमला एके दिवशीं । सारूनि भोजनादि विधीसी । मनीं वाटलें पार्वतीसी । भेटावयास आज जावें ॥ ४८ ॥ रत्नखचित स्वर्णालंकार । लेवुनी अनेक परिकर । नेसुनी वस्त्रें अति सुंदर । हर्षनिर्भर झाली ते ॥ ४९ ॥ संगें घेऊनि विधि-अबला । सत्वरें निघाली कमला । करित करित संभाषणाला । गिरिजासदनीं पातल्या ॥ ५० ॥ गिरिजा सन्मुख येउनी । सासू सुना त्या दोन्ही । सन्मानें बैसविल्या उत्तमासनीं । मधुर वचनें बोलतसे ॥ ५१ ॥ कोठुनी आगमन झालें । काय वांछित आपुलें । अवश्य पाहिजे निवेदिलें । कुशल वर्तमान ॥ ५२ ॥ रमा वदे नगजेप्रति । उरगभूषा पशुपती । भिक्षु न दिसे महिवरती । कोठें गेला असे कीं ॥ ५३ ॥ उमा म्हणे शोध करी । व्रजांत मखांत बलिद्वारीं । किंवा निजला अहीवरी । कोठें असेल चाकर ॥ ५४ ॥ ऐसा करिती मिथ्योपहास । नवल वर्तलें त्या समयास । देवर्षि त्या स्थलास । अकस्मात् पातले ॥ ५५ ॥ लज्जित झाल्या पाहूनि त्यातें । देखूनियां सासवांतें । सुना आकर्षिती पदरातें । तैसें त्यांना जाहलें ॥ ५६ ॥ त्रिभुवनसंचारी मुनी । बैसविले पूजुनी सिंहासनीं । अमरनायिका मृदु वचनीं । पुसती प्रेमें तयातें ॥ ५७ ॥ या त्रैलोक्यांत कोठें असती । आम्हांसम कोण स्त्रिया सुसती । नारदा हें यथामति । विदित व्हावें आम्हांला ॥ ५८ ॥ तो कलहप्रिय वदे तया । ब्रह्मांडामाजीं एक अनसूया । महा साध्वी आदिमाया । सर्वोपमें विराजे ॥ ५९ ॥ देखिली न ऐकिली ऐसी दुजी । धन्य धन्य ब्रह्मांडामाजीं । पतिव्रता-शिरोमणी आजी । हें यथार्थ जाणावें ॥ ६० ॥ अनसूया सतीचें होतां दर्शन । अखिल सुरासुर होती पावन । तात्काल पुनित इतर जन । यांत आश्चर्य कायसें ॥ ६१ ॥ चिरकाल लक्ष्य पतिचरणीं । सती स्वधर्म सदाचरणीं । दर्शनीय अत्रिरमणी । गृहस्थाश्रमीं कुशल असे ॥ ६२ ॥ पतिसेवेंत सदा तत्पर । उभी जोडूनि दोनी कर । अभ्यागताचें निरंतर । आदरातिथ्य करीतसे ॥ ६३ ॥ तृषाक्रांत मुनी एकवेळ । म्हणती आणावें स्वच्छ जळ । सती कांडीत होती तांदुळ । ठेविलें अधर मुसळ

तें ॥ ६४ ॥ विलंब न करितां एक पळ । वरचेवर थांबविलें जड मुसळ । उठोनि गेली साध्वी तात्काळ । स्वच्छ जळ
आणावया ॥ ६५ ॥ सुंदर शुचित पात्रामधीं । रुचिकर शुद्धोदक सुगंधी । आणून दिधलें तें निरवधी । पिऊनि झाले
शांत मुनी ॥ ६६ ॥ नारद म्हणे मीं पाहिलें प्रत्यक्ष । सत्य शपथ परमेश्वर साक्ष । पतिव्रता अनसूया दक्ष । साक्षात्कारी
विशेष ॥ ६७ ॥ अग्निसूर्यादिकांचे ताप । सहसा न स्पर्शती संताप । सतीधर्म पुण्यप्रताप । शास्त्रीं अमूप वर्णिले ॥ ६८ ॥
अतएव तुमच्या गर्वोक्ती । तिजपुढें कदा न प्रवेशती । असूया गर्व शब्द नायकती । प्राज्ञजन कदापि ॥ ६९ ॥
नांवासारिखी करणी एक । 'अनसूया' नाम सार्थक । बोले तैसें वर्तें सम्यक । असूयाविरहित सर्वदा ॥ ७० ॥; निज
आगमनोत्सवाचा । हेतु तत्पतींस कळावा साचा । त्या तिहींत माजवी कलहाचा । प्रसंग मोठा नारद ॥ ७१ ॥
उमारमासावित्रीस । क्षोभविलें लावुनी कलहास । नारद नाचे करी हास । सुस्वर सुरस गायनें ॥ ७२ ॥ सतीचें
गाऊनि यश । ब्रह्मवीणा वाजवी सावकाश । भगवच्चिंतन अविनाश । करित निघाले नारद ॥ ७३ ॥ नारद लावुनी
गेले कळी । इकडे सक्रोधें तिघी तळमळी । खेदें गेल्या आपल्या स्थळीं । परी कांहीं सुचेना ॥ ७४ ॥ क्रोधागारीं विधि-
अबला । घेऊनि खाट-वाकळिला । निजली पाहुनी कळवळला । ब्रह्मलोकीं विरंची ॥ ७५ ॥ या कळिला असेल कारण ।
नारद आमचा कलहप्रवीण । मानसपुत्र सुलक्षण । शहाणपण त्या नाहीं ॥ ७६ ॥ कमलोद्भव कांतेसी म्हणे । तिळमात्र चिंता
न करणें । ऐशा सती एक क्षणें । भस्म करीन पुष्कळ ॥ ७७ ॥ कैलासीं काय वर्तलें वृत्त । श्रोतीं व्हावें सावधचित्त । अनसूया-
सती निमित्त । भडकलें पित्त उमेचें ॥ ७८ ॥ कैलासीं पाहती सदाशिव । भवानी न कोठें दिसे यास्तव । स्वप्रिया शोधितां
जीव । घाबरलासे शिवाचा ॥ ७९ ॥ जीव शिव स्वरूप एकाकार । शिव चिन्मात्र निर्विकार । परंतु स्वप्रियार्थ श्रीशंकर ।
घाबरले नवल काय हें ॥ ८० ॥ क्षोभें पार्वती रुसली । एकांतीं लपून बैसली । पाहतां गृहांत दिसली । नाहीं मृत्युंजयासी

॥ ८१ ॥ मग पुसती नंदी-गणादिकां । ते म्हणती शंकरजी ऐका । वटवृक्षाखालीं जगन्नायिका । झाली असे
निद्रिस्थ ॥ ८२ ॥ जाउनी उठविली स्वप्रिया । त्वरें आले निजालया । नारदाची कळ वायां । महादेवें जाणली ॥ ८३ ॥
निमिषांत रेणूचा सुमेरू । सुमेरूस रेणु करूं । किंवा सूर्यचंद्रादि उभे धरूं । गिरिजे तव समीप ॥ ८४ ॥ अत्यंत
दीनासी सुरेंद्र । सुरेंद्रासी फार दरिद्र । अथवा सर्वंचि सुभद्र । करूं म्हणे स्मरारी ॥ ८५ ॥ वदे शंभुसी उमारमणी ।
न साहवे अनसूयेची करणी । काय भार मशक चिमणी । दग्ध करूं क्षणांत ॥ ८६ ॥ श्रोतीं व्हावें सावधचित्त । वैकुंठीं
वर्तली कैसी मात । विष्णु लक्ष्मीतें शोधित । तें कथामृत चाखावें ॥ ८७ ॥ सेवक पाहती चोहोंकडे । रमा कोठें न
सांपडे । पडलें मोठें सांकडें । वैकुंठामाजीं सर्वत्रां ॥ ८८ ॥ सुरांमध्यें झाली गडबड । आक्रोश करिती धडाधड ।
हरीस लागलें स्त्रीचें वेड । अति अवघड वाटतें ॥ ८९ ॥ चिंताक्रांत झाले सकळ । नवस मानतां तात्काळ । ईश्वरा
मनोरथ सफळ । पूर्ण करावे आमुचें ॥ ९० ॥ गरुडानें मग शोधुनी । तलगृहांत कुजभगिनी । रमा पसरली ते देखुनी ।
केलें वंदन सद्भावें ॥ ९१ ॥ लक्ष्मीप्राप्त्यर्थ नाना उपाय । सकल जन करिती अक्षय । जपतपविद्या दिग्विजय । परी
ते दुर्लभ असेचि ॥ ९२ ॥ तलगृहांत लक्ष्मी गुप्त । ठेविती सर्व स्वकीय आप्त । अगणित असतां श्री प्राप्त । परंतु तृप्त नव्हे
जन ॥ ९३ ॥ हाचि अभिप्राय अंतरींचा । म्हणूनि तलगृहीं वास श्रीचा । असो हरीनें गरुडमुखींचा । वृत्तांत श्रवणें
आनंदले ॥ ९४ ॥ तलगृहीं जाऊनि वेगें । प्रिये कां निजलीस रागें । माधवें स्वात्मानुरागें । आलिंगिलें रमेसी ॥ ९५ ॥
कमलापती धरूनि हस्त । समजावुनी ज्ञान प्रशस्त । जगत्कार्य धुरंधर समस्त । म्हणती स्वस्थ असावें ॥ ९६ ॥ मुख्य
कलहाचें जनन । नारदाचें आगमन । अंतर्साक्षी जनार्दन । मधुसूदन समजलें ॥ ९७ ॥ म्हणती ऐशा अनेक सती ।
निमिषांत धाडूं यमलोकाप्रती । प्रिये असावें आनंदवृत्तीं । चित्तीं क्षोभ कशाला ॥ ९८ ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर । एकत्र

झाले तदनंतर। सती छळणाचा विचार। स्त्रीबुद्धीनें मांडिला ॥ ९९ ॥ ‘स्त्रीबुद्धिःप्रलयंगता’। दुःखें संकटें असंख्य। स्त्रीबुद्धीनें होत प्रलय। अधोगती लाधते ॥ १०० ॥ ब्राह्मणरूपें त्रिवर्ग। भूमंडळीं चालले भर्ग। स्त्रीबुद्धीनें सती अपवर्ग। करूं म्हणती क्षणार्धें ॥ १ ॥ ब्रह्मविद्वरिष्ठ अत्रिमुनी। पतिव्रता अनसूया पत्नी। योगक्षेम भगवद्भजनीं। काल क्षेपिती उभयतां ॥ २ ॥ सुंदर स्वच्छ ऋषिसदन। विलोकितांच वाटे समाधान। आल्या अतिथीस देती अन्न। पुजूनी सन्मानें उभयतां ॥ ३ ॥ अनसूया साध्वी-प्रमुख। जाऊं न देती अतिथीस विन्मुख। करविती प्रेमें प्रसन्नमुख। यथेप्सित अर्पुनी ॥ ४ ॥ व्हावया दर्शन ऋषिआश्रम। पूर्वसुकृत लागे उत्तम। त्रैलोक्यांत सती अप्रतिम। ‘अनसूया’ नाम विराजे ॥ ५ ॥ ऐशा पुण्याश्रमीं अतिथित्रय। येऊनि वदती क्रोधमय। इच्छाभोजन क्षुधार्तप्रिय। द्यावें शीघ्र आम्हांसी ॥ ६ ॥ मग उत्तमासनीं बैसविले। शोडषोपचारें पूजिले। पक्वान्नरसभरित पात्र मांडिलें। भोजनीं विनविलें अतिथींसी ॥ ७ ॥ साध्वी अत्यंत सुस्वरूप। कर जोडूनि उभी अतिथीसमीप। यथा रुचेल तें अमुप। वदती ग्रहण करावें ॥ ८ ॥ तुमचें लावण्य स्वरूप देखुनी। अभिलाषा उपजली मनीं। वाढावें तुम्ही वस्त्र त्यागुनी। ऐसें अतिथी बोलती ॥ ९ ॥ जरी तूं साध्वी सत्य असती। होऊनि विगतवसनेसीं। वाढावें आम्हां भोजनासी। अनसूयेसी वदती ते ॥ ११० ॥ नाहीं तरी पतिव्रतेच्या। समुदायीं निजनामाच्या। वार्ताही काढूं नये वाचा। विग्लापन व्यर्थ हो ॥ ११ ॥ ऐकूनि अतिथींचीं भाषणें। द्विजवरांसी साध्वी म्हणे। नग्न स्त्री पाहूनि होणें। काय लाभ तुम्हांसी ॥ १२ ॥ परनार मार-बुद्धीनें। परकीय नारीच्या ध्यानें। असंख्य परस्त्री-संगतीनें। नागविले जन सर्वस्वीं ॥ १३ ॥ परकांतेचा समागम। मदांध जे विषयकाम। महारौरव नरकीं आराम। पावती बंधन सकळ ते ॥ १४ ॥ मग ते असोत सुरासुर। ऋषी योगी मुनिवर। यक्ष गंधर्वादि विद्याधर। अथवा भूसुरनरेंद्र

॥ १५ ॥ परदार-नाम-ग्रहण । स्वप्नींही नसावें स्मरण । परस्त्रीलंपट दुराचरण । प्राणघातक जाणावें
॥ १६ ॥ स्त्रीसंगें सर्वस्व-नाश । परस्त्रीमुळें बंधनपाश । अतएव तीव्रवैराग्य-अंकुश । सविवेक पाहिजे
॥ १७ ॥ मारधीनें नग्न परनार-काया । पाहतां निरर्थक नर-काया । व्यर्थचि जाती रौरव नरका या । काम-मदांध
सगळे ते ॥ १८ ॥ तुम्ही अतिथी अभ्यागत । भोजन समयीं शुद्धचित्त । असावें हें शास्त्रविहित । पहा
निश्चित विचारें ॥ १९ ॥ तुमचें भाषण सत्य सुरस । बोध शास्त्रार्थ नको आम्हांस । वांछा मनीं विगत-वास ।
वाढा म्हणती अतिथि ते ॥ १२० ॥ नातरी घेऊन जाऊं सत्त्व । आम्हांसी कळतें धर्मतत्त्व । सतीस वाटलें नवल कर्तृत्व ।
आलें दैवत छळावया ॥ २१ ॥ त्रिकाल-ज्ञानी अत्रिऋषी । ब्रह्मविद्वर योगवशी । अंतरीं देखिलें विधिहरिहरासी ।
आले छळणासी आश्रमीं ॥ २२ ॥ ऐकून अतिथींचें वचन । आज्ञानुसार पतीचें ध्यान । शास्त्रविहित सद्वर्तन ।
केलें संधान सतीनें ॥ २३ ॥ निजदैवत तीर्थ करून । अतिथींवरी केलें सिंचन । तंव ते तात्काळ बालें तीन ।
गोजिरवाणीं जाहलीं ॥ २४ ॥ विगत-वसन होउनी सती । घेतलीं बालकें अंकावरती । तों स्तनीं दुग्धधारा
सुटती । मग ते पाजिती लेंकरां ॥ २५ ॥ वारंवार आलिंगन । करी पुत्रमुख-चुंबन । देव म्हणे त्रयाचें
वरप्रदान । सफल झालें आम्हांतें ॥ २६ ॥ अति लहान सुंदर बाल । हातीं न सांपडती तयांचे बाल ।
सतीसामर्थ्य वृद्ध आबाल । पाहूनि नवल मानिती ॥ २७ ॥ उभयतांसी परमानंद । दाटला प्रगटले करुणाकंद ।
ईश्वरें पूर्ण केला छंद । त्रयनंदन देउनी ॥ २८ ॥ नेसुनी सतीनें वस्त्र चांगलें । ध्वजा तोरणें उभारविलें ।
गीत वाद्यें गर्जती भले । कोंदाटलें नभ सुमुदें ॥ २९ ॥ चतुर्मुख जो प्रजापती । करी अनेक ब्रह्मांडोत्पत्ति ।
हिरण्यगर्भ स्रष्टा म्हणती । वेद वानिती जयातें ॥ १३० ॥ तो ‘ब्रह्मदेव’ अत्रिसदनीं । पाळण्यांत लोळे बाल

होउनी । जोजो रे जोजो म्हणूनी । हालवी गायनें अनसूया ॥ ३१ ॥ नारायण जनार्दन । ‘महाविष्णु’ नामाभिधान । अनंतसृष्टीचें पालन । जगज्जीवन करी जो ॥ ३२ ॥ ज्याचा महिमा पुराणीं । गाती वेदव्यासादि मुनी । जो कैवल्यमोक्षदानी । सनकादिकीं वंदित ॥ ३३ ॥ तो अत्रिआश्रमीं हरी । पाळण्यांत रुदन करी । भक्तजनांचा कैवारी । आश्चर्यकारी दयाघन ॥ ३४ ॥ कैलासराणा ‘महेश्वर’ । चंद्रमौली शिवशंकर । जो नीलकंठ गंगाधर । करी संहार पिनाकी ॥ ३५ ॥ वेद-पुराणें स्मृतिशास्त्र । रुद्रमहिमा गाती सर्वत्र । अत्युदार वरदभक्त परतंत्र । सदा स्वतंत्र निर्विकारी ॥ ३६ ॥ जो अखंड परब्रह्मानंद । सच्चिद्‌घन निर्द्वंद्व करुणाकंद । तो होउनी अत्रिबाल मंद मंद । हास्य रुदन करीतसे ॥ ३७ ॥ जो जगद्वंद्य पूर्ण सदाशिव । निर्विकल्पस्वरूप वास्तव । तो जगत्कल्याणास्तव । अत्रिबालक जाहला ॥ ३८ ॥ देवचरित्र अगम्य गहन । प्रत्यक्ष प्रमाण न अनुमान । संशय कुतर्क विकल्प त्यजून । करावें श्रवण आदरें ॥ ३९ ॥ पुढें काय नवल वर्तलें । अकस्मात नारद पातले । पाहूनि त्रैमूर्ति झालीं बालें । देवर्षि हासले गदगद ॥ १४० ॥ अत्रिऋषि अनसूया । पूजुनी म्हणती देवर्षिराया । आपण बैसविलें निजठाया । केली दया समर्थें ॥ ४१ ॥ मग नारद गेले देवलोकीं । सुरवरस्त्रियांसी एकाएकीं । कोठे गेले विधि-हरि-पिनाकी । म्हणती सांगा कीं माय हो ॥ ४२ ॥ सावित्री उमा रमा त्रिविध । नारदासी विनविती बहुविध । बहुत दिवस न पतीचा शोध । सांगा विदित असेल तें ॥ ४३ ॥ तुमचे पती अत्रि-आश्रमांत । बाल होउनी लोळती पाळण्यांत । नारदमुखें आश्चर्यवृत्त । श्रवणें झाल्या सक्रोध ॥ ४४ ॥ सावित्री गिरिजा रमा । वदती न्यावें आम्हां ऋषिआश्रमा । तिघी नारद-समागमा । येऊनि पातल्या भूवरी ॥ ४५ ॥ नारदें ऋषिआश्रम दाविला । तिघी म्हणती आंत चला । जाउनी पाहिलें बालकांला । अंगीं संचरला बहु क्रोध ॥ ४६ ॥ अनसूयेसी वदती तिघी जणी ।

शाबरी मंत्र निशिदिनीं । बैसूनि जपतीस विजनीं । तपस्विनी काय गे ॥ ४७ ॥ तूं भली सती
मांत्रिक । यंत्र तंत्रें तात्कालिक । आमुच्या पतीस केलें बालक । इंद्रजालिके काय गे ॥ ४८ ॥ मंत्र जपूनि
त्वां केलें कपटें । आमच्या पुरुषांसी धाकटें । पतिव्रतालक्षण चेटकें । शोभे नेटकें तुझें तुज ॥ ४९ ॥
क्रोध द्वेष गर्व अहंपणीं । ऐकुनी देवस्त्रियांची वाणी । बोले पतिव्रताशिरोमणी । मंजुल भाषणें विहित ॥ १५० ॥
इंद्रजाल मंत्रादिक उच्छ । काय पदार्थ शाबरी तुच्छ । भगवत्पाद-चिंतकासी स्वच्छ । कळतें सकळ त्रिकालीं ॥ ५१ ॥
बहुरूपी तुमचे पती । विदित असूनि क्षोभवृत्ती । जरी आहां मोठ्या सती । कळकळ तळमळ कशासी ॥ ५२ ॥
तुम्ही महान् पतिव्रता । त्रैलोक्यांत म्हणवितां । अहंपणा जरी गाजवितां । कां न ओळखितां पतीशी ॥ ५३ ॥
स्वपती नोळखितां तुम्ही । वृथा करितां तुम्ही आम्ही । जरी असाल साध्वी कांहीं । न्यावें ओळखून पतींतें
॥ ५४ ॥ स्वपतीचे रूप शब्द स्पर्श । नोळखिती स्त्रिया विमर्श । न सेवा तत्पर परामर्श । दुर्दर्श त्यां बोलिजे
॥ ५५ ॥ अंतर्बाह्य मर्यादा खुणें । स्वपतीस जाणणें न ओळखणें । ऐसें असूनि कोप करणें । नव्हतीं लक्षणें
सतीचीं हीं ॥ ५६ ॥ निजपतीस ओळखित नसल्या । त्या म्हणाव्या पतिव्रता कसल्या । पतिधर्मीं न गेल्या कसल्या ।
असल्या काय कामाच्या ॥ ५७ ॥ मग सावित्री लक्ष्मी उमा । त्यागुनी राग गर्व रिकामा । अज्ञानें नेणों आपला
महिमा । म्हणती क्षमा करा हो ॥ ५८ ॥ पतिव्रताधर्म निपुण । अनसूया जगन्माता आपण । आलों अनन्यैक
शरण । द्यावें दान पतींचें ॥ ५९ ॥ अनसूया वदे हो सुरांगना । यथा पालिते त्रयनंदना । मी सासू तुम्ही
सुना । सुखें नांदा श्वशुरगृहीं ॥ १६० ॥ पतीसह तुम्ही येथें वास । करा धरा गे विश्वास । पावाल परमानंद
सुवास । नका उदास होऊं गे ॥ ६१ ॥ स्वस्त्रियांसि पाहुनी सुरवर । मातोश्रीचें दुग्ध प्रियकर । स्तनपान

करिती क्षुधातुर । चमत्कार देखती सगळे ते ॥ ६२ ॥ जे महेश्वर विष्णु प्रजापती । स्थिति संहार सृष्टी करिती । अनसूया-स्तनपानें तृप्त होती । आश्चर्य मानिती सुरासुर ॥ ६३ ॥ सतीदुग्ध पुष्टिरुचिकर । बलायुष्य यश तेज हिततर । परमामृताहूनि स्वाद परिकर । म्हणूनि त्रिवर्ग प्राशिती ॥ ६४ ॥ अथवा सृष्टीचीं कार्यें करितां । श्रमती कष्टें व्यवहारितां । क्षणमात्र विश्रांती स्वस्थता । भोजनादिकीं न मिळेचि ॥ ६५ ॥ ते व्हावे श्रमपरिहार । निवृत्त व्हावी क्षुधा प्रखर । विश्रांतिप्राप्त्यर्थ चराचर । धुंडूनि आले ऋषि आश्रमीं ॥ ६६ ॥ ऐशा सतीचें मधुर दुग्ध । अति दुर्लभ तें उपलब्ध । म्हणूनि उत्तम योग प्रारब्ध । बाल होऊनि प्राशिती ॥ ६७ ॥ जरी मोठे हे देवत्रय । कोठून मिळे यांना सुसतीचें पय । हाचि जाणूनि अभिप्राय । स्तनपान करिती अवश्य ते ॥ ६८ ॥ महत्त्वामुळें महतांसी । इष्ट कार्य साधावयासी । लज्जा विचार वाटे मानसीं । यदर्थ हौसें शिशु झाले ॥ ६९ ॥ गलिताहंकृतीवांचून । कांहीं न साधे प्रियसाधन । शांत व्हावया भूक तहान । करिती स्तनपान सुखावह ॥ १७० ॥ अनसूया सती अलौकिक ॥ दुग्ध परम पुरुषार्थदायक ॥ आत्मतृप्त्यर्थ पीती सान बालक । अघटित कौतुक मायेचें ॥ ७१ ॥ हा पुत्रसोहळा पहाण्यासाठीं । विमानांची झाली दाटी । अत्यादरें स्वर्णपुष्पवृष्टी । सुरवर करिती अखंड ॥ ७२ ॥ ऋषि योगिजन उत्कृष्टविश्राम । ब्रह्मकैवल्य परंधाम । कृतयुगीं गुरु पुरुषोत्तम । अत्रि-आश्रमीं प्रकटले ॥ ७३ ॥ मार्गशीर्ष शुक्लपक्षीं । भूतातिथी मंदरोहिणी ऋक्षीं । त्रैमूर्ति हे सायान्हीं सुराध्यक्षीं । अंतर्साक्षी जन्मले ॥ ७४ ॥ सुरमासीं शुक्लातिथि चवदावी । दत्तावतार मोक्षसुख चव दावी । दासें लीला म्हणूनच वदावी । जगद्गुरूची सर्वदा ॥ ७५ ॥ ब्रह्मावतार तो ‘सोम’ । रुद्रावतार ‘दुर्वास’नाम । विष्णुस्वरूप ‘दत्त’ परम । सर्वांसी मान्य योगीश्वर ॥ ७६ ॥ अंशअंशी जावे भाव । यदर्थ पूर्णावतार-संभव । परमार्थ-संसिद्ध-योग-

वैभव । शुद्धाधिकारी जाणती ॥ ७७ ॥ भृगु आदिक ऋषि-संमत । चतुर्दशी बुध मार्गशीर्ष शुक्लांत । उच्चस्थ ग्रह-
पंचक विख्यात । वृषभलग्नीं प्रगटले ॥ ७८ ॥ सोम चंद्रमंडलीं निश्चितीं । दुर्वास तीर्थयात्रे जाती ।
त्रयदेवात्मक घडली मूर्ती । होऊनि स्थिती एकत्र ॥ ७९ ॥ विधाता-नारायण-पंचवक्त्र । मिळून झाले एकत्र ।
विशुद्धसत्त्वैकस्वरूप स्वतंत्र । अवतरले सर्वत्र सुखप्रद ॥ १८० ॥ स्कंदपुराणींचें वचन । दत्तात्रेयोत्पत्ति कथन । मार्गशीर्ष
शुक्ल पौर्णिमादिन । प्रदोषव्यापिनी रविवारीं वर्णिलें ॥ ८१ ॥ अत्रीस त्रैमूर्तींनीं वर दिधले । तेचि त्रयमूर्ति अवतरले ।
'देवदत्त' म्हणूनि नाम ठेविलें । दत्तात्रेय ईश्वर ॥ ८२ ॥ अनसूया अत्रि आनंदले । प्रत्यक्ष ईश्वर पुत्र जाहले । कृतकृत्य
उभयतांस वाटलें । वर्णिलें स्कंदपुराणीं हें ॥ ८३ ॥ असो येऊन बैसले सुरवर । गुरुस्तव करिती अपार । श्रोतीं
ऐकावें इहपर । सर्व सुखकर चरित हें ॥ ८४ ॥ जयजय दत्तात्रेय योगीश्वर । परम गुरुवर्य परात्पर । केवल
मोक्षप्राप्त्यर्थ अवतार । लोकहितकर आपला ॥ ८५ ॥ धर्मार्थ-काम-मोक्ष । चतुर्विधपुरुषार्थदाता दक्ष ।
अस्तिभातिप्रियरूप प्रत्यक्ष । पूर्णब्रह्म आपण ॥ ८६ ॥ अलक्ष्य निरंजन अवधूत । भक्तवत्सल त्रैलोक्यपूजित ।
त्वत्कृपें स्वार्थ परमार्थ प्राप्त । होईल निश्चित समस्तांसी ॥ ८७ ॥ मुक्त-मुमुक्षु-साधकांला ।
दिसे सत्य ज्ञानार्क प्रकाशला । पाहूनि बाललीलाविनोदाला । म्हणती साधलें निजकार्य ॥ ८८ ॥
अनसूयात्मज दत्त परमात्मा । भक्तकार्यकल्पद्रुमा । योगी ऋषी समस्त महात्मा । स्तविती सर्वदा भक्तीनें ॥ ८९ ॥
देवतांसी मोक्षगतिप्रद । सुराध्यक्ष सकल सुरानंद । अनवद्य लोकवंदित वरद । त्रिकालज्ञ धर्मवत्सल ॥ १९० ॥
सुरेंद्रसह सकल अमर । सनक सनंदन सनत्कुमार । नारद यक्ष गंधर्व तुंबर । गाती सुस्वरें गुरुवर्या ॥ ९१ ॥
भारद्वाज अंगिरस याज्ञवल्क्य । जमदग्नि अगस्ति कौशिक । मार्कंडेय धौम्य वाल्मीक । गुरुस्तव करिती ते ॥ ९२ ॥

गौतम गर्ग व्यास कपिल । अत्रि भार्गव वत्स मुद्गल । वशिष्ठ वामदेव पतंजल । प्रार्थिती परमपुरुषातें ॥ ९३ ॥
अत्यादरें दक्ष विनायक । महारुद्र स्वामी कार्तिक । भृगु कश्यप जैमिनी शुक । सूत शौनक स्तवितात ॥ ९४ ॥
पराशर मांडव्य कात्यायन । शांडिल्य मरीचि दलादन । धारण्य कौंडिन्य वैशंपायन । दत्तदर्शनार्थ पातले ॥ ९५ ॥
बकदालभ्य कण्व वरुण । पौतिमाष्य अरुण कक्षायण । कर्दम पौलस्त्य दध्यंगाथर्वण । गुरुदर्शना पातले
॥ ९६ ॥ आश्वलायनादि नैध्रुव । जाबाल उद्दालक गालव । पुलहक्रतु शृंग बाभ्रव । वंदनार्थ सर्व ठाकले
॥ ९७ ॥ स्वयंप्रकाश चिद्घनमूर्ति । प्रगटली अत्रि-आश्रमीं ख्याती । अग्नि सूर्यादिक बृहस्पती । चतुर्वेद
स्तविती सनातना ॥ ९८ ॥ सुरवरादिकांच्या स्त्रिया । आल्या वंदनार्थ अनसूया । ऋषिपत्न्यादिक दत्तात्रेया ।
ओवाळिती सप्रेमें ॥ ९९ ॥ गोदावरी यमुना सरस्वती । तुंगा कृष्णा भागीरथी । नर्मदा सिंधु सकल अपांपती ।
स्नान घालिती दत्तात्रेया ॥ २०० ॥ तापी मही कावेरी भीमा । प्रवरा गोमती भामा । सुगंधिक उष्ण जलें
पुरुषोत्तमा । स्नान घालिती आनंदें ॥ १ ॥ वेदवेत्ते सकल विद्वज्जन । पंडित आचार्य ब्रह्मवादिन । मुक्त मुमुक्षु
विषयी येऊन । घालिती लोटांगण शरणत्वें ॥ २ ॥ योगी भोगी विरागी यती । जटिली ब्रह्मचारी नियती । अनेक
वेषधारी येती । श्रीगुरुमूर्तिदर्शना ॥ ३ ॥ सदाचारी ब्राह्मण वैदिक । मंत्र म्हणती वेद शांतिपाठक । धर्मशास्त्री
ग्रहगणक । फलसम्यक वाचिती ॥ ४ ॥ मंगलवाद्यें वाजती । बंदीजन सद्यश गाती । ब्रह्मांडांतर्बाह्यवर्ती ।
परमानंद व्यापिला ॥ ५ ॥ गुरुदत्त-नामाचा गजर । स्तुति करिती सुरासुर नर । नमस्कार
जयजयकार । विश्वाकार भरलासे ॥ ६ ॥ धन्य धन्य पतिव्रता निरुपमा । त्रैलोक्य धावलें ऋषिआश्रमा ।
पुष्पें वर्षती अपूर्व महिमा । निगमागम गर्जती ॥ ७ ॥ ‘सर्वं विष्णुमयं जगत्’ । भरलें ब्रह्मचैतन्यपूरित ।

जे श्रीदत्तात्रेय हरि साक्षात् । हृदयस्थ ते प्रगटले ॥ ८ ॥ किंचितही न स्पर्शतां विकार । निराकार चिद्घनसे साकार । देवस्त्रिया वदती बहुत संवत्सर । झाले वरवियोगासी ॥ ९ ॥ देवस्त्रिया वारंवार नमिती । कृपा करून द्यावें दानपति । ऐकुनी सतीनें तीर्थसिंचनें मागुती । केले पुरुष पूर्ववत् ॥ २१० ॥ हें पाहून सर्वांसी वाटलें आश्चर्य । म्हणती धन्य धन्य सती ऋषिवर्य । नारद वदे साधलें कार्य । अमरार्य झाले एकत्र ॥ ११ ॥ मग त्रैमूर्ति वदती नारदा । आमचें अभेदत्वें दैवी संपदा । विशुद्धसत्त्वैक विलोकी सर्वदा । दत्त परमेश्वरस्वरूप ॥ १२ ॥ तुझेनि मिषें जगतासी परम लाभ । योगी परम भास्कर स्वप्रभ । दत्तजयंती उत्साह समारंभ । करा अदंभ प्रतिवत्सरीं ॥ १३ ॥ जनकजननीस नमूनी । चंद्र दुर्वास गेले स्वस्थानीं । विष्णुरूप साक्षात् दत्त महामुनी । राहिले सदनीं ऋषीच्या ॥ १४ ॥ समस्त घेती तीर्थ प्रसाद । भोजनीं तृप्त झाले विशद । दत्तगुरूचा जय स्तुति वाद । सुरनरवृंद करिताति ॥ १५ ॥ माला-जटामुकुट-मंडित । वस्त्रालंकारभूषित । रत्नसिंहासनीं स्थित विराजित । श्रीमद्दत्त सुरेश्वर ॥ १६ ॥ दत्तावतार पूर्णषोडशकला । जन्मोत्साह करितां कलाविकला । आपदा चिंता जाती सकला । भक्तीस विकला जगदीश ॥ १७ ॥ मार्गशीर्षमासीं प्रतिवत्सरीं । दत्तजयंतीउत्साह आदरीं । पुराण कीर्तन शक्त्यनुसारीं । विप्रभोजन करावें ॥ १८ ॥ विधि-नारायण-हरात्मक । विशुद्धसत्त्वस्वरूप एक । ध्याती भुक्तिमुक्तिप्रदायक । विश्वव्यापक सर्वदा ॥ १९ ॥ पुत्रारोग्य-विवर्धन । कर्मपाश-प्रभंजन । परकायप्रवेश-साधन । साध्य होय तत्कृपें ॥ २२० ॥ लंबिकादि अखिल योगोपदेष्टा । प्रणवाकार ब्रह्मपुच्छप्रतिष्ठा । सर्वांतर्यामी स्वामी द्रष्टा । अर्चितां जाती कष्ट दैन्य ॥ २१ ॥ (श्लोक) दकारोऽज्ञानदग्धा च । तकारस्तत्त्वमव्ययं । दत्तस्मरणमात्रेण । पुनर्जन्म न विद्यते ॥ १ ॥

नित्य केलिया श्रीगुरुभक्ती । पुत्रपौत्र लक्ष्मी विद्या प्राप्ती । राजमान्य विजयी दीर्घायु होती । असंदेह गुरुकृपें
॥ २२ ॥ भूतप्रेतपिशाचादि-समंधा । डाकिनी शाकिनी सर्व बाधा । प्रशमन होय सिद्धि प्राप्त सिद्धा ।
दत्तात्रेय-आराधनें ॥ २३ ॥ ब्रह्मात्मविज्ञानें साक्षात्कार । जीवन्मुक्त होती नर । चिंतितार्थ सर्व सिद्धीश्वर ।
प्रसादें लाधे निरंतर ॥ २४ ॥ या ग्रंथाचे नित्य पठणें । सर्व सिद्ध निःशंक होतें श्रवणें । गृहीं हा ग्रंथ
संरक्षणें । दत्तदर्शन होईल ॥ २५ ॥ ऐसें सुरवर वरप्रदाना । देऊन गेले मुदित स्वस्थाना । वस्त्रालंकार
दक्षिणा दाना । ऋषीनें दिधलें यथायोग्य ॥ २६ ॥ पूर्ण लीला मुनीश्वर । वदविता स्वयें दत्तदिगंबर । स्वामी
समर्थ श्रीगुरुवर । हृदीं निरंतर वसूनियां ॥ २७ ॥ गुरुलीलामृत सुरस ग्रंथ । त्याचा तोचि वदवी समर्थ ।
शुद्धाधिकारी रसज्ञ यथार्थ । परमार्थबुद्धी जाणती ॥ २८ ॥ गुरुपदीं काया वाचा मन । अर्पुनी निजरंगीं
रंगला वामन । पुढें कथाप्रसंग वर्णन । श्रोतीं सावधान परिसावें ॥ २९ ॥ इति श्रीगुरुलीलामृत ।
श्रुतिस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामन विरचित । द्वितीयाध्याय सुरस हा ॥ २३० ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय तिसरा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त स्वामीसमर्थ ॥

॥ श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ शिष्य विनवी श्रीगुरूसी । द्वितीयाध्यायीं दत्तात्रेयोत्पत्तीसी ।
मूलपीठ गुरुसंततीसी । साद्यंत कथिलें आपण ॥ १ ॥ पुढें काय सांगा वर्तलें । कोण्या स्थानीं कवणरूपें प्रगटले ।
मानस माझें उत्कंठित झालें । अवतारचरित्र ऐकावया ॥ २ ॥ गुरु म्हणती परमपवित्र । अत्यंत रहस्य अवतारचरित्र ।
ऐकतां धनधान्यादि पुत्रपौत्र । चारी पुरुषार्थ लाधती ॥ ३ ॥ श्रीमद्भागवतीं प्रथमस्कंधांत । तृतीयाध्यायीं अवतारचरित्र ।
सूतें कथिलें शौनकादि ऋषींप्रत । तेंचि सावधानें परिसावें ॥ ४ ॥ सूत सांगती ऋषिजनांतें । सृष्टीचे प्रारंभीं भगवंतें ।
सकल चराचर विश्वोत्पत्तीतें । करावया कारणें ॥ ५ ॥ धारण केला ‘पुरुषावतार’ । तें पुरुषस्वरूप महत्तत्त्व अहंकार ।
आणि पंचभूतसह तन्मात्र । इहीं उत्पन्न झालेलें ॥ ६ ॥ शब्द स्पर्श रूप रस गंध । हे पंच विषय तन्मात्रा प्रसिद्ध । यायोगें
उद्भवलेलें षोडशविध । अंशांनीं युक्त असे जें ॥ ७ ॥ पंच ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंद्रियें पंच । मन आणि महाभूतें पंच । ह्या
षोडशकलायुक्त साच । सूक्ष्मभूत असा जो ॥ ८ ॥ प्रलय समुद्रीं पावूनि विश्रांति । निद्रा समाधि रूप स्थिति । करणारा
जो ब्रह्मांडपति । पुरुषावतारी नारायण ॥ ९ ॥ त्याच्या नाभीरूप डोहांतील । कमलापासूनि ब्रह्मदेव सबल । जो विश्व
स्रष्ट्याचा स्वामि केवल । उपजला तो परमेष्ठि ॥ १० ॥ तें भगवंताचें कैसें स्वरूप । जें निरतिशय-विशुद्धसत्त्वरूप ।
त्या ईश्वराचें अवयव रूप । उत्तमाधारेंकरूनी ॥ ११ ॥ विश्वरचनेचा विस्तार । कल्पिला आहे साचार । त्या स्वरूपासी
योगी निरंतर । ज्ञानचक्षूंनीं विलोकिती ॥ १२ ॥ असंख्यात मुख मस्तकीं । चरण ऊरु भुज कर्ण नेत्र नासिकीं । मुकुट

कुंडलें वस्त्रेंभूषणादिकीं । शोभायमान दिसतसे ॥ १३ ॥ ज्या आदिनारायणापासून । ब्रह्मदेव जाहला उत्पन्न । त्या ब्रह्मदेवापासून । मरीच्यादिक ऋषि जाहले ॥ १४ ॥ त्या ऋषींनीं देव मनुष्यादिक । उत्पन्न केले पशुपक्ष्यादि देख । आदिनारायणाचे अवतार अनेक । जगत्कल्याणा जाहले ॥ १५ ॥ ब्राह्मणरूपी प्रथमावतार । धारण केला 'सनत्कुमार'। नैष्ठिक्य ब्रह्मचर्य व्रत निरंतर । साध्य करूनि आचरिलें ॥ १६ ॥ पाताळीं पृथ्वी नेली हिरण्याक्षानें । म्हणूनि त्या यज्ञाधिपति देवानें । उद्धरिली वराह-स्वरूपानें । दैत्यविध्वंस करूनी ॥ १७ ॥ त्या देवें ऋषिवंशानंतर । 'नारद' नामक तृतीयावतार । घेऊन पंचरात्रागम नामक तंत्र । कथन केलें सविस्तर ॥ १८ ॥ त्या वैष्णव तंत्रमार्गें कर्म । केलेलें होतें निष्काम । तें कर्म मुमुक्षुजनांस परम । मोक्षप्रद होतें हो ॥ १९ ॥ त्या नारायणें चतुर्थावतारीं । धर्म नामें ऋषि संतती माझारीं । 'नर-नारायण' दोन प्रकारीं । ऋषिस्वरूपें धरियेलीं ॥ २० ॥ चित्त शांतताकारक । इतरांसी बहुधा-अशक्य । ऐसा तपश्चर्या मार्ग सम्यक् । नरनारायणीं दाविला ॥ २१ ॥ पांचवा सिद्धांचा ईश्वर । धरूनि 'कपिल' नामक अवतार । असुरि नामें ब्राह्मणांस सांख्यशास्त्र । कपिल मुनीनें कथिलें तें ॥ २२ ॥ ज्यांत तत्त्वांचा समुदाय । सांगितलासे यथार्थ निर्णय । तेंचि सांख्यशास्त्र म्हणती आर्य । कपिलमहामुनीचें ॥ २३ ॥ षष्ठावतार 'श्रीदत्तात्रेय'। योगाधीश्वर सद्गुरु अद्वितीय । ऋषि-मुनि-योग्यादिकांसी अक्षय । महादाश्रय होय जो ॥ २४ ॥ अलर्कराजा प्रऱ्हादास । यदु सहस्रार्जुन इत्यादिकांस । दत्तात्रेयें आत्मविद्या बोधूनि सुरस । कृतकृत्यता अर्पिली ॥ २५ ॥ ज्या प्रख्यात यदुवंशांत । अवतरले श्रीकृष्ण भगवंत । त्या यदुराजासी मोक्षपद प्राप्त । दत्तात्रेयकृपें जाहलें ॥ २६ ॥ नंतर रुचि नामें प्रजापतीपासून । आकूती भार्योदरीं उत्पन्न । 'यज्ञ' जयाचें नामाभिधान । तो सप्तमावतार जाहला ॥ २७ ॥ त्यानें याम नामक म्हणून । देवगणांसहवर्तमान । स्वायंभूवमन्वंतराचें संरक्षण । केलें निज पराक्रमें ॥ २८ ॥ अष्टमावतार 'ऋषभ' नामक ।

नाभिराजा ज्याचा जनक । मेरुदेवी स्त्रीचे उदरीं सम्यक् । जन्म झाला ऋषभाचा ॥ २९ ॥ गृहस्थादिक सर्वाश्रमांतील । लोकीं वंद्य धैर्य सबल । पुरुषें सेवावयासी निर्मल । योग्य ऐसा मार्ग जो ॥ ३० ॥ परमहंस योग्यांचा मार्ग । स्वयें आचरूनि यथासाङ्ग । ऋषभें जनांसी दाविला योग । पमरहंस मार्ग तो ॥ ३१ ॥ पूर्वीं वेन नामें नृप । मृत्यु पावला होऊनि ऋषिशाप । तेव्हां अराजक प्रजा भय ताप । पावली ऐसें निरखुनी ॥ ३२ ॥ त्या जगदीश्वराचें स्तवन । करिती अपार ऋषिजन । तदा नारायणें ‘पृथु’ नामें म्हणून । नवमावतार घेतला ॥ ३३ ॥ गोरूपिणी पृथ्वीचें दोहन । त्या पृथुरायें उत्तम करून । दुग्धरूपी सर्वौषधि काढून । केली ख्याति त्रिलोकीं ॥ ३४ ॥ तैसेंचि चाक्षुष मन्वंतरांत । सकल समुद्र प्रलयकालवत् । एकत्र झाले तेव्हां तो भगवंत । ‘मत्स्यावतार’ घेतसे ॥ ३५ ॥ कौतुकें मत्स्यरूप धरून । पृथ्वीरूप नौकेंत बसवून । सत्यव्रत राजाचें संरक्षण । केलें दशमावतारीं ॥ ३६ ॥ तोचि राजा सत्यव्रत । पुढें जाहला मनु वैवस्वत । सूत शौनकादि ऋषीप्रत । हें कथानक सांगतसे ॥ ३७ ॥ पूर्वीं देव आणि दानव । अमृताच्या प्राप्तीस्तव । समुद्रीं मंथन करीत होते जंव । तंव नवल काय वर्तलें ॥ ३८ ॥ बुडूं लागला मंदराचल । तेव्हां तो परमेश्वर दयाल । एकादशावतार प्रबल । कूर्मरूप जाहला ॥ ३९ ॥ ‘कूर्मस्वरूप’ करूनि धारण । तो मंदराचल पर्वत जाण । निज पृष्ठभागावरी धारण । केला सहज भगवंतें ॥ ४० ॥ तोचि पुन्हां परमेश्वर । ‘धन्वंतरी’ नामें द्वादशावतार । धरूनि सुरासुरांसी साचार । अमृत-कलश देतसे ॥ ४१ ॥ तो देव त्रयोदशावतारीं । ‘मोहिनी’ स्वरूपास धरी । चातुर्यें दानवांसि मोहित करी । देवांस अमृत पाजितसे ॥ ४२ ॥ मग त्या ईश्वरें चवदावा । धरिला ‘नृसिंहावतार’ बरवा । स्तंभीं प्रकटूनि सर्व देवां । प्रल्हादभक्ता संरक्षिलें ॥ ४३ ॥ ब्रह्मवरें अति दुर्जय । झालेला हिरण्यकश्यपु दैत्य । अंकीं घेऊनि तयाचें पारिपत्य । केलें भक्ताकारणें ॥ ४४ ॥ बुरुड जैसा लव्हाळ्यांचें । विदारण करितो त्यापरी साचें । नृसिंहें स्वनखांनीं

दैत्याचें । विदारण केलें क्रोधभरें ॥ ४५ ॥ नंतर श्रीहरि नारायण । करी पंधरावा ‘वामनावतार’ धारण । बलिराजाचें
सर्वस्व हरण । करावें ऐशा हेतूनें ॥ ४६ ॥ बलिराजाच्या जाऊन मखांत । त्रिपाद भूमीची याचना करित । महादाता
बलिराजा वदत । यथेप्सित घेईं रे ॥४७॥ त्रय पावलांत बलिपासून । सर्वस्व घेतलें हरून । स्वर्गींचें राज्य इंद्रासि देऊन ।
वामनें विश्व सुखी केलें ॥ ४८ ॥ सोळावा अवतार ‘परशुराम’ । ब्राह्मणकुलांत घेऊनि जन्म । ब्राह्मणद्रोही नृपांसी
यमलोकीं धाडी भार्गव ॥ ४९ ॥ ब्राह्मणांचा द्रोह करणारे दुष्ट । खल छलक राजे पापिष्ट । तन्नाशार्थ एकवीस वेळ स्पष्ट ।
भार्गवें निःक्षत्रिय पृथ्वी केली ॥ ५० ॥ पराशरापासून सत्यवतीचे उदरीं । ‘व्यास’ जन्मले सत्रावे अवतारीं । ‘व्यासो
नारायणः साक्षात्’ हरि । परोपकारी सर्वदा ॥ ५१ ॥ अल्प मंदबुद्धीचे जन । त्यांना ज्ञान प्राप्त व्हावें म्हणून ।
वेदरूप वृक्षाच्या अनेक शाखा करून । रचिलीं सूत्रें भाष्यादिक ॥ ५२ ॥ अठराव्या अवतारीं नारायण । ‘रामचंद्र’ रूप
करूनि धारण । देवकार्यार्थ सीतारमण । वानरसाह्य घेतसे ॥ ५३ ॥ कपिकरीं सेतूबंधन । करूनियां समुद्रतरण ।
श्रीरामचंद्रें रावण कुंभकर्ण । सहपरिवारें वधियले ॥५४॥ एकुणवीस आणि वीस। हे दोन अवतार सुरस। धरूनि ‘श्रीकृष्ण’
‘बलराम’ रूपास । कंसादिक वधियले ॥ ५५ ॥ श्रीकृष्ण आणि बलराम-। रूपें यादववंशीं घेऊनि जन्म । दावूनि लीला
अद्भुत परम । भूभार हरण केला हो ॥ ५६ ॥ पुढें कलियुग प्राप्त झालें । दानव देवद्वेष करूं लागले । मग त्या देवें
बुद्धरूप धरिलें । दैत्यांसी मोहित करावया ॥ ५७ ॥ एकविसावा ‘बुद्धावतार’ । गया प्रदेशांत साचार । बुद्धनामक
जैनपुत्र । तो भगवंत होतसे ॥ ५८ ॥ नंतर कलियुगाच्या अंतीं । अधर्मरत सकल भूपति । प्रजाधनापहारी चौर्यवृत्ति ।
दुराचरणी निपजती ॥ ५९ ॥ मग तो देव जगत्पालक । ब्राह्मणकुलीं विष्णुयशा नामक । द्विजभार्योदरीं ‘कल्की’-
अवतार देख । जगत्कल्याणा घेईल ॥ ६० ॥ कुमार नारद मनु स्वायंभुवादिक । देवत्रय सृष्टि-स्थिति-संहारकारक । महा

* * *

तेजस्वी मनुपुत्र सम्यक् । आणि कश्यपादि प्रजापति ॥ ६१ ॥ हे सकलही अवतार । त्या परमेश्वराचेचि होत साचार । आणि श्रीकृष्णावतार । तोही पूर्णब्रह्मस्वरूप असे ॥ ६२ ॥ या ईश्वरावतारचरित- । श्रवणें पठणें होय यथेप्सित । भागवतीं आद्यस्कंधीं तृतीयाध्यायांत । असे तेंचि वर्णिलें ॥ ६३ ॥ आतां ज्योतिषादिशास्त्रयुक्त चतुर्युगोत्पत्ति बोलिजेत । अवतार कोणकोणते युगांत । जाहले तेही परिसावे ॥ ६४ ॥ अचिंत्य अव्यक्त निराकार । निर्गुण स्वरूप गुणात्मक साचार । जे समस्त जगदाधार । त्या ब्रह्ममूर्तीस नमियेलें ॥ ६५ ॥ सूर्यसिद्धांतानुसार । समस्त जगदुत्पत्ति स्थिति संहार । यासी कारण ब्रह्म साचार । परमायुर्वर्षशत बोलिलें तें ॥ ६६ ॥ चतुर्युगें सहस्रवेळां जाती । तेव्हां पितामहाचा दिवस म्हणती । ऐसे ब्रह्मयाचे दिन सहस्र होती । तदा विष्णूची एक घटिका ॥ ६७ ॥ ऐशा विष्णूच्या द्वादशलक्ष घटी । तेव्हां कलार्ध संख्या होते धूर्जटी । रुद्रसंख्या कलार्ध दशकोटी । तदा ब्रह्माक्षर होतसे ॥ ६८ ॥ चतुर्युगांचा ऐक्यसंयोग । त्यासी म्हणती ‘महायुग’ । संधि-अंशांचे वेगळे भाग । शास्त्रामाजीं कथियेले ॥ ६९ ॥ कृत त्रेता द्वापार कलि चार । ऐसीं युगें एकाहत्तर । पर्यंत एका मनूचा कालाधिकार । ते चतुर्दश मनु बोलिजेत ॥ ७० ॥ ब्रह्मदेवाच्या अहोरात्रांत । चतुर्दश मनु होऊनि जात । तयांचीं नामें परिसावींत । विधीच्या प्रथम दिवसापासून ॥ ७१ ॥ स्वायंभुव स्वारोचि उत्तम । तामस रैवत चाक्षुष षष्ठम । वैवस्वत मन्वंतर सप्तम । सांप्रत चाललें असे हें ॥ ७२ ॥ वर्तमान वैवस्वतसप्तमें । मन्वंतरें अष्टाविंशतितमे । कलियुगे चरण प्रथमे । संधौ भविष्यंति मनवः ॥ ७३ ॥ पुढें होणारे मनु सात । त्यांचीं नामें शास्त्रविहित । अनुक्रमें श्रोतीं सावधचित्त । होऊनियां परिसावीं ॥ ७४ ॥ सावर्णि दक्षसावर्णि । धर्मसावर्णि रुद्रसावर्णि । ब्रह्मसावर्णि रोच्यसावर्णि । भौत्यसावर्णि सातवा ॥ ७५ ॥ ऐसे हे मनु चतुर्दश । शास्त्रीं वर्णिले सावकाश । या ग्रंथीं तयांचा समावेश । बालबोधार्थ केलासे ॥ ७६ ॥ आतां सांगूं द्वीपप्रकारा । सप्तद्वीपा

वसुंधरा । जंबु प्लक्ष शाल्मली कुश ध्यानीं धरा । क्रौंच शाक पुष्कर ॥ ७७ ॥ ही पृथ्वी नवखंड ।
शास्त्रीं वर्णिलें जें अखंड । भारतवासी हो जन उदंड । श्रवण करा नामें त्यांचीं ॥ ७८ ॥ इलावृत्त भद्राश्व
हरिवर्ष । केतुमाल रम्यक हिरण्मय । कुरु किंपुरुष भारतवर्ष । बोलिलीं नवखंडें वसुधा ही ॥ ७९ ॥ त्या प्रथम श्रेष्ठ
जंबुद्वीपीं । ब्राह्मण क्षत्रिय वैश्यादि प्रतापी । वसती स्वधर्मरत सुस्वरूपी । हें आपणांस उमजावें ॥ ८० ॥ दशभाग
जंबुद्वीपाचे । कळावे आर्य हो आम्हांस आमचे । निजशास्त्ररहस्य स्वहिताचें । कल्याणकारक समजावें ॥ ८१ ॥
कुरु चंद्र सौम्य वरुण । नाग कुमारिका ताम्रपर्ण । गभस्तिमत् कशेरु ऐंद्र हे जाण । दशभाग जंबुद्वीपाचे ॥ ८२ ॥
आतां ऐका सप्तसमुद्र मनोरम । लवण इक्षु क्षीर दधि घृत पंचम । मधुमय अमृतमय सप्तम । मुख्य जलधि हे वर्णिले
॥ ८३ ॥ आतां वर्णूं चतुर्दशलोक । अधोर्ध्व ऐका हो सकळिक । सप्तपाताल अधोलोक । तत्त्वज्ञपुरुषें कथिले कीं ॥ ८४ ॥
तल अतल वितल सुतल । तलातल रसातल । सप्तम तें म्हणिजे पाताल । हे अधोलोक निवेदिले ॥ ८५ ॥
भूर्लोक भुवर्लोक स्वर्लोक । महर्लोक पांचवा जनोलोक । तपोलोक सप्तम सत्यलोक । हे ऊर्ध्वलोक बोलिले ॥ ८६ ॥
चतुर्दशलोक कथिले वचनीं । आतां सांगूं चौऱ्यांशीं लक्ष योनि । पुराणांतरीं कित्येक स्थानीं । शास्त्रकारीं लिहिल्या ज्या
॥ ८७ ॥ नवलक्ष उदकीं जलचर । वीसलक्ष योनि स्थावर । कृमि गणत्रि लक्षरुद्र । दशलक्ष पक्षीयोनि होय
॥ ८८ ॥ पशुयोनि त्रिंशल्लक्ष । मनुष्ययोनि चतुर्लक्ष । ऐशा योनि चतुराशीति लक्ष । लक्ष्यपूर्वक जाणिजे ॥ ८९ ॥
या प्राणिमात्रांची तत्त्वतां । आयुष्यावधि बोलूं आतां । अवश्य समजावें समस्तां । गुज निजशास्त्र म्हणून ॥ ९० ॥
मनुष्यायुष्य एकशेंवीस । पंचशत वर्षें वृक्षास । तीनशें वर्षें कपीस । बत्तीस गणिलीं अश्वाचीं ॥ ९१ ॥ व्याघ्राचें
आयुष्य चौसष्ट वत्सर । सर्पाचें तें एकसहस्र । कूर्माचें पंधराशें संवत्सर । पंचवीस गर्दभाचें गणियेलें ॥ ९२ ॥ एक वर्ष

पिपीलिकादिकांचें । द्वादशवर्षें श्वान-सूकराचें । पंचवीस पंचवीस अजा-मृगांचें । वृषभाचें चोवीस वर्षें ॥ ९३ ॥ सिंह-गजांचें शतवत्सर । उष्ट्राचें पंचवीस संवत्सर । पिंगलादिकांचें आयुष्य तीन सहस्र । गृध्राचें चारसहस्र बोलती ॥ ९४ ॥ एकशेंपंधरा जलधोक्षजाचें । तीनसहस्र वर्षें भेकाचें । षट्शतवत्सर आयुष्य बकाचें । पारावताचें (पारव्याचें) एकसहस्र असे ॥ ९५ ॥ वृश्चिक गोधा- (पाण्यांतील घोरपड) दिकांचें । आयुष्य गणिलें अष्ट वर्षांचें । वर्ष मास पक्ष सूक्ष्म जंतूंचें । दिन घटिकादि असतसे ॥ ९६ ॥ तडागादिक जलाशय । वापी कूपादि देवालय । इत्यादिकांचें दशसहस्र आयुष्य । शास्त्रीं वर्णिलें असे हें ॥ ९७ ॥ आतां चतुर्युगोत्पत्ति श्रवण । कराहो ज्योतिषशास्त्र प्रमाण । इतर शास्त्रांत भिन्नभिन्न । युगकल्पभेदें आढळतें ॥ ९८ ॥ कार्तिक शुक्ल नवमी । श्रवण नक्षत्रीं वृद्धियोग नामी । 'कृतयुगोत्पत्ति' प्रथम यामीं । जाहली असे निश्चयें ॥ ९९ ॥ सत्रालक्ष अठ्ठावीस हजार । कृतयुग प्रमाण संवत्सर । ह्यांत चतुष्टय झाले अवतार । मत्स्य-कूर्म-वराह-नारसिंह ॥ १०० ॥ प्रभववत्सरीं दक्षिणायनीं । कार्तिक शुक्ल त्रयोदशी चंद्रदिनीं । मृग नक्षत्रीं योगशोभनीं । 'मत्स्यावतार' अपराण्हीं जाहला ॥ १ ॥ मत्स्यरूप करूनि धारण । दुष्टदानवांचें निर्दलन । केलें जगद्धितार्थ वेदोद्धरण । नारायणें स्वलीलें ॥ २ ॥ दक्षिणायनीं शुक्लनाम वत्सरीं । श्रावण शुक्ल एकादशी गुरुवारीं । विष्कंभयोगीं मूल नक्षत्रीं । 'कूर्मावतार' सायान्हीं जाहला ॥ ३ ॥ कूर्मरूपें धरूनि अवतार । दुर्जन निशाचरांचा संहार । करूनि जगदुद्धरण भूभार । उतरिला स्वेच्छें भगवंतें ॥ ४ ॥ भाद्रपद शुक्ल तृतीयादिनीं । अपराण्हीं 'वराहरूप' धरूनी । हिरण्याक्षें पाताळीं नेली मेदिनी । उद्धार तियेचा केला हो ॥ ५ ॥ अंगिरा नामाब्दीं उदगयनीं । वैशाख शुक्ल चतुर्दशी दिनीं । मंदवारीं स्वाति-भे योग-वरियानीं । प्रदोषव्यापिनी जयंती ॥ ६ ॥ न दिवसा न निशीं ऐशा समयासी । स्तंभीं प्रगटले 'नृसिंह' रूपेंसी । निर्दलुनी हिरण्यकश्यपूसी । प्रल्हाद भक्तासी रक्षिलें

॥ ७ ॥ त्या कृतयुगीं मुळींच नसे पाप । पुण्य वीसविस्वे अमूप । स्वधर्मनिरत पुण्यप्रताप । एकलक्ष नरायुष्य होतें ॥ ८ ॥ मानव एकविंशति हस्तप्रमाण । द्रव्यरत्न पात्रसुवर्ण । तेव्हां ब्रह्मांडमय प्राण । पुष्करतीर्थ प्रसिद्ध असे ॥ ९ ॥ सोळाशें सूर्यग्रहणें । दशसहस्र चंद्रग्रहणें । स्त्रिया पतिव्रताधर्मपरायणें । विख्यात राजेही धर्मिष्ठ ॥ ११० ॥ हिरण्यकश्यपु प्रल्हाद विरोचन । बालि बाणासुरादि विद्वान् । बीज एकएकविंशति छेदन । पितराज्ञाधारक पुत्र होते ॥ ११ ॥ कपिल भद्र दक्षादि जन । नित्य निरत ब्रह्मोपासन । पौरावनीं तत्पर जाण । कृतयुगीं झाले सुकृती ॥ १२ ॥ वैशाख शुक्ल तृतीया सोमवारीं । शोभनयोगीं रोहिणी नक्षत्रीं । ‘त्रेतायुगोत्पत्ति’ द्वितीय प्रहरीं । शास्त्रीं असे वर्णिली ॥ १३ ॥ बारालक्ष शहाण्णव हजार । त्रेतायुगमान संवत्सर । त्रेतांत ‘वामन-परशुराम-रामचंद्र’ । अवतारत्रय जाहले ॥ १४ ॥ अदिति-कश्यप-पुत्र ‘वामन’ । धातानामवत्सरीं दक्षिणायन । भाद्रपद शुक्ल द्वादशी बुध श्रवण । मध्यान्हकालीं अवतरले ॥ १५ ॥ पंचमावतार असे वामन । भिक्षुरूपें धरणी त्रिपाददान । घेतलें बलीचें सर्वस्व हरून । वामनें विश्व सुखी केलें ॥ १६ ॥ रेणुकासुत ‘परशुराम’ जन्म । उदगयनीं पार्थिवाब्द नाम । वैशाख शुद्ध तृतीया रोहिणी सोम । सुकर्मयोगीं प्रदोषकालीं ॥ १७ ॥ कोणी मध्यान्ही तृतीया शुद्ध घेती । परशुरामजयंतीतें करिती । जेणें एकवीस वेळां निःक्षत्रिय जगती । पितृकैवारें केलीसे ॥ १८ ॥ संवत्सरनाम तारण । चैत्र शुक्ल नवमी उत्तरायण । भृगुवासर पुनर्वसु-भे योग-वरियाण । ‘श्रीराम’ मध्यान्हीं जन्मले ॥ १९ ॥ मिळवूनि वानरसैन्य । समुद्रीं सेतुबंधन करून । रावणादिक दैत्य वधून । सीता आणिली रामचंद्रें ॥ १२० ॥ त्रेतायुगीं पांच विश्वे पाप । पंचदश विश्वे पुण्य अमूप । नृशरीर चतुर्दश हस्त माप । दशसहस्र वर्षें आयुष्य होतें ॥ २१ ॥ त्रेतायुगीं सुवर्ण द्रव्य रौप्य पात्र । परमेश्वरलिंग पवित्र । तेव्हां अस्थिमय प्राण विचित्र । नैमिष्यारण्य तीर्थ असे ॥ २२ ॥ अठराशें सूर्यग्रहणें

जाण । चंद्रग्रहणें एकलक्ष प्रमाण । बीज एक प्रसव सप्तछेदन । त्रेतायुगीं वर्तलें ॥ २३ ॥ सूर्यवंशीं राजे धर्मकुशल विख्यात । विक्रम विश्वामित्र भगीरथ । दिलीप अज दशरथ । राम लवकुशादि जाहले ॥ २४ ॥ त्रेतायुगीं मुख्य तपोबल । वचन प्रमाण निर्मल । यज्ञयाग करिती सकल । पुण्यशील वेदवेत्ते ॥ २५ ॥ माघ कृष्ण अमावास्या शुक्रवारीं । वरीयसीं योगीं धनिष्ठा नक्षत्रीं । 'द्वापारयुगोत्पत्ति' तृतीय प्रहरीं । विद्वज्जन वर्णिती ॥ २६ ॥ आठलक्ष चौसष्ट हजार । बोलिलें द्वापार मान वत्सर । 'श्रीकृष्ण' 'बौद्ध' द्वय अवतार । द्वापार युगीं जाहले ॥ २७ ॥ दुर्मतीनामाब्दीं दक्षिणायनीं । श्रावण कृष्ण अष्टमी बुध रोहिणी । अतिगंड योगीं मध्यरजनीं । कृष्णपरमात्मा प्रगटले ॥ २८ ॥ यदुकुलभूषणप्रदीपक । श्रीकृष्ण भगवान् पूर्ण एक । वधूनि दानव कंसादिक । जीव अनेक उद्धरिले ॥ २९ ॥ दुर्मतिनामाब्दीं याम्यायनीं । पौष शुक्ल एकादशी भौमदिनीं । पुष्य-भे धृति-योगीं सायान्हीं । 'बौद्धावतार' जाहला ॥ १३० ॥ तेव्हां पापपुण्य समान । एक सहस्र मनुष्यायुर्मान । शरीर उच्च सप्तहस्त प्रमाण । द्वापार युगांत होतें कीं ॥ ३१ ॥ ताम्रपात्र रजत मुद्रा व्यवहार । प्राण रुधिरमय साचार । तीर्थ प्रसिद्ध कुरुक्षेत्र । द्वापार युगीं असे हो ॥ ३२ ॥ छत्तीसशें सूर्यग्रहणें जाण । दोनलक्ष चंद्रग्रहण प्रमाण । बीज एक प्रसव तीन छेदन । राजे परिसा सोमवंशी ॥ ३३ ॥ सोम बुध तडाग पुरूरव नृपती । अंगद पांडु युधिष्ठिर सुकीर्ति । अर्जुन अभिमन्यु भूप परीक्षिती । जन्मेजय देवखंड ॥ ३४ ॥ सहनाग शंभु वेणु जीव । विश्व कामरूपादि पार्थिव । वचन प्रमाण विपुल द्रव्य । विष्णुपूजन तत्पर असती कीं ॥ ३५ ॥ भाद्रपद कृष्ण त्रयोदशी । रविवारीं आश्लेषा नक्षत्रेसीं । व्यतिपातयोगीं मध्यरात्रीसीं । 'कलियुगोत्पत्ति' जाहली ॥ ३६ ॥ चारलक्ष बत्तीस हजार । कलियुग प्रमाण संवत्सर । 'कल्की' भविष्यावतार । असे होणार शेवटीं ॥ ३७ ॥ माघशुक्ल एकादशी रविवारीं । गंडयोगीं पुष्यनक्षत्रीं । दिवसा चतुर्थ प्रहरीं । कल्की अवतार

होईल ॥ ३८ ॥ कर्नाटकदेशीं करवीर- । पत्तनीं कल्की भविष्यावतार । आठशेंएकवीस संवत्सर । होईल शक तयाचा ॥ ३९ ॥ गौडदेशीं महाकाल देवता । सोमेश्वरलिंग तत्त्वतां । कलींत पुण्य पांचविश्वे न्यूनता । पाप पंधराविश्वे अधिक असे ॥ १४० ॥ मनुष्यायुर्बल शतवत्सर । औटहात प्रमाण शरीर । कूट द्रव्य अस्थि व्यवहार । अन्नमय प्राण असे ॥ ४१ ॥ राजे स्वधर्मकर्मरहित । मिथ्याचारी द्विज कुमार्गी रत । सर्वत्र माजेल नास्तिकमत । कलींत वसेल तीर्थ गंगा ॥ ४२ ॥ बीज एक अनेक प्रसव छेदन । अभक्ष्यभक्षक उपासक जाण । निंद्यकर्मी दुराचारी जन । होतील निश्चयें कालियुगीं ॥ ४३ ॥ कलींत षट् शककर्तार । प्रथम इंद्रप्रस्थीं युधिष्ठिर । तीनसहस्र चव्वेचाळीस संवत्सर । युधिष्ठिर शक बोलिला ॥ ४४ ॥ दुसरा उज्जनीस ‘विक्रमशक’। एकशेंपस्तीस वत्सरात्मक । तृतीय प्रतिष्ठानीं ‘शालिवाहन’ शक । अठरा हजार वर्षें कथियला ॥ ४५ ॥ चतुर्थ वैतरणी सिंधुसंगमीं । ‘विजयाभिनंदन’ नामीं । त्याचा शक दशसहस्र वर्षगामीं । ज्योतिःशास्त्रीं वर्णिला ॥ ४६ ॥ पंचम धारातीर्थीं गौडदेशीं । ‘नागार्जुन’ असे नाम जयासी । चारलक्ष संवत्सरपर्यंत निश्चयेंसीं । शक तयाचा चालेल ॥ ४७ ॥ षष्ठम कर्नाटकदेशीं करवीर- । पत्तनीं कल्की भविष्यावतार । अठराशें एकवीस संवत्सर । चालेल शक तयाचा ॥ ४८ ॥ ऐका कालिस्वरूप पिशाच्चवदन । कर वामहस्तें धरूनि शिश्न । दक्षिणहस्तें जिव्हा धरून । कलि कलहप्रिय नाचतसे ॥ ४९ ॥ कालियुगीं सूर्यचंद्रग्रहणें जाण । होतील अतिशय प्रमाण । यावत्सूर्यचंद्र अग्नि वरुण । तावत् अल्प धर्म राहील ॥ १५० ॥ मत्स्य कूर्म वराह बौद्ध । कल्की इत्यादि अवतार प्रसिद्ध । या जयंत्यांविषयीं विविध । भिन्नभिन्न मतें असतीं ॥ ५१ ॥ मास पक्ष तिथि नक्षत्र वार । कल्पभेदें जयंतीकाल प्रकार । युगपरत्वें वेगळे विचार । असती जयंतीनिर्णयार्थ ॥ ५२ ॥ पुराण ज्योतिष धर्मशास्त्र । कल्पभेदें इत्यादिकांचे विचार । युगपरत्वें जरी भिन्न तिथि वार । तरी निर्दोष समजावे

॥ ५३ ॥ जयंतीप्रीत्यर्थ उपोषण । उत्साहसमारंभ कीर्तनश्रवण । ब्राह्मणभोजन पुराणपठण । करितां महत्पुण्य होतसे
॥ ५४ ॥ शिष्य विनवी गुरुनाथा । ऐकूनि अवतारचरित्रकथा । परमानंद होतसे चित्ता । पुनरार्त झालों श्रवणासी
॥ ५५ ॥ आणखी कोणकोणते अवतार । झाले असती श्रीगुरुवर । कृपा करूनि सांगा सविस्तर । पुढिले अध्यायीं
रसाल ते ॥ ५६ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुति स्मृति पुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । तृतीयाध्याय
रसिक हा ॥ ५७ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे तृतीयोऽध्याय समाप्तः ॥ ३ ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

# ॥ अध्याय चौथा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ श्रीगुरु म्हणती शिष्यातें । सावध व्हावें शुद्धचित्तें । श्रीमन्नृसिंहयतिवृत्तांतातें । आतां श्रवण करावें ॥ १ ॥ श्रीगुरुलीलामृत पान । करा हो संत साधु विद्वज्जन । होऊनि एकाग्र विमलमन । वेदमथित अनादि जें ॥ २ ॥ हिमालय पर्वतीं यतिवर्य । दीनजन-कल्पतरु आर्य । जगद्धितार्थ दिगंबराचार्य । स्वेच्छाचारें संचरती ॥ ३ ॥ विशाल हिमाचल पर्वतीं । योगी मुनि जपी तपी वसती । निजकार्यार्थ ब्रह्मचारी व्रती । अनुष्ठान करिती संतत ॥ ४ ॥ चीन देशींचीं स्त्रीपुरुषें । वनौषधी शोधितां हर्षें । पाहिलें मुंडी भगव्या वेषें । यतिवर्या तयांनीं ॥ ५ ॥ मग वदती एकमेकांस । हें भूत सैतान राक्षस । किंवा असे कोणी माण्‌स । करिती वल्गना यापरी ॥ ६ ॥ हें रिकामें सोंग काय । वृत्ति दिसते पिशाच्चमय । जादू टोणा तोडगे उपाय । कळत असेल याजला ॥ ७ ॥ उभयतां पोट धरून हांसती । कुचेष्टित वाग्बाणीं निंदिती । म्हणती निरुपयोगी हे यति । वृक्षाआड चलावें ॥ ८ ॥ तेथें वृक्षछाया घनदाट । अनेक पक्ष्यांचा कलकलाट । पाहूनि कामोद्भव अचाट । लागलें नेट विषयाचें ॥ ९ ॥ सारासार सत्यत्वें तत्त्वगूढ । नोळखिती कामी मूढ । अहंकारें देहबुद्ध्यारूढ । होऊन बडबड करिती ते ॥ १० ॥ याहीवरी मद्यपानें मदांध । वाग्जल्पन सक्रोध । स्वप्नीं देखील कैंचा बोध । तयां अविरोध विषयांधा ॥ ११ ॥ संगें घेऊनियां कांता । अहोरात्र करिती एकांता । भोगिती शेवटीं आकांता । पावती विषयमदांध ॥ १२ ॥ माय-बाप-गुरु-देवां । धिक्कारिती सर्व जीवां । बरें वाईट पाप किंवा । पुण्यासही न जाणती ॥ १३ ॥

स्त्रियांसमागमें खावें प्यावें । वस्त्रभूषणीं मिरवावें । अनादर वाग्बाण सोसावे । पुष्पासम स्त्रियेचे ॥ १४ ॥
स्वकीय स्त्री किंवा पराची । आप्त सखे सोयऱ्यांची । हेही मर्यादा-ओळख नसेचि । केवळ पशुतुल्य कामांध ॥ १५ ॥
स्त्रीचें दास्यत्व करिती बळें । मदनविकारें भरले डोळे । योग्यायोग्य कांहीं न कळे । झाले आंधळे कामातुर ॥ १६ ॥
वृक्षाआड भूमीवरी । शयन करिती दुरहंकारी । पाहाती तंव पुरुषाची नारी । बनली सुंदरी सावयवी ॥ १७ ॥
एकमेकांसि निरखिती नीट । विपरीत घडलें स्पष्ट । स्त्रीचा पुरुषावयवासकट । झाला घाट नराकृति ॥ १८ ॥ मग
घाबरूनि चकित होती । हें काय संकट ओढवलें म्हणती । एकाकीं विपरीत घडे कवणे रीतीं । कोण दैवत क्षोभलें
॥ १९ ॥ तंव गुहेंत तपस्वी ब्रह्मचारी । देखुनी अंतरीं लज्जित भारी । म्हणती ही यतींद्राचीच माया खरी । सुरनरां
अगम्य ॥ २० ॥ नृसिंहसरस्वती इकडे । हांसती पाहूनि निंदकांकडे । तंव तीं भिऊन फोडिती हंबरडे । आक्रोशें
कंठ शोषले ॥ २१ ॥ उभयतां थरथरां कांपती । म्हणती विपरीत आम्हुची दैवगति । उन्मत्तपणें निंदिले यति । दुष्कृति
आम्हां फळलीसे ॥ २२ ॥ 'द्यावें तैसेंचि घ्यावें । करावें तैसें भोगावें' । आपले अपराध न गणावे । केवढें तरी मूर्खत्व
॥ २३ ॥ मग नृसिंहस्वामीसंनिध । जाऊन प्रार्थिती बहुविध । क्षमा करा जी अपराध । शरणागतां रक्षावें ॥ २४ ॥ दीननाथा
पुण्यप्रतापा । प्रवर्तलों आम्ही निंद्यपापा । अपराध्यांवरी मायबापा । आतां कृपा करावी ॥ २५ ॥ हें स्वप्न किंवा भ्रांति ।
परस्पर विपरीत देह दिसती । किंवा इंद्रजाल माया चित्तीं । लेशही उमज पडेना ॥ २६ ॥ निंदेचें प्रायश्चित्त । आम्हां
मिळालें खचित । पूर्वजन्मीचें किंचित् सुकृत । म्हणूनि चरणां देखियलें ॥ २७ ॥ सद्गुरुनाथा दयासागरा । बालान्याय क्षमा
करा । करावें पुन्हां पूर्ववत् शरीरां । द्यावें लेंकरां दान हें ॥ २८ ॥ कधीं न ऐकिलें पाहिलें । कोणत्याही प्रकारें न जाणिलें ।
ईश्वरनियमाविरुद्ध घडलें । लाजिरवाणें लोकांत ॥ २९ ॥ महाराज आपणांसी । ओळखिलें न आम्हीं तामसी ।

आतां आमुची गति कैशी । होईल तें कळेना ॥ ३० ॥ यतींद्र वदती या कामविकारें । महत्क्लेश पावती सारे ।
काममोहें अंतरीं नुरे । सारासार विचार ॥ ३१ ॥ कामक्रोधें दुःख शोक । साध्य न होती इहपर लोक । जीव
सांपडती बंधनीं अनेक । देह सार्थक कदा नव्हे ॥ ३२ ॥ काममोहासी धिक्कारिती । तेचि योगी तोष पावती ।
तयां ज्ञानें ईश्वरप्राप्ति । विरक्तीसह होतसे ॥ ३३ ॥ यास्तव कामादिक विकार । समूळ त्यागावे अति दूर । विवेक
विचार दृढतर । निरंतर पाहिजे ॥ ३४ ॥ मग तीं स्त्रीपुरुषें यतीलागुनी । वदती आपल्या चरणदर्शनीं । पश्चात्ताप
पूर्ण झाला मनीं । आतां सद्गुरु तारावें ॥ ३५ ॥ पाहूनि शुद्धांतःकरण । पश्चात्ताप परिपूर्ण । कळवळले सद्गुरु
दयाघन । भक्तकामकल्पतरु ॥ ३६ ॥ कृपादृष्टीं अवलोकितां । पूर्ववत् काया झाली तत्त्वतां । स्पष्ट देखूनि
उभयतां । वदती भगवंता धन्यधन्य ॥ ३७ ॥ आमच्या देहाचें पादसंवाहन । समर्थ-चरणीं घातलें करून । तरी
आपले उपकार कृपाघना । कदाकाळीं न फिटती ॥ ३८ ॥ परोपकार भूतदया । हें ब्रीद आपुले गुरुराया । निंदक
कृतघ्नांवरी प्रेम माया । करणें शोभे तुम्हांसिच ॥ ३९ ॥ मग समर्थ आज्ञापिती त्यांसी । सुखें जावें चीन देशीं ।
इहपर साध्य ईश्वरतत्त्वासी । पावाल तुम्ही निश्चयें ॥ ४० ॥ शिरसा आज्ञा मानून । घालिती साष्टांग लोटांगण ।
मग स्वदेशीं करिती गमन । गुरुपदाचिंतन अहर्निश ॥ ४१ ॥ पुढें तयांसी पुत्र जाहले । तेही समर्थांचे सेवक
बनले । सद्गुरुलीलागानीं रंगले । भवपाशविमुक्त होती ते ॥ ४२ ॥ त्या हिमालय गिरीवर । अन्य देशींचीं
मनुष्यें चार । मृगया करिती वारंवार । उदरपूर्ती करावया ॥ ४३ ॥ तेथें आम्रवृक्षातळीं । यति बैसले होते
उदकाजवळी । हेमंतऋतु शीतकाळीं । स्वानंदमेळीं निमग्न ॥ ४४ ॥ व्याधभयें एक शिशुकुरंग । धांवत आला
कंपितांग । वृक्षाआड तो सवेग । समर्थाश्रय करावया ॥ ४५ ॥ समर्थ तयासी कुरवाळिती । भयभीतास अभय

देती । दीनदुर्बळांसी संरक्षिती । तेचि समर्थ बोलिजे ॥ ४६ ॥ दुरूनि पारधी मृगाला । शोधितां वृक्षाखालीं तो दिसला । बंदूक भरूनि तीराला । सज्ज केलें चतुर व्याधीं ॥ ४७ ॥ बंदुकीचे करिती बार । तीर मारिती वरचेवर । तयांचा भयंकर शब्दगजर । होतसे पर्वतीं अपार ॥ ४८ ॥ प्रतिध्वनि फार उद्भवती । पशु जीव घेऊनि पळती । पक्षी दूर उडूनि जाती । भयें प्राणरक्षणार्थ ॥ ४९ ॥ जलांत लपती मत्स्य मगर । अति दूर गेले तृणचर । भयकंपित चराचर । स्मरती परमेश्वर सर्वही ॥ ५० ॥ प्राणी पशुपक्ष्यादिक । तेथें न राहिलें एक । गढूळ दिसूं लागलें उदक । भयंकर पर्वतीं ॥ ५१ ॥ मार्ग मिळे जयांना जिकडे । ते ते धांवत गेले तिकडे । भयें काळीज धडधडे । कांहीं सुचेना अंतरीं ॥ ५२ ॥ वायु झाला असे कुंद । दिशा भासती केवल धुंद । वृक्ष लतापत्र अस्पंद । धुम्रें नभ कोंदाटलें ॥ ५३ ॥ कमल पुष्पांतील भृंग । आंतलें आंत झाले दंग । म्हणती हा काय दुर्घट प्रसंग । आतां श्रीरंगा सांभाळी ॥ ५४ ॥ अशा या प्राणसंकटीं । परमेश्वरा धूर्जटी । तवविना संरक्षिता सृष्टीं । अन्य कोणी न दिसे ॥ ५५ ॥ बंदुकींत गोळ्या छरे । भरूनि मृगासी एकसरें । व्याध मारिती क्रोधभरें । विनाकारण दुर्बळां ॥ ५६ ॥ परी त्या मृगवत्सासह । वृद्ध नृसिंहसरस्वती निःस्पृह । स्वानंदीं निमग्न पितामह । निर्भयें स्वस्थ बैसले ॥ ५७ ॥ डळमळी न कदा आकाश । मेरुपर्वत स्थिर अविनाश । पृथ्वीस बांधितां रज्जुपाश । परी ते अचल अभंग जशी ॥ ५८ ॥ म्हणती शिकार करणारे । कोण बैसलासे बुवा रे । दुःसह बंदुकीच्या बारें । भीत नाहीं सहसाही ॥ ५९ ॥ किती झाडल्या बंदुका । परी थयाच्या एकाही नखा । अणुमात्र देखिल धका । लागला नाहीं कीं ॥ ६० ॥ हे कोणी इंद्रजाल गारुडी । मंत्रतंत्राचे खेळगडी । अथवा औषधी बुट्टी जडी । नाना परवडी जाणती ॥ ६१ ॥ तेथील गुहेंतले तपस्वी । दुरोनि अवलोकिती तेजस्वी । म्हणती कोण महात्मा मनस्वी । निर्भय निःशंक विभूती ही ॥ ६२ ॥ स्वामी

समर्थ व्याधांकडे । पाहूनि फेंकती दोन खडे । तों काय चमत्कार घडे । ज्याचें कुडें त्यापुढेंचि ॥ ६३ ॥ धरिल्या बंदुका करीं । पुढें मागें खालीं वरी । हालवेना बहु प्रकारीं । चारी व्याध तटस्थ ते ॥ ६४ ॥ म्हणती हें काय घडलें चमत्कारिक । शरीर तीर आणि बंदूक । चळेना वळेना क्षणएक । यासी उपाय कायसा ॥ ६५ ॥ चौघे पाहती टकमकां । देहस्मृति नसे एकमेकां । गुहेंतील योगी या कौतुका । अवलोकिती त्या समयीं ॥ ६६ ॥ व्याधांचें काष्ठवच्छरीर । हातीं बंदुका आणि तीर । पाहतां दिसे भयंकर । विस्मयप्रद प्रसंग तो ॥ ६७ ॥ शत्रु मित्र निंदक वंदक । समान उदारदृष्टि सम्यक् । हर्षामर्षरहित यतिनायक । शांतमानस सर्वदा ॥ ६८ ॥ सुखदुःखादि द्वंद्वभेद । स्वप्नींही नसे जया खेद । पूर्णब्रह्म सच्चिदानंद । जगद्गुरु यतिराज ॥ ६९ ॥ अनायासें जरी मिळालें । अन्नोदक कंदमूळफलें । ग्रहण करिती स्वलीलें । श्रीगुरु स्वामी समर्थ ॥ ७० ॥ बोलावें कीं न बोलावें । स्वस्थ किंवा चंचल व्हावें । हेहि वृत्तीस नव्हे ठावें । ब्रह्मभावें स्वतंत्र ॥ ७१ ॥ दूर अथवा समीप । महान् किंवा अल्प । त्रिकालीं नसे हा विकल्प । नृसिंहयतिवर्यासी ॥ ७२ ॥ ऐसे दयाळु करूनि कृपा । जनां दाविती मार्ग सोपा । अध्यात्म-अधिभूत-अधिदैवत त्रयतापां । निवारिती स्वामिराय ॥ ७३ ॥ दया क्षमा स्वभावसिद्ध । अंतर्बाह्य शुद्धबुद्ध । वेद-शास्त्रीं पुराणीं प्रसिद्ध । गुरुमहिमा अगाध वर्णिला ॥ ७४ ॥ तटस्थ झाले व्याध दोन याम । पाहूनि कळवळले आत्माराम । मग तयांसी म्हणती आतां क्षेम । पावा विश्राम सद्धर्मीं ॥ ७५ ॥ कृपावलोकनें तात्काळीं । चौघांची तटस्थता गेली । देहशुद्धी बरवी आली । गुरुमाउली वळल्यानें ॥ ७६ ॥ पूर्वींचे ते अनेक छंदी । त्यागूनि मोह मद धुंदी । मग श्रीगुरु-चरणारविंदीं । पश्चात्तापें लोळती ॥ ७७ ॥ आम्ही मतिहीन मदांध । चुकीनें धरूनि विरोध । केले दयाळा बहु अपराध । दुराचारीं प्रवर्तलों ॥ ७८ ॥ मृगास्तव आपणांतें । मारिलें उन्मत्तपणीं निर्दयत्वें । महा पाप घडलें आम्हांतें । ऐसें सानुतापें बोलती

॥ ७९ ॥ सर्व शास्त्रीं कथिलें हेंचि जाणा । वृथैव न गांजावें कवणा । ऐसें असतां उन्मत्तपणा । धरूनि केले अन्याय
॥ ८० ॥ मदांध झालों मोहित । कर्में केलीं अनुचित । महतांसी कष्टविलें बहुत । निष्ठुर छलक आम्हीं आहों
॥ ८१ ॥ विनास्वार्थ आम्हीं दुष्टीं । छळिलें समर्थासि पापिष्टीं । तथापि स्वामींची कृपादृष्टी । ढळली नाहीं तिलमात्र
॥ ८२ ॥ कृतघ्नांसी महच्छासन । न होतां जाहले प्रसन्न । महानुभाव स्वामी आपण । त्रिभुवनपालक दयाळु
॥ ८३ ॥ ऐसें बोलतां सद्गद कंठ । उदय पावले भाव अष्ट । प्रेमाश्रू वाहती स्पष्ट । अज्ञान खटपट निमाली
॥ ८४ ॥ एकाग्र झालें शुद्ध चित्त । अंतरात्म्यासी अखंड जडत । झालें संसारशोकरहित । गुरुकृपामृतप्राशनें
॥ ८५ ॥ जप तप विद्यादिक अमोल । अखिल साधनांचें श्रेय विमल । अष्टांगयोगाचें सर्व फल । लाधलें
तात्काल गुरुकृपें ॥ ८६ ॥ वर्णाश्रम-विद्याविहीन । कदा न घडलें श्रवण मनन । हिंसन-क्रिया स्पष्ट असून । वळले
दयाघन त्यांवरी ॥ ८७ ॥ बहुत जन्मीं जें न होईल । अधिकारावीण न घडेल । सेवेवांचूनि न देववेल । कधींही
जाणा कवणासी ॥ ८८ ॥ आपणास मारित असतां । अपराध कांहीं न गणितां । कुल जाति व्याधास
न पुसतां । केलें आपणासारिखें ॥ ८९ ॥ दिल्या घेतल्यावांचून । नुसतें न बोलती कोणी वचन । तशांत दुष्ट मारकांसी
प्रसन्न । कदापि कोण होईल ॥ ९० ॥ परंतु हें अद्भुत नवल वर्तलें । दुष्ट हिंसकासी उद्धरिलें । यदर्थ श्रीगुरूसि वेदें
वर्णिलें । 'दयासागर' म्हणून ॥ ९१ ॥ श्रीगुरुस्वामी परम पवित्र । अतुल सामर्थ्य तें विचित्र । व्याध गाती अपार स्तोत्र ।
इहपरत्रतारक ऐसें ॥ ९२ ॥ तयां आज्ञापिती गुरु निष्काम । सर्वभूतीं अविरोध प्रेम । संरक्षूनि सत्य स्वधर्म । स्वस्तिक्षेम
असा रे ॥ ९३ ॥ शिरीं मानूनि गुर्वाज्ञा । पदांसि नमूनियां शुद्धप्रज्ञा । स्वात्मानुभवुनी गुरुगम्य संज्ञा । गेले
आनंदें पारधी ते ॥ ९४ ॥ श्रीगुरुदर्शन थोर महिमा । पारधी पावले योगक्षेमा । निरुपमासी द्यावी उपमा । हें न

घडे अघटित ॥ ९५ ॥ जगाच्या नित्य कल्याणार्थ । महीवरी संचरती गुरुनाथ । भक्तिरहस्य ज्ञान परमार्थ । यथार्थ मार्गा लाविती ॥ ९६ ॥ परोपकारार्थ सोसिती कष्ट । उद्धरिती हिंसक दुष्ट । पुढें कथा परिसावी श्रेष्ठ । कुरंगाची रसाळ ॥ ९७ ॥ हरिणी सोसूनि त्रासा । धुंडाळित निज पाडसा । भयभीत टाकित श्वासा । हांका मारी वत्सासी ॥ ९८ ॥ म्हणे धांव धांव रे बाळ । तुजविना प्राण होतो व्याकुळ । होत आला संध्याकाळ । कोठें सांपडेल निज वत्स ॥ ९९ ॥ कोठें वत्सा गुंतलासी । केव्हां येशील मजपाशीं । क्षुधाशांत्यर्थ स्तनपानासी ॥ त्वरित येईं रे तान्हया ॥ १०० ॥ व्याधांनीं मारिलें असेल । आतां कैचें वत्स भेटेल । मृगीच्या नेत्रांतून प्रेमजल । वाहे घळघळ तेधवां ॥ १ ॥ पुत्रा तुझा भरंवसा मजलागून । वृद्धावस्थेंत करिशी पालन । प्राक्तनदशा अतिहीन । येऊन पडलें संकट ॥ २ ॥ हे विश्वंभर पशुपति । मायबापा वत्साप्रति । भेटवूनि हेतुपूर्ति । करी सत्वर दयाळा ॥ ३ ॥ हरिणी अत्यंत शोकाकुल । तृषार्त गेली उदकाजवळ । मागेंपुढें पाहे अंतराळ । व्याध मारील म्हणूनी ॥ ४ ॥ भयें किंचित् जल प्राशून । करी दिशावलोकन । म्हणे आमचें वसतिस्थान । आम्रतरुतलीं असे कीं ॥ ५ ॥ इकडे मृगीचा पति । शोधी स्त्रीपुत्रांप्रति । चिंताग्रस्त होय चित्तीं । काय होईल कळेना ॥ ६ ॥ मंदगति उदकासंनिध । धैर्यें करी स्वस्थानशोध । तों देखिले मुनीश्वर अगाध । आम्रवृक्षा-तळवटीं ॥ ७ ॥ मग धरूनि मोठा धीर । योगिराजसमीप सत्वर । येऊनि उभा ठाकला मृगीवर । नमस्कारी मनोभावें ॥ ८ ॥ तयासि पाहून नृसिंहयति । प्रसन्नवदनें हांसती । वदती का रे विप्रा आम्हांप्रति । नोळखिसी सांप्रत ॥ ९ ॥ पूर्वींचा तूं आमचा भक्त । होतासि गाणगापुरांत । रोगी ब्राह्मण तूं व्याधिनिर्मुक्त । झालासि आमच्या सेवेनें ॥ ११० ॥ तुझी स्त्री शुद्ध पतिव्रता । पुत्रपौत्रसंतानयुक्ता । परी सत्पुरुष छळिले तुम्ही तत्त्वतां । म्हणूनि पावलां मृगजन्म ॥ ११ ॥ पूर्वपुण्ययोग किंचित् । यदर्थ भेटी आमुची प्रस्तुत । इतक्यांत

मृगीही त्वरित । आली पतीतें भेटावया ॥ १२ ॥ तंव दृष्टी देखिलें बालक । उभयही हर्षलीं तात्कालिक । राज्यपदाहूनि अधिक । मानिती सुख अंतरीं ॥ १३ ॥ पूर्व संस्कार-संस्मृति । वाचा फुटली उभयतांप्रति । ओळखूनि नृसिंहसरस्वती । साष्टांग नमिती तृणचर ॥ १४ ॥ बहुत जन्मांचें सुकृत । आजि फळलें आम्हांप्रत । देखिले पुन्हां श्रीगुरुदत्त । झालों पावन गुरुराया ॥ १५ ॥ पतितपावन करुणासागर । नरहरि दत्तात्रेय गुरुवर । साक्षात् पूर्णब्रह्म परमेश्वर । जगदोद्धारक आपण ॥ १६ ॥ होतां पुन्हा श्रीचरणदर्शन । बहु जन्मींचें उपजलें ज्ञान । जरा जन्म मृत्यु निरसून । ब्रह्मविज्ञान होतसे ॥ १७ ॥ सत्पुरुष-छलनें घडले दोष । अन्यायी आम्ही स्त्रीपुरुष । श्रीचरणस्पर्शें निर्दोष । झालों सांप्रत गुरुवर्या ॥ १८ ॥ पहिला जन्म रोगी ब्राह्मण । द्वितीय वृषभजन्म गौण । स्त्रीसहित कष्टें दारुण । कृषिकर्मीं जुंपलों ॥ १९ ॥ तृतीयजन्म शूद्रजाति । स्त्रीसह वैदुरानगरीं वस्ती । दरिद्र दुःख भोगिलें अति । पुत्र मारिती आम्हांसी ॥ १२० ॥ चतुर्थजन्मीं तंतुकार । स्त्रीसह रोगी क्लेश अपार । काशीक्षेत्रीं वास निरंतर । विश्वेश्वरा सेविलें ॥ २१ ॥ पुण्यक्षेत्रीं घडला व्यभिचार । म्हणूनि पंचम खर जन्म साचार । स्त्रीसह कष्ट सोसिले अनिवार । लत्ताप्रहार कुलालाचे ॥ २२ ॥ सुवर्णकार जन्म षष्ठम । हस्तिनापुर वस्तिग्राम । केलें पुष्कळ हेम-चौर्यकर्म । लोभें धर्म टाकुनी ॥ २३ ॥ निजभार्या पतिव्रता । मुष्टिपिष्ट देई साधुसंता । त्यायोगें सप्तम जन्म आतां । अजिनयोनी पावलों ॥ २४ ॥ आजि व्याधहस्तें मरणसमय । होता खचित कुलक्षय । पदरीं पूर्वपुण्यसंचय । देखिले पाय समर्थांचे ॥ २५ ॥ पुरे झाल्या जन्मखेपा । आतां सोडवा मायबापा । दीनबंधो व्हावी कृपा । त्रिविध तापां निरसावें ॥ २६ ॥ अति दुःखरूप संसार । मायापाश हा अनिवार । जाणूनि गुंतलों साचार । आम्ही केवल मतिमंद ॥ २७ ॥ पाहूनि शिंक्यावरील

कापूस । मार्जार मानी नवनीत सुरस । चाखितां पावे खेदास । तैसें संसारसुख वायां ॥ २८ ॥ प्रेमें अस्थि चघळी श्वान ।
परी रक्त निघे मुखांतून । प्रपंचसुख त्यापरी असून । मिथ्या मोहें गुंतलों ॥ २९ ॥ काममोहादि लागले पाठीं ।
सोडवा समर्थ जगजेठी । देऊनियां आत्मज्ञानदृष्टी । ठेवा अखंड निजपदीं ॥ १३० ॥ कांहीं न लागे आम्हां गोड ।
लाधली गुरुचरणाची जोड । बिंबलें गुरुभक्तीचें वेड । अहंपण लया गेलें ॥ ३१ ॥ ऐकूनि बोलती जगत्पाल ।
सद्धर्माचार पुण्यशील । ब्राह्मणवंशीं जन्म पावाल । बाणेल ज्ञान वैराग्य ॥ ३२ ॥ महाराष्ट्र दक्षिण देशीं । फिरत
येऊं स्वक्षेत्रासी । भेटीस याल त्या समयासी । मोक्षसुखासी पावाल ॥ ३३ ॥ मनुष्यजन्मावांचून । न होय अपवर्गसाधन ।
विक्षेप विघ्नें निरसून । अज्ञान नष्ट होईल ॥ ३४ ॥ मोक्षमार्गाचें प्रमुखद्वार । नृजन्मचि सर्व श्रेयस्कर । श्रीगुरुकुलवास
निरंतर । नृजन्में सुलभ होतसे ॥ ३५ ॥ मूक पशु आणि सत्पुरुषांचा । ऐकूनि संवाद स्वहिताचा । गुहेंतील
तपस्वीजनांचा । जीव वेधला सलक्ष्य ॥ ३६ ॥ बाणला अनुताप अभंग । धांवत आले चतुर्वर्ग । प्रणतवत्सल प्रभूसी
साष्टांग । प्रणिपात करिती तेधवां ॥ ३७ ॥ चीन देशींच्या कामांधासी । दाविलें सहज चमत्कारासी । पावन करून
सुप्रसन्नतेंसीं । सुखें स्वदेशीं धाडिलें ॥ ३८ ॥ व्याध हिंसक प्राणघातक । असती तदपराध अनेक । परी क्षमा करूनि
पारमार्थिक । ज्ञानोपदेश तयां केला ॥ ३९ ॥ मृगवत्सार्थ दुःखसहन । करूनि वांचविले प्राण । मृगीमृगांस वाचादान ।
देऊनि पावन केलें तयां ॥ १४० ॥ धन्यधन्य महात्मा आपण । साक्षात्स्वरूप नारायण । आम्हीं आलों
अनन्य शरण । सद्गुरुचरणारविंदांतें ॥ ४१ ॥ जनानुग्रहार्थ घेतां अवतार । साधूंच्या परित्राणार्थ साचार ।
सद्धर्ममार्गासी लावितां सत्त्वर । खल-दुष्ट-विषयी-हिंसकांसी ॥ ४२ ॥ परमपुरुष परमहंस । अकल्पित भेटले आम्हांस ।
चलावें गुहेंतील आश्रमास । संध्यासमय जाहला ॥ ४३ ॥ येथें शीत वाजेल अति । ऐसें तपस्वी बोलती । तेव्हां

तेव्हां मृगी मृग नमस्कारूनि बोलती । काय आज्ञा आम्हांतें ॥ ४४ ॥ तिन्हीही मृगांच्या मस्तकीं ।
हस्त ठेविला कौतुकीं । कांहीं कालें दक्षिणलोकीं । भेटाल मनुष्यशरीरानें ॥ ४५ ॥ ऐसें बोधूनि गुरुदयाळ ।
आले तपस्व्यांसह उदकाजवळ । स्नान संध्यावंदन निर्मल । करूनि गेले गुहेंत ॥ ४६ ॥ मग मृगांचा कलाप ।
आम्रवृक्षातळीं जलासमीप । घेई निर्भयें विश्रांति झोंप । आनंदमय होउनी ॥ ४७ ॥ पुढिले अध्यायीं श्रोतेसंत ।
श्रवण कीजे कथामृत । गुहेंतील कुशलवृत्त । रसपूरित सुखप्रद ॥ ४८ ॥ हा अलौकिक गुरुशिष्यसंवाद ।
अखंडानंददायी मुक्तिप्रद । वेदोपनिषदरहस्य हें विशद । तुम्हांकरणें कथितसें ॥ ४९ ॥ अखंड कृपेचें भांडार ।
संतसाधुजनांचें माहेर । सात्त्विकभक्त-हेतुपूर्तिकर । श्रीगुरुस्वामी समर्थ हे ॥ १५० ॥ कविवरांचें विश्रांतिस्थान ।
सकल जगताचें जीवन । समस्तांचें पूर्ण समाधान । अत्रिनंदन जगद्गुरु ॥ ५१ ॥ तेचि श्रीस्वामी दत्त ।
अंतरीं वसूनि अखंडित । लेखनस्फूर्ति दासाप्रत । देऊनि स्वलीला वर्णविती ॥ ५२ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत ।
वेदशास्त्र-पुराण-संमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । चतुर्थाध्याय रसिक हा ॥ १५३ ॥ इति श्रीगुरुलीलामृते ।
गुरुशिष्यसंवादे चतुर्थोऽध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय पांचवा ॥

## ॥ श्रीगुरुदेव दत्त–स्वामीसमर्थ ॥

॥ श्रीगणेश-सरस्वत्यैनमः ॥ श्रीमद्दत्तात्रेयदिगंबरायनमः ॥ शिष्य प्रार्थितसे गुरुवक्त्याप्रति । अवतारचरित्राध्यायाचे अंतीं । जयंत्याध्याय सांगूं निश्चितीं । ऐसें आपण वचन दिलें ॥ १ ॥ त्या आपल्या वचनानुसार । जयंत्याध्याय सांगा सविस्तर । शिष्याचें वचन ऐकिल्यानंतर । गुरु सप्रमाण सांगती ॥ २ ॥ जयंत्युत्साहीं श्रीभगवंताचें । पूजन उपवासादि करितां साचें । दुरितनाशन अनेक जन्मांचें । वांछित फल प्राप्त होतें ॥ ३ ॥ चैत्रशुक्ल प्रतिपदा दिनीं । संवत्सरारंभीं सूर्योदयव्यापिनी । असेल जी तीच जनीं । आदरावी अवश्य ॥ ४ ॥ ब्रह्मपुराणांतील वचन । चैत्रमासीं शुक्लप्रतिपदादिन । ते दिनीं सूर्योदयीं हें जग उत्पन्न । केलें प्रथम ब्रह्मदेवानें ॥ ५ ॥ जेव्हां दोन्हीहीं दिवशीं । प्रतिपदा असेल सूर्योदयकालासी । अथवा नसेल उदयासी । तेव्हां पहिलीच आदरावी ॥ ६ ॥ वृद्ध वसिष्ठाचें वचन । कीं चैत्र शुक्ल प्रतिपदा दिन । कृष्णप्रतिपदा फाल्गुन । आणि कार्तिक शुद्ध प्रतिपदा ॥ ७ ॥ ह्या पूर्वतिथिनियुक्त असतील । आदराव्या त्याचि प्रांजल । संवत्सरप्रतिपदेसी पाणपोई चिरकाल । घालून उदक द्यावें जनासी ॥ ८ ॥ इतुक्या दिवशीं तैलाभ्यंगस्नान । न केलिया दोष होती उत्पन्न । नरकप्राप्ति सांगितली म्हणून । तैलाभ्यंग अवश्य करावें ॥ ९ ॥ प्रतिपदेसि घरोघरीं ध्वजारोपण । भक्तीनें देवब्राह्मणपूजन । निंबपत्रादिकभक्षण । विप्रसंतर्पण करावें ॥ १० ॥ पारिभद्राचें पुष्प पत्र कोमल । मरीच लवण हिंगु जीरक अजमोद हीं सकल । एकत्र करूनि भक्षावीं मंगल । आरोग्यार्थ सर्वांनीं ॥ ११ ॥ उत्तम भोजन पंचांग-श्रवण । करावें द्यावें दक्षिणादान । उत्साह भगवत्कीर्तन स्मरण । सत्य मृदु

भाषण करावें ॥ १२ ॥ आरंभ देवीनवरात्रासी । कीजे या संवत्सरप्रतिपदेसी । ही प्रतिपदा द्वितीयायुक्त ऐशी । घ्यावी अमावास्या वर्जुनी ॥ १३ ॥ द्वितीयायुक्त मुहूर्तमात्र जरी । असेल तरी ती घ्यावी देवीनवरात्रीं । शारदानवरात्रासम चतुरीं । पारणादि निर्णय जाणावा ॥ १४ ॥ संवत्सरप्रतिपदेसि 'मत्स्यजयंती' । अपराण्हीं कोणी तृतीया पंचमी म्हणती । आषाढशुक्ल एकादशी सांगती । कल्पभेदें कित्येक ॥ १५ ॥ नूतन वर्षाचें नामोच्चारणादिक । संकल्पादिक करणें तें आवश्यक । चैत्रशुद्ध प्रतिपदेसी असतां अधिक । परी मलमासांतचि करावें ॥ १६ ॥ परंतु अधिक चैत्रमासीं देवकार्य । करण्यास असे निषेध प्रत्यवाय । म्हणूनि देवकार्य न होय । अधिक-चैत्रमासांत कदापि ॥ १७ ॥ तात्पर्य अधिक चैत्रमासांत । शुभ देवकार्यें न करावीं हें विहित । केवळ द्वितीय चैत्रमासांत । शुद्ध प्रतिपदेस करावीं ॥ १८ ॥ अधिक-चैत्रांत निंबपत्रभक्षण । करूं नये संवत्सर-फलश्रवण । केवल शुद्ध चैत्रप्रतिपदेसीच जाण । करावें तें मंगलप्रद ॥ १९ ॥ चैत्र शुद्ध तृतीया तिथीला । कर्कलग्नीं शुभवेळेला । 'गौरीदेवीचा जन्म' जाहला । चतुर्थीयुक्त घ्यावी ही ॥ २० ॥ घेऊं नये द्वितीयायुक्त । तृतीया करावी चतुर्थीसहित । या तृतीयेपासून एक मासपर्यंत । 'उमामहेश्वरपूजन' करावें ॥ २१ ॥ चतुर्थीयुक्त जी गौरीतृतीया । ती पुत्रपौत्रादि संतति सौभाग्या । देणारी म्हणून चतुर्थीयुक्त तृतीया । घ्यावी गौरी-आंदोलन-व्रतासी ॥ २२ ॥ चतुर्थीयुक्त तृतीयेसी जरी । वैधृत्यादि कुयोग असती तरी । स्वीकारावी तीच खरी । घेऊं नये द्वितीयायुक्त ॥ २३ ॥ अखंडसौभाग्यकारक । 'गौरीव्रत' हें पुत्रपौत्रप्रदायक । शिवगौरीपूजन सम्यक । अवैधव्यकर स्त्रियांसी ॥ २४ ॥ चैत्र शुद्ध पंचमीदिनीं । 'मीनावतार' म्हणती झाला मध्यान्हीं । चैत्र शुद्ध अष्टमीदिनीं । 'भवानी-जयंती' असे हो ॥ २५ ॥ चैत्र शुद्ध अष्टमीला । 'अन्नपूर्णेचा जन्म' झाला । चैत्रशुद्ध नवमी तिथीला । जन्म जाहला 'तारेचा' ॥ २६ ॥ चैत्रमासीं शुद्ध नवमी दिनीं । भृगुवासरीं प्रदोषव्यापिनी । अकस्मात् मणिद्वीपनिवासिनी । 'भुवनेश्वरी'

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

उद्भवली ॥ २७ ॥ चैत्र शुक्ल नवमी दिनीं । पुनर्वसु-नक्षत्रीं मध्यान्हीं । ‘श्रीराम’ जन्मले कर्कलग्नीं । ती रामजयंती
प्रसिद्ध ॥ २८ ॥ ही रामनवमी मध्यान्हव्यापिनी । महत्पुण्यतमा वर्णिली पुराणीं । म्हणूनि हीच स्वीकारिजे जनीं ।
सर्व संशय निरसुनी ॥ २९ ॥ दोन्ही दिवशीं मध्यान्हव्यापिनी । असतां अथवा नसतां जनीं । द्वितीय दिवसाची
स्वीकारुनी । अष्टमीविद्ध त्यजावी ॥ ३० ॥ पूर्वदिवशीं पूर्ण मध्यान्हकालीं । जरी ही नवमी असली । आणि द्वितीयदिनीं
तैशीच आली । मध्यान्हींच्या एकभागीं ॥ ३१ ॥ तरीही जी पूर्वअष्टमीयुक्त । ती नवमी टाकावी शास्त्रनिषेधित ।
द्वितीय दिनींचीच घ्यावी विहित । माधवादि मतानें ॥ ३२ ॥ मध्यान्हकालीं अष्टमीयुक्त । नवमी असली
पुनर्वसु-नक्षत्रसहित । तथापि त्यागूनि ती वेधित । घ्यावी द्वितीय दिवसाची ॥ ३३ ॥ जेव्हां असेल दशमी
क्षयासी । आणि नवमीच्या पारणादिवशीं । येईल स्मार्तांची एकादशी । तेव्हां अष्टमीयुक्त तई घेइजे ॥ ३४ ॥ दुसरे
दिवशीं सहा घटिकापर्यंत । असलेली नवमी वैष्णवांसी उक्त । आणि शुद्ध नवमी नसेल मिळत । किंवा तीन मुहूर्त
असेल ॥ ३५ ॥ अथवा तीन मुहूर्तांहून कमी । असतां अष्टमीविद्ध नवमी । तद्दिनीं सर्वांनीं ‘रामनवमी’ । जयंती
उपोषण करावें ॥ ३६ ॥ पुनर्वसु नक्षत्र दोन्ही दिवशीं । व्याप्त असेल नवमी मध्यान्हेसी । पुण्यकारक योग निश्चयेंसी ।
किंचित् भाग असतांही ॥ ३७ ॥ यदर्थीं असे अगस्तीचें वचन । तैसें पुरुषार्थचिंतामणीचें भाषण । दोन्ही दिवशीं
पुनर्वसु जाण । माध्यान्हीं असतां नसतांही ॥ ३८ ॥ दोन्ही दिवशीं मध्यान्हसमयाला । पुनर्वसूचा संयोग असला ।
अथवा दोन्ही दिवशीं नसला । तथापि दुसरीच घ्यावी ॥ ३९ ॥ मध्यान्हीं नवमी पुनर्वसुयुक्त । असेल ती अवश्य
स्वीकृत । किंवा ज्यापरी सांप्रदाय मत । त्यापरी करिती जयंतीतें ॥ ४० ॥ परंतु अधिक-मलमासांत । रामजन्मोत्साह
मुळीं ना उक्त । द्वितीयचैत्रशुक्लीं करिजेत । अगस्तिसंहितेंत वचन असे ॥ ४१ ॥ चैत्र शुक्ल नवमीस उपोषण जागरण ।

पित्रोद्देशें करावें तर्पण । ब्रह्मप्राप्तीची ज्यांसी इच्छा जाण । त्यांनीं अगत्य करावें ॥ ४२ ॥ न केलिया रामजयंती-उपवास ।
कुंभिपाक नरकांत होय वास । म्हणूनि सर्वत्रांनीं जयंती-उपवास । भक्तिपूर्वक करावा ॥ ४३ ॥ श्रीरामपूजा प्रतिमादान ।
वेदघोष पुराणकीर्तन । दशमीस पारणा ब्राह्मणभोजन । करितां महत्पुण्य होतसे ॥ ४४ ॥ चैत्रशुक्लनवमी-मध्यान्हीं ।
मेषार्क पुनर्वसु-नक्षत्रीं कर्कलग्नीं । पंचग्रह असतां बलवान उच्चस्थानीं । श्रीराम अवतीर्ण जाहले ॥ ४५ ॥ साधूंचें व्हावया
संरक्षण । दशाननादि दानवांचें विनाशन । करावया धर्मसंस्थापन । 'श्रीरामचंद्र' अवतरले ॥ ४६ ॥ या नवमीस
देवीनवरात्रसमाप्ति । शारदीनवरात्रवत् करिती । चैत्रशुक्ल चतुर्दशीस सांगती । 'सिद्धेश्वरीचा जन्म' असे ॥ ४७ ॥
चैत्री शुक्ल पौर्णिमा सूर्योदयव्यापिनी । 'हनुमज्जयंती' घ्यावी जनीं । याचें कारण श्रोतृजनीं । सादरचित्तें परिसावें ॥ ४८ ॥
आपल्या जन्मकालींच हनुमंतें । फलबुद्धीनें सूर्यबिंब ग्रासावयातें । उड्डाण केलें ऐशी कथा आहे ते । म्हणून सूर्योदयीं
जन्म ग्राह्य ॥ ४९ ॥ या चैत्रशुद्ध पौर्णिमेपासून । आरंभावें वैशाखस्नान । कोणी चैत्रशुद्ध एकादशीपासून । या
स्नाना प्रारंभिती ॥ ५० ॥ अथवा मेषसंक्रातीपासून । कोणी करिती हें स्नान । व्रतासि राकापौर्णिमादिन ।
घेती जन सगळे ते ॥ ५१ ॥ शनि-रवि-गुरुवारयुक्ता । चैत्री पौर्णिमा आली असतां । तद्दिनीं स्नान श्राद्धादि कर्में
करितां । अश्वमेधफल लागतें ॥ ५२ ॥ चैत्रशुद्ध पौर्णिमेला । कित्येकीं सिद्धेश्वरी-जन्म कथिला । श्रीकाशीचा
जन्मदिवस गणिला । इंद्रपूजनादि अन्वाधान करावें ॥ ५३ ॥ कोणी म्हणती चैत्रकृष्णनवमीस । श्रीहरीनें
अपराण्हसमयास । धरिलें 'वराहावतारा'स । जगदुद्धार करावया ॥ ५४ ॥ तृतीया तिथीस वैशाख शुक्लांत । पुनर्वसु नक्षत्र-युक्त ।
निशीमाजीं प्रथम प्रहरांत । 'परशुरामजयंती' असे कीं ॥ ५५ ॥ रेणुकेच्या गर्भापासून । भार्गवराम झाले अवतीर्ण ।
एकवीस वेळ क्षत्रियशून्य । पृथ्वी केली विप्रेंद्रें ॥ ५६ ॥ दोन्ही दिवशीं प्रदोषकालीं । तृतीया जर व्यापक

असली । तरी दुसरे दिवसाची घेतली । पाहिजे जयंतीकारणें ॥ ५७ ॥ कारण संकल्पकालापासून । तृतीया असे
व्यापून । दिवस-रजनीं तृतीयेचा योग म्हणून । दुसरी ग्रहण करावी ॥ ५८ ॥ प्रसंगवशात् ही अक्षय्य तृतीया ।
साङ्ग पूर्वाण्हव्यापिनी ग्राह्या । अर्ध मुहूर्त घेती शुभ कार्या । देवपित्रादि कर्मांसी ॥ ५९ ॥ वैशाखशुक्ल तृतीयादिनीं ।
यत्किंचित दानादिक भावेंकरुनी । करावें तें सर्वक्षयरहित होतें म्हणुनी । अक्षय्य तृतीया हिला म्हणती ॥ ६० ॥
वेदघोष कीर्तन पुराण । दुसरे दिवशीं ब्राह्मणभोजन । पारणें करूनियां जाण । साजरा दिन करावा ॥ ६१ ॥ सूर्योदयापासून दोन यामपर्यंत । पूर्वाण्हव्यापिनी तृतीया उक्त । दोन्ही दिवशीं पूर्वाण्हकालीं असतां व्याप्त ।' द्वितीया दिनीचीच
घ्यावी ॥ ६२ ॥ ही तृतीया बुध किंवा सोमवारयुक्त । उत्तम परी असावी द्वितीयाविवर्जित । बुध रोहिणीयुक्त जरी
द्वितीया असत । घेऊं नये तथापि ॥ ६३ ॥ रोहिणी नक्षत्र बुधवारयुक्ता । अति पुण्यदायक तृतीया ही तत्त्वतां ॥
उदकुंभदानें ब्रह्मलोकता । प्राप्त होय अनायासें ॥ ६४ ॥ रत्नमालादि ग्रंथांचें वचन । अक्षय्यतृतीया 'कृतयुगारंभ' दिन ।
कार्तिकशुद्ध नवमीसी जाण । 'त्रेतायुगारंभ' असे ॥ ६५ ॥ द्वितीया करूनि विवर्जित । द्वितीयदिनीं चतुर्थीयुक्त । तृतीया
असेल जी तीन मुहूर्त । तीच घ्यावी देवपितृकर्मांसी ॥ ६६ ॥ या चारीयुगारंभतिथींत । श्राद्धें करावीं पिंडरहित ।
पितृत्रय मातामहत्रय सपत्निक असत । त्यांचे उद्देशें करावें ॥ ६७ ॥ 'द्वापारयुगा' चा आरंभदिवस । भाद्रपदकृष्ण त्रयोदशीस । 'कलियुगाचा' प्रारंभदिवस । माघशुद्ध पौर्णिमा असे ॥ ६८ ॥ स्वोच्चस्थानीं षट्ग्रह बलवंत । मिथुनेसी
राहुसंस्थित । 'परशुरामावतार' विख्यात । जयंत्युत्साह करावा ॥ ६९ ॥ कारण युगादि मन्वादि तिथींस । श्राद्धें केलिया तीं
पितरांस । दोनसहस्त्र वर्षेंपर्यंत तृप्तीस । देणारीं निश्चयें होताति ॥ ७० ॥ शुक्लपक्षाच्या युगादि तिथि । अथवा मन्वादि
दिवस जे असती । त्या तिथींत श्राद्ध करावें शास्त्ररीतीं । पूर्वाण्हकालीं अवश्य ॥ ७१ ॥ आणि कृष्णपक्षांतील युगादि ।

ज्या तिथि अथवा मन्वादि। त्या दिवशीं श्राद्ध सांगितल्या विधीं। अपराण्हकालीं करावें ॥ ७२ ॥ जे असती धनादि रहित। त्यांसी श्राद्ध करणें अनुकूल नसत। म्हणून त्यांनीं मन्वादि युगादि तिथींत। तिलतर्पण तरी करावें ॥ ७३ ॥ भागीरथीच्या ओघानें पूर्वकालीं। जन्हूची तपश्चर्या भंग झाली। मग जन्हु क्रोधयुक्त होऊनि तत्कालीं। भागीरथीसी प्राशित ॥ ७४ ॥ स्वकन्येस जन्हुपिता। क्रोधावेशें झाला प्राशिता। हें देखूनि भगीरथें त्वरितां। आर्जविलें तयास ॥ ७५ ॥ तेव्हां जन्हूनें प्रसन्न होऊन। आपल्या दक्षिण कर्णरंध्रांतून। पुन्हां तियेस दिधलें सोडून। म्हणून 'जान्हवी' नाम पडियलें ॥ ७६ ॥ त्या गंगेचा उत्साह-जन्मदिवस। आहे वैशाख शुक्ल सप्तमीस। मध्यान्हकाल-व्यापिनी जन्मास। घ्यावी शुद्ध सप्तमी ॥ ७७ ॥ गगन-मेखला जियेचें कटिभूषण। मध्यान्हीं शुक्ल सप्तमीस भावेंकरून। या गंगादेवीचें केलिया पूजन। वांछितार्थ लाधतसे ॥ ७८ ॥ वैशाख शुक्ल चतुर्दशी। 'नृसिंहजयंती' म्हणती जियेसी। ती प्रदोषकालव्यापिनी जन्मासी। घ्यावी श्रीमन्नृसिंहाच्या ॥ ७९ ॥ स्वातिनक्षत्र सोम आणि शनिवार। सिद्धि-योग वणिज-कर्ण सुखकर। यांतील एकादा असतां योग सुंदर। किंवा हे सर्वही प्रशस्त जाणावे ॥ ८० ॥ श्रीमन्नृसिंहकृपाप्रसादेंकरून। सर्व सौभाग्य होतें अखंडवर्धन। ऐसें दुर्लभव्रत महद्भाग्येंकरून। पुरुषांसि प्राप्त होतसे ॥ ८१ ॥ ऐसें प्रतिवर्षीं हें श्रीमन्नृसिंहव्रत। भगवत्प्रसन्नतार्थ आचरावें संतत। पूजन उपोषण जागरण विप्रभोजनयुक्त। अनंत फलदायक असे हें ॥ ८२ ॥ 'कूर्म-बौद्ध-नृसिंह-कल्की' हे चार। सायंकालीं उद्भवले अवतार। ऐसा पुराणीं वाक्यसमुच्चयांत प्रकार। कथिला असे महर्षींनीं ॥ ८३ ॥ असो दोन्ही दिवशीं सूर्यास्तकालीं। चतुर्दशीची व्याप्ती असली। अथवा मुळींच नसली। तथापि द्वितीयादिनींचीच घ्यावी ॥ ८४ ॥ परंतु या नृसिंहजन्मव्रतासी। घेऊं नयेचि त्रयोदशी। प्रदोषकालव्यापिनी चतुर्दशी। घ्यावी शास्त्रविहिती ॥ ८५ ॥ चैत्र-वैशाखमासीं वसंतऋतूंत। वसंतपूजनीं करावे विप्र तोषित। तैसेंचि संततधारीं देवार्चनउक्त। उदक द्यावें

* * *

सर्वांसी ॥ ८६ ॥ वामनपुराणांतील वचन । वैशाखांत वैदिक विद्वान ब्राह्मण । सुगंध चंदन पुष्पें फलादिकींकरून । पूजावे परमभक्तीनें ॥ ८७ ॥ द्विजांसी सुगंध चंदनाची उटी । सुवासिक पुष्पहार घालावे कंठीं । पात्रीं पक्वान्न आम्रफलाची दाटी । पन्हें द्यावें प्राशनार्थ ॥ ८८ ॥ तैसेचि प्राशनार्थ सुगंध शीतल । अर्पावें स्वच्छ रुचिकर जल । विंझणा पंख्यासह दक्षिणा तांबूल । यथाशक्ति समर्पावे ॥ ८९ ॥ ‘प्रपा’ म्हणजे पाणपोया । ठेवाव्या सर्वांसी उदक प्यावया । अभिषेक करावें देवराया । तेणें घडतीं महत्पुण्यें ॥ ९० ॥ वैशाख शुद्ध पौर्णिमा तिथीस । ‘कूर्मजयंती’ असे सायान्हकालास । तसाचि ‘पुष्करा’ देवीचा जन्मदिवस । आहे विद्वांसप्रतिपादित ॥ ९१ ॥ वैशाखकृष्ण चतुर्दशीसी । ‘ज्वालामुखी’ चा जन्म निश्चयेंसीं । ह्या सर्व वैशाखमासीं । शंकरासी जलधारा ठेवावी ॥ ९२ ॥ समाप्त होतां वैशाखस्नान । मधुयुक्त तिलपात्रदान । छत्र पादुका दीपदान देऊन । तिलतर्पण करावें ॥ ९३ ॥ वसंतऋतूंत एकमास । तीन दिवस अथवा एक दिवस । अनुकूल असेल त्या दानव्रतास । वैशाखमासीं करावें ॥९४॥ ज्येष्ठशुद्ध प्रतिपदेपासून । ‘दशहरारंभ’ गंगास्नान । गंगालहरीस्तोत्रपठणश्रवण । दशदिन नित्य करावें ॥ ९५ ॥ ज्येष्ठशुद्ध प्रतिपदेसी । करावें करवीरव्रतासी । ज्येष्ठशुक्ल द्वितीयेसी । ‘बौद्ध कल्की-’अवतार असती ते ॥ ९६ ॥ ज्येष्ठ शुद्धतृतीयेसी । करावें ‘रंभाव्रतासी’ । ज्येष्ठशुक्लचर्तुर्थीसी । ‘उमावतार’ जाहला ॥ ९६ ॥ ‘शुक्लादेवीपूजन’ अष्टमीस । उपोषण करावें नवमीस । ज्येष्ठशुक्लदशमीतिथीस । ‘गंगावतार’ जाहला ॥ ९७ ॥ ज्येष्ठमास शुक्लपक्ष दशमी बुधवार । हस्तनक्षत्र व्यतीपात गर । आनंद कन्या चंद्र वृषभस्थ भास्कर । हीं ‘दशहरा’संज्ञक जाणावी ॥ ९८ ॥ बुधवार आणि हस्तनक्षत्रांचा । आनंदनामक योग होतो साचा । दशमी आणि व्यतीपात् या दोहोंचा । मुख्यत्वें योग गणताति ॥ ९९ ॥ म्हणून या दशयोगांतील कित्येक । योगयुक्त ऐशी दशमी सम्यक । ज्या दिवशीं पूर्वाण्हकालीं व्यापक । तद्दिनीं ‘दशहराव्रत’ करावें ॥ १०० ॥ पूर्वाण्हकालीं दोन्ही दिवशीं । दशमी व्यापक जरी ऐशी । तरी

दहांतून बहुतयोग ज्या दिवशीं । असतील ती दशमी घ्यावी ॥ १ ॥ जरी असेल अधिकमास ज्येष्ठ । तथापि अधिकमासीं व्रत करावें हें श्रेष्ठ । द्वितीयज्येष्ठमासीं करूं नये स्पष्ट । ऐसें शास्त्र कथितसे ॥ २ ॥ या दिवशीं काशीनिवासी जे जन । त्यांनीं दशाश्वमेधतीर्थीं स्नान । करून श्रीगंगापूजन । यथाशक्ति दानधर्म करावा ॥ ३ ॥ अन्य देशांत वसणारे जे लोक । त्यांनीं संनिध नदी सरोवरादिक । असतील त्या तीर्थांत स्नान आवश्यक । गंगापूजनादिक करावें ॥ ४ ॥ कायिक पापाचे प्रकार तीन । वस्तु घेणें दिधल्यावांचून । हिंसा करणें शास्त्राज्ञेवीण । परस्त्रीगमन तृतीय तें ॥ ५ ॥ आणि वाचिक पापाचे प्रकार चार । कठोर असत्य भाषण निरंतर । चहाडी असंबद्धप्रलाप चार । ऐसीं वाचिकपापें जाणावीं ॥ ६ ॥ परद्रव्यापहरणीं सदा ध्यान । विनास्वार्थ परानिष्टचिंतन । वस्तूविषयीं असत्याग्रह करणें धारण । ऐशीं मानसिक त्रिविध पापें जाणावीं ॥ ७ ॥ यापरी कायिक वाचिक मानसिक । दशविध पापांसि होऊं नये प्रवर्तक । विवेकें भगवत्प्राप्ति आवश्यक । पुण्य मोक्षदायक होतसे ॥ ८ ॥ अनेक पातकें गंगास्नानें । दग्ध होती नुसत्या स्मरणें । सकल पितर उद्धरती दर्शनें । भवमुक्तता होय गंगाकृपें ॥ ९ ॥ ज्येष्ठशुक्ल द्वादशीस । 'कूर्मजयंती' सायान्हीस । युगपरत्वें वर्णिती विद्वांस । धर्मादि ज्योतिषग्रंथांत ॥ ११० ॥ आषाढशुद्ध प्रतिपदा । 'वैद्यनाथजयंती' असे तदा । आषाढशुक्ल एकादशीस सदा । 'मत्स्यजयंती' म्हणताति ॥ ११ ॥ आषाढशुद्धएकादशी महातिथी । तद्दिनीं सायान्हीं मत्स्यजयंती । उपोषण देवार्चन शुद्ध चित्तीं । पुराण कीर्तनादि आचरावें ॥ १२ ॥ हरिपूजन करूनि एकादशीउपवास । पुंडरीक-निर्मित क्षेत्रीं ज्याचा निवास । त्या 'श्रीविठ्ठलपांडुरंग'-दर्शनें मानवास । वांछितार्थ मुक्ति प्राप्त होतसे ॥ १३ ॥ या एकादशीस ईश्वरपूजा करून । श्रीभगवंताचे संनिध बैसून । चातुर्मासिक काम्य नित्य व्रत जाण । अथवा पारणोत्तर संकल्पावें ॥ १४ ॥

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

आषाढशुद्ध पौर्णिमा तिथी । 'व्यास-गुरुपूजा पौर्णिमा' म्हणती । सूर्योदयापासून सहा घटिका असेल ती । घ्यावी गुरुव्यासपूजेस
॥ १५ ॥ याच पौर्णिमेच्या ठायीं । 'कोकिलाव्रत' 'शिवशयनोत्सवादि' हीं । करावयासि पौर्णिमा पाहीं ।
प्रदोषव्यापिनी घ्यावी ती ॥ १६ ॥ श्रावणशुक्लतृतीयेस । हरीनें धरिलें कूर्मावतारास । तैशापरीच या तिथीस ।
'मंगलागौरीचा' जन्म म्हणती ॥ १७ ॥ श्रावणशुद्धषष्ठी दिनीं । 'कल्कीजयंती' असे सायान्हीं । श्रावण शुद्ध पौर्णिमा
दिनीं । 'हयग्रीवोत्पत्ति' जाहली ॥ १८ ॥ या पौर्णिमेस ब्राह्मणांची श्रावणी । उपाकर्मोत्सर्ग करिती होमहवनीं । 'नारळी
पौर्णिमा' वर्णिती जनीं । रक्षाबंधन करावें ॥ १९ ॥ श्रावणकृष्ण प्रतिपदातिथीस । 'विंध्याचलजयंती' वर्णिती
विद्वांस । आणि 'भीमचंडीजयंती'ही सुरस । असे याच प्रतिपदेसी ॥ १२० ॥ श्रावणकृष्ण षष्ठीस । 'हरदेवजयंती'
म्हणती विद्वांस । श्रावणकृष्ण सप्तमीस । 'सीताजन्म' जाहला ॥ २१ ॥ श्रावणकृष्णाष्टमीतिथी । हिला 'कृष्णजन्माष्टमी'
म्हणती । ही दोनप्रहररात्रीस असेल ती । घ्यावी श्रीकृष्णजन्मास ॥ २२ ॥ पूर्व दिवशीं मध्यान्हरात्रीस ।
असेल अष्टमी ती घ्यावी जन्मोत्सवास । किंवा दुसरे दिवशीं मध्यरात्रीस । असेल तरी ती घ्यावी ॥ २३ ॥
मध्यान्हव्यापिनी दोन्ही दिवशीं । असतां दुसरीच करावी आदरेंसीं । आणि दोन्ही दिवशीं अर्धरात्रीसी । नसल्यास
दुसरी करावी ॥ २४ ॥ स्थूलदृष्टीनें आठवा मुहूर्त । तयासीच 'निशीथ' ( मध्यरात्र ) म्हणतात । अष्टमीस रोहिणी
असतां शास्त्रांत । जयंती मानिली चार प्रकारें ॥ २५ ॥ पूर्वदिवशीं मध्यान्हरात्रकालीं । रोहिणीनक्षत्रयुक्त
अष्टमी असली । तरी पहिलीच पाहिजे केली । कृष्णजयंतीकारणें ॥ २६ ॥ दुसरे दिनीं निशीथ समयासी । अष्टमी
रोहिणीयुक्त ऐशी । आली असतां त्या दिवशीं । 'कृष्णजन्माष्टमी' करावी ॥ २७ ॥ दोन्ही दिवशीं मध्यरात्रीं ।
अष्टमी असतां रोहिणीनक्षत्रीं । तरी दुसरे दिवशीं शास्त्रीं । वर्णिलेली करावी ॥ २८ ॥ पूर्वदिनीं अष्टमी मध्यरात्रीस ।

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

आणि दुसरे दिवशीं रोहिणी निशीथकालास । ऐशी आली असतां करावी खास । माधवमतें दुसरे दिनीं ॥ २९ ॥
हेमाद्रिमतें पूर्व दिवशीं । कमलाकरमतें दोन्ही दिवशीं । करावें जयंतीउपोषणासी । जागरणउत्साह-कृष्णपूजा
॥ १३० ॥ रोहिणीनक्षत्र पूर्वदिनीं । दुसरे दिवशीं अष्टमी रात्रीं मध्यान्हीं । ऐशी आली असतां जनीं । घ्यावी दुसरे
दिवसाची ॥ ३१ ॥ दोन्ही दिवशीं मध्यरात्रीस । अष्टमी आणि रोहिणी नसल्यास । दुसरे दिवशींच अष्टमी उपवास ।
करावा शास्त्रविहित ॥ ३२ ॥ या अष्टमीस रोहिणी नक्षत्र । आणि आलिया बुध किंवा सोमवार । त्यांतही नवमी
असतां फल थोर । मुक्तिदायक वर्णिलेंसे ॥ ३३ ॥ गोकुलाष्टमीचें काम्यनित्यव्रत । न केलिया होय नरक प्राप्त ।
केलें असतां सर्व कार्यें सिद्ध होत । म्हणून अवश्य करावें ॥ ३४ ॥ या व्रताचे दिवशीं उपोषण जागरण । करावें
मुख्यत्वें श्रीकृष्णपूजन । मृत्तिकादि अथवा सुवर्ण । श्रीकृष्णप्रतिमा करूनियां ॥ ३५ ॥ आपल्या कुलाचारानुसार ।
कृष्णप्रतिमापूजन-उत्साह यथाशास्त्र । चंद्रपूजनादिक करावें समंत्र । वेदघोष कीर्तनपुराणादि ॥ ३६ ॥ अष्टमीउपोषण
करणारे नारीनर । तिहीं अष्टमीतिथी संपल्यानंतर । देवब्राह्मणांसी नैवेद्य प्रथम साचार । अर्पूनि पारणा करावी
॥ ३७ ॥ रोहिणीनक्षत्रयुक्त अष्टमीस । ज्यांनीं केला असेल उपवास । नक्षत्र आणि तिथीच्या अंतीं त्यांस । पारणें
केलें पाहिजे ॥ ३८ ॥ अष्टमी आणि रोहिणी या दोहोंतून । एक दिवसां आणि द्वितीय रात्रीं संपूर्ण । असतां
सोडावें उपोषण । द्वितीयदिनीं दिवा किंवा रात्रीस ॥ ३९ ॥ दिवसां तिथि आणि नक्षत्र जेव्हां । दोहोंतून एक
संपत असेल तेव्हां । उपोषितांनीं उपवास सोडावा । नैवेद्यार्पण करूनि ॥ १४० ॥ जेव्हां दिवसां एकही संपत नाहीं ।
तेव्हां मध्यरात्रीच्यापूर्वीं लवलाहीं । एकाच्या समाप्तिकालीं पाहीं । पारणा अवश्य करावी ॥ ४१ ॥ मध्यरात्रीच्या
पूर्वीं किंचित् । होत असल्यास अष्टमी तिथ्यन्त । अथवा होतां नक्षत्रान्त । तदा पारणें सोडावें ॥ ४२ ॥ रात्रीं असंभव

भोजनाचा । असल्यास आहार फलादिकांचा । करूनि उपवास सोडावा साचा । म्हणजे पारणा होतसे ॥ ४३ ॥ श्रावणकृष्णाष्टमीस वृषभलग्नीं । सिंहराशीचा रवि मध्यरजनीं । पंचग्रह उच्च बलीय असूनि । वृषभराशीस चंद्र होता ॥ ४४ ॥ स्वगृहींचे चतुर्ग्रह अति बलवान । तेव्हां अवतरले पूर्णब्रह्मकृष्णभगवान् । कंसादि दानवांचें व्हावया निधन । आणि भूभार उतरावयासी ॥ ४५ ॥ भक्तपांडवादिकांच्या हितार्थ । आणि दुष्ट कौरवादिविनाशार्थ । धर्मसंस्थापनार्थ श्रीकृष्णनाथ । जगदुद्धरणार्थ अवतरले ॥ ४६ ॥ श्रावणकृष्णाष्टमीदिनीं । ‘शीतलाजन्म’ म्हणती कोणी । श्रावणकृष्णनवमीदिनीं । ‘कर्दमजन्म’ बोलती ॥ ४७ ॥ श्रावणकृष्णत्रयोदशीतिथी । ते दिवशीं झाली ‘कलियुगोत्पत्ति’ । अमावास्येसि ‘पिठोरीव्रत’ करिती । प्रदोषव्यापिनी लक्षुनी ॥ ४८ ॥ भाद्रपदशुक्लद्वितीयातिथी । ते दिनीं असे ‘बलभद्रजयंती’ । शुक्लतृतीयेस ‘हरितालिकाव्रत’ करिती । मध्यान्हीं करिती ‘मंगलागौरीजन्म’ ॥ ४९ ॥ तृतीया हरितालिकाव्रतासी । मुहूर्तमात्र असतां दुसरे दिवशीं । चतुर्थीयुक्त प्रशस्त ऐशी । घ्यावी शिवपार्वतीपूजनाला ॥ १५० ॥ पूर्णतृतीया त्यजावी । चतुर्थीयुक्त अवश्य घ्यावी । क्षयकारणें चतुर्थीयुक्त अभावीं । घ्यावी द्वितीयायुक्त तदा ॥ ५१ ॥ या व्रतदिनीं स्त्रियांनीं उपोषण । श्रीशंकरपार्वतीचें पूजन । हरितालिकाकथाश्रवण । करावें जागरण रजनीसी ॥ ५२ ॥ भाद्रपदशुक्ल चतुर्थीदिनीं । ‘गणेशजयंती’ मध्यान्हव्यापिनी । ‘गणेशचतुर्थी’ म्हणती जनीं । सिद्धिविनायकव्रत असे ॥ ५३ ॥ दोन्ही दिवशीं संपूर्ण मध्यान्हीं असेल । अथवा जरी तैशी नसेल । तरी पूर्वींची ग्रहण करूनि प्रांजल । व्रत पूजनादिक आचरावें ॥ ५४ ॥ दोन्ही दिवशीं मध्यान्हकालीं । सारखेपणें चतुर्थी असली । अथवा न्यूनाधिकत्वें एकभाग आली । तरी पूर्वींचीच घ्यावी ॥ ५५ ॥ कित्येक ग्रंथकारांचें असें मत । न्यूनाधिकपणें चतुर्थीव्याप्त । अथवा अधिकव्यापिनी असत । तरी दुसरीच घ्यावी ॥ ५६ ॥ दिवसा मध्यान्हीं सर्वथा

स्पर्श नाहीं । दुजे दिनीं मध्यान्हव्यापिनी तरीही । दुसरीच घ्यावी पाहीं । मध्यान्हकालव्यापिनी चतुर्थी ॥ ५७ ॥ पूर्वदिवशीं एकदेश असे मध्यान्हीं । आणि दुसरे दिवशीं संपूर्ण मध्यान्हव्यापिनी । असतां चतुर्थी दुसरे दिनीं । घ्यावी सप्रमाण ते परिसा ॥ ५८ ॥ गणेश व्रत चतुर्थी दिनीं । तृतीयायुक्त मध्यान्हकालव्यापिनी । असेल ती प्रशस्त जाणिजे जनीं । चतुर्थी नसतां पंचमीविद्ध घ्यावी ॥ ५९ ॥ हाचि निर्णय इतरमासीं । जाणावा शास्त्रप्रमाणेंसीं । ही चतुर्थी रवि-भौमवारयुक्त असतां ऐशी । विघ्नेशार्चनीं मोठी प्रशस्त ॥ १६० ॥ गणेशचतुर्थीस चंद्रदर्शन । झालिया येतसे मिथ्याभिदूषण । तद्दोषशांत्यर्थ करावें पठण । सिंहप्रसेन-श्लोकांचें ॥ ६१ ॥ या चतुर्थीस भावें मृण्मयादिक । मूर्ति पूजावी सिद्धिविनायक । मोदक-नैवेद्यार्पण देख । ब्राह्मणभोजनादिक करावें ॥ ६२ ॥ सिद्धिविनायकें प्रगटून । सिंदूरासुराचें केलें मर्दन । सर्व कार्यारंभीं करावें तत्पूजन । तेणें कार्यसिद्धि निर्विघ्न होतसे ॥ ६३ ॥ भाद्रपद शुक्ल तृतीया दिनीं । वराहजयंती अपराण्हीं । भाद्रपद शुक्ल पंचमीस कोणी । कल्पभेदें म्हणताति ॥ ६४ ॥ हीच 'ऋषिपंचमी' मध्यान्हव्यापिनी । ऋषिपूजनासी घ्यावी जनीं । दोन्ही दिवशीं पंचमी मध्यान्हव्यापिनी । असतां वा नसतां पूर्वींचीच घ्यावी ॥ ६५ ॥ या पंचमीस ऋषिपूजन करून । नांगरल्यावांचून जी जमीन । तींत मनुष्यहस्तें झालेलें उत्पन्न । तण्डुल शाकादिक भक्षावें ॥ ६६ ॥ भाद्रपद शुक्ल सप्तमीदिन । 'राधाजन्म' वर्णिती विद्वान् । भाद्रपदअष्टमी दिन । 'ज्येष्ठादेवी'-जन्म कोणी म्हणती ॥ ६७ ॥ या अष्टमीस ज्येष्ठादेवीचें पूजन । अष्टमी किंवा ज्येष्ठा नक्षत्र प्राधान्य । व्रत आचरावें भावें करून । स्त्रीजनीं मंगलप्रद ॥ ६८ ॥ अनुराधा नक्षत्रीं आवाहन । ज्येष्ठा नक्षत्रीं देवीपूजन । मूल नक्षत्रीं करावें विसर्जन । त्रयदिनात्मक हें व्रत ॥ ६९ ॥ भाद्रपद शुक्ल द्वादशीदिनीं । श्रवण नक्षत्रयुक्त मध्यान्हीं । 'वामनजयंती' म्हणती जनीं । अवतार पंचम श्रीहरीचा ॥ १७० ॥ या व्रतास मध्यान्हकालव्यापिनी ।

अथवा द्वादशी जी असेल मध्यान्हीं । किंवा अन्यत्र कालीं नक्षत्रश्रवणीं । युक्त असेल ती घ्यावी ॥ ७१ ॥ उभय दिनीं श्रवणनक्षत्राचा योग । असतां पूर्वीचीच घेणें योग्य । किंवा सर्व प्रकारें श्रवण साङ्ग । द्वादशीस नसल्यास ॥ ७२ ॥ म्हणजे मध्यान्हव्यापिनी द्वादशीस । श्रवणाभाव असल्यास । ती द्वादशी टाकून खास । श्रवणयुक्त एकादशीस व्रत करावें ॥ ७३ ॥ शुद्ध एकादशीस श्रवण नसल्यास । आणि दशमीविद्ध एकादशीस । श्रवण नक्षत्र असल्यास । ते दिवशीं व्रत करावें ॥ ७४ ॥ पूर्वदिनीं द्वादशी ( मध्यान्हव्यापिनी ) । आणि दुसरे दिवशीं मध्यान्हाहूनि । अन्यत्रकालींयुक्त श्रवणीं । असतां पूर्वीचीच करावी ॥ ७५ ॥ दोन्ही तिथीचेठायीं श्रवण-। नक्षत्राभाव असल्या जाण । मध्यान्हव्यापिनी द्वादशीस जन । करा हो व्रत भक्तीनें ॥ ७६ ॥ दोन्ही दिवशीं मध्यान्हकालीं । द्वादशीची व्याप्ति असली वा नसली । तरी एकादशीयुक्त पाहिजे घेतली । श्रीभगवान् वामनव्रतासी ॥ ७७ ॥ तिथिनक्षत्रांच्या अंतीं । पारणा करावी पूर्वोक्तरीतीं । या दिवशीं मध्यान्हीं नदीसंगमतीर्थीं । करावें स्नान अवश्य ॥ ७८ ॥ श्रीभगवान् विष्णुरूपी वामन । सुवर्णप्रतिमेची पूजा करून । सुवर्ण छत्रादि समंत्रदान । द्यावें सदाचारी द्विजांसी ॥ ७९ ॥ भाद्रपद शुक्ल अनंतचतुर्दशी । द्विमुहूर्तव्यापिनी घेतां सूर्योदयासी । चतुर्दशग्रंथीयुत दोरकानंतासी । पूर्वाण्हीं पूजितां फलप्रद ॥ १८० ॥ भाद्रपदकृष्णषष्ठी तिथी । 'कपिलाषष्ठी' जयंती कोणी म्हणती । भाद्रपदकृष्णाष्टमीस मध्यान्हीं वदती । 'गजगौरीजन्म' 'दुर्गाष्टमी-महालक्ष्मी'-दर्शन ॥ ८१ ॥ आश्विनशुक्लप्रतिपदा । सूर्योदयव्यापिनी नवरात्रारंभासि तदा । अमावास्या वर्जूनि प्रतिपदा । एकद्विमुहूर्त घेईजे ॥ ८२ ॥ आश्विन शुक्लपंचमीतिथी । कोणी 'उपांगललितादेवी-जन्म' वदती । अपराण्हव्यापिनी ललितापूजार्थ घेती । कित्येक रात्रव्यापिनी पंचमी ती ॥ ८३ ॥ आश्विन शुक्ल सप्तमीस । 'गरुडजन्म' वर्णिती विद्वांस । पत्रिकापूजा करणें या

सप्तमीस । म्हणती ‘सरस्वती-जन्म’ कोणी ॥ ८४ ॥ आश्विन शुद्ध अष्टमीला । ‘भद्रकाली’ देवीचा अवतार झाला । आश्विन शुद्ध नवमीला । ‘दुर्गादेवीचा’ जन्म असे ॥ ८५ ॥ आश्विन शुक्लांत मूलाचे प्रथमपादीं । सूर्यास्तापूर्वी ‘सरस्वतीचें’ आवाहन आदि । पूर्वाषाढांत दिवसा करावें पूजनादि । उत्तराषाढांत बलिदान कीजे ॥ ८६ ॥ प्रथमपादीं नक्षत्रश्रवण । असतां करावें सरस्वती-विसर्जन । सरस्वती-स्थापनेपासून । विसर्जन होईतोंपर्यंत ॥ ८७ ॥ अध्ययन अध्यापन लेखन । अनध्याय पाळावा जाण । विद्येच्छु जे असती जन । त्यांहीं अध्ययनादि वर्जावें ॥ ८८ ॥ आश्विन शुक्ल महाष्टमी । सूर्योदयव्यापिनी घ्यावी संयुक्त नवमी । सर्वथा वर्जावी युक्तसप्तमी । भौमवार असतां पुण्यकारक ॥ ८९ ॥ आणि बलिदान-कर्माकरितां । दशमीयुक्त नवमी घ्यावी तत्त्वतां । नवमीस पारणें करितां । देवी कुलवृद्धि करितसे ॥ १९० ॥ दशमीस शारदोत्सव असे म्हणून । करावें भगवतीदेवीचें पूजन । कुलाचारानुसार विसर्जन । पारणा करावी तैशीच ॥ ९१ ॥ दशमीस श्रवण नक्षत्र नसतां । अपराण्हव्यापिनी घ्यावी नवमीयुक्ता । नवमीयुक्त दशमीस ‘अपराजिता’- । देवीपूजन विजयप्रद ॥ ९२ ॥ दोन्ही दिवशीं असतां श्रवण । दशमी अपराण्हकाल व्यापून । तेव्हां पूर्वींची घ्यावी अथवा श्रवण । असतां दुसरे दिवशीं करावी ॥ ९३ ॥ श्रवणयुक्त दशमीस । काकुस्थराजानें केलें सीमोल्लंघनास । म्हणूनि सर्वांनीं विजयादशमीस । सीमोल्लंघन करावें ॥ ९४ ॥ दोन्ही दिवशीं अपराण्हकालीं । दशमीव्याप्त असतां करावी पहिली । दोन्ही दिवशीं प्रदोषकालीं । व्याप्त असतां घ्यावी दुसरीच ॥ ९५ ॥ दशमीचा स्पर्श दोन्ही दिवशीं । असतां अपराण्हाच्या एकभागासी । तेव्हां पहिली घ्यावी देवीपूजनासी । सीमोल्लंघन शमीपूजनादि करावें ॥ ९६ ॥ अपराण्हकालीं दशमी नसतां । घ्यावी जी असेल श्रवणयुक्ता । शमीवृक्ष नसल्यास अश्मंतक तत्त्वतां । आपट्याची पूजा करावी ॥ ९७ ॥ आश्विनशुक्ल दशमीदिनीं ।

‘बौद्धजयंती’ असे सायान्हीं। ही विजयादशमी शुभ प्रयाणीं। श्रवणयुक्त विशेष आहे ॥ ९८ ॥ आश्विनशुक्ल पौर्णिमेसी भले । ते ‘अश्विनीकुमार’ जन्मले। या पौर्णिमेला रात्रीं उद्भवले । ‘श्रीमह्लक्ष्मीनारायण’ ॥ ९९ ॥ आश्विनशुक्ल पौर्णिमा ‘कोजागरी’-। व्रतासी घ्यावी व्यापिनीमध्यरात्री। ‘वरदालक्ष्मी’ पूजन करूनि प्रेमभरीं। प्रसाद ग्रहण करावा ॥ २०० ॥ ऐरावतस्थि-रलक्ष्मींद्रांचें पूजन। द्यूतकर्में करावें जागरण। ‘कोण जागृत आहे’ ऐसें लक्ष्मी बोलून। धनादिक वर देते जागृतांसी ॥ १ ॥ ज्येष्ठापत्यासि ओवाळावें निरांजनीं। करावें ‘आश्वयुजीकर्म’ आश्वलायनीं । कृष्ण द्वादशी प्रदोषव्यापिनी । ते दिनीं ‘सवत्स-गौपूजन’ करावें ॥ २ ॥ आश्विन कृष्ण त्रयोदशीला। ‘कामेश्वराचा’ जन्म झाला । आश्विन कृष्णचतुर्दशीला । ‘हनुमज्जन्म’ वदती कोणी ॥ ३ ॥ आश्विनकृष्णत्रयोदशी दिवशीं । सायंकाळीं गृहाबाहेर लावावें यमदीपासी । तेणें अपमृत्यु पावे नाशासी । श्रीयमाच्या प्रसादें ॥ ४ ॥ आश्विनकृष्ण ‘नरकचतुर्दशी’। चंद्रोदयव्यापिनी घ्यावी अभ्यंगस्नानासी । करावें यम-भीष्म-तर्पण दीपोत्सवासी । विप्रांसह भोजन करावें ॥ ५ ॥ आश्विनकृष्णअमावास्या दीपावली। लक्ष्मीपूजनासि घ्यावी सायंकालीं । ‘महालक्ष्मी-सरस्वती-महाकाली’-। पूजनें धनधान्यादि लाधतसे ॥ ६ ॥ कार्तिकशुद्धप्रतिपदादिवशीं । ‘बलिपूजा’ दीपोत्सव गोक्रीडनकासी । ‘अन्नकूटगोवर्धनपूजनासी’। श्रद्धाभक्तियुक्त करावें ॥ ७ ॥ चतुर्दशी अमाप्रतिपदेसी तैलाभ्यंगस्नान । नूतन वस्त्रालंकार धारण । द्यूत खेळणें ओवाळणें निरांजन। मंगलमालिकादि कृत्यें करावीं ॥ ८ ॥ यदर्थीं प्रतिपदा दशमुहूर्त । सूर्योदयापासून व्यापिनी घेईजेत । नवमुहूर्तांतही न्यून असत । ‘शिवरात्र’ आणि ‘बलिप्रतिपदा’ ॥ ९ ॥ अठरा घटिकांत नून असतां यदा । अमावास्यायुक्त प्रतिपदा तदा । शिवरात्र आणि बलिप्रतिपदा। घ्यावी पूजनादिकांसी ॥ २१० ॥ अभ्यंगस्नान नववस्त्रादि धारण । द्यूतकर्म नारीकर्तृकनिरांजन । या

कार्यास्तव सूर्योदयीं घटिका दोन । असणारी प्रतिपदा घ्यावी ॥ ११ ॥ या दिवशीं लक्ष्मीपूजन । आणि कुबेराचें पूजन करून । द्यूत खेळावें हर्षें जाण । जयपराजय-फल संवत्सरपर्यंत जाणावें ॥ १२ ॥ कार्तिकशुक्ल द्वितीया तिथी । कोणी 'यमजयंती' म्हणती । या दिवशीं पूर्वीं यमुनेनें यमाप्रति । स्वगृहीं भोजन घातलें ॥ १३ ॥ म्हणून यमद्वितीया म्हणती जन । अतएव या दिवशीं भगिनीहस्तें भोजन । केलिया होतसे धनलाभ पुष्टिवर्धन । स्वभगिनी-अभावें तत्सम स्त्रिया जाणाव्या ॥ १४ ॥ तयांच्या गृहीं करूनि भोजन । सत्कार करावा धनादिकेंकरून । म्हणजे होतसे लाभ-पुष्टिवर्धन । सशास्त्र विधान हें आहे ॥ १५ ॥ ही यमद्वितीया अपराण्हकालीं असतां । तरी पूर्व दिवसाची घ्यावी तत्त्वतां । दोन्ही दिवशीं अपराण्हीं असतां वा नसतां । स्वीकारावी दुसरीच ॥ १६ ॥ कार्तिकशुक्ल दशमीस । करिती 'यमुनाजयंती' आणि यमपूजनास । कार्तिक शुद्ध द्वादशीस । 'प्रबोधोत्सव'-'तुलसीविवाह'-'चातुर्मास्य-समाप्ति' ॥ १७ ॥ कार्तिक शुक्ल 'वैकुंठचतुर्दशीस' । पूर्व दिवशीं करूनि उपवास । दुसरे दिवशीं अरुणोदय कालास । असणारी जी चतुर्दशी ॥ १८ ॥ त्या चतुर्दशीचे ठायीं श्रीशंकरपूजन । करून प्रातः करावें पारण । म्हणजे अरुणोदययुक्त चतुर्दशीदिन । ऐशा अहोरात्रीस उपोषण घडतें ॥ १९ ॥ सूर्योदयापूर्वीं घटिका चार । त्यास 'अरुणोदय' संज्ञा आहे सशास्त्र । उदाहरण त्रयोदशी चोपन घटिकानंतर । सत्तावन घटिका चतुर्दशी ॥ २२० ॥ त्या चतुर्दशीस अरुणोदययुक्त अशी । जी असेल त्रयोदशी । त्या त्रयोदशीस करून उपोषणासी । चतुर्दशीस प्रातः शिवपूजन पारणा करावी ॥ २१ ॥ दोन्ही दिवशीं अरुणोदयकालीं । चतुर्दशीची व्याप्ति असली । तरी पूर्वदिवशीं उपोषण करून चांगली । शिवपूजा दुजेदिनीं अरुणोदयीं करावी ॥ २२ ॥ दोन्ही दिवशीं चतुर्दशी अरुणोदयास । नसल्यास पूर्वदिवशीं करावा उपवास । चतुर्दशीयुक्त अहोरात्रीच्या अरुणोदयास । शिव पूजूनि पारणा करावी ॥ २३ ॥ कोणी ही

चतुर्दशी निशीथ-व्यापिनी । स्वीकारिती विष्णुपूजनीं । दोन्ही दिवशीं असेल मध्यरात्र-व्यापिनी । तरी मध्यरात्रीं
आणि प्रदोष-व्यापिनी घ्यावी ॥ २४ ॥ वैकुंठचतुर्दशी विश्वेश्वर-प्रतिष्ठादिन । उपवास आणि दीपदान । जागरण नृत्य
वाद्यगायन । परमेश्वरचरित्रपठण करावें ॥ २५ ॥ कार्तिकशुक्लपौर्णिमा तिथी । कोणी 'कार्तिकस्वामीची' जयंती म्हणती ।
कोणी 'मत्स्यावतार'ही वानिती । समाप्ति चातुर्मास्य व्रताची ॥ २६ ॥ कार्तिकस्नान समाप्त । 'भीष्मपंचक' पूर्ण होतसे व्रत ।
कृत्तिका नक्षत्रयोगें महापुण्य देख । रोहिणीयोगें महाकार्तिकत्व होतसे ॥ २७ ॥ कार्तिकशुक्ल पौर्णिमेच्या दिवशीं । असतां
कृत्तिकानक्षत्र शुद्धमानसीं । जो द्विज जाईल कार्तिकस्वामिदर्शनासी । महापुण्य तया लाभेल ॥ २८ ॥ तो ब्राह्मण
सप्तजन्मपर्यंत । श्रीमान् वेदपारंगत । या पौर्णिमेस समाप्ति होत । 'आकाशदीप-त्रिपुरोत्सवादि' ॥ २९ ॥ म्हणती
कार्तिककृष्णाष्टमी तिथी । मध्यान्हकालव्यापिनी घ्यावी ती । आहे 'कालभैरवाची' उत्पत्ति । अनवद्य उग्रमूर्ति सर्वत्र
वंद्य असे ॥ २३० ॥ ही अष्टमी पौर्णिमान्तमासपक्षें पाहीं । मार्गशीर्ष कृष्णाष्टमी योग नाहीं । 'कालभैरवाष्टमी'व्रतासि
सर्वदाही । मध्यान्हव्यापिनी मुख्यत्वें असे ॥ ३१ ॥ बहुशिष्टानुचारान्वयें जाण । प्रदोषव्यापिनी घ्यावी हो जन ।
दोन्ही दिवशीं असतां प्रदोषकाल व्यापून । तदा पूर्वींचीच घ्यावी ॥ ३२ ॥ या कालाष्टमीस उपोषण । करावें श्रीकालभैरवाचें
पूजन । अभीष्टप्रद श्रद्धाभक्तीनें जागरण । करावें पारणें शास्त्रोक्त ॥ ३३ ॥ मार्गशीर्षशुक्लपंचमीदिनीं । 'बलदेवजयंती'
असे सिंहलभीं । ही पंचमी नागपूजनीं । षष्ठीयुक्त घ्यावी हें उक्त ॥ ३४ ॥ श्रावण मार्गशीर्ष शुक्ल नागपंचमीस ।
स्नान-दानें पुण्य लाभे विशेष । आणि नागलोकीं होय निवास । ऐसें स्कंदपुराणीं फल बोलिलें ॥ ३५ ॥ श्रावण
मार्गशीर्ष या द्वयमास व्यतिरिक्त । अन्यकार्यासी शुक्ल पंचमी चतुर्थीयुक्त । घ्यावी सर्वदा हें शास्त्रोक्त । वचन
ग्रहण करावें ॥ ३६ ॥ मार्गशीर्षशुक्ल षष्ठीस रविवारीं । चंद्र असे शततारका-नक्षत्रीं । प्रत्यक्ष प्रगटले 'श्रीशिवमल्हारी'।

पूर्वाण्हकालीं जयंती असे ॥ ३७ ॥ कैलासाहूनि जेजुरीक्षेत्रीं । प्रथम पातले कडेपठारीं । मणिमल्लविनाशार्थ शिवमल्लारी । परित्राणार्थ भक्तसाधूंच्या ॥ ३८ ॥ वधूनि दुष्ट निशाचर । संरक्षिलें हें संपूर्ण चराचर । करुणार्णव सदाशिवावतार । कनकगिरीसमान विराजे ॥ ३९ ॥ शिवमल्लारीचीं स्थानें बहुत । जेजुरीक्षेत्र मुख्य सुशोभित त्यांत । परमेश्वर म्हालसाकांत । दर्शनेंचि समाधान वाटतसे ॥ २४० ॥ अगणित नित्य भंडार खोबरें । उधळती प्रेमें लोक सारे । सदानंदाचा उदय उच्चस्वरें । गर्जती फलार्थ पावती ते ॥ ४१ ॥ विशाखा भौमवारयोगेंकरून । हिचें वर्णिती ‘चंपाषष्ठी’ नामाभिधान । किंवा रवि भौमवार शततारका असून । वैधृतीयोग असेल ॥ ४२ ॥ म्हणजे मार्गशीर्षमास पक्षशुक्ल । षष्ठीतिथी रवि किंवा वार मंगल । शततारका नक्षत्र वैधृतीयोग निर्मल । हे सहा मिळून चंपाषष्ठी ॥ ४३ ॥ ही षष्ठी दोन्ही दिवशीं व्याप्त । सूर्योदयापासून सहा घटिकापर्यंत । असतां जी अधिक योगयुक्त । असेल ती स्वीकारिजे ॥ ४४ ॥ ती प्रथम किंवा दुसरे दिवशीं नियेंश्वसीं । सांगितलेल्या योगांच्या अभावासी । (?) असतां दुसरी स्वीकारिजे ॥ ४५ ॥ म्हणजे दोन्ही दिवशीं योगांचा अभाव । तरी त्रिमुहूर्त-व्यापिनी घ्यावी पर्व । चंपाषष्ठी कुलधर्मोत्सव । करिती प्रसन्न शिव होतसे ॥ ४६ ॥ ह्या षष्ठीस ‘स्कंदजयंती’ कोणी म्हणती । पूजनार्थ पूर्वीचीच घेती । मार्गशीर्षशुक्ल सप्तमीस करिती । ‘सूर्यव्रत’ विध्युक्त ॥ ४७ ॥ मार्गशीर्ष शुक्ल चतुर्दशी तिथी । असे ‘श्रीदत्तात्रेयावतारजयंती’ । वृद्धवशिष्ठवामदेवादि सांगती । प्रदोषव्यापिनी घेइजे ॥ ४८ ॥ दत्तपुराणादिकीं प्रमाण । आणि भृग्वादि ऋषींचें वचन । मार्गशीर्ष शुक्ल चतुर्दशीस अवतीर्ण । जगद्गुरु दत्तात्रेय जाहले ॥ ४९ ॥ बुध किंवा मंदवासरीं । प्रदोषकालीं रोहिणी नक्षत्रीं । षड्ग्रह स्वोच्च वृषभलग्नीं साचारी । चंद्र वृषभराशीस असतां तदा ॥ २५० ॥ परमात्मा पूर्णब्रह्म सनातन । श्रीगुरुदेव दत्त-भगवान् । जगदोद्धारार्थ प्रत्यक्ष अवतीर्ण । जाहले अत्रिऋषिसदनांत ॥ ५१ ॥ स्कंदपुराणांतील वचनीं । मार्गशीर्ष शुक्ल पौर्णिमेस

सायान्हीं । रविवारीं अनसूयेलागुनी । महत्तेजस्वी पुत्र प्राप्त जाहला ॥ ५२ ॥ अत्रिऋषि विलोकून लवलाहें । म्हणती हा पुत्र प्रत्यक्ष परमेश्वर आहे । विधि-हरि-हर देवत्रयांचें हें । वरप्रदान सफल जाहलें ॥ ५३ ॥ महाविष्णूनें आपल्यास स्वतां । आत्मरूप पुत्र दिधला जगद्धिता । म्हणूनि 'दत्तात्रेय' ऐसें नाम तत्त्वता । ठेविलें प्रेमें या जगद्गुरूचें ॥ ५४ ॥ या दिवशीं करावें उपोषण । श्रीमद्दत्तात्रेय-गुरूचें विध्युक्त पूजन । वेदघोषपुराणकीर्तनगायन । शुद्ध भक्तीनें जागरण करावें ॥ ५५ ॥ जयंत्योत्सव समारंभें करून । यथाशक्ति पारणें ब्राह्मण भोजन । करावें म्हणजे सर्वदा प्रसन्न । दत्तात्रेय जगदीश्वर होतसे ॥ ५६ ॥ मार्गशीर्ष कृष्णाष्टमी तिथी । माध्यान्हीं असे 'कालभैरवोत्पत्ति' । ऐशीं वचनें शिवरहस्यग्रंथीं । वर्णिलीं असतीं स्पष्टत्वें ॥ ५७ ॥ पौषशुक्ल पौर्णिमातिथी । आहे 'शाकंबरीव्रत' जयंती । माघस्नानारंभ करिती । एकादशी वा पौर्णिमेपासून ॥ ५८ ॥ पौष शुक्लैकादशी किंवा पौर्णिमेपासून । अथवा मकरसंक्रमण लक्षून । दुःखदारिद्र्यनाशार्थ करावें 'माघस्नान' । तेणें भगवंत तुष्ट होतसे ॥ ५९ ॥ माघशुक्ल द्वादशी पौर्णिमेपूर्वीं समापन । किंवा कुंभसंक्रमणापर्यंत करावें माघस्नान । नद्यादि तीर्थीं कोठेंही स्नानकालीं जन । करा हो स्मरण प्रयागराजाचें ॥ २६० ॥ पौर्णिमान्तमास-पक्षेंकरून । पौषकृष्ण चतुर्थीस जन्मले 'गजानन' । सर्व देवस्वरूप साक्षात् भगवान् । सर्वमंगलकारक ऐसे ॥ ६१ ॥ पौषकृष्ण अमावास्येस । असे 'लीलाकालीचा' जन्मदिवस । या अमावास्येसी दिवसास । आलिया 'अर्धोदयपर्व' घ्यावें ॥ ६२ ॥ पौष किंवा माघी अमावास्यादिनीं । रविवार व्यतीपात् श्रवण नक्षत्र मिळूनी । हीं आलीं असतां अर्धोदयपर्वणी । कोटि सूर्यग्रहणासमान असे ॥ ६३ ॥ यांतील कांहीं योग असतां न्यून । त्यासी 'महोदयपर्व' म्हणती कोणी जन । हा अर्धोदययोग दिवसांच प्रशस्त जाण । रात्रीं कधींही घेऊं नये ॥ ६४ ॥ हें प्राप्त झालें असतां अर्धोदय । गंगेसारिखें सर्व तोय । ब्रह्मदेवत्व प्राप्त

होय । सर्व ब्राह्मणां त्याकालीं ॥ ६५ ॥ या अर्धोदयपर्व-कालांत । जें दान घडेल किंचित् । तें मेरुपर्वतप्राय होत । शास्त्रनिर्णय निश्चयेंसीं ॥ ६६ ॥ स्कंदपुराणवचनानुसार । माघी अमावास्या दिवशीं रविवार । आणि असतां व्यतीपात् श्रवणनक्षत्र । त्यासी अर्धोदयपर्व म्हणती ॥ ६७ ॥ पौषमाघांच्या मध्यवर्तीचा अर्थ एक । अमान्तमास-पक्षें पौष घेती लोक । पौर्णिमान्त चांद्रमास-पक्षें कित्येक । माघमास ऐसा अर्थ घेती ॥ ६८ ॥ तथापि सर्वथा सर्वनिर्णय-संमत । पौषकृष्ण अमावास्या दिवशीं निश्चित । रविवार श्रवण व्यातीपात् योगही प्राप्त । झालीं असतां 'अर्धोदयपर्व' जाणावें ॥ ६९ ॥ माघ शुक्ल चतुर्थीस । म्हणती 'ढुंढिराजव्रत' जन्मदिवस । प्रदोषव्यापिनी घ्यावी पूजनास । भाद्रपदशुक्ल चतुर्थीवत् निर्णय जाणावा ॥ २७० ॥ या चतुर्थीस कुंदपुष्पेंकरून । सायान्हीं सदाशिवाचें पूजन । उपवास किंवा नक्तभोजन । केल्यानें श्रेय प्राप्त होतें ॥ ७१ ॥ माघ शुक्ल पंचमी तिथी । ही आहे 'सरस्वतीजयंती' । 'वसंतोत्सवारंभ' वसंतपंचमी म्हणती । ती पूर्वाण्हव्यापिनी घ्यावी ॥ ७२ ॥ माघशुक्ल पंचमीस अभ्यंगस्नान । रतिमदनाचें करावें पूजन । वसंतोत्सवारंभ म्हणून । महोत्सव सर्वांनीं करावा ॥ ७३ ॥ दोन्ही दिवशीं दोन प्रहरीं असतां । पंचमी पूर्वींची घ्यावी तत्त्वतां । वसंतोत्सवारंभाकरितां । रतिमदनांचे पूजनासी ॥ ७४ ॥ माघशुक्ल रथसप्तमीदिनीं । 'सूर्यजयंती' म्हणती कोणी । ती घ्यावी अरुणोदयव्यापिनी । सूर्यग्रहणासारखी असे ॥ ७५ ॥ या रथसप्तमीस स्नान दान । केलें असतां प्राप्त होतें फल महान् । दोन्ही दिवशीं अरुणोदयकालीं व्यापून । असल्यास पूर्वींची करावी ॥ ७६ ॥ जेव्हां एक घटिका किंवा घटिकेहून । कांहीं षष्ठी अधिक असून । क्षय असल्यानें अरुणोदयापूर्वीं संपून । सप्तमी जात असेल ॥ ७७ ॥ तेव्हां सप्तमी घ्यावी षष्ठीयुक्त । आणि स्नान करावें अरुणोदय कालांत । पूर्वदिवशीं भोजन करून एकभुक्त । सप्तमीस अरुणोदयीं स्नान ॥ ७८ ॥ या जन्मींचें आणि जन्मांतरार्जित । पातक मन-वाणी-शरीरकृत । ज्ञात

आणि सातवें अज्ञात । ऐशीं ‘सप्तविधपापें’ जाणावीं ॥ ७९ ॥ ह्याप्रकारें सप्तविधपातकें । आणि सप्तव्याधिही देखे ।
रथसप्तमीच्या अरुणोदयीं एके । स्नानें नाशाप्रत पावती ॥ २८० ॥ पीठादिकीं रथस्थित सूर्यमूर्ति काढून । सूर्यनारायणाचें
करावें पूजन । ह्या मन्वादि तिथींत पूर्वाण्ह- । व्यापिनी सप्तमीस श्राद्ध करावें ॥ ८१ ॥ माघशुक्ल ‘भीष्माष्टमी’
लक्षून । भीष्मोद्देशें जे करिती श्राद्धतर्पण । ते पुरुष होती संततीवान् । म्हणून श्राद्धार्थ मध्यान्हव्यापिनी घ्यावी ॥ ८२ ॥
माघशुद्ध द्वादशीस उपोषण । तिलस्नान करावें तिलें विष्णुपूजनें । नैवेद्य तिलदान होम तिलभक्षण । तैलयुक्त दीपदान
करावें ॥ ८३ ॥ माघी पौर्णिमा दुसरी घ्यावी । तद्दिनीं ‘माघस्नानसमाप्ति’ करावी । भोजन घालूनि द्विजदंपत्यांसि
द्यावीं । वस्त्रभूषणें कंबल रक्त उपानहादि ॥ ८४ ॥ तिलश्राद्धतर्पण तिलपात्रदान । शालिग्रामदान वेणीदान ।
केलिया महत्फल होतें पुण्य । कुलधर्मही करावे ॥ ८५ ॥ माघकृष्णचतुर्दशी । ‘वैद्यनाथजयंती’ असे त्या दिवशीं ।
निशीथव्यापिनी शिवरात्रीसी । प्रगटले ‘श्रीगिरिजाधव’ ॥ ८६ ॥ माघकृष्णचतुर्दशी अर्धरात्रीयुक्त । असेल ते दिनीं
करावें ‘शिवरात्रीव्रत’ । अश्वमेधफल होय प्राप्त । ऐसा नारदसंहितेंत निर्णय ॥ ८७ ॥ त्रयोदशीदिनीं चतुर्दशी
निशीथव्यापिनी । असेल ते दिवशीं शिवरात्रीव्रत शुद्धमनीं । उपोषण जागरण पूजन करावें जनीं । ऐशीं अन्य स्मृतींत
वाक्यें असतीं ॥ ८८ ॥ निशीथ म्हणजे दुसऱ्या प्रहरींची । माधवमतें एक घटिका शेवटची । आणि एक घटिका तृतीय-
यामारंभाची । किंवा आठवा मुहूर्त रात्रीचा ॥ ८९ ॥ प्रथम दिवशीं निशीथव्यापिनी । चतुर्दशी असतां पहिलीच
घ्यावी जनीं । दुसरे दिवशीं असतां अर्धरात्रव्यापिनी । किंवा दोन्ही दिवशीं मध्यरात्रीस नसतांही ॥ २९० ॥ दुसरे
दिवशींची घ्यावी व्रता । दोन्ही दिनीं मध्यरात्रीस संपूर्ण व्याप्ति असतां । अथवा एकदेशव्याप्ति असतां तत्त्वतां ।
करावी पूर्वदिवसाचीच ॥ ९१ ॥ ऐसें हेमाद्रिकौस्तुभकाराचें मत । आणि दुसरे दिवशीं करावें शिवव्रत ।

ऐसें माध्व निर्णयसिंधु पुरुषार्थचिंतामणि आदि बहुत । ग्रंथकार म्हणती ऐक्यत्वें ॥ ९२ ॥ द्वितीयदिनीं व्याप्ति मध्यरात्रीच्या एकदेशास । आणि संपूर्णव्याप्ति पूर्वदिवसास । असतां मात्र पूर्वींची व्रतास । घ्यावी ऐसें प्रमाण ॥ ९३ ॥ पूर्वदिवशीं निशीथैक-भागव्याप्ति । आणि दुजे दिनीं संपूर्ण जरी ती । व्रतास दुसरी घ्यावी उक्ति । ऐशी शास्त्रीं बोलियेली ॥ ९४ ॥ या माघवद्यचतुर्दशीस रवि किंवा भौमवार । असल्या उत्तम प्रकार । त्यांत 'शिवयोग' असतां उत्तमोत्तम फार । अतिप्रशस्त पर्व जाणावें ॥ ९५ ॥ या शिवरात्रीस उपोषण जागरण । मुख्यत्वें आहे श्रीशिवपूजन । शंकरास लघु-महारुद्राभिषेकेंकरून । चारी प्रहरां अभिषेकावें ॥ ९६ ॥ या शिवरात्रीव्रताहून श्रेष्ठ व्रत नसे इतर । ते दिनीं जे न पूजिती रुद्र त्रिभुवनेश्वर । ते सहस्त्रावधिजन्म भोगिती दुर्धर । यातना निःसंशय जाणावें ॥ ९७ ॥ म्हणूनि नित्यकाम्य हें शिवरात्रीव्रत । प्रतिवर्षीं करावे उपवास शिवपूजा भक्तियुक्त । यदर्थीं शंकर पार्वतीस प्रबोधित । मद्भक्त व्रत आचरी जो हें ॥ ९८ ॥ त्यासी मी करितसें मद्गण अक्षय । आणि करितों अखंड आज्ञा दिव्य । तो सर्व महाभोग भोगुनी शुद्धप्रज्ञामय । मोक्षाधिकारी होतसे ॥ ९९ ॥ ब्राह्मणापासून तों चांडलापर्यंत । करण्यास अधिकार आहे शिवरात्रीव्रत । म्हणजे सर्वत्रांनीं श्रद्धाभक्तिसमन्वित । व्रतोपवासादि अवश्य करावें ॥ ३०० ॥ हें सुदुर्लभ महाशिवरात्रीव्रत । सकलपातकांचा नाश करित । चतुर्वर्णादिकीं भक्तियुक्त । या व्रतासी आचरावें ॥ १ ॥ हें व्रत इहलोकीं सुखदायक । आणि मुक्तिप्रदायक असे निश्चयात्मक । ऐसें महाव्रत प्रतिवर्षीं आवश्यक । शुभदायक करावें ॥ २ ॥ तीन प्रहरांच्या आंत चतुर्दशी समाप्त । होत असतां चतुर्दश्यन्तीं पारणा करिजेत । तीनयामांहून अधिक चतुर्दशी असत । तेव्हां चतुर्दशींत प्रातः पारणा करावी ॥ ३ ॥ या प्रकारें आहे माधवादिकांचें मत । ऐसेंच वर्णिलें निर्णयसिंधूंत । तीनप्रहरांपूर्वीं चतुर्दशी होईल समाप्त । तथापि चतुर्दशींत

पारणा करावी ॥ ४ ॥ करूं नये चतुर्दशीच्या अंतीं । यदर्थी शंकर पार्वतीस सांगती । चतुर्दशीस उपोषण करून शुद्धचित्तीं । चतुर्दशीमध्यें पारणा करावी ॥ ५ ॥ हा योग अगण्यपुण्येंहि दुर्लभतर । ऐशा या योगांत एकेक शिताचा फलविस्तार । सांगण्याविषयीं मी परमेश्वर । समर्थ नाहीं गे पार्वती ॥ ६ ॥ इत्यादि श्रेष्ठवचनेंकरून । चतुर्दशीमध्यें केलिया पारण । पुण्यातिशय आहे म्हणून । तिथीमध्यें पारणें करावें ॥ ७ ॥ माघकृष्णामावास्या-दिवशीं । अवतरले म्हणती 'वेदव्यासऋषि' । असतां शततारकानक्षत्र त्या दिवशीं । श्राद्धाचरणें पितरां परमतृप्ति ॥ ८ ॥ फाल्गुनशुद्धप्रतिपदेपासून । द्वादशदिनपर्यंत 'पयोव्रत' करणें जाण । श्रीभागवतीं केलें वर्णन । तदनुसार आचरावें ॥ ९ ॥ फाल्गुनशुद्धपंचमीतिथी । कोणी वदती 'याज्ञवल्क्यजयंती' । फाल्गुनशुद्धसप्तमीदिनीं म्हणती । 'कपिलावतार' जाहला ॥ ३१० ॥ फाल्गुनशुद्धद्वादशीला । कित्येक सांगती 'वीरभद्रावतार' झाला । कर्नाटकस्थ वदती अभिप्रायाला । वीरभद्रावतार वर्षाकालीं ॥ ११ ॥ फाल्गुनशुद्ध पौर्णिमेस । सायान्हीं 'हुताशनी' देवीचा जन्मदिवस । आणि 'वशिष्ठा' देवीचाही जन्म विद्वांस । वर्णिती वाराणशीचे ॥ १२ ॥ भद्रारहित प्रदोषव्यापिनी । पौर्णिमा घ्यावी हुताशनीपूजनीं । सूर्यास्तापासून सहाघटिका जनीं । प्रदोषकाल जाणावा ॥ १३ ॥ ढुंढाराक्षसी-पीडापरिहारार्थ । करावें होलिकापूजन विध्युक्त । तदा प्रार्थनामंत्र पठिजेत । अभिवंदन करावें ॥ १४ ॥ फाल्गुनकृष्ण प्रतिपदादिनीं । वसंतोत्सवारंभार्थ घ्यावी सूर्योदयव्यापिनी । सूर्योदयीं असतां दोन्ही दिनीं । तरी घ्यावी पहिलीच ॥ १५ ॥ या दिवशीं करावें तैलाभ्यंगस्नान । आणि करावीं आम्रपुष्पें भक्षण । सर्वारिष्टशांत्यर्थ वंदन । होलिकादेवीचें करावें ॥ १६ ॥ फाल्गुनकृष्णचतुर्थी तिथी । कोणी म्हणती 'गणेशोत्पत्ति' । श्रावणकृष्णचतुर्थीपासूनि करिती । संकष्टचतुर्थी गणेशव्रत ॥ १७ ॥ यावज्जीव किंवा एकवीस संवत्सर । एक वर्ष अथवा वर्षांत एकवार । संकष्टचतुर्थीव्रत करावें श्रेयस्कर । तदर्थ चंद्रोदयव्यापिनी चतुर्थी घ्यावी

॥ १८ ॥ प्रतिमासीं कृष्णपक्षीय चतुर्थीस । दिवसा करावा उपवास । चंद्रोदयकालीं रात्रीस । गणेशपूजन करावें ॥ १९ ॥ ही चतुर्थी चंद्रोदयव्यापिनी । घ्यावी गणेशभक्तजनीं । दोन्ही दिवशीं चंद्रोदयव्यापिनी । असतां घ्यावी दुसरीच ॥ ३२० ॥ कित्येक ग्रंथकारांचें मत । दोन्ही दिवशीं चंद्रोदयव्यापित । असल्यास तृतीयायोग प्रशस्त । सर्वोत्तम जाणावा ॥ २१ ॥ म्हणूनि तृतीयायुक्त चतुर्थी । घ्यावी असें कोणी म्हणती । दोन्ही दिवशीं चंद्रोदयीं चतुर्थी । नसेल तर दुसरी घ्यावी ॥ २२ ॥ जरी नसेल दोन्ही दिवशीं । चतुर्थी ती चंद्रोदयासी । तरी प्रदोषकालव्यापिनी व्रतासी । घ्यावी अवश्य दुसरीच ॥ २३ ॥ फाल्गुनकृष्ण 'रंगपंचमीदिन' । होलिकोत्सव होतसे संपूर्ण । फाल्गुनकृष्णाष्टमी दिन । 'बंदिदेवी'चा जन्म असे ॥ २४ ॥ फाल्गुनकृष्ण त्रयोदशीस । शततारकानक्षत्र असल्यास । 'वारुणीयोग' म्हणती त्यास । महत्पुण्यतम असे जो ॥ २५ ॥ त्यांतही शुभयोग शनिवार शततारका असल्यास । 'महावारुणीयोग' वदती त्यास । हा वारुणीयोगाहून श्रेष्ठ खास । शास्त्रकारीं वर्णिला ॥ २६ ॥ या दिवशीं गंगादि तीर्थीं स्नान । करावें यथाशक्त्या धनधान्यवस्त्रादि दान । हा योग कोटि सूर्यग्रहणांसमान । पुण्यकारक सर्वांसी ॥ २७ ॥ फाल्गुण कृष्ण अमावास्यादिन । मन्वादितिथि आहे म्हणून । श्राद्धादिकांसी घ्यावी हो जन । अप्रराण्हव्यापिनी अमावास्या ॥ २८ ॥ (पौर्णिमा–निर्णय) प्रत्येक मासीची पौर्णिमा जाण । पहिली वटसावित्री व्रतावांचून । अन्य कृत्यांसी घेण्या योग्य न । दुसरी प्रतिपदायुक्त घेईजे ॥ २९ ॥ (शिवरात्री-निर्णय) प्रत्येक मासाची शिवरात्री तिथी । प्रदोषव्यापिनी घ्यावी उपोषणार्थ ती । कित्येक महाशिवरात्रीसारखी घेती । निशीथव्यापिनी कृष्णचतुर्दशी ॥ ३३० ॥ (प्रदोष-निर्णय) सूर्यास्तापासून सहाघटिका रात्रीपर्यंत । जो समय त्याला 'प्रदोषकाल' म्हणतात । शुक्ल कृष्ण पक्षीं त्रयोदशीस उपोषित । राहूनि सायं प्रदोषीं शिव पूजिजे ॥ ३१ ॥ या प्रदोष-शिवव्रतासी । प्रदोषव्यापिनी घ्यावी त्रयोदशी । दोन्ही दिवशीं प्रदोषकालासी । व्यापिनी

१०

चतुर्दशी असेल ॥ ३२ ॥ अथवा सारखेपणें दोन्ही दिवशीं । प्रदोषकालाच्या एक भागासी । व्यापूनि असेल त्रयोदशी । तेव्हां द्वितीय स्वीकारावी ॥ ३३ ॥ पूर्व दिवशीं प्रदोषकालीं । त्रयोदशीची अधिक व्याप्ति असली । आणि दुसरे दिवशीं प्रदोषकालीं । स्वल्प व्याप्ति तरी दुसरी करावी ॥ ३४ ॥ परंतु प्रथमदिनीं प्रदोषकालांत । देवपूजा आणि भोजन होई तोंपर्यंत । त्रयोदशीची व्याप्ति अधिक असत । तरी पहिलीच घ्यावी व्रतासी ॥ ३५ ॥ देवपूजा भोजन होण्याइतुकी व्याप्ति । नसेल तर दुसरे दिवशीं करावी ती । दोन्ही दिवशीं प्रदोषकालीं व्याप्ति । नसल्यास दुसरी करावी ॥ ३६ ॥ (एकादशी-निर्णय) आतां संक्षेपें सांगूं एकादशी-निर्णय । ज्यांत अरुणोदय वेध आणि सूर्योदय । सूर्योदयापूर्वी चार घटिका तो अरुणोदय । नंतर सूर्योदय स्पष्टचि ॥ ३७ ॥ अरुणोदयवेध वैष्णवांलागून । आणि सूर्योदयवेध असे स्मार्तांकारण । जरी छप्पन्न घटिकांहून । पळमात्र अधिक दशमी असेल ॥ ३८ ॥ तरी एकादशीस दशमी वेध अरुणोदयकालीं । समजा एकादशी दशमीनें विद्ध झाली । आणि दशमी साठघटिकांहून पळमात्र अधिक असली । तरी एकादशी दशमीवेध सूर्योदयीं ॥ ३९ ॥ म्हणजे अरुणोदयवेधित-कालीं । दशमीनें विद्ध एकादशी असली । तरी वैष्णवीं पाहिजे त्यागिली । दुसरी करणें अवश्य ॥ ३४० ॥ आणि सूर्योदयवेध म्हणजे सूर्योदयकालीं । दशमीनें विद्ध एकादशी असली । स्मार्तांनीं पाहिजे त्यागिली । पहिली करणें अवश्य ॥ ४१ ॥ जरी अरुणोदयवेध नसेल । आणि एकादशी वा द्वादशीची वृद्धि असेल । तरी पहिली वैष्णवीं त्यागूनि निर्मल । दुसरी घ्यावी उपोषणार्थ ॥ ४२ ॥ एकादशीची मात्र वृद्धि असतां । स्मार्तीं पहिली घ्यावी उपवास व्रता । आणि संन्यासीं इत्यादिकीं तत्त्वतां । करावी दुसरी अवश्य ॥ ४३ ॥ द्वादशीची असेल वृद्धि जर । आणि एकादशी शुद्ध असेल तर । त्या दिवशीं स्मार्तीं उपवास जागर । करावा अवश्य शुद्ध मनें ॥ ४४ ॥ असतां विद्ध एकादशी । स्मार्तीं करावी दुसरे दिवशीं । आणि एकादशी

द्वादशीची वृद्धि तरी आदरेंसीं । सर्वांनीं दुसरीच करावी ॥ ४५ ॥ परमापत्ति किंवा सौख्यकालांत । जननाशौच वा
मृताशौचांत । त्यागीना एकादशी उत्तमव्रत । तोचि वैष्णव जाणावा ॥ ४६ ॥ सर्व जीवीं अद्वेषें ईश्वर पाहे । स्वकीयाचार-
दक्ष दुष्कर्मीं नोहे । जयें संपूर्ण कर्माचरण विष्णूसी समर्पिलें आहे । तोचि वैष्णव म्हणावा ॥ ४७ ॥ ऐशा सत्य
चांगल्या वैष्णवावांचून । जे टिळेबिंदुमाळा वेषधारी इतर जन । ते जातीचे कोणीही असोत मानी विद्वान् । परंतु सत्य वैष्णव
नसती ते ॥ ४८ ॥ विष्णुपुराणींचें असे वचन । जो कदा न चळे वेदोक्त स्ववर्णाश्रमधर्मापासून । शत्रुमित्रादिकांचे ठायीं
पाहे आत्मबुद्धि समान । तोचि 'विष्णुभक्त' सत्य जाणिजे ॥ ४९ ॥ असो आतां कपिलाषष्ठी आणि गजच्छायानिर्णय ।
स्पष्टत्वें कथूं साभिप्राय । यच्छ्रवणें पातकराशी दूर होय । संशय मानसीं न धरावा ॥ ३५० ॥ ( कपिलाषष्ठी-निर्णय )
भाद्रपदकृष्णषष्ठी दिन । हस्तनक्षत्रीं सूर्य असून । मंगळवार नक्षत्र रोहिणी जाण । आणि व्यतीपात् सहावा ॥ ५१ ॥
ऐसे हे सहायोग एकत्र जेव्हां येती । 'कपिलाषष्ठी' तेव्हां म्हणती । हा योग दिवसांच घेती । रात्रीं घेणें अयोग्य ॥ ५२ ॥
या कपिलाषष्ठी-महापर्वणींत । यथाशक्ति हवन दानधर्म जो आचरित । तया कोटिगुण फल होत । ऐसें शास्त्रीं कथिलें
असे ॥ ५३ ॥ ( गजच्छाया-निर्णय ) भाद्रपद-कृष्णामावास्येसी । सूर्य चंद्र हस्तनक्षत्रासी । आले असतां संज्ञा तिजसी ।
'गजच्छाया' ऐशी आहे ॥ ५४ ॥ या गजच्छाया पर्वणींत । श्राद्धदानादि कृत्यें आचरावीं शुद्धचित्त । सर्वांनीं विध्युक्त
पितृपक्षांत । महालयश्राद्धें करावीं ॥ ५५ ॥ ( महेश्वरावतार ) महेश्वराचे अनेक अवतार । महादेव विष्णु इत्यादि नामें
चतुःप्रकार । त्यांत स्वर्गींचे एकादशरुद्र । श्रोतीं आदरें परिसावे ॥ ५६ ॥ वीरभद्र शंभु गिरीश अजैकपात् । अहिर्बुध्न्य
पिनाकी अपराजित् । भुवनाधीश्वर कपाली स्थाणु शोभत । आणि भव ऐसे एकादश ॥ ५७ ॥ अथवा अहिर्बुध्न्य
अजैकपात् । विरूपाक्ष सुरेश्वर जयंत । बहुरूप त्र्यंबक अपराजित । सवितृ हर भीम हे ऐसे ॥ ५८ ॥ ( द्वादशादित्य )

आतां परिसा द्वादशादित्याभिधान । अर्यमा पुष्णा त्वष्टा सविता विवस्वान् । भग धाता विधाता मित्र वरुण । शुक्र उरुक्रम ऐसे हे ॥ ५९ ॥ हे द्वादशादित्य भगवान् । प्रसिद्ध कश्यपऋषीपासून । अदितीचे ठायीं उत्पन्न । झाले असती तेजस्वी ॥ ३६० ॥ (अष्टवसु) आतां अष्टवसूंचीं नामें परिसा निर्मल । आप् किंवा विष्णु अनिल । धर ध्रुव सोम अनल । प्रत्यूष आणि विभावसु ॥ ६१ ॥ हे 'अष्टवसु' संज्ञक स्वर्गलोकांत । प्रतिमन्वंतरीं देव भिन्न होतात । ते अथवा श्रीमद्भागवतांत । वर्णिले अष्ट वसु जे ॥ ६२ ॥ द्रोण प्राण ध्रुव दोष वसु । अग्नि अर्क आणि विभावसु । याप्रकारेंहि अष्टवसु । श्रीमद्भागवतीं वर्णिले ॥ ६३ ॥ (जगदंबावतार) श्रीजगदंबेचे अवतार अगणित । नवदुर्गांचीं नामें सांगूं त्यांत । स्मरणें पातकें भस्म होत । नाममालिका ती परिसा ॥ ६४ ॥ शैलपुत्री ब्रह्मचारिणी । चंद्रघंटा कूष्मांडा स्कंदमाता कात्यायनी । कालरात्री महारात्री आणि । सिद्धिदा ऐशा 'नवदुर्गा' ॥ ६५ ॥ चामुंडा वाराही ऐंद्री । माहेश्वरी लक्ष्मी कौमारी । ब्राह्मी देवी ईश्वरी । एशा ह्या 'जगन्माता' ॥ ६६ ॥ श्रीबाला बगला इत्यादिक । दशमहा विद्या रूपा जगदंबा सम्यक । नवनाग स्वग्रह नवनाथादि अनेक । असंख्यावतार ईश्वराचे ॥ ६७ ॥ (सप्तर्षि) कश्यप अत्रि भारद्वाज । विश्वामित्र गौतम जमदग्नि वशिष्ठऋषिराज । ऐसे सप्तर्षि सतेज । या मन्वंतरींचे असती ॥ ६८ ॥ (सप्त तारे) मरीचि अत्रि अंगिरस श्रेष्ठ । पुलस्त्य पुलह क्रतू वशिष्ठ । ऐसे 'सप्त तारे' आकाशांत । स्वतेजें नित्य झळकती ॥ ६९ ॥ असो विस्तार झाला बहुत । अतएव हा कथाभाग येथें समाप्त । पुढिले अध्यायीं निरूपण रसभरित । श्रोतीं सावधान परिसावें ॥ ३७० ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । पंचमाध्याय गोड हा ॥ ३७१ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे पंचमोऽध्यायः समाप्तः ॥ ५ ॥

श्रीगुरुदेवदत्त स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय सहावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ गुरु शिष्यासी सांगती । ऐक बापा सावध चित्तीं । जगन्नाथांतील वृत्त यथास्थिति । भुक्तिमुक्तिदायक जें ॥ १ ॥ एक अलवणीबुवा ब्रह्मचारी । विद्वान् विहित शुद्धाचारी । तीर्थयात्रा करिती पादचारीं । मोठे तपस्वी असती ते ॥ २ ॥ घडले जयांसी चारी धाम । वेदोक्त कर्म सनातन धर्म । फलेच्छारहित निष्काम । परमार्थबुद्धि-विराजित ॥ ३ ॥ डाकोरनाथाचे ग्रामीं । अनुष्ठान करिती नित्य नेमीं । गीता भागवत नित्य प्रेमीं । पठण करिती उच्च स्वरें ॥ ४ ॥ पूर्वपुण्य पदरीं सद्भाग्य । अंगीं नित्य वसे तीव्र वैराग्य । निःस्पृही सत्पुरुष योग्य । संसारभोगविरहित जे ॥ ५ ॥ ते अलवणी साधुबुवा । जगन्नाथदर्शनीं सेवा । करित होते प्रेमें तेथवां । झालें वृत्त परिसावें ॥ ६ ॥ तीन मनुष्यें बुवांचे संगतीं । जगदीश्वरस्थानीं होती । अलवणीबुवांची प्रकृति । अस्वस्थ झाली त्या समयीं ॥ ७ ॥ संगें असलेले तीन मानव । तयांसी झाला ज्वरोद्भव । म्हणती जगदीश्वर देव । हें काय संकट दाविलें ॥ ८ ॥ सप्त दिवसांत अन्नोदक । दुर्लभ झालें ग्रास एक । तृषा लागली फार भूक । व्याकुल जीव जाहला ॥ ९ ॥ त्या धर्मशाळेभीतरीं । हे पडले चौघे दुखणेकरी । कोणी आणून न देती सामग्री । भोजनाची तयांसी ॥ १० ॥ अथवा परिपक्क अन्न । मागतांही न देती आणून । चौघांसी उठवेना म्हणून । याचना करिती इतरांतें ॥ ११ ॥ लोक आपापल्या कामांत । श्रवणीं न घेती तयांची मात । परोपकारार्थ यातायात । सज्जनावीण कोण करी ॥ १२ ॥ यात्रार्थ जनांची दाटी । शास्त्रांच्या मोठ्या सांगती गोष्टी । परोपकार दया न पोटीं ।

काय चावटी उपयोगी ॥ १३ ॥ असूनि करंटे कृपण । उदार म्हणविती स्वयें आपण । कपर्दिकेस्तव तळमळपण । जीव व्याकुळ होतसे ॥ १४ ॥ औदार्य तें तरी दांभिक । आम्हांसी मोठे म्हणतील लोक । बाह्यरंग दाखवावया अनेक । शब्दसंकेत चालती ॥ १५ ॥ नीचसंगति वाटे गोड । साधूसि म्हणती लागलें वेड । स्ववर्णाश्रमधर्माची चाड । नसूनि रमती नीचासवें ॥ १६ ॥ वरीवरी संभावितपणा । अंतरीं भरल्या कपटखुणा । विद्वान् साधूंच्या सद्गुणा । पाहूनि मुख मुरडिती ॥ १७ ॥ आमुचा वंश मातापिता । आमुची कीर्ति उत्तमता । आमची वानिती जे योग्यता । देऊं दान तयां म्हणती ॥ १८ ॥ वडिलोपार्जित नीचवृत्ति । तेणें आलिया संपत्ति । आपणास मानिती भूपति । मोठे कपटी दांभिक ॥ १९ ॥ ऐसे दीर्घद्वेषी नीच । उन्मत्तपणें वदती आम्ही उच्च । ते काय करितील साच । परोपकार भूतदया ॥ २० ॥ असो तांदुळांतील खडे । न निवडितां दांत पडे । स्वादरहित अन्न भक्षणें जडे । रोग सत्वरें तया नरा ॥ २१ ॥ तैसे खरे साधुसंत । विद्वज्जन-समन्वित । निवडूनि वंदितां समस्त । कल्याणवंत जन होती ॥ २२ ॥ जाणूनि सदसद्विचार । शोधावें ज्ञान सारासार । वेदशास्त्रविहित हिततर । घ्यावें निरंतर सत्य तें ॥ २३ ॥ सत्य ते परमब्रह्मपुरुष । सत्य तेंचि आत्मसंतोष । सत्य स्वधर्मकर्म निर्दोष । सत्यचि तारक भवार्णवीं ॥ २४ ॥ हृदयीं परमात्म सत्य-स्वरूप । जाणती साधु अप्रकंप । ऐसे अलवणीबुवा समीप । असूनि कोणी नोळखिती ॥ २५ ॥ परी परमेश्वर तो दीनदयाळ । भक्तजनांचा करी सांभाळ । नुपेक्षी कदा जाश्वनीळ । जन चिरकाळ सेविती ॥ २६ ॥ तो प्रणतवत्सल प्रभु धांवे । हवें तें काम करी भक्तांसवें । निजजनांसी जीवेंभावें । संरक्षित सर्वदा ॥ २७ ॥ आकाशीं हिंडती पक्षी । निजबालकांसी सदा रक्षी । तैसा सर्वज्ञ सर्वसाक्षी । कदा नुपेक्षी दासासी ॥ २८ ॥ तेथें कोणी संस्थानीं । तेजःपुंज पुरुष सज्ञानी । वृद्धनृसिंहतीर्थ महामुनि । असती ऐसें लोक बोलती ॥ २९ ॥ अलवणीबुवांचें हृद्गत ।

जाणूनि वृद्धनृसिंह त्वरित । जेथें अलवणी होते निद्रिस्त । क्षुधादुःखें पीडित ॥ ३० ॥ तेथें येऊनि ठेले सन्मुख । कटीवरी हस्त साजिरे सुरेख । सुगंध भस्म लेपिलें देख । वदती 'अलख' शब्द ते ॥ ३१ ॥ अन्नोदकावांचूनि । ज्वरें भरली बहुत ग्लानि । शब्द निघेना मुखांतूनि । अलवणी आणि तिघां इतरांच्या ॥ ३२ ॥ ऐशी विलोकूनि अवस्था । दया उपजली जगन्नाथा । चौघाजणांचिया माथां । निजांघ्रिकमलें स्पर्शिती ॥ ३३ ॥ जगन्नाथचरणस्पर्श । होतांचि चौघांचे मस्तकांस । खडबडूनि उठले त्या समयास । अलवणीबुवासहित ते ॥ ३४ ॥ जगन्नाथ-स्वामिचरणीं । साष्टांग नमिती तेचि क्षणीं । उभे राहिले जोडूनि पाणि । अंतरीं सद्गद होउनी ॥ ३५ ॥ गीर्वाण भाषेंत स्तवन । करिती अपार चौघेजण । साक्षात्पूर्णब्रह्म आपण । 'अवतारिक पुरुष' आहां ॥ ३६ ॥ दर्शन होतांचि आपलें । आमचें शरीर आरोग्य झालें । ऐसें कोठें न विलोकिलें । अपूर्व समर्थ महिमा हा ॥ ३७ ॥ हे भगवान् जगदीश्वरा । वृद्धनृसिंहपरात्परा । अवधूत श्रीमद्गुरुवरा । सर्वांतरनिवासी ॥ ३८ ॥ प्रत्यक्ष जगन्नाथस्वामी । दत्तदिगंबर स्मर्तृगामी । दीनजनार्ति-सकल प्रशमी । करुणाकंद पातले ॥ ३९ ॥ न पाचारितां सहज गमन । यशस्वी झालें सुदर्शन । भक्ताभीष्टप्रद महान् । शांताकार सद्गुरु ॥ ४० ॥ आजि पूर्ण भाग्योदय । देखिले भवतारक पाय । जे अत्यंत दुर्लभ अनेक उपाय । करितां प्राप्त योग्यांतें ॥ ४१ ॥ अवर्णनीय धन्य दिवस । भक्तजन-मानसनिवास । जगन्नायक श्रीमत्परमहंस । गुरुवतंस विलोकिले ॥ ४२ ॥ श्रद्धाभक्तिसमन्वित । अलवणी जोडूनि हस्त । परमादरें विनवित । जगन्नाथस्वामीतें ॥ ४३ ॥ आपलें कोणतें असे स्थान । वास्तव्य कोठें स्नान भोजन । होऊनियां प्रसन्न-वदन । निवेदन करावें ॥ ४४ ॥ हांसूनि वदती परमहंस । "विश्वीं आमुचा अखंड वास । विश्वाधिष्ठान हेंचि खास । अभिन्न स्थान आमुचें ॥ ४५ ॥ तथापि तुम्हांसि व्हावें श्रुत । यदर्थ सांगूं यथार्थ विहित । आमुचें स्थान सह्याद्रिपर्वत । आणि गिरनार पर्वत जाणावें ॥ ४६ ॥

काशीक्षेत्र मातापुर । करवीर पांचाळेश्वर नगर । कुरवपुर औदुंबर । करंजनगर इत्यादि ॥ ४७ ॥ नृसिंहवाडी गाणगापुर ।
कुरुक्षेत्र हरिद्वार । हिमाचल आणि रामेश्वर । द्वारका नगरी विख्यात ॥ ४८ ॥ विज्ञान नित्य गंगास्नान ।
अद्वैत परमामृत प्राशन । तुंगभद्रा प्रवरापान । भीक्षाटन सर्वत्र ॥ ४९ ॥ अबु श्रीगिरि अनेक । मेरुपर्वत गिरिकर्णिक ।
अंबा-काली-सरस्वत्यादिक । अनंत स्थानें आमुचीं ॥ ५० ॥ अष्टविनायक वक्रतुंड । ब्रह्मकपाट केदारकुंड । आमचें
स्थान पिंड ब्रह्मांड । द्वादश ज्योतिर्लिंगादि ॥ ५१ ॥ तीर्थ-क्षेत्र-देव-संस्थान अखिल । संपूर्ण आमुचें निजस्थल ।
सर्वत्र व्यापक निर्मल । चिरकाल भरलों स्वतःसिद्ध" ॥ ५२ ॥ वृद्ध नृसिंहसरस्वती । ऐसें अलवणीबुवाप्रति । निजरंगप्रेमें
बोधिती । स्वात्मप्रतीती दृढ व्हाया ॥ ५३ ॥ अवघा भरला जगन्नाथ । श्रीगुरुनृसिंहस्वामी समर्थ । दर्शनें स्मरणें
सकलानर्थ । नष्ट होती तात्काल ॥ ५४ ॥ ऐसें ऐकूनि यतिभाषण । अलवणीबुवांनीं धरिले चरण । वारंवार घालिती
लोटांगण । नृसिंहनारायणपदीं ॥ ५५ ॥ देवाधिदेवा परमहंसा । अविद्यासंसारतम-विध्वंसा । शुद्ध निरंजन परमपुंसा ।
उपनिषद्-रहस्य आपण ॥ ५६ ॥ मनोवाचा-अगोचर । विश्वव्यापक स्थिरचर । चैतन्यस्वरूप चराचर । तेंचि साकार
जाहलें ॥ ५७ ॥ नवसें सायासें दुर्लभ । तोचि प्रत्यक्ष झाला लाभ । आपल्या कृपें सर्व सुलभ । रमावल्लभा होय तें
॥ ५८ ॥ श्रीमद्गुरु वृद्धनृसिंहतीर्थ । आपणचि स्वामी जगन्नाथ । ऐक्यस्वरूप ज्ञानयोग तत्त्वार्थ । झालों कृतार्थ दर्शनें
॥ ५९ ॥ अलवणीबुवा प्रार्थिती ऐसें । तेधवां वृत्त घडलें कैसें । श्रोतीं परिसावें अनायासें । विश्वंभरचरित्र तें ॥ ६० ॥
सुंदर एक गृह विशाल । तेथेंचि शोभिवंत निर्मल । उत्तम सुगंध रुचिकर जल । स्वच्छपात्रीं भरलें असे ॥ ६१ ॥
रंगवल्ल्यांचा अति थाट । बसाया मांडिले चार पाट । पुष्पलतिका घनदाट । चित्रविचित्र अचाट त्या ॥ ६२ ॥ चटण्या
कोशिंबिरी लवण । रसभरित शाका द्विगुण । पंचामृत लोणचीं मृदु कठिण । पापड कुरवडियादिक ॥ ६३ ॥ बारिक

शाल्योदन सुवासिक । वरी पिंवळें वर्ण सम्यक् । सुंदर मधुर पक्वान्नें अनेक । लाडू मोदक वाढिले ॥ ६४ ॥ दधि क्षीर सुगंध शुद्ध घृत । बहुविध क्षिप्रा विलसत । आर्द्रक जंबीर आर्द्रकोषणयुत । रंभाफलादिक भरलेले ॥ ६५ ॥ कथिका नाना रसादिक । रुचिकर अपूप वटक । लेह्य पेय चोष्य खाद्यादिक । पदार्थ कटु आम्ल रसिक ॥ ६६ ॥ शुद्धपात्रीं रसभरित । विविध पदार्थ मांडिले बहुत । सुवासिक स्वच्छ जलपूरित । सुंदर पात्रें ठेविलीं ॥ ६७ ॥ मुखवासार्थ पूगीफल । सह त्रयोदशगुणीतांबूल । हिरण्यदक्षिणा सोज्वल । शोभिवंत स्थानीं ठेविली ॥ ६८ ॥ वारावयासी व्यजन चामर । उभे ठाकले सेवक तत्पर । चौघेजण झालेले क्षुधातुर । त्यांसी समर्थ सांगती ॥ ६९ ॥ उठा सत्वर भोजनासी । कारण नसे विलंबासी । सर्वसिद्ध पात्रीं निश्चयेंसीं । घ्या हो बसूनि प्राणाहुति ॥ ७० ॥ तंव ते चौघे तिकडे पहाती । सर्वसिद्ध पात्रें यथास्थिति । अद्भुत आश्चर्य मनीं मानिती । म्हणती केवल ईश्वर हे ॥ ७१ ॥ मग चौघे भोजना बैसले । आतृप्त यथास्थित जेविले । मुखशुद्ध्यर्थ तांबूल भक्षिले । आनंद वर्तला त्या स्थलीं ॥ ७२ ॥ तेथें असलेले सर्वलोक । पहाती हें विलक्षण कौतुक । म्हणती हे प्रत्यक्ष जगन्नायक । विश्वव्यापक परमेश्वर ॥ ७३ ॥ सप्त दिवसांचे उपोषित । चौघे अन्नोदकरहित । होते व्याप्त ज्वरदूषित । क्लेश भोगितां पाहिले ॥ ७४ ॥ लोक म्हणती अकस्मात् । कोठूनि आले न कळत । यांच्या चरणस्पर्शें क्षणांत । आरोग्य झालें चौघांसी ॥ ७५ ॥ क्षणांत अद्भुत नवल वर्तलें । उत्तम सुशोभित स्थान निर्मिलें । नानापक्वान्नपूरित पात्रीं देखिले । चौघे जेविले यथेच्छ ॥ ७६ ॥ घेतली तांबूलसहित दक्षिणा । सेवक वारिती चामर विंझणा । तृप्ति आरोग्यता चौघांजणा । लाधली एके क्षणांत ॥ ७७ ॥ अघटित परमेश्वरी लीला । दाविती दयाळू जनांला । अतर्क्य अगम्य ब्रह्मादिकांला । ते आजि डोळां पाहिली ॥ ७८ ॥ अवघे लोक लोटांगणा । प्रेमें घालिती प्रदक्षिणा । जगन्नाथ स्वामिचरणां । आलिंगिती आनंदें ॥ ७९ ॥ वदती लोक शरणागत । जगन्नाथ

* * *

स्वरूपानंत । उद्धरावे दुष्ट पतित । अपराध क्षमा करूनियां ॥ ८० ॥ आपण साक्षात् आहां प्रभु । पूर्णब्रह्म सनातन
विभु । परमेष्ठी नारायण शंभु । अखंड कल्याणकारक ॥ ८१ ॥ पदरीं नसतां पूर्वपुण्य । सर्वचि आमचें वैगुण्य ।
भगवान् परमात्मा निस्त्रैगुण्य । ज्ञाननिपुण आहां कीं ॥ ८२ ॥ आम्ही येथें आलों पुण्यास्तव । परी अंतरीं नुपजे
दयाभाव । परोपकाराचा अभाव । सर्वथैव जाहला ॥ ८३ ॥ पीडित दीनांसि अन्नोदक । दिधलें नाहीं ग्रास एक । तीर्थयात्रा
देव-प्रदर्शन लोक । करितों दांभिक आम्ही ते ॥ ८४ ॥ त्यांत एक जन्मांध ब्राह्मण । वेदवेत्ता शास्त्रनिपुण ।
कर्मधर्मनिरत सात्त्विक जाण । भावें बोलत समर्था ॥ ८५ ॥ म्हणे अहो नारायणा । जगदीश्वराख्य निर्गुणा । योगेश्वराधीश
जगत्कारणा । विश्वव्यापका गुरुवर्या ॥ ८६ ॥ मनीषा उपजली मानसीं । नयनीं पहावें आपणांसी । पूर्ण
व्हावी कृपा मज दिनासीं । अहो हृषीकेशी उद्धरावें ॥ ८७ ॥ आपली कृपादृष्टि होतां । सर्वार्थ साध्य होय तत्त्वतां ।
अघटित ऐकिलें प्रत्यक्ष आतां । चौघे निरामय जाहले ॥ ८८ ॥ ‘कर्तुमकर्तुमन्यथा’ । जगदुत्पत्ति-स्थिति-संहरिता ।
जगत्प्राण अत्युदार दाता । जगन्नाथा आपण ॥ ८९ ॥ सफल करा जी मनोरथ । द्यावें दर्शन दीनानाथ । नातरी देह
त्यागितों शपथ । सत्य आपणांसमक्ष ॥ ९० ॥ पाहूनि दृढतर निश्चय । कळवळले पुरुषोत्तमराय । पुढें प्रवर्तलें नवल
काय । श्रोतीं सादर परिसावें ॥ ९१ ॥ स्वकंठांतील सुपुष्पहार । झुगारिला निजकरें सत्वर । जन्मांधाचिये अंगावर ।
सहज पडिला तेधवां ॥ ९२ ॥ पंडितें जाणूनि महाप्रसाद । वंदिला मस्तकीं अविषाद । नेत्रांसी स्पर्शितां विशद ।
उघडले नेत्र तयाचे ॥ ९३ ॥ नृसिंहतीर्थ इतुक्यांत । कटीवर ठेवूनि द्वयहस्त । उभे ठाकले दत्तावधूत । जन
समस्त देखती ते ॥ ९४ ॥ पंडित वदे जी परमहंस सद्गुरु । कामधेनु चिंतामणि कल्पतरु । उपमा न साजे मैलागरु ।
क्षीरसागरादि आपणां ॥ ९५ ॥ लोह-परिसाचा दृष्टान्त । सुवर्ण एकदेशी न शोभत । सर्वज्ञ सर्वचिदपराजित ।

गुणातीत गुरुराय जो ॥ ९६ ॥ देहेंद्रियांत व्यापक सर्वेश्वर । असून अस्पर्श इंद्रियादि विकार । सर्वभूतनिवासी धुरंधर । कार्यकारणरहित तूं ॥ ९७ ॥ अविद्यामाया-व्यतिरिक्त । परी अज्ञानदृष्टीसी मायायुक्त । अव्यक्त असतां दिसे व्यक्त । उपाधि-निर्मुक्त विराजे ॥ ९८ ॥ वेदवेदांतप्रतिपाद्य । प्रत्यगात्मा ब्रह्म स्वसंवेद्य । देशकालवस्तु-अपरिच्छेद्य । जगद्वंद्य जगद्गुरु ॥ ९९ ॥ पुष्पमाला नेत्रीं फिरवितां । दिसूं लागलें दृश्य आतां । जेवीं निद्रेंतून जागृत होतां । अवघे दिसती पदार्थ ते ॥ १०० ॥ देवद्विजसाधुजन-विरोध । केलीं पूर्वजन्मीं पापें अगाध । त्यायोगें भोगिलीं दुःखें विविध । उपजलों गर्भांध इहजन्मीं ॥ १ ॥ पुण्यांश होता कांहीं पदरीं । यात्रेसी पातलों येथवरी । मी दीन हीन पंगु भिकारी । परंतु ईश्वरानुग्रह लाधला ॥ २ ॥ श्रीमन्नृसिंह जगदात्ममूर्ति । ज्याचेनि स्फुरे सत्तास्फूर्ति । मीं गर्भांधानें परब्रह्मज्योति । स्पष्ट नेत्रीं पाहिली ॥ ३ ॥ सुप्रसन्नवदन अति निर्मल । सर्वत्र व्यापला सुगंध परिमल । सुशोभित चरणरक्त कोमल । वंदितां भवजाल नुरेचि ॥ ४ ॥ अनंत जन्मींचें सर्व पातक । विदग्ध झालें अविद्यात्मक । डोळां देखिलें अद्वितीय एक । सच्चिदानंदरूप सद्गुरु ॥ ५ ॥ भाग्य उदयासी पावलें । जोडिलीं आजि श्रीगुरुपाउलें । गर्भांधासी नेत्र दिधले । अद्भुत वर्तलें चरित्र ॥ ६ ॥ धाता यथा जें जें निर्मित । न्यूनाधिक्य मिथ्याभूत । महत्पुरुषावीण अघटित । करी जगतीं अन्य कोण ॥ ७ ॥ धन्य धन्य हा जगन्नाथ-मेळा । अघटित अपार गुरुलीला । परमपूज्य त्रैलोक्यपाला । डोळां देखिलें गर्भांधें ॥ ८ ॥ ब्रह्मादिकांसी न लागे अंत । मुनि योगी हृदयीं नित्य चिंतित । ध्याती जया सेवकजन भक्त । तो जगन्नाथीं भेटला ॥ ९ ॥ ज्याचें सदुर्लभ चरणदर्शन । जयाकरितां वेदोक्त धर्माचरण । करिती हरिगुरु-भक्तिपरायण । तो नारायण संतुष्टला ॥ ११० ॥ यापरी नृसिंहस्वामी जगत्पाळें । चौघां दुर्बळां आरोग्य देऊनि

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

तृप्त केलें । तैसेंच गर्भांधासी नेत्र दिधले । जगन्नाथ-मेळीं सहज ॥ ११ ॥ अलवणीबुवा सेवकांसह । आरोग्य-
तृप्त झाले सुखावह । जगन्नाथ-प्रसादासी दुराग्रह । विटाळ सहसा मानूं नये ॥ १२ ॥ जगन्नाथ-प्रसाद प्रशस्त ।
म्हणूनि लोक पसरिती हस्त । अलवणीबुवास अपरिमित । नृसिंहसरस्वती प्रबोधिती ॥ १३ ॥ मग अलवणी
करिती विज्ञापना । विश्वात्मा प्रभु जगज्जीवना । द्यावें आम्हां पुनर्दर्शना । दयाघना गुरुवर्या ॥ १४ ॥ श्रीगुरु
वदती प्रज्ञापुराप्रति । होईल पुढें वास्तव्य प्रख्याति । भेटी होईल सहजस्थिति । निःसंशय असावें ॥ १५ ॥
वदे नेत्र आलेला पंडित । निजसेवेंत ठेवा अखंडित । अनायासें दंडकमंडलुमंडित । गुरु न धुंडितां लाभले
॥ १६ ॥; तंव तेथें वृद्ध शूद्र एक । दारिद्र्यव्याप्त परमभाविक । येऊनियां श्रीगुरुसन्मुख । साष्टांग दंडवत
करीतसे ॥ १७ ॥ करद्वय जोडूनि प्रार्थना करी । म्हणे आपण देव अवतारी । आठ दिवस झाले मदीय स्त्री ।
चुकली कोठें दिसेना ॥ १८ ॥ यात्रेंत धुंडितां थकलों । स्त्रीसंसारसुखासी मुकलों । तान्ह्या बालकासी रक्षितां
सुकलों । विकलों जैसा चाकर ॥ १९ ॥ ऐकूनि समर्थ कथिती त्यासी । "मरणद्वारीं बैसलासी । अद्यापवरी वासना
मानसीं । थेरड्या तिळही लाज नसे ॥ १२० ॥ ऐशीं वर्षांचें वृद्धवय । शिथिल झाले सर्वावयव । संनिध पातला मृत्यु-
समय । तथापि कामवासना उरलीसे ॥ २१ ॥ आतां कैसा मनोजय । केव्हां व्हावा वासनाक्षय । कदा जिंकावें
विषयेंद्रिय । वृद्धा विचार करीं रे ॥ २२ ॥ तूं कोण कैंचा कोठून । आलासि पुढें कोठें गमन । प्रस्तुत शूद्रदेह-
धारी असून । वृथाभिमान बाळगिसी ॥ २३ ॥ दृश्य जगत्कर्ता कोण । याचें कोणतें उपादान कारण । तूं दृश्य जडदेह
नव्हेसि आपण । करीं विचार एतादृश ॥ २४ ॥ विषयभ्रांतीनें भुललासी । पूर्वींचा तूं तेली असती । दास आमुचा
असूनि मानसीं । ओळख कशी पटेना" ॥ २५ ॥ मग समर्थ सांगती सेवकांसी । भस्म लावावें याचे कपाळासी ।

तेणें होईल स्मृति मानसीं । अंतसमयासी उपयोगी ॥ २६ ॥ भस्म स्पर्शितांचि भालीं । पूर्वजन्म-स्मृति उद्भवली ।
धांवूनि लागला चरणकमलीं । नृसिंहसरस्वती-गुरूच्या ॥ २७ ॥ म्हणे "मी जातीचा तेली आपा । मज कां अव्हेरिलें
मायबापा । वश झालों संसार-खटाटोपा । त्रिविधतापें गांजलों ॥ २८ ॥ सोडवा प्रपंच-परिग्रहसंग । ठेवा निजपदकमलीं
अभंग । नांदवा ब्रह्मात्मसुखीं निःसंग । निजरंगीं मेळवा करुणार्णवा" ॥ २९ ॥ वृद्धाची प्रिय स्त्री त्या कालीं । काय
आहे तें पहावया आली । पतीस देखूनि आनंदली । बालें घेतलीं कटीवरी ॥ १३० ॥ वारंवार निजपतीचे कंठीं ।
प्रेमभरें घालीत मिठी । अनिवार मायाप्रपंचगांठी । लोक पहाती कौतुक ॥ ३१ ॥ वृद्ध तेली स्त्रीस म्हणे ऐक ।
श्रीगुरुसमर्थपदीं ठेवीं मस्तक । ईश्वरावतार जगदोद्धारक । आमचा पालक सर्वस्वीं ॥ ३२ ॥ मग ती करितसे साष्टांग
नमन । म्हणे स्वामीचरित्र अपार गहन । दर्शनें झालें परम पावन । पूर्वजन्मज्ञान उपजलें ॥ ३३ ॥ उभयतांही सद्गुरुपदीं
लोळती । चरणारविंदीं ठेवा म्हणती । गुरुपदवियोग नसावा अंतीं । स्वस्वरूपीं मेळवा ॥ ३४ ॥ नृसिंहमुनि वदती
वचना । तुमची पूर्ण होईल शुभकामना । आशीर्वाद देऊनि सर्वजनां । अंतर्धान पावले ॥ ३५ ॥ आश्चर्य वाटलें
सकलांस । म्हणती साक्षात् पूर्णब्रह्म परमहंस । मग सर्वजन जाती स्वसदनास । सद्गुरुपदांतें चिंतूनि ॥ ३६ ॥
ते अलवणीबुवा बडोद्यांत । निरुपाधिक बालपिशाचवत् । स्वेच्छें राहिले दिवस बहुत । लोककल्याणाकारणें ॥ ३७ ॥
नव्हते बुवा लवण भक्षित । म्हणूनि 'अलवणी' नाम विख्यात । त्यांनींच हें श्रीगुरुवृत्त । निवेदिलें आम्हांसी ॥ ३८ ॥
जाणूनि पूर्ण भरंवशाचें वृत्त । सत्यपणें ग्रंथीं केलें ग्रथित । नव्हे किंचित् स्वकपोलकल्पित । सत्यार्थ वदविती दत्तगुरु
॥ ३९ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदशास्त्रपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठवामनविरचित्त । षष्ठाध्याय गोड हा ॥ १४० ॥
इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे षष्ठोऽध्यायः समाप्तः ॥ ६ ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय सातवा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ गुरु म्हणती शिष्यासी । न धरावा संशय मानसीं । अनन्यैक-
भक्तीनें सेवेसी । शुद्धचित्तें असावें ॥ १ ॥ श्रीगुरुचरणीं सादर । सेवेंत असावें तत्पर । कपट दंभादि अविचार ।
परित्यागुनी समूल ॥ २ ॥ नित्यनेमें साष्टांगनमन । आज्ञा शिरसां मानून । गुरुपदीं तनुमनधन । शिष्यें अर्पण
करावें ॥ ३ ॥ ब्रह्मात्मभावें सेवितां । अभेद स्वात्मस्वरूपता । बाणे निःसंगबोध तत्त्वतां । संदेहरहित शिष्यासी ॥ ४ ॥
गुरुचरणीं सदा लीन । देव ब्राह्मण विद्वान् । संत महात्मे साधुजन । भावेंकरूनि वंदिजे ॥ ५ ॥ वेदशास्त्रीं विश्वास पूर्ण ।
वेदविहित आचरण । सर्वकर्म ब्रह्मार्पण । कीजे टाकूनि फलेच्छा ॥ ६ ॥ फलेच्छा अखिलकर्मांची । अवश्य त्यजिली
पाहिजे साची । तरीच होय अंतःकरणाची । शुद्धि निश्चयें जाणपां ॥ ७ ॥ चित्तशुद्धि झाल्यावांचून । कांहींच न
साधे साधन । वेदमहावाक्यार्थीं सावधान । कैसेंनि होय मानस ॥ ८ ॥ मुख्यत्वें अनादि वेदप्रणीत । तोचि सद्धर्म
सुविहित । म्हणूनि स्ववर्णाश्रमकर्म वेदोक्त । चित्तशुद्ध्यर्थ करावें ॥ ९ ॥ त्यागूनि अन्यकर्म निंद्य । सनातनवेदप्रतिपाद्य ।
सुनिश्चितार्थें स्वधर्म आद्य । कर्म वंद्य आचरावें ॥ १० ॥ पाखांड सर्व टाकावें । वेदांत-सिद्धांतांसि आयकावें । न कळे तरी
पुसावें । सद्विद्वानांसी अवश्य ॥ ११ ॥ श्रुत्यर्थसंपन्न ब्रह्मानुभवी । दृढबोधशक्ति क्षमा बरवी । सदाचारी जितेंद्रिय, पदवी ।
'सद्विद्वान्' तयां शोभते ॥ १२ ॥ मग ते असोत ब्रह्मचारी । अथवा गृहस्थ सदाचारी । किंवा संन्यासी भिक्षाहारी । श्रोत्रिय
ब्रह्मनिष्ठ दयाळु ॥ १३ ॥ ऐसें श्रीगुरुस्वामी उत्तम । तपस्व्यांची गुहा विश्राम । त्यांत प्रवेशले आत्माराम । परंधाम योगिराज

॥ १४ ॥ हिमाद्रिवरी अत्यंत शीत । तेथें वसणारे धैर्यवंत । गुहेमाजीं अग्नि सतत । ठेविती अमित तपस्वी ॥ १५ ॥ लावूनियां पाषाण थोर । निरुद्ध केलें गुहाद्वार । पुण्यगुहेआंत विवर । सुंदर शोभिवंत असे ॥ १६ ॥ तेथें सन्मानें आसनावर । बैसविले नृसिंहगुरुवर । तपस्वी जोडूनि द्वयकर । म्हणती फलाहार करावा ॥ १७ ॥ गुहा शोभिवंत निर्मल । शुद्ध एकांतवासस्थल । योगाभ्यासार्थचि केवल । निरुपाधिक उपयोगी ॥ १८ ॥ पुष्पवटिका नानाविध । उदक-प्रवाह स्वच्छ संनिध । घनदाट कुसुमसुगंध । रोगनाशक भरलासे ॥ १९ ॥ लहान थोर उभे तरु । सुवासिक चंदन मैलागरु । चंपक बकुल जाति सुरु । करवीर कल्हारादिक ॥ २० ॥ पर्वतीं बहुविध दिसे शोभा । कदंब मोगरा केतकी रंभा । पुन्नाग मालती हरिवल्लभा । जैशी इंद्रसभा साजिरी ॥ २१ ॥ हरिनेत्र हरिचंदन । पारिजातक पलाश अर्जुन । मंदार जंबीर कुंद मदन । अनेक प्रसून सुगंधित ॥ २२ ॥ भस्मधारी जटायुक्त । 'कौपिनवंत खलु भाग्यवंत'। निरुपद्रवी शुचिर्भूत । सदा शांत तपस्वी ते ॥ २३ ॥ तुंबे भरिले स्वच्छोदकें । कंदमूलफलादिकें । नृसिंहमूर्तीस रुचलें तितुकें । समर्पूनि तोषिविती ॥ २४ ॥ फलाहार जलप्राशन । झाल्यावरी हरिकीर्तन । करिती पादसंवाहन । मृदु वचनें बोलती ॥ २५ ॥ "त्यागूनि अहंकार लज्जा । देवाधिदेवा स्वामिराजा । योगाभ्यास आत्मकाजा । केला पुष्कळ सांगती ते ॥ २६ ॥ प्राणायाम समाधीयोग । शास्त्रविहित अनुद्वेग । केला त्यजूनि सकलभोग । बहुत वर्षें अभ्यास ॥ २७ ॥ परी न वाटे समाधान । तळमळीत व्यग्रमन । शोधूनि बहुत महात्मेजन । केलें सेवन तयांचें ॥ २८ ॥ किमया जडी विजयकल्प । सांगती नाना संकल्प । कोणी न दाविती निर्विकल्प । परब्रह्मस्वरूप तें ॥ २९ ॥ देहबुद्धीचे व्यवसाय । अष्ट सिद्धींचे समुदाय । साहंकारें वदती उपाय । बाह्यरंग अवघा तो ॥ ३० ॥ प्राप्त व्हावे संस्थान मठ । महंतीप्रतिष्ठार्थ खटपट । कोणत्याही प्रकारें प्रकट । लोकांत यावें प्रसिद्धीस ॥ ३१ ॥ शिष्य प्रशिष्य बहुत । असावें

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

आम्ही लोकपूजित । आमचेचि घ्यावे उपदेश विहित । सकल जनीं सर्वदा ॥ ३२ ॥ किंचित झालिया अपमान । क्रोधें
तोडिती पराची मान । ऐसें असूनि मानापमान । मुखें समान म्हणती ते ॥ ३३ ॥ मनीं घट्ट विषयवासना ।
वरिवरी वेदांतवचना । पंडितपणें करिती व्याख्याना । केवल उदरभरणार्थी ॥ ३४ ॥ फाल्गुनमासीं बालकें गर्जती ।
तैसे कलियुगीं वेदांती भासती । शुष्क हृदयीं बहिर्मुख वृत्ति । अंतरीं जपती स्त्री धना ॥ ३५ ॥ कीर्तन करिती
पुराण वाचिती । टिळे माळा बहुवेष धरिती । अंगारे धूप दोरे करिती । लोकांसि लाविती नादास ॥ ३६ ॥
वरिवरी दाखविती विरक्ति । अंतरीं अत्यंत विषयासक्ति । लटकें पंथ ज्ञान भक्ति । कधीं न मुक्ति मिळे तयां
॥ ३७ ॥ ऐसे काममदांध बाष्कळ । पोपटासारिखे वाचाळ । अशांचा संग स्वप्नींही एक पळ । विटाळ देखील
न व्हावा ॥ ३८ ॥ असो आमचा सुदैवयोग । उदय पावला यथासांग । श्रीसद्गुरु ब्रह्मवेत्ते निजरंग । भेटले अभंग
अनायासें ॥ ३९ ॥ आत्मप्राप्तीस तो काय । सांगा समर्थ सोपा उपाय । हृदयस्थ ब्रह्मात्मा निरामय । नित्योपलब्ध
व्हावा जी ॥ ४० ॥ धातु शिला काष्ठ मृन्मय । देव तीर्थेंहि जलाशय । बहुतकाल सेवितां योग्य । फलद्रूप होती
ते ॥ ४१ ॥ संत-गुरूसी नमस्कार करितां । अनन्यभावें शरण होतां । सहजस्थिति स्वस्वरूपता । नित्य अर्पिती
शिष्यांसी” ॥ ४२ ॥ ऐकूनि तयांचे विनंतीस । ओळखिलें विशुद्धमानस । वदती नृसिंहपरमहंस । श्रोतीं उल्हासें
परिसावें ॥ ४३ ॥ “तुम्ही विरागी ब्रह्मचारी । ब्रह्मविद्येचे अधिकारी । व्हाल परब्रह्मसाक्षात्कारी । याच शरीरीं अविलंबें ॥ ४४ ॥
पंचकोशांतरीं गुहा । तींत वसे अखंडात्मा महा । हृदयीं सूक्ष्मविचारें पहा । सच्चिदानंदस्वरूप ॥ ४५ ॥ दिसे जो जो
विषय । तो अशाश्वत मिथ्या होय । तद्द्रष्टा अस्तिभातिप्रिय । स्वरूपात्मा आपणचि ॥ ४६ ॥ सर्वज्ञ द्रष्टा सर्वसाक्षी ।
अंतर्बाह्य सकल निरीक्षी । विवेकी ब्रह्मज्ञानें लक्षी । अलक्ष्यातें प्रत्यक्ष ॥ ४७ ॥ येथें मुख्यत्वें देहाहंकृति । बाह्य जड

***********************************************************************

दृश्य मनोवृत्ति । त्यागूनि वासना निश्चितीं । हृदयीं पहावें आपणा ॥ ४८ ॥ समूळ गळावा देहाभिमान । सुटावें
पदार्थविषयभान । जैसें वमियेलें अन्न । पुन्हां न कोणी भक्षिती ॥ ४९ ॥ मनोबुद्ध्यादिकवृत्ति । आपल्यापासून उद्भवती ।
येतां जातां आपणास दिसती । त्याहूनि भिन्न आपण ॥ ५० ॥ घटद्रष्टा घटाहूनि भिन्न । तैसें अनेक वृत्ति लय उत्थान ।
जाणता स्वतःसिद्ध ज्ञानघन । आत्मा आपण निःशंक ॥ ५१ ॥ देहीं असूनि देहव्यापार । आपणचि पाहे विवेकचतुर ।
देहेंद्रियांचे न स्पर्शती विकार । म्हणूनि निर्विकार निजात्मा ॥ ५२ ॥ हा स्थूल देहमांसमय । सूक्ष्मदेह वासनामय ।
कारणदेह अज्ञानमय । ऐसे देहत्रय जाणिजे ॥ ५३ ॥ या देहत्रयांचे व्यवहार । असत्-जड-दृश्य विकार । आत्माचि
जाणे निर्विकार । तोचि आत्मा आपण ॥ ५४ ॥ देहत्रयांच्या अवस्था तीन । जागृति सुषुप्ति स्वप्न । विश्वानर तैजस
प्राज्ञ । जीवसंज्ञा अभिमानी ॥ ५५ ॥ जागृतस्वप्नसुषुप्त्यादि प्रपंच । प्रकाशक ब्रह्मात्मा साच । तो प्रत्यक्ष आहे मीच ।
जाणूनि बंधमुक्त होईजे ॥ ५६ ॥ स्वसंकल्पवशात् बद्ध । निःसंकल्पें मुक्त शुद्ध । संकल्पविकल्प जाणता प्रबुद्ध । स्वतःसिद्ध
आत्माचि ॥ ५७ ॥ मूळचे तुम्ही ब्रह्मात्माचि असतां । ब्रह्मात्मा म्हणतां कां भितां । स्वकल्पनावशें अधःपाता ।
कांहो जातां वृथैव ॥ ५८ ॥ भूत येऊनि अंगांत द्विज । कल्पित बोले मी अंत्यज । वेदोक्तधर्मी ब्राह्मणवंशज । मिथ्या
अंत्यज म्हणवित ॥ ५९ ॥ अथवा होतां वायुप्रकोप । भलतेंचि बडबडे वाग्जल्प । किंवा झोपेंत असतां महत् स्वल्प ।
बरळे ओरडे वृथा जैसें ॥ ६० ॥ पाहूनि स्वप्रतिबिंब उदकीं । बुडालों म्हणे वर काढा कीं । तैसें कल्पनावशें विलोकी ।
असूनि आत्मा सन्निकर्ष ॥ ६१ ॥ मिथ्या कल्पित दृश्य जड । अविद्या कल्पनेनें माजविलें बंड । तेणें जन्ममरणप्रवाहीं
उदंड । बुडूनि दंड भोगिती ॥ ६२ ॥ म्हणूनि हें कल्पना-थोतांड । आत्मघातक द्वाड वितंड । पूर्णब्रह्मात्मसाक्षित्वें
अखंड । निर्मूल कीजे मिथ्यात्वें ॥ ६३ ॥ ब्रह्मज्ञानाचें मुख्य तत्त्व । स्वात्मानुभवुनी विशुद्धसत्त्व । ज्याचे निमाले

विकल्प मिथ्यात्व । ‘जीवन्मुक्त’ पुरुष ते ॥ ६४ ॥ ‘सर्वं खलु इदं ब्रह्म’ । ‘सत्यज्ञानमनंतं ब्रह्म’ । ‘निरामयं सोहं ब्रह्म’ । तेंचि आपण निश्चयें ॥ ६५ ॥ शास्त्रदृष्टि गुरुवाक्यप्रतीति । तिसरी स्वात्मप्रतीति निश्चितीं । विविधप्रकारें जे अनुभविती । भवबंधमुक्त होती ते ॥ ६६ ॥ अस्ति-भाति-प्रियरूप ब्रह्म । जगद्रूप रूप नाम । त्यागूनि नामरूप-जगद्भ्रम । आत्मा आपण ओळखावा ॥ ६७ ॥ ‘अस्ति’ म्हणजे तो आहे । ‘भाति’ म्हणजे प्रकाशिता पाहे । ‘प्रिय’ म्हणजे आवडता लाहे । माझा मीच मजलागीं ॥ ६८ ॥ आपल्याकरितां सर्व प्रिय । बृहदारण्यीं मंत्राभिप्राय । वेदीं कथिलें व्हावया आत्मश्रेय । सत्यपणीं हेंचि कीं ॥ ६९ ॥ एवं अस्ति-भाति-प्रियरूप । आपण आत्मा ब्रह्मस्वरूप । महावाक्यार्थजन्य निर्विकल्प । निःशंक आपण आहों ॥ ७० ॥ परी व्हावें लागे अभ्यासन । वेदमहावाक्यार्थजन्य ज्ञान । ब्रह्माकारांतःकरणवृत्ति मन । झालें पाहिजे सुदृढ ॥ ७१ ॥ अतएव नाशनार्थ अज्ञान । ‘वृत्तिव्याप्ति’ अपेक्षित शास्त्रवचन । अभेद ब्रह्मात्मानुसंधान । निरसूनियां ‘फलव्याप्ति’ ॥ ७२ ॥ ब्रह्मवार्तेमाजीं अति कुशल । ब्रह्मवृत्तीवीण व्यर्थ फल । उदरार्थ वैखरी शब्दजाल । काय बाष्कळ कामाचें ॥ ७३ ॥ संसारभोग व्यवधान । निःशेष झालिया विषयभान । वासनाक्षय मन स्वाधीन । शुद्ध जरी असेल ॥ ७४ ॥ तरीच साधे ब्रह्मविद्या । नासे अज्ञानकार्यासह अविद्या । श्रीगुरुकृपें मोक्षसौख्या । निःशंक ते भोगितील ॥ ७५ ॥ ब्रह्ममयीवृत्तीवीण । न जावा निमिषार्ध क्षण । ब्रह्मादि सनकादि विचक्षण । योगी पूर्ण झाले अभ्यासें ॥ ७६ ॥ विषयीं मनासी अवसर । न द्यावा किंचित् पळभर । सहजस्थिति ब्रह्मात्मसाक्षात्कार । अभ्यास निरंतर होय तरी ॥ ७७ ॥ आवरण-विक्षेप-कषाय-लय । रसास्वाद हें विघ्नबाहुल्य । सर्व विघ्नांचा निश्चयें क्षय । खचित होय ब्रह्माभ्यासें ॥ ७८ ॥ शरीरप्रारब्ध कर्मक्षय । तोंवरी आत्मानुसंधान अक्षय । श्रीगुरुहरिभक्तप्रिय । असावें अभय साधूनि” ॥ ७९ ॥ स्वामिराजमुखें वेदसंमत । ऐकूनि बोध-परमामृत । तपस्व्यांचें चैतन्याकार चित्त । होऊनि लागली

समाधि ॥ ८० ॥ समर्थकृपें निरुपाधि । बाणली परमाद्वैतसमाधि । अखंड सच्चित्सुखामधीं । समरसले तपस्वी ॥ ८१ ॥ जेथें नुरे अहंदेहबुद्धि । गवसेना मानसिक आधि । संसार जन्ममरण व्याधि । सुटोनि गेली सर्वथा ॥ ८२ ॥ नित्य स्वस्वरूपानंदगोडी । निर्विकल्प समाधीची आवडी । असेल पूर्वसुकृताची जोडी । उपलब्ध तरी होतसे ॥ ८३ ॥ सुखें उदंड प्रपंच जात । परी तीं सर्व सौख्यें नाशिवंत । सच्चिद्‌ब्रह्मात्मसुख निश्चित । अविनाशी बृहत् एकचि ॥ ८४ ॥ एकचि व्यापक ब्रह्मसुख । त्यावीण अवघें महद्दुःख । क्षणिक क्षयी सुखांत देख । न रमती प्रबुद्ध कदाही ॥ ८५ ॥; तपस्वी गुहेचे पश्चिमेस । व्याघ्रद्वय करिती वास । उपद्रव न देती कोणास । संतोषित वृत्तीनें ॥ ८६ ॥ तपस्वी आणि समर्थसंवाद । चालत असतां निर्विवाद । गुहेंत येऊनि बैसले अविषाद । व्याघ्र तत्त्वबोधश्रवणार्थ ॥ ८७ ॥ समर्थमुखें उपदेश शीघ्र । ऐकूनि तटस्थ झाले दोन्ही व्याघ्र । दग्ध झाले अघौघसंचय समग्र । अत्युग्र पशु असूनि ॥ ८८ ॥ पूर्वीं ते परोक्षज्ञानी । उन्मत्त पंडितमन्यमानी । शापें पावले तिर्यग्योनी । परी सुसंस्कार मनीं उरलासे ॥ ८९ ॥ संत गुरु ब्राह्मण देव । गर्वें धिक्कारिले सदैव । परापमान केले पराभव । विद्यामदें तयांनीं ॥ ९० ॥ तपस्वी ब्रह्मसुखांत निमग्न । उरलें नाहीं देहभान । रजनी उरली घटिका दोन । व्याघ्रांसी समर्थ बोलती ॥ ९१ ॥ अंतर्साक्ष दिगंबरदत्त । वदती व्याघ्रांसी कां हो पंडित । येऊनि बैसलां अंधारांत । कोपऱ्यांत कशासी ॥ ९२ ॥ सेवकजनयुक्त चामर छत्र । गजाश्वावरी भरून ग्रंथशास्त्र । देशोदेशीं तुम्ही विजयपत्र । बलात्कारें घेतलें ॥ ९३ ॥ तुम्ही बहुत विद्वज्जनांसी । अपमानिलें साधुसंतांसीं । तैसेंच विद्यागुरूसी । बहुप्रकारें कष्टविलें ॥ ९४ ॥ तुम्ही असूनि पंडित ब्राह्मण । केलें सद्धर्मखंडण । अधर्मनिजमतमंडण । केलें भांडण द्विजांसवें ॥ ९५ ॥ देव-गुरु-वेद-विप्रशाप । आणि असंख्य घडलें पाप । त्यायोगें तामसी शार्दूलरूप । अत्युग्र पशु जाहलां ॥ ९६ ॥ विद्यामद धनमद । सत्ताधिकार प्रमाद । असत्-श्रीमदांधें उन्माद । हे अतिदुःखद

परिणामीं ॥ ९७ ॥ योगीश्वर-दर्शनें हितकारी । व्याघ्रांसी उद्भवली वाग्वैखरी । येऊनि नृसिंहमूर्तीचे सामोरी । चरणांवरी लोळती ॥ ९८ ॥ जयजय हो नृसिंहमुनिवरा । जयजय हो जगदीश्वरा । जयजया जी दयासागरा । मूढांसि उद्धरा प्रभुराया ॥ ९९ ॥ जयजया जी ज्ञानप्रकाशा । जयजय हो गुरु योगीशा । जगत्पावना अविनाशा । पाशमुक्त करा जी ॥ १०० ॥ जयजय विधिहरिहरा । श्रीगुरुदेवदत्त दिगंबरा । स्वामीसमर्थ चराचरा । व्यापक सारा भरलासी ॥ १ ॥ दत्तावतार अवधूत मूर्ति । सत्ताप्रकाशक चित्स्फूर्ति । अखिल ब्रह्मांडांतर्बाह्यवर्ति । विराजित जगदात्मा ॥ २ ॥ नित्य गाती यश निगमागम । सुरवर-योगी-मुनिजन-विश्राम । साक्षी चेता केवल परंधाम । पूर्णब्रह्म सनातन ॥ ३ ॥ तव महिमा अनंत अपार । लीलाविग्रही निरंतर । अगम्य अशक्य आम्ही पामर । काय वानूं समर्थातें ॥ ४ ॥ दर्शनें वाचा फुटली तत्काल । मूक आम्ही पशु केवल । धन्यधन्य परमकृपाल । जगत्पाला बोलविलें ॥ ५ ॥ न करावा आमचा अव्हेर । मायबाप तूंचि माहेर । करूनि दीन जनांगीकार । भवसंसार पार करावें ॥ ६ ॥ त्यागूनि अविद्याभिमान मल । होऊनि लीनचित्त निर्मल । वंदिती गुरुचरणकमल । ते शार्दूल प्रेमभरें ॥ ७ ॥ विगलित देहाहंपणा । सबीज मुराला पंडितपणा । श्रीमन्नृसिंहयतिचरणां । शरणागत जाहले ॥ ८ ॥ मग समर्थं कृपाकर । ठेविला व्याघ्रमस्तकांवर । वदती श्रीकरुणासागर । श्रोतीं सादर परिसावें ॥ ९ ॥ "अविनाशीक्षेत्र काशीपुरीं । जन्म पावाल योगीउदरीं । द्विजकुलवंशीं सदाचारी । वेदवेदांगपारग ॥ ११० ॥ पश्वादिदेहीं नाहीं गति । ऐसें निगमागम गर्जती । यास्तव नृजन्म दुर्लभप्राप्ति । महत्सुकृतें होतसे ॥ ११ ॥ चौऱ्यांशींलक्ष योनि फिरतां । जीवास नसे विश्राम्यता । न साधे परमपुरुषार्थता । नृजन्मावीण कदाहि ॥ १२ ॥ म्हणूनि श्रेष्ठ नरदेह । मोक्षद्वार आत्मागेह । सहजें प्राप्त पर इह । ईश्वरानुग्रहासी पात्र कीं" ॥ १३ ॥ ऐसें व्याघ्रांसि बोधितां । उदयासि

* * *

आला सविता । जागृति आली समस्तां । पशुपक्ष्यादिकांतें ॥ १४ ॥ कोकिला आळवी पंचमस्वर । पक्षी बोलती प्रभातीं मधुर । भगवन्नामाचा गजर । हरिदास भक्त करिती ॥ १५ ॥ षट्चक्रदेवताध्यान । अजपाजप संकल्पून । हंसःसोहंस्वरूपाधिष्ठान । हृदयीं मुनिजन जपती ॥ १६ ॥ गुरुदैवताराधन । प्राणायामसंयमन । देवतादि विष्णुपत्नी नमून । पाद स्पर्शिती योग्यादि ॥ १७ ॥ तेव्हां व्याघ्रांसि वदती नारायण । तपस्व्यांचें मस्तकावघ्राण ॥ करावें हो पंडित आपण । समाधिव्युत्थान होईल ॥ १८ ॥ मग तपस्व्यांचें मस्तक व्याघ्रीं हुंगिलें । तात्काल ते देहशुद्धीवर आले । स्वस्वरूपानंदीं रंगले । प्रेमें वदिलें गुरुचरणां ॥ १९ ॥ नंतर तपस्व्यांनीं शौचमुखमार्जन । विधिपूर्वक केलें स्नान । संध्यावंदनादि कृत्य जाण । पूजनादिक आटोपिलें ॥ १२० ॥ मग श्रीसमर्थांसी स्नान । यथासांग घालिती प्रेमेंकरून । परमात्मापुरुष अलौलिक जाणून । सद्भावें तयांसी सेविती ॥ २१ ॥ त्या हिमाद्रीच्या पायथ्यासमीप । एक संन्यासी मौन्यरूप । करितां झाला अत्युग्र तप । दत्तदर्शनाकारणें ॥ २२ ॥ षट्त्रिंशति संवत्सर । अनुष्ठान केलें निराहार । परंतु दत्तात्रेयदर्शन एकवार- । देखिल झालें नसे तया ॥ २३ ॥ कंटाळूनि झाला निराश । म्हणे कैसा गुरु-मंत्रोपदेश । फळला नसे लवलेश । बहुत क्लेश भोगुनी ॥ २४ ॥ मी महापापी केवळ । कैसा उद्धरिला अजामिळ । काय कामाचें तपोबळ । धिक्कार असो मजलागीं ॥ २५ ॥ ऐसा संन्यासी तळमळित । तों निद्रिस्त असतां स्वप्नांत । दत्तात्रेय दाविती दृष्टांत । श्रोतीं एकचित्तें ऐकावा ॥ २६ ॥ हिमाद्रीवरी पुण्यगुहा । आम्रवृक्षासमोर पहा । तेथें दत्तात्रेययोगी-महा । वसती जावें तद्दर्शनार्थ ॥ २७ ॥ ऐसा दृष्टांत स्वप्नीं होत । मग तो यति होऊनि जागृत । नित्यविधि सारूनि त्वरित । आला गुहेसंनिध ॥ २८ ॥ पाहूनि व्याघ्र भयंकर । भयभीत झाला यति फार । तयासी म्हणती योगीश्वर । भीतोसि कां रे व्यर्थचि ॥ २९ ॥ स्वप्न भ्रांति चेष्टा मस्करी । कांहीं न चिंता भीति तस्करीं । त्वदीय

इच्छा श्रेयस्करी । आतां निर्धारीं होईल ॥ १३० ॥ मग दत्तात्रेयस्वरूप सगुण । दाविलें त्रिगुणात्मक पूर्ण । तपस्वी व्याघ्र यति लोटांगण । वारंवार घालिती ॥ ३१ ॥ म्हणती आजी पुरले मनोरथ । गुरुदत्तात्रेय स्वामीसमर्थ । नेत्रीं अवलोकिले यथार्थ । झालें सार्थक तपाचें ॥ ३२ ॥ बालार्कवद्दिव्यप्रभा शांत । मालाजटामुकुटमंडित । पुष्पालंकारभूषित । श्रीगुरुदत्त देखिले ॥ ३३ ॥ अनंतजन्मांचें सुकृत । फळलें दत्तदर्शन अद्भुत । अप्राप्त तें प्राप्त निश्चित । बहिरंतरीं लाधलें ॥ ३४ ॥ व्याघ्रांसी वदती स्वामी । पुण्यक्षेत्रीं जन्माल काशीग्रामीं । पुनर्दर्शन होईल अंतर्यामीं । मुक्तियोगक्षेमरूप ॥ ३५ ॥ सद्गुरु सांगती तपस्व्यांसी । अद्वैतसमाधि बाणली तुम्हांसी । क्षेमरूप असावें स्वस्थतेसीं । पूर्वीं कथिल्यान्वयें ॥ ३६ ॥ संन्याशासी म्हणती बरवा । ब्रह्मस्वरूपानुभव घ्यावा । ब्रह्मविद्यातारक संसारभवा । प्राप्त झाली तुम्हांसी ॥ ३७ ॥ मग तपस्वी आणूनि आरती । मनोभावें ओवाळिती । मंत्रपुष्पांजली प्रदक्षिणा करिती । लोटांगण घालिती वारंवार ॥ ३८ ॥ ऐसें परमानंदमय त्रिभुवन । पुष्पें वर्षती देव विमानांतून । उत्साहसमारंभांत अत्रिनंदन । अंतर्धान पावले ॥ ३९ ॥ सर्वांसी वाटलें आश्चर्य । एकाकालीं आनंद विस्मय धैर्य । आम्हांस करूनि कृतकार्य । श्रीगुरुवर्य गुप्त झाले ॥ १४० ॥ समर्थगुरुमहिमा अनंत । गातां थकले वेदशेषादि बहुत । ते श्रीगुरु-स्वामीलीलामृत । स्वयें वदविती निश्चयें ॥ ४१ ॥ पुढील अध्याय भक्तिरसपूरित । ऐका विद्वज्जन श्रोते संत । जो वेदशास्त्रसुविहित । सद्धर्महितकारक ॥ ४२ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदशास्त्र-पुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । सप्तमाध्याय गोड हा ॥ १४३ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे सप्तमोऽध्यायः समाप्तः ॥ ७ ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥

बोटें । तेणें दिसती वाईट थोटे । स्वजनीं त्यागिले रोगी ओखटे । न भरती पोटें तयांचीं ॥ १४ ॥ कोणी न देती अन्नोदक । मग मागती घरोघरीं भीक । न मिळेचि धान्य कण एक । लोकांसी हांका मारिती ॥ १५ ॥ गर्वें करावें कर्म हांसत । तेंचि परिणामीं भोगावें रडत । ‘द्यावें तैसें घ्यावें’ हा सिद्धान्त । लोकानुभविक सत्य असे ॥ १६ ॥ विनापराध परांसी गांजणें । अनुकूलकालीं उन्मत्तपणें । परिणामीं महत्कष्ट भोगणें । सुटका न होणें त्याविना ॥ १७ ॥ अनुकूलकालीं सकलसिद्ध । प्रतिकूल समयीं तेंचि विरुद्ध । ऐसें जाणती बहुविध । जन त्रिविध उघड हें ॥ १८ ॥ म्हणूनि अनुकूलकालीं विहित । सद्धर्मकर्म शास्त्रसंमत । निरंतर तें सुशिक्षित । जनांनीं भावें आचरावें ॥ १९ ॥ जैशी आदित्याची छाया । चढते उतरते जाते लया । धन संपत्ति प्रपंचमाया । स्थिर न राहे सहसाही ॥ २० ॥ उदयकालीं सविता रक्त । अस्तमानीं तैसाचि शोभत । संपत्ति-विपत्तिकालांत । एकरूप महंत ते ॥ २१ ॥ अर्थाचिया संपादनीं । क्लेश तैसाचि परिपालनीं । अर्थाची झालिया हानि । दुःख होतसे व्ययकालीं ॥ २२ ॥ अर्जितां पालितां दुःख । नाश होतां खर्चितांही असुख । ऐशा क्लेशकारी अर्थासि देख । धिक्कार असो सर्वदा ॥ २३ ॥ ऐसें धन जें क्लेशकारी । तयाचा लोभ मनुष्यास भारी । या कलियुगीं अनेकप्रकारीं । जाणत असतां होतसे ॥ २४ ॥ धनलोभें तुटती पुत्र । धनलोभें सोडिती कलत्र । धनाचे लोभें इहपरत्र । साध्य न होती निश्चयें ॥ २५ ॥ धनार्थ वधिती मायबापा । धनार्थ प्रवर्तती महत्पापा । वर्णाश्रम-कुलधर्मप्रतापा । धिक्कारिती धनलोभी ॥ २६ ॥ धनलोभी करंटे कृपण । कवडी वेंचितां तळमळी प्राण । धनलोभ्याचें सर्व भाषण । अप्रमाण सर्वदा ॥ २७ ॥ कृपण धनलोभेंकरून । न वांछी कदा भार्यागमन । पुत्र झालिया वित्तहरण करील माझें सर्वथा ॥ २८ ॥ कृपणपणाची झाली सीमा । धनलोभ्यासी कैंचा काका मामा । धनार्थी नोळखिती । रिकामा । आप्तपणा कदापि ॥ २९ ॥ धनलोभी कृपण प्रचुर । भाषण वरिवरी करिती मधुर । पैठणी आग्रहसह आदर ।

# ॥ अध्याय आठवा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ शिष्य म्हणे अहो गुरुराया । वृद्धनृसिंह जगताशया । अवतार घेती भक्तजनकार्या । धर्मसंस्थापना कारणें ॥ १ ॥ अलवणीबुवा सेवकांसहित । तृप्त जाहले आरोग्यवंत । गर्भांधासी नेत्र त्वरित । दिधले नृसिंहमुनिवरें ॥ २ ॥ वृद्ध शूद्राची स्त्री जगन्नाथमेळीं । नृसिंहकृपें लाधली तात्काळीं । भस्म स्पर्शितां कपाळीं । आली पूर्वजन्मस्मृति तयां ॥ ३ ॥ समस्त जनांसी नृसिंहदर्शन । सहज लाधलें आशीर्वचन । श्रीमन्नृसिंह-चरणचिंतन । करित गेले जन स्वस्थानीं ॥ ४ ॥ पुढें वर्तलें काय वृत्त । श्रवणार्थ चित्त उत्सुक होत । कृपा करूनि गुरुलीलामृत । जगद्धितार्थ सांगा जी ॥ ५ ॥ अखंड गुरुभक्तीचा संचार । अंगीं भरला पूर्णविचार । नृसिंहसरस्वतीचें अपार चरित्र । गुरु वदती शिष्यासी ॥ ६ ॥ नृसिंहगुरुवर्य हरिद्वारीं । असतां वर्तलें नवल भारी । दोन युवमल्ल दृढशरीरी । असती तेथें द्विजवंशीं ॥ ७ ॥ करूनि मल्लबाहुयुद्ध । जिंकिती इतरांसी प्रसिद्ध । शरीरसंपत्तीनें समृद्ध । मल्लयुद्ध-विशारद ॥ ८ ॥ त्यागूनि स्ववर्णाश्रमधर्म । अहंकारें विपरित कर्म । आचरती न जाणूनि वर्म । दयाधर्म नसेचि ॥ ९ ॥ दुष्ट मदांध परपीडक । विनास्वार्थ साधुनिंदक । परस्त्री-परधनापहारक । महाछलक मल्ल ते ॥ १० ॥ कोणासी कांहींच मागती । न दिधल्यासी बळें ताडिती । असेल तेवढें हिसकावून घेती । बंधुद्वय मल्ल ते ॥ ११ ॥ ऐसें चाललें बहुत दिवस । लोकांसी सोसवेना महत्त्रास । जन प्रार्थिती परमेश्वरास । हे राक्षस वधावे ॥ १२ ॥ पुढें प्रारब्धकर्मसंयोग । मल्लांसी रक्तपिती सर्वांग । उद्भवलासे दुःसह महारोग । भोगिती भोग अनिवार ॥ १३ ॥ रोगें हातापायांचीं गळालीं

वारंवार करिती ते ॥ ३० ॥ धनलोभी अतिकृपण । देती घेती धनार्थ प्राण । धन शरीरदुःखासी कारण । घातक जाण सर्वस्वीं ॥ ३१ ॥ ऐसे ते विवेकहीन जेठी । निमग्न झाले दुष्टसंकटीं । त्या कालीं स्मरती जगजेठी । श्रीवैकुंठाधिपतीस ॥ ३२ ॥ धांव धांव रे भगवंता । आम्हां दुष्टमदोन्मत्तां । सांभाळावें रोगपीडितां । भक्तवत्सला जगदीशा ॥ ३३ ॥ आम्हीं केलें महापातक । दुर्जन खल परघातक । विषयमदांध भ्रष्ट दांभिक । मोठे छलक अविवेकी ॥ ३४ ॥ अभिमानी शरीर सबळ । देव-द्विज-साधूंचा केला छळ । ताडिले दास दुर्बळ । आम्ही खळ माजलों ॥ ३५ ॥ नाहीं जाणिले धर्माधर्म । धिक्कारिलें वैदिककर्म । धनलोभार्थ काढिलें चर्म । दीनसात्त्विकशरीराचें ॥ ३६ ॥ आमुचें असतां ब्राह्मणकुळ । उन्मत्तपणें धनार्थ केवळ । केलें विपरीतकर्मचांडाळ । कापिले गळे दुर्बळांचे ॥ ३७ ॥ महारोगें पीडिलों भारी । पंचमहापातकी दुराचारी । तुज ईश्वराविना भूवरी । कोण करी पालन ॥ ३८ ॥ उच्चस्वरें मारिती हांका । धांवा चंडीविनायका । राम कृष्ण हरि जगत्पालका । सदाशिवा धांव रे ॥ ३९ ॥ धांव पाव भवानीशंकरा । पुरुषोत्तमा करुणाकरा । शरणागतासी आधारा । महेश्वरा रक्षावें ॥ ४० ॥ श्रीमद्गुरुदेवदत्त दिगंबरा । अखिलब्रह्मांडाधीश्वरा । योगीराजा दयासागरा । कृपा करा आम्हांवरी ॥ ४१ ॥ आतां सोसवेना व्यथा । तुजविना कोण संरक्षी अनाथा । कुलस्वामी सद्गुरुनाथा । फोडूं माथा काय हो ॥ ४२ ॥ हस्तपादांच्या गळाल्या अंगुली । प्रारब्धकर्में दुर्दशा व्यापिली । तुजवीण कोणी नसे माउली । करी साउली कृपेची ॥ ४३ ॥ अहो हरिहरविधि भगवंत । आमचा पाहूं नका अंत । प्रणतभक्तवत्सल दयावंत । ब्रीद अनंत वर्णिती ॥ ४४ ॥ अतिसंकटीं प्रल्हादासी । त्वांचि रक्षिलें गजेंद्रासी । वस्त्रें फेडितां द्रौपदीसी । पावलासी लगबगें ॥ ४५ ॥ धांव पांव दयाळा झडकरी । भस्मोद्धूलन शिव त्रिशूलधारी । दीनअनाथांचा तूं कैवारी । तारीं त्रिपुरारी स्मरांतका ॥ ४६ ॥ धांव धांव हे कर्पूरगौर । रोगें पीडिलों

द्वादशवत्सर । भक्ताभिमानी भुजगेंद्रहार । धांव सत्वरें शंकरा ॥ ४७ ॥ इकडे हरिद्वारीं विप्रसदनीं । भोजनासी बैसले नृसिंहमुनि । दीनदुःखार्तवचनें मनीं । अंतर्साक्षित्वें जाणिलीं ॥ ४८ ॥ मग तत्काल दीनदयाळ । कळवळोनि उठले उतावीळ । टाकूनि अन्नपूरितपात्रजळ । मनोवेगें पातले ॥ ४९ ॥ ब्राह्मणभोजनीं समुदाय । म्हणती न कळे झालें काय । अकस्मात् श्रीगुरुदत्तात्रेय । कोठें गेले कैसें हे ॥ ५० ॥ भोजन करूनि त्वरें ब्राह्मण । नृसिंहमुनीश्वर जगत्प्राण । चोहोंकडे शोधिती जाण । ब्रह्मांडत्राणालागीं ते ॥ ५१ ॥ देहीं असतां जरी न सांपडे । बाह्य कैंचा तरी दृष्टीस पडे । भ्रमें कष्टती जन बापुडे । देवाधिदेवाकारणें ॥ ५२ ॥ ब्रह्मविद्याभ्यासें बरवें । निजहृदयस्थासी ओळखावें । मग अंतर्बाह्य अवलोकावें । सर्वत्र समान ब्रह्मात्मतत्त्व ॥ ५३ ॥ जप तप नियम अनुष्ठान । करितां गुंतले संशयापन्न । ईश्वरप्राप्ति आत्मज्ञानावांचून । न होय सर्वथा श्रुति वदे ॥ ५४ ॥ घडलें जरी गंगा-सागरस्नान । व्रतपरिपालन अथवा दान । ज्ञानविहीनासी सर्वमतेंकरून । अनेक जन्मीं मुक्ति नव्हे ॥ ५५ ॥ झालिया परमेश्वर-गुरुकृपा । मोक्षमार्ग होतसे सोपा । अविद्यातमसंसारसंतापा-। पासून होती निर्मुक्त ॥ ५६ ॥ परी त्यागूनि विषयासक्ति । ईश्वरगुरुचरणीं अनन्यभक्ति । अखंडित पाहिजे ज्ञानशक्ति । पूर्णविरक्तिसहित ते ॥ ५७ ॥ असो ते शुचिर्भूत विप्र । मुनिसंनिध पातले क्षिप्र । भावें वंदिले नृसिंहवप्र । पुढें काय वर्तलें ॥ ५८ ॥ पाहूनि भयंकर महारोग्यांसी । नृसिंहमुनिवरें कृपाकटाक्षेंसीं । अंघ्रिकमलें द्विजशरीरांसी । स्पर्श केला त्या कालीं ॥ ५९ ॥ श्रीमद्गुरु नृसिंहयोगाधीश । पूर्णब्रह्मव्यापकअविनाश । त्या महत्पुरुषाचा पादस्पर्श । द्विजशरीरांस जाहला ॥ ६० ॥ अनेक जन्मीं तप अत्युग्र । अष्टांगयोगें चित्तैकाग्र । भगवत्प्राप्त्यर्थ करिती समग्र । परी जो दुर्लभ असेचि ॥ ६१ ॥ नानाव्रतांचें आचरण । कृच्छ्रचांद्रायणादि उपोषण । भगवत्कीर्तन नामस्मरण । करिती जागरण श्रद्धेनें ॥ ६२ ॥ तथापि भगवच्चरण निर्मल । विध्वंसक-भवसंसारजाल । सुदुर्लभ दर्शन भाग्यशील । कश्चित्

पुरुषासी होतसे ॥ ६३ ॥ ऐसे खल अधर्मी जेठी । परंतु पूर्वसुकृत होतें गांठीं । म्हणूनि नृसिंहयोगीश्वरभेटी । कृपादृष्टि
जाहली ॥ ६४ ॥ उत्तमक्षेत्र हरिद्वारीं । श्रीगंगेच्या कांठीं घाटावरी । मल्ल दोघे पडलेले दुःखसागरीं । रोगें व्याकुल झालेले
॥ ६५ ॥ साधु ब्रह्मचारी संन्यासी । गृहस्थ वैदिक द्विजवर्य तापसी । घाटावरी संध्यादि-वंदनासी । बैसले सुखें इतर जन
॥ ६६ ॥ वाळवंटामधीं कित्येक । गोष्टी सांगती मनोरंजक । सुंदर मनोहर मंदिरें अनेक । शोभती लोक गंगातीरीं ॥ ६७ ॥
गंगोदकाचें पात्र विशाल । पलीकडे पर्वत जंगल । बदरीकेदार मार्ग धवल । शोभे हिमाचलसंबंध ॥ ६८ ॥ श्रीगंगामूर्ति
गंगाद्वारस्थान । पहातांचि वाटे समाधान । पवित्र होय सहज मन । क्षेत्रमहिमा अपार ॥ ६९ ॥ शुद्धोदकें वाहतसे गंगा ।
अत्यंत रमणीय शोभे तुंगा । दर्शनें स्नानें पानें निजरंगा । मेळवी अभंगा स्मरणें ती ॥ ७० ॥ आधींच पवित्र गंगातीर ।
त्यांत विराजे श्रीहरिद्वार । निश्चयें प्राप्त होय परमेश्वर । जगदाधार अवतारी ॥ ७१ ॥ ते नृसिंहनारायण । पाप संकटादि
विदारण । दीनबंधु न लागतां एकक्षण । करिती संरक्षण सर्वांचें ॥ ७२ ॥ तेथें दिवसां चतुर्थयामीं । चमत्कार
दाविती सर्वांतर्यामी । श्रीमदवधूत नृसिंहस्वामी । लीला अद्भुत जयांची ॥ ७३ ॥ महारोग्यांचे देहास त्या स्थलीं । पादस्पर्श
होतांचि तत्कालीं । सुवर्णशुद्ध दिव्यकांति झाली । निमिषार्धांत श्रोते हो ॥ ७४ ॥ खडबडून दोघे मल्ल उठले ।
समर्थांसी लोटांगण घातलें । श्रीगुरुचरणीं मस्तक ठेविलें । प्रेम दाटलें अनिवार ॥ ७५ ॥ देहास न्याहाळून ते पाहती ।
आरोग्य तेजस्वी सर्वांगकांति । मग आनंद मावेना चित्तीं । नाचती उडती सप्रेमें ॥ ७६ ॥ समस्तांसी वाटलें कुतूहल ।
अमानुषिक कर्तृत्व विशाल । म्हणती ईश्वरेच्छें हलाहल । अमृत होय सर्वथा ॥ ७७ ॥ द्वादशवर्षांचे रोगपीडित । करीत होते
प्राणघात । सर्वांग आरोग्य निमिषांत । केलें पुनीत आपण ॥ ७८ ॥ प्रत्यक्ष परमेश्वर आपण । अनादि अखंड नारायण । करावया
जगदुद्धरण । होतां अवतीर्ण दयानिधि ॥ ७९ ॥ मायाअज्ञानें वेष्टिलों । जन्मोजन्मीं प्रपंचीं कष्टलों । आम्ही अभिमानी उन्मत्त

श्रेष्टलों । देखतां संतुष्टलों मुनीश्वरा ॥ ८० ॥ त्यांत एक विप्र कुटिल । समर्थांसी पुसे गर्वशील । आपण कोण सांगा कोठील । वर्णाश्रमही कथावा ॥ ८१ ॥ नृसिंह वदती कुटिलासी । आधीं सांगूं तुझ्या वृत्तासी । मग कळेल अन्य प्रश्नासी । देऊं उत्तर सावकाश ॥ ८२ ॥ तूं पूर्वींचा हिंसक व्याध । पुष्कळ केले जीववध । मद्यपी अभक्ष्यभक्षक मदांध । हस्तनापुरीं होतासी ॥ ८३ ॥ अपहारिलें परदारधन । तुज घडलें मातृगमन । तैसेंचि राजकन्येचें प्राणहनन । केलेंसि त्वां पापिष्ठें ॥ ८४ ॥ न्यायी सत्यविचारी चतुर । यवनराजे स्वधर्म तत्पर । त्यांनीं तुजला देशपार । केलें जर्जर दुष्टा रे ॥ ८५ ॥ दूर परदेशीं त्वां जाऊन । तेथेंही निंद्यकर्म गहन । केलेंसि तेणें नासिकछेदन । नेत्र राजदूतें फोडिलें ॥ ८६ ॥ मग राहिलास चर्मकाचे घरीं । तुज पोशिती सद्विचारी । तेथेंही निंद्यकर्म भारी । त्वां केलेंसि निर्लज्जा ॥ ८७ ॥ तेथें तुज पशूंनीं भक्षिलें । त्यांचेहि उदरीं रोग उद्‌ेले । तिर्यग्योनींत जन्म झाले । तुझे दोन हिंसका ॥ ८८ ॥ आधींच मनीं पुष्कळ हौस । त्यांत पातला फाल्गुनमास । पशु मारूनि व्याघ्रें उपवास । पारणें सोडिलें तद्वत् ॥ ८९ ॥ होता पूर्वजन्मार्जित । सुकृतसंस्कार किंचित । तेणें आतां द्विजकुलांत । पावलासि जन्म तूं ॥ ९० ॥ पूर्वस्वभावें विनापराध । काल रात्रीं केलासि गोवध । अतिपातकी दुर्बुद्ध । मुखदुर्गंधि विचारिसी ॥ ९१ ॥ हें ऐकूनि कुटिल भ्याला । थरथरां कापूं लागला । म्हणे अंतर्साक्षी सत्य वदलां । प्रत्यक्ष ईश्वर आपण ॥ ९२ ॥ मजसारिखा महापातकी । खचित नसेल या त्रयलोकीं । आपण साक्षात् भेटले पिनाकी । आतां सद्गुरु तारावें ॥ ९३ ॥ मी अनिवार दुःख भोगिलें । प्रायश्चित्त पुष्कळ आचरिलें । परंतु बुद्धीस स्थिरत्व न आलें । अद्यापवरी प्रभुराया ॥ ९४ ॥ मग समर्थ आज्ञापिती जनांला । मृतगौस्थानासी त्वरें चला । तात्काल त्या द्विजसदनाला । गुरुसह सर्व पातले ॥ ९५ ॥ कुटिल द्विजाच्या गृहामागें । नृसिंह मुनीश्वर जाऊनि अंगें । मृतधेनूचें शव दाविती वेगें । समस्तांकारणें तेधवां ॥ ९६ ॥ सगळे करिती हाहाःकार । म्हणती गौवधाचे दोष अपार । द्विज नव्हे हा अंत्यज निष्ठुर । चांडाल

* * *

क्रूरहृदयाचा ॥ ९७ ॥ परम सात्त्विक पूज्य धेनु साचार । तिजवरी दुर्जनें शस्त्रप्रहार । करूनि जोडिलें पाप अघोर ।
धर्मशास्त्रातें लंघुनी ॥ ९८ ॥ विप्रवंशास लाविला कलंक । मातंगहृदयी निर्दय कंटक । वेदशास्त्रविहित धर्मोच्छेदक ।
नीच हिंसक अविचारी ॥ ९९ ॥ देखूनि गौमातेचें मृतकलेवर । शोकाकुल झाले नारीनर । मुखें वदती शिवहरहर ।
कलियुग घोर मातलें ॥ १०० ॥ ब्राह्मण भ्रष्ट कुमार्गरत । मद्यमांसनिंद्यकर्मनिरत । अभक्ष्यभक्षक स्वक्रियातीत । झाले
पतित उदरार्थीं ॥ १ ॥ कृत-त्रेता-द्वापारयुगीं । सद्धर्मकर्मज्ञाननिष्ठयोगी । वेदशास्त्रसंपन्न वीतरागी । ब्राह्मण बहुत
जाहले ॥ २ ॥ महर्षि सुकवि उग्रतपी । सामर्थ्यवंत शापादपि शरादपि । वेदवेदांगपारग पुण्यप्रतापी । झाले अद्यापि
विप्रवर्य ॥ ३ ॥ ब्रह्मविद्ब्रह्मरूप ब्राह्मण । अनादि वेदोक्तधर्मपरायण । मंत्रसामर्थ्यें अखिल देवगण । उभे ठाकती
विप्रांपुढें ॥ ४ ॥ ज्यांना प्रत्यक्ष परमेश्वर । साह्य सुप्रसन्न निरंतर । अखंडानुभवी ब्रह्मसाक्षात्कार । शौर्योदार तेजस्वी
॥ ५ ॥ सुरवर दानव सकाळिक । श्रीमंत न्यायी प्रजापालक । ब्राह्मणसेवनीं भूपादिक । त्रिकालीं तत्पर प्रेमभावें ॥ ६ ॥
अनिल-जल-पर्ण-फलाशन । करिती संतत ईश्वरोपासन । ऋषि मुनि योगी ब्राह्मणजन । पूजनीय सदोदित ॥ ७ ॥
दया क्षमा शांति अविरोधी । परोपकारी वृत्तिनिरोधी । निष्काम निःस्पृहजन प्रबोधी । झाले कोट्यावधि विप्र ॥ ८ ॥
वेदांचे प्रमुख अधिकारी । शुद्ध गायत्रीचे संस्कारी । ब्राह्मण पवित्र सदाचारी । ब्रह्मविद्या-विनयसंपन्न ते ॥ ९ ॥ ऐसे
वेदवेदांगार्थसंपन्न । त्रैलोक्यपूजित ब्राह्मणजन । तद्वंशज कलियुगीं स्वधर्मक्रियाहीन । असमर्थ जाहले ॥ ११० ॥
जे सत्त्वगुणविशिष्ट अक्रोध । ते अनुचित कर्म करिती गोवध । याप्रकारें व्हावया उद्बोध । बोलती सावध धर्मखेदें ॥ ११ ॥
हें परिसून कुटिलद्विज । विस्मित जाहला निर्लज्ज । म्हणे जगज्जनका अधोक्षज । उद्धरावें पतितासी ॥ १२ ॥ पतित-
पावन कल्मषहरणा । वटपत्रशयनी नारायणा । सूत्रात्मा संपूर्ण विद्यानिपुणा । जगत्कारणा सुराध्यक्षा ॥ १३ ॥ तव नामें

अजामिल गणिका । पावन केलें पशुपक्ष्यादिकां । प्रत्यक्ष मज भेटलासि द्वारका-। नाथा अभयप्रद ॥ १४ ॥ जळालें कलिकल्मष
सबीज ! देखिले श्रीगुरु राजाधिराज । नृसिंहस्वामीसमर्थ सहज । कृतार्थ आज जाहलों ॥ १५ ॥ समर्थ वदती
कुटिलद्विजासी । पश्चात्तापें शुद्ध झालासी । तरी उठवावें मृतधेनूसी । सत्यत्व सर्वांसी वाटेल ॥ १६ ॥ कुटिल
म्हणे मी शरण अनन्य । आपण करुणार्णव धन्य । श्रीसद्गुरुआज्ञा शिरसां मान्य । वचन प्रमाण होईल ॥ १७ ॥
मी सेवक दीन दुर्बल । आज्ञा प्रमाणचि केवल । नृसिंहचरणाचें तीर्थ निर्मल । विप्रें घेतलें सुपात्रीं ॥ १८ ॥
अकालमृत्युहरण । सर्वव्याधिविनाशन । शरीरशुद्धि धर्मसाधन । मोक्षदायक गुरुतीर्थ ॥ १९ ॥ गुरुदेवतीर्थमहिमा
अपार । नेणती ब्रह्मादिक सुरवर । ऐसें बोलूनि मृतधेनूवर । विप्रें तीर्थ प्रोक्षिलें ॥ १२० ॥ सिंचन
करितां पादोदक । गुरुलीलें वर्तलें अलौकिक । दोन दिवसांची मृतधेनु देख । थरथरूनि उठली ते ॥ २१ ॥
जैसें निद्रा संपतां होय जागृति । तैसेंचि जाहलें धेनूप्रति । ईश्वरलीला गहन गति । अगम्य अतर्क्य सर्वत्र ॥ २२ ॥
ईश्वरेच्छा बलवान् वैभव । निमिषांत केली धेनु सजीव । तटस्थ पाहती लोक सर्व । महदाश्चर्य वर्तलें ॥ २३ ॥
अत्यंत पातकी द्विजकुटिल । त्याचेच हस्तें प्रोक्षवूनि तीर्थजल । दोन दिवसांचें मृतशव निर्बल । तात्काल उठविती
सद्गुरु ॥ २४ ॥ अनुचित कर्मिष्ठ महद्दोषी । क्षणांत केला द्विज निर्दोषी । परमात्माचि संन्यासवेषी । श्रीमत्परमहंस
प्रगटले ॥ २५ ॥ कृपामृतदृष्टीनें पाहतां । महारोग्यांसी आरोग्य झालें तत्त्वतां । अतिपापिष्टासि उद्धरिलें,
आतां । मृतधेनूसी उठविलें ॥ २६ ॥ हेचि परब्रह्मपरात्पर । करावयासी जगदुद्धार । अवतरले नृसिंहयोगीश्वर ।
स्वेच्छाचारें वर्तती ॥ २७ ॥ अविद्याअज्ञानांधःकार-। युक्त प्रपंचिक नारीनर । पावन करावे यदर्थ महीवर ।
स्वच्छंदें यतिवर संचरती ॥ २८ ॥ अविद्याअज्ञान-वेष्टितांसी । दिसती गुरु मनुष्यविलासी । परी हे सर्वथैव

भ्रांतिष्ठासी । कैसें कळे सत्यतत्त्व ॥ २९ ॥ मनुष्यासारिखे व्यवहार । स्थूलदृष्टीनें वरवर । काय जाणती जीवपामर ।
ईश्वरचरित्र अगाध ॥ १३० ॥ ओळखीवांचून सर्व वृथा । पुराण कीर्तन व्याख्यानकथा । पक्वानांचीं नामें
घेतां सर्वथा । उदरतृप्ति नव्हेचि ॥ ३१ ॥ कुटिलद्विजाची परिवार । स्त्री कन्या भगिनी पुत्र । करिती साष्टांग
नमस्कार । यतिनाथचरणीं सद्भावें ॥ ३२ ॥ म्हणती धन्य भाग्योदय । न सांपडे करितां अनेकसाधनोपाय ।
सुदुर्लभ ते सद्गुरुपाय । सहज निर्भय देखिले ॥ ३३ ॥ कामधेनु आली घरीं । अनायासें कल्पद्रुम द्वारीं । चिंतामणि
आलिया करीं । मग काय उणें असे हो ॥ ३४ ॥ याहून फल अधिकाधिक । आळशावरी वर्षलें गंगोदक ।
श्रीगुरु अखिलब्रह्मांडनायक । देखतां हर्षित जाहलों ॥ ३५ ॥ सर्व पदार्थ मिथ्या नाशिवंत । आम्ही दरिद्री
वित्तरहित । काय समर्पावें प्रभूसी अनंत । अखंड-अव्ययाकारणें ॥ ३६ ॥ लक्ष्मी ज्याचिया पायीं लोळे ।
पुष्प तरी चरणकमळें । चरणापासून गंगोदक निघालें । काय वहावें देवराया ॥ ३७ ॥ तथापि भक्तिप्रेमभरित ।
यथाशक्ति जें जें विहित । सानुकूल होऊनि शुद्धचित्त । करूं पूजन अत्यादरें ॥ ३८ ॥ यथाविधि पादप्रक्षालन ।
गंधाक्षतपुष्पादिकीं केलें पूजन । नैवेद्य फल तांबूल अल्पधन । वस्त्रालंकार समर्पिलें ॥ ३९ ॥ नीरांजन-कर्पूरारति ।
भक्त भावार्थें ओवाळिती । नामसंकीर्तनें यश गाती । जयजयकार करिती आनंदें ॥ १४० ॥ मंत्रपुष्पांजलि उच्चस्वरें ।
वेदघोष करिती आदरें । प्रदक्षिणा घालिती सारे । साष्टांग नमिती जगद्वंद्या ॥ ४१ ॥ त्या कुटिलब्राह्मणाचे सदनीं ।
परमानंद व्यापिला त्रिभुवनीं । एक प्रहर गेली रजनी । नृसिंहमुनीश्वरलीलेंत ॥ ४२ ॥ हरि प्रकट असे हरिद्वारीं । परब्रह्म
नाचे भक्तकैवारी । पूर्व प्रश्नोत्तर नरहरि । स्वयें सांगती समस्तांतें ॥ ४३ ॥ श्रोतीं सावधान असावें । श्रीगुरुमुखसुवृत्त
परिसावें । जेणें यथेप्सित सफल व्हावें । गुरुप्रसादें निःसंशय ॥ ४४ ॥ “आम्ही यजुर्वेदी ब्राह्मण । आमचें नाम ‘नृसिंहभान’।

* * *

मूळपुरुष वटवृक्षस्थान । दत्तनगर-निवासी हो" ॥ ४५ ॥ हें ऐकूनि वदे एक द्विज । मंत्र म्हणा हो योगीराज । मग नृसिंहविश्वेश्वर सहज । पठण करूं लागले ॥ ४६ ॥ चतुर्वेद वेदांगसहित । सार्थ पठती यथास्थित । पाहिजे तें मंत्रविधान विहित । सांगती शांत सकळांतें ॥ ४७ ॥ मनांतील विकल्प शंका- । निवृत्ति करिती तात्काल देखा । अद्भुत आश्चर्य समाधान लोकां । वाटलें सामर्थ्य अतुल ॥ ४८ ॥ अनन्यभावें धरिती चरण । म्हणती आलों आम्ही शरण । अपराध क्षमा करा संपूर्ण । प्रत्यक्ष ब्रह्मसनातना ॥ ४९ ॥ अज्ञान-अहंकारें भरलों । अविद्यामायें मातलों । प्रत्यक्ष ईश्वर असूनि भुललों । मदांध झालों गुरुराजा ॥ १५० ॥ समर्थ वदती अमृतवचन । सुखरूप असा पुष्कळ दिन । स्ववर्णाश्रमधर्मैं वर्तन । ईश्वरोपासन करावें ॥ ५१ ॥ भूतदया मृदुभाषण । वंदावे देव साधु ब्राह्मण । सारासारविवेक प्रमाण । हृदयस्थ जनार्दना ओळखावें ॥ ५२ ॥ यापरी आशीर्वचन देउनी । निघून गेले नृसिंहमुनि । मग लोक गेले निजस्थानीं । अपार चरित्र वर्णिती ॥ ५३ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदशास्त्रपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । अष्टमाध्याय रसिक हा ॥ १५४ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे अष्टमोऽध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुदेवदत्त-स्वामीसमर्थ ॥

# ॥ अध्याय नववा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ ॥ गुरु म्हणती सच्छिष्यासी । शुभचित्तसावधानेंसीं । श्रीमन्नृसिंहसत्कीर्तीसी । श्रवण करीं बा सर्वदा ॥ १ ॥ प्रख्यात नारायणसरोवर । श्रीकृष्णत्रिविक्रम-क्षेत्र । कच्छ-देशीं द्वारकेहूनि दूर । मनोहर विराजे ॥ २ ॥ कृष्णत्रिविक्रमाचें मंदिर । शोभायमान असे सुंदर । तीर्थ वापी उदक शुभ्र । त्रिविक्रमासंनिध असे तें ॥ ३ ॥ ग्राम लहान परी शोभिवंत । तेथें यात्रेसी प्रेमयुक्त । द्वारकेहूनि लोक समस्त । जलपादमार्गें जाताति ॥ ४ ॥ त्या नारायणसरोवर ग्रामीं । सहज गेले नृसिंहस्वामी । लोकानुग्रही स्मरणगामी । सेवकासहित मंदिरीं ॥ ५ ॥ त्या मंदिराचे स्थानाधिपति । एक साधु महाराज असती । वापींत स्नान जे जे करिती । दक्षिणा देती ते महंतासी ॥ ६ ॥ ते स्थानाधिपति अभिमानी । दक्षिणादिक घेतल्यावांचूनी । वापीस्नान जनालागूनी । करूं न देती धनावीण ॥ ७ ॥ त्या महंताचे शिष्य चार जण । वापींत करूं न देती प्रवेशन । म्हणती यात्रेसी धनविहीन । कां येतां हो दरिद्री ॥ ८ ॥ द्रव्य नसतां तुमचे गांठीं । कां हिंडतां हो तीर्थकांठीं । येथें आमची वृत्ति मोठी । तीर्थकरदंड घेतसों ॥ ९ ॥ ऐसे कामलोभी उदंड । बोलती तीर्थक्षेत्रस्थ गुंड । नृसिंहमुनीश्वर वितंडबंड । पाहूनि हांसती गद्गदा ॥ १० ॥ मग नृसिंहयतिवर्य सेवकांसहित । उड्डाण करूनि गगनांत । उतरले वापींत अकस्मात् । करिती स्नान निर्भयें ॥ ११ ॥ योगसामर्थ्य पाहूनि अपूर्व । भयभीत झाले मग सर्व । वापींत उतरूनि हतगर्व । नमन करिती दुरूनी ॥ १२ ॥ उदकावरी नृसिंहमुनि । निराधार बैसले सिद्धासनीं । चार पुरुष इतुकें पाणी । भरलें होतें वापींत

॥ १३ ॥ उदकावरी वितस्तिप्रमाण । आसनीं स्थित उमारमण । अहोरात्र अन्नोदकावीण । स्वानंदीं निमग्न होते ते
॥ १४ ॥ शिष्यांसहित वृद्धसाधु । म्हणती समर्थासी दीनबंधु । क्षमा असावी करुणासिंधु । महदपराधी आम्हांसी ॥ १५ ॥
जन्म गेला धनलोभांत । बहुत मिळतां नव्हे तृप्त । मैंद, नोळखिले भगवंत । संत महंत विद्वज्जन ॥ १६ ॥ जैसे स्मशानांतील
गृध्र काक । पिंडादि भक्षिती श्वानादिक । तीर्थक्षेत्रस्थ आम्ही लोक । लोभी निर्लज्ज संस्थानीं ॥ १७ ॥ मार्गीं
तस्कर सर्वस्व लुटिती । सोडिती मारिती जीव घेती । त्यापरीच आम्रुची वृत्ति । मोठे दुर्मति आम्ही असों ॥ १८ ॥
तस्करांहूनि गुंड अधिक । उघडपणें वित्तापहारक । बाह्यरंग निर्लोभ दांभिक । संभावितपणें वर्ततों ॥ १९ ॥ टिळेमाळादि
वेषधारी । नाममात्र साधु ब्रह्मचारी । म्हणवितों तथापि दुराचारी । कपटी पापी लोभिष्ट ॥ २० ॥ देवासंनिध आम्ही
असतों । नित्य देवाची सेवा करितों । परी निशिदिनीं धन अपहारितों । भय न मानितों ठाकुरजीचें ॥ २१ ॥ धनलोभें
सेवेसी दुर्लक्ष । दुष्कर्म आचरितों देवासमक्ष । मोठे श्रीमंत धनिकांचे पक्ष । धरितों द्रव्यार्थ सतत ॥ २२ ॥ जैसे
गौस्तनींचे गोचिड । नसे तयांसी दुधाची चाड । रक्त प्राशूनि पुष्ट जाड । होती द्वाड पीडक ॥ २३ ॥ गौवत्स करित
दुग्ध स्तनपान । तेणें दुग्धलाभ घेती जन । परी गोचिड माजले रक्त प्राशून । निर्दय पीडिती स्तनांसी ॥ २४ ॥
गोचिडांचें उदरभरण । गौस्तनींच होतसे जाण । ऐसें असतांही विनाकारण । सात्त्विक धेनूसी पीडिती ॥ २५ ॥ ज्याचें
जन्मभरी खावें प्यावें । त्याचेंचि समूळ छेदावें । दुष्ट दुर्बुद्धि खल स्वभावें । अति कृतघ्न असती ते ॥ २६ ॥ ज्यांनीं पाळिलें
सदोदित । त्यांच्याचि नाशास होती प्रवृत्त । नोळखिती स्वकीय आप्त । खल उन्मत्त धनलोभी ॥ २७ ॥ आम्ही छलक
गोचिडासमान । नित्य करितों हरिसेवन । सकामनिक अशुद्ध मन । दुर्वर्तन आमचें ॥ २८ ॥ आपणासारिखे योगाधीश्वर ।
निंदुनी केला तिरस्कार । ताडिलें वाग्बाणें निष्ठुर । आम्ही पामर अन्यायी ॥ २९ ॥ आमचा सच्छिष्य विचारी । राधाकृष्ण

ब्रह्मचारी । ज्याचा विश्वास मंदिरीं भारी । तोही श्रमें व्यापिला ॥ ३० ॥ आमची ‘साठी बुद्धि नाठी’ । हातीं घेऊनियां काठी । श्वानवत् गुर्गुरूनि पाठीं । वसवसां लागतों लोकांचे ॥ ३१ ॥ आमचे गुरु विशुद्धानंद । तेचि आपण दिसतां निर्विवाद । बहुतकाल दर्शनार्थ खेद । वाटतां गोविंद प्रगटलां ॥ ३२ ॥ पुत्रापराधांचा खेद । माता कदां न मानी निर्विवाद । त्याहूनि श्रेष्ठ आपण करुणाकंद । ब्रह्मानंद सद्गुरु ॥ ३३ ॥ आतां मंदिरांत चलावें । अपराध सर्व क्षमा करावे । दीनजनोद्धारका उठावें । पतितपावना नरसिंहा ॥ ३४ ॥ मग राधाकृष्ण ब्रह्मचारी । उतरला तीर्थोदकाभ्यंतरीं । साष्टांग नमनें पाय धरी । उठावें म्हणे विश्वेश्वरा ॥ ३५ ॥ नरसिंह परमात्मा दयाळ । पाहूनि अंतःकरण विमल । उदकावरूनि चालत तात्काल । आले मंदिरीं सकलांसह ॥ ३६ ॥ अनन्यभावें उत्तमासनीं । बैसविले श्रीनृसिंहमुनि । पुष्पहार सुगंध चंदनीं । नीरांजनीं पूजिले ॥ ३७ ॥ करिती देवाची आरती । चक्रपाणी ओंवाळिती । पंचपदी भजन सुस्वरें गाती । नाचती समताल तेधवां ॥ ३८ ॥ मधुर वाद्यें वीणा मृदंग । झर्झरी झंझन वाजती चंग । एकत्वें व्यापिला निजरंग । सत्संगमहिमा अगाध ॥ ३९ ॥ भजन आटोपल्यानंतर । स्वल्प झाला फलाहार । मग निद्रिस्त होती सर्वत्र । आनंदरूपीं मिळाले ॥ ४० ॥ प्रभातकालीं सगळे उठून । करिती शौचमुखमार्जन । भगवच्चर्चा नामस्मरण । स्नानादि कर्म अटोपिती ॥ ४१ ॥ देवासी समर्पूनि नैवेद्य । लेह पेय चोष्य खाद्य । नृसिंहमूर्ति जगद्वंद्य । भोजनीं बैसले समंडळ ॥ ४२ ॥ त्यांमधीं एक अरण्यपंडित । पढतमूर्ख मनीं जल्पत । आकाशमार्गें उडोनि वापींत । कोणत्या साधनें पातले ॥ ४३ ॥ जलावरी वितस्ति प्रमाण । कवण योगें साधिलें आसन । पाण्यावरूनि चालणें कठिण । विलक्षण हें वाटतसे ॥ ४४ ॥ हें गारुड अथवा इंद्रजाल । किंवा मणि-मंत्रौषधि केवल । यंत्रतंत्राचें भांडवल । कसें काय तें कळेना ॥ ४५ ॥ नेत्रीं अंजन मुखीं गुटिका । औषधीमर्दित पादुका । कोणतें त्रोटक केलें चेटका । किंवा मायिक असेल हें ॥ ४६ ॥ वेदविहित कर्मानुष्ठान । कीं दशमहा-

* * *

विद्योपासन । किंवा त्रिलोह मुद्रिका वेष्टून । उड्डाणासन केलें हो ॥ ४७॥ महामंत्र-पुरश्चरण । अथवा आकर्षिला वायु प्राण ।
देवताबीज-मंत्रोच्चारण । साध्य असेल कीं काय ॥ ४८ ॥ शालिग्राम बाण वदनीं । सप्तशती सार्थ पढूनी । सिद्ध झाले
होमहवनीं । कर्णीं ठेवुनी कीलक ॥ ४९ ॥ गुप्त विमान जवळी अथवा । पूर्वपुण्य उग्र तपाचा ठेवा । उच्छिष्ट चांडाळी
गणेश देवा । चंडी भैरवां आराधिलें ॥ ५० ॥ वशीकरण आणि मोहन । साधिलें असेल दृष्टिबंधन । कालज्ञान उच्चाटन
स्तंभन । यक्षिणीसाधन असेल कीं ॥ ५१ ॥ जयकरण वाजीकरण । वटिका-औषधी-भक्षण । भूत प्रेत ग्रह पिशाच्चरक्षण ।
वैतालकर्ण इत्यादि ॥ ५२ ॥ किंवा विजयादिक कल्प । अतिवाहिक सत्संकल्प । शाबरी बीरमंत्र कल्प । घृतें तैलें
पाकादि ॥ ५३ ॥ तिथि वार नक्षत्र करण योग । ग्रह गणित फलित पंचांग । किंवा वेदमंत्र गायत्री-सिद्धांग । प्राप्त अव्यंग
असेल ॥ ५४ ॥ किंवा तत्त्वज्ञान स्वरोदय । इडा पिंगला सुषुम्णा त्रय । ब्रह्मा विष्णु रुद्र देवता काय । साधिल्या स्वसामर्थ्यें
॥ ५५ ॥ छायापुरुषाचा अभ्यास । षण्मुद्रादिकांचा ध्यास । किंवा एकासनीं स्थितवास । अनायासें लाभला ॥ ५६ ॥
अथवा श्रीहट गोल्हाट । नीलबिंदु औटपीठ । जाणिलें असेल त्रिकूट । दशमद्वारीं गुरूसी ॥ ५७ ॥ अथवा
प्राणायाम सम्यक् । रेचक पूरक कुंभक । नित्योपलब्ध कुंभक देख । सगर्भ साध्य जाहला ॥ ५८ ॥ मूलबंध उड्डाणबंध ।
तिसरा तो जालंदरबंध । देवतासह अप्रतिबंध । सिद्ध असेल प्राणायाम ॥ ५९ ॥ चतुराशीति अष्टांग । संसिद्ध
असेल लंबिकायोग । चित्तवृत्ति निरोधअंग । राजयोग साद्यंत ॥ ६० ॥ षट्चक्र देवता हंसरूप । प्रश्वासनिःश्वासात्म अजपाजप । एकवीसहजार सहाशें माप । जपिला असेल गुरुमार्गें ॥ ६१ ॥ किंवा जीवब्रह्मैक्य-अभेद । स्वात्मानुभविला
सच्चिदानंद । लोकानुग्रहकाम्यार्थ स्वच्छंद । शक्तिपात केलासे ॥ ६२ ॥ ऐसे विप्रमनींचे संशय । निवृत्त व्हावया
सर्वसंशय । अंतःसाक्षी श्रीदत्तात्रेय । जाणिती हृदय विप्राचें ॥ ६३ ॥ भोजनांतीं नृसिंहयोगी । वदती संशयी विप्रालागीं ।

कोणतीं साधनें उपयोगी । आम्हाजोगीं असती रे ॥ ६४ ॥ तुझें घोटाळलें अंतःकरण । कळेना आमुचें निराकरण ।
त्वरें करावें पृथक्करण । उदाहरण मांडावें ॥ ६५ ॥ अवघ्या लघु दीर्घ शंका । त्यांत भरला दगा धोका । समजून सांग रे
पुराणिका । शास्त्रीबुवा आम्हांसी ॥ ६६ ॥ तूं जाणसी न्याय व्याकरण । आम्ही करितों भिक्षाटन । सिद्ध साध्य
साधकपण । काय निराकरण जाहलें ॥ ६७ ॥ विकल्प संशयी अरण्यपंडित । ऐकूनि जाहला गर्भगळित । म्हणे हें
अंतःसाक्षी महद्भूत । निःसंशय काय कीं ॥ ६८ ॥ सर्वसाक्षी द्रष्टा सर्वज्ञ । वेदवेदांगार्थविदुःप्राज्ञ । परमार्थस्वरूप अभिज्ञ ।
यज्ञस्वरूप एक विष्णु ॥ ६९ ॥ माझे मनांतील शंकासमुदाय । जाणते पुरुष महाशय । सर्वशक्ति सकलमत तात्पर्य ।
विश्ववर्य विज्ञानी हो ॥ ७० ॥ निर्गुण निर्विकल्प निरंजन । या महापुरुषाविषयीं कल्पना जाण । अज्ञानमदांध वाग्जल्पन ।
करणें सर्वथैव अयोग्य ॥ ७१ ॥ अत्यंत पवित्र पुण्यपुरुष । अविद्या-मायातीत निर्दोष । परब्रह्म अद्वितीय निर्विशेष ।
साक्षात् निश्चयें असती हें ॥ ७२ ॥ अविद्या-अज्ञान-भ्रमित । आम्ही अहंकारी मदोन्मत्त । आंधळे झालों विषयासक्त ।
नोळखिले अनंत जगद्गुरु ॥ ७३ ॥ जे पूर्णपरमात्मावतार । सर्वशक्तिमान् अखंड दयासागर । त्यांसी दोष लावणें
याहूनि भयंकर । अघोर पातक कोणतें ॥ ७४ ॥ म्हणून महापुरुषाविषयीं । कोणत्या प्रकारें कोणत्याही समयीं । सर्वथा
दोषदृष्टि दुःखमयी । सहसाही नसावी ॥ ७५ ॥ सेवा करणें राहिलें बाजूस । वृथा निंदा चेष्टा उपहास । सहज वाटे
परी दुःखास । सर्वपरी कारण असे ॥ ७६ ॥ भोजनसमयीं दुर्विचारी । बुडालों होतों विकल्पसागरीं । सहज गुरुदर्शन
क्षणभरी । होतांचि विकार निमाले ॥ ७७ ॥ मी कुचेष्टित असतां खळ । भोजनीं संस्कार प्राप्तकाळ । महद्दर्शनें संशय-विटाळ ।
फिटले क्षण न लागतां ॥ ७८ ॥ स्वामीसमर्थ योगींद्रें आज । अपराधी असतां मी द्विज । तथापि आपणासारिखें
मज । करूनि निजगुज दाविलें ॥ ७९ ॥ म्हणे परमपुरुषा योगींद्रा । भक्तवत्सला दयासमुद्रा । विधिनारायणा महारुद्रा ।

भवदरिद्रांतक अससी तूं ॥ ८० ॥ धन्य धन्य सामर्थ्य विशाल। सोडविशी भवबंध जाल। तूं अव्यय कालाचाही काल। लीलाविग्रही शोभसी ॥ ८१ ॥ बहुत देवही नवसले। तथापि ते न गवसले। अंतर्यामीं ब्रह्मतत्त्व वसलें। तेंचि दिसलें स्पष्ट मज ॥ ८२ ॥ अनेकवार लोटांगणा। शुद्धभावें घालित प्रदक्षिणा। म्हणे नृसिंहावतार नारायणा। कृतकृत्य झालों त्वत्कृपें ॥ ८३ ॥ दर्शन होतांचि कृतार्थता। लाधली ब्रह्मानंद-स्वरूपता। मम गृहीं चलावें आतां। पवित्र करावें कुटुंब सर्व ॥ ८४ ॥ मग नृसिंहमुनिसमवेत। सगळे पातले पंडितसदनांत। योगीश्वर सिंहासनस्थित। जाहले हर्षभरित समग्र ॥ ८५ ॥ धांवूनि आले भोळे भाविक। साष्टांग नमिती ग्रामलोक। म्हणती धन्यदिन मंगलदायक। यतिनायक प्रगटले ॥ ८६ ॥ आजि सहज गृहासि पाय। लागले जाहला भाग्योदय। जड मूढ आम्हांसी बापमाय। तरणोपाय आपणचि ॥ ८७ ॥ पूर्वसुकृतें महत्पादरज। आमच्या भालीं स्पर्शलें आज। पदकमलें रक्तदिव्य सतेज। निर्मल तारक देखिलीं ॥ ८८ ॥ मग गंधाक्षता पुष्पालंकार। धूप दीप नीरांजन कर्पूर। फल तांबूलादि नारी नर। समर्पिती योगीश्वरातें ॥ ८९ ॥ गीत वाद्य घोष मधुर। गर्जती भक्त जयजयकार। आनंदवृत्ति हर्षनिर्भर। नृसिंहनामोच्चारिती ॥ ९० ॥ तेंव्हां समर्थ पुसती पंडिता। कोठें तुझे मातापिता। विप्र वदे ते उभयतां। कैलासवासी जाहले ॥ ९१ ॥ गेले षट्त्रिंशति संवत्सर। पंचत्व पावले विमत्सर। आपल्या प्रश्नासि हेतु उत्तर। विदित नसे आम्हांसी ॥ ९२ ॥ उत्तर देती नृसिंहमुनि। त्वत्पिता असे तुझे सदनीं। पाळण्याची रज्जु धरूनी। झोके देतसे मुलासी ॥ ९३ ॥ पंडित न मानी विश्वास। म्हणे मेल्यासी वर्षें झालीं छत्तीस। कोणता जन्म असेल त्यास। जगन्निवास सांगा हो ॥ ९४ ॥ अंतर्साक्षी त्रिकालज्ञानी। भूत भविष्य वर्तमानी। संपूर्ण वृत्तांत ज्ञानचक्षूंनीं। जाणते आपण त्रयलोकीं ॥ ९५ ॥ नृसिंह वदती पहा घरांत। भुजंग होऊनि पाळण्यांत। निजलेल्या बालकासि रक्षित। झोंके देत ममतेनें ॥ ९६ ॥ वासना

राहिली म्हणून । सर्पयोनींत झालें जनन । वासनाक्षय झाल्यावांचून । सद्गति नसे प्राण्यासी ।। ९७ ।। मनोजय वासनाक्षय।
अभ्यास-वैराग्ययोगें होय । ब्रह्मविद्याप्रवर्तक संप्रदाय । गुरूसी शरण रिघावें ।। ९८ ।। तात्पर्य वासनाविरहित ।
झाल्याविना न मोक्ष प्राप्त । वासनेमुळें सर्पयोनींत । उपजला तात तुझा हा ।। ९९ ।। वृद्धभुजंगाचे अंगासी धक्का ।
कोणीही लावूं नका । लावाल तरी दुःखशोका । अवश्य पावाल निश्चयें ।। १०० ।। कोणत्याही प्राणिमात्राचा वध ।
करूंचि नये हा शास्त्रनिर्बंध । सर्वभूतीं दया क्षमा अविरोध । असावी ऐसें शास्त्रें बोधिती ।। १ ।। घडला असतां
अपराध । धर्मन्यायरीति यथासंबंध । जाणूनि निःपक्षपात शोध । उचित शासन असावें ।। २ ।। देशाचार लोकाचार ।
कुलाचार वृद्धाचार । जाणूनि शास्त्रविहित विचार । जें करणें तें करावें ।। ३ ।। न कळे तरी पुसावें वडिलांसी ।
विद्वान् श्रेष्ठ सद्गुरूसी । विचारावें सविनय आदरेंसीं । स्वहितार्थ जिज्ञासूंनीं ।। ४ ।। म्हणूनियां विनाकारण । भुजंगाचें
न करावें छळण । जरी भुजंगास होईल स्फुरण । येईल धांवून आम्हांकडे ।। ५ ।। ऐकूनि श्रीगुरुमुखें सुनीति । पहावयासी
सगळे उठती । मंद गतीनें भुजंगासी पहाती । म्हणती सत्य गुरुवाक्य ।। ६ ।। परस्पर बोलती वचन । तान्हें
बालक असे लहान । यासी झालिया सर्पदंशन । प्राणहानि होईल ।। ७ ।। एक म्हणे कशास उशीर । करा सर्पप्राणसंहार ।
कोणी वदती महताज्ञानुसार । चालतां हितकर असे हो ।। ८ ।। दुसरा म्हणे परिसा युक्ति । सर्पासी
करा कीं काकूलती । पालखांतून तान्ह्याप्रति । घ्यावें काढून हळूंच ।। ९ ।। तिसरा वदे वाक्य परिसा । मूकजनावरांचा
भरंवसा । त्यांतून विषारी यांचा न जाणावा सहसा । म्हणूनि यास वधावें ।। ११० ।। चवथा बोले पहातां काय ।
विचारांत होतो कालक्षय । मुसळ घेऊनि याचा लय । करा निर्भय त्वरेनें ।। ११ ।। कित्येक म्हणती भुजंग गृहांत ।
असतां होईल प्राणघात । यदर्थ मारणें योग्य निश्चित । अन्य खटपट कशास ।। १२ ।। काष्ठें आतां मारावें यास । तों

भुजंगें टाकिला प्रश्वास । बाहेर येऊनि नृसिंहश्रीपादास । नमिलें मरणभयास्तव ॥ १३ ॥ करीं घेऊनि त्या भुजंगासी ।
समर्थ वदती कां भीतोसी । तुझेचि पुत्रादि या समयासी । त्वत्प्राणहानीस प्रवर्तले ॥ १४ ॥ या कल्पितसंसारपरिग्रहीं ।
वासना दुःखास कारण पाहीं । तूं गृहधनपति असतां कांहीं । दया नाहीं हिंसकां ॥ १५ ॥ वासना अद्याप झाली तृप्त ।
कीं प्रपंच आवडी असे उर्वरित । मनोरथ परिणाम प्राणान्त । पुत्रादि हस्तीं होतसे ॥ १६ ॥ काय इच्छा असे मानसीं ।
तंव सर्प विनवी श्रीगुरूसी । नको नको संसारसुख मजसी । पावलों तृप्ति पुष्कळ ॥ १७ ॥ आतां सोडवा हो मायाजाल ।
चरणीं ठेवा मज चिरकाल । ऐसें वाचेनें स्पष्ट बोले व्याल । ऐकूनि सकल दचकले ॥ १८ ॥ सर्पासी घेऊनि योगीश्वर ।
त्वरें दाविती नारायणसरोवर । मुनीश्वरासंगें सर्वत्र । आले कौतुक बघावया ॥ १९ ॥ सर्पासी गुरु बोधिती वचन ।
या सरोवराचें घेतां दर्शन । एक जन्माचें दोषक्षालन । अवश्यमेव होतसे ॥ १२० ॥ सरोदका स्पर्श झाला असतां ।
त्रिजन्म पातक नाशे तत्त्वतां । स्नानें सहस्रजन्म दुरितां । क्षय होय निश्चयें ॥ २१ ॥ श्रीनारायणसरोदक । प्राशितां
बिंदुमात्र एक । दग्ध होय महापातक । कृतकृत्यता होतसे ॥ २२ ॥ सरसागरादिक-तीरीं । वसती जे नर पंचरात्रीं ।
तरूनि जाति संसारसागरीं । सत्य सत्य त्रिवाचा ॥ २३ ॥ तीर्थक्षेत्रांचें महिमान । ऐकूनि संतुष्टले जन । म्हणती देवा
प्रत्यक्ष नारायण । करितां पावन जगतासी ॥ २४ ॥ सर्पासी आज्ञापिती अवधूत । त्वरें स्नान करीं रे सरोवरांत । पुढती
येणें योगीकुलांत । जन्म पावशी मोक्षप्रद ॥ २५ ॥ नारायणसरोवरक्षेत्र । बिंदु पंपासरोवर पवित्र । मानसरोवरादिकीं
फल पत्र । दानें स्नानें पुण्यलोकप्राप्ति ॥ २६ ॥ भूवरी नारायणतीर्थासम । दुसरें नसे तीर्थ अनुपम । अमर इच्छिती
या क्षेत्रीं जन्म । अन्याची ती काय कथा ॥ २७ ॥ परिसूनि तीर्थमहिमा यश । भुजग वंदूनी म्हणे हृषीकेश । भवार्णवतारक
तूं जगदीश । केलें पाशनिर्मुक्त ॥ २८ ॥ मी मूक हिंसक विषारी जनावर । तूं जगदात्मा करुणाकर । सर्वज्ञ सर्वशक्तिमान्

परमेश्वर । वाणी संस्कार दिधलासि ॥ २९ ॥ मजला दिधलें जीवदान । योगीकुलांत होईल जनन । न मागतां
ऐसें आशीर्वचन । प्रसन्नत्वें दिधलें त्वां ॥ १३० ॥ जन्मोजन्मींचे जननी जनक । तूंचि आमचा संरक्षक । केला दुरी
संसारशोक । पुण्यश्लोक गुरुवर्या ॥ ३१ ॥ ऐसें विनवूनि भुजंगम । नमस्कार करीत सप्रेम । सरोदकीं प्रवेशला परंधाम ।
योगीश्वरा चिंतूनि ॥ ३२ ॥ सर्वांसी वाटलें आश्चर्य । म्हणती धन्य श्रीगुरुज्ञानसूर्य । मग आचरूनि संध्यावंदनकार्य ।
गेले सर्वही स्वस्थलीं ॥ ३३ ॥ श्रीगुरुलीलामृत-सत्कीर्ति । सर्वत्र लोक सर्वदा गाती । धन्य धन्य योगीश्वर जगत्पति ।
भेटले येथें प्रख्यात ॥ ३४ ॥ ते भगवान् श्रीस्वामी समर्थ । जेथें वसती तेंचि क्षेत्र तीर्थ । जनांसी लागावा योग्य सत्पंथ ।
स्वार्थ परमार्थ साधावा ॥ ३५ ॥ एतदर्थ विश्वकुटुंबी नृसिंहमुनि । वास्तविक निरुपाधिक असूनि । परोपकारार्थ संचरती
भुवनीं । दयानिधि सदाशिव ॥ ३६ ॥ महंताच्या उजव्या हातां । श्वेतकुष्ट व्याधि होता । तो श्रीमन्नृसिंहचरण स्पर्शतां ।
गेला तात्काळ तयाचा ॥ ३७ ॥ नारायणसरोवरींचा वृत्तांत । ब्रह्मचारी राधाकृष्णादि महंत । यांणीं निवेदिला
इत्थंभूत । तोचि येथें कथियेला ॥ ३८ ॥ कांहीं नव्हे पदरचें एक । वदविता सत्य प्रामाणिक । स्वामीसमर्थ निश्चयात्मक ।
निःसंशय जाणावें ॥ ३९ ॥ पुढिले अध्यायीं रसिक कथन । श्रोतीं असावें सावधान । अपार अनंत लीलावर्णन ।
त्याचा तोच वदवील ॥ १४० ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदशास्त्रपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । नवमाध्याय
गोड हा ॥ ९ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे नवमोऽध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुदेवदत्त—स्वामीसमर्थ ॥ ॥

# ॥ अध्याय दहावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥  ॥ श्रीक्षेत्र द्वारकापुरी प्रसिद्ध । जेथें नांदतसे परमात्मा शुद्ध । श्रीकृष्ण भगवान् प्रबुद्ध । पूर्णावतार तारक जो ॥ १ ॥ द्वारका 'पश्चिमधाम' विख्यात । गोमतीतीर्थ वाहे अखंडित । अनादिस्थान देवतांसहित । शोभिवंत दिसतसे ॥ २ ॥ साधु संत सज्जन विरागी । भक्त दास हठयोगी राजयोगी । आपापल्या कार्यांलागी । भजती द्वारकाधीशा ॥ ३ ॥ त्या सुक्षेत्र द्वारकावतींत । एक योगीपुरुष वसत । शुन्याबुवा नामें संत । वृद्ध पुरुष असा जो ॥ ४ ॥ ज्याचे अंगावरी शुभ्ररोम । बहुत दीर्घ म्हणूनि नाम । शुन्याबुवा योगी उत्तम । अधिकारी मोक्षमार्गींचा ॥ ५ ॥ त्रिकाल गोमतीतीर्थ-तीरीं । योगी वसे सदाचारी । शुन्याबुवा ब्रह्मात्मविचारी । भगवद्भक्त निष्काम ॥ ६ ॥ द्वारका यात्रेसी जे जे येती । ते संपूर्ण यात्रा करिती । आणि शुन्याबुवाचें दर्शन घेती । प्रेमभावेंकरूनि ॥ ७ ॥ ते शुन्याबुवा हठयोगक्रिया । करीत होते परमार्थ साधावया । दुस्तर भवसागर तरावया । मनोनिग्रहेंकरूनि ॥ ८ ॥ जिंकूनियां इंद्रियग्राम । हृदयस्थ ओळखावा आत्माराम । म्हणूनिया साधुसमागम । निष्काम सेविला जयांनीं ॥ ९ ॥ भजन पूजन आरती उत्साह । समारंभ साधुजनांसह । करित होते अपरिग्रह । शुन्याबुवा सत्पुरुष ॥ १० ॥ काम क्रोध मद मत्सर । लोभ मोह दंभादि विकार । परित्यागुनी निरंतर । भगवद्भजनीं निर्मल ॥ ११ ॥ पुराण ग्रंथ वेदांतश्रवण । नित्य चर्चा कार्यकारण । ऊहापोह विचक्षण । शुन्याबुवास्थानीं होतसे ॥ १२ ॥ सदा भेटती महात्माजन । परमेश्वरस्वरूपचर्चा निशिदिन । उत्तमप्रकारें परोक्षज्ञान- । युक्त होते शुन्याबुवा ॥ १३ ॥ आल्या गेलियाचा सत्कार । मधुर

भाषणें गंभीर । शुन्याबुवा करिती साचार । उल्हासयुक्त मानसें ॥ १४ ॥ उपमर्द कठोरभाषण । दुसऱ्यासी विनाकारण । दुखविणें पराचें अंतःकरण । साधुलक्षणें नव्हेत हीं ॥ १५ ॥ सत्यप्रियवाक्येंकरून । संतुष्ट होती सर्वजन । तस्मात् तेंचि बोलावें वचन । 'वचनीं किमर्थ दरिद्रता' ॥ १६ ॥ सत्यवचन मधुर प्रिय । बोलतां सर्वभूतीं निरामय । धनादिक खर्च न होतां अक्षय । सर्वोपयोगीं येतसे ॥ १७ ॥ मधुर भाषण ही औषधी एक । प्रदानें सर्वत्र संतोषकारक । कटु वचन वज्रकंटक । दुःखदायक सदा असे ॥ १८ ॥ कटुशब्दबाण श्रवणद्वारें । ज्या समयीं अंतरीं संचरे । तेव्हां देह इंद्रियांसी बहुप्रकारें । दुःसह दुःख होतसे ॥ १९ ॥ कटुशब्द अंतरीं सहन । कोणासीही न होय म्हणून । दुःखें तळमळितसे मन । चिंतानिमग्न असत तें ॥ २० ॥ प्राणीमात्रासी कटु अप्रिय । वचन लागून राहतें रोगमय । कांहीं न सुचे न वाटे प्रिय । दुःखशोकप्रद होय जें ॥ २१ ॥ लोकांमाजीं बोलती म्हण । कटुशब्द खोंचे जसा प्रखरबाण । कटु मर्म वाक्याचें उच्चारण । सर्वस्वीं नाशकारक असे ॥ २२ ॥ म्हणून शहाण्या सुशिक्षितांनीं । कटु अप्रिय अनृत मर्मवचनीं । दुखवूं नये प्राण्यालागुनी । कोणासीही कदापि ॥ २३ ॥ सत्य प्रिय मधुर रसाळ । अवश्यमेव वचन चिरकाळ । सर्वत्रांसंगें बोलावें निर्मळ । उत्तम फलदायक जें ॥ २४ ॥ सत्य प्रिय भाषण अमृततुल्य । विरहित समूलकौटिल्य । नेमें बोलतां ब्रह्मकैवल्य । सर्वसौख्य उपलब्धे ॥ २५ ॥ हाचि वेदशास्त्रांचा नियम । आज्ञा प्रमाणरूप उत्तम । अखिलसौख्यार्थी सुगम । विनिर्णित मुख्यत्वें हो ॥ २६ ॥ हा नियम सर्वत्रांसी पाहिजे । परंतु पूर्वसुकृतें लाहिजे । धर्म अर्थ काम मोक्ष पाविजे । चतुर्विध पुरुषार्थ यायोगें ॥ २७ ॥ हें सत्य-प्रिय-भाषणव्रत । पाळितां देव होती प्रसन्न त्वरित । मैत्री सर्वत्र सख्य जोडत । ऐसें सुलभ साहजिक हें ॥ २८ ॥ कटु अप्रिय अनृत । भाषणें कलिरायाच्या युगांत । संतति संपत्ति अपरिमित । प्राप्त होती निश्चयें ॥ २९ ॥ याप्रकारें कोणी बोलती । कोणी उदाहरणें दाविती । खोट्या कर्में सुखी झालों म्हणती । कोणी

सांगती अनुभव ॥ ३० ॥ परंतु हें निर्मूल अप्रमाणिक । सर्वपरी अनर्थकारक । असत्य दुराग्रह घातक । इहपरलोकीं निश्चयें ॥ ३१ ॥ पूर्वपुण्योदयसंस्कारें । धनादिक प्राप्त होत सारें । कधींही अनृत दुष्कर्माचारें । न होय प्राप्त सहसाही ॥ ३२ ॥ भ्रांतिष्ट ते अहंकारमदें । वाग्जल्पना करिती विषादें । जैसें मद्यपी बडबडे प्रमादें । विचारशून्य होऊनि ॥ ३३ ॥ जेवीं भूतें अंगीं संचरतीं । अभद्र निंद्यवचनें बोलतीं । स्वदेहाची नसे स्मृति । तें बडबडणें वृथैव ॥ ३४ ॥ अथवा होतां वायुप्रकोप । भलभलते चाळे करी अनेक । ते खरें ऐसे न मानिती लोक । जो वायु मात्रापानें उतरतो ॥ ३५ ॥ असत् श्रीमदांधालागून । दारिद्र्य हेंचि परमांजन । स्पर्शतां देखती डोळे उघडून । मग अश्रुपात गाळिती ॥ ३६ ॥ दारिद्र्यांजन चटके लागतां । शुद्धीवर येती तत्त्वतां । आपल्यासारखें सर्वभूतां । दारिद्र्यानुभवें पाहती ॥ ३७ ॥ तात्पर्य सत्य प्रिय मंजुल । मर्मभेदरहित प्रांजल । वचन बोलावें सर्वकाल । तेणें सर्वार्थ प्राप्त होतसे ॥ ३८ ॥ श्रीसद्गुरु श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ । केव्हां भेटेल महात्मा श्रेष्ठ । परब्रह्मात्मस्वरूप इष्ट । दाविल हृदयस्थ निजगुह्य ॥ ३९ ॥ कधीं होईल प्रारब्धोदय । अपरोक्षज्ञानी श्रीगुरुराय । पूर्णब्रह्म परमेश्वर दत्तात्रेय । योगींद्र केव्हां भेटतील ॥ ४० ॥ नानावेषें श्रीदत्तावधूत । जगत्कल्याणार्थ संचरत । जयाच्या दर्शनार्थ योगी संत । अनुष्ठान व्रतें आचरती ॥ ४१ ॥ पूर्ण ब्रह्म सर्वाधिष्ठान । स्वरूप सच्चिदानंदघन । देशकालवस्तुपरिच्छिन्न-विहीन । अव्यय सनातन जगदात्मा ॥ ४२ ॥ त्या अलखनिरंजनाची फेरी । लोकानुग्रहास्तव महीवरी । येतसे देवस्थानीं तीर्थक्षेत्रीं । धरित्री पावन करावया ॥ ४३ ॥ जो जगत्कारणविवर्तोपादान । हठयोगराजयोगादि करून । दाता वेदप्रतिपाद्य सनातन । योगाधीश्वर फिरतसे ॥ ४४ ॥ ऋषि योगी साधु भक्तजन । श्रीगुरुदत्तात्रेयोपासन । प्राप्त व्हावया ज्ञानविज्ञान । करिती अनुदिन अनन्यें ॥ ४५ ॥ तो दीनानाथ योगीराज । श्रीस्वामीसमर्थमहाराज । स्मरणगामी अधोक्षज । देईल मज दर्शन

जरी ॥ ४६ ॥ दर्शन देऊनि कृपा करील । दयासागर दीनवत्सल । तरी एकही न लागतां पल । होईल सिद्ध अभीष्ट
॥ ४७ ॥ जो सद्गुरु कालाचाही काल । परमात्मस्वरूप पूर्ण विशाल । भक्ताभीष्टप्रद महत्कृपाल । अत्रिबाल जगद्गुरु
॥ ४८ ॥ तो स्मरणगामी यदा धांवे । अपारसौख्य काय पुसावें । शीघ्र सत्यपारमार्थिक व्हावें । यांत आश्चर्य
कोणतें ॥ ४९ ॥ त्या परमपुरुषाचें दर्शन । केव्हां होईल मजलागून । कृतकृत्यता त्यावांचून । होणार नाहीं सर्वथा
॥ ५० ॥ ऐशा विचारसागरांत । भुज्याबुवाचें निमग्न चित्त । असतां घडलें अकस्मात् । श्रोतीं सावध परिसावें ॥ ५१ ॥
श्रीकृष्णदत्तात्रेय योगीश्वर । श्रीमत्परमहंसयतिवर- । रूपें प्रकटले भक्तासमोर । भुज्याबुवाच्या स्थानांत ॥ ५२ ॥ जैसे
निजभक्त प्रल्हादास्तव । स्तंभीं प्रकटले रमाधव । नृसिंहावतार ईश्वर वास्तव । भक्तसंरक्षक उद्भवले ॥ ५३ ॥ हिरण्यकश्यपूचा
विध्वंस । करूनि रक्षिलें प्रल्हादास । तेचि नृसिंहरूप परमहंस । जगन्निवास उभे ठेले ॥ ५४ ॥ त्या कालीं
भुज्याबुवाच्या ध्यानांत । श्रीनृसिंह-दत्तावधूत । परमहंसरूपें मूर्तिमंत । आत्मस्वरूप दाविती ॥ ५५ ॥ परमहंस गुरुमूर्तीला ।
मानसीं देखूनि बुवाला । अंतर्बाह्य आनंद जाहला । तो वर्णिला नव जाय ॥ ५६ ॥ स्तंभ स्वेद आणि तिसरा रोमांच ।
स्वरभंग कंप तो पांचवा साच । वैवर्ण्य अश्रुपात प्रलय हेच । अष्टभाव उदेले ॥ ५७ ॥ आनंदाश्रु प्रेमें वाहती । अवधूतमूर्ति
दिसे चित्तीं । नेत्र उघडून जंव पहाती । तंव ती मूर्ति समोर ॥ ५८ ॥ अंतरीं देखिलें तेंचि बाह्य । अविनाशी
सर्वत्र ग्राह्य । दीनप्रणतजनांसी साह्य । तें भगवत्स्वरूप विलोकिलें ॥ ५९ ॥ पाहों जैसें भूषण सुवर्ण । अंतर्बाह्य एकचि
दिसे वर्ण । नाम मात्र सगुण निर्गुण । एकचि पूर्णब्रह्म तें ॥ ६० ॥ घटादि नामधेय वाचारंभण । विकारहीन मृत्तिका
कारण । तैसें बहिरंतरीं अद्वितीय पूर्ण । परमेश्वरस्वरूप असे ॥ ६१ ॥ भुज्याबुवासी पटला प्रत्यय । अंतर्बाह्य एक
निरामय । परमहंसवेषें दत्तात्रेय । चिन्मयस्वरूप देखिलें ॥ ६२ ॥ मग खडबडोनि उठले । भुज्याबुवांनीं चरण धरिले ।

वारंवार साष्टांगें नमिले । दत्तात्रेय नरहरि ॥ ६३ ॥ भुज्याबुवा करिती विज्ञापना । "महेश्वरा जनार्दना । मदनांतका त्रिलोचना । त्रिपुरमर्दना केशवा ॥ ६४ ॥ आदिनारायणा विधिहरिहरा । उत्पत्ति-स्थिति-संहारकरा । त्रिगुणातीत निर्विकारा । दयासागरा गुरुवर्या ॥ ६५ ॥ बहुत दिवसांपासून । तळमळित होतें व्यग्र मन । पुष्कळ भेटले महात्माजन । केलीं साधनें अनिवार ॥ ६६ ॥ वैकुंठ कैलास सत्यलोक । सोडूनि जगत्कार्यें अनेक । मजवरी वळले जगन्नायक । सुखदायक साच कीं ॥ ६७ ॥ बुडालों होतों संशयसागरीं । स्मरणें धांवले श्रीहरि । पातले दीनभक्तकैवारी । श्रीगिरिनारीं अवधूत ॥ ६८ ॥ मायबाप सोयरे गणगोत । सखया तुम्हीच सत्य आप्त । तुम्हांविना अखिलब्रह्मांडांत । दुजें दैवत नसेच कीं ॥ ६९ ॥ जन्म देती जननीजनक । वाढविती करूनि ममता कौतुक । परंतु भवसंसारतारक । समर्थ न होती कदापि ॥ ७० ॥ मातापितरादि इतर दैवतें । न होती समर्थ तारावयातें । एकचि त्रैलोक्यांत मोक्षदाते । श्रीगुरु स्वामी समर्थ ॥ ७१ ॥ अविद्या-अज्ञानकार्यसहित । मायासंसारप्रपंच कल्पित । भवसागर दुस्तर क्षणांत । उल्लंघित गुरुदास ॥ ७२ ॥ अज्ञानबंधन सोडविता । वेदांतविज्ञानार्थ सुनिश्चिता । सद्गुरुनाथ एकचि दाता । ब्रह्मसायुज्यता प्राप्त्यर्थ ॥ ७३ ॥ धन्य धन्य आजि सुदिन । स्मरण करितां अत्रिनंदन । उभे राहिले साक्षात् येऊन । दिधलें दर्शन अंतर्बाह्य" ॥ ७४ ॥ स्तवन ऐकूनि स्वामिराय । भुज्याबुवास वदती सदय । "काय मानसीं असती संशय । सांगा निर्भय सत्वरें ॥ ७५ ॥ संशय कोठून उद्भवती । पदार्थीं विकल्प कोठें वसती । उपजती तेथेंच अस्त पावती । शोधा अंतरीं विचारें ॥ ७६ ॥ मजला संशय वाटतो । ऐसें जाणूनि कोण म्हणतो । संशयाहूनि भिन्न असतो । म्हणूनि जाणतो संशयासी ॥ ७७ ॥ संशयाचा द्रष्टा जाणता । तोचि आत्मा आपण तत्त्वतां । संशय-संशयी यांविरहिता । परतोनि पहावें हृदयीं त्या ॥ ७८ ॥ सर्वा-

धिष्ठानआत्मा अव्यय । सर्वांतरीं व्यापक असे चिन्मय । साक्षी चेता निर्गुण अद्वितीय । आत्मा केवल आपणचि ॥ ७९ ॥ जो अज्ञानमाया संशयातीत । अनेक शब्द-वाक्यरहित । निःशब्दस्वरूप आत्मा निश्चित । पूर्णब्रह्म परात्पर ॥ ८० ॥ ‘त्वंपद-तत्पदा’चा जो लक्ष्यार्थ । ‘असि’ पदें अभेदें निरुपाधि यथार्थ । प्रत्यगात्मा-ब्रह्मैक्य परमार्थ । सत्य सत्य हाचि असे ॥ ८१ ॥ जीव ईश्वर लहानमोठेपणा । किंचिज्ञ-सर्वज्ञा शक्तिगुणा । ‘सोऽयं देवदत्त’ ही ‘भागलक्षणा । लक्षित जाणा आत्म्यातें ॥ ८२ ॥ हेंचि महावाक्यार्थ स्पष्ट विवरण । करूनि सांगूं निर्वाण । कथिलें ग्रंथीं जें स्वात्मनिरूपण । करावें श्रवण आदरें तें ॥ ८३ ॥ पंचकोशादिकांचा विचार ज्यांनीं । केला असेल जाणा त्यांनीं । तत्त्वमस्यादि वाक्य विचारावांचूनी । केल्याचें तें काय फळ ॥ ८४ ॥ महावाक्यविचार विहितासी । म्हणजे वाक्यविचारशून्यासी । हा ‘प्रत्यक्ष’ आत्मा असूनि समीपेंसी । ‘परोक्षवत्’ भासतो ॥ ८५ ॥ आत्मा ‘प्रत्यक्’ प्रकाशमान । सर्वदा सर्वत्र आहे भासमान । तथापि वाक्यार्थविचारावांचून । कदा नये अनुभवासी ॥ ८६ ॥ म्हणूनि व्हावया आत्मसाक्षात्कार । तत्त्वमस्यादि महावाक्यार्थविचार । अवश्य केलाच पाहिजे साचार ॥ मोक्षाधिकारी जनांनीं ॥ ८७ ॥ तस्मात् पदार्थ-शोधनपूर्वक । महावाक्यार्थविचारें आवश्यक । झाल्याविना आत्मज्ञान सम्यक् । निश्चयात्मक न होत तें ॥ ८८ ॥ स्वबुद्धिबळेंकरूनि केवळ । वाक्यविचार जरी केला पुष्कळ । तथापि स्वात्मानुभव निर्मळ । होणार नाहीं सर्वथा ॥ ८९ ॥ म्हणूनि श्रीसद्गुरूसी शरण । अगत्य जाऊनि धरावे दृढ चरण । म्हणजे सामर्थ्यवंत सद्गुरु दयाघन । कृपा प्रसाद करतील ते ॥ ९० ॥ त्या श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ-मुखें वाक्यविचार । समजूनि उमजावा यथाशास्त्र । तेणें क्षणांत आत्मसाक्षात्कार । अवश्यमेव होतोचि ॥ ९१ ॥ आतां पदार्थ-विचार कथन । ऐका हो श्रोते साधुजन । ‘तत्त्वमसि’ या वाक्यांत पदें तीन । ‘तत्-त्वं-असि’ ऐशीं ॥ ९२ ॥ वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ ।

ऐसे दोन आहेत पदाचे अर्थ । त्यांत प्रथम ‘त्वं’ या पदाचा वाच्यार्थ। सांगूं शास्त्रविहित जो ॥ ९३ ॥ मी
स्थूल वा कृश आहें । ऐसें देहबुद्धिधर्में वदताहे । मी काणा वा बधिर आहें । ह्या इंद्रियधर्मासी ॥ ९४ ॥
तथा सुखदुःखादि शुभाशुभासी । या अंतःकरणाच्या धर्मासी । क्षेत्रज्ञ आत्म्याच्या ठायासी । अभेदेंकरून आरोपिलें
॥ ९५ ॥ म्हणजे तादात्म्य-अध्यासेंकरून । कर्तेपणादि अभिमान धरून । देहधर्मांचें आरोपण । करितसे आत्मयावरी
॥ ९६ ॥ मी काणा आहे बधिर । या प्रकारें वृत्ति अहमाकार । इंद्रियधर्मांचा आरोप आत्म्यावर। साहंकारें करणें जो
॥ ९७ ॥ विज्ञानकोशाध्यारोपपूर्वक । मी कर्ता असे अभिमानात्मक। ऐसा जो होतसे बोधविवेक। ‘वाच्यार्थ’ तोचि
त्वं-पदाचा ॥ ९८ ॥ म्हणजे चैतन्यात्मा सोपाधिक । तो त्वं-पदाचा वाच्यार्थ सम्यक् । यासी शास्त्रज्ञ ते कित्येक ।
‘शबलार्थ’ही म्हणताति ॥ ९९ ॥ याचें विशेष स्पष्टीकरण । जें वज्रशुचिउपनिषदीं प्रमाण । तें सत्यत्वें कळावया कारण ।
बोलूं जनांच्या हितार्थ ॥ १०० ॥ श्रोत्र त्वचा नेत्र जिव्हा घ्राण । हें ‘ज्ञानेंद्रिय-पंचक’ जाण । हस्त पाद वाचा गुदा शिश्न।
हें होय ‘कर्मेंद्रिय-पंचक’ ॥ १ ॥ प्राण अपान व्यान उदान । पांचवा तो वायु समान । नाग कूर्म कृकल देवदत्त
धनंजय जाण । दश प्रकारचे वायु हे ॥ २ ॥ मन बुद्धि अहंकार चित्त । हें ‘अंतःकरण-चतुष्टय’ सत्य । शब्द स्पर्श
रूप रस गंध असत । ‘पंचविषय’ प्रसिद्ध ते ॥ ३ ॥ वचन आदान आनंद विसर्ग गमन । हें कर्मेंद्रियाचें वर्तन।
विकल्प निश्चय अहंकार अनुसंधान । ज्ञान हें ज्ञानेंद्रियाचें समजावें ॥ ४ ॥ अन्नमय प्राणमय मनोमय । विज्ञानमय
आणि आनंदमय । पंचकोशात्मकसहित होय। देहेंद्रिय-पसारा हा ॥ ५ ॥ अधिदैविक अध्यात्मिक । तिसरा बोलिला
अधिभौतिक । हे त्रिविध ताप दुःखकारक । होती प्राणीमात्रासी ॥ ६ ॥ सत्त्व रज तम हे त्रिगुण । आणि त्रिकाल
भूत भविष्य वर्तमान । पुत्रेषणा वित्तेषणा लोकेषणा जाण । ‘ईषणात्रय’सहित हे ॥ ७ ॥ अशन पिपासा शोक मोह ।

जरा मरण या 'षडूर्मीं'सह । तादात्म्यअध्यास अहंदेह । चैतन्यात्मा सोपाधिक ॥ ८ ॥ 'अस्ति जायते वर्धते अपक्षीयते । विपरिणमते विनश्यते' । या षड्भाव-विकारसहित येथें । 'त्वंपद-वाच्यार्थ' कथिलासे ॥ ९ ॥ त्वं-पदाचा लक्ष्यार्थ सांप्रत । कथितों परिसा हो भक्तिमंत । शरीर इंद्रियादि अहंकारातीत । साक्षी आत्मा अखंड असे ॥ ११० ॥ देह आणि देहाभिमान । तथा इंद्रियादिकांहून । आत्मा साक्षी अत्यंत भिन्न । निरुपाधिक विराजे ॥ ११ ॥ सर्वत्र प्राण्यांचे हृदयीं स्थित । अद्वितीय ब्रह्मात्मा सदोदित । अखिलोपाधि-विनिर्मुक्त । हाचि 'त्वंपद-लक्ष्यार्थ' जाणावा ॥ १२ ॥ आतां तत्पदाचा वाच्यार्थ श्रवण । करा हो श्रोतेजन आपण । वेदांतउपनिषद-वाक्यांत प्रमाण । ब्रह्म ज्ञेय संवेद्य जें ॥ १३ ॥ मायोपाधिक सकल जगताचें । उत्पत्ति स्थिति आणि संहाराचें । उपादान कारण प्रपंचाचें । सर्वज्ञ सर्वेश्वर असे जें ॥ १४ ॥ सर्वकामप्रद संपूर्णशक्तिमान् । सर्वज्ञत्वादि उपाधिसहवर्तमान । सत्यज्ञानानंदस्वरूप चैतन्यघन । 'तत्पदवाच्यार्थ' तो म्हणिजेला ॥ १५ ॥ आतां तत्पदाचा लक्ष्यार्थ कथित । कर्तृत्वलक्षण प्रपंचोपाधिरहित । विविधोपाधिनिर्मुक्त विश्वातीत । अज्ञानद्वैतरहित जें ॥ १६ ॥ सर्वज्ञत्वादि विशिष्ट जगत्कर्तेपणा । इत्यादि उपाधिविरहित जाणा । विशुद्धविज्ञान-अद्वैतपणा । चैतन्याक्षरस्वरूप ऐसें ॥ १७ ॥ जें आत्मस्वरूप अनुभवगम्य । तेंचि 'तत्पदलक्ष्यार्थ' आहे मान्य । या प्रकारें पदार्थविवेचन योग्य । केलें असतांही बोध नव्हे ॥ १८ ॥ म्हणूनि 'सामानाधिकरण' । त्रयसंबंधाचें ज्ञानाविण । तत्त्वमसि महावाक्यार्थज्ञान । होणार नाहीं यथार्थ ॥ १९ ॥ आतां सामानाधिकरण । म्हणजे एक अधिकरणीं विद्यमान । जे जातिक्रियादि गुण । परस्पर असती ते ॥ १२० ॥ विशेषण-विशेष्यरूप असून । एकविभक्त्यंत जीं पदें दोन । तेंचि 'सामानाधिकरण' । उदाहरणें परिसावीं ॥ २१ ॥ 'नीलो घटः, रक्तं कमलं' हीं दोन । विशेषणविशेष्यभाव असून । परस्पर एकविभक्त्यंत म्हणून । लक्ष्यलक्ष्यकत्वसंबंध असे ॥ २२ ॥ तैसा येथें तत्पद-त्वंपदाचा । सामानाधिकरण्यसंबंध आहे साचा । कारण प्रथमा-

विभक्तींत दोहोंचा । परस्पर विशेषण-विशेष्यादि संबंध ॥ २३ ॥ म्हणजे पदाचे एकार्थी-निष्ठत्व । आणि विशेषण-विशेष्यभाव । तैसेंचि लक्ष्यलक्ष्यकत्व । त्रयसंबंधीं सामान्याधिकरण्य हें ॥ २४ ॥ महावाक्य हें 'तत्त्वमसि' । म्हणजे तें तूं आहेसी । चैतन्यरूप अर्थांसी । तात्पर्ययोगें जाणवितें ॥ २५ ॥ त्वं या पदार्थाचें विशेषण । तत्पदार्थ हें होतें जाण । त्वं-तत्-असिवचन । म्हणजे तूं तें आहेसि ॥ २६ ॥ ऐसें बोलतां तत्पदार्थाचें । विशेषण त्वंपद होतसे साचें । विशेषण-विशेष्यभावसंबंध दोहोंचे । अभेदार्थ जाणविती ॥ २७ ॥ तथा तत्पद आणि त्वंपदाचा । आत्मयासंगें संबंध साचा । लक्ष्य आणि लक्षकपणाचा । आहेचि नित्यसंबंध ॥ २८ ॥ म्हणजे तत्पद-त्वंपद हें लक्षक । आणि आत्मा लक्ष्य असे निरुपाधिक । महावाक्यांतील संबंध निःशंक । आहे त्रिविधप्रकारें ऐसा ॥ २९ ॥ म्हणूनि सांप्रत सामानाधिकरण्याचें । स्वरूप ऐकावें स्वहिताचें । ज्यायोगें महावाक्यार्थाचें । यथार्थ ज्ञान होय तें ॥ १३० ॥ व्हावया लोकांत प्रवृत्ति । भिन्न भिन्न कारणें ज्याचीं असतीं । तथा भिन्नभिन्न अर्थाचे होती । वाचक ऐसे शब्द जे ॥ ३१ ॥ ऐशा वाचक शब्दांच्या तात्पर्यानें । एकार्थाविषयीं जो संबंध होणें । त्या संबंधासी 'सामानाधिकरण्य' म्हणणें । लक्षणाप्रतिपादक निश्चयें ॥ ३२ ॥ आतां या 'तत्त्वमसि' महावाक्यांत । लक्षणेवांचूनि बोध न होत । म्हणूनि लक्षणा अवश्ययुक्त । कळावयासि सांगूं ती ॥ ३३ ॥ जीव प्रत्यक्ष तथा परिच्छिन्न । आणि ब्रह्म परोक्ष तथा परिपूर्ण । या प्रकारें हीं असतीं दोन । विरुद्धधर्मी परस्पर ॥ ३४ ॥ कारण कीं प्रत्यक्षत्व आणि परोक्षत्व । परस्पर विरुद्धधर्म असत । अर्थात एकेठायीं न वसत । तत्-त्वंपदार्थ परस्पर ॥ ३५ ॥ या प्रकारें त्यागूनि विरुद्धार्थ । व्हावया अखंडबोधार्थ । या तत्-त्वंपदार्थी यथार्थ । लक्षणा स्वीकारिली पाहिजे ॥ ३६ ॥ तें लक्षणास्वरूप ऐका भलें । कोणत्याही प्रमाणाच्या विरोधामुळें । ज्या वाक्यांत ज्या पदाचा कळे । मुख्यार्थ ऐसा जो ॥ ३७ ॥

मुख्यार्थ म्हणजे प्रतिपाद्यार्थ । त्या वाक्यांत त्या मुख्यार्थाचा स्वीकार न संभवत । त्या पदाचा संबंध्यर्थ । मुख्यार्थासंगें जो होय ॥ ३८ ॥ त्या मुख्यार्थसंबंधीं अर्थांत । पदाची जी प्रवृत्ति होत । त्या प्रवृत्तीस उक्त । लक्षणाप्रतिपादक म्हणताति ॥ ३९ ॥ काव्यप्रकाश ग्रंथांत । लक्षणास्वरूप प्रतिपादित । तेंचि परिसा हो श्रद्धायुक्त । श्रोते समस्त सज्जन ॥ १४० ॥ मुख्यार्थ म्हणजे वाच्यार्थाचा । बोध होतां बोधितार्थाचा । लोकप्रचारें अथवा प्रयोजन योगाचा । मुख्यार्थासंगें संबंध जो ॥ ४१ ॥ तो संबंध ठेवणारा अन्यार्थ । जो वृत्तियोगें जाणिला जात । त्या अर्थासी म्हणती पंडित । 'लक्षणावृत्ति' या नामें ॥४२॥ ती लक्षणा त्रिविधा होत । एक 'जहत्' दुसरी 'अजहत्' । तिसरी 'जहदजहत्' । त्यांतील प्रथम कथितसे ॥ ४३ ॥ संपूर्ण पदवाच्यार्थ त्यागून । वाच्यार्थासंगें युक्तार्थ भिन्न । म्हणजे संबंध ठेवणारा अर्थ अन्य । त्या भिन्नार्थाविषयीं ॥ ४४ ॥ म्हणजे त्या भिन्नार्थीं जी पदाची वृत्ति । तियेसि 'जहल्लक्षणा' म्हणती । 'वृत्ति' म्हणजे वर्तन संबंध स्थिति । प्रवृत्ति इत्यादि अर्थ होय ॥ ४५ ॥ ती जहल्लक्षणा कोठें संभवत । 'गंगायां घोषः' इत्यादि स्थलांत । 'मंचाः क्रोशन्ति' याही वाक्यांत । प्रसिद्ध लक्षणा परिसावी ॥ ४६ ॥ सांप्रत दार्ष्टांतीं 'तत्त्वमसि' या वाक्यांत । ही जहल्लक्षणा न संभवत । म्हणूनि ती घेऊं नयेचि अर्थांत । तें कारण परिसावें ॥ ४७ ॥ येथें तत्-पदाचा आणि त्वं-पदाचा । तसाचि या दोन्ही पदार्थांच्या संपूर्ण अंशाचा । त्याग होत नाहीं साचा । विरुद्धांशाचा मात्र होतसे ॥ ४८ ॥ 'गंगायां घोषः' या वाक्यांत । 'गंगा' या पदाचा मुख्यार्थ 'प्रवाह' असत । 'घोष' म्हणजे गौळवाडा बोलिजेत । त्या प्रवाहीं नसे गौळवाडा ॥ ४९ ॥ उदकप्रवाहीं लोकस्थिति । प्रत्यक्ष प्रमाणानें दिसेना ती । आणि आधार नसल्यानें उपपत्ति । होत नसे वाक्याची ॥ १५० ॥ यास्तव प्रवाहरूप अर्थ त्यागून । प्रवाहयुक्तसंबंधीं 'तीर'पदाचें करितां ग्रहण । तैसें येथें न संभवे म्हणून । जहल्लक्षणा घेऊं नये ॥ ५१ ॥ कारण वाच्यार्थाचा संपूर्ण । त्याग नाहीं सर्वथा जाण । आणि एक-

देश पदार्थ-ग्रहण। म्हणून न संभवे 'जहती' ही ॥५२॥ ; 'अजहल्लक्षणा' स्वरूप आतां। परिसावें बोधाकरितां। उदारणासहित तत्त्वतां। अलंकारशास्त्रीं कथिलें तें ॥ ५३ ॥ शक्ति-वृत्तियोगें प्रतीतीसी। येणारा जो अर्थ तयासी। न त्यागितां त्या प्रतीतार्थासी। म्हणजे वाच्यार्थाचा त्याग नसे ॥ ५४ ॥ पदाच्या वाच्यार्थापासून। भिन्नार्थाविषयीं जें प्रवृत्तिवर्तन। तियेसी नाम अजहल्लक्षण। अलंकारशास्त्रज्ञ म्हणताति ॥ ५५ ॥ 'शोणो धावति' उदाहरण ऐसें। म्हणजे लाल रंगाचा धांवतसे। या वाक्यांत 'शोण' पदाचा असे। मुख्यार्थ तो रक्तगुण ॥ ५६ ॥ रक्तगुणासि क्रिया धांवणें। हें तो न संभवे होणें। म्हणूनि अश्वार्थ उक्त समजणें। शोण शब्दाचा तात्पर्यें ॥ ५७ ॥ यामुळें शोण शब्दाचा। वाच्यार्थ जो रक्तगुण त्याचा। त्याग होत नाहीं साचा। हे ध्यानांत ठेवणें ॥ ५८ ॥ तथा वाच्यार्थाहूनि भिन्न। अश्वाचें होतसे ग्रहण। म्हणूनि हें उदाहरण। अजहल्लक्षणेचें समजावें ॥ ५९ ॥ 'काकेभ्यो दधि रक्ष्यतां' इति। यथा 'छत्रिणो गच्छन्ति'। हीं उदाहरणें 'अहजती'-। लक्षणेचीं जाणावीं ॥ १६० ॥ आतां 'तत्त्वमसि' या वाक्यांत। अजहल्लक्षणा अयुक्त। ग्रहण करण्यास योग्य न होत। कारण त्याचें परिसावें ॥ ६१ ॥ वाच्यार्थाच्या एकदेशाचा त्याग। आणि एक देशाचा ग्रहणयोग। होतो, म्हणूनि येथें साङ्ग। अजहल्लक्षणाही नसे ॥ ६२ ॥ ; आतां 'जहदजहल्लक्षणा'-स्वरूप। प्रतिपादित ज्ञानविज्ञान-प्रदीप। श्रीमच्छंकराचार्य शिवस्वरूप। जगद्गुरुविरचित ऐका ते ॥ ६३ ॥ वाच्यार्थाचा त्याग करणें। आणि लक्ष्यार्थासी घेणें। हें जिच्यायोगें समजणें। ते 'जहदजहल्लक्षणा' ॥ ६४ ॥ वाच्यार्थरूप एकदेशातें त्यागून। लक्ष्यार्थरूप एकदेशाचें बोधन। करिते, तियेसी म्हणती बुधजन। 'जहदजहल्लक्षणा' ॥ ६५ ॥ या लक्षणेचें प्रसिद्ध उदाहरण। 'सोऽयं देवदत्तः' हें जाण। म्हणजे 'तो हा देवदत्त' ब्राह्मण। ऐसें भाषण बोलतां ॥ ६६ ॥ या वाक्यांत 'सः' या पदाचा अर्थ केवल। तो पूर्वींचा परोक्ष देशकाल। वयोवस्था इत्यादि विशिष्ट केवल। ज्या स्थलीं देवदत्त होता तो ॥ ६७ ॥ आणि 'अयं' पदाचा अर्थ स्पष्ट।

हा वर्तमानदेशकालादिविशिष्ट। वयोवस्था वृद्ध ह्या स्थलीं श्रेष्ठ। ‘तो हा देवदत्त’ खचित आहे॥ ६८॥ ‘अयं’शब्दप्रत्यभिज्ञान
वचन। पूर्वीं अनुभविलेले पदार्थादिकरून। कालांतरीं पाहिले असतां अभिन्न। ‘तोच हा पदार्थ’ ऐसें ज्ञान जें
॥ ६९॥ या दोन्ही पदांच्या वाच्यार्थांत। विशेष्य एकचि असे देवदत्त। परंतु ‘सोऽयं’ या दोन्ही विशेषणांत। विरोध ऐसा
व्यापक॥ १७०॥ म्हणजे गेलेले जे देशकालादिक। आणि वर्तमानकाल देशादिक। टाकूनि दोन्ही पदांचे विरुद्धार्थ
असम्यक्। अविरुद्ध देवदत्तस्वरूप लक्षावें॥ ७१॥ त्या प्रकारेंच तत्त्वमसि या वाक्यांत। तत्पदाचा वाच्यार्थ मायोपाधियुक्त।
सर्वज्ञत्वादि-धर्मविशिष्ट होत। ‘तत्पद’ वाच्यार्थ चैतन्यात्मा ऐसा॥ ७२॥ आणि जो मायाकार्यअविद्योपाधिक।
किंचिज्ञत्वादि-धर्मविशिष्ट परिच्छेदक। चिदाभास तो ‘जीव’ संज्ञक। त्वंपद-वाच्यार्थ ऐसा असे॥ ७३॥ या ‘तत्-
त्वं’ दोन्ही पदांच्या अर्थांत। विशेष्य जें परमात्मस्वरूप सच्चित्। त्या शुद्धपरमात्म-चैतन्यस्वरूपांत। विरोध सहसाही
नसे॥ ७४॥ परंतु सर्वज्ञत्वादि धर्मयुक्त। तथा किंचिज्ञत्वादिधर्मसहित। ह्या दोन्ही धर्मरूपवाच्यार्थाच्या अंशांत।
विरोध वाटत असे॥ ७५॥ म्हणूनि ते दोन्ही विरुद्ध विशेषांश। त्यागूनि घ्यावें शुद्ध ‘चिद्रूप’परमेश। याकरितां ‘भागत्याग-
लक्षणा’ अवश्य। अंगीकारावी विवेकें॥ ७६॥ त्या जहदजहल्लक्षणेचें। प्रतिपादन करिती शास्त्रज्ञ साचें। तेंचि
लक्षण बोलूं अभेदार्थाचें। शुद्धस्वरूपप्राप्त्यर्थ॥ ७७॥ ‘सोऽयंदेवदत्तः’वाक्य ऐसें। म्हणजे ‘तो हा देवदत्त’ असे। टाकूनि
परोक्ष अपैसें। जे जे देशकालादिक॥ ७८॥ तें परोक्ष देशकालादिविशिष्टपण। तथा अपरोक्षदेशकालादिविशिष्टपण
जाण। हे दोन्ही विरुद्धधर्म त्यागून। केवल देवदत्तस्वरूप लक्षावें॥ ७९॥ ‘सः’ आणि ‘अयं’ या पदार्थाच्या ऐक्यासी।
प्रतिपादन करणाऱ्या या भागलक्षणेसी। अखंडार्थबोध व्हावयासी। महावाक्यांत ग्रहण कीजे॥ १८०॥ प्रतिपादित ती
जहदजहल्लक्षणा। ‘जीवब्रह्मैक्यार्थ’ निर्दोष जाणा। म्हणूनि तत्त्वमस्यादि वाक्यांत योजना। करूनि स्वस्वरूप अनुभवावें

।। ८१ ।। तत्पदस्थित परोक्षपणाचा । तथा त्वंपदस्थित प्रत्यक्षादिपणाचा । त्याग करूनि सर्वोपाधींचा । लक्ष्यात्मस्वरूपीं मिळावें ।। ८२ ।। जाणवूनि केवल सच्चिद्रूपासी । 'असि' या पदेंकरून अभेदेंसीं । तत् आणि त्वं-पदार्थाच्या ऐक्यासी । लक्षणा निःसंशय बोधितसे ।। ८३ ।। एवं 'तत्त्वमसि' वाक्यार्थज्ञान । प्राप्त करूनि घेती जे सज्जन । तयांसि ब्रह्मानंदप्राप्ति जाण । हें आशीर्वचन निश्चयें" ।। ८४ ।। यापरी सरल बोध आणि आशीर्वचन । श्रीगुरुमुखें होतांचि श्रवण । अखंडसमाधि बाणली पूर्ण । भुन्याबुवासी तात्काल ।। ८५ ।। विसरले अवघें देहभान । ब्रह्मानंदीं झाले निमग्न । जीवन्मुक्तस्थितीसि जाण । पावले गुरुकृपें भुन्याबुवा ।। ८६ ।। स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । दशमोऽध्याय रसिक हा ।। १८७ ।। इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे दशमोऽध्यायः समाप्तः ।। १० ।। श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ।। ।। ।। ।। ।। ।। ।। ।। ।। ।। ।।

# ॥ अध्याय अकरावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ ॥ शिष्य विनवी गुरुचरणीं । धन्य धन्य आपली तारक वाणी । श्रीगुरुलीला ऐकतां श्रवणीं । तृप्तिच नव्हे अद्यापि ॥ १ ॥ अमृतप्राशनाचा कंटाळा । वृद्ध-तरुणा अथवा बाळा । कधीं नयेचि कोण्या काळा । शाहण्या अथवा वेड्यासी ॥ २ ॥ अमृत प्राशिती स्वर्गींचे अमर । परी स्वर्गीं कंटाळती भोगासी फार । मृत्युलोकीं आम्हांसि नर । जन्म व्हावा इच्छिती ऐसें ॥ ३ ॥ पूर्णब्रह्मसनातन परमेश्वराची उपासना । तथा तीव्र वैराग्य भक्तिज्ञाना । प्राप्त व्हावें ऐशी जनार्दना । करिती विज्ञापना अमर ते ॥ ४ ॥ स्वर्गींच्या दिव्यांगनांच्या भोगांचा । तथा अमृतप्राशनाचा । अमरांसही वीट येतो साचा । शंका यांत तिळ नसे ॥ ५ ॥ ईश्वरेच्छेनें विषाचें अमृत । आणि अमृताचें विष होत । म्हणून अमृतासी अमृत । कशाकरितां म्हणावें ॥ ६ ॥ प्राशनें अतिशय अमृत । भोगादिकांचाही वीट येत । ‘अति सर्वत्र वर्जयेत्’ हें युक्त । अनुभवाचे अंतीं प्रिय वाटे ॥ ७ ॥ अथवा अमृत आटलिया । काय मिळे स्वर्गीं प्यावया । तें ‘अमृत’ नाम मात्र वदावया । आणि ऐकावया गोड लागे ॥ ८ ॥ म्हणूनि हरिगुरुलीलामृत । तेंचि सत्य सत्य ‘परमामृत’ । श्रवणद्वारें प्राशितां हृदयांत । प्रगटे भगवंत अखंड ॥ ९ ॥ हरिगुरुलीलामृत केल्या पान । तेणें तुटे सहज भवबंधन । संसारप्रपंचदेहभान । मिथ्या नाशिवंत कळतें हें ॥ १० ॥ परमात्मा सर्वांतर्यामी । श्रीमद्दत्तात्रेय समर्थस्वामी । अघटित अतुलपराक्रमी । भेटती हृदयीं अनायासें ॥ ११ ॥ पहा भुऱ्याबुवासी निरवधि । बाणली अखंड अद्वैतसमाधि । सुटल्या संशयादिउपाधि । दर्शन होतां योगीश्वराचें ॥ १२ ॥ ते अतिप्रिय कथा महाराजा । तृषार्तासि

लीलामृत पाजा । आपण परोपकारकाजा । सदा तत्पर असतां हो ॥ १३ ॥ ऐकूनि सच्छिष्याची प्रार्थना । आल्हाद झाला गुरुवक्त्याच्या मना । म्हणती धन्य धन्य शुद्ध भावना । तल्लीन झालास श्रवणार्थीं ॥१४॥ परमरहस्य हें तुजनिमित्तें । आठवलें आम्हांसि प्रेमभरितें । वर्षाकालीं जसें उदक भरपूर तें । नदी-कूप-सागरादिकांत ॥ १५ ॥ जैसें जीवन सर्वां जीवां । मित्रचि भासे तथापि राजीवां । पाहिजे सर्वकाळ बरवा । उदकामाजीं निवास ॥ १६ ॥ तैसें अनन्यभगवद्भक्तासी । आणि शुद्धांतःकरण झालेल्या नरासी । परमेश्वराच्या वियोगासी । क्षणभरी देखील न साहवे ॥ १७ ॥ म्हणजे परमेश्वरस्वरूप सर्वत्र । सर्वदा अनुभवीतसे भक्त पवित्र । तयासि श्रीहरिगुरुचरित्र । अत्यंत प्रिय वाटतसे ॥ १८ ॥ गृहांतील सकल मनुष्यांतें । तान्हें बाळ लीलें विलोकितें । परंतु देखतां जननीतें । अति उल्हास दावित ॥ १९ ॥ अन्नावांचूनि प्राणादि न चालती । अन्नावांचूनि न होय क्षुधानिवृत्ति । अन्नोदकावांचूनि नये शक्ति । प्राणिमात्रांसि उघड हें ॥ २० ॥ अन्न भक्षूनि होय क्षुधानिवृत्ति । आणि प्राणी सर्वोपयोगी होती । तैसें भगवद्गुणानुवादें साधूस शांति । आनंदवृत्ति होतसे ॥ २१ ॥ ऐसी सच्चिदानंदनृसिंहमूर्ति-। दर्शनें ब्रह्मापरोक्षानुभूति । शुन्याबुवासी स्वात्मप्रतीति । दृढतर झाली क्षणमात्रें ॥ २२ ॥ आधीं नम्र अमोलिक सुवर्ण । त्यावरी जडिले रत्नखचित कोंदण । शुन्याबुवाचें पवित्रांतःकरण । विरक्तपणासह झालेलें ॥२३॥ संशयें मारिल्या बहुत हांका । दत्तात्रेया जगन्नायका । करुणाकर धांवले क्षणेका । द्वारकाधीश नृसिंह ॥ २४ ॥ महावाक्यार्थ बोधिला सरळ । त्यायोगें परमार्थ निर्मळ । ब्रह्मसाक्षात्कार केवळ । शुन्याबुवांनीं अनुभविला ॥ २५ ॥ समाधि लागली निरुपाधिक । ऐसें पाहून योगींद्रकुलदीपक । वरदहस्त मस्तकीं ठेवून सकौतुक । करिती सावध बुवासी ॥ २६ ॥ नेत्र उघडूनि शुन्याबुवा । विलोकिती देवाधिदेवा । साष्टांगीं नयन रमाधवा । वारंवार करिती ते ॥ २७ ॥ धरिलीं दत्तचरणकमळें । नेत्र भरले प्रेमाश्रुजळें । अहो विश्वेश्वरा संशयजाळें । तोडून केलें मज मुक्त

॥ २८ ॥ पुरुषोत्तमा महेश्वरा । दीनवत्सला कृपासागरा । दर्शन देऊनि भवसंसारा- । पासूनि केलें निवृत्त ॥ २९ ॥
दत्तात्रेय नृसिंह श्रीकृष्ण । द्वारकाधीश नारायण । ब्रह्मसनातन परिपूर्ण आपण । कृतार्थ केलें दासासी ॥ ३० ॥ अनंतकोटिब्रह्मांडनायका
। सगुणनिर्गुणविश्वव्यापका । कूटस्थाक्षर मदनांतका । मोक्षदायका गुरुवर्या ॥ ३१ ॥ ध्यान करितांचि
अंतरीं प्रगटले । तैंचि स्वरूप बाह्य उभें ठेलें । अंतर्बाह्य एकचि दिसले । दत्तात्रेय परमेश्वर ॥ ३२ ॥ अनेक
जन्मांचें सुकृत । आजि उदयासि आलें संचित । मनोरथ जाहले सुफलित । प्रत्यक्ष जगद्गुरुदर्शनें ॥ ३३ ॥ नरवेष
स्वेच्छें करूनि धारण । यतींद्ररूपें करितां जगदुद्धरण । भक्तकार्यकल्पद्रुम पूर्ण । योगीश्वर अद्वितीय ॥ ३४ ॥ चौऱ्यांयशीं
लक्ष योनी फिरतां । नृदेह प्राप्त झाला तत्त्वतां । आपल्या महद्दर्शनें सायुज्यता । स्वस्वरूपीं पावलों ॥ ३५ ॥ ज्यासाठीं
मीं आजपर्यंत । आचरिलें अनुष्ठान जपव्रत । ते आजि सहज द्वारकानाथ । श्रीकृष्णभगवंत देखिले ॥ ३६ ॥ तेथें उभेसे
होते जे साधुसंत । ते पाहूनि झाले आश्चर्यभरित । म्हणती प्रत्यक्ष श्रीगुरुदेवदत्त । देखिले स्वामीयोगीराज ॥ ३७ ॥ मग
षोडशोपचारें पूजन । मंगलारती ओंवाळिती जन । महोत्साहसमारंभ कीर्तन । गीत वाद्यें वाजतीं ॥ ३८ ॥ श्रीगिरिनारीदत्तावधूत
। नामें गर्जती हर्षभरित । जयजयकार त्रिभुवनांत । मावेनासा जाहला ॥ ३९ ॥ सुमनें वर्षती अपार । सुगंधवायूनें
दाटलें चराचर । एकचि ब्रह्मानंदसागर । उचंबळला वृत्तिलहरीनें ॥ ४० ॥ ब्रह्मोदधींतील लहरी । सर्वदा अभिन्न
सदाकारी । श्रीकृष्णविष्णुमय द्वारकापुरी । कोठें वेगळी दिसेना ॥ ४१ ॥ द्वारावतींत महानंदप्रसंग । घडला परमपुरुषपरमहंससंग
। ओतप्रोत भरला निजरंग । अभंग लीलामृताचा ॥ ४२ ॥ इत्थंभूत हरिगुणलीलामय । तो प्रसंग वर्णिला
नव जाय । वदविता दत्तात्रेयस्वामिराय । मी नव्हे वामनदास खरा ॥ ४३ ॥ मी कोण पदार्थ काय लिहिणार । गलित
झालासे अहंकार । अवघा हरि जगदीश्वर । मीतूंपणविरहित ऐसा ॥ ४४ ॥ समग्र तूंचि दत्तात्रेय हरि । तूं जीवन असती

मी लहरी । तुजवीण मी कोणत्याही प्रकारीं । भिन्न नव्हें क्षणमात्र ॥ ४५ ॥ परमात्मास्वरूप शब्दविरहित । निःशब्द चैतन्यदोषरहित । तथापि शब्दींच वर्णिलें जात । वेदशास्त्रपुराणीं ॥ ४६ ॥ अज्ञानचर्मचक्षूंनीं कोठें न दिसे । परी सर्वत्र परब्रह्म आहे तैसेंचि असे । आणि तें शब्दींच गवसे । वेदोपनिषदादिकांत ॥ ४७ ॥ 'तत्त्वमस्यादि' महावाक्यार्थज्ञानें । प्रदिपादित जें लक्षणेनें । जीवब्रह्मैक्य स्वानुभवानें । प्राप्त होतें निश्चित तें ॥ ४८ ॥ ती ब्रह्मप्राप्ति अपरोक्षानुभूति । भुन्याबुवासी लाधली सहजस्थिति । याच नृदेहीं 'चक्षुर्वै सत्यं' प्रतीति । मुक्तीचा सोहळा उपलब्ध झाला ॥ ४९ ॥ धन्य धन्य नृसिंहमुनीश्वर । श्रीकृष्णदत्तात्रेय गुरुवर । दर्शनमात्रें यथेप्सित वर । देऊनि सार्थक करिताति ॥ ५० ॥; या उत्साहसमारंभामाजीं । एक अंधभक्त सुरदासजी । तथा वामनाचा पिता रावजी । त्या कालीं उभे होते ॥ ५१ ॥ श्रीनृसिंह गुरुदत्तात्रेयाप्रति । सुरदास साधु करी विनंति । नेत्रीं पहावी श्रीगुरुमूर्ति । इच्छा मानसीं उपजली ॥ ५२ ॥ मग प्रार्थिती भुन्याबुवा । जगद्वंद्या महादेवा । रावजीवैद्यासी प्रसाद बरवा । व्हावयासी पाहिजे ॥ ५३ ॥ तैसेंचि अंध सुरदासासी । दर्शन द्यावें अनाथासी । हेंचि मागणें चरणांपासीं । मनोरथ पुरवी दयाळा ॥ ५४ ॥ ऐकूनि प्रियभक्ताचें वचन । कळवळले दत्तदेव दयाघन । म्हणती पाहीं नेत्र उघडून । सुरदास भक्तासी ॥ ५५ ॥ आशीर्वचन सार्थक शुभ । श्रवण करूनि आत्मलाभ । व्हावया नेत्र उघडण्यास प्रारंभ । कैसा सुरदास वदे ॥ ५६ ॥ मी जन्मांध पातकी । परी समर्थाज्ञा वंद्य मस्तकीं । कृपाप्रसाद वरद हस्तकीं । महत्पुण्यें प्राप्त झाला ॥ ५७ ॥ श्रीगुरुदत्तात्रेय-पादुकांवर । घातला साष्टांग नमस्कार । जयजय ब्रह्मा विष्णु महेश्वर । दया करा मायबापा ॥ ५८ ॥ समर्थांच्या आशीर्वचनास । पात्र नव्हे मी अंध सुरदास । परमपुरुष परमात्मा परमहंस । जगद्धितार्थ अवतरतां ॥ ५९ ॥ अधिकार न पाहतां सदैव । कृपा करावी हाचि दृढभाव । कोणी कसाही असो परी भिन्नभाव । नाहीं आपुल्या ठायीं देवा ॥ ६० ॥ बहुत दिवसांचा सेवक । अथवा दर्शनार्थ तात्कालिक ।

आलों असतांही समत्व एक। न्यूनाधिक नसे कदा ॥ ६१ ॥ मुलें लेंकरें मायबापां। प्रियचि असती असंतापा। प्रजा जैशी न्यायीधर्मीभूपा। आवडतसे सप्रेम ॥ ६२ ॥ श्रीहरि-सद्गुरूसी भक्त सेवक। याहूनि आवडती अधिकाधिक। दृष्टांत उपमा एकदेशात्मक। विश्वव्यापका न साजे ॥ ६३ ॥ सुरदास ऐसें बहुत स्तवन करित। तंव चमत्कार वर्तला अद्भुत। स्वच्छ सुंदर नेत्र अकस्मात्। उघडले तयाचे श्रीकृपें ॥ ६४ ॥ मग दत्तात्रेय शिवमूर्ति। सुरदासें विलोकिली निश्चितीं। सगळे पाहूनि आश्चर्य मानिती। वदती साक्षात्परमेश्वर हे ॥ ६५ ॥ नंतर जगदीश-चरणीं। सर्वत्र शुद्धान्तःकरणीं। लोळती म्हणती अघटित करणी। ब्रह्मादिकांसी अगम्य ॥ ६६ ॥ श्रीचरणारविंदां सुरदास। नमन करूनि स्तवनास। वदे भगवंता जन्मगर्भांधास। दिसूं लागलें सर्व आतां ॥ ६७ ॥ समर्थांचा अद्भुत सहज खेळ। मधुर भाषण आणि प्रेमळ। परोपकाराकरितां केवळ। महीवरी संचरणें ॥ ६८ ॥ करुणाकरा सहज स्वभावें। जगताचें कल्याण करावें। दीनशरणागतांसी संरक्षावें। संस्थापावें सद्धर्मा ॥ ६९ ॥ साधूंचें करावें परित्राण। आणि खलदुष्टांचें हनन। धर्मसंस्थापनार्थ अवतीर्ण। युगायुगीं होतां जी ॥ ७० ॥ समस्त जगतासी आधार। स्वामी पूर्णब्रह्म परमेश्वर। श्रीपाद नरहरि दत्तगुरुवर। चराचरव्यापक आहां ॥ ७१ ॥ सर्व जीव अविद्या-अज्ञानवश। संसार प्रपंचीं अहर्निश। सुखाचा नसूनि लवलेश। मानिती सौख्य चिरकाल ॥ ७२ ॥ देह नाशिवंत क्षणभंगुर। उपभोग प्रपंच संसार। अत्यंत विरस निःसार। असूनि सरस मानिती ॥ ७३ ॥ मनीं अति निःसार जाणती। नाशिवंत मुखानें म्हणती। परंतु अज्ञान मोहवर्ती। प्रीति न सोडिती कदापि ॥ ७४ ॥ कंटाळा संसारोपभोगाचा। धनस्त्रीपुत्र-देशादिकांचा। कधींही न मानिती सुखाचा। लेश मात्र नसूनि ॥ ७५ ॥ या कलिरायाच्या युगांत। प्राणी विषयोपभोगीं बहुत आसक्त। विद्याधनादिक-मदें गर्वान्वित। उन्मत्त लंपट जाहले ॥ ७६ ॥ देहाभिमानाच्या स्वाधीन। सर्वदा तत्पर झाले जन। नेत्र भरले धुरेंकरून।

ते कैसे ईश्वर ओळखिती ॥ ७७ ॥ आचार्य-जननी-जनकासी । साधुसंत-महात्मेजनांसी । वेदशास्त्रविहित सद्धर्मासी । गर्वें अनादर करिती ॥ ७८ ॥ ते परमेश्वररूप अगाध । अवतारिक पुरुष दर्शनीय सिद्ध । नोळखिती विषय-मदान्ध । वार्ता देखील नायकती ॥ ७९ ॥ परंतु संकट रोग दरिद्र । संसारांतील गृहछिद्र । अनेक दुःखें व्याकुल अभद्र । झालें म्हणजे उमजती ॥ ८० ॥ संसारिक दुःखें पोळती । आधिव्याधीनें भाजती । महत्संकटीं वारंवार लोळती । मग येती शुद्धीवरी ॥ ८१ ॥ ऐशा अज्ञानी प्रापंचिकांतें । आपणचि समर्थ शुद्धिदाते । कनवाळु उद्धरूनि वरदहस्तें । कृतार्थता देत असां ॥ ८२ ॥ हें श्रवण करोनि अवधूत । म्हणती प्रसन्नवदनें त्वरित । त्रिविधितापांपासूनि विरक्त । ब्रह्मज्ञानी होशील ॥ ८३ ॥; तदनंतर नृसिंहमुनि । भुन्याबुवासी सांगती खूण जुनी । या रावजी वैद्या लागूनि । दोन वेळां भेटलों ॥ ८४ ॥ श्रीकाशीक्षेत्रीं जान्हवीतीरीं । यांची जननी दुखणेकरी । रखुमाई नामाची विधवा स्त्री । झाली होती त्या काळीं ॥ ८५ ॥ अहल्या स्त्रीसह हे रावजी । करित होते बहुत काळजी । भोळे भाविक शुद्धचित्त सहजीं । यांचें निरंतर असतें हो ॥ ८६ ॥ या नगरकर वैद्यांचे वंशांत । सप्तशृंग निवासिनी जगदंबा सतत । प्रसन्न असे कृपाप्रसादयुक्त । तैसेचि त्र्यंबकेश्वर ॥ ८७ ॥ शुद्ध वेदोक्तमार्गी सरल । वैदिकब्राह्मण हे सच्छील । संस्थानी परी दुर्बल । झाले परमार्थास्तव हो ॥ ८८ ॥ यांचे पूर्वज सिद्ध पुरुष । होत आले प्रसादें विशेष । हे आमचे प्रियभक्त निर्दोष । रागद्वेषरहित जे ॥ ८९ ॥ यांसी नसूनि किमपि भ्रांति । सदाचारें तीर्थयात्रा करिती । यांचे मातुश्रीस आम्ही हातीं । धरूनि केलें सावध ॥ ९० ॥ यांची लहान कन्या काशी । आम्ही भेटण्याचे पूर्व दिवशीं । उत्तम शिवक्षेत्रीं पंचत्वासी । पावली होती खूण ऐका ॥ ९१ ॥ पुन्हां ब्रह्मावर्त प्रसिद्ध क्षेत्रीं । विश्वनाथ ब्राह्मणाचे घरीं । यासी दर्शन देऊनि संकट दुरी । केलें आम्ही जाणा हो ॥ ९२ ॥ रावजीनीं ऐकूनि हें श्रीमुख । पाहतांचि पटली खूण ओळख । मग अंतरीं

उपजोनि हरिख । साष्टांग दंडवत घातलें ॥ ९३ ॥ क्षमा असावी भगवंता । अपराध्यासी जगन्नाथा । आपुले चरणकमलीं आतां । अनन्य शरण जाहलों ॥ ९४ ॥ मी मूढमति संसारिक । कैसें नोळखिले कमलानायक । दत्तावधूत योगीश्वरतिलक । जगत्पालक नृसिंहमुनि ॥ ९५ ॥ आपण प्रत्यक्ष परमपुरुष । पूर्णपरब्रह्म निर्विशेष । असंख्य अक्ष पाद शीर्ष । अनंतावयव निरवयवी ॥ ९६ ॥ पृथ्वी आप वायु आकाश तेज । स्थिरचरीं व्यापलां तेजःपुंज । दिशा भरूनि उरलां शाश्वत अज । दशांगुलपरिमित तिष्ठतसां ॥९७॥ 'दशांगुल' उपलक्षण म्हणिजेत । ब्रह्मांडा बाहेरही सर्वगत । पुरुष सर्वत्र व्याप्यावस्थित । पुरुषसूक्तीं ऐसा अर्थ असे ॥ ९८ ॥ अथवा नाभिस्थानापासून । दशांगुलें अतिक्रमून । हृदयीं स्थित असे नारायण । तेंचि आपण साक्षात् आहां ॥ ९९ ॥ आपुली कारणावस्था अतिक्रमून । जगदावस्था परिदृश्यमान् । प्राण्यांच्या कर्मफलभोगार्थ जाण । पुरुषोत्तमा स्वीकारितां ॥ १०० ॥ तस्मात् पुरुषचि सर्व असे । आणि जगत् नाशिवंत दिसे । म्हणून परिणामत्व येत असे । ऐसी आशंका होईल जरी ॥ १ ॥ 'अमृतत्व' म्हणजे अमरण धर्माचा । अविनाशी स्वामी मुक्तीचा । त्या मोक्षेश्वरासी जननमरणाचा । नाहींच स्पर्श कधींही ॥ २ ॥ या पुरुषाचा महिमा स्वकीय । सामर्थ्यवंत अतिशय । जगत्संबंधास्तव म्हणणें होय । वास्तवस्वरूप हें वसे ॥ ३ ॥ सकल विश्व जीं सर्वभूतें । कालत्रयवर्ती प्राणिमात्रादि ते । उत्पन्न झालेलें अवघें एकपाद तें । या पुरुषाचा चतुर्थांश ॥ ४ ॥ या पुरुषाचें अवशिष्ट अमृत । त्रिपाद स्वरूप विनाशरहित । तें द्योतनात्मक अवतिष्ठत । स्वप्रकाश स्वरूपें आपण ॥ ५ ॥ यद्यपि ' सत्यंज्ञानमनंतंब्रह्मेति ' । ऐशी गर्जे वेद श्रुति । इयत्ता मुळींच नसे ती । परब्रह्मस्वरूपीं सदा ॥ ६ ॥ इयत्तेचा अभाव असून । 'पादचतुष्टय' हें अशक्य निरूपण । या शंकेचें यथार्थ समाधान । परिसावें आदरेंकरूनि ॥ ७ ॥ 'बृहत्' म्हणजे अत्यंत अतिविस्तृत । आहे ब्रह्मस्वरूप सत्य-ज्ञान-अनंत । आणि 'अत्यल्प' हें जगत् नाशिवंत । मिथ्या दृश्य ऐसें बोलिजेलें

॥ ८ ॥ पूर्णब्रह्म आपण स्वयंप्रकाश । अनंतकोटि-ब्रह्मांडाधीश । जैसें सर्वत्र व्यापक आकाश । घटमठादिकांसी
॥ ९ ॥ घटमठादि उपाधि असतां । अथवा घटादि भंगले असतां । परी महदाकाश अचल तत्त्वतां । आहे तैसेंचि
सिद्ध असे ॥ ११० ॥ जेवीं मंदांधःकार सांजवेळीं । दोरी पाहूनि सर्पभ्रांति झाली । देखणारासी भीति वाटली । कांपूं
लागला थरथरां ॥ ११ ॥ सर्प देखोनियां रडे पडे । तों इतुक्यांत ऐकूनि लोक जमले । काष्ठें मुसळ शस्त्र आणिलें ।
दोरीचा सर्प मारावया ॥ १२ ॥ मग बोलती धीर कित्येक । आणा आणा रे त्वरें दीपक । आणूनि सगळे पाहती लोक ।
परी न दिसे सर्प कोठेंही ॥ १३ ॥ रज्जूचि पडली दिसे स्पष्ट । विलोकितांचि आलें धारिष्ट । विलया गेली सर्पगोष्ट ।
रज्जुज्ञान झाल्यानें ॥ १४ ॥ अधिष्ठानसत्यत्वेंकरून । कल्पित जगत्मिथ्यत्वाचें होय ज्ञान । रज्जूवरी उपजे अज्ञान ।
वक्रतादि सादृश्ययोगें ॥ १५ ॥ मंदांधःकारीं सर्पग्रह ज्यासी । म्हणजे सर्पबुद्धि अव्युत्पन्नासी । सर्पभ्रांति होते अज्ञानासी ।
परंतु व्युत्पन्नासी होतचि नाहीं ॥ १६ ॥ तैसेंचि आत्मज्ञानावांचून । प्रकाश सादृश्ययोगेंकरून । चिज्जडग्रंथिरूप
चिदाभासभ्रम । होतो अविवेकी नरासी ॥ १७ ॥ भ्रम मिथ्याकल्पित वस्तूवरी । भ्रमाचें अधिष्ठान तें निर्विकारी ।
परमार्थज्ञानसंपन्न जो अधिकारी । ऐशियास भ्रम नसेचि ॥ १८ ॥ हेंचि वेदान्तसिद्धान्तरहस्य । ब्रह्मात्मा अधिष्ठान
अव्यय । म्हणूनि 'विवर्तोपादान' कारण होय । नव्हे 'आरंभ-परिणाम' ॥ १९ ॥ पूर्वावस्थेचा अपरित्याग असोन ।
अवस्थांत प्राप्तिलक्षण । तेंचि उक्त विवर्तोपादान । कारण कथिलें वेदांत-ग्रंथांत ॥ १२० ॥ तस्मात आकाशादि देहान्तपर्यंत
। म्हणजे जगत्-विस्ताराचें उक्त । मायाशबल चैतन्यावांचून अन्यत् । परमाणु अथवा प्रकृति ॥ २१ ॥
प्रकृत्यादि उपादान कारण । न संभवे परब्रह्माविण । 'तस्माद्वा एतस्मादात्मन । आकाशः संभूत' इत्यादि श्रुति ॥ २२ ॥
म्हणूनि प्रत्यक्ष परमात्मा आपण । परमपुरुष परमहंस निर्वाण । विश्वव्यापक आहां जगत्प्राण । अभेद निःसंशय दयाब्धे

॥ २३ ॥ विश्वोद्भवस्थितिप्रलयासी । कारण असून स्वतंत्रेसी । जगद्धितार्थ अवतारकृत्यासी । स्वच्छंदें धारण करितां
हो ॥ २४ ॥ आपुलें कर्तव्य अगाध लीला । अशक्य अगम्य आहे मानवाला । वेदशास्त्रें पुराणादि निजस्तवनाला ।
करितां उपरम पावती ॥ २५ ॥ हे प्रभो स्वलीला अपारविचित्र । सर्वथा अगम्य गुरुदेवचरित्र । तथापि श्रद्धाभक्तीनें गातां
पवित्र । इहपरत्र सार्थक्य होतें ॥ २६ ॥ श्रीचरणदर्शनें पावन । झालों कृतकृत्य मी मतिहीन । म्हणून साष्टांगीं
अनन्यनमन । रावजी वैद्य करिती हो ॥ २७ ॥ प्रेमळ निजभक्तमुखें स्तवन । ऐकूनि आनंदले अत्रिनंदन । म्हणती
परमात्मस्वरूपीं झालां तल्लीन । संदेहरहित निश्चितार्थें ॥ २८ ॥ तुमचे वंशांत सर्व सौख्यार्थप्रद । शिवशक्तीचा
कृपाप्रसाद । आहे तोचि वृद्धिंगत परमानंद । असो सुस्थिर निरंतर ॥ २९ ॥ तुमचा ज्येष्ठपुत्र शुद्ध वैदिक । वेदविहित-सदाचारी
सविवेक । त्यास आमुचें दर्शन होईल निश्चयात्मक । दक्षिणदेशीं यवनप्रांतीं ॥ १३० ॥ दुसरा पुत्र प्रंपचरहित ।
शिवभक्त कुशल ब्रह्मचर्यव्रत । ठेंगणा भूतहितासी रत । सत्य स्पष्टवक्ता होईल ॥ ३१ ॥ आमुचें दर्शन तयासी ।
निःसंशय कर्नाटकदेशीं । होईल जाणा निजक्षेत्रासी । संदेह यांत तिळ नसे ॥ ३२ ॥ आमचा प्रियभक्त तिसरा पुत्र ।
गुरुसंप्रदायप्रवर्तक अहोरात्र । ज्ञानविज्ञानसंपन्न नित्य पवित्र । केवल विरक्त होईल ॥ ३३ ॥ सद्धर्मीं निरत सदाचारी ।
सत्यप्रिय मधुर निर्मळ वैखरी । दास आमचा जनहितकारी । निर्विकारी निःस्पृह ॥ ३४ ॥ तो आमचे गुणानुवादलीला ।
ग्रथित करील जगद्धिताला । निःसंशय ह्या आशीर्वचनाला । सत्य सत्य जाणावें ॥ ३५ ॥ ; रावजीस ऐसें आशीर्वचन देऊन ।
निघाले झडकरी अनसूयानंदन । गोमती तीर्थाचें महिमान । सांगती सेवकजनांसी ॥ ३६ ॥ गोमतीतीर्थ गोमयस्नान ।
करितां होती जन पावन । आणि तीर्थाचे तीरीं गोदान । सन्मनानें अर्पितां पुण्यप्राप्ति ॥ ३७ ॥ गोपितीर्थीचें गोपीचंदन
भाळीं । लावितां पुनीत होती तात्काळीं । गोपीनाथाच्या दर्शनें मायाजाळीं । न गुंतती कदाही ॥ ३८ ॥ हे अति दुर्लभ

* * *

पंच गकार । पूर्व सुकृतें लाधती नर । चक्रतीर्थ पद्मतीर्थ शंखोद्धार । अपारपुण्यदायक ॥ ३९ ॥ शंखोद्धारतीर्थीं शंख
अनेक । सुंदर शोभिवंत असती लाभकारक । देवपूजेंत शंख आवश्यक । असलाचि पाहिजे सर्वदा ॥ १४० ॥ शंखोदक
देवासि असे प्रिय । म्हणूनि पांजजन्य मान्य होय । द्वारकावतीक्षेत्र देवतामय । दर्शनीय आहे तारक ॥ ४१ ॥
सप्तपुरींमाजीं क्षेत्र द्वारकावती । जेथें श्रीकृष्णभगवंताची मूर्ति । परब्रह्मस्वरूप अखंड स्थिति । जगदुद्धारार्थ विराजे
॥ ४२ ॥ गोमतीसमुद्र-संगमांत । पंचकूप गोड मधुरजलयुक्त । असती विराजमान शोभिवंत । त्यांतून उदक लोक नेती
॥ ४३ ॥ धन्य धन्य महत्क्षेत्र द्वारका । पुण्य दर्शनें समान रावरंका । श्रीकृष्णपरमात्मा तीन लोकां । भक्तसखा
उद्धरीतसे ॥ ४४ ॥ अनेकतीर्थें अनेक दैवतें खचित । परी ‘एकोविष्णुर्महद्भूत’ । त्रैलोक्यासी व्यापक सदोदित ।
भूतांतरात्मा करुणार्णव ॥ ४५ ॥ तीर्थमहिमा संक्षेपें सांगोनी । पातले सकळ भुऱ्याबुवाचे स्थानीं । श्रीदत्तावधूतासी
सिंहासनीं । बैसवूनि पूजिती समस्त ॥ ४६ ॥ मंगलकारक आरती । भक्तजन भावें ओंवाळिती । सद्गुरु दत्तात्रेय नामें
गर्जती । जयजयकार करिती आनंदें ॥ ४७ ॥ वीणा मृदंगादि करताल । वाद्यें झर्झरी वाजती ताल । सुस्वर रागरागिणी
मंजुल । गायक गाती उल्हासें ॥ ४८ ॥ तल्लीन झाले साधुवृंद । जिकडे तिकडे परमानंद । दत्तात्रेयगुरु सच्चिदानंदकंद ।
अंतर्बाह्य व्यापिला ॥ ४९ ॥ श्रीकृष्ण दत्तात्रेय नृसिंहमुनि । द्वारावतींत भुऱ्याबुवाचे सदनीं । साधुवृंदांस कृतार्थता
अर्पुनी । अंतर्धान पावले ॥ १५० ॥ पुढिले अध्यायीं कथा रसिक । वदवील अखिल ब्रह्मांडनायक । श्रवणें इहपर होतसे
सार्थक । श्रोतीं सादरें परिसावें ॥ ५१ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामन
विरचित । एकादशोध्याय गोड हा ॥ १५२ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे एकादशोऽध्याय समाप्तः ॥ ११ ॥
श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय बारावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ ॥ गुरुरायास शिष्य विनवी । श्रीगुरुलीलामृतचवी । वारंवार ग्रहण करावी । तृप्ति व्हावी यथार्थ ॥ १ ॥ जैसी पुनः पुनः लागे क्षुधा । अन्नादि-भक्षणें जाय बाधा । गुरुलीला प्रबोध-सुधा । प्राशन करवा मजलागीं ॥ २ ॥ श्रवणद्वारें प्रचुरपान । व्हावया झालें उदित मन । कृपा करूनियां कथन । करा पावन निजदासा ॥ ३ ॥ तंव श्रोते वदती वियोग । अवधूतलीला राजयोग। न साहवे क्षणेक वेग । कथा-प्रसंग वदा जी ॥ ४ ॥ पतिव्रतेसी वियोग पतीचा । असह्य होय निमिषाचा । श्रोत्रियब्रह्मनिष्ठ सद्गुरूचा । सच्छिष्यासी तद्वत् ॥ ५ ॥ श्रवणासि आलिया अंतराय । नुमजती सच्छास्त्राभिप्राय । कथामृतपानासी अवश्य । चित्त संलग्न पाहिजे ॥ ६ ॥ श्रवणसमयीं वृथा कुतर्क । नसावा अन्यकामसंपर्क । रहस्य कळावया सुतर्क । मर्यादाविहित करावे ॥ ७ ॥ तस्मात् कुतर्क परित्यागुनी । श्रुत्याश्रय करावा मुमुक्षुजनीं । शमदमादिचतुष्टयसाधनीं । युक्त मुमुक्षु पाहिजे ॥ ८ ॥ गुर्वाज्ञासेवातत्पर । शिष्य असावा सुमति चतुर । निष्काम शुद्धमानस निरंतर । श्रवणातुर सुशील ॥ ९ ॥ ऐकूनि श्रोतियांचें वचन । वक्ता बोले प्रसन्नवदन । तुम्ही जाणतां ज्ञानविज्ञान । श्रोते शुद्ध मानसें ॥ १० ॥ वक्त्याचा न्यूनाधिकदोष प्रसंगीं । श्रोतेच जाणती सत्संगी । अध्यात्मविद्या श्रोतियांचे अंगीं । सशास्त्र सदा वसतसे ॥ ११ ॥ श्रोतियांचें होतां अनवधान । कथाभाग होई रसहीन । भक्तिज्ञानवैराग्यसंपन्न । श्रुत्यर्थरसज्ञ श्रोते हो ॥ १२ ॥ श्रोते तुम्ही परमचतुर । क्षमाशांतिदयागुणयुक्त गंभीर । परब्रह्मपरंधाम परात्पर । अर्थज्ञलक्षणप्रमुख ते ॥ १३ ॥ ज्याकरितां विहितकर्मधर्म । समाधि-

योग प्राणायाम । अपरिमित साधनें निष्काम । जन्मोजन्म आचरती ॥ १४ ॥ सर्वांतर्यामी जयाचा निवास । ओतप्रोत ज्योतिराभास । ज्याची वेद पुराणें इतिहास । कीर्ति गाती अखंड ॥ १५ ॥ दीन हीन पंगु अंध दुर्बळ । दरिद्री रोगी दुःखी सकळ । विश्वकुटुंबवत्सल दयाळ । संरक्षणार्थ संचरे ॥ १६ ॥ स्वच्छंदें व्यवहारी स्वतंत्र । जो सर्वकाल भक्तपरतंत्र । संपूर्णविश्वप्रकाशक मित्र । लीला विचित्र जयाची ॥ १७ ॥ यतिपति असूनि विश्वकुटुंबी । काषाय वस्त्र करीं दंड तुंबी । निर्लेप विभासक निरालंबी । नरवेषधारी हिंडतसे ॥ १८ ॥ दृढ वैराग्य असूनि सर्वभूतीं । ज्याची सदोदित प्रीति । भिक्षुक असून जगदीश श्रीमंती । असे अगम्य चरित्र जयाचें ॥ १९ ॥ ज्यानें धर्मराजाच्या मखांत । उच्छिष्टपत्रावळी काढिल्या अमित । अर्जुनरथींचा सारथी होत । अश्व धूत पार्थाचे ॥ २० ॥ स्तंभीं प्रगटला प्रल्हादास्तव । तोचि नृसिंहेश्वर वास्तव । ऋषि योगी सकल करिती स्तव । अवतरला कलियुगीं तोचि ॥ २१ ॥ प्रसिद्ध काठेवाडप्रांतीं । सौराष्ट्रदेशीं गिरनारपर्वतीं । जुनागढ जयासी म्हणती । यात्रेसि जाती सकळिक ॥ २२ ॥ गिरनारपर्वत विराजमान् । श्रीमद्दत्तात्रेय सनातन । त्या प्रभुचें प्रियवसतिस्थान । असे प्रख्यात श्रोते हो ॥ २३ ॥ जेथें मुनि योगि व्रती तपी । भक्त विरागी अनुष्ठानी जपी । रोगी दुःखी त्रिविधतापी । स्वस्वकार्यार्थी वसती ते ॥ २४ ॥ ब्रह्मचारी संन्यासी गृहस्थ । साधु संत महंत वानप्रस्थ । व्हावयासी पूर्ण मनोरथ । येती समस्त रावरंक ॥ २५ ॥ अलखनिरंजनगुरु गिरिनारीं । श्रीदत्तावधूतध्वजाधारी । त्रैलोक्यासी भरंवसा भारी । ऐसें वदती सकल सदा ॥ २६ ॥ अशा प्रसिद्ध गिरनारपर्वतीं । श्रीमन्नृसिंह विश्वपति । गौमुखतीर्थीं येऊनि वसती । सर्वभूतहितास्तव ॥ २७ ॥ आपलें पूर्वींचें प्रिय स्थान । पूर्णब्रह्म श्रीगुरु अत्रिनंदन । परमहंसरूप धारण करून । अवलोकनार्थ पातले ॥ २८ ॥ अमानुषिक अवतार कृत्य । जगदुद्धरणार्थ ज्याचें स्तुत्य । 'अहमात्मा' स्वरूप उपलब्ध नित्य । तो गिरिनारीं हिंडतसे

॥ २९ ॥ गौमुख तीर्थाहून मार्गें पादचारी । शेषनारायण पादुका मध्यंतरीं । आम्रवृक्ष शोभा साजिरी । असती लतासमूह
॥ ३० ॥ पुढें तीर्थ हनुमानधारी । हनुमानमुखें वाहतसे वारी । हनुमंत मूर्ति दुजी सामोरी । सुंदर ध्यान स्वरूप असे
॥ ३१ ॥ या हनुमानधारी स्थानांत । वसती विरागी साधुमहंत । दर्शनासी येती जन बहुत । पाहूनि हनुमंता आनंदती
॥ ३२ ॥ पादचारी अति लहान वाट । सभोंवतीं वृक्षलता घनदाट । जिकडे तिकडे सुगंध अवीट । आनंदप्रद
भरलासे ॥ ३३ ॥ त्या हनुमानधारी स्थानीं । योगीश्वर श्रीनृसिंहमुनि । वसते झाले द्वय रजनी । भक्तजनांच्या आग्रहें
॥ ३४ ॥; त्यांत एक विरागी पांगळा । त्यानें योगीश्वर देखिले डोळां । नमन करावया उतावळा । झाला परी हालवेना
॥ ३५ ॥ 'हात जोडूनि म्हणे बावा । चरणीं ठाव प्राप्त व्हावा । असा हेतु सोत्कंठ बरवा । माझ्या मानसीं उपजला
॥ ३६ ॥ काय करूं आतां उपाय । न हालती न चालती पाय । दीनदुर्बळ झाला निरुपाय । प्रारब्धहीन मी असें
॥ ३७ ॥ मोठमोठ्यानें मारीत हाका । अहो अनंतब्रह्मांडनायका । गुरुगिरिनारी उभे ठाका । चरणपादुका वंदीन
॥ ३८ ॥ मी पंगु अनाथ पराधीन । आपण परमेश्वर दीनदयाघन । अप्राप्त झालें उदकान्न । तैसेंचि दर्शन मजलागीं
॥ ३९ ॥ दिसतां आपण नरवेषधारी । अज्ञानें नोळखिती नरनारी । परी साक्षाद्दत्तात्रेय हरि । गिरिनारीं मज भासतसां
॥ ४० ॥ दीनवाणी श्रवण करून । द्रवले महादेव त्रिलोचन । पंगूसि बोलती मधुरवचन । आक्रोश रुदन करिशी कां
॥ ४१ ॥ चक्षु झांकोनि इकडे यावें । त्वां मागें पुढें न अवलोकावें । निर्भय धैर्यें त्वरित उठावें । संशय किमपि धरूं
नये ॥ ४२ ॥ तेथें असलेले साधु कित्येक । तैसेचि जमलेले यात्रस्थ लोक । म्हणती उपजत पंगु हा मूर्ख । ऐकतो काय
जोगड्याचें ॥ ४३ ॥ गर्भस्थपंगु कोणी चालतां । न देखिला, ऐकिली न वार्ता । सिद्धि-साक्षात्कार बोलण्यापुरता । सत्य
न होय कदाकाळीं ॥ ४४ ॥ असे ईश्वररूप म्हणून । भूमंडळीं फिरती रात्रंदिन । या कलियुगांत साधु संत जन ।

अवतारिक कशाचे ॥ ४५ ॥ साधुविरागी उदरभरणार्थी । कोठें कोणी नसती परमार्थी । आम्हांस संशय नसे यदर्थी । ऐसें बोलती निष्ठुर ते ॥ ४६ ॥ अंगासी लावूनियां राख । जटा वाढवूनि रंगितमुख । टिळे माळा वाजविती शंख । आपणांसी साधु म्हणविती ॥ ४७ ॥ जटिल मुंडी लुंचित केश । काषायांबर कृतपरिवेष । मठ महंती काम राग आवेश । उदरनिमित्त वेष बहु करिती ॥ ४८ ॥ ते हिंडती जरी चारी धाम । अथवा वसविती संस्थान ग्राम । संपादिती बहु वित्त हेम । घृत पक्वान्नादिक भक्षिती ॥ ४९ ॥ नग्न अथवा कौपिनवस्त्र । अज्ञातयोग वेदांतसार शास्त्र । द्वेषी निंदक वाग्बाणास्त्र । अशस्त्र वध करिती ते ॥ ५० ॥ ते कैंचे साधु विरागी भक्तजन । सत्यभक्ति-वैराग्य-विहीन । नसे जयांसी ब्रह्मात्मज्ञान । कर्मानुष्ठानशून्य ते ॥ ५१ ॥ ऐशा क्षेत्रस्थ पाषाणहृदया । कैंची ज्ञात सर्वभूतदया । द्रव्यावांचूनि अन्य क्रिया । न जाणती साधु हे ॥ ५२ ॥ असो त्या दीनपंगूस पाचारिती । जगदात्मा गुरु नृसिंहयति । शिरसां आज्ञा मानूनि निश्चितीं । चित्तीं हर्षित जाहला ॥ ५३ ॥ पंगु बोले आतां कांहीं होवो । मम देह राहो अथवा जावो । तो भगवंत मजला पावो । दृढनिश्चयात्मक दयाळु ॥ ५४ ॥ मग पंगूनें नेत्र झांकिले । श्रीमत्परमहंस मनीं चिंतिले । म्हणे देवाधिदेवा मज सांभाळिलें । पाहिजे आपण समर्थांनीं ॥ ५५ ॥ ऐसें वदूनि पंगु झडकरी । उठून चालला पादचारी । देखती समस्त साधुब्रह्मचारी । म्हणती काय आश्चर्य हें ॥ ५६ ॥ समर्थांचिया चरणांजवळ । ठेवितां सद्भाव न लागतां वेळ । गर्भस्थपंगु सवेगें तात्काळ । चालत गेला साहजिक ॥ ५७ ॥ मग पंगु नृसिंहचरणारविंदां । सच्चित्सुखात्मकआनंदकंदा । दीनभक्तजनवत्सल मुकुंदा । परमानंदा वंदितसे ॥ ५८ ॥ म्हणे जयजय हो गुरुगिरिनारी । श्रीमद्दत्तात्रेयध्वजाधारी । विश्वेश्वरा भरंवसा भारी । आहे चराचरीं आपुला ॥ ५९ ॥ मूकासि करितसां वाचाल । पंगु-अंधादिकांचे तात वत्सल । पंगु लंघिती गिरि अखिल । रमाधवा युष्मत्कृपें ॥ ६० ॥ मी गर्भस्थ

**************************************************************************

पंगु चढलों गिरि । न लागतां विलंब क्षणभरी । सहजदर्शनें कृपें नरहरि । पूर्णावतारी गुरुवर्या ॥ ६१ ॥
अतुलसामर्थ्य कलियुगांत । मीं अनुभविलें निमिषांत । आपण प्रत्यक्ष परमेश्वर अच्युत । निःसंशय आहां कीं
॥ ६२ ॥ वारंवार नृसिंहचरणावरी । मस्तक ठेवून दंडवत करी । म्हणे बहुत जन्मांचें श्रीनरहरि । सार्थक झालें
दर्शनें ॥ ६३ ॥ पंगुअंधादिकांचा वृथैव । दुःखरूप जन्म सर्वथैव । जीवंत असूनियां शव- । समान लोकां दिसती
॥ ६४ ॥ आधीं गिरिनारी स्थान विशेष । त्यांत भेटले महापुरुष । दर्शनें गेले दुरितदोष । पंगु चालूं लागलों
॥ ६५ ॥ जन्मपंगु चढला गिरिवर । हा अत्यद्भुत चमत्कार । पाहूनि भयभीत झाले समग्र । म्हणती ईश्वर हाचि
आहे ॥ ६६ ॥ मुखावरी ताडिती स्वकरें । निंदक निर्लज्ज आपटिती शिरें । आम्ही साधु न, दुर्जन खरे । लांडे
पशु जन्मलों ॥ ६७ ॥ पाडूनि घेतला पायांवरी धोंडा । आग लागो आमच्या तोंडा । रोविला अपकीर्तीचा झेंडा ।
बांधिला गंडा कंठीं तो ॥ ६८ ॥ निर्लज्ज चाभरी चावट जिव्हा । मांसाचा लहान तुकडा अहाहा । दुःखसमुद्रीं
बुडवितो महा । असह्य बोल बोलुनी ॥ ६९ ॥ काय उपयोगी ऐशी जीभ । दुःखफळ देणारी अशुभ । छेदूनि
टाकावी म्हणूनि प्रारंभ । केला शस्त्र घेऊनि ॥ ७० ॥ निंदकांची सानुताप मति । पाहून नृसिंहसरस्वती । तयां निंदकांसी
निषेधिती । रसनाछेदें दुःख असे ॥ ७१ ॥ वृथा प्राणिमात्रांचा मानभंग । करूंचि नये अतिप्रसंग । तीव्रवैराग्यें महापुरुषसंग ।
विवेकप्राप्त्यर्थ करावा ॥ ७२ ॥ प्रपंचसंगचि होतसे बाधक । निःसंग अत्यंत सुखदायक । दृढभक्ति वैराग्य
सविवेक । ऐसा सत्संग घडावा ॥ ७३ ॥ सत्संगत्वेंचि निःसंगत्व । निःसंगत्वें होय निर्मोहत्व । निर्मोहत्वें निश्चिततत्त्व ।
जीवन्मुक्त होय सत्य पैं ॥ ७४ ॥ सारासार सद्विचार सत्संगति । तथा दृढतर प्रेम गुरुभक्ति । येणेंचि होय परमपदप्राप्ति-
श्रुतिशास्त्रें कथिती यदर्थ ॥ ७५ ॥ तस्मात्सर्वप्रयत्नेंकरून । खरा साधुसमागम चिरंतन । श्रोत्रिय-ब्रह्मनिष्ठ-आचार्यवान् ।

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

तो गुरुकुलवास घडावा ॥ ७६ ॥ ऐशा गुरुकुलवासावीण । अप्राप्त परमपद निर्वाण । श्रीगुरुमुखें परमामृत श्रवणद्वारें
प्राशन करिती ते ॥ ७७ ॥ परमपुरुषाचा समागम । अनायासें लाधला निष्काम । तयांचे हृदयस्थ स्वात्माराम ।
परंधाम प्रगटला ॥ ७८ ॥ परमपुरुषाचे बहुत आभार । मानूनि करिती नमस्कार । म्हणती जयजय दत्तदिगंबर । विधिहरिहर
भेटले ॥ ७९ ॥ पूजनादिक झालियानंतर । सांगूनि तीर्थमाहात्म्य सुंदर । निघाले गिरिनारीयोगविद्वर । ज्यांचें
अपार चरित तें ॥ ८० ॥ जन्मपंगु चढला श्रीगिरि । त्याचें नाम गणेशपुरी । चंचलभारती आनंदगिरि । श्रीगुरुसंगें
निघाले ॥ ८१ ॥ तैसेचि कृष्णानंदसरस्वती । रामपर्वत विश्वचैतन्ययति । हर्षभरित निघाले सोबती । नृसिंहस्वामीसमागमें
॥ ८२ ॥ अशाप्रकारें शिष्यांसहित । नृसिंहस्वामी दत्तावधूत । शेषनारायणपादुका पाहत । परमानंदें चालती
॥ ८३ ॥ रामानंदाच्या पादुकांसंनिध । आले नाशक तापत्रिविध । तें श्रीनृसिंहचरित्र अगाध । ऐका शुद्धमानसें
॥ ८४ ॥ रामानंदसत्पुरुषाच्या । चरणपादुका असती साच्या । गौमुख आणि हनुमानधारी मारुतीच्या । बाजूस
सुंदर शोभती ॥ ८५ ॥ तेथें वसती आसपास । साधुसंत भक्त हरिदास । श्रीगिरिनारीगुरुदर्शनास । जाती
येती नियमें ते ॥ ८६ ॥ तेथें उदकांचे लहान झरे । पर्जन्योदकें टांकी भरे । अत्युष्ण कालांत उदक नुरे । तेव्हां त्रास
होतसे ॥ ८७ ॥ कमंडलु तीर्थीं आणि गौमुखांत । त्याप्रकारेंच हनुमानधारींत । कामापुरतें उष्णकालांत । निर्मल उदक
राहतसे ॥ ८८ ॥ कमंडलु तीर्थीं नित्य स्नान । कमंडलुवरती अखंडासन । गुरुगिरिनारीचें भस्म विलेपन । मुख्यत्वेंकरून
होतसे ॥ ८९ ॥ कमंडलूपासून अत्युच्च शिखर । आकाशीं शोभायमान सुंदर । प्रमुख अनादि मनोहर । दत्तात्रेय
स्थान विराजे ॥ ९० ॥ गुरुगिरिनारी दत्तदिगंबर । उच्च शिखरीं ते जगदीश्वर । स्वच्छंदें वसती निरंतर । परंतु न
दिसती कवणासी ॥ ९१ ॥ श्रीदत्तात्रेय-चरणपादुका । उच्च शिखरीं आनंददायिका । अध्यात्मज्ञान प्रकाशिका ।

* * *

बहुत प्राचीन असती त्या ॥ ९२ ॥ पादुकांजवळी सिद्धिविनायक । वसतसे सर्वविघ्नांतक । गिरिनारीचीं स्तोत्रें अनेक ।
करी गायन गणपति ॥ ९३ ॥ तैसाचि वातात्मज हनुमंत । कर जोडूनि उभा तिष्ठत । श्रीदत्तगुणानुवाद सदोदित ।
अतिप्रेमें वर्णितसे ॥ ९४ ॥ पाठीमागें श्रीशंकराचार्य । वेदविहित धर्मकर्मप्रवर्तकवर्य । शंकर साक्षात्कर्ते जगत्कार्य ।
स्वतःसिद्ध वसती ते ॥ ९५ ॥ वेदसागरांतून ज्यांनीं । उपनिषदार्थामृत मथूनि । वेदान्त विज्ञान उद्धृत करूनि । उपकार
केले जगतावरी ॥ ९६ ॥ हे साक्षात्पूर्ण श्रीशंकर । वेदांतांभोज उदयभास्कर । व्याससूत्राचे भाष्यकार । स्वामी
शंकर जगद्गुरु ॥ ९७ ॥ उपनिषद-शारीर-भगवद्गीता । हें प्रस्थानत्रय मुख्यता । ह्या प्रस्थानत्रयावरी भाष्य तत्त्वतां ।
केलें विस्तृत शंकरें ॥ ९८ ॥ तीर्थ क्षेत्र अनेक देवस्थानें जाण । जागृत केलें धर्मसंस्थापन । वेदविहित मार्गासी लाविले
जन । दयाळु शंकर स्वामींनीं ॥ ९९ ॥ वेदांत अद्वैत परमामृत । लोपलें होतें कलियुगांत । जें अनादि वेदशास्त्रसंमत ।
केलें संस्थापन ज्यांनीं तें ॥ १०० ॥ असंख्य देवताष्टकें स्तोत्रें । सुसरल रचिलीं परम पवित्रें । अर्थगांभीर्य मधुर देवादि
चरित्रें । सुबोधार्थ प्रकाशिलीं ॥ १ ॥ जीं पठतां श्रवण करितां । समाधान उल्हास वाटे चित्ता । सरल सोपी सुरस
कविता । सर्वत्र जनांसी मान्य जे ॥ २ ॥ ते शंकराचार्य गिरिनार पर्वतीं । श्रीगुरुदत्तात्रेयासी आराधिती । दत्तप्रसादें
विजय विख्याति । स्वल्प वयांत लाधले ॥ ३ ॥ श्रीदत्तात्रेयचरणांसंनिध । शंकराचार्य नाम प्रसिद्ध । बैसले असती
नित्यप्रबोध । जगद्धितार्थ आनंदें ॥ ४ ॥ विनायकाच्या सन्निकर्ष । घंटा शोभतसे सर्वोत्कृष्ट । घंटारव ऐकतां संतोष ।
वाटे प्रिय जनांला ॥ ५ ॥ गुरुगिरिनारीचें शिखर । अत्युच्च पांचवें दिसे सुंदर । दुरूनि भासे महा भयंकर । चढतां
श्रम वाटती ॥ ६ ॥ परंतु अद्यापपर्यंत । गुरुगिरिनार पर्वतांत । चढतां उतरतां दुःखित मृत । कोणीही झालें नसेचि
॥ ७ ॥ मुख्य शृंगावरती जाऊन । श्रीगिरिनारीचें घेतां चरणदर्शन । श्रमपरिहार वाटे समाधान । प्रसन्न मन

होतसे ॥ ८ ॥ धर्मवृक्षाचें बीज गहन । कविवर ऋषि योगी सज्जन । भक्तादि अखिल जनांचें जीवन । दत्तात्रेय
नाम असे हो ॥ ९ ॥ सर्वांसि विश्रांतिस्थान प्रमुख । दत्तात्रेय गिरिनारीचे सुरेख । गिरनारमाहात्म्यग्रंथीं लेख । सुरस जाण
वर्णिला ॥ ११० ॥ असो श्रीमन्नृसिंह मुनीश्वर । शिष्यांसहित गंगाधर । निजस्थान श्रीगिरिनार । अवलोकिती मंदगति
॥ ११ ॥ गोमुखतीर्थाहूनि अंबिका- । स्थानीं आले क्षणें एका । समर्थासि देखूनि जगदंबिका । हास्यवदनें बोलतसे
॥ १२ ॥ सोडूनि निजस्थान आपुलें । स्वामी आपण कोठें होतां गेले । बहुत दिवसां सगुणब्रह्म देखिलें । श्रीमत्परमहंस
स्वरूपी ॥ १३ ॥ समर्थ वदती अहो माते । आम्ही संचरतों तीर्थक्षेत्रातें । आलों श्रीच्या दर्शनातें । देवस्थानें विलोकित
॥ १४ ॥ ऐक्यरूपें अभेदें उभयतां । कार्यकारणरहित तत्त्वतां । भाषणें गंभीर जगद्धिता- । कारणें करिती परस्पर
॥ १५ ॥ प्रकृतिपुरुषाचा नसेचि भेद । ऐसें वर्णिती शास्त्रें वेद । लोककल्याणास्तव संवाद । वेगळेपणें नव्हे तो
॥ १६ ॥ येथें उपमान उपमेय । त्याप्रकारें न हेयोपादेय । तैसेचि व्यतिरेक अन्वय । ब्रह्माद्वितीय स्वरूपीं नसे
॥ १७ ॥ यथा दीप आणि प्रभा एक । करितां नयेचि व्यतिरेक । तथा पुरुष शिवशक्त्यात्मक । विश्वव्यापक चैतन्य
हो ॥ १८ ॥ सूर्य आणि प्रकाश जेवीं । गूळ आणि गोडी बरवी । उदकीं मधुरता ऐक्य जाणावी । प्रकृति पुरुष
तद्वत् ॥ १९ ॥ अभेद ऐक्य शिवशक्तिसंवाद । सहजस्थितीचा अनुवाद । केवळ स्वात्मानुभव सर्वार्थप्रद । निरपवाद
श्रेयस्कर ॥ १२० ॥ अंबाजीचें करूनि दर्शन । गोरक्षनाथासि सगळे भेटून । अवघडनाथासी विलोकून । कमंडलुतीर्थीं
पातले ॥ २१ ॥ देवतामय गिरनारपर्वत । योगी भोगी साधु विरक्त । पशु पक्ष्यादिक जन समस्त । युक्त मनोहर विराजे
॥ २२ ॥ वनौषधि आणि सुवासिक लता । नानावृक्ष शोभविती पर्वता । जिकडे तिकडे सुगंध तत्त्वतां । आनंदप्रद
भरलासे ॥ २३ ॥ पर्वतांतून स्वच्छोदकाचे झरे । कमंडलु तीर्थांत पाझरती गोजिरे । अत्यंत शुद्ध जळ साजिरें । मधुर

शीतल निरोगी ॥ २४ ॥ ऐशा पवित्र तीर्थाचें दर्शन । आणि तीर्थोदक स्नान । घडतां तीर्थोदक प्राशन । होई पावन जगत् सर्व ॥ २५ ॥ कमंडलुतीर्थाचें महिमान । अपार अतर्क्य असे गहन । ज्यांत प्रत्यक्ष अत्रिनंदन । करिती स्नान दत्तगुरु ॥ २६ ॥ श्रीमद्गुरु नृसिंहसरस्वती । सकलांसह स्नान करिती । संध्यावंदनादि कर्म आचरती । पूजिती तीर्थ-देवता ॥ २७ ॥ तेव्हां सर्वत्र आनंदमय । मुखें वदती गिरिनारी दत्तात्रेय । रामदास सेवादास आणि कृष्णदास त्रय । साधु तीर्थस्नाना पातले ॥ २८ ॥ तंव वदे कृष्णदास । जयजय गिरिनारी जगन्निवास । दर्शन द्यावें निज दासास । या प्रसंगीं योगिराजा ॥ २९ ॥ तंव रामदास साधु बोले । आपण साधु कलियुगांतले । श्रीदत्तदर्शन दुरावलें । भले भले थकले हो ॥ १३० ॥ मग वदे सेवादास विरागी । पूर्णानुभवी हठयोगी राजयोगी । कोणी न दिसती या कलियुगीं । गुरु-गिरिनारीवांचूनि ॥ ३१ ॥ तीर्थ-क्षेत्र-देवतास्थान । कलीमध्यें असें स्थानपूजन । प्रत्यक्षप्रमाण देवता-दर्शन । न होय जाणा निश्चयें ॥ ३२ ॥ हें ऐकूनि चंचलभारती । वदतसे साधुवृंदाप्रति । चित्तशुद्धिविना देवताप्रतीति । कैशी होय दर्शनेच्छुसी ॥ ३३ ॥ अंतःकरण झालिया पवित्र । महत्पुरुष गुरुकृपें देवचरित्र । साक्षात्कार होय प्रत्यक्ष विचित्र । निःसंशय निश्चयें ॥ ३४ ॥ मनीं नसतां विशुद्ध भाव । कैंचा पावे देवाधिदेव । निष्काम कर्मोपासनें अवश्यमेव । चित्त शुद्ध होतसे ॥ ३५ ॥ परमेश्वर-सद्गुरुसेवन । करितां होय निर्मल मन । मग साक्षात्कार देवदर्शन । सत्य सत्य होतसे ॥ ३६ ॥ वेदविहित सत्पथ जरी सांपडे । महापुरुष-समागम जरी घडे । शुद्धहृदयीं तरीच रोकडें । उघडें दिसे परब्रह्म ॥ ३७ ॥ श्रीगुरु-हरिभक्ति प्रेमळ । सेवाआज्ञातत्पर त्रिकाळ । प्रत्यक्ष दर्शन लाभे तात्काळ । शुद्ध सात्त्विक शिष्यासी ॥ ३८ ॥ श्रीमन्नृसिंह गुरुराय । येथें बैसले गिरिनारी दत्तात्रेय । अवलोकूनि धरा पाय । पावन व्हाल यत्कृपें ॥ ३९ ॥ सोडा सोडा हो संकल्पविकल्प । थोर स्वामी समर्थाचे समीप । वृथा करूं नका हो

वाग्जल्प । गलिताहंकृति करा हो ॥ १४० ॥ या श्रीगुरु-दत्तावधूता । शरण व्हा हो त्वरित आतां । सर्वोत्तम महालाभकाल तत्त्वतां । पुन्हा न येईल कदापि ॥ ४१ ॥ ऐशी अत्युच्चस्वरें गर्जना । चंचलभारती करी साधुजनां । खडबडूनि उठले मानोनि वचना । जागृत झाले संत ते ॥ ४२ ॥ श्रीनृसिंहमुनी विश्वरूप । भक्तवत्सल दाते सत्संकल्प । धरिती त्रयमूर्ति सगुणस्वरूप । दिसती प्रत्यक्ष दत्तात्रेय ॥ ४३ ॥ दयाळु भक्तकार्यकल्पद्रुम । त्रिभुवनानंद अद्वैत परम । श्रीदसंरक्षणार्थ स्वरूप उत्तम । धरिती निगमागमवंद्य जे ॥ ४४ ॥ बालार्कप्रभ इंद्रनीलजटिल । विलसित भस्मांग रागोज्वल । शांत योगीश्वर चर्मांबरशार्दूल । भूषणें निर्मल शोभती ॥ ४५ ॥ ब्रह्माइंद्रसनकादिकीं परिवृत । सिद्ध महायोगी ऋषि समस्त । श्रीमद्दत्तात्रेयासि सदोदित । उपासिती अनन्य ते ॥ ४६ ॥ हृदयीं श्रीदत्तात्रेयध्यान । परमानंदें करिती चिंतन । श्रीदत्तमूर्ति चैतन्यघन । कमंडलुतीर्थी उभी असे ॥ ४७ ॥ धन्य धन्य कमंडलु परमतीर्थ । साधुवृंद जमले दत्तदर्शनार्थ । सत्यत्वें भक्तप्रतिज्ञा-सिद्ध्यर्थ । त्रैलोक्यनाथ उभे ठेले ॥ ४८ ॥ श्रीमद्दत्तात्रेयावधूतदर्शन । धन्य पर्व सहज मद्भाग्योदयदिन । पूर्णब्रह्म गुरु सनातन । लाधले सहज समस्तांसी ॥ ४९ ॥ करिती प्रेमें साष्टांग दंडवत । षोडशोपचारें पूजिती संत । अत्यंतश्रद्धाभक्तिसमन्वित । नृसिंहदत्तात्रेयासी ॥ १५० ॥ प्रार्थना करिती भक्तजन । जयजय अवधूत निरंजन । भक्तमनीषा सफल करून । दिधलें दर्शन अपूर्व हें ॥ ५१ ॥ शके सत्राशें पंचाहत्तरांत । श्रीमद्गुरु दत्तावधूत-। दर्शनें सेवादास योगांतर्गत । रहस्य पावले निःशंक ॥ ५२ ॥ रहस्य हटयोगाचें वास्तव । सेवादासासी लाधलें सर्व । अंतरीं उदेला प्रेमभाव । नम्र झाले सेवादास ॥ ५३ ॥ विमानांतून पुष्पें वर्षती । सुरवर झाले प्रसन्न चित्तीं । पुढिले अध्यायीं श्रोतीं । तेचि कथा परिसावी ॥ ५४ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठवामनविरचित । द्वादशाध्याय गोड हा ॥ १५५ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे द्वादशोऽध्यायः समाप्तः ॥ १२ ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

* * *

# ॥ अध्याय तेरावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्तात्रेयस्वामिने नमः ॥ ॥ शिष्य वदे हो सद्गुरुनाथा । परम पवित्र दत्तात्रेयकथा । त्रैलोक्यपावनी महत्प्रथा । परोपकारार्थ निरूपा जी ॥ १ ॥ धन्य कमंडलुतीर्थ भूवरी । जेथें प्रतिष्ठित असे दत्तगिरिनारी । दीननतजनवत्सल त्रिपुरारि । विश्वविहारी भूतात्मा ॥ २ ॥ नित्य तत्पर परोपकारी । योगीश्वराधीश स्वेच्छाचारी । करुणार्णव त्रिभुवनसंचारी । दत्तात्रेय जगद्गुरु ॥३॥ प्रल्हाद आणि अलर्कराजासी । यदुराजादि कार्तवीर्यासी । ब्रह्मविद्या बोधूनि जनांसी । दत्तात्रेयें कृतार्थ केलें ॥ ४ ॥ मत्स्येंद्र-गोरक्षादिक सारे । योगानंदपदासी साधिकारें । श्रीमद्दत्तात्रेयगुरुकृपावरें । पावले अखंडात्मस्वरूप ॥ ५ ॥ जो भक्तजनकार्यकल्पद्रुम । कमंडलुतीर्थीं पुरुषोत्तम । भक्तप्रतिज्ञासिद्ध्यर्थ पूर्णकाम । आत्माराम उभा असे ॥ ६ ॥ ती कथा करावया श्रवण । उदित झालें माझें अंतःकरण । ज्या गुरुलीलामृतप्राशनें जरामरण- । रहित होती सकलही ॥ ७॥ प्रेमभरें गुरु शिष्यासी वदती । तेचि कथा सादर चित्तीं । ऐक बापा शिष्या सुमति । धन्य परमार्थी अधिकारी ॥ ८ ॥ तुजकरितां आम्हांसी । परमलाभही जगतासी । जसें दुग्ध सर्वत्र उपयोगासी । वत्सानिमित्तें येतसे ॥ ९ ॥ चंचलभारतीची प्रतिज्ञा । दत्तात्रेयदर्शनें शुद्धप्रज्ञा । त्या वाचाल साधुवृंदा अनभिज्ञां । सहज पूर्ण जाहली ॥ १० ॥ कलियुगामाजीं दत्तदर्शन । जे योगयागादि तपानुष्ठान । करिताति यथाविधान । तयांहि अत्यंत दुर्लभ असे ॥ ११ ॥ अनेक साधनें अनेक युक्ति । अनेक प्रकारें धरूनि विरक्ति । त्यागूनियां विषयासक्ति । भगवद्भक्ति आदरिती ॥ १२ ॥ धारण करूनि नानावेष रंग । आळविती सर्वदा श्रीरंग । नित्य भजन टाळ वीणा

मृदंग । घेऊनि अभंग पठती ते ॥ १३ ॥ टाळ मृदंगादि वाद्यें फुटती । बहुवार वीण्याच्या तारा तुटती । वाद्यें वाजवितां कर दुखती । कंटाळती भजन करितां ॥ १४ ॥ भगवद्गुणानुवाद-स्मरण । हरिचर्चा इतिहास पुराण । नित्यनेमें करिती पठण श्रवण । परी तें दर्शन दुर्लभ असे ॥ १५ ॥ बैसती लावूनियां कपाट । प्राणस्पंदनिरोधनयोगें हट । करूनि म्हणती पावलों अवीट । परमानंदमोक्षासी ॥ १६ ॥ निरंतर बैसती ध्यानीं । कोणासी न बोलती मौनी । लाविती अग्नीच्या चौऱ्यायशीं धुनी । परी तें दर्शन दुर्लभ ॥ १७ ॥ एके पायावरी उभे ठाकती । अक्षयी हस्त वर ठेविती । नखें केशादिक वाढविती । टांगूनि घेती उफराटें ॥ १८ ॥ काष्ठलतेचे कटिदोर । काष्ठाचीच कौपीन बडीवार । लिंगासि लाविती कुलुप सुंदर । परंतु दुर्लभ दर्शन तें ॥ १९ ॥ लोहकंटकाची शय्या करून । त्यावरी बैसती भस्म लावून । वनस्पतीनें धातु मारून । भस्म देती लोकांसी ॥ २० ॥ ताम्रादिधातूंचें कांचन । रौप्यमुद्राही दाविती करून । जडी बुटी किमया साधून । उदरपोषण करिती ते ॥ २१ ॥ अग्नि-उदकावरी चालती । अंतरालीं उभे राहती । अष्टसिद्धींची झालिया प्राप्ति । अथवा सांगती उलगडे ॥ २२ ॥ यति ब्रह्मचारी आदिक । वैद्यक्रिया औषधी अनेक । तिरस्कारूनि परमार्थ अलौकिक । करिती संसारिक साधनें ॥ २३ ॥ टोंचूनि घेती लोखंडाचे गळ । मनकवडे जोशी सांगती फळ । कावडी भरूनि गंगाजळ । कापडी लोकां दाविती ॥ २४ ॥ ग्रामांत घालिती लोटांगण । नानाप्रकारें उपोषण । करिती ग्रंथाचें पारायण । कर्में अथवा भक्तिमार्गें ॥ २५ ॥ बहुतप्रकारचें विचित्र मत । करिती साधनें अनंत । तथापि असे या कलियुगांत । भगवद्दर्शन दुर्लभ ॥ २६ ॥ साधनें राजस तामसी । सकामनिक अत्यंत सायासीं । जन्मभरी करितां कष्टांसी । भगवद्दर्शन न होय ॥ २७ ॥ प्रत्यक्ष देवदर्शन कलियुगांत । अति दुर्लभ असे जें निश्चित । तें प्रत्यक्ष पूर्णब्रह्म क्षणांत । कमंडलुतीर्थीं प्रगटलें ॥ २८ ॥ भक्तप्रतिज्ञा-सिद्ध्यर्थ । उभे ठेले नृसिंह जगन्नाथ ।

चंचळभारतीचे मनोरथ । पूर्ण केले भगवंतें ॥ २९ ॥ तो परमेश्वर जरी करी कृपा । संसारपरमार्थ तरीच सोपा । होय निश्चयात्मक सहज बापा । शिष्या धरीं रे मानसीं ॥ ३० ॥ बहुत जन्मांचें पूर्वार्जित । ईश्वरार्पण निष्काम सुकृत । असतां निरामय धूतचित्त । तरीच परमात्मकृपा होय ॥ ३१ ॥ भोळे भाविक भक्तिमान । सहज मोकळें शुद्ध मन । कामरागद्वेष त्यजून । भगवच्चरण सेविती जे ॥ ३२ ॥ मग ते केवळ उच्च जाती । अथवा नीचकूळ असतां मंदमति । गोड लागे ती भगवद्भक्ति । अनन्य प्रेमें जयांसी ॥ ३३ ॥ तयांसी श्रीजगदीश्वर । सद्गुरुनाथ दयासागर । प्रसन्न होऊन निरंतर । प्रत्यक्ष दर्शन देतसे ॥ ३४ ॥ अंतःकरण असूनि निर्मळ । हरिगुरुचरणीं चिरकाळ । असतां अनन्यैक भक्ति केवळ । अवश्य होय दर्शन तें ॥ ३५ ॥ येथें मुख्य कारण शुद्ध भाव । भाव तेथेंचि देवाधिदेव । सर्वदा तिष्ठतसे स्वयमेव । निःसंशय जाणिजे ॥ ३६ ॥ पाषाणीं मृत्तिकेंत आणि काष्ठांत । देव नसतांही भावें पावत । तस्मात् भावचि कारण होत । प्रत्यक्ष देव-प्राप्तीतें ॥ ३७ ॥ 'भावेन देवं' ऐशीं शास्त्रसंमत । वचनें कल्याणकारक निश्चित । भावेंचि भेटे तो भगवंत । होय दास दासांचा ॥ ३८ ॥ अंतःकरणीं नसतां भाव । कैसा पावे विश्वेश्वर देव । म्हणूनि सर्वदा अवश्यमेव । शुद्ध भाव पाहिजे ॥ ३९ ॥ 'भावयतीति भावः' । सत्ता करितो जो तो भाव । सत्ता आत्मा चेष्टाभाव । अस्तित्वपणाची स्थिति ॥ ४० ॥ सहजगुण दृढ निश्चय । मनोभावादि अभिप्राय । अर्थ भावार्थ पूज्य आर्य । उपदेश मन ईश्वर ॥ ४१ ॥ 'भाव' शब्दाचे अर्थ बहुत । असती शब्दकोशांत । येथें दृढनिश्चयात्मक शुद्ध चित्त । हाचि भावार्थ मुख्य असे ॥ ४२ ॥ संसार प्रपंचीं अवश्य वित्त । अनुकूल असतां सुख होत । संसार हा धनविरहित । क्लेशकारक होतसे ॥ ४३ ॥ तैसें परमार्थास्तव चित्त । सानुकूल असावें सदोदित । मग तें चित्त चैतन्यस्वरूपभूत । होय अद्वैत परब्रह्म ॥ ४४ ॥ श्रोत्र-त्वचा-नेत्र-जिव्हा-घ्राण । हीं पंच ज्ञानेंद्रियें शास्त्रप्रमाण । शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध जाण । हें पंच विषय शिष्या रे

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

॥ ४५ ॥ श्रोत्रेंद्रियाचा 'शब्द'विषय । कर्णीं शब्द ऐकणें होय । 'स्पर्श' म्हणजे घेणें हा विषय । त्वगिंद्रियाचा जाणावा
॥ ४६ ॥ पदार्थांचा आकार पाहणें । हा चक्षूचा 'रूपविषय' म्हणणें । कटु मधुरादि रस चाखणें । हा जिव्हेचा 'रसविषय'
॥ ४७ ॥ घ्राणेंद्रियानें वास घेणें । हा 'गंधविषय' घ्राणाचा म्हणणें । पंचविषय याप्रमाणें । इंद्रियद्वारें वर्तती
॥ ४८ ॥ वाचा-हस्त-गुदा-उपस्थ-पाद । हीं पंचकर्मेंद्रियांचीं नामें विशद । वचन-दान-गमन-विसर्ग-आनंद । कर्में
असतीं हीं तयांचीं ॥ ४९ ॥ पंचभूत सूक्ष्म तन्मात्रायुक्त । 'तन्मात्रा' हे पंचविषय म्हणिजेत । पंचविषय जड दृश्य असत् ।
देहाभिमानसहित ते ॥ ५० ॥ कल्पित जड दृश्य असूनि बाधक । जैसे कुरंगासी शब्दविषय घातक । मातंगासी स्पर्श,
पतंगासी नाशक । रूपविषय होतसे ॥ ५१ ॥ रसविषय बाधक मीनासी । गंधविषय घातक भृंगासी । ऐसे प्राणनाशक
एकेकासी । विषय जाणा होताति ॥ ५२ ॥ ते पांचही विषय मनुष्यशरीरीं । नांदती महत्क्लेशकारी । या विषयांचें
ध्यान सर्वोपरी । अनर्थकारक निश्चयें ॥ ५३ ॥ या विषयांचें चिंतनरहित । जेव्हां होईल हें चित्त । तेव्हां तें चैतन्य-
स्वरूप निश्चित । चिच्छब्दें जाहलें जाणावें ॥ ५४ ॥ जड विषय 'चित्त' चिंतन तकार- । रहित होतां 'चिद्रूप' निर्विकार ।
जपा-( जास्वंदी )पुष्परंगाकार । होय जैसा स्फटिकमणि ॥ ५५ ॥ ते जपापुष्पोपाधि काढितां । पूर्वरूप
स्वच्छ मणि दिसे तत्त्वतां । तैसें चित्तजडत्व हरपतां । चिदात्मरूप उरतसे ॥ ५६ ॥ टाकूनि वृत्ति चंचल ।
अभ्यास-वैराग्यें चित्त निश्चळ । करून पावावें सुखें निर्मळ । अखंड मोक्ष-स्वरूपासी ॥ ५७ ॥ चंचळभारतीच्या मस्तकीं
प्रसन्न । वरदहस्त समर्थें ठेविल्यापासून । तयासि उपजलें ज्ञानविज्ञान । श्रीगुरुप्रसादें तात्काळ ॥ ५८ ॥ चंचळभारतीची
परमार्थस्थिति । दिवसेंदिवस वृद्धीस पावे ती । श्रीसद्गुरुकृपा होय जयावरती । तयासि काय उणें असे ॥ ५९ ॥ असो
त्या साधुवृंदें तेव्हां प्रत्यक्ष । पूर्णब्रह्म परमेश्वर निरपेक्ष । श्रीमद्दत्तात्रेयस्वामी कमलाक्ष । पाहिले लक्षपूर्वक ॥ ६० ॥

गिरिनारमूर्ति परम मंगळ । श्रीगुरुदेवदत्त स्वामी दयाळ । देखूनि धांवले साधु सकळ । होऊनि विमलचित्त ते ॥ ६१ ॥
कोमल सुंदर चरणकमल । प्रेमें आलिंगिती ते अखिल । पत्र-पुष्प-धूप-दीपयुक्त फल । करिती मांगलिक आरती
॥ ६२ ॥ शरणागत भावें अनन्य । तटस्थ उभे जोडूनि करद्वय । सुदुर्लभ दर्शनें साधु निरामय । भयरहित झाले
ते ॥ ६३ ॥ प्रार्थना करिती भक्त सेवक । अन्यजन प्रेमळ भाविक । अभिमानरहित होऊनि लोक । जगन्नायका
आळविती ॥ ६४ ॥ जयजया जी अनसूयानंदन । मूलाधार जगज्जीवन । भक्तवत्सल प्रसन्न वदन । त्रिभुवनानंदन
व्यापका ॥ ६५ ॥ पूर्णब्रह्म लीलावतारी । दत्तात्रेय श्रीपाद नरहरि । जगदुद्धारक श्रीगिरिनारी । आम्हांवरी वळले हो
॥ ६६ ॥ जे न होय कदापि ब्रह्मादिकां । ते अद्भुत लीला दावितां लोकां । अतुल सामर्थ्य विश्वव्यापका । आपणांसचि
शोभतसे ॥ ६७ ॥ दुजा कोण या चतुर्दश । ब्रह्मांडीं समर्थ परमेश । विधाता सदाशिव हृषीकेश । त्रयमूर्ति आपण
प्रत्यक्ष ॥ ६८ ॥ अनंतकोटि ब्रह्मांडनायक । उत्पत्ति-स्थिति-संहारक । कलियुगामाजीं अलौकिक । प्रत्यक्ष नेत्रीं देखिले
॥ ६९ ॥ 'चक्षुर्वैसत्यं' ऐशी श्रुति । आम्हांसि प्रत्यक्ष फलप्रदाती । स्वानुभवा आली हो निश्चितीं । भगवन्मूर्ति विलोकिली
॥ ७० ॥ अगाध पूर्वपुण्य फला आलें । अनंतजन्मीं जें न देखिलें । तें परमात्मस्वरूप प्रत्यक्ष ठेलें । मूर्तिमंत समोर
॥ ७१ ॥ जी परब्रह्ममूर्ति सदैव । आम्हांसि भेटली स्वयमेव । जी अंतर्बाह्य पूर्ण सदैव । विश्वव्याप्त असे जी ॥ ७२ ॥
हृदयांतरीं वसूनि सदोदित । वदवी जी निःसंशय लीलामृत । कमंडलुतीर्थीं प्रतिष्ठित । भक्तमनोरथपूरक जी ॥ ७३ ॥
रामदास आणि कृष्णदास । विगलिताहंकार मानस । होऊनि शरण प्रभुपदास । वारंवार नमिती ते ॥ ७४ ॥ कृष्णगिरी
भारतीबुवा । रामपुरी खाकीबुवा । अवघडदास अघोरीबुवा । दत्तदर्शनें कृतार्थ झाले ॥ ७५ ॥ जें जें अंतःकरणीं
आणिती । अंतःसाक्षी नृसिंहसरस्वती । तें तें प्रत्युत्तर समाधानवृत्ति । व्हावया देती गुरुवर्य ॥ ७६ ॥ चरणदास साधु

नाम । त्याचे अंतरीं संशयागम । चित्तनिग्रह असे बहुत विषम । कैसा साध्य होईल ॥ ७७ ॥ हठनिग्रह योग-
साधनास । फारचि होताति आयास । तथापि तेही करूनि शेवटास । मोक्षप्राप्तीचा संदेह उरे ॥ ७८ ॥ कोण्या साधनें
चित्तजय । आत्मज्ञानप्राप्त्यर्थ त्वरें होय । तो कळावा मजला उपाय । ऐसा संशय चरणदासाचा ॥ ७९ ॥ चरणदास
मनाचा संदेह । विषम असे चित्तनिग्रह । जाणूनि स्वामीनृसिंह । दत्तात्रेय अवधूत ॥ ८० ॥ चंचलभारतीसी आज्ञापिती ।
शास्त्रविहित शंकानिवृत्ति । करावी त्वां धरूनि शान्ति । आज्ञानुसार वर्तावें ॥ ८१ ॥ मग चंचलभारती उठोन ।
समर्थांसी करूनि साष्टांगनमन । सद्गुरुआज्ञा शिरीं मानून । भाषण करिता जाहला ॥ ८२ ॥ हें मन चंचल प्रमाथी
दृढ बलवान् । याचें सुदुष्कर संयमन । वायूचें जैसें आकलन । तैसा कठिण मनोजय ॥ ८३ ॥ समुद्र
करवेल प्राशन । सुमेरूतें टाकवेल उपटोन । होईल वन्हीचेंही भक्षण । परी मनोनिग्रह कठिण महा ॥ ८४ ॥
मनोवेगवृत्ति अनिवार । म्हणोनि मनोनिग्रह विषम दुष्कर । तथापि तो निश्चयें सत्वर । अभ्यास-वैराग्येंच होतसे ॥ ८५ ॥
मनोनिग्रहाचे दोन प्रकार । वेदांतीं वर्णिले यथाशास्त्र । एक 'हठनिग्रह' प्रथम प्रकार । 'क्रमनिग्रह' दुजा असे ॥ ८६ ॥
चक्षुश्रोत्रादि पंचज्ञानेंद्रियें । वाक्पाणि आदिक पंचकर्मेंद्रियें । याप्रकारें दशेंद्रियें । सर्व शरीरीं असती हीं ॥ ८७ ॥ अहो
हीं दशेंद्रियें जैशीं । तत्तद्गोलकमात्राचे निरोधवशी । हठनिग्रहें हीं जाणा अपैशीं । निग्रह केलीं जातीं ॥ ८८ ॥
तैसेंच या चंचलमनाचा । हठनियोगें निग्रह करूं साचा । जडमूढ पुरुषासी या प्रकारचा । भ्रमचि केवळ होतसे ॥ ८९ ॥
परंतु त्या दशेंद्रियांसारखा । मनोनिग्रह हठमात्रें जरी लेखा । तथापि कदाकाळीं न होय देखा । चित्तजय हठनिग्रहें ॥ ९० ॥
मनोनिग्रह हठमात्रें कां न होय । ऐसा येईल जरी संशय । तयांचें समाधान सांगूं प्रत्यय । शास्त्रविहित परिसावें ॥ ९१ ॥
त्या मनाचें वास्तव्यस्थान गोलक । जें हृदयकमल असे सम्यक् । तें निरोध करण्यास अशक्य । हृदयकमल सर्वथा ॥ ९२ ॥

संत हो याकरितां तो मनोजय । व्हावयासी योग्य उपाय । क्रमनिग्रहचि योग्य होय । हेंचि सांगती वशिष्ठऋषि ॥ ९३ ॥
चित्ताच्या स्वभावासी जाणणार । पुरुष असती जे चतुर । उत्तम युक्तिवांचूनि वारंवार । हठयोग त्यांनीं सेवूं नये ॥ ९४ ॥
आसनावरी होऊनि स्थित । म्हणती कोणी मनोजय करूं त्वरित । हठयोगें करूं चित्त विजित । परी हें न घडे कदापि
॥ ९५ ॥ जैसे दुष्ट मतंगज महामत्त । अंकुशाविना वश न होत । तैसें उत्तमयुक्तिवांचून चित्त । वश न होय सहसाही
॥ ९६ ॥ परिसा त्या युक्तिचतुष्टय उत्तम । प्रथम ‘अध्यात्मविद्याधिगम’ । दुसरी ‘महात्माजनांचा समागम’ । अवश्य व्हावा
सर्वदा ॥ ९७ ॥ तिसरी ‘वासनांचा परित्याग’ । चवथी ‘प्राणस्पंदनिरोधयोग’ । ह्या चारी युक्तिरूप उपाय सांग । चित्तजयासी
असती हो ॥ ९८ ॥ ऐशा चारी युक्ति शक्तिमंत । विद्यमान् असतांही उक्त । जे पुरुष हठयोगें चित्त । निग्रह करिती
व्यर्थचि ॥ ९९ ॥ त्या पुरुषांसी केवढें अज्ञान । दीपाचा परित्याग करून । ते अंजनाच्या योगें जाण । तमासी निवृत्त
करितााति ॥ १०० ॥ दीप त्यागूनि हठमार्गें काजळें । अंधःकार घालवूं म्हणती बळें । ते अति मूढ दुराग्रही आंधळे ।
बंधन पावती संतत ॥ १ ॥ जेवीं मदोन्मत्त हस्ती । कमलतंतूनें बांधिती । मनोनिग्रह हठें त्या रीतीं । करिती वृथैव
॥ २ ॥ तस्मात् व्हावयासी मनोजय । क्रमनिग्रहचि असे योग्य । अध्यात्मविद्याप्राप्ति-उपाय । मुख्यत्वें होय क्रमैक
॥ ३ ॥ ते अध्यात्मविद्या कैशी संतत । कळवूनि जनांसी नित्य बोधित । कीं प्रपंच जड दृश्य मिथ्याकल्पित । नाशवंत
असे अविद्येसह ॥ ४ ॥ या मिथ्यादेहपंचादिविरहित । द्रष्टा साक्षी आत्मा सदोदित । स्वप्रकाश परमानंदरूप नित्य ।
अंतर्यामीं वसतसे ॥ ५ ॥ अजरामर परमार्थस्वरूप । हृदयस्थ जो अत्यंत समीप । प्रत्यगात्मा परब्रह्म निर्विकल्प । तोचि
प्रत्यक्ष आपण आहों ॥ ६ ॥ हाचि क्रमनिग्रह प्रथम मुख्य । परमात्माप्राप्तीस सोपा उपाय । या क्रमें सहज होत मनोजय ।
ऐसें ब्रह्मविद्या बोधितसे ॥ ७ ॥ ऐसा प्रबोध झालियानंतर । स्वविषयभूत दृश्यपदार्थ गोचर । त्याविषयीं हें मन चतुर ।

मिथ्यत्वहेतुत्वें जाणतसे ॥ ८ ॥ आपले गोचर दृश्यविषयाच्याठायीं । हें मन मिथ्यत्वहेतूनें पाहीं । प्रयोजनाच्या अभावासही । मन हें निश्चित करितसे ॥ ९ ॥ यथा प्रयोजनयुक्त । परमार्थ परमानंदस्वरूप सत्य । अविद्यामायेहूनि भिन्न अत्यंत । गुणातीत परात्पर असे ॥ ११० ॥ त्याविषयीं स्वप्रकाशतारूप हेतूला । जाणूनि आपले अविषयतेला । अध्यात्मबोधें निश्चय केला । निर्विषय मनानें शांतिप्रद ॥ ११ ॥ जैसा अग्नि इंधनरहित । आपोआप होतसे शांत । तैसें निर्विषयरूप चित्त । उपरमाप्रत पावतें ॥ १२ ॥ म्हणूनि अध्यात्मविद्या प्राप्त । झाल्यानें कष्टायासरहित । मनोनिग्रह सुखेनैव होत । ज्ञानरूप उपायें ॥ १३ ॥ आणि ऐशा बोध केलेल्या तत्त्वासी । जाणूं न शके जो आळशी । अथवा जाणलेल्या तत्त्वबोधासी । वारंवार विस्मरे जो ॥ १४ ॥ ऐशा भिन्न दोघांसी मनोजय । व्हावया 'साधुसमागम' उपाय । केलाचि पाहिजे अगत्य । अवश्यमेव सत्संग ॥ १५ ॥ या दोन्ही अधिकाऱ्यांप्रति । महात्माजन पुनः पुनः बोधिती । वारंवार ते तत्त्वबोधाची स्मृति । करविती कृपाळू अध्ययन ॥ १६ ॥ आणि जे विद्या-धन-मदादिक । दुर्वासनेनें पीडित असम्यक् । महात्मा साधुसंग क्षण एक । करूं न शकती कदा जे ॥ १७ ॥ त्या पुरुषांसी पूर्वोक्तविचारें । मनोनिग्रहासी उपाय बा रे । 'वासनापरित्याग'चि खरें । साधन तिसरें योग्य असे ॥ १८ ॥ आणि वासनेच्या अतिप्रबलता । योगें पावले जे नर दीनता । वासनात्यागार्थ असामर्थ्यता । जाहली असे जयांसी ॥ १९ ॥ तयांसी 'प्राणस्पंद-निरोधन' । चित्तनिग्रहार्थ उपाय साधन । कां तरी वासना तथा प्राणरोधन । चित्तप्रेरक असती हो ॥ १२० ॥ अतिकठिण तिन्ही उपाय । ज्यांना वाटती कष्टमय । तयांसी प्राणरोधन चतुर्थोपाय । सांगती वशिष्ठ ब्रह्मर्षि ॥ २१ ॥ रामचंद्रासी वशिष्ठ सांगती । चित्तवृक्षाचीं दोन बीजें असती । एक प्राणस्पंदनिरोध म्हणती । वासनात्याग दुसरें तें ॥ २२ ॥ या दोन बीजांतील एकाचा । नाश झाला असतां साचा । तरी शीघ्र दुसऱ्या बीजाचा ।

नाश स्पष्ट होतसे ॥ २३ ॥ आतां प्राणायामाभ्यासें दृढ । सद्गुरूनें दाविली जी युक्ति सुघड । आसनभोजनादिकांचे नियमें गाढ । प्राणस्पंद-निरोध होतसे ॥ २४ ॥ आणि असंग व्यवहार राखितां । प्रपंचचिंतन परित्यागितां । हें शरीर नाशिवंत मिथ्या देखतां । वासना निवृत्त होतसे ॥ २५ ॥ संसार प्रपंचाचें अचिंतन । निःसंग-निर्मोहत्वें व्यवहारीं वर्तन । देह दृश्य जाणलिया नाशवान् । तदा वासना नुपजेचि ॥ २६ ॥ वासनेच्या परित्यागें खचित । तैसेंच प्राणस्पंद-निरोधें चित्त । अचित्तभावासी होय प्राप्त । यावरी यथेच्छित तें करीं ॥ २७ ॥ बाह्य अनात्म-पदार्थांचें रघुनंदन । जें वस्तुत्व-स्वरूपें भावन । तैसेंचि सानुरागेंकरून । अंतरीं चिंतन पदार्थांचें ॥ २८ ॥ रघुतिलका एवढेंचि मात्र । चित्ताचें स्वरूप यथाशास्त्र । अनात्म-विषयानुचिंतन अत्र । सत्य जाण मानितों मी ॥ २९ ॥ ज्या कालीं हा पुरुष आणिक । परित्यागासी पदार्थ योग्य अमुक । किंवा ग्रहण करण्यास योग्य एक । 'वस्तुचिंतन' ऐसें तें ॥ १३० ॥ तें त्याग-ग्रहण दोन्ही टाकून । किंचित्वस्तूचें देखील चिंतन । बाह्य अनात्म-पदार्थांचें भावन । क्षणमात्रही करूं न शके ॥ ३१ ॥ किंतु सर्वांचा परित्याग करून । स्थित होतां अचिंतन । त्या कालीं चित्तोत्सर्जन । होत नाहीं सहसाही ॥ ३२ ॥ आणखी ज्या कालीं हें मन । सर्व वासनारहित होऊन । करित नसे लेश मनन । दृश्यादृश्यही वस्तूंचें ॥ ३३ ॥ त्या कालामाजीं 'अमनस्ता' । म्हणजे मनोविकारशून्यता । उद्भवते ते कैशी आहे अमनस्ता । परमात्मपददायक ॥ ३४ ॥ इतुक्या कथनें दोन उपाय । सिद्ध झाले अभ्यास-वैराग्य । प्राणस्पंद-निरोधार्थ योग्य । अभ्यासरूप उपाय असे ॥ ३५ ॥ वासनापरित्यागार्थ दुसरा । वैराग्यरूप उपाय बरा । 'अध्यात्मविद्या-साधुसंग' खरा । ऐसे हे उपायद्वय ॥ ३६ ॥ परंतु हे दोन उपाय सम्यक् । अभ्यासवैराग्याचे उपपादक । आहेत म्हणून अंतर्भूत निःशंक । अभ्यासवैराग्यामाजीं असती ॥ ३७ ॥ अतएव अभ्यासवैराग्ययुक्त । कथिलें हें जें शास्त्रविहित । तैसें वर्तावें हो साधु

संत महंत । भावें नित्य नियमानें ।। ३८ ।। चित्तवृत्तीचा निरोध योग । प्राणायामादि यथासांग । पुढें प्रसंगीं हठयोग राजयोग । होईल निरूपण यथामति ।। ३९ ।। या कलियुगीं हठयोगक्रिया । महाकष्टें सिद्ध व्हावया । कठिण असे, परी बोलावया । सोपें सहज वाटतसे ।। १४० ।। योगानुभवी सद्गुरु कुशल । योगमार्ग-प्रदर्शक जरी मिळेल । तरीच योगयोगांग साधेल । निःसंशय जाणावें ।। ४१ ।। साधिलें जरी हठनिग्रह-पक्षा । तथापि राजयोगाची उरेल अपेक्षा । कां तरी आत्मज्ञानावीण मोक्षा । पावेल कैसा अधिकारी ।। ४२ ।। हठनिग्रहाची आवडी । तेणें करूनियां तांतडी । बंद करावी सुखें नाकपुडी । वायु कोंडूनि टाकावा ।। ४३ ।। हठनिग्रहीं बहुत आयास । क्रमनिग्रहचि यापरिस । वाखाणिती श्रेष्ठ ब्रह्मविद्यावतंस । मोक्षासि सुलभ राजयोग ।। ४४ ।। स्ववर्णाश्रम निष्कामकर्म धवल । करितां ईश्वर-प्रणिधान सर्वकाल । परमेश्वरासी शरण गेल्या निर्मल । मनोजय सहज होतसे ।। ४५ ।। ईश्वरानुग्रहावांचून । तथा संत-गुरूंच्या सेवेवीण । कदा न होय योगसाधन । वेदान्तविज्ञान सुनिश्चित ।। ४६ ।। चंचळभारतीच्या मुखें श्रवण । करूनि तोषले साधुजन । म्हणती धन्य गुरुकृपा सघन । भारतीसी ज्ञान जाहलें ।। ४७ ।। ऐसा परमानंद-रसस्वाद । चाखित असतां साधुवृंद । श्रीगिरिनारी सच्चिदानंद । दिसेनासे जाहले ।। ४८ ।। टकमकां पहाती सकळिक । कोठें गेले योगींद्रतिलक । नृसिंहगुरु यतिनायक । शोधिती लोक पर्वतीं ।। ४९ ।। पंचम शिखरावरती । दत्तात्रेय-चरणपादुका असती । तेथें जाऊनि जन पाहती । तंव नृसिंहमूर्ति विलोकिली ।। १५० ।। साधुवृंद झाले अनन्य शरण । दृढ धरती दत्तात्रेयचरण । म्हणती स्वामी समर्थ आपण । आमचा सांभाळ करावा ।। ५१ ।। श्रीचरणाचा कदा वियोग । न साहवे आम्हांसी क्षणमात्र वेग । भक्तजनपालक अव्यंग । फेडा पांग दीनांचा ।। ५२ ।। ऐकूनि वचन देती स्वामी । सदासर्वदा अंतर्यामीं । अंतर्बाह्य असून स्मरणगामी । तिष्ठत आहों संत हो ।। ५३ ।।

* * *

आशीर्वचन मंगलकारक । ऐकून संतुष्टले संत सेवक । पूजूनि सद्गुरूसि सकळिक । प्रेमें आरती ओंवाळिती ॥ ५४ ॥
पुष्पवृष्टि करिती अमर । एकरूप गाजला जयजयकार । अद्वितीय ब्रह्मानंदसागर । उचंबळला सर्वत्र ॥ ५५ ॥
तेचि कथा पुढिले अध्यायांत । स्वयें वर्णवील गुरुदेवदत्त । श्रोतीं होऊनि सावधचित्त । श्रवण करावी अत्यादरें ॥ ५६ ॥
स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । त्रयोदशोध्याय गोड हा ॥ १५७ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे त्रयोदशोऽध्यायः समाप्तः ॥ १३ ॥ श्रीगुरुदेवदत्त—स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय चौदावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ गुरु सांगती शिष्यासी । स्वामिराज वसती तीर्थक्षेत्रासी । वास्तविक परोपकार करावयासी । संचरती क्षुत्पिपासा टाकुनी ॥ १ ॥ दासोपंत दत्तोपासक । मुकुंदराज महात्मा नामक । सत्पुरुष साधुसंत अनेक । वसती पर्वतीं आनंदें ॥ २ ॥ ‘जोगाईचें आंबें’ नामक । मोंगलाईंत क्षेत्र एक । डोंगर सुंदर खडक । शोभिवंत दिसतसे ॥ ३ ॥ जोगाई देवी जगदंबा । आदिमाया विश्वकदंबा । परमेश्वरी निरालंबा । आंबेग्रामीं विलसतसे ॥ ४ ॥ अंबेचें वसतिस्थान । ग्राम ‘आंबें’ नाम म्हणून । सहस्रावधि लोक येऊन । दर्शनासी घेती ते ॥५॥ ऐशा सुस्थान डोंगरांत । स्वामिमहाराज विचरत । गोरक्षकांचे मुलांत । बाललीला खेळती ॥ ६ ॥ त्या गोरक्षकांची एक मुलगी । सौंदर्यशील निरोगी । पंच वर्षांची अनुरागी । गोष्टी सांगे यतीसवें ॥ ७ ॥ यतिरायास नित्य नेमें । भाकर देतसे ती सप्रेमें । टाकूनियां इतर कामें । चरणीं लीन होतसे ॥ ८ ॥ पूर्वसंस्कार प्रबळ । त्यायोगें बुद्धि विशाळ । दिवसेंदिवस भाव निर्मळ । यतिपदकमलीं झालासे ॥ ९ ॥ नित्य चाले ऐसा क्रम । वदे हाचि पराक्रम । जन्मा येऊन त्रिविक्रम । अंतर्यामीं जाणिजे ॥ १० ॥ एके दिवशीं तिची माता । विचार करी सहभर्ता । आपली कन्या रूपसौंदर्यता-। युक्त असे मनोहर ॥ ११ ॥ आपले गृहासमोर । श्रीमंत असे सावकार । उद्यान गृह माड्या मंदिर । भृत्यासमवेत नांदतसे ॥ १२ ॥ त्यासी नसे पुत्रसंतान । तदर्थ करावें एक साधन । कन्येसी वस्त्रालंकार घालून । मुलगा म्हणोन देइजे ॥ १३ ॥ गुप्त न सांगावें कवणासी । सौख्य होईल आपणांसी । हा विचार पूर्ण मानसीं । गुराख्यांनीं केला हो

॥ १४ ॥ करविला पुरुषवेष धारण । वस्त्रालंकारभूषणें लेववून । करविलें अश्वारोहण । सेवकजनसमवेत ॥ १५ ॥ पुढें होतसे वाद्यगजर । गुलाल वर्षे पुत्रावर । नेऊन ग्रामाबाहेर । देवमंदिरीं बैसविलें ॥ १६ ॥ श्रीफल पुष्पें अर्पिती । देवासी नमन करविती । बैसवूनि अश्वावरती । दृष्ट काढिती पुत्राची ॥ १७ ॥ वाजत गाजत उत्साहीं । सावकाराचे आले गृहीं । पुत्रावरूनि उतारा लवलाहीं । ओंवाळूनि टाकिती ॥ १८ ॥ सावकारासी दंडवत । गुराखी घालिती विनययुक्त । आपणांप्रीत्यर्थ आजपर्यंत । पुत्रशोधांत होतों जी ॥ १९ ॥ अकस्मात् सुदैवेंकरून । हें सर्वोत्कृष्ट पुत्ररत्न । ईश्वरप्रेरणार्थ सप्रयत्न । प्राप्तकालीं लाभलें ॥ २० ॥ हा पुत्र परम सुंदर । केला आपुल्या चरणीं सादर । आपणांसी प्रसन्न परमेश्वर । निश्चयात्मक जाहला ॥ २१ ॥ ऐकूनियां शुभवचनास । सावकार कळवी पत्नीस । आप्त सखे सोयऱ्यांस । परमानंद वाटला ॥ २२ ॥ मेघ वर्षतां चातकास । सूर्योदयें पक्षुपक्ष्यादिकांस । वाटे अपरिमित उल्हास । तैसा आनंद वर्तला ॥ २३ ॥ बालास निजांकावरी बैसवून । सावकारें दिधलें आलिंगन । मिष्टपदार्थ मुखीं घालून । करी चुंबन मुहुर्मुहुः ॥ २४ ॥ कुलदेवगुरुवृद्धांसी । विद्वान्विप्रसंतांसी । कुलाचारपरंपरेसी । केलें वंदन बालानें ॥ २५ ॥ मग सावकारें धरूनि करीं । स्थापिलें पुत्रास गादीवरी । गीत वाद्य नानाकुसरी । नृत्यादिक मनोहर ॥ २६ ॥ नंतर उत्तम भोजन झालें । तांबूल दक्षिणादान दिधलें । उभयतांस कृतकृत्य वाटलें । पुत्ररत्न पाहूनि ॥ २७ ॥ शुक्लपक्षींच्या चंद्रकला । जैशा पावती वृद्धीला । दिनें दिनें पत्रपुष्पसकलां । तरु वाढती जैसे कीं ॥ २८ ॥ विपुल वर्षतां पर्जन्य । वर्धती अष्टादश धान्य । दिवसेंदिवस पुत्र सामान्य । वर्धमान जाहला ॥ २९ ॥ कांहीं दिवसांनंतर । पत्नीसह सावकार । तनयाचा विवाहविचार । करूं अवश्य म्हणती ते ॥ ३० ॥ प्रधानसहित आश्रितमंडळ । पाचारिले आप्त सकळ । पंडित ज्योतिषी गणितफळ । ज्ञाते द्विज आणिले ॥ ३१ ॥ सावकार म्हणे हो

आपण । चिरंजीवाचें पाणिग्रहण । करावया जन्मटिपण । पहा मुहूर्त चांगला ॥ ३२ ॥ ऐकूनि सांगती पंडित । आजी उत्तम योग असे निश्चित । पाठवावे प्रधान सुमंत । वधुशोधाकारणें ॥ ३३ ॥ मग सावकारें मंडळ । प्रेषिलें वधुशोधना तात्काळ । गंगाखेडाकडे तें उतावीळ । गेलें वस्त्रालंकारासहित ॥ ३४ ॥ सर्वप्रकारें अनुकूळ । पाहिलें योग्य सुस्थळ । कन्या चतुर विवेककुशल । दृढांगी चपल विराजे ॥ ३५ ॥ उत्तम मार्गशीर्षमासीं । शुक्लपक्षीय दशमीसी । गुरुवार तिथिनिश्चयासी । करूनि आलें मंडळ ॥ ३६ ॥ सावकारासी वृत्तशुभ । निवेदिलें वस्तुलाभ । उत्तम असें साहित्य प्रारंभ । अविलंब करा हो ॥ ३७ ॥ वस्त्रें अलंकार उत्तम । अमूल्य रत्नजडित हेम । गजाश्वरथादि उत्तम । शिबिका अंबाऱ्यादि वाहनें ॥ ३८ ॥ विविधपूर्ण अन्न सामग्री । सिद्ध करूनि सत्वरीं । निघाले जावया कन्यानगरीं । एकसहस्त्र वऱ्हाडी ॥ ३९ ॥ वाजती भेरी मृदंग । पाहूनि होती लोक दंग । रागरागिणी जलतरंग । वाजविती गाती आनंदें ॥ ४० ॥ भव्यमंदिरीं रमणीय शाखा । व्याह्यासी दिधला जानिवसा । आदरें मान योग्यसा । जलान्नपदार्थपूरित ॥ ४१ ॥ देवप्रतिष्ठा भोजन । झालें सीमांतवरपूजन । वाङ्निश्चय यथाविधान । होतां जन आनंदले ॥ ४२ ॥ वधूकडील चतुरस्त्रिया । हळदी लाविती वराचे पायां । सूक्ष्मदृष्टीनें पाहती तया । म्हणती वाया सगळें हें ॥ ४३ ॥ नसती पुरुषाचे अवयव । स्त्रीचेंचि दिसे लक्षण वैभव । कुजबुजती यौवननव । स्पष्ट अवयव स्त्रियेचे ॥ ४४ ॥ एकाएकी गलबला । हाःहाःकार स्त्रियांत माजला । सावकारासी वृत्तान्त कळला । फुटलें प्रारब्ध म्हणे तो ॥ ४५ ॥ फारचि अपमानकारक । अत्यंत खेदजनक । उभयपक्षासी जाहला शोक । म्हणती धिक्कार आम्हांसी ॥ ४६ ॥ अपकीर्ति पसरली उदंड । हे काय कपटें कुभांड । आतां लोकांत काळें तोंड । दावावें कीं मरावें ॥ ४७ ॥ सावकार आणि पत्नी । दुःखें हंबरडा फोडुनी । घेत कपाळ बडवुनी । होती फारचि विव्हळ ॥ ४८ ॥ हें मूळचें काय कपट । शोधिलें नसे

आम्ही नीट । विपरित प्रारब्धखटपट । वृथा वांचणें कायसें ॥ ४९ ॥ आतां नको गृहद्वार । यमलोकचि श्रेयस्कर ।
मनोभंग कठिणतर । साहवेना आम्हांसी ॥ ५० ॥ धन-कीर्तिस मिळविलें । आजपर्यंत व्यवहारिलें । तें सकल धुळीस
माखिलें । गेलें बुडालें पाण्यांत ॥ ५१ ॥ पूर्वदुष्कृत आड आलें । प्रारब्ध आमचें फुटलें । हरहर ईश्वरें काय केलें ।
बहुत घडविलें विपरित ॥ ५२ ॥ कोणासीही न पुसतां । बोलतां न विचारितां । वऱ्हाड निघालें दुःसह चिंता- । युक्त
आलें स्वनगरीं ॥ ५३ ॥ गेले आपापले सदनीं । चिंतानदींत निमग्न होऊनि । सावकारें भूपतीचे कानीं । घातलें वृत्त
सर्वही ॥ ५४ ॥ राजाज्ञें त्या मुलासी । संगें देऊनि मारेकऱ्यांसी । धाडिलें विजन-अरण्यासी । शिरच्छेद करावया ॥ ५५ ॥
कपटी गोरक्षकाचें घर । लुटून करावें देशपार । भूपतिविद्यमान कारभार । आज्ञानुसार होतसे ॥ ५६ ॥ त्या डोंगरांत
मारेकरी । वधावया नेती सुंदरी । तंव ते म्हणे ऐका घटिकाभरी । नका मारूं मजलागीं ॥ ५७ ॥ या डोंगरांत संन्यासीबुवा ।
मज आजोबासमान बरवा । तयाचे चरण वंदूनि निरोप घ्यावा । ऐसा हेतु मानसीं ॥ ५८ ॥ मारेकऱ्यांस
उपजली दया । चला म्हणती पाहूं तया । मग बालकास वधूं या । होईना कां विलंब ॥ ५९ ॥ आम्रवृक्षातळीं
सिद्धासन । स्वामिसमर्थ विराजमान् । तेथें उदकझरा लहान । मंद मंद वाहतसे ॥ ६० ॥ पुष्पलताफलसंबंध । चोहोंकडे
सुटला सुगंध । पक्ष्यांसह तरूचें स्कंध । शोभती आनंददायक ॥ ६१ ॥ पक्ष्यांचे मंजुलध्वनि । मनोहर पडतां
कानीं । संतोष पूर्ण दाटे मनीं । ऐसी वनशोभा अपूर्व ॥ ६२ ॥ वारंवार वायुलहरी । स्पर्शतां किंचित् शरीरीं ।
शीतल आल्हाद हितकारी । वाटे येथेंचि वसावें ॥ ६३ ॥ असो तें गोरक्षबाल । मृत्युभयें उतरलें मुखकमल । आधींच
तनु सुंदर कोमल । चिंताविव्हल अंतरीं ॥ ६४ ॥ जगत्पितामह-स्वामिपायीं । लोटांगणें ठेविली डोई । म्हणे
मायबाप तुम्ही अक्षयीं । म्हणोनि आलों शरणागत ॥ ६५ ॥ मग साद्यंत सविस्तर । वृत्त निवेदिलें भयंकर ।

शरणागतासी अव्हेर । गुरुमाउली न व्हावा ॥ ६६ ॥ सर्वस्वीं मी चरणदास । चरणीं सद्दढ विश्वास । तारक संरक्षक
विश्वास । सकलाधार आपणचि ॥ ६७ ॥ भक्तवत्सल स्वामी वरद । सांभाळावें निजब्रीद । क्षणांत माझा शिरच्छेद ।
आजोबा होत पहा हो ॥ ६८ ॥ स्वामी म्हणती होय सावध । ब्रह्मादिकांचा करूं निरोध । अशक्य होय तुझा वध ।
भीति मानसीं न धरावी ॥ ६९ ॥ योगिराज मुनींद्र यति । मारेकऱ्यांस सांगती । सावकार ग्रामाधिपति । येथें शीघ्र
आणावे ॥ ७० ॥ नातरी तुम्ही प्राणासी । मुकाल शीघ्रगतीसीं । पाहूनि नृसिंहमूर्तीसी । दचकले मारेकरी ॥ ७१ ॥
सवेंचि गेले नगरांत । सांगती सकल वृत्तांत । ईश्वर कोपलिया त्वरित । होय प्रलय सगळ्यांचा ॥ ७२ ॥ सर्वत्रमंडळीसह
सावकार । धांवत आला सत्वर । नृसिंहमूर्ति उग्रावतार । देखूनि थरथर कांपतसे ॥ ७३ ॥ स्वामी म्हणती
सकळिकां । मुलगा मुलगी पहा निका । परीक्षा करा अवलोका । या बालका दुष्ट हो ॥ ७४ ॥ मग सगळे अवलोकिती ।
पुरुषावयव प्रजापति । भयभीत होऊनि म्हणती । विलक्षण आश्चर्य हें ॥ ७५ ॥ पुरुषावयव पुल्लिंग । दृढपुरुषत्व यथासांग ।
विलोकूनि झाले दंग । म्हणती श्रीरंग पावला ॥ ७६ ॥ स्वामीसमर्थगुरुचरणीं । लोळती अवघे लोटांगणीं । धन्यधन्य
अगाधकरणी । ब्रह्मादिकां अगम्य ॥ ७७ ॥ जन्माची कन्या सावयवी । ब्रह्मदेवें निर्मिली बरवी । कपटें पुरुष म्हणतां लाजवी ।
मरणतुल्य विवाहीं ॥ ७८ ॥ जन्म स्त्रीचा पुरुष करणें । हें देवादिकां न होणें । अथवा पुरुषाची स्त्री बनविणें । हेंही
सोपें नव्हेचि ॥ ७९ ॥ जें न करवे देवां सुरां । तें अघटित कृत्य दातारा । स्वामिराया दयासागरा । केलें तुवां अपूर्व
॥ ८० ॥ सावकार विनवी कर जोडून । आम्ही अल्पमति अज्ञान । नेणों स्वामिचरित्र गहन । मदांधेंकरून योगिया
॥ ८१ ॥ या चतुर्दश ब्रह्मांडांत । जें जें आहे ईश्वरनिर्मित । तें नष्ट करूनि दुजें घडित । समर्थकर्तृत्व पूर्ण हें ॥ ८२ ॥
प्रारब्धावरी मारिती मेख । पुसोनि टाकिती विधिलेख । महापुरुषकर्तृत्व सुरेख । अतुलसामर्थ्य आपुलें ॥ ८३ ॥

* * *

आपली करितां स्तुति । स्तब्ध झाल्या वेदश्रुति । आम्ही संसारिक मंदमति । नेणों गति अगम्य ॥ ८४ ॥ धन्य धन्य भाग्य सुदिन । झालें समर्थचरणदर्शन । क्षमा असावी म्हणोन । साष्टांगीं नमनें पूजिती ॥ ८५ ॥ समर्थ आज्ञापिती सकळां । पहा आमुच्या प्रियबाळा । पुरुषत्वाची पूर्ण कळा । अबला प्रबला साधिजे ॥ ८६ ॥ पुन्हा विलोकिती नारीनर । समर्थप्रासादिक पुरुषाकार । निःशंक चकित सावकार । झाले विस्मित अवघेही ॥ ८७ ॥ ब्रह्मांडामाजीं मावेना । आनंद दाटला ऐसा जनां । ब्राह्मणभोजन समाराधना । केलें पूजन अत्यादरें ॥ ८८ ॥ श्रीगुरुस्वामी पूर्णवरद । आशीर्वचन पुत्रप्रसाद । घेऊनि निघाले महदानंद– । युक्त निरोप सद्गुरुचा ॥ ८९ ॥ सावकारें घरीं येऊन । व्याह्यासी केलें पत्रलेखन । मार्गशीर्षवद्य दशमीदिन । विवाहनिश्चय झालासे ॥ ९० ॥ येतांचि पत्रोत्तर । सिद्ध सामग्री अलंकार । घेऊनि निघाला सावकार । एक सहस्र वऱ्हाडी ॥ ९१ ॥ जानवसा पहिले स्थानीं । व्याह्यानें दिधला आदरेंकरूनि । भोजनसमारंभ होऊनि । सीमांतपूजन जाहलें ॥ ९२ ॥ लोक करिती उपहास । जाणोनि पूर्वींचा इतिहास । कोणी म्हणती भोजनास । दानदक्षिणा मिळेल ॥ ९३ ॥ स्त्रिया गदगदा हांसती । पुनःपुन्हां टाळ्या पिटिती । शहाणपणाची फजिती । पडेल आतां दृष्टीस ॥ ९४ ॥ वाङ्निश्चय हरिद्राप्रसंग । पूर्ववत् घडला साङ्ग । त्याच स्त्रिया वराचें पुरुषांग । पाहूनि दंग जाहल्या ॥ ९५ ॥ हें काय वर्तलें नवल । स्त्रीअवयव नष्टले समूळ । वरश्रेष्ठ पुरुषत्व प्रबळ । पुरुषावयव स्पष्ट हे ॥ ९६ ॥ प्रसन्न असेल चक्रपाणी । अगाध अमानुष करणी । कैसें घडलें गे साजणी । पूजिले भवानीशंकर ॥ ९७ ॥ अथवा इंद्रजाल गारूड । मणिमंत्र साधन भारूड । किंवा साधूनें दिलें चिथुड । करिती बडबड चावटी ॥ ९८ ॥ ‘शुभं भवतु सावधान’। मंगलाष्टकें विप्रवचन । भेरी मृदंग नृत्य गान । मारिती तान गायक ॥ ९९ ॥ आशीर्वाद मंगलाक्षता । वर्षितां वधुवरांवरी तत्त्वतां । आनंद न माय

चित्ता । सुप्रसन्नता सर्वांसी ॥ १०० ॥ असो विवाह समारंभ । सर्वोत्कृष्ट निर्विघ्न अदंभ । द्विजांसी दिधलें सुवर्णकुंभ । भरिले सदक्षिणांभ-सहित ॥ १ ॥ कुटिल स्त्रियांसी जामातें । जेव्हां दाविलें पुरुषार्थातें । टाकोनि उन्मत्ताभिमानातें । लागती पायांतें अनन्य ॥ २ ॥ विवाहसमारंभचमत्कार । जामात पुरुषार्थाचें भाण्डार । देखूनि करिती नमस्कार । जोडिती कर क्षमार्थें ॥ ३ ॥ लक्ष्मीतेज आनंदवृद्धि । यश बल विजय समृद्धि । दीर्घायु आरोग्य चित्तशुद्धि । हरिभक्ति लाधली ॥ ४ ॥ यासी सुपुत्रसंतान । ज्ञानविज्ञानसंपन्न । सत्पुरुष कीर्तिमान् । आयुष्मान् होईल ॥ ५ ॥ आशीर्वचन समर्पण । प्रसन्न-वदनें श्रेष्ठ ब्राह्मण । म्हणती 'उदयोऽस्तु' कल्याण । पुत्रपौत्रें नांदाल ॥ ६ ॥ तदनंतर हर्षभरित । सावकार पुत्रस्नुषासहित । व्याही समस्तांसी बोलवित । यथायोग्य सन्मानें ॥ ७ ॥ वस्त्रालंकार जामाता । तैसेंचि अर्पिलें समस्तां । व्याही वदे प्रेमें आतां । कृपा लोभ असावा ॥ ८ ॥ वऱ्हाड आलें स्वनगरीं । आनंद वर्तला धनिकद्वारीं । तात्काळ गेले सकळ डोंगरीं । स्वामिरायांच्या दर्शना ॥ ९ ॥ नानापदार्थ-फलांसी । अर्पिती स्वामीसमर्थांसी । स्वामी वदती बाळासी । कुटुंबसह क्षेम असो ॥ ११० ॥ दोन पुत्र झाल्यावरी । भेटीस यावें प्रज्ञापुरीं । गुप्त गोष्ट ही प्रगट न करी । शास्त्राचारें वर्तावें ॥ ११ ॥ नरहरि ऐसें बोलिले । तात्काळ अंतर्धान पावले । सर्वांसी आश्चर्य वाटलें । पुरुषोत्तम म्हणती हे ॥ १२ ॥ समस्त आनंदोत्साही । आले आपापले गेहीं । स्वामिलीलामृत सर्वदाही । कल्याणार्थ प्राशिती ॥ १३ ॥ परमपुरुष परमहंस- । प्रसादें सावकारपुत्रास । कांहीं गेलिया वर्ष मास । पुत्र प्राप्त जाहले ॥ १४ ॥ द्वादशवर्षांचीं बालकें । खेळती लीला कौतुकें । बालहट्ट घेती जितुके । तितुके पुरविती उल्हासें ॥ १५ ॥ षोडश वर्षांचे पुत्र झाले । विवाह शुभकार्या करविलें । मोठे बुद्धिमान निघाले । विद्वान् साजले ते पुत्र ॥ १६ ॥ समर्थांचा आशीर्वाद सत्य । सुखी नांदती उभय दंपत्य । सावकारपुत्रें पाहूनि कृत्य । सावध झाला

परमार्था ॥ १७ ॥ श्रीगुरुकृपें मूळची विरक्ति । त्यांत वाढली स्वामीभक्ति । तुटली संसार आसक्ति । जीवन्मुक्ति
व्हावया ॥ १८ ॥ सर्वत्रांचे आज्ञानुसार । सोडूनि प्रपंच संसार । स्वामिद्वारास संतोषें सत्वर । निघाला यतिवरदर्शना
॥ १९ ॥ कांहीं न कलह प्रपंच विकार । वैराग्य सद्भक्त उदार । त्यागूनि देहअहंकार । सावकारपुत्र निघाला ॥ १२० ॥
लोकांसि फार संसार सोस । सोडितां होय जीव कासावीस । कदाचित् त्यागिल्या न सुटे आस । सत्य वैराग्य तें नव्हे
॥ २१ ॥ वैराग्य घेती ऋणासाठीं । दुराचारिणी स्त्री मोठी । स्त्रीमुळें तीर्थाचे कांठीं । कंटाळुनी जाती विरक्त ॥ २२ ॥ प्रिय
स्त्रीपुत्रांचा वियोग । मनासारिखे न मिळती भोग । दंड कारागृह येतां योग । वैराग्य वेष साधिती ॥ २३ ॥ परस्त्री-
परधनापहार । विश्वासघातें गृहद्वार । संपादूनि गोष्टी चतुर । वैराग्यविचार बोलती ॥ २४ ॥ ऐसें नव्हे वैराग्य कृत्रिम ।
विषयेच्छारहितकाम । तीव्रवैराग्य कृत्रिम । स्वामिभक्त परमविरागी ॥ २५ ॥ मनोजय वासनाक्षय । अंतःकरण शुद्ध
निरामय । तें यथार्थ निर्मलवैराग्य । इहामूत्रभोग टाकणें ॥ २६ ॥ असो सर्वांचा घेऊनि निरोप । श्रीगुरुचरणांसमीप ।
कुलोद्धारक कुलदीप । प्रज्ञापुरीं पातला ॥ २७ ॥ नमन करी वारंवार । स्तोत्र वर्णीत अपार । कायावाचामनें तत्पर ।
शुद्धांतर गुरुपुत्र ॥ २८ ॥ समर्थ वदती तयासी ऐका । कां रे बाळा गोरक्षका । आलासि सख्या परमार्थिका । आज्ञा-
पालका सत्यत्वें ॥ २९ ॥ गोसावी होऊन षण्मास । अनुभवुनी परब्रह्मास । समर्थाज्ञें तीर्थयात्रेस । गेला गिरनार पर्वतीं
॥ १३० ॥ म्हणे ब्रह्मनिष्ठ वामन । गिरनार पर्वतीं मजलागून । सावकारपुत्र सुजाण । कमंडलू तीर्थीं भेटला ॥ ३१ ॥
स्वामिलीला गुप्तकथा । साद्यंत निवेदिली सर्वथा । अक्षरशः तीच गुंफिली यथार्था । नव्हे अन्यथा श्रोते हो ॥ ३२ ॥
दत्तात्रेयस्वामी ब्रह्मानंद । अद्भुतानंत गुणानुवाद । वर्णितां न सरती विशद । शास्त्रें वेद थकताति ॥ ३३ ॥ श्रीगुरु
शिष्यासी सांगती । अपार लीला न मावे त्रिजगतीं । जगदुद्धारार्थ यथामति । करा श्रवण प्रीतीनें ॥ ३४ ॥ लीलामृत-

श्रवणें निर्वेध । पिशाच्चभूतादि संबंध । नष्ट होती अनेक बंध । दुरितनिरोध ग्रंथपठणें ॥ ३५ ॥ जैसा करतलामलक । अनुभव स्पष्ट सम्यक् । तैशीं प्राप्त सौख्यें अनेक । एकनिष्ठें अवलोका ॥ ३६ ॥ पुढिले अध्यायीं कथन । रसभरित आख्यान । वदविता समर्थ अत्रिनंदन । दयाघन समर्थ ॥ ३७ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदशास्त्रपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । चतुर्दशाध्याय गोड हा ॥ १३८ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे चतुर्दशोऽध्यायः समाप्तः ॥ १४ ॥

श्रीगुरुदेवदत्त – स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय पंधरावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ ॥ शिष्य गुरुवक्त्यासि विनवी । श्रीगुरुलीलामृताची चवी । अविट मधुर चाखितां बरवी । तृप्ति न वाटे कदापि ॥ १ ॥ गुरुलीलामृताचा नित्य वारंवार । श्रवणद्वारें हृदयीं व्हावा संचार । तेणेंच अंतर्यामीं आत्मा गुरुवर । ओळखिला जाईल सत्यत्वें ॥ २ ॥ तरीच नरजन्माचें सार्थक । होईल निःशंक निश्चयात्मक । म्हणून लीलामृत भवतारक । मोक्षदायक प्राशावें ॥ ३ ॥ विलंब न करितां मजलागीं । प्राशन करवा जी सर्वोपयोगी । मग श्रवणार्त प्रेमीविरागी । शिष्यासी गुरु सांगती ॥ ४ ॥ शिष्या तुजनिमित्तें अनायासें । आम्हांसही महल्लाभ होतसे । जगद्धितार्थ ही एकचि असे । आत्मज्ञानरूप गुरुलीला ॥ ५ ॥ प्रसिद्ध दक्षिण देशीं धाम । ज्याचें 'सेतुबंध-रामेश्वर' नाम । विख्यात क्षेत्र आहे सुखाराम- । दायक सर्व जनांसी ॥ ६ ॥ भागीरथीच्या आणूनि कावडी । श्रीरामेश्वरावरी घालिती आवडीं । रामेश्वरसेतु घेऊनि जन तांतडीं । अर्पिती श्रीभागीरथीस ॥ ७ ॥ ब्रह्मचारी गृहस्थ वनस्थ मुंडी । संत महंत विरागी साधूंच्या झुंडी । उष्णकालीं किंवा असतांही थंडी । रामेश्वर–दर्शनार्थ जाती कीं ॥ ८ ॥ कन्याकुमारी दक्षिण रामेश्वर । समुद्र-संगमतीरीं ज्योतिर्लिंग थोर । ज्येष्ठ शुद्ध दशमीं बुधवारीं सुंदर । श्रीरामचंद्रें स्थापिलें ॥ ९ ॥ या रामेश्वर-ज्योतिर्लिंगाचे पूजारी । पूर्वी ब्राह्मण होते सदाचारी । एक वृद्ध पूजारी मृत झाल्यावरी । शिरले लोक जंगम ॥ १० ॥ पूजाऱ्यांच्या स्त्रीपुत्रांस । जंगमांनीं बहुत देऊनि त्रास । आपणचि पूजारी होऊनि विप्रास । लिंगासी स्पर्श करूं न देती ॥ ११ ॥ बलात्कारें जंगम पूजारी होऊन । उन्मत्तपणें अविचारेंकरून । यात्रेस येती जे जे

जन । त्यांसी गाभाऱ्यांत जाऊं न देती ॥ १२ ॥ करूं न देती रामेश्वर-पूजन । करिती लोभें द्रव्यहरण । यात्रेकऱ्यांस त्रासवून । गालीप्रदानें अर्पिती ॥ १३ ॥ लहानमोठ्यासी धिक्कारिती । अधिकाऱ्यांसी प्रौढी दाविती । यात्रेकऱ्यादिक सर्व म्हणती । हें काय पाप शिवालयीं ॥ १४ ॥ मग सर्व लोक एकत्र होऊन । बहुतदिवसांचा पूजारी मृतब्राह्मण । त्याचे पुत्रासि पाचारून । करिती विचार योग्य तो ॥ १५ ॥ राजमुद्रांकित सनदापत्रें जुनीं । केलीं एकत्र शोधुनी । मग विनंतिपत्र लिहूनि । प्रमाणपत्रासह ॥ १६ ॥ नृपाचे विद्यमान जे अधिकारी । त्यांसी दाविलें न्यायमंदिरीं । त्यांनीं खरीं सनदापत्रें षण्मासाभीतरीं । निरखूनि न्याय केला ॥ १७ ॥ निर्णय करूनि वासुदेवभटाला । पूर्ववत् रामेश्वरपूजाअधिकाराला । समर्पूनियां तयाला । क्लेशमुक्त सहज केलें ॥ १८ ॥ सांप्रत ते वासुदेव वृद्धब्राह्मण । श्रीरामेश्वराचें करिती पूजन । जंगमांनीं केलें पलायन । सत्याचा परिणाम सत्यचि ॥ १९ ॥ असो ऐशा महान क्षेत्रांत । स्वामिराज गुरु अवधूत । एका वृक्षाखालीं वालुकेंत । बैसती स्वच्छंदें व्यवहारी ॥ २० ॥ तेथें अन्नसत्रें असतीं । त्यांतील एक अन्नसत्रावरती । कारकून होता द्विज सुमती । पापरहित सात्त्विक ॥ २१ ॥ त्यानें अवलोकून वृक्षतळीं । धांवून वंदिले श्रीचंद्रमौळी । म्हणे दयाळा आपणाजवळी । पदार्थसंग्रह एकही नसे ॥ २२ ॥ क्षुधापिपासनिवृत्त्यर्थ । कोठें न देखिले हो आपणां समर्थ । परी दैदिप्यमान् पुरुष यथार्थ । पाहतांचि मनोरथ पूर्ण होती ॥ २३ ॥ मी आपणासाठीं नित्य नैवेद्य । आणूनि देईन लेह-पेय-चोष्य-खाद्य । स्वीकारा जी देवा जगद्वंद्य । वेदांतवेद्य आपण आहां ॥ २४ ॥ ऐसें बोलूनि अन्नभरित ताट । आणूनि ठेविलें विप्रें निकट । स्वामिरायें विप्रचित्त । चोखट देखूनि स्वल्प ग्रहण केलें ॥ २५ ॥ मग नित्यनेमें तो ब्राह्मण । अन्नपूरित पात्र ठेवी आणून । लोकांस कळलें तें वर्तमान । तेव्हांचि येऊन विलोकिती ॥ २६ ॥ तेजस्वी दिव्य मनोरम मूर्ति । दर्शनेंचि वाटे समाधान शांति । हे सत्पुरुष महात्मा म्हणती । निःस्पृह यति जितेंद्रिय ॥ २७ ॥ कोणी म्हणती बाल-

पिशाच्चवत् । वेड्यासारिखें वर्तन लोकांत । कां दाविती याचें न उमजत । विशेष तात्पर्य आम्हांसी ॥ २८ ॥ तथापि
हें अत्यंत प्रिय दर्शन । सहज सुलभ झालें दुर्लभ असोन । आमचें पूर्वसुकृत म्हणून । पातले पुरुष कारणिक ॥ २९ ॥
वृक्षातळीं कधीं असावें नसावें । कोठें परोपकारार्थ फिरावें । एकेक पक्षीं दिवशीं न घ्यावें । अन्नोदक स्वच्छंदें ॥ ३० ॥
नित्य नैवेद्य आणणारा विप्र । त्याचीं वयोवर्षें साठ संवत्सर । झालीं असोनि संतान पुत्र । देखिलें नाहीं यदर्थ ॥ ३१ ॥
उभयतां देवास विनविती सर्वथा । आमची झाली वृद्धावस्था । येवढीच पूर्ण करावी आस्था । व्हावी व्यवस्था पुत्रहस्तें
॥ ३२ ॥ स्त्रीपुरुषांचा पाहूनि आग्रह । उत्तर देती यति अपरिग्रह । 'पुत्र होईल जाईल परी निग्रह । करीं रे ब्राह्मणा
इंद्रियांचा' ॥ ३३ ॥ आशीर्वचन ऐकूनि स्त्रीपुरुषांस । आनंदरूप झाला संतोष । पुढें गर्भ राहून विप्रस्त्रियेस । नवमास
पूर्ण भरले ते ॥ ३४ ॥ नंतर द्विजपत्नी प्रसूत होऊन । लाधलें सुंदर पुत्रसंतान । उभयतांस वाटलें समाधान । कुमारमुख
पाहूनि ॥ ३५ ॥ नित्यनियमें तो ब्राह्मण वृक्षतळीं । ठेवी नैवेद्य सान्न पत्रावळी । पुत्र देऊनि गेले तात्काळीं ।
स्वामिसमर्थ योगिराज ॥ ३६ ॥ सप्त वर्षांचा जाहला द्विजसुत । उभयतां बैसले विचार करित । यतिवर्यांच्या पायांवरी
हर्षित । घालूं म्हणती पुत्रातें ॥ ३७ ॥ परंतु ते संन्यासी अधोक्षज । कोठें न दिसती महाराज । बहुत दिवसांत भक्तकाज– ।
कल्पद्रुम चिंतामणि ॥ ३८ ॥ ती गुरुनाथ माउली कामधेनु । भेटेल तो सुदिन मानूं । जैसा उदयासि पावला
भानु । म्हणजे सर्व संतोषती ॥ ३९ ॥ प्राणिमात्रांचा व्यवहार । चाले प्रकाशलिया भास्कर । आपोआप लयासि अंधःकार ।
पावतो ज्याप्रकारें ॥ ४० ॥ तैसे यतीश्वर ते अलौकिक । साक्षात् अवतारी जगन्नायक । केवल आमचे जननीजनक ।
केव्हां दर्शन देतील ॥ ४१ ॥ इकडे वृक्षतळीचें नित्य अन्न । एक पिशाच्च करी भक्षण । विप्र म्हणे येथें नसती नारायण ।
नैवेद्य कोण भक्षीतसे ॥ ४२ ॥ कोणी भूत प्रेत पिशाच्च राक्षस । किंवा झोटिंगादिक भक्षी अन्नास । ऐसा संशय आला

६६

ब्राह्मणास । भगवंतास आठवी तो ॥ ४३ ॥ दुसरे दिनीं द्विज पत्नीपुत्रासहित । श्रीरामेश्वर–दर्शन करूनियां चिंताग्रस्त । बाहेर येऊनि उभा ठाकत । तों सद्गुरूसी देखिलें ॥ ४४ ॥ श्रीमत्परमहंस परमपुरुष । पूर्णब्रह्म परमात्मा निर्विशेष । नुकतेच मंदिरांत पाहिले जे विशेष । तेचि बाहेर ठाकले ॥ ४५ ॥ क्षणही न जाहला विलंब । इतुक्यांत बाहेर कैसे धावले निरालंब । हे प्रत्यक्ष श्रीसदाशिव सांब । हेरंबजनक ईश्वर ॥ ४६ ॥ देवालयीं देखिले तेचि बाहेर । संन्यासवेषें श्रीरामेश्वर । जे दीनशरणागताचें माहेर । ते दयासागर विलोकिले ॥ ४७ ॥ देवळांत ज्योतिर्लिंगस्थानीं । संन्याशी बैसलेले देखिले कित्येकांनीं । तीं मनुष्यें तत्काल बाहेर येऊनी । पाहती तों तेंचि रूप उभें ॥ ४८ ॥ महदाश्चर्य वाटलें सर्वांसी । साष्टांगीं वंदिती यतिचरणांसी । 'ॐ नमो नारायणाय' मंत्रासी । उच्चारूनि प्रार्थिती ॥ ४९ ॥ नैवेद्य आणणारा ब्राह्मण । पत्नीस म्हणे पुत्रास आणून । या भवतारक पायांवरी जाण । घालीं गे तनयास शुद्धमति ॥ ५० ॥ उभयतां पुत्रास मारिती हांका । धांव रे पुन्हां वेळ येईल हा कां । नरतनु गेल्या फोडिशील हांका । शीघ्र बालका येईं रे ॥ ५१ ॥ पाचारिलें शब्दीं बहुतवार । परिसूनि पुत्र देत प्रत्युत्तर । मला त्या यतिवर्यासमोर । येण्यास भय वाटतें ॥ ५२ ॥ त्या समयीं द्विजस्त्रीनें पुष्पफलादिक । योगीश्वरासि अर्पिलें सम्यक् । ब्राह्मण गर्जोनि म्हणे बाळा ऐक । विश्वव्यापका वंदी रे ॥ ५३ ॥ दुरूनि वदे ब्राह्मणसुत । त्या यतिवरासी पाहतांचि मी होईन मृत । जाणा हो हें निश्चित । म्हणूनि कांपत थरथरां ॥ ५४ ॥ मग पित्यानें पुत्रास ओढूनि आणिलें । त्या कालीं पुत्रें नेत्र झांकिले । म्हणे मी जातों खचित भले । मारूं नका रे मजलागीं ॥ ५५ ॥ ऐसें बोलूनि एक घटिकेंत । पुष्ट आणि उंच झाला दशहस्त । हें पाहूनि मायबापें भयचकित । लोकही तैसेच होती कीं ॥ ५६ ॥ हा सप्तवर्षांचा विप्रतनय । दशहस्त उंच झाला हें आश्चर्य । याचें आम्हांस वाटतें भय । आतां काय करावें ॥ ५७ ॥ तंव तो म्हणे मला द्यावी मुक्ति । ऐसें विनवूनि योगिराजाप्रति । धाडकन् पडूनि पृथ्वीवरती ।

मृत झाला तत्काळ ॥ ५८ ॥ ऐसें विलक्षण कृत्य पाहून । दचकती मनीं सकल जन । पुत्रार्थ मायबापें आक्रोशून । करिती रुदन
अतिशय ॥ ५९ ॥ जिकडे तिकडे हाहाःकार । सगळेचि भयचिंतातुर । म्हणती धांव धांव रे रामेश्वर । तूंचि यतिवर दयाळा
॥ ६० ॥ आम्हीं अथवा आमच्या पितरें । ऐकिलें न देखिलें याप्रकारें । या कालीं भगवंतें दयासागरें । सांभाळावें सर्वांसी
॥ ६१ ॥ आम्हांसि दावितां संन्यासीरूप । परी आपण साक्षात्पूर्णब्रह्मस्वरूप । जगत्कार्यधुरंधर प्रौढप्रताप । नेणों आम्ही
मदांध ॥ ६२ ॥ जो अज्ञानरूप संसार मादक । तापत्रयरूप नाशिवंत मायिक । प्राण्यासि सर्वस्वीं क्लेशदायक । प्राणघातक
जन्मोजन्मीं ॥ ६३ ॥ ह्या संसारीं भुलून । रतलों नेणूनि आपलें महिमान । जन्ममरणरूप खेपा करून । पुनःपुनः
संसारिक होतों ॥ ६४ ॥ अनिवार संसारमायाचक्रांत । सांपडलों व्यर्थ अहंकारयुक्त । आतां आपण परमेश्वर साक्षात् । भेटलां
पूर्वसुकृतें ॥ ६५ ॥ ऐशी परिसूनि बहुलोकप्रार्थना । करुणा उपजली जनार्दना । म्हणती 'पुत्र होईल जाईल' ऐशा वचना ।
कथिलें होतें पूर्वींच ॥ ६६ ॥ म्हणूनि व्यर्थ करूं नका शोक । तें झाडावरील पिशाच्च नैवेद्यभक्षक । तोचि राक्षस तुमचा
झाला लेक । तद्योनीमुक्त केला हो ॥ ६७ ॥ सुगति लाधली तयासी । अग्निदाह द्यावा प्रेतासी । ह्या श्रीगुरुस्वामीवचनासी ।
ऐकून कित्येक शंकती ॥ ६८ ॥ पुष्ट दशहस्तउंच जड प्रेत । उचलावयासि कोणी न शक्तिमंत । मग योगीश्वर सांगती
धर्महित । प्रेतासी विभूति लावावी ॥ ७९ ॥ भस्ममहिमा वर्णूनि अपार । बोधिती जनांसि कृपासागर । पूर्ववत् लहान
होईल शरीर । वचन हें सत्य मानावें ॥ ७० ॥ यदर्थीं नसावा संशय । ऐसें आज्ञापिती श्रीगुरुवर्य । तदनुसार विभूतिमय ।
केलें कलेवर राक्षसाचें ॥ ७१ ॥ भस्म लावितांचि शवभालीं । पूर्ववत् सप्तवर्षांचा तत्कालीं । मृतबाल झालेला
पाहून मंडळी । म्हणती हें काय अघटित ॥ ७२ ॥ मग त्या प्रेतासि अग्निदाहादिक । केलें पित्यानें कर्म विधिपूर्वक ।
मायबाप बहुत करिती शोक । लोटले कित्येक दिवस ॥ ७३ ॥ पुन्हां रामेश्वरदेवालयांत । श्रीमत्परमहंस अवधूत ।

विलोकूनि तीं स्त्रीपुरुषें दंडवत् । सद्भावें घालती चरणांवरी ॥ ७४ ॥ तो ब्राह्मण पत्नीसह विनवित । अहो पुरुषोत्तमा
भगवंत । पतितपावना होऊनि कृपावंत । निपुत्रिकलांछन दूर करा ॥ ७५ ॥ वय झालें साठवर्षांहूनि अधिक । वृद्धावस्था
त्यांत देह क्षणिक । आपण अनंतकोटी ब्रह्मांडनायक । संरक्षक आहां निश्चयेंसीं ॥ ७६ ॥ पुत्रप्राप्तीची आमची उत्कंठा ।
पूर्ण करावी नीलकंठा । नंतर आम्हांसि पाठवावें वैकुंठा । आतां कंठासि प्राण आलासे ॥ ७७ ॥ मग द्विजस्त्रीस त्यांच
साठावे वर्षीं । पुत्रसंतान लाधतां होय निमग्न हर्षीं । जैसें अवर्षणकालीं मेघ उदक वर्षी । तेणें सर्वां अत्यानंद होतसे
॥ ७८ ॥ तैसें त्या वृद्धस्त्रीपुरुषांसि पुत्रसुख । पाहूनि उचंबळलें अत्यंत सुख । श्रीगुरुलीला सर्वार्थदायक । अगम्य असे सर्वांसी
॥ ७९ ॥ पाहूनि अघटितचमत्कार । लोक म्हणती हे साक्षात्परमेश्वर । महिमा न कळे यांचा अपार । म्हणूनि जयजयकारें गर्जती
॥ ८० ॥ धन्य भाग्योदय आजि दिवस । भेटले परमपुरुषपरमहंस । जगदोद्धारक अवतारी खास । कृतार्थ झालों तत्कृपें
॥ ८१ ॥ त्या कालीं ज्यांनीं हें कृत्य अलौकिक । पाहिलें प्रत्यक्ष त्यांतील लोक । अद्यापपर्यंत जीवंत कित्येक ।
प्रामाणिक आहेत ॥ ८२ ॥ त्यांनीं ह्या अमानुषलीला । कथिल्यान्वयें सत्यत्वें ग्रथित केल्या । यत्किंचित्हि लापिकेला ।
ग्रथिलें नाहीं सर्वथा ॥ ८३ ॥ वृद्ध रखुमाबाई मराठीण । तिनें स्वामिचरित्र सप्रमाण । रामेश्वरींचे इत्थंभूत निरूपण ।
केलें प्रत्यक्ष पाहिलेलें ॥ ८४ ॥ त्या वेळींचे नारायणभट । आणि रामेश्वरींचे पूजारी श्रेष्ठ । वासुदेवभटही सांगती
प्रकट । योगीश्वरांचे चमत्कार ॥ ८५ ॥; एक महंमदशहा अवलिया फकीर । स्वामिमहाराजांचीं चरित्रें अपार । प्रतीतीस
आलेलीं सत्याकार । सांगत होता निःपक्षपातें ॥ ८६ ॥ असो जें स्वतःसिद्धप्रमाण । त्यासी कासया अन्यप्रमाण कारण ।
मूळपुरुष तो आदिनारायण । लोककल्याणार्थ प्रकटला ॥ ८७ ॥ श्रोतीं तें परिसावें सावधान । श्रीगुरुलीलामृत
श्रवणेंकरून । हृदयकमलीं सर्व प्रकाशमान् । जाणिलें जातें स्वात्मरूप ॥ ८८ ॥ आणि सर्वाभीष्टप्रद नित्य । हें अनुभवून

पहावेंचि सत्य । कुबुद्धि षड्विकारांचें पारिपत्य । होतें तत्पादसेवनें ॥ ८९ ॥ श्रीरामेश्वराजवळ कोटिकूप । तीर्थ आहे
करणारें अपाप । ह्या कोटितीर्थीं स्नानास्तव ताप । असे पूजाऱ्यादिकांचा ॥ ९० ॥ रौप्य मुद्रिकांवांचून । ते करूं न
देती तीर्थस्नान । त्या तीर्थीं स्वामिराज जनार्दन । सहज गेले स्नानार्थ ॥ ९१ ॥ पूजाऱ्यांस म्हणती आम्हां स्नान ।
घाला रे तुम्ही देवभक्तजन । ते उन्मत्त वदती उपहास करून । द्रव्याविना स्नान न घडे ॥ ९२ ॥ मग तयांसी वदती
योगीश्वर । आम्हीं निर्धन संन्यासी दिगंबर । कोठूनि द्यावा तुम्हांसी कर । व्यर्थ किरकिर करूं नका ॥ ९३ ॥ पूजारी
सांगती ज्यापाशीं धन । तयासी घडतें पुण्यस्नानदान । धनावीण कोरडें ब्रह्मज्ञान । विद्वत्व सर्व निरर्थक ॥ ९४ ॥ समर्थ
वदती उत्तर वचन । स्नानचि पळालें तीर्थांतून । स्वस्थ बसा याप्रकारें बोलून । गेले निघून यतींद्र ॥ ९५ ॥ यतियूथपति
गेल्यावर । त्या तीर्थीं किडे पडले फार । दुर्गंधीमुळें कोणीही नर । स्नानपानादिक न करिती ॥ ९६ ॥ स्नानाचें उत्पन्न
बुडालें मग । पूजाऱ्यादिकांसि लागला उद्वेग । द्रव्य वेंचून उपाय साङ्ग । अनेक साधनें साधिती ॥ ९७ ॥ करिती
रामेश्वरास नवस । दाविती मांत्रिकी जाणत्यास । परोपकारीं केलिया प्रयत्नास । तथापि दुर्गंध जाईना ॥ ९८ ॥
श्रमुनी थकले निरुपाय । म्हणती कोपले ते यतिवर्य । या गोष्टीस करावें तरी काय । तळमळुनी हाय करिती ॥ ९९ ॥
स्वामिरायाचा शोध बहुत । गांवोगांवीं केला अरण्यांत । परंतु दृष्टीस पडले नाहींत । अवधूतदिगंबरमहाराज ॥ १०० ॥
देहाभिमान गळाल्यावीण । शुद्ध झाल्यावांचून अंतःकरण । कैसा ओळखिला जाईल नारायण । कोठें कधीं भेटावा
॥ १ ॥ श्रीसद्गुरुकृपा नसतां । वेदांतविज्ञाननिश्चयरहितां । अनधिकाऱ्यांसि ओळखितां । कैसा यावा परमेश्वर ॥ २ ॥
मग ते असोत चतुर्वेदी । शास्त्री पंडित कवि विवादी । ज्योतिषी मांत्रिक चिकित्सकादि । गीतवाद्यांत निपुण जे ॥ ३ ॥
अथवा भूपति प्रधानादिक । शूर वीर योद्धे सेनानायक । त्यांना शुद्धभावावीण जगन्नायक । भेटी नाहींच सर्वथा ॥ ४ ॥

किंवा ब्रह्मचारी गृहस्थ वानप्रस्थ । संन्यासी साधु संत मौनी ध्यानस्थ । जपी तपी महंत एकासनस्थ । नानापंथी मठाधिपति
॥ ५ ॥ पुरश्चरणी भजनी कथेकरी । यात्रेकरी तीर्थदेवांचे वारकरी । श्रीमंत सुखी धनी अधिकारी । संभावित प्रतिष्ठित मानी
॥ ६ ॥ कलाकौशल्यनिपुण धूर्त आदिकरून । मोठे असोत किंवा लहान । ते सर्व शुद्धभक्तीवांचून । प्राप्त न होती
परमेश्वरा ॥ ७ ॥ तैसे ते पूजारी बहु अहंकारी । शुद्धभक्तिभावनारहित अंतरीं । सकामनिक शोधिती पृथ्वीवरी । धनलोभी
मदांध ॥ ८ ॥ जेथें प्रत्यक्ष नांदे शारदापीठ । श्रीमच्छंकराचार्य जगद्गुरु श्रेष्ठ । ज्यांचा प्रसिद्ध मुख्य शृंगेरीमठ । तेथें गेले पूजारी
॥ ९ ॥ जगद्गुरूसी साष्टांग प्रणिपात । करूनि झाले शरणागत । करद्वय जोडूनि इत्थंभूत । योगीश्वरवृत्त निवेदिलें ॥११०॥
धर्मसंस्थापक स्वामी शंकर । धर्ममार्गासि लाविती निरंतर । सर्वांसि पूज्य जगद्गुरुवर । वेदवेदांगपारग असती जे ॥ ११ ॥
दया क्षमा शांति परोपकार । इत्यादिकांचें अधिष्ठान सुखकर । सर्वविद्येचें विस्तृत भांडार । अखंडमंडित विराजे ॥ १२ ॥
दंड-प्रबोधरूप प्रकाशमान् । कमंडलूंत भरलें अद्वैतामृत जीवन । तीव्रवैराग्य काषायवस्त्रपरिधान । केलें वेदविहित
ज्ञानार्थ ॥ १३ ॥ जें वेदोक्त धर्माचें रहस्य । उमजवुनी वर्तवावे जन निरालस्य । प्रतीतीस यावें अखंडोपास्य । ब्रह्मात्मस्वरूप अभेद ॥ १४ ॥ कामरागद्वेषादिरहित व्हावयासी । यथार्थ स्वहित कळावया जनासी । शास्त्रयुक्ति प्रेमें सद्धर्मोपदेशी ।
शंकराचार्य जगद्गुरु ॥ १५ ॥ त्यांनीं पूजाऱ्यादिकांचें हृद्गत । परिसूनियां इत्थंभूत । योगसमाधि लाविली
त्वरित । यतिवर्या शोधावया ॥ १६ ॥ शंकराचार्य साक्षात्सदाशिव । त्रिकाल ज्ञानें जाणिलें सर्व । समाधि विसर्जूनि
स्वयमेव । वर्णिती वैभव यतीश्वराचें ॥ १७ ॥ ते संन्यासी दिसती मानव । परंतु साक्षाद्देवाधिदेव । जगदुद्धारार्थ
कलियुगीं स्वयमेव । परमेश्वरचि अवतरले ॥ १८ ॥ अमानुषिक अघटित चरित्र । अगम्य अगाध असे विचित्र । ज्यांच्या
सद्यश-श्रवणें इहपरत्र । साध्य होतसे निःसंशयें ॥ १९ ॥ तुम्ही व्यापिलां मायामोहें । योग्यायोग्य जाणते नव्हे ।

चढलां मदें अहंदेहें । मिथ्याप्रपंच-चक्रावरी ॥ १२० ॥ धनलोभें पूजितां देव त्रिकाल । धनार्थ लोकांचा करितां छल । ब्रह्मकुलीं जन्मूनि कृत्यें अमंगल । आचरितां कैशीं दुर्मति ॥ २१ ॥ आजपासूनि लोकांचें छलन । तिरस्कार कराल अपमान । तरी तुमचा सर्वस्वीं नाश होऊन । अधोगतीस पावाल ॥ २२ ॥ सर्वांचें आदरातिथ्य करावें । सत्य प्रिय मृदुवचनें संतोषवावें । सद्धर्माचारें धन यश मिळवावें । उदर भरावें मिळेल त्यांत ॥ २३ ॥ त्यागूनि समूल देहाहंकृति । पूर्ण ब्रह्मावतार वेषी यति । अनन्यें शरण रिघावें तयांप्रति । कृपा करितील निश्चयें ॥ २४ ॥ पूजाऱ्यांनीं राहूनि दिन त्रय । पूजिले श्रीमच्छंकराचार्य । पश्चात्तापें होऊनि शुद्धि मनोजय । आज्ञा घेऊनि निघाले ॥ २५ ॥ आले रामेश्वरक्षेत्रांत । तत्काल दर्शनासि गेले देवालयांत । तों लिंगस्थानीं देखिले मूर्तिमंत । अवतारिक संन्यासी ॥ २६ ॥ स्वामिराज म्हणती तयांसी । भेटूनि आलां कीं श्रीजगद्गुरूसी । स्वानुभवें लाजून उमजून मानसीं । करिती तेव्हां दंडवत ॥ २७ ॥ प्रार्थिती आपण साक्षात् ईश्वर । अंतःसाक्षी व्यापक निर्विकार । अपराध क्षमा करूनि बालकांवर । दया करावी जननीसम ॥ २८ ॥ त्यांतें वदती योगीश्वर अगाध । जगद्गुरूंनीं उपदेशिला विहित प्रबोध । तदनुसार वर्तावें अविरोध । म्हणजे इहपर साधेल ॥ २९ ॥ 'तथास्तु' म्हणूनि तिहीं तत्कालीं । मस्तकें ठेविलीं श्रीगुरुपदकमलीं । म्हणती कोटि तीर्थ व्हावें चंद्रमौळी । पूर्ववत् दयाळा ॥ १३० ॥ भावनेसारिखें फल होईल । ऐसा आशीर्वाद होतां तत्काल । कोटि तीर्थांचें पाहती जल । तों अपूर्व वर्तलें ॥ ३१ ॥ सुगंध रुचिकर स्वच्छोदक । जाहलें पूर्वींहूनि अधिक । प्राशितां आरोग्य-सुखवर्धक । मोक्षदायक प्रकाशलें ॥ ३२ ॥ मग सर्वत्र पूर्ववत् तीर्थस्नान । करूनि तोषिती ब्राह्मण । दशगुणित मिळूं लागलें धन । स्वामिसमर्थप्रसादें ॥ ३३ ॥ ऐसे योगीश्वर कृपासागर । असती सत्य पूर्णावतार । जगत्कल्याणार्थ करिती संचार । विचित्रलीला दाविती ॥ ३४ ॥ त्या गुरूचें लीलामृत । परिसावें श्रोतीं सावधचित्त ।

शिवकांची विष्णुकांची द्वयक्षेत्रें प्रख्यात । रामेश्वरासमीप असतीं ॥ ३५ ॥ हीं दोन ग्रामें वैष्णवांस जहागीर । पूर्वींपासूनि आहेत साधिकार । तत्संबंधीं मुद्रितकागद सरकार-। अधिकारी विचारिती ॥ ३६ ॥ असतील ते सर्व घेऊनि यावे । न्यायमंदिरीं दाखवावे । तैसें न झालिया उत्पन्न न मिळावें । ऐशी होईल नृपाज्ञा ॥ ३७ ॥ वरिष्ठाधिकाऱ्याकडून या रीतीं । आज्ञापत्र मिळालें वैष्णवांप्रति । जहागीरदार अधिकाऱ्यांस विनविती । मुद्रितकागद नाहींत ॥ ३८ ॥ मग सरकारांतून प्रथम । जप्त झाले दोन्ही ग्राम । उत्पन्न आणि अधिकार काम । तेंही हिरूनि घेतलें ॥ ३९ ॥ जहागीरदार वैष्णवविप्र । त्या कालीं झाले चिंतातुर । तयांसि कांहीं सुचेना विचार । डोळ्यांवरील धूर गेलासे ॥ १४० ॥ मग म्हणती शिवकांचींत एक परमहंस । आल्यासि झाले दोन दिवस । चला जाऊं त्यांचे दर्शनास । म्हणूनि सिद्ध जाहले ॥ ४१ ॥ जहागीरदार आणि इतर मंडळी । गेली परमहंससंन्याशाजवळी । तेजस्वी प्रसन्न मुख निःस्पृह बली । देखिली मूर्ति मनोहर ॥ ४२ ॥ वंदूनि लीनपणें विज्ञापना । वैष्णव करिती करुणाघना । बहुत जुनी जहागीर आम्हां वैष्णवांना । वंशपरंपरें चालतसे ॥ ४३ ॥ शिवकांची विष्णुकांची ग्राम दोन । यांचें आजपर्यंत मिळालें उत्पन्न । यासंबंधीं कागदपत्रप्रमाण । मागती आम्हां राजाधिकारी ॥ ४४ ॥ तीं सनदापत्रें आम्हांपाशीं नाहींत । म्हणूनि उत्पन्नासह ग्राम केले जप्त । आम्हीं पडलों महत्संकटांत । यांतून मुक्त करा जी ॥ ४५ ॥ दयासागर श्रीमत्परमहंस । म्हणती पाचारा सर्वाधिकाऱ्यांस । मग वैष्णवीं करूनि प्रयास । आणिले नृपाचे अधिकारी ॥ ४६ ॥ अधिकाऱ्यांनीं यतीश्वरास विनविलें । कागदपत्र जर यांनीं दाविले । तर उत्पन्न अधिकार मिळेल सगळें । पूर्वींप्रमाणें चालेल ॥ ४७ ॥ नंतर परमहंस वदती या नदींत । पाषाण मोठा आहे सुशोभित । त्यावर लिहिलेलें जें इत्थंभूत । तें अवश्य विलोकिजे ॥ ४८ ॥ तेव्हां नदींत लोक उतरून । बाहेर काढिती विशालपाषाण ।

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

त्यावरी सुवाच्य अक्षरें प्राचीन । लेख पाहती सर्वत्र ॥ ४९ ॥ शक संवत्सर मास तिथि वार । मूळपुरुषाचें नांव लिहिलें सुंदर । कोणीं कोणास अर्पिलें प्रमाणपत्र । हें सर्व लिखित असे ॥ १५० ॥ मोठे मोठे अधिकारी तें वाचून । म्हणती धन्य योगिराज साक्षात् भगवान । अंतःसाक्षी हे जगत्कल्याण । व्हावया अवनीं प्रगटले ॥ ५१ ॥ प्रत्यक्ष-प्रमाणसहित सर्वत्रांसी । अनुभवें वाटलें आश्चर्यासी । तदनंतर नृपाज्ञें वैष्णवांसी । मिळाली जहागीर पुनरपि ॥ ५२ ॥ शिवकांची आहे स्मार्त-शैवांची । विष्णुकांची आहे वैष्णवांची । हें कांहीं असो परी स्वामीसमर्थांची । दया समान सर्वत्र ॥ ५३ ॥ दोन्ही क्षेत्रें असतीं जवळ जवळ । एकचि परमेश्वर तेथें नांदे चिरकाळ । मतभेदाचे फेडूनि विटाळ । व्हावें निर्मळ सर्वदा ॥ ५४ ॥ पुढिले अध्यायीं रसाळ वर्णन । श्रीगुरुस्वामी हृदयस्थ राहून । वदवील तें श्रोतेजन । परिसा प्रेमेंकरूनि ॥ ५५ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । पंचदशाध्याय गोड हा ॥ १५६ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे पंचदशोऽध्यायः समाप्तः ॥ १५ ॥ श्रीगुरुदेवदत्त—स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

# ॥ अध्याय सोळावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमद्दत्तात्रेयगुरवे नमः ॥ ॥ गुरु सांगती प्रिय शिष्याला । वत्सा करूनि एकाग्रचित्ताला । परिसाव्या स्वामीसमर्थलीला । संसारार्णवतारक ॥ १ ॥ मोगलाईप्रांतीं बीड जिल्ह्यांत । वडवाळ-राजूर ग्राम शोभिवंत । मोठें तालुक्याचें आहे प्रख्यात । तेथील वृत्त परिसावें ॥ २ ॥ एक जुना लहानसा मठ । त्या मठांत जाऊनियां नीट । श्रीगुरुस्वामी जगद्वरिष्ठ । बैसले अवीट सप्रेमें ॥ ३ ॥ व्हावा त्या स्थानाचा भाग्योदय । जनांसि समजावें सत्य प्रिय । स्वधर्मकर्म सदाचारमय । वेदशास्त्रविहित अनादि जें ॥ ४ ॥ लोकांत परस्पर प्रेमवृद्धि । सहज व्हावी अंतःकरणशुद्धि । अद्वेषपणें परोपकारबुद्धि । आयासरहित वसावी ॥ ५ ॥ संसारी जन असूनि तयां । पोटीं उपजावी क्षमा दया । येऊनि सुदुर्लभ नृदेहीं या । सत्कीर्ति लौकिक संपादावा ॥ ६ ॥ या जगत्कल्याणहेतूस्तव । राजूरमठांत वास्तव । राहिले योगीश्वर ज्यांचा स्तव । करिती निगमागमादिक ॥ ७ ॥ तेजस्वी मनोहर दिव्यमूर्ती । विलोकूनि सर्वत्र संतोषती । नित्य येऊनि साष्टांगें नमिती । ईश्वरविभूति म्हणती जन ॥ ८ ॥ त्या कालीं लालभारती इत्यादिक । श्रीगुरुस्वामींचे बनले सेवक । वाढला समर्थांचा लौकिक । अवतारिक पुरुष म्हणूनि ॥ ९ ॥ पुढें लोकांनीं करूनि खटपट । प्रसिद्ध चंदुलाल दिवाण धर्मिष्ठ । त्यांना निवेदिलें वृत्त इष्ट । कार्य व्हावया नृपाज्ञें ॥ १० ॥ त्यांनीं निजामसरकारची आज्ञा । घेऊनि विहित प्राज्ञा । लोकांची जाणूनि शुद्ध प्रज्ञा । विचारिली संज्ञा समर्थांची ॥ ११ ॥ राजमुद्रांकित सनदपत्र । स्वामिरायांच्या नामाचें स्वतंत्र । सहस्रमुद्रांचें वर्षासन प्रमाणपत्र । अर्पूनि संस्थान चालविलें ॥ १२ ॥ एके समयीं त्या राजूरची मंडळी । श्रीक्षेत्र

पंढरपुरास गेली । आषाढी एकादशीस विठ्ठलमाउली । दर्शनार्थ सप्रेमें ।। १३ ।। भीमेसी आला महापूर । पहावया धांवले लोक समग्र । जिकडे तिकडे उदक विस्तार । शोभायमान् पावलें ।। १४ ।। त्या महापुराच्या उदकावरूनि । येतांना अकस्मात् देखिले लोकांनीं । योगाधीश्वर नृसिंहमुनि । दैदीप्यमान् यतिरूपें ।। १५ ।। महापुरावरूनि सहजगतीं । चालत आले निर्भयस्थिति । महदाश्चर्य सर्व लोक मानिती । म्हणती पुरुषोत्तम अलौकिक हे ।। १६ ।। राजूरच्या मंडळीनें हें देखिलें । यतींद्रतिलकांसि म्हणती भले । समर्थ राजुराहूनि निघाले । केव्हां आले कळेना ।। १७ ।। योगमायेचें संपूर्ण भांडार । आपण साक्षात् आहां परमेश्वर । ऐसें वदूनि सकल नारीनर । गेले पांडुरंगदर्शना ।। १८ ।। यात्रा आटोपूनि राजूरचें मंडळ । गेले स्वनगरीस भक्तप्रेमळ । प्रथम शोधूनि पुसती घननीळ । स्वामिराज येथें होते कीं ।। १९ ।। तेव्हां राजूरचे लोक सांगती । येथेंचि होते यतियूथपति । कोठेंही क्षणमात्र गेले नसती । श्रीगुरुस्वामी समर्थ ।। २० ।। मग पंढरीस जाऊन आलेले लोक । ग्रामस्थांसि सांगती कौतुक । हे योगाधीश्वर जगन्नायक । पंढरपुरीं विलोकिले ।। २१ ।। आम्ही पंढरीस असतां महापूर । भीमेसी आला अनिवार । चोहोंकडे पसरलें नीर । पहावया जनसमुदाय पातला ।। २२ ।। त्या समयाचा देखावा अपूर्व । ईश्वरी मायेचा अगम्य भाव । टकमकां पाहती सर्व जीव । महापूर-नीर वैभव ।। २३ ।। ऐशा महापुराच्या उदकावरूनी । सहजगति परतीराहूनी । श्रीगुरु चालत आले नृसिंहमुनि । पादसंवाहनासह अलीकडे ।। २४ ।। हें अद्भुत आश्चर्यकारक । सर्वांनीं देखिलें प्रत्यक्ष-प्रमाणपूर्वक । म्हणती तेव्हां लीनत्वें सकळिक । हे अवतारिक ईश्वर ।। २५ ।। आम्ही अज्ञानी प्रापंचिक मंदमति । नेणों समर्थ विचित्रगति । पायींच्या वाहनांसही स्पर्शले नसती । बुद्बुदादिक जलाचे ।। २६ ।। राजुराहूनि कोठें गेले नसून । महापुरावरूनि निर्भयें चालून । अकस्मात् यतिरूपें जगज्जीवन । पांडुरंग क्षेत्रीं प्रगटले ।। २७ ।। श्रीगुरु त्रैमूर्ति नृसिंहमुनि । तीर्थक्षेत्रादिकीं हिंडूनि । जगदुद्धारार्थ विश्रांति-स्थानीं । अक्कलकोटीं

राहिले ॥ २८ ॥ देशोदेशींचे लोक दर्शनासी । येती सहस्रावधि अक्कलकोटासी । सद्भावें यतिराज-चरणांसी । आलिंगिती नमूनियां ॥ २९ ॥ अखंडमंडलाकार पारमार्थिक । विस्तार पावली कीर्ति अलौकिक । अगणित निष्कामी सकामनिक । झाले सेवक अनन्य ॥ ३० ॥ स्वामी समर्थ राजुरास असतांना । 'चंचलभारती' या नामाभिधाना । शिष्यांनीं ठेविलें यतिनारायणा । दशविध संन्यासांतील ॥ ३१ ॥ असो राजुराहूनि यतींद्रराय । गेल्यावरी सर्व करिती हाय । प्रारब्ध आमुचें फुटलें काय । ओढवला अंतराय दर्शनार्थ ॥ ३२ ॥ मग बहुत संवत्सर गेल्यावर । राजुरांतील मठाचें उत्पन्न थोर । निजामसरकार आज्ञानुसार । बंद झालें सर्वस्वीं ॥ ३३ ॥ नंतर श्रीसमर्थांचे सेवक । लालभारतीसहित कित्येक । शोधितां तीर्थक्षेत्रीं अनेक । कळलें सम्यक् वृत्त तयां ॥ ३४ ॥ कीं दत्तात्रेय-श्रीगुरुगिरिनारी । जगतासि भरंवसा सर्वदा भारी । ते परमात्मा ध्वजाधारी । प्रज्ञापुरीं वसताति ॥ ३५ ॥ ऐसें समजतांचि लालभारती आदिक । अक्कलकोटासि पातले तात्कालिक । जनांसि पुसती यतिनायक । जगद्गुरु कोठें विराजती ॥ ३६ ॥ विश्वात्मा सद्गुरु कृपासागर । प्रणतवत्सल असे निरंतर । जगदुपकारार्थ विधिहरिहर । धरिती अवतार एकरूपें ॥ ३७ ॥ जो अनादि अनंत अज अव्यय । श्रीगुरुस्वामी दत्तात्रेय । भगवान् योगीश्वर जगत्प्रिय । तो दाखवा हो सत्वरी ॥ ३८ ॥ जो वेदान्तवेद्य सनातन । 'साक्षी चेता केवल निर्गुण' । तो दावा हो जगज्जीवन । आम्हां दीनां शीघ्रत्वें ॥ ३९ ॥ जो वेदविहित सद्धर्माचें बीज । ऋषि योगी भक्तजनांचें निजगुज । सर्वांतर्यामी शाश्वत पुराण अज । तो गुरुमहाराज दावा हो ॥ ४० ॥ दीन भोळ्या भाविकांचा मायबाप । ज्यासाठीं सकल करिती जपतप । नित्योपलब्ध हृदयस्थ ब्रह्मस्वरूप । अस्तिभातिप्रियत्वें ॥ ४१ ॥ जें शुद्ध भक्तीचें संजीवन । कविवर सज्जनांचें विश्रांतिस्थान । एकमेवाद्वितीय ब्रह्म परिपूर्ण । तें कोठें भेटेल सांगा जी ॥ ४२ ॥ समीप नित्य प्राप्त असून । अविद्यामायाभ्रमेंकरून । देहाहंकृतीचें पडून वेष्टण । दुरावलेसें वाटतसे ॥ ४३ ॥ तत्संगें झालिया

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

निर्विषय चित्त । शुद्ध निर्मल वैराग्ययुक्त । श्रीसद्गुरुवरें वेदान्त-प्रतिपादित । भेटे हृदयांत अभेदत्वें ॥ ४४ ॥ ते परमात्मा स्वामीसमर्थ । जे राजुरांत होते जगदुद्धारार्थ । भेटवा हो आम्हांसी त्वरित । अक्कलकोटस्थ जन हो ॥ ४५ ॥ ऐसें बोलून लालभारतीसह । धरूनि अंतरीं दर्शनाग्रह । शरण निघाले सेवक अपरिग्रह । आले बुधवारपेठेंत ॥ ४६ ॥ त्या कालीं लीलाधारी नृसिंहमुनि । प्रियभक्त चोळाप्पाचे सदनीं । बैसले होते सुखें सिंहासनीं । दयासिंधु जगद्गुरु ॥ ४७ ॥ दिव्य तेजस्वी मनोहर मूर्ति । पाहूनि ओळखिले शुद्धमति । साष्टांग दंडवत घालिती । लालभारती इत्यादिक ॥ ४८ ॥ तेव्हां कंठ झाला सद्गदित । नेत्रीं वाहती प्रेमाश्रुपात । अंगीं रोमांच दाटले पुलकित । देहभानरहित ऐसे ॥ ४९ ॥ ओसरूनि कल्पनेचा बाजार । शब्दरहित आनंदाचा पूर । दाटला भेटला निर्विकार । गुरु साक्षात्परब्रह्म ॥ ५० ॥ याप्रकारें एक मुहूर्तपर्यंत । लालभारतीस तटस्थ-लक्षणायुक्त । विलोकूनि श्रीमद्दत्तावधूत । स्वामिराज आज्ञापिती ॥ ५१ ॥ स्वरूपलक्षणा सहजस्थिति । निर्विकारी ब्रह्मात्मापरोक्षानुभूति । असंदेह अभेद निश्चितीं । असावी त्रिपुटी टाकूनि ॥ ५२ ॥ ध्याता-ध्यान-ध्येय, ज्ञाता-ज्ञान-ज्ञेय । आणि द्रष्टा-दर्शन-दृश्य । इत्यादि सर्व त्रिपुटींचा लय । अवश्य झाला पाहिजे ॥ ५३ ॥ श्रीगुरुमुखें आत्मप्रबोध । श्रवण करूनियां अगाध । लालभारती होऊनि सावध । म्हणे अपराध क्षमा व्हावे ॥५४॥ राजूरग्रामाचे मठाधिपति । आपण मुख्य महंत यथास्थिति । आम्ही आपले सेवक निश्चितीं । बहुत दिवसांचे आहोंत ॥ ५५ ॥ आपला शीघ्र नव्हता बहुत दिन । म्हणूनि आपल्या नांवाचें उत्पन्न । निजाम सरकारांच्या आज्ञेवरून । बंद झालें गुरुवर्या ॥ ५६ ॥ आपल्या हयातीपत्रावरून । आम्हां शिष्यांसि मिळेल उत्पन्न । म्हणूनि सनदा कागदपत्र पुढें ठेवून । केलें नमन साष्टांगीं ॥ ५७ ॥ स्वामी समर्थ म्हणती शिष्यांला । "कोणी गुरु नसे आणि चेला । 'अहंब्रह्मात्मा' सनातन संपूर्ण एकला । व्यापला अंतर्बाह्यवर्ती ॥ ५८ ॥ एक नाथाचा सर्वही पसारा । त्या जगत्पसाऱ्याहूनि नाथ तो न्यारा । लालभारती जाणूनि परमार्थविचारा ।

नको बावरा होऊं रे ॥ ५९ ॥ गुरुशिष्यपणाची अहंकृति । सांडूनि सकल मठमहंती । निरुपाधिक होऊनि ब्रह्मस्थिति । भोगावी अखंड अभेद ॥ ६० ॥ तुम्हांस पाहिजे असेल तर । घ्यावें उत्पन्न मठाधिकार । वर्तावें सदाचारयुक्त निरंतर । षड्विकार त्यागूनि ॥ ६१ ॥ अतिथि-अभ्यागतादिकांसी । यथाशक्ति अर्पावें अन्नोदकासी । नित्य झटावें सर्वभूतांच्या हितासि । सदा नम्र होऊनि ॥ ६२ ॥ कोणत्याही व्यसनांत कधीं न गुंतावे । तीव्रवैराग्यें मना जिंकावें । सदा सर्वदा ब्रह्माभ्यासें चिंतावें । सच्चिदानंदात्मस्वरूप ॥ ६३ ॥ पाहुण्या राउळ्यासारखे अलिप्त । राहून चालावें यथास्थित । मठसंस्थानाधिकार विहित । अनादि वेदोक्तमार्गानें ॥ ६४ ॥ वेदप्रणीतधर्म संप्रदाय । वैदिक अथवा लौकिकादि यथान्याय । परंपरेनें आचरूनि अक्षय । दावावें वळण जनांसी" ॥ ६५ ॥ श्रीगुरुवचन कल्याणकारक । सर्वकालीं सत्यानंददायक । दुस्तरभवसागरतारक । निश्चयात्मक परिसूनि ॥ ६६ ॥ लालभारती कर जोडूनि उभा । प्रार्थी अहो स्वयंप्रकाश स्वयंभा । विश्वसदन कारणरूपस्तंभा । त्रिभुवनारंभक नारायणा ॥ ६७ ॥ विश्वोद्भवस्थितिप्रलयासि हेतु । आपण आहां विश्वपटीं एकचि तंतु । अनंतब्रह्मांडनायका मम हेतु । पूर्ण करा जी बालकाचा ॥ ६८ ॥ ऐसें बोलूनि साष्टांग दंडवत । घालूनि श्रीगुरुनामें गर्जत । गेला सत्वरें नृपभुवनांत । निर्मल गुरुभक्त भारती ॥ ६९ ॥ त्या कालीं श्रीमंत मालोजी महाराज । सत्यन्यायधर्म रीतीनें कामकाज । विलोकित होते निःपक्ष सहज । भोसले उपनामक भूपति ॥ ७० ॥ प्रणाम करूनि नृपवर्यातें । सनदा कागदपत्र जें प्रमाण होतें । नृपसिंहासनापुढें ठेविलें तें । मधुर भाषणें करूनि ॥ ७१ ॥ सारासारविवेकी नृपवर । वाचूनि पाहिलें कागदपत्र । म्हणे श्रीदत्तात्रेयस्वामींचें चरित्र । आहे अगम्य अपार ॥ ७२ ॥ नृपवर्याचे आज्ञेवरूनि । कारभारी आणि इतर अधिकारी जनीं । भक्त चोळाप्पास पाचारूनि । आणिले राजसभेंत ॥ ७३ ॥ एक विचारें सर्वत्रांनीं । समर्थांचें हयातीपत्र दिधलें लिहूनि । लालभारती तें प्रमाणपत्र घेऊनि । योगीश्वरासमीप पातला

॥ ७४ ॥ दत्तात्रेयस्वामीचें पूजन । विध्युक्त करून नैवेद्यसमर्पण । लालभारती समार्थाज्ञा घेऊन । हैद्राबादेस पोहोंचले ॥ ७५ ॥ प्रयत्नें उत्पन्न मिळालें पुनरपि । स्वामीराजचरणकृपें सुखरूपी । थोडेंबहुत चालतसे अद्यापि । लोक सांगती राजूरचे ॥ ७६ ॥ अक्कलकोटांतील समस्तांला । तैसेंचि तेव्हां दर्शनास आलेल्यांला । अत्यंत निःस्पृहत्वाच्या यतिलीला । परमाद्भुत वाटल्या ॥ ७७ ॥ अक्कलकोटभूपतीचे उपाध्याय । वेदशास्त्रसंपन्न राजमान्य । गिरराव सद्धर्मनिरतक्षय । त्यांचे तनय रामकृष्ण ॥ ७८ ॥ ते रामकृष्ण नामक उपाध्याय । ऋग्वेदी ब्राह्मणकुळीं पुण्यमय । संपन्नविद्या आणि विनय । सर्वभूतहितीं रत होते ॥ ७९ ॥ दयाळु स्वभाव परोपकारी । शुद्धचित्त परमार्थविचारी । प्रेमळभाषणी निरहंकारी । सदाचारप्रवर्तक ॥ ८० ॥ रामकृष्णासि बंधु दोन । पंढरीनाथ आणि गोपाळकृष्ण । तेही सद्धर्माचारसंपन्न । असती कुशल व्यवहारीं ॥ ८१ ॥ त्यांच्या मातुश्रीचा वृद्धपिता । भाऊ शेषाद्रि नामें तत्त्वतां । त्या भाऊंसि अत्यंत जरावस्था । प्राप्त झाली अनिवार ॥ ८२ ॥ जरा वाढली दिवसेंदिवस । भाऊंचा प्राण होतसे कासावीस । कंठावरोध झाला श्वास । काळजी सर्वांस पडली तदा ॥ ८३ ॥ त्या कालीं भक्तकामकल्पद्रुम । श्रीमत्परमहंस पुरुषपरम । स्वामी समर्थ परब्रह्म परंधाम । आत्माराम करुणार्णव ॥ ८४ ॥ भाऊ शेषाद्रीच्या सदनीं । अहोरात्र बैसले येऊनी । आपुल्या हस्तीं माळ घेऊनी । वरचेवर फेंकिती ॥ ८५ ॥ घ्यावी फेंकावी पुनःपुनः माला । ऐसा क्रम वारंवार चालला । तों अकस्मात् चमत्कार घडला । तुटली माळा त्या कालीं ॥ ८६ ॥ माळा तुटल्या बरोबर । भाऊंनीं त्यागिलें कलेवर । सर्वांसि तेव्हां वाटला चमत्कार । म्हणती परमेश्वर प्रत्यक्ष हे ॥ ८७ ॥ भाऊ शेषाद्रि महत्पुण्यवान् । श्रीमद्योगिराज अत्रिनंदन । तच्चरणारविंदीं सावधपणें प्राण । अर्पिले भाऊंनीं अंतःसमयीं ॥ ८८ ॥ समीप असूनि भक्तवत्सल । अहो भाग्यें साधला अंतकाळ । भाऊंचें भोळें अंतःकरण निर्मळ । म्हणून कृपाळु

धांवले ॥ ८९ ॥ जन्मभरी करिती अनुष्ठान । जप तप योग याग हवन दान । तथापि अंतकालीं भगवद्दर्शन । महादुर्लभ
असे कीं ॥ ९० ॥ पूर्वींचे जुने मनुष्य साहजिक । पवित्र चित्ताचे भोळे भाविक । म्हणूनि तयावरी जगन्नायक । तात्काल
कृपा करी कीं ॥ ९१ ॥ हें चक्षुर्वैसत्य प्रमाण । लाधलें भाऊंसि पदनिर्वाण । हें अवश्य सर्वांनीं लक्ष्यांत ठेवून । नित्य
वर्तावें सुगतिप्रद ॥ ९२ ॥ असो भाऊंचें शव स्मशानापर्यंत । पोहोंचवून मग गेले अवधूत । भक्तजनप्रणतवत्सल भगवंत ।
ज्यांची अपरिमित लीला असे ॥ ९३ ॥ रामकृष्ण राजोपाध्याय । त्यांचे पुत्र पौत्रादिक सविद्याविनय । असती बंधूंचेही
तनय । अक्कलकोटीं सुखरूप ॥ ९४ ॥ पूर्वींचे अक्कलकोटांतील । मालोजी महाराजांचे प्रेमळ । दाजी पिराजी भोंसले
कुशल । होते मुंबापुरीस ॥ ९५ ॥ त्या दाजीबा भोसल्यासि फार । स्वामिराज दर्शनाची लागली हुरहुर । म्हणे मी
श्रीचरणांपासूनि दूर । परदेशीं पडलों दुर्भाग्यें ॥ ९६ ॥ श्रीमद्दत्तात्रेय–स्वामींचे पाय । दृष्टीस पडतील तो सुदिन भाग्योदय ।
गुरुदर्शनासि अंतराय । पावलों पूर्वदुष्कृतें ॥ ९७ ॥ अंतरीं लागली तळमळ । म्हणे केव्हां भेटतील समर्थ कृपाळ ।
प्रारब्ध ग्रहदशा माझी दुर्बळ । चरणकमलें दुरावलीं ॥ ९८ ॥ अन्नोदक न लागे गोड । निद्रा–स्वप्नांतही दर्शनाची
आवड । लागली निजध्यासाची खोड । विषय द्वाड त्यागुनी ॥ ९९ ॥ दाजीबांच्या मित्र आणि भृत्यांतें । हें अंतर्गुह्य
विदित होतें । एके दिवशीं प्रातः शौचमुखमार्जनातें । करूनि दाजीबा गेले स्नानासी ॥ १०० ॥ देवघरांत देवपूजेचें
साहित्य । सिद्ध करूनि उभा ठाकला भृत्य । इतुक्यांत अकस्मात् घडलें कृत्य । भक्ताप्रीत्यर्थ प्रभूचें ॥ १ ॥
श्रीमद्दत्तात्रेयस्वामी सुराध्यक्ष । देवाचे पाटावरी येऊनि प्रत्यक्ष । स्थित झालेले सर्वसमक्ष । लक्ष्यपूर्वक विलोकिती ॥ २ ॥
अक्कलकोटींचा जुना सेवक । त्यानें ओळखूनि यतींद्रतिलक । दाजीबास पाचारिलें तात्कालिक । स्वामिराजदर्शना
॥ ३ ॥ दाजीबा भोसले धाई धाई । स्नान करूनि आले त्या ठायीं । पाहूनि घालिती दंडवत पायीं । श्रीगुरुस्वामी-

समर्थांच्या ॥ ४ ॥ अनन्यभावें करिती प्रार्थना । मज पातक्यासी करुणाघना । अपराध न गणूनि जनार्दना । दिधलें दर्शन दासासी ॥ ५ ॥ 'पतितपावन' नाम आपुलें । ब्रीद समर्थां सत्यत्वें सांभाळिलें । दर्शन देऊनि सुफलित केलें । माझें पूर्ण मनोरथ ॥ ६ ॥ बहुत जन्मांचीं फळलीं सुकृतें । म्हणूनि कृपासागर श्रीभगवंतें । हितकर दर्शन देऊनि मूढातें । जड पामरातें उद्धरिलें ॥ ७ ॥ स्वामिराय म्हणती अरे भक्तभूषणा । दाजीबा मोल नाहीं तुझ्या गुणां । टाकूनि सर्वथा देहाहंपणा । शरणागत झालासि ॥ ८ ॥ अद्वितीय ब्रह्मानंदस्वरूप मोक्ष । प्राप्त होईल निःशंक नित्य प्रत्यक्ष । सर्वांभूतीं नम्र सदा निरपेक्ष । शांतचित्त असावें ॥ ९ ॥ दाजीबा श्रीफलादिक अर्पितां । अंतर्धान पावले क्षण न लागतां । सर्वांसि आश्चर्य वाटलें तत्त्वतां । स्वामिराज लीला निरखूनि ॥ ११० ॥ संकटसमयीं वारंवार । दाजीबास देती अभयवर । त्यायोगें समाधान निरंतर । राहतसे धीर संतोष ॥ ११ ॥ त्या चतुर दाजीबा भोसल्यास । स्वामिराज लीलासुधारस । श्रवणद्वारें प्राशूनि उल्हास । अत्यंत वाटे मुहुर्मुहुः ॥ १२ ॥ स्वामीसमर्थ चरणीं खास । दाजीबाचा होता संपूर्ण विश्वास । ऐकतां सांगतां यतीश्वराचा इतिहास । प्रेमाश्रुपात वाहे तदा ॥ १३ ॥ एकेक प्रहरपर्यंत । कंठ व्हावा सद्गदित । अष्ट भावांचा उदय होत । समर्थलीला–श्रवणानें ॥ १४ ॥ शुद्ध भक्तिरूप घेऊनि जीवन । निर्विषय वैराग्य तरूवरी सिंचन । नित्य नियमें वर्धमान । वैराग्यवृक्ष प्रबल झाला ॥ १५ ॥ श्रीसद्गुरूच्या पायगुणें सफल । विरागवृक्ष प्रफुल्लित दृढ विशाल । विस्तारल्यानें प्रपंचजाल । तुटूं लागलें आपोआप ॥ १६ ॥ सद्गुरुमुखें वेद-महावाक्यार्थ । कळूं लागला शुद्ध परमार्थ । म्हणजे समजावा तो यथार्थ । फलद्रूप झाला विरागतरु ॥ १७ ॥ वैराग्य भक्तीचें विशुद्धफल । ब्रह्मात्मज्ञान झालें पाहिजे निर्मल । जीवब्रह्मैक्य अभेदें सर्वकाल । प्रत्यक्षानुभव होऊनी ॥ १८ ॥ जयासि लाधे सद्गुरुकृपा । तयासि परमार्थ होय सोपा । सगुण निर्गुण साक्षात्काररूपा । पावतसे सच्छिष्य ॥ १९ ॥ संसारसागरीं तारक । गुरु

****************************************************************

साक्षात्परब्रह्म एक । तें गुरुचरित्र अलौकिक । शिष्या ऐक सावधानें ॥ १२० ॥ अक्कलकोटापासूनि दीड कोसावर ।
नागनळीग्राम लहान सुंदर । एकेकालीं नृसिंहमुनीश्वर । त्या ग्रामांत पातले ॥ २१ ॥ यतीश्वर समागमीं त्या वेळीं ।
पुष्कळ जमली होती मंडळी । त्यांसहित शिवचंद्रमौली । गेले साधन दुधनीस ॥ २२ ॥ श्रीपादभट्ट आणि सरस्वती
वृद्ध । होते स्वामिरायासंनिध । दर्शनेच्छु लोक करित शोध । गेले दुधनीस सर्वही ते ॥ २३ ॥ इकडे अक्कलकोटाहूनि ।
फलाहार सामग्री सिद्ध करूनि । चोळाप्पानें कृष्णाप्पापाशीं देऊनि । समर्थासाठीं पाठविली ॥ २४ ॥ दुधनीच्या मोठ्या
टेंकडीवर । एक राहत होता फकीर । तयाच्या जागेंत त्रैमूर्ति अवतार । सद्गुरुवर स्थित होते ॥ २५ ॥ तेव्हां कृष्णाप्पानें
फलाहाराचे । पदार्थ पात्रीं मांडिले साचे । त्यांतील पांच सात ग्रास तयाचे । हस्तें भक्षिलें यतीश्वरें ॥ २६ ॥
ते दिवशीं सायंकाळपर्यंत । तेथेंचि बैसले श्रीमद्दत्तावधूत । सर्व लोक झाले क्षुधार्त । मागती भोजन गुरुनाथा ॥ २७ ॥
अहो अंतकालापेक्षां अधिक । माध्यान्हकाळ कठिण बोलती लोक । क्षुधापिशाच्चिनी अत्यंत बाधक । होय अन्नोदकांवाचून
॥ २८ ॥ अन्नापासूनि भूतें उद्भवतीं । अन्नानेंच प्राणी जीवंत राहती । अन्नांतचि सर्व लय पावती । ऐशी श्रुति
गर्जतसे ॥ २९ ॥ अन्नभक्षणावीण कांहीं न सुचे । गोड न लागती उपभोग पदार्थांचे । अथवा धर्माधर्मादिक फुकाचे ।
कोणतेंही प्रिय न लागे ॥ १३० ॥ क्षुधापिशाच्चिनीबाधा अनिवार । हें जाणती संपूर्ण प्राणिमात्र । म्हणून भोजन
याचिती क्षुधातुर । जगदीश्वराकारणें ॥ ३१ ॥ तेथूनि ब्राह्मणांचीं सदनें दूर । रजनी लोटली एकप्रहर । प्रज्ञापुराहूनि
पाचारणार्थ सत्वर । आले नृसिंहराव भोसले ॥ ३२ ॥ शिबिकेसह भोई लोक । उष्ट्र स्वारयुक्त पातले अश्वादिक ।
त्यांनाहि लागली फार भूक । झाले व्याकुळ सर्वही ॥ ३३ ॥ मग स्वामीसमर्थ सर्वांला । चुर्मालाडू यथेष्ट भोजनाला ।
मिळतील सांगती तों आला । हैद्राबादचा श्रीमंत ॥ ३४ ॥ ककुभाई राजेंद्र जहागीरदार । संगें घेऊनि भृत्यादिक परिवार ।

* * *

पातला जगद्वर्यासमोर । जावळ काढावया पुत्राचें ॥ ३५ ॥ शिधा सामग्री पदार्थ बहुत । आणिले होऊनि पुत्रवंत । वारंवार लोटांगण घालित । स्त्रीपुत्रांसह गुरुपदा ॥ ३६ ॥ रजनी झालीसे दोन याम । समस्तां फलाहार देऊनि प्रथम । तृप्त केले पावले आराम । मनुष्यादिक सकलही ॥ ३७ ॥ दुसरे दिवशीं पुत्राचें जावळ । काढवूनि झालें स्नानमंगल । विध्युक्त पूजिले तमालनीळ । श्रीफलादिक अर्पिलें ॥ ३८ ॥ उत्तम पक्वान्नें चतुर्विध । लेह पेय चोष्य खाद्यादि निर्वेध । यथेच्छ भोजन नानाविध । करूनि तृप्त सर्व झाले ॥ ३९ ॥ तांबूल दक्षिणा आणि दान । योग्यतेनुसार सर्वांलागून । इतरही पंक्तीस जेविले जन । आशीर्वचनें ॥ १४० ॥ याप्रमाणें दिवस तीन । जहागीरदारानें समाराधना करून । नानाजातींच्या लोकांस मिष्टान्न । घातलें भोजन यथेच्छ ॥ ४१ ॥ जेथें न मिळे अन्न एक ग्रास । तेथें अनेक मानव पशुपक्ष्यादिकांस । आकंठपर्यंत तीन दिवस । उत्तमान्न भोजन मिळालें ॥ ४२ ॥ समर्थांचें अघटित करणें । न कळे देवादिकांकारणें । तेथें अन्नार्थी अल्पमतीस कळणें । हें तो केवळ न घडेचि ॥ ४३ ॥ असो स्वामीसमर्थांचा आशीर्वाद । घेऊनि श्रीफलादिकप्रसाद । राजेंद्र जहागीरदार पूर्णानंद- । युक्त गेले स्वनगरीं ॥ ४४ ॥ इकडे नृसिंहराव भोसले । सविनय सद्गुरूसि म्हणाले । अक्कलकोटासि चलावें पहिले । इच्छेनुरूप कृपाघना ॥ ४५ ॥ हें परिसूनि स्वामीदत्तात्रेय । वदती श्रवण करा भक्तप्रिय । गौड गांवांतूनि जाऊं निर्भय । इच्छा आमुची यापरी ॥ ४६ ॥ लोक म्हणती गौड ग्राम कोणीकडे । विनाकारण जावें कां वांकडे । गुरुवर्य वदती वाटेल तिकडे । जाऊं आम्ही जगद्धिता ॥ ४७ ॥ ऐसें वदून दत्तात्रेय गिरिनारी । निघाले स्वच्छंद व्यवहारी । पाठीमागें सर्व लोक आणि सेवेकरी । धांवले वाहनादि घेऊनि ॥ ४८ ॥ एक वृषभ त्या गौडग्रामांत । सर्पदंश होऊनि झाला मृत । करुणार्णव सच्चिदानंदावधूत । गेले वृषभास पहावया ॥ ४९ ॥ त्वरेनें त्या स्थानीं ग्रामस्थ । आले दर्शनासि सकळिक । स्वामीसमर्थांनीं मारूनि हांक । उठविलें मृत वृषभासि

**********************************************************************

॥ १५० ॥ एक दिवस मृत होऊनि पडिला । तयासि तात्काळ उठविला । हें पाहूनि सर्व जनांला । अगणित आश्चर्य
वाटलें ॥ ५१ ॥ नंतर पातले अक्कलकोटास । तेथून लोहारगांव वीस कोश । त्या ग्रामींच्या बापू कुळकरण्यास । कंठास
छिद्र पडिलें होतें ॥ ५२ ॥ गृहस्थाश्रमी ऋग्वेदी ब्राह्मण । व्यथेमुळें सुटलें अन्न भक्षण । उदक प्राशितां कंठछिद्रांतून ।
वाहे बाहेर क्लेशद ॥ ५३ ॥ असंख्य केले प्रयत्न उपाय । परंतु किंचित्‌ही व्यथा शांत न होय । मग त्रासूनियां अतिशय ।
गेले गाणगापुरासि ॥ ५४ ॥ गुरुचरित्र ग्रंथाचें सप्ताह पठण । केलियावरी झाले दृष्टांत स्वप्न । पार्थिव गणपति करावे
म्हणून । दत्ताशीर्वचन लाधलें ॥ ५५ ॥ आज्ञानुसार नित्य गणेशमृन्मय । पार्थिव करिती बापू द्विजवर्य । एके वेळीं
वाम हस्तावरी पार्थिव गणराय । घेऊनि विध्युक्त पूजिती ॥ ५६ ॥ तंव एक महाभुजंग तयांचे अंगावरी । चढला म्हणूनि
भयभीत भारी । मठांतील जन म्हणती झडकरी । सत्वर ऊठ रे ब्राह्मणा ॥ ५७ ॥ वाम करीं पार्थिव गणेश असे । विप्र वदे
आतां उठावें कसें । तों करींचें पार्थिव पडलें अपैसें । हें देखूनि सर्प पळाला ॥ ५८ ॥ तेव्हांपासूनि कंठछिद्रव्यथा
मंदगति । वाटूं लागली स्वल्प शांति । मग दत्तात्रेव बापूस आज्ञापिती । हरिगुणवर्णन कवित्व करी ॥ ५९ ॥
वेदशास्त्राभ्यास नाहीं मजला । द्विज वदे केवीं करूं मी कवनाला । तथापि आज्ञानुसार अभंगाला । केला प्रारंभ बापूंनीं
॥ १६० ॥ अभंग रचिले तीन चार शत । परंतु शेवटील चरण पूर्ण न होत । बापू कुळकरणी होऊनि चिंताग्रस्त ।
दत्तात्रेयासि प्रार्थिती ॥ ६१ ॥ मग स्वप्नीं दृष्टांत होई तदा । पूर्णब्रह्म-परमपुरुषाचे पदा । अक्कलकोटीं जाऊनि अनन्य
वंदा । त्यावीण पाद सिद्ध नोहे ॥ ६२ ॥ आम्हीच प्रत्यक्ष अवतारिक तेथें वसतसों । याविषयीं संशय कधींच नसो ।
वेदविहितमार्ग सदा सर्वत्र वसो । हाचि ठसो हितोपदेश ॥ ६३ ॥ मग सत्वरें बापू कुळकरणी । अक्कलकोटीं पातला
श्रीगुरुचरणीं । शरण साष्टांग लोटांगणीं । आला भक्त वैष्णव ॥ ६४ ॥ श्रीमद्दत्तात्रेयपादकमल । स्वकंठासि लाविलें कोमल ।

तेव्हां यतीश्वर सांगती प्रांजल । चतुर्थ चरणें अभंगांचीं ॥ ६५ ॥ त्याकालीं बापूसि पटला पूर्णानुभव । म्हणे विश्वात्मा
आपण देवाधिदेव । अमानुषिक लीला अनंत अपूर्व । नेणों आम्ही प्रापंचिक ॥ ६६ ॥ श्रीस्वामी साक्षात् परमेश्वर ।
करितसां महाराजा जगदुद्धार । पूर्णब्रह्मस्वरूप व्यापक चराचर । हेतुदृष्टांतवर्जित आहां ॥ ६७ ॥ मग सद्गुरुनाथ
दत्तात्रेय । बापू विप्रें पूजिले जगत्प्रिय । तदा कंठछिद्र व्यथा गेली अमय । पूर्वींहूनि उत्तम ॥ ६८ ॥ दत्तात्रेयप्रसादें कवित्व
कुशल । बापू कुळकरणी लोकविश्रुत निर्मल । दासबापू या नामें प्रसिद्ध सर्वकाल । संतपदवीस पावले ॥ ६९ ॥
झाला भगवत्प्रसाद जयावरी । तयासि लाधती पुरुषार्थ चारी । श्रीगुरुलीलामृताब्धिलहरी । सर्व करी कार्य सिद्ध ॥ १७० ॥
येथें निःसंशय पाहिजे सद्भाव । भाव तेथेंचि उभा देव । लीलामृताचा स्वादानुभव । घ्यावा जनहो अवश्य ॥ ७१ ॥
स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । षोडशाध्याय रसाल हा ॥ १७२ ॥ इति
श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे षोडशोऽध्यायः समाप्तः ॥ १६ ॥ श्रीगुरुदेवदत्त--स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय सतरावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसद्गुरुदत्तात्रेयस्वामिने नमः ॥ ॥ शिष्य म्हणे दत्तात्रेयस्वामी । कोणकोणत्या होते ग्रामीं । ऐकूनि गुरु वदती सर्वांतर्यामी । अखंड व्यापक सर्वसाक्षी ॥ १ ॥ सत्तास्फूर्तित्वें निर्विकार । उत्पत्तिस्थितिलयकारण परात्पर । जागृति-स्वप्न-निद्रादि प्रपंचविस्तार । ज्याच्या प्रकाशें होतसे ॥ २ ॥ तो परमात्मा असे सर्वत्रव्यापक । पूर्णब्रह्म परमेश्वर स्वामी अलौकिक । साधूंच्या परित्राणार्थ सम्यक् । दुष्टांचा विनाश करावया ॥ ३ ॥ धर्मसंस्थापनाकरितां । अनेकावतार साकार सगुणता । धारण करूनि स्वेच्छें तत्त्वतां । जगताकारणें उद्धरीतसे ॥ ४ ॥ तेचि दत्तात्रेय योगीश्वरमुनि । स्वेच्छाचारें नानावेष धरूनि । लोकानुग्रहकार्यार्थ जनीं । संचरती वनीं पर्वतादिकीं ॥ ५ ॥ स्तंभीं प्रकटूनि प्रऱ्हादासि रक्षिलें । अर्जुनाचें सारथ्य केलें । कळवळूनि नक्रासि वांचविलें । बळीस दिधलें निजपद ॥ ६ ॥ ध्रुवासि अढळपदीं बैसविला । राज्यपदीं सुग्रीव स्थापिला । बिभीषणासि ज्यानें समर्पिला । राज्याधिकार लंकेचा ॥ ७ ॥ तो पूर्णब्रह्म सनातन । ज्यानें उद्धरिले नंदगोपादि असंख्यजन । यदुकुलोद्भव प्रकाशमान् । साक्षाद्भगवान् स्वतःसिद्ध ॥ ८ ॥ यदुराजासि करविलें बोधामृतपान । अलर्ककार्तवीर्यादि नृपांसि वरप्रदान । अनेक ऋषि योगी मुनिजन । यत्सेवनें पावन झाले असती ॥ ९ ॥ ज्या यदुवंशीं अति विख्यात । अवतरले श्रीकृष्णभगवंत । तो यदुराजा वेदांतविज्ञानवंत । श्रीदत्तात्रेयकृपें जाहला ॥ १० ॥ नवनाथयोगी अखिलसिद्ध । मत्स्येंद्रगोरक्षादि योगज्ञान प्रबुद्ध । शंकराचार्य स्वामीजनार्दन एकनाथ प्रसिद्ध । दासोपंत निरंजनादिक ॥ ११ ॥ ते सत्पुरुष योगी साधु संपूर्ण । सद्गुरु गिरिनारी अलखनिरंजन । स्वामी दत्तात्रेय पूर्णब्रह्म

सनातन । सेविती भगवान् सर्वदा ॥ १२ ॥ शके सत्राशेंसत्तावन वर्षाक्रतूंत । श्रावणमासीं मंगळवेढियांत । दामाजीपंताचे
समाधीपाशीं अवधूत । प्रथम येऊनि बैसले ॥ १३ ॥ ज्या मंगळवेढें प्रसिद्ध क्षेत्रांत । सत्पुरुष गृहस्थ दामाजीपंत । श्रीविठ्ठलाचे
साक्षात्कारवंत । परोपकारी जाहले ॥ १४ ॥ जेथें आणखीही साधुसंत पुण्यवान् । झाले प्रेमळ भगवद्भक्तजन ।
तेथें कृष्णभट कापशीकर विद्वान । वैदिक द्विजवर वसतसे ॥ १५ ॥ तो सद्धर्मी देवदर्शनासि नित्य । फिरतसे शुद्धभक्तियुक्त ।
आचरितां ऐसें नित्यकृत्य । तों अकस्मात् गुरुवर्य देखिले ॥ १६ ॥ समीप जाऊनि केलें नमन । म्हणे कोठूनि
झालें जी आगमन । कोणतें आपलें वसतिस्थान । पुढें गमन कोठवरी ॥ १७ ॥ मनोहर सुंदर शरीराकृति । बालार्कदिव्य
विलसे कांति । प्रसन्नवदन भगवन्मूर्ति । पूर्वसुकृतें देखिली आजि ॥ १८ ॥ दर्शनेंचि होतसे शांत मन । अंतरीं पूर्ण
वाटतें समाधान । अवतारिक दिसतां हो करुणाघन । भक्तजनवत्सल प्रभुराया ॥ १९ ॥ आतां झाला रजनीचा समय ।
आमचे सदनीं चलावें हो भक्तप्रिय । अत्याग्रहें कृष्णंभट सविनय । यतीश्वरासि प्रार्थितसे ॥ २० ॥ वास्तविक श्रद्धा
पाहून विप्राची । वाट धरिली तत्सदनाची । ओळख नसूनि ग्राममार्गाची । पातले विप्रगेहांत ॥ २१ ॥, यामिनी गेली
एकप्रहर । पत्नीस वदतसे द्विजवर । समर्थासाठीं फलाहार । कांहीं स्वल्प सिद्ध करीं ॥ २२ ॥ तंव गीताबाई करी
भाषण । गृहांत नसती तण्डुलकण । अभागी दरिद्री आपण । काय करावें या समयासी ॥ २३ ॥ ऐकूनि सांगती
श्रीगुरुस्वामी । आम्हांसि प्रिय दुधाची दशमी । या कालीं खटपट नको रिकामी । असेल तेंचि सिद्ध करावें ॥ २४ ॥
मग दुग्धार्थ घेऊनियां भांडें । सतीनें शोधिले गवळीवाडे । द्विगुणित मोल देतांही थोडें । न मिळे पय त्या कालीं ॥ २५ ॥
पतिव्रता द्विजस्त्री वारंवार । दुग्धार्थ हिंडे घरोघर । परंतु दुग्धाचा एक तुषार । कोठें देखील मिळेना ॥ २६ ॥ फारचि
केला सतीनें शोध । परी न सांपडे किंचित् दूध । खेदें म्हणे ओढवलें प्रारब्ध । समर्थ उपोषित राहतील कीं ॥ २७ ॥

गृहीं येऊनि यतिराया । वृत्तांत कळवी सलज्ज विप्रजाया । गेला आमुचा जन्म वाया । पय देखिल मिळेना ॥ २८ ॥
पूर्वीं न घडलें ईश्वराराधन । म्हणूनि आम्ही भाग्यहीन । यापेक्षां अतिश्रेष्ठ निधन । काय वांचूनि उपयोग ॥ २९ ॥
परिसूनि हांसती यतिराय । तुमचे गृहीं असतां गाय । दुग्धार्थ हिंडतां धाय धाय । तुम्हां काय म्हणावें ॥ ३० ॥ गृहीं
असूनियां निधान । कां शोधावें वृथा रान । नाभींच सुगंध भरला असून । कस्तुरीमृग फिरे जैसा ॥ ३१ ॥ आत्मादेव
असतां देहीं । व्यर्थचि भ्रमती नर पाही । कामधेनु असून गेहीं । तक्र मागती अन्यासी ॥ ३२ ॥ कंठीं बांधून नगचामीकर ।
शोधिती पुसती गांवभर । कटिवरी घेऊनियां कुमर । हरपला म्हणूनि सांगती ॥ ३३ ॥ समीप असतां कल्पतरु
चिंतामणि । भीक्षा मागती दीनवाणी । परमात्मा सदाशिव हृदयीं असूनि । हिंडती कष्टती बहिर्मुख ॥ ३४ ॥ तैसें तुमचें
करणें । गाय असूनि दुग्ध न काढणें । परिसूनि गीताबाई म्हणे । क्षमा करणें हो मायबापा ॥ ३५ ॥ लोटले चार संवत्सर
धेनु आटली हें सत्योत्तर । काढितां दुग्ध न निघे तिळमात्र । वत्सही थोर वाढलें ॥ ३६ ॥ प्रभो ही धेनु न फळे पाही ।
तरी आतां कैंचें दुग्ध दहीं । म्हणूनि उमयतांही लवलाही । चरणीं मस्तक ठेविती ॥ ३७ ॥ दुग्धार्थ पुष्कळ केले उपाय ।
परंतु गुण नसे तिळप्राय । सकल गणगोत बापमाय । आतां आश्रय आपला असे ॥ ३८ ॥ मग प्रणतवत्सल संसारश्रमनाशन ।
स्वामिराज वदती प्रसन्न वचन । ऊठा करा सत्वर दुग्धदोहन । नसे कारण संशयाचें ॥ ३९ ॥
समर्थाची अभीष्टप्रद आज्ञा शिरीं । वंदूनि उभयतां उठलीं झडकरी । स्वच्छ पात्र घेऊनियां करीं । नमस्कार
करिती गौमातेस ॥ ४० ॥ नसूनि वत्स आणि कण चारा । स्तनस्पर्शेंचि फुटला पान्हा झरझरा । पात्रांतरीं गर्जती
क्षीरधारा । सद्गुरुलीला अगम्य ॥ ४१ ॥ क्षीरें भरलीं थोर तीन पात्रें । दुग्ध काढितां शिणलीं गात्रें । ओलीं
चिंब झालीं अंगवस्त्रें । घर्म शरीरीं सुटला ॥ ४२ ॥ जेथें झळके श्रीगुरुकृपादृष्टि । तेथें सर्व सौख्यार्थ वर्षे वृष्टि ।

अखंड नांदतसे तुष्टि । शांति-पुष्टिसंयुक्त ॥ ४३ ॥ नंतर सतीनें करुनि पदार्थ । फलाहारें संतोषविले स्वामी समर्थ । अघटित कृत्य दावूनि यथार्थ । करिती कृतार्थ यतिराय ॥ ४४ ॥ दुसरे दिनीं ग्रामवासी लोकांला । अपूर्व वृत्तांत श्रुत जाहला । कृष्णंभटाचे सदनीं पातला । जनसमूह उल्हासें ॥ ४५ ॥ ठेविलीं पात्रें क्षीर भरून । नेत्रीं प्रत्यक्ष अवलोकून । जन म्हणती हें नवल गहन । करिती नमन यतीश्वरा ॥ ४६ ॥ या धेनूसि आजपर्यंत । खाऊं घातले पदार्थ बहुत । मंत्रतंत्र अंगारे दोऱ्यासहित । उपाय साधनेंही करविलीं ॥ ४७ ॥ परी किंचित पय नाहीं निघालें । हें सात्त्विक दंपत्य होतें त्रासलें । गाईनें कांहींच नसतां भक्षिलें । दोहिलें वत्सावांचूनि ॥ ४८ ॥ हे अवतारिक पुरुष जनार्दन । लीलामात्रें कृत्य घडलें अतिगहन । मग स्वामिराज गेले तेथून । कृपा करून विप्रावरी ॥ ४९ ॥ त्या कृष्णंभटाचे चिरंजीव । गोविंदभट जयाचें नांव । समर्थकृपें सुखें सदैव । सदाचारयुक्त वर्तती ॥ ५० ॥; त्या मंगळवेढियाची निवासी । एक शूद्रस्त्री जनाबाई नामेंसीं । तिला बालपणापासूनि पंढरीसी । जाणें आवडे नियमानें ॥ ५१ ॥ पांडुरंगविठ्ठलाची भक्ति भारी । प्रत्येक एकादशीस वारी । जनाबाई जाऊनि पंढरपुरीं । दर्शन करी विठोबाचें ॥ ५२ ॥ द्वादशी पारणें सोडूनि सायंकाळीं । जनाबाई गृहीं येई संतमेळीं । रुक्मिणीकांत चरणकमलीं । जडली प्रीति सर्वदा ॥ ५३ ॥ एकदां आषाढीचे वारीस । पडूं लागला जोरानें पाऊस । क्षणमात्र उघडेना त्या समयास । गमनास आयास पडती ॥ ५४ ॥ गाठोडें बांधूनि शिरीं ठेविलें । समागमें कन्यारत्न घेतलें । म्हणे सांभाळीं गे माय विठ्ठले । नामघोषें गर्जत चालली ॥ ५५ ॥ धैर्यें भरपावसांत निघाली । मंदगतीनें दोन कोस गेली । तेधवां सायंवेळा पातली । मार्ग सहसा दिसेना ॥ ५६ ॥ विद्युल्लतांचा लखलखाट । शीत वायु वाहे अफाट । अंगासि कंप सुटे थरथराट । शीत अत्यंत पडियलें ॥ ५७ ॥ मार्गीं एका वृक्षातळीं । कन्येसहित

जनाबाई बैसली । ओलीं वस्त्रें पिळूं लागली । भयें पाहे चोहोंकडे ॥ ५८ ॥ तेथें वृक्षाखालीं समोर । एक दीप्तिमान् बैसले यतिवर । शीतें कांपत असूनि थरथर । हांसती निर्भय आनंदें ॥ ५९ ॥ कधीं कधीं मंगळवेढ्याचे अरण्यांत । जनाबाई यतिदर्शनासि असे जात । हे यतीश्वर सत्पुरुष नामांकित । आहेत म्हणून जाणतसे ॥ ६० ॥ मग जनी करी साष्टांग नमन । स्वामिसमर्थासि वदे लीन वचन । आजपर्यंत श्रीविठ्ठलदर्शन । टळलें नाहीं वारीचें ॥ ६१ ॥ आजि मात्र आला अंतराय । आतां यासि कोणता उपाय । सांगा जी आपण साक्षात् प्रभुराय । करूं काय सुचेना ॥ ६२ ॥ प्रेमभरें दाटला कंठ । पाहूनि बोधिती नीलकंठ । विठ्ठलक्षेत्र असे भूवैकुंठ । ओळखीं सन्निकट भामिनी ॥ ६३ ॥ पंढरपुर क्षेत्रीं आहे देवराय । अन्यत्र स्थलीं नाहीं काय । आतां परमात्मा सच्चिन्मय । हृदयीं माय पाहीं गे ॥ ६४ ॥ विषयीं अत्यंत विटूनि सुटला । परित्यागूनि मायाप्रपंच-खटला । परमेश्वरभजनीं अखंड नटला । आटला मोह समुळीं तो ॥ ६५ ॥ दृढ ब्रह्मात्मज्ञानें संशय फिटला । विश्वात्मा हृदयंतरीं जर पटला । जन्ममरणाचा फेरा मिटला । हटला यम तयासी ॥ ६६ ॥ पंढरपुर हेंचि क्षेत्र शरीर । क्षेत्रज्ञ विठ्ठल आत्मा निरंतर । सर्वांतर्यामीं साक्षी निर्विकार । जड देहाहूनि भिन्न पाहीं गे ॥ ६७ ॥ मग कटीवरी ठेवूनि दोन्ही कर । उभे राहिले योगाधीश्वर । प्रत्यक्ष विठ्ठल रुक्मिणीवर । जनीनें सुंदर रूप देखिलें ॥ ६८ ॥ जनाबाईनें पंढरपुरीं । जें जें पाहिलें होतें पांडुरंगमंदिरीं । तेंचि येथें प्रत्यक्ष सर्व प्रकारीं । अभिन्नपणें अवलोकिलें ॥ ६९ ॥ वाटलें समाधान कौतुक । चरणीं ठेविलें प्रेमें मस्तक । म्हणे येथेंचि भेटले रमानायक । दासीकारणें साक्षात् ॥ ७० ॥ जनी प्रार्थी योगिराज-पांडुरंगा । दासीसि मिळविलें निजरंगा । जेवीं उदका आणि तरंगा । भिन्नत्व नसे सर्वथा ॥ ७१ ॥ जय विठोबा रखुमाई माउले । तूंचि प्रत्यक्ष दाविलीं पाउलें । खेळविशी अनंत ब्रह्मांडें जैसें बाहुलें । घडिशी मोडिशी क्षणार्धें ॥ ७२ ॥ मी दरिद्री वृद्ध स्त्री

मतिहीन । जाणूनि दिधलें येथेंचि दर्शन । यतीश्वर पायींची वाहन । होऊन न फिटे उपकार ॥ ७३ ॥ जनाबाई त्या एकादशीपासून । पुत्रकन्यादिसहवर्तमान । जेथें वसती अत्रिनंदन । तेथें वारीस येतसे ॥ ७४ ॥ पंढरीची सोडून वारी । वृद्धावस्थेमुळें प्रतिवत्सरीं । जनाबाई येतसे प्रज्ञापुरीं । मोक्षाधिकारी यथार्थ ॥ ७५ ॥ प्रेमभावें गुरु दत्तात्रेय-पूजन । यथाशक्ति अन्नसंतर्पण । नामसंकीर्तन उत्तम भजन । देहभानरहित करितसे ॥ ७६ ॥ सद्गुरु महिमा वर्णितां अपार । मुके होती वेद साचार । कोणी न समर्थ सुरवर । गंधर्व किन्नर चारणादि ॥ ७७ ॥ अनपेक्षित येथें कुल जाती । विषयेच्छारहित विरक्ति । मुख्यत्वें पाहिजे परमभक्ति । जीवन्मुक्ति होय जेणें ॥ ७८ ॥ जनाबाई महा पुण्यवान् । अंगीं असून वैराग्य भक्ति ज्ञान । शांतपणें सर्व भूतीं लीन । देहाभिमानवर्जित असे ॥ ७९ ॥; त्या मंगळवेढ्याचे अरण्यांत । स्वामी गुरुदेव दत्तावधूत । कंटकशय्येवरी आनंदांत । पहुडती निर्भय स्थितीनें ॥ ८० ॥ मंगळवेढ्याचा राहणार । बसाप्पा नामें तैलकार । त्यानें मार्गीं जातां कंटकावर । यतींद्र निद्रिस्त पाहिले ॥ ८१ ॥ हे साधुपुरुष कोणीतरी । किंवा असती अवतारी । बसाप्पातेली मनीं विचारी । तों दत्त दिगंबर बोलिले ॥ ८२ ॥ आम्ही कोणी तरी असो तुज । पुसण्याची काय आहे गरज । हें मनांतील जाणतां सहज । वाटलें अपूर्व बसाप्पासी ॥ ८३ ॥ मग जेथें असतील स्वामी । तेथें दर्शनासि जातसे नित्यनेमीं । बसाप्पाची स्त्री म्हणे पति निरुद्यमी । नादीं लागला वेड्याचे ॥ ८४ ॥ बसाप्पासी दरिद्रें व्यापिलें । तथापि सेवकत्व न सोडिलें । ऐसे कांहीं दिवस जातां कळवळले । दत्तदिगंबर मुनीश्वर ॥ ८५ ॥ कांटवण ग्रामींचे काननीं । बसाप्पासह दिगंबरमुनि । फिरतां विलोकिले अस्तमानीं । सर्प अपार भयंकर ॥ ८६ ॥ बसाप्पा होत भयें व्याकुल । समर्थ म्हणती येईं रे जवळ । यांतूनि लागेल तितुके पुष्कळ । घ्यावे निःसंशय निर्भयें ॥ ८७ ॥ मग एक सर्प बसाप्पानें ।

वस्त्रीं गुंडाळून घेतला त्वरेनें । यतींद्र आज्ञापिती आतां जाणें । गृहालागीं सत्वर ॥ ८८ ॥ समर्थांचे आज्ञानुसार । बसाप्पा गेला गृहीं सत्वर । देखूनि स्त्रीपुत्रांसि आनंद थोर । म्हणती धन्य भेटि झाली ॥ ८९ ॥ कक्षेंतील वस्तु गुप्त । स्त्रीपुत्रांसि उघडूनि दावित । बावनकशी सुवर्ण लखलखित । पाहूनि हर्षित जाहली ॥ ९० ॥ मग स्त्रीपुरुषें दुसरे दिवशीं । गेलीं दिगंबरेश्वराच्या दर्शनासी । समर्थ म्हणती गृहस्थाश्रमासी । भोगून पावाल सायुज्य ॥ ९१ ॥ ऐसा परमेश्वर दत्तदिगंबर । सामर्थ्यातिशय निरंतर। संपूर्णलोकासी अत्यंत सुखकर ।अखंड भरला चराचरीं ॥ ९२ ॥; ज्याचे कृपें मंगळवेढ्याचा । तंतुवाय म्हणजे कोष्टीजातीचा । दरिद्री केवळ उदरपूर्तीचा । अभाव नित्य पडे जयासी ॥ ९३ ॥ तो तंतुक नित्य येऊनि यतिदर्शन । करी शुद्धभावेंकरून । ऐशा क्रमें गत झाले स्वल्पदिन । तों अत्रिनंदन कळवळले ॥ ९४ ॥ स्वप्नीं दृष्टांत दाविती कोष्टयासी । तव पिता पंढरीस पावला पंचत्वासी । त्यानें पूर्वी संपादिलें धनासी । व्यापार करूनि पुष्कळ ॥ ९५ ॥ तुझ्या नांदत्या गृहाचे परसद्वारीं । तुळशीवृंदावनामाझारीं । तें धन ठेविलें गुह्यप्रकारीं । खणून घ्यावें निर्भयें ॥ ९६ ॥ याप्रकारें प्रत्यक्ष अवधूतें । स्वप्नीं दाविलें सार्थदृष्टांतातें । जागृत होऊनि त्या कोष्टयातें । आश्चर्य वाटलें विलक्षण ॥ ९७ ॥ मग मुनीश्वराकडे जाऊन । नमूनि स्वप्न केलें निवेदन । समर्थ म्हणती सत्य आमुचें वचन । धनसुखसंपन्न होशील रे ॥ ९८ ॥ ऐसे त्रैलोक्यपूजित यतीश्वर । ज्यांची अगम्य लीला अपार । त्या भगवंताच्या आज्ञानुसार । तंतुक पातला स्वसदनीं ॥ ९९ ॥ कांतेसी सांगे कल्याणवृत्त । परिसूनि होय ती हर्षचित्त । म्हणे प्रपंचसुखार्थ पाहिजे वित्त । तेंचि प्राप्त होतसे ॥ १०० ॥ नंतर गुप्तरीतीं खननक्रिया । करूनि काढिलें पुष्कळ द्रव्या । समर्थदया प्राप्त भाग्योदया । सुखी जाहला तंतुवाय ॥ १ ॥ पुढें दिगंबराज्ञेनें मोहळास । सुखें तयें केला निवास । सद्गुरुगुणानुवाद अहर्निश । गाऊनि काल घालवी ॥ २ ॥ त्या मंगळवेढ्याचा शूद्र एक । त्याची स्त्री सती असे सात्त्विक ।

उभयतांचें वय पंचशतवर्षाधिक । वृद्धावस्थेस पावलेलीं ॥ ३ ॥ पोटीं निपजलें नसे पुत्रसंतान । जेणें सर्वदा उद्विग्न मन । दिगंबरमुनीसी वनांतरीं शोधून । घालिती लोटांगण उभयतां ॥ ४ ॥ या प्रकारें नित्य दर्शनक्रम । हृदयीं ध्याती योगीजन–विश्राम । परमात्मा परब्रह्म परंधाम । शुद्धभक्तीनें अर्चिती ॥ ५ ॥ जाणुनि स्त्रीपुरुषांचा शुद्धभाव । प्रसन्न होऊनि श्रीगुरुदत्तदेव । म्हणती सन्मुख वृक्षाचें शिरस नांव । तयाचा डिंक शुभ्र असे ॥ ६ ॥ तो शुभ्र डिंक शर्करायुक्त । भक्षण करीं गे शूद्रे अतृप्त । आज्ञानुसार तात्काल ती भक्षित । त्याच रजनीं गर्भवती राहे ॥ ७ ॥ नवमास पूर्ण भरल्यावर । प्रसवली शूद्री पुत्ररत्न सुंदर । ऐसा समर्थमहिमाविस्तार । किती म्हणून वर्णावा ॥ ८ ॥ त्या परमेश्वराच्या अपरिमित । अमानुषिक लीला ज्या असत । त्या संक्षेपें परिसा हो साधुसंत । सर्वसौख्यार्थदायक ज्या ॥ ९ ॥; त्या पुण्यक्षेत्रीं एक द्विज निर्मल । वसतसे वैदिक प्रपंचकुशल । बाबाजी भट्ट नामें सत्त्वशील । कुटुंबवत्सल सद्धर्मी ॥ ११० ॥ त्या विप्रसदनीं अकस्मात् । कधीं कधीं येती दत्तावधूत । एके कालीं त्रैमूर्तिभगवंत । विप्रसदनीं पातले ॥ ११ ॥ तेव्हां विप्रस्त्रीनें उत्तमासनावरी । बैसविले परम पुरुष अवतारी । अतिनम्रत्वें नमस्कारी । म्हणे कृपा आजी केलीसे ॥ १२ ॥ नंतर द्विजस्त्रीशी अनंत । म्हणती आम्ही झालों तृषाक्रांत । उदक आणूनि देईं त्वरित । सती ऐकूनि घाबरली ॥ १३ ॥ मग म्हणे प्राशनार्थ योग्य सुंदर । गृहामाजीं नाहीं मधुरनीर । जाऊनि आणूनि देतें सत्वर । कृपासागर यतिराया ॥ १४ ॥ श्रवण करूनि सतीचें भाषण । बोलती तेव्हां आदिनारायण । गृहांत उत्तमोदकाचा कूप असून । कां गे हिंडसी वृथैव ॥ १५ ॥ तंव वदे द्विजनारी । जाहलासे कूप शुष्क भारी । उदकाचा गंध नसे त्यामाझारीं । केवळ कोरडा ठणठणित ॥ १६ ॥ इतक्यांत शेजारचे नारी नर । म्हणती भटगृहीं प्रसंग थोर । विलोकनार्थ धांवले समग्र । नमिती सुराध्यक्षासि ॥ १७ ॥

* * * * * * * * * * * * * * *

तंव योगिराज द्विजपत्नीसी । म्हणती ऊठ चाल गे उदक पहावयासी । आमुचें वचन पूर्णतेसी । कैसें होतें अवलोकीं ॥ १८ ॥ ऐसें म्हणतां सर्वत्र लोक । कूपाजवळी गेले सकौतुक । बहुदिनापासूनि नसे उदक । कूप केवळ कोरडा असे ॥ १९ ॥ तंव श्रीगुरुदेव दत्तदिगंबर । कूपासमीप लघुशंका करूनि थोर । आज्ञापिती घटासि बांधूनि दोर । सोडा सत्वर कूपामध्यें ॥ १२० ॥ मग कुंभासि रज्जु बांधून । दिगंबरेश्वराचा जयजयकार गर्जून । सतीनें गुरुपदीं विश्वास ठेवून । कूपीं कुंभ सोडिला ॥ २१ ॥ कूपामाजीं द्विजस्त्री पाहे । तों उदक पूर्ण भरलें आहे । उत्तम मधुरोदक लवलाहें । काढिलें साह्यें प्रभूच्या ॥ २२ ॥ श्रीगुरुलीलेचा अत्यद्भुत प्रताप । पाहूनि जन विस्मित हर्षरूप । इतुक्यांत बाबाजीभट्ट समीप । येऊनि कूपोदक पाहे ॥ २३ ॥ यतीसि लोटांगण घाली वारंवार । म्हणे जय श्रीगुरुदेव दत्तदिगंबर । त्रैमूर्तींचा धरूनि पूर्णावतार । उपकार करिसी जगावरी ॥ २४ ॥ श्रीस्वामी समर्थ वरदमूर्ति । सर्वत्र शरण होऊनि नमिती । जयजयकारें गर्जूनि मंगलारती । उत्साह करिती भक्तीनें ॥ २५ ॥; त्या सुसमया सत्पुरुष एक । बाळकृष्ण साधुबुवा नामक । वेदांतज्ञानी प्रेमळ सात्त्विक । पारमार्थिक स्वयें होते ॥ २६ ॥ त्यांनीं दत्तमुनींच्या विमलचरणा । नमूनि अपार केलें स्तवना । सर्वत्र करिती भजनगायना । समारंभपूर्वक ॥ २७ ॥ तो बाबाजीभट्ट वैदिक पुढती । पंढरपुरासी जाऊनि राहिला प्रीतीं । त्या मंगळवेढ्यांत दिगंबर यति । असतां घडलें कौतुक ॥ २८ ॥ ग्रामानिकट पर्वतशिखरीं । महात्मापुरुष दोघे निर्विकारी । दिगंबरेश्वरासहित नानापरी । ब्रह्मविचारीं निमग्न ते ॥ २९ ॥ तेथें उत्तम असे एकांतस्थळ । वृक्ष घनदाट छाया विशाल । सरिता वाहतसे सुंदर जल । देखतां संतोष होतसे ॥ १३० ॥ ऐशा रमणीय नदीच्या तटाकीं । एकत्र बैसले विधिहरिपिनाकी । जे न भेटती पातालीं किंवा नाकीं । ते मर्त्यभूमीं विराजले ॥ ३१ ॥ तेथून येणारे जाणारे लोक । अज्ञानी अज्ञानवश प्रापंचिक । हे प्रत्यक्ष त्रैमूर्ति उत्तमश्लोक ।

नोळखिती मायिक अभिमानी ॥ ३२ ॥ परस्पर चर्चा प्रसन्नवदन । करिती जगदीश्वर सर्वैश्वर्यसंपन्न । त्या परमानंदस्वरूपाचें वचन । अधिकाराविण कैसें कळे ॥ ३३ ॥ देवत्रय एकांतीं भेटूनि । गेले आपापल्या स्थानीं । योगिराज दिगंबरमुनि । स्वेच्छें जनविजनीं संचरती ॥ ३४ ॥ करकमभोशाचे राहणार । यशवंतराव महादेव भोसेकर । जे पुढें 'देवमामलतदार' । या नामें प्रसिद्ध जाहले ॥ ३५ ॥ तेही मंगळवेढ्यांत कांहीं दिवस । दिगंबरेश्वराच्या होते सेवेस । त्या सत्पुरुषाचा सश्लेष इतिहास । पृथकाध्यायीं वर्णिला असे ॥ ३६ ॥ स्वामीसमर्थ असतां मंगळवेढ्यास । विशेषपणें अवतारकृत्यास । दावित नव्हते मनुष्यादिकांस । हें स्थूल वचन वृथैव असे ॥ ३७ ॥ मंगळवेढ्याजवळील ग्राम । पंढरी बेगमपूर चळआंबें नाम । इत्यादि ग्रामीं दिगंबर आत्माराम । फिरती निष्काम जगद्धिता ॥ ३८ ॥ चळआंब्यास एकेकालीं । दत्तदिगंबर गुरुराजमाऊली । रामदासीबुवाचे मठांत बैसली । भोजन आटोपूनि स्वच्छंदें ॥ ३९ ॥ तों यतिरायासी लागली झोंप । मग मठद्वारासी लावूनि कुलूप । रामदासीबुवा गेले गुपचूप । निजकार्यार्थ बाहेर ॥ १४० ॥ नंतर योगिराज झाले जागृत । देखिले मठद्वार निरुद्धित । कुलूप लावूनि किल्ली खिशांत । घेऊनि गेले बुवा ते ॥ ४१ ॥ संपूर्ण योगयोगांगतत्त्वें । सिद्धिसहित अंगीं वसती नित्यत्वें । मायाविशिष्ट परमात्मा विशुद्धतत्त्वें । अस्ति-भाति-प्रियरूपत्वें व्यापक ॥ ४२ ॥ ऐसा योगींद्र वेदविदुत्तम पुरातन । योगात्मा सर्वयोगाधिष्ठान । सिद्धिफलप्रदाता शशिसूर्याग्रलोचन । अत्रिनंदन सिद्धात्मा ॥ ४३ ॥ ते आपल्या योगलीलेनें क्षणांत । बैसले जाऊन भीमेच्या वाळवंटांत । लोकीं अवलोकिलें हें निश्चित । कळलें रामदासीबुवासी ॥ ४४ ॥ मग म्हणती दिगंबरमुनि मठांत निद्रित । इतर कोणी असेल वाळवंटांत । मी स्वहस्तें करूनि मठद्वार संरुद्धित । कुलूप लावूनि निघालों ॥ ४५ ॥ किल्लीही आहे माझेच जवळ । मग संगें लोकांसि घेऊनि तात्काळ । मठद्वार उघडिलें उतावीळ । रामदासीबुवांनीं ॥ ४६ ॥ मठीं मुळींच नाहींत

दिगंबर । मग बुवा झाले गलिताहंकार । तेव्हां परशूरामभट्ट गोरे उत्तर । देती रामदासीबुवातें ॥ ४७ ॥ हे यति साक्षात्परमेश्वर । वेदवेदांगपारग योगसिद्धेश्वर । परमपुरुष वेदांतांभोजभास्कर । वेदात्मा आदिनारायण असती ॥ ४८ ॥ तुम्ही साधु म्हणवितां आपणासि । परंतु संशयविपर्यय नांदती मानसीं । असो सर्व आश्चर्ययुक्त वाळवंटासि । जाऊनि यतीसि शरण रिघाले ॥ ४९ ॥ मंगळवेढ्यास द्वादशवत्सर । आरोग्यसुखद परेश परमोदार । राहिले असती दत्तदिगंबर । श्रीसद्गुरुवर स्वामिराज ॥ १५० ॥ चोखामेळ्यांतील एक अंत्यज । दिगंबर कृपें पावला साधुत्व सहज । दुसरा उद्धरिला भ्रष्ट द्विज । तिसरा म्लेंछ सिद्ध झाला ॥ ५१ ॥ अरण्यांत पडलेलें मृत श्वान । तयासि करून संजीवन । परोपरी प्रेमें प्रबोधून । निजभक्त केला तेधवां ॥ ५२ ॥ तें श्वान नृजन्म पावूनि पुढती । भक्तिज्ञानसहित तीव्र विरक्ति । संपादूनि परमागति । मोक्षस्थितीसि प्राप्त झालें ॥ ५३ ॥ ज्याच्या अगाध लीलामृत-श्रवणें । सुटतें मायामय प्रपंच-धरणें । प्रपंच भोगूनि परमार्थ साधणें । हें तों होणें अवश्यचि ॥ ५४ ॥ तेंचि पुढिले अध्यायीं कथन । ऐका हो सकळ श्रोतेजन । करा हो गुरुलीलामृत पान । सार्थक होईल जन्माचें ॥ ५५ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । सप्तदशाध्याय रसिक हा ॥ १५६ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे सप्तदशोऽध्यायः समाप्तः ॥ १७ ॥

श्रीगुरुदेवदत्त-स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय अठरावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमत्परमहंस दत्तात्रेयगुरवे नमः ॥ ॥ शिष्य विनवी गुरुवक्त्यासी । मंगळवेढ्याहूनि दिगंबरमुनि संन्यासी । कोठें गेले कोणत्या ग्रामासी । परोपकारीं तत्पर जे ॥ १ ॥ गुरु वदती ऐकावें शिष्यराया । जो निर्गुण निर्विकार त्याची इच्छा माया । हिरण्यगर्भ विराट् उद्भवलें जगत्कार्या । समष्टिव्यष्टिरूपानें ॥ २ ॥ स्थूल सूक्ष्म आणि कारण । समष्टि व्यष्टिरूपें समान । माया म्हणजे मूळप्रकृति जाण । जी मूळपुरुषाधीन असे ॥ ३ ॥ त्या मायेच्या संभवापासून । संपूर्ण विश्व झालें उत्पन्न । त्या संपूर्ण विश्वासि चैतन्यघन । व्यापला परमात्मा अंतर्बाह्यवर्ती ॥ ४ ॥ विश्वात्मा चिद्रूपें असे व्यापक संतत । म्हणूनि अनंतब्रह्मांडव्याप्य म्हणिजेत । सदा स्वप्रकाशें विराजित । प्रकाश्य-जड-असज्जगत् हें ॥ ५ ॥ जसें महदाकाश व्यापक असून । घटमठादिक उपाधिभेदेंकरून । ‘घटाकाश-मठाकाश’ नामाभिधान । भिन्नत्व दिसतसे शब्दमात्रें ॥ ६ ॥ जैसें घटादि मात्र विकार वाचारंभण । मृतिकाचि सत्य उपादानकारण । तैसें नामरूपात्मकजगत् भासमान् । होतें जाणा आत्मप्रकाशें ॥ ७ ॥ अस्तिभातिप्रियरूप । ब्रह्मात्मा अखंड सच्चिदानंदस्वरूप । जगद्रूप संकल्पविकल्प । मिथ्या जल्प नाशिवंत असे ॥ ८ ॥ जैसा असत्य वंध्यापुत्र । गंधर्वनगर खपुष्प असत्य चित्र । शशविषाण नरशृंग हे शब्द मात्र । सत्यत्व लेशही नसेचि ॥ ९ ॥ तथापि ‘अघटितघटनापटीयसी’ । माया अविद्या अज्ञानविलासी । ‘मायोपाधिक’ म्हणती ईश्वरासी । ‘अविद्योपाधिक’ जीव हा ॥ १० ॥ अधिष्ठानांश आणि भ्रमांशासहित । जेव्हां हा जीव होतो मायावलंबित । तेव्हां आपणासि संसारिक मानित । विसरूनि स्वरूप आपुलें ॥ ११ ॥ भ्रमांशाचा तिरस्कार करून । जेव्हां जीव मानी प्रधान्य अधिष्ठान । तेव्हां मी

चिदात्मा असंग आहे म्हणून । स्वरूपासी पूर्ण जाणतसे ॥ १२ ॥ अज्ञानकार्यसहित जी संसारप्रवृत्ति । त्या माया-अविद्येची होय निवृत्ति । खुंटे जन्ममरणरूप पुनरावृत्ति । अखंडब्रह्मस्थिति भोगुनी ॥ १३ ॥ त्या ब्रह्मानुभवस्थितीचा पूर्णप्रदाता । सद्गुरु दत्तात्रेयस्वामी असे तत्त्वतां । त्या गुरुलीलामृतें सत्य सार्थकता । होतसे बहुत जन्मांची ॥ १४ ॥ ते दिगंबरेश्वर मंगळवेढ्याहून । पंढरपुरीं पुन्हा गेले तें कथन । परिसा श्रोते करून सादर मन । गुणानुवाद श्रीगुरूचे ॥ १५ ॥ सन बाराशें त्रेसष्ट फसली । शके सतराशें पंचाहत्तर सालीं । श्रावण मासांत कथा वर्तली । अद्भुत रसाळ सुखकर ॥ १६ ॥ तेव्हां श्रीक्षेत्र पंढरपुरास । महापूर चंद्रभागा नदीस । अपरंपार जलमय सर्व बाजूस । आला होता विशाल तो ॥ १७ ॥ कधींही ऐसा महापूर । आला नव्हता आजवर । त्या कालीं चंद्रभागा सुंदर । अति जलाढ्य शोभली ॥ १८ ॥ तटाकीं सद्गुरु यतिराज । उभे होते कौतुकें सहज । विठोबा पांडुरंग अधोक्षज । त्यातें भेटावया जात होते ॥ १९ ॥ पुसिलें प्रथम नावाडियास । न्याल कीं आम्हां परतीरास । कर्णधार वदे यतीश्वरास । नेऊं दोन रुपयांसि ॥ २० ॥ आम्ही संन्यासी केवल निर्धन । कोठूनि आणावे रुपये दोन । सर्वत्रांसी नेतां नौकेंतून । तैसें न्यावें आम्हांसि ॥ २१ ॥ मदोन्मत्त असती ते नाविक । धनावांचून नेणती आणिक । हेलना करिती कुटिल लोक । नसे ओळख राहिली ॥ २२ ॥ जैसा आधींच प्रबलतर पशु माजला । त्यांत फारचि कामांध झाला । भगिनी-मातेस विसरला । भोगूं लागला उघड तो ॥ २३ ॥ तैसे ते कर्णधार माजलेले । परतीरीं नौका घेऊनि गेले । बसल्या लोकांसि उतरविलें । पुन्हां आले अलिकडे ॥ २४ ॥ हा महापूर अति भयंकर । पहावया जमले अनेक नारीनर । चोहोंकडे भरूनि पसरलें नीर । देखावा सुंदर त्या कालीं ॥ २५ ॥ मृत्तिका पाषाण वृक्षादिक । अवघेंचि दिसे जलमय देख । शोभा वाटे समाधानकारक । पूजिती लोक भीमेसी ॥ २६ ॥ जैसें परब्रह्म अद्वितीय अलौकिक ।

चराचर आहे संपूर्णव्यापक । अखंडैक्य अभेदें निश्चयात्मक । भेटे प्रत्यक्ष आत्मज्ञानियासी ॥ २७ ॥ असो पुन्हा नाविकांस गुरुयति । उदक किती असे म्हणून पुसती । गुडघ्याखालीं ऐसें उत्तर देती । दुष्ट छलक पापी ते ॥ २८ ॥ मग पुन्हां नौका कर्णधारीं । मंडळी बसवूनि नेली पैलतीरीं । स्वामीसमर्थावांचूनि ऐलतीरीं । अन्य कोणी न राहिले ॥ २९ ॥ पाहूनि नावाड्यांचें उन्मत्तपण । वटपत्रशयनी नारायण । मूळपुरुष जगत्कारण । लीला विलक्षण जयाची ॥ ३० ॥ तेव्हां पादसंवाहनासहित । अपार जलावरूनि अर्धक्षणांत । चालत गेले गुरुदत्तावधूत । परतीरास सहजगतीं ॥ ३१ ॥ परंतु पादुकांस लवलेश । उदकाचा झाला नाहीं स्पर्श । लोक मानिती आश्चर्य विशेष । मग परस्परें बोलती ॥ ३२ ॥ दिसती संन्यासीवेषें नर । परी हे साक्षात्परमेश्वर । हेचि पांडुरंग रुक्मिणीवर । नसे अंतर निश्चयें ॥ ३३ ॥ पुरवावया निजभक्तकामना । यावें लागलें जगज्जीवना । अनायासें दिधलें दर्शना । श्रीपांडुरंग-विठ्ठलें ॥ ३४ ॥ पंढरपुरीं हा चमत्कार । पाहिलेले वृद्ध नारी नर । अद्यापि आहेत दर्शनातुर । संत चतुर भाविक ॥ ३५ ॥ तेव्हां निस्तेज मुखें झालीं नाविकांची । घमेंडी जिराली पोकळ फुकाची । धुंदी उतरली अहंपणाची । गाती यतींद्राचें सद्यश ॥ ३६ ॥ यतिरायाचें वंदन पूजन । अनन्यभावें पादपद्मालिंगन । करिती सर्वत्र सत्कीर्तिगायन । उत्साहें जन त्या कालीं ॥ ३७ ॥ भूवैकुंठ श्रीपांडुरंगक्षेत्रीं । योगींद्रें क्रमिल्या त्र्यरात्री । ज्याच्या गमनें पुण्यपावन धरित्री । होतसे नित्य साहजिक ॥ ३८ ॥ पंढरींत दाविली विचित्रलीला । पुत्रप्राप्ति झाली वृद्ध वंध्येला । उठविलें एका मृत बालकाला । ऐसें चरित्र अपूर्व ज्यांचें ॥ ३९ ॥; गुरु सांगती अधिकारी शिष्याला । अगम्य अतर्क्य गुरु-प्रभुलीला । यतीश्वर गेले मंगळवेढ्याला । स्वच्छंदें वास्तव्य करण्यासी ॥ ४० ॥ तेथूनि पुढें कांहीं दिवासांनीं । मोहोळग्रामीं पातले दत्तमुनि । तो कथाभाग शुद्धभावेंकरूनि । श्रोतीं श्रवण करावा ॥ ४१ ॥ श्रीगुरुदेव स्वामीमहाराज । चार सहा मास सहज । मोहोळग्रामीं अधोक्षज । जगदुद्धरणार्थ

वसत होते ॥ ४२ ॥ ग्रामासंनिध लहान ओढा । वाहे सुंदर जलमय गाढा । दोंही तटीं पुष्पलतांचा वेढा । सुगंधयुक्त विराजे ॥ ४३ ॥ त्या ओढ्याच्या दरडींत एक पाषाण । शोभतसे वक्रतुंडासमान । तयाखालीं एक गुहा अंखड शोभायमान् । होती प्रचंड बहु जुनी ॥ ४४ ॥ दंडकमंडलुसायुधमंडित । वेदात्मा वेदार्थप्रकाश पंडित । नाना मतवाद होती खंडित । अधर्मी जनांसी दंडित असे ॥ ४५ ॥ शंखचक्रगदापद्मडमरूत्रिशूलधारी । चर्तुभुज मनोहर विश्वाधारी । भगवन्मूर्ति सुकुमार गोजिरी । भेटे साजिरी कधीं कधीं ॥ ४६ ॥ दिगंबर भस्म-सुगंध-लेपित । दत्तात्रेय योगाधीश्वर विराजित । त्या एकांतस्थलीं योगगुहेंत । वसती अवधूत निजेच्छें ॥ ४७ ॥ तया ग्रामीं वनीं वृक्षस्थळीं पर्वतीं । गुरुराज स्वतंत्रे वर्तती । त्रयभेदातीत पूर्ण ब्रह्मावतार निश्चिती । प्रत्यक्ष त्रयमूर्ति अनाथ बंधु ॥ ४८ ॥ अन्नोदकाचें स्मरण न व्हावें । कधींतरी मिळेल तें भोजन करावें । यदृच्छालाभसंतुष्ट असावें । स्वादरहित विमत्सर ॥ ४९ ॥ त्या मोहोळग्रामीं ब्राह्मण एक । अधिकारी गृहस्थ प्रापंचिक । निःपक्षपाती निःस्पृही सम्यक् । न्यायधर्ममार्गें वर्ततसे ॥ ५० ॥ त्या गृहस्थाचा पुत्र एकुलता एक । सुस्वरूप मतिमान् लाक्षणिक । वय असे अष्टादश वर्षात्मक । भाग्यशील तरुण शोभतसे ॥ ५१ ॥ तो मुलगा अकस्मात् । वायुप्रकोपें झाला मूर्च्छित । हालवितां न चळे न उठत । देहभानरहित बेशुद्ध ॥ ५२ ॥ त्या समयीं ज्योतिषी वैदिक । आणि मोठमोठे रोगचिकित्सक । भूतपिशाचादि पंचाक्षरी मांत्रिक । आणिले पाठक चेटकादि ॥ ५३ ॥ तथापि न झाली परीक्षा कोणासी । मुलाची आशा न वाटे लोकांसी । मायबापांच्या दुःखासी । परिहार नसे सहसाही ॥ ५४ ॥ दुःखचिंतेच्या समुद्रांत । निमग्न झाले तदा समस्त । कोणी म्हणती या ग्रामांत । संन्यासी अतीत फिरतसे ॥ ५५ ॥ तया एकदां दाखवावें । ऐसें सांगती वृद्ध बरवें । सत्ताधिकारी वदती आणावें । सत्वर पाहूनि तयासी ॥ ५६ ॥ मग चोहोंकडे धुंडिती । परी कोठें न भेटती यतिपती । तेव्हां एक स्त्री सौभाग्यवती । म्हणे दावितें चला हो ॥ ५७ ॥ ब्रह्मविद्या-

चिच्छक्तिदेवीवांचून । कोण दावी जगदात्मा प्रकाशघन । सदुपासना-आर्द्रभक्ति-ज्ञानावीण । गुरुकृपांजन स्पर्शेना ॥ ५८ ॥ आंत चटका लागला म्हणजे । निरामय होतें कार्य सहजें । सर्व विकार नासूनि सतेजें । समजे उमजे परमांजनें ॥ ५९ ॥ असो मरणोन्मुख झाली पुत्रस्थिति । कफवातपित्तें कंठावरोधली प्राणगति । सोडूनि जाववेना पुत्राप्रति । पाय निघेना पित्याचा ॥ ६० ॥ तथापि धरूनि मोठा धीर । निघाले अधिकारी गृहस्थ सत्वर । संगें सौभाग्यवती स्त्री उदार । दावी गुहाद्वार नदींत ॥ ६१ ॥ मग त्या गुहेपाशीं येऊनि समस्त । आक्रोश करिती शोकाकुलित । प्रणतवत्सलरूपी अनंत । समाधिउत्थित व्हावें जी ॥ ६२ ॥ उठा धांवा हो भगवंता । विश्वनाथा योगीशा कृपावंता । यतियूथपति अचल श्रीमंता । सांभाळा आतां पुत्रातें ॥ ६३ ॥ आमचा पुत्र म्हणूनि वाढविला । परी आम्हांसि सोडूनि शेवटीं चालला । काय करावा उपाय याला । जगत्पालका सांगावें ॥ ६४ ॥ आम्हां दीनांसी वृद्धापकाळीं । पुत्रावांचूनि कोण सांभाळी । पुत्रसंरक्षणार्थ आम्हांसि बळी । सद्यःकालीं द्यावें हो ॥ ६५ ॥ अंधाचे हातांतील काठी । गेलिया तो पडे महत्संकटीं । तनयावीण सतत महाकष्टी । यथा वृष्टिविना जन ॥ ६६ ॥ कलियुगीं कौतुक विलक्षण । सुंदर पुत्र पावती मरण । जनकजननी कुमारावीण । चिरायुमान वांचती ॥ ६७ ॥ पूर्वजन्मींचें कोणतें पातक । आड उभें ठेलें पुत्रघातक । दैवज्ञें वर्तविलें गृहजातक । पुत्रशोक व्हावया ॥ ६८ ॥ अत्यंत गहन पुत्रशोक । याहूनि दुसरा नाहीं अधिक । नंदनाविरहित धिक् धिक् । निरर्थक वांचणें ॥ ६९ ॥ 'आत्मा वै पुत्रनामासी' । 'आत्मा वै जायते पुत्रः' अशी । श्रुतिशास्त्रवचनें सत्यत्वासी । येतीं कैशीं पुत्ररहित ॥ ७० ॥ 'गृहरत्नानि बालका' । 'अमृतं बालभाषणं' वचनें देखा । काय करावें ऐश्वर्य गृह धनादिकां । सुंदर बालकाविरहित ॥ ७१ ॥ 'अपुत्रस्य गतिर्नास्ति' । ऐशीं शास्त्रवचनें गर्जती । इहपरत्र कधीं न साधती । पुत्रसुखाच्या अभावें ॥ ७२ ॥ परंतु तें पुत्रसुख प्रारब्धाधीन । प्रारब्धसूत्र ईश्वराचे स्वाधीन । म्हणूनि आम्ही अनाथ पराधीन । आलों

शरण श्रीचरणीं ॥ ७३ ॥ उठा उठा हो स्वामीसमर्थ । गृहीं ओढवला महदनर्थ । पुत्रें स्वीकारिला मृत्युपंथ । दीन
अनाथा सोडवा ॥ ७४ ॥ अत्याक्रोश श्रवणें कळवळले । यतिश्रेष्ठ तात्काळ वळले । अंतर्साक्षी भविष्य कळलें । त्रिकालज्ञानी
मुनीश्वरां ॥ ७५ ॥ बहुजनांसी उचलेना धोंडा । ऐसा लाविला आनंदगुहेच्या तोंडा । सर्वांचें मन झालें
कानकोंडा । कैसे बाहेर येतील ॥ ७६ ॥ मग योगीश्वरें स्वहस्तें आपण । सहज उचलून ठेविला पाषाण ।
प्रसन्नवदनें करिती मंगलभाषण । श्रोतीं सावधान ऐकिजे ॥ ७७ ॥ भटजी 'तुमच्या चिरंजीवा । अश्वावरी
नीट बैसवा । समुद्रतीराकडे पाठवा । गृहा सत्वर जाऊनि' ॥ ७८ ॥ ऐकूनि सगळे झाले तटस्थ । कोणासीही
न कळे शब्दार्थ । मग ती सौभाग्यवती वदे हर्षभरित । आतां येथून चलावें ॥ ७९ ॥ कृपें द्रवला सद्गुरु श्रीरंग । तुमचा
घडला कार्यभाग । गृहासी चलावें सवेग । श्रीगुरुसंयोगें सुखीं व्हाल ॥ ८० ॥ नंतर साष्टांगें नमूनि सकल । सदनीं
येऊनि देखती तात्काळ । परमत्वरेनें पुत्रमुखकमल । तों प्रफुल्लित निर्मल भासलें ॥ ८१ ॥ मुलासि शीघ्र वाटला
आराम । श्वास निघाला जिरला घाम । सर्वजनांसि आश्चर्य परम । सुखाविर्भाव मावेना ॥ ८२ ॥ धन्य दिवस आनंदमय ।
वृद्धीस पावला भाग्योदय । पुत्र सजीव झाला निरामय । जयजयकार वर्तला ॥ ८३ ॥ हे यति न मानव ऐसें
जन म्हणती । कीं प्रत्यक्ष परमेश्वरचि जगत्पति । धरूं नका हो संशय चित्तीं । करा भक्ति अनन्यभावें ॥ ८४ ॥ 'संशयात्मा
विनश्यति' । इहपरलोक न साधे नव्हे सुखप्राप्ति । संशयात्मा पावे अधोगति । ऐसें बोधिती श्रुति शास्त्रें ॥ ८५ ॥
सर्वोपरी संशय असे बाधक । सर्वप्रकारें संशयचि घातक । संशयचि भवसंसृतिकारक । जन्ममरणदायक संशय असे
॥ ८६ ॥ अहो हें सर्वचि ब्रह्मस्वरूप असून । 'तुम्ही ब्रह्म आहां' ऐसें म्हणतां भीती जन । नष्ट न झाल्यामुळें विकल्प
अज्ञान । भोगिती अधःपतन संशयें ॥ ८७ ॥ म्हणूनि अंतरीं निःसंशय असावें । हरिगुरुचरणीं भक्तिप्रेमें वसावें । मी

कोण कोठील हें संतगुरुसी पुसावें । अनुभवावें ब्रह्मस्वरूप ॥ ८८ ॥ अतएव 'भक्तिप्रियः श्रीपतिः' । ऐशी श्रुति स्मृति आणि भगवदुक्ति । विवेकी महात्मा साधुही वदती । हरिगुरुभक्ति करा हो ॥ ८९ ॥ मुख्यत्वें सर्व वेदशास्त्रांचें तात्पर्य । परमात्मा निर्विकार संपन्न अखिलैश्वर्य । अंतर्यामीं ओळखूनि त्यजूनि अज्ञान निर्माल्य । कृतकार्य व्हावें त्वरेनें ॥ ९० ॥ तेचि परमात्मा प्रत्यक्ष यतीश्वर असून । आम्ही प्रपंचमायामोहीं गुंतून । नोळखितों सच्चिदानंदघन । अलखनिरंजन अवधूत ॥ ९१ ॥ असो त्या सद्‌गृहस्थाचा चिरंजीव । दत्तात्रेयस्वामिकृपें होऊनि सजीव । तिसरे दिवशीं वस्त्रालंकारयुक्तवैभव । अश्वारूढ होऊनि निघाला ॥ ९२ ॥ मायबाप सखे सोयरे आप्तजन । लोकसमुदाय संगें घेऊन । त्या योगगुहेसमीप येऊन । घातलें नमन साष्टांग ॥ ९३ ॥ त्याकालीं जंगमवाणी लिंगाईत । गवेस्वामी नामें सत्पुरुष विरक्त । सदा सर्वदा योगाभ्यासरत । संत बहुत वयाचा जो ॥ ९४ ॥ एकांतस्थलीं घालूनि पद्मासन । किंवा भद्रासन वीरासन सिद्धासन । सिंहासन मयूरासन स्वस्तिकासन । गोमुख मुक्तासनादिक ॥ ९५ ॥ यम नियम आणि आसन । प्राणायाम प्रत्याहार धारणा ध्यान । समाधि ऐसें अष्टांगयोगसाधन । कथिती याज्ञवल्क्य पतंजलि ॥ ९६ ॥ हटयोग राजयोग सांख्यज्ञान । यांचें विशेष व्याख्यान । पृथगध्यायीं यथासांग होईल कथन । श्रोतीं सावधान असावें ॥ ९७ ॥ जेव्हां कर्मेंद्रिय-ज्ञानेंद्रियांचे । आणि मनसहित बुद्धीचे । व्यापार थांबती साचे । म्हणजे स्वव्यापाररहित असणें ॥ ९८ ॥ यासीच 'परमा गति' म्हणती । आणि इंद्रियधारणा स्थिरवृत्ति । तेव्हां अप्रमत्त इंद्रियादिक होती । त्यासीच मानिती 'योग' ऐसें ॥ ९९ ॥ चित्तवृत्तीचा निरोध करणें । त्यासीच 'योग' म्हणती योगज्ञ शहाणे । तो अष्टांगयोग अभ्यासणें । साधकजनीं अवश्य ॥ १०० ॥ जीवब्रह्मैक्यसंयोग । तोचि जाणावा सर्वोत्तमयोग । जेणें अविद्या जन्ममरणभोग । अज्ञान दूर होतसे ॥ १ ॥ अथवा शिव विष्णु शक्ति । अग्नि सूर्यादि गणपति । इत्यादि देवतांचे ठायीं स्थिति । अभेद बुद्धि असणें

जी ॥ २ ॥ तोचि योग म्हणावा सर्वमान्य । अभेदबुद्धि समदर्शनेंचि होय धन्य । द्विज धेनु गज श्वान श्वपचादिकीं एक चैतन्य । विद्या विनय संपन्न देखती ॥ ३ ॥ हा राजयोग गवेस्वामीस । अप्राप्त होता अनभ्यास । प्राणायामपरायण समाधीस । साधिलें होतें हठाभ्यासें ॥ ४ ॥ पुढें दत्तात्रेयस्वामींच्या कृपेंकरून । गवेस्वामींनीं योगाभ्यास सोडून । संपादिलें अपरोक्षब्रह्मज्ञान । स्वस्वरूप अखंड अभिन्नत्वें ॥ ५ ॥ आधींच चतुष्टयसाधनसंपन्न । त्यावरी अष्टांगयोगसाधन । तेणें शुद्ध सात्त्विक चित्त होऊन । मुमुक्षुपण उपजलें ॥ ६ ॥ मग श्रीगुरुमुखें वेदान्तश्रवण । करूनि त्याचें वारंवार स्मरण । मनन होऊं लागलें निदिध्यासन । वृत्तिप्रवाहरूपत्वें ॥ ७ ॥ प्रत्यगभिन्न-परब्रह्म जाण । तदेकाकारवृत्ति प्रवाहाभ्यासन । म्हणजे ब्रह्माकारवृत्ति अंतःकरण । होणें तोचि ‘निदिध्यास’ म्हणती ॥ ८ ॥ अथवा मी असंग अविक्रिय । प्रत्यगभिन्न ब्रह्मप्रत्यय । अहंब्रह्मास्मि अखंड अद्वय । अनुभवणें तोचि ‘साक्षात्कार’ ॥ ९ ॥ ब्रह्मानंदमयवृत्तीवांचून । फुकट न लोटावा अर्धही क्षण । ‘जीवन्मुक्त’स्थितीचें लक्षण । ब्रह्माभ्यासें बाणतेंचि ॥ ११० ॥ परंतु पूर्वसंस्कारापासून । वृत्ति जगदाकार जायमान । जगत्पदार्थाकार मन । होऊंचि देऊं नये ॥ ११ ॥ जगत्पदार्थाकार झालिया वृत्ति । प्रतिबंधक विघ्नराशी उद्भवती । ऐशानें न चुके पुनरावृत्ति । जन्ममरणसंसृतिबंधन ॥ १२ ॥ म्हणून मोक्षाधिकारी यांनीं । जड दृश्य पदार्थ समूळ टाकुनी । ब्रह्माकारांतःकरणवृत्ति अनुदिनीं । अष्टाभ्यासें नित्य करावी ॥ १३ ॥ निरंतर ब्रह्माभ्यास झालिया प्रबल । प्रतिबंध विघ्नबाहुल्य सकल । अविद्या अज्ञान प्रपंच प्रारब्धजाल । सबीज तात्काल दग्ध होई ॥ १४ ॥ न द्यावा किंचित् मनासि अवसर । उद्भवूं न द्यावे मनोविकार । याप्रकारें ब्रह्माभ्यास दृढ निरंतर । केला पाहिजे अवश्य ॥ १५ ॥ तात्पर्य अभ्यास नसावा शिथिल । सर्वदा ब्रह्माभ्यास कीजे अतिप्रबल । मुख्यत्वें श्रीसद्गुरुकृपा नित्य निर्मल । संपादितां सर्वसिद्ध होय ॥ १६ ॥ असो श्रीगुरु दत्तात्रेय स्वामींचें ।

अभयप्रसाद वरदान कृपेचें । गवेस्वामीस प्राप्त झालें साचें । भोगिती फुकाचें मोक्षसुख ॥ १७ ॥ ते गवेस्वामी गुहेसमीप जाऊन । स्तविती दत्तात्रेय-एकनाथ-जनार्दन । नंतर आनंदगुहेंतून आदिनारायण । आले बाहेर करुणार्णव ॥ १८ ॥ तेव्हां एकचि गर्जला जयजयकार । श्रीगुरुदेवदत्त स्वामीदिगंबर । भरलें महदानंदें चराचर । सगळे नमस्कार घालिती ॥ १९ ॥ यथासांग योगीश्वरांचें पूजन । फल तांबूल दक्षिणा समाराधन । यथाशक्त्यनुसार धर्म दान । पुराण कीर्तन जाहलें ॥ १२० ॥ प्रार्थिती दत्तदिगंबर सच्चिदानंद । जय स्वामीसमर्थ करुणाकंद । दीनदयाल भक्तवरद । अखंड सुखप्रद जनांसी ॥ २१ ॥ म्हणे अधिकारी सद्गृहस्थ । संजीवूनि दान दिधला पुत्र यथार्थ । भगवंता आपले चरणकृपें मनोरथ । आजि माझे पूर्ण झाले ॥ २२ ॥ अमानुषिक कृत्य अवतारिक । परमपुरुष परमात्मा अलौकिक । आपणचि अनंतकोटि-ब्रह्मांडनायक । सुखदायक सर्वांसी ॥ २३ ॥ आम्ही अज्ञानी संसारी मंदमति । नोळखूं परमेश्वर विभूति । तथापि श्रीदत्तात्रेयगुरु वरदमूर्ति । कृतकार्य झालों निजकृपें ॥ २४ ॥ दीनअनाथांचे कैवारी आपण । जगताचें विवर्तोपादान कारण । कर्ता करविता फलप्रदाता जगदुद्धरण । स्वलीलें जाण करितसां ॥ २५ ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर । त्रयदेवात्मक श्रीमद्दत्तावतार । श्रीमत्परमहंसवेषधारी नर । दिसतां परी परमेश्वर आहां कीं ॥ २६ ॥ जड मूढ भ्रांत अज्ञानी केवल । ते न जाणती निजस्वरूप निर्मल । श्रीमान् देव पुरुषोत्तम प्रतापविशाल । भक्तवत्सल तेजस्वी ॥ २७ ॥ ऐसे अनन्य गुणानुवाद वर्णिती । वारंवार प्रभुचरणीं लोळती । जयजय योगीश्वर जगत्पति । वंदितों भावें तुजलागीं ॥ २८ ॥ सर्व मंगलाचें मंगलायतन । संपूर्ण जीवांचें संजीवन । सर्वत्रांचें विश्रांतिस्थान । आनंदघन जगद्गुरु ॥ २९ ॥ सर्वकर्मफलाश्रय । अखिल योगांचें संयोगश्रेय । सकलधर्मांचें मुख्यालय । सर्व जयांचें विजयरूप ॥ १३० ॥ ते श्रीगुरुस्वामी दत्तात्रेय । तया सकलही शरण अनन्य । होऊनि म्हणती धन्य धन्य । झालों पावन चरणकृपें

॥ ३१ ॥ कृतकृत्यता प्राप्त होऊनि । गेले सर्वत्र आपापल्या स्थानीं । स्वामीसमर्थांची सत्कीर्ति गाऊनि । प्रपंच करिती सुखरूप ॥ ३२ ॥ त्या मोहोळग्रामींचा शिल्पकार । जेथें असतील दत्तदिगंबर । तेथें नित्य जाऊनि साष्टांग नमस्कार । प्रेमभावें करितसे ॥ ३३ ॥ ऐसा नेम चारमासपर्यंत । सिद्धीस गेला विघ्नरहित । एके दिनीं शिल्पकाराचे मनांत । सत्संकल्प उद्भवला ॥ ३४ ॥ आमचें मुख्य कुलदैवत । श्रीमल्लारिमार्तंड म्हाळसाकांत । साक्षात् कैलासपति शिव अनंत । तें महद्दर्शन मज व्हावें ॥ ३५ ॥ ज्यांचें प्रसिद्धस्थान क्षेत्र-जेजुरी । पालीदावडी लिंबगांवादि अनेक नगरीं । तो परमात्मा शिवमल्लारि । कैवारी सर्व जनांचा ॥ ३६ ॥ भंडार खोबऱ्याचा सुकाळ । ज्याचे चरण सेविती संपूर्ण चिरकाल । जो विश्वाद्य विश्ववंद्य निखिल । त्रिभुवनभयापहारी ॥ ३७ ॥ कनकगिरिसदृश मल्लारिदेव । जो म्हाळसा-भूषितांगीं सदैव । करीं खड्ग वाहन जयाचें श्वेताश्व । दिव्य तेजस्वी विराजे ॥ ३८ ॥ विबुध-बुधगणांनीं सेवित । ज्याचे कृपें कृतार्थ होत जगत् । मणिमल्ल दैत्यांसि वधूनि सुगति देत । भक्तकामकल्पद्रुम ॥ ३९ ॥ भक्तीनें होय नित्य संतोषित । गणादिभक्तसह विराजित । भैरवादि उभे तिष्ठत । ॐकार-ब्रह्मस्वरूप जो ॥ १४० ॥ अनेक नित्य येऊनि जेजुरीं । करिती खंडेरायाची वारी । चंपाषष्ठीचा उत्साह भारी । समारंभ घरोघरीं होतसे ॥ ४१ ॥ मंगलारती तळी भरिती । सदानंदाचा एळकोट गर्जती । सदा आनंदोदय सर्व पावती । कैलासपति-प्रसादें ॥ ४२ ॥ त्या मल्लारिमार्तंडाचें सुंदर ध्यान । तयाचें व्हावें प्रत्यक्ष मज दर्शन । सत्संकल्प-फलप्रदाता भगवान् । जाणिलें मन शिल्पकाराचें ॥ ४३ ॥ अंतर्यामी सर्वांतर्साक्षी । अंतर्बाह्य सकल निरीक्षी । अनंतब्रह्मांडें राहती ज्याचे कुक्षीं । लक्षिती जयासी योगीजन ॥ ४४ ॥ विश्वनाथ आज्ञापिती तयासी । जें वसतसे ध्यान तुझे मानसीं । तें प्रत्यक्षप्रमाण एकाग्रचित्तेंसीं । अवलोकीं नयनीं आतां तूं ॥ ४५ ॥ करद्वय जोडूनि शिल्पकार । उभा राहिला दर्शनातुर । तों अकस्मात्

* * *

देखिलें ध्यान सुंदर । मल्लारिशिव मूर्तिमंत ॥ ४६ ॥ यथासाङ्ग मार्तंडमल्लारी । शिल्पकारें विलोकिले नेत्रीं । साष्टांग
दंडवत नमन करी । अत्यानंदें तेधवां ॥ ४७ ॥ नाचत नाचत करी स्तवन । कुलदैवत अहो शिवभगवान् । बहुत
दिवसांचे मनोरथ पूर्ण । दर्शन देऊनि केले जी ॥ ४८ ॥ सद्गुरुस्वामी करुणासागर । अंतर्साक्षी व्यापक चराचर ।
शिवमल्लारिस्वरूप धरूनि सुंदर । दाविलें सहज क्षणमात्रें ॥ ४९ ॥ अतर्क्य अगम्य निजलीला । अपार भासे ब्रह्मादिकांला ।
तेथें यःकश्चित् मानवाला । सर्वपरी अशक्य असे ॥ १५० ॥ देवा तुमची करितां स्तुति । वेदशास्त्रें पुराणादि स्तब्ध
होती । श्रीगुरुलीलामृताची विख्याती । गर्जे त्रिभुवनीं विजयप्रद ॥ ५१ ॥ पुढिले अध्यायीं रसाळ कथन । सोलापुरीं
स्वामिरायाचें आगमन । श्रोते परिसा एकाग्रमन । विनवी वामनदास तुम्हां ॥ ५२ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत ।
श्रुतिस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । अष्टादशाध्याय रसिक हा ॥ १५३ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे
अष्टादशोऽध्यायः समाप्तः ॥ १८ ॥ श्रीगुरुदेवदत्त—स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय एकोणिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश–सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्तात्रेय गुरवेनमः ॥ ॥ गुरूसि विनवी शिष्य अधिकारी । स्वामी समर्थ केव्हां गेले सोलापुरीं । मागील अध्यायीं सूचनानुसारीं । सांगा विस्तारपूर्वक ॥ १ ॥ श्रीगुरुदत्तात्रेय स्वामिलीला । ऐकतां तृप्ति अद्याप मजला । झाली नसे सर्वेंद्रियांला । समाधानकारक ऐशी ॥ २ ॥ गुरु वदती सच्छिष्या परीस । या श्रीगुरुलीलामृतापरीस । अधिक नाहीं चिंतामणि आणि परीस । षड्रस नवरसादिक ॥ ३ ॥ गुरुलीलामृत मधुर गोडी । चाखिती श्रवणीं जे आवडीं । तेचि साधिती स्वार्थ-परमार्थ-जोडी । परमपद-पुरुषार्थ ॥ ४ ॥ परमपद म्हणजे परमात्मा । अपार ज्याचा प्रकाशे महिमा । सर्वांतर्यामी त्या निर्हेतु निरुपमा । वेदांत-गुरुमुखें जाणावें ॥ ५ ॥ मी कोण कोठून आलों हें पहिलें । आणि हें जगत् कोणी निर्मिलें । त्या जगत्कर्त्यासि पाहिजे जाणिलें । अवश्य या नृजन्मीं ॥ ६ ॥ या जगताचें त्रिधा उपादान । ‘आरंभ-परिणामी-विवर्त’ कारण । जीवेश्वराचें स्वरूपविवेचन । अविद्येसहित व्हावें ॥ ७ ॥ पिंड-ब्रह्मांडाचा शुद्ध विवेक । व्हावा गुरुमुखें वेदान्त सम्यक् । हें जड शरीर दृश्य विनाशी मायिक । तैसेंचि ब्रह्मांड समजावें ॥ ८ ॥ हा देह अशुचि मांसमय । आणि आत्मा विशुद्ध पुण्य-ज्ञानमय । देह असत्-दुःखमय अमय । परिछिन्न विनाशी असे ॥ ९ ॥ आत्मा व्यापक सच्चिदानंदघन । एक नित्य सर्वत्र अपरिच्छिन्न । देशकाल-वस्त्वादिक विहीन । स्वयंप्रकाश स्वरूप आहे ॥ १० ॥ देह स्थूल सूक्ष्म कारण । आद्यंतवंत विकारी जाण । क्षणभंगुर अशाश्वत अप्रमाण । प्रकाश्य घटवत् व्यतिरेकीं ॥ ११ ॥ कर्ण-नेत्र-नासिकेंतून निघे मळ । मुखांतूनि थुंका गळे

लाळ। उपस्थ-इंद्रियांतून अमंगळ । मूत्रपुरीष निघतसे ॥ १२ ॥ विष्ठा मूत्र लोम केश नख । पळमात्रही गृहीं न ठेविती देख। सदा चिंतारोगादि दुःख । सप्तधातूमय देह बनलासे ॥ १३ ॥ झालिया विष्ठामूत्रादि अमंगल स्पर्श । पळमात्र देखील नसतां अवकाश। दुर्गंधि विटाळ मानिती दोष। चिळसयुक्त देहासी ॥ १४ ॥ मातेचें रक्त पित्याचें रेत । स्त्रीयोनींत एकत्र होत। नवमास भरलिया उपजत । इंद्रजालवत् देह हा ॥ १५ ॥ अनंत क्लेश मातेच्या उदरीं । गर्भीं जीव भोगी नानापरी। यमयातनापरीस भारी। तळमळ करी सुटाया ॥ १६ ॥ यमजाचणीहून अत्याधिक । जीव दुःख सोसूनि करी शोक। म्हणे जगदीशा सोडविता तूं एक । अज्ञान पामर जीवासी ॥ १७ ॥ माता भक्षी आवडते पदार्थ। ते करिती मजला अनर्थ। कष्ट न सोसवती मी असमर्थ। दीनानाथा सोडवीं ॥ १८ ॥ गर्भीं दुःखें तळमळ करितां । नये सांगतां ऐकतां आणि बोलतां । धांव धांव रे परमेशा भगवंता। सोडवीं आतां मज बाळा ॥ १९ ॥ नको नको गर्भजन्मयातना। धिक्कार असो या दुर्गंधमय गर्भस्थाना। पतितपावना जगज्जीवना। सोडवीं आतां दीनासी ॥ २० ॥ मग परमेश्वरकृपेनें अर्भक । ज्यापरी यंत्रपीडनें पदार्थार्क । निघे त्यापरी योनियंत्रांतून देख । शोकाकुलित ओरडूनि ॥ २१ ॥ बाहेर पडल्यावरी लेंकरा। लागे मायाअविद्येचा वारा। तेणें पुढती परमेश्वरा । विसरे बाललीलेंत ॥ २२ ॥ बाल्यावस्थीं विष्ठा मूत्रादि दुर्गंध। त्याचा अंगासि वारंवार होत संबंध। हांसे रडे ओरडे सक्रोध । बालदुःख न कळे कोणा ॥ २३ ॥ कांहीं समजूं लागल्यावरी । आवडीं खेळे फार खोड्या करी । मायबापां आणि इतरां परोपरी । पीडीतसे बालक तें ॥ २४ ॥ त्रस्त सर्वही तयाच्या काहुरें। कोपें ताडितां बाल घाबरे। परवस्तु घेई घरीं दारीं फिरे। पळे अडखळे पडतसे ॥ २५ ॥ मागे हट्ट करी रागें रुसे। फेंकी मुखांत घाली जें जें गवसे । जणूं लागलें वेड भरलें पिसें । मर्कटचेष्टा करितसे ॥ २६ ॥ तात्पर्य बाल कुमार आणि पौगंड (व्रतबंधानंतर वय वर्षें १० पावेतोंची अवस्था)। या अवस्थेंत

दुःखेंचि होती उदंड । युवावस्थेंत कामक्रोधांचें बंड । माजतें थोतांड विषयांचें ॥ २७ ॥ तारुण्यांत विद्याशक्तिद्रव्यबळें । मदांध होऊनि होती खुळे । रमणीविलासाचे करिती चाळे । करिती सोहोळे बंधनप्रद ॥ २८ ॥ माता पिता गुरु धनी ज्ञात्यांसी । धिक्कारूनि स्वजाति स्वधर्मासी । स्वकीय पर किंवा विश्वयोषितेसीं । रमती विषयदास सर्वदा ॥ २९ ॥ परनिंदा परदोष छिद्र पाहती । गर्विष्ठ निजदोष न जाणती । अनुचित निंद्यकर्में आचरती । जगांत म्हणविती प्रतिष्ठित ॥ ३० ॥ स्त्रीलंपट दुराचारी विषयासक्त । होती दरिद्री रोगी मूढ अशक्त । स्त्रीमुळें सर्वस्व नाश प्राणघात । तारुण्यावस्थेंत होतसे ॥ ३१ ॥ तात्पर्य तरुणपणाचा भर । सर्वपरी क्लेशकारक साचार । म्हणूनि करूनि सारासारविचार । इंद्रियें जिंकावीं ज्ञात्यांनीं ॥ ३२ ॥ वृद्धावस्थेंत ग्रासिती रोग । औषधोपचार होती निरुपयोग । सत्कर्म धर्म विवेक न घडे सांग । होती विकल इंद्रियें ॥ ३३ ॥ सर्वावस्थेहूनि वृद्धापकाल । शोकदुःखाचा डोंगर केवळ । अंगकंप श्वास गळे लाळ । करिती स्वकीय विडंबना ॥ ३४ ॥ जरावस्था असे क्षयकारक । मृतावस्था अत्यंत पीडादायक । ऐसें हें षड्विकारी स्थूल वासनात्मक । कारण शरीर दुःखमय ॥ ३५ ॥ 'अस्ति जायते वर्धते । विपरिणमते अपक्षीयते विनश्यते' । हें संक्षेपें निरूपिलें शिष्या तूंतें । कळावया स्पष्ट आत्मस्वरूप ॥ ३६ ॥ ऐसा सुदुर्लभ नृदेह प्राप्त होऊन । शरीरेंद्रियें सदृढ अव्यंग असून । चित्त बुद्धि अंतःकरण मन । शंकित पदार्थज्ञान असतांही ॥ ३७ ॥ मनाचा एक चांगलेपणा । ज्या कार्यामागें लागे जाणा । तद्रूप स्वाभाविक धरी धारणा । कार्यसंकल्परूप मनोवृत्ति ॥ ३८ ॥ उठुनी पुनः पुनः त्या मनोवृत्ति । भ्रमण करितां आपणास समजती । अधिष्ठानीं पुनरपि येऊनि स्फुरती । उत्थानलयसाक्षित्वें जाणावें त्यां ॥ ३९ ॥ जडवृत्ती साक्षित्वें चिद्घन । अधिष्ठान आत्मा तोचि आपण । निर्विकार उपाधिरहित कार्यकारण । साच आहों कीं ॥ ४० ॥ आपणापासूनि वृत्ति उठली । बाह्य पदार्थाकार झाली । आपणामाजीं परतोनि आली । देखिली

जाणिली ते आपणचि ॥ ४१ ॥ मनोवृत्ति विकारी दृश्य जड । येत जात आपणासि दिसते उघड । म्हणूनि द्रष्टा साक्षी निर्विकार सुघड । आत्मा स्वयें आपणचि आहों ॥ ४२ ॥ अंतःकरणवृत्तीच्या येरझारा । अखिल वृत्तिसंधीचा पसारा । त्या संधिवृत्तीच्या अभावासि खरा । प्रकाशक कूटस्थ निर्विकार ॥ ४३ ॥ क्षणक्षणा बुद्धीचे विकल्प । उठती परिणामीं दिसती अल्प । आत्मा चैतन्य अनंत निर्विकल्प । जाणता या विकल्पांसी ॥ ४४ ॥ मुक्तमालिकेंत सूत्र जैसें । अनुस्यूत व्यापक एक दिसे । बुद्धिविकल्पांत आत्मा विलसे । अनुस्यूत व्यापकत्वें ॥ ४५ ॥ जड परिणामी दृश्य बुद्धीच्या वृत्ति । त्या बुद्धिवृत्तिहून भिन्न आत्मा निश्चितीं । चिदानंदघन अपरिच्छिन्न स्थिति । जाणिजे साक्षिस्वरूपें ॥ ४६ ॥ मुक्ताफळींच दोरी वेष्टिली । ती द्वयमुक्तांसि निवडून पाहिली । तंव दोरीच स्पष्ट दिसूं लागली । मुक्तीं ओविली असून भिन्न ॥ ४७ ॥ तैसा बुद्धिवृत्तीचे मधीं । आणि बुद्धिवृत्तीचे अखिल संधी । त्या संधीमाजीं निरवधि । कूटस्थात्मानुभव स्पष्ट होतसे ॥ ४८ ॥ त्या अखिल संधिवृत्तीच्या अभावास । उघड प्रकाशिता आत्मा निराभास । निर्विकार कूटस्थ शुद्ध अनुभवास । येतसे निःसंशय स्पष्टत्वें ॥ ४९ ॥ बुद्धिवृत्तिरूप पूर्वविकल्प नष्ट झाला । आणि जोंपर्यंत दुजा विकल्प नसे प्रकटला । तोंपर्यंत शुद्धात्मा स्पष्ट प्रकाशला । 'तत्पद' लक्ष्यस्वरूप ॥ ५० ॥ अतएव गुरुसदनवास कराया गेले । गुरुभक्त जे शुद्ध मोक्षाधिकारी भले । त्यांनीं वृत्तिरहित अंतःकरण केलें । पाहिजे अवश्य अभ्यासें ॥ ५१ ॥ म्हणजे निर्वृत्तिक अंतःकरण । झालियावरी गुरुकृपेची खूण । निर्विकल्प कूटस्थ सच्चिदानंदघन । अनुभविला जातसे उघड तो ॥ ५२ ॥ ऐसा ब्रह्मात्म्याचा स्पष्टानुभव । शुद्धान्तःकरणी मुमुक्षु वास्तव । जयां प्राप्त व्हावा ऐशी शुभेच्छा सदैव । तयीं प्रयत्नें अभ्यास करावा ॥ ५३ ॥ त्रयक्षणक्रमेंकरून । अंतःकरण-वृत्तिमात्रांचें निरोधन । म्हणजे विकल्परहित अंतःकरण । निर्वृत्तिकाभ्यासें करावें ॥ ५४ ॥ म्हणजे मोक्षाधिकाऱ्यासि वास्तव । लाभतो शुद्धचैतन्य-स्वरूपानुभव । याकरितां विकल्पनिरोधन

अवश्यमेव । केलेंच पाहिजे प्रयत्नें ।। ५५ ।। जप तप अनुष्ठान यज्ञ व्रत । कर्मकांड उपासना तीर्थ क्षेत्र सेवित । तिल
दर्भ भस्म मृत्तिका चिवडीत । उदक सांडित बसावें तोंवरी ।। ५६ ।। तोंवरी मुद्रांकित द्वादश टिळे । तोंवरी श्वेत रक्त
पीत बिंदु काळे निळे । साधिती प्रयोग-कल्प शोधूनि बळें । जटिल मुंडितादि तोंवरी ।। ५७ ।। न्याय व्याकरण
शास्त्राभिमान कलह । तोंवरी मठ महंती शब्दांचे दुराग्रह । महादशांतर्दशादि फल-नवग्रह । सकल महत्त्व तोंपर्यंत
।। ५८ ।। अखिल वृत्तींचा साक्षी आत्मा जोंपर्यंत । कळला नाहीं समीप असूनि हृदयांत । सर्व कर्म निरर्थक तोंपर्यंत ।
वेदशास्त्रादिकांत कथिलें ऐसें ।। ५९ ।। त्या स्वात्मप्राप्त्यर्थ खटाटोप भयंकर । त्यजूनि दृढाभ्यास करावा निरंतर ।
याच देहीं आत्महित साधूनि सत्वर । परमानंदीं सुखी व्हावें ।। ६० ।। त्या परमानंदाची व्हावया प्रतीति । आणखी
सांगूं वेदवाक्यार्थ सयुक्ति । परिसावें सावधान श्रोतीं । जीव हा सविकल्पक असे ।। ६१ ।। कल्पनेसहित हा
जीव । तयासि सविकल्पक म्हणिजे सदैव । गुरु सच्छास्त्रोपदेश नसे जंव । तंववरी सविकल्पक जाणिजे ।। ६२ ।।
पश्चात्तापें जीव श्रीगुरुचरणाश्रयीं । जेव्हां विकल्प भ्रम टाकूनि देई । तेव्हां तोचि जीव ज्ञानोपदेशसमयीं ।
अहंब्रह्मानुभव घेतसे ।। ६३ ।। 'अहं ब्रह्मास्मि' या महावाक्यार्थ-पंक्तींत । भागत्याग-लक्षणानें 'सोऽयं देवदत्त' ।
वाच्यार्थ टाकूनि लक्ष्यार्थ घेत । उपाधिरहित जीव हा ।। ६४ ।। जयांचे नष्ट झाले सकल भ्रम विकल्प । ते
महावाक्यार्थानुभवी निर्विकल्प । होऊनि शुद्ध सच्चिदानंदस्वरूप । जीव-ब्रह्मैक्य सुख भोगी ।। ६५ ।। परब्रह्म
सत्य आणि मिथ्या हें जगत् । जीव-ब्रह्मैक्य असे निश्चित । यांत भेद नाहीं खचित । ऐशी वेदान्त डिंडिमा
पिटितसे ।। ६६ ।। जैसें अविवेक्यास मंदांधःकारीं । कल्पित सर्प भासे रज्जूवरी । अज्ञानें वक्रतादि सादृश्य दोरी ।
सर्पचि मानी अज्ञानी ।। ६७ ।। तैसें ब्रह्मज्ञान नाहीं जयासी । चिज्जड-ग्रंथिरूप चिदाभास भ्रम तयासी । प्रकाश-

साद्दश्येंकरून अज्ञानसमयासी । होतो जीवाविषयींचा ॥ ६८ ॥ तो जीव सद्गुरुउपदेशेंकरून । होतो ब्रह्मस्वरूप अखंड अभिन्न। हेंचि वेदान्तरहस्य पूर्ण ।जीव ब्रह्मस्वरूप असेचि ॥ ६९ ॥ ऐशी जीवासी ब्रह्मसायुज्यता । एकचि श्रीगुरुस्वामिराज प्रदाता । ते एकेसमयीं सोलापुरीं असतां । वर्तली कथा ते परिसावी ॥ ७० ॥; योगाधीश्वर सोलापुरीं । स्थित होते सुभरावाचे देवमंदिरीं । सायंकाळीं तेथें नरनारी। दर्शनार्थ येती देवाच्या ॥ ७१ ॥ देवाच्या दक्षिण बाजूस । बैसले श्रीमत्परमहंस । स्वेच्छाचारें करिती विनोदहास । ब्रह्मानंदस्वरूप ते ॥ ७२ ॥ तेव्हां कित्येक म्हणती हे वेडे । काय बोलती वांकडें तिकडें । मुख फिरवूनि एकीकडे । खेळती खडे बालवत् ॥ ७३ ॥ त्यांत चिंतो सखाराम टोळ । दुरूनि देखती यतीचे खेळ । मनीं म्हणती यांना एकवेळ । विचारावें कीं काय ॥ ७४ ॥ तेजस्वी मनोहर दिव्य मूर्ति । अवलोकूनि मनीं घोटाळती । संन्यासी सेवडा जंगम जति । हे असती कवण्या पंथाचे ॥ ७५ ॥ स्मार्त भागवत कोणतें मत । गाणपत्य सौरि शैव शाक्त । मनीं चिंतिती टोळ चिंतोपंत । कोणते मठसांप्रदायी हे ॥ ७६ ॥ अथवा नानक दादु कबीर । इत्यादि अनेक वैष्णववीर । स्वामिनारायण रसेशपंथी हे नर । असती काय कळेना ॥ ७७ ॥ अथवा सत्पुरुष अवतारी। असती काय हे काषायवस्त्रधारी। बहु रत्नें या वसुंधरेवरी । टोळ अंतरीं बोलती ऐसें ॥ ७८ ॥ मग वदती सर्वज्ञ स्वामिराय। तुम्हांसी आहे ज्ञान काय । ‘नान्यःपंथा विद्यतेयनाय’ ।हा श्रुत्यभिप्राय समजा हो॥ ७९॥ ‘वेदान्त-विज्ञान-सुनिश्चितार्थ’। ब्रह्मात्मानुभव अभेद यथार्थ। वेदप्रतिपादित परमार्थ । हें सिद्धान्तरहस्य उमजा हो ॥ ८० ॥ ऐकूनि चिंतोपंत आणि लोकही । तत्काल अंतरीं भ्याले पाही । म्हणती अंतर्साक्षी लोकानुग्रही । अपरिग्रही महत्पुरुष हे ॥ ८१ ॥ हे यतिराज नसती वेडे । काशीचे कापडी अथवा मनकवडे । वेदार्थवचनोत्तर देती रोकडें । आमुचें कुडें फळे आम्हां ॥ ८२ ॥ त्या दिवसापासून चिंतोपंत । स्वामिचरणांचे

झाले भक्त । गृहस्थाश्रमीं सदाचाररत । होते मामलतदार जे ॥ ८३ ॥ मग अक्कलकोट संस्थानांत । कारभारी झाले चिंतोपंत । त्या कालीं मालोजीभूप प्रख्यात । राज्यपदारूढ होते ॥ ८४ ॥ एके कालीं चिंतोपंत स्वसदनीं । यतींद्रा पंक्तींत बैसविती भोजनीं । तेव्हां विकल्प उपजला पंत-मनीं । कीं सर्व जातीचें अन्न भक्षिती हे ॥ ८५ ॥ यांना एकीकडे दूर बसवावें । हें जाणिलें योगीश्वर दत्तदेवें । उठूनि गेले तंव पंत म्हणती यावें । गुरु वदती शुद्ध होऊनि मग येऊं ॥ ८६ ॥ अनेंक चमत्कार चिंतोपंतासी । तथा दाजीबाच्या आले प्रतीतीसी । शीलवान् सद्‌गृहस्थ प्रिय लोकांसी । निस्सीम स्वामिभक्त होते ॥ ८७ ॥; स्वामिराज असतां सोलापुरीं । श्रीसिद्धेश्वर शिवमंदिरीं । प्रथम प्रवेशले जनहितकारी । भक्तकैवारी परमपुरुष ॥ ८८ ॥ श्रीसिद्धेश्वर सरोवरांत । उदक नव्हतें यत्किंचित् । नेत्रस्पर्शनार्थही अप्राप्त । मग प्राशनार्थ कोठचें ॥ ८९ ॥ एक दोन क्रोशांवरूनि पाणी । लोक आणिती दीनवाणी । अत्यंत कष्टी होती मनीं । ईश करुणा भाकिती ॥ ९० ॥ महाकष्टें मिळे अल्प नीर । त्या कारणें प्यावया न पोटभर । तृप्ति न वाटे क्षणभर । झाले जर्जर सकलही ॥ ९१ ॥ उदकास्तव क्लेश अनिवार । म्हणूनि लोक प्रार्थिती चिंतातुर । मग कळवळूनि दयार्णव यतीश्वर । सहज चमत्कार दाविती ॥ ९२ ॥ लोक अंतरीं झाले हिंपुटी । देखूनि यतीश्वर दूर तडागतटीं । लघुशंका करिती एकघटि । प्रत्यक्ष दृष्टीं जन देखती ॥ ९३ ॥ नंतर द्वितीयदिनीं पर्जन्य । बहुत वर्षला जगन्मान्य । त्रास मिटला गेलें दैन्य । यतीश्वरकृपेनें ॥ ९४ ॥ उदकें भरले तडाग विपुल । अवघें जलमय शोभे विशाल । तेव्हांपासून सिद्धेश्वर तडागीं जल । अत्युष्णकालींही राहतसे ॥ ९५ ॥; त्या सोलापुरीं हिंदुस्थानी ब्राह्मण । होता एक सदाचारसंपन्न । राजसेवा करूनि उदरभरण । सात्त्विकपणें करितसे ॥ ९६ ॥ तयाचें मुकुंद ऐसें नामाभिधान । राजसेवानिष्ठ नीतिमान् । स्वामिराज असतील तेथें जाऊन । नित्य दर्शन घेतसे ॥ ९७ ॥ नित्य नेमें दर्शनासि जावें । श्रीगुरुसमर्थासि विनवावें । मजला संसारांतून

सोडवावें। करावें आपणासमान ॥ ९८ ॥ ऐशी वारंवार मुकुंदवाणी। शुभेच्छा मोक्षसुखदायिनी। पवित्रता द्विजान्तःकरणीं। ओळखिली यतिरायें ॥ ९९ ॥ मग आज्ञापिती करुणाकर । वासनारहित होऊनि सत्वर । सर्वसंगपरित्याग खरोखर। करितां शीघ्र सुखप्राप्ति ॥ १०० ॥ महत्पुरुषमुखें प्रबोधकारक। सत्यज्ञानानंत ब्रह्म अलौकिक । जीव ब्रह्मस्वरूप चिन्मात्रैक । ऐकिलें तारक मुकुंदें ॥ १ ॥ पूर्वसुकृत भाग्योदया आलें। तेणें सद्गुरुचरणदर्शन घडलें। सहजस्थिति ब्रह्मस्वरूप कळलें । गुरुलीलामृतसेवनें ॥ २ ॥ पूर्वजन्मींचा योगाभ्यासी । त्यांत साधनचतुष्टयसंपन्नता ज्यासी । ऐशा मोक्षाधिकारी मुकुंदासी । भेटले संन्यासी गुरुदेव ॥ ३ ॥ चतुर्विध पुरुषार्थांचा दाता। त्या सद्गुरुनाथाची कृपा होतां। आपणासारिखें करिती तत्त्वतां। क्षण न लागतां मुकुंदासी ॥ ४ ॥ जिकडे झळके गुरुकृपादृष्टि। तिकडे संपूर्ण ब्रह्ममय सृष्टि । जैशी वर्षतां मेघवृष्टि । सर्वत्र तुष्टि होतसे ॥ ५ ॥ ब्रह्मवेत्तेश्रीगुरुकृपांजनेंकरून । दिव्य समदृष्टि विश्वात्मस्थिति अनुभवून। पुढें उपाधि न लागावी म्हणून । दृढमौन धरिलें मुकुंदें ॥ ६ ॥ श्रीगुरुदेवदत्त-स्वामीदिगंबर । अक्कलकोटासि गेल्यानंतर । मुकुंदमौनीबुवा श्रीसिद्धेश्वर- । देवालयांत राहिले एकीकडे ॥ ७ ॥ कधीं न कोणापाशीं करितीं याचना । भाषण टाकूनि धरिलें नित्यमौना । ब्रह्मानंदस्वरूपाकार वृत्तीविना । निमिषार्ध न तिष्ठती ॥ ८ ॥ परीस स्पर्शतांचि लोहातें। लोह तत्काल सुवर्णत्व पावतें। या एकदेशी दृष्टांताहून परतें। गुरु साक्षात् स्वात्मत्वब्रह्म नटविती ॥ ९ ॥ श्रीसिद्धेश्वराचे कासारीं। मौनीबुवा नित्य स्नान करी । देखूनि संतापती अधिकारी । प्रतिकार करिती स्नानार्थ ॥ ११० ॥ सांगती बुवास समजून । तडागीं तुवां न करावें स्नान। केलें असतां तुजला शासन। होईल जाण निश्चयें ॥ ११ ॥ परी एकही दिवस मौनीबुवाचा । टळला नाहीं नियम तडागस्नानाचा । राजदूतांनीं मग ताडनाचा। उपाय करूनि त्रासविलें ॥ १२ ॥ परंतु तडागस्नान विधि । बुवांनीं सोडिलाचि नाहीं कधीं । मारणाराच

शरीरसंधी । कळा तिडकांनीं दुखावले ॥ १३ ॥ बुवावरी झाल्यानें गुरुप्रसाद । अंगीं उद्भवला नाहीं क्रोध विषाद ।
अक्रोधवैराग्य जितेंद्रिय अमद । शांतिदयायुक्त बुवा वसती ॥ १४ ॥ मग विघ्नसंतोषी दूत हर्षले । तिहीं बुवासि
खोलींत कोंडिलें । द्वारासी दृढ कुलूप लाविलें । मौनीवृत्त निवेदिलें वरिष्ठासी ॥ १५ ॥ दुसरे दिनीं प्रातःकालीं ।
चमत्कार पहावया जमली मंडळी । अधिकारीही खोलीजवळी । क्रोधें येऊनि बैसले ॥ १६ ॥ तों अकस्मात्
तडागोदकांत । बुचकळ्या मारिती मौनीमहंत । हें देखूनि लोक आश्चर्यचकित । म्हणती काय नवल हें ॥ १७ ॥
अतिशय छळिलें ताडिलें । कोंडिलें दुःशब्दीं धिक्कारिलें । परी सत्पुरुषचित्तीं न उपजले । क्रोधादिक विकार ॥ १८ ॥
विलोकूनि ऐसें महदाश्चर्य । लोक म्हणती धन्य सत्पुरुष आर्य । तेव्हांपासूनि मौनीसाधुवर्य । सर्वत्र मान्य जाहले
॥ १९ ॥ धन मान गृह सत्ताधिकार । शक्तियुक्तशरीर साहंकार । हें अवघेंचि अशाश्वत क्षणभंगुर । केवल
नीरबुदबुदवत् ॥ १२० ॥ हें नाशिवंत मिथ्या सर्व जाणती । परी प्राप्तकालीं कांहीं नोळखिती । संकटीं भयंकर दुःखें पोळती ।
तेव्हांचि येती शुद्धीवरी ॥ २१ ॥ त्यांत महंतकृपापात्र होती नर । तेचि तरती दुस्तरभवसागर । त्यासीच अनुकूल होय
जगदीश्वर । सर्वार्थसुखप्रद प्रसन्न सदा ॥ २२ ॥ असो ऐशीं देवसाधुसंतचरित्रें । भवतारक परमपवित्रें । नित्यश्रवणपठणमात्रें । दुरितनाशन होतसे ॥ २३ ॥ सोलापुरीं शेवटपर्यंत । मौनीबुवासिद्ध होते प्रख्यात । तात्पर्य गुरुकुलवास सर्व
हित- । दायक निश्चित असे हो ॥ २४ ॥ म्हणूनि गुरुसंग सर्वकाल । अवश्य व्हावा सुनिर्मल । जेणें तुटे भवपाशजाल । मोक्ष हातां येतसे ॥ २५ ॥ सोलापुरीं असतां स्वामिराय । दर्शना येतसे लोकसमुदाय । भिन्न भिन्न बुद्धीचे
अभिप्राय । म्हणती कारणिक पुरुष हे ॥ २६ ॥ मनांत जें जें चिंतिती लोक । त्यांचें सम्यक् उत्तर देती एक ।
स्वानुभवासि येतां प्रत्येक । वाखाणिती अद्वितीय समर्थांसी ॥ २७ ॥ तेथील जन स्वामिसमर्थांस । प्रार्थिती या ग्रामीं करा हो

निवास । बहु श्रेयस्कर आपण आम्हांस । त्रिविधतापहारक आहां कीं ॥ २८ ॥ आपणासारिखे महापुरुष । जगीं न दिसती
न भेटती विशेष । महद्दर्शनेंचि अतिसंतोष । समाधान पूर्ण वाटतसे ॥ २९ ॥ या मायामय प्रपंचांत कांहीं । देवगुरुसंतसेवा
घडत नाहीं । तेथें मग परमार्थाचें नांवही । घ्यावयास नलगे ॥ १३० ॥ या शुभमंगलसावधानकालीं । संसारव्यापमुक्त
करा चंद्रमौली । अघोरदोषनिधि माजला कलि । जिकडे तिकडे अधर्मरूप ॥ ३१ ॥ योगिराज देती प्रशस्त उत्तर ।
अक्कलकोटस्वस्थान प्रज्ञापुर । तेथें आम्ही जाऊनि सत्वर । राहूं स्वस्थ आनंदें ॥ ३२ ॥ त्या प्राणप्रज्ञापुरांत आमचें ।
वसतिस्थानज्ञानप्रद साचें । इंद्रियदेवता आप्तवर्ग जीवाचे । ऋणानुबंधी असती ते ॥ ३३ ॥ अव्ययात्मा सर्वाधिष्ठान ।
अवश्य केलें पाहिजे त्याचें संरक्षण । लोकदृष्टीनें करूं गमनागमन । ब्रह्मगंतव्यस्थान सकलांचें ॥ ३४ ॥ असतों तुमच्या
हृदयीं समीप । ओळखूनि टाका खेद विकल्प । सर्वही असां योगक्षेमरूप । अहमात्मस्वरूप जाणूनि ॥ ३५ ॥ ऐका
योगक्षेमार्थ अभंग । अप्राप्य जीवब्रह्माचा ऐक्यभावयोग । प्राप्त करून घेणें यथासांग । तो 'योग'शब्दार्थ उत्कृष्ट जाणिजे
॥ ३६ ॥ प्राप्त झालेला जीवब्रह्मैक्यभाव । त्याचें अचल संरक्षण करणें अवश्यमेव । तोचि जाणावा 'क्षेम'शब्दार्थ वास्तव ।
योगक्षेम याप्रकारें ॥ ३७ ॥ अन्नाच्छादनादिकेंकरूनी । प्रपंचनिर्वाह करिजे अनुदिनीं । तोही योगक्षेम-शब्दार्थ घेती
जनीं । ऐसे शब्दार्थ अनेक ॥ ३८ ॥ आमचें अनन्यभावें चिंतन । आणि जे करिती भक्त सेवन । त्या
प्रियभक्तांचा प्रतिज्ञेंकरून । योगक्षेम वाहतों सर्वदा ॥ ३९ ॥ गृहस्थाश्रमी निष्काम सद्धर्मरत । असावें सर्वभूतांचें हित
साधित । ऐसें बोधूनि स्वामीगुरुदेवत्त । 'अलख' म्हणून निघाले ॥ १४० ॥ जन करिती साष्टांग नमन । वारंवार सद्यश
करिती वर्णन । स्वामीमहाराजांचा जयजयकार गर्जून । गेले आपापल्या गृहीं ॥ ४१ ॥ मनोवेगवत् योगीश्वर तत्काल ।
अक्कलकोटीं बुधवार-पेठेजवळ । खंडेराय देवालयाच्या ओट्यावर दयाळ । येऊनि बैसले प्रथम ॥ ४२ ॥

गोरक्षकासि पुसती तेव्हां स्वामी । आम्हीं यावें कां तुमचे ग्रामीं । गोरक्षक म्हणती आपुले आगमीं । आम्ही
असों आतुर ॥ ४३ ॥ कित्येक वदती बुवाजी । चला आमच्या गृहीं आजी । देऊं प्रेमें भाकरभाजी ।
पावन आम्हां करावें ॥ ४४ ॥ पाषाण निःशंक उशासी घेऊनी । योगिराज निद्रिस्त तया स्थानीं । क्रमिली स्वेच्छें
सारी रजनी । समजलें शुभवृत्त लोकांसी ॥ ४५ ॥ दुसरे दिवशीं झाला प्रातःकाल । अश्विनशुक्लषष्ठी दिन मंगल ।
पांडुरंग पुराणिक चिंतोपंत टोळ । इतर मंडळ पातलें ॥ ४६ ॥ कारभारी टोळ चिंतोपंत । सांगती ऐका हो समस्त ।
हे यतिराज परमेश्वरावतार साक्षात् । सत्यानुभव आम्हां आला ॥ ४७ ॥ अंतर्साक्षी निर्विकारी अवधूत । अक्कलकोटीं
आगमना प्रार्थिलें बहुत । जगदुद्धरणार्थ पातले धीपुरांत । लीलाविग्रही महद्भाग्यें ॥ ४८ ॥ मग पुराणिक करिती
पाचारण । कीं गृहासि लागावे श्रीभगवच्चरण । मनोमय जाणूनि स्वेच्छें नारायण । पातले पुराणिकसदनीं ॥ ४९ ॥
पांडुरंग पुराणिकाची जाया । निराबाईनें नमिलें यतिपायां । बाबा सबनीस कर जोडूनियां । सद्गुरुराया वंदिती ॥ १५० ॥
वदती पूर्वीं माणिकनगरीं हें सद्दर्शन । होऊनि धीपुरीं येण्याचें दिधलें वचन । तें आजी फलद्रूप झालें शुभलग्नीं संपन्न ।
प्रकाशले नारायण आद्यगुरु ॥ ५१ ॥ मग सारूनि स्नान भोजन विधि । निद्रिस्त झाले करुणानिधि । बोलतां चालतां
झाली सायंसंधि । फलाहारासि लाडू करविले ॥ ५२ ॥ यतिवर्य उठूनि सिंहासनीं बैसले । लोक येऊन पाहूं लागले ।
भाविक अभाविक स्तब्धता पावले । दिव्य परमहंसमूर्ति पाहुनी ॥ ५३ ॥ दर्शनार्थ टोळआदिक बैसले येऊन । तेव्हां
पुराणिक प्रार्थिती यतिवर्यालागून । फलाहारासि उठावें कृपा करून । घ्यावे ग्रास दोन यथेप्सित ॥ ५४ ॥ न कळे जयाची
अघटित करणी । ते बैसले पात्रावरी येउनी । निराबाई लवण कोशिंबिरी चटणी । लाडू पात्रीं वाढितसे ॥ ५५ ॥ तेव्हां
यति वदती आम्हां दुर्लभ अन्न । म्हणूनि लाडू ठेविलेस कपटें चोरून । त्यांतही अर्धा चुलीसमीप ठेवून । अर्धाचि वाढिसी

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

आम्हांसी ॥ ५६ ॥ सर्वांसमक्ष ऐकूनि निरा लाजली । अधोवदन होऊनि त्याकालीं । म्हणे अंतर्साक्षी हे चंद्रमौली ।
अपराध पोटीं घालावे ॥ ५७ ॥ जाणिला सहज अंतर्गताशय । पुराणिकादि सर्वांस वाटलें आश्चर्य । हे सर्वज्ञ अखंड
ज्ञानसूर्य । भक्तकामकल्पद्रुम विराजती ॥ ५८ ॥ असो प्रातःकालीं दुसरे दिवशीं । चिंतोपंत आणि भाऊ राजजोशी ।
आग्रह करिती यतीश्वरासी । यावें गृहासी म्हणून ॥ ५९ ॥ तेव्हां राजजोशीबुवाचे गृहीं । गेले यतींद्र लवलाही ।
तेथें स्नान भोजनादिक सर्वही । झालें आनंदविजयप्रद ॥ १६० ॥ चतुर्थ प्रहरीं स्वच्छंद व्यवहारी । गेले
नृपाच्या गणपतिमंदिरीं । लोकही पश्चात् गेले सत्वरीं । कौतुकावलोकनार्थ ॥ ६१ ॥ नृपवर्यासि यतिवृत्त कळलें ।
नंतर मालोजीभूप आणि दाजी भोसले । श्रीगणपतीच्या देवालयीं पातले । अर्पिलें श्रीफल पुष्प मालादि ॥ ६२ ॥ मग
यतिवर्यें श्रीफलप्रसाद । नृपतीस दिधला संपूर्ण सुखद । स्वकरें पुष्पहार सविनोद । दाजीबाचे गळ्यांत घातला ॥ ६३ ॥
काषायवस्त्राचा करूनि बोळा । मालोजी नृपाचे अंगावर फेंकिला । प्रथम प्रवेशीं अवतारलीला । सुचवूनि गेले दिगंबर
॥ ६४ ॥ नगरवेशीचे जवळ ओढ्यावर । जाऊनि बैसले अवधूत दिगंबर । तेथें नेऊनि दिलें कौपीन वस्त्र । स्वामी
समर्थ सद्गुरूतें ॥ ६५ ॥ अहमदअल्ली रिसालदार त्वरित । तेथें आला रामचंद्र रंगारीसहित । अग्नि न घालितां
चिलमींत । गुडगुडी दिधली यतिहस्तीं ॥ ६६ ॥ जाणूनि छलक यवनाचें कपट । कौतुक दाविती गुरु श्रेष्ठ । ओढितां
न फुंकितां घेत अग्नि पेट । पाहती नेत्रीं जन सर्व ॥ ६७ ॥ यवन अंतरीं होऊनि विस्मित । समर्थांसि घाली दंडवत् ।
म्हणे आपण सिद्धपुरुष खचित । अन्याय क्षमा करावा ॥ ६८ ॥ यतींद्रासि रामा रंगारी पुसे । येथें आपलें गणगोत
कोण असे । समर्थ वदती येथें पेठेंत वसतसे । आप्त आमुचा द्विज एक ॥ ६९ ॥ रामचंद्र जाऊनि त्वरित । आणी
द्विजासि धरूनि हस्त । देखूनि वदती स्वामिराज अवधूत । कां रे मजला नोळखिसी ॥ १७० ॥ चोला तूं सुखरूप आहेस

काय । कां रे भुललासि मायबाप आचार्य । तूं रामचंद्र सराफ द्विजतनय । पूर्वभक्त प्रिय आमचा ॥ ७१ ॥ अक्षय वटवृक्षींचा
विहार । विसरलासि मूळपुरुष दत्त नगर । ऐकोनि उमजला चोळा पूर्व समाचार । साष्टांग नमस्कार करितसे
॥ ७२ ॥ जाणूनि समर्थ उपवासी । नेऊनि चोळ्यानें स्वसदनासी । भक्तिपूर्वक घातलें भोजनासी । देवभक्त आनंदले
॥ ७३ ॥ पुढिले अध्यायीं प्रश्न प्रवेश । साद्यंत समाधान करूं विशेष । श्रोतीं परिसावें अविनाश । गुरुलीलामृत आदरें
॥ ७४ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । एकोनविंशाध्याय गोड हा
॥ १७५ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे एकोनविंशोऽध्यायः समाप्तः ॥ १९ ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥

# ॥ अध्याय विसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीसद्गुरुदत्तात्रेयस्वामिने नमः ॥ ॥ शिष्य सविनय गुरूसि पुसे । प्रज्ञापुरीं गुरुदत्तात्रेयस्वामी वसे । त्यायोगें तें अक्कलकोट अधिक सरसें । उदेलें क्षेत्र सर्वांपरिस ॥ १ ॥ अक्कलकोटचे सभोंवतीं । तीर्थ क्षेत्रादिक कांहीं असतीं । पुण्यरूप भूमि मध्यवर्ती । कैसी काय सांगा जी ॥ २ ॥ टाकूनि तीर्थक्षेत्रें विख्यात । श्रीमत्परमहंस स्वामिराज अवधूत । महत्प्रीतियुक्त अक्कलकोटांत । कां राहिले सांगा जी ॥ ३ ॥ कर्नाटकदेश फार कठिण । सांप्रदायमत विचित्र अहंपण । दया-क्षमा-परोपकार-विहीन । लोक बोलती याप्रकारें ॥ ४ ॥ सोडूनि संस्थानादि राजधानी । चतुर्विध पुरुषार्थदाते समाधानी । जनांसी धर्ममार्गानुसंधानीं । बसले काय लावावया ॥ ५ ॥ परिसूनि शिष्याची नत विनंति । प्रेम-भक्तीच्या उल्हासें गुरु म्हणती । धन्य धन्य गुरुभक्ता ज्ञानी जगतीं । लोकहितार्थ असती तव प्रश्न ॥ ६ ॥ मोक्षाधिकारी कुलोद्धारक । वेदविहितधर्म नित्य संप्रवर्तक । भगवद्यश प्रिय संचारक । हितकारक जगासि ॥ ७ ॥ एक शिष्या बापा कुलदीपक । सांडूनि काम राग द्वेष शोक । प्रचंड जड दृश्य असत्य मायिक । वर्जूनि परमार्थिक झालासि ॥ ८ ॥ अक्कलकोट धन्य पुण्यभूमि । जेथें वसले श्रीगुरुसमर्थस्वामी । पूर्णब्रह्मव्यापक सर्वांतर्यामी । स्मरणगामी जगदीश ॥ ९ ॥ ज्याचा ब्रह्मादिदेवांसि न लागे अंत । म्हणूनि महेश्वर बोलिजे अनंत । ऋषि योगी मुनि भजती साधुसंत । तद्गुणवृत्तांत परिसावा ॥ १० ॥ भवसंसारतारक ज्याचें चरित्र । वेदवेदार्थमथित परमपवित्र । श्रवणें पठणें इहपरत्र । अवश्य निश्चयें प्राप्त होय ॥ ११ ॥ अवतारिक पुरुष जेथें वसती । तेंचि तीर्थ क्षेत्र जाणावें निश्चितीं । महात्मा सत्पुरुष साधुसंत

नांदती । तें स्थान क्षेत्र समजावें ॥ १२ ॥ तैसे हरिहर जगदंबा गजानन । नारसिंह श्रीराम श्रीकृष्ण भगवान् । जेथें जेथें इत्यादिक देवतामूर्तिस्थापन । झालेलीं स्थानें विशेष ॥ १३ ॥ तींच तीर्थें क्षेत्रें असतीं प्राधान्य । तेथेंच सर्व शरण होती अनन्य । अथवा स्वयंभु देवस्थानें जगमान्य । दर्शनें धन्यता येतसे ॥ १४ ॥ जैसें नृपति मुख्यत्वें वसे ज्या स्थानीं । तेंचि नगर विराजे 'राजधानी' । नृप आरूढ होई ज्या राजसिंहासनीं । तयासी सर्वत्र वंदिती ॥ १५ ॥ किंवा सद्धर्म सन्मार्गप्रवर्तक । सद्गुरुचीं स्थानें असतीं जीं सम्यक् । तींच तीर्थें क्षेत्रें प्रसिद्ध अलौकिक । सुखदायक सकलांसी ॥ १६ ॥ वेदाध्ययनपूर्वक वेदार्थसंपन्न । त्याहीवरी ब्रह्मविद्या अपरोक्षज्ञान । जीवब्रह्मैक्य स्वानुभवेंकरून । सहजस्थिति भोगिली ज्यानें ॥ १७ ॥ त्या श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठाचें दर्शन । सर्वत्रासी प्रिय पूज्य असें स्थान । जें नित्यश्री-नित्य-मंगलप्रद अर्चन । नित्योत्साह होत ज्या स्थानीं ॥ १८ ॥ देवादिकांचीं मंदिरें श्रेष्ठ । महात्मा सत्पुरुषांचे मठ । समाधीचें स्थान असे वरिष्ठ । तीर्थक्षेत्र तेंचि जाणावें ॥ १९ ॥ जेथें उत्तम पुरुषांचा होय निवास । तेंचि तीर्थक्षेत्र स्थान सरस वास । तेथेंचि परमात्मा जगन्निवास । भेटे सर्वांस सुखकर ॥ २० ॥ जैशा अयोध्या मथुरा माया द्वारका । काशी कांची अवंतिका । ह्या सप्तपुरी असती मोक्षदायिका । गंगादि नद्या तीर्थक्षेत्र ॥ २१ ॥ तैसेंच हें अक्कलकोट राजधानी ग्राम । येथें मूळ पुरुष सातारचे प्रथम । फत्तेसिंह भोंसले उपनाम । नृपते परमधार्मिक होते ॥ २२ ॥ दुसरे दत्तक शहाजी भोंसले । त्यांनींही सुखें राज्यपद भोगिलें । शहाजीचे पुत्र राज्यासनीं बैसले । फत्तेसिंह महाराज तिसरे ते ॥ २३ ॥ फत्तेसिंहाचे मालोजीमहाराज । बाबासाहेब चौथे भूपति सतेज । त्यांचे आपासाहेब शहाजीराज । प्रजाहितकारी पांचवे ॥ २४ ॥ त्यांनीं द्वाविंशति संवत्सर । राज्य केलें 'सकलांसी सुखकर । त्यांचे बंधु आबासाहेब चतुर । होते प्रज्ञापुरासी ॥ २५ ॥ शहाजीचे पुत्र मालोजीराजे । विद्याकलादि गुणनिपुण जे । शौर्य औदार्य कीर्ति गाजे । राज्यपदारूढ झाले ते ॥ २६ ॥ शके सत्राशें एकूणपैंशींत भोंसले ।

* * *

शहाजीराजे कैलासवासी झाले । मग राज्यपदारूढ होऊन साजले । मालोजीमहाराज भूपति ॥ २७ ॥ त्याकालीं स्वामीदत्तदिगंबर । सोलापुरासी होते दयासागर । चिंतो सखाराम टोळ द्विजवर । तेथें वसतसे सद्गृहस्थ ॥ २८ ॥ श्रीस्वामिरायांच्या दर्शनासी । दत्तमंदिरीं लोक येती भावेंसीं । ‘पूर्णावतारिक’ स्वामी समर्थांसी । प्रतीतीनें म्हणती जन ॥ २९ ॥ अक्कलकोटसंस्थानचे कारभारी । चिंतोपंत टोळ सज्जन सुविचारी । त्यांनीं समर्थांसी प्रार्थिले अंतरीं । कीं अक्कलकोटास चलावें ॥ ३० ॥ अंतर्साक्षी पुरुषोत्तम यतीश्वर । अंतरींचा हेतु जाणूनि प्रशस्त प्रत्युत्तर । अर्पिती तेव्हां सकल नारीनर । ईश्वर म्हणूनि वंदिती ॥ ३१ ॥ पाऊस पडण्याच्या पूर्वदिवशीं । लाह्या भाजल्यावरी अक्कलकोटासी । येऊं ऐसें सांगती टोळासी । योगाधीश्वर यतींद्र ते ॥ ३२ ॥ शालिवाहन शके सत्राशेंएकूणऐंशीं । पिंगलनामवत्सरीं आश्विनमासीं । बुधवासरीं शुक्लपंचमी दिवशीं । अक्कलकोटासी पातले ॥ ३३ ॥ याविषयींचा सर्व इतिहास । पृथगध्यायीं वर्णिला सुरस । श्रोतीं सावध होऊनि निरालस । शुद्धचित्तीं परिसावा ॥ ३४ ॥ संवत एकूणविंशतिशत । अधिकचतुर्दश संवत्सरांत । फसलीसन बाराशें सदुसष्टांत । अठराशें सत्तावन्न इसवीसन ॥ ३५ ॥ पूर्वींचें स्वामिरायाचें गणगोत । सखे केवल सर्व आप्त । त्या सर्वत्रांचें संरक्षण यथास्थित । लोकहित व्हावें म्हणूनि ॥ ३६ ॥ कराया यथार्थ जगदुद्धार । प्रत्यक्ष अवतार दत्तदिगंबर । यतिरूपें अवनीवर । स्वेच्छाचारें संचरती ॥ ३७ ॥ अनेक तीर्थक्षेत्रीं जाऊन । करुणार्णव करिती जनांसि पावन । अक्कलकोटीं स्वेच्छेंकरून । वसले येऊनि प्रभुराय ॥ ३८ ॥ सहस्रावधि लोक येती धांवून । नित्य जयजयकार समाराधन । मंगलारति उत्साह पुराण कीर्तन । भूजनपूजन होतसे ॥ ३९ ॥ गांवीं परगांवीं भव्यअरण्यांत । अथवा सदनीं मोठ्या मैदानांत । टेकडीवरी नदीतीरीं कंटकांत । किंवा देवळांत बैसती ॥ ४० ॥ सर्वजातींच्या गृहीं ओट्यावरी । स्थित होती योगीश्वर स्वेच्छाचारी । ज्या ज्या स्थलीं दत्तात्रेय गिरिनारी । श्रीगुरुस्वामी विराजती ॥ ४१ ॥ त्या त्या स्थळीं नित्य लोकांची दाटी ।

या अवतारिक पुरुषांच्याच गोष्टी । कित्येक करविती चरणभेटी । पोटासाठीं उघडपणें ॥ ४२ ॥ श्रीगुरुस्वामी समर्थांच्या नांवावर । स्थापूनि मठ संस्थान मंदिर । पुष्कळ लोक आपला संसार । निर्वेधपणें चालविती ॥ ४३ ॥ सकामजन संसारी प्रापंचिक । किंवा निष्कामी वीतरागी पारमार्थिक । त्या सर्वांचा योगक्षेम सम्यक् । समर्थ सर्वदा वाहती ॥ ४४ ॥ सद्भक्त अथवा दुर्जन खोटे । आंधळे पांगळे रोगी दुर्बळ थोटे । समर्थांच्या नांवावरी भरिती पोटें । धष्टपुष्टादि निरुद्योगी ॥ ४५ ॥ असो समर्थांची अखंडकीर्ति । विस्तारली मंगल शुभदा जगतीं । मालोजी नृपतीची विशेष जडली भक्ती । परिवारासह प्रभुपदीं ॥ ४६ ॥ नानाप्रकारचे पदार्थ फलादिक । वस्त्रें भूषणें उत्तम अमोलिक । पक्वान्नादि सुगंधी गंगोदक । समर्पिती लोक योगीश्वरातें ॥ ४७ ॥ अनेक मानता नवस सायास । फिटती वाटिती जन प्रसादास । थोडें बहुत प्राप्त होय सर्वत्रांस । तेणें समाधानास पावती ॥ ४८ ॥ भगवान् श्रीपरमात्मा त्रैमूर्ति । बालार्कवद्दिव्य मनोहर ज्याची कांति । पाहतांच वाटे समाधान शांति । चित्त शुद्ध होतसे ॥ ४९ ॥ श्रीमंत नृपति आदि प्रधान । शौर्यऔदार्यादि गुणसंपन्न । आणि सत्ताधिकारी सधन । विद्वज्जन सज्जनादि ॥ ५० ॥ पंडित श्रोत्रिय वेदवेदांगपारग । कर्मी उपासक तीव्र विराग । याज्ञिक जपी तपी अनुष्ठानी योगांग । सुस्थिर अथवा दुस्थिर ॥ ५१ ॥ ब्रह्मचारी वनस्थ गृहस्थ संन्यासी । पुराणिक हरिदास उदासी । संत महंत आचार्य तीर्थवासी । गीतवाद्यांत निपुण जे ॥ ५२ ॥ नानामत नानासांप्रदायी पंथी । आणि स्वार्थी परमार्थी । कुटिल संभावित भावार्थी । अनेक देशांचे असंख्य जन ॥ ५३ ॥ दैदीप्यमान् चिन्मूर्ति सुंदर । सर्वांतर्यामी स्वामी मनोहर । तें अद्वितीय स्वरूप निरंतर । पहावेंचि वाटे सर्वांसी ॥ ५४ ॥ असंख्यात जन येउनी । तटस्थ होती भगवन्मूर्ति पाहुनी । येथेंच सदा वसावें सुदर्शनीं । न जावें सोडुनी ऐसें म्हणती ॥ ५५ ॥ सगळे थाट डौल हट्ट टाकून । स्वामिराजपदीं होती लीन । निज कार्याचें मनीं करिती चिंतन । आशीर्वचन प्राप्त्यर्थ ॥ ५६ ॥ श्रीस्वामि-

समर्थांच्या समोर । कोणी न उच्चारिती शब्दाक्षर । अंतर्साक्षित्वाचे तडाखे लागती फार । तेणें थरथर कांपती
॥ ५७ ॥ समर्थांचें बोधरूप वचन गाढें । गंभीर मधुर प्राणीमात्रांसि आवडे । ज्यांत पापपुण्य कर्मांचे उलगडे।
होती रोकडे साक्षात् ॥ ५८ ॥ अगम्य लीला चमत्कार । जाणूनि आल्हादती नारी नर । अक्कलकोट गुरुक्षेत्र
माहेर । सर्वांसी विश्रांति स्थळ उदेलें ॥ ५९ ॥ भूपति भोंसल्यांचें उत्तम कुल । त्याहीवरी शूर उदार धर्मशील।
अक्कलकोटचे अहोभाग्य निर्मल । पूर्णब्रह्म केवल प्रगटलें ॥ ६० ॥ अक्कलकोट पंचक्रोशांत । प्रत्यक्ष पूर्णब्रह्म सनातन संचरत।
लीलाविग्रही श्रीभगवंत । यति वेषधारी नांदतसे ॥ ६१ ॥ 'अक्कलकोट' शब्दाचा अर्थ आतां । परिसा श्रोते सज्जन तत्त्वतां ।
यथामति शब्दाची सार्थकता । बोलूं सर्वांसि कळावया ॥ ६२ ॥ 'अक्कल' शब्दार्थ करा श्रवण । बुद्धि मति प्रज्ञा उपदेश
इच्छा ज्ञान । मर्यादा सत्कार संमति विचार स्मरण । अभिप्राय अंतःकरणादिक ॥ ६३ ॥ मनीषा प्रेक्षा धी धिषणा ।
चित् संवित् प्रतिपत् ज्ञप्ति चेतना । उपलब्धि इंद्रियानें समजणें जाणा । अनेकार्थ अक्कलेचे ॥ ६४ ॥ आतां 'कोट' शब्दार्थ
ऐका ते । ज्याच्या सभोंवतीं तटबंदी केली असते । सर्व बाजूंनीं संरक्षणार्थ वेष्टिलें असतें । द्वारें ठेवूनि लहान मोठीं
॥ ६५ ॥ कोश गड दुर्ग किल्ला आवरण । प्राकार आणि कुंपण । मृत्काष्ठ दगड कंटकादिकेंकरून । असलेलें संरक्षण
ग्रामादिकांसी ॥ ६६ ॥ एवं अंतःकरण बुद्धि अहंकार मन चित्त । त्यांत बुद्धि निश्चयिका वसत । अन्नमय प्राणमय मनोमय
असत । विज्ञानमय आनंदमय कोश ॥ ६७ ॥ या बुद्धिकोशादिकांचा साक्षी स्वामी । सच्चिदानंदस्वरूपात्मा अंतर्यामी।
चैतन्यरूपें असूनि इंद्रियग्रामीं । आहे तद्व्यतिरिक्त समर्थ हा ॥ ६८ ॥ प्रतिबिंबलासे अंतःकरण-बुद्धींत । वाटे तथापि
भिन्नचि सतत । शरीरेंद्रियादि सर्वांसि प्रकाशित । जड दृश्य परिछिन्न वस्तूंसी ॥ ६९ ॥ ऐशा विज्ञानरूप अक्कलकोटांत ।
स्वामीसमर्थ गुरुदेवदत्त । निरुपाधिक नांदे सर्व विकाररहित । निर्विकल्प अखंड स्वसत्तें ॥ ७० ॥ आतां परिसा

‘अः’ अक्षरार्थ वास्तव । अः म्हणजे महादेव वायु वासुदेव । इत्यादि अः-अक्षरार्थें गौरव । मुख्य परमेश्वर होतसे ॥ ७१ ॥;
‘क’कार अक्षरार्थ परिसा अनेक । ‘कायांते कम्यते कचति वाकः’ । शब्द करी इच्छी जो तो सम्यक् । अथवा दीप्तिमान्
हाही अर्थ ॥ ७२ ॥ ‘कै’ धातु शब्द ‘कसु’ म्हणजे कांति । आणि ‘कच’ धातु म्हणजे बंधन दीप्ति । ‘क’ अक्षराचे बहुत अर्थ
असती । ते श्रवण करा श्रोते हो ॥ ७३ ॥ आत्मा वायु सूर्य ब्रह्मदेव । अग्नि यम मदन वासुदेव । राजा मयूरपक्षी
अंतःकरण जीव । शरीर वेळ द्रव्य नाद ध्वनि ॥ ७४ ॥ दंभ गांठा प्रकाश कल्याण । कुशलपुरुष सुख ब्राह्मण ।
मस्तक उदक केश सुवर्ण । पानीय पदार्थ पिण्याचे ॥ ७५ ॥; आतां ‘ल’कार अक्षरार्थ करा श्रवण । देवराज इंद्र आणि
कर्मन् । दान आलिंगन अंगीकार अर्थ ग्रहण । आणि ‘द्रविण’ म्हणजे पातळ करणें ॥ ७६ ॥ जैसें मूळ ‘चित्’ शब्द
असून । पावलें जडत्व विषयध्यानेंकरून । म्हणजे ‘चित्त’ विषयें जड मूढ होऊन । विसरलें चिद्रूप आपलें ॥ ७७ ॥ जैसें
जपापुष्प समीप ठेवतां । शुद्ध मण्यासी येते आरक्तता । आणि तें वेगळें करितां । शुद्धमणिस्वरूप स्वच्छ दिसे ॥ ७८ ॥
तैसा ‘अक्कल’ या त्रय अक्षरांचा अर्थ प्रमुख । शुद्ध परमात्मा अखंडरूप व्यापक । परी पुष्पवत् मायोपाधिक । झाला
ब्रह्मात्मस्वरूप विसरूनि ॥ ७९ ॥ अक्कल म्हणजे बुद्धिज्ञानासी । मोहें जडत्व आलें क-कारासी । तें नासूनि सर्वांसी ।
द्यावया इहपरसुख ॥ ८० ॥ श्रीगुरुदेवदत्त समर्थस्वामी । सत्तास्फूर्तित्वें वसती अंतर्यामीं । तेचि अखिल विश्वाचे कल्याणकामीं ।
धी-पुरांत प्रकटले ॥ ८१ ॥ अंतर्बाह्य परिपूर्ण व्यापक । निर्गुण अथवा सगुणरूपें अलौकिक । व्यवहार आणि
परमार्थ-प्रकाशक । अक्कलकोटांत प्रकटले ॥ ८२ ॥ व्यवहार-परमार्थ-मार्गें पाहतां । अक्कलकोटासि आणिली सार्थकता ।
तो अनंतब्रह्मांडांचा जनिता । वसला जगद्धितार्थ प्रज्ञापुरीं ॥ ८३ ॥; त्या अक्कलकोट क्षेत्राच्या सभोंवतीं । असलेलीं तीर्थ
क्षेत्रें वर्णूं यथामति । शिष्य-प्रश्नाची यथार्थ निराकृति । होतसे सहज गुरुमुखें ॥ ८४ ॥ अक्कलकोटापासून एक कोशावर ।

* * *

बोर्याळ गांवाजवळ एक डोंगर । त्या डोंगरांतून नदी नामें बोरीभद्र । उत्पन्न झालेली पूर्वकालीं ॥ ८५ ॥ त्या बोरीनदीचा
प्रवाह थोर । विराजमान् दिसती दोन्ही तीर । त्या बोरीभद्र तीर्थांत निरंतर । सर्वत्र करिती स्नानपान ॥ ८६ ॥ अक्कलकोटाहून
चार कोशांवर । लहानसें जेऊर नामक ग्राम सुंदर । तेथें कोटिबाणलिंग काशीविश्वेश्वर । भागीरथीसह शोभतसे
॥ ८७ ॥ देवाचे पूर्वेस एक उत्तम विहीर । त्यांतून शुभकालीं जगद्धितकर । उदकानें भरलेली घागर । येतसे वर आपोआप
॥ ८८ ॥ खोल आहे ऐसें सांगती लोक । अत्युष्णकालींही असतें उदक । हें कोटिलिंगस्थान संताप शोक- । नाशक
असे निश्चित ॥ ८९ ॥ अक्कलकोटाहून उत्तरेस चार कोश दूर । ग्राम आहे लहान बऱ्हाणपुर । तेथें अनंत चैतन्य साधूचें
सुंदर । आहे स्थान रमणीय ॥ ९० ॥ तेथें हिंदु आणि यवन । सगळे करिती भावें पूजन । प्रतिवर्षीं वैशाख ज्येष्ठांत
येती जन । यात्रा भरते पुष्कळ ॥ ९१ ॥ कित्येक नृपांचे राज्यांतून । आहे या स्थानासि उत्पन्न । स्वामीसमर्थ या
स्थानीं आपण । जात होते कधीं कधीं ॥ ९२ ॥ अक्कलकोटाहून दोन योजनें दूर । वैष्णवांचें प्रसिद्धग्राम खेडमणुर ।
तेथें भीमानदी वाहे सुंदर । भीमातीर पुण्यभूमि ॥ ९३ ॥ सीना आणि भीमानदीचा संगम । त्या खेडाजवळ झालासे
मनोरम । भीमा आणि पयोनदीचा संगम । हद्र्याहून पुढें झाला आहे ॥ ९४ ॥ पंढरपुर निरानरसिंहपुर । धाकटें मोठें
खेड आणि मणुर । भीमा वाहतसे सुंदर सर्वत्र । तथापि विशेष या चारी स्थानीं ॥ ९५ ॥ दक्षिणोत्तरवाहिनी भीमा
गंगा । पंढरपुरासी म्हणती चंद्रभागा । स्नानें पानें दुरित दुःखरोगां । उरली न जागा कोठेंही ॥ ९६ ॥ कृष्णासंगमीं आणि
शूर्पाल क्षेत्रीं । प्रसिद्ध स्थान श्रीव्यंकटेशगिरि । भगवती कृष्णा कुरुक्षेत्रीं । सर्वत्र असूनि विशेष चतुःस्थलीं ॥ ९७ ॥
धीपुराहून चार योजनांवर । प्रख्यात क्षेत्र असे तुळजापुर । श्रीतुळजाभवानी तेथें निरंतर । जगत्पालनार्थ तिष्ठतसे ॥ ९८ ॥
अष्टभुजा दिव्य सुंदर मूर्ति । महिषासुरमथिनी देवी चिच्छक्ति । त्रैलोक्यपूजित सर्वत्र यश गाती । शरण जाती

जगन्मातेस ॥ ९९ ॥ अक्कलकोटापासून योजनें तीन । निंबर्गी नामक मारुतीचें स्थान । जयासी ‘देवनिंबर्गी’ म्हणती जन । जागृतस्थान अद्भुत ॥ १०० ॥ सर्वांचे पूर्ण होती मनोरथ । नवस मानता फिटती शपथ । महारुद्रावतार मुख्य वानरयूथ । सर्वार्थप्रद नांदतसे ॥ १ ॥ अक्कलकोटापासून योजनें तीन । गाणगापुर प्रख्यात क्षेत्रस्थान । जेथें भीमा–अमरजेचा संगम असून । पूर्वीं यज्ञ झालेले ॥ २ ॥ जगत्कार्यधुरंधर नित्य प्रौढप्रताप । भक्तिज्ञान-वैराग्य-सौभाग्यप्रदीप । नृसिंहस्वामी-दत्तात्रेय-गुरुस्वरूप । त्रिविधताप नाशक जे ॥ ३ ॥ महारोग कुष्टादि व्याधिग्रस्त । आणि स्वस्वकार्यार्थी लोक समस्त । श्रीगुरुदेवदत्तचरण प्रशस्त । सेविती शरण होऊनी ॥ ४ ॥ प्रसिद्ध क्षेत्र नृसिंहवाडी । पांचाळ नगर औदुंबर भिल्लवडी । मातापुर करवीर कुरगड्डी । गिरनार पर्वतादिक मुख्यस्थानें ॥ ५ ॥ सह्याद्रि पर्वतादिकीं निवास । मेरु-शिखरीं बैसूनि बोधिती जनांस । पुनीत करिती नद्यादि भागीरथीस । जगन्निवास जगद्गुरु ॥ ६ ॥ अक्कलकोटाहूनि वीस कोश । कलबुर्गें नामक ग्रामीं वास । केशवचैतन्य साधूंचें खास । स्थान सर्वांस प्रिय असे ॥ ७ ॥ येथें हिंदु आणि यवनादि सगळे । पूजा करिती शुद्ध भाव-बळें । या स्थानासि आहे उत्पन्न चांगलें । सुंदर स्थान मनोहर ॥ ८ ॥ अष्टयोजनें अक्कलकोटाहून । पंढरपुर विठ्ठल क्षेत्र महान् । रुक्मिणीपांडुरंगाचें आवडतें स्थान । सोडूनि दिंडिरवनादिक ॥ ९ ॥ जेथें अनेक साधु भक्त संतजन । करिती पांडुरंगाचें कीर्तन भजन । अगणित लोक वारकरी येऊन । विठ्ठलदर्शनें समाधान पावती ॥ ११० ॥ अक्कलकोटाहून दश योजनांवर । जुनी यवन राजधानी विजापुर । त्या विजापुराहूनि पुढें कृष्णातीर । सुंदर मनोहर विराजे ॥ ११ ॥ तिकडे बदामी नामक असे नगर । तत्सन्निध चौळदगुडग्राम सुंदर । त्याजवळ एक डोंगर । शोभायमान् दिसतसे ॥ १२ ॥ त्या डोंगरांत देवी विख्यात बनशंकरी । वसतसे जगन्माता त्रिपुरसुंदरी । त्या बनशंकरीच्या दर्शनास नरनारी । सहस्रावधि

जातीं हो ॥ १३ ॥ अपूर्व जागृत जगदंबेचें स्थान । तेथें प्रतिवर्षीं पौष शुक्ल प्रतिपदेपासून । यात्रेसि येती बहुत जन । रथोत्साह होतसे ॥ १४ ॥ रथोत्साह पौष शुक्ल पौर्णिमेला । होतसे मग पातळ यात्रामेळा । पूजारी ब्राह्मण कण्व त्या स्थला । आहेत वंशपरंपरें ॥ १५ ॥ तेथें रात्रीं व्याघ्र असती । परंतु मनुष्य-पशु-पक्ष्यांसि ते न स्पर्शती । आदिमायेचें सामर्थ्य अघटित अति । सर्वत्र गाती सर्वदा ॥ १६ ॥; श्रीपादवल्लभाचें समाधिस्थान । कृष्णा नदीकांठीं कुरगड्डी म्हणून । तेथें एक पाद असे तयाचें पूजन । करिती जन सौख्यार्थ ॥ १७ ॥; तेरढोकें ग्रामीं भक्त गोराकुंभार । तेथें वडाखालीं असे विठ्ठलमंदिर । त्या प्रसिद्ध भक्ताची समाधि सुंदर । नदीमाजीं शोभतसे ॥ १८ ॥ त्या तेरढोकेंग्रामीं सांप्रत । हिंदु जातीचा जंगलीबुवा संत । वसतसे चिरकाल स्वानंदांत । निःस्पृह निर्विकार-स्वभावी ॥ १९ ॥; तैसें जोगाईचेंआंबें नामक । क्षेत्र प्रसिद्ध असे सुखसंतोषदायक । तेथें जवळ पर्वत विराजे एक । म्हणती लोक ‘दत्तपहाड’ त्यासी ॥ १२० ॥ जोगीश्वरीचें स्थान उत्तम । दर्शनें प्राप्त होय सुखाराम । जेथें दासोपंत सत्पुरुष इंद्रियग्राम । जिंकूनि परमधाम पावले ॥ २१ ॥ तैसेचि महात्मा मुकुंदराज । शिवावतारी योगिराज सतेज । ज्यांनीं जगदुद्धारार्थ रचिले सहज । वेदान्तगुजग्रंथ प्राकृत ॥ २२ ॥ सरल मधुरबोधक ज्यांची वाणी । ते मुकुंदराज संतशिरोमणि । जोगाईच्या दत्तपहाडांत निर्वाणीं । जगत्कल्याणी वसत होते ॥ २३ ॥ त्या पहाडांत जगद्गुरु स्वामिराय । स्वेच्छाचारी वसले संवत्सर द्वय । तेव्हां गोरक्षकाच्या कन्यकेसि पौरुषेय । देऊन स्त्रीचा पुरुष केला ॥ २४ ॥ ब्रह्मदेवें केलेलें जें जें निर्मित । तें कोणीही अन्यथा करूं न शकत । तथापि स्वामीसमर्थांचें सामर्थ्य अघटित । विधिकृत अन्यथा करिती कीं ॥ २५ ॥; असो भीमा आणि कृष्णातीर । गोदावरी कांठींचीं तीर्थक्षेत्रें मनोहर । नासिक त्र्यंबक पैठण टोकें सुंदर । प्रवरासंगम कायगांवादि ॥ २६ ॥; गंगाखेड पुणतांबें आदिकरून । शिवाय वाल्मिकतीर्थ मांडवगण- ।

मोहनी-अवतार सुंदरस्थान । नेवासें म्हणून प्रसिद्ध असे ॥ २७ ॥ कोल्हार जेजुरी सप्तशृंग । शंभुमहादेव विख्यात असे अभंग । कार्तिकस्वामी कांची श्रीरंग । दक्षिणरामेश्वरादि अखिल ते ॥ २८ ॥; अक्कलकोटासमीप आणि दूर । तीर्थक्षेत्रें असती अपार । साधुसंत महात्मे पुण्यभूमींत निरंतर । वसले वसती वसतील ॥ २९ ॥; असो श्रीमत्परमहंसरूपें आदिनारायण । स्वेच्छें नरवेष करूनि धारण । विलोकूनि अनेक क्षेत्रें तीर्थाटन । करित आले धीपुरीं ॥ १३० ॥ श्रीस्वामीसमर्थ आल्यावरी । दुसरे दिवशीं पर्जन्यवृष्टि झाली भारी । त्यापूर्वीं मेघवृष्टि नव्हती बरी । खंडवृष्टि होती कीं ॥ ३१ ॥ दत्तात्रेयस्वामी स्वयंप्रकाश । त्यांचा अक्कलकोटीं होतांचि प्रवेश । समस्तांसी सुख अर्थ आरोग्य यश । लाधलें सहज सुफलित ॥ ३२ ॥ ईश्वरें प्रथम रचिलें मनुष्यादि शरीर । त्यांत इंद्रियांसह देवतांनीं तदनंतर । ईश्वराज्ञें केला संचार । जड दृश्य ऐशा शरीरांत ॥ ३३ ॥ तथापि न चळे न हाले हे काया । चैतन्याविना काय करी माया । वायु अग्न्यादिक देवतांनीं देहीं या । नख-चरणांपासूनि प्रवेश केला ॥ ३४ ॥ सर्वज्ञ सर्वशक्तिमान् सर्वैश्वर्य । मायिन महेश्वर कारण मायाकार्य । कर्ता करविता विश्वाध्यक्ष जगद्धुर्य । अधिष्ठान स्थैर्य-धैर्यादिकांचें ॥ ३५ ॥ शरीरेंद्रिय देवता ज्याचे किंकर । अनंत ब्रह्मांडांचा अव्यय सूत्रधार । त्यानें ईक्षणमात्रें प्रवेश स्वेच्छाचार । चैतन्य-स्वरूपें केला असे ॥ ३६ ॥ मूर्ध-सीमा विदारून । म्हणजे कपाल-मध्यत्रयदेश छेदून । प्रविष्टले परमेश्वर चैतन्यरूपेंकरून । तेव्हां शरीरसंसरण चाललें ॥ ३७ ॥ हृदयीं परमात्म्याचा असे निवास । शिष्या ‘हृदय’ शब्दार्थ परीस । अंतःकरण-मन-बुद्धि-चित्त-मानस । ज्ञान हृदय काळीज ॥ ३८ ॥ ‘हरतीति हृदयं’ म्हणजे । हरण करणार तें जें । तयासि हृदय बोलिजे । शास्त्रप्रमाणार्थ हा ॥ ३९ ॥ ‘हृत्’ रक्ताशय हृत्कमल । शरीरांत हृदयाचा जो भाग खोल । ऐसे हृदय-शब्दाचे अर्थ पुष्कळ । बुद्धि त्यांतील मुख्यत्वें ॥ १४० ॥ त्या बुद्धींत आणि बुद्धीच्या वृत्तींत । साक्षी व्यापक स्वामी अलिप्त । ‘आत्मा-श्रोता-

द्रष्टा-मंता-विज्ञाता’ निश्चित । तोचि समर्थ दत्तगुरु ॥ ४१ ॥ बुद्धिस्थ असूनि जडबुद्ध्यादिकांचे विकार । कधीं न स्पर्शती म्हणूनि निर्विकार । ते अक्कलकोटनिवासी परमगुरु परात्पर । दत्तदिगंबर स्वामिराय ॥ ४२ ॥ त्या अक्कलकोट नगरीं नृपति । गाजले सद्धर्मी शुद्धमति । त्यांत मालोजीनृप श्रेष्ठ प्रजाहितीं । परम न्यायी शूर जो ॥ ४३ ॥ त्या मालोजी नृपास प्रथमदर्शनीं । श्रीफल प्रसाद दिधला समर्थांनीं । आणि स्वकंठींची पुष्पमाला काढुनी । दाजीबाचे कंठीं घातली ॥ ४४ ॥ नंतर नृपासि पुत्रप्राप्त्यर्थ । दाजीबा यतींद्रासि विनवित । मग समर्थकृपें पुत्र प्राप्त । शहाजीराजे जाहले ॥ ४५ ॥ फसली सन बाराशेंऐंशीं । श्रावण वद्य दशमी दिवशीं । मालोजी नृप झाले कैलासवासी । त्यांनीं बारा वर्षें राज्य केलें ॥ ४६ ॥ मग राज्यपदारूढ झाले । शहाजी ऊर्फ बाबासाहेब भोंसले । सद्वर्तनें न्यायधर्में आवडले । प्रजाजनांसी कुलदीपक ॥ ४७ ॥ भोंसलेकुळींचे राजे आणि राजपत्नी । कर्मधर्मशील दयाळु असती अनुदिनीं । धन्य ते प्रजा अक्कलकोट राजधानी । जेथें कैवल्यदानी विराजले ॥ ४८ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामन-विरचित । विंशाध्याय गोड हा ॥ १४९ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे विंशोऽध्यायः समाप्तः ॥ २० ॥

श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

## ॥ अध्याय एकविसावा ॥

### ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ।। श्रीमद्दत्तात्रेयगुरवे नमः ।। ।। शिष्य विनवी सद्गुरूलागून । प्रवेशादि प्रश्नाचें योग्य समाधान । झालें पूर्वसंस्कारें चोळाप्पासि दर्शन । कल्याणकारक अनायासें ।। १ ।। कोण कुठील चोळा हरिभक्त । पुढें काय घडला वृत्तांत । तें पान करवा श्रीगुरुलीलामृत । जेणें लाधे भुक्ति मुक्ति ।। २ ।। गुरु निरूपिती सविस्तर । तारक जे भवसंसारसागर । सदोदित ऋद्धिसिद्धि-प्रदातार । समस्त सुरनर ध्याती जया ।। ३ ।। याज्ञवल्क्य व्यास सनत्कुमार । विनायक रुद्र भास्कर । वामदेव गौतम नारद सुरेश्वर । स्तविती ब्रह्मेंद्रादि जयासी ।। ४ ।। अत्रि भार्गव दक्ष गर्ग मुद्गल । भृगु कश्यप जैमिनी पातंजलि कपिल । दध्यंगाथर्वण पराशर वसिष्ठ निर्मल । उद्दालक मांडुक दुर्वासादि ।। ५ ।। विश्वामित्र भारद्वाज वाल्मिक कौशिक । जमदग्नि मरीचि कर्दम शुक । मार्कंडेय धौम्य कण्व वत्स शौनक । स्वामिकार्तिकादि सेविती ।। ६ ।। अंगिरा पौतिमषी शांडिल्य अगस्त्य । कात्यायन अरुण मांडव्य पुलस्त्य । अश्वलायन कौंडिन्य गालव जाबाल नित्य । ध्याती समस्त जयासी ।। ७ ।। वेद स्मृति पुराणें शास्त्रादिक । ऋषि योगी मुनि ज्ञानी कर्मी उपासक । महात्मा साधु संत भक्त अनेक । अखंड गाती जयासी ।। ८ ।। ते परमपुरुष परमात्मा नारायण । परमेश्वर साक्षात् अत्रिनंदन । श्रीगुरुदत्तात्रेय पूर्णब्रह्म सनातन । जगत्कल्याण करावया ।। ९ ।। सर्वज्ञ सर्वसाक्षी सर्वांतर्यामी । जगद्गुरु श्रीमद्दत्तात्रेय स्वामी । नाना रूपें नाना वेष धरिती नामी । जगदुद्धार करावया ।। १० ।। चोळाप्पासि देऊन आलिंगन । नानापरी संबोधून । दत्तावधूत अलख निरंजन । पुन्हा संभाषण करिताति ।। ११ ।। अनादि वेदशास्त्रविहित प्रमाण । चालवावया

सद्धर्माचरण । आणि तुझें फेडावया ऋण । आलों जाण चौलभक्ता ॥ १२ ॥ आतां अवश्य आम्हांजवळ । सोडूनि माया प्रपंच तळमळ । स्वस्थ असावें बा सर्वकाळ । निरुपाधि निर्मळ मानसें ॥ १३ ॥ तेव्हां राधाबाई बोले पाहीं । अहो योगिराज भक्तानुग्रही । तंडुलादि धान्य गृहांत नाहीं । स्वयंपाक करूं कशाचा ॥ १४ ॥ आम्ही दरिद्री मूढ अभागी । आपण दिसतां महान्‌योगी । भुक्ति-मुक्तिप्रदायका लावूनि सन्मार्गीं । संरक्षण करावें ॥ १५ ॥ इतुक्यांत कोणीं तांदूळ अर्पिले । मग राधाबाईनें ते रांधिले । शाक कोशिंबिरी दधि दुग्ध चांगलें । सुखें जेविले यतिपति ॥ १६ ॥ त्या वर्षी नव्हता पर्जन्य । अन्नोदकाचें विशेष दैन्य । ग्रामीं प्रवेशलिया यतींद्र धन्य । वर्षलें पुष्कळ मेघोदक ॥ १७ ॥ चित्रा स्वाति महानक्षत्र । क्षुत्पिपासानिवृत्त्यर्थ वर्षलें सर्वत्र । पश्चाद्धान्य पुष्प फल पत्र । उन्हाळा जाऊनि उत्पन्न झालें ॥१८॥ राधाबाई चोळाप्पाची सासू । आणि चौलपत्नी बाई येसू । सोंवळ्याची करिती धुसधुसु । यतीश्वराकारणें ॥ १९ ॥ अन्नरसभरित पात्र स्थाली । यतींद्रास दूर ठेविती वेगळी । राधा आणि येसूबाई अतिसोंवळी । विटाळ मानिती जगद्गुरूचा ॥ २० ॥ कधीं कधीं विनोदें जगन्नायक । शिवून फेंकून देती स्वयंपाक । स्वयें शिजवूनि अन्न शाक । भक्षिती, ताक प्राशुनी ॥ २१ ॥ जैसें मातापिता पितादिक आप्तवर्ग सगळे । श्रीकृष्णासि लाविती प्रेमलळे । परंतु पूर्णब्रह्मरूप तें सर्व गोपी गोवळे । मायाबळें नोळखिती ॥ २२ ॥ त्या प्रकारें संसारीं लंपट लोक । मिथ्या प्रपंची कपटी मायिक । लोभी सुरागी सकामनिक । नोळखिती अलौकिक जगद्गुरूतें ॥ २३ ॥ तथापि सद्गुरुचरणीं प्रेम अवीट । चोळाप्पाचें वाढलें अदंभ निष्कपट । बाबा सबनीस नित्य नेमें निकट । सेवेसी वसतसे भक्तियुक्त ॥ २४ ॥ समागमें घेऊन चोळाप्पासी । जनीं वनीं उद्यानीं जाती पर्यटनासी । पुढें अक्कलकोटासभोंवती पंचक्रोशीं । हृषीकेशी संचार करिती ॥ २५ ॥ बालवत्‌लीलें स्वच्छंदें हंसावें । मध्यें स्तब्ध असूनि रुसावें । सकल जनांसी सहज ठसावें । ऐसें बोध-

तात्पर्य भाषणांत ॥ २६ ॥ लोकांचिया मनांतील गुज । संकेतें उघड बोलावें सहज । अवलोकितांचि स्वामीमहाराज । शक्तिपात होत सकलांचा ॥ २७ ॥ यद्यपि खदिरारण्यांत । चंपकवृक्ष वसतसे गुप्त । तथापि अतुल परिमल कथित । समीरण सर्व दिशांसी ॥ २८ ॥ तैशी दत्तात्रेय-स्वामीची सत्कीर्ति । अखंडाकार विस्तार पावली जगतीं । अनेक देशींचे अनेक लोक येती । निजकार्यार्थीं दर्शनाला ॥ २९ ॥ ज्ञानामृत-समुद्र पूर्ण भरला चिरकाल । भावनाशक्तीसारिखें फल । शुद्ध मोक्षाधिकारी विरल । गुरुभक्त सरल पावती ॥ ३० ॥ यतीश्वर वदती एकेसमयीं । स्वयंपाक करा हो राधा येसूबाई । परिसूनी ऐसे घाई घाई । गेल्या पाकनिष्पत्तिस्थानीं त्या ॥ ३१ ॥ तों तेथें न दिसे अग्निकाष्ठ । तंदुल डाळ शाक धान्य पिष्ट । तेव्हां त्यांसी वाटले कष्ट । आतां काय करावें ॥ ३२ ॥ मग बाहेर येऊनि मानसीं । म्हणती धिक्कार असो आम्हांसी । गृहीं न मिळे अन्न यतींद्रासी । शोभा काय गृहस्थाश्रमाची ॥ ३३ ॥ उदरापुरतें जाडेंभरडें अन्न । आणि साधारण वस्त्राच्छादन । हेंही अप्राप्त तरी देह असून । नसल्या सारिखा व्यर्थचि ॥ ३४ ॥ कामधेनु किंवा कल्पतरु लाधला । अथवा लोहासि परीस स्पर्शला । चिंतामणि नित्य प्राप्त झाला । तरी मग काय उणें ॥ ३५ ॥ सुरभी मणि तरु आणि परीस । सद्गुरु श्रेष्ठ अत्यंत यांहीपरीस । अनायासें समर्थ जगन्निवास । झाले आम्हांस उपलब्ध ते ॥ ३६ ॥ पुन्हा बोलती गुरु यतिवर्य । बायांनो स्वयंपाकगृहांत जा अवश्य । पात्रें भरलीं असतीं अन्नमय । पाहतां काय, आणा गे ॥ ३७ ॥ तेव्हां त्या महंताज्ञानुसार । पाकगृहांत जाऊनि देखती सत्वर । पक्वान्नरसभरित पात्रें सुंदर । पाहूनि हर्षित जाहल्या ॥ ३८ ॥ मग वाढिलीं पात्रें अन्नभरित । जेविलीं सर्वही आतृप्त । ऐसें स्वामिचरित्र अद्भुत । अशक्य विचित्र वर्णितां ॥ ३९ ॥ जें अघटित ब्रह्मादिकांसी दुर्लभ । तें श्रीगुरुकृपें होतसे सुलभ । चोळाप्पातें प्रत्यक्ष परमात्मलाभ । घडला अभंग महद्भाग्यें ॥ ४० ॥ घरचें वस्त्रपात्रादि विकून । सर्वदा करी गुरु-सुश्रूषण । पूर्णभक्त चोळाप्पा भाग्यवान् । त्यासमान

विरलाचि असे ॥ ४१ ॥ श्रीकृष्णसखा धनंजय । श्रीरामदाससखा पवनतनय । तद्वत् पूर्णसखा चोळाप्पा प्रिय । श्रीमद्दत्तात्रेय स्वामींचा असे ॥ ४२ ॥ त्यजूनि प्रपंच व्यवसाय । अहोरात्र सेवी दत्तगुरु पाय । त्यावीण न जाणेचि अन्य उपाय । अनन्यभक्तियुक्त चोळाप्पा ॥ ४३ ॥ चिंतोपंत आणि पुराणिकांनीं । समर्थांचे आहार चौलसदनीं । होती तें दाजीबाभोंसल्याचे कानीं । जाऊनियां घातलें ॥ ४४ ॥ नृपकृपेंतील सद्गृहस्थ कुलवान् । दाजी पिराजी भोंसले नामाभिधान । शूर उदार विद्याकलाकौशल्यसंपन्न । खासगीचे कारभारी होते ॥ ४५ ॥ त्या दाजीबांनीं चौलवृत्त भलें । मालोजी भूपतीस निवेदिलें । नृपवर्यें दाजीबासि आज्ञापिलें । नैवेद्य सुव्यवस्था करून द्यावी ॥ ४६ ॥ दाजीबांनीं राजाज्ञा मानूनि वंद्य । चौलगृहीं स्वामिरायासी नित्य नैवेद्य । सुव्यवस्थित चालू करविला सद्य । अबाधित निभेल ऐसा ॥ ४७ ॥ कांहीं दिवसांनंतर प्रज्ञापुरीं । दत्तजयंत्युत्साह समारंभ भारी । दाजीबांनीं चालू करवून प्रतिसंवत्सरीं । नृपाज्ञें नेमणूक बांधून दिधली ॥ ४८ ॥ प्रतिवर्षीं श्रीनृसिंहसरस्वती- । उत्साह माघ कृष्ण गुरुप्रतिपदा पुण्यतिथी । समारंभ करणें आवडे राजाप्रति । धन खर्चूनि अपार ॥ ४९ ॥ गुरुप्रतिपदा गाणगापुरीं । जाऊनि महीपाल प्रतिवत्सरीं । ब्राह्मणभोजनादिक उत्साह आदरीं । करवितसे भक्तिभावें ॥ ५० ॥ मालोजीरायासि स्वप्नीं यतींद्ररूपें । एकदां दृष्टांत दाविला प्रौढप्रतापें । जागृत होऊनि श्रीमंत नृपें । विप्रादिकांसि स्वप्न निवेदिलें ॥ ५१ ॥ कीं प्रत्यक्ष श्रीगुरुदत्तात्रेय-स्वामी । आम्ही स्वतां असूनि तुमचे ग्रामीं । कां शिणतां हो नृपति पराक्रमी । गाणगापुरीं येऊनि ॥ ५२ ॥ तेव्हां सकलांसि आश्चर्य वाटलें । म्हणती स्वामिराज साक्षात् दत्तावधूत भले । मग प्रज्ञापुरीं दोन्ही उत्साह-समारंभ योजिले । स्वप्नानुसार प्रतिवर्षीं ॥ ५३ ॥ तेव्हांपासून प्रतिसंवत्सरीं । दोन्ही उत्साह अक्कलकोट-नगरीं । उत्तम समारंभें अद्यापवरी । नियमानुसार होत आहेत ॥ ५४ ॥ बुधवार पेठेंतील आद्यमठांत । हे उत्साह होती आनंदभरित । सवाशें रुपयांची

नेमणूक असत । प्रत्येक उत्साहाप्रीत्यर्थ ॥ ५५ ॥ पुढें दत्तात्रेय-स्वामिसंनिध । सेवक जमले नानाविध । अन्नवस्त्रधनादिक मान उपलब्ध । होऊं लागला सकलांसि ॥ ५६ ॥ ते धीपुरस्थित हृषीकेशी । फिरती स्वेच्छें पंचक्रोशीं । सेवकजनांसह एके दिवशीं । अवलोकिती निवडुंगा ॥ ५७ ॥ निवडुंग कंटकाचें रान । दचकले अवघे कंटकारण्य पाहून । शब्द निघेना मुखांतून । कोणाच्याही त्या कालीं ॥ ५८ ॥ निवडुंगाचे अपरिमित कांटे । मार्गीं पसरले ऊर्ध्वमुख धाटे । समर्थ म्हणती चला रे गोमटे । सकलही या कंटकांवरूनी ॥ ५९ ॥ दर्शनार्थ आलेले परगांवाहून । तैसेचि मोठमोठे सेवेकरी जन । परिसूनि स्वामिराजांचें वचन । भयभीत होती अंतरीं ॥ ६० ॥ त्यांतही जे प्रमुख होते समागमें । ते बडबडती हे खेळ काय रिकामे । दुरूनि पाहूनि खेळ प्रेमें । जाऊं आपल्या ग्रामासी ॥ ६१ ॥ कित्येक बोलती प्रतिष्ठित प्रबुद्ध । आम्ही कदा नव्हेचि सिद्ध । निरर्थकभाषण विरुद्ध । कशाकरितां वदावें ॥ ६२ ॥ झाला माध्यान्हींचा समय । आजि पुढीचें कैसें काय । होईल केव्हां भोजनाची सोय । उपास संवय आम्हां नसे ॥ ६३ ॥ असो स्वामिराज दत्तात्रेय । आरक्त सकुमार ज्यांचे पाय । अनवाणी चालले जगद्गुरुवर्य । अपार कंटकांवरूनी ॥ ६४ ॥ नागफणीच्या कांट्यावरून । चालत गेले जगज्जीवन । तात्काळ समर्थांच्यामागून । भक्त चोळाप्पा चालिला ॥ ६५ ॥ पाहूनि आश्चर्य मानिती लोक । धन्यधन्य म्हणती गुरुसेवक । निजप्रिय चोळाप्पाचि एक । निर्भय खचित देखिला ॥ ६६ ॥ गुरु शिष्य उभयतां अनवाणी । अतिशय कंटकमार्ग नागफणी । त्यां कंटकांवरूनि शिरोमणि । अर्धक्षणांत सहज गेले ॥ ६७ ॥ परंतु कंटकांचा पायांसि स्पर्श । जाहलाचि नाहीं लवलेश । स्वामी पूर्णब्रह्म परमेश । त्यांना भय कशाचें ॥ ६८ ॥ ज्यांच्या भयें सूर्य चंद्र । मृत्यु अग्नि वायु सुरेंद्र । नित्य देव दानव मानव नरेंद्र । आज्ञानुसारें वर्तती ॥ ६९ ॥ जो ज्ञानी पुरुषाचें ज्ञेय । ऋषि-योगी-मुनिजनांचें ध्येय । भक्त साधु सेवकांचें सुसेव्य । अव्यय निर्भय वस्तुरूप ॥ ७० ॥ धीपुरस्थित दत्तात्रेयप्रभु । शुद्ध

अद्वितीय स्वयंभू । सर्वांतरात्मा पूर्णविभु । निर्विकल्प निरुपाधिक असे जो ॥ ७१ ॥ वेदांत-उपनिषद्-मथितार्थ । जो ‘ विज्ञानसिद्धांत-सुनिश्चित ’ परमार्थ । तो परमात्मा सर्वभूतांच्या हितार्थ । प्रज्ञापुरीं प्रकटला ॥ ७२ ॥ चारी पुरुषार्थ चारी मुक्तींचा । चतुर्विध वाचेंचा स्वामी नियंता । स्थूल-सूक्ष्म-कारणदेहांचा साक्षी चेता । केवल निर्गुण प्रकाशित ॥ ७३ ॥ ज्याचिया स्मरणें अवघें भय । समूल दग्ध होऊनि जाय । त्या भगवंतासी दृश्य कंटक काय । रुततील तारक पायांसि ॥ ७४ ॥ स्वाभाविक कंटकांचा कंटकपणा । दूर करण्याचें सामर्थ्य नसे कोणा । हें जाणूनि कंटकोद्धरण नारायणा । दया उपजली त्या काळीं ॥ ७५ ॥ कंटकमर्दन कंटकत्वहारक । कंटक-अविद्यामाया-कलहांतक । कंटक-कलह-देहाभिमान-विनाशक । भवतारक चरण ज्याचे ॥ ७६ ॥ ते श्रीमद्भगवच्चरण त्या कंटकांसी । स्पर्शतांचि कंटकत्व गेलें लयासी । सामर्थ्यातिशय प्रकट व्हावयासि । जनांसी लीला दाविती ॥ ७७ ॥ ऐसा परमेश्वर असतां जवळी । भय न बाधे कदाकाळीं । भक्तजनांसि तो सखा सांभाळी । कारुण्यसिंधु जगदीश ॥ ७८ ॥ ज्याच्या कृपें चोळाप्पा सद्भक्त । अपार कंटकांवरूनि गेला क्षणांत । पुण्यवान् भोळा भाविक शुद्धसंत । मोक्षाधिकारी जाहला ॥ ७९ ॥ भीमातीरीं खेडमणूरचे राहणार । सद्गृहस्थ नाईक रामचंद्र । तयासि संतति कन्यापुत्र । त्यांतील एक चोळाप्पा ॥ ८० ॥ जाति ब्राह्मण यजुर्वेदी । ज्याची कण्वशाखा आदि । सदाचारें भगवच्चरणारविंदीं । भक्ति जडली सर्वदा ॥ ८१ ॥ वडिलांचे पश्चात् चोळाप्पाद्विज । कुटुंबसहित साधाया प्रपंचकाज । अक्कलकोटासि येऊनि सहज । सुखवस्तु राहिला ॥ ८२ ॥ त्यासि कन्या पुत्र संतति । समर्थकृपें जाहली प्राप्ति । कृष्णाप्पा अण्णाप्पा नामें असती । वर्तती यतींद्रसेवेंत ॥ ८३ ॥ जमखिंडीकडील कृष्णातीरीं गोटेग्राम । तेथील राहणार अनंतभट नाम । यजुर्वेदी ब्राह्मण वैदिक निस्सीम । विद्वान् प्रथम कण्वशाखी ॥ ८४ ॥ तयाचे तनय असती सात । विद्वान् दशग्रंथी सदाचाररत । वैदिक याज्ञिकी अभिमानरहित । असती प्रपंचकुशल ते ॥ ८५ ॥ त्यांतील एक

***************************************************************

श्रीपाद्नामक । व्रतबंध झाल्यावरी वेदाभ्यास सम्यक् । करूनि पातला धीपुरीं अलौकिक । यतिनायकांच्या दर्शनासि
॥ ८६ ॥ श्रीफलादि अर्पूनि प्रेमें अवीट । समर्थांच्या पायीं प्रणिपात धीट- । पणें करूनि श्रीपादभट । बैसला निकट
यतीश्वरांच्या ॥ ८७ ॥ नंतर वदती सर्वभूतनिवासी । अल्पवयी श्रीपादभटासी । त्वां सर्वदा वसावें आम्हांपासीं । सेवेसि
तत्पर निर्भयें ॥ ८८ ॥ ऐसें आशीर्वचन अभय । श्रीपादाचा प्राप्तकाल भाग्योदय । अप्रार्थित जाहला श्रीमद्दत्तात्रेय ।
स्वामी समर्थ प्रसन्न ॥ ८९ ॥ स्वामिराजांच्या आज्ञेनुसार । श्रीपाद गुरुसेवेंत ठेला तत्पर । चोळाप्पांनीं थोडे दिवसांनंतर ।
कन्या अर्पिली श्रीपादा ॥ ९० ॥ दुसरा यादवनामें मानकरी । समर्थांचा जाहला सेवाधारी ।; आणि एक सरस्वतीनामक
वृद्ध शूद्र स्त्री । समर्थासन्मुख वसतसे ॥ ९१ ॥ समर्थासवें बोले चाले । परी अंतरीं हेचि ईश्वर जाणितले । समाधानवृत्तीनें
अनुभविलें । प्रेमसुख तियेनें ॥ ९२ ॥; असो जिकडे जाती योगीश्वर । तिकडे धांवे श्रीपाद सत्वर । दत्तात्रेयसेवेंत
असती तत्पर । चोळाप्पा कृष्णाप्पा श्रीपाद ॥ ९३ ॥ करावें न करावें अमुक । मनीं नुपजे ऐसा संशयकलंक । जें जें
पडे काम तें संतोषपूर्वक । करिती लौकिक चाड त्यजूनि ॥ ९४ ॥ समर्थ अंतःकरणाची परीक्षा करिती । गालिप्रदानें
धिक्कारिती । चोळाप्पासि जैन म्हणती । प्रेमें हांसती पोट धरुनी ॥ ९५ ॥ तैसेंचि लीलेनें चौलसदनीं । काष्ठावीण पेटविती
अग्नि । किंवा शुभाकाष्ठीं अग्नि प्रज्वलित असूनी । ओतिती पाणी चुलींत ॥ ९६ ॥ जैसें वत्साचें निमित्त मात्र । दुग्ध
प्राशिती पुष्टिदायक सर्वत्र । तैसें चोळाप्पानिमित्त प्रज्ञापुरक्षेत्र । झालें सुखदायक सर्वांसी ॥ ९७ ॥ जे पूर्णब्रह्म परमेश्वर
स्वामी । ते जगदुद्धारार्थ अक्कलकोटग्रामीं । वसती चोळाप्पाचे धामीं । स्मरणगामी भक्तिप्रिय ॥ ९८ ॥ भक्तिलक्षणेवांचून ।
वश नोव्हे इतर साधनेंकरून । केवल भक्तीनेंच भगवान् । सर्वदा प्रसन्न होतसे ॥ ९९ ॥ शुद्धप्रेमैक्यभक्तिलक्षणा ।
श्रीमत्सद्गुरूचा थोरपणा । शास्त्रानुभव आत्मानुभव खुणा । जाणती विरल भाग्यवंत ॥ १०० ॥ ऐशा प्रकारें सरलभक्तीचा

* * *

सोहळा । नित्यश्री-नित्यमंगल-वृद्धि पावला । चोळाप्पाचे संगें खेळती लीला । स्वामिराय प्रेमानें ॥ १ ॥ बहुतपदार्थ खेळाचे । धातुकाष्ठादिक मृत्तिकेचे । पदार्थांतून पदार्थ साचे । घालिती स्वेच्छें काढिती ॥ २ ॥ विश्वोद्भवस्थितिलयकारण । मी जगदात्मा सत्य नारायण । ऐसें खेळांत सुचविती यतीन्द्र आपण । स्वस्वरूप ओळखावया ॥ ३ ॥ वेड्यासारखें बोलावें चालावें । परंतु भाषणाचें खेळाचें तात्पर्य बरवें । शास्त्रीपंडितासही न उमजावें । बोधाधिकारावांचूनि ॥ ४ ॥ शब्दांचें अर्थगांभीर्य । अंतःकरणादिकांचें स्थैर्य । पारमार्थिक आत्मानुभवाचें धैर्य । जगत्कार्यसूचक दाविती ॥ ५ ॥ सहज बोलणें तो उपदेश । सहज चालणें तो आदेश । सहज खेळणें निर्देश । आत्मप्रवेश प्रथमदेहीं ॥ ६ ॥ संसारप्रपंच कैसा करावा । योगक्षेम कैसा चालवावा । कोणत्या प्रकारें सत्य व्हावा । मोठेपणा जगांत ॥ ७ ॥ प्रपंचदुःखें जावीं अनेक । कोणता मार्ग अक्षयसुखदायक । चातुर्य युक्ति ज्ञान लौकिक । कवण्या रीतीं पाविजे ॥ ८ ॥ संसारांतील ताप संकट । कैसे हटती योगदुर्घट । पराक्रम औदार्य संग्राम सुभट । कैशापरी साधतील ॥ ९ ॥ वेदप्रणित सनातनवर्णाश्रम । नित्यनैमित्तिक निष्कामकर्म । स्वधर्मेंचि सद्गुरु-सत्समागम । कवण्या रीतीं घडे कीं ॥ ११० ॥ तीर्थयात्रा अनेक देवदर्शन । सर्वदा होईल पवित्र स्थिर मन । आणि ईश्वरीसूत्र कळावया साधन । कोणतें अवश्य पाहिजे ॥ ११ ॥ मनोजय आणि वासनाक्षय । प्रत्यगात्मा अखंडब्रह्म चिदानंदमय । मोक्षसुखोपभोग कैसा होय । जाती संशय कोणे कालीं ॥ १२ ॥ आरोग्यता धन पुत्र विद्या प्राप्ति । निर्विघ्न शुभमंगलकार्यें कैशीं होतीं । जितेंद्रियत्व विजय सत्कीर्ति । कैशापरी पाविजे ॥ १३ ॥ लाभ मृत्यु आणि हानी । कळेल कोणत्या प्रमाणसाधनीं । जगत्कल्याण होईल कैसेनी । ऐसे लोक-प्रश्न अनेक ॥ १४ ॥ दत्तात्रेयस्वामींच्या संभाषणांत । सकल शंकांचें समाधान होत । शब्दार्थांचें अनुभवसंकेत । स्पष्ट निर्णित सहज होती ॥ १५ ॥ लोकांच्या

मनांतील प्रश्नांचें उत्तर । अंतर्साक्षी सर्वज्ञ निर्विकार । एक्याचि बोले प्रशस्त मनोहर । अर्पिती स्वतंत्र स्वच्छंदें ॥ १६ ॥ दर्शनें वचनें तत्काळ शक्तिपात । सामर्थ्यातिशयें व्हावें जगद्धित । राव रंक सर्वांसी अनुभव येत । मग शरणागत सर्व होती ॥ १७ ॥ समर्थांचें विजयवेदवचन । न टळे न कळे ब्रह्मादिकांलागून । म्हणूनि परमेश ब्रह्मसूत्र जन । अगम्य अतर्क्य बोलती ॥ १८ ॥ ज्यांची अमानुषिक लीला अपार । ऐसे स्वामीसमर्थ दत्तदिगंबर । तयाच्या लीलामृतप्राशनें निरंतर । सकल नारीनर सुखी होती ॥ १९ ॥ त्या दत्तात्रेयप्रभूंनीं एके दिवशीं । दाविलें नवल चोळाप्पासी । तत्सदनीं औदुंबरवृक्ष सहजेंसीं । खेळांत लावितां उगवला ॥ १२० ॥ औदुंबर कल्पवृक्ष दिवसेंदिवस । सुशोभितपणें पावला वृद्धीस । त्या लहान गोजिरवाण्या कल्पतरूस । पूजिती नमिती सकलही ॥ २१ ॥ देवाचे पितळी मुखवटे । देव्हाऱ्यांतून काढूनि नित्य यतिवर्य । त्या पोकळ मुखवट्यांत घालूनि धान्य । वारंवार मोजिती ॥ २२ ॥ फलपुष्पादि त्या मुखवट्यांत । वरचेवर घालूनि काढिती अवधूत । तों नृसिंहवाडीचा द्विज अकस्मात । पातला नवस फेडावया ॥ २३ ॥ त्यासि पोटशूळ व्याधीनें पीडा । तेणें लोळतसे गडबडा । अनेक औषधोपचार दोरे गंडा । आरोग्यार्थ विप्रें केलें ॥ २४ ॥ तीर्थक्षेत्रीं वसूनि देवधर्म । आणि व्रतानुष्ठान नेम । आचरिला परंतु उदरव्यथेसी आराम । किंचित् वाटला नाहीं ॥ २५ ॥ म्हणूनि नृसिंहवाडीप्रसिद्ध क्षेत्रांत । गुरुचरित्राचीं पारायणें विध्युक्त । बहुतेक केल्यावरी स्वप्नांत । नृसिंहगुरुवर सांगती ॥ २६ ॥ त्वां जावें सत्वर अक्कलकोटीं । तेथें विरंचि-विष्णु-धूर्जटी । ऐक्यरूपें अवतार घेऊनि सर्वसंकटीं । तारिती सकल जीवांसी ॥ २७ ॥ ते आम्हींच प्रत्यक्ष यतिवेष धरून । करितों हो संपूर्ण विश्वाचें कल्याण । यदर्थीं निःसंशय त्वां होऊन । जावें कार्यसिद्ध्यर्थ ॥ २८ ॥ जागृत होऊनि ब्राह्मण विस्मित । मग कळवी एका साधूसि दृष्टांत । साधु म्हणे सत्याशीर्वचन सुफलित । होईल निश्चित जाण पां ॥ २९ ॥ पूर्णब्रह्म परमेश्वर

* * *

साक्षात् । अक्कलकोटीं नांदतसे अनंत । त्या परमात्मदर्शनें खचित । आरोग्य होईल ब्राह्मणा ॥ १३० ॥ परिसूनियां साधुवचन । चालण्यासी सामर्थ्य नसे म्हणून । द्विजें एक सात्त्विक नूतन अश्व घेऊन । केलें नमन गुरुपादुकांसी ॥ ३१ ॥ गुरुपादुकांवरी रुद्राभिषेक । करूनि नैवेद्य समर्पण भक्तिपूर्वक । म्हणे आरोग्य झाल्यावरी सम्यक् । विप्रसंतर्पण करीन तेथें ॥ ३२ ॥ यापूर्वीं केला होता एक नवस । कीं झालिया दृष्टांतास । पेढे सवारुपयाचे खास । गुरुदर्शन होतांचि वाटीन ॥ ३३ ॥ नंतर घालूनि देवासी लोटांगण । अश्वारूढ होऊनि शूली ब्राह्मण । श्रीगुरुदेवदत्तस्वामींचें स्मरण । करीत उत्साहें निघाला ॥ ३४ ॥ मंद मंद चालतां तो पथीं । अक्कलकोटांत पातला तो सन्मति । लोकांसि पुसे श्रीमद्यति-जगत्पति । कोठें वसती सांगा हो ॥ ३५ ॥ त्यांत बाळकृष्ण ग्रामजोशीबुवांनीं । विप्रासि पोंचविलें चोळाप्पाचे सदनीं । सदन जीर्ण द्वार लघु असूनी । त्यांत विप्रें अश्व घातला ॥ ३६ ॥ तेव्हां औदुंबरासमीप शिवशंकर । खेळत बैसले होते दिगंबर । अश्व तेव्हां अटकला द्वारांत प्रहर । लोक चमत्कार विलोकिती ॥ ३७ ॥ मग सदनांतून वदती मृत्युंजय । कां रे दृष्टांताचे पेढे भुललासि काय । ते आणिल्यावांचून तुझा हय । हलणार नाहीं सर्वथा ॥ ३८ ॥ बाहेर त्या ब्राह्मणासहित सगळे । ऐकती उघडूनि श्रोत्र डोळे । शूली ब्राह्मणासि पुसती तेव्हां बळें । काय नवस केलासि ॥ ३९ ॥ विप्र वदे ऐका हो समस्त । हे अंतर्साक्षी परमेश्वरचि साक्षात् । मीं अंतर्यामीं जाणिलें शंकारहित । याचि देहांत याच कालीं ॥ १४० ॥ मी सप्ताह करित होतों नृसिंहवाडींत । तेव्हां बोललों होतों नवस सत्य । कीं मजला होईल देवदृष्टांत । तरी सवारुपयाचे पेढे वांटीन ॥ ४१ ॥ तदनुसार दृष्टांत होऊन । प्रस्तुत येथें पातलों दर्शनालागून । परी दर्शना अगोदर माझें मन । जाणिलें सद्गुरुनाथांनीं ॥ ४२ ॥ ऐसें विप्रें वदूनि साष्टांगनमन । घातलें, पेढे आणवून । म्हणे क्षमा करा हो जगज्जीवन । कृपानिधि प्रभुराया ॥ ४३ ॥ मग

परमात्मा दयानिधि वळले। घोडें मागल्यामागें बाहेर सरकलें। हें कौतुक पाहूनि सगळे भ्याले। दंग झाले अंतरीं ॥ ४४ ॥ नंतर आंत जाऊनि शूली ब्राह्मण। आलिंगी दृढ भगवच्चरण। श्रीफल पेढेआदिकरूनि समर्पण। अनन्य शरण जाहला ॥ ४५ ॥ तदा देवाधिदेवें पितळेचा मुखवटा। लाविला क्षणमात्र विप्राचे पोटा। सामर्थ्यातिशयाचा स्पर्शतां झपाटा। गेला तत्काळ पोटशूळ ॥ ४६ ॥ समर्थांच्या करस्पर्शें विप्रोदर व्यथा। क्षणार्धें नष्ट झाली निःशेष सर्वथा। ऐशा तारक श्रीगुरुलीलारूप कथा। किती म्हणून वर्णाव्या ॥ ४७ ॥ असो त्या द्विजें करूनि योगींद्र पूजन। यथाशक्ति केलें ब्राह्मणभोजन। मग करी स्तुतिस्तवन। सद्गुरूचें अपार ॥ ४८ ॥ समर्थांचें सद्यश जयघोषें गर्जत। विप्र गेला आपले नगरीं उल्हासित। ऐसें जे जे प्राशिती गुरुलीलामृत। पावती यथेप्सित सकळ ते ॥ ४९ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत। वेदशास्त्रपुराणार्थमथित। ब्रह्मनिष्ठ वामनविरचित। एकविंशाध्याय गोड हा ॥ १५० ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे एकविंशोऽध्यायः समाप्तः ॥ २१ ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय बाविसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्तात्रेयदिगंबराय नमः ॥ ॥ शिष्य प्रार्थी गुरुवक्त्यालागून। श्रीगुरुहरिलीलामृतप्राशनाविण। निरर्थक जाऊं न द्यावा अर्धक्षण। हरिगुरुभक्तदासांनीं ॥ १ ॥ मन होईल कामादिविकारवंत। अथवा संकल्पें बाह्यपदार्थीं जात। तेणें विक्षेप येतसे श्रवणादिकांत। अभ्यासीं विरक्त मुमुक्षु ते ॥ २ ॥ म्हणूनि त्या चंचल मनासि अवसर। कधीं च कोणी न द्यावा क्षणभर। मन होतांचि सविकार। विवेकें सत्वर परतूनि आणावें ॥ ३ ॥ संकल्पवृत्तिचें अवश्य निरोधन। केलेंचि पाहिजे विवेकयोगेंकरून। मनोवृत्तीचें सर्व लय उत्थान। जाणूनि निर्विकार साक्षित्वें ॥ ४ ॥ ज्ञानामृत प्राशूनि स्वस्थ असावें। जनांसि सन्मार्गीं लावावें। त्यावांचूनि दग्धोदरार्थ म्हणवावें। आपणासि श्रेष्ठ निरर्थक ॥ ५ ॥ म्हणूनि भगवान् सद्गुरुनारायण। त्याचेचि गुणानुवादगायन। लीलामृत श्रवणें पान। अखंड करवा हो गुरूजी ॥ ६ ॥ गुरु अत्युल्हासें तदनंतर। प्रशस्त वर्णिती लीलामृतसागर। परिसा श्रोते भाविक चतुर। एकाग्रचित्तेंकरूनि ॥ ७ ॥ सद्गुरुवांचूनि परमागति। न घडे कोणासिही कदा कल्पांतीं। ऐसें वेदशास्त्रपुराणादि सांगती। महात्मा संत योग्यादिक ॥ ८ ॥ योगावांचूनि परमावृत्तिनिरोध। विद्येवांचूनी कविताप्रबंध। नासिकाविरहित सुगंध। कधीं न होय कोणातें ॥ ९ ॥ विद्याविहीन ब्राह्मण। नदी-कूप-तडाग उदकाविण। सत्यावांचून केवल प्रमाण। स्मरणाविण पठण व्यर्थ असे ॥ १० ॥ दीपप्रकाशावांचून मंदिर। पतिविरहित रमणी सुंदर। देवसभारहित स्वर्गीं पुरंदर। वनस्पतीविण मंदर निस्तेज दिसे ॥ ११ ॥ पायांवांचून तीर्थाटण। हस्तांवांचून धर्मदान। वाणीविरहित संभाषण। तैसें

गुरूविण ज्ञान व्यर्थंचि असे ॥ १२ ॥ सुस्वरावांचून गायन । वृक्ष पुष्पपत्रफलावांचून । अथवा धेनु दुग्धविहीन । पुरुषत्व शून्य निरुपयोगी असे ॥ १३ ॥ सदाचाराविण आचार्य । द्रव्यावांचून औदार्य । पराक्रमविहीन शौर्य । धैर्याविण कार्य होणार नाहीं ॥ १४ ॥ पिळावांचून दोरडें । शांतिविरहित थेरडे । मायेवांचून रडें । कदा कामासि नये ॥ १५ ॥ सामर्थ्याविरहित करभार । इक्षुरसाविण साकर । धन्यावांचून चाकर । पिष्टाविण भाकर होत नसे ॥ १६ ॥ सत्तेवांचूनि शहाणपण । परिचयविरहित संभाषण । शास्त्राविरहित प्रमाण । कारणाविना कार्य न होय तें ॥ १७ ॥ मातेवांचून बालक । परमेश्वराविना पालक । कालावांचून भक्षक । स्त्रीविना शालक बोलूंचि नये ॥ १८ ॥ भक्तावांचून देव । शरीरावांचून दैव । धनाविरहित वैभव । ब्राह्मणाविण भूदेव शोभत नसे ॥ १९ ॥ पर्जन्यावांचून धान्य । भूपतीविरहित सैन्य । कुटुंबाविना दैन्य । विनयाविण विद्या व्यर्थ दिसे ॥ २० ॥ पतिव्रतेवांचूनि सहगमन । पाचाराविण आगमन । श्रद्धेवांचून देवतोपासन । देवाविण देवालय शोभत नसे ॥ २१ ॥ पश्चात्तापाविण विरक्ति । सत्पुरुषावांचून शांति । ज्ञानावांचून अपरोक्षानुभूति । ज्ञाते न मानिती सहसाही ॥ २२ ॥ साहित्यावांचून पाक । सुगरणीविना स्वयंपाक । अभ्यासावांचूनि परिपाक । पक्काविण रुचि होत नसे ॥ २३ ॥ अन्नाविण प्राणेंद्रिय ग्राम । प्राणावांचूनि पराक्रम । पराक्रमहीन जयसंग्राम । योग्यावीण प्राणायाम होत नाहीं ॥ २४ ॥ अग्नीवांचूनि उष्ण । गोकुलविरहित श्रीकृष्ण । साधूवांचूनि विगततृष्ण । रहात नसे कदापि ॥ २५ ॥ मंत्रविरहित जप । ब्रह्मचर्यावांचूनि तप । स्नेहविरहित दीप । व्यापाविण संताप होणेंच नाहीं ॥ २६ ॥ परमेश्वरावांचून सहाय । यत्नसाह्याविण सिद्ध कार्य । शरीररहित अवयव सत्य । दयेविण हृदय म्हणूंचि नये ॥ २७ ॥ देवमूर्तीविना मंदिर । गणपतीवांचूनि उंदीर । भगवंताविरहित इंदिरा खरोखर । शोभत नसे कदापि ॥ २८ ॥ नवग्रहांवांचूनि वक्र । शत्रुवांचूनि परचक्र । दुग्धावांचूनि तक्र ।

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

चक्रहीन रथ कैसा व्हावा ॥ २९ ॥ समर्थावांचूनि कल्याण । व्यासावांचूनि पुराण । हरिदासाविण कीर्तन । वक्त्याविण निरूपण कोणीं करावें ॥ ३० ॥ दात्यावांचूनि याचक । पोथीविरहित वाचक । चुलीवांचूनि पाचक । प्रसंगाविण सूचक काय करी ॥ ३१ ॥ व्याकरणाविना विभक्ति । सद्भावविंरहित भक्ति । ज्ञानावांचूनि कैवल्यमुक्ति । कदा कोणासि उमजेना ॥ ३२ ॥ लोभावांचूनि आसक्त । कलहावांचूनि विभक्त । श्रावणमासाविण व्रतनक्त । देवाविण भक्त होत नसे ॥ ३३ ॥ रोगविकृतीविना मरण । उदकावांचूनि पाट धरण । संकटावांचूनि शरण । देखिल्याविण अनुकरण येत नसे ॥ ३४ ॥ दुर्जनावांचूनि निंदा । प्रयत्नाविण व्यापारधंदा । महाराजाविना गोब्राह्मणवृंदा । प्रतिपालक कोण असे ॥ ३५ ॥ प्रजापतीवांचूनि उत्पत्ति । विष्णुवांचून जगत्स्थिति । महेश्वरावांचूनि संहारशक्ति । कोणासि असे ॥ ३६ ॥ कालमित्तिवांचूनि व्याज । द्रव्यावांचूनि चोज । राजधानीविना नृपराज । कीर्तीविना जन्म साजेना ॥ ३७ ॥ रमणीविना उपभोग । संन्यासविरहित शिखासूत्र त्याग । पुत्रावांचूनि संसार सांग । दैवाविना उद्योग होत नसे ॥ ३८ ॥ सत्पात्रावांचूनि दान । धर्मदानरहित धन । क्षमेवांचूनि व्यर्थ ज्ञान । ज्ञानाविण सकल व्यर्थ असे ॥ ३९ ॥ भरतीवांचूनि सागर । गर्विष्ठावांचूनि अनादर । सद्गुरूवांचूनि पैलतीर । नेण्या कोण समर्थ ॥ ४० ॥ जड शीलेसि नसे तरण्याचें ज्ञान । तैसेंचि बहुगुरु अपहारिती शिष्याचें धन । तयां स्वतरणोपायीं अज्ञान । इतरांसि काय तारतील ॥ ४१ ॥ जटिल मुंडी लुंचितकेश । काषायांबर कृतपरिवेष । उदरनिमित्त बहुकृतवेष । मत पंथ अनेक पोटार्थीं ॥ ४२ ॥ लाखेचे खोटे मुलामी अलंकार । सुवर्णासारिखे दिसती वरवर । खोटें मोतीं खोटें रत्न वरी सुंदर । परीक्षिती चतुर सत्यत्वें ॥ ४३ ॥ खोटी गारगोटी कांच । मौल्यवान् मणि रत्न आणि खरे पाच । सत्यास क्रयविक्रयकालींच । परीक्षिती कांच भिन्न मणि ॥ ४४ ॥ मौल्य देऊन मणि स्वीकारिती । कांच दूर फेंकून देती । कांच पायांदिकासि रुतती । तेणें क्लेश होती अनिवार ॥ ४५ ॥ तैसे भक्तिज्ञान

वैराग्यरहित । दया क्षमा शांतीविरहित । कामक्रोधद्वैषादिसहित । असूयायुक्त धनलोभी ।। ४६ ।। घालितां नृपतीसम
भूषणें । तरी कोण तयासि राजा म्हणे । श्रीदत्तगुरुसारिखीं अनुकरणें । केलिया न बाणे योग्यता ।। ४७ ।। मोर
आनंदें करी सुंदर नृत्य । लांडोराचें तें नव्हेंचि कृत्य । स्वामिराजासमान खेळती भृत्य । ते काय सत्य गुरु योग्य होती
।। ४८ ।। योग्यतारहस्य न जाणूनि बळें । उगेंचि जनां दाविती भाव चाळे । उपासक प्रतिष्ठित प्रसादफळें । देती दोरे
आंगारे जनांसि ।। ४९ ।। जपार्थ शोधिती चिळें । सिंदूर उडीद पुष्पें फळें । जादू टोणे दाटिती खिळे । द्रव्य मिळे
म्हणूनि ।। ५० ।। स्वगुरूसि वाखाणिती । आमचा सांप्रदाय उत्तम म्हणती । अन्य सांप्रदाय धिक्कारिती । कापट्यमति
ते त्यजावे ।। ५१ ।। तांदुळांतील सर्व खडे । निवडल्याविना परिपाक न घडे । नाहींतरी जेवितां दांत पडे । लोक
उघडें हें जाणती ।। ५२ ।। गुरु नसावा विजातीय । जेणें तीर्थप्रसादासि प्रत्यवाय । श्रुत्यर्थबोधश्रवणासि व्यत्यय ।
वर्णाश्रमधर्में येतसे ।। ५३ ।। सर्वप्रकारें प्राप्त संकोच । तस्मात् गुरु विजातीय नकोच । वैदिकधर्मी स्वजातीय साच । गुरु
स्वच्छ दर्पणवत् असावा ।। ५४ ।। श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ आचारवान् पुरुष । तोचि सद्गुरु जाणावा विशेष । त्यावांचूनि परब्रह्म
निर्विशेष । बोधील कोण सविशेषें ।। ५५ ।। वेदाध्ययनपूर्वक । वेदार्थसंपन्न ब्राह्मण वैदिक । तोचि श्रोत्रिय जाणावा सम्यक् ।
ऐसें उपनिषद्-भाष्यकार सांगती ।। ५६ ।। टाकूनि सर्व कर्म फलादिक । केवल अद्वितीय ब्रह्मस्वरूपीं निष्ठा एक ।
म्हणजे ब्रह्मसाक्षात्कार अलौलिक । अभेदनिश्चयें प्राप्त झाला जया ।। ५७ ।। तोचि श्रोत्रिय ब्रह्मवेत्ता ब्रह्मनिष्ठ । ऐसें
उपनिषद्-भाष्यकार स्पष्ट । श्रीमच्छंकराचार्य जगद्गुरु वरिष्ठ । मोक्षप्राप्त्यर्थ बोधिती ।। ५८ ।। ब्राह्मण श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ ।
आचारवान् पुरुष श्रेष्ठ । तोचि ब्रह्मवेत्ता सद्गुरु विद्वद्वरिष्ठ । तयासिच शरण रिघावें ।। ५९ ।। म्हणून विजातीधर्म परहेका ।
जरी पदरीं सत्ता पुष्कळ पैका । तथापि न भ्रष्टवावें लोकां । गुह्य प्रकट रीतीनें ।। ६० ।। श्रुतिशास्त्रें मारिती हाका ।

स्ववर्णाश्रम-धर्मांगें देहशकट हांका । विजातीय परधर्म टाका । भयशोकासि देणारा तो ।। ६१ ।। अंतर्बाह्य निर्मल जे
प्रशांत । कामक्रोधादि विकारविनिर्मुक्त । जितेंद्रिय सदाचारी सत्यवचन परिमित । तयासि गुरुत्व शोभतें ।। ६२ ।। गुरु
परमेश्वरभक्तिपरायण । साक्षात्कारी अध्यात्मज्ञान-निपुण । निरभिमानी नित्य सदाचरण । सर्वभूतीं लीन झाला जो ।। ६३ ।।
चातुर्य शुद्धविवेकपूर्ण । सर्वदा निर्मल ज्याचें अंतःकरण । रसिक प्रेमळ सत्य संभाषण । तयासि गुरुत्व शोभतें ।। ६४ ।।
प्रतिष्ठा-मान-लोभवर्जित । शिष्याचे हृत्ताप जो निवारित । परस्त्री परधन विषय विषवत् । टाकिले खचित जयानें ।। ६५ ।।
निर्मोह ब्रह्मचर्यव्रतें स्थित । वेदोक्तधर्मपरायण सदोदित । मठ महंती-निंदा-असूया-वर्जित । तयासि गुरुत्व शोभतें ।। ६६ ।।
गु-कार प्रथमवर्ण एक । तो मायादिगुणभासक । रु-कार तो परब्रह्म अलौकिक । माया-भ्रांतिविमोचक असे ।। ६७ ।। गु-शब्दें
अज्ञानांधःकार । अंधःकारनाशक तो शब्द रु-कार । अज्ञानतिमिरनाशक ज्ञानभास्कर । भवसागरतारक ‘गुरु’ शब्दार्थ ।। ६८ ।।
सोडविती बंधन दुराग्रह । परोपकारार्थ लोकसंग्रह । निःस्पृह दयालु करिती जनानुग्रह । आग्रहरहित सद्गुरु ते
।। ६९ ।। वैराग्य-भक्तिज्ञानयुक्त मोक्षश्री । परनारीस देखती समानमातुश्री । आत्मसंतुष्ट ज्यांची प्रसन्न मुखश्री । तेचि
श्रीगुरु जाणावे ।। ७० ।। श्रीमंत विद्वान् शिष्य सबल । तच्छंदानुरोधें न वर्तती गुरुप्रबल । अनाथ दरिद्री शिष्याची
आबाळ । न करिती सर्वथा समदर्शी गुरु ।। ७१ ।। ज्ञान-वैराग्य-भक्तीचा मोठा सांठा । वैदिक लौकिक सुयुक्तींचा पुरवठा ।
भवरोगनाशक औषधी संग्रह मोठा । सद्गुरुसदनीं पूर्ण भरला असे ।। ७२ ।। गुरु हेंचि परम तीर्थोदक । अवघीं इतर तीर्थें
निरर्थक । संपूर्ण तीर्थांचें तीर्थोदक । गुरुचरणीं अखंड तिष्ठतसे ।। ७३ ।। ऐसें पार्वतीस कैलासनायक । गुरुगीता-निजरहस्य
एकांतिक । बोधिती निर्भयें परमानंददायक । परमात्मा गुरु सदाशिव ते ।। ७४ ।। तस्मात् गुरुपादोदक नित्य प्राशन ।
करावें गुरूचें उच्छिष्ट भोजन । गुरुमंत्राचें अखंड चिंतन । गुरुस्तोत्रपठण सदा कीजे ।। ७५ ।। ध्यानासि मूलाधार गुरूची

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

मूर्ति । पूजेसि मूल गुरुचरण असती । गुरुवाक्य हेंचि मूलमंत्रबीज शंकर वदती । मोक्षासि मूल गुरुकृपा पाहिजे ॥ ७६ ॥
मूल सद्गुरुमूर्तीचें करावें ध्यान । गुरुपदांचेंचि मूलपूजन । तारकमंत्र गुरुवचनप्रमाण । मुक्तीसि मूल गुरुकृपा असे ॥ ७७ ॥
ब्रह्मात्म अपरोक्ष अभेदज्ञान । श्रीगुरु-पूर्णकृपेवांचून । न होय हेंचि सत्य वचन । अनुभवून पहावें ॥ ७८ ॥ श्रीगुरुस्वामी-
समर्थ-कृपा । तेणें चुकती जन्ममरणखेपा । त्या प्रभूवांचूनि त्रिविधसंसारतापा । कोण दूर करील ॥ ७९ ॥ 'हुं कृत्य तूं कृत्य'
सद्गुरुप्रति । कधींहि न करावी प्रसक्ति । सद्गुरूची मर्यादा पाळिती । प्रज्ञशिष्य सदोदित ॥ ८० ॥ गुरुचरणांची
मृत्तिका । भालीं स्पर्शलिया सर्वसुखदायका । जैशा निर्दोष कल्याणकृतिका । तुषारही वर्षतां शुभप्रद ॥ ८१ ॥ म्हणून इतर सर्व
गुरु टाकून । ब्रह्मवेत्ते सद्गुरूसि व्हावें अनन्यशरण । तेचि चतुर्विधपुरुषार्थसिद्धिज्ञान देऊन । सोडविती बंधन सकलांचें ॥ ८२ ॥
ऐशा उत्तम सद्गुरूचें आख्यान । संक्षेपें परिसा संतसज्जन । मोगलाई प्रांतांत ग्राम कल्याण- । नामें प्रसिद्ध वर्ततसे ॥ ८३ ॥
कल्याणनगरवासी ब्राह्मण एक । सद्गृहस्थ मनोहर नाईक । त्यांची पत्नी बयाबाई नामक । पतिव्रता सात्त्विक शोभतसे ॥ ८४ ॥
त्या साध्वीस ईश्वरकृपेंकरून । प्राप्त जाहलें ज्येष्ठ सुपुत्ररत्न । दादासाहेब नामाभिधान । दिवसेंदिवस वाढले ॥ ८५ ॥
ते गृहस्थाश्रमी असतांही । प्रपंचाचें वारें त्यांस स्पर्शलें नाहीं । स्नानसंध्यानुष्ठानाविण कांहीं । न जाणती पुत्र नाईकाचे
॥ ८६ ॥ नंतर मनोहरनाइकें भावेंकरून । केलें दत्तात्रेय-परमात्माराधन । तेणें दत्तावधूत प्रसन्न होऊन । देती दर्शन
तयासि ॥ ८७ ॥ दत्तात्रेय वदती आम्ही तुमचे पोटीं । अवतरतों जगदुद्धारासाठीं । पुन्हा होईल प्रत्यक्षभेटी ।
ऐसें बोलून अदृश्य जाहले ॥ ८८ ॥ पुढें मनोहरपत्नीच्या उदरीं । उत्पन्न जाहले गुरुगिरनारी । श्यामसुंदर मूर्ति गोजिरी ।
देखूनि नरनारी आनंदती ॥ ८९ ॥ तयाचें नाम ठेविलें 'माणिक' । बाल्यावस्थेपासूनि प्रामाणिक । परमानंदावांचूनि
नेणे आणिक । परमार्थप्रकाशक विराजे ॥ ९० ॥ मौंजीबंधनांत गायत्रीमंत्र । उच्चारीना मनोहरपुत्र । त्यायोगें

खिन्न झाले सर्वत्र । म्हणती द्विजत्व कैसें साधेल ॥ ९१ ॥ ब्रह्मज्ञानांत न यावा उणेपणा । अंगीं विशेष न जडावा
कर्मठपणा । तथापि लोकसंग्रहार्थ आपणा । जगद्धितार्थ वर्तणें योग्य असे ॥ ९२ ॥ ऐसा मानसीं करूनि योग्य विचार ।
मातृभिक्षाकालीं तो द्विज दिव्यपुत्र । चारी वेदांचे मंत्र वारंवार । सार्थगायत्रीसह गर्जतसे ॥ ९३ ॥ तें देखूनि सर्वांसि
वाटलें कौतुक । म्हणती हा सत्पुरुष आहे कारणिक । मायाप्रपंचविरहित तारक । प्रकटलें माणिक खचित हें ॥ ९४ ॥
पुढें कल्याणग्राम सोडून । जनींविजनीं करिती पर्यटन । पांचाळेश्वरीं श्रीहनुमान । त्या देवळांत राहिले ॥ ९५ ॥
चोरादिकांसि चमत्कार दाखवून । सोडविला कुटुंबवत्सल ब्राह्मण । पुन्हा कल्याणास येऊन । सर्वांस भेटून निघाले॥ ९६ ॥
थोरले बंधु बैसले अनुष्ठानीं । मधले माणिक हिंडती निरंजनीं । धाकटे बंधु नृसिंहराव अनुदिनीं । गृहस्थाश्रमीं वर्तती
॥ ९७ ॥ शिष्यांसहित मंठाळ सोडून । मैलारास माणिक जाऊन । चंपाषष्ठीचा उत्साह ब्राह्मणभोजन । शिव मल्लारीचें
करविती ॥ ९८ ॥ भालकीग्रामाच्या अरण्यांत । समाधि लावून बैसले गुहेंत । एकसंवत्सरपर्यंत राहून उत्थित । जाहले
माणिक समारंभें ॥ ९९ ॥ सहस्रावधि जन येती दर्शनास । आनंदें फेडिती नवस सायास । ज्या ज्या स्थानीं माणिकप्रभूंचा
वास । तेथें समारंभ मोठे होताति ॥ १०० ॥ पहाडगांव राजुरी पंढरपुर । मंगळवेढें बेदर आणि स्थानें इतर ।
मुधोळ संस्थानांत मासद्वय संचार । करिती परोपकारी माणिक ॥ १ ॥ बेदराहून राजुरीस येऊन । केली दत्तात्रेयाची
गादी स्थापन । काष्ठाचें सोडगें आणि प्रसाद घेऊन । संतुष्ट जन सर्वदा ॥ २ ॥ हुमणाबाद आणि
ग्राम-गडवंती । त्या दोन्ही ग्रामाचे वनांत मध्यवर्ती । जुनें शिवालय आणि उदककुंड हीं शोभती । परंतु तस्करोपद्रव बहु असे
॥ ३ ॥ त्या शिवालयीं उतरले ब्राह्मण । तेव्हां तस्करीं केलें त्यांचें सर्वस्व हरण । तेथें तात्काल माणिकें प्रकटून । केलें संरक्षण
भक्तांचें ॥ ४ ॥ मारेकऱ्यांचे दोन्ही कर । तटस्थ राहिले वरचेवर । मग माणिकप्रभूस शरण आले तस्कर । दंडवत वारंवार घालिती

॥ ५ ॥ प्रभूची अघटित करणी । अपराध्यांचे हात बैसले ठिकाणीं । मग समाधि होईपर्यंत त्या स्थानीं । दत्ताची गादी स्थापूनि राहिले ॥ ६ ॥ उत्तम मार्गशीर्ष मासांत । दत्तगुरूचें गादीस्थान झालें स्थापित । दोन वापिका बांधिल्या त्यांत । विपुल मधुरोदक निघालें ॥ ७ ॥ माणिकप्रभुसाठीं उत्तम स्थान । भव्य रमणीय बांधवून । वसविला सुंदरग्राम नूतन । 'माणिकनगर' नांवाचा ॥ ८ ॥ प्रभूसाठीं स्थान एकांतिक । बांधवूनि स्वच्छ सम्यक् । त्या गुहेंत ब्रह्मानंदीं निमग्न माणिक । प्रभु सप्ताह बैसती ॥ ९ ॥ श्रीदत्तात्रेयगादी सन्मुख । वेदमंत्र जागरण अनुष्ठान मख । पुराण कीर्तन भजन सुरेख । नृत्य गीत वाद्यादि चालतसे ॥ ११० ॥ निर्वैर निर्द्वेष हिंदु आणि यवन । माणिकप्रभूंचें करिती सेवन । सत्कीर्ति पसरली असंख्य जन । द्रव्य वेंचून येती दर्शना ॥ ११ ॥ पुढें मनोहरनाईक वारले । कल्याणचें सर्वमंडळ पातलें । माणिकनगरीं स्वस्थ राहिले । देहसार्थक व्हावया ॥ १२ ॥ पहारेकरी भालदार चोपदार । प्रभूंचें यश वर्णिती अपार । 'भक्तकार्यकल्पद्रुम' जयजयकार । दत्तजन्मोत्साह थोर होतसे ॥ १३ ॥ माणिकप्रभु सिद्धपुरुष । वेदान्तविज्ञानयोग-विशेष । तीव्रवैराग्ययुक्त दया संतोष । हर्षामर्षविरहित ते ॥ १४ ॥ यज्ञेश्वरवैद्य अहमदनगरकर । ज्यासि म्हणती बापू दीक्षित द्विजवर । ते प्रभूसमीप कांहीं संवत्सर । आज्ञातत्पर वसत होते ॥ १५ ॥ यज्ञेश्वराचे पुतणे विश्वनाथ । वैद्य जे वाल्मिकग्रामस्थ । वैदिकधर्मपरायण सत्त्वस्थ । शुद्धमानस विद्वान् असे ॥ १६ ॥ माणिकप्रभूंचे सेवेसि । विश्वनाथ वसती त्या समयासी । तैसेंचि अक्कलकोटचे रहिवासी । बाबासबनीस होते ते ॥ १७ ॥ नित्य नेमें सायंकालीं । दर्शनार्थ जमती मंडळी । संतचरित्रें गाती प्रभूजवळी । विणामृदंगटाळघोषें ॥ १८ ॥ तों अकस्मात् दाटली प्रभा । सूर्यप्रकाशाहून अधिक शोभा । जैशी स्वर्गांतील इंद्रसभा । मध्यें उभा महेश्वर ॥ १९ ॥ तथा दिव्य सुंदर तेजःपुंज । संन्यासी एक पुराणशाश्वत अज । अपूर्व देखिले योगिराज । भक्तवत्सल यतीश्वर ॥ १२० ॥ समागमें संन्यासी दोन । जैसे ब्रह्माविष्णुमहेश्वर

तीन । त्यांत एक ब्रह्मसनातन- । स्वरूप दिसतसे सकलांसी ॥ २१ ॥ मग माणिकप्रभु धांवले । प्रणिपात करूनि
आलिंगिलें । यतीश्वरासि आदरें बैसविलें । उत्तमासनावरी तेधवां ॥ २२ ॥ कंठीं घातले सुगंध पुष्पहार । बाजूस बैसविले
संन्यासी इतर । ‘गुरुदेवदत्त’नामाचा गजर । भरला आनंद परिपूर्ण ॥ २३ ॥ तदा प्रभु पुसती यतीन्द्रनारायणा ।
कोठोनि जहालें आगमना । काय असेल जी महदाज्ञा । कळावी प्राज्ञा मुनीश्वरा ॥ २४ ॥ नंतर वदती यतीश्वर । आपण
अंतर्साक्षी सर्वज्ञ निर्विकार । महापुरुष विवेकचतुर । जगदुद्धारार्थ तिष्ठतसां ॥ २५ ॥ मग माणिकप्रभु बोलती । बाबासबनीस
ब्राह्मणाप्रति । हे भवतारक सद्गुरु जगत्पति । यतियूथस्वामी जाणावे ॥ २६ ॥ थोडे दिवसांत अक्कलकोटीं ।
ब्रह्मांडनायक अनंतकोटि । विराजतील जगदुद्धरणासाठीं । खूण दृढ पोटीं द्विजा धरीं रे ॥ २७ ॥ तैसेंचि सांगती विश्वनाथा ।
हृदयीं धरावें दत्तस्वामीसमर्था । पूर्ण करितील मनोरथा । शुद्ध परमार्थ अर्पूनि ॥ २८ ॥ तुमच्यांतील जे कनिष्ठ ।
वामनराव वैद्य एकनिष्ठ । या योगीश्वराचें कृपें ब्रह्मनिष्ठ । होतील श्रेष्ठ सर्वत्र ॥ २९ ॥ श्रीमद्दत्तात्रेय-संप्रदाय ।
वाढवितील देवमार्ग अद्वितीय । संसार परित्यागूनि निःसंशय । गुरुपादपद्म अक्षय सेवितील ॥ १३० ॥ तदनंतर उभयतांनीं
प्रसाद । दिधला विश्वनाथासि आशीर्वाद । ‘स्वस्थ आनंदांत असां’ ऐसें सच्चिदानंद । जगद्वंद्य वदले प्रेमें ॥ ३१ ॥
मग सर्व मंगलआरती । प्रियभक्तवृंद ओंवाळिती । आनंदें भगवच्चरित्रें गाती । गर्जती गुरुदत्तात्रेयनामें ॥ ३२ ॥ महत्पुरुषसमर्थ
ते द्वय । सर्वरात्र ब्रह्मानंदमय । बैसले होते ऐक्यत्वें निरामय । तेथें प्रवेश अन्याचा नव्हता ॥ ३३ ॥ दुसरे
दिवशीं यतीन्द्रतिलक । बाबासबनीसाचे मनांतील जे तर्क । त्या तर्कांचें समाधान निःशंक । करिती अंतर्साक्षित्वें ॥ ३४ ॥
तत्काल द्वयसंन्यासी संगें घेऊन । योगिराजस्वामी अवधूतनिरंजन । माणिकप्रभूचा निरोप विचारून । गेले स्वेच्छाचारी ते
॥ ३५ ॥ नंतर बाबासबनीसास । माणिकप्रभु आज्ञापिती खास । तुम्हीं जावें अक्कलकोटास । जगद्गुरु लवकर येतील

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

॥ ३६ ॥ कांहीं दिवस गेल्यानंतर । सबनीस महीपति रामचंद्र । माणिकप्रभूंच्या आज्ञेनुसार । बाबा पातले अक्कलकोटीं
॥ ३७ ॥ सांगती सर्वांसि मंगलवृत्तशुभ । अनायासें प्राप्त होईल अलभ्यलाभ । येथें शीघ्र येतील विश्ववल्लभ । अवतारिक पुरुष
यतीश्वर ॥ ३८ ॥ असो इकडे माणिकनगरांत । सकलयोगैश्वर्य जाहलें प्राप्त । त्या कालीं मध्यायुअवस्थेंत । होते
शोभत माणिकप्रभु ॥ ३९ ॥ माणिकप्रभुचें आशीर्वचन । प्रसादफलादि आज्ञा घेऊन । विश्वनाथ वैद्य वामोरीस येऊन ।
आनंदरूपें राहिले ॥ १४० ॥ जननी-जनकादिकांसि । सांगती शुभविजय-वर्तमानासि । माणिकप्रभूचे स्थानीं अद्भुतसंन्यासी ।
अवतारिक तेजस्वी आले होते ॥ ४१ ॥ तयांनीं कंठांतील पुष्पहार । घातला वामनाचे गळ्यांत शुभकर । प्रसाद अर्पूनि
मधुर । आशीर्वचनें गौरविलें ॥ ४२ ॥ पुढें गेलिया दोन संवत्सर । वामनाचा झाला मौंजीबंधन संस्कार । मग दत्तात्रेयस्वामीची
भक्ति निरंतर । वेदाध्ययन वामन करितसे ॥ ४३ ॥ आणि शालोपयोगी अभ्यास । तोही अवगत झाला
वामनास । असो इकडे माणिकनगरास । वर्तलें वृत्त परिसावें ॥ ४४ ॥ प्रभूंचे बंधु आणि जननीस । पंचत्व प्राप्त होऊनि
झाला कैलासवास । प्रभूंनीं ब्रह्मज्ञान बोधूनि त्यांस । जन्ममरणबंधन-मुक्त केलें ॥ ४५ ॥ तेव्हां जगद्गुरु श्रीशंकराचार्य ।
आद्य शृंगेरीमठाचे अध्वर्य । माणिकप्रभूसि यथायोग्य । सत्कारपूर्वक भेटूनि गेले ॥ ४६ ॥ त्यानंतर थोडे दिवसांत ।
प्रभूचे कनिष्ठबंधु प्रख्यात । नृसिंहराव तात्या पुरुष संत । वैकुंठवासी जाहले ॥ ४७ ॥ त्यांना चिरंजीव असती दोन ।
ज्येष्ठ मनोहरआप्पा म्हणून । प्रभूंनीं त्यास गादीवर बैसवून । समारंभ थोर करविला ॥ ४८ ॥ कनिष्ठ ते ग्रहस्थाश्रमांत ।
वेदोक्तधर्ममार्गी विध्युक्त । यथायोग्य वर्तती सदोदित । प्रभुआज्ञांकित झालेले ॥ ४९ ॥ मार्गशीर्षमासीं दत्तजयंती- ।
उत्साहसमारंभ उत्तम रीतीं । होतसे प्रतिसंवत्सरीं लोक येती । दूर समीप देशींचे ॥ १५० ॥ माणिकप्रभूंनीं अनेक लीला ।
चमत्कृतिसाक्षात्कार दावूनि जनांला । लाविलें वैराग्यभक्तिज्ञान-मार्गाला । अनादि वेदआज्ञेनुसार ॥ ५१ ॥ गुरुदत्तात्रेय

स्वामीदिगंबर । अक्कलकोटीं प्रकटल्यावर । सत्कीर्ति प्रकाशली सविस्तार । अपार अगम्य अलौकिक ॥ ५२ ॥ मग संतोषें माणिकप्रभूंनीं । मार्गशीर्ष शुक्ल दशमी शुभदिन पाहूनि । विद्वान् वैदिक ब्राह्मण पाचारूनि । संन्यास-दीक्षा घेतली ॥ ५३ ॥ त्याच दिवशीं अक्कलकोटांत । स्वामी समर्थ वदती दत्तावधूत । माणिकेश्वर होऊनि चतुर्थाश्रमी संन्यस्त । उद्यां प्रातः समाधि घेतसे ॥ ५४ ॥ ऐसे महापुरुष असती विरल । म्हणूनि दुःखी झाले लोक सकल । परमेश्वरसत्तेपुढें बल । चालत नाहीं सर्वथा ॥ ५५ ॥ दुसरे दिवशीं एकादशीस । माणिक समाधिस्थ झाले निजानंदास । पारचि नाहीं त्या वियोगदुःखास । अवतारिक सिद्धपुरुषाच्या ॥ ५६ ॥ जडदेहमतिदृष्टीनें वाटतें गेले । परंतु विदेहचैतन्यस्वरूप पूर्ण भरलें । तथापि प्रियभक्तांसि आपलें । पूर्वगुणरूप दाविती ॥ ५७ ॥ धन्य धन्य त्या सद्गुरुची लीला । अपार न वर्णवे कवणाला । म्हणून करितों साष्टांग नमनाला । तुमच्या वामनाला सांभाळा ॥ ५८ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । द्वाविंशतितमाध्याय रसिक हा ॥ १५९ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे द्वाविंशतितमोऽध्यायः समाप्तः ॥ २२ ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय तेविसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्तात्रेयगुरवे नमः ॥ ॥ शिष्य गुरुवक्त्यासि विनवी । पट्टशिष्य-लक्षणें परमार्थिक बरवीं । संक्षेपें कथिलीं तीं सांगावीं । विस्तारपूर्वक मजलागीं ॥ १ ॥ डोईस वाढवूनि केश । भूतें बोलविती धरूनि धनोद्देश । अंगारे धुपारे मंत्रोपदेश । परमार्थ ज्ञानविहीन देती ॥ २ ॥ वेदोक्त सनातन आदिधर्म । वेदविहित स्ववर्णाश्रम प्रथम । आचरावें निष्कामकर्म । शुद्धांतःकरण व्हावया ॥ ३ ॥ वेदाध्यायनपूर्वक । श्रुत्यर्थसंपन्न श्रोत्रिय म्हणावा सम्यक् । सर्वकर्मफलेच्छात्यागपूर्वक । परब्रह्मस्वरूपीं निष्ठा असूनि ॥ ४ ॥ ब्रह्माद्वितीयस्वरूपीं केवल । अभेद साक्षात्कार निश्चल । महावाक्यार्थजनित सोज्ज्वल । स्वात्मानुभव झालेला ॥ ५ ॥ गृहस्थ वनस्थ यति ब्रह्मचारी । कोणीही असो परी सदाचारी । दृढतर बोधसामर्थ्य त्याहीवरी । परोपकारीं तत्पर असे ॥ ६ ॥ तोचि श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ । श्रुतिशास्त्रीं वर्णिती ब्रह्मवरिष्ठ । विजितेंद्रिय निःस्पृह एकनिष्ठ । कामक्रोधविवर्जित ऐसा ॥ ७ ॥ याहूनि विरहित इतर । नानावेषधारी ढोंगधत्तुर । उदरनिमित्त बहु वेरझार । करणारे ते निरुपयोगी ॥ ८ ॥ अथवा नुसते व्याख्यानकुशल । अंतरीं नसे अनुभवाची ओल । चित्तभ्रमणकारक शब्दजाल फोल । कष्टद महारण्य ॥ ९ ॥ हृदय कोरडें ज्ञानविटाळ । वरिवरी सोंग वीणा मृदंगटाळ । स्वामिरायासारिखे लीलाखेळ । करिती बाष्कळ कपटी ते ॥ १० ॥ ते नव्हती मोक्षाधिकारी । भक्ति दाविती दांभिक परोपरी । ते त्यागावे अति दूरी । परमार्थी अनहितकारी स्वार्थी जे ॥ ११ ॥ त्यांचे संगें व्यवहारिक फलप्राप्ति । होत ऐशी मूढांसि मोहभ्रांति । तेणें नादी भोळे भाविक फसती । अंतीं

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

प्रतीति निष यथा ॥ १२ ॥ ते पट्टशिष्य नव्हती सर्वथा । आंचवले मुख्य परमार्था । तत्संग घातक नरकपथा । नेणारा
म्हणून धिक्कारिजे ॥ १३ ॥ चांगलें वाईट हें कळावें । खरें खोटें ओळखूनि घ्यावें । सुज्ञजनीं सारासार समजावें । यथार्थ
उमजावें स्वविहित ॥ १४ ॥ देवपदारूढ राज्यपदारूढ । होती तयांसि वस्त्रालंकार गाढ । पट्टाभिषेक राज्याभिषेक
अमूढ । करूनि अर्पिती अधिकार ते ॥ १५ ॥ मंत्री प्रधानादिकांसि । देती श्रेष्ठाधिकार प्रसंगासि । यथा शास्त्रीय लौकिक-
पद्धतीसि । वस्त्रादि अर्पिती समारंभें ॥ १६ ॥ तथा संतमहंतांच्या आसनीं । समारंभपूर्वक मठसंस्थानीं । आधिपत्य पारमार्थिक
शिष्यालागूनि । स्थापिती योग्य पट्टशिष्या ॥ १७ ॥ ब्रह्मविद्यासंपन्न सदाचारी । निरभिमानी जो निर्विकारी । हरिगुरुभक्त
परोपकारी । तोचि पट्टशिष्य बोलिजे ॥ १८ ॥ तेचि साधुमहात्माअवतारिक । पूर्णब्रह्मस्वरूप अलौकिक । लोकानुग्रहार्थ
अमानुषिक । अघटित कृत्यें करिताति ॥ १९ ॥; श्रोतीं व्हावें यदर्थीं सावधान । परिसावें चिदंबरदीक्षिताख्यान ।
तेणें वांच्छितार्थ प्राप्त होऊन । परमार्थही उमजेल ॥ २० ॥ गुरु म्हणती ऐक बा रे । यथा शास्त्रीयलौकिकप्रकारें ।
पट्टशिष्य विरल सात्त्विक रे । मुख्य परमार्थिक असती ते ॥ २१ ॥ कर्नाटकप्रांतीं मुरगोडग्राम । मलप्रभा
नदीतीरीं सुंदर परम । आहे प्रसिद्ध सत्पुरुषधाम । विश्रामक्षेत्र जनांसि ॥ २२ ॥ त्या ग्रामीं मल्हारदीक्षित ।
यजुर्वेदी ब्राह्मण नामांकित । प्रथम कण्वशाखी सद्धर्मरत । शिवभक्त तो वसतसे ॥ २३ ॥ त्यासी नव्हतें पुत्रसंतान ।
त्यायोगें मल्हारदीक्षित खिन्न । म्हणे करावें ईश्वराराधन । अनुष्ठान कोठें जाऊनि ॥ २४ ॥ श्रीरामेश्वरासमीप सुंदर ।
आहे चिदंबरेश्वराचें मंदिर । विप्रें तेथें जाऊनि प्रखर । तपश्चर्या आरंभिली ॥ २५ ॥ दीक्षितासि तेथें झालें स्वप्न ।
विप्रा तुजला सप्तजन्म जाण । प्राप्त न होय पुत्रसंतान । पाहूनि जागृत द्विज झाला ॥ २६ ॥ मग करीतसे द्विज प्रार्थना ।
श्रीभगवंता गिरिजारमणा । सुपुत्र व्हावा ऐशी वासना । दयाघना पूर्ण करा ॥ २७ ॥ दीक्षितांचें शुद्धांतःकरण ।

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

ओळखूनि ईश्वर आपण । वदती तुझे स्त्रीचे उदरीं जाण । येतों पुत्र होऊनि ॥ २८ ॥ ईश्वरवचन करूनि श्रवण । हर्षभरित होत्साता ब्राह्मण । पूजा नैवेद्य करूनि अर्पण । आला विजयी स्वगृहीं ॥ २९ ॥ पुढें थोडे दिवसांत सती । विप्रस्त्री झाली गर्भवती । नवमास भरतां प्रसूती- । समय प्राप्त जाहला ॥ ३० ॥ त्या काळीं मल्हार दीक्षितास । स्त्रिया सांगती बाहेर जायास । तथापि दीक्षित एके बाजूस । बैसले गुप्तरीतीनें ॥ ३१ ॥ इतक्यांत भार्या प्रसूत होऊन । निर्माण झालें पुण्यवान पुत्ररत्न । पुत्राचे कर्णीं बिल्वपत्र देखून । मल्हारदीक्षित आनंदले ॥ ३२ ॥ जातकर्मादिक साङ्ग केलें । म्हणती ममगृहा प्रत्यक्ष ईश्वर अवतरले । ‘ चिदंबर ’ ऐसें नाम ठेविलें । सर्वांनीं नमिलें बालकासि ॥ ३३ ॥ आश्चर्य वाटलें सकळिकां । दिन दिन वयोवृद्धि पावली बालका । मौजीबंधन वेंचूनि धनादिकां । शास्त्रविहित जाहलें ॥ ३४ ॥ एक दिवसीं होतें गजगौरीव्रत । पूजा सांगा चला हो दीक्षित । ऐसें लोक पाचारिती समस्त । तों दीक्षित स्नानसंध्येंत बैसले ॥ ३५ ॥ कर्मनिष्ठ दीक्षित मल्हार । पुत्रासि सांगती बा रे चिदंबर । पूजा सांगावया जावें सत्वर । हें ऐकूनि चिदंबर निघाले ॥ ३६ ॥ सद्गृहस्थाचे घरीं समारंभ । पूजापठणासि केला प्रारंभ । मांडिले गणपतीस जलकुंभ । देवताआवाहन चालिलें ॥ ३७ ॥ उभे राहिले साक्षात लंबोदर । म्हणती धन्य धन्य चिदंबर । होशील प्रख्यात शिवावतार । यज्ञयागादि करशील बा ॥ ३८ ॥ मृत्तिकेचा गज होता रचिला । तो सजीव होऊनि चालूं लागला । देखूनि ऐसें अखिलजनांला । अघटित आश्चर्य वाटलें ॥ ३९ ॥ मल्हार दीक्षितासि वर्तमान । कळल्यावरी आले धांवून । उभे राहिले कर जोडून । वदती भगवान प्रत्यक्ष आहां ॥ ४० ॥ जें जें कराल तें सिद्ध होईल । तुम्ही चिदंबरेश्वर शोभतां केवल । परंतु हें घोर कलियुग प्रबल । पाठीं लागतील जन बहु ॥ ४१ ॥ अवतारकृत्य कारणप्रसंगीं । अवश्य प्रकट व्हावें जगीं । सविनय प्रार्थितों आपणालागीं । न लागावी उपाधि म्हणून ॥ ४२ ॥ पितृआज्ञा मस्तकीं वंदून । पूर्ववत्

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

मृन्मयगज निर्जीव करून । बालस्वभावें पलायन । करून गेले स्वगृहीं ॥ ४३ ॥ दीक्षित दिनशुद्धि पाहून । करविती चिदंबरासि वेदाध्ययन । स्वल्पकाळांत मुखोद्गत होऊन । चतुर्वेदमंत्र पठतसे ॥ ४४ ॥ कर्ममार्गांत अतिकुशल । वेदवेदांगार्थसंपन्न सकल । यज्ञयागान्त सूत्रें भाष्य विशाल । षोडशी प्रयोगादि रचिले ॥ ४५ ॥ मग दीक्षितें सुमुहूर्तावरी । पुत्रविवाह समारंभें भारी । करविला यथाशास्त्राचारी । कुलशील कन्या पाहूनि ॥ ४६ ॥ पुढें थोडक्याच दिवसांत । स्वर्गस्थ झाले मल्हार दीक्षित । तयांची स्त्री लक्ष्मी नामांकित । साध्वी धर्मपरायण ॥ ४७ ॥ चिदंबर दीक्षितांचा जन्मदिवस । ज्ञाते म्हणती कार्तिकवद्य षष्ठीस । दोन स्त्रिया त्या दीक्षितास । जाहले पुत्र षट्संख्या ॥ ४८ ॥ दिवाकरआप्पा ज्येष्ठ तनय । दुजा मार्तंड तिसरा मृत्युंजय । पुत्रप्रपौत्रादिक पुण्यमय । वंश विस्तीर्ण वाढला ॥ ४९ ॥ मल्हारदीक्षित आटोपल्यावर । यज्ञयाग करूं लागले चिदंबर । देवतादर्शन अनेक चमत्कार । चिदंबर-लीलें होतसे ॥ ५० ॥ एकदां यज्ञसमारंभ चालला असतां । लक्षावधि ब्राह्मण साङ्ग जेवितां । प्रथमपंक्ति उठल्यावरी तत्त्वतां । द्वितीयपंक्ति बैसली ॥ ५१ ॥ इतक्यांत भृत्यगणांसवें । श्रीमंत बाजीराव पेशवे । मंत्र्यादिक सैन्यासह बरवे । पातले अकस्मात मुरगोडा ॥ ५२ ॥ लक्षावधि गजाश्वरथमानव । दर्शनासि आले दुसरे बाजीराव । यथायोग्य सन्मान आदरभाव । करूनि भोजनीं बैसविलें ॥ ५३ ॥ घृत संपलें ऐसा बोभाट । दीक्षितांच्या कर्णीं पडला दाट । दिवाकर म्हणे तुपाची वाट । सांगा नीट तात हो ॥ ५४ ॥ दीक्षित म्हणती गंगेपासून । पाहिजे तितके घट भरून । स्वच्छ सुगंधी घ्यावें गणून । गंगोदक तें दिवाकरा ॥ ५५ ॥ मग हजारो आणून घागरी । आज्ञानुसारें गेले नदीतीरीं । घटीं जल भरूनि स्कंधावरी । घेती करीं मस्तकीं ॥ ५६ ॥ कित्येकांनीं आणिले शकट । त्यांत ठेविले भव्य सजल घट । चिदंबरसदनीं आणिले झटपट । ओतिती पटपट अग्नीवरी ॥ ५७ ॥ मलप्रभेचें जल तापवून । वाढिती सकळां गाळून । बाजीराव पेशवे सगळे जन ।

म्हणती हें काय अघटित ॥ ५८ ॥ गोघृताहून अधिक । घृत सुंदर स्वच्छ सुगंधिक । भोजनीं प्राशिती यथास्थित लोक ।
वाढिती अपरिमित तयांसि ॥ ५९ ॥ दुसरे दिवशीं परगांवांतील । घृत आणविलें उत्तम विपुल । पाहूनि बोलती दीक्षित
प्रांजल । उसनें फेडावें गंगेचें ॥ ६० ॥ मग सपाद हिशेबें पूर्ववत् । तेचि घट पूर्णघृतभरित । नेऊनि ओतिले मलप्रभेंत ।
पहाती जन टकमकां ॥ ६१ ॥ उदकाप्रमाणें स्वच्छोदक । प्रत्यक्ष नेत्रीं विलोकिती लोक । सर्वांसि वाटलें अतिकौतुक ।
म्हणती अवतारिक पुरुष हे ॥ ६२ ॥ यज्ञादि कर्मकांड चालावें यास्तव । म्हणूनि कळवळला सदाशिव । त्या परमेश्वरें
अवतार स्वयमेव । चिदंबररूपें धरियेला ॥ ६३ ॥ लक्षावधि लोकांसि चिदंबर । अर्पिती द्रव्य दिव्यांबर । संतुष्ट होऊनि
‘जयचिदंबर । गुरु चिदंबर’ वदती ते ॥ ६४ ॥ ऐशा यज्ञामाजीं देव प्रत्यक्ष । येऊनि करिती यज्ञकार्य
दक्ष । नारद तुंबर गंधर्व सिद्ध यक्ष । यज्ञप्रसाद भक्षिती ॥ ६५ ॥ अक्कलकोटनिवासी स्वामिराय । गुरुगिरिनारी
श्रीदत्तात्रेय । चिदंबर दीक्षितांच्या यज्ञांत आज्य । वाढित होते स्वयें पंक्तींत ॥ ६६ ॥ चिदंबरदीक्षितांच्या
यज्ञांत । आम्ही वाढीत होतों घृत । ऐसें स्वामी समर्थ स्वतः सांगत । होते प्रियजनांसि ॥ ६७ ॥ असो पेशवे श्रीमंत
बाजीराव । कर्मकांड यज्ञ खर्च चालावें सदैव । म्हणूनि जहागीर संस्थान गांव । मागा म्हणती चिदंबरा ॥ ६८ ॥ आम्ही
श्रीमंत असोन सर्वानुकूल । आमचे सदनीं कधीं न घडेल । याप्रकारें लक्षावधि लोक जेवूनि सकल । जाती पहिले प्रहरांत
॥ ६९ ॥ जलाचें घृत आणि घृताचें जल । पुण्यप्रतापें करविलें तत्काळ । वस्त्रालंकार अर्पूनि सर्वमंडळ । संतुष्ट झालें
पेशव्यांचें ॥ ७० ॥ श्रीयज्ञनारायणाचा प्रसाद । बाजीरावें धरूनि राज्यश्रीमद । ग्रहण केला नाहीं मात्र विनोद । केला
योग्यता न जाणूनि ॥ ७१ ॥ सहस्रावधि वैदिक विद्वान् । शास्त्री पंडित याज्ञिकी ब्राह्मण । श्रौतस्मार्तज्योतिर्गण । हरिदास-पुराणिक
गानक ॥ ७२ ॥ इतुक्या सर्वांचें शुभवचन । बाजीरावें धिक्कारिलें साभिमान । यज्ञनारायणाचा प्रसाद अव्हेरून ।

पेशवे बैसले स्वस्थ ते ॥ ७३ ॥ मग वदती चिदंबरेश्वर । पेशवाईचा अंत पातला दुर्धर । निश्चयें समजा हो
द्विजवर । 'ईश्वरेच्छा बलीयसी' ॥ ७४ ॥ असो चिदंबरदीक्षित सदनीं । रथाश्व गज शिबिकादि करूनि । सिद्ध असतां
पादमार्गें चालूनि । खडावा देखिल नसतांही ॥ ७५ ॥ अनवाणी स्वतः घेऊनि उदक । लोकापूरनामें साधूसि तहानभूक ।
जाणूनि अंतरीं गेले अशोक । सत्वरें दोन योजनांवरी ॥ ७६ ॥ हैं पाहून पुत्रभृत्यांनीं । रथाश्व शिबिका सिद्ध करूनि ।
दीक्षितांचे पश्चात धांवूनि । गेले सकळिक शीघ्रगति ॥ ७७ ॥ 'लोकापुर' नामक साधूला । उदकाचा शोष लागला ।
उदकास्तव कंठ शुष्क झाला । शब्दही निघेना मुखांतूनि ॥ ७८ ॥ अंतर्साक्षित्वें जाणूनि वृत्त । पादचारी अविलंब
दयायुक्त । धांवत गेले चिदंबरदीक्षित । अन्नोदक पात्रें घेऊनि ॥ ७९ ॥ दोन तीन योजनें सत्वर । उल्हासें गेले चिदंबर ।
तृषेनें व्याकुलता देखूनि फार । दिधलें रुचिकर जल तयासि ॥ ८० ॥ प्राशन करूनि स्वच्छोदक । शांत झाला
लोकापुर तात्कालिक । नंतर चिदंबरें स्वहस्तें सम्यक । भोजन घातलें तयासि ॥ ८१ ॥ लोकापुरसाधु झाला संतुष्ट ।
ऐसे परोपकारी दीक्षित श्रेष्ठ । भूतदया सर्वत्र वरिष्ठ । चिदंबर-हृदयीं वसतसे ॥ ८२ ॥ एक तर अंतर्साक्षित्व । दुसरें
साजे निरभिमानत्व । तसेंच अत्यंत दयालुत्व । निरालस्यत्वही विराजे ॥ ८३ ॥ ऐसे महात्मा अवतारिक ।
चिदंबरदीक्षित अलौकिक । तत्पर कुशल कर्मकांडविवेक । महायाज्ञिकी समर्थ जे ॥ ८४ ॥ त्या मुरगोडग्रामीं महायज्ञ ।
करित होते वैदिक याज्ञिक सुज्ञ । त्या कालीं बाजीराव पेशवे राज्ञ । भृत्यांसह होते तैं ॥ ८५ ॥ लीलाविग्रही स्वामीसमर्थ ।
त्या यज्ञांत वाढीत होते घृत । श्रीमद्दत्तात्रेय अवधूत । अविद्यायुक्त जन नोळखिती ॥ ८६ ॥ 'यज्ञो वै विष्णुः' ऐशी श्रुति ।
प्रसिद्ध विष्णूची यज्ञमूर्ति । जेथें उभे हरिहरविधि त्रैमूर्ति । पंक्ति वाढिती स्वानंदें ॥ ८७ ॥ होता उद्गाता ब्रह्मा । आचार्य
यजमान करिती होमा । ऋत्विक मंत्र पढती महिमा । वर्णिती यज्ञपुरुषाचा ॥ ८८ ॥ निष्कामयज्ञ विध्युक्त साङ्ग ।

* * *

ब्रह्मस्वरूप अखंड निजरंग । अभेद सहजस्थिति अव्यंग । अभंग निश्चल निःसंशय ॥ ८९ ॥ ज्या प्रकारें प्राणाग्निहोत्र ।
शरीरांत चालतसे अहोरात्र । विवेकानुभवें जाणिल्या पवित्र । स्वतंत्र स्वस्वरूप ओळखतें ॥ ९० ॥ तैसेंचि चिदंबरयज्ञांत ।
देवता ठाकती उभ्या मूर्तिमंत । ब्रह्मार्पण ब्रह्महवि अग्निहुत । यज्ञकर्महो ब्रह्मचि होय ॥ ९१ ॥ ब्रह्म सर्वंचि
बाह्यांतर्वर्ती । 'यस्यभासामिदं सर्वं विभाति' । अस्ति-भाति-प्रियरूप ब्रह्मात्मप्रतीति । अभिन्नत्वें वर्ततसे ॥ ९२ ॥ ऐशा ब्रह्मरूप
यज्ञामाजीं सदा । विराजित असे दैवीसंपदा । जिच्यासंबंधें कैवल्यपदा । पावती शुद्ध अधिकारी ॥ ९३ ॥ यज्ञनारायणाचा
प्रसाद आणि दर्शन । प्राप्त होतां अखिलजन । संदेहरहित होती पावन । जेथें जनार्दन उभा असे ॥ ९४ ॥
चिदंबरासारख्या महापुरुषांनीं । यज्ञ करावा जगद्धितकारणीं । प्रत्यक्ष ज्या यज्ञांत देवतांनीं । भोजनीं वाढावे पदार्थ ॥ ९५ ॥
जेथें कर्म-उपासना-ज्ञानदेवता । पंक्तींत भोजनीं धरूनि नम्रता । घ्या हो घ्या हो पक्वान्नें नानाघृता । म्हणती आदरें आग्रहें
॥ ९६ ॥ चटण्या कोशिंबिरी लवण । पापड कुरवडिया सांडगे जाण । अनेक शाका वटक वरण । अन्नपक्वान्न परोपरी
॥ ९७ ॥ अपूप क्षिप्रा ओदन । आमटी कढी जंबीरादिकरून । लेह्य पेय चोष्य खाद्य भोजन । चतुर्विधप्रकारें होतसे ॥ ९८ ॥
नानापरीच्या रंगवल्लया शोभत । पाट मांडिले उत्तम रौप्ययुक्त । पंक्तीमधूनि पाट वाहत । सुगंध स्वच्छोदकाचे ॥ ९९ ॥
वरी साजती भव्यमंडप । तोरणें झालरी लटकती अमूप । मध्यें सुंदर प्रकाशदीप । विराजित चोहोंकडे ॥ १०० ॥
भोजनाचे पदार्थ विपुल । ते ठेवण्यास हौद बांधिले विशाल । जैसे भरलेले कूप सजल । पदार्थयुक्त हौद तसे ॥ १ ॥
कढी आमटी क्षिप्रादिक । हौदांतून काढिती ब्राह्मणलोक । लक्षावधि मनुष्यांस पुरेसें सम्यक् । वारंवार आपोहरें ॥ २ ॥
नित्य हौद स्वच्छ धुऊन । वस्त्रानें पुसून काढून । पातळ पदार्थ त्या हौदांतून । ठेविती उत्तम प्रकारें ॥ ३ ॥ अन्नपूर्णा
देवी चोहोंकडे । परिपूर्णत्वें तिष्ठतसे कोडें । घृतपूरित करीं घेऊन भांडें । वाढिती विप्र उदक जसें ॥ ४ ॥

असो एक तरुण ब्राह्मण । हौदांतून आमटी उष्ण । काढितां पाद निसटून । पडला हौदांत आमटीच्या ॥ ५ ॥ मग त्यास युक्तीनें वर काढिलें । काढणाऱ्याचे हात पाय पोळले । विप्रास सावध करिती भले । तों तो गतप्राण जाहला ॥ ६ ॥ इकडे लक्षावधि मंडपांत । विप्रसमुदाय यथास्थित । भोजन आनंदें करित । त्यांत हा प्रसंग विलक्षण ॥ ७ ॥ नंतर चिदंबरपुत्र दिवाकर । पित्यासि नमी जोडूनि कर । विनवी अहो कृपाकर । यज्ञांत विघ्न ओढवलें ॥ ८ ॥ अत्युष्ण आमटीचे हौदांत । पडूनि एक ब्राह्मण झाला मृत । काढिलें वरी तयाचें प्रेत । आतां काय करावें ॥ ९ ॥ ऐकूनि दीक्षितचिदंबर । म्हणती प्रसंग पातला दुर्धर । श्रीचिदंबरेश्वर गंगाधर । करील विघ्न निर्मुक्त हें ॥ ११० ॥ मग चिदंबरदीक्षित पुत्रासह । चिंताग्रस्त होऊनि निरग्रह । म्हणती श्रीदत्तावधूत प्रपितामह । श्रीगुरुस्वामीसमर्था ॥ ११ ॥ जयजय राजाधिराज । योगिराज स्वामीमहाराज । कल्पद्रुम-चिंतामणिभक्तकाज । यज्ञलाज संरक्षा ॥ १२ ॥ ईश्वराची आज्ञा म्हणून । वेदविहित-कर्म प्रतिपादन । यथासांग यज्ञकार्य संपादन । झालें असतां हें काय ॥ १३ ॥ हें काय घडलें विपरित । ऐसें वदती चिदंबरदीक्षित । तदा प्रबोधिती श्रीमद्दत्तावधूत । यतिवेषधारी ईश्वर ॥ १४ ॥ घाबरूं नका धरा हो धीर । त्या प्रेतासि आणा येथें सत्वर । पिंवळें करा प्रेतशरीर । हळदी पुष्कळ लावूनि ॥ १५ ॥ मग तात्काल आणिलें विप्रशव । हळदी लावूनि निजविलें तंव । सांगती देवाधिदेव शिव । करा आपापलीं कार्यें तुम्ही ॥ १६ ॥ शवावरी घालून पांघरूण । थापटिती स्वामिराज आपण । म्हणती विप्रा तुझे प्राण । कोणीं नेले सांग पां ॥ १७ ॥ श्रमाचा व्हावया परिहार । गाढनिद्रा लागली तुज सुखकर । ऊठ ऊठ रे आतां सत्वर । देईं तांबूल ब्राह्मणांसि ॥ १८ ॥ ऐकूनि मृतविप्र झाला सावध । खडबडूनि उठला संनिध । म्हणे क्षमा करा जी अपराध । लीला अगाध परमेश्वरा ॥ १९ ॥ आमटीचे हौदांत मृत्युपद । पावलों असतां अंगासि हळद । लावूनियां शुभप्रद । उठविलें आपण कृपाळा ॥ १२० ॥ आपण साक्षात्

परमेश्वर । परमपुरुष दयासागर । कृपाकटाक्षें मज दीना सत्वर । आयुष्य देऊनि उठविलें ॥ २१ ॥ मी दरिद्री कुटुंबवत्सल ।
आपण विश्वकुटुंबी जगत्पाल । यज्ञघात अपकीर्ति मृतकाल । टाळिला सहज सर्वस्वीं ॥ २२ ॥ पुरुषोत्तम यज्ञनारायण ।
प्रत्यक्ष विश्वनाथ आपण । करितसां जगत्कल्याण । लीला संपूर्ण दावूनि ॥ २३ ॥ मग विध्युक्त मंगलस्नान ।
संजीवन झालेल्या विप्रासि घालून । इतरांनींही शुद्धस्नान करून । सिंचन केलें वेदमंत्रें ॥ २४ ॥ मृत विप्र
झाला संजीवन । नाम ठेविलें 'यज्ञदत्त' म्हणून । विप्रें दत्तगुरुपदीं लीन होऊन । केलें नमन सर्वांसि ॥ २५ ॥ परिधान
करूनि पीतांबर । करीं घेऊनि सुर्वणपात्र । चिदंबरदीक्षितासह द्विजवर । शुचिर्भूत होत्साता ॥ २६ ॥ भोजनीं बैसलेल्या
सर्व विप्रांसि । त्रयोदशगुणी तांबूल आदरेंसीं । हिरण्यगर्भ दक्षिणा प्रेमेंसीं । अर्पण करी यथायोग्य ॥ २७ ॥ जैसें
धर्मराजाच्या मखांत । श्रीकृष्णें काढिल्या पत्रावळी अमित । तैसें या चिदंबर दीक्षितांच्या यज्ञांत । देव पंक्तींत वाढिती
॥ २८ ॥ ज्या आमटीच्या विस्तीर्ण हौदांत । ब्राह्मण पडून झाला मृत । श्रीगुरुस्वामीसमर्थ देवदत्त । कृपें जीवंत
जाहला ॥ २९ ॥ तो हौद आपल्या आपण । सहज कोरडा झाला जाण । तयासि धुऊन शांति करून । केलें पूजन
तयाचें ॥ १३० ॥ स्वामीसमर्थ दत्तदिगंबर । आणि दीक्षित चिदंबर । अनादि वेदोक्तसदाचार । यथानुक्रमें चालविती
॥ ३१ ॥ वेदविहित उत्तमप्रकारें मग । करविती यथासांग सुरेख । कोणतेंही न्यून नसेचि देख । परिपूर्ण संपूर्ण
होतसे ॥ ३२ ॥ चिदंबरयज्ञांत काय उणें । देवांनीं येऊन जेथें राबणें । सर्वसिद्धींसहित अन्नपूर्णेनें । करावें परिपूर्ण
अन्नादिक ॥ ३३ ॥ त्या शुद्ध झालेल्या हौदांत । पुन्हा ब्रह्मवृंद आमटी घालित । परी न भरे कांठापर्यंत । यत्न केल्या
सहसाही ॥ ३४ ॥ मग दीक्षित चिदंबर । म्हणती स्वामीमहाराजा दिगंबर । हौद भरत नाहीं काय विचार । करणें
असेल तो करावा ॥ ३५ ॥ तेव्हां सांगती दत्तगुरुवर्य । बोलावा 'यज्ञदत्त' व्हावया कार्य । तंव यज्ञदत्तें येऊन सवैर्य ।

वंदिले स्वामी जगद्गुरु ॥ ३६ ॥ तयासि आज्ञापिती जगदीश्वर । त्वां एक संध्येच्या पळीभर । आमटीच्या हौदांत शुद्धनीर ।
टाकावें सत्वर यज्ञदत्ता ॥ ३७ ॥ तयें आज्ञानुसारें ओतिलें उदक । तों उंचबळला हौद तात्कालिक । उसळून
वर येत सम्यक् । काय अलौकिक गुरुलीला ॥ ३८ ॥ जैसा श्रीक्षेत्र पैठणांत । एकनाथमहाराजांच्या सदनांत । फाल्गुन
वद्य षष्ठीचे उत्साहांत । येऊनि भगवंत हौद भरी ॥ ३९ ॥ उत्साहापूर्वीं स्वल्पदिनीं । रांजण काढिती स्वच्छ धुऊनि ।
पूजा धूपदीपादि करूनि । नमूनि भरण्या आरंभिती ॥ १४० ॥ आपआपल्या नवसाच्या घागरी । पाणी भरूनि खांद्यावरी ।
एकनाथाच्या हौदांत सत्वरीं । आणूनि ओतिती लोक ते ॥ ४१ ॥ परंतु श्रीखंड्यांच्या घागरीविण । कदा न भरे न
उसळे तो रांजण ( हौद ) । जेव्हां तो परमात्मा नारायण । अंगें येऊनि उदक भरी ॥ ४२ ॥ तेव्हां तो हौद पूर्ण भरे
उसळे । तें पहावया बैसती उघडूनि डोळे । श्रीखंड्या द्विजासि शोधिती सगळे । परी नाढळे तो कोठेंही ॥ ४३ ॥ कोठें
न भेटे न दिसे । परी सर्वांतरीं सदोदित वसे । श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठकृपें गवसे । अधिकाऱ्यांसि बाह्यांतरीं ॥ ४४ ॥ तैसेंचि
चिदंबरदीक्षितांचे यज्ञांत । स्वामीसमर्थ दत्तावधूत- । कृपावलोकनें सहज पदार्थयुक्त । हौद भरती उसळती ॥ ४५ ॥
चिदंबरदीक्षितांचा साद्यंत ग्रंथ । पूर्वीं भक्तें केलासे ग्रथित । ज्यांत लीला चमत्कार अनंत । वर्णिले असती दीक्षितांचे
॥ ४६ ॥ हें तयांचें चरित्र । श्रुत व्हावया जनांसि सर्वत्र । संक्षेपें कथिलें अल्पमात्र । मूल चरित्रावरूनि ॥ ४७ ॥
पुढिले अध्यायीं कथा रसाळ । परिसा श्रोते भक्तप्रेमळ । जेणें अंतःकरण होय निर्मळ । साधती चारी पुरुषार्थ ॥ ४८ ॥
स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । त्रिविंशतितमाध्याय रसिक हा ॥ १४९ ॥ इति
श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे त्रिविंशतितमोऽध्यायः समाप्तः ॥ २३ ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय चोविसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ श्रीगुरु सांगती शिष्यालागून । ऐक शुद्ध वेदान्त-विज्ञान । जें ब्रह्मोपनिषदीं केलें कथन । श्रोतीं तेंचि परिसावें ॥ १ ॥ या त्वं-पदरूप जीवात्म्याला । ज्या चारी अवस्था कथियेल्या । स्पष्टत्वें सर्वांसि समजायाला । त्या ब्रह्मोपनिषदांत ॥ २ ॥ हा आनंदस्वरूप आत्मा स्वयंज्योति । यद्यपि वास्तव विचारांतीं । पाहतां केवल निरुपाधिक स्थिति । सर्वावस्थाविरहित असे ॥ ३ ॥ तथापि मायावशें आत्मा ज्ञेय । जागृत्-स्वप्न-सुषुप्ति-तुरीय । या चारी अवस्थांसि प्राप्त होय । त्या परिसा अवस्थास्थानांसि ॥ ४ ॥ नाभी-हृदय-कंठ-मूर्द्धास्थान । यथाक्रमें ऐका हो सज्जन । अंतःकरणविशिष्ट ‘जीवात्मा’ संज्ञ । नाभीस्थानीं जागृति ॥ ५ ॥ जेव्हां नाभीपासून नेत्रपर्यंत । विशेषेंकरून होतो संस्थित । तेव्हां हा जीवात्मा ‘विश्व’ संज्ञेसि प्राप्त । करणाऱ्या जागृतावस्थेसि ॥ ६ ॥ आणि कंठदेशाचे ठायीं जेव्हां । विशेषेंकरून स्थित होतसे तेव्हां । ‘तैजस’ संज्ञेसि प्राप्त करणाऱ्या नांवा । स्वप्नावस्थेसि जीवात्मा लाधतो ॥ ७ ॥ आणि जेव्हां हृदयकमलाच्या ठायीं । विशेषेंकरून जीवात्मा स्थित पाहीं । ‘प्राज्ञ’ संज्ञेसी प्राप्त करणाऱ्या त्या समयीं । प्राप्त होतो सुषुप्तीसी ॥ ८ ॥ आणि समाधिप्रभावेंकरूनि । हा जीवात्मा राहे मूर्द्धास्थानीं । तेव्हां ‘शुद्धात्मरूपता’- प्रदायिनी । त्या तुरीयावस्थेसि प्राप्त होय ॥ ९ ॥ आतां जागृतावस्थेची ‘विराटदेवता’ । आणि स्वप्नाची ‘हिरण्यगर्भ’ तत्त्वतां । सुषुप्तीची असे ‘रुद्र’ देवता । तुरीयावस्थेचा स्वामी ‘परमात्मा’ असे ॥ १० ॥ मायारूपउपाधी-संबंधेंकरून । तो परमात्मा जगद्रूप होत भासमान । वास्तव मनवाणीचा अविषय असून । कार्यकारणभावरहित ॥ ११ ॥ ऐशा स्वयंज्योति-आनंदस्वरूपीं अवश्य । हे कर्मफलरूप शब्दादि पंच

विषय । आपापले विषयस्वभाव कार्य । त्यागिती कर्म विषय हे ॥ १२ ॥ त्या तुरीयरूप परमात्म्याच्या ठायीं । जैसे ते
शब्दादिक विषय पाहीं । आपापले विषयस्वभावही । परित्याग करिताति ॥ १३ ॥ तैसे देव वेद यज्ञ मातापिता स्नुषादिक ।
ममाध्यासाचे विषय पदार्थ अनेक । आपापले विषय स्वाभाविक । परित्याग करिताति ॥ १४ ॥ आणि अहं-ध्यासाचे
विषय जाती । ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्रत्व स्थिति । चांडाळादिक वर्णजाती असती । अहं-ध्यासाचे विषय हे ॥ १५ ॥
शुद्धपरमात्म्याच्या ठायीं या जाती । वास्तव पहातां मुळींच नसती । तैसेंच ब्रह्मचर्य गृहस्थ वानप्रस्थ यति । हे चारी
आश्रमही नाहींत ॥ १६ ॥ आणि उत्तम-मध्यम-कनिष्ठ कर्मकर्ते प्रबल । तथा इहपरलोकींचें सुखदुःखरूप फल- । प्राप्ति करणारीं
साधनें सकल । आणि सुखदुःखफलसहित ते ॥ १७ ॥ कर्मकर्ते आणि कर्मे त्रिविध । इत्यादिक जेवढा हा संसारसंबंध ।
तेवढा संसार ऐंद्रजालसम निषेध । मिथ्या मायिक केवल तो ॥ १८ ॥ तो संसार या परमात्म्याच्या ठायीं । कोणतेही कालीं
नाहीं । ऐसें कार्यसह अज्ञानविरहित पाहीं । वास्तव अद्वितीय परब्रह्म ॥ १९ ॥ शुद्धचित्त झालेल्या अधिकारीजनांसि ।
गुरुमार्गें स्वयंज्योति येतसे प्रतीतीसि । जो परमात्मा इंद्रादि सर्व देवतांसि । आपले आज्ञेंत चालवित ॥ २० ॥ म्हणूनि
ऋषि पितर देवतादिक । महान् तेजस्वी पुरुष सम्यक् । नसे समर्थ कोणीही एक । परमात्मनियमनाकारणें ॥ २१ ॥ वायु
सूर्य अग्नि इन्द्र । मृत्यु आणि सर्वदेवसह चंद्र । परमात्मभयें आज्ञानुसार । वर्तती आपले कार्यासि ॥ २२ ॥ ऋषि पितर
देवतादि परतंत्र । परमात्मनियमन करूं न शकती सर्वत्र । ऐसा परमात्मा देव स्वतंत्र । सत्तास्फूर्तिप्रदायक ॥ २३ ॥
तो सर्वसाक्षीव्यापक विश्वदेव । ब्रह्मानंदस्वरूप अलौकिक सदैव । ज्यांनीं अनुभविला स्वयमेव । अभेद निःसंशय अंतरीं
॥ २४ ॥ ते सत्पुरुष महात्माजन । इतर पामर अनाथ जीवासमान । त्या ऋषिदेवतांच्या किंकरभावालागून । कधींही
न प्राप्त होती ते ॥ २५ ॥ ईश-जीव-जगतादि द्वैतप्रपंच । जीवांनीं कल्पनेनें कल्पिला उगाच । ऐसें जाणूनि ब्रह्मानुभवी पुरुष

साच । निर्भयपणें वर्तती ॥ २६ ॥ तेजःपुंज असूनि भास्कर । त्यासि कल्पिती घूकादि पक्षी अंधःकार । तैसें अव्ययाधिष्ठानावर । जीवजगत्-संसार कल्पिती ॥ २७ ॥ अग्नि गुह्य वसे संपूर्ण काष्ठांत। तैसा परमेश्वर आब्रह्मस्तंभपर्यंत। प्रसिद्ध जें कार्यकारणरूप या लोकांत । चार प्रकारें भूतप्राणी ॥ २८ ॥ ते जरायुज-अंडज-स्वेदज-उद्भिज्ज । त्या सर्व प्राणीमात्रामाजीं अज । गुह्यत्वें वसतसे परमात्मा सहज । आकाशवत् व्यापकत्वें ॥ २९ ॥ तथा स्थूल सूक्ष्म कारण । या देहत्रयांत तिष्ठे साक्षिरूपेंकरून । सार्वभौमवत सर्वभूतांसि वश करून । भूतीं वसे अलिप्तत्वें ॥ ३० ॥ हे शिष्या तो परमात्मा देव । माया-संबंधें भासे जगज्जीव । परी जगच्चालक निजाज्ञें सर्व । चालवी हालवी चेतनत्वें ॥ ३१ ॥ अनंत ब्रह्मांडांचा श्रीगुरुस्वामी । साक्षी केवल चेता सर्वांतर्यामी । निर्गुण निरंजन रहित-धर्माधर्मीं । गुणागुणीं भावविरहित जो ॥ ३२ ॥ जैसा काष्ठांतील गुह्याग्नि । प्रकटे काष्ठाचे मथनेंकरूनि । तैसा ब्रह्मसाक्षात्कारार्थ ब्रह्मवेत्त्यांनीं । मथनोपाय कथियेला ॥ ३३ ॥ आपल्या शरीरासि किंवा बुद्धीसि । अधोअरणीरूप करून चिंतनासि । म्हणजे देह अथवा धिषणासी । खालची अरणी चिंतावी ॥ ३४ ॥ आणि अकार उकार मकार । अर्धमात्रा ऐशा ह्या मात्रा चार । या मात्रांयोगें यथाक्रम प्रकार । अवस्था चार परिसाव्या ॥ ३५ ॥ जागृत-स्वप्न-सुषुप्ति अवस्था होय । विश्व-तैजस-प्राज्ञ-तुरीय । ऐशा तुरीय आत्म्यासि अक्षयकर । कथन करणारा प्रणव जो ॥ ३६ ॥ त्या ॐकारासि ऊर्ध्व अरणीरूप करून । करावें अधिकाऱ्यानें चिंतन । जैसें लोकीं द्वयकाष्ठअरणी-मंथनेंकरून । अग्नि प्रकट होतसे ॥ ३७ ॥ तैसें शरीर बुद्धि तथा ॐकार । या द्वय अरणीच्या मथनें खरोखर । आत्मा साक्षात्काररूप वैश्वानर । प्रगट होतो निश्चित ॥ ३८ ॥ जो आत्मज्ञानरूप पवित्राग्नि । कार्यासहित अज्ञानासि नासूनि । समूळ सर्व कर्मांसि जाळूनि । तत्काल टाकित शिष्या रे ॥ ३९ ॥ प्रथम विश्व-तैजस-प्राज्ञ-तुरीय हे चार । यथाक्रमें विराट्-हिरण्यगर्भ-ईश्वर- । परमात्मा या चतुर्थांसि निरंतर ।

अभिन्नरूपें चिंतावें ॥ ४० ॥ तदनंतर अकार-उकार-मकार । अर्धमात्रा या प्रणवाच्या मात्रा चार । या मात्रांयोगें ते विश्वादिक चार । अभिन्नरूपें चिंतावे ॥ ४१ ॥ ऐसें जें करणें सर्वदा ध्यान । तेंचि द्वय अरणीचें असे मंथन । गुह्यात्मा ह्मा ध्यानेंकरून । शीघ्र प्रकट होतोचि ॥ ४२ ॥ या अर्थाविषयीं किंचित्‌मात्रही । शिष्या संशय व्यर्थ कांहीं । करूंचि नये तरीच लवलाही । आत्मसाक्षात्कारा पावशी ॥ ४३ ॥ जैसें तिळांतील गुह्य तैल । यंत्रपीडनें निघे सोज्ज्वळ । दुग्धांतील गुह्य घृत तत्काल । बिलोडनोपायें लाधतें ॥ ४४ ॥ अथवा इक्षुदंडांतील गुड । यंत्रपीडनें आणि कढविण्यानें अवघड । असतांही प्रयत्नें प्राप्त होत उघड । जाणती सकल सत्य हें ॥ ४५ ॥ तैसें या बुद्धयादि संघांत । गुह्यत्वें जो आत्मादेव वसत । तो परमात्मा या जीवासि मोत । त्या ध्यानरूप उपायें ॥ ४६ ॥ तथा तप-सत्य-विवेकोपायेंकरून । प्राप्त होतो अद्वितीय निरंजन । यद्यपि जीवेश्वरभाव नसून । अविद्या-संबंधें जीव होय ॥ ४७ ॥ जीवभावासि होऊनि प्राप्त । जागृत्-स्वप्नादि संसारीं भ्रमत । आणि जेव्हां गुरु-शास्त्रोपदेशयुक्त । आत्मसाक्षात्कारासि पावतो ॥ ४८ ॥ तेव्हां कल्पित जीवभाव टाकून । ब्रह्मस्वरूप होतो अभिन्न । निर्विकारसहजस्थिति भोगून । विदेहकैवल्य पावतो ॥ ४९ ॥ जेवीं ऊर्णनाभिजंतु । स्वयें उत्पन्न करीं लय तंतु । तेविं जागृत्-स्वप्नीं हा जीव मंतु । अनेक पदार्थ उत्पन्न लय करी ॥ ५० ॥ आणि हा जीवात्मा ज्या समयीं । गुरु-शास्त्रोपदेशें आपले हृदयीं । स्थित ब्रह्मानंदस्वरूपासि निःसंशयी । साक्षात्कार करितसे ॥ ५१ ॥ तेव्हां जीवत्वभाव परित्यागून । हा जीवात्मा स्वस्वरूपीं होय लीन । त्या आत्म्यासी वाकादि इंद्रिय सहमन । करूं न शकती विषय कदा ॥ ५२ ॥ ऐशा आत्मज्ञानें ब्रह्मानुभव । हृदयीं प्रकटूनि मुक्त होतो जीव । मोक्ष संपदा अखंडवैभव । भोगी सहजस्थितीनें ॥ ५३ ॥ आणि कर्म-उपासनेच्या फलरूप । हा संसार नाशिवंत मिथ्या जल्प । या संसाराचेंही कारण आत्मा समीप । असूनि संसारीं दिसेना ॥५४॥ ऐसा परमात्मा समीप असून । न भेटे मनोनिग्रहावांचून । मनोनिग्रह वासना क्षीण ।

झाल्यावरी प्रकटेचि ॥ ५५ ॥ अनेककोटि जन्मोजन्मीं । अनेक साधनें जरी केलीं रिकामीं । तथापि मनोनिग्रहावांचून अंतर्यामीं । जाणूं न शकती सहसा त्या ॥ ५६ ॥ म्हणूनि मोक्षेच्छूनें सनिश्चय । मनोनिग्रह करावा अवश्य । त्यायोगें मोक्षसुख प्राप्त होय । अनंतजन्मांचें सार्थक ॥ ५७ ॥ या जीवाचें मन दोन प्रकारें प्रसिद्ध । एक शुद्ध मन आणि दुजें अशुद्ध । विषयोपभोगीं प्रीति बहुविध । तें मन 'अशुद्ध' जाणावें ॥ ५८ ॥ निष्काम-कर्मोपासनेंकरून । विषयेच्छारहित झालेलें जें मन । तें 'शुद्ध' जाणावें हो सज्जन । श्रोतीं ऐशा दों रीतीं ॥ ५९ ॥ विषयासक्त जें अशुद्ध मन । तेंचि मनुष्याच्या बंधासि होतें कारण । आणि विषयासक्तीरहित जें शुद्धमन । मनुष्याच्या मुक्तीसि कारण तें असे ॥ ६० ॥ म्हणूनि सर्व विषयासक्तिरहित । मुमुक्षूंनीं मनासि करावें सदोदित । जेव्हां मन निरोधित होऊन करीत । जीवब्रह्मैक्य निश्चय दृढ ॥ ६१ ॥ तेव्हां मोक्षेच्छूंस मोक्षफलप्राप्ती । किंचित्ही विलंब न होतां सुलभ रीतीं । यथा भोजनकालींच होय तृप्ति । तथा मुक्ति होय आत्मज्ञानकालीं ॥ ६२ ॥ जैसें स्वप्नावस्थेंत हें मन । आपल्या स्वरूपअज्ञानेंकरून । मिथ्याद्वैत प्रपंचाकार होऊन । नानाविकारी होतसे ॥ ६३ ॥ तैसेंच जागृतावस्थेंतही मन । आपल्या स्वरूपअज्ञानेंकरून । मिथ्या द्वैतप्रपंचाकार होऊन । नानाविकारां पावतें ॥ ६४ ॥ शिष्या तथा स्वप्नांत हें अज्ञानी मन । द्वैतप्रपंचाकार झालेलें असून । वास्तव तें अधिष्ठान चिद्रूपेंकरून । द्वैतभावरहित असे ॥ ६५ ॥ तथा जागृतावस्थेंत तें अज्ञानी मन । जरी द्वैतप्रपंचाकार झालें असून । वास्तव तें अधिष्ठानचैतन्यरूपेंकरून । आहे द्वैतविकाररहित ॥ ६६ ॥ आत्मसाक्षात्कारें हें मन जेव्हां । द्वैतप्रपंचाकारवृत्ति त्यागितसे तेव्हां । द्वैतप्रपंचअग्रहणरूप अमनस-भावा । प्राप्त होतो मोक्षाधिकारी ॥ ६७ ॥ हें ऐकूनि शिष्य पुसे गुरूतें । हें मन जेव्हां अमनस-भावासि प्राप्त होतें । त्या कालीं आत्मस्वरूप शेष राहतें । कोणत्या प्रकारें सांगा जी ॥ ६८ ॥ तें भ्रमसिद्ध मन ज्यासमयीं । गुरु म्हणती अमनस-भावा प्राप्त होई । वेदवेत्तेपुरुष

आत्मरूपाविषयीं । याप्रकारें कथिताति ।। ६९ ।। त्या अमनस-कालीं या आत्म्याला । एक ब्रह्मचि योग्य आहे जाणावयाला ।
म्हणून सर्वकल्पनारहित सुखाला । आत्मा नित्य पावतो ।। ७० ।। आत्मा नित्य आहे म्हणून । होत जन्मादि सर्वविकारविहीन ।
आणि त्या जन्मरहित ज्ञानेंकरून । अजवस्तुबोध होतसे ।। ७१ ।। अन्य अनात्मपदार्थ-बोध नसे । यास्तव आत्मा
ज्ञेयवस्तुत्वें अभिन्न असे । स्वप्रकाशज्ञानरूप विलसे । जन्मादि-विकारवर्जित ।।७२।। शिष्या कोणी भ्रांतिष्ट ऐसें बडबडत ।
या मनाचा लय सुषुप्तींत होत । तैसा मनोलय झाला असतां सतत । अमनस-भावास पावेल तैं ।। ७३ ।। हीं भ्रांतिष्ट वचनें
न संभवतीं । कां तरी सुषुप्तींत मन जाय लयाप्रति । तथा समाधि-अवस्थेंत करिती । मनाचा जो निरोध ।। ७४ ।।
निद्रा आणि समाधि या दोहोंत । महान् विशेषता होय प्रतीत । ती विशेषता परिसा हो संत । उपनिषत्प्रमाणसिद्ध जी
।। ७५ ।। जें मन विषयांचा निग्रह करून । झालें आहे सर्वकल्पनाविहीन । यथा महावाक्यजन्य ब्रह्मविद्येंकरून । मन
झालेलें सुसंस्कृत ।। ७६ ।। ऐशा शुद्ध मनाची जागृतावस्थेंत । जी ब्रह्माकारतारूप अवस्था होत । त्या अवस्थेहून मनाची
सुषुप्तींत । विलक्षण अवस्था होतसे ।। ७७ ।। कां तरी सुषुप्तिअवस्थेंत तें मन । आपलें कारण अज्ञानांत राहे सूक्ष्म
होऊन । आणि समाधिअवस्थेंत तें मन । न पावे लय अज्ञानांत ।। ७८ ।। कारणअज्ञानांत न पावे लय । कारणसमाधींत
तें मन अद्वय । अधिष्ठान ब्रह्मामाजीं प्राप्त होय । बाधितवृत्तीनें बाधासी ।। ७९ ।। आतां सुषुप्ति आणि समाधि या
दोहोंत । दुसरी विशेषता निरोपिजेत । तें निरुद्ध मन समाधिअवस्थेंत । त्रिपुटीरहित झालेलें ।। ८० ।। म्हणजे ज्ञाता-ज्ञान-ज्ञेयादि
भेदरहित । सुसंस्कृत झालेलें मन समाधींत । केवल अद्वितीय ब्रह्मरूपचि होत । हें निश्चित निःसंशय ।। ८१ ।।
कैसें तें अद्वितीय ब्रह्म असे । द्वैतविवर्जित निर्भय विलसे । तथा स्वयंप्रकाश-ज्ञानस्वरूप वसे । सर्वत्र व्यापकपणें तें
।। ८२ ।। तथा जन्मादिविकाररहित । अज्ञानरूपनिद्राविवर्जित । तथा अहंमम-अध्यासातीत । ब्रह्म सदोदित निर्विकार असे

॥ ८३ ॥ नामरूपादिधर्मविहीन । नेत्रादि इंद्रियांचा विषय नसून । आणि एकवार ज्या ब्रह्मज्ञानेंकरून । अविद्या नष्ट
झालेली ॥ ८४ ॥ नष्ट झालेली अविद्या अज्ञानसहित । पुन्हा कधीं न उद्भवत । यास्तव तें ब्रह्म एकवार आविर्भूत ।
होतसे चैतन्यस्वरूपें ॥ ८५ ॥ ऐशा अद्वितीय ब्रह्माकारातें । मन समाधींत प्राप्त होतें । आणि निद्रेंत अविद्याविशिष्टचैतन्यीं
तें । लयासी पावतें उघड हें ॥ ८६ ॥ निद्रेंत अविद्याविशिष्ट चेतन । त्या चैतन्यांत लय पावतें हें मन । तेव्हां
त्या अद्वैतब्रह्माकारतेसी न । प्राप्त होत हें मन ॥ ८७ ॥ म्हणूनि सुषुप्ति अवस्थेहून । समाधींत आहे विशेषता महान् ।
आतां त्या समाधीचें दुर्लभपण । करूं निरूपण शिष्या रे ॥ ८८ ॥ पूर्वपुण्यें तें मन मुमुक्षूचें । त्या अमनस-भावासि प्राप्त
होतें साचें । मग निर्विकल्प समाधींत ब्रह्माचे । स्वरूपास पावे अधिकारी ॥ ८९ ॥ ती निर्विकल्प समाधि कैसी विशद ।
वागिंद्रियांचे विषय जे सर्व शब्द । ते तथा अंतःकरणवृत्ति-विविधशब्द । त्यांहून विरहित समाधि असे ॥ ९० ॥ ऐशा
निर्विकल्प शुद्ध समाधींत । सर्वदैव प्रपंचाचा अभाव होत । म्हणून योगी निर्विकल्प समाधिस्थित । पदार्थग्रहणत्याग न करी
॥ ९१ ॥ न करी पदार्थत्याग । तथा विषयचिंतेचा नसे उद्वेग । सर्वविक्षेपरहित निश्चल अभंग । अद्वैत आत्मस्वरूप
होतोचि ॥ ९२ ॥ मग संकल्पविकल्पविहीन । आणि समताभावासी अधिकारी जन । पावून निर्विकल्पब्रह्मानुसंधान ।
निर्विकल्प समाधीस पावतो ॥ ९३ ॥ निर्विकल्पसमाधिरूप याप्रकारें । कथिती वेदांतशास्त्रवचनें बा रे । तथापि ब्रह्मवेत्ता-
गुरूपदेशें अधिकारें । प्राप्ति होय या समाधीची ॥ ९४ ॥ सद्गुरूच्या उपदेशावांचून । त्या समाधीची प्राप्ती नाहीं जाण ।
म्हणूनि वेदांतयोगविद् गुरूसि शरण । जाऊनि स्वहित संपादावें ॥ ९५ ॥ हा निर्विकल्पसमाधियोग ज्ञाता-ज्ञान-ज्ञेय ।
तथा ध्याता-ध्यान-ध्येय । इत्यादि सर्वसंबंधशून्य । केवल निरुपाधिक आहे ॥ ९६ ॥ म्हणून या समाधीस विद्वान् ।
कथिती 'अस्पर्शयोग' या नामेंकरून । या समाधीस वेदांतविचारविहीन । देखूं न शकती भयभीत ॥ ९७ ॥ जैसें निर्भय

एकांतस्थानीं । मूढ बालक भयकारण आरोपूनि । भयरहित तें स्थान असूनि । भयासि उगीच पावतें ॥ ९८ ॥ तैसे सर्वभयरहित समाधींत । भय आरोपोनि जन विवेकरहित । त्या निर्विकल्पसमाधियोगें भयासि प्राप्त । विनाकारण होतात ॥ ९९ ॥ जैसे प्रसिद्ध रूपविषयाप्रति । जन्मांध पुरुष न देखती । तैसें अज्ञानें सुषुप्तितुल्य मानिती । अमनसरूप समाधीसी ॥ १०० ॥ भयाचीं कारणें असतीं दोन । एक आत्मस्वरूपाचें अज्ञान । दुसरें शास्त्रविरुद्ध कथिती वचन । नाना कुतर्क करूनि ॥ १ ॥ सांख्यशास्त्रानुसारीं ते कुतर्क । संक्षेपें कळावया निरूपण सम्यक् । “अद्वितीयात्मा सर्वत्र व्यापक । अभेद सच्चिदानंदरूप ॥ २ ॥ ऐसें वेदांतशास्त्रीं कथिलें । तें न संभवे ऐसें कुतर्कवादी बोले । एकीं एकचि आत्मा म्हणितलें । तें न घडे सहसाही ॥ ३ ॥ एकचि आत्मा व्यापक असेल जर । तरी एक जीव सुखी झाल्यानें इतर । सर्व जीव सुखी झाले पाहिजेत निरंतर । हा सिद्धांत ठरतसे ॥ ४ ॥ तथा एक जीव झाल्यानें दुःखी । झाले पाहिजेत सर्व जीव दुःखी । परंतु ऐसें पाहाण्यांत या लोकीं । येत नाहीं सहसाही ॥ ५ ॥ कोणी जीव सुखी असे । कोणी दुःखचि भोगितसे । तथा कोणी जीव जन्मतसे । कोणी मरतो जगतीं या ॥ ६ ॥ याप्रकारें व्यवस्था येई पाहण्यांत । यावरूनि ऐसें जाणिलें जात । कीं आत्माव्यापक सर्व शरीरांत । एकत्वें नाहीं ॥ ७ ॥ कां तरी एकेक आत्मा एकेक देहीं । देह अनंत म्हणून अनंत आत्मेही । त्या आत्म्यांसि भोगमोक्षप्रदाही । मानिली पाहिजे प्रकृति एक ॥ ८ ॥ संसारदशेंत ती प्रकृति एक । जी धरिते महत्तत्वादि रूपें अनेक । ती प्रकृति मोक्षकालीं अदर्शनात्मक । भावासि प्राप्त होतसे ॥ ९ ॥ अथवा संसारीं बंधरूप अनुलोम । मोक्षकालीं मुक्तिरूप प्रतिलोम । ती प्रकृति पावते परिणाम । किंवा बंधनप्रद न होय ॥ ११० ॥ आणि मनरूपें करितें बंधन । यास्तव मुक्तिकालीं कृतार्थ झालेलें मन । आपले कारणांत लय पावे म्हणून । संभवे ऐशा त्रिविध रीतीं ॥ ११ ॥ आणखी अद्वितीय ब्रह्मांत ।

तादात्म्यरूप मनाचा लय खचित । वेदांत्यांनीं मानिला तो न संभवत । त्याचें कारण परिसावें ॥ १२ ॥ आपले कारणांत होतो कार्याचा लय । अकारणांत कदा न होय । यथा घटरूप कार्याचा लय । मृत्तिकारूप कारणांत होतसे ॥ १३ ॥ घटरूप कार्याचा लय । तंतु आदिक अकारणांत न होय । निर्विकारब्रह्मामाजीं असंभाव्य । म्हणजे मनाची कारणता नसे ॥ १४ ॥ म्हणूनि मनाचा लय ब्रह्मस्वरूपीं । संभवत नाहीं कदापि ।" या प्रकारें अनेक कुतर्क पापी । करिती अविवेकी मूढ ते ॥ १५ ॥ नाना प्रकारें कुतर्क करून । ते योगी म्हणविणारे ज्ञानविहीन । निर्विकल्पसमाधियोगें भिऊन । अमनस-भावासि न पावती ॥ १६ ॥ श्रुति विद्वान् अनुभवसिद्ध । जो पूर्वोक्त असे अमनस-भाव प्रसिद्ध । त्यागूनि त्या अमनसतेसि अप्रबुद्ध । सुषुप्तितुल्य मानिती ॥ १७ ॥ म्हणून ते स्वात्मस्वरूपाप्रति । वेदांतज्ञानहीन पावूं न शकती । वृक्षासारिखे अज्ञ असूनि मानिती । आपणासि पंडित ॥ १८ ॥ पाषाणासारिखे निश्चल असून । व्यर्थ श्वास उठविती भात्यासमान । जैसें जन्मांध स्वहस्तस्थित धन । देखूं न शके सर्वथा ॥ १९ ॥ तैसे ते कुतर्की सद्विचारहीन । हृदयस्थ आनंदचिद्घन । आत्म्यासि देखूं शकती न । सांख्यानुसारीं लेशही ॥ १२० ॥; आतां नैय्यायिकादिकांचें । संक्षेपें निरूपण करूं कुतर्कांचें । कुतर्क मतवाद निरसूनि साचें । शुद्धात्मस्वरूप उमजेल ॥ २१ ॥ बुद्ध्यादिकांचा साक्षी सदोदित । आत्मा सर्वउपाधिरहित । आनंदस्वरूप स्वयंज्योतिरूप वसत । निर्विकार ऐसा जो ॥ २२ ॥ त्या आत्म्यासि कोणी वादी नैय्यायिक । मानिती ज्ञानरहित जड स्वाभाविक । आणि कोणी शून्यवादी माध्यमिक । ज्ञानसुखासि असत्य मानिती ॥ २३ ॥ जेव्हां त्या नैय्यायिकांचे मतांत । आत्म्यासंगें मनाचा संयोग होत । त्या कालीं आत्म्याचे ठायीं उपजत । ज्ञानसुखादि गुण ते ॥ २४ ॥ आणि ज्या कालीं आत्म्याचा आणि मनाचा । संयोग-संबंध होत नसे साचा । त्या कालीं आत्म्यामाजीं ज्ञानसुखादिगुणांचा । होत नाहीं उद्भव ॥ २५ ॥ आणि त्या माध्यमिकांच्या मनांत । तें ज्ञानसुखादि अत्यंत असत्य होत ।

तथा नैय्यायिक मतें आत्मा मोक्षकालांत। संबंधरहित असे ॥ २६ ॥ मरणकालीं आत्म्यासि मनाचा संबंध नोहे। परी जीवितावस्थेंत संबंध आहे। म्हणूनि ते वादी जीवितावस्थेंत पाहे। अमनसभावा न स्वीकारिती ॥ २७ ॥ मात्र अमनसभावासि मोक्षकालांत। अंगीकार करिती वादी भ्रांत। म्हणूनि निर्विकल्पसमाधियोगें सदोदित। भयासि पावती भ्रांतिष्ट ते ॥ २८ ॥ ऐसें शास्त्रविरुद्ध कुतर्क परित्यागून। ब्रह्मवेत्ता गुरूसि शरण होऊन। वेदांतशास्त्र-संप्रदायानुसार जे जन। मनोनिग्रह करिताति ॥ २९ ॥ ते अधिकारी आत्मसाक्षात्कारासि पावून। मोक्षरूप नित्यसुखासि भोगून। जन्ममरणादिसर्वदुःखांपासून। विरहित होती निर्भयें ॥ १३० ॥ म्हणूनि ज्यांना मोक्षप्राप्तीची इच्छा होय। त्यांनीं प्रथम करावा मनोजय। हें परिसूनि शंका करित शिष्य। विनयपूर्वक गुरुवर्या ॥ ३१ ॥ त्या अत्यंत प्रबल मनाचा जय। करण्यासि कोणीही समर्थ न होय। या शंकेचें समाधान गुरूराय। सशास्त्रयुक्तीनें सांगती ॥ ३२ ॥ मनोजय करणें अशक्य असतें तर। वेदश्रुति स्मृति पुराणें पवित्र। मनोनिग्रहविधान प्रकार। कदापिही करिते ना ॥ ३३ ॥ जें कर्म करण्यासि सामर्थ्य आहे। त्या कर्माचेंचि विधान शास्त्र कथिताहे। जें कर्म करण्यास कोणासही सामर्थ्य नोहे। तें शास्त्र सांगणार नाहीं ॥ ३४ ॥ जैसें अग्निहोत्रादि कर्में करण्यास। सामर्थ्य आहे अधिकारी पुरुषास। म्हणोनि अग्निहोत्रादि कर्में आचरावयास। शास्त्रविधान करितसे ॥ ३५ ॥ आणि अग्निभक्षण तथा समुद्रोल्लंघन। करावया कोणाचें सामर्थ्य नाहीं म्हणून। अग्निभक्षणादि कर्मांचें विधान। कोणतेंही शास्त्र कथीना ॥ ३६ ॥ आणि मनोजय व्हावया वारंवार। श्रुति-स्मृति-पुराणें बोधिती सशास्त्र। तथा अनेक विद्वानानुभवें साचार। मनोजय करणें सिद्ध असे ॥ ३७ ॥ ऋषि मुनि योगी महात्मा संत अनेक। मनोजय करूनि शुद्धपरमार्थिक। झाले होती पुरुषार्थी प्रयत्नें अवश्यक। 'अभ्यासवैराग्ययुक्त' जे ॥ ३८ ॥ यास्तव गुरु-शास्त्रांच्या उपदेशें। मनोनिग्रह अवश्य सिद्ध होतसे। अनुद्वेग

दृढोत्साहचि कारण असे । मनोनिग्रहार्थ सर्वांसि ॥ ३९ ॥ जैसें पूर्वीं टिटिभपक्षांनीं । समुद्रानें अंडीं लपविलीं म्हणूनि । सामर्थ्य नसतांही दृढप्रयत्नें चंचूंनीं । समुद्र केला जलरहित ॥ १४० ॥ तैसें होऊनि उद्वेगविरहित । तथा दृढोत्साहप्रयत्नेंकरूनि सतत । मनोनिग्रह करावाचि आळसरहित । गुरुशास्त्रमार्गें मुक्तिप्रद ॥ ४१ ॥ उद्यम साहस धैर्य बल । बुद्धि पराक्रम हे षड्गुण निर्मल । ज्या पुरुषामाजीं नांदती चिरकाल । तयासि काय दुर्लभ असे ॥ ४२ ॥ मरणान्तसंकट जरी आलें । तरी उद्योगादिक न सोडिती भले । म्हणूनि मनोजय सगळे । करा हो जन अवश्य ॥ ४३ ॥ रजोगुणाचें कार्य कामवासना । सत्त्वगुणकार्य विषयभोगानुभव नाना । तथा तामस गुण निद्रारूप लय जाणा । जागृत्-स्वप्नाचे विक्षेप ते ॥ ४४ ॥ कामभोग हे अनर्थाचें कारण । तथा निद्रा सर्व दोषांचें बीजारोपण । तें तर सर्वानर्थकारण जाण । म्हणूनि मन आवरावें ॥ ४५ ॥ त्या मनोनिग्रहाचे दोन उपाय । एक ‘अभ्यास’ दुजा आहे ‘वैराग्य’ । संपूर्ण हा द्वैतप्रपंच महत्कष्टद होय । नानाप्रकारें जीवासि ॥ ४६ ॥ ऐसें जाणूनि इच्छा पदार्थप्राप्तीची । कदा न करणें वैराग्य हेंचि । म्हणजे विषयेच्छारहित तेंचि । ‘वैराग्य’ निर्मल म्हणावें ॥ ४७ ॥ आणि हें संपूर्ण जगत् ब्रह्मरूप । ब्रह्माहून भिन्न नसे वास्तवस्वरूप । जैसें मृत्तिकेहूनि भिन्न घटाचें रूप । मुळींच नसे हो कदापि ॥ ४८ ॥ याप्रकारें वारंवार चिंतन स्वमनीं । त्या चिंतनासीच ‘अभ्यास’ म्हणती ज्ञानी । ऐसें वैराग्य-अभ्यासरूप उपाय दोनी । असती मनोजयार्थ ॥ ४९ ॥ अर्जुनासि बोधी श्रीकृष्ण भगवान् । चंचल दुर्निग्रह असे जरी हें मन । तथापि अभ्यास-वैराग्ययोगेंकरून । होऊं शके मनोजय ॥ १५० ॥ मनाचा निरोधरूप जो योग मुख्य । त्या योगामाजीं चित्ताचा लय-विक्षेप-कषाय । हे विरोधी होती अवश्य त्रय । चित्तनिरोधरूप योगांत ॥ ५१ ॥ त्या तिन्ही अवस्थांचा नाश । अभ्यास-वैराग्योपायें करावा अहर्निश । त्यांत हें चित्त निद्रारूप ‘लयांत’ विशेष । प्रवर्तमान होतें तेव्हां ॥ ५२ ॥ तेव्हां मुमुक्षूनें त्या चित्तासी ।

जोडावें आत्मचिंतनस्वरूप अभ्यासीं। आणि कामभोगीं तत्परता 'विक्षेपासी'। हें चित्त जेव्हां प्राप्त होतें ॥ ५३ ॥ तेव्हां त्या विषयभोगामाजीं नानाविध। दोषांचें चिंतनरूप वैराग्यें शुद्ध। त्या विषयभोगापासूनि चित्तवृत्तिनिरोध। म्हणजे चित्तासि निवृत्त करावें ॥ ५४ ॥ हें लयविक्षेपाचें रूप वर्णिलें। आतां कषायाचें परिसा भलें। विघ्नबाहुल्य पाहिजे गेलें। अभ्यासेंकरून समूल ॥ ५५ ॥ रागादिकांच्या संस्कारेंकरून चित्तांत। आत्म-अनात्माकार वृत्तिरहित। जी स्तब्ध अवस्था आहे मानसांत। यासीच 'कषाय' म्हणताति ॥ ५६ ॥ त्या कषाय-दोषयुक्त चित्तासि देखूनि। मोक्षाधिकारी पुरुषांनीं। वैराग्य-अभ्यास-उपायेंकरूनि। कषाय-दोषनिवृत्ति करावी ॥ ५७ ॥ या उपायें मुमुक्षूचें चित्त। जेव्हां ब्रह्माकारतेसि प्राप्त होत। तेव्हां तें ब्रह्माकार झालेलें चित्त। चलायमान् करूं नये ॥ ५८ ॥ तें ब्रह्माकार बनलेलें चित्त। जेव्हां बाह्य पदार्थावरी जात। तेव्हां मुमुक्षूनें प्रयत्नें त्वरित। करावें ब्रह्माकार पुनः पुन्हा ॥ ५९ ॥ लय-विक्षेप-कषायदोषरहित। जेव्हां चलनपणा सांडी हें चित्त। तथा सर्व दृश्य पदार्थसंबंधरहित। झालें म्हणजे ब्रह्मरूप जाणावें ॥ १६० ॥ सर्व विक्षेपरहित झालेलें। चित्त ब्रह्मस्वरूपीं अखंड मिळालें। तें शुद्धब्रह्म नित्यमुक्त विराजलें। सर्वानर्थविहीन ऐसें ॥ ६१ ॥ जोंपर्यंत साक्षी-आत्म्याचे ठायीं। मनाचा 'बाधरूप' लय होत नाहीं। तोंपर्यंत मननिरोध शिष्या पाहीं। अवश्य करावा मुमुक्षूनें ॥ ६२ ॥ त्या निरोधी मनासि होय ब्रह्मप्राप्ति। हाचि मनाचा 'बाध' असे निश्चितीं। वेदांतवाक्यविचार सांख्य वदती। कीं निरोधचि योगफल ॥ ६३ ॥ या मनाच्या निरोधापेक्षां अधिक। सांख्ययोगाचें फल नाहीं आणिक। म्हणोनि मनोनिग्रह-प्रतिपादक। अध्यात्मशास्त्र अभ्यासावें ॥ ६४ ॥ वेदांत मनोनिग्रह शास्त्रप्रापक। त्यातें सांडूनि अन्य न्याय मीमांसादिक। शास्त्राध्ययन करिती करविती अनेक। तेणें शांति नसेचि ॥ ६५ ॥ ज्या पुरुषाचें मन विषयवासना। त्यागूनि शांतीस पावलें नाहीं जाणा। त्याचें दान यज्ञ तप

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

शौच तीर्थादिक नाना । सर्वही कर्म निष्फळ ॥ ६६ ॥ यथा सर्व 'कुंजरशौचवत्' । म्हणजे गजाचें स्नान निष्फल होत । स्नानानंतरी पुन्हां अंगावरी मृत्तिका फेंकित । तैसेंचि अशांत मनाचें ॥ ६७ ॥ इहपरलोकीं मिळणारें शुभफल । मननिरोधेंचि प्राप्त होय सकल । म्हणूनि मनोनिग्रह मोक्षार्थ निर्मल । अवश्य चिरकाल करावा ॥ ६८ ॥ पुढिले अध्यायीं रसाळ व्याख्यान । परिसा हो सावधानें श्रोतेजन । श्रीगुरुलीलामृत जगत्पावन । करणारें भक्तजनांसि ॥ ६९ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदशास्त्रपुराणमथित । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । चतुर्विंशतितमाध्याय रसिक हा ॥ १७० ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे चतुर्विंशतितमोऽध्यायः समाप्तः ॥ २४ ॥ श्रीगुरुदेवदत्त—स्वामीसमर्थ ॥ ॥

# ॥ अध्याय पंचविसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ गुरु सांगती सच्छिष्याला । अपार अनंत श्रीगुरुलीला । श्रवणपठणें सकल जीवांला । संपूर्ण लाभप्रद होतसे ॥ १ ॥ अज्ञान-निद्रेंतून करितो जागें । थापटूनि प्रबोधी सानुरागें । नृजन्मीं येऊनि आळसें उगें । आयुष्य घालवूं नका जन ॥ २ ॥ निरालस्य होऊनि उठा सत्वर । शोधा स्वदेश इंद्रियग्राम देहमंदिर । निजसुख विषयकामीं निरंतर । मानूनि कां मरतां जन्मतां ॥ ३ ॥ परित्यागूनि सद्गुरुजननी-जनकांसि । तीर्थक्षेत्रीं कां हो हिंडतां जन काशी । योगांगव्रत तपादि करणें परिश्रमासि । मोक्षसिद्धीसि हीं निरुपयोगी ॥ ४ ॥ अनेक कर्में यज्ञें आणि धनेंकरून । मोक्षप्राप्ति नाहीं जाण । एका त्यागानेंच अद्वितीय चिद्घन । सत्यज्ञानानंतस्वरूप लाधतें ॥ ५ ॥ निर्मल तीव्र वैराग्यावांचून । अप्राप्त असे गुरुमुखें ब्रह्मज्ञान । त्या ब्रह्मात्मज्ञानेंचि मुमुक्षुजन । मोक्षसुखसंपन्न होतात ते ॥ ६ ॥ परंतु पुरुषार्थ-प्रयत्न अवश्य । ब्रह्मवेत्ता महत्पुरुष गुरूचा समाश्रय । पाहिजे मुख्यत्वें निरालस्य । त्याविना उपहास वाढतसे ॥ ७ ॥ ते दत्तात्रेय परमात्मा परमहंस । निर्विकार विश्वात्मा परमपुंस । विराजती कर्णीं मस्तकीं अवतंस । प्रशंसनीय एकचित्तें ॥ ८ ॥ ते यतीन्द्र वारंवार बोधिती बरवें । 'शेत पिकवावें आणि खावें'। या प्रबोध वचनाचें रहस्य परिसावें । स्वकल्याणार्थ सर्वांनीं ॥ ९ ॥ आळस टाकूनि समूळ । पुरुष-प्रयत्न अवश्य चिरकाल । केलिया सर्वाभीष्ट सफल । प्राप्त होतसे निश्चयें ॥ १० ॥ आळसें हटानें बसावें स्तब्ध । उगेंचि कां म्हणावें 'प्रारब्ध'। प्रयत्नावांचून कांहींच उपलब्ध । होणार नाहीं सर्वथा ॥ ११ ॥ व्हावया निर्वाह प्रपंचसंसार । केला पाहिजे यत्नचि थोर । 'प्रयत्नांतीं परमेश्वर'। मिळे

ऐसें सर्वत्र बोलती ॥ १२ ॥ श्रुति स्मृति पुराणें इतिहास । करिती आळशांचा उपहास । साद्यंत प्रपंचनिर्वाहास । प्रयत्नचि
मुख्य लागतसे ॥ १३ ॥ पुरुषार्थें करावे उद्योग । व्यापारधंदे रोजगार कामें साङ्ग । पुरुषप्रयत्नें सकल वस्तुभोग ।
आपोआप प्राप्त होती ॥ १४ ॥ पौरुषयत्नें राज्यपदप्राप्ति । विद्या द्रव्य संतति संपत्ति । पुरुषार्थी यांचीं नामें गर्जती ।
त्रैलोक्यांत सदोदित ॥ १५ ॥ पुरुषार्थें विजयी महाशूर । युद्धांत शस्त्रास्त्रें गर्जती थोरवीर । पुरुषार्थें तीर्थक्षेत्र देवमंदिर ।
रचिती सागर नद्यादिक ॥ १६ ॥ प्रयत्नवान् जे जे पुरुष । ते पाताळांतून आणितील शेष । प्रयत्नें परंब्रह्मविद्या निर्विशेष ।
हृदयीं विशेष आकळिती ॥ १७ ॥ पुरुषार्थी प्रयत्नें अर्धक्षणांत । समुद्र नदी वृक्ष वन्हि पर्वत । आर्द्र शुष्क करूनि
त्वरित । उपडिती स्थापिती प्राशिती ॥ १८ ॥ नर करणीनें बैसती स्वर्गीं । नर करणीनें होती इन्द्रपदभोगी । नर
करणीनें अशक्त रोगी । त्यागी विरागी इहपर होती ॥ १९ ॥ क्रियमाणें होती अमर । जिंकिती समरीं सुरासुर ।
क्रियमाणें दीन दुर्बल पामर । किंवा छत्रचामरें मिळविती ॥ २० ॥ जैशी प्रयत्न क्रियाशक्ति । वासना तैशी फलनिष्पत्ति ।
कृतीनें रंक होई चक्रवर्ती । अथवा भूपति असून भिक्षा मागे ॥ २१ ॥ प्रयत्नें देव होय सारथी । प्रख्यात रथी अतिरथी
महारथी । भूमंडलीं आणिली भागीरथी । प्रयत्नेंकरून भगीरथें ॥ २२ ॥ प्रयत्नें स्वर्गासि करिती सोपान । हटयोगें एकत्र
होतसे प्राणापान । प्रयत्नहटें उडविती विमान ॥ अंतरिक्ष-गमन वायुवेगें ॥ २३ ॥ आकाशीं दाविती धूमकेतु शिखाकेतु ।
समुद्रावरी रचिती सेतु । सिद्धीस नेती अघटित हेतु । अचाट प्रयत्नेंकरूनि ॥ २४ ॥ चालती तारायंत्र वाफेच्या गाड्या ।
उद्यानें मंडप मंदिर माड्या । प्रयत्नें वैद्य पाहती रोगनाड्या । औषधोपचारी चिकित्सक ॥ २५ ॥ राजनीति धर्म क्षात्र ।
प्रजापालन दया सर्वत्र । प्रजेसि सांभाळिती यथाशास्त्र । व्यवस्था मात्र प्रयत्नें ॥ २६ ॥ साङ्ग सार्थ चतुर्वेदाध्ययन । नित्य
यत्नें धर्मशास्त्रादि ग्रंथावलोकन । अष्टांग योग तत्त्वदर्शन । करिती ईश्वरोपासना प्रयत्नें ॥ २७ ॥ चौदा विद्या चौसष्ट

कला । शिकती किमया गारुड इंद्रजाला । भूत-प्रेत-पिशाच्च-संबंधाला । दूर करिती प्रयत्नें ॥ २८ ॥ सूर्य-चंद्र-ग्रहणांचे वेध । प्रयत्नें साधिती अश्वमेध । काशी क्षेत्रीं वसती निर्वेध । देहसार्थकासि प्रयत्नें ॥ २९ ॥ आधीं शेत प्रयत्नें नांगरावें । मग त्यांत धान्यबीज पेरावें । मेघवृष्टीनें मोड अंकुर उगवावे । संरक्षण करावे नित्य त्यांचें ॥ ३० ॥ पशुपक्ष्यादिकांचें क्षेत्रीं उपद्रव । निरसनार्थ मंचोपरीं बसावें सदैव । धान्यकण परिपक्व झाल्यावरीही सर्व । सांभाळावें लागतसे ॥ ३१ ॥ मग कांडणें पेषणें निवडणें । नंतर शिजवूनि पक्वान्न भोजन करणें । ‘शेत पिकवावें खावें’ या वाक्याप्रमाणें । अनुभवासि सर्व येतेंच ॥ ३२ ॥ परंतु पुरुषार्थ-प्रयत्नावांचून । शेतांत कैसें धान्य होय उत्पन्न । पुरुषार्थ चतुर्विध असती भिन्न । धर्म-अर्थ-काम-मोक्ष ॥ ३३ ॥ पुरुषार्थ प्रयत्न खरा दिसे । यत्नेंचि सर्व प्राप्त होतसे । प्रारब्ध म्हणून चुलीजवळ आळसें । बसावें काय स्वस्थपणें ॥ ३४ ॥ हस्तपादादिक नाहींत त्यास । म्हणून पंगु म्हणती प्रारब्धास । यासाठीं केले पाहिजे यत्न सायास । ऐसें प्रयत्नवादी स्थापिती ॥ ३५ ॥ दिसेना म्हणून ‘प्रारब्ध-अदृष्ट’ । तें कार्यें काय सिद्ध करील इष्ट । दैववाद्यांचें मत अति कनिष्ट । अनिष्टप्रद तें मानूं नये ॥ ३६ ॥ टाका रे टाका रे प्रारब्धमतछंदा । करा रे करा यत्न उद्योग धंदा । तरीच पावाल सर्व सुखानंदा । ऐसें बोलती यत्नवादी ॥ ३७ ॥ कुटुंबाचा वैरी आळस । झोंप सुखाची सोयरी वाटे आळशास । आळसी ते जडभार भूमीस । व्यर्थचि होती जाणावें ॥ ३८ ॥ हस्त पाद हलविल्यावांचून । शरीर-व्यवहार उदर-पोषण । प्राणीमात्रांचें होणार नाहीं म्हणून । अवश्य यत्न करा हो ॥ ३९ ॥ आतां दैववाद्यांचें मत । चतुर सुज्ञ श्रोते परिसोत । नित्य यत्न मृत्युकालपर्यंत । केले परिमित सुखार्थ ॥ ४० ॥ स्वकार्यसिद्ध्यर्थ लोक । करिती यत्न सर्वदा अनेक । परंतु कार्य न साधतां उलटा शोक । काय म्हणून होतसे ॥ ४१ ॥ प्राण जाई तोंकालपर्यंत । यत्न केले असंख्यात । तथापि क्षणमात्रही सुख प्राप्त । झालेंचि नाहीं सर्वथा ॥ ४२ ॥ नसूनि कांहीं यत्नांत न्यूनत्व । संसारीं कां

होत नाहीं सौख्यत्व । म्हणूनि प्रयत्नासि येतें मिथ्यत्व । पुरुषत्व असूनि वंध्यत्व कां ॥ ४३ ॥ कोणी गर्भश्रीमंत असून । कां न मिळे त्यास वस्त्रान्न । समुद्रांत जन्मभर राहून । वर निघालिया कोरडे कां ॥ ४४ ॥ यत्नाची झाली पराकाष्ठा । जन्मभरी सोसूनियां कष्टा । काय राहिली प्रतिष्ठा । पुरुषयत्न-उद्योगाची ॥ ४५ ॥ अतिपरिश्रमें फार कंटाळा । पुरुषप्रयत्नाचा वीट आला । आतां कर ठेवून वरि कपाळा । यत्न-गोंधळा धिक्कारिलें ॥ ४६ ॥ नको नको हा पुरुषप्रयत्न । पुरें झालें भोगणें क्लेश-यत्न । दैववाद्यासि प्राप्त झालें रत्न । राजमंदिरीं अयत्नें तें ॥ ४७ ॥ दैवदिष्ट भागधेय । नियति विधि आणि भाग्य । आरब्ध प्राक्तन काल ऐश्वर्य । प्रारब्ध नशीब इत्यादिक ॥ ४८ ॥ ऐशीं दैवाचीं नामें अनेक । आतां 'दैव' शब्दाचा अर्थ परिसा सम्यक् । तैसा 'दिष्ट' शब्दार्थही पृथक् । सांगूं स्पष्ट कळावया ॥ ४९ ॥ 'देवादागतं देवानामिदं दैवं' । देवापासून प्राप्त जें तें दैव । किंवा देवसंबंधीं जें तें दैव । ऐसा दैव-शब्दार्थ जाहला ॥ ५० ॥ म्हणजे ईश्वरापासून झालें जें प्राप्त । किंवा परमेश्वरसंबंधीं जें तें दैव म्हणिजेत । अर्थात् दैव अनादि ईश्वरनिर्मित । तें अनृत कैसें होईल ॥ ५१ ॥ 'दिशति दिश्यते स्म इति वा दिष्टः' । क्षणोक्षणीं अशा बाल्यादिक स्पष्ट । अवस्थेंत देई जें इष्ट । अथवा शुभाशुभ देई जें तें 'दिष्ट' जाणावें ॥ ५२ ॥ दिश् धातु अति सर्जन । म्हणजे दैव कालादि प्राक्तन । अर्थात् दैव पंगु दृष्ट नाहीं म्हणून । प्रारब्ध-प्राधान्य जाणिजे ॥ ५३ ॥ विधि नियति भागधेय । याचे अर्थ लोक जाणती भाग्य । दैवादि शब्दांचे अर्थ-तात्पर्य । दैवचि प्राधान्य बलवान् असे ॥ ५४ ॥ 'दैवो विचित्रा गती' । ऐशीं अनेक श्रुतिशास्त्रें गर्जती । ललाटरेषा खरी मानिती । कष्ट करूनि शेवटीं ॥ ५५ ॥ 'दैवं फलति सर्वत्र' । 'न विद्या पौरुष स्वतंत्र' । शुभाशुभ फलद एक स्वतंत्र । दैवचि निश्चित मानिती ॥ ५६ ॥ दैवगतीचीं विचित्र लक्षणें । काय होईल एका क्षणें । हें अगम्य असूनि जरी कळलें ज्ञानें । तथापि

भोगणें न चुके कदा ॥ ५७ ॥ ज्या ज्या कालीं जें जें होणार । तें तें न चुकेचि ऐसा सर्वत्र निर्धार । दैवगतीचा विचित्र विचार । तेणें सकल कुंठित होती ॥ ५८ ॥ पुरुष-यत्न झाले शतशां । तरी मग कां वरिती अपयशा । दुर्विज्ञेय दैवदशा । भवितव्यता कैशी टळेल ॥ ५९ ॥ दैव झालिया पराङ्मुख । नसतीं विपरित विघ्नें प्राप्त दुःख । रत्नांच्या गारगोट्या होती देख । स्वप्नींही सुख दुर्लभ तें ॥ ६० ॥ पाठमोरें दैव जेव्हां असे । तदा सुवर्णाचीही मृत्तिका आणि होती कोळसे । महत्कठिण प्रसंग अप्रार्थित येतसे । प्रारब्ध-ग्रहदशें अनिवार ॥ ६१ ॥ लोकांच्या अपवादासाठीं । अहोरात्र प्रयत्न केले कोटी । ते निष्फळ होऊन शेवटीं । मुकाट्यानें हा दैव हा दैव म्हणती ॥ ६२ ॥ जन्मांतरींचीं जीं शुभाशुभ कर्मैं । हींच उदया येतीं दैव-नामें । तें संचित-क्रियमाण-दैव त्रयकर्में । त्रिविध प्रकारें जाणिजे ॥ ६३ ॥ भावी देहारंभक तें ‘संचित’ । वर्तमानदेहनिर्वर्त्य ‘क्रियमाण’ असत । वर्तमान देहारंभक ‘प्रारब्ध’ सत्य । शास्त्र लौकिक स्वानुभवें ॥ ६४ ॥ यद्यपि संचितचि जन्मांतरीय । तथापि भावी देहाचें तें प्रारब्ध होय । अतएव सिद्धात्मा स्वतः अज अव्यय । अबाध्य कर्तृत्वादिरहित ॥ ६५ ॥ त्रिविध प्रारब्ध कर्म निरूपिलें । प्रसंगवशात् प्रारब्धत्रय प्रकार पाहिजेत केले । इच्छा-अनिच्छा-परेच्छा प्रारब्ध वर्णिलें । वेदांतशास्त्रीं त्रिविध तें ॥ ६६ ॥ प्रारब्धसंस्कार प्रेरक जाणिजे । 'आणि यत्नासि प्रेर्य म्हणिजे । ईश्वरें मायें निर्माण केलें जें जें । तें तें पाहिजे भोगिलें ॥ ६७ ॥ प्रारब्धसंस्कारयुक्त प्रेरणा । तैशी तैशी प्रयत्न-धारणा । लाभालाभ कार्यकारणा । घडे होणाऱ्यासारिखें ॥ ६८ ॥ दैवसंस्कार असे प्रबल । तरीच प्रयत्न होतसे सफल । दोहींचें वास्तविक वर्म केवल । तत्त्वज्ञ जन जाणती ॥ ६९ ॥ दैव झालिया सानुकूल । तरीच पुरुष यत्न होती सुफल । मृत्तिकादिकांचें सुवर्ण उज्ज्वल । गारेचें रत्न तत्काळ होतसे ॥ ७० ॥ वटबीज सूक्ष्म असून । महा वटतरु वाढतो विस्तीर्ण । बीजाहून वृक्ष नाहीं भिन्न । शाखा-पत्र-पुष्प-फलादिक ॥ ७१ ॥ बीजापासूनि उपजे वाढे वृक्ष ।

वृक्षांगीं भरलें बीज प्रत्यक्ष । ऐसें असतां तदर्थ पक्षापक्ष । विनास्वार्थ कशाला ॥ ७२ ॥ तैसें दैवावीण यत्न । यत्नावांचूनि प्राक्तन । कधीं न राहतसे भिन्न । जाणावें निश्चयें विवेचन हें ॥ ७३ ॥ पुरुष-प्रयत्नें सहजसाध्य । अतिशय यत्नें असाध्य । साध्यअसाध्यासि बाध्य । दैव मध्यें लागलें ॥ ७४ ॥ एकासनीं स्थित जे संत योगीजन । तयासि मिळतें अन्नाच्छादन । असेल माझा हरि भगवान । देईल आणूनि बाजेवरी ॥ ७५ ॥ वर्तमान-भूत-भावी हे प्रतिबंध । कार्यांत आड येती प्रसिद्ध । अत्यंत दृढाभ्यासें विवेकें तत्संबंध । नष्ट होय निःसंशयें ॥ ७६ ॥ ज्ञानाग्नीनें संचितादिक । सर्व कर्म भस्म होय साहजिक । देह प्रारब्धकर्मांचा वास्तविक । भोगिल्यानें क्षय होतो ॥ ७७ ॥ सर्व व्यवहारासि कारण मूल अज्ञान । ते तत्त्वज्ञानें नष्ट झालें म्हणून । कैसे व्यवहारीं वर्तती ब्रह्मज्ञानी जन । अज्ञानी जनांचा प्रश्न ऐसा ॥ ७८ ॥ त्या अज्ञानी जनांसि बोध व्हावा म्हणून । वेद श्रुति प्रारब्ध करी कथन । संचित-क्रियमाण-प्रारब्धकर्मांचा क्षय होऊन । ज्ञानी परमपुरुषार्थासि पावले ॥ ७९ ॥ ज्ञानाग्नींत जळालें सर्व कर्म संचित । क्रियमाण पूर्वप्रवाहें घडतें विध्युक्त । कर्में अहेतुक अहंममतादिरहित । ब्रह्मार्पण होत व्यवहार सकल ॥ ८० ॥ जड देह मिथ्या नाशिवंत । त्या देहाचें प्रारब्ध नव्हे सत्य ऋत । म्हणूनि ब्रह्मात्मज्ञानी व्यवहारांत । निर्विकार साक्षित्वें वर्तती ॥ ८१ ॥ अर्थात् हें शरीर क्षेत्ररूप । क्षेत्रज्ञ आत्मा निर्विकार साक्षिस्वरूप । श्रीसद्गुरुकृपें ब्रह्मानंद निर्विकल्प । अनुभविती मुमुक्षु सर्वदा ॥ ८२ ॥ शिष्य बाळा होईं रे सावध । श्रीगुरुलीला ऐक बा अगाध । जेणें शांत होती काम क्रोध । समूल विकार नाशती ॥ ८३ ॥; असो अक्कलकोटचे पांडुरंग । पुराणिक आश्रित अभंग । त्यांचे शालक विरक्त सत्संग । करिती गृहस्थ असूनि ॥ ८४ ॥ शुक्लयजुर्वेदी ब्राह्मण । ईश्वरभक्तिपरायण । महीपति रामचंद्र-नामाभिधान । बाबा सबनीस जन म्हणती ॥ ८५ ॥ कांहीं दिवस सबनिसी कारकुनी । अक्कलकोट राजधानीं । करितां उपरती झाली

मनीं । बाबा सबनीस विप्रासि ॥ ८६ ॥ सत्यवादी सद्धर्माचार । पांडुरंगभजनीं सदा तत्पर । उद्भवला परमार्थ-संस्कार । पूर्वपुण्येंकरूनि ॥ ८७ ॥ मोगलाईंत हुमणाबादेनजिक । माणिकनगर स्थान रम्यक् । सिद्धपुरुष माणिकप्रभु नामक । त्यांचें स्थान असे हें ॥ ८८ ॥ दया क्षमा शांति अंगीं । भक्तिज्ञानसहित विरागी । राग द्वेष विकार परित्यागी । माणिकप्रभु महात्मा ॥ ८९ ॥ जे बाल्यावस्थेपासून । संसार प्रपंच परित्यागून । ब्रह्मानंदांत अखंड निमग्न होऊन । विचरती भूवरी ॥ ९० ॥ जगद्धितार्थ कल्याण-ग्रामादिकांत । वसूनि शेवटीं आनंदभरित । रचवूनि माणिकनगर प्रख्यात । राहिले विश्रांतिस्थानीं त्या ॥ ९१ ॥ सहस्रावधि लोक दर्शना । येती धरूनि शुद्ध भावना । वैदिक पंडित हरिदास नाना । गायक वैद्य ज्योतिषी ॥ ९२ ॥ श्रीमंत गृहस्थ सावकार । व्यापारी आणि सत्ताधिकारी थोर । निर्धन रोगी भाविक नारीनर । येती दर्शना गणिकादि ॥ ९३ ॥ ब्रह्मचारी ग्रहस्थ वनवासी । साधु संत महंत विरागी संन्यासी । सर्व जातींचे लोक दर्शनासि । येती माणिकप्रभूच्या ॥ ९४ ॥ वेदघोष वेदांत सिद्धांत । चर्चा पुराण कीर्तन नृत्य गीत । भजन पूजन आरती सतत । स्थानांत प्रभूच्या चालतसे ॥ ९५ ॥ माणिकप्रभु पुष्कळांसि धन । देती वस्त्रालंकार जाण । नानापरीचें पक्वान्न भोजन । मिळे सर्व जातींना ॥ ९६ ॥ नानापरीचे लोक सेवेसी । वसती धनलोभें कामनेंसीं । माणिकप्रभु अर्पिती सर्वांसि । धनादिक प्रसाद ॥ ९७ ॥ अहमदनगरकर वैद्य सेवेंत । होते यज्ञेश्वर बापू दीक्षित । त्यांचे पुतणे प्रभुदर्शनार्थ । राहिले होते येऊनि ॥ ९८ ॥ सदाचारी वैदिक विद्वान् । विश्वनाथ वैद्य वामोरीकर म्हणून । आणखी शास्त्री पंडितजन । समीप होते प्रभूच्या ॥ ९९ ॥ या अवतारिक पुरुषाची सत्कीर्ति । सदोदित पावतसे वृद्धीप्रति । ज्यांनीं ग्रंथ स्वानुभविकस्थिति- । पूर्वक रचिला उत्तम ॥ १०० ॥ ऐशा महात्मा पुरुषाचें यश गुण । बाबा सबनीसानें श्रवण करून । अक्कलकोटचे सबनिशीचें काम सोडून । गेले ते माणिकनगरासि ॥ १ ॥ वंदूनि माणिकप्रभूला । बाबा

सबनीस राहिले सेवेला । कांहीं दिवस गेल्यावरी पातला । भाग्योदय सुदिन ॥ २ ॥ जैसें वसंतऋतूचें होतां आगमन । धान्यौषधि फलपुष्पादि होती उत्पन्न । सकल प्राणीमात्र संतोष पावून । परमसुखार्था लाधती ॥ ३ ॥ अथवा उदयासि येतां अर्क । सुरसभा मानवपशुपक्ष्यादिक । आपापलें नित्य-नैमित्तिक । कर्म आचरती आनंदें ॥ ४ ॥ पौर्णिमेचा पूर्ण चंद्र । देखूनि आनंदती प्राणीमात्र । वनौषधि लता पुष्प पत्र । होती प्रफुल्लित कमलिनी ॥ ५ ॥ गोकुल वृंदावन मथुरा द्वारका । येथील सकलजन गोप गोपिका । भक्त सखे पांडवादि देखा । श्रीकृष्णदर्शनें संतुष्टती ॥ ६ ॥ तैसें भक्तकार्यकल्पद्रुम । योगी मुनिजन विश्रामधाम । एक यतिवेषें पुरुष परम । पातले दिव्य तेजस्वी ॥ ७ ॥ परम त्वरेनें प्रभु माणिक । सामोरा गेले सकळिक । आणूनि बैसविले गुरुनायक । उत्तमश्लोक सिंहासनीं ॥ ८ ॥ साष्टांग प्रणिपात संपूर्ण । करिती पूजिती नारायण । मंगलारती स्तोत्रपठण । करिती प्रदक्षिणा मुहुर्मुहुः ॥ ९ ॥ मग माणिकप्रभु समस्तांसि । सांगती हे गुरुस्थानीं हृषीकेशी । साक्षाद्दत्तात्रेय आम्हां सर्वांसि । आहेत जगदुद्धारक ॥ ११० ॥ हे स्वामिराज दत्तात्रेय । विकासती पूज्य सर्वत्र वंदनीय । यदर्थी नसावाचि संशय । मायबाप जगद्गुरु हे ॥ ११ ॥ बाबा सबनीसास प्रभु बोधिती । दोन वर्षांनीं ही श्रीदत्तमूर्ति । तुमच्या अक्कलकोटीं निश्चितीं । जगद्धितार्थ प्रकटेल ॥ १२ ॥ या चरणांची सेवा आणि दर्शन । करूनि मनेप्सितार्थ पावतील जन । बाबांनीं हें अमृतवचन ऐकून । ‘तथास्तु’ म्हणून नमियेलें ॥ १३ ॥ स्वामीसमर्थ पूर्णावतारी । विश्वनाथ वैद्यासि तयांच्या पायांवरी । प्रभूंनीं घातलें निर्धारीं । सांगितलें भविष्य तें ॥ १४ ॥ तुमचा कनिष्ठ बंधु वामन । सत्पुरुष होईल यांचे कृपेंकरून । हरिगुरुगुणानुवाद वर्णून । निर्माण ग्रंथ करील ॥ १५ ॥ सर्वोपरी तुमचें हें कुलदैवत । दत्तात्रेयस्वामी शिवशक्तिमंत । या चरणकृपें व्हाल मुक्त । निःसंशय जाणावें ॥ १६ ॥ ऐसें बोलूनि प्रभूंनीं

फलप्रसाद । दिधला सर्वाभीष्ट फलप्रद । उभय महत्पुरुषाचें चरणारविंद । विश्वनाथें वंदिलें ॥ १७ ॥ विश्वनाथ वैद्य
वामोरीकर । अनन्यभावें जोडूनि द्वय कर । म्हणे जय जय हो करुणाकर । योगाधीश्वर गुरुवर्या ॥ १८ ॥ श्रीगुरु
देवदत्त स्वामिराय । करितसां सृष्टि-स्थिति-प्रलय । विराट् हिरण्यगर्भ मायामय । विधि-हरि-हर आहां स्वयें ॥ १९ ॥
आत्मांतर्वर्ती विश्वव्यापका । सत्ता-स्फूर्तित्वें जगत्पालका । गुणातीत अनंतब्रह्मांडनायका । आपणचि आहां मोक्षप्रद
॥ १२० ॥ साकार स्वरूपें निराकार । सर्वांतर्यामि-निवासी परात्पर । चिच्छक्तीचा करून अंगिकार । स्वच्छंदें व्यवहार
करितां हो ॥ २१ ॥ आपण उभयतां पुरुषोत्तम । अभेद ऐक्यस्वरूप निःसीम । आम्हांसि लाभ झाला परम । दर्शन
झालें पायांचें ॥ २२ ॥ झालों आजि कृतकृत्य । मंगलचि परममंगल नित्य । पूर्णब्रह्मस्वरूप ज्ञानानंतसत्य ।
प्रत्यक्ष प्रत्ययें हृदयीं विलोकिलें ॥ २३ ॥ धन्य दिवस आजि भाग्योदय । भेटले परमेश्वर दत्तात्रेय । म्हणूनि धरिले
दृढतर पाय । गुरु बाप-माय आमचे ॥ २४ ॥ गुरुनाथें अभयकर-वरद । मस्तकीं ठेविला नित्यानंद । उठवूनि
बोधिती सच्चिदानंद । यतींद्र गोविंद मुनिवर्य ॥ २५ ॥ अहमात्मस्वरूप नित्योपलब्ध । जेथें वेद श्रुति ठेल्या स्तब्ध ।
समजूनि उमजलें पूर्वप्रारब्ध- । पुण्यपरिपाकेंकरूनि ॥ २६ ॥ सिद्धपुरुष तुमचे पूर्वज । तैसें तुम्हीही निर्द्वंद्व अव्यय
अज । विश्वनाथ वैद्यासि स्वामिराज । सांगूनि सहज ब्रह्मस्थिति ॥ २७ ॥ बाबांसि आणि सकलांतें । अर्पूनि आशीर्वाद
कल्याणातें । माणिकप्रभूसि आलिंगनातें । देऊनि गेले योगिराज ॥ २८ ॥ पुढें बाबा सबनीस । येऊनि
राहिले अक्कलकोटास । विश्वनाथ वैद्य आले वामोरीस । परमपुरुषार्थ साधूनि ॥ २९ ॥ प्रसाद दत्तात्रेय स्वामींचा ।
सर्वांनीं ग्रहण केला हिताचा । उदय पावला सदा आनंदाचा । जयजयकार वाढला ॥ १३० ॥ रावजी वैद्यांचे सदनांत ।
प्रसादरूपीं श्रीमद्दत्तावधूत । आशीर्वाद व्हावया सुफलित । पूर्ववत् स्थिर जाहले ॥ ३१ ॥ प्रथम प्रसाद दर्शन ।

रावजी वैद्यासि शुभ शकुन । श्रीक्षेत्र काशींत अत्रिनंदन । रक्षिती येऊन ब्रह्मावर्तीं ॥ ३२ ॥ तैसेंचि श्रीक्षेत्र द्वारावतींत । भुन्याबुवा योगियांचे स्थानांत । स्वामी समर्थ श्रीगुरुदेवदत्त । दर्शन देती सर्वांसि ॥ ३३ ॥ म्हणूनि पूर्ववत् म्हणितलें । रहस्य जाणती सज्जन भलें । असो जनपदहितकर्ते पातले । कांहीं दिवसांनीं सोलापुरीं । ॥ ३४ ॥ तेथूनि अक्कलकोट नगरीं । येऊनि प्रवेशले स्वेच्छाचारी । स्वामी समर्थ दत्तावतारी । लोकानुग्रहाकारणें ॥ ३५ ॥ मग ते बाबा सबनीस । स्वामिरायांच्या सेवेस । अपवर्ग-प्राप्त्यर्थ होऊनि दास । पूर्ण विश्वासें रंगले ॥ ३६ ॥ त्यावेळीं ब्राह्मण-स्त्री हरिबाई । सातार प्रांतांतील विरक्त पाहीं । रामदासी सांप्रदायी । सज्जनगडची राहणारी ॥ ३७ ॥ अक्कलकोट ग्रामाबाहेर । जुनें विस्तीर्ण श्रीराममंदिर । आहे तेथें उदकाची विहीर । मोठी सुशोभित सखोल ॥ ३८ ॥ तेथें राममंदिर लहान । बांधून राहिली रामदासीण । भजन पूजन ग्रंथपठण । भिक्षा मागून करितसे ॥ ३९ ॥ तेथें बाबा सबनीस सदाचारी । नित्य वाचिती दासबोध ज्ञानेश्वरी । गुरुभक्त मोक्षाधिकारी । सत्कालक्षेप करिती हो ॥ १४० ॥ बाबांचे लहानसे खोलींत । अध्यात्मग्रंथ-चर्चा चालत । दत्तंभट सार्थ बोधामृत । पठती नित्य निरालस्य ॥ ४१ ॥ गणपतराव सेवेकरी । धोंडोपंतादिक विचारी । बाबा फडणीस श्रवण मनन नित्य अंतरीं । करिती शुद्ध मानसें ॥ ४२ ॥ शुद्ध स्वच्छ भगवद्गीता । बाबांनीं लिहिल्या स्वहस्तें अधिक शता । देवालयीं अर्पिल्या बहुता । परोपकारार्थ पठणासि ॥ ४३ ॥ गुरुराज गुरुराज कारुण्य कंद । सर्वदा मुखीं दत्त विष्णु हरि गोविंद । स्मरती राम कृष्ण हरि गोविंद अखंड । गुरुनाम-स्मरण करिती हो ॥ ४४ ॥ निराबाई बाबांची भगिनी । सेवा करी बंधु सत्पुरुष म्हणूनि । शरीर सदृढ कांति गौरवर्णी । सुंदर सावयव विराजित ॥ ४५ ॥ पांडुरंग पुराणिकास संतान । होते पुत्रद्वय आणि कन्या दोन । गोविंदराव नामाभिधान । दुसरे राम पुराणिक ॥ ४६ ॥ प्रपंच-परमार्थ-कुशल ।

राम पुराणिक होते मन निर्मल । दत्तस्वामींचे भक्त केवल । एकनिष्ठ सद्धर्मी ॥ ४७ ॥ सबनीस त्यांचे मातुल । सेवा
करिती चिरकाल । बाबांसि असती पुत्र विमल । धोंडोपंत आणि हरि ॥ ४८ ॥ स्वामिरायांचें लीलावैभव । बाबांनीं विलोकिलें
गुरुकृपें सदैव । अपरिच्छिन्न जीवब्रह्मैक्यानुभव । जीवन्मुक्तिसुख भोगिलें ॥ ४९ ॥ गलित होऊनि देहाभिमान । ब्रह्मदृष्टीनें
सर्वभूतीं लीन । सर्वत्रांसि सर्वदा समान । 'बाळ' म्हणूनि बोलती ॥ १५० ॥ तुलसी-काष्ठमाला कंठीं । ब्रह्मानंद-निमग्न
अपरोक्ष वैकुंठीं । बाबा साधु ऐसा काल कंठी । गुरुदत्त नामें गर्जूनि ॥ ५१ ॥ अक्कलकोट संस्थानांतून । बाबांसि
निर्वाहापुरतें वेतन । मिळत होतें प्रतिमासीं तेणेंकरून । सुखें परमार्थ लाधला ॥ ५२ ॥ ईश्वर-संतचरित्रें वर्णितां ।
आनंदवृत्ति देहभान-विरहिता । प्रेमाश्रुपात वर्षती परमार्थता । ऐशी योग्यता हो बाबांची ॥ ५३ ॥ गंभीर शांत
भाषण प्रेमळ । भक्ति ज्ञान वैराग्य अंगीं प्रबळ । मन मोकळें वाचा रसाळ । होते तळमळ-विरहित ते ॥ ५४ ॥ सोडिला
ज्यांनीं सकल वादविवाद । 'गुरुराज-गुरुराज' ऐसा सदा छंद । मिळाले स्वरूपीं परमानंद । श्रीगुरुसमर्थप्रसादें ॥ ५५ ॥
एके दिनीं प्रातःकाळीं प्रकृती बिघडून । होतां समय माध्यान्ह । अक्लेश अनायासें देहविसर्जन । झालें पुण्यवान् बाबांचें
॥ ५६ ॥ अंतरीं अखंडात्मानुसंधान । सर्वांसि बोधामृत प्राशवून । सर्वेंद्रियें मन सावध असून । मुखीं स्मरण हरिचें ॥ ५७ ॥
वाढवूनि हरिगुरुकीर्ति । गृहस्थाश्रमीं संपादिली भगवत्प्रीति । जीवब्रह्मैक्य सायुज्य मुक्ति । बाबा सबनीस सत्पुरुषें ॥ ५८ ॥
असो पुढिले अध्यायीं रसाळ कथन । परिसा भाविक श्रोतेजन । वदविता सद्गुरु नारायण । दत्तात्रेय-स्वामिराज ॥ ५९ ॥
स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । पंचविंशतितमाध्याय रसिक हा ॥ १६० ॥
इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे पंचविंशतितमोऽध्यायः समाप्तः ॥ २५ ॥ श्रीगुरुदेवदत्त-स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय सव्विसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्गुरुदेव-दत्तात्रेय-स्वामिने नमः ॥ ॥ शिष्य गुरु वक्त्यासि करी विनंति । दत्तात्रेय-स्वामि-गुणलीला अपार असती । नित्य श्रवणें प्राशितां तृप्ती । वाटत नसे अद्यापि ॥ १ ॥ स्वर्गींच्या अमृताचा येतो कंटाळा । अमृत पीत असतांही कृपाळा । शुष्क झाल्यावरी पुण्याचा मळा । मृत्युलोकीं प्रवेशती ॥ २ ॥ अमृतपानें देखील अमरत्व । जातें तें काय उपयोगी अमृत असत्व । जन्मभरी प्राशूनि ब्रह्मबोधतत्त्व । प्राप्त नव्हे स्वर्गींही ॥ ३ ॥ असो वेदांत-उपनिषदार्थमथित । रहस्य जें ‘ब्रह्मात्मैक्य’ असे सुनिश्चित । सद्गुरुमुखें महावाक्यार्थजनित । स्वात्मानुभवामृत तेंचि सत्य आहे ॥ ४ ॥ देवपूजेंतील पय दधि मधु शर्करा घृत । तेंही होय ‘पंचामृत’ संज्ञित । गुड आम्ल लवणादि तीक्ष्णपदार्थयुक्त । भोजनांतील पंचामृत जें ॥ ५ ॥ भोजनकालीं पंचामृत तें । प्रेमें चाटितां स्वादिष्ट वाटतें । परंतु नेत्रनाशिकाद्वारें वाहतें । प्रेमपाझरयुक्त उष्णोदक ॥ ६ ॥ म्हणजे अवघीं अमृतें पिऊन । शेवटीं पावती मृत्युसदन । अमरत्वही जातें गळून । ऐसा परिणाम अमृताचा ॥ ७ ॥ सुधारस षड्रसादि नवरस । फिके शुष्क जे अत्यंत विरस । ऐशा प्राशनें भवसंसाराची घसघस । न मिटे सर्वथा गुरुराया ॥ ८ ॥ म्हणून भवसंसारतारक । हरि-गुरुलीलामृतचि एक । याहूनि अन्य नाहीं अधिक । निश्चयात्मक समजावें ॥ ९ ॥ हें स्पष्ट कळावया वारंवार । भक्तिज्ञानस्वरूपलीलामृत साचार । तेंचि मोक्षसुख अमृत निरंतर । प्राशिलें पाहिजे सार्थकास्तव ॥ १० ॥ अतएव गुरुनाथा कृपा करून । मज अनाथ तृषार्तासि करवा पान । ऐकूनि सुभद्र निर्मल शिष्यवचन । भरतें आलें गुरूसि ॥ ११ ॥ जो अपार लीलामृतसागर ।

******************************************************************************

उचंबळला नेटें आंत बाहेर। महदानंदलहरी वारंवार। गर्जनावृद्धि होतसे ॥ १२ ॥ म्हणे अगा गुरुभक्ता शिष्यराया। भगवद्गुणानुवाद सत्वर परिसाया। धन्य धन्य मन वाणी काया। पावलें भाग्योदया सुकृत ॥ १३ ॥ अक्कलकोटीं खासबागेंत। दर्शनेच्छु आणि सेवकजनांसहित। पुराणपुरुष यतीश्वर भगवंत। होते विराजित एके कालीं ॥ १४ ॥ तेव्हां गिरि-पुरि-भारती यतिदीक्षेंतील। तीन गोसावी मुंडी शक्ति प्रबल। मोठे धष्टपुष्ट उंच बोलके विशाल। पातले बागेंत श्रोते हो ॥ १५ ॥ न्याय-व्याकरण-वेदांतशास्त्रप्रवीण। विद्यामदयुक्त करिती भाषण। वादविवादासि समर्थ असेल कोण। त्यानें यावें समोर आमच्या ॥ १६ ॥ स्वामिरायापासूनि दूर। बैसले होते बळवंत आणि विश्वंभर। त्यांसि हे गोसावी गर्वोक्तीनें त्रिवार। पुसती अधिकार समर्थांचा ॥ १७ ॥ हे स्वामी कोठले आहेत कोण। केव्हां केलें संन्यासग्रहण। येथें राहण्याचें काय कारण। मठसंप्रदाय कोणता ॥ १८ ॥ शृंगेरी अथवा जगन्नाथमठ। द्वारकेचा शारदामठ कीं बदरिकाश्रममठ। किंवा इतर शिष्यसंप्रदायी मठ। कुडलगी संकेश्वरादि असती ते ॥ १९ ॥ आम्हांसि सांगावें इत्थंभूत। ऐसे बोलती गोसावी अतिक्रोधयुक्त। हें ऐकूनि सेवेकरी भीत भीत। आम्ही जाणत नाहीं म्हणती ॥ २० ॥ माहुरगडचे राहणार। हे गोसावी राक्षसवत् भयंकर। अमर्याद तीक्ष्ण वचनें निष्ठुर। ताडिती हस्तेंही लोकांसि ॥ २१ ॥ अहंकार दाटला सर्वांगीं। जयपत्र मागती सर्वांलागीं। म्हणती आम्हीच मोठे योगी। तुम्ही सकल मूर्ख आहां ॥ २२ ॥ तुम्हां लोकांसि काय कळतें। ऐसें बोलती भलभलतें। मग सेवेकऱ्यांनीं भक्त चोळाप्पातें। कळविलें संकट श्रीपादासि ॥ २३ ॥ नंतर तेथें आले श्रीपादभट। जे समयोचित बोलणारे धीट। त्यांसि पाहूनि ते गोसावी उद्धट। अति चावट पुसती तदा ॥ २४ ॥ हे स्वामी हंस किंवा परमहंस। दंडग्रहण नाहीं काय यांस। हें तत्काल सांगावें आम्हांस। नातरी वादास उभें रहावें ॥ २५ ॥ मग श्रीपादभट सांगे गोसाव्यांला। आपण सर्वसंग-परित्याग केला।

संन्यास घेऊन त्रासवितां लोकांला । चला समर्थासमोर ॥ २६ ॥ जें पाहिजे तें प्रशस्त उत्तर । मिळेल समाधानकारक
सत्वर । मग ते संन्यासी महापंडित क्रूर । गेले समोर समर्थांच्या ॥ २७ ॥ महापुरुषांसि त्यांनीं वंदन । केलें नाहीं
माजले साभिमानेंकरून । परंतु दत्तात्रेय मूर्तींस अवलोकून । पावले मौन तत्काल ॥ २८ ॥ विद्यादिकें मदोन्मत्त झालेले
राक्षस । राक्षस बरे परी हे त्याहीपरिस । प्रबल अहंकारी केवल असुरत्वास । प्राणपोषक पावलेले ॥ २९ ॥ धर्मकर्माच्या
मर्यादा टाकूनि । नाडलेले पंडित दुरभिमानी । स्वेच्छाचारें संन्यास घेऊनि । फिरती दांभिक प्रतिष्ठार्थ ॥ ३० ॥
ऐसें असूनि पूर्व सुकृतें भाग्य । उदयासि पावलें अव्यंग । परमपुरुषाचा दर्शनप्रसंग । घडूनि साधलें स्वहित जयां
॥ ३१ ॥ 'अति पातकी किंवा अति पुण्यवान् । तरती' ऐसें बोलती बहुजन । असो हा प्रसंग पहावया लागून । पुष्कळ
लोक बैसले ॥ ३२ ॥ संन्यासी तटस्थ उभे ठेले अभंग । शरीर-भानरहित ते गुंग । तैं अकस्मात पलमात्र श्रीरंग ।
करुणाकटाक्षें देखती ॥ ३३ ॥ भरली प्राप्तिकाल इष्ट घटिका । उतरला दुरभिमान लटिका । गुरुकृपांजनें नेत्ररोग
टीका । झडूनि गर्व निमाला ॥ ३४ ॥ मूर्ख असोत अथवा पंडित । गुरु-प्रज्ञाप्रसादें त्वरित । आत्मतत्त्व जाणूनि होती
विरक्त । भवसागरापासूनि ॥ ३५ ॥ ते तिन्ही पंडित पिटूनि वक्षस्थळ । वदती आम्ही केवळ दुष्ट चांडाळ । जळो जळो
पंडितपणा विद्याबळ । बंधनकारक सर्वदा ॥ ३६ ॥ देहसार्थकाच्या नव्हती ह्या विद्या । केवळ बंधनप्रद मायाजाल
अविद्या । जैसें मद्यपी प्राशूनि मद्या । विपरित कर्मे आचरती ॥ ३७ ॥ जैशी वानरी नाचे घरोघरीं । तैसे आम्ही पंडित
दुरहंकारी । प्रतिष्ठितपणें फिरतों दारोदारीं । उदर-कुटुंबपोषणार्थ ॥ ३८ ॥ ह्या सर्व विद्या मायिक पोटासाठीं । अनेक
शब्द वाचालता चावटी । वेदांताच्या पोकळ सांगतों गोष्टी । फाल्गुनी सिमग्याप्रमाणें ॥ ३९ ॥ पंडित गोसावी रडती
घळघळां । भयें कांपती चळचळा । सविनय वदती काळाच्याही काळा । जगत्कृपाळा योगीश्वरा ॥ ४० ॥ वारंवार

घालिती लोटांगण । घेऊनि समर्थांच्या पायींची वाहन । स्वहस्तें स्वदेहांसि करिती ताडण । म्हणती शहाणपण
जळो सगळें ॥ ४१ ॥ सर्व दुरित शास्त्राभिमान जळो । देहबुद्धि श्रेष्ठत्व समूळ गळो । चातुर्य कुतर्क अवघे
वितळो । कळो रहस्य गुरुवेद-आश्रयें ॥ ४२ ॥ आम्ही मदोन्मत्त दुष्ट राक्षस । आजपर्यंत जनांसि दिधला त्रास ।
आपण साक्षात्परमात्मा जगन्निवास । विनास्वार्थ उपहास केला ॥ ४३ ॥ हिंसक अतिमदांध । ताडिलें तीक्ष्ण
शब्दबाणें विविध । अतिपातक घडलें अपराध । क्षमा कीजे दयाळा ॥ ४४ ॥ पुनः पुन्हा साष्टांग दंडवत प्रणाम ।
करूनि स्तविती पूर्णब्रह्म परंधाम । साक्षात् आपण पुराणपुरुषोत्तम । आदिनारायण आहां हो ॥ ४५ ॥ आम्हीं
अपराधी मूढ असूनि । गर्वें माजलों पंडितमान्यमानी । यथेष्टाचरणी मदांध होऊनि । बुडालों होतों भवार्णवीं
॥ ४६ ॥ बुडालों असूनि भ्रमें तरलों वाटे । लोकांसि बोधिलें विपरित धर्मवाटें । विषयमदांध होऊनि थाटें । गांजिले
लोकांसि विजयपत्रार्थ ॥ ४७ ॥ यथा मर्कटासि मदिरापान । वृश्चिकदंश झाला त्यांतून । त्याहीवरी भूत संचरलें
जाण । मग मर्कटचेष्टा काय विचाराव्या ॥ ४८ ॥ या कल्पितविद्या आणि विद्वत्तेस । धिक्कार असो पंडितपणास ।
शब्दजाल महारण्य देतें क्लेशास । आणि चित्तभ्रमणकारक तें ॥ ४९ ॥ शब्द केल्याही शब्दार्थविवेक ।
म्हणून गुरुकुलशुद्ध सदनवास अवश्यक । ब्रह्मात्मानुभव साक्षात्कारानुभव अभेदात्मक । नित्योपलब्धी होतेच ॥ ५० ॥
ऐशा प्रकारें पश्चात्तापयुक्त । पंडित संन्यासी झाले विरक्त । तिघेही देहाभिमानत्यक्त । गुरुपदीं आसक्त जाहले ॥ ५१ ॥
सद्गुरुमूर्तीचें सर्वदा ध्यान । करिती गुरुचरणांचें पूजन । श्रीगुरुस्वामींचें उच्छिष्ट प्रसाद भोजन । निःसंशय अष्टदिन
केले ज्यांनीं ॥ ५२ ॥ तयांचा पूर्ण हेतू जाणून । दत्तात्रेय स्वामी पूर्णब्रह्म सनातन । शेषशायी भगवंत कृपा करून ।
देती दर्शन त्रिवर्गांसि ॥ ५३ ॥ दत्तात्रेय-आज्ञा वंदूनि शिरीं । त्रय संन्यासी गेले मातापुरीं । ऐसे स्वामी समर्थ अनंत

लीलाधारी । पूर्णावतारी तारिती जनां ॥ ५४ ॥ नेणती अपकार अथवा उपकार । नोळखिती मी तूं तो आपपर । सर्वत्र समान कृपादृष्टी निरंतर । प्रकाशमान् ज्यांची विलसे ॥ ५५ ॥ ज्यांच्या दर्शनार्थ सत्पुरुष पुष्कळ । येती नमूनि जाती सर्वकाळ । तें संक्षेपें लीलाचरित्र प्रांजळ । ऐका श्रोते निर्मळ तुम्ही ॥ ५६ ॥ जें नित्य ऐकतां गातां स्मरतां । सकळ मनोरथ सिद्धीस जाती तत्त्वतां । तोच त्रैमूर्ती-दत्तस्वरूप फलदाता । जगत्त्राता विराजे ॥ ५७ ॥; आळंदीचे नृसिंहसरस्वती । सत्पुरुष ऐसी असे ज्यांची प्रख्याति । भक्ति-ज्ञान-वैराग्ययुक्त ते यति । एके कालीं प्रेमभरें ॥ ५८ ॥ येऊनि प्रथम अक्कलकोटांत । उतरले पटवर्धनाचे गणपति-मंदिरांत । दत्तात्रेय योगीश्वराकडे लागलें चित्त । केव्हां दर्शन होईल ॥ ५९ ॥ नृसिंहसरस्वती निघाले दर्शनासि । इकडे दत्तगुरु आज्ञापिती सेवकांसि । व्याघ्राजिन घालावें बसावयासि । संन्याशासि योग्य तें ॥ ६० ॥ अंतर्साक्षी योगिराज केवल । प्रसन्न वदन शोभे सर्व काल । इतुक्यांत संन्यासी पातले जवळ । श्रीगुरु स्वामी समर्थांच्या ॥ ६१ ॥ यतीनें नम्रत्वें केलें वंदन । तदनंतर संज्ञापूर्वक सन्मान । व्याघ्रासनीं स्थित व्हावें म्हणून । स्वामिरायें तयासी सुचविलें ॥ ६२ ॥ मनोहर तेजस्वी सुंदर दत्त-मूर्ति । पाहूनि संतोषित झाले नृसिंहसरस्वती । तों अकस्मात् दत्तात्रेय वदती । 'रंडा सोडावी' हें बरें ॥ ६३ ॥ हें परिसूनि आळंदीचे संन्यासी । उत्तर देती सत्य सविनयेंसीं । तेंचि काम चाललें आहे अहर्निशीं । नारायण हो भगवंता ॥ ६४ ॥ यतीच्या मानसिक कांहीं खुणा । पटल्या वास्तविक रीती जाणा । मग नृसिंहयतीच्या मना । परमानंद वाटलासे ॥ ६५ ॥ हे अवतारिक पुरुष खचित । आहेत श्रीमद्दत्तात्रेय अवधूत । यतीच्या मनाचें समाधान यथोचित । यथास्थित जाहलें ॥ ६६ ॥ दत्त मुनीश्वरें स्वकंठींची माळा । घातली नृसिंहयतीच्या गळां । तो अद्भुत परमानंद सोहळा । जयजयकारें गाजला ॥ ६७ ॥ लागली ब्रह्मात्मस्वरूप सहजसमाधि । योगिजनांसि आवडे जी निरवधि ।

त्या कालीं लोकही सहस्रावधि । आनंदीं निमग्न जाहले ॥ ६८ ॥ कांहीं वेळानें होऊन मंगल आरती । सगळे प्रसाद उत्कंठेनें घेती । दत्तात्रेय-सद्गुरूची महत्कीर्ति । वर्णित गेले स्वसदनीं ते ॥ ६९ ॥ गणेश जोशीबुवाचे मठांत । आळंदीचे स्वामी महात्मा संत । श्रवण करविती मंडळीस वेदान्त । सयुक्तिक भाषणें ॥ ७० ॥ नृसिंहसरस्वती योगी विद्वान् । भक्ति-ज्ञान-वैराग्यसंपन्न । सत्पुरुष जयांसि द्विजजन । मानिती वंदिती सर्वत्र ॥ ७१ ॥ धीपुरीं शिक्षक बाळाजी भास्कर । त्याच्या कल्पना शंका अनिवार । त्या शंकांचें समाधान सशास्त्र यतीवर । यथायोग्य करित होते ॥ ७२ ॥ प्रत्यक्ष दत्तात्रेय ईश्वर जाणून । त्या दत्तात्रेयस्वामींचें नित्य दर्शन । करित प्रज्ञापुरीं राहिले स्वल्प दिन । स्वामी नृसिंहसरस्वती ॥ ७३ ॥ घेऊनि दत्तात्रेयस्वामींचा निरोप । पुण्याहूनि आळंदीस गेले सुखरूप । तदनंतर त्यांचा लौकिक निर्लेप । वृद्धिंगत जाहला ॥ ७४ ॥ या नृसिंहस्वामींचे भक्त सेवक । असती बहुत भाविकलोक । हे यतिवर पुन्हां अक्कलकोटीं एक । दोन वेळां जाऊन आले ॥ ७५ ॥ या नृसिंहयतीचें सुंदर स्थान । आळंदीस आहे शोभायमान । हे संन्यासी पारमार्थिक विद्वान् । प्रेमें भजनही करित होते ॥ ७६ ॥ दत्तावतार कृत्य संपल्यावर । हे नृसिंहसरस्वती यतिवर । आळंदी क्षेत्रांत निरंतर । समाधिस्त जाहले ॥ ७७ ॥ तें विठ्ठल-मंदिर रमणीय असून । त्यांत या सिद्ध पुरुषाचें समाधिस्थान । तेथें नित्य पूजन गीत भजन । उत्साह समारंभ होतसे ॥ ७८ ॥ श्रीस्वामीसमर्थांच्या दर्शनें । कृपाकटाक्षें आणि आशीर्वचनें । असंख्य जन आपापल्या प्रतीतीनें । यथेप्सित योग्यतेस पावले ॥ ७९ ॥ अक्कलकोटनिवासी यतिनायक । ज्यांनीं विलोकिले नाहीं ऐसे लोक । अति दूर देशींचे जातींचे अनेक । भक्त सेवक जाहले ते ॥ ८० ॥ योगीश्वराचें प्रत्यक्ष दर्शन नसून । दूर देशींचे जन होती पावन । मग प्रत्यक्ष दर्शनें होतसे कल्याण । यांत आश्चर्य कोणतें ॥ ८१ ॥ मनाचे मोकळे भोळे भाविक । किंवा अभाविक निंदक दुष्ट अनामिक । कोणी कसेही

कोठें असोत प्रापंचिक । किंवा पारमार्थिक असोत ॥ ८२ ॥ दूर अथवा समीप असतां । प्रत्यक्ष अथवा स्वप्नीं दृष्टांता । अभेददृष्टया समान फलप्रदाता । जगदात्मा स्वामी विराजित ॥ ८३ ॥; तोचि परिसा हो कथा प्रकार । जेणें निर्विघ्न चाले संसार । संकटें पळतीं दूर दूर । दैन्य दुःख नसेचि ॥ ८४ ॥ एक ऋग्वेदी सात्त्विक द्विजवर । यशवंतराव महादेव भोसेकर । अहमदनगर जिल्ह्यांत होते नोकर । पारनेरादि ग्रामीं ते. ॥ ८५ ॥ त्या यशवंतरावास एके दिवशीं । स्वप्नांत येऊनि एक महत्संन्यासी । शालिग्रामशिला नित्य पूजनासि । देती प्रासादिक कृपेनें ॥ ८६ ॥ यायोगें परमार्थ आणि प्रपंच । घडेल तुम्हांसि फल सिद्ध उंच । कीर्ति गाजेल जगतांत साच । साधु पुरुष म्हणूनि ॥ ८७ ॥ देऊनि आशीर्वाद प्रसाद । अंतर्धान पावले यति सच्चिदानंद । जागृत होऊनि म्हणती हा स्वप्न भास कीं विनोद । यतींद्र गोविंद भेटले ते ॥ ८८ ॥ ते महाजन कोठें आहेत जगन्निवास । स्वप्नीं दिधला ज्यांनीं प्रसादोपदेश । वेदोनारायण लाविती वेदमार्गास । ज्यांच्या भासें हें सर्व प्रकाशतें ॥ ८९ ॥ शय्यासनीं देखिला अकस्मात् । शालिग्राम सुलक्षण मूर्तिमंत । अत्यानंदें यशवंतराव नाचत । आलिंगित शालिग्राम शिलेसि ॥ ९० ॥ पुढें श्रीस्वामिराजकृपें सत्वर । दिवसेंदिवस वाढला अधिकार । मानसीं चिंतिती भोसेकर । ते दिगंबर यति भेटतील कीं ॥ ९१ ॥ श्रीशालिग्रामाचें नित्य पूजन । करिती यथासांग षोडशोपचारेंकरून । अतीत-अभ्यागतांसि देती भोजन । सत्कार करून यथाशक्ती ॥ ९२ ॥ यशवंतरावासि स्वप्न झालें रात्रीं । कीं सोलापुरासमीप अक्कलकोटपुरीं । तेथें वसतसों सखया झडकरी । यावें प्रज्ञापुरीं यशवंता ॥ ९३ ॥ जागृत होऊनि भोसेकर । म्हणती घडला ईश्वरी चमत्कार । मग अक्कलकोटासि पातले शीघ्र । पुसती यतीश्वर कोठें ते ॥ ९४ ॥ ऐकूनि बुधवार पेठेंत । तेथें भोसेकर भक्त यशवंत । तेव्हां प्रियकर चोळाप्पाचे गृहांत । होते स्थित योगीराज स्वामी ॥ ९५ ॥ स्वप्नीं देखिले जें तेचि प्रत्यक्ष ।

अंतर्साक्षी विराजती विश्वाध्यक्ष । घातला साष्टांग नमस्कार संलक्ष । तों शिला कोठें रे यति पुसती ॥ ९६ ॥ तदा यशवंतरावें दाविला शालिग्राम । स्वप्नीं लाधला प्रसाद जो प्रथम । वदे आपण प्रत्यक्ष पुरुषोत्तम । आहां विश्रामधाम सर्वांतरीं ॥ ९७ ॥ नानाविध यशवंतराव करी स्तोत्रें । अद्भुत अगम्य श्रीस्वामिचरित्रें । उपासन होतसे कर्मतंत्रें । वस्तुतंत्रें बोध होय ॥ ९८ ॥ सकळ यंत्र-मंत्र-तंत्रांचें सार । आनंदस्वरूप परमात्मा सर्वेश्वर । तोचि प्रकटला स्वतःसिद्धावतार । जगदुद्धारार्थ धीपुरीं ॥ ९९ ॥ ऐसें आलें स्पष्ट दृढ अनुभवासि । अनेक धरितो रूपें जगद्धितासि । अतर्क्य लीला अक्कलकोटनिवासी । आहे आपली जगद्गुरुवर्या ॥ १०० ॥ मग पूजन ब्राह्मण-समाराधन । यशवंतरावें केलें शुद्धभावेंकरून । वारंवार लोटांगणें घालून । आज्ञा निरोप मागतसे ॥ १ ॥ मग वरप्रदान देती दत्तावधूत । तुम्ही मूळचेचि आहां संत । सर्वांसि प्रिय जैसा ऋतु वसंत । तैसे साधु पसंत व्हाल जगीं ॥ २ ॥ मग वंदूनि गेले भोसेकर । पुढती झाले मामलतदार । साधुत्वाचा लौकिक वाढला थोर । स्वामिसमर्थप्रसादें ॥ ३ ॥ तदनंतर यशवंतराव महादेव । देवमामलतदार पदवी पावले सदैव । सहस्रावधि जन ज्यांच्या अपूर्व । दर्शनार्थ जाती भक्तीनें ॥ ४ ॥ खानदेशांतील सटाणें ग्रामीं । यशवंतराव मामलतदार जे निष्कामी । परोपकार-तत्पर निर्मळ अंतर्यामीं । प्रेमळ रसाळ वाणी ज्यांची ॥ ५ ॥ दया क्षमा सत्यत्व वसे ज्याच्या अंगीं । सर्वभूतीं नम्र असूनि धैर्य दक्ष प्रसंगीं । निरभिमानी विनटले निजरंगीं । वेदोक्त मार्गीं सर्वदा ॥ ६ ॥ नंतर सोडूनि अधिकार । निरुपाधिक सत्पुरुष हे थोर । गृहस्थाश्रमीं असूनि निर्विकार । असती सदाचारसंपन्न ते ॥ ७ ॥ जैसे संतशिरोमणी दामाजीपंत । तैसेचि सत्पुरुष खचित यशवंत । प्रतीतीनें ज्यांचे जाहले सेवक बहुत । करिती उत्साह समारंभ ते ॥ ८ ॥ इहपर साधूनि अखंड सत्कीर्ति । नासिकक्षेत्रीं गोदातटीं वसती । ते पुण्यवान् यशवंतराव निजधामाप्रति । गेले विदेह

कैवल्या पावले ॥ ९ ॥ सटाण्यास असतां त्यांनीं स्वमुखें । वामनासि स्वामिचरित्र निवेदिलें सुखें । तेंचि सत्य कथिलें भावनेसारिखें । फल सिद्ध होतें सर्वत्र ॥ ११० ॥; त्या श्रीगोदातीरीं प्रसिद्ध त्र्यंबक । पुण्यक्षेत्र आहे नासिक । त्या नासिकांत बाबा घोलप नामक । यजुर्वेदी ब्राह्मण वसती ते ॥ ११ ॥ ज्योतिष आणि वेदांतशास्त्रांत । बाबा घोलप होते पारंगत । त्याहीवरी जे सन्मार्ग विहित । संप्रवर्तक द्विजोत्तम हो ॥ १२ ॥ त्यांना एकदां गोदेच्या घाटावरी । भेटले यतिवेषें दत्त गिरिनारी । तेव्हां बाबा नमूनि चरण धरी । म्हणे अवतारिक दिसतां हो ॥ १३ ॥ जाणूनि घोलपाचा हृद्गत आशय । सर्वसाक्षी सर्वज्ञ स्वामी दत्तात्रेय । आशीर्वाद देती आनंद-निरतिशय । संन्यास घेतां उपजेल ॥ १४ ॥ ऐसें बोधूनि पावले अंतर्धान । सदा समीप होते द्विज विद्वान् । म्हणती साक्षात्कार घडला नारायण । भेटूनि कल्याण केलें कीं ॥ १५ ॥ पुढें चतुर्थाश्रम-संन्यास धारण केला । तों तात्काळ आत्मसाक्षात्कार प्रकाशला । बाबांसि प्रत्यक्षात्मानुभव लाधला । योगीश्वरांच्या दर्शनें ॥ १६ ॥ आणखीही कांहीं अनुभव । बाबांच्या प्रत्यक्ष प्रमाणास आले देव । स्वामिराजांचें लीलावैभव । प्रेमें वामनासि निवेदिलें त्यांनीं ॥ १७ ॥ ते घोलप कुलीन सत्पुरुष सिद्ध । नासिक क्षेत्रीं वसत होते प्रसिद्ध । पंचवटींत कपिलेश्वरासन्निद्ध । त्रिविधतापरहित जे ॥ १८ ॥; ब्रह्मनिष्ठ वामन असतां नासिकास । एका किमयागारें केला यति-उपहास । तेणें सुवर्णाचा कोळसा झाला खास । दत्तात्रेय-स्वामींच्या निंदेनें ॥ १९ ॥ हा प्रसंग घोलपांनीं समक्ष पाहिला । सोन्याचे गोळ्याचा कोळसा झाला । मग किमयागार धीपुरीं जाऊन उद्धरला । तो भाग वर्णिला अन्य अध्यायीं ॥ १२० ॥; एक कोंकणस्थ जाती ब्राह्मण । विष्णुपंत गोखले म्हणून । जयासि म्हणती सकल जन । 'विष्णुबुवा-ब्रह्मचारी' ॥ २१ ॥ ते ब्रह्मचारी मुंबापुरीस वसून । धर्मोपदेश करिती जनांलागून । पाहिजे त्या शंकेचें योग्य समाधान । सप्रमाण युक्तीनें करिती ॥ २२ ॥ ज्यांची

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

मुंबापुरीस झाली वाहवा । ते विष्णुबुवा प्रथम जेव्हां । अक्कलकोटास आले तेव्हां । वर्तलें नवल परिसावें ॥ २३ ॥
अक्कलकोटाच्या गांवाबाहेर । आहे श्रीरामचंद्राचें मंदिर । त्या मंदिरांत स्वामिराज दिगंबर । त्रयदिन होते त्या कालीं
॥ २४ ॥ विष्णुबुवा आणि एक पारशी । आले दत्तात्रेयस्वामि-दर्शनासि । साष्टांग नमस्कार करून यतींद्रासी ।
बैसले पहात विचित्र लीला ॥ २५ ॥ विष्णुबुवाचे संकल्प मानसीं । समर्थांनीं कांहीं तरी माझ्याशीं । बोलावें वेदांत-
वचनासी । मज विद्वानासमागमें ॥ २६ ॥ मग बोलती अत्रिनंदन । तुम्ही कोण कोठिल काय विद्वान् ।
वृथैव कां धरिला विद्याभिमान । बंधनकारक सर्वथा ॥ २७ ॥ ऐकूनि हें विष्णुबुवा हांसत हांसत । गेले उतरले
साहेबांचे बंगल्यांत । म्हणती हे अवतारिक पुरुष खचित । आहेत परंतु किंतु मज वाटे ॥ २८ ॥
फलाहार आटोपूनि निद्रित झाले । तेव्हां विष्णुबुवासि स्वप्न पडलें । पुष्कळ वृश्चिकांनीं दंशिलें । बुवांचे
अंगासि स्वप्नांत ॥ २९ ॥ झाला हजारों वृश्चिकांचा दंश । त्यायोगें बुवा जागृतींत करिती आक्रोश । वेदना लागल्या
अति विशेष । सोसवेना त्या बुवासि ॥ १३० ॥ बुवा अतिशय झाले व्याकुळ । तों जागृत झाले तेथें सकळ । दीप
लावूनि विलोकितां तात्काळ । एकही वृश्चिक दिसेना ॥ ३१ ॥ सर्वत्रांसि उपजलें आश्चर्य । सगळे बुवास वदती धरा
धैर्य । आपण ब्रह्मचारी विद्वद्वर्य । असूनि इतके घाबरलां कां ॥ ३२ ॥ स्वप्न म्हणजे मिथ्या केवळ । त्या स्वप्नांतील
वृश्चिकदंशें विव्हल । आपण सत्पुरुष म्हणवितां बुद्धिबल । हें काय नवल जाहलें ॥ ३३ ॥ असो दुसरे दिवशीं भोजनोत्तर ।
विष्णुबुवा शिष्यांसहित सत्वर । अक्कलकोटग्रामाबाहेर । गेले श्रीराम-देवालयीं ॥ ३४ ॥ श्रीमद्दत्तात्रेय
स्वामिसमर्थासि । साष्टांग नमूनि नम्र भावेंसीं । वदती किंतु उद्भवला मानसीं । त्याचें भोगिलें प्रायश्चित्त ॥ ३५ ॥
मग बोधिती दत्तात्रेयावधूत । तुम्ही म्हणवितां सत्पुरुष पंडित । स्वप्नींच्या वृश्चिकदंशें जागृतींत । दुःखाकुलित कां

झाला ॥ ३६ ॥ नंतर योगीश्वरें चोळाप्पासि पाचारून । विहिरींतील उदकें कलश भरून । आणविला तो विष्णुबुवाचे हातीं देऊन । बोधिती यांत काय तें समजावें ॥ ३७ ॥ अंतरींची पटतांचि खूण गुप्त । ब्रह्मचारी झाले अहंकारगलित । स्तविती आपण साक्षात् परमेश्वर निश्चित । घेतलें पदरांत निजब्रीदें ॥ ३८ ॥ पुन्हां नमन करूनि शिरसाष्टांग । आज्ञा प्रसाद घेऊनि प्रेमें यथासांग । योगीश्वराचे गुणानुवाद अभंग । गात गेले मुंबापुरा ॥ ३९ ॥ ते विष्णुबुवा विमल ब्रह्मचारी । वेदांततत्त्वज्ञ होते निर्विकारी । प्रबोधकुशल परोपकारी । रचियले ग्रंथ जयांनीं ॥ १४० ॥ 'वेदोक्तधर्मप्रकाश' ग्रंथ प्राकृत । तथा 'भावार्थसिंधु' नामें शुद्ध अद्वैत । इत्यादि निर्मिले सरल सरस भाषेंत । व्हावया हित जगताचें ॥ ४१ ॥ यांच्यासारिखें शंका समाधान । करणारे विरला असतील विद्वान् । इहपर सत्कीर्ति गेले संपादून । विदेहकैवल्यस्वरूपीं ॥ ४२ ॥; असो ब्राह्मण सत्पुरुष संत एक । ज्यासि विष्णुबुवा नारायण म्हणती लोक । ते पंढरपुरास दिवस कित्येक । होते पिशाच्च वृत्तीनें ॥ ४३ ॥ मुखें काळ बाप सर्वांस आहे म्हणती । उपाधि नसावी म्हणून लोकांस धिक्कारिती । ब्रह्मात्मतत्त्वानुभवी पिशाच्च वृत्ति । धरूनि उपद्रव न देती कोणा ॥ ४४ ॥ यांनीं एका द्विजपुत्रास ताडिलें । त्यांनीं अधिकाऱ्यासि कळविलें । आणावया मामलतदारें धाडिलें । बुवास सोलापुरीं ॥ ४५ ॥ अधिकारी विष्णु परशुराम रानडे । बुवासि उभें केलें त्यांजपुढें । विचारितां प्रत्युत्तर वांकडें तिकडें । वेड्यासारिखे बुवा वदती ॥ ४६ ॥ 'काळ बाप सर्वांसि ग्रासितो । रांडेचा रक्त दगड खातो ओकतो' । ऐसें उच्च स्वरें सर्वदा बुवा बोले तो । 'काळ काळ' म्हणूनि ॥ ४७ ॥ अधिकाऱ्यांनीं ठरवूनि वेडा विक्षिप्त । पुण्यास धाडिलें वेड्यांच्या दवाखान्यांत । तेथेंही काळबुवा नित्य उच्चारित । 'काळ काळ' शब्द निःस्पृही ॥ ४८ ॥ डेविड-सासुनच्या दवाखान्यांत । बुवा

वेड्याप्रमाणें सतत ओरडत । मी वामन त्या स्थलांत । गेलों होतों सहज कीं ॥ ४९ ॥ परिसूनि बुवांच्या मुखींचीं अक्षरें । मला हे सत्पुरुष आहेत वाटलें खरें । तों तेथें सदाशिव गौंडे सत्वरें । पातले सहज सद्गृहस्थ ॥ १५० ॥ त्यांनीं स्वतः बुवांचें चरित्र पाहिलें । त्यांनाही ते सत्पुरुष बुवा वाटले । मग बंधमुक्त करूनि बुवास आणिलें । ठेविलें शुक्रवारपेठेंत योग्य स्थलीं ॥ ५१ ॥ मीं बुवासि शुद्ध प्रेमें विनविलें । आपण सत्पुरुष दिसतां कोण कोठले । कोण सांप्रदायी गुरु आपले । सांगा मजला संतवर्या ॥ ५२ ॥ नंतर काळबुवा वदती वचन । ज्यांनीं तुम्हांकडे पाठविला ब्राह्मण । त्या दत्तात्रेय-स्वामिराजांचे जाण । सेवकजन आम्ही आहोंत ॥ ५३ ॥ लोकांची उपाधि होऊं नये । यदर्थ पिशाच्चवत् वृत्ति धरिली स्वयें । तुम्ही आमचेच आहां हें निश्चयें । अंतरीं योग्य ओळखितों ॥ ५४ ॥ सदाशिवराव गृहस्थ उत्तम । त्यांनीं बुवांची सर्व व्यवस्था नित्यनेम । ठेवूनि सेवा केली सप्रेम । महात्मा संतजन म्हणूनि ॥ ५५ ॥ हे काळबुवा महात्मा संत । पुणें शहरीं जाहले प्रख्यात । ज्यांच्या दर्शनें लोक आनंदयुक्त । यथेप्सित पावले ॥ ५६ ॥ सत्पुरुष निःस्पृह केवल हे । एकटे वसती अपरिग्रह । निरुपाधिक ज्ञानी असंदेह । दत्तात्रेय स्वामींच्या कृपेंतले ॥ ५७ ॥ मीही त्यांचे दर्शनास पुण्यास असतां । जात होतों धरूनि लीनता । अंतर्साक्षित्वाच्या गोष्टी जगद्धिता । बोलत होते काळबुवा ॥ ५८ ॥ ज्या ब्राह्मणानें काळबुवावरी । प्रसंग आणविला होऊन वैरी । तो ब्राह्मण अक्कलकोटास सत्वरी । संसार-कार्यार्थ पातला ॥ ५९ ॥ दत्तात्रेयगुरु-दर्शनास द्विज । गेला खासबागेंत सहज । द्विजासि पाहतांच योगिराज । वदती वैर कां आम्हांसि ॥ १६० ॥ द्विज ऐकूनि फार लाजला । मनीं झडकरी उमजला । म्हणे अपराधाची मजला । क्षमा व्हावी प्रभुराया ॥ ६१ ॥ सहस्रावधि योगी महात्मा संत । दर्शनास येती

जन असंख्यात । त्या सर्वत्रांचे मनोरथ पूर्ण होत । अवतारलीला पाहूनि ॥ ६२ ॥ ते योगीराज स्वामी अवधूत । त्यांचा बंदीजन होऊनि लीलामृत । दास वामन यथामतीं रचित । श्रोतीं सावधान परिसावें ॥ ६३ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदवेदांगार्थमथित । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । षड्विंशतितमाध्याय गोड हा ॥ १६४ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे षड्विंशतितमोऽध्यायः समाप्तः ॥ २६ ॥ श्रीगुरुदेवदत्त-स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय सत्ताविसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्गुरुदेव-दत्तदिगंबराय नमः ॥ ॥ गुरुवक्त्यासि शिष्य विनवित। 'संन्यास' पदाचा अर्थ सांगा उचित । शब्दार्थ सर्वांस कळेल थोडक्यांत । ऐसा सांगा गुरुवर्या ॥ १ ॥ सकल काम्य कर्मांचा न्यास । उत्तम पुरुष म्हणती तोचि 'संन्यास' । न्यास बोलती त्यागास । कर्मफलेच्छा त्यागणें ॥ २ ॥ सकाम कर्में जीं सकल । त्या कर्में करून प्राप्त व्हावें वांच्छितफल । ऐशी जी कर्मफलेच्छा चिरकाल । त्या इच्छेचा त्याग करणें ॥ ३ ॥ सर्व कर्मांचा जो त्याग । तोचि 'कर्मसंन्यास' जाणिजे अव्यंग । त्याचे चार प्रकारचे भाग । असती असंग व्हावया ॥ ४ ॥ 'कुटीचक' 'बहूदक' 'हंस' । चौथा जाणिजे 'परमहंस' संन्यास । इच्छा आणि संगरहित उदास । सर्वसंगपरित्याग तो संन्यास बोलिजे ॥ ५ ॥ ब्रह्मवेत्ता महात्मा पुरुषाची सेवा । तथा प्रसन्नरूप सत्संगचि बरवा । कामक्रोधांच्या निवृत्तीचा जाणावा । उपाय हाचि मुख्यत्वें ॥ ६ ॥ 'संन्यास' या शब्दांत । एक 'सं'पद आणि दुजें 'न्यास'पद वसत । त्या संन्यास पदाचा परिसोत । श्रोते पारमार्थिक मुख्यार्थ तो ॥ ७ ॥ 'अहं-ब्रह्मास्मि' महावाक्य हें आत्मज्ञान । त्या आत्मज्ञानरूप शस्त्रेंकरून । मूलअज्ञान-सहित षड्रिपूंचें छेदन । हा 'सं'पदाचा अर्थ असे ॥ ८ ॥ आणि पुनरावृत्तीहून रहित । ब्रह्मात्मभावें ब्रह्मस्थिति भोगीत अखंडित । हाचि 'न्यास' पदाचा अर्थ होत । श्रुति प्रदिपादित सरल ऐसा ॥ ९ ॥ 'सं' आणि 'न्यास' हीं दोन्ही पदें मिळून । यथार्थ अर्थ करा हो श्रवण । ब्रह्मविद्या गुरुकृपेंकरून । अवश्य उपलब्ध पाहिजे ॥ १० ॥ मूलअज्ञानसहित काम-क्रोधादिक । आत्मज्ञान-खड्गें छेदूनि निश्चयात्मक । पुनरावृत्तिरहित जीव-ब्रह्मैक्य । मुक्तिसुख

भोगित असणें तें ॥ ११ ॥ हाचि 'संन्यास' पदाचा सत्यार्थ उचित । श्रुतिप्रमाण स्वात्म-प्रतीत । ब्रह्मवेत्ते महात्मा प्रतिपादित । संन्यास-पदार्थ या प्रकारें ॥ १२ ॥ संन्यास आणि संन्यासाचें फल । दोन प्रकारें असे विमल । एक 'विविदिषा संन्यास' केवळ । दुसरा 'विद्वत्संन्यास' तो ॥ १३ ॥ ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीस्तव । सर्व कर्मांचा परित्याग करणें जो वास्तव । त्याचेंचि विविदिषा-संन्यास ऐसें नांव । वेद-वेदांत-ज्ञानी कथिती ॥ १४ ॥ त्या विविदिषा संन्यासाचें फल । गुरुमुखें वेदांत श्रवण करून चिरकाल । मनन-निदिध्यासें ब्रह्मसाक्षात्कार केवल । प्राप्त होऊन स्वस्थ बसणें ॥ १५ ॥ आत्मानुभवाचा दृढ निश्चय । सद्गुरुवरें करणें जो अक्षय । विविदिषा-संन्यासाचें अव्यय । हेंचि फल जाणावें ॥ १६ ॥ आणि ब्रह्मात्मसाक्षात्कार झाल्यावरी । जीवन्मुक्ति-सुखभोगार्थ निर्विकारी । सर्व कर्मांचा परित्याग करी । तोचि 'विद्वत्संन्यास' जाणावा ॥ १७ ॥ आणि जीवन्मुक्तिसुख झालेली प्राप्ति । ती अखंड भोगणें अभेद ब्रह्मस्थिति । तेंचि विद्वत्संन्यासाचें फल वदती । श्रुत्यर्थ ज्ञानी ब्रह्मविद् ॥ १८ ॥ ऐसे ब्रह्मवेत्ते महात्मा निर्विकार । परमहंस पूर्ण शुद्ध निरंतर । लोकानुग्रही बोधिती श्रेयस्कर । परोपकारी दयाळु ॥ १९ ॥ ज्यांचें अतिशुद्ध मानस । भोगिती सच्चिदानंदरूप ब्रह्मसुखास । मायारचित प्रपंचास । अनिर्वचनीय जाणून त्यागिती ॥ २० ॥ जैसें अति स्वच्छ दर्पणांत । सूर्याचें प्रतिबिंब अधिक स्पष्ट दिसत । आणि मलीन दर्पणांत स्वच्छ नसे भासत । सूर्यप्रतिबिंब न्यून भासे ॥ २१ ॥ तैसें शुद्धसत्त्वगुणयुक्त एकाग्र बुद्धींत । आत्मप्रतिबिंब स्पष्ट भासत । म्हणूनि तेथें आनंद अधिक होय प्रतीत । तैसें मलीन बुद्धींत न भासे ॥ २२ ॥ जैसें शब्दादि पंचविषयांत जी सुखप्रतीति । आत्म्याचे संबंधें वाटे होय ती । जैसें गुडामाजीं मधुरपणाची स्थिति । स्वतःसिद्ध स्वाभाविक असे ॥ २३ ॥ ज्या ज्या वस्तूंसि त्या गुडाचा संबंध । त्या त्या वस्तूंत मधुरता येते अबाध । तैसें आत्म्याचे ठायीं आनंदरूपता प्रसिद्ध । स्वतःसिद्ध वसतसे ॥ २४ ॥ त्या

आत्म्याचे तादात्म्य-संबंधेंकरून । शब्दादि पंच विषयांत आनंद-प्रतीति भासमान् । परंतु स्वतः शब्दादि विषयांत कदाच न । आनंदरूपता लेशही ॥ २५ ॥ जैसा वायूचा स्पर्श शीतोष्णरहित असून । जलस्पर्शें शीतल मानिती जन । अग्निस्पर्शें हा वायु उष्ण । म्हणती वाटतो आम्हांसि ॥ २६ ॥ त्या जल अग्नीचे अवयव अति सूक्ष्म । त्या अवयवांसि वायूचा होत स्वसमागम । आणि तयांचा शरीरासि सूक्ष्म । संबंध जेव्हां होतसे ॥ २७ ॥ तेव्हां शीतोष्ण वायुप्रतीति होय । त्या सूक्ष्म अवयवांचा नसे चाक्षुष प्रत्यय । तैसें आत्म्याचे तादात्म्य-संबंधें शब्दादि विषय । आनंदमय वाटती ॥ २८ ॥ स्वतः शब्दादि विषयांत सुख नाहीं । तथापि आत्मज्ञानशून्य भ्रांतिष्ट मानिती पाही । परंतु शब्दादिकांत सुखाचा नसे लेशही । सुखानंदस्वरूप आत्मा स्वयें असे ॥ २९ ॥ आणि प्राण-बुद्ध्यादिकांचें । वाकादिक कर्मेंद्रियें आणि ज्ञानेंद्रियांचें । उपादान तथा निमित्त कारण सर्वांचें । आनंदस्वरूप आत्माचि असे ॥ ३० ॥ जैसें ऊर्णनाभि जंतु एक । तंतूचें उपादान तथा निमित्त कारण असे सम्यक् । तैसें आत्मा केवल निरुपाधिक । परी मायाविशिष्टरूपें कारण असे ॥ ३१ ॥ जैसें नैय्यायिकाचे मतांत । घट आणि ईश्वराचा जो संयोग होत । त्या संयोगाचें उपादान तथा निमित्त । कारण एक ईश्वर मानिती ॥ ३२ ॥ आणि लोहपिंड उष्ण रक्त नसून । अग्निसंगें होतसे रक्त उष्ण प्रकाशमान् । तैशी बुद्धि एकाग्र सुखरूप नसून । मूढमति जन सुखरूप मानिती ॥ ३३ ॥ बुद्ध्यादिक जड सकल संघांत । साक्षी आत्माचि असे खचित । मन-बुद्धि-चित्त-अहंकाराहूनि अतीत । द्रष्टा अनंत निर्विकार विराजे ॥ ३४ ॥ म्हणून ब्रह्मात्मज्ञान सर्वांहून अत्याधिक । तो ब्रह्मात्म-साक्षात्कार ज्यासि झाला अलौकिक । तोचि 'गुरु' पदवीस योग्य आहे एक । श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ आचार्य ॥ ३५ ॥ तेचि योग्य विद्वत्संन्यासी । तेचि उद्धरिती जगासी । तेचि अनादि वेदरहस्य जनांसि । बोधिती प्रेमें कल्याणार्थ ॥ ३६ ॥ म्हणूनि आत्मज्ञान-प्रदाता गुरूसि । पदार्थचि नसे गुरुदक्षिणा द्यावयासि । शिष्यें जरी दिधलें

त्रैलोक्यासि । तरीही दानाप्रमाणें दक्षिणा नसे ॥ ३७ ॥ ऐशा ब्रह्मविद्या-प्रापक सद्गुरूवांचून । जे आत्मसाक्षात्कार-रहित
हीन । ते शिष्य-पदवीस योग्य आहेत ऐसें वचन । श्रुति शास्त्रें आणि साधुजन वर्णिती ॥ ३८ ॥ नरदेह प्राप्त
झाला अमोलिक । म्हणूनि अवश्य करा हो देहसार्थक । क्षणभंगुर नाशिवंत मायिक । भरंवसा नाहीं या शरीराचा ॥ ३९ ॥
विद्या धन पुत्र शक्ति सर्व अनुकूल । असलें तथापि प्रपंच मायाजाल । यांत पाहुण्यासारिखें अलिप्त केवल । असणें
किंवा त्यागणेंचि योग्य होय ॥ ४० ॥ वारंवार इक्षुदंड । छेदितां छेदितां प्रकांड । स्वाद मधुर रस गोड । आवडे सर्व
जनांला ॥ ४१ ॥ पुनःपुन्हां घासितां चंदन । दिव्य सुगंध होतसे वर्धमान । सुखकर वाटे विलेपन । शीतल चंदन
सकलांसि ॥ ४२ ॥ पुनःपुन्हां दग्ध करितां सुवर्ण । चढे निर्मलकांति वर्ण । हेमाचे अनेक अलंकार जाण । प्राणाहूनि
प्रिय सर्वांसि आवडती ॥ ४३ ॥ जाळितां घासितां केलिया छिन्न । सुवर्ण इक्षुदंड आणि चंदन । मौल्यवान् जड
पदार्थ असून । राग द्वेषादि विकार नाहींत ज्यांसि ॥ ४४ ॥ तैशी उत्तमांची प्रकृति । प्राणांतीं देखिल ज्यांना नुपजे
विकृति । धन्य धन्य ते महत्सुकृति । निर्विकार स्थिति ज्यांची असे ॥ ४५ ॥ त्या दत्तात्रेय-स्वामींचे दर्शनासि । अक्कलकोटीं
एके दिवशीं । गणिका राधा नामें छलक मानसीं । पातली महा अभिमानी ॥ ४६ ॥ त्या कालीं गुरुगिरिनारी
दिगंबर । बैसले होते उंच टेकडीवर । प्रातःसमयीं असंख्य नारीनर । दर्शनीं स्थिर बैसले होते ॥ ४७ ॥ श्रीसमर्थांसि
करूनि नमन । राधा बैसली फलादि समर्पून । मग प्रारंभिलें सुस्वर गायन । रागरागिणीसहित तिनें ॥ ४८ ॥ वीणा
मृदंगादि वाद्यें वाजतीं । राधा वेश्या हर्षें यथायोग्य रीतीं । गातसे अति सुस्वरें प्रीतीं । श्रवण करिती जन एकचित्तें
॥ ४९ ॥ रूपयौवन-संपन्ना । तरुणी मद-विव्हल वारांगना । परम मनोहारिणी जन-रंजना । हावभाव दावी चतुरस्र
॥ ५० ॥ त्यापूर्वीं खल-दुष्टांनीं साकल्य । गणिकेसि शिकविलें कौटिल्य । यतीश्वरासि परिक्षूनि निर्माल्य- । तुल्य

करावें अवश्य ॥ ५१ ॥ छलक खल दुष्टांचे घाट । अनुचित निंद्य अति दुर्घट । गुप्त ते प्रसंगवशात् प्रकट । होती परनाश व्हावया ॥ ५२ ॥ काक सर्व रस भक्षिती । परी विष्ठेवांचून नव्हे तृप्ति । परनिंदा-द्वेषविना जन दुर्मति । क्षण न विसंबती कदाही ॥ ५३ ॥ कितीही केलें गुदप्रक्षालन । तथापि मूळचेंचि तें अति मलिन । त्या प्रकारें खल दुष्ट दुर्जन । बोधिलिया परपीडन नच त्यागिती ॥ ५४ ॥ महा तापद दुर्जनांचा सहवास । हाचि जाणावा महान् नरक खास । सहज किंवा बुद्धिपुरःसर त्यास । स्पर्श देखील होऊं नये ॥ ५५ ॥ दुरित भीति धर्म न्याय नाहीं ज्यांत । न बसावें क्षणभरही त्यांत । त्यापेक्षां तृणचरमुखें नेत्रें पहात । सुखें असावें भल्यांनीं ॥ ५६ ॥ त्रासूनियां कंटक मार्गास । यात्रेकरी पंथी त्यागिती कंटक पथ प्रयास । तैसा दुर्जनांचा सहवास । सद्धर्ममार्गी सज्जन त्यागिती ॥ ५७ ॥ असो दुराग्रहें ठरलेला खल-संकेत । तदनुरोधें गणिका कुचेष्टित । हावभाव कटाक्ष नखरे बहुत । राधा दावित समर्थांसि ॥ ५८ ॥ वारांगनेचें वीस वर्षांचें वय । गौर कोमल उत्तम रूपसौंदर्य । जैशी स्वर्गांतील रंभा ऊर्वशी होय । वेश्या तैशीच भासतसे ॥ ५९ ॥ गंधर्वासारिखें जिचें गायन । आकर्षिलें जिनें सर्वांचें शरीर मन । अवघें एकाग्र लक्ष लावून । विलोकिती जन राधेसि ॥ ६० ॥ ठरलेल्या खल संकेताप्रमाणें । खलदुष्ट दूर उभे संभावितपणें । परस्परें हळूं हळूं संभाषणें । वेश्येसि खुणें सुचविती ॥ ६१ ॥ वेश्या उच्चस्वरें संभाषणाचा । प्रयत्न पुष्कळ करी साचा । परंतु मुखांतून एकाही अक्षराचा । उच्चारच होईना ॥ ६२ ॥ मग निरुपायें अनुरागिणी । राधा चिंतितसे अंतःकरणीं । मी रूपसौंदर्याची अपूर्व खाणी । देवांगनेसारिखी असे ॥ ६३ ॥ माझ्यासारिख्या स्त्रीचा समागम । यतीश्वरासि विषय काम । घडला किंवा न घडला पराक्रम । ऐसा भ्रम वेश्येसि झाला ॥ ६४ ॥ जाणूनि वेश्येच्या मनींचें विपरित । अंतर्साक्षी निर्विकार अवधूत । उच्चस्वरें पुसती कीं स्त्री-पुरुषांत । काय भेद असे गे ॥ ६५ ॥ अंतरींचें सत्यत्वें जाणिलें म्हणूनि ।

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

भयचकित होऊनि कामिनी। अधोवदन तदा घालूनि । विस्मितमना जाहली ॥ ६६ ॥ नंतर वेश्या वदे हळूच। भगेंद्रिय आणि स्त्रियांस असती कुच। आणि पुरुषावयव वेगळेच। हाचि भेद वाटतसे ॥ ६७ ॥ नंतर योगीश्वर गणिकेस बोधिती। प्रकृति आणि पुरुषाचा भेद नसे निश्चितीं। जैशीं कार्यकारण असती। भेदरहित सर्वदा ॥ ६८ ॥ परमात्मा सदाशिव निरंतर एक । सच्चिदानंदस्वरूप सर्वत्र व्यापक । तेथें नसती उपमा-उपमेय अनेक। हेतू-दृष्टांतवर्जित असे ॥ ६९ ॥ म्हणूनि हे वेश्ये तुझे अवयव। ब्राह्मणांस अर्पूनि सर्व वैभव। त्वां होऊनि निरवयव निरामय । जावें ब्रह्मगंतव्य स्थानासि ॥ ७० ॥ भयवत् नृसिंहमूर्ति पाहूनि। भयभीत झाली ती कामिनी। थर थर कांपत घाबरूनि। लोटांगण घालितसे ॥ ७१ ॥ अहो देवा विवेकचूडामणि । दुष्ट मी गणिका दुराचरणी । प्रवर्तलें साहस-कर्मिणी । खल-दुर्जन-संगानें ॥ ७२ ॥ आतां दयाळा स्वामी महाराजा। संरक्षावी दासीची लज्जा । अंतरींच्या हितनिजगुजा । सर्वज्ञ शक्तिमान् जाणते आहां ॥ ७३ ॥ तों वीणावादक वेश्येसि वदे लवलाही। तुमच्या अवयवाची झाली लाही। कपाळ फोडिलें दुष्ट-खलांहीं। भजन करित बसा आतां ॥ ७४ ॥ तेव्हां राधा स्तनांकडे पाहत। तंव ते मुळींच ना दिसत। ज्याचें कुडें तयासि सत्य। बाधे पुढें अवश्य तें ॥ ७५ ॥ विषयमदोन्मत्त होती माजली। स्तन गेलियावरी फार लाजली । पश्चात्तापें विषयवासना जळाली । आणि कीर्ति गाजली श्रीगुरूची ॥ ७६ ॥ राधा म्हणे दृढ शरीर सावयव चांगलें। ब्रह्मदेवें सुंदर निर्मिलें। त्यांत न्यूनाधिक केलेलें। नाहीं देखिलें कोणींही ॥ ७७ ॥ जरा व्याधि रोग विकार कांहीं । निर्बल वृद्धत्वादिक उपाधि नाहीं । दृष्टि-भूतबाधादि नसतांही । कुचकुंभ कैसे गेले हो ॥ ७८ ॥ ब्रह्मादिदेवांसि मनुष्यांसि अगम्य । अघटित सामर्थ्य अनुगम्य । श्रीमद्दत्तात्रेय-स्वामींचें बल साम्य। करणें अशक्य सकलांसि ॥ ७९ ॥ पुष्ट कोमल स्तनमंडल । कोणी नेले हो अचल । नाना कल्पना बाष्कळ । करिती लोक त्या

कालीं ॥ ८० ॥ मांत्रिक वैद्य रोगचिकित्सक । शास्त्री ज्योतिषी याज्ञिक पुराणिक । म्हणती ईश्वरी मायेचें कौतुक । कोणासि कदाही कळेना ॥ ८१ ॥ खल-दुष्ट-छलकांनीं त्या कालीं । निर्लज्ज अधोमुखें घातलीं । त्या दिवसापासून चेष्टा टवाळी । कोणीही करित नसे प्रभूची ॥ ८२ ॥ असो सबीज वासनारहित राधा कामिनी । अमद अस्तन निरामय निरभिमानी । श्रीमद्दत्तात्रेय-गुरुचरणीं । झाली अनन्य शरणागत ॥ ८३ ॥ अंतःकरण झालें निर्मल सत्त्वशील । निर्लोभ निर्मोह निरिच्छ केवल । इहामूत्रफलभोग त्यागून सकल । रंगलें चित्त गुरुस्वरूपीं ॥ ८४ ॥ कंठ झाला सद्गदित । नेत्रीं वाहती प्रेमाश्रुपात । अंगीं रोमांच उभे ठाकत । गुरुभक्तिरत जाहली ॥ ८५ ॥ परित्यागूनि लज्जाभिमान । गुणदोष मानापमान । सुखदुःखादि समान । समर्थकृपें ज्ञान उपजलें ॥ ८६ ॥ दत्तात्रेय-स्वामींचें पूजन । श्रद्धा-भक्तीनें आरती ओंवाळून । दत्तात्रेय-नामसंकीर्तन । करितसे गायन सुस्वर ॥ ८७ ॥ मग योगिराजें निजकंठींची माला । घातली राधा दासीच्या गळां । आज्ञापिती काशी प्रयागादि स्थलां । वृंदावन गोकुळा जाऊन यावें ॥ ८८ ॥ राधा प्रार्थितसे अहो श्रीहरि । आपली आज्ञा मान्य सर्वोपरी । सेवा न घडली मज अनधिकारी । समर्थद्वारीं श्वानवत् असूं द्या ॥ ८९ ॥ 'आपणासारिखें करिती तात्काळ' । ऐसें वाचारंभण मात्र वदती सकळ । देखिलें न कोणाचें ऐसें बळ । ऐकिलें नाहीं हो जगद्गुरु ॥ ९० ॥ तो निजानुभव प्रत्यक्ष केवळ । मजलागीं ठसला अचल निर्मल । आपणासारिखें केलें तात्काळ । गुणजातिविषयादिरहित ऐसें ॥ ९१ ॥ कोणतें पुण्यव्रत फळलें । प्रेरणा करूनि पाचारूनि दर्शन दिधलें । इंद्रियविषय-विकार समूळ दग्ध झाले । बळेंचि पाजिलें ज्ञानामृत ॥ ९२ ॥ वास्तविक परमार्थविचारें पाहतां । प्रकृति-पुरुषांची निर्विकार अभेदता । निरुपाधिक आनंद ब्रह्मात्मानुभवितां । ऐक्यरूपता बाणली गुरुबोधें ॥ ९३ ॥ धन्य धन्य हो जगदाधीशा । पूर्णब्रह्म सनातन परमपरेशा । चुकविली भवसंसार दुर्दशा । केले अष्टपाशरहित मला ॥ ९४ ॥ गुरु ब्रह्म-

स्वरूपी नित्य सन्मुख । झाले सबीज विषयविकार पराङ्मुख । लाविलें गुरुशास्त्रमार्गीं प्रमुख । पूर्णकृपानिधि दातारा ॥ ९५ ॥ जय जय हो पतितपावना । जय जया जी आदिनारायणा । जय जया जी जगज्जीवना । मनमोहना देवाधिदेवा ॥ ९६ ॥ जय जया जी अनसूयानंदना । योगाधीशा ब्रह्म सनातना । गुरुदत्त गिरिनारी अलखनिरंजना । अपराध क्षमा व्हावे जी ॥ ९७ ॥ आपुल्या आज्ञें जातें काशी-वृंदावना । दासीस द्यावें अखंड दर्शना । मज दीन दासीवरी पूर्ण कृपा सघना । असावी हेचि विनंति ॥ ९८ ॥ मग वस्त्रालंकार त्यागून । एक श्वेत वस्त्र करूनि परिधान । श्रीकृष्ण-दत्तात्रेयपदीं लोटांगण । घालूनि निघाली राधिका ॥ ९९ ॥ नंतर बडोद्यासि राधा येऊन । फाल्गुनमास नेमणूक संबंधीं गायन । तें धन राधा ग्रहण करून । आली पुसत पुसत सप्रेमें ॥ १०० ॥ ब्रह्मनिष्ठ वामनबुवाचे सदनीं । पातली दत्तात्रेयदर्शना लागूनि । त्या कालीं दाजीबा भोंसले आणि । इतर मंडळी स्थित होती ॥ १ ॥ देवां ब्राह्मणादिकांसि घालूनि दंडवत । श्रीमद्दत्तात्रेयस्वामींचें सामर्थ्याद्भुत । गाऊनि उघड दावी इत्थंभूत । परमेश्वर कृत्य प्रत्यक्ष तें ॥ २ ॥ निर्विषयी राधा अमद स्तनरहित । मुखें वदे नित्य 'श्रीगुरुदेव दत्त' । केवल अल्पवयी रूपगुणसौंदर्ययुक्त । असूनि विरक्त गुरुकृपें झाली ॥ ३ ॥ देह अवयव ईश्वरनिर्मित । त्यांसि न्यूनाधिक नष्ट कोणीही करूं न शकत । जे रोगादिभयें वृद्ध-मृतावस्थेंत । नष्ट न होती सर्वथा ॥ ४ ॥ ते दत्तात्रेयस्वामिकटाक्षें सहज । कुच स्थानसहित सबीज । क्षणमात्रें लय पावले विषय कामराज । घोर कलियुगांत अतिदुर्लभ हें ॥ ५ ॥ कर्ता अकर्ता अन्यथा कर्ता । स्वामीसमर्थ-गुरुदत्त दाता । ज्याच्या अगम्य लीलेचें समस्तां । महदाश्चर्य वाटतसे ॥ ६ ॥ नंतर राधेनें ब्राह्मणभोजन । करूनि दत्तात्रेयस्वामींचें भजन । काशीक्षेत्राकडे केलें गमन । धन्य भाग्यवान् गणिका ती ॥ ७ ॥ गुरु सांगती प्रिय शिष्यासि । श्रीमद्दत्तात्रेयगुरुकृपा प्राप्त होय ज्यासी । चतुर्विध पुरुषार्थ लाधती तयासि ।

कांहीं न्यून नसे कदा ॥ ८ ॥ श्रीगुरु वरप्रसाद अपार महिमा । पायीं लोळती सिद्धि अणिमा गरिमा महिमा । उद्धरिली छलकगणिका रामा । गुरुपदीं विश्रामा पावली ॥ ९ ॥; शके सत्राशें एक्याणवांत । उत्तम मार्गशीर्ष शुक्लपक्षांत । पुष्कळ सेवकजनांसहित । श्रीमदावधूत योगीश्वर ॥ ११० ॥ अक्कलकोटसन्निध नागणसुर । हंचनाळ कोतवालाचें हदर । इत्यादि ग्रामीं करिती संचार । घडलें वृत्त त्या कालीं ॥ ११ ॥ एक गोसावी सात्त्विक विरक्त । श्रीमद्दत्तात्रेयदर्शन व्हावें या युगांत । म्हणून बहुत संवत्सरपर्यंत । अनुष्ठान त्यानें केलेलें ॥ १२ ॥ परंतु श्रीकृष्ण दत्तात्रेयदर्शन । झालें नसल्यानें तो उदासीन । हिंडत हिंडत प्रज्ञापुरीं येऊन । शोध करित पातला तेथें ॥ १३ ॥ यतींद्रासि प्रणिपात करून । स्तब्ध उभा राहिला कर जोडून । योगिराज स्वामींनीं त्यास विलोकून । स्वयें दत्तात्रेयरूप धरियेलें ॥ १४ ॥ ब्रह्मा-विष्णु-महेश्वर देवत्रय । शंख चक्र गदा त्रिशूल करीं अक्षय । स्वप्रकाश पूर्णपरमानंदमय । मंगलायतन शोभतसे ॥ १५ ॥ अंगीं भस्म सुगंध सुवासिक । कंठीं माला रुद्राक्ष मणि मौक्तिक । सुंदर वदन हस्त अभयकारक । त्रिभुवनपालक विकसित जे ॥ १६ ॥ शार्दूल-चर्मांबर केलें धारण । चारी वेद उभे श्वानरूपें धरून । समागमें कामधेनु ऋद्धि सिद्धि जाण । सेवा-तत्पर तिष्ठती ॥ १७ ॥ सुरासुर चारण सिद्ध यक्ष किन्नर । योगी मुनी विरागी ऋषीश्वर । ज्यासि हृदयीं ध्याती निरंतर । तो त्रयमूर्ति परमेश्वर साक्षात् ॥ १८ ॥ भक्ताभीष्टप्रद प्रणतवत्सल । सच्चिदानंद गुरु अत्यंत कृपाल । विश्वपालक विश्वात्मा अत्रिबाल । भक्तिप्रिय उभा ठेला ॥ १९ ॥ अति दुर्लभ तें भगवान्दर्शन । गोसाव्यानें देखिलें डोळे भरून । घातलें साष्टांग दंडवत नमन । कृतार्थ होऊनि ते कालीं ॥ १२० ॥ गोसाव्यास विलक्षण चमत्कार । सगुणरूपें दर्शन-साक्षात्कार । घडून यथेप्सित प्राप्त झालें साचार । प्रत्यक्ष प्रमाण 'चक्षुर्वै सत्यं' ॥ २१ ॥ धन्य धन्य प्राप्तकाल भाग्योदय । भेटले विश्वेश्वर गुरु दत्तात्रेय । तेव्हां

गोसावी शरण निःसंशय । कृतकृत्य होऊनि प्रार्थितसे ॥ २२ ॥ आपण साक्षात् पूर्ण परमेश्वर । करित आहां जगदुद्धार । आम्ही अज्ञानी जीव पामर । नोळखूं स्वरूप लीलाधारी ॥ २३ ॥ अनेक जन्मांचें सत्य सार्थक । झालें दर्शनें विश्वव्यापक । गुरुगिरिनारी ध्वजाधारी अलौकिक । दत्तात्रेय-गुरूचा सेवक झालों ॥ २४ ॥ मग दत्तात्रेयस्वामींचा जयजयकार गात । गोसावी अत्यंत हर्षभरित । गुरुआज्ञेनुसार मातापुर-क्षेत्रांत । गेला कृतकार्य होऊनि ॥ २५ ॥; ज्यांची लीला अगम्य अपार । ते योगिराज दत्तात्रेय सर्वेश्वर । अक्कलकोटीं एके समयीं सहजानुसार । देशमुखाचे वाड्यांत स्थित होते ॥ २६ ॥ समीप असतां अनेक सेवेकरी । दिवसां तृतीय प्रहरीं । मोगलाईंतील वृद्ध विचारी । एक सय्यद यवन पातला ॥ २७ ॥ सुंदराबाई शिवूबाई यतिपाशीं तेधवां । होते बाबा सबनीससह बाबा यादवा । आणि मी ब्रह्मनिष्ठ वामनबुवा । कीर्तनार्थ वीणा वाजवित होतों ॥ २८ ॥ तेव्हां यवन पुसे सेवकांप्रति । अक्कलकोटचे स्वामी कोठें असती । भयंकर उच्च यवनाप्रति । कोणी न सांगती सेवक ते ॥ २९ ॥ तों योगीश्वर वदती लवलाही । अक्कलकोटांतचि ते स्वामी पाहीं । ऐकूनि वचन शुभमंगलप्रवाहीं । तटस्थ झाला वृद्ध यवन ॥ १३० ॥ सुटलें प्रपंचदेहभान । चित्त चैतन्यस्वरूपीं झालें तल्लीन । प्रज्ञानेत्रें स्वामिराज भगवान् । हृदयस्थ पाहिले धीपुरीं ॥ ३१ ॥ यवन तटस्थ एक मुहूर्तपर्यंत । उभाचि राहिला समाधिअवस्थेंत । अहंदेहध्यास होऊनि गलित । आत्मारामपरायण झालेला ॥ ३२ ॥ एकाकार होऊनि समस्तलोक । पाहूनि तें विलक्षण कौतुक । म्हणती सामर्थ्यातिशय अलौकिक । यवनासि पारमार्थिक तत्काल केलें ॥ ३३ ॥ या प्रकारें योग्य समाधिस्थिति । जाणूनि कृपाकटाक्षें जगत्पति । वृद्ध यवनाकडे विलोकिती । तंव तों आला शुद्धीवर ॥ ३४ ॥ मग हळूं हळूं नेत्र उघडून । पाहे तों अंतर्बाह्य चैतन्यस्वरूप भगवान् । यवनी भाषेंत उत्तम स्तवन । रसिक यवन करितसे ॥ ३५ ॥ आजपर्यंत मजला बहुत । भेटले सांई फकीर हजरत ।

साधु संत विरागी गोसावी असीत । मोठे महंत संस्थानी ॥ ३६ ॥ मी कलिमा किताब आणि कुराण । बहुत पढून आमचें
धर्मावर्तन । निमाज बंदगी करितों प्रेमेंकरून । पंगुजनांवरी उपकार ॥ ३७ ॥ आणि हकीकत तरीकत । शर्यत आणि
मार्फत । हें चांगलें जाणूनि सदोदित । वर्ततों सत्य रीतीनें ॥ ३८ ॥ तैसेंचि नासूद जमसूद । मलकुद आणि लाहुद ।
हे चारी मंजलयोग सुखप्रद । अभ्यासूनि पाहिले ॥ ३९ ॥ आमच्या धर्मगुरुमार्गें सकल । जाणिलें जडी बुट्टी जंगल ।
परंतु मंगलात्मा जगन्मंगल । देखिलें नाहीं कधींही ॥ १४० ॥ ते महद्भाग्यें अक्कलकोटांत । विचारितां निरवधि अर्धक्षणांत ।
अंतर्यामीं पाहिले परब्रह्म अवधूत । स्वामीसमर्थ जगद्गुरु ॥ ४१ ॥ गरीबनवाज परवरदिगार । साहेब दिलके अंदर ।
आपहि खुद्बखुद इलाही परमेश्वर । अल्लाल्लायलिल्ला महमदरसुलिल्ला ॥ ४२ ॥ ओहि अल्ला खुदाइलाहि । स्वामीमहाराज
पूर्ण है आपहि । दिलके अंदर दर्शन हुवा है ओहि । बाहरी स्वामिराज बैठे है ॥ ४३ ॥ ‘अक्कलसे खुदा पहिचानना ।’
पलखमें दर्यामाफ दर्शन होना । गुरुमहेरकी लेहरसे मैनें जाना । सच्चासाहेब देख लिया ॥ ४४ ॥ सबजनमका
सार्थक हुवा । में स्वामिमहाराजका बंदा हुवा । चाहेसो हुकुम करो जी गुरुदेवा । सर्वांतर्यामी स्वामिराजा
॥ ४५ ॥ ऐसें स्वानुभवासहित बोलून । आणिलेले पदार्थ अर्पण करून । स्वामिलीलामृतपानें कृतार्थ होऊन ।
वाहवा करीत आनंदें ॥ ४६ ॥ मग दुसरे दिवशीं गुरुआज्ञेनुसार । महाभक्त वृद्धयवन जमादार । हैदराबादेकडे गेला
सत्वर । लोकांसि सांगे गुरुवृत्त ॥ ४७ ॥ येथें वर्ण जाती अधिकार । इत्यादिकांचें महत्त्व नलगे साचार । एक शुद्धभाव-
भक्तीनें परमेश्वर । भेटतसे प्रसन्न होत्साता ॥ ४८ ॥ ते आपणासारिखें करिती तात्काल । न पाहती अधिकार जाति
वर्णकुल । जनांवरी कृपा करिती सर्वकाल । लीला अपार जयांची ॥ ४९ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणार्थ-
मथित । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । सप्तविंशतितमाध्याय गोड हा ॥ १५० ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे
सप्तविंशतितमोऽध्यायः समाप्तः ॥ २७ ॥ श्रीगुरुदेवदत्त—स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय अठ्ठाविसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्गुरुदेव-दत्तात्रेय-स्वामिने नमः ॥ ॥ गुरु वदती शिष्या सदैव । त्यागूनि कपट दंभादि सर्वथैव । हरिगुरुचरणीं दृढतर भाव । असावा निश्चल मानसें ॥ १ ॥ सद्गुरुसि म्हणूं नये नर । आत्मा विष्णु परमेष्ठी शंकर । गुरु साक्षात् परब्रह्म परमेश्वर । जाणूनि सेवन करावें ॥ २ ॥ जाणावयाचा जो परमार्थ । श्रीगुरुमुखें तो बाणावा यथार्थ । वेद-वेदांत-महावाक्यार्थ । निश्चितार्थ प्रत्यक्षानुभवें ॥ ३ ॥ टाकूनि विषय पदार्थासक्ति । सर्वदा असावी अंतर्मुख वृत्ति । ऐशी अभेद जीवब्रह्मैक्यस्थिति । तेंचि ‘जीवन्मुक्ति’ बोलती ॥ ४ ॥ मुक्ति इच्छिसि जरी हातांत । तरी त्यजावेंचि विषय विषवत् । दया आर्जव क्षमा संतोषयुक्त । सत्यामृत सेवीं बा ॥ ५ ॥ सत्याचें जें सोलीव सत्य । तेंचि सद्गुरु ब्रह्मस्वरूप नित्य । त्या गुरुसदनीं वासार्थ अपत्य । दास होऊनि वर्तावें ॥ ६ ॥ तरीच चुकती जन्ममरण खेपा । पावती शिष्य मोक्षस्वरूपा । म्हणून सेवा हा सदुपाय सोपा । करा रे बापांनो गुरुभक्ति ॥ ७ ॥ अनादि वेदोक्त सनातन- । धर्ममार्गाप्रमाणें कीजे वर्तन । श्रद्धा-भक्तियुक्त नित्य कर्मोपासन । फलेच्छा टाकून करावें ॥ ८ ॥ स्ववर्णाश्रमविहित धर्म सांडूनि । व्यर्थ न हिंडावें आड रानीं । यदर्थ शिष्या कथानुसंधानीं । चित्त स्थिर असावें ॥ ९ ॥ दक्षिण काशीक्षेत्र करवीर । जेथें महालक्ष्मी तिष्ठे निरंतर । पंचगंगा वाहे सुंदर । येती अपार जन तेथें ॥ १० ॥ नृसिंहवाडी क्षेत्र प्रख्यात । कृष्णा-पंचगंगासंगम विराजित । नृसिंहस्वामी गुरुदेवदत्त । वसती सदोदित त्या स्थानीं ॥ ११ ॥ सकल बाधा-प्रशमन । सकलाभीष्टप्रद शुद्धस्थान । जेथें अनेक सेवाधारी जन । मनेप्सित व्हावया वसती ते

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

॥ १२ ॥ श्रीशंकराचार्यांचा श्रेष्ठ । भव्य सुशोभित संकेश्वर मठ । अनेक तीर्थ देवता प्रकट । करवीर प्रांतीं विकसती
॥ १३ ॥ ऐशा कोल्हापूर प्रांतीं विराजमान । इचलकरंजी नामें संस्थान । त्या इचलकरंजींत ब्राह्मण विद्वान । श्रीपाद
भट्ट वसतसे ॥ १४ ॥ ते श्रीपादभट्ट एके समयास । फिरत फिरत अक्कलकोटास । पातले दत्ताचे दर्शनास । वैदिक द्विज
दशग्रंथी ॥ १५ ॥ दशग्रंथ अष्टविकृति । ऋग्वेदमंत्र मुखोद्गत पठती । शांत समाधानी ज्यांची वृत्ति । यतिपादपद्मां
नमिती ते ॥ १६ ॥ स्नान संध्यादि कर्में आचरिती । विध्युक्त एकनिष्ठ शुचिर्भूत चित्तीं । काम-राग-द्वेष-विवर्जित स्थिती ।
दर्शनासि नित्य तत्पर जे ॥ १७ ॥ एके दिवशीं त्रैमूर्ति-अवतार । स्वामी समर्थ दत्तदिगंबर । श्रीपाद भटासि श्रेयस्कर ।
प्रसन्नवदनें सांगती ॥ १८ ॥ तुम्हीं श्रीक्षेत्र वाराणशीस । जाऊनि राहावें तीन मास । परतूनि येऊनि आम्हांस । भेटावें
हो द्विजवर्या ॥ १९ ॥ दत्तमुनींच्या आज्ञेनुसार । श्रीपादभट वेदपारंगत विप्र । गुरूसि करूनि साष्टांग नमस्कार । निघाले
काशीयात्रेसी ॥ २० ॥ प्रथम प्रयागासि जाऊन । तेथील कर्में आटोपून । गयेंत जाऊन विष्णुपद-पूजन । केलें
पिंडदानादि ॥ २१ ॥ मग जाऊनि काशीपुरा । पूजिलें जान्हवी विश्वेश्वरा । यथासांग यात्रा शास्त्रप्रचारा- । अन्वयें केली
विप्रेंद्रें ॥ २२ ॥ या विरस असार संसारीं । सार असे चतुष्टय प्रकारीं । सर्वदा 'निवास विश्वेश्वरपुरीं' । 'सत्संग' व्हावाचि
दुसरा हो ॥ २३ ॥ तिसरें नित्य 'भागीरथीस्नान' । चौथें होय 'विश्वेश्वर-दर्शन' । असार संसारांतील निश्चयेंकरून ।
कथिलें सारचतुष्टय तें ॥ २४ ॥ भागीरथीतीर-मृत्तिकातिलक । ज्यांनीं रेखिला भालीं सम्यक् । ते स्वर्गलोकीं इंद्राहूनि
अधिक । पुण्यस्वरूप वसती सदा ॥ २५ ॥ जो 'गंगा-गंगा' ऐशा प्रकारें । शतयोजनांवरूनि जरी स्मरे । सर्व पापमुक्त
होऊनि तरे । विष्णुलोकीं वसे तो ॥ २६ ॥ सेवितां गंगाजल निर्मल । भुक्तिमुक्तिप्रदायक त्रिकाल । भावानुसार सर्वदा फल ।
प्राप्त होय निश्चयार्थें ॥ २७ ॥ पुण्य प्रकाशक वाराणशी । काशीसमान नाहीं स्वर्गासि । भूलोकीं विराजे पापनाशी ।

महापवित्र अनुपम ॥ २८ ॥ ‘काशी काशी’ ऐसें त्रिवार । भावें पठण करिती जे नर । काशीनिवासाचें फल साचार । तयांसि प्राप्त होतसे ॥ २९ ॥ संपूर्ण तीर्थदेवतामय काशी । स्मरावें जावें वसावें अहर्निशीं । श्रीपादभट ऐशा अविनाशी । विश्वेश्वरपुरींत रमले ते ॥ ३० ॥ नित्य जागरणाच्या स्थानीं । श्रीपादभट बैसती जाऊनि । परंतु तेथील विद्वान् या म्हणूनि । कोणी न म्हणती तयांसि ॥ ३१ ॥ मोठमोठे वैदिक विद्वान् । वृद्ध तरुण द्विज जन । श्रीपादभटासि बोलावून । न देती मान आदरें ते ॥ ३२ ॥ आधीं पंडित त्यांत काशीकर । त्याहीवरी मोठा अहंकार । ऐशा समाजांत कोण पुसणार । श्रीपादभट द्विजासि ॥ ३३ ॥ मोठमोठे विद्वान् क्षेत्रस्थ धेंड । अभिमानें करिती हेळसांड । वैदिक शास्त्री पुराणिकादि गुंड । महाप्रचंड प्रतिष्ठित ॥ ३४ ॥ हें पाहूनि श्रीपादभट । म्हणती नको ही सन्मानाची कटकट । कशाकरितां करणें खटपट । चालले झटपट दर्शना ॥ ३५ ॥ विश्वेश्वराच्या देवालयाजवळ । कटीवर हस्त ठेवूनि सोज्ज्वल । दत्तात्रेय स्वामिराज दयाल । प्रसन्नवदनें उभे होते ॥ ३६ ॥ मार्गांतूनि जाणारे येणारे लोक । अत्यंत तेजस्वी पुरुष अलौकिक । पाहूनि वाटलें तयांसि कौतुक । बोलती कित्येक भाषण तें ॥ ३७ ॥ हे दैदीप्यमान् यतिराय । शृंगेरीचे श्रीमच्छंकराचार्य । न कळे आहेत कीं काय । ऐसा भास वाटतसे ॥ ३८ ॥ कोणी म्हणती या मूर्तीसि । आम्हीं पाहिले हंपी-विरूपाक्षासीं । कोणी वदती जगन्नाथ क्षेत्रीं यांसि । आम्हीं भोजन घातलें ॥ ३९ ॥ चतुर्वेद-वेदांगपारग हे यति । तेथील संस्थानी विशुद्धमति । श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ आचार्य अति । जितेंद्रिय निःस्पृह आहेत ॥ ४० ॥ कोणी वृद्ध पुरुष तेव्हां सांगती । हेचि संन्यासी हिमालयपर्वतीं । वेड्यासारिखे निरुपाधिक संचरती । आम्हीं प्रत्यक्ष देखिले ॥ ४१ ॥ अशा प्रकारें लोक जमून । चर्चा करिती स्वबुद्धिबलेंकरून । त्यावेळीं कांहीं वैदिक विद्वान् । सहज उभे राहिले ॥ ४२ ॥ त्यांतील बोलतसे कोणी । ज्योतिर्मठाचे शिरोमणी । शंकरस्वामीचे सिंहासनीं । शंकराचार्य हेचि होते ॥ ४३ ॥ चार पांच मास

राहून यांनीं । पलायन केलें तेथूनि । वेद-वेदांगवेत्ते असूनि । वेड्यासारिखे करिती कां ॥ ४४ ॥ वांकडे तिकडे चेष्टा
वचन । अर्पिती कां हो गालिप्रदान । इतुक्यांत कोणी संन्यासी दोन । उभे राहून बोलती ॥ ४५ ॥ यांची कीर्ति
प्रकाशमान् । आणि हे असती पुरुष महान् । परवां दुर्गा घाटीं बसून । सांगत होते मनांतील ॥ ४६ ॥ मग दुसरा
संन्यासी बोलत । हे सत्पुरुष कलकत्त्यांत । श्रीमहाकालीचे स्थानांत । बैसले ते आम्हीं देखिले ॥ ४७ ॥ कित्येक मंडळींनीं
या पुरुषांची । परीक्षा पहावया साची । पात्रें ठेविलीं मद्य-मांसाची । यांचेसमोर छलकांनीं ॥ ४८ ॥
भक्षणार्थ आग्रह करिती ।, नानाप्रकारें प्रमाण सांगती । तों अकस्मात् एक सुंदर युवती । उभी ठेली विद्युल्लतेसम
॥ ४९ ॥ रूपयौवनसंपन्न चपला । सर्वोत्कृष्ट तरुणी मदविव्हला । वस्त्रालंकारयुक्त भामिनीला । देखूनि सर्वही भयचकित
होती ॥ ५० ॥ या प्रकारची गुणवती सुंदर । उभी जोडून दोन्ही कर । दैदीप्यमान् यांचेसमोर । गंभीर भाषणें
जनां बोधी ॥ ५१ ॥ अहो तुम्ही अज्ञानी जन । तुम्हांसी नाहीं यथार्थ ज्ञान । या उत्तम पुरुषाचें छलन । करूं नये सहसाही
॥ ५२ ॥ हे पूर्णब्रह्म परमहंस । परमात्मा परमपूंस । मायाअविद्याकार्यविध्वंस । यद्दर्शन भाग्यें लाधे ॥ ५३ ॥
यदर्थीं विपरित भावना । अहो नसावी तुमच्या मना । ऐसें वदूनि ते देवांगना । मांस पात्रासि स्पर्श करी ॥ ५४ ॥
स्पर्शितांचि त्या पात्रांतील । मांसाचीं फलें झालीं तत्काल । आणिक एक वर्तलें नवल । जाहलें पय मद्याचें ॥ ५५ ॥
पुढें ती स्त्री आणि हे संन्यासी । न दिसती कोठेंही लोकांसि । तेव्हां विस्मित होऊनि पश्चात्तापासि । पावले सर्व त्या
स्थानीं ॥ ५६ ॥ यावरूनि पहातां यांजला । अष्टसिद्धींचा लाभ झाला । किंवा कर्णपिशाच्च यक्षिणीला । साधिलें
ऐसें वाटतें ॥ ५७ ॥ या प्रकारें बुद्धिबलानुसार । चर्चा करिती लहान थोर । इतुक्यांत इचलकरंजीकर । श्रीपाद जोशी
बोलती ॥ ५८ ॥ समर्थांसि साष्टांग नमन । करूनि पुसती कुशल वर्तमान । आपण अक्कलकोटीं असून । येथें केव्हां

* * *

आलां जी ॥ ५९ ॥ दत्तात्रेय स्वामी तदनंतर । श्रीपादासि प्रबोधिती मधुर । आम्ही सर्वत्र वसतों निरंतर । तथापि पातलों तव कार्या ॥ ६० ॥ त्वां आजीं मंत्रजागरणांत । निर्भय जाऊनि बसावें निश्चित । आम्हीही तेथें जवळचि आहोंत । म्हणावे मंत्र वेदांचे ॥ ६१ ॥ घेऊनि समर्थांचा आशीर्वाद । संतोषित झाला भट्ट श्रीपाद । म्हणे जयजय करुणाकंद । सच्चिदानंद गुरुराया ॥ ६२ ॥ आपला अपार महिमा । नेणती सूर्य चंद्र इंद्र ब्रह्मा । आत्मारामा पुरुषोत्तमा । आज्ञेनुसार निघालों ॥ ६३ ॥ काशीकर वैदिक पट्टीचे विद्वान् । त्या मंडळांत विप्र बैसला जाऊन । वारंवार काशीस्थांच्या चुक्या दावून । सावध तयांसि करितसे ॥ ६४ ॥ उत्तम प्रकारें शुद्ध आपण । मंत्र करूनियां पठण । स्वामिरायांचे स्मरूनि चरण । गर्जतसे सिंह जैसा ॥ ६५ ॥ हें अवलोकूनि काशीकर । धरूनि श्रीपाद भटजीचा कर । अत्यादरें मध्यें आसनावर । नमस्कारूनि बैसविती ॥ ६६ ॥ मग नित्य मंत्रजागरणासि । आणिती प्रेमें श्रीपाद भटासि । सन्मानपूर्वक वस्त्रालंकारासि । देवविती बहुत धन ॥ ६७ ॥ तेव्हां श्रीपादांनीं काशी क्षेत्रांत । ब्राह्मण-भोजन जागरण शक्तियुक्त । करून विप्रश्रेष्ठां संतोषित । निघती हर्षित द्विजवर ॥ ६८ ॥ येऊनियां अक्कलकोटासि । दत्तात्रेयस्वामिचरणारविंदांसि । पुजूनि करिती ब्राह्मणभोजनासि । सांगती सर्वांसि शुभवृत्त ॥ ६९ ॥ श्रीगुरुस्वामि-लीलामृत । काशीस घडलेलें इत्थंभूत । कर्णद्वारें प्राशिती लोक समस्त । होती पावन तत्कालीं ॥ ७० ॥ अतर्क्य अद्भुत चमत्कारिक । अघटित करणी मायिक । सर्वांसि अनुग्रहकारक । विचित्र लीला गुरूची ॥ ७१ ॥ कालिकादेवी-मंदिरांत । देखिलेलें कथिलें ज्यानें वृत्त । तो ब्रह्मानंद यति अक्कलकोटांत । भटजीसंगें आलेला ॥ ७२ ॥ त्यानें उच्च स्वरें सर्व इतिहास । बोधिला धीपुरांतील जनांस । ते धन्य धन्य म्हणती भाग्य दिवस । पाजिलें सुरस मोक्षामृत ॥ ७३ ॥ या कलिरायाच्या कलियुगीं । आम्ही वर्तूं लागलों कुमार्गीं । शास्ता जगद्गुरु आम्हांलागीं । अवश्य पाहिजे सर्वदा ॥ ७४ ॥ अक्कलकोटचें

अहो भाग्य। प्रगटले अवतारिक पुरुष योग्य। ज्यांचे दर्शनें दुरित-भोग्य। निरसून सौख्य लाधतसे ॥ ७५ ॥ गुरु-लीला गायन करीत। श्रीपाद जोशी हर्षभरित। गेले स्वनगरीं पुढें दिन बहुत। गेल्यावरी स्वर्गस्थ जाहले ॥ ७६ ॥ सांप्रत तयांचे चिरंजीव। स्वग्रामीं सुखें नांदती सदैव। विद्वान् तयाचें आडनांव। 'जोशी भट' असें तें ॥ ७७ ॥ असो ऐसा परमपुरुषार्थ ब्रह्मसाक्षात्कार। प्राप्त झाल्यावरी निरंतर। मग प्रयत्न प्रारब्ध कलेवर। मतवाद नुरती सर्वथा ॥ ७८ ॥ म्हणूनि शास्त्रसंयुक्तीं तडजोड। प्रारब्ध-प्रयत्नाची असेचि जोड। सुशिक्षितांनीं जाणावी बिनतोड। मतवाद वरकड टाकूनि ॥ ७९ ॥ प्रपंच-व्यवहारीं पाहिजेचि यत्न। परमार्थीं पुरुषार्थ दैव प्रयत्न। दैव-यत्नाचा भाव जाण। सद्विद्वानरत्नें जाणती ॥ ८० ॥ प्रयत्नें अवश्य शेत पिकवावें। प्रारब्धें सुखरूप नित्य खावें। दत्तात्रेय-स्वामींचें सद्बोध वाक्य बरवें। केवल कल्याणार्थप्रद ॥ ८१ ॥ त्या दत्तात्रेय-चरणीं लीन वामन। निमित्तमात्र लीलामृत-वर्णन। हृदयीं प्रकटूनि सद्गुरु अत्रिनंदन। आपलें आपण वदविती ॥ ८२ ॥ त्या गुरु-परमेश्वरानुग्रहावीण। आणि दिव्य ज्ञानचक्षूंवांचून। स्वयंप्रकाश अलख निरंजन। कैसें दिसेल अंतरीं ॥ ८३ ॥ ते प्रभु सर्वांतरीं नित्य प्रतिष्ठती। परंतु चर्मचक्षूंनीं सर्वथा न दिसती। सुरनरादिकांसिही कल्पांतीं। अनंत जन्म घेतलिया ॥ ८४ ॥ जप तप अनुष्ठान मुख्य उपवास व्रतें। कृच्छ्रचांद्रायणादि बहु प्रायश्चित्तें। यद्यपि अगणित जळतीं दुरितें। तथापि वासनाबीज उरतसे ॥ ८५ ॥ अनंतजन्मकृत अविवेकें। लघु महा आणि अति पातकें। गुरु-नारायण-स्मरणमात्रें क्षणेकें। समूल जातीं जळून ॥ ८६ ॥; असो कथा श्रोते परिसा सादर। अक्कलकोट ग्रामाबाहेर। आहे श्रीरामचंद्राचें देवालय सुंदर। तेथें एक परमार्थातुर स्त्री वसे ॥ ८७ ॥ द्विज जाती विगतधवा। जिचा रामदासी पंथ बरवा। श्रीसीतारामाची करी सेवा। योगात्मा प्रभूचें नित्य दर्शन घेऊनि ॥ ८८ ॥ तीव्र वैराग्यशील सदाचारी। भिक्षा मागूनि मधुकरी। देव-अतिथींस अर्पूनि युक्ताहारी। निर्वाह करी हरिबाई

॥ ८९ ॥ भिक्षायोगें श्रीरामचंद्रजीचें स्थान । बांधवूनि देवालय लहान । श्रीरामपंचायतन-मूर्ति स्थापून । भजन-पूजन करितसे ॥ ९० ॥ दासबोधादिक वेदांत ग्रंथांचें पठण । भक्तिपूर्वक सर्वदा श्रवण मनन । करूनि सर्व कर्म ब्रह्मार्पण । हरिभक्तिपरायण हरि झाली ॥ ९१ ॥ तेथें सत्पुरुष बाबा सबनीस । वेदांत ग्रंथ वाचिती सार्थ सरस । अन्य कोणी बैसती श्रवणास । ते उपहास करिती सर्वांचा ॥ ९२ ॥ त्यांत वारकरी काशीनाथ म्हसवडे । बाबा फडणिसादिक म्हणती कोरडें । मस्तक फिरून स्वामी झाले वेडे । वृथा जन नादीं लागले हे ॥ ९३ ॥ चतुर्थाश्रम घेऊनि हे भ्रष्टले । यांनीं व्यर्थ थोतांड बंड माजविलें । यांच्या नादानें बाबा बैसले । करित उलथ्या पालथ्या पोथ्या ॥ ९४ ॥ तेव्हां एका गृहस्थाचे पायासि । सर्पें वेष्टिलें अतिक्रोधेंसीं । मग ते सगळे यतींद्र-दर्शनासि । गेले त्वरेनें पेठेंत ॥ ९५ ॥ त्या कालीं मोठ्या पटांगणांत । दत्तात्रेय स्वामी होते स्थित । तेथें दिव्य तेजस्वी गुरुमूर्ति विलोकित । भक्तिश्रद्धा-समन्वित जन उभे ॥ ९६ ॥ यतीश्वरांच्या समोर । उभे राहिले छलक निंदक विप्र । तयांसि देखूनि दत्तदिगंबर । हास्यवदनें बोलती ॥ ९७ ॥ आम्ही वेडे भ्रष्टलों मस्तक भ्रमलें । तरी तुमच्या पित्याचें काय खर्चलें । उदरासि मिळतसे चांगलें । म्हणूनि चेष्टा आठवल्या कां ॥ ९८ ॥ तुमच्यांतले सर्व घोंटाळे । ठाऊक आहेत मज सगळे । जळो तुमचे टिळे माळा सोंवळें । अंतर्बाह्य विटाळलेले तुम्ही आहां ॥ ९९ ॥ ऐसे अंतर्साक्षी ईश्वर महद्भूत । त्यांचें वाक्य परिसूनि झाले लज्जित । म्हणती आपण परमेश्वर साक्षात् । घातले पदरांत अन्याय बहु ॥ १०० ॥ आम्ही श्रीचरणीं शरणागत । अपराध क्षमा व्हावे हो भगवंत । ऐसें वदूनि वारंवार प्रणिपात । अनुतापयुक्त करिती ते ॥ १ ॥ सर्पानें सोडिलें ज्याचे पायास । तो जाहला सेवेकरी गुरुदास । तेव्हांपासूनि बाबा फडणीस । गुरुभक्त निःसीम जाहले ॥ २ ॥ बाबांसि कन्या चिरंजीव । असती ज्यांचे सुशीलस्वभाव । काशीनाथदादा म्हसवडे सदैव ।

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

विठ्ठल-स्मरण करितसे ॥ ३ ॥ हे पंढरीचे वारकरी भजन । करिती ज्ञानेश्वरी इत्यादि ग्रंथावलोकन । सर्वदा सत्कालक्षेप ।
करून । उदासीनवृत्ति राहिले ॥ ४ ॥ असो इंग्रज सरकारचे विद्यमान । अधिकारी साहेब-बंबगार्डन ।
जतन करावया संस्थान । अक्कलकोटीं वसती ते ॥ ५ ॥ ग्रामाबाहेर त्यांचा मुक्काम । सुंदर विशालगृहीं आराम ।
न्याय रीतीनें पाहती काम । दक्ष लोकहितीं जे ॥ ६ ॥ त्यांचे पायास एकदा । गोम डसली होती विषदा ।
आपणास न व्हावी आपदा । म्हणूनि उपाय योजिती ॥ ७ ॥ दंश झालेल्या स्थानाचें विष । शस्त्रें काढविलें
त्यांनीं निःशेष । त्यायोगें पादचर्म गेलें विशेष । तेणें क्लेश उपजले ॥ ८ ॥ साहेबांच्या पायाचें गेलें सालटें ।
पाद रक्ताळूनि डसती माशा चिलटें । औषधें गुण न येतां उलटें । दुःखप्रद होतसे ॥ ९ ॥ बंबसाहेब
दुःखें त्रासले । वेदना सोसवेना कंटाळले । म्हणती कशानें मला वाटेल चांगलें । दंश-विष उतरूनि ॥ ११० ॥
तों दुसरे दिवशीं अकस्मात् । श्रीगुरुस्वामी दत्तावधूत । बंगल्याजवळचे माळरानांत । सहज येऊनि बैसले ॥ ११ ॥
बंबसाहेबांस भृत्य सांगती । स्वामिराज आले सहज गतीं । साहेब म्हणती करा विनंती । आणा गुरूस आदरें ॥ १२ ॥
भृत्यांनीं सत्वर जाऊन । महाराजांस आणिलें पाचारून । साहेबांनीं अभ्युत्थान । दिधलें स्वामिरायातें ॥ १३ ॥ वंदिले
परात्पर सद्गुरु । समर्थ वदती कोठें मूल जोरु । ऐकूनि साहेब म्हणती काय करूं । मला कांहीं सुचेना ॥ १४ ॥
मग शीघ्र यतिपति । गेले गणेश-बागेप्रति । साहेब तेकाळीं संतापती । दुःखें विलपती अनिवार ॥ १५ ॥ तदा
पाचारिले कारभारी । नारायण वासुदेव बरवे सत्वरी । ते येऊनि पुसती प्रकृति बरी । आहे काय आपली ॥ १६ ॥
साहेब पुसती कारभाऱ्यासि । स्वामी काय बोलिले आम्हांसि । बरवे सांगती सत्यार्थासि । तेणें साहेब संतोषले ॥ १७ ॥
साहेब वदती पायाचें दुःख बरें । केव्हां होईल तें यतींद्रास विचारा बरें । जाऊनि कारभारी त्वरें । यतिपादपद्मां

वंदिती ॥ १८ ॥ गुप्तपणें कळविती चोळाप्पासि । साहेबांचे दुःखार्थ उपायासि । विचारा युक्तीनें समर्थांसि । ऐकूनि चोळाप्पा विनवित ॥ १९ ॥ करद्वय जोडूनि प्रार्थी चोळाप्पा । अहो समर्थ दयाब्धे मायबापा । दुःखी साहेबांवरी करा जी कृपा । त्रिविधतापनाशका ॥ १२० ॥ बंबगार्डन साहेब आपले । पायाच्या दुःखें त्रासले । तीन वर्षें दुःख भोगिलें । केले बहुत उपचार ॥ २१ ॥ परंतु गुण नाहीं अद्यापि । तदर्थ औषध सांगा पथ्यें सोपीं । सकल सर्वदा स्वस्तिक्षेमरूपी । असावे राजा प्रजादिक ॥ २२ ॥ तेव्हां समर्थ वदती अभय वरदहस्त । निंबवृक्षाचें खोड रक्त प्रशस्त । जलांत उगाळूनि लावितां समस्त । व्याधिविध्वंस होईल ॥ २३ ॥ क्षेमरूप आशीर्वचन । श्रवणें संतुष्ट झाले जन । निंबाचें 'रक्तखोड आणवून । गेले घेऊन कारभारी ॥ २४ ॥ साहेबांसि सांगती हें औषध घ्यावें । पाण्यांत उगाळूनि पायासि लावावें । देखूनि बंबगार्डन बरवें । कार्य झालें बोलती ॥ २५ ॥ महत्पुरुषाची सत्य वाणी । प्रासादिक मान्य जगत्कल्याणी । प्रतीतीस येतसे पूर्णपणीं । अघटित करणी थोरांची ॥ २६ ॥ मग पाण्यांत उगाळूनि तात्काळ । लाविलें पायास दोन तीन वेळ । तेणें व्याधि दुःख तळमळ । गेली समूळ लवकरी ॥ २७ ॥ पाय लंगडलेला आंखडलेला । कोणत्याही उपचारें बरा न झाला । तीन वर्षांधिक भोग भोगिला । पायामुळें बंबसाहेबांनीं ॥ २८ ॥ एवढें महादुःख वाढलेलें । परी एक दिवसांत नष्ट झालें । बंबसाहेबांसि आश्चर्य वाटलें । काय हें महत्कृत्य विलक्षण ॥ २९ ॥ हें नव्हे मानवी कृत्य । केवल ईश्वरकर्तृत्व सत्य । जैसा प्रकाशे सर्व स्थलीं आदित्य । दीपादिकांहूनि विलक्षण ॥ १३० ॥ तेव्हांपासूनि बंबसाहेबांची । दत्तात्रेयस्वामिपदीं पूर्ण विश्वासाची । दृढतर जडली भक्ति प्रेमाची । सर्वसुखदायक सर्वदा ॥ ३१ ॥ ऐसे सहज बहुत चमत्कार । जनपदहितार्थ दत्तात्रेय ईश्वर । दाविती सद्धर्म-मार्ग सुखकर । पूर्णावतारी श्रीगुरु ॥ ३२ ॥ अनंत

लीला अगम्य अतर्क्य । त्या वर्णन करणें सर्वथैव अशक्य । वर्णितां न पुरे धरणी त्रैलोक्य । तथापि यथामतीं वाक्यें वर्णूं ॥ ३३ ॥; बरवे द्विज नारायण वासुदेव । सदाचरणी शुद्ध भक्तिभाव । सत्यभाषणप्रिय सुशील स्वभाव । यथा धर्मन्यायें वर्तती ॥ ३४ ॥ सद्‌गृहस्थ साहेब-बंबगार्डन । न्याय रीति योग्य सज्जन । निःपक्षपणें अक्कलकोट संस्थान । केलें जतन जयांनीं ॥ ३५ ॥ पुरुष-प्रयत्नानें उत्तम फल । प्राप्त होतें तीं उदाहरणें पुष्कळ । जाणती प्राणिमात्र सकल । तें निरोपिलें यथामतीं ॥ ३६ ॥ जो परमानंदरूप परमेश्वर निर्मल । ज्याचे कृपें मुके होती वाचाल । पंगु लंघिती पर्वत तत्काल । तो चिरकाल वंदिजे ॥ ३७ ॥ परमेश्वर-सामर्थ्यातिशय । ज्याचे कृपें मूक होती विद्वद्वर्य । तेचि कथा परिसावी निःसंशय । विधिलेख फिरती टळती ते ॥ ३८ ॥ मन्याबा नामें मनुष्य एक । गरीब अक्कलकोटीं होता मूक । तयासि जाणती पुष्कळ लोक । मन्याबा मुका म्हणूनि ॥ ३९ ॥ श्रीमद्दत्तात्रेय-स्वामींचें दर्शन । मन्याबा नित्य घेई भक्तिश्रद्धेंकरून । उदर भरी भिक्षा मागून । दर्शनें मन शुद्ध झालेलें ज्याचें ॥ १४० ॥ श्रीगुरु दत्तात्रेय-स्वामीसमोर । टाळ्या वाजवी नाचे सुंदर । तयासि आज्ञापिती जगदीश्वर । भजन करीं रे मन्याबा ॥ ४१ ॥ मग तो मन्याबा संज्ञेनें विनवी । अहो त्रैलोक्यनाथा वाचा द्यावी । तदा स्वकरें मुख उघडून दावी । मला वाणी नाहीं म्हणून ॥ ४२ ॥ सर्वदा गुरुनामाचें सुखें स्मरण । घडावें एवढेंच, नसो इतर शब्द कारण । आपण पूर्णब्रह्म साक्षात् नारायण । प्रसन्न झाले मजलागीं ॥ ४३ ॥ मग मन्यासि उपदेशिती जगद्गुरु । तें परिसा हो सज्जन पापभीरु । ‘गुरु महाराज गुरु । जय जय परब्रह्म सद्गुरु’ ॥ ४४ ॥ ऐसा योगीश्वरमुखें गुरु-मंत्रोपदेश । होतांचि प्रकटला वाचा प्रकाश । करूं लागला भजन सावकाश । मूकत्व लयासि पावलें ॥ ४५ ॥ ऐसा चमत्कार घडला अघटित । पाहूनि

* * *

लोक जाहले आश्चर्ययुक्त । म्हणती हे जगदीश्वर खचित । जगदुद्धारार्थ अवतरले ॥ ४६ ॥ यत्कृपें मुके झाले वाचाल । पंगूंनीं उल्लंघिले पर्वत अचल । प्रत्यक्ष देखिलें प्रमाण सामर्थ्य प्रबल । पूर्णावतारिक सहज लीलें ॥ ४७ ॥ हे स्वामिराज अक्कलकोटनिवासी । उपदेश न करिती कोणासि । ऐशा मंदमतींच्या शंका-निवृत्तीसि । उघड समाधान झालें या प्रसंगीं ॥ ४८ ॥ समर्थांचें सहज संभाषण । तेंचि मंत्रोपदेश बोध दृढीकरण । त्यांतही महामंत्र महावाक्यार्थज्ञान । जगदुद्धारार्थ बोधिती तें ॥ ४९ ॥ आम्ही अज्ञानी मंदमति जड मूढ । कैसें समजावें पूर्ण ईश्वरत्व गूढ । तेचि कृपाब्धि परमहंस मानसारूढ । तिष्ठतां दृढोपदेश कां न व्हावा ॥ १५० ॥ तस्मात् त्यजूनि संशय कुतर्क । मोक्षाधिकाऱ्यांनीं निर्भयें वास्तविक । घ्यावें उपदेश-बोधरहस्य पारमार्थिक । प्रापंचिक धाक निरसूनि ॥ ५१ ॥ तें मिथ्या प्रापंचिक सकल भवभय । गुरुलीलामृत-पानें सबीज दग्ध होय । म्हणूनि श्रीगुरुलीलापान अक्षय । श्रवणपठणें अवश्य कीजे ॥ ५२ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । अष्टाविंशतिमाध्याय गोड हा ॥ १५३ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे अष्टाविंशतितमोऽध्यायः समाप्तः ॥ २८ ॥

श्रीगुरुदेवदत्त—स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय एकोणतिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुदेव दत्तदिगंबराय नमः ॥ ॥ शिष्य विनवी गुरु वक्त्यालागून । जगताचें उपादान कारण । केलें भेदसहित लक्षण । उदाहरण सांगा जी ॥ १ ॥ गुरु म्हणती शिष्या तव उत्तम प्रश्न । या प्रश्नें सहज होय जगताचें समाधान । प्रथम ‘उपादान’ शब्दार्थ विवेचन । करूनि दावूं यथामतीं ॥ २ ॥ ‘उपादीयते तत् उपादानं’ । इंद्रियाकर्षण जें तें जाण । डुदाञ्-धातु म्हणजे दान । आकर्षण इंद्रियांचें ॥ ३ ॥ कोणेका कार्याचें जें समवायी कारण । हस्तादि इंद्रियांनीं जें करणें ग्रहण । ज्या वाक्यांत ते अर्थ असती दोन । इंद्रियाकर्षण हेतु उक्ति निमित्त तें ॥ ४ ॥ आतां ‘कारण’ शब्दार्थ करा श्रवण । ‘कार्यतेऽनेनेति कारणं’ । कृति करिजे जेणें करून । तें कृञ्-धातु अर्थ करणें ऐसें ॥ ५ ॥ न्यायशास्त्रांतील ‘समवायी’ कारण । दुसरें तें ‘असमवायी’ कारण । तिसरें आहे ‘निमित्त’ कारण । कार्यसाधन-हेतुनिमित्त ॥ ६ ॥ क्रियेचें जें उद्देश्य तें आणि ज्ञानेंद्रिय । दुःख कालमान समुदाय । मूल मूलतत्त्व गायन वाद्य । विशेष पीडा नरकादिक ॥ ७ ॥ भूत भविष्य आणि वर्तमान-कालांत । उत्पत्तीस जें कारणभूत तें दैवत । कारण शब्दाचे अर्थ असती बहुत । परी येथें संक्षिप्त सांगितले ॥ ८ ॥ आतां ऐका ‘उपादान’ कारण । म्हणजे साक्षात् प्रत्यक्ष कारण । जैसें घटोत्पत्ति-स्थिति-लयासि आधारपण । मृत्तिकाचि जाणा घटकार्यास ॥ ९ ॥ कुलाल आणि दंड चक्रादिक । निमित्त कारण होय तें घटारंभक । उपादान कारण त्रिविध प्रकारात्मक । परिसा सकलिक श्रोते जन ॥ १० ॥ आनंदस्वरूप परब्रह्मापासून । निश्चयें हीं सर्व भूतें होतीं उत्पन्न । जीवंत राहती आनंदेंकरून । आणि

लीनही होती आनंदांत ॥ ११ ॥ निरंश आणि जे निरवयवी । त्या आनंदस्वरूप आत्म्याचे ठायीं पदवी । जगदुपानत्व
सिद्ध आहे वाजवी । श्रुतियुक्त-लौकिक-प्रमाणांसह ॥ १२ ॥ त्या निरंश निरवयव आत्मस्वरूपीं । आरंभ-परिणाम-
वाद न स्पर्शती कदापि । एक विवर्तचि असे उपादानरूपीं । तें दृष्टान्तें उमजेल सर्वांसि ॥ १३ ॥ जैसे घटाचे उत्पत्ति-
स्थिति-लयासि कारण । तदुपादानभूत मृत्तिकाचि आहे जाण । तद्वत् जगताचें उपादान कारण । आनंदस्वरूप ब्रह्म
असे ॥ १४ ॥ तें उपादान असे त्रिधा भिन्न जाण । ‘विवर्ति-परिणामी-आरंभिक’ अभिधान । त्यांतील प्रथम आरंभाचें
लक्षण । श्रोते सज्जन परिसा हो ॥ १५ ॥ आरंभवादी जे वैशेषिकादिक । कणाद-ऋषीचें मत सांप्रदायिक । न्याय-
शास्त्रसंबंधीं विशेष गुणबोधक । आरंभक मतवादी ऐसे ते ॥ १६ ॥ ते कार्य-कारणाचा भेद मानिती । अन्यापासून अन्याची
उत्पत्ति । जैसें तंतूपासून असून पटनिष्पत्ति । म्हणती भिन्न तंतु आणि पट ॥ १७ ॥ कार्य कारण मानूनि भिन्न ।
कार्याची अपेक्षा न ठेवी कारण । आणि कारणाची अपेक्षा कार्य ठेवित न । ऐशीं वचनें स्थापिती ॥ १८ ॥ पटाचें
उपादान कारण तंतु असतां । तथापि ते मानिती तंतु-पट-भिन्नता । त्यांत एकासि असे विरुद्ध-परिणामता । दुसऱ्यासि
विरुद्ध क्रियत्व असे ॥ १९ ॥ एक पदार्थापासून नसून । आरंभ होतसे बहुत पदार्थापासून । जैसे नैय्यायिक-मतें अनंत
परमाणु मिळुन । जगदारंभ होतसे ॥ २० ॥ म्हणून टाकूनि मतवाद खटपट । जगदुपादान परमेश्वरचि असे श्रेष्ठ ।
विवेकें पहातां मातीपासून घट । आणि तंतूपासून पट अभिन्न असे ॥ २१ ॥; आतां परिणामवाद ऐका चतुर । एकचि
वस्तूसि पूर्वावस्था-त्यागपुरःसर । अवस्था प्राप्ति होते जी इतर । त्यासीच परिणाम-वाद म्हणती ॥ २२ ॥ जैसें दुग्धाचा
परिणाम दहीं । मृत्तिकेचा परिणाम घट पाही । सुवर्णाचा परिणाम कुंडल हेंही । दृष्टांतें उघड समजावें ॥ २३ ॥ यथा
दुग्ध-मृत्तिका-सुवर्ण । पूर्व क्षीरादिव्यवहार योग्यता टाकून । दधि-घट-कुंडल परिणामासि जाण । व्यवहारयोग्यता पावती ॥ २४ ॥

तेंचि परिणामी उपादान कारण। होतसे कार्याचे समान सत्तावान्। जैसें सावयव दुग्ध दह्यांत समान। आहे ‘व्यावहारिकसत्ता’ ती ॥ २५ ॥ अथवा ‘प्रातिभासिकसत्ता’ समान। दुग्धदह्यादिकांत आहे जाण। तैसें चैतन्य आणि प्रपंचाची समान-। सत्ता नाहींच विषमसत्ता आहे ॥ २६ ॥ निरवयव आनंदात्मा चैतन्यामाजीं। ‘पारमार्थिकसत्ता’ वसतेचि सहजीं। आणि जगद्रूप प्रपंचामाजीं। व्यावहारिक-प्रातिभासिक सत्ता असे ॥ २७ ॥ यास्तव संपूर्ण जगत्प्रपंचाचें उपादान। जो आनंद-स्वरूपात्मा चैतन्यघन। तेथें आरंभ किंवा परिणामी कारण। नाहीं सर्वथा निश्चित ॥ २८ ॥ आतां ‘विवर्तोपादान’-लक्षण। यथामतीं करूं निरूपण। पूर्वावस्था ते न परित्यजून। अवस्थांतरभान ‘विवर्त’ तो ॥ २९ ॥ आरंभ-परिणाम-मतवादाहून। निर्दोष विवर्तवादचि योग्य लक्षण। आपलें वास्तव स्वरूप त्यागून। न अन्यथा प्रतीति होते जे ॥ ३० ॥ जैसें रज्जु पूर्वरज्जुस्वरूप त्यागित नसून। ते सर्परूपें होत भासमान्। तेव्हां तेंचि विवर्तवादाचें लक्षण। उदाहरणासह बोलिजेलें ॥ ३१ ॥ रज्जुआदिक सावयव आहेत। म्हणूनि निरवयव आत्मरूपीं तें न घटत। ऐशा आशंकेचें समाधान प्रशस्त। गुरु बोधिती शिष्यातें ॥ ३२ ॥ निरवयवी जे गगनादिक। यदर्थीं स्पष्ट व्हावया दृष्टांत बोलूं सम्यक्। परिसा हो श्रोते प्रापंचिक पारमार्थिक। शुद्धात्म-स्वरूप उमजावया ॥ ३३ ॥ आकाश निरवयव निर्मल असतांही। जैसें त्या विशुद्ध आकाशाचे ठायीं। गंधर्वनगर आणि नीलता प्रतीत होई। तलमालिन्य उफराटें जसें ॥ ३४ ॥ आणि जैसें बालकासि आपले मनांत। भयें दुःखद राक्षसादि होती प्रतीत। अविवेकी स्वकल्पनेनें मालिन्य आरोपित। स्वच्छ शुद्ध पदार्थीं ॥ ३५ ॥ अर्थात् सावयव अथवा निरवयव। पदार्थीं वर्ते तो विवर्त-भाव वास्तव। आनंदात्मस्वरूपीं विवर्त अवश्यमेव। अंगिकारिला ज्ञात्यांनीं ॥ ३६ ॥ शुद्ध आकाशीं जैसें गंधर्वनगर। तैसें चैतन्यस्वरूपीं कल्पित जगत्संसार। अतएव विवर्तवादचि अंगीकार। केल्यानें निःशंक ज्ञान होतें ॥ ३७ ॥ यद्यपि अद्वितीय सच्चिदानंदघन।

* * *

त्या आत्मस्वरूपीं जगत्कल्पना करणें अनुपपन्न । कल्पना हेतूचा अभाव असून । कल्पिते मायाशक्ति अनिवार ।। ३८ ।। जैसें मणिमंत्रादिरूप ऐंद्रजालिक । जी माया असे अघटित घटक । त्या माया-शक्तियोगें गंधर्वनगरादिक । शुद्ध आकाशीं कल्पिती ।। ३९ ।। ती 'अघटितघटनापटीयसी'माया । अनिर्वचनीय कल्पित मिथ्या वाया । ऐशी आहे म्हणूनि जाते लया । ब्रह्मविद्येनेंचि तात्काल ।। ४० ।।; आतां भेदत्रयांचा उपक्रम । कळावया बोलूं सुगम । जेणें प्रज्ञानानंद ब्रह्मात्माराम । ज्ञानगम्य समजेल ।। ४१ ।। म्हणून अंतःकरणाचें जें वाचक । मानस-चित्त-प्रज्ञा-हृदयादिक । त्या सर्वांत प्रज्ञा हीचि एक । अत्यंत शोभायमान् असे ।। ४२ ।। प्रज्ञा या नामांत दोन शब्द । एक 'प्र' शब्द अणि दुसरा 'ज्ञा' शब्द । त्यांत प्र-शब्दाचा अर्थ विशद । परिसा विद्वज्जन श्रोते हो ।। ४३ ।। प्रकर्ष-उत्कर्ष-आधिक्य । पुढें अग्रभागीं प्रारंभ उघडिक । अप्रतिबंध दर्शन अतिशयादिक । पराकाष्ठादि अर्थ होतसे ।। ४४ ।। येथें प्र-शब्दार्थ ऐसा मुख्य । स्वगत भेद सजातीय विजातीय । हे भेदत्रय-रहित होय । प्र-शब्दार्थ निर्णित ।। ४५ ।। तो ज्ञः– 'जानातीति ज्ञः' जाणतो जो तो । ज्ञा-धातु अवबोधन जाणणारा तो । वेदांतवेत्ता ज्ञाता ब्रह्मदेव अर्थ होतो । चंद्र बुध ग्रह मंगलादि ।। ४६ ।। येथें ज्ञा-शब्दाचा मुख्यार्थ प्रकाश । आणि प्र-ज्ञा या दोन शब्दांचा अर्थ विशेष । आनंदस्वरूप आत्मा परमेश । त्याचे ठायीं 'प्रज्ञा' शब्दार्थ घटतसे ।। ४७ ।। ज्या ज्या वस्तु आत्म्याहूनि भिन्न । त्या अनात्म जड पदार्थीं कधीं न । म्हणजे प्रज्ञा-शब्दार्थ आत्मा-चिद्घन । तद्व्यतिरिक्त पदार्थीं प्रज्ञार्थ घटत नसे ।। ४८ ।। तो समजावयासि अभिप्राय । बोलूं लक्षणसह भेदत्रय । स्वगत-सजातीय-विजातीय । वृक्षादि दृष्टांतेंकरूनि ।। ४९ ।। समान जातींच्या पदार्थांचा । जो परस्पर भेद दिसे साचा । तोचि 'सजातीय भेद' म्हणावयाचा । शास्त्रांतरीं वर्णिला जो ।। ५० ।। एकचि वृक्षाचा अन्य वृक्ष संगें भेद । जैसे वटवृक्ष आणि आम्रतरु असती स्वतःसिद्ध । तथापि वृक्षद्वयांत

असे जो भेद । तो सजातीय जाणावा ॥ ५१ ॥ अथवा एक ब्राह्मणाचा भेद । दुसऱ्या ब्राह्मणासंगें आहे विशद । आणि ब्राह्मणत्व जाती निर्विवाद । दोन्ही विप्रांत समान असे ॥ ५२ ॥ याशीच 'सजातीय भेद' म्हणती । तो देखील न स्पर्शे आत्मयाप्रति । कारण आत्म्याचे समान द्वितीय जाती । आत्मा नाहीं म्हणून ॥ ५३ ॥ अद्वितीयात्मा आणि विरुद्ध जातीच्या पदार्थांचा । परस्पर जो भेद दिसे साचा । तो 'विजातीय भेद' जाणावयाचा । अनेक ग्रंथांत प्रतिपादित जो ॥ ५४ ॥ जैसें वृक्षाहूनि केवळ भिन्न । असती मृत्तिका शिला पाषाण । त्याचेंचि आहे नामाभिधान । विजातीयभेद ऐसें ॥ ५५ ॥ अथवा ब्राह्मण आणि क्षत्रियांचा । परस्पर जातिभेद आहे साचा । ब्राह्मण क्षत्रियत्व दोंही भिन्न जातींचा । एकाधिकरणांत वास नच होय ॥ ५६ ॥ परस्पर-विरुद्धता असे । म्हणून विजातीय भेद आत्मरूपीं न गवसे । कारण आत्म्याहूनि भिन्न नसे । कोणतीही वस्तु शिष्या ॥ ५७ ॥ यद्यपि अनात्म जड दृश्य जगत् । तें आत्म्याहूनि भिन्न विजातीय असत । तथापि कल्पित प्रपंचानें सिद्ध नसे होत । विजातीय भेद आत्मस्वरूपीं ॥ ५८ ॥ आणि समान सत्तावान् पदार्थ । तोचि भेदाचा संपादक होत । आपुल्याठायीं भेद असे जो स्थित । तोचि स्वगतभेद जाणावा ॥ ५९ ॥ जैसा एकाच वृक्षाचा भेद जो स्वगत । शाखा-पत्र-फलपुष्पादिसहित । म्हणजे वृक्षाचे अवयवांचा भेद म्हणिजेत । 'स्वगत भेद' या नामेंकरूनि ॥ ६० ॥ अथवा एकाचि शरीरांत । हस्त-पादादिकांचा जो परस्पर भेद असत । हाचि स्वगत-भेद जाणिजेत । त्याचा शुद्धात्मस्वरूपीं स्पर्शचि नसे ॥ ६१ ॥ कारण हा स्वगत भेद सावयव । पदार्थांत होतसे अभिनव । आणि आत्मा आहे केवल निरवयव । म्हणूनि त्यासि अभाव भेदाचा ॥ ६२ ॥ याप्रकारें भेदत्रय रहित । स्वप्रकाशात्मा विराजे सर्व भेदातीत । प्रज्ञा आणि प्रज्ञान शब्दार्थ एकचि होत । आनंदस्वरूप परमात्मा ॥ ६३ ॥ ब्रह्मादिस्थावरान्त पर्यंत । आत्मा व्यापक असे सर्व शरीरांत । जैसा संपूर्ण काष्ठामाजीं सतत ।

अग्नि स्थित असतसे ॥ ६४ ॥ किंवा घटाची उत्पत्ति-स्थिति-लय । त्या कारणरूपी मृत्तिकेंत होय । वाचारंभण मात्र घट विकार नामधेय । मृत्तिकाचि कारण सत्य असे ॥ ६५ ॥ जैसें घटाचें मृत्तिका उपादान कारण । तैसें जगदुत्पत्ति-स्थिति-लयासि जाण । आत्मा एक उपादान कारण । सच्चिदानंद स्वामी समर्थ असे ॥ ६६ ॥ ऐसा वेदप्रतिपादित परमात्मा अखंड । ज्याचे ईक्षणें उभारे ब्रह्मांड । त्या हृदयस्थासि स्वानुभवूनि उदंड । तरले प्रचंड भवसागर ॥ ६७ ॥; प्रसिद्ध श्रीकाशीक्षेत्रीं । एक वसत होते बहिरे शास्त्री । स्वधर्मरत उभयतां पुरुष स्त्री । तें कथानक परिसावें ॥ ६८ ॥ तयांसि बहुत वर्षें पुत्रसंतान । नव्हतें तें झालें विश्वेश्वरकृपेंकरून । ते बहिरे शास्त्री विद्वान् असून । करविलें गणित जातक पुत्राचें ॥ ६९ ॥ ज्योतिष जातक-शास्त्रानुसार । जन्मपत्रिकेंत फल निर्धार । अमुक वर्षीं मास तिथि प्रहर । त्यावेळीं पुत्र पंचत्व पावेल ॥ ७० ॥ अल्पायुषी त्या पुत्राचें भाकित । जाणूनि शास्त्री बैसले चिंताक्रांत । म्हणती व्रतबंधादिक संस्कारयुक्त । कैसें होईल बालक हें ॥ ७१ ॥ तेथें एक सत्पुरुष वसती भले । मंत्रशास्त्र-निष्णात सदाचारी चांगले । तयांसि शास्त्रीबुवांनीं पुसिलें । जन्मपत्रिका दावूनि ॥ ७२ ॥ ते साधु जाणती भविष्य ज्ञान । आणि निरुपाधिक वैराग्यवान् । त्यांनीं पत्रिका साद्यंत विचारें पाहून । योग्य उपाय कथियेला ॥ ७३ ॥ साधु म्हणे साधनें सकल । तुमचे कार्यांत होतील निष्फल । परी महात्मा अवतारिक दर्शनें केवल । पुत्र आयुष्मान् होईल ॥ ७४ ॥ मग शास्त्री वदती साधूसि । ऐसे पुरुष आतां कलियुगांत कोठें असती । तेव्हां मांत्रिक शास्त्रीबुवासि कथिती । चरित्र स्वानुभविक तें ॥ ७५ ॥ या युगीं अवतारिक पुरुष आज । अखंडचिंतामणि कल्पद्रुम-भक्तकाज । पूर्णब्रह्मस्वरूप श्रीस्वामिमहाराज । अक्कलकोटीं विराजती ॥ ७६ ॥ तेथें जाऊनि करा हो सेवा । याविषयीं संशय मुळींच नसावा । नंतर नमूनि उठले शास्त्रीबुवा । विचारूनि

सुमुहूर्त ॥ ७७ ॥ स्त्रीपुत्रांस घेऊन शास्त्री । पातले अक्कलकोटनगरीं । नारायणभट हर्डीकराचे घरीं । राहूनि घेती गुरुदर्शन ॥ ७८ ॥ नित्य श्रीमद्दत्तात्रेय-स्वामिदर्शन । श्रीगुरुचरित्र-ग्रंथाचें पठण । करीत होते सदाचारसंपन्न । तों अपूर्व वर्तलें ॥ ७९ ॥ पुत्राचा मरणकाल समीप आला । तेव्हां पुत्र अकस्मात् मूर्च्छित पडला । स्वामीसमर्थ सांगती शास्त्रीबुवाला । तीळ आणावे सत्वर ॥ ८० ॥ हें गुरुवचन ऐकूनि सर्वांसि । तीळ शब्दें भय वाटलें मानसीं । मग यतीश्वर वदती द्विजासि । शर्करायुक्त तीळ खावे ॥ ८१ ॥ श्रीआज्ञेनुसार बालमुखांत । तीळ घातले शर्करायुक्त । त्यावरी एकाच घटिकेंत । द्विजपुत्र सावध जाहला ॥ ८२ ॥ मृतावस्थेंतून उठविलें बालका । पाहूनि आश्चर्य वाटलें सर्व लोकां । मग प्रार्थिती कालाच्याही कालांतका । यतींद्रनायका परमेश्वरा ॥ ८३ ॥ द्विजसुताचा गेलेला श्वास । परी समर्थांचा पूर्ण विश्वास । जो मूलाधार पालक या विश्वास । तत्कृपें सजीव पुत्र झाला ॥ ८४ ॥ लहान बाल परी बुद्धिमान् । श्रीसमर्थांस करद्वयीं करी नमन । अमृतरूपीं बालभाषण । मंदगतीं वदून तोषविलें ॥ ८५ ॥ प्रज्ञापुरीं चार संवत्सर । बहिरे शास्त्री राहिले सहपरिवार । स्वामिराज अदृश्य झाल्यावर । गेले वाराणशीस सदनीं ते ॥ ८६ ॥ पुढें ते शास्त्री कैलासवासी । झाल्यावरी चिरंजीव विद्वान् प्रतिष्ठेसी । सदाचारी चढले नांवलौकिकासी । यति योगीश्वरप्रसादें ॥ ८७ ॥; आतां प्रतिष्ठान नामक क्षेत्रींचे । राहणारे गृहस्थ विदुर जातीचे । नथुराव नामें शेखदारीचे । कामावर होते धीपुरीं ॥ ८८ ॥ त्याकालीं श्रीमंत मालोजी भोंसले । नृपति शूर निःपक्ष न्यायी चांगले । राज्य करित होते आपलें । सुखदायक प्रजेसि ॥ ८९ ॥ तेव्हां सत्तावान जे कोणी त्यांनीं । खजिन्यांतून गुप्तपणें द्रव्य घेतलें काढूनि । ऐसा नथोबावर आरोप आणूनि । त्रासविलें विनास्वार्थ ॥ ९० ॥ नथोबा भोळा निष्कपटी सात्त्विक । कौटिल्य ज्यासि नाहीं ठाऊक । रीति न्यायें जमाखर्च चोख । ठेवी शिल्लक बरोबर ॥ ९१ ॥ परधन आणि परनारीस । स्पर्श न करी धरूनि

धर्ममार्गास । ऐसें असतां फसवून नथोबास । दिधला त्रास अतिशय ॥ ९२ ॥ ‘नाऱ्याचें प्रायश्चित गोंद्याला । तुका उजवला आणि नागू नागवला’ । ऐशा म्हणीप्रमाणें नथोबाला । घडला दुर्घट प्रसंग ॥ ९३ ॥ या घोर कलिरायाच्या युगांत । दुःखी होती सत्यवादी साधु संभावित । त्यांहून इतर जे ते यथास्थित । सुख भोगिती सर्व प्रकारें ॥ ९४ ॥ सत्यजनांचा होत छल विरोध । असत्यासि मान धन मिळे अबाध । सत्य असतांही अपराध । अपराधी सुटूनि निरपराधी गुंतती ॥ ९५ ॥ असो मालोजी नृपति गुरुवारीं । दत्तात्रेयस्वामि-दर्शनासि झडकरी । पातले पेठेंत जनहितकारी । नमस्कारिती योगीश्वरा ॥ ९६ ॥ संगें दाजी पिराजी भोंसले । नमूनि श्रीगुरूसि प्रार्थियलें । काय आज्ञा आहे आम्ही आपले । दास लेंकरें चरणांचीं ॥ ९७ ॥ तंव बोलती श्रीगुरु नृसिंहमुनि । खजीना पहा रे मोजूनि । विनापराध कोणासि जाचणी । करणें तें पातक होतसे ॥ ९८ ॥ श्रीसमर्थवाक्य परिसूनि भूपति । अन्याय क्षमा करा ऐसें विनविती । मग नृपवर्य दाजीबास आज्ञापिती । अशींच कामें शोधितां कां ॥ ९९ ॥ नंतर दुजे दिनीं दोन प्रहरीं । भूपाल आणि सर्व अधिकारी । मोजिती खजीना झडकरी । समक्ष हिशेब पाहूनि ॥ १०० ॥ जमाखर्च हिशेबाप्रमाणें । शिलकेचा मेळ मिळाला सत्यपणें । न्यूनाधिक कांहीं नव्हतें तेणें । शिल्लक हिशेबीं बरोबर होती ॥ १ ॥ सकलांसि आश्चर्य वाटलें । आणि नृपवर्याच्या मनांत बिंबलें । कीं निजहित साधूनि गरिबास छळिलें । विनाकारण कपट्यांनीं ॥ २ ॥ कपटी अनृत कृत्यें बाहेर पडलीं । तेव्हां ते कपटी मुखें घालिती खालीं । मग नथोबासि आणिलें तात्कालीं । बंधनमुक्त करूनियां ॥ ३ ॥ मालोजीराय सांगती तयासि । तुम्ही पूर्ववत् लागावें कामासि । नथोबा प्रार्थी महीपालासि । पुरे आतां चाकरी नको ॥ ४ ॥ दयालोभ असावा मजवरी । म्हणूनि निघाला झडकरी । जेथें होते त्रैमूर्तिरूप अवतारी । प्रणतदीनभक्तवत्सल ॥ ५ ॥ तेथें जाऊनि करी साष्टांग प्रणाम । चरणीं मस्तक ठेवूनि सप्रेम । प्रार्थीतसे पूर्णब्रह्म

परंधाम । अहो निगमागमकीर्तित ॥ ६ ॥ आपणांवांचूनि त्रैलोक्यांत । कोणी नाहीं त्राता खचित । समर्थांच्या कृपेनें दोषमुक्त । झालों सुटलों वृद्धपणीं ॥ ७ ॥ पुढें पूजा नैवेद्य समाराधन । श्रद्धाभक्तिसमन्वित करून । दत्तात्रेयगुरु आज्ञा प्रसाद घेऊन । गेला पैठण-क्षेत्रांत ॥ ८ ॥ पैठणांत राहूनि आनंदांत स्वस्थ । दत्तात्रेयासि आराधित नथु सत्त्वस्थ । सत्यवादी भगवद्भक्त गृहस्थ । सकीर्ति गातसे योगीश्वरांची ॥ ९ ॥ त्याचे प्रसिद्ध चिरंजीव । नाम जयाचें शंकरराव । ते परिवारासह शुद्धभाव । असूनि धीपुरीं येत होते ॥ ११० ॥ अक्कलकोटीं प्रेमें येऊन । दत्तात्रेयस्वामींचें नित्य दर्शन । पूजा नैवेद्य विप्रसंतर्पण । करित होते उदारत्वें ॥ ११ ॥ त्यांच्या संकट प्रसंगीं धांवून । योगिराज करित होते संरक्षण । त्यांनीं पुत्राचें मौंजीबंधन । अक्कलकोटींच केलें तें ॥ १२ ॥ श्रीसमर्थांच्या नैवेद्यास सतत । द्वादश संवत्सरपर्यंत । स्वल्प धन यथाशक्तीं होते अर्पित । शंकरराव विदुर ते ॥ १३ ॥ अक्कलकोटीं असतां स्वामिराजमाउली । शके सत्राशें अठ्याणवाचे सालीं । दुष्काळामुळें महर्गता फार झाली । धान्य आणि उदकाची ॥ १४ ॥ श्रीमद्दत्तजयंतीचा उत्साह तेव्हां । भोजन-समारंभ मोठा कैसा व्हावा । पंचासि विचार पडला जेव्हां । मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमेस ॥ १५ ॥ मेहेदर्गीहून स्वामिराय आले । पेठेंत प्रमुखस्थानीं स्थित झाले । पंचांसि धिक्कारूनि वदती चांगलें । पुष्कळ मंडळी जेवितील ॥ १६ ॥ मग दुसरे दिवशीं शंकरराव विदुर । आणि एक येऊनि सावकार । दत्तजयंतीचा उत्साह झाला थोर । सहस्त्रावधि नारीनर जेविले ॥ १७ ॥ इतरही देवस्थानालागीं । शंकरराव पडले फार उपयोगी । उदार धीर भक्तभजनरंगी । समर्थांचे सेवक असती ॥ १८ ॥ प्रसिद्ध क्षेत्र गोदातटीं पैठण । जेथें एकनाथमहाराजांचें संस्थान । भक्तीनें श्रीखंड्या आदि नारायण । घटोदकें रांजण भरी स्वयें ॥ १९ ॥ शंकरराव विदुर त्या क्षेत्रांत । नांदे कन्या-पुत्र-पौत्रयुक्त । दत्तात्रेय-गुरुलीला अनंत । दावूनि उद्धरिती जगातें ॥ १२० ॥; एक

गुजराथी नागर ब्राह्मण । नारायणदास त्याचें नामाभिधान । मोगलाई प्रांतीं बीड पत्तन । त्या स्थलीं वर्ततसे ॥ २१ ॥ तेव्हां कोणीएक सात्त्विक ब्राह्मण । वेदशास्त्राभ्यासीं निपुण । जयाचें निर्मलान्तःकरण । तीर्थाटन करितसे ॥ २२ ॥ तो हिंडत हिंडत नारायणदासाचे घरीं । येऊनि बैसला सदाचारी । देव-तीर्थ-माहात्म्य वर्णन करी । महात्मा अवतारिक पुरुषांचें ॥ २३ ॥ विप्र वदे एक अवतारिक पुरुष । जितेंद्रिय थोर निवृत्ततर्ष । गलिताहंकार-हर्षामर्ष । केवल निर्दोष यतीश्वर ॥ २४ ॥ ते महा योगीश्वर सांप्रत । विराजती अक्कलकोट राजधानींत । अंतर्साक्षी ईश्वर साक्षात् । तयांचें अपूर्व दर्शन मज झालें ॥ २५ ॥ सत्कीर्ति परिसूनि गुर्जर । नारायणदास उन्मत्त निष्ठुर । उपहास करी वारंवार । अहंकारयुक्त दुरात्मा ॥ २६ ॥ या कलियुगीं साधु संत संन्यासी । उदरनिमित्त फिरती आळशी । चमत्कार दाविती लोकांसि । ते कशाचे अवतारिक ॥ २७ ॥ तदा ब्राह्मण वदे विनाकारण । महापुरुषाचें न करणें हेळण । निंदेचें महापातक जाण । निंदकपण नसावें कधीं ॥ २८ ॥ याप्रकारें बोलून द्विजवर । गेला निघूनि अतिसत्वर । तेव्हां नारायणदासाची स्त्री गरोदर । नवमास पूर्ण झालेली ॥ २९ ॥ प्रसूतीचें होऊनि सर्व लक्षण । प्रसूति न होतां अडचण । प्रसंग येई तुल्यमरण । याहूनि अधिक वेदना ॥ १३० ॥ ऐशीं संकटें वारंवार । येतां अष्टादश मास झाले भरपूर । प्रसूतिप्रसंग नको दुर्धर । स्त्री म्हणे देवा मरण देईं ॥ ३१ ॥ पाहूनि स्त्रीदुःख-व्याकुलता । गुर्जर विप्रासि उद्भवली चिंता । व्यापार धंदा नावडे चित्ता । म्हणे उपाय काय करूं ॥ ३२ ॥ मला अनुकूल सर्व व्यवहार । मी या शहरांत नामांकित सावकार । प्रथम संततीचा हा मृत्युकर । ऐसा प्रकार कां होतो ॥ ३३ ॥ घरांत कोणी वृद्ध मनुष्य पोक्त । नसे म्हणूनि चिंताक्रांत । म्हणे मजवरी कोपले भगवंत । दत्तावधूत-स्वामिराज ॥ ३४ ॥ जिरविली माझी उन्मत्त खोड । मी दुष्ट निंदक पापी द्वाड । दीड वर्ष होऊनि गेलें तरी तरफड । प्रसूति अद्यापि होत नसे

॥ ३५ ॥ आपलेंचि कृत्य हें देवराया । अनन्य शरण झालों तव पायां । क्षमा करा जी ममान्याया । पापियातें
उद्धरावें ॥ ३६ ॥ शरणागतासि मरण । न चिंतावें नारायण । प्रणतवत्सला ब्रीद-संरक्षण । आपुलें आपण करावें
॥ ३७ ॥ वत्सालागीं जैशी धेनु येई धांवत । तैसें होऊनि कृपावंत । धांवा धांवा हो करा संकटमुक्त । किती अंत
पाहतां ॥ ३८ ॥ पुत्राचे अनेक अपराध मनीं । तयाचा खेद माता न मानी । तैसे आपण जगज्जनक जननी । अपराधगणना
करूं नये ॥ ३९ ॥ तेव्हां कळवळले कारुण्यघन । अतीताचा वेष धारण करून । नारायणदासाचे गृहीं येऊन ।
उभे राहिले तेजस्वी ॥ १४० ॥ नारायणदासासि बोधिती । यात्रेकरू ब्राह्मण तव गृहाप्रति । येऊनि वर्णितां सत्कीर्ति ।
कां रे त्यांसि क्षोभविलें ॥ ४१ ॥ परिसूनि अतीताचें भाषण । नारायणाचे मनीं पटली खूण । म्हणे अंतर्साक्षी सर्वज्ञ
आपण । जाणिलें सकल वृत्त तें ॥ ४२ ॥ त्या काळीं तेथें विप्र वैदिक विद्वान । गृहस्थ आणि इतर जन । परिसूनि
कौतुक वर्तमान । विनविती अतीत साधूसि ॥ ४३ ॥ म्हणती कोणत्या साधनें प्रसूति । होईल तें सांगावें निश्चितीं ।
अतीत वदे परिसा युक्ति । गरज असेल तरी करा ॥ ४४ ॥ अक्कलकोट ग्रामीं जाऊन । रुद्राभिषेकें ब्राह्मण भोजन ।
सहस्र रौप्य-मुद्रिका खर्चून । करावें पुत्रप्राप्त्यर्थ ॥ ४५ ॥ मग नारायणदास बोलत । जर आज अस्तमानकालपर्यंत ।
प्रसूति होईल पुत्र प्राप्त । तरी हें खचित करीन मी ॥ ४६ ॥ तों अतीत कोठें दिसेना । तेव्हां आश्चर्य वाटलें
सर्व जनां । नंतर प्रसूतिकाल वेदना । होऊं लागल्या स्त्रियेसि ॥ ४७ ॥ जाहला सूर्य-अस्तमान । तदा दत्तात्रेयस्वामिकृपें
निर्विघ्न । प्रसूति होऊनि पुत्रसंतान । झालें आनंदकारक ॥ ४८ ॥ लौकिक नामकरणादिक । गुर्जर विप्रें करविलें
जातक । मुलास ग्रह इष्ट सौख्यकारक । ऐसें गणक सांगती ॥ ४९ ॥ पुत्र होऊन चार पांच मास । गेले तथापि नारायणदास ।
जाईना धीपुरीं दर्शनास । तेव्हां काय वर्तलें ॥ १५० ॥ गुर्जरपत्नीसह तान्हयास । चैन पडेना कांहीं दिवस ।

म्हणूनि गुर्जरपत्नी उपवास । करूं लागली गुरुवार ॥ ५१ ॥ तेव्हां स्त्री वदे पतीस । काय करूं तुमच्या कृपण स्वभावास । प्रज्ञापुरीं जावया देवदर्शनास । तुम्हांसि बुद्धि कां न होई ॥ ५२ ॥ नारायणदास झाला मदांध । कांतेसि गालिप्रदानें नानाविध । अर्पी अन्यांसिही विरुद्ध । वेड्यासारिखा जाहला ॥ ५३ ॥ नारायणदासासि चित्तभ्रम झाला । तेणें वस्त्रें चिंध्या फाडूं लागला । उकीरड्यांत निर्लज्ज लोळूं लागला । अमर्याद शब्दें बोलतसे ॥ ५४ ॥ तेव्हां त्याच्या जननीसह कारकून । पूर्वोक्त पोक्तपणें विचार करून । सहकुटुंब परिवारें निघून । अक्कलकोटीं पातले ॥ ५५ ॥ तेव्हां पेठेंत विरूपाक्ष मोदीच्या गृहांत । स्वामी समर्थ होते स्थित । तेथें परिवारासह गुर्जर उन्मत्त । उभे ठाकले दर्शनार्थ ॥ ५६ ॥ विलोकूनि भ्रमिष्ट गुर्जर विप्रासि । श्रीसमर्थ वदती कां रे माजलासि । आणखी पाहिजे काय तुजसि । शिक्षा दंड भोगणें ॥ ५७ ॥ चार मास येथें राहिल्याविण । बरा न होशी रे विप्रा नारायण । मग सगळे समर्थ आज्ञा प्रमाण । मानूनि राहिले सेवेंत ॥ ५८ ॥ चतुष्टय मास गेल्यावरी । गुर्जर विप्राची प्रकृति झाली बरी । निभ्रांत आरोग्य झाल्यावरी । रुद्राभिषेक करविले ॥ ५९ ॥ ब्राह्मणभोजन यथासांग । आणि सुवर्णालंकार चांग । करवूनि अर्पिले अव्यंग । श्रीगुरुदत्तात्रेय-स्वामींसि ॥ १६० ॥ पुत्रासि घालूनि प्रभुपायांवरी । साष्टांगें नमूनि शरण आदरीं । प्रार्थिती सगळे निरहंकारी । लीलाधारी जगद्गुरूतें ॥ ६१ ॥ आम्ही अपराधी सर्वस्वीं । आपण प्रत्यक्ष परमेश्वर तेजस्वी । दुःखें निवारूनि आम्हां केलें यशस्वी । आनंद मनस्वी पुत्र देऊनि ॥ ६२ । अहो अनंतकोटि-ब्रह्मांडनायका । सत्ता-स्फूर्तित्वें सर्वप्रकाशका । सर्वांतर्यामी अद्वितीय नियामका । विश्वव्यापका यतीश्वरा ॥ ६३ ॥ ऐसें जयजयकारें कीर्ति गात । गुर्जरमंडळ गेलें बीड ग्रामांत । सुखें नांदती सेविती अखंडित । दत्तात्रेय-स्वामिचरणांसि ॥ ६४ ॥ त्या प्रभूची लीला अपार ।

सहज श्रवणें मनेप्सित प्राप्त निरंतर । भक्तवत्सल कृपासागर । पूर्णावतार लीलाविग्रही ॥ ६५ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । नवविंशतितमाध्याय रसिक हा ॥ १६६ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे नवविंशतितमोध्यायः समाप्तः ॥ २९ ॥ श्रीगुरुदेवदत्त—स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय तिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त—स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्तदिगंबराय नमः ॥ ॥ शिष्य प्रार्थित गुरु वक्त्यासि । शुभेच्छा उद्भवली मम मानसीं । कीं देशकालवस्तु-परिच्छेदासि । श्रवण करावें गुरुमुखें ॥ १ ॥ गुरु सांगती परिच्छेदत्रय । तव प्रश्न लोककल्याणार्थ होय । म्हणून वेदोपनिषदांतील रहस्य । सावधानें परिसावें ॥ २ ॥ ऋग्वेदी ऐतरेय उपनिषद । त्यामाजीं गुरु-शिष्याचा संवाद । त्यांतील अधिकाऱ्याचें लक्षण शुद्ध । प्रथम निरूपितों कळावया ॥ ३ ॥ पठण केले आहेत वेद ज्यानें । आणि वेदार्थ सांगितला जो गुरूनें । त्या अर्थ-धारणेंत बुद्धि समर्थतेनें । आहे ज्यांची निरालस्य ॥ ४ ॥ एकाग्र चित्तें गुरु-शुश्रूषण । नित्य करिती गुरुमुखें वेदांतश्रवण । गुरुकृपायुक्त झालें मन । ऐसे असती मुमुक्षु जे ॥ ५ ॥ ते पंच प्रकारच्या भेद-ज्ञानेंकरून । जगत् भयासि पावलें देखून । एके कालीं विचार करिती धीमान् । भयरूप जगताच्या हितार्थ ॥ ६ ॥ त्यांत प्रथम जीव-ईश्वराचा भेद । दुसरा असे जीवांचा परस्पर भेद । तिसरा जीव-जडांचा भेद । ईश आणि जडाचा भेद चवथा ॥ ७ ॥ जड-जडांचा भेद पांचवा । ऐशा पंचभेदांचा स्वरूप विचार परिसावा । अति कष्ट संपूर्ण देहधारी जीवां । असती संसार-शूलांत ॥ ८ ॥ या संसाररूप शूलेंकरून । जन्ममरण-दुःखासि पावती जन । त्या भेदरूप संसार-शूलाचें लक्षण । श्रवण करावें उमजावया ॥ ९ ॥ कामक्रोधादिरूप काकांचा वास । आहे संसार-शूलामाजीं विशेष । आणि स्त्रीरूप वृकीनें सुखास । प्राप्त झालेला शूल हा ॥ १० ॥ यद्यपि स्त्री वृकी या शूलाचें सुखाचें । कारण नसूनि उलटे असे दुःखाचें ।

तथापि जैसे मार्ग चालणाराचे । श्रम-परिहार व्हावया ॥ ११ ॥ त्यासि जैसा लत्तापादांचा प्रहार । दुःखासि कारण असूनि फार । आवडे वाटे श्रम-परिहार । सुखासि कारण पथिकासि ॥ १२ ॥ तैशी विषयीं प्रीति असे ज्याची । त्यासि दुःखरूप स्त्री असूनि लागे सुखाची । ऐशा भेदरूप संसार-शूलाची । सर्वांसि भीति वाटतसे ॥ १३ ॥ हा संसाररूप शूल अति तीक्ष्ण । अज्ञानरूप लोह असे ज्याचें कारण । आणि रज-तम-सत्त्व हे तीन गुण । शिखा शोभती जयाच्या ॥ १४ ॥ ऐशा संसाररूप शूलाची भीति । संपूर्ण देहधारी जीवांसि कां वाटे ती । या शिष्य-प्रश्नाचें उत्तर देती । गुरु दयालु सप्रमाण ॥ १५ ॥ शिष्या कामक्रोधादि काकांचा निवास । तथा स्त्रीरूप वृकीचा असे वास । ऐशा संपूर्ण संसाररूप शूलास । परमेश्वर-मायेनें उभविलें ॥ १६ ॥ ती माया आत्मज्ञानें निवृत्त झाल्यावरी । त्या मायेचें कार्य जो संसारशूल भारी । त्याचीही सहज समूल निवृत्ति होते निर्धारीं । जैसा तंतुनाशें पट नष्ट होय ॥ १७ ॥ माया आणि अज्ञान हे दोन्ही शब्द । एकाचि अर्थाचे वाचक असती अविरोध । जैसे घट आणि कलश हे दोन्ही शब्द । एकार्थवाचक आहेत ॥ १८ ॥ शिष्य म्हणे ज्ञानें अज्ञाननिवृत्ति । आपण कथिली ते न घडे कल्पांतीं । कारण घटपटादि पदार्थ-ज्ञान असून जगतीं । न जाय अज्ञान कोणाचें ॥ १९ ॥ मग गुरु वदती शिष्यालागून । वेदांत-उपनिषदार्थ-श्रवणेंकरून । उत्पन्न झालेलें जें महावाक्यजन्य ज्ञान । तेंचि अज्ञानाचें निवर्तक असे ॥ २० ॥ त्या ब्रह्मज्ञानाहूनि भिन्न जेवढें ज्ञान । तें संपूर्ण जाणावें अज्ञान । म्हणूनि शिष्या त्या अज्ञानात्मज्ञानेंकरून । अज्ञाननिवृत्ति न घडेचि ॥ २१ ॥ जैसें सन्निपात-भ्रमेंकरून । बडबडे जे भेरीनाद होती श्रवण । त्या भ्रांतिज्ञानासि कोणीही जन । यथार्थ नाहीं मानित ॥ २२ ॥ म्हणूनि वेदांतमहावाक्येंकरून । आणि गुरुमुखें वाक्यार्थाचें श्रवण । त्या श्रवण-मननें झालेलें जें ब्रह्मज्ञान । त्या ज्ञानेंचि मोक्षप्राप्ति होते ॥ २३ ॥ यास्तव त्यागूनि संसार शूलरूप । आणि ब्रह्मप्राप्तिरूप जो मुक्तिमंडप । त्या मुक्तिमंडपांत येऊनि

आत्मस्वरूप । परिच्छेदरहित ओळखावें ॥ २४ ॥ ते परिच्छेदत्रय परिसा विशद । ‘देशपरिच्छेद’ आणि ‘कालपरिच्छेद’ । तिसरा असे ‘वस्तुपरिच्छेद’ । ऐका लक्षण तयांचें ॥ २५ ॥ प्रथम घटादिक अनात्म-पदार्थीं । देशपरिच्छेद-लक्षण दाखविती । अत्यंत-अभावाच्या प्रतियोगीपणाप्रति । म्हणती देशपरिच्छेद ॥ २६ ॥ भूमीवरी येथें असलेल्या घटाचा । अन्य ठिकाणीं अत्यंताभाव साचा । म्हणजे येथील घट इतर स्थलीं नसावयाचा । तोचि या घटाचा अत्यंताभाव ॥ २७ ॥ त्या अत्यंताभावाचा प्रतियोगीपणा । त्या घटामाजीं आहे जाणा । त्याचेंचि नाम देशपरिच्छेद हे शिष्यराणा । आहे ऐसें समजावें ॥ २८ ॥ गो-व्यक्तिरूप एकदेशीं जैसें । गोत्व जाती राहतसे । ते अश्वादिकांच्याठायीं न वसे । हा देशपरिच्छेदाचा दृष्टांत जाणावा ॥ २९ ॥ तैसा परमात्मा एकदेशीं नाहीं स्थित । सर्वत्र पूर्णव्यापक आहे अखंडित । जर परमात्मा कोणत्या एकही देशांत । नाहीं ऐसें म्हणाल ॥ ३० ॥ तरी या शंकेचें शास्त्रोक्त समाधान । परिसा हो भले श्रोतेजन । परमात्म-सत्ता-प्रकाशावांचून । सगळे पदार्थ निरुपयोगी ॥ ३१ ॥ अमुक देशांत नाहीं परमेश्वर । मग त्या देशांतील पदार्थांचा जर । सत्ता-प्रकाश नाहीं होणार । तरी व्यवहार कैसा चालेल ॥ ३२ ॥ मग होईल अव्यवस्थित प्रसंग । जड देशीय पदार्थांची ओळख साङ्ग । सत्ता-प्रकाशावांचूनि अव्यंग । होणार नाहीं सर्वथा ॥ ३३ ॥ सर्व शरीरीं प्राण आणि इंद्रियादिक । यांचा कोणी नसतां नित्य नियामक । व्यवहार न चाले क्षणमात्र एक । चैतन्याविण जडाचा ॥ ३४ ॥ म्हणूनि सत्ता-स्फूर्तित्वें प्रकाशक । सर्वत्र सर्वदा आहे व्यापक । तेथें देशपरिच्छेदाचा अभाव देख । असेचि निःसंशय निश्चित ॥ ३५ ॥; प्रागभाव आणि प्रध्वंसाभावांचा । प्रतियोगीपणा तो ‘कालपरिच्छेद’ साचा । जैसें घटोत्पत्तीपूर्वीं कपालांत घटाचा । ‘प्रागभाव’ राहतसे ॥ ३६ ॥ आणि घटाचा नाश झाल्यावरी पाहे । कपालांत घटाचा ‘प्रध्वंसाभाव राहे’ । त्या दोन्ही अभावाचा प्रतियोगीपणा पटांत आहे । त्याचेंचि नाम ‘कालपरिच्छेद’ ॥ ३७ ॥ जैसें भूत-

भविष्य-वर्तमान कालांत । पदार्थ असती जे जे अगणित । ते सर्व पदार्थ कोणत्या कालीं असतात । आणि कोणत्या कालीं नसतात ॥ ३८ ॥ म्हणूनि ते सर्व पदार्थ जड-जात । असती 'कालपरिच्छेदयुक्त' । तैसा आत्मा असे कोणत्या एक कालांत । आणि कोणत्या एका कालीं नसतसे ॥ ३९ ॥ ऐसा भावचि नाहीं म्हणून सर्वत्र । सर्वकालीं परमेश्वर स्वामी स्वतंत्र । व्यापक असे त्रिकालाबाध्य विचित्र । तेथें कालपरिच्छेद नसेचि ॥ ४० ॥; तिसरा 'वस्तुपरिच्छेद' करा श्रवण । अन्योन्याभावाचें प्रतियोगीपण । त्याचें नाम वस्तुपरिच्छेद असे जाण । ते उदाहरणासह परिसावें ॥ ४१ ॥ जैसें पट तो घट नसे । या रीतीं घटाचा अन्योन्याभाव पटीं भासे । त्या अन्योन्याभावाचें प्रतियोगित्व घटीं असे । तो वस्तुपरिच्छेद जाणावा ॥ ४२ ॥ जैसें 'अस्ति' या शब्दाचा । आणि 'अस्ति' या ज्ञानाचा । विषय जो भूमि त्या भूमीचा । घटाहूनि भिन्नपणा असे ॥ ४३ ॥ आणि 'नास्ति' या शब्दाचा । आणखी 'नास्ति' या ज्ञानाचा । विषय जो वंध्यापुत्र त्याचा । घटासि भिन्नपणा असे ॥ ४४ ॥ म्हणूनि घटादिक वस्तु समस्त । असती परिच्छेदयुक्त । केवळ व्यतिरेकी जड नाशिवंत । दृश्य मिथ्याभूत असती त्या ॥ ४५ ॥ तैसें अस्ति-नास्ति या शब्दांचा । आणि अस्ति-नास्ति या ज्ञानाचा । विषयचि नाहीं कोणाचा । परमात्म्याहूनि भिन्न असा ॥ ४६ ॥ कां तरी सर्वांचा आत्मा आहे । म्हणूनि वस्तुपरिच्छेदाचा स्पर्श नोहे । जैसें रज्जूमाजीं कल्पित सर्प राहे । तैसें आत्माधिष्ठानीं कल्पित सर्व ॥ ४७ ॥ हें संपूर्ण प्रपंच-जगत् कल्पित । नाम-रूप-क्रियासहित । देशकालवस्तु-परिछिन्नरूप असत । आद्यंतवंत भासतसे ॥ ४८ ॥ रज्जूमाजीं कल्पित सर्प भासे । ब्रह्मात्मस्वरूपीं जगत् तैसें । आत्मा निर्विकल्प संपूर्ण व्यापक असे । अपरिच्छिन्न अभेद ॥ ४९ ॥ सर्व अनात्म पदार्थ त्रयपरिच्छेदयुक्त । आणि आत्मा सर्वपरिच्छेदातीत । पूर्णब्रह्म व्यापक आहे अखंडित । म्हणूनि देशपरिच्छेद नसेचि ॥ ५० ॥ घट येथें आहे येथें नसे । घट जड केवल व्यतिरेकीं दिसे । म्हणूनि परमात्मस्वरूपीं कदा नसे । देशपरिच्छेद सर्वथा

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

॥ ५१ ॥ परब्रह्म उत्पत्तिनाशरहित । अर्थात् त्रिकालाबाध्य अविनाशी सतत । तें कालाचाही काल विख्यात । कालपरिच्छेदरहित आहे ॥ ५२ ॥ कालाची उत्पत्ति-स्थिति-लय जेथून । अखिल कालाचेंही जें कारण । तें परब्रह्म अज नित्य शाश्वत पुराण । म्हणूनि कालपरिच्छेदविरहित असे ॥ ५३ ॥; सर्व वस्तूंच्या प्रभव-स्थिति-लयासि । कारण सर्वाधिष्ठानात्मा आहे परियेसीं । म्हणून वस्तुपरिच्छेद नाहीं निश्चितेंसीं । सर्वात्मब्रह्मस्वरूपीं ॥ ५४ ॥ या अभिप्रायें वेदोपनिषदीं प्रांजल । जीव-ब्रह्माचा अभेद निश्चल । श्रुतीनें कथिला कृपालुत्वें केवल । मुमुक्षु जनांच्या हितार्थ ॥ ५५ ॥ आणि ब्रह्मप्राप्तीचें मुख्य साधन । केवल एकचि आहे आत्मज्ञान । तद्विज्ञानार्थ ब्रह्मनिष्ठ गुरूसि शरण होऊन । ब्रह्मानुभव संपादिजे ॥ ५६ ॥ पुन्हां सुलभ रीतीनें भेदत्रय सांगतसे । जी वस्तु आदिकालीं आणि अंतकालीं नसे । त्या वस्तूसीच म्हणती 'अनित्य' ऐसें । शास्त्रें आणि वेद व्यासादिक ॥ ५७ ॥ तिन्ही कालांत आत्मा विद्यमान् । सर्वत्र नित्यानंद-स्वरूप अभिन्न । आणि आत्म्याहूनि कोणतीही भिन्न । वस्तु नाहीं शिष्या रे ॥ ५८ ॥ यायोगें वस्तुपरिच्छेदाचा अभाव । आत्म्याचेठायीं दाविला वास्तव । तैसा संक्षेपें थोडक्यांत कळावया अभाव । सांगूं देशकालपरिच्छेदाचा ॥ ५९ ॥ जी वस्तु कोण्या एक कारणांत । किंवा राहे कोणत्याही देशांत । अथवा राहे कोण्या एक कालांत । वस्तु म्हणजे यच्चयावत्पदार्थ ॥ ६० ॥ ती वस्तु त्या आपल्या आधाराहून । आणि भिन्न होतसे जगतापासून । त्या भेदें त्या वस्तूसि अनित्यपण । उघड प्राप्त होतसे ॥ ६१ ॥ म्हणूनि ज्या ज्या वस्तु भेदयुक्त असती । त्या त्या वस्तु अनित्यचि होती । ऐसा नियम व्यास भगवान् कथिती । सूत्रांमाजीं स्पष्टपणें ॥ ६२ ॥ जैसे घटपटादिक पदार्थ भेदयुक्त । असल्यानें अनित्य म्हणजे क्षणिक होतात । त्या घटादिकासारखा कधीं न होत । आत्मा नित्य शाश्वत तो ॥ ६३ ॥ कोणत्या कारणांत किंवा देशांत । अथवा न राहे कोणत्या कालांत । तात्पर्य संपूर्ण

देशकालादिक कल्पित । वस्तूंचा आधार आत्मा असे ॥ ६४ ॥ कोणत्याही कल्पित जड वस्तूचा । आधार आत्म्यासि नसे साचा । म्हणून कोणत्याही प्रकारें अनित्यपणाचा । आत्म्यासि स्पर्श नाहीं ॥ ६५ ॥ अतएव देशकालादि परिच्छेद । मुळींच नसती आत्मरूपीं शुद्ध । किंवा त्या देशकालेंकरून दुःखद । उत्पन्न झाल्या ज्या वस्तु ॥ ६६ ॥ त्या असत्य-जड-वस्तूंची स्थिति । त्या देशकालांतचि असे ती । म्हणून ह्या संपूर्ण वस्तु वसती । अव्ययाधिष्ठानामाजीं ॥ ६७ ॥ परंतु कोणत्याही अनात्म वस्तूंत । सर्वाधिष्ठानात्मा कधीं न राहत । आपला जो स्वमहिमा त्यांत । आत्मा प्रतिष्ठित सर्वदा ॥ ६८ ॥ आतां नानाविध प्रपंच संसार । त्या प्रपंचासि आत्मा आहे आधार । या अर्थासि स्पष्ट कळावया साचार । दृष्टांत सांगूं अनेक ॥ ६९ ॥ सूत्रामाजीं वसती मालेचे मणिगण । तैसा हा स्थूल प्रपंच सूत्रात्म्यामाजीं जाण । किंवा पृथ्वीच्या कणिका सूक्ष्म संपूर्ण । पृथ्वीमाजीं राहती ॥ ७० ॥ हा सूक्ष्म प्रपंच त्या प्रकारें । राहे कारण-ईश्वरस्वरूपीं शिष्या बा रे । जैसें स्वनामरूप त्यागूनि सारें । समुद्रीं जाऊनि मिळती गंगादि नद्या ॥ ७१ ॥ तैसा हा अव्याकृत कारण-। ब्रह्मामाजीं प्रपंच वसतसे जाण । यदर्थीं परिसावें दृष्टांत उदाहरण । दार्ष्टांतीं सत्यत्वें कळावया ॥ ७२ ॥ धूमरूप अंधःकार अग्नींत राहे । तैसा सृष्टिकालीं आत्मस्वरूपीं पाहे । अनित्य-जड-दुःखरूप प्रपंच राहे । तैसाच परिसावा वायु-दृष्टांत ॥ ७३ ॥ वायूच्या आधारें जैसें । गंध आणि तृणादि राहतसे । तैसा हा प्रपंच स्थिति-कालांत राहतसे । परमात्म्याचे ठायीं ॥ ७४ ॥ येथें गंध शब्दें गंधाचा आधार । पृथ्वीचे सूक्ष्म भाग घ्यावे हो श्रोते चतुर । आणि शरदृतूंत आकाशांत पयोधर । लय पावूनि वसती जसे ॥ ७५ ॥ तैसा प्रयलकालीं हा प्रपंच । परमात्म्याचेठायीं राहे असाच । याप्रकारें तत्पदार्थ-ईश्वररूपें आत्म्यासीच । जगदाधारता कथियेली ॥ ७६ ॥ आतां त्वं-पदार्थ जीवरूपें करून । कर्तृत्व-भोक्तृत्वादि प्रपंचाचें आधारपण । आनंदस्वरूप आत्म्याचे ठायीं तीन । दृष्टांतेंकरून दाखवूं ॥ ७७ ॥

जैसा सुहृदसज्जनांचे ठायीं दुष्टपणा । कल्पित असे निश्चयें जाणा । अथवा दुष्ट दुर्जनांचे ठायीं साधुपणा । असे केवळ कल्पित ॥ ७८ ॥ तैसा आत्मा सुखस्वरूप स्वयंप्रकाश । ज्यांत नाहीं दुःखाचा लवलेश । सच्चित्सुखात्मक ब्रह्मपरेश । नामरूपात्मक जग दुःखरूप असे ॥ ७९ ॥ शिष्य म्हणे जगदात्मा सुखरूप जरी । जगतांतील विद्यमान् दुःखसंगें तरी । म्हणजे दुःखसंबंधें अवश्य आत्मा विकारी । कां न होईल गुरुवर्या ॥ ८० ॥ गुरु सांगती या शंकेचें समाधान । कीं अद्वितीयात्म-स्वरूपाचें विवेचन । यथार्थ केलिया आत्म्यासि कधीं न । दुःखसंबंध स्पर्शे बा ॥ ८१ ॥ कारण जे जे पदार्थ होती उत्पन्न । ते ते सर्व जड-दुःखरूप परिछिन्न । तात्पर्य दुःखासि उत्पत्ति आहे म्हणून । दुःखही जड असें सर्व जाणती ॥ ८२ ॥ वास्तविक परमार्थ दृष्टीनें पाहतां । चैतन्यात्मरूपीं जड वस्तूची नसे वार्ता । आणि सुखासि उत्पत्ति तत्त्वतां । वेदवेत्त्यांनीं अंगिकारिली नाहींच ॥ ८३ ॥ ते वेदवेत्ते सुखास नित्य मानिती । आणि आत्मप्रतिबिंब जी अंतःकरणाची वृत्ति । तदुत्पत्ति नाश स्वीकारूनि निश्चितीं । सुखरूप मानिती ते मूर्ख ॥ ८४ ॥ ऐकूनि शिष्य म्हणे गुरुजी अंतःकरणवृत्ति । मुख्य सुखरूप कां नाहीं ती । गुरु वदे वृत्तीस सुखरूप मानिल्या निश्चितीं । श्रुतीस ये विरुद्धता ॥ ८५ ॥ जड वस्तूचें सुखरूप करूनि खंडन । वर्णिलें श्रतीनें व्यापकात्म्यासि सुखरूप म्हणून । आणि अनुमान-युक्तीनेंही सुखरूपपण । वृत्तीला सिद्ध होत नाहींच ॥ ८६ ॥ कारण उत्पत्तिवान् पदार्थ जितुके । सुखरूप होत नसती तितुके । जैसें दुःख उत्पत्तिवान् म्हणूनि लटिकें । न टिके तें सुखासारिखें निश्चित ॥ ८७ ॥ तैशी अंतःकरणाचीःवृत्ति देखील । उत्पत्ति-प्रलयवान् आहे चंचल । म्हणूनि अंतःकरणवृत्ति दृश्य मिथ्या जड केवल । सुखरूप नाहीं सर्वथा ॥ ८८ ॥ त्या सर्व अंतःकरणवृत्तीचा जाणता । आत्मा द्रष्टा श्रोता मंता विज्ञाता । सकल देहेंद्रिय जड वृत्तींहूनि भिन्न तत्त्वतां । चैतन्यस्वरूप अपरिछिन्न ॥ ८९ ॥ त्या आत्मसाक्षात्काराचें कारण । जें वैराग्य विषयेच्छारहित जाण । विषयजन्य

सुखासि दुःखरूपपण । यथार्थ जाणिल्यानें प्राप्त होतें ॥ ९० ॥ विरक्तीसह श्रीगुरुभक्ति । पाहिजे शुद्ध सात्त्विक अंतःकरणस्थिति । तेणेंचि इहपर यथेप्सित साधती । राहते सत्कीर्ति पुरुषाची ॥ ९१ ॥ श्रीगुरुभक्ति-सेवेवांचून । कांहीं न साधे स्वहितसाधन । म्हणूनि सद्गुरुभक्ति सर्वदा सेवन । करा हो जन अवश्य ॥ ९२ ॥; धर्मार्थ-काम-मोक्ष हे पुरुषार्थ- । प्रदाता श्रीगुरुदेवदत्त स्वामीसमर्थ । ज्यांचें सामर्थ्यातिशय यथार्थ । यदर्थी कथा मधुर परिसा हो ॥ ९३ ॥ निजाम हैद्राबादचे राहणार । श्रीमंत निजाम सरकारचे दप्तरदार । राजेराय प्रसिद्ध जहागिरदार । नाम शंकरराजे जयांचें ॥ ९४ ॥ ते एकेकालीं महायात्रेस । गेले श्रीक्षेत्र वाराणशीस । कुटुंब-भृत्यादिसह अत्युल्हास । पूर्वक काशीस पातले ॥ ९५ ॥ प्रेमें-करूनि भागीरथीचें स्नान । श्रीविश्वेश्वराचें प्रथम दर्शन पूजन । करावयासि उभे ठेले श्रीमान् । काशी-विश्वेश्वराचे देवालयीं ॥ ९६ ॥ त्या कालीं रायराजे रावशंकर । झालेले विश्वेश्वर-देवदर्शनातुर । पाहती तंव महादेव विश्वेश्वर । पिंडीसह लिंग दिसेना ॥ ९७ ॥ आणि त्या शिवलिंगस्थानीं । दैदीप्यमान् मनोहर पुरुषशिरोमणि । सुंदर यतिवेषधारी महामुनि । सुप्रसन्नवदन विराजित ॥ ९८ ॥ ऐशी श्रीवरदमंगलायतन मूर्ति । लिंगस्थानीं देखूनि शंकररावाप्रति । अद्भुताश्चर्य वाटलें चित्तीं । हें काय आहे म्हणून ॥ ९९ ॥ तेव्हां क्षेत्रस्थ विप्रासि वदती राजेराय । हें स्वप्न किंवा भ्रांति होय । न दिसे विश्वेश्वर लिंगमय । जागृतावस्थेंत नवल काय वर्तलें ॥ १०० ॥ विप्र वदती कुलधर्मादि नवस । तुमचे कांहीं राहिले असल्यास । स्मरण करावें या शुभ प्रसंगास । आपण उदार चतुर आहां ॥ १ ॥ मग शंकर राजे वदती द्विजांलागूनि । महायात्रेस निघण्याचे पूर्वदिनीं । अक्कलकोटस्थ यतींद्र-दर्शन घ्यावें मनीं । ऐसा संकल्पोद्भव झाला होता ॥ २ ॥ त्या योगीश्वर पुरुषोत्तमाचें । श्रेयस्कर सद्यश परिसिलें होतें साचें । आजि भाग्य अनेक जन्मांचें । प्रफुल्लित प्रकाशलें ॥ ३ ॥ म्हणूनि शंकरराजे समीप । गेले तों न दिसे यतीश्वर रूप । श्रीकाशीविश्वेश्वर लिंगस्वरूप । स्वच्छ दृष्टिगोचर जाहलें

॥ ४ ॥ हें विलोकून अपूर्व कौतुक । विस्मित झाले रायराजे आणि लोक । परमेश्वरचरित्र अलौकिक । सत्यसंकल्प
फलदाता असे ॥ ५ ॥ नंतर षोडशोपचारें विध्युक्त । शंकररावें शंकरासि हर्षभरित । पूजिलें वस्त्रालंकार धनयुक्त ।
यात्रा केली यथासांग ॥ ६ ॥ काशी प्रयाग गयादि सेविती । ब्राह्मणांसि भोजन दान दक्षिणा यथास्थितीं । अर्पिल्यावरी
शंकररायाची प्रकृति । अस्वस्थ झाली एकेकालीं ॥ ७ ॥ बहुतेक तीर्थयात्रा करून । निघाले सकल भृत्यादि
जन । शीघ्र गतीनें मार्ग क्रमून । अक्कलकोटीं पातले ॥ ८ ॥ अशक्त झाली शंकररायाची प्रकृति । तथापि अत्यंत
दर्शनातुर वृत्ति । रथारूढ होऊनि शीघ्र गतीं । स्वजनांसहित रायराजे ॥ ९ ॥ जेथें स्थित होते महायोगीश्वर । तेथें
उतरूनि सत्वर । अत्युल्हासें साष्टांग नमस्कार । केला शरीरभाव टाकूनि ॥ ११० ॥ पूजन करूनि फलादिक अर्पिलें ।
मंदपणें मधुर शुद्ध उच्चारिले । विश्वेश्वर-लिंगस्थानीं जें देखिलें । तेंचि स्वरूप सांप्रत पाहतसें ॥ ११ ॥ आपणचि
प्रत्यक्ष विश्वेश्वर । घडला चक्षु-प्रमाण सर्वांसि चमत्कार । क्षमा करूनि श्रीकृपासागर । मम शरीर आरोग्य करावें
॥ १२ ॥ म्हणजे यथाशक्तीं धन अर्पीन । बांधवीन येथें मठ स्थान । परिसूनि वदती नारायण । तें असो परी
शरीरा आरोग्य होईल ॥ १३ ॥ मग भक्त चोळाप्पानें त्वरित । गुरु-तीर्थप्रसाद शंकरराय-मुखांत । घातल्यावरी
शरीर तात्काळ शांत । वाटूं लागलें द्विजवरा ॥ १४ ॥ स्वल्प दिवसांत तीर्थप्रसादेंकरून । आरोग्य शरीर स्वस्थ
होऊन । रायराजें केलें विप्रसंतर्पण । योग्य दक्षिणा अर्पूनि ॥ १५ ॥ पुढें कांहीं दिवसानंतर । पुन्हां येऊनि राजे
राय शंकर । अक्कलकोट ग्रामाबाहेर । श्रीराममंदिर जुनाट असे ॥ १६ ॥ त्या श्रीराम देवालयासमोर । स्वच्छोदकपूरित
एक असे विहीर । श्रीरामाचे सव्य बाजूस लहानसें राममंदिर । हरिमायेनें देवासह स्थापिलेलें ॥ १७ ॥
त्या श्रीराम-देवालयाजवळ । मठ बांधविला सुंदर विशाल । त्यामाजीं पाषाणाचें देऊळ । गाभाऱ्यासह

रचियेलें ॥ १८ ॥ श्रीमद्दत्तात्रेय-स्वामींचें मुखकमल । शोभे धातूचें सुनिर्मल । त्या देवालयांत मांडिलीं चरणकमलें सुंदर । बहुत खर्च करूनि ॥ १९ ॥ त्या मठांतील अत्यल्प भागांत । स्वामिमहाराजांचे पूर्णभक्त । रामदासबुवा नामक संत । अत्यल्पकाल राहिले होते ॥ १२० ॥ जे रामाचार्य जमखिंडीकरांचे गृहांत । पूर्वीं राहिले होते दिवस बहुत । भिक्षा मागून होते निर्वाह करित । निरुपाधिक साधु रामदास ॥ २१ ॥ गुरुभक्तिवान् योगाभ्यासी । भजन करिती प्रेमळ भावेंसीं । निःस्पृह निर्लोभ विरक्त उदासी । होते मराठे जातीचे ॥ २२ ॥ जितेंद्रिय नित्य सदाचारी । युक्ताहारी निःसंग विहारी । समाधानी परमार्थविचारी । काम-राग-द्वेषविरहित ॥ २३ ॥ त्या रामाचार्य जमखिंडीकराचे गृहीं । रामदास असतां अपरिग्रही । तेथें एक सत्पात्र द्विज निराग्रही । प्रपंच खटपट-परित्यागी ॥ २४ ॥ वैराग्ययुक्त अंतःकरण निर्मल । हरिगुरुभक्तिपरायण केवल । कोंकण देशांतील राहणार । गणपतराव नाम ज्याचें ॥ २५ ॥ श्रीस्वामी-समर्थांचा नित्य नैवेद्य । नाना उत्तम पदार्थ करित सद्य । स्वच्छ स्वादिष्ट निरालस्य अनवद्य । निर्लोभपणें रांधितसे ॥ २६ ॥ ज्या ज्या ऋतूंत जे जे पदार्थ प्रिय । चोष्य खाद्य लेह्य पेय । चटण्या कोशिंबिरी पक्कान्नादि भोजनीय । सर्वोत्कृष्ट पाक करी ॥ २७ ॥ सदाचारी नित्य शुचिर्भूत । भक्तिज्ञान-वैराग्यसहित । परधन-स्त्री-परनिंदाविरहित । सरलमार्ग जयाचा ॥ २८ ॥ बाबा सबनीस सत्पुरुष शांत । त्यांचे गृहीं वेदान्त-श्रवण होत । मोक्षाधिकारी दत्तंभट वाचित । वेदान्त ग्रन्थ नित्यशः ॥ २९ ॥ सातारा प्रांतींचे राहणार । सदाचारी गुरुभक्तिरत निरंतर । टाकूनि आशापाश संसार । अक्कलकोटीं राहिले ॥ १३० ॥ गणपतराव आणि दत्तंभट । त्यांचें परमार्थीं प्रेम होतें अवीट । मधुकरी भिक्षा मागूनि पोट । भरित होते विरागी ॥ ३१ ॥ स्वामिसमर्थांच्या पूर्ण कृपेंतील । बाबा सबनीस जीवन्मुक्त केवल । तैसे दत्तंभट परमार्थशील । गणपतरावही

होते ते ॥ ३२ ॥ बाबा सबनीस-साधुसदनीं । रामदासादि गुरुभक्त येती श्रवणीं । त्या रामदास संताच्या कोणी । विघ्नसंतोषी पाठीं लागले ॥ ३३ ॥ तयांनीं विनाकारण । रायराजांचे मठांतून । रामदासासि दिधलें काढून । कुशब्द-बाणें ताडूनि ॥ ३४ ॥ तथापि रामदास साधूला । खेद न वाटे किंचित् मनाला । साक्षात्कारें परमार्थ पूर्ण बाणला । सुख दुःख समान झालेलें ॥ ३५ ॥ श्रीमद्दत्तात्रेयस्वामी दिगंबर । ज्यांनीं रामदासाचें नांव ठेविलें कबीर । स्वमुखें 'कबीरा' म्हणूनि वारंवार । पाचारूनि बोधित होते ॥ ३६ ॥ असो रायराजांच्या मठांत । देवपूजेकरितां सेवेकरी मोरोपंत । कुटुंबी प्रापंचिक ब्राह्मण बहुत । वर्षें अक्कलकोटीं असलेला ॥ ३७ ॥ कोंकणस्थ द्विज म्हैसकर । भिक्षा मागतसे गृहस्थ निरंतर । त्यासि योग्य नेमणूक देऊनि विप्र । ठेविला देवपूजेसि ॥ ३८ ॥ तोचि सेवेकरी अद्यापवरी । रायराजांचे मठांत पूजाधिकारी । आहे आणि समर्थांचा प्रतिवत्सरीं । उत्साह समारंभ होतसे ॥ ३९ ॥ शंकर रायराजांची औदार्यशक्ति । होती देवगुरुचरणीं दृढ भक्ति । त्यांचे दत्तकपुत्र सांप्रत असती । हैद्राबादीं आनंदांत ॥ १४० ॥ स्वामीमहाराजांच्या पश्चात् । स्वयें रायराजे येऊनि घीपुरांत । उत्साहकालीं ब्राह्मणभोजन बहुत । करविती उत्तम प्रकारें ॥ ४१ ॥ तेव्हां दुजे दिनीं एक संन्यासी । पातला भिक्षा-भोजनासी । रायराजें पुजूनि त्या यतीसि । भोजनासि बैसविलें ॥ ४२ ॥ स्वामीसि हस्तोदक देऊन । रायराजें आणि सर्वांनीं घेतलें आपोशन । 'हरहर-महादेव' स्वामिराजांचें नामस्मरण । जयजयकार जाहला ॥ ४३ ॥ तथापि तो हट्टी संन्यासी । हस्तोदक प्रोक्षून न बसे भोजनासि । मग रायराजे विचारिती तयासि । काय पाहिजे म्हणून ॥ ४४ ॥ संन्यासि म्हणे शंकरराया । काशी-महायात्रा आम्हांसि व्हावया । एक दोन शत रौप्यमुद्रिका द्रव्या । घाल तरीच ग्रास घेईन ॥ ४५ ॥ नंतर पन्नास रौप्यमुद्रिका आणून । रायराजें यतीस केल्या अर्पण । तेव्हां यति यथास्थित करूनि भोजन । सर्वही जेविले साश्चर्य ॥ ४६ ॥ ऐसें भोजनकालीं

स्वामीनें अडवून । धन घेऊनि नंतर केलें भोजन । ऐसा संन्यास-आश्रमधर्म नसून । घेतलें धन लोभिष्टें ॥ ४७ ॥
तात्पर्य रायराजाचें औदार्य । दयायुक्त धर्म दान शौर्य । गुरुभक्ति असूनि विवेक धैर्य । होतें ऐश्वर्य असतांही ॥ ४८ ॥;
असो स्वामीसमर्थांच्या पश्चात् । रामदास राहिले पंढरपूर क्षेत्रांत । आणि बाबा सबनिसांचे सदनांत । वेदांत श्रवण
नित्य चालतसे ॥ ४९ ॥ ते बाबा सबनीस महा संत । शालिवाहन शके अठराशें दहांत । अधिक चैत्र कृष्ण चतुर्थींत ।
कैलासवासी जाहले ॥ १५० ॥ पुढें थोड्या दिवसांत दत्तंभट । काशी क्षेत्रीं विश्वेश्वर सन्निकट । संन्यास घेऊनि राहिले
योग पट्ट । अद्यापि काशींत वसती ते ॥ ५१ ॥ गणपतराव सेवेकरी । तोही आहे म्हणती काशी क्षेत्रीं । आणि
महादेवभट्ट परशरामादि सेवेकरी । गेले तीर्थादिक करावया ॥ ५२ ॥ स्वामिमहाराजांच्या पश्चात् । कांहीं संवत्सर
जाहले गत । तेव्हां शंकर रायराजे देहातीत । कैलासवासी जाहले ॥ ५३ ॥ त्यांचे दत्तक चिरंजीव । अक्कलकोटीं
स्वमठांत अवश्यमेव । करविती श्रीसमर्थांचे उत्सव । आश्रितमंडळ पाठवूनि ॥ ५४ ॥ रायराजांचे मठांत अद्यापवरी ।
नित्य पूजा नैवेद्यादि चालतसे पूर्वपरी । मोरोपंत म्हैसकर ब्राह्मण पूजारी । पूर्वींपासून असे बरा ॥ ५५ ॥ सर्वदा
सर्वत्रांचा योगक्षेम । चालविती स्वामिराज गुरु परम । तें लीलामृत परिसा भक्त निःसीम । पुढिले अध्यायीं सुखरूप जें
॥ ५६ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदवेदांग-उपनिषदार्थमथित । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । त्रिदशाध्याय गोड
हा ॥ १५७ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे त्रिदशोऽध्यायः समाप्तः ॥ ३० ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥

# ॥ अध्याय एकतिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीमद्दत्तात्रेयस्वामिने नमः ॥ ॥ कर्नाटक देशीं विजापुर जिल्ह्यांत । तंबग्राम इंडी तालुक्यांत । त्या तंबग्रामीं शिवराम जोशी वसत । ज्योतिषी विद्वान् ब्राह्मण ॥ १ ॥ त्यास पुढें संतति कैशी होईल । हें त्यांनीं गणित करूनि वर्तविलें फल । नंतर शिवरामभटास पुत्र कुशल । झाले तीन ईशकृपें ॥ २ ॥ ज्योतिष-जातक-ग्रंथानुसार । जन्मपत्रिकेंत फलविस्तार । निर्माण केल्यान्वयें साचार । फलानुभव येत असे ॥ ३ ॥ ज्येष्ठ पुत्रद्वय झाले विद्वान । कनिष्ठ गोविंदभट लहान । साधुवृत्ति त्याचें वर्तन । भोळेपणा अंतरीं ॥ ४ ॥ द्वादश वर्षात्मक गोविंद । तो न पढला ज्योतिषादि शास्त्रवेद । त्याचा पिता शिवराम ज्योतिर्विंद । पावला मरण वृद्ध तो ॥ ५ ॥ पुढें त्वरेनें गोविंदभट । पाहतसे अक्कलकोट । स्वामिराज अवतारिक श्रेष्ठ । तत्पादकमलीं विनटला ॥ ६ ॥ केलें साष्टांग नमन गोविंदें । मुखें नामस्मरण वदे । 'स्वामिराय-स्वामिराय' ऐशा शब्दें । भावें नित्य गायन करी ॥ ७ ॥ स्वामिरायाचें अखंड स्मरण । गोविंद करी उच्चारण । नेणे श्रीगुरुस्वामिरायावीण । अन्य दैवत स्वप्नींही ॥ ८ ॥ गोविंदाची दिन दिन वृद्धि । होऊं लागली शुद्ध बुद्धि । स्वामिराय-नामस्मरणें वाचासिद्धि । जाहली प्रसिद्धि लोकांत ॥ ९ ॥ लोक येऊनि स्वस्वकार्यासाठीं । लागती गोविंदाचे पाठीं । गोविंदभटास पुसती गोष्टी । मग तो उत्तर देतसे ॥ १० ॥ अहो तुम्ही सगळे जन । स्वामिरायाचें पादसेवन । करा निरंतर भक्ति भजन । तेणें तुमचें कार्य साधे ॥ ११ ॥ ते गोविंदभट एके दिवशीं । गेले संनिध व्हार्ति-ग्रामासि । तेथें वीरभद्र देवाचें विशेषी । दर्शनीय स्थान आहे ॥ १२ ॥ त्या व्हार्तिग्रामीं

राचाप्पा मोदी। वणिक् सावकार अप्रमादी। ईश्वरभक्त भाविक वरदी। कवन करितसे साधारण ॥ १३ ॥ वणिकाचे दैवत वीरभद्र। त्या देवावरी कविता-पदें अपार। नूतन केलीं भक्तिज्ञानपर। राचाप्पा भक्त-धनिकें ॥ १४ ॥ राचाप्पा आणि गोविंदभट। या उभयतांची पडली गांठ। गोविंद वदे दत्तावतार स्वामीश्रेष्ठ। तद्गुण-वर्णन करावें ॥ १५ ॥ राचाप्पा म्हणे एक ईश्वरावांचून। अन्यावरी मी न करीं कवन। गोविंदें हें वचन ऐकून। वदे ठीक आहे बरें ॥ १६ ॥ मग गोविंद आले आपले गांवा। बोले स्वामिराया सदाशिवा। हरिहर विष्णु वासुदेवा। केला आपुला अनादर ॥ १७ ॥ अत्यंत खेद वाटला मानसीं। गोविंदें त्यागिलें अन्नोदकासि। एकासनीं बैसूनि स्वस्थ अहर्निशीं। नामघोषें गर्जतसे ॥ १८ ॥ वीरभद्रेश्वरासि पडिलें संकट। सप्तदिन अन्नोदकाविण गोविंदभट। बैसला दृढ निश्चयें भक्त धीट। हें पाहूनि शिव कळवळले ॥ १९ ॥ जाऊनि राचाप्पाचे स्वप्नांत। ईश्वरें दाविला सत्य दृष्टांत। मीच स्वामिराय साक्षात् भगवंत। उमाकांत परमेश्वर ॥ २० ॥ जो मी परमेश्वर सदाशिव। तोचि समर्थ स्वामी देवाधिदेव। प्रत्यक्ष कलियुगीं अभिन्न भाव। आहे निश्चित असंशय ॥ २१ ॥ भिन्नत्व भेदभाव जरी मानिशी। तरी दुःखें पावूनि जाशील अधोगतीसि। आजपासूनि करीं स्तवनासि। दत्तात्रेय-स्वामींच्या ॥ २२ ॥ वणिका ऊठ ऊठ झडकरी। जाऊनि गोविंदभटाचे घरीं। क्षमा मागूनि तच्चरणावरी। घाली साष्टांग दंडवत ॥ २३ ॥ कर जोडूनि विनवावें। तयासि स्नान भोजन घालवावें। समर्थांचे तीर्थप्रसादा घ्यावें। कपट नसावें अंतरीं ॥ २४ ॥ राचाप्पास ऐसा दृष्टांत दावून। ईश्वर पावले अंतर्धान। राचाप्पा जंगम जागृत होऊन। भयभीत घाबरला ॥ २५ ॥ म्हणे या गोविंदभटाचें निमित्त। मज स्वप्नीं भेटले गिरिजाकांत। धन्य दिवस आजि भाग्ययुक्त। म्हणून उठला त्वरेनें ॥ २६ ॥ शौच मुखमार्जन करूनि स्नान। घाईं घाईं देवपूजन। दोन कोश पाद-मार्गें चालून। तंव ग्रामीं पातला ॥ २७ ॥ राचाप्पा गोविंदभटाचे सदनीं। जाऊनि लोळे तच्चरणीं। म्हणे

आपणाकरितां त्रिशूलपाणि । भेटले स्वप्नीं प्रत्यक्ष ॥ २८ ॥ अक्कलकोट म्हणजे धीपुर । तेथें साक्षात् भगवान् शंकर । जगदुद्धारार्थ धरूनि अवतार । नांदतसे यतिवेषें ॥ २९ ॥ ज्याची अमानुषी अद्भुत लीला । चोळाप्पा प्रियभक्त ज्याच्या सेवेला । रक्त-श्यामलांगी दिव्य प्रकाशला । शोभला व्यापक सर्वांतरीं ॥ ३० ॥ तोचि अंतर्यामीं नियंता । आत्मा श्रोता मंता द्रष्टा विज्ञाता । माझे हृदयीं प्रकटूनि कविता । अहंकाररहित वदवितसे ॥ ३१ ॥ तोचि सद्गुरु मायबाप आप्त । सखा सोयरा गणगोत । महाराज स्वामी गुरुदेवदत्त । सर्वांसि तारक शोभतसे ॥ ३२ ॥ तत्-दृष्टांतानुरूप । मी शरण आलों तुमच्या समीप । क्षमा करूनि उठा असंताप । करा स्नान भोजन ॥ ३३ ॥ मग गोविंद संतुष्ट होऊन । स्नान करूनि संध्या पूजन । स्वामिरायांसि नैवेद्य समर्पून । बैसले दोघे भोजनासि ॥ ३४ ॥ चमत्कार पाहती सकळ । सत्पुरुष दोघे सात्त्विक निर्मळ । जेवूनि वीणा मृदंग टाळ । भजन गाती स्वामींचें ॥ ३५ ॥ नंतर राचाप्पा स्वनगरीं गेले । स्वामिचरित बहुत वर्णिलें । पुढें कांहीं दिवसांनीं उद्भवलें । गोविंदभटासि जलोदर ॥ ३६ ॥ पुष्कळ उपाय लोक करिती । गुण नसूनि रोग वाढला अति । सर्वत्र स्पष्ट मुखें बोलती । आतां न वाचे गोविंद ॥ ३७ ॥ तेव्हां मामलतदार शिंदगीचे । दाजीबा येऊनि भटाचें । उदर पाहूनि वदती एक दिवसाचें । आयुष्य वाटे उरलेलें ॥ ३८ ॥ दाजीसाहेब भक्त उदार । गोविंदास पुसती रोग-परिहार । आपण साधु उपाय सत्वर । सांगा आम्ही करितसों ॥ ३९ ॥ तेव्हां दाजीबा-मामलतदारासि । उपाय सांगे गोविंद जोशी । लघुरुद्र करून स्वामिरायांसि । पुरणाचा नैवेद्य अर्पावा ॥ ४० ॥ ऐकूनि हें मामलतदारांनीं । एकादश ब्राह्मण बोलावूनि । रुद्राभिषेक प्रारंभूनि । एकादश दिन चालविला ॥ ४१ ॥ तें रुद्राभिषेकाचें तीर्थोदक । गोविंदभटाचे अंगासि लोक । मर्दन करितां अवश्यक । गुण होऊं लागला ॥ ४२ ॥ ऐसा एकादश दिनपर्यंत । महारुद्र जाहला समाप्त । ब्राह्मण-

भोजन केलें यथास्थित । दक्षिणा देऊनि बोळविलें ।। ४३ ।। गोविंदभटाचें शरीर-आरोग्य निर्मल । झालें, जलोदर गेलें समूल । दत्तात्रेय-स्वामिराय दयाळ । कृपें गोविंद वांचले ।। ४४ ।। नंतर त्वरेनें गोविंदभट । पातले अक्कलकोटीं भूवैकुंठ । बुधवारपेठेंत आद्यस्थान श्रेष्ठ । भक्तमनोरथ पुरविणारें ।। ४५ ।। त्या मुख्य स्थानांत स्वामिराय । स्थित होते वदनें हास्य । गोविंदभटें धांवूनि धरिले पाय । म्हणती विश्वजनक पूर्णेश्वरा ।। ४६ ।। मग यतिआज्ञें स्थापित-पादुकांवरी । गोविंदभटें लघुरुद्राभिषेक आदरीं । करून समाराधना द्विजवरीं । अर्पिला नैवेद्य पूर्णान्नाचा ।। ४७ ।। तांबूल दक्षिणा द्विजवरां । अर्पूनि जोडूनि गोविंदभट करा । वदती पूर्णब्रह्मस्वरूप यतीश्वरा । आपण रोगनिर्मुक्त मज केलें ।। ४८ ।। धन्य धन्य करुणासागर । प्रत्यक्ष त्रैमूर्तींचा अवतार । लीलाविग्रही साक्षी परात्पर । अत्रिकुमरा जगद्गुरु ।। ४९ ।। ब्रह्मरूपें करितां विश्वोद्भव । विष्णुरूपें पाळितां संपूर्ण जीव । जगत्संहर्ता महेश्वर शिव । अनंतब्रह्मांडनायक आपण ।। ५० ।। तुमची करितां वास्तव स्तुति । उपरम पावल्या वेद श्रुति । व्यासादिकीं वर्णितां ब्रह्मस्थिति । निःशब्दत्वा पावले महर्षि ।। ५१ ।। तेथें माझा काय पाड । भरलें गुरुस्वरूपीं वेड । 'स्वामिराज' हें नाम गोड । आवडे अखंड अमृताधिक ।। ५२ ।। गोविंदभट ऐसें सद्यश गात । समर्थाज्ञें गेले स्वनगरांत । पुत्रपौत्रसह नांदती सुखांत । आशीर्वादें यतींद्रांच्या ।। ५३ ।। ; आतां तैलंग ब्राह्मणाचें वृत्त । परिसिजे श्रोतीं सावधचित्त । गुरु शिष्यासि प्रेमें साद्यंत । जगद्धितार्थ कथिती तें ।। ५४ ।। एक तैलंग जातीचा ब्राह्मण । तीर्थयात्रा देशाटन । धनप्राप्त्यर्थ करितसे जाण । शुद्धाचरणयुक्त जो ।। ५५ ।। प्रयाग श्रीक्षेत्र वाराणशींत । करूनि स्नानदानादि विहित । गयेसि जाऊनि अर्पित । पिंडदान विष्णुपदीं ।। ५६ ।। तेथून पुष्कर तीर्थीं येऊन । तेथें करूनि स्नानदान । जेथें तेथें विप्रभोजन । शक्त्यनुसार करितसे ।। ५७ ।। नंतर वृंदावन मथुरा । गोकुलीं राहूनि यथाचारां । देवदर्शनादि राजोपचारा । पाहिले विलास भगवंताचे

॥ ५८ ॥ पुढें मातृगया सिद्धपुर । करूनि बहुचरा अंबाजी देवी थोर । क्षेत्र विलोकूनि डाकूर । तैलंग बडोद्यास राहिला
॥ ५९ ॥ तेथें मिळवूनि कांहीं अर्था । तैलंग गेला नर्मदातीर्था । ज्या नर्मदातीरीं स्वहितार्था । वसती महात्मा योगी
मुनि ॥ ६० ॥ जपी तपी व्रती संन्यासी । बैरागी साधु संत उदासी । ब्रह्मचारी गृहस्थ वनवासी । नर्मदाकांठीं
तिष्ठती ॥ ६१ ॥ झालिया नर्मदा-मातेचें दर्शन । स्नान नर्मदोदक प्राशन । अनंत जन्मांचें दुरित दहन । होती
पावन सर्वत्र ॥ ६२ ॥ मुख्यत्वें नर्मदा ॐकार क्षेत्रीं । त्यापरीच भृगुक्षेत्रीं । चांदोद कर्नाळी या दोन क्षेत्रामध्यंतरीं ।
नर्मदा-ओर नदीचा संगम असे ॥ ६३ ॥ रेवा दुर्लभ सर्वत्र वाहे । तथापि तिन्ही स्थानीं विशेषत्वें आहे । म्हणून दर्शनें
स्नानें लवलाहे । लाहे पुण्य अगाध ॥ ६४ ॥ मीन मकर कूर्मादि जंतु अगणित । नर्मदोदकीं वसती सतत । नर्मदा-
माहात्म्य अपार अद्भुत । पुराणीं ऋषीश्वर वर्णिती ॥ ६५ ॥ मोठें विस्तीर्ण पात्र अवलोकून । तात्काल वाटे समाधान ।
प्राणिमात्र सकल पावन । होती यांत आश्चर्य काय ॥ ६६ ॥ प्रख्यात नर्मदायात्रा ऐशी । महानदी मही तापी तैशी ।
साबरमती-स्नान करून संतुष्ट मानसीं । वसईस विप्र आला ॥ ६७ ॥ निर्मळ ग्रामीं विप्रें जाऊन । श्रीशंकराचार्यांचे
समाधीचें पूजन । निर्मलेश्वराचेंही करून । मुंबापुरीस विप्र आला ॥ ६८ ॥ समुद्रीं स्नान करूनि धन । थोडेंबहुत
संपादून । पांडुरंगाचें करावया दर्शन । विप्र आला पंढरीस ॥ ६९ ॥ चंद्रभागे करूनि स्नान । घेतलें रुक्मिणी-
विठ्ठलाचें दर्शन । नैवेद्य ब्राह्मण-सुवासिनी-भोजन । केलें भूवैकुंठपुरींत ॥ ७० ॥ पंढरपुरची यात्रा झाल्यावरी ।
तैलंग ब्राह्मण पातला सोलापुरीं । तेथें ऐकिलें कीं प्रज्ञापुरीं । स्वामी समर्थ आहेत ॥ ७१ ॥ ते अंतरीचें हृद्गत
सांगती । जें जें पाहिजे तें तें देती । तेणें तैलंग हर्षला चित्तीं । आला अक्कलकोटांत ॥ ७२ ॥ तेव्हां स्वामिराज
भगवंत । बैसले होते खासबागेंत । दर्शनेच्छु जनसमूहसहित । तेथें तैलंग पातला ॥ ७३ ॥ यतींद्रासि साष्टांग

ाम । तैलंग ब्राह्मणें घातला प्रथम । कवि-मुनि-सज्जनांचें जीवन परम । विश्रांति-धाम देखिलें ॥ ७४ ॥ यतियूथपति
ती विप्रासि । कवण हेतू असे मानसीं । तीर्थें फार करूनि आलासी । हुडकावया येथवर ॥ ७५ ॥ तदा
दे तैलंग ब्राह्मण । संसारीं गांजलों झालें ऋण । पुष्कळ केलें देशाटन । ऋणमुक्त व्हावें यदर्थ ॥ ७६ ॥ हिंडतां
ंडतां श्रमलों भारी । युक्ति-विद्या-बळें परोपरी । स्वल्प धन लाधलेलें यात्रेमाझारीं । वेंचिलें केवल धर्मार्थ ॥ ७७ ॥
ऋणमुक्त व्हावया उपाय । दीनासि सांगा हो स्वामिराय । जेणें ब्रह्मस्व फिटून जाय । मायबापा गुरुवर्या ॥ ७८ ॥
योगिराज वदती त्या कालीं । द्रव्य नसतें संन्याशाजवळी । कृष्ण मृत्तिका पाहिजे असली । तरी ती घेऊन जावी त्वां ॥ ७९ ॥
तंव यतीश्वरासि विप्र म्हणे । मृत्तिका घेऊन काय करणें । मग श्रीगुरु वदती चालते होणें । नाहीं गरज आम्हांसि
॥ ८० ॥ गुरु वाक्य ऐकूनि तैलंग । म्हणे पार्थिव करण्यास उपयोग । होईल म्हणूनि पडशींत अभंग । मृत्तिका
ढेप बांधिली ॥ ८१ ॥ गुरुपाद वंदूनि विप्र निघाला । हळूं हळूं हैद्राबादेस गेला । स्वग्राम मार्गें चालला । थकला
ओझें उचलितां ॥ ८२ ॥ मृत्तिका-त्यागार्थ पडशीचें मुख । सोडिलें तों दिसे लखलख । शुभ्र स्वच्छ रौप्य
सुरेख । देखूनि तैलंग हर्षला ॥ ८३ ॥ स्वनगरीं जाऊनि सदनांत । गाठोडें ठेवी एकांत गुप्त । कांता वदे काय झालें
प्राप्त । तों जन बहुत धांवले ॥ ८४ ॥ मग बाहेर काढिली मृत्तिका ढेप । सर्वांनीं देखिलें रजत रूप । एके बाजूस
मृत्तिका अति अल्प । दिसली कृष्ण वर्णाची ॥ ८५ ॥ सर्वांसि अघटित वाटलें आश्चर्य । बोलती ईश्वरी लीला
अगम्य । तैलंगाचे मनीं होता संशय । म्हणूनि ऐसें जाहलें ॥ ८६ ॥ कांता म्हणे हो पतिवर्या । जाऊनि विनवावें त्या
स्वामिराया । ज्यांची अद्भुत अतर्क्य माया । रौप्याचें व्हावया सुवर्ण ॥ ८७ ॥ ज्या महत्पुरुषाच्या वरवचनें ।
मृत्तिकेचें रौप्य झालें क्षणें । त्या देवाच्या कृपावलोकनें । सोनें कां न होईल ॥ ८८ ॥ ऐकूनि स्त्रीबुद्धीचे बोल ।

लोभी तैलंग विप्र तात्काल । भोजनादि आटोपूनि एक पल । विलंब न करितां निघाला ॥ ८९ ॥ लोक म्हणती दोन सहस्र मोलाचें धन । अनायासें लाधलें असून । कां गा होतोसि मूर्खा खिन्न । लोभिया ज्ञान तुज नाहीं ॥ ९० ॥ अरे अवतारिक पुरुषांचा समागम । अखिल सुखार्थाचें परंधाम । लाधूनि धनही तुजला भ्रम । बाईल-बुद्धीनें जाहला ॥ ९१ ॥ विक्षिप्त लोभी तैलंग ब्राह्मण । धिक्कारून संभावितांचें भाषण । निघून आला अक्कलकोटीं जाण । स्वामिचरणांसमीप ॥ ९२ ॥ सुवर्णप्राप्तीचा अति लोभ झाला । देखूनि ऐशा तैलंग विप्राला । स्वामी समर्थ म्हणती तयाला । उठ चालता होईं रे ॥ ९३ ॥ आधींच जाति तैलंग । त्यांत कार्पण्य आणि अति लोभाचें अंग । संतोष समाधानाचा संग । होणार नाहीं कदापि ॥ ९४ ॥ देवता तीर्थ महात्मा जन । त्यांचें झालें बहु दर्शन । आणि रौप्याची ढेप लाधली असून । पुनः लोभी धांवला ॥ ९५ ॥ आतां न मिळे खचित सुवर्ण । जाणूनि द्विजें केलें प्रयाण । रौप्य गोळ्यांत कृष्ण मृत्तिकेची खूण । देखूनि जन तटस्थ झाले ॥ ९६ ॥ असो तैलंग लोभी ब्राह्मण । गृहीं जाऊनि झाला क्त-ऋण । अभाविकासही दत्तात्रेय स्वामी प्रसन्न । होतांचि तया काय उणें ॥ ९७ ॥ भाविक अभाविक किंवा ंडित । मूर्ख धनिक अथवा दीन संभावित । स्वजाति विजाति भेदादि हिताहित । सर्वत्र समान विलोकिती ॥ ९८ ॥ चि श्रोते परिसा हो सम्यक् । भीमातीरीं शिरगुर गांवीं एक । माधवशास्त्री नामक । विद्वान् ब्राह्मण वसतसे ॥ ९९ ॥ शिरगुर गांव त्यांस जहागीर । असूनि जाहलें ऋण फार । तेणें माधवाचार्य चिंतातुर । तशांत कुटुंब वर्तलें ॥ १०० ॥ कधीं कधीं ते माधवशास्त्री । येत असती प्रज्ञापुरीं । श्रीस्वामिराज-चरणीं भारी । प्रेम होतें ंचें ॥ १ ॥ त्याकालीं धनाचा अभाव । त्यांतही प्रिय स्त्रीचा आठव । त्याहीवरी ऋणचिंतेनें शास्त्री धव । वेड्यासारखे जाहले ॥ २ ॥ तेव्हां मानसीं संकल्प उठिला । आतां जावें अक्कलकोटाला । शरण व्हावें स्वामि

णांला । तरीच तरणोपाय असे ॥ ३ ॥ नंतर अक्कलकोटीं येऊन । स्वामीसमर्थांचें चरण-दर्शन । करूनि
भावें वंदन । उभे ठाकले व्याकुल ॥ ४ ॥ मग बोलावूनि तयांसि जवळ । यतिराज चिद्घनानंद दयाळ ।
सुमुहूर्त-सावधान' शब्दें शुभफल । अर्पिती चणकांसह त्यांसी ॥ ५ ॥ माधवाचार्य लीनपणें भाषण करी । गुरुराया
ोक करिती माझी मस्करी । वृद्धपणीं गुरुवरदा वाणी श्रेयस्करी । फळेल काय मजलागीं ॥ ६ ॥ रौप्य
द्रिका पांच सहस्र । ऋण आहे माझ्या माथ्यावर । वय झालें पन्नास वर्षांवर । विवाह-संस्कार होय कसा ॥ ७ ॥
एसें वदूनि स्तब्ध ठेले । मग योगीश्वराधीश नमिले । आज्ञा मानूनि शास्त्री निघाले । आले शिरोळ ग्रामांत ॥ ८ ॥
माधवशास्त्री यांचे आप्त । शिरोळ ग्रामीं होते वसत । त्यांचे गृहीं विवाह निश्चित । द्वय कन्यांचा नेमिला ॥ ९ ॥
कनिष्ठ कन्येचा वर । वऱ्हाड्यांसह आला सत्वर । सीमांत-पूजन झालें यथाशास्त्र । त्या गृहीं माधव उतरले
॥ ११० ॥ ज्येष्ठ कन्येच्या वर-वऱ्हाड्यांस । मंडळ गेलें होतें आणावयास । तेथें कांहीं विपर्यास ।
जाहल्यामुळें परतलें ॥ ११ ॥ कन्येचा पिता ऐकूनि वृत्त । खेदें बैसला चिंताग्रस्त । म्हणे धांव दयाळा
भगवंत । निर्विघ्न कार्यसिद्धि करी ॥ १२ ॥ ज्येष्ठ कन्येचा विवाह झाल्यावांचून । कनिष्ठेचें कैसें करावें
लग्न । लौकिकांत हें अयोग्य म्हणून । थोरलीचें कार्य प्रथम व्हावें ॥ १३ ॥ अवधि न उरली आतां ।
अनायासें न पाचारितां । माधवाचार्य कुलीन तत्त्वतां । सहज आले हे शुभ वेळीं ॥ १४ ॥ त्यांच्या योग्यतेनुरूप
आम्ही । कोणत्याही प्रकारें सम नाहीं । ज्येष्ठ कन्या यांस दिधली यांत कांहीं । संशय नसे सर्वांनुमतें ॥ १५ ॥
माधवाचार्यासि विचारल्यानंतर । त्यांनीं दिधला रुकार । मग नेमस्त सुमुहूर्तावर । टाळी वाजली मांगलिक ॥ १६ ॥ दोन्ही
कार्यें समारंभपूर्वक । घडलीं यथाशक्ति लौकिक । त्यांत विशेषत्वें तात्कालिक । माधवासि रत्न लाभलें ॥ १७ ॥

गांठीं एक कपर्दिकही नसतां । अकस्मात् माधवासि कष्टविरहिता । कन्या स्वरूपसुंदर उपवर तत्त्वतां । लाधली
स्वामिराजकृपें ॥ १८ ॥ दत्तात्रेय-स्वामी रमाधव । तत्पादकृपें शास्त्री माधव । नूतन भार्येसह मित्र बांधव ।
आले अक्कलकोटासि ॥ १९ ॥ भार्येसह साष्टांग नमन । आस्तिक्यभावें घालून । माधवाचार्य उभे करद्वय जोडून ।
स्तोत्रें अपार वर्णिती ॥ १२० ॥ जयजय हो परमपुरुषा । दीनभक्तवत्सल करुणाविशेषा । आदिनारायण तव
महिमा शेषा । व्यासादिकांसि अगम्य ॥ २१ ॥ अविद्या-मायें वेष्टिलों । निजरूपासि विसरलों । विद्या-धन-
मदें बहु माजलों । तेणें गुंतलों भवजालीं ॥ २२ ॥ आपणचि तारक भवार्णवीं । सार्थचि श्रीमत्परमहंस पदवी ।
विचित्र चरित्र निर्गुण गोसावी । दावितां चवी मोक्षाची ॥ २३ ॥ वटपत्रशायी दत्त-नगर । मूळ परमात्मा विधि-
[illegible]रि-हर । त्रयमूर्ति धरूनि ऐक्यावतार । जगदुद्धारार्थ विचरतां ॥ २४ ॥ या प्रकारें माधवें प्रार्थितां । स्वामी-
[illegible]समर्थ गुरुदेवदत्ता । दया उपजूनि वदती ऋणमुक्त आतां । व्हाल पुत्रपौत्रादिसह सुखी ॥ २५ ॥ ते समयीं
[illegible]त्तंबापुरीचा भक्त । हरिश्चंद्र नामें गुणवंत । पाषाणाच्या पादुका निर्मित । उत्तम प्रकारें स्वामींच्या ॥ २६ ॥ तो
[illegible]रिश्चंद्र स्वामिरायाजवळ । उभा होता भाविक निर्मल । त्यातें मागितल्या माधवें तत्काळ । चरण-पादुका समर्थांच्या
[illegible]चि २७ ॥ मग हरिश्चंद्र भक्तें । उत्तम पादुका तयातें । दिधल्या तेव्हां सुमुहूर्तें । अत्यंत गौरव करूनि ॥ २८ ॥
[illegible]धवें स्वामिरायांच्या चरणांसि । पादुका लाविल्या भावेंसीं । नंतर गुरुपादुकांसि । नमन केलें साष्टांगीं ॥ २९ ॥
[illegible]कारूनि फलादिक प्रसाद । माधवशास्त्री वंदूनि गुरु गोविंद । आज्ञा घेऊन परमानंद- । पूर्वक गेले निज ग्रामासि
[illegible]ंचे १३० ॥ मध्व-संप्रदायानुसार । शालिग्राम शिलेचें तीर्थ वारंवार । घालितो त्या पादुकांवर । निःसीम भक्तिपूर्वक
[illegible]धर ३१ ॥ तें शिलातीर्थ पादुकांवरी घालून । पूजन करिती नैवेद्यार्पण । वैष्णवांसि देती धन मान । इतर विप्रांसि

धिक्कारिती ॥ ३२ ॥ म्हणती आपणांसि वैष्णव । परी न जाणती यथार्थ भक्तिवैभव । वेदशास्त्र-रहस्यानुभव । पढूनि देखील नेणती ॥ ३३ ॥ साहंकारें स्वमताभिमान । भेदबुद्धीनें करिती पूजन । असो स्वामिराजदयेंकरून । ऋणमुक्त झाले माधव ॥ ३४ ॥ ते माधवाचार्य एकवार । होते श्रीव्यंकटेश-गिरीवर । तेथें घडला चमत्कार । श्रोतीं सादर परिसावा ॥ ३५ ॥ त्या कालीं दत्तात्रेय-स्वामीसमर्थ । मार्गांत बैसले होते स्वस्थ । तेथेंही पुष्कळ लोक दर्शनार्थ । जमले होते सद्भावें ॥ ३६ ॥ तेव्हां माधवें पाहिलें यतीश्वरासि । म्हणे केव्हां आलेति या स्थलासि । योगिराज वदती तयासि । येथेंच वसतों सर्वदा ॥ ३७ ॥ उच्छिष्ट-अन्नोदकयोगें फार । कंटाळलों रे द्विजवर । नको नको तें उच्छिष्टान्न नीर । भेदकपटयुक्त जें ॥ ३८ ॥ परिसूनि अंतरखुणेचे बोल । माधवासि अद्भुत वाटे नवल । म्हणे न हे मानव परमेश्वर केवल । अंतर्साक्षी जगद्गुरु ॥ ३९ ॥ आम्ही अज्ञानी मदोन्मत्त । मताभिमानी कपटी प्रतिष्ठित । कर्में आचरितों अनुचित । विद्वान् म्हणवितों सर्वदा ॥ १४० ॥ ऐसा पश्चात्ताप माधवाचार्याला । सारासार-विचार-दृष्टीनें झाला । म्हणे केव्हां जाईन अक्कलकोटाला । पाहीन मूर्ति परब्रह्म ॥ ४१ ॥ श्रीगिरी-व्यंकटेशाचें दर्शनादिक । आटोपूनि अनन्यगतिक । निघून त्वरें निष्ठापूर्वक । माधव पातले धीपुरीं ॥ ४२ ॥ सच्चिदानंद पूर्णब्रह्म स्वामी । विश्वव्यापक अंतर्यामी । सद्भावें पूजिले प्रेमीं । इहपर साध्य व्हावया ॥ ४३ ॥ विनविती जगद्वंद्य देवाधिदेवा । 'अपराध क्षमा करूनि अथवा । शरणागतासि दंड व्हावा । कांहीं तरी प्रभु-आज्ञें ॥ ४४ ॥ मग करुणासागर हास्यवदन । बोलती स्वस्थ आनंदनिमग्न । असावें भेद द्वैत टाकून । ओळखूनि अंतरात्म्यासि ॥ ४५ ॥ परनिंदा परापमान । करूं नये सर्वथा वेदमत-खंडण । हरिगुरुभक्ति-परायण । असावें लीन सर्वत्र ॥ ४६ ॥ श्रीगुरुमुखें बोधामृत-श्रवण । करूनि हर्षले माधव जाण । आज्ञेनुसार ग्रंथ लहान । संस्कृत

भाषेंत रचिलासे ॥ ४७ ॥ स्वर्गस्थ झाले ते माधवशास्त्री । पुत्रपौत्र नांदती सदाचारी । समाधीचे दर्शनासि प्रज्ञापुरीं । येत असती भक्तीनें ॥ ४८ ॥ ऐशी श्रीगुरु-समर्थांची लीला । अगम्य अतर्क्य देवादिकांला । भवार्णवीं तारक सर्वत्रांला । तेचि पुढें परिसावी ॥ ४९ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदशास्त्रपुराणसंमत । 'ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । एकत्रिंशतितमाध्याय गोड हा ॥ १५० ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे एकत्रिंशतितमोऽध्यायः समाप्तः ॥ ३१ ॥ श्रीगुरुदेवदत्त-स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय बत्तिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीसद्गुरु-दत्तात्रेय-स्वामिने नमः ॥ ॥ शिष्य म्हणे पुढें काय कथा वर्तली । ती सांगा जी गुरुमाउली । अधिकारी शिष्याची ऐकिली । विनवणी जगद्धिताची ॥ १ ॥ गुरु वदती शिष्यासि भलें । परिसावें वत्सा लीलामृत चांगलें । तुजसाठीं जाती उद्धरिले । प्राणिमात्र सकलही ॥ २ ॥ दत्तात्रेयस्वामी सच्चिदानंद । तच्चरणभक्तीचा सदा छंद । लागलिया सर्वाभीष्टप्रद । होतसे सर्व जनांसि ॥ ३ ॥ सातारा जिल्ह्यांत रहिमतपुर । नामाचें आहे ग्राम सुंदर । आप्पासाहेब माने सरदार । तेथें वसती गृहस्थ ते ॥ ४ ॥ त्यांसि दोन पुत्र कन्या एक । कुटुंबवत्सल मराठे भाविक । चांगली होती जयांची वागणूक । परंतु घरची गरिबी ॥ ५ ॥ संसारीं धनाच्या अभावानें । त्रासले फार गांजले माने । बहुत शोधिलीं वररत्नें । कन्येसि सुस्थळ मिळावया ॥ ६ ॥ सुस्वरूप कन्या उपवर । सद्गुण अंगीं शोभे गंभीर । कोणासि अर्पावें कन्यारत्न सुंदर । माने विचार करिती हा ॥ ७ ॥ अक्कलकोटासि जाऊनि । उत्तम पुरुषास करावी विनवणी । कन्या-रत्न सर्वोत्कृष्ट ठिकाणीं । पडेल सौख्यांत जन्मभरी ॥ ८ ॥ ऐशा उत्तम विचारीं । शके सत्रासें अठ्यायशीं वत्सरीं । आप्पासाहेब माने प्रज्ञापुरीं । आले समीप समर्थांच्या ॥ ९ ॥ बाबासाहेब मराठे मानकरी । गुर्जर उपनामक त्यांचे घरीं । माने राहिले होऊन सेवेकरी । गुरुदत्तात्रेय-स्वामींचे ॥ १० ॥ करावें नित्य दोन्ही वेळां दर्शन । श्रीस्वामिराजचरणीं लीन । चार पांच मास क्रमिले राहून । सेवानिमग्न माने ते ॥ ११ ॥ एके दिवशीं चोळाप्पा भक्त । पाहूनि प्रसन्नवदन गुरुदेवदत्त । मान्यांचा हेतू करी निवेदित । नतजनभक्तवत्सलासि ॥ १२ ॥ हे येथील मानकरी

सुशील । सर्व प्रकारें जाहले निर्बल । कन्या सुलक्षण सुंदर शील । मिळालें न स्थळ अद्यापि ॥ १३ ॥ नंतर मान्यासि वदती दयासागर । खंडेरायासि अर्पावी कन्या चतुर । लेईल अमोलिक बहु वस्त्रालंकार । तेणें व्हाल बहु सुखी ॥ १४ ॥ आणि लौकरचि माने तुम्ही । पोंचाल शेवटच्या मुक्कामीं । ऐसा आशीर्वाद सर्वांतर्यामी । मान्यांस देती जगदीश ॥ १५ ॥ हें आप्पाराव मान्यांनीं ऐकून । स्वामी-समर्थांचें पादपूजन । केलें नैवेद्य समाराधन । प्रसाद घेऊनि निघाले ॥ १६ ॥ माने गेले रहिमतपुरास । पुढें जातां थोडे दिवस । कन्या उत्तम पाहायास । आलें मंडळ बडोद्याचें ॥ १७ ॥ मानकरी ज्योतिषी कारकुन । साताऱ्याकडील कन्या शोधून । कांहीं मुलींच्या पत्रिका घेऊन । आले रहिमतपुरासि ॥ १८ ॥ मान्यांची पाहूनि कन्या उत्कृष्ट । बडोद्याचें मंडळ झालें संतुष्ट । निवडूनि कन्या चांगल्या श्रेष्ठ । गेले घेऊनि वटोदरीं ॥ १९ ॥ दुसरे दिवशीं राजवाड्यांत । कन्यापरीक्षण शास्त्रविहित । होऊनि मान्यांची कन्या निश्चित । विवाह यथोचित ठरला ॥ २० ॥ श्रीमंत प्रौढप्रताप सम्यक् । गोब्राह्मणादि प्रजापालक । अनादि सद्धर्म-संरक्षक । शौर्य-औदार्यादियुक्त जे ॥ २१ ॥ खंडेराव महाराज नृपवर । गुर्जर देशाधिपति विवेकचतुर । श्रीमंत गायकवाड सरकार । समशेर बहादुर शोभती ते ॥ २२ ॥ त्यांनीं मान्यांची कन्या विलोकून । सर्वांच्या वचनासि दिधला रुकार मान । नंतर विवाह सामुग्री विपुल जाण । सर्व प्रकारें सिद्ध झाली ॥ २३ ॥ अप्पासाहेब माने यांचे कन्येबरोबर । खंडेराव गायकवाड सरकार । यांचा विवाह सुमुहूर्तावर । झाला मांगलिक-समारंभें ॥ २४ ॥ दान-दक्षिणा ब्राह्मण-भोजन । सर्वत्रांसि उत्तम षड्रस अन्न । मिळालें वस्त्रभूषणादि जाण । यथायोग्य प्रकारें ॥ २५॥ राजपत्नी श्रीमंत जमुनाबाई । सर्व जनांसि अक्षय सुखदायी । सुखरूप सुलक्षण गुणमयी । लक्ष्मीच दिसे प्रत्यक्ष ॥ २६ ॥ अंगावरी रत्न मौक्तिक । सुवर्णालंकार अमोलिक । वस्त्रें लेईल्या मांगलिक । दैदीप्यमान् .विराजित ॥ २७ ॥ आप्पासाहेबांनीं कन्येप्रति । वज्रचूडेमंडित सौभाग्यवती । वस्त्रालंकारयुक्त

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

सद्धर्ममति । पाहूनि संतोष मानिला ॥ २८ ॥ म्हणती श्रीस्वामिराज साक्षात् भगवान् । सुफल झाले मनोरथ पूर्ण ।
समर्थांचें जैसें आशीर्वचन । तैसें लाधलें सदन नृपश्रेष्ठ ॥ २९ ॥ पूर्णब्रह्मपरमेश्वर परंधाम । तत्पाद-सेवेनें लाभ झाला
परम । राजा राणी जोडा उत्तम । अप्रतिम शोभतसे ॥ ३० ॥ त्या दत्तात्रेयस्वामिवरदें आज । सुखी झालों अनायासें
सहज । पतितपावन कल्पतरु भक्तकाज । माझी लाज सांभाळिली ॥ ३१ ॥ यमुनेच्या जन्माचें झालें कल्याण ।
आम्हांसि वंशपरंपरें श्रीमंतपण । प्राप्त झालें ऐसें माने आपण । गुरूचें सद्यश सांगती सर्वां ॥ ३२ ॥ आप्पासाहेबासि
आहेत सुपुत्र दोन । आण्णासाहेब तात्यासाहेब म्हणून । तेही शूर सरदार बुद्धिमान् । शोभती वडिलांसारिखे ॥ ३३ ॥
पुढें थोडक्याच दिवसांत । आप्पासाहेबांचें शरीरारोग्य बिघडत । दत्तात्रेयस्वामींचें भजन करित । कैलासवासी झाले ते
॥ ३४ ॥ जमुना राणी महद्धार्मिक । त्यांनीं आपले बंधूसि तात्कालिक । पाठवूनि स्वामिरायाचें पूजनादिक ।
अक्कलकोटीं करविलें ॥ ३५ ॥ मग ते आण्णासाहेब माने । बडोद्यास गेले आनंदानें । पुढें कांहीं दिवस प्रभु-सत्तेनें ।
वृत्त घडलें विलक्षण ॥ ३६ ॥ शके सत्राशें ब्याण्णव संवत्सरीं । मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीस सोमवारीं । खंडेराव महाराज
परमार्थविचारी । कैलासवासी जाहले ॥ ३७ ॥ त्यांचे बंधु मल्हारराव गायकवाड । झाले राज्यासनीं आरूढ ।
धार्मिक शूर सत्यवादी दृढ । होते प्रजा पाळित ॥ ३९ ॥ ते राज्यावरूनि पदच्युत । होऊनि राहिले मद्रासेंत ।
तेव्हां जमुनाराणी होऊनि प्रसूत । कन्या सुरत्न उदेलें ॥ ३९ ॥ त्या जमुनाराणींनीं कांहीं दिवस । अन्नसत्र ठेविलें
होतें अक्कलकोटास । काशीक्षेत्रादि अनेक तीर्थीं वास । जमुनाराणीस घडला हो ॥ ४० ॥ आल्या गेल्यांचा सर्वांचा
आदर । करित होत्या योग्य सत्कार । स्वराजधानीस उत्तम भव्य मंदिर । रचवूनि तारकेश्वरा स्थापिलें ॥ ४१ ॥ त्यांची
निरालस्य निःसीम शिवभक्ति । कीर्तन-पुराणादि श्रवणीं प्रीति । सद्धर्म औदार्य दृढतर शक्ति । अखंड कीर्ति गाजतसे

* * *

॥ ४२ ॥ सुखें चालावें राज्य वीरक्षेत्र । म्हणूनि त्यांनीं अंकावरी घेतले दत्तकपुत्र । श्रीमंत सयाजीराव महीवर । गायकवाड सरकार विराजती ॥ ४३ ॥ राजकार्यधुरंधर महीपाल । न्यायमार्गीं असती कुशल । अनेक देश विलोकूनि सबल । प्रजा पालन करिताति ॥ ४४ ॥ ते गुर्जराधीप सयाजीमहाराज । थोडे दिवसांपूर्वीं सहज । अक्कलकोटचे भूपति शहाजी राज । त्यांचे भेटीस गेले होते ॥ ४५ ॥ दत्तात्रेयस्वामींचें आद्य प्रिय स्थान । बुधवार पेठेंत विराजमान् । तेथें जाऊनि समाधीचें दर्शन । घेऊनियां संतुष्टले ॥ ४६ ॥ सुपुत्र-कन्यासंततीसहित । सयाजी महाराज दयायुक्त । परमेश्वरकृपें आनंदांत । अखंडित नांदती ॥ ४७ ॥ ; आतां शिष्या सुंदरी नामक । वानरीची कथा ऐक । मुक्या जनावरासही सुखात्मक । जाहला प्रसाद सद्गुरूचा ॥ ४८ ॥ अक्कलकोट संस्थानचे । साहेब बंबगार्डनर नामाचे । होते पोलिटिकल एजंट त्यांचे । जवळ होती एक वानरी ॥ ४९ ॥ ती वानरी पाहिजे त्या मनुष्यास । चावत असे संरक्षकास । तैसेंचि बंबगार्डनर साहेबास । चावावयास धांवे सर्वदा ॥ ५० ॥ मर्कट चेष्टा करी विपुल । येऊनि चावे सर्वांजवळ । लोक त्रासले सांगती कागाळ । साहेबांसमीप येऊनि ॥ ५१ ॥ त्या वानरीचा फार त्रास । आला बंबगार्डनर साहेबांस । मग तिच्या प्राणघातास । निरुपायें साहेबें हुकूम केला ॥ ५२ ॥ खंडोबाच्या देवळामागें । वानरीस आणिलें भृत्यवर्गें । मग प्राणघात महारागें । शस्त्र मारूनि करणार ॥ ५३ ॥ तों खंडोबाच्या देवळांत बैसले । होते दत्तात्रेयस्वामी स्वलीलें । इतुक्यांत तें भुजंगानें पाहिलें । येऊनि कथिलें यतिवर्यां ॥ ५४ ॥ बंबसाहेबांचे दास । ठार मारिती वानरीस । सोडवूनि आणूं कां हो तीस । जगन्निवास गुरुनाथा ॥ ५५ ॥ आणा म्हणाले योगीश्वर । हें ऐकूनि भुजंगा सत्वर । धांवूनि गेला तेथवर । म्हणे भृत्यांस मारूं नका ॥ ५६ ॥ साहेबांच्या आज्ञेवरून । वानरीस आणिलें सोडवून । समर्थांच्या दयें जीवदान । अज्ञान वानरीस मिळालें ॥ ५७ ॥ स्वामिराजांच्या चरणांवरी । गडबडा लोळे ती वानरी । प्रेमाविर्भाव चेष्टा करी । त्यागूनि

मर्कटस्वभाव ॥ ५८ ॥ योगाधीश्वर मायारहित । तथापि सर्व प्राणीमात्रांची दया उपजत । सोडवूनि त्या वानरीप्रत । परम प्रेमें संबोधिती ॥ ५९ ॥ आजपासूनि अगे मर्कटे । दंश करणें टाकी चावटे । नातरी टांगूनि उफराटें । मारवूनि धाडूं स्वर्गासि ॥ ६० ॥ प्रभुरायांच्या आज्ञेनुसार । वानरी असूनि मूक जनावर । तिणें दंशादिक मर्कट-चेष्टा समग्र । त्यागिल्या निःशेष तत्कालीं ॥ ६१ ॥ स्वामिराज असतील जेथें । नित्य दोन वेळां जाऊनि तेथें । चरणांवरी पडूनि पालथें । जोडूनि हस्त नमीत ॥ ६२ ॥ समर्थ जें कांहीं देतील । हरबरे किंवा अन्न जल । इतर पदार्थादिक फल । वानरीनें भक्षण करावें ॥ ६३ ॥ न देतां कोणासि उपद्रव । फिरावें वनांत अथवा गांव । वानरीचें 'सुंदरी' ऐसें नांव । गुणकर्मावरूनि ठेविलें ॥ ६४ ॥ मुखश्री वानरीची प्रफुल्लित । समाधान सात्त्विक शांत चित्त । स्वकंठांतील माला मर्कटीचे गळ्यांत । स्वहस्तें यतींद्रें घालावी ॥ ६५ ॥ तिचे मस्तकीं आपुली टोपी । घालित होते वारंवार पूर्णप्रतापी । वाणी नसतां निजज्ञानरूपीं । करुणासागरें मिळविलें ॥ ६६ ॥ अक्कलकोटीं बुधवार पेठेंत । स्वामिरायांच्या आद्य प्रिय मठांत । सुंदरी वानरी देहातीत । स्वर्गस्थ शिवरूप जाहली ॥ ६७ ॥ समारंभें वाजत गाजत । गुलाल बुक्का रेवड्या उधळित । शर्करा वाटीत भजन करीत । नेऊनि पुरिलें मर्कटीसि ॥ ६८ ॥ समर्थांचे घरची मर्कटी । सुंदरी प्रासादिक पुण्यवान् मोठी । दत्तात्रेयचरणीं शेवटीं । लीन झाली चिद्रूप ॥ ६९ ॥ समर्थांच्या वानरीस जन । देती सर्वदा सकल मान । जैसें श्रीरामचंद्राश्रित होऊन । पावले कपिगण मोक्षपदा ॥ ७० ॥ अथवा गायी-वत्स गोप-गोपी । सहज पावले श्रीकृष्ण-स्वरूपीं । पाषाण-तृण-वृक्षादिकां कदापि । न गति त्यांसि उद्धरिलें ॥ ७१ ॥ तैसेचि दत्तात्रेय परमेश्वर । स्वामी समर्थ पूर्ण ब्रह्मावतार । सर्वांतर्यामी साक्षी निर्विकार । असूनि जगदुद्धार करिताति ॥ ७२ ॥ ज्यांच्या पादस्पर्शें अगाध । पशु-पक्ष्यादिकांचें उघडे प्रारब्ध । जे धीपुरांत परमात्मा शुद्ध । वसूनि बोधिती व्यापक ॥ ७३ ॥ त्या सद्गुरुनाथाच्या

आज्ञेनुसार । सुंदरीनें त्यागिला मर्कटचेष्टा-विकार । साधुवृत्तीनें वर्तली निरंतर । सोडलें शरीर समर्थपायीं ॥ ७४ ॥
मोठ्या समारंभपूर्वक अंतीं । सुंदरीस मिळाली उत्तम गति । इहपर साधूनि सत्कीर्ति । वानरी झाली पारमार्थिक ॥ ७५ ॥
दिनकरराव आनंद शेणवी जातीचे । कारभारी अक्कलकोट संस्थानचे । कांहीं दिवस होते त्यांचे । नेत्रांत विकार जाहला
॥ ७६ ॥ आग होई रात्रंदिवस । वैद्यादिकांचे उपाय देऊनि धनास । बहुत केले परंतु गुणास । नाहीं आले उपचार
॥ ७७ ॥ द्रव्य वेंचूनिही दिनकररावांचे नेत्र । औषधें न बरे झाले अणुमात्र । म्हणती काय करूं ईश्वरी सूत्र । नेणों
काय असेल तें ॥ ७८ ॥ कोणी म्हणती हेंचि बरवें । स्वामिरायासि उपाया पुसावें । पुढती चोळाप्पासि बोलावें । पाठवून
आणिलें ॥ ७९ ॥ कारभारी म्हणती चोळाप्पाला । विनवावें यतियूथपतीला । नेत्रें पीडिलें फार मजला । यदर्थ उपाय
कोणता ॥ ८० ॥ हें ऐकूनि चोळाप्पा उठले । गृहीं येऊनि श्रीपादास कळविलें । त्यांनीं दत्तमूर्तीपुढें कर जोडिले ।
निवेदिलें वृत्त शेणव्यांचें ॥ ८१ ॥ मग वदती दत्तावधूत । हत्तीचें मूत्र घालावें नेत्रांत । तेणें होईल नेत्ररोग शांत ।
परिसी श्रीपाद पंडिता ॥ ८२ ॥ परिसूनि गुरुवाक्य सुखकर । कारभाऱ्यासि कळविलें सत्वर । श्रवण करूनि कारभारी
दिनकर । हांसले मंडळीसहित ते ॥ ८३ ॥ सत्ता अधिकार धनादिक । अनुकूलकालीं मदांध लोक । वियोग कालीं
अवश्यक । ताठा उतरून नम्र होती ॥ ८४ ॥ साधु संत महात्मा गुरुवर । भलभलते सांगती औषधोपचार । असो करूनि
पहावे एकवार । म्हणूनि मूत्र मागविलें ॥ ८५ ॥ गजमूत्र तीन दिवस । नेत्रांत घातलें उग्र वास । आराम जाहला
डोळियांस । उष्ण विकार मावळला ॥ ८६ ॥ आरोग्य होऊनि स्वच्छ दिसूं लागलें । मग दिनकररावास नवल वाटलें ।
म्हणती अवतारिक पुरुष चांगले । यतींद्र सत्य आहेत ॥ ८७ ॥ आम्हीं अधिकार-मदांध फार । महात्मा पुरुषांचा करितों
तिरस्कार । अनुचित अधर्म कर्म प्रखर । आमचें आम्हांस बाधतसे ॥ ८८ ॥ अधिकार सत्ता सौभाग्य । असतां धर्मन्यायें

वर्तावें योग्य । परोपकार दया योग्यायोग्य । पाहूनि करणें विचारीं ॥ ८९ ॥ स्वामि-दर्शनासि आजपर्यंत । मी कधीं न गेलों उन्मत्त । तथापि करुणाकर समर्थ- । कृपें नेत्र स्वच्छ झाले ॥ ९० ॥ त्या दिनकररावांची प्रकृति । अनारोग्य दिवसेंदिवस अशक्ति । त्यासाठीं ते सोलापुरास जाती । औषधोपचार करावया ॥ ९१ ॥ जातेवेळीं दिनकरराव । संगें घेऊनि नाझर गोपाळराव । वंदूनि श्रीगुरुदत्तदेव- । चरणीं प्रार्थना करितसे ॥ ९२ ॥ हे कारभारी सोलापुरास । जातात औषध घ्यावयास । तेव्हां समर्थ वदती नाझरास । साकर कोठूनि उपजते ॥ ९३ ॥ गोपाळराव म्हणे गुळापासून । तेव्हां यतीश्वर म्हणती गुळ कोठून । गोपाळ वदे इक्षुरस काढून । अग्निस्पर्शें गूळ होतो ॥ ९४ ॥ समर्थ म्हणाले तर मग । झडकरी लावावी हो आग । तंव कारभारी बोले मी निरोग । होऊनि केव्हां येईन ॥ ९५ ॥ सद्गुरु वदती हे दिनकरा । आतां येथें येणें विसरा । मग ते जाऊनि सोलापुरा । गेले यमपुरा अल्प दिनीं ॥ ९६ ॥; अगाध देवगुरुचरित्र । श्रवणपठणें होय मनेप्सित । श्रोतीं व्हावें सावधचित्त । परिसावें वृत्त पारशाचें ॥ ९७ ॥ मुंबापुरीचे राहणारे पारशी । बरजोरजी कामदार धीपुराशी । होते त्यांचे आप्त मुंबईसि । नवरोजी नामें गृहस्थ ॥ ९८ ॥ स्वामिमहाराजांच्या अद्भुत लीला । बरजोरजी सांगती नवरोजीला । परंतु सत्य न वाटे तयांला । म्हणून आले अक्कलकोटीं ॥ ९९ ॥ उतरले साहेबांचे बंगल्यांत । तीन दिवस झाल्या उपरांत । द्वारें लावूनि बैसले एकांत । मध्य-रात्रीस नवरोजी ॥ १०० ॥ बाहेर बैसले पहारेकरी । नवरोजी बंगल्यांत मंचकावरी । बैसले होते त्यांचे शेजारीं । खुर्च्या होत्या मांडिल्या ॥ १ ॥ त्यांतील एका काष्ठासनावर । अकस्मात येऊनि योगिराजेश्वर । बैसले स्वामिराय दिगंबर । नवरोजीनें विलोकिलें ॥ २ ॥ स्वामिमहाराजांस दंडवत । साष्टांग करूनि प्रणिपात । म्हणे द्वारें बंद भृत्य-संरक्षित । असतां कैसे आलांत ॥ ३ ॥ चमत्कार वाटूनि नवरोजीस । म्हणे हे परमेश्वर-अंश । मग आपले

प्रपंच-वृत्तांतास निवेदिलें लीनतेनें ॥ ४ ॥ फिटूनि ऋण पुष्कळ संपत्ति । मजला व्हावी अधिकारप्राप्ति । परिसूनि
त्रैमूर्तिराज वदती । होतां देशील काय आम्हां ॥ ५ ॥ नवरोजी वदे कर जोडून । प्राप्तीचा चतुर्थांश खचित देईन ।
त्यावरी सांगती अत्रिनंदन । नर्मदेकडे जावें त्वां ॥ ६ ॥ आशीर्वचन परिसूनियां शुभ । तांबूल कुटण्यासि केला प्रारंभ ।
गोष्टी चालल्या असतां क्षेम । यतिनाथ गुप्त जाहले ॥ ७ ॥ नवरोजी पाहे बाहेर आंत । तों न दिसती दत्तावधूत ।
म्हणे नवल वर्तलें अद्भुत । प्रत्यक्ष भगवंत हे असती ॥ ८ ॥ नंतर द्वारें उघडूनि पाहत । तों भृत्य संरक्षक निजले
आहेत । तयांसि करूनि जागृत । शोध करी समर्थांचा ॥ ९ ॥ निरुद्ध द्वारें लहान थोर । असूनि कैसे आले यतीश्वर ।
आणि कैसे कोठें गेले हा चमत्कार । पाहूनि विस्मित नवरोजी ॥ ११० ॥ भृत्य शोधार्थ पाठविले । गांवीं उद्यानादिकांत
न दिसले । पुष्कळांनीं सत्यत्वें सांगितलें । कालचि गेले रामपुरा ॥ ११ ॥ दोन कोश अक्कलकोटाहूनि । आहे खेडेगांव
रामपुर म्हणूनि । तेथें स्वामिमहाराज मोक्षदानी । काल सकाळीं गेले हो ॥ १२ ॥ परिसूनि हें नवल वृत्त । नवरोजी
गेला रामपुरासि धांवत ॥ प्रेमें घाली दंडवत । म्हणे समर्था क्षमा करा ॥ १३ ॥ सर्वांतर्यामी पुसती जगन्नाथ । सुखरूप
आहांना हो शेठ । तांबूल आमुचा राहिला तेथ । सांगा यथार्थ कुशल तें ॥ १४ ॥ रात्रीच्या अनुभवाची खूण ।
विड्याचें मजला झालें विस्मरण । त्या तांबूलाची दिधली आठवण । दावूनि सगुण यतिरूप ॥ १५ ॥ हे नसती केवल
वेषधारी । असती साक्षात् परमेश्वर अवतारी । जगदुद्धारक लीलाधारी । जाणते अंतरीं दयाळु ॥ १६ ॥ सर्व द्वारें
निरुद्ध असूनि । संरक्षकही उभे ठेले रजनीं । ऐसें असतां आले कोठूनि । मला भेटूनि कोठें गेले ॥ १७ ॥ आपलें
कृत्य अवतारिक । अघटित आहे अमानुषिक । परोपकारार्थ अलौकिक । हें मजला निश्चित समजलें ॥ १८ ॥
गुर्जर देशीचें आलें पाचारण । यथार्थ करावें त्वां प्रयाण । परिसूनि आशीर्वाद भाषण । यथार्थ कल्याणकारक तें

॥ १९ ॥ साष्टांग घालूनि लोटांगण । श्रीफलादि करूनि समर्पण । नवरोजी मानूनि आज्ञा प्रमाण । आले मुंबापुरीस ॥ १२० ॥ श्रीमंत मल्हारराव महाराजांकडून । नवरोजींस आणा बोलावून । ऐशी लेखी राजाज्ञा घेऊन । आले न्यावया नवरोजीला ॥ २१ ॥ बडोद्यासि गेले तात्काळ । भेटूनि महाराजांसि कुशल । परिश्रम करूनि पुष्कळ । कार्य सिद्ध जाहलें ॥ २२ ॥ श्रीमंत मल्हारराव गायकवाड । राज्यासनीं विराजले आरूढ । त्यांनीं नवरोजीस द्रव्य उदंड । दिधलें वस्त्रालंकारादि ॥ २३ ॥ नंतर नवरोजीस स्वामी-समर्थांची । आठवण झाली कृपेची । मग तत्काल अक्कलकोटाची । वाट धरिली तयानें ॥ २४ ॥ येऊनि अक्कलकोट-ग्रामांत । स्वामिरायांचे चरणीं लोळत । म्हणे जगदीश्वर अनंत । ऋणमुक्त केलें मजलागीं ॥ २५ ॥ आपल्या कृपावलोकनेंकरून । कोण सुखी न होई जन । सर्वत्र सर्वदा आनंद-निमग्न । होती पावन दयाळा ॥ २६ ॥ आपणांस विनयपूर्वक । गुजराथ देशाचे नृपनायक । मल्हारराव महाराज भाविक । त्यांनीं एक विचारविलें ॥ २७ ॥ श्रीदत्तात्रेय-स्वामिराजांस । समारंभासहित खास । आणवावें स्वराजधानीस । ऐसा हेतू नृपाचा ॥ २८ ॥ यास्तव मज समागमें । दिधली ब्राह्मणादिक मंडळी प्रेमें । तदा ती मंडळी अनुक्रमें । करिती नमन यतिवर्या ॥ २९ ॥ मग त्यांनीं प्रति दिवशीं । वेंचूनि गुर्जराधिपतीच्या धनासि । ब्राह्मणादिक सर्व सेवेकऱ्यांसि । आणि ग्रामस्थांसि आग्रहें ॥ १३० ॥ नित्य पक्वान्नें रसिक सोज्ज्वल । नूतन नित्य-श्री नित्य-मंगल । भोजन-समारंभ मोठा दंगल । अक्कलकोटीं चालविला ॥ ३१ ॥ समर्थांसि न्यावया बडोद्याप्रति । अनेक प्रकारचे यत्न करिती । अनेक गप्पा थापा मारिती । जगद्गुरूसि न्यावया ॥ ३२ ॥ घालूनि मोठमोठे मध्यस्थी । खटपट सेवेकरी धनार्थी । परस्परें स्थायिक स्वार्थी । न कळतां प्रभुराया ॥ ३३ ॥ सर्वांतर्यामी सर्वसाक्षी । अनंत-ब्रह्मांड-व्यापार निरीक्षी । जगदुत्पत्ति करवूनि संरक्षी । संहारही करितसे ॥ ३४ ॥ त्रैलोक्याचा स्वामी सूत्रधार ।

सर्वाधिष्ठान जगदाधार । द्रष्टा-श्रोता-मंता-विज्ञाता निर्धार ।. निर्विकार श्रुति वर्णित ॥ ३५ ॥ धरिला ज्यानें संन्यास वेष । उपनिषद्-मथितार्थ विशेष । अविद्या-मायारहित निर्विशेष । परब्रह्मस्वरूप विराजित आहे ॥ ३६ ॥ योगी-मुनिजनांचें जो ध्येय । भक्त-ज्ञानियांचें असे ज्ञेय । सच्चिदानंद जो अप्रमेय । हेतु-दृष्टांत-वर्जित ॥ ३७ ॥ ऐसा निरुपम विराजमान् । तयासि नेऊं म्हणती अज्ञानी जन । गुप्त रीतीनें शिबिकेंत बैसवून । घेऊन जाऊं म्हणती ते ॥ ३८ ॥ अविद्यायुक्त देहाहंकार । जेथें माजला संसार बडिवार । समीप असूनि जाहला दूर । पडिला विसर प्रापंचिकां ॥ ३९ ॥ प्राप्तीचा चतुर्थांश देण्याची । वासना न राहिली नवरोजीची । कार्यापुरते आर्जव करण्याची । संसारिकांची खोड असे ॥ १४० ॥ 'गरज सरो आणि वैद्य मरो' ऐशी । लोकांची म्हण येते अनुभवासि । आपली वासना जैशी । तैशीच फलद्रूप होतसे ॥ ४१ ॥ तात्या हर्षे रामभाऊ मालसे । समर्थांसि न्यावया घेऊनि अपैसे । बरेच लोक अनायासें । आले होते कार्यार्थी ॥ ४२ ॥ भांगेंत घालूनि धोत्र्यादिकांचें बीज । स्वामिरायांसि पाजविलें सहज । धनप्राप्त्यर्थ सोडूनि लाज । माजले सर्व द्विजादिक ॥ ४३ ॥ तेव्हां स्वामिराजांची प्रकृति । विषारीपदार्थें घाबरली होती । बडोदकर मंडळींचें कापट्य अति । उघडें पडलें सकल हें ॥ ४४ ॥ त्यांत संभावित गृहस्थांनीं । ऐसें साहस करूं नये म्हणूनि । निवारण केलें असतां कपट्यांनीं । अघोर कृत्य केलें हो ॥ ४५ ॥ इतुकें जरी साहस झालें । तथापि समर्थें विषादा न मानिलें । तेचि समर्थ पूर्ण म्हणिजेले । अभेद समदर्शी जे ॥ ४६ ॥ यशवंतराव येवल्या जासूद । दोन वेळां आला होता धनयुक्त मद । श्रीमद्दत्तात्रेय सच्चिदानंद । स्वामिराजांसि न्यावया ॥ ४७ ॥ मल्हारराव भूपति निर्मल । धार्मिक शूर शांत दयाल । त्यांची शुभेच्छा आलेलें मंडळ । यांचेनि पूर्ण झाली नसे ॥ ४८ ॥ येथें पाहिजे केवल शुद्धभाव । तेथेंचि तिष्ठे देवाधिदेव । असो आलेल्या लोकांस सदैव । आशीर्वाद दिधला गुरुनाथें ॥ ४९ ॥ तात्या हर्षे

आणि रामभाऊंला । समर्थांचा आशीर्वाद फळला । वृद्धापकालीं संरक्षायाला । पुत्र जाहले दोघांसि ॥ १५० ॥ दत्तात्रेय-
स्वामींच्या जयजयकारा । वर्णिती त्रैमूर्तींच्या अवतारा । आनंदें गेले ते स्वनगरा । हर्षनिर्भर होऊनि ॥ ५१ ॥
गळती अहंकार वाद निंदा । सदा अनन्य गुरुचरणारविंदां । ब्रह्मनिष्ठ वामनाचा हाचि धंदा । यतींद्रलीला वर्णावी
॥ ५२ ॥ श्रीगुरुलीलामृत-श्रवणपठणें । मनोवांछित पूर्ण होणें । संशय-विपर्यय समूल टाकणें । मग कां न पावणें
ब्रह्मपद ॥ ५३ ॥ तेचि कथा पुढिले अध्यायांत । वदविता श्रीगुरुदेवदत्त । लीलाधारी स्वामी समर्थ अनंत ।
भवार्णवीं तारक जो ॥ ५४ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदशास्त्रपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित ।
द्वित्रिंशतितमाध्याय गोड हा ॥ १५५ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे द्वित्रिंशतितमोऽध्यायः समाप्तः ॥ ३२ ॥
श्रीगुरुदेवदत्त—स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय तेहतिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्त-दिगंबर-स्वामिने नमः ॥ ॥ शिष्य प्रार्थी गुरु वक्त्यासि । गुरुलीलामृत
श्रवणासि । तृषार्त झालों शुद्ध मानसीं । करवावें पान सत्वरें ॥ १ ॥ गुरु वदती वत्सा परीस । अगम्य लीला
ब्रह्मादिकांस । संक्षेपें सांगूं इतिहासास । जगद्धितास यथामतीं ॥ २ ॥ एक तिर्गुळ विठ्ठलराव । हैद्राबादेस वसे सदैव ।
माणिकप्रभूंचे चरणीं भाव । असे शुद्ध तयाचा ॥ ३ ॥ निंद्यकर्म-वर्तनावरून । मामलतीचे कामावरून । तयासि
टाकिलें काढून । त्या मोगल सरकारांनीं ॥ ४ ॥ आली कारागृहवासाची वेळ । संकटीं पडिला विठ्ठल व्याकुळ ।
आतां कोठें जावें म्हणूनि पळ । काढिला विठ्ठल त्रिपल्लीनें ॥ ५ ॥ माणिकप्रभूंकडे जावें जरी । तेथें वारंटें धरतील तरी ।
शृंखला घालूनि पायीं करीं । कारागारीं नेतील ॥ ६ ॥ म्हणोनि रातोरात निघाला । माध्यान्हरात्रीच्या समयाला ।
विठ्ठलराव अक्कलकोटीं आला । शोध करीत समर्थांचा ॥ ७ ॥ त्या समयीं योगीराज दत्तावधूत । सेखनुरुद्दीन अवलियांचे
दर्ग्यांत । प्रिय सेवकजनांसमवेत । होते निद्रित जगद्वंद्य ॥ ८ ॥ तेथें विठ्ठलराव गेला न कळत । पूजाऱ्यास करविलें
जागृत । म्हणे दर्शन करवूनि मसलत । सांगा मजला तात्काल ॥ ९ ॥ याप्रकारें गडबड चालतां । जागृति आली
दत्तावधूता । विठ्ठल समीप जाऊनि चिंता-। युक्त संकट निवेदिलें ॥ १० ॥ समर्थ वदती दुष्ट दुर्जना । कां रे परस्त्रिया आणि
परधना । अपहारिलें त्वां नाना । येथें पातलासि पापिष्टा ॥ ११ ॥ कर्म करावें हांसत हांसत । परिणामीं भोगावें मग रडत ।
तुझ्या बापाचे आम्ही आहोंत । सेवक काय खला रे ॥ १२ ॥ मग वदे विठ्ठलराव तिर्गुळ । उद्धरिली गणिका अजामिळ ।

मी खल दुष्ट पापात्मा केवळ । चरणांजवळ पातलों ॥ १३ ॥ आतां कसेंही करून दासास । संभाळावें हो जगन्निवास । त्रैलोक्यांतही मला या वेळेस । अन्य त्राता नसे कीं ॥ १४ ॥ नंतर आज्ञापिती यतिवर्य । तात्काळ जावें त्वां निर्भय । क्षमा केले तुझे अन्याय । सावध होय आतां तरी ॥ १५ ॥ विठ्ठल म्हणे झाल्यास सुखें माझी सुटका । तरी अर्पीन एक सहस्र मुद्रिका । साष्टांगीं नमूनि जगन्नायका । हैद्राबादेस तो गेला ॥ १६ ॥ वरिष्ठांनीं विठ्ठलासि पाहून । सोडिलें अपराध मुक्त करून । मग विठ्ठल त्वरेनें गेला निघून । माणिकप्रभूंच्या स्थानासि ॥ १७ ॥ माणिकप्रभूंचे पुतणे । आप्पासाहेब सज्जन शहाणे । विठ्ठलासि वदती जाऊन येणें । सहस्र मुद्रिका देऊनि ॥ १८ ॥ ऐकून विठ्ठल लाजला । अक्कलकोटीं धांवूनि आला । दत्तगुरूंच्या चरणीं लागला । तेव्हां वदती गुरुनाथ ॥ १९ ॥ कारागृहमुक्त झाला असून । का रें न देशी आमचें धन । लोभी तूं असशी कृतघ्न । करिशी प्रतारणा आम्हांसि कां ॥ २० ॥ ऐसें म्हणूनि पायांतील पादुका । दिधल्या तया कामनिका । मग त्यानें समर्थांसि राम-नामिका । सुवर्ण-मुद्रिका अर्पिली ॥ २१ ॥ आंगठी ती पस्तीस रुपयांची श्रेष्ठ । आणि दिधले रोख रुपये पासष्ट । ऐसा विठ्ठल होऊनि रहित-कष्ट । गेला आपल्या सदनासि* ॥ २२ ॥; श्रोती परिसा सावधान । ठाकुरदासबुवांचें आख्यान । सातारा जिल्ह्यांत तारगांव म्हणून । तेथील राहणारे बुवा हे ॥ २३ ॥ कान्यकुब्ज द्विज असून । श्रीकृष्ण बापू नामाभिधान । सुस्वर गायन आणि कीर्तन । करित होते बापुबुवा ॥ २४ ॥ पंढरीस निंद्यकर्म केल्यावरून । अंगावर कुष्टरोग झाला उत्पन्न । भार्या ऋतुमती कुलशीलवान् । सती सेवेसि तत्पर असे ॥ २५ ॥ ठाकुरदासासि लाज वाटे । शरीर कुष्टें न दिसे गोमटें । आमचें प्रारब्धकर्म ओखटें । म्हणती उपाय करावे ॥ २६ ॥ मग नृसिंहवाडीस जाऊन राहिले । गुरुचरित्र-सप्ताहा

---

* इ. स. १९०६

मांडिलें । श्रीमद्दत्तात्रेयांसि आराधिलें । देहआरोग्य व्हावया ।। २७ ।। तेथून गाणगापुरास । यावयासि निघाले ठाकुरदास । पादमार्गें सोलापुरास । श्रीकृष्ण बापू पातले ।। २८ ।। तेथूनि पादचारी मार्ग सरळ । दोहों बाजूंस वृक्षछाया विशाल । गांवें कांहीं लांब जवळ । शोभे मार्ग सडकेचा ।। २९ ।। सहकुटुंब बापूबुवा । शकटावरी बैसूनि गाती धांवा । आले अक्कलकोट गांवा । जवळीं तिसरे प्रहरीं ते ।। ३० ।। अक्कलकोट गांव आणि पेठ । या दोहोंमध्यें सोलापुरची वाट । उद्यानें सुंदर तरु घनदाट । नानाप्रकारें शोभती ।। ३१ ।। त्या मार्गीं चिंच वृक्षाखालीं । चोळाप्पाचे गृहामागें चंद्रमौली । स्वामिरायांची स्वारी बैसली । ती पाहिली बुवांनीं ।। ३२ ।। मनोहर मूर्ति तेजस्वी । देखूनि जपी यति तपस्वी । समाधानी होती यशस्वी । दर्शनें राव रंकादिक ।। ३३ ।। ऐशा योगीश्वर जगद्गुरूस । विलोकूनि बुवा ठाकुरदास । मनीं चिंतिती हे नव्हे मानव खास । अवतारिक असतील ।। ३४ ।। बुवासि वदती यतिराज पुण्यश्लोक । मनुष्य असो वा अवतारिक । पुढील मार्ग क्रमावा हो गायक । संसार-धक्के खात जा ।। ३५ ।। ठाकुरदासासि वाटलें नवल । म्हणती अंतर्साक्ष दिसती पुरुष केवल । अंतरीं नमूनि विचारशील । मार्ग क्रमिती क्षेत्राचा ।। ३६ ।। जाऊनि गाणगापुरासि । करूं लागले ईश्वरसेवेसि । गुरुचरित्र नेमें पठणासि । करिती उपवास बुवा ते ।। ३७ ।। बापूबुवासि झाला दृष्टांत । महापादुकांचें पूजन केशर-कस्तुरीयुक्त । करूनि जावें जेथें अवधूत । चिंचेखालीं देखिले ।। ३८ ।। तदनंतर पादुकांचें पूजन । करूनि यथाशक्ति समाराधन । श्रीमन्नृसिंह-आज्ञा घेऊन । बुवा आले धीपुरीं ।। ३९ ।। श्रीफलादिक पुढें ठेविलें । प्रेमें दत्तात्रेयस्वामींसि नमिलें । करद्वय जोडूनि उभे राहिले । ठाकुरदास तेधवां ।। ४० ।। तों भक्तवत्सल भवभयहरण । मुखें बोलती पुरुषोत्तम भाषण । केशर कस्तुरीचें केलें समर्पण । द्यावें आणून आम्हांसि ते ।। ४१ ।। अंतरींचें रहस्य केशर-कस्तुरीचें । नृसिंह-आज्ञेनुसार साचें । पूजनसमयीं न

अर्पिल्याचें । अंतर्साक्षित्वें जाणितलें ॥ ४२ ॥ मग ठाकुरदासांनीं साष्टांग नमन । करूनि अर्पिली केशर-कस्तुरी जाण । मासत्रय सेवेसि राहून । कीर्तन गायन करिती ॥ ४३ ॥ एके दिवशीं समर्थें कीर्तनांत । चिलमीवरील काष्ठ जळत । अंगावरी फेकिलें क्षणांत । ठाकुरदासांनीं तो प्रसाद स्वीकारिला ॥ ४४ ॥ हें उदकीं उगाळूनि अंगासि । लावा म्हणती हृषीकेशी । शिरसा मान्य करून प्रभु-आज्ञेसि । तैसें करिती ठाकुरदास ॥ ४५ ॥ प्रासादिक दग्ध काष्ठ उगाळून । बुवा सर्वांगीं करिती चर्चन । मास-पक्षांत समर्थकृपेंकरून । कुष्ट रोग नष्ट झाला ॥ ४६ ॥ प्रसन्न होतांचि योगाधीश्वर । आरोग्य स्वच्छ झालें शरीर । बुवांचे आनंदास ना पार । सर्वांसि नवल वाटलें ॥ ४७ ॥ पुढें बुवास मुंबापुरींत । भाऊ रसूल सावकार प्रख्यात । त्यांनीं स्थान बांधून दिधलें विस्तृत । ठाकुरद्वार सुंदर तें ॥ ४८ ॥ तेथें स्वामिराजांच्या चरणपादुका । स्थापूनि गुरुमार्ग दाविती लोकां । माघ वद्य गुरुप्रतिपदेस प्रत्येका । उत्साहास येती धीपुरीं ॥ ४९ ॥ मस्तकींची टोपी गुरुदेवदत्त । एकदां फेंकिती कल्याणयुक्त । श्रीकृष्णबुवांचे पत्नीचे ओटींत । प्रसाद टोपी पडली ती ॥ ५० ॥ तोचि उत्तम शुभप्रद शकून । बाईस लाधलें पुत्रसंतान । सुरूप गंभीर गुणी बुद्धिमान् । 'गुरुनाथ' नाम ठेविलें त्याचें ॥ ५१ ॥ जगन्नाथबुवा प्रसिद्ध । त्यांचे बंधु ठाकुरदास भक्त शुद्ध । रसिक कीर्तनीं नानाविध । गाती संतचरित्रें ॥ ५२ ॥ मोठमोठ्या पत्तनीं शहरीं । संचरती सत्पुरुष सदाचारी । ठाकुरदास-बुवा विचारी । मोक्षाधिकारी विद्वान् ॥ ५३ ॥ त्यांचे गुरुनाथ चिरंजीव । मुंबापुरीं मठांत वसती सदैव । सुस्वर गायन कीर्तन शुद्धभाव- । युक्त करिती सन्मार्गी* ॥ ५४ ॥; आतां त्रिविक्रम मुनीचा इतिहास । शिष्या सावधचित्तें परीस ।

---

* ठाकुरद्वारीं हल्ली जी व्यवस्था आहे तिची हकीकत - 'इ. स. १९०६ सालीं गुरुनाथबुवा निवर्तल्यामुळें तेथील सेवेकरी रा. रा. बाळाजी हरिश्चंद्र तळपदे व रा. रा. वामनराव सोकरजी नवलकर वगैरे मंडळींनीं 'श्रीस्वामी-समर्थ-मंडळ' स्थापून श्रीस्वामी समर्थांची सेवा चालविली आहे.

रामतीर्थ-क्षेत्रीं निवास । होता त्रिविक्रम यतीचा ॥ ५५ ॥ जिल्हा बेळगांव अथणी । तालुक्यांत रामतीर्थ शिरोमणि । तेथें त्रिविक्रम संन्यासी मुनि । वसती करिती तीर्थयात्रा ॥ ५६ ॥ गाणगापुरीं नृसिंहसरस्वती-। अवतार प्रत्यक्ष त्रयमूर्ति । त्यांचे प्रिय शिष्य त्रिविक्रम-भारती । कुमसीस होते प्रख्यात ॥ ५७ ॥ भीमातीरीं कुमसी क्षेत्र । रामतीर्थ क्षेत्र तैसें पवित्र । त्रिविक्रमभारती ख्यात सर्वत्र । तैसेचि त्रिविक्रम संन्यासी हे ॥ ५८ ॥ अक्कलकोटचे शहाजी नृपति । ज्यांना आप्पासाहेब भोंसले म्हणती । त्यांचे राजवाड्यांत कोणी म्हणती । पिशाच्च-संबंधबाधा असे ॥ ५९ ॥ ती बाधा व्हावी निवारण । आणि पुत्रसंतान व्हावें दीर्घायु प्रमाण । म्हणूनि त्रिविक्रम यतींसि पाचारण । करूनि आणिलें प्रज्ञापुरीं ॥ ६० ॥ त्यांचें यथासांग महापूजन । करवूनि ब्राह्मण-समाराधन । महीवरें यतिश्रेष्ठास संतोषवून । प्रसन्न मन करविलें ॥ ६१ ॥ मग नृपवरा त्रिविक्रम यति । वदती सर्व बाधा होईल प्रशांति । शूर उदार चतुर पुत्रसंतति । निश्चयें होय यशस्वी ॥ ६२ ॥ आपुलें महद्भाग्य मुख्य कारण । थोडे दिवसांत अवतार पूर्ण । परमहंस यतींद्र नारायण । येतील आपल्या ग्रामांत ॥ ६३ ॥ ग्रामोग्रामींचे अगणित जन । येतील करावया नित्य दर्शन । जाणावें सत्य सत्य त्रिवचन । संशय लेशही न धरावा ॥ ६४ ॥ कांहीं शिष्य त्रिविक्रम यतींच्या समागमें । होते त्यांत एक रामाचार्य नामें । जमखिंडीकर वैदिक विप्र प्रेमें । वसत होता सन्मार्गी ॥ ६५ ॥ नित्य तीर्थप्रसाद द्यावयास । यतीनें ठेविलें रामाचार्यास । नंतर त्रिविक्रमयतिवर्यास । नृपवरें आनंदें बोळविलें ॥ ६६ ॥ पुढें कांहीं दिवसांनंतर । श्रीमत्परमहंस पूर्ण-ब्रह्मावतार । अक्कलकोटीं दत्त-दिगंबर । जगदुद्धारार्थ पातले ॥ ६७ ॥ लीलाविग्रही भक्तवत्सल । स्वेच्छाचारें संचरती कृपाल । अनेक शुद्ध जनांवरी निर्मल । प्रसादानुग्रह करिती ते ॥ ६८ ॥ ते रामाचार्य झाले राजाश्रित । पत्नी गयाबाई शास्त्राचारयुक्त । तत्पर सदा असे पतिसेवेंत । उभयतां कुलीन सज्जन

हो ॥ ६९ ॥ यांसि कन्यासंतति असून । झालें नव्हतें पुत्रसंतान । म्हणती पोक्त वय आतां पुत्ररत्न । कैचें होय आम्हांसि ॥ ७० ॥ परी स्वामिराजकृपेंकरूनि । गर्भिणी झाली आचार्यपत्नी । माहेरीं भेटावयास जाऊनि । राहिली गयाबाई ती ॥ ७१ ॥ कृष्णातीरीं शूर्पाली क्षेत्र । नृसिंह-देवस्थान असे पवित्र । तेथें माहेरीं वडील छत्र । म्हणूनि सती राहिली ॥ ७२ ॥ इकडे रामाचार्य अक्कलकोटीं । चिंतातुर वसती हिंपुटी । स्वामिराज चरणांची भेटी । नियमें नित्य घेती ते ॥ ७३ ॥ रामाचार्यांचे सदनांत । रामदास नामें वसती संत । भिक्षावृत्ति तीव्र वैराग्ययुक्त । शांत दांत ज्ञानी जे ॥ ७४ ॥ ज्यांसि म्हणती समर्थ कबीर । त्यांसि हाक मारूनि सत्वर । आज्ञापिती दत्तदिगंबर । हें लिखितपत्र घेईं रे ॥ ७५ ॥ रामदास विनवी स्वामिराया । काय करूं कागदास या । समर्थ वदती कोमट्यास द्या । पुत्र जाहला म्हणून ॥ ७६ ॥ स्वामीसमर्थ रामाचार्यांप्रति । ‘कोमटी’ ऐशा नामें बोलाविती । तें शुभपत्र त्या रामाचार्यांचे हातीं । दिधलें रामदास साधूंनीं ॥ ७७ ॥ रामाचार्य वदे दत्तात्रेया । कागद कशाचा असे स्वामिराया । समर्थ सांगती आचार्या । पुत्र झाला परियेसीं ॥ ७८ ॥ हा पहा गणपति असें म्हणूनि । स्वामिराय मुरलीधराचे देवळीं जाऊनि । खेळत बैसती भक्तांलागूनि । देती आशीर्वचनाला ॥ ७९ ॥ नंतर एक मुहुर्तांत शुभपत्र । आलें कीं रामाचार्यांसि लाधला पुत्र । स्वामी-समर्थांची लीला विचित्र । इहपरत्रदायक ऐशी ॥ ८० ॥ गणपतिसारिखा ठेंगणा । सुरूप सुंदर पुत्र देखणा । कृष्णाचार्य-नामें जाणा । गृहस्थाश्रमीं वर्ततसे ॥ ८१ ॥ ते रामाचार्य वारल्यावर । कांहीं गेलिया संवत्सर । गयाबाई निजधामासि नंतर । गेल्या देह त्यागूनि ॥ ८२ ॥ रामाचार्यांची कन्या भीमा । विगतधवा शास्त्रनेमा- । प्रमाणें वर्ते निष्कामा । भक्तिज्ञान संपादूनि ॥ ८३ ॥ परमेश्वराचें विध्युक्त पूजन । वेदांत-ग्रंथ नित्य पठण । करितसे कीर्तन पुराण । वागे कुलीन वृत्तीनें ॥ ८४ ॥ रामाचार्यांचे एक तनय । उंच

ज्याचें असे तरुण वय । पूर्ववत् चालतसे राजाश्रय । त्या कृष्णाचार्याचा ॥ ८५ ॥; विद्वान घराण्याचा इतिहास ।
त्रिविक्रमयतीच्या आशीर्वादास । संक्षेपें कथूनि श्रोत्यांस । पुढें सुरस कथानक वर्णितों ॥ ८६ ॥ औरंगाबाद् येथील ।
चावल-दरवाजाजवळ । हिंदुस्थानी ब्राह्मण वसती सबल । लालासाहेब नामाचे ॥ ८७ ॥ त्यांस हैद्राबादेस योग्य
नोकरी । होती निजाम सरकारचे पदरीं । कांहीं दिवस गेलियावरी । कुष्ट रोग दुर्धर उद्भवला ॥ ८८ ॥ दोन्ही
हातांसि भरला श्वेतकुष्ट । म्हणून दिसूं लागले फार वाईट । लोकांत नमन करितां स्पष्ट । दिसे म्हणून लाज वाटे
॥ ८९ ॥ रोग उद्भवला पूर्ववयांत । तेणें लालासाहेब झाले उद्विग्नचित्त । व्यापार धंदा कांहीं नावडत । हे नामांकित
गृहस्थ ॥ ९० ॥ त्यांस कोणीं ग्रंथांतरींचें वचन । सांगितलें कीं हैद्राबादेहून । 'आलवाल' म्हणूनि दोन योजनें स्थान ।
व्यंकटेशाचें सुंदर आहे ॥ ९१ ॥ हें व्यंकटेश-दैवत असे जागृत । पुष्करिणी वापी तीर्थ प्रख्यात । मासत्रय स्नान
केलिया त्या तीर्थांत । महान् रोग विनाशती ॥ ९२ ॥ त्रिकाल सप्ताह केलिया स्नान । शीतज्वरादिक जाती पळून ।
रथोत्साह-समारंभ कार्तिक कृष्ण- । अमावास्येसि होतसे ॥ ९३ ॥ प्रति संवत्सरीं रथोत्साह । जमे नरनारी आदिक
समूह । यात्रा भरे संत-हरिदासांसह । येती गायकादि गुणीजन ॥ ९४ ॥ प्रसिद्ध नरेंद्र बहादुर । त्यांचें हें आलवाल
ग्राम सुंदर । त्या व्यंकटेशाचें स्थानक्षेत्र । दर्शनीय विराजित असे ॥ ९५ ॥ ऐसें परिसूनि लालासाहेब विप्र । त्या स्थलीं
गेले क्षिप्र । दर्शन स्नान दानादि केलें पवित्र । आरोग्य काया व्हावया ॥ ९६ ॥ परी किंचित् न वाटला गुण । तेणें
लालासाहेबासि वाटले क्लेश द्विगुण । हैद्राबादेसि गेले परतून । परम खिन्न-मानसें ॥ ९७ ॥ तेथें शालिबंडा-पेठेंतील ।
कोणी गृहस्थ सत्यस्वभावशील । राजे रायरायाकडील । अक्कलकोटीं आले होते ॥ ९८ ॥ श्रीमद्दत्तात्रेय स्वामिराजांचें ।
स्वानुभवें दर्शन चरणकमलांचें । त्यांनीं कथिलें चरित्र हिताचें । लालासाहेबांसि निज गुज ॥ ९९ ॥ ऐकूनि

लालासाहेब द्विज बोलती । आलवालीं श्रम केले अति । त्यां सार्थक काय जाहलें पुढती । अन्य होणार आतां ॥ १०० ॥ ते लालासाहेब एके दिवशीं । रात्रौ माडीवरी उद्विग्न मानसीं । स्वसदनीं मध्यान्ह-रजनीसी । पडिले होते मंचकीं ॥ १ ॥ कृष्णपक्ष अपरात्री समय । तों एक मोठी कपिला गाय । समीप उभी गुणरूपसौंदर्य । असे लखलखित शृंगी ती ॥ २ ॥ लालासाहेब पाहूनि तिजसि । उठूं लागले हांकावयासि । तों मध्येंचि विचार करिती मानसीं । कीं द्वारें बंद असतांही ॥ ३ ॥ मोठी पुष्ट धेनु जिन्यांतून । कैशी आली पायऱ्या वेधून । मीं स्वयेंही जागृत असून । पाउलें वाजतां न ऐकिलीं ॥ ४ ॥ जों गायीकडे दृष्टि केली । तों ती अंगावर धांवली । इतुक्यांत धेनूचे पश्चात् मूर्ति पाहिली । जटाधारी साधूची ॥ ५ ॥ लालासाहेब वदती आपण कोण । साधु म्हणे गोरक्षक जाण । पुन्हां लालासाहेब करिती प्रश्न । द्वार निरुद्ध असतां कैसे आलां ॥ ६ ॥ ही धेनु कोणाची तें सांगावें । जटाधारी म्हणे ऐका बरवें । सोलापुर गाणगापुराचे मध्यें जाणावें । गौतमीचें गुरुस्थान ॥ ७ ॥ ऐसें वदतां साधु आणि गाय । नाहींशीं झालीं तीं द्वय । देखूनि लालासाहेबां उपजला विस्मय । म्हणती हें काय वर्तलें ॥ ८ ॥ पुढें राजेरायांच्या मंडळींस । सांगूनि इत्थंभूत इतिहासास । विचारिलें गुरुस्थानास । त्या लालासाहेब गृहस्थें ॥ ९ ॥ मग त्यांनीं कथिलें गुरुस्थान । राजधानी अक्कलकोट म्हणून । तेथें परमात्मा जनार्दन । प्रत्यक्ष यतिवेषें विराजती ॥ ११० ॥ हें परिसूनि लालासाहेब निघाले । अक्कलकोट क्षेत्रीं पातले । शेख नुरुद्दीनच्या दर्ग्यांत बैसले । होते तेव्हां जगद्गुरु ॥ ११ ॥ लालासाहेबांनीं घातला नमस्कार । तों वदती स्वामिराय योगीश्वर । आमच्या गायीस माराया क्रूर । उठिला होतासि काय रे ॥ १२ ॥ पोहोंचली अंतरींची खूण । लालासाहेब उभे लज्जित वदन । वदती आपण साक्षात आदिनारायण । शरणागतासि

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

सांभाळा ॥ १३ ॥ आपले दयें अनुकूल सर्व । आहे गृहस्थाश्रमाचें वैभव । परंतु कुष्टरोगें व्याकुल जीव । जाहला
समर्था प्रभुराय ॥ १४ ॥ इतुक्यांत चोळाप्पा प्रिय भक्त । आणि श्रीपादभट अनंत । यांनीं लालासाहेबांचें वृत्त । विनयपूर्वक
निवेदिलें ॥ १५ ॥ मग आज्ञापिती दत्तात्रेय मुनीश्वर । श्वानांसि घालावें अन्न नीर । अमृत वचन ऐकूनि क्षिप्र ।
संतोषित जाहले ॥ १६ ॥ आज्ञेनुसार नित्य नियमें । श्वानांसि भोजन घालिती प्रेमें । थोड्या दिवसांत ऐशा क्रमें ।
कुष्ट गेला समूल ॥ १७ ॥ हैद्राबादेसि लालासाहेब गेल्यावर । आरोग्य स्वच्छ झाले कर । बुद्धिमान् झाले पुत्र प्रौत्र ।
स्वामिसमर्थकृपेनें ॥ १८ ॥ श्रीसमर्थांच्या नैवेद्यास । दहा रुपये प्रति मासास । चौघड्यासही कांहीं दिवस । रक्कम
देत होते लालाजी ॥ १९ ॥ श्रीसमर्थांचे दर्शनास येऊन । यांनीं केलें ब्राह्मणभोजन । स्वामिमहाराज निजधामीं
निमग्न । झाल्यावरी हे येत होते ॥ १२० ॥ ते लालासाहेब आपले देशीं । परिवारासह गेले आनंदेंसीं । दत्तात्रेयस्वामींच्या
चरणसेवेसी । असती तत्पर सुखी सदा ॥ २१ ॥ श्रीस्वामिरायांची अलौकिक । कीर्ति ऐकूनि अगत्य ।
मुक्त मुमुक्षु विषयी लोक । धांवूनि येती दर्शनासि ॥ २२ ॥ हैद्राबाद कोल्हापूर पुणें । सातारा रत्नागिरी ठाणें ।
सोलापूर कर्णाटक प्रगणे । अहमदनगर विजापूर ॥ २३ ॥ धारवाड बेळगांव अलिबाग । मोगलाईंतील बहुतेक भाग ।
खानदेश मारवाड तैलंग । बंगाल-प्रांताकडचेही ॥ २४ ॥ मद्रास मेवाड आणि द्रविड । गुजरात कच्छ काठेवाड ।
नेपाळ पांचाल देश वऱ्हाड । श्रीरामेश्वराकडचेही ॥ २५ ॥ गोवें प्रांत पंजाब कराची । आदिकरूनियां बहुतेक
देशांची । अखंड कीर्ति स्वामिरायांची । परिसूनि येती मनुष्यें ॥ २६ ॥ सर्व देशांतील थोडे बहुत । जन येती
अक्कलकोटांत । विशेषेंकरूनि मुंबईचे भक्त । वारंवार येती जाती ॥ २७ ॥ सर्व जातींचे सर्व ठिकाणचे । जन नित्य
येऊनि निज कल्याणाचे । धर्मार्थ-काम-मोक्षप्राप्तीचे । उलगडे घेती करूनि ॥ २८ ॥; असो मुंबईचे सावकार । भाऊ

रसूल नामक थोर । अक्कलकोटासि पातले सत्वर । दर्शनोत्सुक गृहस्थ ॥ २९ ॥ ते समयीं विरूपाक्ष मोद्याचे गृहीं ।
निःसंग निर्मोह निरग्रही । दत्तात्रेय स्वामी लोकानुग्रही । सहज स्थित होते हो ॥ १३० ॥ साष्टांग दंडवत घालून ।
योगिराजचरणीं नमन । महत्कार्य घडलें म्हणून । भाऊसाहेबें केलें जी ॥ ३१ ॥ पादप्रक्षालन पूजन । नैवेद्य साङ्ग
ब्राह्मणभोजन । करूनि म्हणे मी सत्यत्वें देईन । रौप्यमुद्रिका शतद्वय ॥ ३२ ॥ पुरुषोत्तम यतींच्या समक्ष ।
चोळाप्पा सराफास प्रत्यक्ष । मुद्रिका पाठवून देतों ऐसें विरूपाक्ष । मोदीसमोर सांगितलें ॥ ३३ ॥ भाऊ रसूल धनिक
प्रख्यात । गेले मुंबईस मग परत । निमग्न जाहले प्रपंचांत । मुद्रिकांचें स्मरण नसे ॥ ३४ ॥ झाली व्यापाराची भरभराटी ।
पुत्र-संतान उपजलें स्त्री-पोटीं । आनंदोत्साही घेती भेटी । सदनीं दाटी लोकांची ॥ ३५ ॥ संसार धनाचें वेड भरलें ।
रौप्य-मुद्रिकांसि विसरले । मनासारिखें कार्य झालें । मग कशासि भेटणें ॥ ३६ ॥ ऐसें जाणूनि यतिनायक । पहावें
म्हणती परीक्षा कौतुक । वेष धरूनि चमत्कारिक । जगन्नायक मायावी ॥ ३७ ॥ सावकारद्वारीं संरक्षक । उभे
असती भृत्य लोक । सावकार-आज्ञेविण कोणी एक । सदनांत जाऊं न देती ॥ ३८ ॥ नंतर तीन वर्षांचें बाल- ।
स्वरूप धरूनि ते जगत्पाल । प्रवेशले सदनीं कोमल । बालभाषणें करूनि ॥ ३९ ॥ भोजनीं बसावया पाट । मांडिले
प्रत्येकासि ताट । नाना पक्कान्नरसभरित दाट । सिद्ध झालेलें पाहूनि ॥ १४० ॥ त्या गडबडींत देखूनि बालक ।
सावकारासि वाटलें कौतुक । भोजनासि बैसले तात्कालिक । वदती हें लेकरूं कोणाचें ॥ ४१ ॥ इतक्यांत यतिरूप
धरूनि । जगद्गुरु विराजले सिंहासनीं । वदती सावकारालागूनि । मोक्षदानी पिनाकी ॥ ४२ ॥ आमच्या रौप्य-
मुद्रिका दोन शत । देतोसि किंवा नाहीं निश्चित । ऐसें वदूनि नारायण अच्युत । अंतर्धान पावले ॥ ४३ ॥ सावकार
भाऊ रसूल । तयासि वाटलें भारी नवल । इतरांनींही समक्ष कोमल । पाहिलें बालकाचें यतिरूप ॥ ४४ ॥ भाऊ

**********************************************************************

म्हणती सकलांसि । हे अक्कलकोटचे परम संन्यासी । साक्षात् परमेश्वर आम्हांसि । जागृत केलें दर्शनें ॥ ४५ ॥ आम्ही
विषयी दुष्ट मदांध । क्षमा करूनि आमचे अपराध । कृतार्थ केलें दर्शनें अगाध । ऐसें म्हणूनि निघाले ॥ ४६ ॥ सहकुटुंब
भाऊ रसूल । संगें घेऊनि फल-पदार्थादि विपुल । लोहमार्गें आले तात्काल । अक्कलकोटीं पेठेंत ॥ ४७ ॥
ठाकुरदास बुवासहित । घालिती साष्टांग दंडवत । मुखें गर्जती 'श्रीगुरुदेवदत्त- । स्वामिमहाराजकी जय' ॥ ४८ ॥
मुद्रिकासह वस्त्रालंकार । रुचिर पदार्थ फलें मधुर । अर्पूनि करिती वारंवार । नमस्कार प्रार्थना ॥ ४९ ॥ यतिवर्य
वदती कां रे सावकारा । भोजनीं न म्हटलें भोजन करा । अतिथि-अभ्यागतासि थारा । ग्रासाचा देखील देववेना ॥ १५० ॥
भाऊ म्हणे आजपासून निरंतर । आल्या अतिथीस अन्ननीर । देत जाईन हो दत्तदिगंबर । आज्ञातत्पर वर्तेन ॥ ५१ ॥
मग रुद्राभिषेक विप्र-संतर्पण । करूनि तोषविले उमारमण । स्वीकारूनि आज्ञा प्रसाद जाण । मुंबईस आले परतूनि ॥ ५२ ॥
जयांची अद्भुत अनंत लीला । नेणवे देवादि-मनुष्यांला । तो कथाभाग जाय वर्णिला । पुढिले अध्यायीं यथामतीं
॥ ५३ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदपुराणशास्त्रार्थमथित । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । त्रयत्रिंशतितमाध्याय गोड हा
॥ १५४ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे त्रयत्रिंशतितमोऽध्यायः समाप्तः ॥ ३३ ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

## ॥ अध्याय चौतिसावा ॥

### ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्तात्रेय-स्वामिने नमः ॥ ॥ शिष्यासि गुरुनाथ बोधिती । वेदोपनिषदार्थ यथारीतीं । माया-प्रपंचाचें रूप दाविती । अत्यंत असत्यपणाचें ॥ १ ॥ माया तथा मायारचित । सकल प्रपंच अनिर्बचनीय असत । जैसें मथुरेसमीप वनांत । रात्रीं निद्रिस्त पुरुष झालेला ॥ २ ॥ तो आपले हृदयीं स्वप्नांत । सूर्यग्रहणयुक्त समुद्रासि देखत । तेथें अल्प हृदयीं व्हावया स्थित । योग्यता नसे समुद्राची ॥ ३ ॥ तथा रात्रीमध्यें सूर्यग्रहण । कधीं कोणासि न होय अवलोकन । तथापि स्वप्नांत समुद्रासह सूर्यग्रहण । प्रतीतीस येतसे ॥ ४ ॥ म्हणून स्वप्न-पदार्थ माया-इंद्रजाल-रचित । तैसें योग्य देशकालविरहित । चराचररूप प्रपंचासि मूढ देखत । अतएव मायारचित प्रपंच होतो ॥ ५ ॥ किंवा शुद्धात्म-साक्षात्कार झाला ज्यासि । माया आणि मायेचें कार्य तयासि । अत्यंत असत्यत्व येतें प्रतीतीसि । तें दृष्टांतासह परिसावें ॥ ६ ॥ जैसें आकाशामध्यें स्थित । सर्पाच्या पायाचें जें चिन्ह असत । तें गर्भांधपुरुष विलोकित । हें म्हणणें मिथ्या असे ॥ ७ ॥ आणि मूक पुरुषाचें भाषण । बधिर पुरुष करितसे श्रवण । ह्या गोष्टी जैशा अति असत्य असती जाण । तैशी दृष्टि तत्त्ववेत्त्यांची असे ॥ ८ ॥ तत्त्ववेत्त्यांसि यथार्थ दृष्टीनें तसें । अत्यंत असत्य जगत् भासतसे । आणि आत्मज्ञानशून्यासि वाटतसे । आपण जगासि जाणतों ॥ ९ ॥ याप्रकारें अज्ञानी नरांचें वचन । तें केवल भरलें साभिमान । जगताचें स्वरूप जाणलें नसून । शब्दें पंडितपणा मिरविती ॥ १० ॥ यास्तव मायावी परमेश्वर-रचित । प्रपंचासि कोणीही जाणूं न शकत । किंवा ऐशा प्रपंचाचें अज्ञान शोभत । भूषण देहधारी जीवांसि ॥ ११ ॥

अज्ञानी गर्वें बोलती वचन। कीं आम्हांसि कोणतेंही नाहीं अज्ञान। हें अज्ञानी मूढांचें मिथ्या वाग्जल्पन। तें कारणसह श्रवण करा ॥ १२ ॥ ज्या स्थूल शरीरीं सर्वदा दृढ। आत्मबुद्धि मानिती अविवेकी मूढ। त्या स्थूल देहाचें स्वरूप जड। जाणत नाहींत मूर्ख ते ॥ १३ ॥ स्थूल देहाचें स्वरूप न जाणणें। मग त्या बाह्य प्रपंचाचें स्वरूप ओळखणें। हें तर कोणत्याही प्रकारें नाहींच घडणें। अविवेक्यांसि सर्वथा ॥ १४ ॥ किंवा स्वर्गप्राप्त्यर्थ विहितकर्मैं। तथा नरकास्तव निषिद्ध कर्मैं। आणि मोक्षप्राप्त्यर्थ निष्काम कर्मैं। ज्या इंद्रियांनीं करिती अज्ञानी ॥ १५ ॥ त्या इंद्रियांचें स्वरूप खचित। हे अज्ञानी जीव न जाणती किंचित। मग ते बाह्य प्रपंचासि न जाणत। यांत आश्चर्य कोणतें ॥ १६ ॥ मला सर्वदा सुख असावें। आणि दुःखाचें वारेंही नसावें। ऐशा स्वार्थबुद्धीनें बरवे। हे जीव कार्यासि प्रवर्तती ॥ १७ ॥ परंतु 'मला' या शब्दार्थाप्रति। अविवेकी मूढ जाणूं न शकती। तरी बाह्य प्रपंचासि यथारीतीं। कैशा रीतीं जाणतील ॥ १८ ॥ आपलें पूर्वजन्मींचे आप्त कोण। आणि पुढील जन्मीं कोण संबंधी जन। ऐसें मूढांसि नाहींच ज्ञान। ते काय जाणती प्रपंचासि ॥ १९ ॥ बाल्य आणि तरुणावस्थेंत। जे जे पदार्थ भोगिले बहुत। त्यांचेंही ह्या जीवासि स्मरण नसत। आगामी भोग पदार्थांचेंही ॥ २० ॥ इंद्रियजन्य ज्ञानाचा नसे विषय। म्हणूनि मायारचित प्रपंच अतींद्रिय। त्या अतींद्रिय प्रपंचाचा देखील बोध न होय। शब्दप्रमाण-योगानें ॥ २१ ॥ मातापितादिक वृद्धांचे वचनेंकरून। कुलाचार-वृद्धाचार-धर्माचें ज्ञानकथन। पुत्रासि होय तें यथार्थ ज्ञान। शब्दप्रमाणेंकरूनि ॥ २२ ॥ यास्तव अनादि वेदप्रमाणेंकरून। दृष्टिस्थितिवाद सिद्ध होतसे जाण। किंवा मनु आदिक वृद्धांचें वचन। संपूर्ण जन प्रमाण मानिती ॥ २३ ॥ तो साक्षात् वेदपुरुष भगवान। सत्य स्वतःसिद्ध प्रमाण। अपेक्षित नसे कदा अन्य वचन। अनादि अपौरुषेय वेदासि ॥ २४ ॥ भारतादिक पुराणें सगळीं। पुरुषकृत असतीं निर्मिलीं। यास्तव तयांसि 'पौरुषेय' म्हणिजेलीं। व्यासादिक ऋषिकृत ॥ २५ ॥

जैसें पूर्व-कल्पांत महाभारत। व्यासांनीं रचिलें उत्तम विस्तृत। तैसें महाभारत उत्तर-कल्पांत। न्यूनाधिकत्वें व्यास रची ॥ २६ ॥ यास्तव महाभारतांत पुराणादि पौरुषेय। ज्यांत पूर्वोक्त कल्पांत न्यूनाधिक होय। आणि पूर्वोत्तर कल्पांतही अक्षय। अनादि 'अपौरुषेय' वेद सिद्ध ॥ २७ ॥ वेद अनादि परमेश्वर-निःश्वासित। म्हणून पूर्वोत्तर-युगादि कल्पांत। न्यूनाधिक विलक्षण यत्किंचित्। वेदांत होतचि नाहीं सर्वथा ॥ २८ ॥ अन्य प्रमाण-अपेक्षा-साह्यरहित। म्हणूनि सनातन अपौरुषेय वेद निश्चित। स्वतःप्रमाणतेनें सिद्ध विराजित। सत्य जगद्धित बोधिती ॥ २९ ॥ अनादि-अपौरुषेय शुद्ध वेद। हें वेदमंत्रीं महर्षि-आदिकीं केलेंचि आहे सिद्ध। तैसेंचि निःशंक प्रतिपादिलें निर्विवाद। पूर्वींचे आचार्यादिक वेदवेत्त्यांनीं ॥ ३० ॥ सुषुप्तींत आणि मरणावस्थेंत। सर्व इंद्रियांचा लय प्राणामाजीं होत। आणि जागृतींत तथा जन्मकालांत। प्राणेंचि इंद्रियोत्पत्ति वेद कथी ॥ ३१ ॥ जागृत स्वप्न आणि सुषुप्ति। समाधि मूर्च्छा जन्ममरणादि अवस्था ज्या असती। त्या अवस्थारूप प्रपंचासि स्वयंज्योति। परमात्मा साक्षी प्रकाशितसे ॥ ३२ ॥ जागृति-स्वप्न-सुषुप्तीच्या ठायीं। एकचि आत्मा अवस्था-प्रकाशक पाहीं। त्या सर्व अवस्थांहूनि निराळा राही। जन्मादि-विकाररहित जो ॥ ३३ ॥ अवस्थात्रयांचे भोग्य भोक्ता भोग। त्यांहूनि भिन्न विलक्षण साक्षी पुरुष असंग। सदाशिव चिन्मात्रस्वरूप अभंग। वेदेंचि कथिलें याप्रकारें ॥ ३४ ॥ इतर प्रमाणसाह्यावांचून। ज्ञान तथा प्रमाणरूप असे वेद भगवान्। अतएव वेदाज्ञा श्रद्धा भक्तीकरून। अवश्य अंगिकारिली पाहिजे ॥ ३५ ॥ जैशी भूपतीची आज्ञा सकल। श्रद्धापूर्वक मानिती प्रजा चिरकाल। तैसे वेद सदुपदेश करिती निर्मल। कल्याणार्थ प्राणिमात्रांच्या ॥ ३६ ॥ प्रपंच अनिर्वचनीय मायामय। त्यांत मानूनि विषयसुख अक्षय। सर्व जीव होऊनि लंपट विषय-। उपभोगांत गुंतले ॥ ३७॥ ते सर्व जीव सुटावे विषय-बंधांतून। त्यांच्या जन्माचें सार्थक व्हावें म्हणून। मायबापांपेक्षां अधिक आप्त वेद भगवान्। कृपायुक्त सरल वाक्योपदेशी

॥ ३८ ॥ सूर्याच्या तेजें नेत्र पावती प्रतिघात। तैसें कोणत्याही वस्तूनें निश्चित। सर्वज्ञ दिव्य वेदासि नाहींच होत। म्हणूनि अप्रतिघात वेद असे ॥ ३९ ॥ सर्व वस्तूंचें यथार्थज्ञानसंपन्न। सर्वदा सप्रमाण वेद प्रकाशमान्। म्हणून भ्रमप्रमादादि दोषदर्शन। वेदांत नाहीं सर्वथा ॥ ४० ॥ वेद या शब्दाचा अर्थ विचारितां। वेदासि शोभे निरावरण ज्ञानस्वरूपता। अर्थात् ज्ञानस्वरूपासि जड-परिछिन्नता। स्पर्शाच्या वार्ताही नाहींत ॥ ४१ ॥ यास्तव चैतन्यरूप परिपूर्ण। प्राण-उपहित परमात्मा भगवान्। तोचि साक्षात वेदस्वरूप नारायण। आहे निर्णित निश्चयें ॥ ४२ ॥ मंत्र ब्राह्मण दोन्ही मिळून। शब्दब्रह्मरूप भगवान्। आहे, ऐसें अर्थरहस्य सत्यत्वें न समजून। शंका करणें हें अनुचित आहे ॥ ४३ ॥ जैसें धर्मात्मा-राजाचें आज्ञा वचन। निःसंशय मान्य करिती प्रजाजन। अथवा मातापित्याचें कल्याणवचन पालन। करिती सुपुत्र संतत ॥ ४४ ॥ किंवा सच्छिष्य सद्गुरु-आज्ञें वर्तती। तेणें सर्वार्थसौख्य पावती। तैसे जे वेदाज्ञानुसार वर्तती शुद्धमति। त्यांसि चतुर्विध पुरुषार्थप्राप्ति होतसे ॥ ४५ ॥ किंवा पतिव्रता पतिआज्ञा करी पालन। अथवा जे परमेश्वर-भक्तिपरायण। ते पावती उत्तम गति शिष्या जाण। तैसेंचि वेदाज्ञें चालतां फलद्रूप होय ॥ ४६ ॥ यजमानाच्या आज्ञेंत वागती चाकर। तयांसि फल होतेंचि सुखकर। तैसे वेदोक्त धर्ममार्ग-प्रवर्तक नर। अक्षयसुखी अवश्य होती ॥ ४७ ॥ तो वेदात्मा वेदपारग नारायण। परमात्मा यतीश्वर अत्रिनंदन। वेदांतवेद्य ब्रह्मपरिपूर्ण। जगदुद्धरणार्थ अवतरे ॥ ४८ ॥ ज्याचें सद्यश गायन करितां। खचित होय सर्वसंकट-बंधमुक्तता। श्रोतीं परिसावी यदर्थ कथा। शुद्ध चित्तेंकरूनि ॥ ४९ ॥; मोगलाई प्रांतीं जोगाईचे आंब्यानजिक। ग्राम असे 'केज' नामक। येथें राहणारे गृहस्थ युक्तलौकिक। ऋग्वेदी ब्राह्मण जातीचे ॥ ५० ॥ महारुद्र देशपांडे नामाभिधान। यांसि बंधुत्रय होते विद्यमान्। गृहस्थाश्रमी धनिक कुलवान्। असतां कांहीं

कारणानें ॥ ५१ ॥ निजाम-सरकारांतील त्यांचें उत्पन्न । जप्त जाहलें होतें म्हणून । तें सुटण्यासाठीं प्रयत्न साधन । त्रिवर्गांनीं बहुत केलें ॥ ५२ ॥ त्यांतील ज्येष्ठ ते महारुद्र । त्यांनीं प्रयत्न केले फार । बीड प्रांतीं कोणी साधु पवित्र । होता त्याचे दर्शनासि ॥ ५३ ॥ महारुद्रराव वारंवार जात होते । तेव्हां त्यांनीं विचारिलें साधूतें । कोणत्या रीतीं आमचें कार्य तें । होईल हें सांगा जी ॥ ५४ ॥ साधु म्हणे अक्कलकोटास । आहेत महात्मा श्रीमत्परमहंस । तुम्ही गेलिया त्यांचे दर्शनास । उपयोग होईलसें वाटतें ॥ ५५ ॥ मग ते देशपांडे महारुद्र । अक्कलकोटासि गेले सत्वर । तेव्हां विरूपाक्ष मोदीच्या गृहीं यतीश्वर । प्रसन्नवदनें स्थित होते ॥ ५६ ॥ देशपांड्यांनीं श्रीफलादि अर्पून । घातलें प्रेमें साष्टांग नमन । तदा महारुद्ररावांचें हृद्गत जाणून । अवधूत निरंजन वदले कीं ॥ ५७ ॥ चार मनोरे आहेत तेथें जावें । म्हणजे तुमचें शेत सोडून देऊं बरवे । ऐसें आशीर्वचन ऐकून महारुद्ररावें । जाणिलें अंतर्साक्षी सिद्ध पुरुष हे ॥ ५८ ॥ ठेवूनि समर्थांच्या वचनीं विश्वास । भोजनोत्तर देशपांडे खास । वंदूनि श्रीदत्त-दिगंबरपदांस । त्वरेंकरूनि निघाले ॥ ५९ ॥ हैद्राबाद शहरांत त्वरेनें । महारुद्रराव गेले योगीश्वर-आज्ञें । करितां स्वल्प प्रयत्न-साधनें । सहज कार्य जाहलें ॥ ६० ॥ पूर्वीं प्रयत्न साधनें केलीं अनेक । द्रव्यही खर्चिलें परी यशदायक । न झालेलें कार्य तें साहजिक । समर्थांच्या शब्दें त्वरित साधलें ॥ ६१ ॥ त्या दिवसापासून यतीश्वरचरणीं । महारुद्रांचा जडला विश्वास पूर्णपणीं । ‘विश्वासः फलदायकः’ ऐसें शास्त्र वर्णी । विश्वासचि फलद्रूप होतो ॥ ६२ ॥ उत्पन्न मिळालें पूर्ववत् । तेव्हां अक्कलकोटास पातले त्वरित । महारुद्रराव भक्तिवंत । चरण वंदिती जगद्गुरूचे ॥ ६३ ॥ स्वामीसमर्थांचें श्रद्धापूर्वक पूजन । करूनि नैवेद्यादिक समर्पण । केजधारूरास सुखें जाऊन । राहिले हर्षभरित ते ॥ ६४ ॥ पुढें थोडक्या दिवसांत महारुद्र । सर्व मंडळीसहित क्षेत्र पंढरपुर । कुलदेवता विठ्ठल रुक्मिणीवर । पांडुरंग-दर्शनासि पातले ॥ ६५ ॥ यांस चार पुत्र पंचकन्या आहेत । तयांसह सर्व घर-मंडळीयुक्त ।

चंद्रभागेंत स्नान करूनि शुचिर्भूत। होत्साते गेले दर्शनासि ॥ ६६ ॥ तों विटेवरी विठ्ठल-पांडुरंग-मूर्ति नसून। दिसले
संन्यासी दैदीप्यमान्। विटेवर उभे कटीवर हस्त ठेवून। प्रसन्न मुख वासुदेव ॥ ६७ ॥ विठ्ठलरूप यतींद्रमूर्ति मन-
मोहन। विलोकूनि हर्षले सर्व जन। अलौकिक चमत्कार अपूर्व जाण। वाटला देशपांड्यांसि ॥ ६८ ॥ कुलस्वामी विठ्ठल
आणि यतीश्वर। असती अभिन्न-स्वरूप निरंतर। हें उमजावया योगीश्वरें चमत्कार। सहज लीलेनें दाविला ॥ ६९ ॥
मग षोडशोपचारें श्रीविठ्ठलपूजन। करूनि यथाशक्ति ब्राह्मण-भोजन। स्वग्रामासि गेले गृहस्थ सधन। सर्व मंडळीसहित
ते ॥ ७० ॥ तथापि महारुद्ररावांचे चित्तीं। तळमळ लागली दर्शन-प्रीति। केव्हां पाहीन श्रीगुरुदेवदत्तमूर्ति। स्वामीसमर्थ
जगदीश ॥ ७१ ॥ नंतर अक्कलकोटास येऊन। कुलदैवत रुक्मिणीकांत जनार्दन। हे योगीश्वर सत्य आहेत म्हणून।
लोटांगण नमन घातलें ॥ ७२ ॥ अक्कलकोटचे ग्रामजोशी। प्ररव्यात बाळकृष्णबुवा ज्योतिषी। विद्वान् सदाचारी समदर्शी।
ऋग्वेदी ब्राह्मण वैष्णव ॥ ७३ ॥ ज्यांचे सदनीं प्रेमें वारंवार। येत होते स्वामिराज योगीश्वर। जोशीबुवांसि होते दोन
पुत्र। श्रीपति आणि नाना या नामांचे ॥ ७४ ॥ जोशीबुवांचें मोकळें शुद्ध मन। कार्य-प्रश्न पुसावयासि नित्य गृहीं
येती जन। करिती सन्मानपूर्वक त्यांचें समाधान। बाळकृष्ण ग्रामजोशीबुवा ते ॥ ७५ ॥ ज्यांचे सदनीं हैद्राबादेकडील।
गणपतराव आरबादिक श्रीमंत मंडळ। उतरत होते इतर जन पुष्कळ। स्वामिराज-दर्शनार्थ ॥ ७६ ॥
बाळकृष्ण जोशी विद्या-विनय-संपन्न। सुस्वभावशील सदय आचारवान। लोकप्रिय सत्कुलवान् कीर्तिमान्। म्हणूनि
येणें जाणें तत्सदनीं ॥ ७७ ॥ त्या ग्रामजोशांचे सदनीं। मंडळीसहित देशपांडे उतरूनि। सहस्र-भोजन
समाराधना करूनि। करिती योगाधीश्वराचें पूजनादिक ॥ ७८ ॥ शुक्ल पक्षींच्या चंद्रकलासम। श्रीस्वामीससर्थ-
चरणीं निरुपम। महारुद्ररावांची शुद्धभक्ति निःसीम। जडली सप्रेम सर्वदा ॥ ७९ ॥ योगीश्वराचें आशीर्वचन

कल्याणप्रद । घेऊनि आज्ञा सगळे युक्त-आनंद । स्वनगरासि गेले सेवित-भक्तजनवृंद । सद्यश गात नृसिंह-मुनींचें ॥ ८० ॥ देशपांडे गेल्यावर स्वसदनीं । पुढें त्यांस आठ चार दिवसांनीं । द्रव्याचे हांडे सांपडले स्वामिकृपेंकरूनि । महल्लाभ जाहला ॥ ८१ ॥ दिवसेंदिवस भाग्योदय-काळ । वृद्धि पावलासे सानुकूल । जगन्नाथ स्वामी सदाशिव कृपाल । साह्य होतां काय उणें ॥ ८२ ॥ गृहस्थाश्रमांत असूनि धन्य । जे झाले ईश्वरासि शरण अनन्य । प्रिय नाहीं हरि-गुरु-देवावांचूनि अन्य । तेचि भगवद्भक्त साधु म्हणावे ॥ ८३ ॥ ज्यांनीं उभारिली भक्ति-विजयध्वजा । हृदयीं ओळखिलें गरुडध्वजा । तेचि सत्पुरुष निरवधि अधोक्षजा । परमेश्वरासि सदा आवडती ॥ ८४ ॥ असो पुन्हां महारुद्रराव । अक्कलकोटीं पातले मंडळीसह सर्व । बाळकृष्ण ग्रामजोशी यांचे गृहीं देव- । दत्तदर्शनार्थ उतरले ॥ ८५ ॥ तेव्हां महारुद्ररावासि ज्वरोत्पत्ति । होऊनि वायुप्रकोपें बिघडली प्रकृति । आतां देहाची आशा नाहीं म्हणती । लोक चिन्ह पाहूनि ॥ ८६ ॥ नंतर महारुद्राचे ज्येष्ठ पुत्र । रघूत्तमराव देसाई पवित्र । घाबरे होऊनि गेले जगत्सूत्र- । धारक समर्थासमीप ॥ ८७ ॥ श्रीमद्दत्तात्रेयस्वामी विश्वंभर । चरणीं करून साष्टांग नमस्कार । प्रार्थना करिती वारंवार । जगदुद्धारक प्रभुराया ॥ ८८ ॥ आमचे पित्याची घातली घटिका । त्यावीण आमचा प्रपंच लटिका । प्राप्त व्हावी कृपारूप अंजनगुटिका । दयासागरा मायबापा ॥ ८९ ॥ तेव्हां वदती परब्रह्म परंधाम । तव पित्यासि होईल त्वरें आराम । जाई स्वस्थानीं करीं काम । ऐसें घनश्याम वदती ॥ ९० ॥ परिसूनि शुभ अमृतभाषण । रघूत्तम तीर्थप्रसाद घेऊन । परम त्वरेनें बिऱ्हाडीं जाऊन । घाली मुखांत जनकांचे ॥ ९१ ॥ तेव्हां अंग गार पडलेलें तथापि । शरीर उष्ण सावध झालें पुनरपि । विश्वकुटुंबी योगीश्वर पूर्णप्रतापी । आशीर्वचन शीघ्र फळलें ॥ ९२ ॥ आठ चार दिवसांत आला शुभ परिचय । महारुद्ररावाची प्रकृति झाली निरामय ।

* * *

गुरु-परमेश्वराची कृपा पूर्ण होय। तेथें काय विलंब सुखार्थ ॥ ९३ ॥ स्वामी समर्थ करुणार्णव । त्यांचे सहज वचनें
महारुद्रराव । देशपांड्यांचे घरांत अभिनव । सुखाचा दिवस उगवला ॥ ९४ ॥ मग रघूत्तम देसाई करी विनंति । अहो
नारायणा त्रैलोक्याधिपति । उत्तम आरोग्य पित्याची प्रकृति । झाली तात्काळ आपल्या वचनें ॥ ९५ ॥ आतां न लागतां
अर्ध घटिका । अर्पितों दशसहस्त्र रौप्यमुद्रिका । हें परिसूनि अनंत-ब्रह्मांडनायका । हासूं आलें विलक्षण ॥ ९६ ॥ जो
कारण विश्वोद्भव-स्थिति-लयासि । ज्याच्या मायें अनंत निर्मिलें द्रव्यादिकांसि । लक्ष्मी ज्याचे चरणांची दासी । अर्पावें
त्यासि काय आम्हीं ॥ ९७ ॥ ज्याचे पदार्थ भरले अनंत ब्रह्मांड । तयासि दधि क्षीर घृत खाद्य शर्करा खंड । भक्ष्य भोज्यादिक
पदार्थ उदंड । काय अर्पावे कसे ते ॥ ९८ ॥ अनंत पदार्थ जगत् ज्याचें उच्छिष्ट । ज्याचें यश गाती निगमागमें
सर्वोत्कृष्ट । जगद्धितार्थ जो झाला मायाविशिष्ट । संपूर्ण गुणऐश्वर्यसंपन्न जो ॥ ९९ ॥ जो अनादिवेद-प्रतिपाद्य ।
उपनिषद्रहस्य-वेदांतसंवेद्य । जो अंतर्बाह्य व्यापक विश्ववंद्य । तयासि नैवेद्य काय समर्पावा ॥ १०० ॥ तथापि तो
प्रणतजनभक्तवत्सल । त्याचे तयासीच पदार्थ अखिल । अहंममता टाकूनि शुद्धप्रेमभरें निर्मल । चित्तें अर्पितां
घेतसे ॥ १ ॥ तो परमेश्वर भक्तिभावाचा भुकेला । भक्तिलाच दासासारखा जातो विकला । आत्मज्ञानें तो हृदयस्थ
जातो ओळखिला । सर्वांतर्यामी स्वामी देव ॥ २ ॥ अर्पण करणें काय वेगळें । ऐशा हेतूनें योगिराज हांसले । सर्व-
साक्षी सर्वज्ञत्वें उत्तर देती चांगलें । सर्वांसि सुलभ कळावया ॥ ३ ॥ न पाहती जीवांचे अधिकार । दयाळुत्वें करिती
परोपकार । श्रीमज्जगद्गुरु प्रशस्त उत्तर । केवळ भक्तवात्सल्यार्थ अर्पिती ॥ ४ ॥ आम्हांसि नलगे द्रव्य-अघ ।
आपल्या घरासि जा रे नीघ । घराचे उकीरड्यांत टाकून दे ओघ । हा दगड तेथें नेऊन ठेव रे ॥ ५ ॥ त्या कालीं
तेथें मुंबापुरीचा भक्त । श्वेत पाषाणाच्या पादुकाकारक । प्रख्यात हरिश्चंद्रजी नामक । सात्त्विक निर्लोभी भक्तिमान् ॥ ६ ॥

तो उत्तम श्वेतवर्ण मनोहर । समर्थांच्या पादुका दिव्य सुंदर । घेऊन बैसला होता समोर । शुद्ध प्रज्ञा स्थिर झालेला ॥ ७ ॥ दत्तात्रेय-स्वामींच्या आज्ञेनुसार । त्यानें रघूत्तम देसाई केजकर । त्यासि दत्तात्रेयचरणपादुका सत्वर । अर्पण केल्या हर्षभरें ॥ ८ ॥ हा हरिश्चंद्र शेणवी जातीचा । महान् भक्त होता दत्तचरणांचा । मुंबईस राहून धंदा नोकरीचा । करित असे चतुरस्र ॥ ९ ॥ परोपकारी गृहस्थ सज्जन । पाहिजे तशा उत्तम प्रकारें पादुका करून । मोल न घेतां कोणापासून । सहस्रावधि अर्पितसे ॥ ११० ॥ पुष्कळ पादुका सिद्ध करून । दत्तात्रेय-स्वामिचरणांसि लावून । पाहिजे तशा मोठ्या लहान । स्वामिभक्तिपरायण करितसे ॥ ११ ॥ शुद्ध चित्त असलेला भक्तिमान् । ऐसा लोकांसि युक्त-सन्मान । हरिश्चंद्र धन-मोलावांचून । गुरुपादुका अर्पितसे ॥ १२ ॥ वारंवार अक्कलकोटास । श्रीमद्दत्तात्रेय-स्वामींचे दर्शनास । हरिश्चंद्रजी येत असे शुद्ध मानस । पूजा नैवेद्य दक्षिणादि करित असे ॥ १३ ॥ हरिश्चंद्रें रघूत्तमासि पादुका । अर्पिल्यावरी पूजा नैवेद्य दक्षिणादिका । ब्राह्मण-भोजन करूनि संतुष्ट लोकां । गेली देशपांडे मंडळी केजेस ॥ १४ ॥ पुढें त्यांनीं सुमुहूर्तावर । केजेस आपल्या उकीरड्याचे जागेवर । भव्य विशाल मठ मंदिर । बांधविलें सुंदर रमणीय ॥ १५ ॥ त्या मठांत हरिश्चंद्रें केलेल्या । स्वामीसमर्थांच्या पादुका चांगल्या । ज्या रघूत्तम देसाईस प्राप्त झाल्या । समर्थांच्या आज्ञेनुसार ॥ १६ ॥ त्या प्रासादिक पादुकांची स्थापना । पाचारूनि वैदिक याज्ञिक पंडित नाना । सुमुहूर्तीं विधिपूर्वक केली जाणा । लोककल्याणास्तव प्रेमें ॥ १७ ॥ तिन्ही बाजूंस दूखणी सोंपे । बांधविले दृढ स्वामिसमर्थ प्रतापें । वापी मधुर पुष्कळ जलरूपें । बांधविली मठांत केजेस ॥ १८ ॥ देव आहे पूर्वदिशाभिमुख । आणि नगारखाना उत्तराभिमुख देख । स्वामिराजांची पंच धातूची सुरेख । मूर्ति लहान मांडिली आहे ॥ १९ ॥ मनोहर सुंदर प्रसन्न वदन । चलित वरदमूर्ति दैदीप्यमान् । त्या गुरुमूर्तींचें होतां दर्शन ।

भूक तहान हरपते ॥ १२० ॥ झणी दृष्टि लागेल म्हणून । वाटे मूर्तीवरून उतरावें निंबलोण । जैसें तेजःपुंज बाल सुंदर लहान । श्रीकृष्ण-दर्शनें समाधान वाटे ॥ २१ ॥ निरालस्य शुद्ध भक्तिपूर्वक । पूजा नित्य नैवेद्यादिक । आरति भजन त्रिकाल सम्यक् । होतसे मठांत समर्थांच्या ॥ २२ ॥ भक्तीनें पुष्कळ द्रव्य खर्चून । देशपांड्यांनीं बांधविलें उत्तम स्थान । जेथें वैदिक पुराणिक हरिदास विद्वान् । येती जाती जन सेवेकरी ॥ २३ ॥ त्या सर्वांचें होय आदरातिथ्य तेथें । ऐसे लौकिकवान् सधन गृहस्थ ते । महारुद्रराव नाम शोभे तें । त्या देशपांडे द्विजासि ॥ २४ ॥ अक्कलकोटांत बुधवार-पेठेंत । आद्य प्रिय प्रमुख मठांत । शालिवाहन शके अठराशें पूर्णांत । चैत्र कृष्ण चतुर्दशी दिनीं ॥ २५ ॥ श्रीमद्दत्तात्रेय-स्वामिराजें निरुपाधि । विदेही निजानंदीं घेतली समाधि । दर्शनमात्रें हरती आधि व्याधि । लाधती सर्व सौख्यार्थ ते ॥ २६ ॥ असो तदनंतर महारुद्रें गमन । केलें श्रीगिरि-व्यंकटेशदर्शन । तेथें दृष्टांत झाल्यावरून । तात्काळ आले धीपुरीं ॥ २७ ॥ श्रीचरणीं मागूनि क्षमा । पूजिलें त्रयमूर्ति-पुरुषोत्तमा । त्याकालीं महर्गतेची सीमा । झाली होती प्रज्ञापुरीं ॥ २८ ॥ मार्गशीर्षांत श्रीदत्तजयंती-। संबंधीं काळजी पडली होती । अक्कलकोट संस्थानांतून जयंती-। निमित्य नेमणूक मिळत असे ॥ २९ ॥ एक रुपयास गहूं तीन शेर । महर्गतेचा ऐसा माजला बाजार । तेव्हां महारुद्रें साह्य केलें थोर । उत्साह-समारंभ योग्य झाला ॥ १३० ॥ मग कृष्णाप्पा झाले निष्काळजी । पूजारी श्रीपाद् भट झाले राजी । तेव्हांपासून महारुद्रावजी । सर्वत्र घर-मंडळीसहित ॥ ३१ ॥ प्रतिवर्षीं श्रीदत्तजयंतीस । येती सप्रेमें उत्साहास । दुग्ध-दधि-घृत-मधु-शर्करायुक्त पूजेस । षोडशोपचारें करिती ते ॥ ३२ ॥ महारुद्रराव समाधीचें पूजन । रुद्राभिषेकें करिती जाण । द्विजवर्य वेदघोष मंत्र पढून । उत्तम पूजनोत्सव होतसे ॥ ३३ ॥ ब्राह्मण-भोजन करिती पुष्कळ । महारुद्ररावाचे पुत्रही तसेच धर्मशील । रघूत्तमराव गणपतराव प्रेमल । बापूराव आणि अण्णा ते ॥ ३४ ॥

कन्या-पुत्रपौत्रादिसहित । कुटुंब विस्तारी सद्भाग्यवंत । महारुद्रराव असतां संसारयुक्त । झाले विरक्त संन्यासी
॥ ३५ ॥ पुत्रेषणा वित्तेषणा लोकेषणा । टाकूनि संसार प्रपंच सर्व वासना । महारुद्र देशपांडे साहेब नाना । चतुर्थाश्रम
धारण करिती ॥ ३६ ॥ तदनंतर सर्वमंडळीसहित । श्रीक्षेत्र काशीस गेले हर्षभरित । प्रयाग गया क्षेत्रादिक यथास्थित ।
महायात्रा करून गृहीं आले ॥ ३७ ॥ यद्यपि संन्यास-दीक्षा धारण । केली तथापि शुद्ध उदार अंतःकरण ।
हरिगुरुलीला करितां श्रवण । प्रेमाश्रुपात वाहे यन्नयनीं ॥ ३८ ॥ आणि प्रतिवर्षांत एक दोनवार । अक्कलकोटासि
येती स्वामी केजकर । तयांची अवीट पूर्ण गुरुभक्ति निरंतर । होती तो चमत्कार परिसावा ॥ ३९ ॥ यात्रा
करून आल्यानंतर । सर्व मंडळीसहित स्वामी केजकर । अक्कलकोटासि येऊनि थोर । उत्साह समारंभ करविती
॥ १४० ॥ बुधवार-पेठेंतील मुख्य स्थान । तेथें स्वामिसमर्थांचे स्थापित चरण । त्रयमूर्तींचीं मुखकमलें शोभायमान ।
त्यांचे दोन्ही बाजूंस ॥ ४१ ॥ उजवे बाजूस उत्तम बाण-लिंग । शाळुंकेसह दिव्य मनोहर अत्यंत । कोनाड्यांत बहुत
देव चांग । आणि गजानन डावे बाजूस ॥ ४२ ॥ त्या ओट्याचे पुढें खालीं मध्यभागास । परमपुरुष परमात्मा
परमहंस । बैसले समाधिस्थ अखंड निवास । निरुपाधिक निजानंदीं ॥ ४३ ॥ संपूर्ण सुखार्थाभीष्टप्रद । समाधि जी
ब्रह्मस्वरूप सच्चिदानंद । त्या समाधीसि अखिल भक्तजनवृंद । पूजिती वंदिती सदा सर्वत्र ॥ ४४ ॥ त्या श्री-
समाधीवरी भागीरथी घालून । देशपांड्यांनीं यथाविधि पूजन । केलें बहुत ब्राह्मण-भोजन । दक्षिणा तांबूल अर्पूनि गेले
॥ ४५ ॥ त्या यतीश्वरपति-रायातें । दत्तात्रेय-स्वामींचें दर्शन होत होतें । शुद्ध अंतःकरणांत प्रकटे तें । परमेश्वरस्वरूप
गुरुबोधें ॥ ४६ ॥ असो ऐसे जातां थोडे संवत्सर । पुन्हां मार्गशीर्षांत स्वामी केजकर । अक्कलकोटास पातले सहपरिवार ।
दत्तजयंती-उत्साहार्थ ॥ ४७ ॥ तो उत्तम उत्साह झाल्यावरती । केजकर स्वामींची बिघडली प्रकृति । मग

पूजाऱ्यादि थोर जनांप्रति । विनंति करिती यति ते ॥ ४८ ॥ स्वामी समर्थांच्या चरणांजवळ । माझी समाधि करा हो जन प्रांजळ । मी समर्थांचा पूर्ण दास केवळ । अनंत जन्मींचा असे हो ॥ ४९ ॥ शके अठराशें सतराचे सालीं । पौष वद्य नवमीस प्रातःकालीं । केजकर स्वामींनीं समाधि घेतली । देह विसर्जन करूनियां ॥ १५० ॥ सभामंडपाच्या उजव्या बाजूस । समर्थांच्या गाईचा जेथें समाधिवास । त्या गौस्थानाच्या शेजारीं विदेह-निवास । झाला केजकर स्वामींचा ॥ ५१ ॥ केजकरांची समाधि बुधवार-पेठेंत । श्रीस्वामिराजांच्या आद्य प्रिय मठांत । केजकर स्वामी महद्भाग्यवंत । समर्थांच्या चरणकमलीं रंगले ॥ ५२ ॥ त्यांचें लहान मनोहर सुंदर । समाधिस्थान पुत्रें सत्वर । बांधवूनि शिवलिंग सुखकर । स्थापिलें देशपांड्यांनीं ॥ ५३ ॥ त्या समाधीचें नित्य पूजन । करिती नैवेद्य श्रीपादभट समर्पण । समर्थांची पूजा होतसे वेळ दोन । तैशीच केजकर स्वामींचीही ॥ ५४ ॥ ज्यांची समाधि सर्वकाळ । जाहली समर्थांच्या चरणांजवळ । धन्य धन्य भाग्योदय पुण्य प्रबळ । फळलें शेवटीं गुरुरूपीं ॥ ५५ ॥ स्वामीमहाराजांचे भक्तजनांत । केजकर स्वामी असती प्रख्यात । त्यांचे चिरंजीवही उत्तम आहेत । भक्तिज्ञानसंपन्न ते ॥ ५६ ॥ लोकांत आणि राजदरबारांत । यांना सन्मान आहे महत् । सदाचारी ज्ञानी चतुर धीमंत । उदार धार्मिक आहेत ते ॥ ५७ ॥; ऐसे देशपांडे देसाई देशमुख । संस्थानी जहागीरदारादि प्रमुख । भूपति सरदार मानकरी सन्मुख । येती मंत्री प्रधानादिक ॥ ५८ ॥ श्रीमंत नृपति अलिजाबहादुर । जयाजीराव शिंदे सरकार । सर्वगुणैश्वर्यसंपन्न शूर उदार । अक्कलकोटास आले होते ॥ ५९ ॥ नाशिककर गोविंदबुवा स्वामी । आणि इतरही जन होते समागमीं । त्या कालीं श्रीमद्दत्तात्रेय कैवल्यधामीं । राजमंदिरीं स्थित होते ॥ १६० ॥ जाणूनि शिंद्याचें शुद्ध हृद्गत । तेथून ग्रामाबाहेर पातले दत्तावधूत । शिंदे भूपतीस कळतांच गेले धांवत । दत्तात्रेयदर्शनार्थ सप्रेमें ॥ ६१ ॥ घातलें अनन्यभावें साष्टांग

नमन । देखूनि सगुण पूर्णब्रह्म सनातन । जयाजीराजे अति संतुष्ट होऊन । मानसीं प्रश्न आणिती ॥ ६२ ॥ त्या
प्रश्नांचें प्रशस्त समाधान । समर्थांनीं अंतर्साक्षित्वें केलें अमृत-भाषणेंकरून । मग गोविंदस्वामी आणि नृप विद्वान् ।
प्रसन्नमन होत्साते ॥ ६३ ॥ म्हणती आपण साक्षात् परमेश्वर । निःसंशय आहां अंतर्साक्षी निर्विकार । दर्शनें कृतार्थ
झालों पावन स्थिर । नारायणा कृपाब्धे ॥ ६४ ॥ मग यतींद्रें कंठींचा पुष्पहार । नृपतीचे गळ्यांत घातला प्रसाद
श्रेयस्कर । नंतर पुन्हां दर्शन घेऊनि शिंदे सरकार । गेले स्वराजधानीस आनंदें ॥ ६५ ॥ पुढें शिंदे नृपतीस पुत्ररत्न ।
प्राप्त झालें अन्य मनोरथ परिपूर्ण । जयाजी नृपति आणि प्रजाजन । आनंदनिमग्न जाहले ॥ ६६ ॥ श्रीमंत जयाजीराव
शिंदे सरकार । सद्धर्माचरणी शूर उदार निरंतर । भगवद्भक्त ज्ञानी राजकार्यधुरंधर । परोपकारी दयालु न्यायी होते
॥ ६७ ॥ तैसेचि योग्य सर्वगुणसंपन्न । उदार शूर न्यायी शिंदे नृपतिनंदन । आहेत प्रख्यात पुरुष सज्जन । प्रजाहितकारी
नांदती ॥ ६८ ॥ आणि श्रीमंत तुकोजीराव होळकर । राजधानी ज्यांची प्रसिद्ध इंदुर । ते अक्कलकोटासि
होळकर सरकार । एक दोन वेळ आले होते ॥ ६९ ॥ दत्तात्रेयस्वामि-दर्शनेंकरून । तुकोजी नृपतीस बाणलें समाधान ।
तेव्हां त्यांनीं अन्नसत्र धन वेंचून । ठेविलें अक्कलकोटांत ॥ १७० ॥ तुकोजी भूप होळकर । होते शौर्य-औदार्यसंपन्न
गुणगंभीर । विद्वान् न्यायी सद्धर्मी चतुर । पुत्रसुखयुक्त विराजित ॥ ७१ ॥ तयांचे बाळासाहेब नंदन । यथान्यायें
बरींच वर्षें राज्य करून । प्रस्तुत पुत्रासि राज्यीं स्थापून । सुखें विश्रांति घेती ते ॥ ७२ ॥ असो शिंदे सरकार
होळकर । जयाजीराव आणि तुकोजी नृपवर । त्यांनीं तीर्थ क्षेत्रें देवदर्शनें फार । केलीं अनेक धर्मकार्यें ॥ ७३ ॥
ज्यांना महात्मा सत्समागम । घडला असे अपरिश्रम । जे सर्व विद्यांचें सत्कारस्थान परम । विश्रामधाम होते
ते ॥ ७४ ॥ ऐसे महीधर मंत्री प्रधान । आणि शेटसावकार सधन । तैसे महात्मा योगी आणि विद्वान् । अगणित

जन दर्शनास येत होते ॥ ७५ ॥ नगर जिल्ह्यांतील बेलापूर । केशव-गोविंद देवस्थान असे सुंदर । त्या वनांतील संन्यासी योग्य थोर । महात्मा पुरुष असलेले ॥ ७६ ॥ तेही योगी अक्कलकोटासि । तीन चार वेळां आले होते दर्शनासि । तैसेंचि हंसराजयोगी लोकहितैषी । त्यांनीं अनेक ग्रंथांवर टीका केल्या ॥ ७७ ॥ ऐसे सर्व वंदिती येऊन जयांसि । त्यांचे यथामति लीलामृतासि । शरण होऊन अनन्य-भावेंसीं । वर्णितसे दास वामन ॥ ७८ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । चतुस्त्रिंशतितमाध्याय गोड हा ॥ १७९ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे चतुस्त्रिंशतितमोऽध्यायः समाप्तः ॥ ३४ ॥ श्रीगुरुदेवदत्त-स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय पस्तिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्गुरुदत्त-दिगंबराय नमः ॥ ॥ गुरु वक्त्यासि शिष्य विनवी । अक्कलकोटीं मठ स्थानें समर्थांचीं बरवीं । केव्हां किती कैशीं झालीं असावीं । देवता-स्थापना पादुकादिक ॥ १ ॥ गुरु अधिकारी शिष्यासि निरूपिती । तव प्रश्न लोकोपकारार्थ असती । धन्य धन्य शुद्ध गुरुभक्ति । प्रशंसनीय असे जी ॥ २ ॥ सर्वांचें सर्वदा कल्याण असावें । तेंचि गुरुलीलामृत परिसावें । जैसें मेघोदक वर्षतां सुखी व्हावें । संपूर्ण प्राणिमात्रांनीं ॥ ३ ॥ देवलोकींच्या अमृतपानें अमरत्व । येतें तथापि तें क्षणिक अनित्यत्व । झालिया पुण्यबल क्षीण, निःसत्त्व । मृत्युलोकांत प्रवेशती ते ॥ ४ ॥ म्हणूनि निरुपम नित्य अज शाश्वत । अखंड तारक हरिगुरुलीलामृत- । प्राशनें सकल रोग भयें होती निर्मुक्त । भवबंधनादिक तात्काळ ॥ ५ ॥ अक्कलकोटचे सरकारी जोशी । भाऊचे दत्तकपुत्र गणेश ज्योतिषी । त्यांनीं घेऊनि लोकसाह्य द्रव्यासि । बांधविला मठ स्वगृहांत ॥ ६ ॥ त्या मठांत देवता-स्थापन । शके सत्राशें एक्याण्णव शालिवाहन । शुक्लनाम वत्सरीं उदगयन । वसंत ऋतूंत जाहलें ॥ ७ ॥ फाल्गुन कृष्ण तृतीयेस रविवारीं । स्वाति नक्षत्रीं शुभ लग्नावरी । पंचकुंडीं विधानोक्त प्रकारीं । देवता स्थापित जाहल्या ॥ ८ ॥ स्वामी-समर्थांच्या आज्ञेनुसार । गणपति जगदंबा हरिहर । आणि समर्थांच्या पादुका सुंदर । मंदिरांत स्थापन जाहल्या ॥ ९ ॥ सासवडकर दीक्षितांनीं याज्ञिक । करूनि गणेश जोशी-हस्तें अर्चा सम्यक् । तेव्हां पादुकांवरी धान्यादिक । घातलें स्वामिसमर्थांनीं ॥ १० ॥ चार पैसे दिधले दीक्षितासि । श्रीफल प्रसाद गणपतराव जोशासि । ब्राह्मणभोजन तांबूल-दक्षिणेसि । समारंभ योग्य

जाहला ॥ ११ ॥ या मठ बांधण्याचे कामीं साह्यता । अक्कलकोटस्थ जनांनीं थोडीबहुता । यथाशक्ति द्रव्यें केली परमार्थता । नामाकरितां समर्थांच्या ॥ १२ ॥ मुंबईचे विनायकराव वासुदेवजी । आणि ढवळे बळवंत रावजी । यांनीं खर्च करूनि द्रव्यपुंजी । योग्यताविराजित मठ केला ॥ १३ ॥ या मठांत चिंतो सखाराम टोळ । यांच्या भक्तीनें काष्ठाच्या पाटावरी कोमल । स्वामिसमर्थांचीं चरणकमलें विमल । उमटलीं तो पाट मांडिला आहे ॥ १४ ॥ त्या पाटावरील दत्त-पादुका । विलोकूनि संतोष वाटे लोकां । या मठांत वारंवार यतियूथनायका । येऊनि बैसणें प्रिय होतें ॥ १५ ॥ समर्थांनीं औदुंबर वृक्ष लाविलेला । देवाचे उजवे बाजूस आहे शोभला । मोठा वृद्धिंगत असे जाहला । आणि सभामंडप सुंदर दिसे ॥ १६ ॥ देवळाचे दक्षिण भागाला । दुखणी सोपे बांधिले उत्सवाला । मधुर जलपूरित कूप शोभला । असे लहान वृक्षासह ॥ १७ ॥ या मठांत गुर्जरस्थ बडोद्यांतील । श्रीमंत जमुनाबाई महाराणी धर्मशील । उदार शूर दयालु चित्त निर्मल । विवेकी सदाचारी भक्तिमान् ॥१८॥ त्यांनीं देवपूजा नैवेद्यादि व्हावें । आणि मुख्यत्वें दीन सेवेकरी अघवे । त्या सेवेकऱ्यांसि मधुकरी अन्न मिळावें । म्हणूनि ठेविलें अन्नसत्र ॥ १९ ॥ दर मासीं देऊनि सवाशें रौप्यमुद्रा । अन्नसत्र ठेविलें धर्मार्थ परोपकारा । ऐसे कांहीं गेलिया संवत्सरा । अन्नसत्र बंद झालें ॥ २० ॥ पुढें प्रतिवर्षीं रौप्यमुद्रिका सवाशें । मिळत होत्या कांहीं वर्षें । त्याही बंद झाल्या सावकाशें । परमेश्वर-इच्छेनें ॥ २१ ॥; एकेकालीं गणपतराव जोशी नाम । यांचा मोगलाईंतील जहागिरी ग्राम । प्रख्यात श्रीमंत सरकार-निजाम । यांचेकडून जप्त जाहला ॥ २२ ॥ उपाय साधनें करूनि फार । गणेश जोशी बैसले चिंतातुर । मग जेथें स्थित होते दत्तदिगंबर । प्रसन्नवदन अभयकर ॥ २३ ॥ तेथें जाऊनि घातलें नमन । जोशी उभे ठेले चित्त-उद्विग्न । विचारिलें गणेशें कर जोडून । ग्राम केव्हां सुटेल ॥ २४ ॥ उपाय प्रयत्न साधनें खुंटलीं । कांहीं सुचेना मतिमंद झाली । आतां शेवटीं

पाहिजे फळली । समर्थांची कृपा एक ॥ २५ ॥ नंतर वदती भगवान् दयाल । काळजी करूं नको आतांच येईल पाटील । ऐसें आशीर्वचन झाल्यावरी तत्काल । त्या ग्रामाचा पाटील पातला ॥ २६ ॥ जप्ती उठून जहागीर-ग्राम सुटला । ऐसें राजमुद्रांकित आज्ञापत्र घेऊनि आला । तें पहातांचि जोशाचा विस्तारला । आनंद भाग्योदयकाल ॥ २७ ॥ सहज शब्दें तात्कालिक घडला अनुभव । हें पाहूनि चकित झाले सर्व । म्हणती यतीश्वर साक्षात् परमात्मा देव । निःसंशय बोलते चालते ॥ २८ ॥ तेव्हांपासूनि गणेश जोशाची । स्वामीसमर्थ-चरणीं दृढ विश्वासाची । भक्ति जडली परम सुखाची । सामर्थ्यलीला विलोकुनि ॥ २९ ॥ असो त्या जोशी मठांत सांप्रत । गणेशाचे दत्तक-पुत्र सदाचारी भक्तिमंत । गोविंद जोशी नामक प्रख्यात । राजाश्रित असती ते ॥ ३० ॥ हे नारायण वासुदेव बरव्यांचे जामात । विद्वान सद्‌गृस्थ संभावित । ते देवपूजा इत्यादिक स्वमठांत । चालविती पूजारी ठेवूनि ॥ ३१ ॥ बाबाभट ग्रामोपाध्ये पूजारी । विद्वान् कुटुंबवत्सल पुराणिक सदाचारी । जोशी मठांत आणि वडाखालीं करी । नित्य पूजा समर्थांची ॥ ३२ ॥ गोविंद जोशी कन्या-पुत्र-संतति- । संपत्तीयुक्त अक्कलकोटीं नांदती । आतां बुधवार-पेठेंतील श्रोतीं । मठ-देवता-स्थापन परिसावें ॥ ३३ ॥ शके सत्राशें अठ्यायशीपासून । स्वामी दत्तदिगंबराचें उत्तम स्थान । बुधवारपेठेंत व्हावें म्हणून । महाजन-विचार उद्भवला ॥ ३४ ॥ पुरुषार्थ-प्रयत्न तदनंतर । चोळाप्पा पूजारी आणि इतर । संस्थानचे कारभारी उदार । समर्थनामें करूं लागले ॥ ३५ ॥ अक्कलकोटांत साह्याचे आंकडे । पडले रौप्य-मुद्रिकेचे थोडे । पुणें मुंबई आदिक शहरचे पुढें । यादींत नामसह अंक पडूं लागले ॥ ३६ ॥ लोकाश्रयाचें धन अल्पबृहत् । जमूं लागलें अक्कलकोटांत । श्रीपादभट परिश्रम करित । अनेक नगरांत जाऊनि ॥ ३७ ॥ जनसमुदायांत प्रार्थना बरवी । करून देवकार्यार्थ यादी फिरवी । थोडेंबहुत धन जमेल तें पाठवी । अक्कलकोटास समर्थ-

कार्या ॥ ३८ ॥ शके सत्राशें नव्वदापासून । सुमुहूर्तावर पाया खोदून । प्रारंभ श्रीसमर्थ-आज्ञेंकरून । जाहला सर्वार्थ-
विजयप्रद ॥ ३९ ॥ मंद गतीनें देवालयाचें काम । चाललें घेऊनि दत्तात्रेयनाम । देवालय देवगर्भासह विश्राम ।
अपूर्वधाम सिद्ध झालें ॥ ४० ॥ श्रीदत्तात्रेय-स्वामिआज्ञेनुसार । देवळांत खालीं स्वच्छ गुहा सुंदर । ब्रह्मविद्येचें
संपूर्ण भांडागार । शुद्धभक्ति-वैराग्यादिकांचें ॥ ४१ ॥ वेदोक्तधर्म-जिज्ञासा-प्रकाशक । कर्म-उपासनेचें फल-
प्रापक । चतुर्विध-पुरुषार्थप्रदायक । साक्षात्कारी परमानंदस्वरूप गुहा ॥ ४२ ॥ त्या परमानंद-गुहेंत एक प्रहर- ।
पर्यंत स्थित होते दत्त स्वामी दिगंबर । म्हणती हें आमचें आद्य नित्य प्रियकर । स्थान योगसमाधि-सुखाचें ॥ ४३ ॥
मग बाळकृष्ण ग्रामजोशी प्रख्यात । त्यांनीं आरंभापासून दिधला सुमुहूर्त । सर्वानुमतें शुद्ध शुभ सिद्ध मुहूर्त । देवता-
स्थापनार्थ निश्चित झाला ॥ ४४ ॥ शालिवाहन शके सत्राशें पंचाण्णव । 'श्रीमुख' ऐसें संवत्सराचें नांव । उत्तरायण
शिशिरऋतु पुण्यप्रभाव । माघमासीं शुक्लपक्षांत ॥ ४५ ॥ त्या माघ शुद्ध दशमी मंगलवारीं । ध्रुव रोहिणी नक्षत्रावरी ।
अधिवासन विजय वेदाचारीं । प्रारंभिलें कुंड-मंडपादि ॥ ४६ ॥ यथाशास्त्रोक्त कुंड-मंडप । उत्तम साधिलें वेद-
मंत्रार्थ संपादिक । एक मोठें आणि दोन अल्प । कुंडें वेदिकेसह रचिलीं तीं ॥ ४७ ॥ तीं कुंडें आणि मंडप शोभायमान ।
पहातांचि सर्वांसि बाणे समाधान । जेथें उभा परमात्मा सच्चिद्घन । अत्रिनंदन जगद्गुरु ॥ ४८ ॥ जेथें वैदिक श्रौति
याज्ञिक । विद्वान् ब्राह्मण पातले अनेक । रामाचार्य अष्टावधानी उपनामक । अक्कलकोटनिवासी ॥ ४९ ॥ प्रसिद्ध
अवतारिक चिदंबरदीक्षित । त्यांचे पौत्र अण्णादीक्षित प्रख्यात । आणिले पाचारूनि सन्मानयुक्त । शेषभट अग्निहोत्री
॥ ५० ॥ खेडकर धोंडाचार्य । बागेवाडीकर बाबाचार्य । शंकरशास्त्री आणि योग्य । शास्त्री देव निंबर्गीचे ॥ ५१ ॥
शेषभट इंडीकर । आणि श्रौति स्मार्ति विद्वान् इतर । अक्कलकोटीं येऊनि द्विजवर । देवता-स्थापन आरंभिलें ॥ ५२ ॥

तें माघ शुद्ध पौर्णिमा रविवारीं । पुष्य-नक्षत्रीं प्रथम-प्रहरीं । आयुष्मान्-योगीं द्रव-करणावरी । इष्टग्रहयुक्त शुभलग्नीं ॥ ५३ ॥ शुभवर्ग ग्रह उच्च स्थिर नवमांशांत । स्वस्थानीं देवता झाल्या संस्थापित । त्रयमूर्ति श्रीमुखकमलें कोनाड्यांत । मांडिलीं सन्मुख उच्च स्थानीं ॥ ५४ ॥ त्यासमीप सर्वार्थ-प्रकाशिका । श्रीमद्दत्तात्रेयस्वामि-चरणपादुका । कृष्णपाषाणमय महत्पुण्यदायिका । सुंदर स्थापित शोभल्या ॥ ५५ ॥ त्या पादुकांचे वामभागीं सम्यक् । स्थापिले मयूरेश्वर सिद्धिविनायक । आणि पादुकांचे दक्षिणभागीं अलौकिक । ‘आम्रकोटेश्वर’ नामक लिंग ॥ ५६ ॥ पिंडीसहित कृष्ण शिवबाणलिंग । जें शुक्लपक्षांत बालार्कवत् अव्यंग । आणि कृष्णपक्षांत शोभतें कृष्ण-रंग । हें मास पूजनें स्पष्ट दिसे ॥ ५७ ॥ स्वस्थानीं स्वस्वरूपें प्रत्यक्ष देवता । साक्षात्कारा स्थित झाल्या प्रधानता । वेदमंत्र-घोष आणि स्तोत्रें तत्त्वतां । जयजयकारें गर्जती ॥ ५८ ॥ वाजंत्री वाद्यें वाजविती । भेरी मृदंग झर्झरी उच्चस्वरें गर्जती । नगारे तुतारे ढोलक विणे वाजती । गायक गाती राग सुस्वरें ॥ ५९ ॥ संस्कृत मराठी कानडी भाषेंत । स्तोत्रें भजन गाती समस्त । त्रैमूर्ति परमात्म्याचा अखंडित । जयजयकार दुमदुमिला ॥ ६० ॥ त्याच कालीं एक मुहूर्तपर्यंत । अद्वितीय ब्रह्मानंद-गुहेंत होते स्थित । श्रीमद्दत्तात्रेय स्वामी अवधूत । पुन्हां गुहेबाहेर निघाले ॥ ६१ ॥ तेव्हां सर्व विद्वान् ब्राह्मण । साधु संत सेवेकरी भक्तजन । आणि इतर दर्शनेच्छु प्रेक्षकजन । दत्तात्रेय-नामें गर्जती ॥ ६२ ॥ डंके वाजविती फडकती निशाणें । आनंदें डोलती ध्वजा पताका तोरणें । पशुपक्ष्यादिक सत्य मधुर भाषणें । उच्चारिती मंगलशब्दें ॥ ६३ ॥ श्रीमद्दत्तात्रेय स्वामी उच्च स्वरें । मंगलप्रद चतुर्वेद मंत्र सत्वरें । उच्चारण करिती स्वतंत्र वस्तुतंत्रें । तें परिसूनि आनंदले सकल ॥ ६४ ॥ श्रीमुखें मंत्रार्थ-साफल्यता । परमानंद अंतर्बाह्यवर्ती स्वरूपता । म्हणजे सर्व पदार्थ ब्रह्मानंदमय तत्त्वतां । झाले निःसंशय त्या कालीं ॥ ६५ ॥ परमात्मा परम पुरुषोत्तम परमहंस । जेथें स्वस्थानीं प्रतिष्ठित वेदविद्वांस ।

* * *

उभे असती सर्वांतर्यामी परमपुंस । वेद-मंत्रार्थ पठले सफल स्वमुखें ॥ ६६ ॥ अक्कलकोट पुण्यवंत नगर । श्रीमंत मालोजी महाराज नृपवर । त्यांचे पुत्र श्रीशहाजी राजकुमार । सरदार मानकरीसहित ॥ ६७ ॥ बरवे नारायण वासुदेव कारभारी । आणि इतर कारकुनादि अधिकारी । राजोपाध्ये रामकृष्ण वेदाचारी । ग्रामोपाध्ये राजजोशादिक ॥ ६८ ॥ बाळकृष्ण ग्रामजोशीबुवा । आणि राजाश्रित रामभटादिबुवा । नारायणभट व्यंकटशास्त्रीबुवा । आणि इतर विद्वान् मंडळी ॥ ६९ ॥ त्याकालीं गृहस्थ लहानथोर । आणि व्यापारी शेट सावकार । सराफ नायिक अन्य दुकानदार । गज-घोडे-स्वार आणि पादचारी ॥ ७० ॥ राजभृत्य राजसेवक । आणि बाहेरगांवचे पुष्कळ लोक । मतवादी मार्गी पंथी जन अनेक । प्रेक्षकसमूह विराजला ॥ ७१ ॥ सर्व जातींचे नारी नर लोक । सगळे तेथें उभे ठेले नागरिक । देवतास्थापन-प्रसंग अलौकिक । पाहूनि हर्षित सर्व झाले ॥ ७२ ॥ ते सकलजन भावें अनन्य । वारंवार मुखें शब्दोच्चारिती अक्षय । 'श्रीगुरुदेवदत्त-स्वामी-महाराजकी-जय' । गुरु बाप माय भगवान् ॥ ७३ ॥ त्या लक्षावधि जनांसमक्ष । श्रीमद्दत्तात्रेय-स्वामिराज प्रत्यक्ष । आशीर्वचन सर्वमंगलप्रद निःपक्ष । सर्वार्थप्रद बोलती ॥ ७४ ॥ तो आद्य वेदमंत्र सिद्ध प्रिय स्थान । या देवस्थानांत येऊन राहून । जे जे करितील यज्ञ तप व्रतानुष्ठान । ब्राह्मण-संतर्पण समाराधनादि ॥ ७५ ॥ आणि आम्रकोटेश्वराराधन । मंगलमूर्ति मयूरेश्वराचें सेवन । निज पादुकांचें सम्यक् अर्चन । पूजन भजन कीर्तनादिक ॥ ७६ ॥ वेदमंत्राचें नित्य पठण । अथवा गुरुचरित्रादि ग्रंथांचें पारायण । करितील इष्ट मंत्राचें पुरश्चरण । शुद्ध-चित्तें भक्तिभावें जे ॥ ७७ ॥ त्यांस कोटिगुणित प्राप्त फल । त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण होतील । कुशाव्रत-तीर्थोदकें केवल । स्नान पान करतील जे ॥ ७८ ॥ ते रोग-संकट-दुःखमुक्त । होतील पावन पुण्यवंत । देवतोपासनें सर्वांसि अखंडित । चतुर्विध पुरुषार्थ प्राप्त होती ॥ ७९ ॥ आणि या स्थान-विरुद्ध कुतर्क । संशयापन्न जन जे निंदक । उदरार्थी

विरोधी कुमार्गप्रवर्तक । करितील ते भोगितील नरकवास ॥ ८० ॥ ते कोणीही असोत लोक । स्वकुलासह दुर्गतीस जातील निश्चयात्मक । म्हणूनि टाकूनि संशयादि बाधक । साधक विश्वासें सुखी होती ॥ ८१ ॥ ऐशी संस्थापना श्रीसमक्ष झाली । प्रसन्नवदन स्वामिराज माउली । देखूनि विनोदें ती विद्वान् मंडळी । प्रभृति-अण्णादीक्षित रामाचार्य ॥ ८२ ॥ ते त्याकालीं योगीश्वरास विनविती । आपण साक्षात् पूर्णब्रह्म-स्वरूप चिन्मूर्ति । असूनि महादेव-दत्त-प्रतिमा-गणपति । देवतांस श्रेष्ठ स्थान दिधलें कां ॥ ८३ ॥ ओट्यावरती देवतांसि स्थान देणें । आणि आपण खालीं गुहेंत बसणें । हें योग्य आहे काय करणें । विश्वंभरा महेश्वरा ॥ ८४ ॥ मग वदती प्रभु योगाधीश्वर । आपले आश्रमस्थानीं कोणी आले जर । त्यांसि बैसवूनि उत्तमासनावर । त्यांचें आदरातिथ्य केलें पाहिजे ॥ ८५ ॥ अतिथि-अभ्यागतादि आश्रमीं आल्यासि । सिंहासनावरती बैसवावें त्यांसि । खालीं आपण बैसावें ऐशी । शिष्टाचार-परंपरावृत्ति असे ॥ ८६ ॥ अनादि शास्त्रविहित परंपरा । शिष्टमर्यादा चाललीसे श्रेयस्करा । ती तुम्हांसारख्या श्रेष्ठ द्विजवरां । अद्यापि विदित नाहीं काय ॥ ८७ ॥ परिसूनि वेदशास्त्र-मर्यादा-प्रमाण । दत्तमुनींचें सद्धर्म-प्रवर्तक भाषण । मग हर्ष पावले ते ब्राह्मण । अन्य जन संतुष्टले ॥ ८८ ॥ नंतर पुनरपि ते विद्वज्जन । योगीश्वरांसि करिती सविनय प्रश्न । आपण देवतांसि अर्पिलें सुस्थान । हें यथायोग्य जाहलें ॥ ८९ ॥ परंतु या देवतांसि नैवेद्य अन्नोदक । निर्वाहासि नित्य नियमपूर्वक । कैसें मिळावें हो जगन्नायक । जगत्पालका सांगा जी ॥ ९० ॥ मग प्रसन्नवदन त्रैमूर्ति-अवतार । द्विजवरांसि अर्पिती प्रशस्त उत्तर । हा निजपुत्र आम्रकोटेश्वर । त्याचा पुत्र लंबोदर असे ॥ ९१ ॥ त्याची जननी जगदंबा ईश्वरी । तिचा स्वामी मायाविशिष्ट जगत्सूत्रधारी । हिरण्यगर्भ विराट् पुरुष परिवारी । प्रपंच विस्तारी पुत्र-पौत्रादिक असे ॥ ९२ ॥ तोचि परमात्मा शुद्ध निर्विकारी । आम्ही आमचा गोतावळा भारी । एकनाथाचा सर्व पसारा मायाकारी । त्याहूनि भिन्न आम्ही आहों

॥ ९३ ॥ तथापि सर्वत्रांनीं एकत्र असावें । म्हणूनि देवतांसि स्थानापन्न वैभवें- । करूनि सदोदित सुखरूप नांदावें । अतएव खालीं बैसलों ॥ ९४ ॥ या सर्वत्र देवांसि समान । अखंडित पूजा नैवेद्य समर्पण । नित्यश्री-नित्यमंगल उपचार जाण । निःसंशय होतील हो ॥ ९५ ॥ आम्ही खाऊं तें त्यांस देवूं । यांत अंतर कदापि न ठेवूं । निरंतर ऐक्य अभिन्नस्थितीनें राहूं । प्रपंच टाकूनि सर्वथा ॥ ९६ ॥ ऐकूनि प्रश्नाचें यथायोग्य समाधान । ते द्विजजन गदगदां हांसले पोट धरून । पुन्हां दत्तात्रेय स्वामीसि ते विद्वान् । तृतीय प्रश्न विचारिती ॥ ९७ ॥ हे जगदीशा नारायणा अनंता । या ब्रह्मानंद-गुहेंत वारंवार कां बैसतां । क्षमा करूनि हें सांगा जी तत्त्वतां । हरि भगवंता गुरुराया ॥ ९८ ॥ आम्ही अहंकारी प्रापंचिक । अज्ञानी प्रतिष्ठित दांभिक । आपण सर्वज्ञ सर्वसाक्षी व्यापक । व्हावें सार्थक आमचें ॥ ९९ ॥ तेव्हां वदती दत्तात्रेय स्वामी समर्थ । साधुत्राणालागीं आणि धर्मसंस्थापनार्थ । सर्वांसि प्राप्त व्हावा स्वार्थ परमार्थ । म्हणूनि युगायुगीं अवतरतों ॥ १०० ॥ वेदोक्त धर्ममार्गे चालावी प्रवृत्ति । यज्ञकर्म उपासनादि व्हावें यथास्थितीं । ब्रह्मविद्या आणि वैराग्य भक्ति । चतुर्विध पुरुषार्थप्राप्ति सर्वांसि ॥ १ ॥ संपूर्ण जन व्हावे सुखी । अद्वेष सत्य मृदु भाषण वदावें मुखीं । सर्वांभूतीं नम्रता असावी मित्र-सखीं । अखंड प्रीति परस्पर ॥ २ ॥ या हेतूस्तव ब्रह्मानंद-गुहेंत । आमचें हें आद्य प्रियस्थान विख्यात । जगन्मंगलकारक देवतायुक्त । अद्वैत-परमामृत-स्वरूपी ॥ ३ ॥ हेंचि आमचें एकांत समाधिस्थान । काया दत्तनगरसहित येथेंच राहून । भक्तासि देऊं निजदर्शन । विदेहकैवल्यांत येथें बसूनि ॥ ४ ॥ यद्यपि परमात्मा सर्वत्र व्यापक असे । सर्व शरीरांत अंतर्यामीं वसे । तथापि हृदयस्थानांतचि गवसे । प्रकट होतसे आत्मज्ञानिया ॥ ५ ॥ जैसें देशांत मुख्य राजधानी पत्तन । त्या राजधानींत राजमंदिर मुख्य स्थान । त्या प्रमुख स्थानांत राजसिंहासन । त्यावरी आरूढ भूपति असे ॥ ६ ॥ किंवा देव तीर्थ क्षेत्र यात्रा अनेक । त्यांत मुख्य

काशी-महायात्रा अलौकिक । म्हणूनि काशीयात्रेसि स्पष्टत्वें लोक । 'महायात्रा' सर्व म्हणती ॥ ७ ॥ अथवा गृह राहे स्तंभाच्या आश्रित । ते अष्ट दिशाकोण स्तंभ बहुत । त्या सर्वांत मध्य मुख्य स्तंभ तिष्ठत । त्या मुख्य स्तंभाश्रित गृह नांदे ॥ ८ ॥ किंवा दशदिशा ज्या असती । त्यांत मुख्य पूर्वदिशा वर्णिती । आणि दिग्देवतादि दिशापति । त्यांत मुख्य सूर्यात्मा असे ॥ ९ ॥ सूर्य-अग्नि-चंद्रमादि-प्रकाश अनेक । त्यांत मुख्य परमात्मा संपूर्ण प्रकाशक एक । किंवा रौप्य ताम्र आदि धातु बहुतेक । त्यांत एक मुख्य सुवर्ण असे ॥ ११० ॥ सर्व वर्णांमाजीं मुख्य ब्राह्मण । त्या ब्राह्मणांत मुख्य ब्रह्मसाक्षात्कारी जाण । किंवा धर्मार्थ-कामादि पुरुषार्थांत निर्वाण । मोक्षचि मुख्य वर्णिती ॥ ११ ॥ किंवा सर्व प्रमाणांत मूल प्रमाण । अनादि अपौरुषेय वेद सिद्ध जाण । अथवा सर्व आश्रमांत मुख्य ग्रहण । करिती संन्यास विरक्त जे ॥ १२ ॥ किंवा हट्टयोग राजयोगादि समाधि । त्यांत अभिन्न ब्रह्मस्वरूप निर्विकल्प पूर्ण निरुपाधि । निर्विकार जीवब्रह्मैक्य समाधान निरवधि । समाधि अखंड बोलिजे ती ॥ १३ ॥ त्या अद्वैत परमामृतरूप समाधीचें । एकांत हें प्रिय निवासस्थान आमचें । या बुधजन-पेठेंत जैन चोळाप्पाचे । जागेंत सर्वदा राहिलों ॥ १४ ॥ शेवटीं काया या ब्रह्मानंद-गुहेंत । ठेवून राहूं समाधिस्त गुप्त । भक्त सेवक जनांचे सदोदित । मनोरथ पूर्ण करूं ॥ १५ ॥ इतर स्थानीं कार्यार्थ वसतों । तथापि सदोदित येथेंच आम्ही असतों । जैसें सर्वत्र व्यापक असूनि प्रकटतों । स्पष्ट शुद्ध हृदयकमलीं ॥ १६ ॥ ऐसें बोधूनि केलें समाधान । तेणें संतुष्ट झाले विद्वान आणि जन अन्य । मग समर्थाज्ञें सर्वांसि प्रसाद जाण । श्रीफल तांबूलादि दिधलें तें ॥ १७ ॥ घालूनि नाना रंगवल्ल्यांसि । उत्तम पात्रें मांडिलीं भोजनासि । लवण कोशिंबिरी चटण्यांच्या राशी । शाका स्वच्छ रसभरित ॥ १८ ॥ वडे पापड कुर्वडिया लोणचीं । पात्रावरी वाढिलीं नाना प्रकारचीं । ओदन पीतवरण मधुर सुंदर घृताचीं । द्रोण पात्रें भरलेलीं ॥ १९ ॥ नाना पंचपक्कान्नें पूर्ण गोमटीं ।

कढी सांबारें सार आमटी । दुग्ध दहीं शर्करा क्षिप्रा चोखटी । पात्रीं पदार्थ-समुदाय शोभती ॥ १२० ॥ विकल्प संकल्प सर्व सुटले । ब्राह्मण भोजनासि बैसले । यथेच्छ भोजन करूनि तृप्त झाले । तांबूल दक्षिणा घेऊनि ॥ २१ ॥ तैसेचि सर्वत्र इतर मोठे लहान । जेवूनि ढेंकर देती हर्षें जन । ऐसा आठ दिवसपर्यंत भोजन- । समारंभ उत्तम जाहला ॥ २२ ॥ माघ शुद्ध दशमीपासून । माघ वद्य द्वितीयेपर्यंत अष्ट दिन । अर्चासमारंभ-उत्सव महान् । यथायोग्य पूर्ण झाला ॥ २३ ॥ माघी पौर्णिमा आणि वद्य प्रतिपदा । दोन्ही दिवशीं दोन दोन सहस्र तदा । पात्रें जेविलीं आणि दर्शनासि सदा । असंख्य लोक येत होते ॥ २४ ॥ श्रीफल खर्जूरीफल पुगीफल । अगणित शर्करा कर्पूर पुष्कळ । नंदादीप प्रकाशती निर्मल । स्थापित देवतांसमीप पदार्थ येती ॥ २५ ॥ ज्या देवता स्थापित यज्ञांत । चिदंबर-दीक्षितांचे पौत्र अण्णा दीक्षित । वैदिक याज्ञिक श्रौत स्मार्त बहुत । विद्वज्जन विराजित होते ॥ २६ ॥ आणि त्यांत मुख्यत्वें विधि-हरि-हर । त्रयदेवात्मक पूर्ण ब्रह्मावतार । श्रीगुरु स्वामी दत्तदिगंबर । स्वयमेव यज्ञांत तिष्ठती ॥ २७ ॥ 'यज्ञो वै विष्णुः' 'एको विष्णुर्महद्भूतं'। 'सर्वं विष्णुमयं जगत्'। ते महाविष्णु दत्तात्रेय अनंत । प्रत्यक्ष यज्ञकालीं उभे होते ॥ २८ ॥ त्या आद्यप्रिय निज सिद्धस्थानीं । कुंड-मंडप यज्ञ-देवता विराजूनि । ब्रह्मा-होता-उद्गातादि करूनि । आचार्यादि ऋत्विक उत्तम होते ॥ २९ ॥ स्थापनासिद्ध्यर्थ अनेक देवता । पाचारणापूर्वींच पातल्या तत्त्वतां । यांत कोणती विशेष आश्चर्यता । परमात्मा स्वतः उभा जेथें ॥ १३० ॥ ऐशी सुमुहूर्तीं स्थापना झाल्यावर । विद्वान् विप्रादिकांसि युक्त-सत्कार । वस्त्रें भूषणें दक्षिणा अलंकार । यथायोग्य अर्पिलें ॥ ३१ ॥ कोणी राहिले यतींद्र-सेवेसि । बहुधा हर्षभरित मानसीं । विप्रादिक जाऊन स्वनगरासि । लीला गाती समर्थांच्या ॥ ३२ ॥ श्रीदत्तात्रेय-स्वामींनीं स्वहस्तें । लाविलेल्या औदुंबर-कल्पतरूतें । फलप्रद पूजनीय शास्त्रमतें । त्या वरद वृक्षासि सर्व पूजिती ॥ ३३ ॥

देवतांच्यापुढें समोर पूर्वाभिमुख । उत्तम पाषाणाचे तीन खण प्रमुख । चिरेबंदी कमानी स्तंभासह सुरेख । दृढतर रचिले आहेत ते ॥ ३४ ॥ देवाचे दक्षिणेकडील प्रथम खणांत । समर्थांचा पर्यंक असे प्रतिष्ठित । सर्वत्र जन प्रेमभावें सदोदित । त्या श्रीमंचकासि वंदिती ॥ ३५ ॥ मधल्या खणांत दर्शनार्थ येणारे । जाणारे उभे ठाकती सारे । चंदन-घर्षणाचे खणांत तिसरे । सहाण खोडादिक असती ॥ ३६ ॥ तिन्ही खणांत भिंतीवरी । आणि वरच्या फरसबंदीवरी । सुरंगित चित्रें नाना प्रकारीं । शोभायमान् दिसताति ॥ ३७ ॥ मधल्या खणांत घंटा असती । तिसरे खणांत तास घण घण वाजती । मधल्या मुख्य प्रथम द्वारावरती । श्रीगणपति अक्षय स्थित असे ॥ ३८ ॥ शके अठराशें पूर्णांत । बहुधान्य संवत्सरीं चैत्र कृष्णांत । भौमवारीं कृष्ण चतुर्दशी तिथींत । चतुर्थ प्रहरांत शुभ कालीं ॥ ३९ ॥ गांवांत देहविसर्जन वडाखालीं । समर्थांचें जाहलें त्या कालीं । वडाखालीं समाधि व्हावी म्हणून झटली । स्वार्थी खटपटी मंडळी फार ॥ १४० ॥ तैसेचि रायराजांचे मठांत । समाधि व्हावी म्हणून झाले प्रयत्न बहुत । परंतु ते सर्व निरर्थक होऊनि पेठेंत । पूर्व भाकित समर्थांचें झालेलें जें ॥ ४१ ॥ त्या समर्थ संभावितांचा सत्यानुभव । प्राप्त झाला लोकांसि सदैव । समारंभ होऊनि उत्कृष्ट अपूर्व । दत्त-काया नगर पेठेंत आणिले ॥ ४२ ॥ बुधवार पेठेंतील ब्रह्मानंद-गुहेंत । समर्थ निजानंदीं झाले अखंड स्थित । तो शोकरूप भयंकर काल दुःखित । स्वामिराजांच्या वियोगाचा ॥ ४३ ॥ असो समर्थ अदृश्य झाल्यावरी । कृष्णाप्पा श्रीपादभट पूजारी । आणि नारायण वासुदेव कारभारी । इत्यादिकांनीं प्रयत्न केले ॥ ४४ ॥ समर्थकृपें मिळूनि लोकाश्रय । त्या धनें सभामंडप भव्य रमणीय । पांच खणी उच्च सिद्ध काष्ठमय । तिन्ही बाजूंनीं बारगजी सहित ॥ ४५ ॥ सिद्ध झाला समाधानकारक । आणि मंडपाचे उजवे बाजूस सम्यक् । सहा खणी दुमजली जागा बांधूनि एक । त्यांत चौघडादि वाद्यें वाजतीं ॥ ४६ ॥ देवळाचे दक्षिण बाजूला । उत्तम औदुंबर वृक्ष

विस्तारला । पार बांधूनि वरी देवता-मेळा । प्रतिष्ठित झालेला पूजिती ॥ ४७ ॥ प्रत्यक्ष असतां स्वामीसमर्थ । प्रकट झालें कुशाव्रत तीर्थ । कुशाव्रताच्या तिन्ही भागीं विस्तृत । दूखणी सोपे बांधिले असती ॥ ४८ ॥ तेथें स्वयंपाक आणि माजघर । समर्थांचे मौल्यवान् पदार्थगृह सुंदर । बांधिलें असून त्यामागें वागण्याचें द्वार । आणि आहे द्वार पुढें मोठें ॥ ४९ ॥ देवळाचे मागें दोन घरें । पूजाऱ्यांचीं आहेत बरें । चौघड्यासमीप स्थापिलें खरें । समर्थ धेनूचें समाधिस्थान ॥ १५० ॥ ब्रह्मानंदस्वरूप गुहेवरती । कृष्णपाषाणमय स्थापित उत्तमाकृति । ज्यावरी समर्थांचें मुखकमल मांडिती । रौप्यादि धातूचें पूजेसि ॥ ५१ ॥ किरीट उत्तम मकर कुंडलें । महावस्त्रालंकार शोभती चांगले । समाधीचें पूजन आरती पूजारी भले । करिती त्रिकाल यथासांग ॥ ५२ ॥ लघुरुद्र महारुद्राभिषेक । समाधीसि यथासांग करिती लोक । बाहेरच्या तीन कमानींतून देख । पूर्वेस दोन कोसपर्यंत वन दिसे ॥ ५३ ॥ कमानींत मश्रूचे पडदे तीन । आहेत सर्वदा शोभायमान् । सभामंडपांत स्तंभ दश महान् । असती तिन्ही बारगजींत अष्टादश ॥ ५४ ॥ देवांसि प्रदक्षिणा उत्तम प्रकारें । सभामंडपांत देवासमोर जन सारे । उभे राहून पूर्ण करिती त्वरें । आणि कांच हंड्या पुष्कळ लाविती ॥ ५५ ॥ सभामंडपाचे दक्षिण उत्तर भागीं आणि समोर । राजमार्ग असती तथा दुकानदार । लोकसदनें निंबवृक्षादि सुंदर । विराजित मनोहर मंडप दिसे ॥ ५६ ॥ मेणा पालख्या मंचक अब्दागिरी । सुंदर मोरचेल चवऱ्या उत्तमप्रकारीं । योगीश्वराच्या लिखित तसबिरी । विंझणा छत्रचामरादि असती ॥ ५७ ॥ अक्कलकोट पंचक्रोशीं हिंडूनि । आले म्हणजे समर्थांस आद्य प्रिय स्थानीं । निज भक्त चोळाप्पाचे सदनीं । आल्यावीण श्रम-विश्रांति होत नव्हती ॥ ५८ ॥ चोळाप्पाच्या घरमंडळी लेंकरांस । गाई म्हशी आदिक वत्सांस । अवलोकूनि दत्तात्रेय स्वामीस । वाटे संतोषपूर्ण विश्रांति ॥ ५९ ॥ जैसा गोकुळ-वृंदावन-मथुरेंत । श्रीकृष्ण परमात्मा भगवंत । गोपीगोपालादि-वचनें

संप्रवर्तत । भक्तिप्रिय श्रीपति ॥ १६० ॥ अथवा अवतार श्रीरामचंद्र । एकवचनी एकपत्नी निरंतर । असूनि वानरांच्या वचनानुसार । भक्तिप्रिय वर्तत होते ॥ ६१ ॥ भिल्लिणीचें उच्छिष्ट बदरीफल । आवडीनें प्रभु चाखी चिरकाल । गोपाळांचा काला भगवान् दयाल । अभिन्न प्रीतीनें भक्षण करी ॥ ६२ ॥ तैसे दत्तात्रेय स्वामी योगाधीश्वर । असूनि परमहंस स्वच्छंद व्यवहार । चोळाप्पा कृष्णाप्पा श्रीपादादि नर । येसूबाई राधाबाई इत्यादिक ॥ ६३ ॥ किंवा सुंदराबाई सेवेकरी । या सर्वांच्या वचनानुसारीं । वर्तत होते भक्तिप्रिय जनहितकारी । भक्तवत्सल करुणार्णव ॥ ६४ ॥ तच्चरणकमलें औदुंबर-छायेंत । विष्णुपंत ओंडकराचे आंगणांत । अति लहान असती स्थापित । अक्कलकोट नगरामाजीं ॥ ६५ ॥ मुरलीधराचे देवळामागें । उदक वापी बांधूनि भक्तिरंगें । औदुंबरछायेंत पादुका सुसंगें । उत्तम स्थापित जाहल्या ॥ ६६ ॥ आणि बाळकृष्ण ग्रामजोशाचे परसांत । कूपासमीप औदुंबरछायेंत । कृष्णपाषाणमय पादुका स्थापित । आहेत अन्यही ठिकाणीं ॥ ६७ ॥ गांवांत वटवृक्षाखालीं जलकूप । जुनीं आहेत ब्राह्मणगृहें समीप । तेथें अश्व-गाईंचे छपरांत निर्विकल्प । स्वामिराज वसत होते ॥ ६८ ॥ तेथें यतीश्वराचें देहविसर्जन । झालें म्हणून देवालय लहान । रचवूनि सर्व मंडळी मिळून । बाबूराव विष्णु मामलेदार प्रमुख ॥ ६९ ॥ तेथें शिवलिंग चांगलें स्थापिलें । मग सेवेकरीमंडळ जमलें । पूर्वीं परशुराम लंगोटीवाले । काष्ठपादुका पूजित होते ॥ १७० ॥ जोतीबा पाडे मराठा कोंकणांतील । नित्य पेठेंतील देवासि पुष्प बेल । आणूनि देत होता तुलसीदलें विपुल । तो पुढें वडाखालीं राहिला ॥ ७१ ॥ त्यानें पुष्कळ प्रदेश हिंडून । लोकाश्रय धन संपादून । वडाखालीं सभामंडप लहान । सुंदर रमणीय बांधविला ॥ ७२ ॥ पुढें जागा पुष्कळ खण । माड्यादिक बांधविलें श्रम करून । पूजा-नैवेद्यार्थ संस्थानांतून । मिळतसे वेतन खर्चासि ॥ ७३ ॥ जलकूप वटवृक्ष सुंदर हवापाणी । त्यांत समर्थांचें स्थान सुंदर देखूनि । येणारे जाणारे लोक सहज संतोषूनि । सामर्थ्यानुरूप साह्य करिती

* * *

॥ ७४ ॥ या स्थानीं जोतीबा सेवेकरी । प्रमुख असे कुटुंब-सहपरिवारी । बाबाभट असती देवपूजारी । इतर सेवेकरीही असती ॥ ७५ ॥ नित्य पूजन नैवेद्य आरती । होतसे भजन चांगले रीतीं । आले गेले जन तेथें उतरती । सोय जाणूनि उदकादिक ॥ ७६ ॥ तैशीं पुणें मुंबई आदिक शहरांत । स्वामी-समर्थांचीं देवालयें मठ बहुत । मूर्ति आणि पादुकासह विराजित । बांधविले सेवकांनीं ॥ ७७ ॥ रायराजाचें मठस्थापनवृत्त । अन्य अध्यायीं वर्णिलें उचित । अनंत स्थानें नामरूपें अनंत । अद्भुत लीला तारक गुरूची असे ॥ ७८ ॥ त्या गुरुलीलामृतपानें सर्व मनोरथ । पूर्ण होती निःसंशय यथार्थ । अंतःकरण शुद्ध अद्वेष पाहिजे येथ । केवळ स्वार्थ नसूनियां ॥ ७९ ॥ म्हणूनि हरि-गुरुलीलामृताची । सर्वदा घ्यावी अवीट रुची । सर्वसिद्धि इहपर सार्थकतेची । गुरुभक्ति अमृतसंजीवनी ॥ ॥ १८० ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदोपनिषदरहस्यमथित । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । पंचत्रिंशतितमाध्याय गोड हा ॥ १८१ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे पंचत्रिंशतितमोऽध्यायः समाप्तः ॥ ३५ ॥ श्रीगुरुदेवदत्त—स्वामीसमर्थ ॥

# ॥ अध्याय छत्तिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्तदिगंबराय नमः ॥ ॥ शिष्य प्रार्थित अहो गुरुराय । मायेचें स्वरूप आणि लक्षण काय । माया सत्य किंवा असत्य होय । तेही शुद्ध बोधार्थ सांगा जी ॥ १ ॥ तेव्हां गुरु करिती माया-विवेचन । जे पदार्थ ज्या पदार्थावांचून । सिद्ध होऊं न शकती जाण । ते पदार्थ त्या पदार्थाची कल्पना करविती ॥ २ ॥ जैसें दिवसांत न करणारा भोजन । त्या पुरुषाचे शरीरीं जी स्थूलता असे जाण । ती स्थूलता रात्रौ भोजन झाल्याविण । संभवत नाहीं कदापि ॥ ३ ॥ म्हणून ती स्थूलता पुरुषाचें । कल्पना करविते रात्रीं भोजन केल्याचें । तैसें अकर्ता अभोक्ता शुद्ध आत्म्याचे । ठायीं मी सुखी वा दुःखी ॥ ४ ॥ या प्रकारचा जो ध्यास । भोक्तेपणाचा असे खास । तो मायेवांचून न पावे उद्भवास । शुद्ध नित्य आत्म्याचे ठायीं ॥ ५ ॥ म्हणून जो आत्म्यामाजीं अध्यास तो । मायेची कल्पना करवितो । ऐशा अर्थोत्पत्तिरूप प्रमाणानें होतो । मायावाद सिद्ध बा ॥ ६ ॥ याप्रकारें सिद्ध झालेली माया ती । त्या मायेचे दोन स्वभाव असती । एक ‘आवरणरूप’ शक्ति । आणि ‘विक्षेपरूप’ शक्ति दुसरी ते ॥ ७ ॥ मायेचा आवरणशक्तिरूप स्वभाव । जागृति स्वप्न सुषुप्ति या त्रयावस्थेंत विद्यमान भाव । जोंपर्यंत प्रत्यक्ष आत्मानुभव । झाला नाहीं जीवासि ॥ ८ ॥ तोंपर्यंत मायेची आवरणशक्ति । होत नाहीं खचित निवृत्ति । कां तरी एक ब्रह्मविद्येनेंच होय ती । नष्ट आवरणशक्ति मायेची समूल ॥ ९ ॥ आणि दुजा विक्षेप-शक्तिरूप । तो स्वभाव असे द्वय रूप । एक जागृति आणि दुसरा स्वस्वरूप । स्वभाव विक्षेपशक्तीचा तो ॥ १० ॥ त्यांत जागृतावस्थेंत नेत्रादि इंद्रियेंकरून ।

बाह्य घटपटादि पदार्थांचें होतें ज्ञान। त्या अवस्थेस वेदतत्त्ववेत्ते विद्वान् । ‘जागृतावस्था’ म्हणतात ॥ ११ ॥ आणि
ज्या अवस्थेंत पूर्वसंस्कारासि घेऊन । केवल मनानेंचि होतें ज्ञान उत्पन्न । त्या अवस्थेसि म्हणती विद्वज्जन । ‘स्वप्नावस्था’
नाम ऐसें ॥ १२ ॥ जागृति स्वप्न अवस्था दोन । विक्षेपरूप आहेत त्यांचें ऐका शब्दार्थ-ज्ञान । आवरण म्हणजे
आच्छादन वेष्टन । अज्ञान-भ्रमेंकरून झांकणें जें ॥ १३ ॥ ‘विक्षेप’ म्हणजे चित्तवैकल्य । अज्ञान भ्रमानें उत्पन्न होतें
भय । भ्रमिष्टासारखें अस्ताव्यस्त वर्तन होय । विक्षिप्त चित्त भ्रमाकुल तें ॥ १४ ॥ म्हणून जागृतावस्थेंत सुखदुःखप्राप्ती- ।
योगानें मी सुखी दुःखी आहेंसें मानिती । ऐशा ह्या उपभोगरूप अतिशयता होती । पुरुषाचे ठायीं उत्पन्न ॥ १५ ॥
तैसें स्वप्नांत सुखदुःखप्राप्तियोगेंकरून । मी सुखी दुःखी आहें जाण । ऐशी भोगरूप अतिशयता उत्पन्न । सुषुप्ति-
अवस्थेंतही होतसे ॥ १६ ॥ आणि स्वप्नांत भोगातिशयतेस आधार । तोचि तियेसि जागृतींत आहे साचार । त्यांत
स्वप्नांत सुखदुःखजन्य भोगासि तर । केवल आधार मनचि आहे ॥ १७ ॥ कां तरी नेत्रादि इंद्रियांचा लय स्वप्नांत ।
होतो म्हणून इंद्रियें भोगासि आधार नाहींत । यद्यपि प्राण तथा शुद्धात्मा आहेत स्वप्नांत । तथापि त्यांना भोगाधारता
मनसंगें ॥ १८ ॥ म्हणजे प्राण जड आहे केवल । आणि शुद्धात्मा आहे असंग निश्चल । म्हणून स्वप्नांत परिशेष मन
चंचल । सुखदुःखजन्य भोगासि आधार असे ॥ १९ ॥ स्वप्नानंतर पुरुषासि जागृतींत । प्रत्यभिज्ञा-ज्ञान स्पष्ट होत। कीं मी
स्वप्नांत होतों राजसुखानुभवित । तो मी आतां जागृतींत एकांत सुख भोगितों ॥ २० ॥ याप्रकारचें प्रत्यभिज्ञा-ज्ञान ।
स्वप्नभोक्ता तथा जागृत्-भोक्त्याचे अभेद अभिन्न। म्हणून स्वप्न-जागृतीचा भोक्ता एकचि मन । निश्चयें मानिलें असे ॥ २१ ॥
यद्यपि प्राणासारिखें आहे जड मन । तथापि मनासि विशेषता आहे प्राणाहून । आकाशादि पंचभूतांचे मिश्रित सत्त्वगुण ।
तेथून अंतःकरण उत्पन्न झालें ॥ २२ ॥ आणि आकाशादि पंचभूतमिश्रित । रजोगुणापासून प्राण झाले उद्भूत । सत्त्वगुणें मन

प्रकाशक असत। रजोगुणें प्राण प्रकाशक नाहींत ॥ २३ ॥ जैसा प्रदीप तथा घटांत। जडता-धर्म समान दिसत। तरीही प्रदीप घटासि प्रकाशित। आणि दीपासि घट प्रकाशीना ॥ २४ ॥ ऐशा सत्त्वगुणविशिष्ट अंतःकरणांत। तादात्म्य-अध्यास-संबंधयुक्त स्थित। परमात्मा 'विज्ञानमय' संज्ञेसि प्राप्त। होऊनि सर्व देहादिकांसि प्रकाशितो ॥ २५ ॥ म्हणून 'पुरुष' संज्ञेसि प्राप्त झाला। तथापि न लिंपे अंतःकरणधर्माला। कार्यकारणरहित स्वयंप्रकाशला। चक्षु-श्रोत्रमयादि नाम त्यागूनि ॥ २६ ॥ विज्ञानमय भोक्ता स्वप्नांत। 'हिता' नाडींत राहूनि शयन करित। किंवा 'पुरीतत्'मध्यें अथवा हृदयांत। शयनासि प्राप्त होतसे ॥ २७ ॥ जागृतींत शयन स्पष्ट नसे। ऐसें श्रुति वर्णितसे। शयनकर्त्या पुरुषाचे आधारें ऐसें। सांगूं आतां हृदयकमल ॥ २८ ॥ हृदयकमलाचें स्वरूप। तथा पुरीततांचें लक्षणारूप। तथा हिता नामक नाडीचें स्वरूप। स्पष्ट करून दाखवूं ॥ २९ ॥ संपूर्ण प्राणीमात्रांचें उदर। तथा उरस्थान जें युक्त-छिद्र। त्या उदर तथा उर-स्थानाचे मध्यंतर। देशांत अधोमुख ज्याचें असे ॥ ३० ॥ तथा चित्ताचें निवासस्थान। ऐसें जें मांसमय स्थूल जाण। त्यासि हृदयकमल म्हणती विद्वज्जन। ज्यांत निवासे परमात्मा ॥ ३१ ॥ आणि त्या हृदयासि चारी बाजूंनीं वेष्टन। ज्यासि लोक 'आंद्रा' म्हणती जाण। त्या आंद्रासीच पुरीतत् आहे नामाभिधान। त्या हृदयापुरीततांचें ज्ञान नेत्रें नसे ॥ ३२ ॥ आपल्या हृदयाचें तथा पुरीततांचें ज्ञान। होत नाहीं कोणासही नेत्रेंकरून। परंतु अन्य प्राण्याचें झालिया उदरभेदन। हृदयादिकांचें ज्ञान अन्यासि नेत्रें होतसे ॥ ३३ ॥ एक केश सहस्र विभागासि झाला प्राप्त। त्या केशाचा एक विभाग परिमाण होत। त्या परिमाणासारखें परिमाण असत। ऐशा अनंत नाड्या हृदयांत वसती ॥ ३४ ॥ जैसें सूत्रेंरचित जालाचें आद्य ग्रंथीहून। होतसे अनंत सूत्रांचें निर्गमन। तैसें हृदय-देशापासून अनंत नाड्या निघतात ॥ ३५ ॥ प्रश्नोपनिषदांत नाड्यांची गणती। कथिली ती संख्या परिसावी श्रोती। जैसे एकाच

वृक्षापासून निघती । प्रथम स्थूल स्कंध ते ॥ ३६ ॥ त्या स्थूल स्कंधांपासून अन्य । यत्किंचित् स्थूल शाखा निघतात । त्या
शाखांपासून अत्यंत । सूक्ष्म अन्य शाखा उद्भवती ॥ ३७ ॥ तैसें हृदयरूप एक वृक्षापासून । स्थूल स्कंधांच्या समान ।
एक शताधिक नाड्या उत्पन्न । होती प्रश्नोपनिषद्-प्रमाणानें ॥ ३८ ॥ त्या स्थूल नाड्यांतील एकेक नाडीपासून । किंचित्
स्थूल शाखांसमान । एक शत नाड्या होती उत्पन्न । त्या एकेक शत नाड्यांतील ॥ ३९ ॥ एकेक नाडीपासून । अत्यंत
सूक्ष्म शाखासमान । बाहत्तर सहस्र संस्था गणन । नाड्या निघती हृदय-वृक्षीं ॥ ४० ॥ त्या सर्व नाड्या मिळूनि संख्यांक ।
बाहत्तर कोटि बाहत्तर लक्ष देख । दशसहस्र दोनशें एक । हृदयरूप वृक्षांतून निघताति ॥ ४१ ॥ आणि अन्नाचा
परिणाम जो रस । तो रस अति सूक्ष्म नाड्यांत करी प्रवेश । तेणें सर्व नाड्या पावती पूर्णतेस । ऐसा अति सूक्ष्म
दृष्टांत असेचि ॥ ४२ ॥ त्या सर्व सूक्ष्म नाड्या शरीरांत । पादांगुष्ठापासूनि मस्तकापर्यंत व्यापित । जैसे वृक्षपर्णासि
शंकु व्याप्त असत । अग्निव्यापक धूम जैसा ॥ ४३ ॥ अग्नीचें ज्ञान होण्यास धूम कारण । तैसें त्या सूक्ष्म नाड्यांत
मन । सर्व इंद्रियांचा उपसंहार करून । प्राप्त होतसे एकलें ॥ ४४ ॥ धर्माधर्मपाशें बांधिलेलें चित्त । असूनि नाना
संस्कारयुक्त । स्वप्नांत द्रष्टा-दर्शन-दृश्यरूप मन होत । साक्षी-चैतन्य प्रकाशमान् ॥ ४५ ॥ हें मन नाडींत प्रवेश
करी जेव्हां । विज्ञानमय-भोक्ता आत्मा तेव्हां । स्वमायाबलें उच्च नीच अथवा । पदार्थसमुदाय देखतसे ॥ ४६ ॥
म्हणूनि स्वप्न जागृत असे तुल्य । अज्ञान आभास आवरण-विक्षेपमय । तें अज्ञान-आवरण-विक्षेपादि लय ।
पावती केवल ब्रह्मज्ञानें ॥ ४७ ॥ विघ्नबाहुल्यें समाधीस बाधिती । त्या विघ्नांचीं नामें सांगूं निश्चितीं ।
प्रसंगवशात करूं निराकृति । उमजावया सर्वांसि ॥ ४८ ॥ लय-विक्षेप-रसास्वाद-कषाय । हीं चार विघ्नें बाधक सत्य ।
‘लय’ म्हणजे निद्रा तम अविवेक होय । प्रथम विघ्न हें निरूपिलें ॥ ४९ ॥ दुसरें ‘विक्षेपाचें’ परिसा लक्षण । जें अज्ञान

भ्रमें भय होतें उत्पन्न । विकल्प होणें सदा विषयस्फुरण । ‘विक्षेप’ विघ्न तें प्रतिबंधक ॥ ५० ॥ ‘रसास्वाद’ तें तिसरें विघ्न । आनंदाकार वृत्तीनें मानणें मी असे धन्य । मधुर-कटु-आम्ल-षड्रस-रुचिग्रहण । विषयसेवन चित्तदोषें ॥ ५१ ॥ चौथें विघ्न ‘कषाय’ नामक । तुरट स्वाद रस मोहक सुवासिक । प्रपंचांत आसक्त विषयात्मक । चित्त अनेक दोषयुक्त तें ॥ ५२ ॥ राग द्वेषादि तीव्र वासनेंकरून । चित्ताचा स्तब्धीभाव म्हणजे स्थिरपण । चित्त होतें व्यग्र क्षुब्ध क्रोधवान् । कषाय-विघ्न लक्षण तें आहे ॥ ५३ ॥ या प्रकारें जें विघ्नबाहुल्य । मुमुक्षु गुर्वनुग्रहवान् योग्य । त्यांनीं हळूं हळूं ब्रह्माभ्यासें अक्षय । टाकावीं प्रतिबंधक विघ्नें तीं ॥ ५४ ॥ असो त्या नाडींत जेव्हां संचरे मन । आपल्या कारणरूप अज्ञानांत लय पावून । तेव्हां विज्ञानात्म-सुषुप्तिरूप पूर्ण । शयनासि प्राप्त होतसे ॥ ५५ ॥ येथें अंतःकरणविशिष्ट जें चैतन्य । त्याचेंचि नाम भोक्ता ‘विज्ञानमय’ । तो परिछिन्नभाव टाकूनि अभेद अद्वय । परमात्मरूपासि मिळतो निद्रेंत ॥ ५६ ॥ विज्ञानमयाचा जो परमात्मासंगें अभेद । तथा सर्व मनादि-इंद्रियांचा लय असे विशद । तेंचि शयनाचें स्वरूप कथिती तत्त्वविद् । जैसें घटकाश महादाकाशांत अभिन्न आहे ॥ ५७ ॥ तैसा परमात्मा सर्वांतर्यामी । व्यापक आहे श्रीमद्दत्तात्रेय-स्वामी । जो प्रतिपादित निगमागमीं । स्मरणगामी जगदीश ॥ ५८ ॥ सकलाभीष्टवरप्रद । प्रणतभक्तवत्सल करुणाकंद । सामर्थ्यातिशययुक्त गोविंद । तच्चरित्र श्रोतीं परिसावें ॥ ५९ ॥; अक्कलकोटापासून । आठ कोसांवर बोरामणि गांव म्हणून । सोलापूर जिल्ह्यांतलें लहान । येथील आनंदवृत्त परिसावें ॥ ६० ॥ त्या बोरामणि ग्रामांत राहणारे । गणपतराव उपनाम हुकिरे । वाणी जातीचे गृहस्थ बरे । त्यांचे सदनीं गाई म्हशी वृषभ वसती ॥ ६१ ॥ त्या गणपतरावाच्या म्हशी तीन । हरवल्या न सांपडती म्हणून । पुष्कळ प्रकारें केले शोध प्रयत्न । ते निष्फळ जाहले ॥ ६२ ॥ आतां काय करावा उपाय । ऐसा विचार करूनि चिंतामय । मग प्रार्थिले नवसिले श्रीदत्तात्रेय ।

स्वामी समर्थ दयार्णव ॥ ६३ ॥ आमच्या सांपडती म्हशी तीन । तर त्यांतील एक म्हैस आपणां अर्पण करीन । अथवा एका म्हशीचें मोल देईन । सत्य सत्य स्वामिराया ॥ ६४ ॥ भिकाऱ्याच्या वेषें चोरांनीं । त्या म्हशी जीर्णगृहांत ठेविल्या लपवूनि । आज मागल्या रात्रीं जाऊं घेऊनि । ऐसा चोरांचा संकेत ॥ ६५ ॥ दिवसां भिक्षेसि फिरती ते चोर । ऐसा पाहूनि गुप्त अवसर । एका सज्जनानें येऊनि सूक्ष्म विचार । सांगितला गणपतराव हुकिऱ्यासि ॥ ६६ ॥ मग संगें घेऊनि धष्टपुष्ट गडी । जीर्णगृहांत जाऊन तांतडीं । कंठाशीं बांधूनि दोरडी । आणिल्या म्हशी निजगृहीं त्या ॥ ६७ ॥ चार दिवसांत तृण-जला दुर्लभता । तेणें म्हशींना आली अशक्तता । हांबर्डा फोडिती क्षुत्-पिपासार्ता । तृण-जलें शांत म्हशी झाल्या ॥ ६८ ॥ सर्वांसि वाटलें प्रबल आश्चर्य । म्हणती स्वामी प्रत्यक्ष परमेश्वर जगद्गुरुवर्य । नवस सुफलित झालें कार्य । धन्य परमौदार्य प्रभूचें ॥ ६९ ॥ मग एक म्हशीचें मौल्य जें धन । त्या धनें पितळेच्या समया करूनि दोन । वणिकानें चोळाप्पाचे स्थानीं अर्पण । केल्या दत्तात्रेय-समर्थातें ॥ ७० ॥; त्या गणपतरावाचे सदनीं । एक धष्टपुष्ट महिषी वांझ असूनि । अनेक साधनें थकले करूनि । तथापि महिषी फळली नाहीं ॥ ७१ ॥ निष्फळ निरुपयोगी म्हैस जाणून । वणिकानें केली दत्तात्रेयार्पण । जैसें मस्तकाहून किंवा वाहनावरून । मार्गांत तैल घृत दुग्धादि सांडलें जें ॥ ७२ ॥ मस्तकावरचीं भांडीं मडकीं चर्म बुधलें । असावधपणें खालीं मार्गांत पडलें । त्यांतील रसादि पदार्थ सांडिले गेले । भूमीवर व्यर्थ ते ॥ ७३ ॥ त्यांतलें कांहीं घेण्यासारखें नसून । हातीं न लागे करितां प्रयत्न । मग निराश निरुपाय होऊनि जन । 'कृष्णार्पण' झालें म्हणताति ॥ ७४ ॥ हें कृष्णार्पण करणें नव्हे सत्य । प्रापंचिक स्वार्थीं कपटी कृत्य । परमेश्वरासि देखील फसविती नित्य । अन्यासि फसविती यांत नवल काय ॥ ७५ ॥ असो ऐशी वंध्या महिषी अर्पिलेली । तिची दया यतीश्वरास उपजली । आपले जे झाले त्यांचीं कल्याणें केलीं । पाहिजेत समर्थांनीं

|| ७६ || मग ते असोत देव-मानव पशु-पक्ष्यादिक । त्यांची लज्जा आणि स्वब्रीद-संरक्षक । सर्वांसि परमात्माचि एक तारक । त्यावीण समर्थ कोणी नसे || ७७ || पुढें ती वांझ महिषी फळली । वंध्या असून वृद्धापकालीं । गर्भवती होऊनि प्रसवली । पारडें वत्स समर्थकृपें || ७८ || तें पारडें वत्स पावलें पंचत्व । मग लोक धिक्कारिती वणिकासि असत्त्व । शरण होऊनि प्रार्थिती ब्रह्मतत्त्व । जें पूर्ण परमेश्वर यतीन्द्र || ७९ || त्याकृपें पुन्हां पारडें वत्स-देहीं । प्राणादिक संचरून लवलाहीं । वंध्या महिषीचें पारडें जीवंत झालें पाहीं । परमेश्वरकरणी विचित्र असे || ८० || स्वामिसमर्थ-कृपेंकरून । महिषी वत्ससहित पावली संजीवन । करिती तेव्हां दुग्ध-दोहन । वंध्या वृद्ध महिषीचें || ८१ || सर्व सुखी होती वर्षतां मेघवृष्टि । तैशी झालिया परमेश्वरकृपादृष्टि । वांझ महिषीचें दुग्ध प्राशूनि पुष्टि । आली वणिकाचे मंडळीस || ८२ || परंतु येऊन अक्कलकोट क्षेत्रासि । दुग्ध-बिंदुही एके दिवशीं । श्रीमद्दत्तात्रेय-देव-नैवेद्यासि । अर्पिला नाहीं वणिकानें || ८३ || ‘गरज सरो आणि वैद्य मरो’ ऐशीं । लोकवचनें येतीं प्रतीतीसि । तात्पर्य सत्यासत्यविचार प्रापंचिकांसि । वाटत नाहीं स्वापराध || ८४ || पुढें संवत्सर गेले दोन । वंध्या महिषी तेव्हां पावली मरण । अगम्य अतर्क्य लीला गुण । कृपाळुपण गुरु-परमेशाचें || ८५ || जरी झाले अपराध नाना । तरीही विश्वंभरा नारायणा । विषमता आणि निष्ठुरपणा । कधींही स्पर्श करीना || ८६ || पुत्राचे अपराध तीव्र अनेक । कदा न गणिती जननीजनक । तैसा कृपासागर अविषम जगन्नायक । उपमारहित एक विराजे || ८७ || त्या दत्तात्रेय-स्वामींचें झालें वरदान । तेव्हां गणपतराव हुकिरे जाण । धनधान्यादि-पुत्रपौत्रसंपन्न । होऊन संसार-सुख भोगिती || ८८ || प्रत्येक पौर्णिमेसि वारीसि । पेठेंतील समाधिस्थानीं दर्शनासि । ते स्वतः किंवा चिरंजीव बंधु प्रेमेंसीं । अक्कलकोटासि येती कीं || ८९ || श्रीफलादि अर्पण करून । प्रदक्षिणा घालिती लोटांगण । त्यांनीं प्रत्यक्ष

स्वमुखें निवेदन । केलें स्वानुभवासि आलेलें ॥ ९० ॥ तैसेंचि तें सत्य इत्थंभूत । दत्तात्रेय स्वामींचें अद्भुत चरित्र । वर्णिलें; पुढें गजेंद्राचें वृत्त । परिसावें श्रोतीं सावधानें ॥ ९१ ॥ अक्कलकोट ग्राम येथील । महीपालाच्या मंदिराजवळ । हत्ती बांधण्याचें आहे स्थळ । जेथें सांप्रत नूतन शाला रचित असे ॥ ९२ ॥ त्या स्थानीं जव्हार-नामक । मत्त वारण बांधित होते एक । तो मातंग जनांसि त्रासदायक । माजला फार एकेकालीं ॥ ९३ ॥ कोणत्याही मनुष्यमात्रास । जवळ येऊं देईना कोणत्याही समयास । मोठ्या जाड बळकट स्तंभास । साखळदंडें बांधिलेला ॥ ९४ ॥ जो स्तंभ भव्य लाट दृढतर । भूमींत गाडून अर्धा होता वर । तो स्तंभ उपटोनि मोडिला झटकर । जव्हार-नामक हत्तीनें ॥ ९५ ॥ मागल्या पायांचे साखळदंड । होते दृढ गाडलेले अखंड । ते तोडण्याकरितां उदंड । प्रयत्न केले मत्त गजें ॥ ९६ ॥ तेथें पुष्कळ भरूनि दगड गोटे । दोन बुरूज रचिले होते मोठे । ते पाडून टाकिले एक्या झपाटें । मदोन्मत्त करीनें ॥ ९७ ॥ सोंडेनें त्यांतील एकेक दगड । फेंकून मारूं लागला द्वाड । त्या कारणानें राजमार्ग अखंड । निरोधिला प्रचंड गजानें ॥ ९८ ॥ त्या राजमार्गें करण्यास गमन । भयभीत होती सकलजन । आणि गौ अश्व वृषभ श्वान । महिषी गर्दभादिक तीं ॥ ९९ ॥ कोणी आले कीं दगड मारी । त्या मार्गें न जाती नर नारी । सुटून बंड करील तो करि । म्हणूनि नृपवरें योजना केली ॥ १०० ॥ आजूबाजूनें घोडेस्वार । उभे राहूनि पादचारी सशस्त्र । संरक्षण करिती आज्ञेनुसार । प्रजाजनांचें त्या कालीं ॥ १ ॥ लोकांसि वाटलें भयंकर । विलोकूनि तें कृत्य श्री नृपवर । म्हणती मतंगजाचा नाश सत्वर । करावा काय याकालीं ॥ २ ॥ श्रीमद्दत्तात्रेय स्वामी अवधूत । जाणूनि मत्त वारणाचें भयंकर वृत्त । पुष्कळ सेवेकरी जनांसहित । त्या राजमार्गांत पातले ॥ ३ ॥ तेव्हां लोकांनीं पुष्कळ समजावून । कथिलें कीं न जावें या मार्गांतून । इकडे दगड वारंवार झुगारून । गज शुंडेनें मारितसे

॥ ४ ॥ अहो यतियूथपति नरहरी । अति मदोन्मत्त जाहला करि । भडाभड दगड मारितो झडकरी । म्हणून
अन्य मार्गें जावें हो ॥ ५ ॥ शुंडेनें हत्ती दगड फेंकित । हें पाहूनि मोठे सेवेकरी भक्त । भयें होऊनि गर्भगलित ।
मागें परतले त्या कालीं ॥ ६ ॥ आपआपला जीव घेऊन । करूनि गेले पलायन । सर्वदा सर्वांसि जीव प्राण ।
अतिशय प्रिय असतात ॥ ७ ॥ संपूर्ण जीवांचें संजीवन । सकल प्राणांचें अव्ययाधिष्ठान । जगत्प्राण जो विश्वाचें
परित्राण । कृपाब्धि नित्य करितसे ॥ ८ ॥ छलक निंदक दुष्ट दुर्जनांवर । कदा न करी जो अपकार । अखिल
प्राणिमात्रांवरी उपकार । करणारा नित्य परमेश्वर जो ॥ ९ ॥ भक्त सेवकांवरी ज्याची नित्य दया । जो क्षमा करी
जीव-अन्याया । तो परमात्मा प्रत्यक्ष समीप उभा असूनियां । सोडूनि गेले तत्काळ ॥ ११० ॥ देहबुद्धि अहंममता
ज्यासि दृढतर । जे भक्त सेवक म्हणविणारे नर । परित्यागूनि गुरु परमेश्वर । पळाले प्राणपोषक ते ॥ ११ ॥ ज्यांचें
चिंतन दुर्लभ जगतीं । ज्यांसि योगी ऋषि महात्मा भक्त अंतरीं ध्याती । ज्ञानी नित्य हृदयीं अनुभविती । गाती जयांसि
निगमागम ॥ १२ ॥ ते श्रीमद्दत्तात्रेय स्वामी समर्थ । अवतरले जगदुद्धरणार्थ । भक्त-सेवकांचा चालविती चरितार्थ ।
न पाहूनि अधिकार जे ॥ १३ ॥ त्या प्रभु सद्गुरूसि सोडून । हतभाग्य निर्दय गेले पळून । ते नव्हती सच्छिष्य
साधुजन । जरी मोठे म्हणविती लोकांत ॥ १४ ॥ असो ज्याचा हरिगुरुपदीं सदैव । निर्मल एकाग्र शुद्ध चित्तभाव ।
असूनि भक्ति-ज्ञान-वैराग्य-वैभव । गुरुचरणकमलीं रंगले भ्रमर जे ॥ १५ ॥ ते चोळाप्पादि समर्थांचे पूजारी । आणि
बाबा यादव मानकरी । अहंममता परित्यागूनि असंसारी । गुरुभक्तिमान् गुरुदास ॥ १६ ॥ ते स्वामीसमर्थांचे
संनिध । सेवेंत तत्पर उभे असती अबाध । तेव्हां ज्यांची लीला अगम्य अगाध । ते योगात्मा योगीश्वर ॥ १७ ॥
निर्भय स्थितीनें कटीवर । ठेवूनियां वरद उभय कर । उभे राहूनि मत्त वारणासमोर । गालि-प्रदानें अर्पिती ॥ १८ ॥

मूर्खा चढलासि काय माजलासि । विनाकारण मारितोसि लोकांसि । कां रे ओळख न राहिली तुजसि । नाहीं पूर्वींचें स्मरण काय ॥ १९ ॥ 'चढेल तो खचित पडेल' । सोडीं रे अभिमान घातक बाष्कळ । ऐसें गुरु-वचनामृत तात्काल । बोधदायक कल्याण सदा ॥ १२० ॥ तें श्रवण करूनि मत्त वारण । सावधपणें शुद्धीवर येऊन । होऊनि गलित-मदाभिमान । शरणागत जाहला ॥ २१ ॥ पुढचे पायांचे गुडघे टेंकून । गंडस्थळ मस्तक पृथ्वीवर ठेवून । प्रेमाश्रुपात करी नेत्रांतून । जाहला कंठ सद्गदित ॥ २२ ॥ अंतर्बाह्य शुद्ध मानसें । वारंवार प्रणिपात करी विश्वासें । गेलें अज्ञान भरलेलें वेड-पिसें । अनायासें गुरु-दर्शनें ॥ २३ ॥ जैसें पूर्वीं त्रेतायुगांत । हनुमंत नळ नीळ सुग्रीव जांबुवंत । आणि अठरापद्म वानर वाणीरहित । केवळ वनचर असतांही ॥ २४ ॥ तयांसि श्रीरामचंद्राचें दर्शन । होतांचि झाले अनन्य शरण । करूनि श्रीरामकृपा-संपादन । कृतार्थ झाले वानरादि ॥ २५ ॥ परमात्मा श्रीकृष्ण भगवान् । त्याच्या अपूर्व दर्शनेंकरून । तृणचरें गाई वत्स गजेंद्रादिकरून । गोपी गोपालादि उद्धरले ॥ २६ ॥ पशु-पक्षी-वृक्ष-पाषाणादिक । श्रीकृष्ण-दर्शनें पावन झाले अनेक । तैसे दत्तात्रेय परमात्मा जगन्नायक- । दर्शनें मदोन्मत्त गजादि उद्धरिले ॥ २७ ॥ करीनें करूनि मस्तक ठेंगणा । नमन केलें योगींद्रतिलकचरणां । दगड मारणें त्यागूनि छळणा । लीनपणा धारण केलासे ॥ २८ ॥ नागरिकांचा त्रास गेला । ऐशा असती अनंत गुरुलीला । मुकीं जनावरें ओळखिती प्रभूला । पूर्वसंस्कार-ज्ञानोदयें ॥ २९ ॥ मनुष्यांसि असूनि अनुकूल । शरीर वाणी बुद्धि चातुर्य केवल । तथापि नोळखिती वेडगळ । अद्वितीय परमात्मस्वरूप ॥ १३० ॥ त्रयमूर्तींचा अवतार यथार्थ । श्रीगुरुदेवदत्त-स्वामीसमर्थ । तच्चरणांचे अनेक सेवक दास । स्वार्थ परमार्थ साधक जाहले ॥ ३१ ॥; त्यांतील कित्येकांचें वृत्त । सांगूं निःपक्ष सत्य संक्षेपयुक्त । सातार प्रांतीं कडे-ग्रामांत । वसणारे मूळचे मराठे ॥ ३२ ॥ बाबासाहेब यादव । होतें प्रसिद्ध तयांचें

* * *

नांव । जे अक्कलकोटचे भोंसले नृपराव । त्यांचे मानकरी सदैव होते ॥ ३३ ॥ शके सत्राशें एकूणऐंशीं वत्सरीं । दत्तात्रेय स्वामिराज अवतारी । अनेक देव तीर्थ क्षेत्र सप्तपुरी । हिमाचलादिक विलोकूनि ॥ ३४ ॥ अक्कलकोटीं जगद्धितास्तव । प्रकटले त्रैमूर्तिरूप वास्तव । वेद-शास्त्रें-पुराणादि ज्यांचा स्तव । करिती महात्मा साधुजन ॥ ३५ ॥ ते स्वामीराज दत्तदिगंबर । अक्कलकोटीं प्रकटल्यानंतर । तीन चार गेले संवत्सर । तेव्हां कित्येक सेवेसि लागले ॥ ३६ ॥ मूळचे बाबा सबनीस संत । चोळाप्पा सराफ निःसीम भक्त । कारभारी टोळ चिंतोपंत । आणि पांडुरंग पुराणिक ते ॥ ३७ ॥ तत्पर होते नित्य सेवेसि । बाळकृष्ण ग्रामजोशी दर्शनासि । आणखी दोन मनुष्यें शुद्धभावेंसीं । समीप होतीं समर्थांच्या ॥ ३८ ॥ पुढें लोकांसि चमत्कार अनुभव । साक्षात्कार प्रतीति सत्य अवश्यमेव । कार्यसिद्धि वचनप्रमाण सदैव । दाखले पटूं लागले ॥ ३९ ॥ तदनंतर मंद-शीघ्रगतीं । सेवेसि थोडे लोक येऊनि वसती । दर्शनासि जन नित्य येती । देशोदेशींचे प्रज्ञापुरीं ॥ १४० ॥ असो पूर्वसंस्कार-भाग्योदय । अद्भुत होऊनि परमार्थमय । बाबा यादव ते स्वामीदत्तात्रेय- । चरणसेवेसि रंगले ॥ ४१ ॥ टाकूनि माया प्रपंच संसार । श्रीदत्तात्रेयस्वामि-समागम निरंतर । राहूं लागले गुरुभक्ति प्रियकर । बाबा यादव मानकरी ॥ ४२ ॥ मूळचे शुद्धचित्त सात्त्विक । बाबा मराठे भोळे भाविक । त्यांत पूर्व-सुकृतें विश्वपालक । परमेश्वर सद्गुरु भेटले ॥ ४३ ॥ मग अज्ञान-हृदयींची जड ग्रंथी । सुटली ब्रह्मविचारें परमार्थीं । अज्ञान जड देहाचा अर्थार्थीं । संबंध नाहीं शुद्धात्म्यासि ॥ ४४ ॥ श्रीमद्दत्तात्रेय-चरणकमलीं । भ्रमरवत् प्रेमभक्ति रंगली । दिवसेंदिवस वृद्धीस पावली । एक अद्वैतभक्ति विशेष ती ॥ ४५ ॥ हे बाबा यादव संत मराठे । दाजीबा भोंसल्याचे प्रेमांतले मोठे । चौघडादि चर्मवाद्यें कुशलकंठें । गाती भजन हरीचें ॥ ४६ ॥ त्या बाबा यादवसंगें स्वामिराज. । आत्मप्रबोध-वचनें निजगुज । कधीं कधीं बोलत होते सहज । भक्तकार्यप्रदाते ॥ ४७ ॥

स्वामिराज अदृश्य झाल्यावर । बुधवार-पेठेंतील समाधिस्थान सुंदर । त्या आद्य मठांत राहिले निरंतर । घरदार सर्व सोडूनि ॥ ४८ ॥ त्या तारक श्रीमठांत द्वादश संवत्सर । सेवा भजनपूजनयुक्त सरदार । निःस्पृह निर्लोभ शांत निर्विकार । वसत होते भक्त ते ॥ ४९ ॥ यांस अक्कलकोट-संस्थानांतून । प्रत्येक मासीं दहा रुपये वेतन । प्राप्त होतें त्यांतून गुरुकार्यासि लावून । थोडक्यांत निर्वाह करिती ॥ १५० ॥ समर्थांच्या भागीरथीनामें घेनूची । स्थापित समाधि सुंदर साची । त्या समाधीच्या चिरेबंदी ओव्याचीं । कामें करविलीं बाबांनीं ॥ ५१ ॥ आणि स्वामीसमर्थांच्या समाधीचें । मुख्य द्वार जें उत्तम प्रकारचें । त्या द्वाराचा उंबरा सर्व पितळेचे । धातूनें मढविला बाबांनीं ॥ ५२ ॥ समाधीच्या मठसंबंधीं कामें । त्या कामासि धन देती प्रेमें । 'श्रीगुरुदेवदत्त-स्वामीसमर्थ' नामें । गर्जती टाळ वाजवूनि ॥ ५३ ॥ पदरीं ज्यांच्या निर्मल सुकृत । म्हणून पेठेंतील मुख्य तारक मठांत । देह विसर्जूनि गुरु ब्रह्मस्वरूपांत । विदेहकैवल्यांत मिळाले बाबा ॥ ५४ ॥ खटपटी खटाटोप भयंकर । काम-राग-द्वेषविरहित संत खरोखर । पुण्यवान् निर्मल मनाचे उदार । होते बाबा यादव गुरुभक्त ॥ ५५ ॥; असो एक प्रथमशाखी यजुर्वेदी ब्राह्मण । बाळाप्पा जयाचें नामाभिधान । तेरढोकीकडील गाणगापुरीं येऊन । राहिला होता प्रभु-सेवेसि ॥ ५६ ॥ तेव्हां धीपुराहून गाणगापुरासि । श्रीपादभट गेला होता कामासि । बाळाप्पा श्रीपाद भेटले परस्परासि । कुशल क्षेम विचारिती ॥ ५७ ॥ तेव्हां श्रीपादानें दत्तावतारकीर्ति । निवेदिली बाळाप्पाप्रति साद्यंत स्थिति । ऐकोनि बाळाप्पा सहर्ष झाला चित्तीं । म्हणे मी येतों समागमें ॥ ५८ ॥ मजला होईल महद्दर्शन । मी कुटुंबवत्सल आहें ब्राह्मण । तेव्हां बाळाप्पासि गाणगापुराहून । श्रीपादें आणविलें अक्कलकोटीं ॥ ५९ ॥ लावूनि भोजनादिक व्यवस्था । बाळाप्पासि ठेविलें समीप-स्वामीसमर्थां । नंतर बाळाप्पा लागले गुरुपंथा । सेवा नित्य करावया ॥ १६० ॥ पुढें कांहीं

दिवस जातां । कुटुंबासि आणविलें तत्त्वतां । भागीरथी नामें महा पतिव्रता । तिजसहित वसले प्रज्ञापुरीं ॥ ६१ ॥ भागीरथी भोळी सदाचारी । सात्त्विक शुद्ध परोपकारी । कन्या-पुत्रयुक्त प्रज्ञापुरीं । स्त्री पुरुष निर्वाह करिती समर्थनामें ॥ ६२ ॥; सोलापुरची ब्राह्मण स्त्री एक । विधवा सुंदराबाई नामक । समर्थसेवेसि संवत्सर कित्येक । राहिलेली अक्कलकोटीं ॥ ६३ ॥ त्या सुंदराबाईच्या मर्जीनुरूप । बाळाप्पा सेवेसि होता समर्थांसमीप । तेणें स्त्री पुत्र कन्यासह सुखरूप । नांदे बाळाप्पा सेवेकरी ॥ ६४ ॥ सुंदराबाईची कन्या जामात । बाळें येऊनि जाऊनि नांदत । समर्थांच्या सेवकांसि उणें नसत । धन-वस्त्रादिक पदार्थ ते ॥ ६५ ॥ त्या सुंदराबाईस काढावें म्हणून । खटपटी केलें जनीं पुष्कळ प्रयत्न । निरर्थक पुण्याई बल खर्चून । थकले सर्व बाईपुढें ॥ ६६ ॥ शेवटीं विष्णु ओंडकराच्या गृहांतून । प्रासादिक पादसंवाहनेंकरून । सुंदराबाईस तत्काल सेवेंतून । दूर केलें समर्थांनीं ॥ ६७ ॥ सद्गुरूची अशुद्ध चित्तें सकामनिक । सेवा नव्हेचि वास्तविक । असो बाळाप्पा सद्गुरुसेवक । त्याचे थोरल्या पुत्रासि ॥ ६८ ॥ श्रीपादें अर्पिली कन्या काशी । विवाह करूनि दिधली गुरुनाथाशीं ( बाळाप्पाचे चिरंजीव ). । पुढें समर्थ स्वामी निजानंदवासी । समाधिस्त झाल्यावरी ॥ ६९ ॥ पेठेंतील मठामागें पुजारी जागेंत । बाळाप्पा येऊनि राहिले परिवारासहित । तेथें बाळाप्पाचा कनिष्ठ पुत्र बुद्धिमंत । मरण पावला अल्पवयीं ॥ १७० ॥ त्या पुत्रशोकें थोडे दिवसांत । भागीरथीबाई कैलासवासी होत । ऐसा स्त्रीपुत्र-वियोग घडत । गुरुभक्त बाळाप्पातें ॥ ७१ ॥ तथापि बाळाप्पा दक्ष गुरुसेवेंत । पूजा-अनुष्ठान करी सदोदित । सुंदराबाई-संगें उपोषित । शुद्ध मानसें राहतसे ॥ ७२ ॥ पुढें तो ज्येष्ठ पुत्रही गुरुनाथ । क्षयरोगें पावला मृत्यु कलबुर्ग्यांत । त्याची स्त्री काशी अति दुःखित । झाली निरुपाय श्वशुरांसह ॥ ७३ ॥ मग बाळाप्पा राहिले गांवांत जाऊन । करिती पूजा आरती नित्य भजन । समर्थचरणीं विश्वास ठेवून । देशोदेशीं

संचरती ॥ ७४ ॥ बाळाप्पा तपस्वी गुरुभक्त । समर्थांचें सद्यश संप्रदाय वाढवित । ब्राह्मणभोजन-समारंभ करीत । दत्तजयंती आणि पुण्यतिथि ॥ ७५ ॥ गुरुनाथाची विधवा स्त्री काशी । राहतसे पित्याचे सदनासीं । वैराग्य गुरुभक्तियुक्त शुद्ध मानसीं । सद्धर्ममार्गें वर्ततसे ॥ ७६ ॥ दासबोध ज्ञानेश्वरी एकनाथी भागवत । सर्वदा काशी सार्थ पठण करीत । सेवा करी पेठेंतील मुख्य मठांत । दत्तात्रेयस्वामींची सर्वदा ॥ ७७ ॥ याप्रकारें निःस्पृह निरुपाधिक । केवळ शुद्धचित्तें व्हावें पारमार्थिक । तेणें सद्गुरुकृपा होऊन सार्थक । जन्मोजन्मीचें होतसे ॥ ७८ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदपुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । षट्त्रिंशतितमाध्याय गोड हा ॥ १७९ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे षट्त्रिंशतितमोऽध्यायः समाप्तः ॥ ३६ ॥ श्रीगुरुदेवदत्त-स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय सदतिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्गुरु-दत्तदिगंबराय नमः ॥ ॥ श्रीगुरु सांगती शिष्याप्रति । मागिले अध्यायीं माया स्वभावशक्ति । अज्ञानजन्य आवरणशक्ति तथा दुर्जीं तीं । विक्षेप-शक्तिरूप विघ्नें निरूपिलीं ॥ १ ॥ ‘अघटितघटनापटीयसी’ माया ख्याता । त्या मायेची अति दुर्घटता । सर्वत्रांसि स्पष्ट कळावयाकरितां । माया-शब्दाचे चार अर्थ सांगूं ॥ २ ॥ जी तीन कालांत नाहीं होत । तिला ‘माया’ म्हणती पुरुष बुद्धिमंत । अथवा कार्यकारणरूप जगत् । तद्भेदाचें कारण जी होतसे ॥ ३ ॥ तिजला शास्त्रवेत्ते जन । म्हणती ‘माया’ शब्देंकरून । किंवा सर्व जीवांचें अधिष्ठान । जें सच्चिदानंद आत्मस्वरूप ॥ ४ ॥ त्या आत्मस्वरूप-ब्रह्मज्ञानातें । जी सर्वदा आच्छादन करिते । तिजला वेदार्थतत्त्ववेत्ते । ‘माया’ ऐसें म्हणताति ॥ ५ ॥ अथवा यथार्थ आत्मज्ञानेंकरून । जी निवृत्ति होते कार्यासह अज्ञान । तिजला ब्रह्मवेत्ते विद्वान् । ‘मा या’ ऐसें वदताति ॥ ६ ॥ ‘विश्वं माति यस्यां सा माया’ । जगत् राहतें जिच्या ठायां । मा धातु मान अर्थ वाया । इंद्रजाल गारुड कपट छद्म ॥ ७ ॥ आतां ‘मा या’ हीं अक्षरें दोन । त्यांचा भिन्नार्थ दाखवूं करून । ‘मा’ म्हणजे माति गमन । करणें वर्जन निषेध ॥ ८ ॥ जैसें ‘मा कुरु यौवनगर्वं’ । किंशुके शुक मा तिष्ठ । दृष्ट्वा मा कुरु मोहावेशं । अर्थात् मा म्हणजे न करणें वर्जन संशय ॥ ९ ॥ आणि ‘या’ म्हणजे याति । जाणें पावणें मिळणें इत्यादि अर्थ होती । जैसें प्रयाति आयाति । म्हणजे गमन करणें येणें ॥ १० ॥ मा-या दोन वर्ण करितां वेगळे । येणें जाणें नाहीं संशयबळें । एकत्र करितां ‘इंद्रजाल’ ऐसें कळे । माया-शब्दार्थ कल्पना मिथ्या

॥ ११ ॥ अवस्तूचे ठायीं वस्तुत्व-बुद्धि उत्पन्न। होण्यास असे जी कारण । अ-वस्तु असतां वस्तुत्वेंकरून । जगद्रूप
भासमान् होते ती माया ॥ १२ ॥ निर्विकार आत्म्याचे ठायीं। माया संभवचि होत नाहीं। तथा जगत्कारणता असंभव
पाहीं। वास्तविक विचारदृष्टीनें ॥ १३ ॥ आणि श्रुतीनें आत्म्यासि। जगत्कारण तथा जगद्रूप ऐशी। विशेषणें दिधलीं
कैशीं । जगत्कारण-सिद्धीस्तव ॥ १४ ॥ अध्यारोप-अपवादेंकरून । निष्प्रपंच आत्म्याचे ठायीं प्रपंच-माया कल्पून ।
शिष्यासि यथार्थ बोध व्हावा म्हणून। तत्त्वज्ञांनीं कल्पित क्रम रचिला ॥ १५ ॥ जैसें उदयासि येतां भास्कर। निवृत्त
होतसे अंधःकार। तैसें अस्ति-भाति-प्रियरूप निर्विकार। आत्मज्ञानें अज्ञान-मायाभास ते ॥ १६ ॥ आणि जैसें रज्जूचें
विशेष रूप। माला-जलधारा-दंडादि-सर्प । तें रज्जु-अधिष्ठानज्ञानें सविकल्प । निवृत्त होऊनि जातसे ॥ १७ ॥ तैसें
निर्विशेष आत्म्याचे ठायीं। विशेष रूप जें प्रपंच मायामय पाहीं। तथा प्रपंच-कारण जें अज्ञान तेंही। आत्मसाक्षात्कारें
नष्ट होतें ॥ १८ ॥ म्हणून त्या कल्पित अज्ञानासि। तत्त्ववेत्ते देती 'माया' नामासि। जैसें दीपप्रकाशें कोणासि।
अंधःकार गवसेना ॥ १९ ॥ तैसें ब्रह्मानुभवी पुरुषाप्रति। ज्ञानचक्षूंनीं माया कोठें न दिसे ती। जीं आत्मज्ञानें सबीज
पावे लयाप्रति। तिलाच माया-इंद्रजाल म्हणावें ॥ २० ॥ ती माया यद्यपि असे एक । तथापि घटपटादि पदार्थज्ञानें
अनेक। घटादि विषयक अज्ञानाची देख। निवृत्ति करिते शिष्या रे ॥ २१ ॥ ती माया एक असून । अनंत रूपांसि
करिते धारण । त्या अनंत रूपांसि तूला-अज्ञान । तथा अवस्था-अज्ञान म्हणताति ॥ २२ ॥ त्या मूल-अज्ञानाचा।
आणि तूल-अज्ञानाचा । इतुकाचि भेद असे साचा । तो परिसावा कळावया ॥ २३ ॥ जें अज्ञान ब्रह्माचे
आश्रित होऊन । ब्रह्मस्वरूपासही करितें आच्छादन । आणि निवृत्त होतें ब्रह्मज्ञानेंकरून । त्यासि मूल-अज्ञान
म्हणताति ॥ २४ ॥ आणि घटादिक विषयावच्छिन्न । चैतन्याचें आश्रित होऊनि जें अज्ञान । घटादि विषयावच्छिन्न

चैतन्यालागून । आच्छादन करितें ॥ २५ ॥ तें घटादि विषयावच्छिन्न- । चैतन्याचे ज्ञानेंकरून । लयासि पावतें जें अज्ञान । त्यासि तूला-अज्ञान आणि अवस्था-अज्ञान म्हणती ॥ २६ ॥ या अवस्था-अज्ञानासि ग्रहण करून । 'इंद्रो मायाभिः पुरुरूपं ईयते' इत्यादि वचन । तेणें अनेक माया केल्या कथन । श्रुतीनें तात्पर्य समजावया ॥ २७ ॥ आणि 'अजामेकां लोहितशुक्लकृष्णां' । इत्यादि श्रुतींत एक माया-वर्णन । तें मूल-अज्ञानासि ग्रहण करून । श्रुतीनें कथन केलें आहे ॥ २८ ॥ जैसें एकच मायावी ऐंद्रजालिक । स्वमायेनें रूपें धरी अनेक । तैसें परमात्मा मायावी एक । मायावशें अनंत रूपें धरितसे ॥ २९ ॥ ऐसें तत्त्ववेत्ते जे व्यासादिक । जरी सांगती रूपें अनेक । तथापि त्यांचें अनेकत्वादिक । सांगण्याचें तात्पर्य मुळींच नाहीं ॥ ३० ॥ तर नाना लौकिक-प्रमाणानें सिद्ध । करिती नाना प्रकारें भेदानुवाद । जैसें हिम-निवृत्तीचें अग्नि औषध । हाचि अनुवाद जाणावा ॥ ३१ ॥ तैसें सर्व व्यवहाराचे सिद्धीकरितां । एकचि मायेसि जगत्कारणकर्ता । कल्पना करून ते महर्षि तत्त्वतां । सांगती निर्णय यथार्थ ॥ ३२ ॥ मुमुक्षूंच्या बुद्धि-वृद्धिलागून । व्हावया यथार्थ आत्मबोधन । नाना प्रकारें जगताचें आरोपण । करिती श्रुत्यर्थ सत्य कळावया ॥ ३३ ॥ तो मायाविशिष्ट परमेश्वर । श्रीमद्दत्तात्रेय-स्वामी परात्पर । सहज व्हावया जगदुद्धार । लीला अपार दावितसे ॥ ३४ ॥ अक्कलकोटच्या सभोंवती । उत्तम प्रकारचीं उद्यानें असती । त्यांचीं नामें परिसावीं श्रोतीं । कथानक अपूर्व कळावया ॥ ३५ ॥ गणेशबाग खासबाग । फत्तेबाग शहागंजबाग । मोतीबाग थडगेबाग । इत्यादिक मोठमोठे ॥ ३६ ॥ त्या सर्व बागेंत जलभरित । वापी दृढ चिरेबंदी सुशोभित आहेत । एकेकाळीं एक संवत्सरांत । पर्जन्य न्व्हता हवा तसा ॥ ३७ ॥ पातला भव्य भर उष्णकाल । तेव्हां अन्नोदकाचा पडला दुष्काळ । सर्व वापींतील आटलें जल । दुर्लभ झालें त्या कालीं ॥ ३८ ॥ वाटीनें लोटीनें दोन दोन प्रहर । भरितां न भरे हंडा घागर । बुधवार-

पेठेंतील लोक फार । त्रासले उदकार्थ चोळाप्पा ॥ ३९ ॥ उदकासाठीं सगळा दिवस । क्लेश पडूं लागले लोकांस । तेव्हां
कृपार्णव योगीश्वरांस । प्रार्थिती पेठेंतील दीन लोक ॥ ४० ॥ चोळाप्पा स्त्रिया आणि नीळकंठ । म्हणती आतां काय
प्यावें श्रीपादभट । अहो कृपाळु शितिकंठ नीलकंठ । वैकुंठपति उदक मिळेना ॥ ४१ ॥ हें श्रवण करूनि समर्थ कळवळले ।
भक्त मंडळीसहित उठले । तात्काळ खासबागेंत जाऊनि उभे ठाकले । विहिरीच्या कांठावरी ॥ ४२ ॥ मुखें
वेद-जलमंत्र म्हणून । विहिरींत हरभरे दिधले फेंकून । नंतर दुसरे दिवसापासून । वापींत जल सांचूं लागलें ॥ ४३ ॥
कामापुरतें लोकांसि उदक । मिळूं लागलें अक्लेशदायक । तेव्हांपासूनि वापींतील उदक । खुटत नाहीं उष्णकालींही
॥ ४४ ॥ त्या खासबाग-बावडींतील जल । किडे पडून झालें होतें अमंगल । हरभरे पडतांच तें पाणी आरोग्य निर्मल ।
सुगंध रुचिर मधुर झालें ॥ ४५ ॥ पूर्वीं व्यंकट-बावडीचें उदक । प्राशित होते नृपवर्य आणि लोक । पुढें खासबागेंतील
नीर सम्यक् । सर्वत्र पान करूं लागले ॥ ४६ ॥ नंतर एक मासांत वर्षला पर्जन्य । नेलें जनांचें उदकदैन्य । उत्पन्न
झालें पुष्कळ धान्य । तेणें लोक सुखी झाले ॥ ४७ ॥ त्या दिवसापासून खासबागेंतील । बावडींत पुष्कळ शुद्ध जल ।
राहूं लागलें चिरकाल । स्वामीसमर्थकृपेनें ॥ ४८ ॥ बुधवार-पेठेंतील लोक सकल । गणेश-बावडीचें आणि
खास-बावडीचें जल- । पान करिती सदा निर्मल । पाचक आरोग्य मधुर तें ॥ ४९ ॥ त्या समयीं
समर्थ जगन्निवास । खासबागेंत बसले त्रयमास । तेव्हां नृपवर्यें काढविलें मलास । वापी-कूप-तडागांच्या
॥ ५० ॥ शके अठराशें एकवीस वत्सरीं । ज्येष्ठ मासीं लोकांस सुखकारी । अनायासें उदक मिळूं लागलें सत्वरी । प्रातः
सायंकालीं नित्य ॥ ५१ ॥ अक्कलकोट संस्थानचे कारभारी । विठ्ठल टिकाजी परोपकारी । त्यांनीं परिश्रम घेऊनि भारी ।
यंत्रें जलाशय शुद्ध केले ॥ ५२ ॥ त्या खासबागेंतील वापीचें जल । लोहयंत्रें लावूनि नळ । जलसंचयस्थान सुंदर

विशाल । बांधविलें त्यांत नळद्वारें घेती ॥ ५३ ॥ त्या नळद्वारें सर्वांसि । ग्रामांतील पेठेंतील जनांसि । उदक मिळतें अनायासीं । सुखासि कारण झालें जें ॥ ५४ ॥; ऐसें दत्तात्रेयस्वामिचरित । जनांसि कल्याणदायक सदोदित । एकेकालीं श्रीमद्दत्तावधूत स्थित । होते मुरलीधर-देवालयासमीप ॥ ५५ ॥ साकर-विहिरीच्या जवळ । आम्रवृक्षतळीं स्थित होते घननील । दर्शनेच्छु जन उभे पुष्कळ । ठाकलेले त्या कालीं ॥ ५६ ॥ हैद्राबादचा एक शिपाई यवन । दर्शनार्थ उभा ठेला येऊन । कपट-छलबुद्धीनें वंदन करून । समर्थांसि प्रार्थितसे ॥ ५७ ॥ म्हणे मजपाशीं नाहीं पैसा एक । खर्चावयासि द्यावें आपला लौकिक । मुंबापुरीस कार्यार्थ तात्कालिक । गेलें पाहिजे मजलागीं ॥ ५८ ॥ ऐसें ऐकून सर्वज्ञ सर्वशक्तिमान् । उत्तर देती यतींद्र जगज्जीवन । कंबरेसि पंधरा रुपये आलासि बांधून । आणि खोटें कां रे बोलशी ॥ ५९ ॥ आणिक तुझ्या गाठोड्यांत । सुवर्णनग मौल्यवान आहे खचित । ऐसें असूनि वदशी कपटें अनृत । एकही पैसा जवळी नसे ॥ ६० ॥ मग यवनें लाजूनि अधोमुख घातलें । पश्चात्तापें नग रुपये दाविले । हें देखूनि सर्वांसि आश्चर्य वाटलें । समर्थलीलेचें अद्भुत ॥ ६१ ॥ यवन वदे स्वामिराज आपण । प्रत्यक्ष खुदा-अल्ला-इलाही-रहिमान । सर्व अन्याय जननीसमान । क्षमा करावे माझे हो ॥ ६२ ॥ आम्ही स्वार्थी प्रापंचिक । आहों अज्ञानी कपटी छलक । नेणों परमेश्वर-महिमा अलौकिक । देहाभिमानी मदांध ॥ ६३ ॥ मग समर्थ वदती यवनासि । कार्य होईल जावें त्वां मुंबापुरीसि । यापरी कृपाजलधी-वचनासि । ऐकूनि यवन संतुष्टला ॥ ६४ ॥; एकेकालीं बडोद्याची कांहीं मंडळी । कार्तिकस्वामींच्या दर्शनासि गेली । तेव्हां मध्यें मार्गांत उतरली । प्रज्ञापुरीं देवदर्शनार्थ ॥ ६५ ॥ योगीश्वर-दर्शनासि सारे । जाऊनि नमिती प्रेमभरें । त्यांत एक रामशास्त्री डोंगरे । कोंकणस्थ ब्राह्मण विनययुक्त ॥ ६६ ॥ विनविती स्वामिसमर्थांसि । मीही जातों कार्तिकेय-दर्शनासि । समर्थ वदती आज्ञा नाहीं तुम्हांसि । दर्शनार्थ जावया ॥ ६७ ॥

ऐकूनि ते रामशास्त्री विचारांत । पडले उद्वेगचिंतायुक्त । तेव्हां बाबा सबनीस शुद्ध संत । तयासि पुसती काय करावें ॥ ६८ ॥ ते बाबा साधु वदती सत्य वचन । जाऊं नये प्रभु-आज्ञाभंग करून । तुम्ही आहांत ब्राह्मण विद्वान् । तळमळ टाकूनि रहावें ॥ ६९ ॥ नंतर रामशास्त्री सबनीस-गेहीं । राहिले तळमळीत दर्शनाग्रहीं । पांचवे दिवशीं कार्तिकी लवलाहीं । पौर्णिमा आली दर्शनाची ॥ ७० ॥ कार्तिकी पौर्णिमेसि कृत्तिकायोगांत । दर्शनासि जमली मंडळी बहुत । स्नान संध्या आटोपूनि रामशास्त्री त्वरित । दर्शनार्थ पातले बाबासह ॥ ७१ ॥ दत्तगुरूची मांगल्य आरती झाल्यावर । भगवद्दर्शन झालें सर्वांसि सुखकर । त्या कालीं दत्तात्रेय स्वामी दिगंबर । प्रसन्नवदन उभे ठेले ॥ ७२ ॥ कार्तिकस्वामींचें सगुण स्वरूप । प्रत्यक्ष धारण करूनि सर्वांसमीप । दर्शन दिधलें दाता-सत्यसंकल्प । रामशास्त्री यास देवाधिदेवें ॥ ७३ ॥ कार्तिकस्वामींचें दर्शन मूर्तिमंत । विलोकूनि रामशास्त्री यथास्थित । समाधानें होऊनि शरणांगत । घालिती साष्टांग नमन ते ॥ ७४ ॥ प्रार्थिती हे भगवान् दत्तमूर्ते । परमेश्वर आहां बोलते चालते । ऐसा साक्षात्कार मज अज्ञानातें । निःसंशय जाहला ॥ ७५ ॥ आम्ही संसारी अज्ञानी मदांध । नेणों परमात्मा-सामर्थ्य अगाध । कृपालुत्वें देऊनि दर्शनप्रबोध । कृतार्थ केलें अनुभवी ॥ ७६ ॥ हा उदार दीन दयाळु नित्य स्वभाव । वर्ततसे ब्रह्मानंदयोगवैभव । केवल जगदुद्धरणास्तव । परमात्मस्वरूप अवतरलां आहां ॥ ७७ ॥ ऐसा साक्षात्कार झाल्यावर । यथासांग पूजिले गुरु महेश्वर । नंतर दर्शनासि राहिले दोन संवत्सर । रामशास्त्री प्रज्ञापुरीं ॥ ७८ ॥ पुढें दत्तात्रेय-आज्ञा घेऊन । आले बडोद्यासि संतुष्टमन । सदाचारी विवेक रामशास्त्री असून । पुराण सांगत होते ते ॥ ७९ ॥ नंतर काशीमहायात्रा करून । आल्यावर रामशास्त्री सज्जन । नित्य दत्तात्रेयस्वामिलीला वर्णून । कैलासवासी जाहले ॥ ८० ॥; कोल्हापुराकडील बावडें ग्रामाचे । राहणार कऱ्हाडे ब्राह्मण जातीचे । दत्तात्रेयशास्त्री साधले उपनामाचे ।

विद्वान वैदिक असती ॥ ८१ ॥ ते बावडें ग्राम सोडून । अक्कलकोटास येऊन दर्शन घेऊन । श्रीस्वामीसमर्थांचे आज्ञेवरून । बारशीस जाऊन राहिले ॥ ८२ ॥ तेथें वीणा वाजवूनि रागरागिणींत । पुराण सांगती भागवत भारत । लोकांचें सहज मनरंजन होत । तेणें द्रव्यादिक प्राप्त झालें ॥ ८३ ॥ त्या बारशींत श्रीभगवंताचें देवालय । आहे उत्तम प्रकारें रमणीय । त्यांत सुंदर मनोहर भगवन्मूर्ति अक्षय । स्थापित जुनी सुस्वरूप असे ॥ ८४ ॥ लक्ष्मीसहित भगवंत नारायण । त्यासमोर सभामंडप उत्तम जाण । तेथें गरुड करद्वय जोडून । देवासन्मुख तिष्ठतसे ॥ ८५ ॥ श्रीभगवंताचे देवळासभोंवतीं । चिरेबंदी ओव्यावरी खण बांधिले असती । देवासमोर चौघडादि वाद्यें वाजतीं । मुख्य द्वारावरती नित्य ॥ ८६ ॥ सभामंडपाचे वामभागाकडे । जलभरित वापींत आहे उदक गोडें । देवाच्या मागील भागाकडे । द्वितीय द्वार सुशोभित असे ॥ ८७ ॥ तें श्रीभगवंताचें देवालय । आहे चांगलें दृढ विशाल भव्य । पाहतांचि सर्वांसि आनंद होय । श्रीभगवंत-दर्शनें ॥ ८८ ॥ ऐशा भगवन्मंदिरीं सभामंडपांत । बावडेकरबुवा पुराण सांगत । श्रवणास बैसती नरनारी बहुत । धनधान्यादि अर्पिती बुवासि ॥ ८९ ॥ पुढें त्या बारशींत सदन चांगलें । बांधवूनि त्यांत पुराणिकबुवा राहिले । कुटुंबासहित स्वसदनीं शोभले । आनंदें कालक्षेप करिती ॥ ९० ॥ अक्कलकोटासि वारंवार । दर्शनासि येऊनि पूजिती दत्तदिगंबर । गृहस्थाश्रमी वसती साचार । कन्यासंततियुक्त ते ॥ ९१ ॥ त्यांनीं सुंदर कामधेनु एक । समर्थांसि अर्पण केली सात्त्विक । शुक्ल-कपिलवर्ण मनोहर सम्यक् । समर्थांसमीप वसतसे ती ॥ ९२ ॥ 'भागीरथी-गंगा' त्या धेनूचें नाम । समर्थांनीं ठेविलें युक्त-प्रेम । त्या कामधेनूसि संतति आराम- । कारक झाली योगीश्वरकृपें ॥ ९३ ॥ कालवडीचें 'गोदावरी' नामाभिधान ठेवून । थोरल्या खोंडाचें 'लठ्ठ हत्ती' नाम जाण । धाकट्या खोंडासि 'कल्याण' । समर्थ ऐसें पाचारिती तयां ॥ ९४ ॥ बुधवार-पेठेंतील समर्थस्थानीं । त्या गौमातेची समाधि अखंड निर्वाणीं । सुंदर श्वेत

मूर्ति स्थापूनि । पूजन नित्य होतसे ॥ ९५ ॥ या बावडेकर पुराणिकांनीं । तीर्थक्षेत्र अनेक देवदर्शनीं । यथायोग्य धन वेंचूनि । यात्रा केल्या निरालस्य ॥ ९६ ॥ म्हणजे सेतुबंध रामेश्वर । कार्तिकस्वामी व्यंकटेश-गिरिवर । आणि द्वारका यात्रा श्रीगिरिनार । प्रभास क्षेत्र सुदामपुरी ॥ ९७ ॥ जगन्नाथ बद्रीकेदार । प्रयाग गया श्रीकाशी क्षेत्र । अयोध्यापुरी हरिद्वार । गोकुल वृंदावन मथुरादिक ॥ ९८ ॥ ऐशीं अनेक तीर्थक्षेत्रें देवस्थानें जाण । यांना घडलीं दर्शनें स्नानपान । जेथें तेथें पुराण सांगून । स्वार्थ परमार्थ संपादिती ॥ ९९ ॥ हैद्राबाद पुणें मुंबापुरी । इत्यादिक मोठमोठ्या शहरीं । हिंडूनि राहूनि प्रापंचिक संसारी । निर्वाह करिती पुराणिक ॥ १०० ॥ स्नान-संध्यादि कर्मानुष्ठान । करिती नित्य प्रापंचिक असून । वेदांतग्रंथ-विलोकन । भगवद्भजन करिती ते ॥ १ ॥ गृहस्थाश्रमीं दक्ष कुशल । स्वच्छंदें वर्तती सर्वकाळ । स्वामीसमर्थांचे भक्त विमल । लोकीं प्रसिद्ध म्हणविती ॥ २ ॥ त्या बावडेकर पुराणिकांतें । स्वामीसमर्थांचे दाखले पटले नाना ते । समर्थांच्या समागमें होते । सेवेंत कधीं कधीं पुराणिक ॥ ३ ॥ यांचे बंधुही वैदिक याज्ञिक । होते सदाचारी सम्यक् । तात्पर्य बावडेकरबुवा पुराणिक । प्रसिद्ध लोक ओळखिती यांसि ॥ ४ ॥ चोळाप्पा कृष्णाप्पा श्रीपादभट । असती सर्वदा समर्थांचे सन्निकट । तशीच सुंदराबाई खटपट । करणारे कित्येक सेवेकरी ॥ ५ ॥ समर्थांसि उदक तांबूल देती । स्नान घालिती वस्त्रें पांघरविती । योगीश्वर स्वकरें न भक्षिती । कांहींएक पदार्थ ते ॥ ६ ॥ म्हणून पूजारी भरविती ग्रास-अन्न । स्वादास्वादरहित ते प्रभु भक्षून । पूर्णब्रह्म स्वामी ईश्वर सनातन । त्यांना खेळविती ते हांसविती ॥ ७ ॥ लोकांसि वाटे दत्तावधूत । या सेवकांच्या स्वाधीन असती खचित । यांना समर्थांचें स्वभावतत्त्व खचित । कळलें वाटे संपूर्ण ॥ ८ ॥ नित्य-शुद्ध-बुद्ध-परिपूर्ण । अनादि परमात्मा साक्षान्नारायण । स्वतंत्र स्वच्छंद विराजित निर्गुण । पतितपावन जगद्गुरु ॥ ९ ॥ केव्हां राहती भक्ताचे स्वाधीन ।

केव्हां भिन्न निःस्पृह अलख निरंजन । तथापि शुद्ध मोक्षाधिकारी मुक्तावांचून । यथार्थ स्वरूपलक्षण कळत नसे
॥ ११० ॥ जैशी ज्यांची दृष्टि-भावना । तैशी फलसिद्धि होतसे त्यांना । तथापि तत्त्ववेत्ते ब्रह्मनिष्ठ महात्मा
जनां । शरण असणें सार्थक तें ॥ ११ ॥; एक मुंबापुरीचा राहणार । रूपगुणसंपन्न अल्पवयस्कर । मराठे जातीचा
शूद्र नर । 'हरि' ऐशा नामाचा ॥ १२ ॥ ज्याची मातुश्री भाविक । बंधु लहान दादा नामक । पत्नी तरुण
अष्टादश वर्षात्मक । भगिनी आदिक असती ज्यासि ॥ १३ ॥ शहर-सुधराई कचेरींत । नोकरी करितसे मुंबईंत ।
तो स्वामिराजांचा महिमा अद्भुत । श्रवण करूनि आनंदला ॥ १४ ॥ त्याकालीं त्याचे चांगले परिचित । अक्कलकोटचे
दाजीबा भोसले होते मुंबईंत । हरिभाऊनें भेटून तयांसि त्वरित । समर्थ-वृत्त विचारिलें ॥ १५ ॥ तेव्हां
दाजीबानें योगीश्वर-लीला । अपार अगम्य कथिल्या हरिभाऊला । पुढें अक्कलकोटास जाण्याचा निश्चय झाला । म्हणून
सुंदर पादुका करविल्या ॥ १६ ॥ अधिकाऱ्यासि आज्ञा मागून । खर्चावयासि रौप्य मुद्रिका घेऊन । जगन्नाथ मित्र
संगेंकरून । अग्निरथमार्गें अक्कलकोटीं पातले ॥ १७ ॥ जोशीबुवांचे येंथें उतरले । समर्थ-दर्शनार्थ उत्सुक जाहले ।
त्यासमयीं परमात्मा जाऊनि बैसले । होते राजवाड्यांत ॥ १८ ॥ आतां गुरुदर्शन कैसें घडेल । ऐसा चिंतेंत हरिभाऊ
विव्हल । मग राजद्वाराजवळ । बैसले जाऊन दर्शनेच्छु ॥ १९ ॥ तदा भोजनाचा होता समय । भोजन करूनि
शयन करिती नृपवर्य । तों अकस्मात् स्वामिभक्तिप्रिय । चोळाप्पाचे जामात ते ॥ १२० ॥ श्रीपादभटजी शोध
करिती सत्वरी । कीं दर्शनासि कोणी आलेत काय नरनारी । तों पाहिले दोघेच स्वहितकारी । दत्त-दर्शनासि
आलेले ॥ २१ ॥ त्या दोघांस घेऊनि श्रीपादभट । राजवाड्यांत नेऊं लागले नीट । तो चोळाप्पा समर्थांचें
उच्छिष्ट ताट । करीं घेऊन चाललासे ॥ २२ ॥ तेव्हां हरीनें चोळाप्पास पुशिलें । उच्छिष्टान्नानें तुमचे हात

भरले । हें कोणाचें उच्छिष्ट सांगा भलें । स्वामींचें असल्यास मज द्यावें ॥ २३ ॥ मग चोळाप्पा बोले भाविक । हें असें स्वामिराजांचें उच्छिष्ट अन्नोदक । शुद्धभावनायुक्तासि प्रासादिक । देतसों भाग्यवानांसि ॥ २४ ॥ ऐसें वदूनि चोळाप्पांनीं तात्काल । भगवदुच्छिष्ट प्रसाद सजल । हरिभक्तासि अर्पिला निर्मळ । त्यानें प्रेमपूर्वक भक्षिला ॥ २५ ॥ नंतर योगीश्वरपद समीप जाऊन । पूर्णब्रह्म मूर्तिमंत विलोकून । हरिभाऊनें दंडवत नमन । कर जोडूनि घातलें ॥ २६ ॥ दोन घटिका बैसूनि प्रभूपाशीं । बिऱ्हाडीं पातले स्वस्थ मानसीं । भोजनविधि आटोपूनि परस्परांशीं । वदती हरि आणि जगन्नाथ ॥ २७ ॥ आल्यासारिखें कार्य झालें । दर्शन होऊनि प्रसादा भक्षिलें । आतां संसार सोडूनि राहिलें । पाहिजे गुरुभक्ति-भजनयुक्त ॥ २८ ॥ त्याच रात्रीं हरिभाऊसि स्वप्नांत । जाहला भावी योग्य दृष्टांत । कीं तूं प्रपंचजाल त्यागूनि सदोदित । भजन करीं रे निरुपाधिक ॥ २९ ॥ जागृत होऊनि जगन्नाथासि हरि । म्हणे मनकामना सिद्ध झाली पुरी । आणि चोरी होऊनि त्याच रात्रीं । पागोटें सामान कांहीं गेलें ॥ १३० ॥ तेव्हां हरीनें चोळाप्पासि स्वल्प धन । देऊनि करविलें नैवेद्य ब्राह्मणभोजन । समर्थ-चरणांसि पादुका लावून । प्रासादिक म्हणून घेतल्या ॥ ३१ ॥ पुढें योगीराजांची आज्ञा प्रसाद घेऊन । मुंबईस गेले दोघे सज्जन । हातीं वीणा टाळ ग्रहण करून । हरिभाऊ करिती भजन समर्थांचें ॥ ३२ ॥ सोडूनि प्रपंच संसारपाश । हरिभाऊ विनटले गुरुभक्तिवश । श्रीगुरु स्वामीसमर्थांचें सावकाश । मठस्थान त्यांनीं करविलें ॥ ३३ ॥ त्या मठस्थानांत उत्तम रीतीं । समर्थांच्या पादुका आणि लेख्यमूर्ति । विराजित करिती युक्तभक्ति । दर्शनासि येती लोक बहु ॥ ३४ ॥ वर्षांतून दोन तीन वेळां । अक्कलकोटीं येती दर्शनाला । वीणा घेऊनि सुस्वर गाती भजनाला । देहभानरहित ते ॥ ३५ ॥ अभंग पदें

आदि कविता नवी । आरत्या भजनादिक बरवीं । रचूनि ‘स्वामी-समर्थ’ पदवी । सत्कीर्ति वर्णिली हरिभाऊंनीं ॥ ३६ ॥ वाढला हरिभाऊंचा शिष्य-संप्रदाय । अहमदनगरचा एक द्विजवर्य । नाना रेखी ज्योतिषी लोकप्रिय । अक्कलकोटीं येऊन गेलेला ॥ ३७ ॥ तयें स्वामिराजांच्या पादुका स्थापन । करूनि रचिलें सुंदर स्थान । पूजा नैवेद्य आरती आणि भजन । करितसे नाना मंडळीसह ॥ ३८ ॥ त्या नाना जोशानें हरिभाऊ भक्तास । नेऊनि ठेविलें अहमदनगरास । तेथें राहूनि हरिभाऊ भक्त थोडे दिवस । मुंबापुरीस परत गेले ॥ ३९ ॥ नगरचे भाऊ ज्योतिषी विद्वान् । त्याजपाशीं नानारेख्यानें केलें अध्ययन । ते भाऊ जोशी वृद्ध नेत्रांध असून । ज्योतिषांत निपुण होते ॥ १४० ॥ तो नानारेखी धनप्राप्तीकरितां । मुंबापुरीस कांहीं दिवस वसतां । हरिभाऊचा समागम घडूनि तत्त्वतां । लागला यतींद्रांचे भजनास ॥ ४१ ॥ काकूबाई हरिभाऊची जननी । आणि विरक्त गुरुभक्त तैशी भगिनी । वारंवार अक्कलकोटास येऊनि । वसूनि दर्शन नित्य घेती ॥ ४२ ॥ मुंबईच्या कांदेवाडींतील मठांत । हरिभाऊभक्ताचें आरती भजन होत । तात्पर्य हरिभाऊ साधु विरक्त । भगवद्भक्त जाहले ॥ ४३ ॥ पुढें थोडक्या संवत्सरांत । हरिभाऊ पावले कैलासवास । नंतर त्यांचा कनिष्ठ बंधु चालवित । मठादिक व्यवस्था सर्व ॥ ४४ ॥ या मठासि केजकर महारुद्र । देशपांडे आदिक होते साह्यकार । तैसेच गणेश बल्लाळ मुळेकर । सोलापुरीं नौकर होते जे ॥ ४५ ॥ स्वामीसमर्थांचें दर्शन । घडलें आहे त्यांसि पूर्वभाग्योदयेंकरून । ते सांप्रत स्वामिराजदयेनें जाण । मामलतीचें काम करितात ॥ ४६ ॥ ज्यांनीं ‘पुणेंवैभव’ वर्तमानपत्रांत । छापवूनि कळविलें सर्व लोकांत । कीं अक्कलकोटस्वामींचें विचित्र चरित । ज्यांनीं अनुभविलें असेल ॥ ४७ ॥ तें इत्थंभूत त्यांनीं स्पष्ट लिहून । मुळेकराकडे द्यावें पाठवून । त्याप्रमाणें कित्येकांनीं करूनि लेखन । पाठविलें त्यांजकडे ॥ ४८ ॥ नंतर मुळेकरांनीं

* * *

पुणेंवैभवांत । छापवूनि केलें विख्यात । पुढें तें सर्व एकत्र करूनि यंत्रमुद्रिकेंत । मुद्रित करविलें पुस्तकरूपें ॥ ४९ ॥
यावरूनि त्यांचें चित्त । असावें श्रीगुरुभक्तियुक्त । असो हे हरिभाऊचे मठांत । धन-साह्य करिती चांगलें ॥ १५० ॥
तैसेचि बाळाप्पादिक सेवेकरी । तयांसि मुळेकर साह्य करिती आदरीं । ऐसे गुरुभक्त उपासक नरनारी । होती अनेक
समर्थांचे ॥ ५१ ॥ तैसेचि मुंबापुरींत असणारे । सारस्वत ब्राह्मण सद्‌गृहस्थ खरे । ज्यांसि बळवंतराव भेंडे ऐसे सारे ।
म्हणती प्रसिद्ध लोक ते ॥ ५२ ॥ ते खाजगी नौकरी सावकारी । करीत असतां क्षीण रोगें विकारी । जाहले युवावस्थेंत
नाना प्रकारीं । करिती उपाय साधनें ॥ ५३ ॥ पुष्कळ उपाय करूनि थकले । पुढें पुणें शहरांत जाऊनि राहिले ।
तेथें औषधोपचार बहुत झाले । परंतु स्वल्पही गुण वाटेना ॥ ५४ ॥ तेव्हां कित्येक गृहस्थ सज्जन । म्हणती
अक्कलकोटास पहावें जाऊन । अवतारिक पुरुषांचें होतां दर्शन । आराम होईल वाटतें ॥ ५५ ॥ तें परिसूनि
बळवंत भेंड्यांनीं । आत्महितार्थ विचार करूनि । मातुश्री आदिक संगें घेऊनि । अक्कलकोटीं पोहोंचले ॥ ५६ ॥
करजाळकरांच्या वाड्यांत उतरले । स्वामिराज-दर्शनासि भेंडे गेले । त्या कालीं खासबागेंत विराजले । होते जगद्गुरु
दत्तात्रेय ॥ ५७ ॥ तेथें श्रीफलादिक अर्पून । बळवंतें घातलें लोटांगण । तारक जगदीश्वर-पददर्शन । वंदन केलें
सर्वांनीं ॥ ५८ ॥ सुंदर कांति तेजस्वी मनोहर । देखूनि म्हणती हे प्रत्यक्ष महेश्वर । करावयासि जगदुद्धार ।
यतीश्वर नर-वेषें अवतरले ॥ ५९ ॥ मग दुसरे दिवशीं स्नान करून । पूजा-साहित्य सकल घेऊन । भेंडे खासबागेंत
जाऊन । पुरुषोत्तमा वंदिती ॥ १६० ॥ पूजनादिक झालें यथासांग । तेव्हां परमपुरुष परमात्मा असंग । त्या
भेंड्यासि श्रीफल प्रसाद अभंग । प्रसन्नत्वें आरोग्यकारक देती ॥ ६१ ॥ आणि वदती आशीर्वचन । स्वस्थ असावें
गृहीं जाऊन । पुष्पहार प्रसाद प्राप्त होऊन । बळवंत कृतकृत्य जाहले ॥ ६२ ॥ बळवंत-मातुश्रीचा विचार । पहावें

श्रीविठ्ठल क्षेत्र पंढरपुर । नित्य नेमें सायंकालीं दर्शनातुर । बागेंत भेंडे मातेसह आले ॥ ६३ ॥ आम्रवृक्षतळीं त्या कालीं । श्रीपादवल्लभ-नृसिंह-गुरुमाउली । शुद्धभाव जाणूनि कळवळली । सर्वज्ञ सर्वसाक्षित्वें ॥ ६४ ॥ ठेवूनि करद्वय कटीवर । उभी सगुण घनश्याम मूर्ति सुंदर । श्रीपांडुरंग-विठ्ठलस्वरूप अभयकर । धरिलें वरद प्रभूनें ॥ ६५ ॥ साक्षात् पांडुरंग विठ्ठलमूर्ति । विलोकूनि सर्वांस समाधान वाटलें चित्तीं । भेंडे मातुश्रीसह संतुष्टले अति । सामर्थ्यातिशय पाहूनि ॥ ६६ ॥ नंतर गाणगापुरास जाऊन । देवपूजन नैवेद्यादि आटोपून । पुण्यास येऊनि शुभवृत्त निवेदून । मुंबईस गेले भेंडे ते ॥ ६७ ॥ यजमानाचे आज्ञेनुसार । नौकरीस पूर्ववत् लागले निरंतर । रोगनिर्मुक्त झालें दृढ शरीर । स्वामीसमर्थकृपेनें ॥ ६८ ॥ हे रामचंद्र केरो भेंडे गृहस्थ । गृहस्थाश्रमीं वर्तती युक्त-परमार्थ । परोपकारी गुरु-स्वामिकार्यार्थ । परिश्रम करिती निरालस्य ॥ ६९ ॥ काम संपतांचि देवदर्शन । भगवच्चरित्र-वेदांतश्रवण । करिती सत्कालक्षेप सज्जन । बळवंतराव भेंडे ते ॥ १७० ॥ श्रीगुरुस्वामी परमेश्वर । कृपा-दृष्टि करील जयावर । त्यासि चारी पुरुषार्थ प्राप्त होती साचार । कां न्यून नसेचि ॥ ७१ ॥ ऐसें श्रीगुरुलीलामृत अपार । श्रवणें पठणें यथेप्सित सिद्धिकर । तेंचि परिसावें श्रोतीं सादर । पुढिले अध्यायीं रसाल ॥ ७२ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदोपनिषदार्थसारमथित । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । सप्तत्रिंशतितमाध्याय गोड हा ॥ १७३ ॥

इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे सप्तत्रिंशतितमोऽध्यायः समाप्तः ॥ ३७ ॥ श्रीगुरुदेवदत्त-स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय अडतिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्त-दिगंबराय नमः ॥ ॥ अधिकारी शिष्य विनवी गुरूसि । शुभेच्छा उद्भवली
मानसीं । कीं परिसावें ईषणा-स्वरूपासि । श्रोत्रिय-ब्रह्मनिष्ठ-गुरुमुखें ॥ १ ॥ बृहदारण्योपनिषदीं कथन । कहोल
आणि याज्ञवल्क्याचें संभाषण । प्रश्नोत्तररूप शिष्या जाण । तें यथार्थ श्रवण करावें ॥ २ ॥ क्षुधा पिपासा प्राणाचे धर्म ।
आहेत शोक मोह मनाचे धर्म । आणि जरा मरण शरीराचे धर्म । आत्म्याचा धर्म कोणताही नाहीं ॥ ३ ॥ ह्या षड्डर्मिरूप
जो संसार । त्याविरहित ब्रह्मात्मा असे निर्विकार । जैसा घटादिक पदार्थांचा प्रकाशक भास्कर । त्यासि घटादिकांचे
धर्म न स्पर्शती ॥ ४ ॥ तैसा प्राणादिकांचा प्रकाशक । अनंतस्वरूप आत्मा असे अलौकिक । त्या आत्म्यासि क्षुधा
पिपासादिक । प्राणधर्म स्पर्शत नसती ॥ ५ ॥ यास्तव ब्रह्म जसें जन्मादि-संसाररहित । तैसा आत्माही जन्मादिरहित
निश्चित । म्हणूनि वेदवेत्ते महात्मा पुरुष बहुत । आत्म्यासि ब्रह्मरूप वर्णिती ॥ ६ ॥ किंवा निःसंशय आत्मज्ञान झालें
जयाप्रति । त्याची जर होते जन्ममरणादि-निवृत्ति । तर साक्षात् ब्रह्मात्म्यासि जन्मादि नसती । यांत आश्चर्य कोणतें
॥ ७ ॥ जन्मादि संसार आणि अज्ञानरहित । तथा सर्व बुद्ध्यादिकांचा साक्षी अनंत । त्या ब्रह्मात्म्याचा साक्षात्कार
नाहीं होत । विक्षेपवान् पुरुषासि ॥ ८ ॥ कां तरी विक्षेपरहित जे विरक्त । महात्मा विवेकी साधुसंत । त्यांसि आत्मसाक्षात्कार
होतसे प्राप्त । समूल विक्षेप दग्ध झाला म्हणूनि ॥ ९ ॥ यास्तव पूर्वकालीन वामदेवादिक महान् ।
आत्मसाक्षात्कार प्राप्त व्हावा म्हणून । सर्व ईषणांचा परित्याग करून । संन्यासाश्रम घेतला त्यांनीं ॥ १० ॥ यावरून हा अर्थ

सिद्ध झाला सम्यक् । जैशीं साधनें वैराग्य आणि विवेक । आत्मसाक्षात्काराचें साधन आवश्यक । असती शमदमादि चतुष्टय तीं ॥ ११ ॥ तैसें उपरति-शब्दाचा अर्थ संन्यास । विक्षेप-निवृत्तिद्वारें आत्मसाक्षात्कारास । साधन आहे म्हणून येथें शब्दें जो ‘संन्यास’ । तो ‘विविदिषा’ ग्रहण करावा ॥ १२ ॥ आतां ईषणांचें स्वरूप तथा भेदासि । दाखवूं सर्वांसि कळावयासि । पुत्रेषणा लोकेषणा ऐशी । तीन प्रकारची ईषणा असे ॥ १३ ॥ मला पुत्र व्हावा ऐशी जी वासना । त्या इच्छेसि म्हणती ‘पुत्रेषणा’ । त्या पुत्रेषणें स्त्रीचे संग्रहादिकांत जाणा । जीव होती प्रवृत्त ते ॥ १४ ॥ आणि मला धन प्राप्त व्हावें । ऐशा इच्छेसि ‘वित्तेषणा’ म्हणावें । तें धनही दोन प्रकारचें जाणावें । दैवधन आणि मनुष्यधन ॥ १५ ॥ देवलोकीं जें विजयाचें साधन । उपासना आणि कर्म जाण । त्या कर्म-उपासनेसि म्हणती ‘दैवधन’ । वेद आणि वेदवेत्ते ॥ १६ ॥ आणि या मृत्युलोकींचें भोगसाधन । जे पशु-क्षेत्र-सुवर्णादिरूप धन । तयासि म्हणती ‘मानुष्य धन’ । त्या दोन्ही धनेच्छेसि ‘वित्तेषणा’ म्हणती ॥ १७ ॥ आणि मला सुख प्राप्त व्हावें । ऐशा इच्छेसही ‘लोकेषणा’ म्हणावें । तें सुखही दोन प्रकारचें जाणावें । देवलोकींचें आणि मनुष्यलोकींचें ॥ १८ ॥ यद्यपि इच्छेचे विषय पदार्थ अनंत । तैशा इच्छाही अनंत संभवत । तथापि सर्व इच्छांचा ईषणात्रयांत । अंतर्भाव होतसे ॥ १९ ॥ परलोकींचें सुखाचें साधन । तथा मनुष्य-लोकींचें सुखाचें साधन । त्या संपूर्ण साधनाचें नामाभिधान । ‘वित्त’ ऐसें जाणावें ॥ २० ॥ जन्म-मरणादि संसाररहित । आत्मा स्वप्रकाशानंदस्वरूप विराजित । त्या आत्म्याचे ठायीं सुख प्रतिष्ठित । म्हणून अनात्म पदार्थांत सुख नाहीं ॥ २१ ॥ आत्म्याहूनि भिन्न अनात्म-पदार्थ । परिणामकालीं दुःख देणारे असत । यास्तव त्या अनात्म जड पदार्थांत । किंचित्मात्रही सुख नसे ॥ २२ ॥ या प्रकारचा विचार करून । ते महात्मा पुरुष विरक्त विद्वान् । सर्व ईषणांचा परित्याग करून । संन्यासाश्रम ग्रहण करिती ॥ २३ ॥ आणि आत्मज्ञान-प्राप्तीचें साधन । तथा जीवन्मुक्ति-

सुखाचें साधन जाण । जो संन्यास आहे त्याचें निरूपण । केलें शिष्या उमजावया ॥ २४ ॥ आतां आत्मज्ञानाचें केवल साधन । जें श्रवण-मनन-निदिध्यासन । त्याचें स्वरूप करूं निरूपण । बृहदारण्योपनिषदीं कथिलें जें ॥ २५ ॥ सुखरूप ब्रह्म जें स्वप्रकाश । त्या ब्रह्मप्राप्तीची शुभेच्छा आहे ज्यास । आणि शास्त्राचे पद-पदार्थ जयास । वाक्यार्थज्ञान झालेलें ॥ २६ ॥ ऐसा जो चतुष्टय-साधनसंपन्न । गुरुकुलवासी मुमुक्षु जन । तो प्रथम गुरुमुखें वेदांतश्रवण । वाक्यार्थसहित करूनि ॥ २७ ॥ त्या वेदांत-वाक्याचा अर्थ सुनिश्चय । हृदयीं परब्रह्म जें अद्वितीय । त्या ब्रह्मस्वरूपीं करितसे निश्चित तात्पर्य । त्याचेंचि नाम 'श्रवण' आहे ॥ २८ ॥ मुमुक्षूनें त्या श्रवणानंतर । सर्वेषणाचें जनक तथा आसक्ति-द्वार । जन्म-मरणादि विकारवान् हें शरीर । तें अन्वय-व्यतिरेकें दुःखकारण समजावें ॥ २९ ॥ याप्रकारें सुनिश्चित जाणून । सर्व ईषणांचा परित्याग करून । रागद्वेषरहित बालका समान । मुमुक्षूनें स्थित व्हावें ॥ ३० ॥ म्हणजे रागद्वेषपूर्वक विषयांत । जी इंद्रियाची प्रवृत्ति होत । ती इंद्रियांची प्रवृत्तिच दुःखाचें कारणभूत । सकल जीवांसि होतसे ॥ ३१ ॥ या कारणानें रागद्वेषपूर्वक । इंद्रियप्रवृत्तिरहित जें बालक । तें दुःखासि प्राप्त होत नाहीं निश्चयात्मक । तैसें मुमुक्षुनें बालवत् असावें ॥ ३२ ॥ म्हणूनि इंद्रियप्रवृत्तिरहित होऊन । रागद्वेषशून्य बालकासमान । मुमुक्षूनें वेदांत-वाक्यार्थाचें मनन । नानायुक्तींनीं करावें ॥ ३३ ॥ नाना युक्तींनीं विरोध-निवृत्तिपूर्वक । जे वेदांत-अर्थाचें चिंतन सम्यक् । त्या चिंतनासि याज्ञवल्क्यादिक । 'मनन' म्हणती शास्त्रवेत्ते ॥ ३४ ॥ तें मनन रागद्वेषवान् बहिर्मुख । जनांसि प्राप्त होऊं न शके देख । यास्तव रागद्वेषरहित अंतर्मुख । मुमुक्षूनें मनन करावें ॥ ३५ ॥ आणि त्या श्रवण-मननानंतर । मुमुक्षूनें ज्या जगत्-जड-अनात्माकार । त्या विजातीय वृत्ति त्यागूनि सत्वर । आत्माकार सजातीय वृत्ति स्वीकारावी ॥ ३६ ॥ आत्माकार सजातीय वृत्तिप्रवाहरूप । तेंचि जाणावें 'निदिध्यासन'-स्वरूप ।

म्हणजे ब्रह्माकारांतःकरण वृत्ति निर्विकल्प । करूनि निदिध्यासन होतें तें ॥ ३७ ॥ मनवाणींचा विषय जो दृश्य प्रपंच । याहून मी विलक्षण ब्रह्मात्मस्वरूप साच । सजातीय-विजातीय-स्वगतभेदविरहितच । मी ब्रह्मस्वरूप सदा आहें ॥ ३८ ॥ ऐशी ब्रह्मवृत्तिप्रवाहरूप निरंतर । जी निदिध्यासन वृत्ति ब्रह्माकार । त्या निदिध्यासन वृत्तींस निष्ठायुक्त जे तत्पर । श्रवण-मननें पूर्ण झालेले ॥ ३९ ॥ ऐसे जे मुमुक्षु मोक्षाधिकारी । ते ब्रह्मविद्येस पावती सत्वरी । त्या ब्रह्मविद्यासंपन्नासि ब्रह्मसाक्षात्कारी । 'ब्राह्मण' श्रुतीनें म्हटलें आहे ॥ ४० ॥ आणि ब्रह्म श्रवण-मनन-निदिध्यासावांचून । इतर कोणत्याही उपायेंकरून । ब्राह्मणभावासि मुमुक्षु जन । सर्वथा प्राप्त होत नाहीं ॥ ४१ ॥ नाम-रूप-क्रियारहित । स्वप्रकाश सुखरूप अद्वैत ब्रह्म अखंडित । तें मी आहे निर्विकल्प ऐसें जो अनुभवित । त्या ब्रह्मवेत्त्यासि श्रुति 'ब्राह्मण' म्हणे ॥ ४२ ॥ या प्रकारचा ब्राह्मणपणा । श्रवणादिकावांचूनि सिद्ध होत नाहीं जाणा । जैसें महानदीचे पार करणें गमना । तरी नौकेवांचून होत नसे ॥ ४३ ॥ जी नदी महान् वेगवत्तर । तथा अत्यंत आहे जिचा विस्तार । ज्या नदींत अगाध भरलेलें नीर । ऐशी जी महानदी आहे ॥ ४४ ॥ ऐशा महानदीच्या परतीरास जाणें । जैसें एका नौकेवांचून नाहीं साधणें । होडी त्राफा सांगड भोपळे घटादि साधनें । महानदींत कदा न संभवती ॥ ४५ ॥ म्हणूनि महानद्यादिकीं उतरणें । हें उडूप म्हणजे लहान होडीनें न होणें । तैसें श्रवणादि साधनाविण न घडणें । कदापिही ब्राह्मणपणा ॥ ४६ ॥ श्रवणावांचूनि अन्य भिन्न उपाय । हिरण्यगर्भाची उपासना श्रेय । अथवा अश्वमेध-मखादिक होय । उत्कृष्ट कर्मोपासना ते ॥ ४७ ॥ अनेक जन्मीं ते कर्मोपासना करितां । आत्मज्ञानाची प्राप्ति होत नाहीं सर्वथा । कर्मोपासनेपासून फल तत्त्वतां । चित्ताची शुद्धि होतसे ॥ ४८ ॥ ती चित्तशुद्धि झाल्यानंतर । वैराग्य-विवेक शमादिषट्क-संपत्ति मुमुक्षुता चार । हें चतुष्टय-साधन प्राप्त झाल्यावर । गुरुमुखें वेदांत श्रवण करावा लागे ॥ ४९ ॥ गुरुमुखें वेद-महावाक्यार्थ

श्रवण करून । तथा मनन निदिध्यासन होऊन । आत्मसाक्षात्कारासि पावती भाग्यवान् । साधनसंपन्न मुमुक्षु ते
॥ ५० ॥ यास्तव चित्तशुद्धि होईपर्यंत । कर्मोपासनेचा उपयोग होत । आत्मज्ञानप्राप्त्यर्थ साक्षात् । कर्मोपासनेला
कारणता नाहीं ॥ ५१ ॥ म्हणून श्रवणादिकांसि तत्त्वतां । आहे ब्रह्मप्राप्तीची साक्षात्-कारणता । त्या श्रवणादिकांचें
स्पष्ट फल आतां । सांगूं शिष्या परिसावें तें ॥ ५२ ॥ येथें वेदांतशास्त्र जीवेश्वराचे । किंवा भेदासि बोधितसे दोघांचे ।
ऐशा 'प्रमाणगत'-असंभावनेचें । निर्मूल होतें वेदांतश्रवणें ॥ ५३ ॥ आणि आत्मा असे व्यापक सुखरूप नित्य । अथवा
परिच्छिन्न दुःखरूप आहे अनित्य । ऐशी 'प्रमेयगत'-असंभावना होत निवृत्त । म्हणजे वेदांतमननें असंभावना नष्ट होते
॥ ५४ ॥ आणि अनित्य अशुचि दुःखरूप शरीरादिकांत । नित्य शुचि सुखरूपता बुद्धीनें मानित । त्या देहबुद्धीसि
'विपरितभावना' म्हणत । वेदांतशास्त्र स्पष्टपणें ॥ ५५ ॥ देहबुद्धि ती विपरित भावना । वेदांत-निदिध्यासें निवृत्त होते
जाणा । याप्रकारें असंभावना विपरित भावना । नष्ट होती श्रवणादिकें ॥ ५६ ॥ तें श्रवण मनन निदिध्यासन ।
प्रत्यक्ष आत्मज्ञानाचें योग्य साधन । यास्तव श्रवणादिकेंच ब्रह्मानुभवी जन । ब्राह्मणभावासि प्राप्त होती ॥ ५७ ॥
आतां 'कर्मणैवहि संसिद्धि' । 'कांक्षंतः कर्मणां सिद्धि' । येथें 'संसिद्धि' शब्दें घेती चित्तशुद्धि । मोक्षभाव नाहीं तो
॥ ५८ ॥ म्हणूनि अतिशय जरी केलें उपासना कर्म । तथापि कधींही न कळे ब्रह्मप्राप्तीचें वर्म । यास्तव काम्यफल
टाकूनि निष्काम कर्म । करूनि अंतःकरण शुद्ध होतें ॥ ५९ ॥ नंतर श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ गुरूचा समाश्रय । त्या सद्गुरु-
मुखें वेदांतार्थ श्रवण होय । त्या श्रवण-मनन-निदिध्यासें जीवब्रह्मैक्य । स्वरूपसाक्षात्कारी होतो मुमुक्षु ॥ ६० ॥ 'सर्वत्र
ब्रह्म आहे' ऐसें जाणणें । तें परोक्ष ज्ञान म्हणणें । 'मी ब्रह्म आहें' ऐसें प्रत्यक्ष अनुभवणें । तोचि 'साक्षात्कार' जाणावा ॥ ६१ ॥
जैसें ग्रंथ आणि नकाशावरून । काशीक्षेत्राचें करिती वर्णन । ते म्हणावें 'परोक्षज्ञान' । न पाहिलें आपण समक्ष जें

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

॥ ६२ ॥ आणि काशीक्षेत्रीं निवास करून । ज्यास घडलें गंगा-स्नान विश्वेश्वर-दर्शन । तयासि म्हणती 'अपरोक्षज्ञान' ।
'प्रत्यक्ष-साक्षात्कार' तोचि जाणावा ॥ ६३ ॥ ऐशा ब्रह्मसाक्षात्कार-सिद्ध्यर्थ । करावा आत्मतत्त्व-विचार परमार्थ । तेणें
संसार सर्वबंध अनर्थ । तन्निर्मुक्त तात्काल होत मुमुक्षु ॥ ६४ ॥ मग तो देह प्रारब्धकर्मक्षयपर्यंत । जीवन्मुक्ति
ब्रह्मसुख भोगूनि यथास्थित । विदेहकैवल्य निरुपाधि ब्रह्मस्वरूपांत । आहे तैसा आहेचि ॥ ६५ ॥ भोगित असतां प्रारब्ध-
कर्मासि । सनातन वेदप्रणित धर्ममार्गासि । शुद्ध भक्ति-वैराग्य-ज्ञानदृढतेसि । लावावें जनांसि सप्रेमें ॥ ६६ ॥;
जितेंद्रिय निर्लोभ भयशोकरहित । असावें सर्व भूतांच्या हितीं रत । पूर्णब्रह्म दत्तात्रेय-स्वामी हृदयांत । सर्वांतर्यामीस
नित्य भेटूनि ॥ ६७ ॥; दत्तात्रेय-स्वामिकृपें ऐसा अधिकारी । अक्कलकोटाहूनि अष्ट योजनें दूरी । सिद्धनकेरो गांवचा
जंगम वणिक्-गुरु विचारी । 'गुरुसिद्धाप्पा' नाम जयाचें ॥ ६८ ॥ प्रति संवत्सरीं बहुत धन उत्पन्न । गज अश्व वृषभ गौ महिषी
आदिकरून । गुरुसिद्धप्पांचे पदरीं असून । पवित्र अंतःकरण राहतसे ॥ ६९ ॥ ते दत्तात्रेय-स्वामींची कीर्ति अपार । श्रवण
करूनि लोकमुखें वारंवार । भृत्यांसह सिद्ध होऊनि महंत सत्वर । मेण्यांत आपण बैसूनि ॥ ७० ॥ अक्कलकोटास पातले पेठेंत । उतरले
जंगमाचे मठांत । त्या कालीं श्रीमद्दत्तावधूत । ग्रामाबाहेरील जंगम-मठांत विराजती ॥ ७१ ॥ संस्थानी जंगम-गुरु श्रीमान् ।
स्नानादिक धर्म आटोपून । रथ वाहनीं न बैसून आपण । पादचारी संवाहनरहित ॥ ७२ ॥ अक्कलकोट ग्रामाबाहेर । जंगमाचे
मठांत पातले सत्वर । अवलोकिती राजाधिराज दत्तदिगंबर । तेजस्वी सुंदर वरदमूर्ति ॥ ७३ ॥ रक्त-शामलांग
प्रसन्न वदन । वक्ष विशाल कंबुग्रीवासम शोभायमान् । चंपकवत् नासा कमलदल नयन । आजानुबाहु सरल शोभती
॥ ७४ ॥ सुकुमार जन्मजरारहित । सुपाद स्वंगुली सुजंघ विराजित । सुनाभी शुभ ऊरु शुभ लिंगसहित । आच्छादित
कौपीन वस्त्रें ॥ ७५ ॥ सुपार्श्व जघनोत्तम विशाल । महास्कंद शोभती कोमल । दीर्घ पृष्ठोत्थ सर्वदा निश्चल । सुहस्तरेखा

लक्ष्मीवान् साजती ॥ ७६ ॥ बिंबोष्ट स्वच्छ शुभ दंत झळकती । विद्युज्जिव्हा सुतालक शोभती । दीर्घ चंपक नासा सतेज ती । प्रकाशती सुकपोल सुकर्ण ते ॥ ७७ ॥ मीलितोन्मीलित नेत्र शुभ्र विशाल । सुभ्रूमध्य कोमल । सुंदर दिव्य प्रकाशितभाल । भस्म सुगंधयुक्त तें ॥ ७८ ॥ कंठीं रुद्राक्ष तुलसीमाला स्फटिक । विलसतसे हेमयुक्त मुक्त-प्रवालक । कर्णीं चार चार कुंडलरूप मौक्तिकें अमोलिक । ऐसें अलौकिक ध्यान पाहूनि ॥ ७९ ॥ गुरुसिद्धाप्पा हर्षभरित समाधान । पावूनि घालिती साष्टांग नमन । कैसे जाहले गुरुसिद्ध उत्पन्न । तेंही श्रवण करावें ॥ ८० ॥ यांची जननी आणि जनक । राहणारीं मंगळवेढ्या नजीक । ज्याकालीं मंगळवेढ्यास यतिनायक । होते तेव्हां त्या जंगमस्त्रीनें ॥ ८१ ॥ पुत्रसंतान नसल्यामुळें । दिगंबरस्वामी शुद्ध भक्तीनें आराधिले । तेव्हां योगिराज प्रसन्न झाले । दिधलें मांगलिक आशीर्वचन ॥ ८२ ॥ तुजला पुत्र संत कुलदीपक । होईल श्रीमान् शुचिष्मंत निश्चयात्मक । पुढें सतीस पुण्यदायक । सुपुत्र-संतान जाहलें ॥ ८३ ॥ तारुण्यांत पुत्र आल्यावर । स्थित झाले गुरु-जंगमाचे गादीवर । तथापि मठ-महंती अहंकार । ऐश्वर्य असूनि न स्पर्शे जयां ॥ ८४ ॥ त्या गुरुसिद्धाप्पांचे शुद्ध संकल्प मनीं । मजला भेटतील उत्तम पुरुष कोणी । मानसिक संशय फेडूनि । सुखी समाधानी करितील ॥ ८५ ॥ ज्यांच्या सकृद्दर्शनें मज । होईल निःशंकस्थिति सहज । ते शाश्वत पुराण नित्य अज । विश्वंभर महाराज जाणेन मी ॥ ८६ ॥ ऐशा सत्यसंकल्पाचा दाता । परमात्मा उत्तमपुरुष जगज्जनिता । पूर्व सुकृत उदयासि येतां । संकल्पानुसार दृग्गोचर होतसे ॥ ८७ ॥ पूर्व संकल्पानुसार सगळे । मानसिक संशय तत्काल फिटले । अंतःकरण अत्यंत शुचिर्भूत झालें । अज्ञान समूळ जळूनि ॥ ८८ ॥ मग ते गुरुसिद्धाप्पा आनंदले । नृत्य गायन करूं लागले । समर्थांचे चरणावरी लोळले । कृतार्थ केलें मज म्हणती ॥ ८९ ॥ मग सत्यसंकल्पानुसार । आपण साक्षात् भेटले परमेश्वर । मनोरथ पूर्ण झाले कृपासागर । दर्शनें कृतकृत्य जाहलों ॥ ९० ॥ आतां हे श्रीमंती

मठाधिपणाचें । ऐश्वर्य काय चुलींत घालावयाचें । स्वामीसमर्थांच्या पादकमलांचे । दर्शनावीण कांहीं नको ॥ ९१ ॥ कांहीं अन्नपाणी न घेतां । करूनि चित्तवृत्ति-एकाग्रता । दत्तात्रेय-स्वामींच्या समीप तत्त्वतां । तटस्थ उभे राहिले ॥ ९२ ॥ गुरुसिद्धाप्पांचे शिष्यादिक । पाचारणास आले जंगम लोक । म्हणती आपण गुरु संस्थानिक । चलावें पेठेंत जंगममठीं ॥ ९३ ॥ आपणावांचूनि आम्ही सकल । गौ-अश्व-वृषभादिक उपवासी, सायंकाल । जाहला, आतां उठावें गुरुदयाल । ऐसें विनविती तयांसि ॥ ९४ ॥ तेव्हां गुरुसिद्धाप्पांनीं शिष्यवचनीं । दुर्लक्ष केलें, यावरी दत्तात्रेय मुनि । वदले एक भाकर तुजलागूनि । देतों ती पचेल काय ॥ ९५ ॥ नंतर गुरुसिद्धाप्पा नम्रत्वें वदती । आपण कृपा करूनि मज द्याल भगवन्मूर्ति । तें सर्व पचेल यथास्थितीं । पाहिजे त्यासि करुणार्णवा ॥ ९६ ॥ नंतर दत्तात्रेय प्रभूंनीं दुसरे दिवशीं । एक भाकर होती धनगरापाशीं । ती घेऊनि जंगम-सिद्धाप्पासि । दिधली परमार्थिक-संज्ञेची ॥ ९७ ॥ शिवभक्त संपूर्ण जंगम लोक । जंगमाचेंच भक्षिती अन्नोदक । जंगमाविरहित जे जन आणिक । त्यांचें परिपक्व अन्न न भक्षिती ॥ ९८ ॥ तथापि सर्व जातींच्या लोकांचें । धान्य पिष्ट फल पुष्प आणि द्रव्य साचें । भिक्षा मागूनि येत उपयोगाचें । हा एक पर्याय त्यांत असे ॥ ९९ ॥ ऐसें असूनि गुरुसिद्धाप्पानें निःशंक । भक्षिली भाकर प्रासादिक । चमत्कार जाहला तात्कालिक । श्रोतीं श्रवण करावा ॥ १०० ॥ समर्थांचा प्रसाद भक्षितां । वैराग्य विवेक उदयासि येई तत्त्वतां । हृदयीं प्रकटली ब्रह्मस्वरूपता । तेणें सत्य कृतार्थता पावले ॥ १ ॥ श्रीमंती मठ महंती सुटली । देह-अहंता गलित झाली । ब्रह्मस्वरूपीं वृत्ति एकत्वें रंगली । प्रसाद भक्षितां तात्कालिक ॥ २ ॥ गुरुसेवेंत जाहले निमग्न । कोणतेंही नसूनि पदार्थभान । ऐसें दत्तात्रेय-योगीश्वरें विलोकून । गुरुसिद्धाप्पास आज्ञापिती ॥ ३ ॥ तुम्ही आपल्या संस्थानीं जाऊन । असावें निःशंक ब्रह्मानंदीं निमग्न । ब्रह्मस्थितिसुख भोगावें अभिन्न । परोपकारीं विनययुक्त ॥ ४ ॥ सत्य

प्रिय मधुर वचनें सर्वकाळ । भक्ति-वैराग्य-ज्ञानमार्गें निर्मल । स्वयें वर्तूनि निःस्पृह निर्लोभ सकळ । जनांसि बोधूनि संतोषवावें ॥ ५ ॥ परिसूनि सद्गुरुमुखें ज्ञानामृत । गुरुसिद्धाप्पा अमृतपानें झाले तृप्त । मग दत्तात्रेय-स्वामींचें अत्यंत भक्तियुक्त । पूजन करिती यथाविधि ॥ ६ ॥ करद्वय जोडूनि अनन्यभावें । प्रार्थिती मज अज्ञानासि देवाधिदेवें । आपणासारिखें तत्काल बरवें । केलें सहज अधिकार नसतां ॥ ७ ॥ सर्व प्राणिमात्रांवरी परिपूर्ण । आपली कृपादृष्टि प्रकाशे समान । जैसा उदयासि आलिया सूर्यनारायण । जगत्-व्यवहार चालती ॥ ८ ॥ अथवा मेघद्वारें वर्षल्या उदक । संतुष्ट होती सर्वत्र लोक । शीतल वायुस्पर्श सुखदायक । तैसे आपण सर्व जीवां ॥ ९ ॥ भेदाभेद उच्च नीच अधिकार । हें देखणेंचि नाहीं केवल निर्विकार । समान दृष्टि कृपासागर । प्रत्यक्ष परमेश्वर आपण आहां ॥ ११० ॥ ऐसा मज लाधला साक्षात्कार । म्हणूनि घातलें दंडवत नमन वारंवार । गुरुसमर्थांच्या आज्ञेनुसार । जातों राहतों स्वस्थानीं ॥ ११ ॥ प्रसाद घेऊनि जंगम गुरुसिद्धाप्पा । संपादूनि दत्तात्रेय-वरदान-कृपा । निर्मुक्त होऊनि भवसंसारतापा । जाऊनि राहिले सिद्धनकेरीस ॥ १२ ॥ नित्य करिती दत्तात्रेय-गुरुभजन । गुरुआज्ञेनुसार वर्तन करूनि । संस्थानीं गुरुसिद्धाप्पा मुक्त सज्जन । बहुत वर्षें निवसले ते ॥ १३ ॥; असो भीमातीरीं क्षेत्र खेडमणुर । त्या खेड्यांतील राहणार । सीतारामाचार्य पंडित विप्र । तसेच रामाचार्यादिक विद्वान् होते ॥ १४ ॥ वैष्णव-स्वामींच्या पंक्तीस । या मंडळींस प्रथम तीर्थ मानानें देतात । म्हणून यांस 'आद्य' म्हणतात । यांस जहागीरउत्पन्न मोठें असे ॥ १५ ॥ दत्तात्रेयस्वामी दुसऱ्या खेपेस । एल्लम्मा देवीचे स्थानांत होते मणूरास । चोळाप्पासह सेवेकरी त्या वेळेस । पुष्कळ लोक होते समागमें ॥ १६ ॥ दत्तात्रेयस्वामींच्या दर्शनार्थ केवल । सहस्रावधि जन पेढे बर्फी श्रीफल । घेऊनि येत होते पुष्पहार पुष्कळ । कापुरार्तिप्रकाश विशेष तदा ॥ १७ ॥ दूर समीपचे इतर

ग्रामींचे जन । येऊनि प्रेमभावें करिती दंडवत नमन । दिव्य मनोहर भगवन्मूर्ति पाहून । समाधानें तटस्थ होती ॥ १८ ॥ पंढरपुरासारखी बहुत दाटी । दर्शन घेती शुद्धप्रेम पोटीं । अवतारिक पूर्णपुरुष जगतासाठीं । म्हणूनि संचरती महीवरी ॥ १९ ॥ 'श्रीगुरुदेवदत्त स्वामीकी जय' । ऐसें मुखें वर्णिती ते जन अक्षय । अनेक नवस फिटती भक्तिप्रिय । जगत्पतीचे समीप सदा ॥ १२० ॥ आप्पासाहेब मणूरचे पाटील । वैष्णव द्विज असून शुद्ध भक्त प्रेमल । समर्थांचें पादोदक उच्छिष्ट-प्रसाद निर्मल । घेती घरमंडळींसह ॥ २१ ॥ हें पाहूनि खेड्यांतील आद्य वैष्णव । रामाचार्यादिक मंडळीस वैषम्यभाव । चित्तीं उद्भवूनि सगर्व । क्रोधें भाषण करिती ॥ २२ ॥ अहो हे भ्रष्टलेले यति । यांस नसे गोत्र जाति । पाहिजे त्यांचें अन्नोदक ग्रहण करिती । यांचें उच्छिष्ट भक्षिती ब्राह्मण ॥ २३ ॥ त्यांत आमचे वैष्णव पाटीलादिक । भक्षिती उच्छिष्ट तीर्थ म्हणूनि प्रासादिक । यास्तव यांस वैष्णव-जातींतून लोक- । पंक्तिबाह्य वेगळें ठेवावें ॥ २४ ॥ अन्नोदक व्यवहार यांचे संगें । ठेवूं नये कोणीं कोणत्याही प्रसंगें । ऐसे वज्रासम कठोर शब्द वावुगे । द्वेषकारक बोलती ॥ २५ ॥ तें परिसूनि खेडचे महा विद्वान् । सीतारामाचार्य वैष्णव असून । सर्वांसि म्हणती विचार केल्याविण । साहस कर्म करूं नये ॥ २६ ॥ यतींची परीक्षा घ्या हो अनुभव । सयुक्तिक विचार करा रे वैष्णव । आपण कोणत्याही वेदांतील अपूर्व । वेद मंत्र ऋचा अर्थासह ॥ २७ ॥ तैसेंच भागवतांतील श्लोक कठिण । भगवद्गीतेंतील सार्थ पठण । प्रत्येकानें मानसीं अर्ध प्रमाण धरून । अर्धें यतींस पुसावें ॥ २८ ॥ त्यांनीं अर्धमंत्र-श्लोकाचें उत्तर । यथार्थ दिलें असतां जाणावें ईश्वरावतार । मग त्यांचें तीर्थप्रसाद निर्दोष हितकर । कां न घ्यावें आम्हीं ब्राह्मणांनीं ॥ २९ ॥ ऐशी योग्य पोक्त युक्ति कुशल । रामाचार्यादि वैष्णवांस वाटली अनुकूल । दुसरे दिवशीं होतांचि प्रातःकाल । एल्लम्माचे स्थानांत पातले ॥ १३० ॥ समर्थ जागृत होण्याचे

कैदी शेतांतून निघून । सहज आले त्या स्थलीं आपले आपण । दत्तात्रेय-स्वामींचें चरणदर्शन । करावया उभे ठेले ॥ ५८ ॥ सर्वांसि वाटला अद्भुत चमत्कार । म्हणती भक्तवत्सल हे प्रत्यक्ष परमेश्वर । येऊन तत्काल केलें संकट दूर । लीला अपार यांची असे ॥ ५९ ॥ मारणारा होऊनि शरणागत । दत्तात्रेयस्वामिपदीं बहु विनवित । तेव्हां त्याचा हात झाला पूर्ववत् । स्वामिराज भक्तासि वदती तदा ॥ १६० ॥ मदारा त्वां स्वस्थ करूनि मन । निर्भय असावें भक्ति भजन करून । तुझा योगक्षेम चालवितों मी जाण । कल्याण-विजयप्रद सर्वदा ॥ ६१ ॥ अहो जैसें दुष्ट कीचकाचे हातून । द्रौपदीस सोडविलें श्रीकृष्णें येऊन । तैसेंचि धांवूनि दत्तात्रेय भगवान् । तारिती भक्तजनांसि ॥ ६२ ॥ असो अधिकारी आणि इतर । श्रीगुरुलीला वर्णिती निरंतर । जेणें अनेक संकटें बंधनें दूर । होतीं तात्काल निःसंशयें ॥ ६३ ॥; अक्कलकोटाहून एकेकालीं । श्रीमद्दत्तात्रेय-स्वामिराज माउली । भृत्यजनांसह एळमिली-ग्रामीं गेली । तेथें राहूनि परत येतांना ॥ ६४ ॥ मार्गीं हद्री-ग्राम म्हणून । तो अर्धा कोश राहिला तेथून । तों अकस्मात् पर्जन्य येऊन । धांदल उडाली पुष्कळ ॥ ६५ ॥ तेव्हां दत्तात्रेयस्वामी मेण्यांतून । उतरूनि पायीं करूं लागले गमन । परंतु अर्धकोशपर्यंत पर्जन्य । फारचि वर्षल्या कारणानें ॥ ६६ ॥ मार्गांत गुडघ्यावरती जल । वेगें वाहूं लागलें पुष्कळ । सेवेकरी आदिक सर्व मंडळ । भिजून चिंब जाहलें ॥ ६७ ॥ एके दरग्यांत घाईं घाईं सगळे । थराथरां कांपत जाऊनि बैसले । आणि दत्तात्रेय स्वामी स्थित झाले । दर्ग्यासमीप धर्मशाळेंत ॥ ६८ ॥ तें खेडेंगांव असल्यामुळें । खाण्यापिण्यास कांहीं न मिळालें । पर्जन्य एकसारखा वेगबळें । वर्षत होता म्हणूनियां ॥ ६९ ॥ दत्तात्रेयासि प्रार्थिती सकल । पर्जन्यामुळें कोरडें न राहिलें स्थळ । प्राप्त झाला अति क्लेशकाल । यास्तव कृपा करावी त्वरें ॥ १७० ॥ तेव्हां करुणाकर जगज्जीवन म्हणती । पर्जन्यासि सांगा त्वरित गतीं । आमची जागा सोडून वर्षावें निश्चितीं । तैसेंचि जन सांगती पर्जन्यासि

॥ ७१ ॥ पर्जन्यानें आज्ञा मानिली तात्काल । सोडून तेवढें समर्थ स्थळ। वर्षूं लागला मेघ पुष्कळ। तेव्हां सर्वांसि महदाश्चर्य
वाटलें ॥ ७२ ॥; तैसेंचि एका भाद्रपद मासांत। मेहेंदरगीहून भर पर्जन्यांत। उंबरसगीस पातले दत्तावधूत। सेवकजनांसहित
ते ॥ ७३ ॥ त्याकालीं बोरीभद्र-नदीस पूर । येऊन पाणी भरलें अपार । जिकडे तिकडे भरलें नीर । आतां कैसें
जावें परतीरा ॥ ७४ ॥ तेव्हां नरसिंहराव भोंसले । आणि चोळाप्पानें श्रीदत्तात्रेय-गुरूंस प्रार्थिलें । मग सद्गुरु
वदती चला रे सगळे। निर्भयपणें त्वरित तुम्ही ॥ ७५ ॥ ऐसे सांगूनि प्रभु बैसले मेण्यांत । आठ मनुष्यांनीं मेणा
उचलिला त्वरित। सर्व मुखें गर्जती ‘श्रीगुरुदेवदत्त’-। स्वामिसमर्थांचा जयजयकार ॥ ७६ ॥ नदी-प्रवाहांत पाय ठेवितां ।
गुडघ्याइतुकें पाणी जाहलें तत्त्वतां। महा जड मेणा परी आंत परमात्मा बसतां। पुष्पवत् हलका जाहला ॥ ७७ ॥
मेणा-वाहकांचे मांड्यांसि जल लागलें। इतर ते वक्षस्थलपर्यंत भिजले। सर्वत्र निर्विघ्नपणें बोरी नदी उतरले । अलीकडे
पातले शीघ्र गतीं ॥ ७८ ॥ सर्वांसि वाटलें अति आश्चर्य । परमेश्वर साक्षात् धुरंधर जगत्कार्य । दत्तात्रेयस्वामी
विश्वगुरुवर्य । अनंतकोटि ब्रह्मांडनायक ॥ ७९ ॥ चर्मचक्षूंनीं दिसे यतिवेषधारी । नर-रूपा धारण करूनि विश्व
तारी। ज्ञानचक्षूंनीं पूर्णब्रह्म चराचरीं। सत्ता-स्फूर्तित्वें व्यापक असे ॥ १८० ॥ अगम्य अतर्क्य ज्यांची लीला । थारा
नुरेचि संशय-कल्पनेला । सर्वज्ञ सर्वसाक्षी सगुण अवताराला । धरिती जगदुद्धरणार्थ स्वलीलें ॥ ८१ ॥
स्वस्ति श्रीगुरुलीलामृत। श्रुतिस्मृतिपुराणार्थमथित। ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । अष्टत्रिंशतितमाध्याय गोड हा ॥ १८२ ॥
स्वस्ति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे अष्टत्रिंशतितमोऽध्यायः समाप्तः ॥ ३८ ॥ श्रीगुरुदेवदत्त—स्वामीसमर्थ ॥ ॥

# ॥ अध्याय एकूणचाळिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्तात्रेय-गुरवे नमः ॥ ॥ गुरु सांगती शिष्यासि ज्ञानसम्यक् । जैसें श्रोत्र-चक्षु-रसन घ्राण-त्वक् । या पंचज्ञानेंद्रियेंकरून देख । उत्पन्न झालेल्या ज्या अंतःकरणवृत्ति ॥ १ ॥ त्या वृत्तींमाजीं प्रतिबिंबरूपें आत्मचैतन्यशक्ति । व्यापक आहे तैशाच रीतीं । वाकादिक कर्मेंद्रियव्यापारीं ती । निश्चयें व्यापक आहे ॥ २ ॥ ऐशी आत्म्याची चैतन्यशक्ति जाण । सुषुप्ति-अवस्थेंत असे विद्यमान् । म्हणूनि सुषुप्ति-अवस्थेंत आत्मा स्वप्रकाशघन । घटासारिखा अज्ञानी जड असद्रूप होत नसे ॥ ३ ॥ आणि हा आत्मा जागृतावस्थेंत । श्रोत्रेंद्रियेंकरून 'शब्दासि' जाणत । त्वगिंद्रियें करून 'स्पर्शाप्रत' । आणि चक्षूंनीं 'रूपासि' जाणत असे ॥ ४ ॥ रसनेंद्रियें जाणे 'रसासि' । घ्राणेंद्रियें जाणतसे 'गंधासि' । आणि वागिंद्रियें उच्चारी शब्दासि । आत्मा स्वप्रकाश-स्वरूप ॥ ५ ॥ हस्तेंद्रियें करी पदार्थ-ग्रहण । पादेंद्रियें करितसे गमनागमन । उपस्थेंद्रियें आनंदासि भोगून । मलादिक परित्याग गुदेंद्रियें करितसे ॥ ६ ॥ आणि संकल्प-विकल्प मनयोगें करी । बुद्धीनें निश्चय करी निर्धारीं । चित्तयोगें स्मरण आत्मा करी । अभिमान धरी अहंकारें ॥ ७ ॥ इत्यादि अनेक प्रकारचे व्यापारांसि । हा जीवात्मा करी जागृदवस्थेसी । आणि प्राप्त होऊन सुषुप्तीसि । कोणतेही व्यापार करित नसे ॥ ८ ॥ याविषयीं आहे हें कारण । सुषुप्तींत श्रोत्रादिक इंद्रियें तथा पंचविषय जाण । इत्यादिक द्वैत प्रपंच संपूर्ण । त्या प्रपंचाचा अभाव होतो ॥ ९ ॥ या कारणानें सुषुप्ति-अवस्थेंत । कोणतेही व्यापार होत नसत । आणि आत्म्याचें चैतन्यरूप ज्ञान सुषुप्तींत । नाहीं म्हणून व्यापार होत नसे ॥ १० ॥ या प्रकारच्या अर्थाविषयीं । वेद-श्रुतीचें तात्पर्य

* * *

नाहीं। जैसा काष्ठरूप उपाधियुक्त अग्नि पाहीं। अन्नादिक पक्व करितसे ॥ ११ ॥ तोचि अग्नि काष्ठोपाधिरहित। आणि भस्मानें झालेला आवृत। अन्न परिपक्व नसे करित। दाह-प्रकाशादिक कार्यें ॥ १२ ॥ तैसा जागृदवस्थेंत। इंद्रियादिक उपाधीनें झालेला युक्त। हा जीवात्मा उपाधियुक्त करित। अनेक प्रकारचे व्यापारांसि ॥ १३ ॥ आणि सुषुप्तींत श्रोत्रादिक इंद्रियसमुदाय। तथा शब्द-स्पर्श-रूप-रस-गंधादि पंच विषय। या सर्वांचा अज्ञान-कारणामाजीं लय। होतसे जाण निश्चयें ॥ १४ ॥ यास्तव सुषुप्तींत आत्मा विद्यमान् असून। कोणतेही व्यापार न करी जाण। जैसा प्रकाश अग्नीच्या स्वरूपभूत असून। काष्ठ जळल्यानें नासेना ॥ १५ ॥ तैसा सुषुप्तींत विषयेंद्रिय-। रूप उपाधीचा जरी झाला लय। तथापि आत्म्याचें स्वरूपभूत ज्ञान अक्षय। नाश न होय त्या ज्ञानाचा ॥ १६ ॥ कां तरी लोकांत जेवढे पदार्थ। त्या पदार्थांचें जें स्वरूप असत। तें स्वरूप कधींही नाश न पावत। पदार्थ विद्यमान् असे तोंपर्यंत ॥ १७ ॥ त्या पदार्थांचा नाश झाल्यावर। पदार्थांचें स्वरूपही होत अगोचर। जैसें अग्नीचें स्वरूप उष्णता साचार। तथा प्रकाशरूपताही असत ॥ १८ ॥ त्या स्वरूपाचा अग्नीच्या नाशावांचून। नाश होत नसे कोण्याही उपायेंकरून। कां तरी अग्नीचा नाश झाल्या जाण। तत्स्वरूपाचा नाश होतसे ॥ १९ ॥ आणि सुषुप्ति-अवस्थेमाजीं स्थित। द्रष्टा आत्मा असे अविनाशी शाश्वत। म्हणूनि त्या द्रष्टात्म्याचा न संभवत। नाश कोणत्याही देशकालीं ॥ २० ॥ द्रष्टा आत्म्याचा कदापि नाहीं नाश। यास्तव आत्मस्वरूपभूत जी स्वप्रकाश-। ज्ञानरूप दृष्टि आहे तिचाही विनाश। होत नाहीं सर्वथा ॥ २१ ॥ ‘सत्यज्ञानमनंतं ब्रह्म’ ऐसें वेद बोले। ब्रह्मरूप आत्म्याचें सत्यरूप असे चांगलें। तथा ज्ञानरूप अनंतरूप व्यापिलें। निराकार निर्विकार ऐसें ॥ २२ ॥ आत्म्याहूनि सर्व भिन्न पदार्थ। ते वंध्यापुत्रासारिखे असती असत्य अत्यंत। त्या असत्य वंध्यापुत्राची सिद्धि न होत। कोणत्याही प्रमाणेंकरूनि ॥ २३ ॥ तैसें आत्म्याचा नाश हें

मिथ्या वचन। आणि त्या नाशाचें जें कारण। हीं दोन्ही कोणत्याही प्रमाणेंकरून। सिद्ध होऊं न शकत ॥ २४ ॥ कां तरी प्रमेयरूप वस्तूची जी सत्ता। त्या सत्ते-स्वाधीन असे प्राणसत्ता तत्त्वतां। प्रमेयरूप वस्तूची झालिया असत्यता। तियेचें प्रमाण असत्य होतसे ॥ २५ ॥ जैसा वंध्यापुत्र कधींही न सत्य। मग त्याचें प्रमाणही उघड असत्य। आत्मा अविनाशी अज शाश्वत नित्य। पुराणपुरुष सर्व विकाररहित असे ॥ २६ ॥ ऐसा परमपुरुष परमहंस। परमात्मा दत्तात्रेय जगन्निवास। यतिवेष धरून जगदुद्धरणास। सामर्थ्यातिशयत्वें करितसे ॥ २७ ॥; श्रोते परिसा तो तारक कथा-प्रसंग। जेणें संकटें-रोग-दुःखादि होती भंग। गुरुभक्तीनें सुख निःसंग। असंगपुरुष-साक्षात्कार प्राप्त होय ॥ २८ ॥; एक पुणें शहरांतील राहणार। नंदाराम सुंदरजी गवंडी सावकार। त्यांस दोन तीन संवत्सर। मूत्रकृच्छ्र व्याधीनें जाचिलें ॥ २९ ॥ मोठे मोठे शस्त्रवैद्य नामांकित। त्यांचे औषधोपचार केले बहुत। परंतु गुण वाटला नाहीं किंचित्। थकले उपाय करूनियां ॥ ३० ॥ पुढें अक्कलकोटनिवासी। वेदमूर्ति प्रसिद्ध बाळकृष्ण ग्रामजोशी। बडोद्याहून परत येतांना पुण्यासि। विश्रांतीकारणें उतरले ॥ ३१ ॥ ते नंदराम गवंडी यांसि। सहज गेले भेटण्यासि। त्यांहीं बाळकृष्ण ग्रामजोशी-। बुवांचें आदरातिथ्य केलें बहु ॥ ३२ ॥ त्या कालीं नंदरामजींचे सदनांत। वैद्य ज्योतिषी पंचाक्षरी साधु संत। बैसले होते चिकित्सा करीत। तयांचे व्याधीची ॥ ३३ ॥ मग बाळकृष्ण ग्रामजोशीबुवांनीं। धनिकांच्या पत्रिकेंत सूक्ष्मपणें निरखूनि। जन्मलग्न-ग्रह-गणित-दशा पाहूनि। विचार योग्य निवेदिला ॥ ३४ ॥ कीं इतर सर्व उपाय परित्यागून। वास्तविक कांहीं वैदिक करावें साधन। महात्मा अवतारिक सत्पुरुषांचें दर्शन। झालिया अवश्य गुण होय ॥ ३५ ॥ मग नंदरामजी जोशीबुवास पुसती। ऐशा घोर कलियुगीं संप्रति। महात्मा अवतारिक पुरुष वसती। कोण कोठें सांगा जी ॥ ३६ ॥ म्हणजे मी तेथें अगत्य जाईन। परिसूनि ऐसें बाळकृष्ण जोशी वदती वचन। आमचे

अक्कलकोटांत सांप्रत महान् । अवतारिक पुरुष वसतात ॥ ३७॥ नित्य सहस्रावधि लोक तेथें । दर्शनासि येती जाती भावार्थें ।
अनेक जनांचे मनोरथ जेथें । पूर्ण होती सदोदित ॥ ३८ ॥ लोकांसि सत्यानुभव येई । आम्हींही घेतली प्रतीत पाहीं ।
येथें संशय-कल्पनेचें काम नाहीं । प्रत्यक्ष चक्षूंनीं सत्य पहावें ॥ ३९ ॥ नंतर नंदरामजी करिती विनंति । त्यांचा
अंगारा मम शरीराप्रति । लावा कृपा करून तुमचे हस्तीं । भाक उतरूनि ठेवितों ॥ ४० ॥ गुण झाल्यास आपल्या
वचनानुसार । सर्वोपरी वर्तेन हो खरोखर । ऐसें म्हणतांचि जोशांनीं अंगारा सत्वर । दत्तात्रेय-स्वामींचा लाविला ॥ ४१ ॥
जोशी म्हणाले आराम झाल्यावरी । दर्शनासि अवश्य जाऊनि प्रज्ञापुरीं । दानधर्म-ब्राह्मण-भोजनादिक झडकरी । करावें
आपण यथास्थित ॥ ४२ ॥ मग त्याच रात्रीं बरें वाटलें । कळा तिडका उष्णतादि न्यून झालें । सात दिवसांत उठूं
फिरूं लागले । निद्रा चांगली येऊं लागली ॥ ४३ ॥ पुढें अक्कलकोटीं गमनासाठीं । धनिकास हुरहुर लागली मोठी । तेव्हां
दर्शनासि जावें अक्कलकोटीं । म्हणूनि मुंबईहून पुण्यास आले ॥ ४४ ॥ कृष्णबापू उर्फ ठाकुरदास । बुवा पातले सावकारासि
भेटण्यास । त्याकालीं नंदरामजींनीं निजवृत्तास । कळविलें बुवांस साद्यंत ॥ ४५ ॥ मग ठाकुरदासबुवा समागमें । सोडूनि सकल
व्यापार कामें । सावकार गेले अक्कलकोटीं प्रेमें । बाळकृष्ण जोशांचे गृहीं उतरले ॥ ४६ ॥ श्रीगुरुदेवदत्त-स्वामिराज-दर्शन ।
केलें नंदरामजीं होऊनि शरण । दुसरे दिवशीं ब्राह्मण-भोजन । सेवेकरी जनांसहित घातलें ॥ ४७ ॥ एकेक रुपया दिधली
दक्षिणा । संतुष्ट केलें सेवेकरी ब्राह्मणां । सेवेकऱ्यांसि वस्त्रें नाना । अर्पूनि केलें संतोषित ॥ ४८ ॥ नंदरामजींचा सोमवार-
व्रत । आणि शिव-दर्शनाचा नियम, बहुत । दिवसांचा आला दृढ चालत । म्हणूनि शिवमंदिर विचारिती ॥ ४९ ॥
नाहींपेक्षां देवाधिदेव दत्तात्रेय । स्वामीसमर्थांचें दर्शन करूं अवश्य । त्या कालीं श्रीगुरु समर्थ स्वामिराय । मल्लिकार्जुनाचे
ओव्यावर स्थित होते ॥ ५० ॥ मग भाऊ मनसाराम सावकार । बाळकृष्ण ग्रामजोशी बुवासह सत्वर । उभे राहूनि

द्वारांत समोर । मल्लिकार्जुन शिवाचें दर्शन करिती ॥ ५१ ॥ करद्वय जोडूनि नमन दंडवत । प्रथम स्वामी समर्थांस
करिती हर्षभरित । मग दत्तात्रेय वदती आम्हीं शंकर नाहींत । जा त्या दगडाचे देवाकडे ॥ ५२ ॥ मल्लिकार्जुनाचे
जाऊनि समीप । इतर मंडळीसह धनिक सुखरूप । प्रत्यक्ष चक्षूंनीं देखतां शिवलिंगरूप । कांहींच कोणासि दिसलें
नाहीं ॥ ५३ ॥ सावकार म्हणे येथें देवालय असून । शिवलिंग न झालें काय स्थापन । किंवा मी शुद्ध पात्र
नाहीं म्हणून । मजला शिवदर्शन होत नसे ॥ ५४ ॥ पुन्हां महादेवाकडे अवलोकन केलें । तों लिंगस्थानीं यतीश्वर
स्थित दिसले । आणि बाहेर ओट्यावरी मंचकीं बैसले । दत्तात्रेय स्वामीमहाराज ॥ ५५ ॥ मंदिरांत शिवलिंग स्थानीं
आणि बाहेर । दोन्ही स्थळीं देखूनि महा योगीश्वर । दचकला मानसीं सावकार । अहंकार भेदबुद्धि टाकूनि ॥ ५६ ॥
धनिक स्व-श्रीमुखांत आपल्या हस्तें । ताडण करूनि घेई चिमटे कर्णातें । वारंवार घालूनि लोटांगणातें । शरणागत
जाहला ॥ ५७ ॥ प्रार्थितसे आपणचि शिवशंकर । अंतर्बाह्य व्यापक परमेश्वर । सर्व लोकांसमक्ष साक्षात्कार । घडला
मजलागीं देवराया ॥ ५८ ॥ आपलें सामर्थ्यातिशय अलौकिक । जगदुद्धारार्थ अमानुषिक । अगम्य लीला दावूनि अनेक ।
विश्वावरी कृपा करितां ॥ ५९ ॥ आम्ही माया-प्रपंच-मोहांत गुंतलों । परमात्मा-स्वरूपासि विसरलों । जन्ममरण
प्रवाहांत सांपडलों । मुकलों मोक्षसुखासि ॥ ६० ॥ प्रपंच द्वैत दृष्टीची झाली सीमा । परी आतां अपराधाची व्हावी
क्षमा । दत्तात्रेय स्वामी पुराण पुरुषोत्तमा । वर्णिती महिमा श्रुतिस्मृतिपुराणें ॥ ६१ ॥ मग पुन्हां गुरु-पूजन केलें ।
नैवेद्य-फल-तांबूल-दक्षिणादि अर्पिलें । दत्तात्रेय-आज्ञा प्रसाद घेऊनि निघाले । पुण्यपत्तनीं जावया ॥ ६२ ॥ कडप गांव
स्टेशनापर्यंत । दीनदुर्बलांसि वांटिले पैसे बहुत । मुष्टीभर भरूनि केलें संतोषित । उदार दयावंत सावकारें ॥ ६३ ॥
आरोग्य प्रसन्नवदन मानस । नंदरामजी जाऊनि पोंहोंचले पुण्यास । देव दत्तात्रेय-भगवच्चरणांस । पुजूनि भजती निरंतर

* * *

॥ ६४ ॥ पंढरीस पुंडरिकाचें मंदिर। आणि पुण्यांत तुळशीबागेंत सुंदर। सभामंडप बांधविला इतर। स्थानींही केले अनेक परोपकार ॥ ६५ ॥ त्यांचे द्वारीं बैरागी साधु संत। अंध पंगु दुर्बल उभे तिष्ठती सदोदित। त्या सर्वांसि अन्नवस्त्रादिक अर्पित। होते नंदरामजी सावकार ॥ ६६ ॥ यांनीं मूत्रकृच्छ्र-व्याधिनिरसनार्थ। अति उपाय केले खर्चूनि अर्थ। परंतु गुण नसून धनादिक व्यर्थ। गेलें सार्थक न जाहलें ॥ ६७ ॥ आणि दत्तात्रेय-स्वामिनामाचा। सहज अंगारा लावितां फुकाचा। गुणारोग्य होऊनि मूत्रकृच्छ्र व्याधि साचा। असह्य असतांही नष्ट झाला ॥ ६८ ॥ तथा अंतर्बाह्य सदाशिव दर्शन। प्रत्यक्ष नंदरामजीस साक्षात्कार झाल्यावरून। समूळ गेले संशय अभिमान। परमात्मा श्रीगुरुकृपेनें ॥ ६९ ॥ ऐसा श्रीगुरुदेवदत्तस्वामी कृपाल। न देखतां उच्च नीच भेद सकल। परोपकार अनुग्रह चिरकाल। करिती प्राणिमात्रावरी ॥ ७० ॥ ज्यांची लीला नकळे अपार। ज्यांच्या पादपंकज-स्मरणें क्लेश दुर्धर। संकटें रोग पिशाच्च-संबंध अनिवार। नष्ट होती निश्चयात्मक ॥ ७१॥; असो, राहणारे पुणें शहरचे वस्तीस। आप्पासाहेब हसबनीस। त्यांस आणि त्यांचे कुटुंबास। पिशाच्च-संबंध बलाढ्य लागला ॥ ७२ ॥ आप्पासाहेबांचे अंगांत। पिशाच्च-संबंध जेव्हां प्रवेशत। तेव्हां देहभान शुद्धि न उरत। कष्टें व्याकुल होती ते ॥ ७३ ॥ क्षौरकर्म मुळींच होत नव्हतें। चार चार दिवसांत स्नान भोजन नसे तें। अंगांत आलें असतां शास्त्रवार्तातें। मोठमोठ्या करिती आप्पा ॥ ७४ ॥ उभयतां स्त्रीपुरुषें भलीं। पिशाच्च-व्याधीनें गांजलीं। पुष्कळ उपाय अनुष्ठानें करविलीं। महान् पंचाक्षरी आणूनि ॥ ७५ ॥ तथापि व्याधि न्यून वाटेना। मग स्त्री पुरुष विचार आणिती मना। कीं व्याधि-निरसनार्थ गाणगाभुवना। जाऊं भीमा-अमरजा-संगमीं ॥ ७६ ॥ श्रीमद्दत्तात्रेय-नृसिंह-सेवन। केलिया होईल व्याधि-निरसन। ऐशा दृढतर विचारें पुण्याहून। प्रथम अक्कलकोटीं पातले ॥ ७७ ॥ करजाळकरांचे वाड्यांत। उतरले हसबनीस कुटुंबसहित। त्रैमूर्ति-अवतार श्रीभगवंत।

तत्पाददर्शन करूनियां ॥ ७८ ॥ म्हणती परमेश्वरा जगदीशा । महासंबंध-व्याधि दुर्दशा । नष्ट व्हावयाची धरूनि आशा । जातों गाणगापुरासि ॥ ७९ ॥ प्रभुरायाची आज्ञा गमनास । असल्यास जाऊं गाणगापुरास । स्वामीसमर्थ वदती कशास । जातां राखरांगोळी होईल ॥ ८० ॥ परिसूनि आप्पा आणि सरस्वतीबाई । विचारांत पडलीं दोघेंही । मग निश्चयें योगीश्वर-पायीं । निवासार्थ राहिले सप्रेमें ॥ ८१ ॥ तीं स्त्री-पुरुषें उभयतां सर्वदा । योगिराज श्रीस्वामिराज चरणारविंदां । नमूनि चोळाप्पाचे स्थानीं तदा । प्रदक्षिणा घालिती औदुंबरास ॥ ८२ ॥ अन्नसत्रासारिखें सेवेकऱ्यांसि । तेथें नित्य अर्पिती मधुकरी भिक्षेसि । आपणही मधुकरी मागून निर्वाहासि । करिती श्रीमंत असूनियां ॥ ८३ ॥ दत्त-गुरूच्या पादुकांवरती । संतत रुद्राभिषेक धार धरविती । प्रत्येक गुरुवारीं ब्राह्मणद्वारें अभिसिंचिती । लघुरुद्र-भोजन दक्षिणा देऊनि ॥ ८४ ॥ गुरुचरित्र-ग्रंथाचें साङ्ग पठण । नित्य करविती दत्तंभटाकडून । नित्य ब्राह्मणांसि घालिती भोजन । संतुष्टविती सकलांसि ॥ ८५ ॥ सातार-प्रांतीं कृष्णा तीरीं । 'बहे' गांवचा राहणार वैदिक सदाचारी । दत्तंभट जोशी अनुष्ठान करी । पारायण गुरुचरित्राचें ॥ ८६ ॥ ऐसा पांच सहा संवत्सर नियम । सर्व प्रकारें चालला अनुष्ठान-धर्म-क्रम । तेणें पिशाच्च व्याधीचा उपशम । जाहला मंद गतीनें ॥ ८७ ॥ दिवसां मधुकरी मागून उदरभरण । करिती सायंकाळीं मिळाल्यास प्रसाद ग्रहण । तेणें पिशाच्च-व्याधीचें विनाशन । गुरुकृपें जाहलें उभयतांचें ॥ ८८ ॥ परंतु आप्पा विद्वान् चतुर । असल्यानें करूं लागले वकिली व्यवहार । अर्थात् पुन्हा आंगांत संचार । होऊं लागला पिशाच्चाचा ॥ ८९ ॥ नंतर श्रीगुरुदेव-दत्तचरणीं । हसबनीस करूं लागले विनवणी । कीं पुनरपि पिशाच्च जागृत होऊनि । येऊं लागलें अंगांत ॥ ९० ॥ तंव बोलती आदिनारायण । कशास करितां मध्यस्थपण । 'करावें तैसें भोगावें' आपण । ठेवूं नये शब्द कोणावरी ॥ ९१ ॥ खूण पटतांचि वकिलीचे कामांतील । मिळालेलें स्वल्प धन तत्काल । अंतःकरण करूनि

विमल । अर्पिलें समर्थ-चरणकमलीं ॥ ९२ ॥ नंतर हसबनिसाची जननी । नम्रत्वें विनवी चक्रपाणी । पुत्रसंतान व्हावें सरस्वतीलागूनि । जहागीर वाया जातसे ॥ ९३ ॥ तेव्हां देवाधिदेव वदती प्रांजल । या जन्मीं नाहीं परी पुढील । जन्मीं कन्या प्राप्त होईल । मग बाईनें पदर पसरिला ॥ ९४ ॥ ती कन्या तरी या जन्मांत । प्राप्त झाली असतां होऊं संतोषित । नेत्रीं पाहूनि होऊं शांत । 'भुकेलेलें भूत कोडबुळ्यावरी राजी' ॥ ९५ ॥ मग सुराध्यक्ष योगीश्वर कळवळले । बरें तर या जन्मीं घ्या म्हणाले । नंतर एक वर्षांत कन्यारत्न प्रसवलें । सरस्वतीच्या कुक्षेंतून ॥ ९६ ॥ तेव्हां आप्पा हसबनिसांनीं । स्वामी समर्थासाठीं एक गृह विकत घेऊनि । एक वर्षपर्यंत पुरेल त्या भुवनीं । ऐसे धान्यादिक पदार्थ भरले ॥ ९७ ॥ सद्गुरु कृपानिधीसि केले अर्पण । पुढें कांहीं दिवसांनीं प्रकृति बिघडून । दत्तात्रेय-चरणांसंनिध देहविसर्जन । केलें आप्पा हसबनिसांनीं ॥ ९८ ॥ दत्तात्रेयस्वामी परब्रह्म परमेश्वर । त्या ब्रह्मस्वरूपांत आप्पा निमग्न झाले निरंतर । पुण्यवान् स्वधर्मकर्मतत्पर । उदार शूर विद्वान् ते ॥ ९९ ॥ पूर्व सुकृत ज्याचें प्रबल । श्रीमंत असूनि गर्व नसे तिळ देखील । सर्वांसि सत्य प्रिय भाषण मंजूळ । करून संतुष्टवित होते ॥ १०० ॥ योगाधीश्वर-पदीं शुद्ध प्रेम अवीट । जेणें पिशाच्च-व्याधि होऊनि नष्ट । श्रीगुरुचरणकमलीं गोड झाला शेवट । अंतकाल सुफलित ज्यांचा ॥ १ ॥ मग सर्व मंडळी पुण्यास गेली । गुरुभक्ति-स्वधर्मयुक्त वर्तती सर्व कालीं । प्रति संवत्सरीं सरस्वती माउली । दर्शनार्थ येत प्रज्ञापुरीं ॥ २ ॥; दत्तंभटजी वैराग्यसंपन्न । निर्वाह करिती मधुकरी भिक्षा मागून । तैसेचि गणपतराव निरभिमान । कऱ्हाडे ब्राह्मण कोंकणांतील ॥ ३ ॥ संगमेश्वरचे राहणार । 'मुळे' उपनामक परम पवित्र । कुलवान् वेदविहित आचार । अल्प वयांत असतांही ॥ ४ ॥ अक्कलकोटासि येऊनि राहिले । चोळाप्पाचे गृहीं दोन तीन वर्षें वसले । पुढें रामाचार्य जमखिंडीकर चांगले । त्यांचे सदनीं निवसती ॥ ५ ॥

एक तपश्चर्या द्वादश संवत्सर । स्वामिसमर्थासि प्रिय जे पदार्थ मधुर रुचिर । खर्पूस उत्तम मध्यम नाना प्रकारचे साचार । स्वहस्तें करूनि अर्पिले ज्यांनीं ॥ ६ ॥ पैठणचे विदुर शंकरराव प्रतिमासीं । दश रौप्य मुद्रिका यतींद्रांच्या नैवेद्यासि । अर्पित होते प्रेमभावेंसीं । पंचदशसंवत्सरपर्यंत ॥ ७ ॥ गणपतराव मुळे शांत सात्त्विक । निःस्पृह निर्लोभ शुद्ध पारमार्थिक । व्यवहारकुशल चतुर सम्यक् । गुरु समर्थाचे प्रिय दास होते ॥ ८ ॥ स्वामिसमर्थांस कोणते समयीं । ऋतुपरत्वें कोणते पदार्थ प्रिय पाहीं । ते ते उत्तम प्रकारें सिद्ध करूनि लवलाहीं । भक्तिपुरःसर अर्पितसे ॥ ९ ॥ नाना प्रकारचे नित्य नूतन । पदार्थ करी मधुर रुचिकर जाण । समर्थांसि इतरांच्या नैवेद्याहून । गणेश-नैवेद्य शतगुणी आवडे ॥ ११० ॥; मी गुरुदास ब्रह्मनिष्ठ वामन । शके सत्राशें पंचाण्णव-शहाण्णवांत जाण । श्रीद्वारका नारायण सरोवरादि करून । प्रभास क्षेत्र सुदामापुरी ॥ ११ ॥ गोरक्षमढी मूळ माधव- । पुरींत नांदे त्रिविक्रम श्रीकृष्णदेव । तुळशी शाम स्थान अपूर्व । उष्णोदकांचीं कुंडें झरे असती ॥ १२ ॥ कोडीनार समुद्रतीरीं । स्नान-देवदर्शन-माहात्म्य भारी । भीम-कुंडादि श्रीगिरिनारी । अनादि स्थान ब्रह्मा-विष्णु-महेश्वराचें असे ॥ १३ ॥ जन म्हणती जुनागड गिरि । जेथें नांदतसे दत्तात्रेय गुरु गिरिनारी । अनंतकोटि-ब्रह्मांडनायक ध्वजाधारी । भरंवसा भारी जगासि ज्याचा ॥ १४ ॥ या गिरनार-पर्वतीं नूतन । अन्य धर्माच्या देवताही बैसल्या येऊन । नानापंथी मताभिमानी होऊन । म्हणती स्थान आमचें हें ॥ १५ ॥ असो ब्रह्मा-विष्णु-शिवाचें प्रिय । हें अनादि स्थान सत्य प्रमाण होय । हें जाणती सर्व लोक निःसंशय । शाश्वत पुराण देवतामय स्थान हें ॥ १६ ॥ जैसे सांप्रतचे सुधारक विद्वान् । म्हणती वेद पुरुषकृत नवीन । तें जैसें साभिमान मिथ्या वचन । सुज्ञ न्यायी जाणती ॥ १७ ॥ अनादि अपौरुषेय वेद स्वतःप्रमाण । हें सर्वपरी सिद्धचि पूर्वींपासून । सर्वत्र ग्रंथांत प्रसिद्ध झालेलें असून । या ग्रंथींही

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

संक्षेपें वर्णिलें ॥ १८ ॥ मूळच्या हिंदुस्थानच्या हिंदुधर्मी जनांसि । वेदाविषयीं संशयचि नाहीं स्वप्नासी । परदेशीय परधर्मीय
शहाणे वेदांसि । अनादि अपौरुषेय जाणतात ॥ १९ ॥ असो डाकोरक्षेत्र गोमती तीर्थ श्रीकृष्णस्थान । यापरी
श्रीद्वारका यात्रा करून । बडोद्यासि आषाढ मासांत येऊन । भाद्रपदांत अक्कलकोटास गेलों ॥ १२० ॥ मोरोपंत सेवेकऱ्याकडे
उतरलों । जाऊनि दत्तात्रेयचरणीं लागलों । प्रत्येक क्षेत्रींचे पदार्थ अर्पूनि धालों । तों बोलती जगदीश ॥ २१ ॥
सर्व तीर्थ क्षेत्रें केल्याचें सांगतां । श्वानांसि भाकरी तुकडे यथेच्छ घालितां । तरी आतां सेवेकरी सकल भक्तां । घालावें
अन्न भिक्षेसि ॥ २२ ॥ विष्णुपंत ओंडकराचे सदनांत । तेव्हां योगिराज होते स्थित । अनायासें सर्वार्थसिद्धि योग
वर्तत । होता ते दिवशीं यथासांग ॥ २३ ॥ सर्व जातींच्या सेवेकऱ्यांस । भात चपात्या आमटी शाकादि अन्नास ।
यथेच्छ भिक्षा अर्पिली सर्वांस । समर्थांसि नैवेद्य समर्पिला ॥ २४ ॥ वाढावयासि गेलों घृत पोळी । तंव स्वामिराज
वदती माउली । विजयादशमीस आणावे प्रातःकाळीं । पूर्ण-पोळी घृतादि पदार्थ ॥ २५ ॥ त्याकाळीं भिक्षेकरी सर्व
जातींचे तीन शत । भिक्षान्न ग्रहण करूनि झाले तृप्त । इकडे सर्व आटोपल्यावरी दत्तावधूत । प्रसन्नवदन निघाले
॥ २६ ॥ भक्त भगवंता सुताराचे घरीं । जाऊनि स्थित झाले भक्तकैवारी । मीही फळादिक घेऊनि तेथें सत्वरी ।
जाऊनि सुंदराबाईस दिधलें ॥ २७ ॥ बाई म्हणे आज फार चांगलें केलें । समर्थ म्हणती यात्रेचें साङ्ग सार्थक झालें ।
तेव्हां मीं करद्वय जोडून प्रभूंस विनविलें । गाणगापुरासि जाऊनि येतों ॥ २८ ॥ मग वदती समर्थ सहज बोल ।
व्यर्थ पाण्यांत चिखलांत बुडाल । त्या वचनानुसार मरणकाल । चिखलांत पाण्यांत बुडूनि आला होता ॥ २९ ॥
दासासि दुःख संकटीं परोपरी । संरक्षण करिती प्रभु जनहितकारी । गुरुचरित्र-पारायणें केलीं गाणगापुरीं । देवपूजन
ब्राह्मण-भोजनादि ॥ १३० ॥ भीमातीरीं अमरजासंगमीं । दर्शन देऊनि बोधिती नृसिंहस्वामी । आतां होऊं नये व्यर्थ

श्रमी । ब्रह्मानंदांत निमग्न स्वस्थ असावें ॥ ३१ ॥ तेथूनि आश्विन शुद्धांत प्रज्ञापुरीं । येऊनि साष्टांग नमिले त्रिपुरारि । विजयादशमीच्या नैवेद्यार्थ पुरी सामग्री । दिधली गणपतरावासि ॥ ३२ ॥ गणपतराव रात्रीं उठून । स्नानादि कर्म आटोपून । उत्तम प्रकारें नैवेद्य सिद्ध करून । पात्रीं भरून पदार्थ तो ॥ ३३ ॥ शिवूबाई देशमुखीणीचे वाड्यांत । अवधूत गिरिनारी होते स्थित । मांगलिक स्नान आरती असतां होत । गणपतरावानें नैवेद्य नेऊनि समर्पिला ॥ ३४ ॥ तो नैवेद्य आवडीनें प्रथम । भोजन करूनि तृप्त होऊनि आत्माराम । मंचकावरी योगीजनविश्राम । परंधाम गुरु बैसले ॥ ३५ ॥ मी जागृत होतों मध्यरात्रीस । परंतु पुनरपि वश झालों निद्रेस । पुन्हा जागृत होतां उगवला दिवस । तेव्हां मनास खेद जाहला ॥ ३६ ॥ मग त्वरेनें शौच-मुखमार्जन करून । तांबूल-दक्षिणादिक घेऊन । शिवूबाईचे सदनीं जाऊन । जगज्जीवन वंदिले ॥ ३७ ॥ तदा समीप नव्हतें कोणी । तों विश्वंभर विश्वात्मा संज्ञेकरूनि । उदरावरी हस्त फिरवूनि । तृप्तीचे ढेंकर देत आहेत ॥ ३८ ॥ मला रागें भरती दत्तात्रेय । येथें झोंप घेण्यास आलां काय । तांबूल चूर्ण करूनि द्यावा निर्भय । नसावा संशय मानसीं ॥ ३९ ॥ मग तांबूल कुटूनि श्रीमुखांत । घातला मी मंदगतीनें हर्षभरित । रौप्यमुद्रिका एक त्वरित । त्रैलोक्यनाथासमीप ठेविली ॥ १४० ॥ प्रथम भोजन झाल्याचा विश्वास । पटला तयांचा जे पालनकर्ते विश्वास । ज्यांच्या सत्तें नियमित श्वासप्रश्वास । चालती हंस ( सोऽहं ) एकवीस हजार सहाशें ॥ ४१ ॥ मग नैवेद्य घेऊनि लोक । येऊं लागले दर्शनासि पुष्कळ राव रंक । तेव्हां मी घरीं येऊन स्नान-संध्यादिक । आटोपूनि गेलों पूजनासि ॥ ४२ ॥ दर्शनार्थ जाहली दाटी । आनंद मावेना पोटीं । दूर समीप ग्रामींचे दर्शनासाठीं । जन पातले पुष्कळ ॥ ४३ ॥ मग समर्थांचें तीर्थ-प्रसाद घेऊन । गणपतराव आदि सेवक आम्ही जाण । स्वस्थ चित्तें भोजन करून । समर्थांचे सेवेंत तत्पर झालों ॥ ४४ ॥ थाटानें शहाजी नृपाची स्वारी । गजारूढ निघाली

सैन्यासह कारभारी । शिबिकेंत बैसूनि योगिराज अवतारी । पूजारी-सेवकांसह निघाले ॥ ४५ ॥ अनेक मंगलवाद्यें वाजतीं । शहाजी नृप आणि बंबगार्डन साहेब स्थित गजावरती । सर्वांपुढें शिबिकेंत यतिपति । अनेक भृत्यजनांसहित चालले ॥ ४६ ॥ हीच मुख्य सुमुहूर्त विजयादशमी । अक्कलकोट पवित्र पुण्यभूमि । जेथें नांदती सर्वांतर्यामी । दत्तात्रेयस्वामी समर्थ ॥ ४७ ॥ शमीपूजन होऊन सुखकर । परतले सैन्यासह शहाजीनृपवर । मंगलवाद्यें वाजती सुस्वर । दीपप्रकाश चोहोंकडे पसरला ॥ ४८ ॥ सौभाग्यवती सुवासिनी नारी । नीरांजनादि दीप लावूनि पात्रीं । कुंकुममंडित अक्षतांसह घेऊनि करीं । आदरें ओंवाळिती नृपवर्या ॥ ४९ ॥ सकलजन नीरांजन आरती । दत्तात्रेय-स्वामींस ओंवाळिती । परस्परांसह यथायोग्य वांटिती । शमी-अश्मंतक-पत्ररूप सुवर्ण ॥ १५० ॥ जिकडे तिकडे आनंद वर्तला । लोक वंदूनि श्रीशहाजी-नृपाला । दत्तात्रेय-स्वामींच्या जयजयकाराला । करीत गेले स्वसदनीं ॥ ५१ ॥ येथें ह्या कथाभाग वर्णनाचें तात्पर्य । समर्थांसि गणपतीचा नैवेद्य विशेष प्रिय । जैसा गोपालांचा काला प्रिय होय । श्रीकृष्ण-भगवानांसि गोकुलांत ॥ ५२ ॥ शबरीचें उच्छिष्ट बदरीफल । प्रिय वानरहस्तींचें फल मूल जल । श्रीरामचंद्रासि आवडे सर्वकाल । तैसेंचि येथें जाणावें ॥ ५३ ॥ असो बाबा सबनीस संत । कैलासवासी झाल्यावरी थोडे कालांत । दत्तंभटजी जाऊनि श्रीकाशीक्षेत्रांत । संन्यास घेऊन वसती ॥ ५४ ॥ गणपतराव मुळे सेवेकरी । लोक म्हणती तेही वसती काशीक्षेत्रीं । निःस्पृह वैराग्ययुक्त ब्रह्मविचारी । निरुपाधि वर्तती ॥ ५५ ॥; असो मोगलाईंत धारासिंह नजिक । काजळे ग्रामीं राहणारे एक । मराठे गोविंदराव मोहिते नामक । घरचे सुखी गृहस्थ ते ॥ ५६ ॥ त्यांसि पुत्रसंतान नव्हतें म्हणून । अक्कलकोटास दोन तीन वेळां येऊन । समर्थांसि प्रार्थिती त्यावरून । प्रसाद दिधल्यावरी पुत्रसंतान लाधलें ॥ ५७ ॥ ज्येष्ठ पुत्र ते बापू मोहिते । तज्जनक गोविंदराव प्रज्ञापुरातें । येऊनि विनविती दत्तगुरूतें । प्रपंच

वाढला उत्पन्न न्यून असे ॥ ५८ ॥ गृहस्थरीतीं अब्रूनें दिवस । निभतील कसे वाटे काळजी हृदयास । तेव्हां कारुण्यघन रमाधवास । दया उपजून बोलिले ॥ ५९ ॥ तुमचे शेतांत विहीर खणावी । ऊंस हळद् लावावी । तदा मोहिते कर जोडून विनवी । पाणी लागत नाहीं कोठें खणूं ॥ १६० ॥ मग वदती गुरु दत्तात्रेय । औदुंबर पिंपळ पिंपरी यांच्या भागीं मध्य । खणावें म्हणजे जलौघ साध्य । होईल पंचवीस हस्त खणितां ॥ ६१ ॥ आज्ञेनुसार गोविंदराव मोहिते । गृहीं जाऊन आरंभिती वापी-खननातें । पंचवीस हस्त खोदूनही पृथ्वीतें । उदक नाहीं लागलें ॥ ६२ ॥ हें पाहून कुटिल मंडळी उपहास । करूं लागली धिक्कार-चेष्टेस । मोहिते म्हणती प्रत्यक्ष स्वामिरायें खास । शेतांतील वृक्ष नाम खुणा कथिल्या ॥ ६३ ॥ ते प्रत्यक्ष पूर्णब्रह्म सनातन । ज्यांचे कृपें आम्हां लाधलें पुत्रसंतान । त्यांचें सत्य प्रमाण विजय-वचन । होईल आतां फलदायक ॥ ६४ ॥ अक्कलकोटीं प्रभुदर्शन । घेऊनि उदकार्थ प्रार्थना करून । येतों मीं खचित यशस्वी होऊन । ऐसें म्हणून मोहिते निघाले ॥ ६५ ॥ इकडे प्रभु चोळाप्पाचे सदनीं बैसले । भक्तमंडळीसहित लीलें । इतक्यांत गोविंदराव मोहिते पातले । लोटांगण घालिती दंडवत ॥ ६६ ॥ वदती अहो विश्वंभर नारायणा । स्वयंप्रकाश सर्वसाक्षी सच्चिद्घना । श्रीमान् देवा पुरुषोत्तमा निपुणा । सत्तास्फूर्तित्वें व्यापलांत ॥ ६७ ॥ समर्थांचिया आज्ञेनुसार खणिलें । द्रव्य खर्चूनि महत्कष्ट केले । असतां अद्यापि न उत्पन्न झालें । उदक चांगलें शेतांत ॥ ६८ ॥ तंव सांगती त्रैलोक्यनायक । फोडिल्यावरी कृष्णहस्ती-मस्तक । धो धो करित वाहील उदक । खेद शोक करणें नको ॥ ६९ ॥ परिसूनि परमेशवचन-विजय । मोहिते वदती हत्तीचें मस्तक म्हणजे काय । मग श्रीपादभटजी समर्थाभिप्राय । सांगती स्पष्ट सकलांसि ॥ १७० ॥ औदुंबराचे बाजूस विहिरींत । हस्तीसारखा कृष्ण पाषाण विराजित । तयाचें मुख फोडिजेत । म्हणजे पाणी पुष्कळ येईल ॥ ७१ ॥ गोविंदराव मोहिते तदनंतर । ग्रामीं जाऊनि वापींतील पाषाण थोर । त्याचें

गंडस्थळ फोडितांचि नीर । निघालें गज-शुंडेसारिखें ॥ ७२ ॥ हें देखूनि चेष्टेखोर भयभीत झाले । सर्वांसि मोठें कौतुक वाटलें । म्हणती जगत्कल्याणार्थ प्रकटलें । प्रत्यक्ष परब्रह्म प्रज्ञापुरीं ॥ ७३ ॥ मग तेथें ब्राह्मण विद्वान् वैदिक । पाचारूनि विध्युक्त समारंभ सम्यक् । दत्तात्रेय-स्वामींच्या चरणपादुका भक्तिपूर्वक । त्याच पाषाणें स्थापित केल्या ॥ ७४ ॥ देवपूजन ब्राह्मणभोजन । शांति मंगलआरती नामसंकीर्तन । दत्तात्रेय-स्वामींचा जयजयकार करून । कुंभांत भरिलें उदक द्विजीं ॥ ७५ ॥ मोहिते पुष्कळ मंडळीसहित । उदककुंभ घेऊनि आनंदयुक्त । येऊनि अक्कलकोटीं पेठेंत । नमिती अनंत विश्वगुरु ॥ ७६ ॥ विश्वगुरूंचें वस्त्रभूषणें पूजन । करूनि चरणांवरी कुंभोदक घालून । यथाशक्ति केलें ब्राह्मणभोजन । त्या कुंभांत तीर्थ घेतलें ॥ ७७ ॥ आज्ञा घेऊनि गेले काजळ्यास । सुमुहूर्तीं करून समारंभास । तें गुरुपादोदक नित्य शांति व्हावयास । सिंचिलें वापींत ग्रामीं सदनीं ॥ ७८ ॥ पुढें तें झालें स्वच्छ मधुरोदक । प्राशितां सर्वांसि आरोग्यकारक । त्या उदकें शेतांत धान्य-पत्र-फलादिक । झाल्यानें मोहिते सुखें नांदती ॥ ७९ ॥ या ग्रामींचा बापू कुळकर्णी द्विज । समर्थ-सेवेंत होता तीन वर्षें सहज । त्यासि प्रसन्न होऊनि स्वामिराज । कार्य सिद्ध जाहलें तयाचें ॥ १८० ॥ म्हणून काजळ-ग्रामीं सुंदर स्थानीं । दत्तात्रेयस्वामि-पादुका स्थापूनि । मोठ्या उत्साहें गुरुपद-सेवनीं । लागूनि गाती गुरुलीला ॥ ८१ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदशास्त्रपुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । नवत्रिदशाध्याय गोड हा ॥ १८२ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे नवत्रिदशोऽध्यायः समाप्तः ॥ ३९ ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय चाळिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्तात्रेय-स्वामिने नमः ॥ ॥ गुरु बोधिती सच्छिष्याप्रत । जो अद्वितीय आनंदस्वरूप आत्मा तिष्ठत । तो सजातीय-विजातीय-स्वगतभेदरहित । आहे ब्रह्मरूप स्वयंज्योति ॥ १ ॥ तथा परमलोकरूप आहे । ऐसें सुषुप्तींतील आत्म्याचें स्वरूप शुद्ध हें । गताध्यायीं निरूपिलें पाहें । याज्ञवल्क्य-जनक-संवादरूपें ॥ २ ॥ तें आत्मस्वरूप अधिकारी पुरुषासि । यज्ञादिक बहिरंग-साधनें केल्यासि । योग्य आहे प्राप्त होण्यासि । ऐसें बृहदारण्यांत कथिलें असे ॥ ३ ॥ तैसें इहामूत्रफलभोग-वैराग्य । नित्यानित्यविवेक करणें योग्य । शमादि-षट्संपत्ति मुमुक्षुता भाग्य । असतां, हीं चतुष्टय साधनें लाधतीं ॥ ४ ॥ आणि श्रवण-मनन-निदिध्यासन । आठवें 'तत्-त्वं'-पदार्थांचें शोधन । या अष्ट अंतरंग-साधनेंकरून । आत्मा नित्योपलब्ध होतसे ॥ ५ ॥ आत्म्याहूनि संपूर्ण भिन्न पदार्थ । चंचल दृश्य जड नाशवान् आहेत । यास्तव ते जड अनात्म पदार्थ । मुमुक्षूसि प्राप्त होणें योग्य नसे ॥ ६ ॥ या कारणानें श्रुति भगवती । त्या आनंदस्वरूप आत्म्याप्रति । स्पष्ट रीतीनें 'परमागति'। ऐशा नामें वर्णितसे ॥ ७ ॥ येथें चित्तशुद्ध्यर्थ ज्या साधनांचा उपयोग । तयांसि म्हणती साधनें 'बहिरंग'। आणि श्रवण तथा आत्मज्ञानार्थ उपयोग। होतो त्या साधनांसि 'अंतरंग' म्हणती ॥ ८ ॥ जेवढी संपदा या लोकींची । त्याहूनि अधिक संपदा असे कुबेराची । म्हणून परम संपदा कुबेराची साची । म्हणतात लोक उघड ते ॥ ९ ॥ तैसें सुषुप्ति-अवस्थेंत । जो आनंदस्वरूप आत्मा विराजित । त्याहूनि अन्य अधिक संपदा नसत । म्हणूनि श्रुति आत्म्यासिच 'परमसंपदा' कथिते ॥ १० ॥ त्या आनंदस्वरूप आत्म्यासि

सुषुप्तींत । हा जीव नित्यही प्राप्त होत । त्या आत्म्याहूनि भिन्न दर्शनार्थ योग्य नाहींत । अनात्म-पदार्थ कोणतेही ॥ ११ ॥ म्हणून मुमुक्षुसी दर्शनार्थ योग्य केवल । एक आनंदात्माचि असे चिरकाल । याकारणें श्रुति त्या आत्म्यासि निर्मल । 'परमलोक' ऐसें म्हणतसे ॥ १२ ॥ या आनंदस्वरूप आत्म्याहूनि भिन्न । सुंदर स्त्रिया त्या रूपादिक युक्तगुण । किंवा आज्ञाधारी पुत्र सर्वगुणसंपन्न । हींही या जिवाचा परमलोक नसती ॥ १३ ॥ अथवा सुंदर रूपयुक्त । तथा कोमल जें अत्यंत । ऐसें आपलें शरीर असत । तेंही परमलोक नाहीं ॥ १४ ॥ किंवा ज्यांचा आकार पर्वतासारिखा । ऐसे जे मत्त हस्ती देखा । तथा चपल अश्व असती जे कां । वायुवत् गमन करणारे ॥ १५ ॥ आणि ज्यांचा शब्द मेघ-गर्जनेसमान । ऐसे जे रथ आहेत महान् । तथा भयरहित वीर पदाति शूरजन । तथा खर्व-पद्मयुक्त संख्येचे धनकोश ॥ १६ ॥ किंवा नाना प्रकारचें अन्न । भरलेल्या अनेक ज्या कोठ्या पूर्ण । किंवा स्वर्गांतील अप्सरेसमान । वारांगना अनेक आहेत ॥ १७ ॥ आणि इंद्राच्या 'वैजयंत' नामक गृहासमान । जीं अगणित असतीं सदनें जाण । तथा सुंदर इंद्रायणी समान । असती स्त्रिया ज्या अनेक ॥ १८ ॥ आणि धनधान्य पूर्णयुक्त । जी आज्ञाकारी प्रजा नांदत । किंवा अनेक प्रकारच्या भोगसाधनयुक्त । जीं राज्यें असतीं ॥ १९ ॥ तीं राज्यें देखील या जीवाचे । 'परमलोक' नसतीं साचें । ऐशीं राज्यें भोगून जें सुख गमे जन्माचें । तें सुखही जीवाचा 'परमलोक' नाहीं ॥ २० ॥ म्हणून सुषुप्तींत प्राप्त होणें योग्य । जो आनंदस्वरूप आत्मा अद्वितीय । तो आत्माचि एक होय । 'परमलोक' या जीवाचा ॥ २१ ॥ ज्या आनंदस्वरूप-आत्म्यासि सुषुप्तींत । हा जीव नित्य होतसे प्राप्त । तो आत्मस्वरूप-आनंद अखंडित । सर्व लौकिकानंदाहूनि अधिक आहे ॥ २२ ॥ या कारणानें श्रुति भगवती । त्या अद्वितीय आत्म्याप्रति । 'परमानंद' नामें कथिती । यदर्थीं शिष्य गुरूसि पुसे ॥ २३ ॥ सर्व लौकिकानंदाहून । हा आनंदस्वरूप आत्मा अधिक

कशावरून । या शंकेचें याज्ञवल्क्य समाधान । जनकराजासि ठसविती ॥ २४ ॥ आनंदाचा समुद्र जो आत्मा सच्चिद्घन । ज्याच्या लेशमात्र-आनंदासि आश्रित जाण । होऊनि स्थावर जंगम जीव संपूर्ण । जीवनासि प्राप्त होती ॥ २५ ॥ येथें 'लेश' शब्दाचा अर्थ । स्निग्ध जे घृतादिक पदार्थ । ते घेऊनियां हातांत । पुनः त्यांतें त्यजावें ॥ २६ ॥ नंतर हातासि घृतादिकांचा अंश । राहतो त्यांचें नाम आहे 'लेश' । तसा आश्रय करून आत्मानंदाचा लेश । जीवन पावती सर्व प्राणी ॥ २७ ॥ जैसें सर्व जलाचा निधि जो समुद्र । त्या समुद्राच्या लेशमात्र जलासि घेऊनि नंतर । वर्षाकाळीं मेघ विपुल नीर । वर्षती उघडपणानें ॥ २८ ॥ तैसे आनंदसमुद्र आत्म्याचे लेशमात्र । आनंदासि ग्रहण करूनि सर्वत्र । ब्रह्मादिकांपासून कीटकपर्यंत सर्व प्राणीमात्र । जीवनासि प्राप्त होती ॥ २९ ॥ आणि विषयेच्छारूप कारणाचा नाश । झालिया मग इच्छाजन्य दुःखाचा नुरे लेश । अर्थात् जोंपर्यंत दुःखाचा अभाव विशेष । अंतःकरणांत राहतसे ॥ ३० ॥ तोंपर्यंत विक्षेपरहित । तथा अज्ञानेंकरून आवृत । जो आत्मस्वरूप आनंद प्रतीत । तो जीवासि होतसे ॥ ३१ ॥ त्या आनंदासि अज्ञानी जीव । कथन करिती 'सुख' ऐसें नांव । तात्पर्य हें लोकांस प्रतिबंधकत्व । दोन प्रकारें असे ॥ ३२ ॥ 'आवरणरूप' प्रतिबंधक एक । जैसें सूर्य-दर्शनासि मेघावरण प्रतिबंधक देख । आणि द्वितीय 'विक्षेपरूप' प्रतिबंधक । त्याचा दृष्टांत परिसावा ॥ ३३ ॥ जैसें घटादिक पदार्थांचे दर्शनाकरितां । जी नेत्रांची अत्यंत चंचलता । तीच विक्षेपरूप प्रतिबंधकता । जाणावी घटादिक पदार्थांविषयीं ॥ ३४ ॥ तैसें येथें विषयेच्छारूप । बुद्धि-चंचलतारूप विक्षेप । आत्म्याचे आनंदस्वरूप । भानासि प्रतिबंधक असे ॥ ३५ ॥ जेव्हां विषयाची प्राप्ति होते । तेव्हां चंचलरूप विक्षेपासि बुद्धि त्यागिते । ती बुद्धि जोंपर्यंत अन्य विषयेच्छा न करिते । तोंपर्यंत बुद्धि स्थिर राहतसे ॥ ३६ ॥ त्या स्थिर बुद्धींत अज्ञानआवृत । जो आनंदस्वरूप आत्मा विराजित । त्याचें स्पष्ट रूप भान होत । त्यातें अज्ञानी 'विषयसुख' म्हणती

॥ ३७ ॥ विषयाचे प्राप्तिकालीं अज्ञान-आवृत । आत्मानंदाचें भान असे होत । ही गोष्ट कैशी जाणिली जात । या शंकेचें समाधान करिती ॥ ३८ ॥ विषय-प्राप्तकालीं अज्ञानीं जीवातें । जर कदाचित् निरावरण आत्मानंदाचें भान होतें । तर मुक्ति-अवस्थेंत 'मी सुखी' ऐसा ज्ञानी पुरुषातें । अनुभव होणें साहजिक ॥ ३९ ॥ जैसें अज्ञानी मूढासि विषयप्राप्ति-कालांत । 'मी सुखी' ऐसा अनुभव न होत । तरी मी सुखवान् आहें ऐशी प्रतीत । होतसे अज्ञानी जीवासि ॥ ४० ॥ यास्तव ऐसें जाणिलें जात । कीं विषयप्राप्तिकालीं जो आत्मानंद प्रतीत होत । तो अज्ञानेंकरून आवृत झालेल्या मूढाप्रत । प्रतितीसि येतसे ॥ ४१ ॥ आणि मुक्ति-अवस्थेंत केवल । आवरण-विक्षेपरहित निर्मल । ज्ञानी मुक्तासि आत्मानंदानुभव चिरकाल । निःसंशय प्रतीतीस येतसे ॥ ४२ ॥ आतां विषयजन्य लौकिक-सुखांत । सापेक्ष अधिकता निरोपित । आणि आत्मानंदांत निरपेक्ष अधिकत्व । निरूपण करूं श्रोते हो ॥ ४३ ॥ या मनुष्यलोकीं यौवन-अवस्थायुक्त नर । तथा वज्रासमान दृढ ज्यांचें शरीर । आणि भीमार्जुनासारिखे बलवान् शूर । तथा व्यासासमान शास्त्रवेत्ते ॥ ४४ ॥ किंवा अनेकास्त्र चालविणारे महादेवासमान । तथा रोगरहित अश्विनीकुमारवत् जाण । आणि अष्टसिद्धियुक्त श्रीकृष्णाचे साह्येंकरून । युधिष्ठिर अर्जुन समृद्धीस पावले ॥ ४५ ॥ तैसें शूरवीरांच्या साह्येंकरूनि । जे समृद्धीस प्राप्त झालेले जनीं । तथा सप्तद्वीपांत जेवढे मनुष्यादिक प्राणी । त्या सर्वांचा जो चक्रवर्ती राजा होय ॥ ४६ ॥ आणि लोकांत ज्याचें यश महान् । तथा मनुष्याचे भोगाचें जें साधन । स्त्री-पुत्रादिक पदार्थ अन्नपान । त्या सर्व साधनीं युक्त आहे ॥ ४७ ॥ तथा मनुष्य-लोकांतील कोणतेही विषय । ज्यासि असती प्राप्त अक्षय । ते सर्व पदार्थ भोगण्यासि शक्ति होय । आयुष्य बहुत जयासि ॥ ४८ ॥ इत्यादि सर्व भोग-सामग्रीसंपन्न । जो चक्रवर्ती असे राजा महान् । त्यासि जो आनंद होतो त्या समान । इतर प्राण्यांसि आनंद होत नाहीं ॥ ४९ ॥

म्हणूनि ‘मानुष’-आनंदापेक्षां अधिक । ‘चक्रवर्तीचा आनंद’ विशेष आहे सम्यक् । आणि चक्रवर्तीच्या आनंदापेक्षां शतगुणाधिक । पितृलोकीं ‘पितरांसि आनंद’ होतसे ॥ ५० ॥ यास्तव चक्रवर्ती राजाहून । पितरांचा परमानंद आहे ऐसें श्रुतिवचन । आणि पितरांपेक्षां अधिक शतगुण । गंधर्वलोकीं ‘गंधर्वांसि’ परमानंद होतो ॥ ५१ ॥ त्या गंधर्वांहूनि शतगुणाधिक । ‘कर्मदेवतांचा’ आनंद परमानंद अवश्यक । त्या कर्मदेवतांच्या आनंदाहून शतगुणाधिक । ‘आजानज’ देवतांसि परमानंद होतसे ॥ ५२ ॥ अग्निहोत्रादिक कर्में करून । जे देवभावासि प्राप्त होती जन । त्यांचें ‘कर्मदेवता’ नामाभिधान । श्रुतिप्रमाण जाणावें ॥ ५३ ॥ सृष्टीच्या आदिकालांत उत्पन्न । जे झाले अग्नि आदिक देवताजन । त्या अग्न्यादि देवतांचें नामाभिधान । ‘आजानज-देवता’ ऐसें आहे ॥ ५४ ॥ त्या आजानज देवतांहून अधिक शतगुण । ‘प्रजापति’ लोकांत आनंद आहे जाण । यास्तव आजानज देवतांहून । प्रजापति-लोकांचा आनंद विशेष आहे ॥ ५५ ॥ आणि प्रजापति लोकांपेक्षां शतगुण अधिक । ‘विराट्लोकीं’ आनंद राहे सम्यक् । यास्तव प्रजापति लोकांपेक्षां देख । विराट् लोकांचा आनंद विशेष आहे ॥ ५६ ॥ विराट्-लोकींच्या आनंदाहून । ‘ब्रह्मलोकींचा’ आनंद अधिक शतगुण । यास्तव विराट् लोकींच्या आनंदाहून । ब्रह्मलोकींचा आनंद विशेष आहे। ५७ ॥ या स्थूल जगताचें कारण । जो सूत्रात्मा हिरण्यगर्भ जाण । त्या हिरण्यगर्भाचें निवासस्थान । ब्रह्मलोकचि मुख्य असे ॥ ५८ ॥ ऐसा ब्रह्मलोकीं स्थित उपासकाशी । जो विषयजन्य आनंद येत प्रतीतीसि । त्या आनंदाहून इतर भिन्नत्वेंसीं । विपयजन्य आनंद कोणता नाहींच ॥ ५९ ॥ कां तरी मनुष्य-लोकादिक घेऊन । विराट लोकपर्यंत जेवढा आनंद विषयजन्य । त्या सर्व आनंदाचें अवधिरूप स्थान । हिरण्यगर्भाचा आनंद असे ॥ ६० ॥ मनुष्य-लोकांपासून ब्रह्मलोकपर्यंत । जें विषयानंदाचें न्यूनाधिकत्व असत । तें ज्या श्रुतीनें केलें वर्णित । त्या श्रुतीचा अभिप्राय ऐसा आहे ॥ ६१ ॥ सर्व विषयजन्य आनंदाहून । अधिक

जो हिरण्यगर्भाचा आनंद जाण। त्या आनंदाची जोंपर्यंत जीवासि इच्छा पूर्ण। तोंपर्यंत आत्मानंदाचें भान होत नाहीं ॥ ६२ ॥ म्हणून आत्मारूप-आनंदप्राप्तीची। इच्छा ज्या पुरुषांसि आहे साची। त्यांनीं हिरण्यगर्भाच्या आनंदाची। इच्छा देखील करूं नये ॥ ६३ ॥ याप्रकारचें परमवैराग्य। प्राप्त व्हावें ऐसें श्रुतीचें आहे तात्पर्य। येथें मनुष्यलोकांहून ब्रह्मलोकपर्यंत विषयजन्य। जेवढे आनंद आहेत ॥ ६४ ॥ ते आनंद आणि त्या आनंदाचें साधन। जें शरीर स्त्री-पुत्रादिक धन। त्या सर्वांसि काकविष्ठेसमान। शुष्क असार दुर्गंधमय जाणावें ॥ ६५ ॥ त्या अत्यंत विरस आनंदाची इच्छा करूं नये। याचेंचि नाम 'परमवैराग्य' आहे। ऐसें परमवैराग्य जयासि उपजलें पाहें। त्यासि आत्मानंदाचा साक्षात्कार होतसे ॥ ६६ ॥ आणि ब्रह्मलोकींचा आनंद देखील। काकविष्ठेसारखा असार दुर्गंधीमल। जाणूनि निरिच्छ अंतर्बाह्यशुद्ध निर्मल। परमवैराग्यसंपन्न व्हावें ॥ ६७ ॥ कारण ब्रह्मलोकींचा आनंद तोही। आत्मानंदाचा एक लेशमात्र पाहीं। ऐसा ब्रह्मानंदसमुद्र पूर्ण राही। त्यांत परमात्मा नांदे अद्वितीय ॥ ६८ ॥ मनवाणीचा असे अविषय। न्यूनाधिकतारहित अखंड अद्वय। गुरुमुखें ब्रह्मविद्येनें प्राप्त होय। अंतर्यामीं सहजस्थित ॥ ६९ ॥ तो पूर्णब्रह्म सनातन सद्गुरुनाथ। श्रीमद्दत्तात्रेय स्वामीसमर्थ। अवतरला जगदुद्धरणार्थ। लीला अपार तारक ज्याची ॥ ७० ॥; एक कोंकणस्थ जातीचा ब्राह्मण। मोरोपंत बापट म्हणून। बडदाळ्यास जकात-कारकून। नाकेदारीचे कामावर होता ॥ ७१ ॥ अक्कलकोट आणि गाणगापुर। यांच्यामध्यें 'बडदाळें' नामें नगर। त्या बडदाळें-ग्रामीं बहुत संवत्सर। नाकेदार मोरोपंत होते ॥ ७२ ॥ त्या काळीं लोहमार्ग आगगाडीचा। होता सोलापुरापर्यंत येण्या-जाण्याचा। आगगाडींत बसून प्रवास लोकांचा। सोलापुरपर्यंत सिद्ध होता ॥ ७३ ॥ त्यायोगें लोक सोलापुराहून। पादमार्गें बैलगाडी-घोड्यावरून। अक्कलकोटास परमात्मा-दर्शन। करावयास येत होते ॥ ७४ ॥ तेथून क्षेत्र गाणगापुरास। जात होते गुरु नृसिं[illegible]चे दर्शनास।

मार्गांत मेहेंदरगी बडदाळे दुधणीस। कोणी उतरून पुढें जाती ॥ ७५ ॥ गाणगापुरास बहुतेक जाणारे येणारे।
बडदाळ्यास उतरती शिष्या बा रे। मोरोपंताचे सदनीं स्नान भोजन सारे। करूनि जाती येती राहती॥७६॥ परंतु मोरोपंत
प्रथम कंटाळा। करी, देखूनि धिक्कारीत लोकांला। पुढें मासद्वयानंतर मोरोपंत दर्शनाला। अक्कलकोटास पातला ॥ ७७ ॥
स्वामिराजांसि करी साष्टांग प्रणाम। तों बोलती आत्माराम परंधाम। आम्हांकडे येणारेजाणाऱ्यांचें अप्रेम। वाटूनि
अनादर करितोसि काय ॥ ७८ ॥ उगेंच बसून त्यांची सेवा करावी। सत्य-मृदुभाषणें भूतें संतोषवावीं। तेणें पावशी
सत्कीर्तिवान् पदवी। सुगति बरवी सत्य जाण ॥ ७९ ॥ परिसूनि समर्थमुखींचें बोधामृत। मोरोपंत होऊनि अहंकार-
रहित। क्षमा मागूनि शरणागत। पश्चात्तापें शुद्धचित्त जाहला ॥ ८० ॥ आज्ञेनुसार त्या दिवसापासून। प्रज्ञापुरीं
गाणगापुरीं येणारे जाणारे जन। त्यांची सेवा-आतिथ्य आदरेंकरून। करितसे मोरोपंत कुटुंबसह ॥ ८१ ॥ दूरदूरचे
बडदाळ्यास येती। त्यांत मुख्यत्वें सेवेकरी भक्त संत यति। आणि पंगु-बधिर-अंधासि देती। पोटभर अन्न उदक तें
॥ ८२ ॥ पुढें ते मोरोपंत बहु परोपकारी। शांत चतुर न्यायी झाले परमार्थविचारी। वारंवार अक्कलकोटीं गाणगापुरीं।
येऊनि यथाशक्ति करिती समाराधना ॥ ८३ ॥ नाना प्रकारचें उत्तम पक्कान्न। सेवेकऱ्यांसि दुर्बलांसि घालिती यथेच्छ
भोजन। साधारण वस्त्रें खर्चांसि स्वल्प-धन। अर्पिती भगवद्भक्त मोरोपंत ॥ ८४ ॥ कित्येक विघ्नसंतोषी द्वेष्ट्यांनीं।
मोरोपंतावरी अनेक संकटें दोष आणूनि। दुःखी निरुद्योगी करावें म्हणूनि। कठिण प्रसंग गुदरविला ॥ ८५ ॥ परंतु
दत्तात्रेय-स्वामिकृपेंकरून। आणि श्रीमंत निजाम सरकार न्यायी म्हणून। मोरोपंत निर्दोषी सत्यवादी ठरून। सत्कीर्तीस
प्राप्त झाले ॥ ८६ ॥ सत्याचा सत्यचि परिणाम। म्हणूनि न उल्लंघावे ईश्वरी धर्म-नियम। निर्लोभ निःस्पृहपणें
निःपक्ष काम। करावें राजा आणि प्रजेचें ॥ ८७ ॥ न्यायार्जित धनें उदर पोषण। प्रपंचांत करावें कुटुंबभरण। घडेल

तितुकें परोपकार सत्यभाषण । संभावित स्थितीनें आचरावें ॥ ८८ ॥ परोपकारी मोरोपंत बापट । यांची पत्नी दयालु निष्कपट । येणाऱ्या-जाणाऱ्याकरितां खटपट । करूनि अनेक पदार्थ सिद्ध करी ॥ ८९ ॥ कधीं न करी कोणाचा कंटाळा । मुखीं 'दत्तात्रेय' नामस्मरणाचा चाळा । चिरंजीवही सुलक्षण बाळा । स्वस्त्रीसह देशीं नांदतसे ॥ ९० ॥ अंगीं घस लावून घेतल्यावीण । फुकाचें सत्य मधुर प्रिय भाषण । त्यावांचूनि परोपकारी लौकिकवान् । कृपेसी पात्र कैसे होती ॥ ९१ ॥; अक्कलकोटासमीप एक । कोसावर लहान 'ममदाबाद' नामक । ग्राम बोरी-नदीतीरीं आहे सम्यक् । त्या गांवीं एक ऋग्वेदी विप्र वसे ॥ ९२ ॥ त्याचें नाम गोविंदपंत कुळकर्णी । साठ वर्षांचा वयी शुद्धाचरणी । त्यास भोजन केलें म्हणजे उदरांत अग्नि । लागल्यासारिखें वाटावें ॥ ९३ ॥ तेणें फार क्लेशी होई वृद्ध ब्राह्मण । कांहीं बरें वाटावें झालिया वमन । ऐसें बहुत दिवस दुःख भोगून । त्रासून गेला गाणगापुरीं ॥ ९४ ॥ तेथें दत्तात्रेय नृसिंहसरस्वती- । चरणसेवा करूं लागला प्रीतीं । नंतर गोविंदपंतास दृष्टांतीं । सांगती प्रभु स्वप्नांत ॥ ९५ ॥ तुजला परब्रह्माचें दर्शन । झालिया होईल व्याधी निरसन । ऐसें ऐकूनि जागृत झाला ब्राह्मण । संतोष वाटला तयासि ॥ ९६ ॥ अंगीं धैर्य जाहलें प्राप्त । परंतु कुळकर्णी पडला विचारांत । महान् योगी यांसही कलियुगांत । परब्रह्मदर्शन दुर्लभ ॥ ९७ ॥ तरी मजला परब्रह्मदर्शन । कैसें होईल सद्गुरुज्ञानावांचून । त्या कालीं गाणगापुरासि ब्राह्मण । एक वैदिक सेवेंत होता ॥ ९८ ॥ त्याचें नाम बाबाभट मेणवलीकर । कुष्ट रोग उद्भवला त्याचे अंगावर । म्हणूनि गाणगाभुवनीं तो विद्वान विप्र । राहिला देवाचे सेवेसि ॥ ९९ ॥ जयें ऋग्वेद यजुर्वेद म्हटलेले । 'दशग्रंथीं' वैदिकपद मिळविलें । तयासि गोविंदपंतें नीट पुसिलें । स्वप्न-दृष्टांत सांगूनि ॥ १०० ॥ म्हणे मी संसारिक कुटुंबवत्सल । आहें परंतु नसे मुमुक्षु वैराग्यशील । मजला परब्रह्मदर्शन कैसें होईल । कृपा करूनि सांगावें ॥ १ ॥ मग बाबाभट मेणवलीकरांनीं ।

परोपकारार्थ दत्तपदीं विनवणी । केली तेव्हां प्रभूनें येऊनि स्वप्नीं । आज्ञापिलें द्विजवरा ॥ २ ॥ तें परब्रह्म अक्कलकोटांत । आहे तेथें जाऊनि प्रातःकालीं त्वरित । घरें झाडावीं म्हणजे होईल प्राप्त । ऐसें पाहूनि बाबा जागृत झाले ॥ ३ ॥ फार आनंद वाटला बाबासि । त्यांनीं शुभ दृष्टांत कळविला गोविंदपंतासि । तो श्रवण करूनि तयाचे मानसीं । परम आल्हाद वाटला ॥ ४ ॥ मग महापादुकांचें विधियुक्त पूजन । नैवेद्य ब्राह्मण-समाराधन । यथाशक्ति करूनि श्रीमन्नृसिंहचरण । वंदूनि आज्ञा घेतसे ॥ ५ ॥ बाबाभट मेणवलीकरासि प्रणिपात । करूनि म्हणे आपण विद्वान पवित्रचित्त । आपणांपाशीं नाहीं वर्तत । विद्याभिमान लेशही ॥ ६ ॥ तस्मात् आपला शुभ आशीर्वाद । मजला होईल सुखप्रद । ऐसें विनवित कुळकर्णी गोविंद । पादचारी पोहोंचला धीपुरीं ॥ ७ ॥ वृद्धावस्थेंत असह्य शूल रोग । तथापि उत्सुकतेनें सवेग । प्रत्येक गृहीं शोधितां श्रीरंग । दिव्य असंग पुरुष देखिले ॥ ८ ॥ एक सात्त्विक ब्राह्मणाचे सदनीं । भक्त चोळाप्पासंगें मोक्षदानी । खेळती पदार्थ पदार्थांतूनि । काढिती घालिती वरचेवर ॥ ९ ॥ अगम्य अतर्क्य लीला महिमान । ते श्रीमत्परमहंस यतीश्वर अवलोकून । गोविंदपंतें घातलें साष्टांग नमन । मनीं वाटलें कांहीं विचारावें ॥ ११० ॥ इतक्यांत बोलती उमारमण । गोमूत्र आणि गायीचें शेण । सात दिवस केलिया भक्षण । व्याधि निरसन होईल ॥ ११ ॥ पूर्वजन्मीं वृद्धा धेनूस गांजिलें । त्या पातकें तुज शूळें पीडिलें । हें परिसूनि गोविंदपंत विस्मित जाहले । प्रत्यक्ष परब्रह्म विलोकूनि ॥ १२ ॥ परमात्मा अंतर्साक्षी देवाधिदेव । वचनाचा गोविंदपंतासि पटला अनुभव । मग सप्त दिवस गोविंदपंतें भेषज शिव । गोमय गोमूत्र भक्षिलें ॥ १३ ॥ त्यायोगें असह्य घोर व्याधि । सबीज नाहींसा झाला निरवधि । दुःख गेलें शूल उदरसंबंधीं । अन्न पचन होऊं लागलें ॥ १४ ॥ वांती दाहादि जाहलें शांत । कुळकर्णी गोविंदपंत । परब्रह्मदर्शनें आरोग्यवंत । होऊनि

प्रभुचरण वंदिती ॥ १५ ॥ म्हणती जगदीश हे नारायण । प्रत्यक्ष परब्रह्मस्वरूप आपण । जगद्धितार्थ होऊन अवतीर्ण । तारितसां प्राणिमात्रांसि ॥ १६ ॥ आपण साक्षात् परमेश्वर । सामर्थ्य वसे अंगीं सदा अपार । समान दृष्टींत नुरे आपपर । पूर्णपरात्पर जगद्गुरु ॥ १७ ॥ ज्यापरी श्रीमन्नृसिंह-अवतार । श्रीकृष्ण भगवान् श्रीरामचंद्र । ज्यांनीं दावूनि अद्भुत लीला अपार । तारिले गोपाल वानरादिक ॥ १८ ॥ गोकुलवृंदावन मथुरा द्वारावती । अयोध्या लंकापुरी आदिक स्थलीं किती । तारिले गोवत्स वृक्ष पाषाणादि नसे गणती । वनचर तृणचर निशाचर । १९ ॥ द्वादश गांवें अग्नि गिळून । समुद्रावरी तारिले जड पाषाण । हिरण्यकश्यपूचें करूनि विदारण । प्रल्हाद-महाभक्तासि संरक्षिलें ॥ १२० ॥ तेचि आपण साक्षात् परमेश्वर । यांत नसे संशय आणि अंतर । मायामोहें अज्ञानी भ्रांतिष्ट नर । नोळखिती देहधारी अभागी ॥ २१ ॥ प्रज्ञापुरांत सर्वांतर्यामी । हृदयस्थ नांदतसे समर्थ स्वामी । श्रोता मंता द्रष्टा समीप इंद्रियग्रामीं । असूनि निर्विकार सच्चिदानंद ॥ २२ ॥ नष्ट झालिया विक्षेप आवरण । तरीच भेटे हृदयस्थ जनार्दन । भगवंता आपलें चरित्र गहन । निजकृपेवीण न कळे कोणा ॥ २३ ॥ ऐसें स्तवूनि केलें योगींद्रपूजन । यथाशक्ति ब्राह्मणभोजन । सेवेकऱ्यांसि अन्नादि अर्पून । गोविंदपंत गेले ममदाबादेस ॥ २४ ॥ यांचे पौत्रादि वारंवार । अक्कलकोटीं दर्शनासि भक्तिपुरःसर । येती निरालस्य पेठेंत-बुधवार । समर्थांच्या आद्य प्रिय स्थानीं ॥ २५ ॥; ऐशी श्रीगुरुलीला अलौकिक । अमानुषिक दुस्तर भवाब्धितारक । एके मार्गशीर्षांत प्रतिवार्षिक । दत्तजयंत्युत्सवकालीं ॥ २६ ॥ फारचि झाली होती महर्गता । प्रयोजनाचे दिवशीं प्रसादाकरितां । परगांवचे ब्राह्मणादिक तत्त्वतां । पुष्कळचि जमले होते ॥ २७ ॥ त्याकाळीं चोळाप्पा श्रीपादभट । केशव रामचंद्र देशपांडे पाणक्या धीट । इत्यादिक योगिराजांसि सांगती प्रकट । प्रसादासि गर्दी फार झाली ॥ २८ ॥ तीन शत मनुष्यांपुरतें शिजलें अन्न ।

एवढ्यांत तीन चार सहस्र जन । कशा प्रकारें करतील भोजन । परिसूनि योगीश्वर तेधवां ॥ २९ ॥ हिंगुलाजमातेकडील कडें । ज्यावर देवता वसती चोहोंकडे । स्वहस्तांतील काढूनि सांकडें । निवारणार्थ केशवासि देती ॥ १३० ॥ आणि म्हणती अंबा देवीचा रौप्य टांक । कड्यासुद्धां पूर्णपोळीचे राशींत टाक । आजि हा अन्नपूर्णा तटाक । भरला काळजी करूं नका ॥ ३१ ॥ मग टाक आणि कडें केशवानें । पूर्णान्न-राशींत ठेविली नेटानें । लोकांच्या पंक्ति बैसल्या थाटानें । दत्तात्रेयजयंती-प्रसाद भोजना ॥ ३२ ॥ देव अंबेची आरती होऊन । श्रीफल फोडूनि अन्नावरी तीर्थसिंचन । स्वयंपाक-शाळेंत विध्युक्त करून । घेतलें अन्न वाढावया ॥ ३३ ॥ प्रथम दोन सहस्र लोक भोजना बैसले । पुष्कळ घृत अन्नादिक वाढिलें । यथेच्छ भोजन होऊनि सर्वही तृप्त झाले । उठले तांबूल दक्षिणा घेऊनि ॥ ३४ ॥ पुन्हां एक सहस्र इतर ज्ञाति । भोजनीं बैसल्या अनेक पंक्ति । दीपदर्शनापर्यंत यथास्थिति । जेविल्या आकंठपर्यंत ॥ ३५ ॥ मग यवन आणि इतर । चोखामेळा अंत्यजादि नारीनर । एक सहस्र जेविती पोटभर । कोणी न राहिलें प्रसादावीण ॥ ३६ ॥ तेव्हां रात्रीं स्वामी-दत्तात्रेय । राचाप्पा मोदीचे सदनीं स्थित आनंदमय । तेथें चोळाप्पा श्रीपाद नीळकंठ प्रिय । केशवादिक सर्व मंडळी ॥ ३७ ॥ समर्थ आणि अंबा-देवीस । साष्टांगीं करिती नमनास । आपलें भोजन झालें ना म्हणूनि प्रभूंस । विनविती पूजारी सेवक ॥ ३८ ॥ मग अन्नराशींतून कडें टाक । काढूनि आणिती तात्कालिक । धन्य धन्य सामर्थ्य अलौकिक । दत्तात्रेयवचनें सर्व सिद्धि ॥ ३९ ॥ कडें टाकादिक निमित्त मात्र । कर्ता करविता योगिराज स्वतंत्र । तीनशें मनुष्यांचे अन्नांत चतुःसहस्र । पात्रें अधिक जेविलीं ॥ १४० ॥ सर्व लोक तृप्त होऊन । करिती दत्तात्रेय-स्वामी चरित्र गायन । दुसरे दिवशीं समर्थदर्शन । करूनि जाती निज सदनीं ॥ ४१ ॥ धन्य तो दिवस महद्भाग्य काल । जेथें नांदती अत्रि-

* * *

बाल कृपाल । जे कालाचाही विशाल काल । जगत्पालक जगद्गुरु ॥ ४२ ॥; असो एकदां माघ वद्य गुरु-प्रतिपदेसी । ब्राह्मणभोजन उत्साह दिवशीं । केशव पाणीवाल्यानें गाडीशीं । जुंपिले वृषभ सुदृढ चार ॥ ४३ ॥ तीन ब्राह्मण गडी घेऊन बरोबर । गाडींत लोखंडी ताम्राचे घट सत्तर । मोठे जयांत मावे पुष्कळ नीर । ऐसे व्यवस्थेनें ठेविले ॥ ४४ ॥ घागरी पाण्यानें पूर्ण भरून । वर आणिती गणेशबागेच्या विहिरींतून । घागरीवर घागरी व्यवस्थेनें ठेवून । मोठमोठीं भांडींही ॥ ४५ ॥ मग दोन ब्राह्मण बसून गाडीवरती । त्यांनीं गाडी हांकून केली चालती । वीस पंचवीस हात गाडी जाय ती । तों वृषभकंठींचें जूं व्यसन तुटलें ॥ ४६ ॥ गाडी त्वरित उलटी झाली । भांड्यांसुद्धां दोन द्विजांच्या अंगावर पडली । महत्कठिण वेळा प्राप्त झाली । पाणी भरलेल्या भांड्यांखालीं ते दडपले ॥ ४७ ॥ दोन विप्रांवरी पडलीं मोठीं भांडीं । भांड्यांसुद्धां उलटली भर गाडी । मार्गांतील लोक धांवूनि तांतडी । गाडी उभी करिती तदा ॥ ४८ ॥ प्रयास लागले अतिशय । साह्य झाले स्वामी-दत्तात्रेय । तेव्हां गाडी उभी झाली उदकमय । चोहोंकडे पसरलें पाणीच ॥ ४९ ॥ दोन घागरींचे झाले कानवले । तीन भांड्यांचे बैसले गळे । लोखंडी घटांचें पोट फुटलें । बूड दडपलें कित्येकांचें ॥ १५० ॥ भांड्यांत उडाला हाःहाःकार । मनुष्यांसही पडला प्रसंग दुर्धर । वृषभ भिऊन बुजाले पळती दूर । विप्र थरथर कांपती ॥ ५१ ॥ इकडे पेठेंतील विशाल मठांत । ब्राह्मण सुवासिनी बैसती पंचशत । पात्रें वाढिलीं पक्वान्नादि-पूरित । रसभरित स्वादिष्ट पदार्थें ॥ ५२ ॥ पंक्तींत सर्वांसि पाहिजे नीर । म्हणूनि जल गाडीस शोधिती द्विज सत्वर । तिकडे केशव आणि इतर विप्र । पुन्हां पाणी भरून गाडी हांकिती ॥ ५३ ॥ परंतु अकस्मित् प्राप्त-प्रसंगानें । दोन द्विजांचे शरीरावरी भय-दुःखानें । जल भरलेलीं भांडीं आणि गाडी पडल्यानें । मृत्यूचा समय आलेला ॥ ५४ ॥ तथापि स्वामिराज गुरु माउली । कृपादृष्टि दीनांवरी वर्षली । गाडी

आणि भांडीं जल भरलेलीं । अंगावरी पडलीं असतांही ॥ ५५ ॥ दोनही ब्राह्मणांचे शरीरासि स्पर्श । भय-दुःखाचा झाला नाहीं लवलेश । सांभाळकर्ता दत्तात्रेय जगदीश । असतां भय-दुःख कशाचें ॥ ५६ ॥ असो ब्रह्मणांसि मिळालें जीवदान । सर्वांसि उत्तम पुष्कळ जल मिळून । यथास्थित झालें सर्वांचें भोजन । तांबूलासह निर्विघ्नपणानें ॥ ५७ ॥; तैसेंच दुसरे एका माघ मासांत । गुरुप्रतिपदेच्या उत्साहांत । पाणी नव्हतें जंगमाचे विहिरींत । नरोटी वाटीनें काढावें लागत होतें ॥ ५८ ॥ एक घागर भरावयास्तव । एक प्रहर लागत होता वास्तव । त्यांत दाटी उदकार्थ घेती धांव । उभीं मनुष्यें असतीं सदा ॥ ५९ ॥ बागेंतलें पाणी लांब असून । वापींतही उदक झालें न्यून । म्हणूनि दत्तात्रेय-स्वामींचें स्तवन । सर्वंचि करिती उदकार्थ ॥ १६० ॥ मग योगीश्वर तात्काल उठले । जंगमाचे विहिरीकांठीं बैसले । तेथून दूर लघुशंकेसि गेले । परतले लघुशंका करूनियां ॥ ६१ ॥ जाऊनि बैसले मठांत । म्हणती पाणी भरा रे बहुत । तदा केशव पाणक्या पाहे विहिरींत । तंव जल अपार भरलेलें ॥ ६२ ॥ पाण्याचें सुख झालें विपुल । ब्राह्मणभोजन उत्सवकाल । उत्तम प्रकारें झाला गुरुदयाल- । कृपाकटाक्ष-दृष्टीनें ॥ ६३ ॥ समर्थांच्या साक्षात्कारी गोष्टी । दुसरे दिवशीं पुन्हां लागू झाली नरोटी । धन्य धन्य विचित्र सामर्थ्य जगजेठी । आश्चर्य लोक मानिती ॥ ६४ ॥; असो शके सत्राशें अठ्याणवांत । वैशाख शुद्ध चतुर्थीपासून अवचित । ब्रह्मनिष्ठ वामनाची प्रकृति अत्यंत । बिघडली बहुत व्याधीनें ॥ ६५ ॥ शरीरीं उद्भवले अनेक रोग । ओढवला प्रारब्धदशा भोग । बहुत उपाय करितां उपयोग । झाला नाहीं म्हणून ॥ ६६ ॥ बडोद्याचे सुरसागरीं प्राणत्यागार्थ । मध्यरात्रीं गेलों कोणा नकळत । आतां उडी टाकावी खोल पाण्यांत । इतुक्यांत स्वामीसमर्थ येऊनि ॥ ६७ ॥ माझा हात धरूनि वर ओढिती । माझ्या श्रीमुखावरी क्रोधें ताडिती । तुझें प्रारब्ध तुलाच भोगिलें पाहिजे म्हणती । देहारब्ध कर्मक्षय होईपर्यंत ॥ ६८ ॥ मूर्खा सहजसमाधि सोडून । जलसमाधि घेतोसि त्रासून । हेंच कळलें काय ब्रह्मज्ञान ।

प्राणत्याग करावा क्लेशानें ॥ ६९ ॥ माझें शरीरीं फिरवूनि कृपाकर। म्हणती आरोग्य होईल धरीं धीर। मजला घरांत आणून घातलें सत्वर। तें मातुश्री-बंधुआदिकांनीं देखिलें ॥ १७० ॥ अंतर्यामी गुप्त झाले तात्कालिक। त्या कालीं श्रीफल फोडून कर्पूरादिक। उजळूनि प्रार्थिलें जगन्नायक। निजलों विश्रांति घ्यावया ॥ ७१ ॥ त्या रात्रीं चांगली झोंप येऊन। आरोग्यासारिखें वाटलें समाधान। मग तेव्हांपासून झाला व्याधि शमन। परंतु संधिवात राहिला ॥ ७२ ॥ पुढें मार्गशीर्ष शुक्ल पक्षांत। अक्कलकोटासि गेलों तदा पेठेंतील मठांत। मेहेंदरगीहून येऊन अवधूत। मंचकीं स्थित होते ॥ ७३ ॥ त्या वर्षीं अन्नोदकाची महर्गता। कारभारी पंच म्हणती काय करावें आतां। पांढरे तुकडे अन्नादि करून पूर्णता। करावी ब्राह्मणादि भोजनाची ॥ ७४ ॥ तों बोलती प्रभु कारभारी-पंचांसि। तुकडे करा तुमचे घरीं श्राद्ध-दिवशीं। पोटभर तूप गूळ घ्या नैवेद्यासि। हें प्रभुवचन ऐकून सर्व विस्मित झाले ॥ ७५ ॥ दुसरे दिवशीं गृहस्थ भक्त येऊन। त्यानें अगणित दिधलें शिधा सामान। मग सर्व जातींस यथास्थित भोजन। घृत-पूर्णपोळीचें मिळालें ॥ ७६ ॥ ऐशा मोठ्या दुष्काळांतही वारंवार। सेवेकरीजनांस पक्वान्न भोजन पोटभर। मिळत होतें कधीं अन्नोदकांसि लेशभर। तूट पडली नाहीं दत्तकृपें ॥ ७७ ॥ त्याकालीं मजला दृढ बोधिलें। आणि प्रभु खासबागेंत जाऊनि बैसले। सहस्रावधि लोक दर्शनासि उभे ठेले। प्रभूनें केलें कौतुक ॥ ७८ ॥ भागीरथी गाय कल्याण-वत्सासहित। तिचेसमीप खडावा घालून पायांत। कमंडलु दंड करीं घेऊनि उभे अवधूत। म्हणती ‘अलख अलख माय गे’ ॥ ७९ ॥ त्या वेळचें आश्चर्यकारक दर्शन। ‘दत्त-माय दत्त-माय’ मुखें म्हणती जन। तेव्हां ‘दत्त विसरा’ ऐसें प्रभुवचन। बोलिले ‘श्वान भुंकून उपासी मरतील’॥ १८० ॥; मजला बोधिती प्रसन्नता-प्रकारें। कांहीं होवो जावो ब्रह्मांड सारें। स्वस्थ आनंदांत असावें बरें। निर्विकार निर्विकल्प स्थितीनें ॥ ८१ ॥ जीव-ब्रह्मैक्य

झालिया निरुपाधि । जीव घेणें देणें जलादि-समाधि । देहक्लेशें घाबरूं नये कधीं । कोण विधिनिषेध निर्गुण-पथीं विचरतां ॥ ८२ ॥; इतुक्यांत पातली मराठ्याची स्त्री एक । मोरे-उपनांवाची पतिसह भाविक । पोटीं पुत्रसंतान नसे संरक्षक । साठ वर्षें होऊनि गेलीं ॥ ८३ ॥ उभयतांनीं समर्थांसि दंडवत । करूनि अर्पिलें श्रीफ़ल जोडूनि हात । समर्थ वदती ‘घे कारटा’ म्हणूनि पदरांत । घातलें श्रीफळ बाईच्या ॥ ८४ ॥ स्वामिराजकृपें बाईस एक वर्षांत । सुपुत्र-रत्न जाहलें प्राप्त । ज्यांची लीला अद्भुत अनंत । किती म्हणूनि वर्णावी ॥ ८५ ॥ संपूर्ण धरणीवरी लिहील शारदा । श्रीगुरुलीला-गुण स्वयें सर्वदा । तरीही तव गुणांचा पार कदा । सच्चिदानंदा नयेचि ॥ ८६ ॥ तथापि श्रीसमर्थांच्या लीला । विश्रुत व्हावया भाविक जनांला । श्रीगुरु-सत्तेनेंच करितों वर्णनाला । श्रीगुरुलीलामृत तारक ॥ ८७ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदस्मृतिपुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । चत्वारिंशोऽध्याय गोड हा ॥ १८८ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे चत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ॥ ४० ॥ श्रीगुरुदेवदत्त—स्वामीसमर्थ ॥

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

# ॥ अध्याय एकेचाळिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्तात्रेय-गुरवे नमः ॥ ॥ शिष्य विनवी गुरुवक्त्यासि । स्वरूपलक्षण आणि तटस्थलक्षणासि । सांगावें कृपायुक्त मानसीं । मज दासासि अवश्य तें ॥ १ ॥ गुरु वदती ऐक शिष्या तारक कथा उचित । त्रेतायुगीं जनकराजाचे सभेंत । सर्व ब्राह्मणांसि बोधिलें वेदविहित । याज्ञवल्क्य-योगीश्वरें ॥ २ ॥ तें बृहदारण्य-उपनिषदांतील । वेदार्थमथित लक्षण प्रांजल । होऊनि नित्य चित्तनिर्मल । परिसावें चिरकाल हितप्रद ॥ ३ ॥ स्थूल सूक्ष्मरूप जेवढा जड प्रपंच । त्या मायिक प्रपंचाचें कारण साच । विज्ञान-आनंदरूप परमात्माच । आहे जगत्-प्रपंचाचें ॥ ४ ॥ तो परमात्मा सच्चिदानंदघन । सुवर्णादिक पदार्थांचें दान । करणारे जे दाते धार्मिक जन । त्यांसि सौख्यफल देतसे ॥ ५ ॥ आणि पापकर्में जीं ब्रह्महत्यादिक । करणारे जे परपीडक लोक । तयांसि दुःखफलें अनेक । शास्ता परमात्मा देत असे ॥ ६ ॥ कार्यकारण-विरहित असून । जो जगत्-प्रपंचाचें मूल कारण । त्या विज्ञान-आनंदरूपाचें लक्षण । दोन प्रकारचें असे ॥ ७ ॥ पहिलें तें ‘स्वरूपलक्षण’ । आणि दुसरें ‘तटस्थलक्षण’ । त्यांत प्रथम स्वरूपलक्षण-निरूपण । करूं श्रोते यथामति ॥ ८ ॥ जें लक्षण आपल्या लक्ष्याचें । स्वरूप झालेलें असून साचें । इतर पदार्थांहून आपल्या लक्ष्याचें । व्यावृत्ति म्हणजे भिन्न करितसे ॥ ९ ॥ तयासि म्हणती ‘स्वरूपलक्षण’ । जैसें ‘विज्ञान-आनंद’ हें वेदमहावचन । परब्रह्माचें स्वरूपभूत होऊन । ब्रह्मासि भिन्न जडप्रपंचाहूनि करितें ॥ १० ॥ म्हणूनि महावाक्य ‘विज्ञान-आनंद’ । हें ब्रह्माचें स्वरूपलक्षण आहे प्रसिद्ध । आतां दुसरें तटस्थलक्षण विशद । श्रोतीं सावधानें परिसावें ॥ ११ ॥ जें लक्षण आपल्या लक्ष्य-

स्वरूपांत । सर्वकाल नाहीं राहत । म्हणजे कधीं वसे कधीं नाहीं वसत । आपल्या लक्ष्याचे ठायीं ॥ १२ ॥ आणि आपल्या लक्ष्य-स्वरूपातें । इतर पदार्थांहून भिन्न करून जाणवितें । जें लक्षण त्या लक्षणासि तत्त्ववेत्ते । 'तटस्थलक्षण' म्हणताति ॥ १३ ॥ जैसें सुख-दुःखस्वरूप फलदातृत्व खचित । ब्रह्माचे ठायीं सर्वदा नाहीं तिष्ठत । तथापि जगताचे स्थितिकालीं वसत । दातृत्व जगत्प्रलयकालीं नसतेंच ॥ १४ ॥ आणि आकाशादिक जड पदार्थांहून । लक्ष्यरूप ब्रह्मासि करितसे भिन्न । यास्तव सुखदुःखरूप फलदातृत्व म्हणून । ब्रह्माचें 'तटस्थलक्षण' जाणावें तें ॥ १५ ॥ तें पूर्णब्रह्म सनातन परमात्मस्वरूप । तत्साक्षात्कार व्हावा निर्विकल्प । आणि सुटावें त्रिपुटी आदि सविकल्प । म्हणून ब्रह्मलक्षण कथियेलें ॥ १६ ॥ वास्तविक परब्रह्म विलक्षण । परी उमजावया सांगितलें लक्षण । निर्गुण निराकार निर्विकारासि जाण । लक्षण वेदें निरोपिलें ॥ १७ ॥ जगदुत्पत्ति-स्थिति-लयासि जें कारण । त्याचें अध्यारोप-अपवादेंकरून । व्हावया शुद्ध ब्रह्मात्मज्ञान । वेदें लक्षण निरूपिलें ॥ १८ ॥ तो वेदात्मा आदिनारायण । दत्तात्रेयस्वामी सर्वांतर्यामी आपण । निराकार साकार सगुणरूपेंकरून । जगत्कल्याण करितसे ॥ १९ ॥; एक मुंबई-ठाण्याकडील राहणार । कोळी जातीचा लक्ष्मण नामें नर । मोठा खलाशी प्रसिद्ध व्यापार । जलमार्गें नौकेंतून करितसे ॥ २० ॥ जहाज-आगबोटींतून बहुत । पदार्थ माल आणणें नेणें करीत । तो एके दिवशीं जहाज-वाहनांत । पुष्कळ माल भरून चालला ॥ २१ ॥ तेव्हां कांहीं वेळानें भयंकर । वारा सुटून समुद्रांत तुफान झालें फार । जहाजें माल मनुष्यांसुद्धां सत्वर । बुडूं लागलीं समुद्रांत ॥ २२ ॥ लक्ष्मण मोठा धैर्यवान् असून । घाबरला धैर्य गेलें सुटून । खळ खळ पाणी वाहे नेत्रांतून । दुर्घट प्रसंग पाहूनि ॥ २३ ॥ दैववशात् त्यासि झालें स्मरण । श्रीमद्दत्तात्रेय-स्वामीस अनन्य शरण । होऊनि म्हणे त्रैलोक्यांत तारण । आपणाविण नसेचि ॥ २४ ॥ नवस केले देवाधिदेवा । करूं लागला योगीश्वरांचा धांवा । वदे

गुरु मायबापा धांवा हो धांवा । पावा मज संकटीं ॥ २५ ॥ त्याच कालीं अक्कलकोटांत । प्रिय भक्त चोळाप्पाचे सदनीं स्थित । आनंदें खेळत असतां अवधूत । एकाएकीं गडबडून उठले ॥ २६ ॥ त्वरेनें उजवा हात खालीं घालून । आवेशानें 'हुं-हुं-हुं' ऐसें म्हणून । तात्काल दिधलें उचलून । आश्चर्य जन पाहती तें ॥ २७ ॥ जैसें हनुमंतें पृथ्वींत घालून कर । द्रोणागिरि उचलिला सत्वर । तैसें दत्तात्रेय-स्वामींनीं अभयकर । त्वरें उचलिलीं जहाजें तदा ॥ २८ ॥ एका क्षणांत जहाज बुडालेलें । चेंडूसारिखें वर येऊनि तरलें । हानि न होतां लाभकारक झालें । योगीश्वर-सहजलीलें ॥ २९ ॥ योगीश्वरांचे हातांतून घटिका एक । पाझरत होतें समुद्राचें क्षारोदक । सर्वांसि वाटलें विलक्षण कौतुक । श्रीगुरु-अतर्क्य-लीलेचें ॥ ३० ॥ नंतर आठ दिवसांत लक्ष्मण कोळी । समागमें घेऊनि घरमंडळी । अक्कलकोटासि आला त्या काळीं । दत्तात्रेय जगद्गुरु ॥ ३१ ॥ भक्त सेवक इतर जनांसहित । पेठेंत मठांतील सोप्यांत । प्रसन्नवदन विराजमान् स्थित । तेथें लक्ष्मणें जाऊनि ॥ ३२ ॥ घातलें साष्टांग दंडवत । करद्वय जोडूनि अनन्य शरणागत । होत्साता अष्टभाव कंठ सद्गदित । प्रेमाश्रुपात वाहतसे ॥ ३३ ॥ प्रार्थूनि शत रौप्य मुद्रिका । वस्त्रालंकार फलादिक जगन्नायका । अर्पूनि नैवेद्य ब्राह्मणादिकां । भोजन तांबूल दक्षिणेतें ॥ ३४ ॥ समर्थांचें आशीर्वचन संपादून । गुरु-उच्छिष्ट प्रसाद ग्रहण करून । संतुष्ट होत्साता गुरुस्मरण । करित गेला स्वस्थलीं ॥ ३५ ॥; असो पुणें येथील राहणारी । नेउरगांवकर जानकी द्विजनारी । कांहीं रोगें तिजला नेत्रीं । अंधत्व आलें अत्यंत ॥ ३६ ॥ पुष्कळ उपाय औषधोपचार । केले परंतु गुण नाहीं तिळमात्र । मग अक्कलकोटासि येऊन सत्वर । दत्त दिगंबर वंदिले ॥ ३७ ॥ जानकीस आंधळी दीन पाहून । कळवळले विश्वंभर दयाघन । गज-मूत्र नेत्रासि लावावें म्हणून । आशीर्वचन दिधलें ॥ ३८ ॥ स्वामि-समर्थांचे आज्ञेनुसार । तीनवार लाविलें नेत्रासि गज-मूत्र । तेव्हां जानकीस सत्वर । स्वच्छपणें दिसूं लागलें ॥ ३९ ॥

करूनि पूजा नैवेद्यादिक। पुण्यास गृहीं जाऊनि कौतुक। सांगूनि समर्थांची सेवक। होऊनि भक्ति करितसे ॥ ४० ॥; अक्कलकोटस्थ अवतारिक । सर्वत्रांसि परमागतिदायक । ऋषिमुनियोगीजनसेवित सुमुदोक । यतिनायक कृपाब्धि ॥ ४१ ॥ ज्यांचे चरणसेवेकरी नारीनर । सर्व जातींचे होते तीन शतांवर। त्यांत एक मारवाडी तीन संवत्सर । राहिला होता सेवक तो ॥ ४२ ॥ नित्य करीत निष्काम सेवा। सोडूनि न जाय देवाधिदेवा। त्याचे घरचीं पत्रें कीं स्वदेशीं पाठवावा। ऐशीं बहुत आलेलीं ॥ ४३ ॥ पुढें कांहीं दिवसांनीं। त्याचा पिता आणि काका दोन्ही। पादचारी अक्कलकोटीं येऊनि। समर्थ-चरणीं लागले ॥ ४४ ॥ मारवाड देशाचे फलादिक। आणिलेलें प्रभूंसी अर्पिलें सम्यक्। ते मारवाडी सांगती गोष्ट एक। चोळाप्पादिक भक्तांसि ॥ ४५ ॥ अहो योगीश्वरांसि विनंति करा। कीं देशीं पाठवावें आमुच्या कुमरा । मग श्रीस्वामी-दत्तदिगंबरा । चोळाप्पानें सांगून विनविलें ॥ ४६ ॥ तेव्हां योगीश्वर मारवाड्यास वदती जावें। गृहधर्मीं वसूनि येथें येत असावें। मग मारवाडी गमनार्थ बरवे। गाठोडें घेऊनि निघाले ॥ ४७ ॥ समर्थांसि घालूनि दंडवत। मारवाडी सेवक आज्ञा मागत। त्याकालीं समर्थ महारवाड्यांत । बैसले असतां तयासि ॥ ४८ ॥ त्वां जावें स्वदेशीं आज्ञापिती । तेव्हां मारवाड्यास वाटली खंती । गुरुपादपद्म-वियोग चित्तीं । साहवेना तयासि ॥ ४९ ॥ म्हणे हें भवतारका दर्शन। वारंवार व्हावें हो पतितपावन। मला कांहीं प्रसाद मिळावा म्हणून। करी नमन दंडवत ॥ ५० ॥ त्यासि म्हणती सच्चिदानंद। येथें व्यापार नाहीं देणें घेणें प्रसाद। पाहिजे असल्यास निर्विवाद। त्या अस्थिराशींतून कांहीं न्यावा ॥ ५१ ॥ परिसूनि लाजला मारवाडी। आज्ञा शिरीं मानी आवडीं। त्या अस्थिराशींतून तांतडी। चार अस्थि घेतल्या त्यानें ॥ ५२ ॥ त्या अस्थि वस्त्रांत वेष्टून। गाठोड्यांत गुप्त रीतीनें ठेवून। समर्थांसि दंडवत नमन। करूनि चोळाप्पा पूजाऱ्यासिही ॥ ५३ ॥ गेले देशीं मारवाडी-त्रय। घरांत अस्थि न न्याव्या ऐसा संशय। म्हणूनि गृह-

प्रवेशापूर्वीं अक्षय । घराचे बाजूस ठेविती ॥ ५४ ॥ अस्थीचें काढिलें वेष्टन । पूर्वीं तयांचें मुळींच नव्हतें वजन । आतां फारचि जड परिमाण । झालें काय नवल हें ॥ ५५ ॥ पुष्पासारिख्या हलक्या श्वेत असतां । अस्थि पीतवर्ण जड झाल्या त्वरिता । पाचारूनि पित्यास आणि चुलत्यास तत्त्वतां । दाविलें बावनकशी सुवर्ण तें ॥ ५६ ॥ घेतलें त्यांनीं तें सुवर्ण उत्तम । सदनीं ठेविलें संसार आराम । सर्वांसि जाहला आनंद परम । गुरु समर्थांचे गुण गाती ॥ ५७ ॥ पुढें विशाल सदन बांधिलें । मारवाडी बंधूचें लग्न झालें । दत्तात्रेयस्वामी-कृपें पावले । व्यापार सर्व वृद्धिंगत ॥ ५८ ॥ पुढें दोन वर्षांनीं मारवाडी सेवक । अक्कलकोटासि येऊनि शुद्ध भाविक । गुरुनाथपदीं दंडवत करूनि अनेक । लोकांसमक्ष उघड तो ॥ ५९ ॥ त्या अस्थींतील पांच तोळे सुवर्ण । आणिलेलें करी दत्तात्रेयार्पण । समर्थें घेऊनि तें कांचन पीतवर्ण । दिधलें भक्त चोळाप्पासि ॥ ६० ॥ समर्थांची अघटित करणी । अगम्य अतर्क्य देव-मनुष्यांलागूनि । मारवाडी सेवक करी विनवणी । सार्थक व्हावें नृजन्माचें ॥ ६१ ॥ तेव्हां गुरुनाथें प्रबोधूनि तयासि । धाडिलें आपल्या मारवाड देशीं । तो कृतार्थ होऊनि अहर्निशीं । भजन करी सर्वदा ॥ ६२ ॥; असो बडोद्यापासून वीस कोश दूरी । प्रसिद्ध तारक नर्मदा तीरीं । चांडोद करनाळी उभय क्षेत्रीं । नर्मदा-ओर-संगम असे ॥ ६३ ॥ त्या नर्मदातीरीं 'गंगनाथ' महादेव । स्थापित आहे तेथें दर्शनासि जाती सर्व । त्या स्थानांत 'ब्रह्मानंद' ज्यांचें नांव । ते ब्रह्मचारी बुवा वसती ॥ ६४ ॥ बहुत वर्षांपूर्वीं ब्रह्मचारी ते । सेतुबंध-रामेश्वर-यात्रेस गेले होते । तेव्हां अक्कलकोटीं जाऊन तेथें । दत्तात्रेय-दर्शन घेती ॥ ६५ ॥ अवतारिक पुरुषांची लीला अद्भुत । ब्रह्मचारी विलोकित । त्या समयीं कोणी दरिद्र व्याप्त । झालेला द्विज सदाचारी ॥ ६६ ॥ तो श्रीदत्तात्रेय-स्वामिपदां । वंदूनि अनन्य उभा ठेला तदा । तयासि आज्ञापिती कां रे आपदा । भोगिशी व्यर्थ द्विजोत्तमा ॥ ६७ ॥ ह्या अस्थि घेऊनि त्वां जावें । संसारीं सद्धर्मे सुखें वर्तावें । ऐसें परिसूनि प्रभुवाक्य बरवें ।

द्विज विचार करितसे ॥ ६८ ॥ अस्थीसि शिवावें मीं कैसें । प्रभु-आज्ञा उल्लंघणें महापातक घडतसे । धर्मशास्त्र सारासारविवेकें ऐसें । हरि-गुरु-आज्ञा पाळावी हें योग्य ॥ ६९ ॥ मग कांहीं अस्थि वस्त्रांत बांधून । एके बाजूस ठेवी तो नेऊन । तों फार दिसलें जड परिमाण । म्हणूनि वस्त्र सोडूनि दावी जनां ॥ ७० ॥ तेव्हां अस्थि नसून बावनकशी । उत्तम सुवर्ण झालें योग्य मोलासी । अत्याश्चर्य वाटलें सर्वांसि । कीं हृषीकेशी ईश्वर आहेत हे ॥ ७१ ॥ मग त्या आनंदासि पुसावें काय । जेथें प्रत्यक्ष परमात्मा दत्तात्रेय । तिष्ठूनि करी अघटित कार्य । जनांचें सहज दृष्टिमात्रें ॥ ७२ ॥ पाहूनि तटस्थ झाले ब्रह्मचारी । म्हणती हे पुरुष निःसंशय अवतारी । सर्वज्ञ सर्वसाक्षी सर्वांतरीं । सामर्थ्यातिशयें नांदती ॥ ७३ ॥ ब्रह्मचारी बुवांचा मनोदय । अंतर्साक्षित्वें जाणूनि आशय । प्रबोधिलें परमार्थ ज्ञान अद्वय । दत्तात्रेय-जगद्गुरूंनीं ॥ ७४ ॥ अस्थींचें उत्तम सुवर्ण झालें । ब्राह्मणाचें दरिद्र शीघ्र लयासि गेलें । मारवाड्यासि सुवर्ण देऊनि कृतार्थ केलें । कोळ्याचें तारिलें जहाज तें ॥ ७५ ॥ आम्हांसि अज्ञान-मदें वेषधारी नर । दिसती असूनि परमेश्वर । वृथैव माया-मोह प्रपंच-संसार । बंधनकारक सर्वथैव असे ॥ ७६ ॥ असो हे ब्रह्मानंद ब्रह्मचारी । वैराग्य योगसंपन्न सद्विचारी । स्थायिक वसती नर्मदातीरीं । गंगनाथ-ईश्वरस्थानांत ॥ ७७ ॥ त्यांनीं समक्ष पाहिलेल्या अपूर्व लीला । स्वानुभविक साग्र कथिल्या । त्या वामनदासें ग्रथित केल्या । गुरुलीलामृत-ग्रंथांत ॥ ७८ ॥ ब्रह्मचारी बुवांचें ऐंशीं वर्षांचें । वय असूनि शरीर सदृढ साचें । जितेंद्रिय सत्पुरुष सर्वांचें । आल्या गेल्याचें आदरातिथ्य करिती ॥ ७९ ॥; असो श्रीमद्दत्तदिगंबर । स्वामीसमर्थ परमेश्वर । सद्गुणलीला श्रोतीं सादर । सावधानें परिसावी ॥ ८० ॥ हैद्राबाद शहरचे राहणार । मराठे जातीचे विठ्ठल नामक नर । सद्गृहस्थ नम्र धार्मिक चतुर । होते दरिद्रें पीडित ॥ ८१ ॥ प्रसिद्ध चंदुलाल यांचे पौत्र । जे असती नरेंद्रबहादूर ।

त्यांची सेवा करूनि उदर। भरी विठ्ठल कुटुंबाचें ॥ ८२ ॥ परंतु त्यांत होईना निर्वाह । प्रपंच-क्लेश अनिवार दुःसह ।
तेणें चिंताग्रस्त निरुत्साह । होऊनि त्रासला जन्मासि ॥ ८३ ॥ म्हणे ईश्वर प्रारब्ध नाहीं अनुकूल । जें जें करावें तें तें
होत निष्फळ । तेथें एक साधु पुरुष निर्मल । तयासि पुसती कर्मदशा ॥ ८४ ॥ तो म्हणे अक्कलकोटासि कोणी ।
असती उत्तम पुरुष निर्वाणी । तें सद्दर्शन झालें असतां कल्याणी । प्रारब्धदशा उदय पावेल ॥ ८५ ॥ नंतर सिद्ध
होऊनि विठ्ठल । अक्कलकोटीं पातला तात्काल । अर्पूनि प्रेमभरें श्रीफल । परमात्मा सदाशिव नमिले ते ॥ ८६ ॥ शुद्ध
भाविक जाणूनि अंतःकरण । विठ्ठलासि सांगती सत्यनारायण । किती पाहिजे तुजला धन । घेऊनि काय करशील तें
॥ ८७ ॥ शरणागत बोले विठ्ठल । मायबापा कृपा करूनि जितुकें द्याल । त्याचा दानधर्म यथायोग्य चिरकाल ।
करीन संसारीं गुरुवाक्यें ॥ ८८ ॥ नंतर योगीश्वरांचें पूजन । यथाशक्ति करूनि ब्राह्मणभोजन । आशीर्वचन
प्रसाद घेऊन । गेला हैद्राबादेस ॥ ८९ ॥ नरेंद्र बहादुरासि प्रसाद । देऊनि निवेदिला योगींद्र-आशीर्वाद । त्यांनीं
वर्तणूक जाणूनि शुद्ध । विठ्ठलासि कामें सांगितलीं ॥ ९० ॥ नीतिमार्गें लक्षावधि द्रव्य । हातीं येऊनि वाढलें वैभव
भव्य । स्वामीसमर्थकृपें दिव्य । दानधर्म यथास्थित करितसे तो ॥ ९१ ॥ एक दोन वेळां प्रति संवत्सरीं ।
विठ्ठल जमादार येऊनि प्रज्ञापुरीं । योगीश्वर पूजन यथासांग करी । विप्र संतर्पण उत्तम ॥ ९२ ॥ पुढें विठ्ठलासि
जहागीर वेतन । मिळालें वंशपरंपरेंकरून । दत्तात्रेय-स्वामी झाले प्रसन्न । इहपर साधनें विठ्ठलासि ॥ ९३ ॥
विठ्ठलराय जमादार प्रसिद्ध । भाविक पूर्ण गुरुभक्त शुद्ध । श्रीकाशी प्रयाग गया प्रसिद्ध । महायात्रा करूनि
आला ॥ ९४ ॥ समर्थांचे आज्ञेनुसार वर्तणूक । करित होता विठ्ठल अत्युत्सुक । यासि पांच सहा स्त्रिया वैवाहिक ।
होऊनि पुत्रसंतान लाधलें ॥ ९५ ॥ श्रीमद्दत्तात्रेय-स्वामिकृपेंकरून । विठ्ठलाचे मनोरथ झाले पूर्ण । उदार सात्त्विक गुरु-

भक्तिसंपन्न । विठ्ठल जमादार प्रख्यात झाला ॥ ९६ ॥ गुरु परमात्मा अहार्निशीं । साह्य करितसे भोळ्या भक्त-भाविकांसि । नावडे उच्चनीचपणा भगवंतासि । केवळ भक्तिप्रिय होतसे ॥ ९७ ॥ अनेक कर्म-अनुष्ठान व्रत तप । योग याग तीर्थयात्रादि जप । करितां बहुत जन्म अमुप । श्रमती तथापि देव न भेटे ॥ ९८ ॥ तो शुद्ध भोळ्या भाविक भक्तां । प्रत्यक्ष भेटून होतो योगक्षेम चालविता । मुख्यत्वें पाहिजे अंतःकरणशुद्धता । तेणें सर्व साधतसे ॥ ९९ ॥ असो तो विठ्ठल जमादार पुण्यराशी । थोडे दिवसांत झाला कैलासवासी । पुत्रही तैसेच कुशल सर्व कार्यांसि । असती योग्य सांप्रत ते ॥ १०० ॥ दत्तात्रेय-स्वामींच्या भक्त-सेवकांत । विठ्ठल जमादार उदार सद्धर्मी विख्यात । ऐशा श्रीधर लीला अपरिमित । भवाब्धितारक असती ॥ १ ॥; असो श्रीमच्छंकराचार्य संकेश्वर-मठस्थ । देशोदेशीं संचार करित । अक्कलकोटासि होती विराजित । सहजानुसार एके वेळीं ॥ २ ॥ श्रीमंत मालोजी महाराज महीपाल । आणि दाजीबा भोसले कुशल । यांनीं सर्व व्यवस्था मर्यादशील । जगद्गुरूची उत्तम ठेविली होती ॥ ३ ॥ उत्कृष्ट सिंहासनीं बैसवून । शंकर-स्वामीचें केलें पूजन । गुरूचे पंक्तीस वैदिक पंडित ब्राह्मण । ज्योतिषी वैद्यादि बहुत ते ॥ ४ ॥ बैसले होते पात्रीं थाटमाटें । अहंकार मनीं भरला नेटें । तेथें चोळाप्पा आणि योगीश्वर एकटे । गेले समारंभ पहावया ॥ ५ ॥ या बसा आदरातिथ्य उत्थापन । न दिलें कोणी ते मदोन्मत्त द्विज जन । परी एक्या वृद्ध द्विजें योगीश्वरांसि आणून । पाटावरी बैसविलें ॥ ६ ॥ तेव्हां ते आपसांत कुजबुजती । हे यति पाहिजे त्यांचें अन्न भक्षिती । यांस एकीकडे बैसवा म्हणती । भ्रांतिष्ठ कर्मिष्ठ मदोन्मत्त ॥ ७ ॥ आपापल्या पात्रावरी मंडळी । संकल्प सुटण्याचे वेळीं जाऊन बैसली । इतुक्यांत शंकर-स्वामींची दृष्टि गेली । दत्तात्रेय-स्वामींकडे सहज ॥ ८ ॥ दिव्य प्रभा सुंदर मनोहर । अत्यंत तेजस्वी साक्षात् शिव महेश्वर । पाहूनि दचकले आचार्य शंकर । विस्मित झाले ते काळीं ॥ ९ ॥

सुवर्ण-रौप्याचे पात्रांत। पक्कान्नें वाढिलीं अनेक रसभरित। जगद्गुरु पाहती तों कृमी कीटक दिसत। नाहीं अन्न
पात्रावरी॥ ११० ॥ दोन चार वृद्ध विवेकी गृहस्थांस। आचार्यांनीं पुसिलें ऐसें विपरित होण्यास। काय कारण झालें तें आम्हांस।
निवेदावें सत्वर॥ ११॥ तेव्हां वदती वृद्ध द्विजवर। या समुदायांत योगीश्वराधीश्वर। साक्षात् दत्तात्रेय-पूर्णावतार। असूनि
अनादर जाहला॥ १२॥ हें जगद्गुरूंनीं विलोकिलें असून। अप्रशस्त अज्ञानी गर्विष्ठ द्विजांकडून। अपराध घडला मदें
महान्। योग्यता जाणत असतांही॥ १३॥ यापरी धर्मन्याय वाक्य जाणून। शंकराचार्यें झडकर उठून। दत्तात्रेय
स्वामीसन्मुख उभें राहून। प्रार्थना केली अपार॥ १४॥ अपराध क्षमा असावे वास्तविक। आपणचि जगद्गुरु आहां
निश्चयात्मक। आम्ही केवल व्यावहारिक। अधिकार मदें भ्रमलों कीं॥ १५॥ आतां क्षमा करूनि चलावें।
सिंहासनीं विराजित व्हावें। हें परिसूनि देवाधिदेवें। गालिप्रदानें अर्पिलीं॥ १६॥ म्हणती आम्ही जरी आहों भ्रष्ट यति।
परंतु आपल्या तीन शास्त्र्यांची उत्पत्ति। महंमद-यवनापासून आहे ती। कथा यांस यांचे मातेस विचारावी॥ १७॥
आपण जगद्गुरु धर्मसंस्थापक। कैसे बसविले पंक्तीस दुष्ट लोक। वपन केलें केशादि मस्तक। म्हणजे संन्यासी होतो
काय॥ १८॥ शास्त्र पढले म्हणून जातिभ्रष्ट। होत नाहींत काय चांडाल दुष्ट। वेद पढले म्हणजे अधर्मी पापिष्ट।
होत नाहींत काय सांगा हो॥ १९॥ जड मूढ अज्ञानी होती शुद्धविवेकी। भोळे भाविक तरती नर्कीं। परमेश्वरानुग्रहाविण
बाकी। ते केवळ देह-प्राण-पोषक॥ १२०॥ ऐसें ऐकूनि सगळे विस्मित। खालीं तोंडें घालूनि भ्रष्ट पतित।
भोजन करिती यथास्थित। यथेच्छ पदार्थ घेऊनि॥ २१॥ तांबूल दक्षिणा ग्रहण करून। अभिमानरहित शरण
होऊन। श्रीमद्दत्तात्रेय-स्वामीचरण। नमिती सकल स्तब्धपणें॥ २२॥ शंकराचार्यासि वंदूनि। गेले सर्व आपापले
सदनीं। पुढें उत्तम संभावना होऊनि। जगद्गुरु निघाले भृत्यादिसह॥ २३॥ संस्थानांतील पुष्कळ मंडळी। श्रीमंत

मालोजी महाराज त्या काळीं । सरदार-मानकऱ्यांची गर्दी झाली । संपूर्ण ब्राह्मण निघती बोळवावया ॥ २४ ॥ शंकराचार्य तेव्हां प्रसाद सर्वांसि । देऊनि बोधिती शांत गंभीरतेसीं । तुमच्या राजधानींत अपूर्व ऐशी । पुरुषोत्तम परमेश मूर्ति असे ॥ २५ ॥ ते मनुष्य मुळींच नाहींत । साक्षात् ईश्वरावतारी आहेत । अंतर्साक्षी अद्वितीय अनंत । त्यांचें छलन करूं नये ॥ २६ ॥ अनन्य प्रेम ठेवित जावें । यांतचि होईल कल्याण अघवें । हें सर्वांनीं अवश्य लक्ष्यांत ठेवावें । आमचें वाक्य बोधप्रद ॥ २७ ॥ शेवटीं दत्तात्रेय-स्वामीची भेट । घेऊनियां प्रेमयुक्त । श्रीशंकराचार्य श्रेष्ठ । पालखींत विराजले ॥ २८ ॥ हे शंकराचार्य वेदशास्त्रसंपन्न । दया-क्षमा-शांतियुक्त प्रसन्न मन । तीव्रवैराग्ययुक्त ब्रह्मज्ञान । होते जगद्गुरु उत्तम ते ॥ २९ ॥ दोन योजनेंपर्यंत । बोळविण्यास गेलेले जन बहुत । आपले सदनीं पातले परत । गाती गुण जगद्गुरूचे ॥ १३० ॥ श्रीमंत मालोजीराव महाराज नृपवर । कैलासवासी जाहल्यावर । आणि श्रीमद्दत्तात्रेय दिगंबर । झाल्यावरी अदृश्य ते ॥ ३१ ॥ दश संवत्सरांनंतर । श्रीशंकराचार्य गुरुवर । अक्कलकोटासि सन्मानें थोर । येऊनि राहिले स्वल्प दिन ॥ ३२ ॥ दोन शत मनुष्यें समागमें घेऊनि । पालखींत बैसूनि मशाली लावूनि । बुधवार-पेठेंत मुख्य समाधिस्थानीं । विराजमान् जाहले ॥ ३३ ॥ पालखींतूनि उतरूनि । पायींच्या खडावा काढूनि । शिष्याचे स्कंधावरी हस्त ठेवूनि । सभामंडपांत विराजले ॥ ३४ ॥ श्रीमद्दत्तात्रेय-स्वामी सर्वेश्वर । ऐशा उच्च स्वरें पाचारूनि ते शंकर । समाधीसमीप येऊनि स्थिर । उत्तमासनीं स्थित झाले ॥ ३५ ॥ अवलोकूनि स्थापित देवता इष्ट । शंकराचार्य जाहले संतुष्ट । समाधि-पूजन आरति सर्वाभीष्ट । स्वहस्तें विध्युक्त करिती ॥ ३६ ॥ संस्कृत भाषेंत उत्तम अष्टक । रसभरित सरलार्थ श्लोक । श्रीदत्तात्रेय-स्वामींवरी रचूनि सम्यक् । तोषविले लोक सकल तदा ॥ ३७ ॥ ज्यांत दत्तात्रेय-स्वामींचीं अमानुषिक । अवतारकृत्यें अलौकिक । संक्षेपें रचिलीं पारमार्थिक । जगद्गुरूंनीं

क्षणमात्रें ॥ ३८ ॥ एक घटिका एकाग्र चित्त सम्यक् । करूनि ठेविलें समाधीवरी मस्तक । संतुष्ट होऊनि यतिनायक ।
साक्षात्कारें प्रसन्नता ॥ ३९ ॥ मग वस्त्र-श्रीफलादि घेऊन । उच्च स्वरें जयजयकार नमन । शंकराचार्य प्रसन्न-वदन ।
सभामंडपादि विलोकिती ॥ १४० ॥ म्हणती आम्ही यतिदर्शनासि । जाऊं नये परंतु हे परमात्मा हृषीकेशी ।
श्रीमत्परमहंस भक्तजनमानसीं । परमार्थिकसत्तें व्यापक असती ॥ ४१ ॥ त्या परमपुरुषाचें समाधिस्थान । अवश्य वंदिलें
पाहिजे निरभिमान । ऐशीं सदुपदेश वाक्यें बोधून । सर्व जनांस संतोषविती ॥ ४२ ॥ सन्मानपूर्वक स्वस्थानीं
विराजले । पुढें पूजा संभावना होऊनि निघाले । सहस्रावधि मनुष्यांसहित गेले । दुसरे ग्रामासि लोकादरें ॥ ४३ ॥
योग्य शांत परम थोर । ज्यांची परमार्थपर दृष्टि निरंतर । गुरुत्व सत्ताधिकार । नानाप्रकारें शोभती ॥ ४४ ॥ तेचि
महात्मा जगद्गुरु शंकर । तेचि अवतारिक पुरुष पूज्य सर्वत्र । थोरपणा टाकूनि परोपकार । करिती निर्लोभ निःस्पृहत्वें
॥ ४५ ॥ जयांच्या वेदप्रणित धर्ममार्गें । लोक वर्तती नित्य सानुरागें । गुरु-परमेश्वरानुग्रहयोगें । उत्तम गतीस
प्राप्त होती ॥ ४६ ॥; असो एक ब्राह्मण स्त्री चिमा विधवा । अक्कलकोटीं राहूनि योगींद्र देवा । भजूनि भिक्षा मागूनि
तेधवां । निर्वाह भजन करितसे ॥ ४७ ॥ विश्वंभर बुवा बळवंत । त्यांचे समागमीं चिमा वसत । अक्कलकोटाबाहेर
एके कालांत । श्रीरामचंद्राचे विहिरीतटीं ॥ ४८ ॥ श्रीमद्दत्तात्रेय यति परात्पर । खेळत बैसले होते तो चमत्कार ।
श्रोतीं परिसावा चित्तें सादर । गुरुलीला अपार अगम्य ॥ ४९ ॥ समर्थें चिमेचा तांब्या वापींत । टाकूनि दिधला
जलभरित । चिमा विनवी अहो दत्तावधूत । उदक प्राशनास पात्र नसे ॥ १५० ॥ समर्थ वदती वापींत टाकूनि उडी ।
घ्यावें काढूनि जलपात्र तांतडीं । तेव्हां विचार न करितां पलघडी । चिमेनें वापींत उडी टाकिली ॥ ५१ ॥ तरतां पोहतां
येईना उदकांतरीं । गटांगळ्या खाऊनि बुडाली ते नारी । काढावया लोक उतरती सत्वरी । निवारिती योगीश्वर तदा ॥ ५२ ॥

* * *

मरणार नाहीं तिला झालें काय। चेष्टा करिते रंडा अक्षय। मग चिमा रडत धाय धाय। आपले आपण तरूनि जगली ॥ ५३ ॥ संरक्षिता समीप असतां नारायण। कैसा गत होईल प्राण। मुहूर्तपर्यंत उदकांत बुडाली असून। समर्थकूपें वांचली ॥ ५४ ॥; असो अक्कलकोटचा राहणार। गोविंद नामक जाती शूद्र। त्यासि वेड लागलें फार। भलभलते चाळे करितसे ॥ ५५ ॥ एके दिवशीं दत्तावधूत। प्रज्ञापुरीं होते भांडारखान्यांत। तेथें दत्तात्रेयाचें स्थान विराजित। मधुरजलभरित कूप असे ॥ ५६ ॥ तेथें स्वामिराज दोन प्रहरीं। निजले होते पलंगावरी। गोविंदा वेड्यानें येऊनि ते अवसरीं। केलें विपरित कृत्यासि ॥ ५७ ॥ समर्थांचे दोन्ही पायांस। दोरी बांधून लाविली स्वकंठास। फरफर कंठें ओढून मार्गास। चालता होऊं लागला ॥ ५८ ॥ मग सुंदराबाई मोठ्यानें ओरडून। धांवा धांवा म्हणे सोडवा शीघ्र येऊन। तेव्हां गिरि गोसावी धांवले जन। सोडिलें बंधन यतिचरणांचें ॥ ५९ ॥ गोविंदासि मारूं नका ऐसें। योगीश्वर वदती दयावशें। दुष्ट पीडा सहन करिती क्षम्य मानसें। दयासागर कृपालुत्वें ॥ १६० ॥ पुढें तो गोविंदा नव्या विहिरींत। जलपान करितां भारी उदकांत। बुडून मरण पावला त्वरित। हरिगुरुलीला विलक्षण असे ॥ ६१ ॥; एकदां पुणें मुंबईचे लोक सुधारलेले। दत्तात्रेय-स्वामींच्या दर्शनासि आले। तेव्हां समर्थ नग्न दिगंबर ठेले। उभे कटिवरी हस्त ठेवूनि ॥ ६२ ॥ ते छलक दर्शनार्थ उभे असतां। स्वनेत्रीं प्रत्यक्ष अवलोकितां। न दिसती अवधूत परमात्मा तत्त्वतां। तेव्हां छलक दचकले ॥ ६३ ॥ सुधारकांसी झाला पश्चात्ताप। म्हणती आड आलें पाप। प्रत्यक्ष समोर परमात्मास्वरूप। असूनि आम्हां दिसेना ॥ ६४ ॥ अनुतापेंकरूनि नवस सायास। करुणा भाकिती दर्शन द्यावें आम्हांस। मग कळवळले जगन्निवास। दर्शन दिधलें सुधारकां ॥ ६५ ॥ दुसरे दिवशीं सहस्र ब्राह्मणभोजन। केलें दत्तात्रेय-स्वामींचें पूजन। अनन्य शरणागत होऊन। दास झाले सुधारक ॥ ६६ ॥ समर्थ

मनांतील गोष्टी सांगती । सामान कां ठेविलें स्टेशनावरतीं । तेव्हां लाजूनि साष्टांग नमिती । वदती अपराध क्षमा व्हावे ॥ ६७ ॥ देहाभिमान झाला गलित । उदयासि पावलें पूर्व सुकृत । अंतरीं होऊनि सद्गदित । वारंवार चरण नमिती ॥ ६८ ॥ आज्ञा प्रसाद आशीर्वचन । घेऊनि गेले स्वस्थानीं प्रसन्न वदन । श्रीगुरुलीलामृत करिती प्राशन । सद्भक्तियुक्त सर्वदा ॥ ६९ ॥ पुढिले अध्यायीं रसाळ कथन । श्रोतीं व्हावें सावधान । एकाग्र चित्तें करूनि श्रवण । परमार्थलाभ साधावा ॥ १७० ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । एकचत्वरिंशाध्याय गोड हा ॥ १७१ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे एकचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ॥ ४१ ॥

श्रीगुरुदेवदत्त-स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय बेचाळिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्गुरुदेवदत्त-दिगंबराय नमः ॥ ॥ गुरु शिष्यासि कळावया निर्विवाद । बृहदारण्यांतील याज्ञवल्क्य-जनकसंवाद । बोधिती लक्षण अनुवाद । आणि विधिरूप श्रुत्यर्थादि ॥ १ ॥ प्रत्यक्षादिक प्रमाणें करून । सर्व लोकांसि ज्ञात जो अर्थ गहन । त्या अर्थासि कथन करणारें वचन । त्या वचनासि शास्त्रवेत्ते 'अनुवाद' म्हणती ॥ २ ॥ 'अग्नि हिमाचें भेषज' जैसें । सर्व लोकांसि प्रत्यक्ष वचन ऐसें । जी अग्नींत हिम-निवृत्तीची कारणता असे । तियेसि कथन करितसे ॥ ३ ॥ या कारणानें तें वचन अनुवादरूप । तैसें संपूर्ण जगत् असे चेतनरूप । ऐसें श्रुतिवचन अनुवादरूप । तेव्हां होईल शिष्या रे ॥ ४ ॥ जेव्हां संपूर्ण जगताविषयीं अस्मदादिक । जीवासि चैतन्यरूप सिद्ध होईल प्रमाणानें प्रत्यक्षादिक । परंतु जगताविषयीं जीवासि अस्मदादिक । प्रत्यक्ष-प्रमाणानें चैतन्यता सिद्ध नाहीं ॥ ५ ॥ म्हणून सर्व जगतासि चैतन्यरूप । कथन करणारी श्रुति नाहीं अनुवादरूप । आणि जगतासि चैतन्यरूप । म्हणणारी श्रुति विधिरूप आहे ॥ ६ ॥ ऐसा वादीचा दुसरा पक्ष नाहीं संभवत । कां तरी जो अर्थ प्रत्यक्षादि-प्रमाणानें नाहीं पूर्व ज्ञात । तथा ज्या अर्थज्ञानानें फलप्राप्ति होत । आणि ज्या अर्थाचा प्रत्यक्ष प्रमाणानें बोध होत नाहीं ॥ ७ ॥ ऐशा अर्थासि विधिरूप श्रुति बोधितसे । या प्रकारचा अर्थ अद्वितीय आत्माच असे । यास्तव सर्व जग चैतन्य आत्मरूप विलसे । ऐसें म्हणणारी जी श्रुति असे ॥ ८ ॥ ती श्रुति जड-जगताविषयीं । चैतन्यरूपता बोधित नाहीं । जैसें ही रज्जु आहे पाहीं । या प्रकारचें वचन ॥ ९ ॥ ही रज्जु आहे ऐसें वचन । सर्पत्व भ्रमाची निवृत्ति करून ।

रज्जुत्वासीच करिते बोधन। तैसें हें जगत् चैतन्यात्मा रूप आहे ॥ १० ॥ जगत् चैतन्यरूप आहे ऐसें श्रुति-वचन ।
द्वैत भ्रमाची निवृत्ति करून। अद्वितीय आत्म्यासीच करितें बोधन। जगद्भ्रम निरसूनि ॥ ११ ॥ तेथें जगत् अद्वितीय
ब्रह्मरूप असे। ऐशा अर्थासि जी श्रुति बोधितसे। ती श्रुति तत्पदार्थाचे शोधनवशें। करीत असे बोधन ॥ १२ ॥
आणि हें सर्व जगत् चराचररूप । आहे चैतन्यात्मस्वरूप । ऐसें बोधणारी श्रुति तत्पदार्थरूप। परमात्म्यासि चैतन्यरूपाचें
विधान करिते ॥ १३ ॥ आणि हें जगत् आत्मारूप आहे। ऐसा अर्थ जी श्रुति बोधिताहे। ती श्रुति आत्म्यासि
सर्वरूपता विधान करिताहे। बोधनद्वारें त्वं-पदार्थाचे शोधनासि ॥ १४ ॥ आणि तत्पदार्थाचा अर्थ परमात्मा आत्मारूप
असे। ऐशा अर्थासि जी श्रुति बोधितसे। ती श्रुति बोधन करितसे। जीवेश्वराचा अभेद ॥ १५ ॥ कोणी श्रुति तत्पदार्थ-
शोधनप्रकार । आणि कोणी श्रुति-त्वं-पदार्थ-शोधन बोधी साचार । आणि कोणी तत्-त्वं-पदार्थाचा अभेद विचार। करित
असे बोधन ॥ १६ ॥ अज्ञान आणि अज्ञानकार्योपाधि त्यागून। त्या उपाधिहून करूनि भिन्न। जें जाणणें असे शुद्ध
चैतन्य। त्यासि तत्-त्वंपदार्थ-शोधन म्हणताति ॥ १७ ॥ ऐसा श्रुति-अभिप्राय न स्वीकारून । जे वादी पूर्वोक्त श्रुति-
वचन। जडचैतन्य-तादात्म्य-बोधाकडे लावून । कल्पना करिती अनिवार ॥ १८ ॥ आणि त्या चैतन्यआत्म्याचे तादात्म्येंकरून।
सर्व जड जगतासि मानिती चेतन । त्या वादीस पुसावें कीं आत्मा चेतन । त्याचा जड जगताशीं तादात्म्य-
संबंध आहे कां ॥ १९ ॥ त्या तादात्म्य-संबंधाचें संबंधीपण। चैतन्यांत आणि जड जगतांत आहे समान। यास्तव जैसें
आत्मतादात्म्य-संबंधेंकरून। वादी जड जगासि चैतन्यरूप मानितसे ॥ २० ॥ तैसें जड-जगत्-तादात्म्य-संबंधेंकरून ।
चैतन्यात्म्यासि जड जगद्रूपपण। वादी अंगीकार काय म्हणून। करित नाहीं ॥ २१ ॥ कां तरी त्या वादीनें चैतन्यात्म्यासि
सहजें। जडरूपता अंगीकारिली पाहिजे। परंतु वादी आत्म्यासि जडता कोणत्याही ज्ञानकाजें। स्वीकारित नाहीं

॥ २२ ॥ यास्तव जड प्रपंचासि चैतन्यरूपता । बोधाविषयीं श्रुतीचें तात्पर्यही नसतां । किंवा जड जगतासि आहे चैतन्यरूपता । ऐशा अर्थीं श्रुतीचें तात्पर्य संभवत नसे ॥ २३ ॥ कां तरी ज्याच्या अर्थाविषयीं बुद्धिमान् पुरुषाचा । विरोध होत नसे अनुभवाचा । त्या त्या अर्थाविषयीं अविरुद्ध साचा । अनुभविक वेदतात्पर्यार्थ होतसे ॥ २४ ॥ जर अनुभवविरुद्ध अर्थाविषयीं । वेद-भगवानाचें तात्पर्य होई । तर 'आदित्यो यूपः' याचा अर्थ पाहीं । यज्ञभूमींत काष्ठस्तंभ आदित्य आहे ॥ २५ ॥ ऐशा वेदवचनेंकरून । आकाशस्थित जो प्रकाशक सूर्य भगवान् । तो प्रकाशरूप काष्ठस्तंभसंगें करून । तादात्म्यसंबंध पावेल कां ॥ २६ ॥ आणि सूर्याचें काष्ठमय यूपसंगें । तादात्म्य सर्व लोकानुभवाविरुद्ध लागे । म्हणून त्या विरुद्ध अर्थाजोगें । वेदवचनतात्पर्य नाहींच ॥ २७ ॥ यास्तव त्या काष्ठ-यूपाचे स्तुतीविषयीं । 'आदित्यो यूपः' या वचनाचें तात्पर्य आहे पाहीं । तैसेंचि 'यजमानः प्रस्तरः' या वचनाविषयीं । दर्भमुष्टीरूप जो प्रस्तर असे ॥ २८ ॥ तो प्रस्तर यज्ञकर्ता यज्ञमानरूप असे साचा । ऐशा वेदवचनें यजमान-पुरुषाचा । प्रस्तरसंगें जो सिद्ध व्हावयाचा । तादात्म्यसंबंध तो होत नसे ॥ २९ ॥ आणि यजमानाचें त्या दर्भप्रस्तरसंगें । तादात्म्य सर्व लोकानुभवें विरुद्ध लागे । म्हणून त्या विरुद्ध अर्थाजोगें । वेदवचनतात्पर्य नाहींच तें ॥ ३० ॥ परंतु त्या दर्भप्रस्तराचे स्तुतीविषयीं । त्या वचनाचें तात्पर्य आहे पाहीं । जर प्रस्तर-यजमानाचे अभेदाविषयीं । वचनतात्पर्य असतें तें ॥ ३१ ॥ तर त्या प्रस्तराचा दाह केल्यानें अग्नींत । यजमानाचाही होईल दाह खचित । मग सकल यज्ञादि कर्मांचा होत । लोप तेव्हां सर्वोपरी ॥ ३२ ॥ यावरून हा अर्थ झाला सिद्ध । बुद्धिमान पुरुषाचा अनुभव अविरुद्ध । जो आहे वचनार्थ शुद्ध । त्या अर्थाविषयीं वेदतात्पर्य असतें ॥ ३३ ॥ आणि जड जगतासि चैतन्यरूपता । सर्व लोकानुभवें आहे विरुद्धता । यास्तव त्याविरुद्ध अर्थाविषयीं तत्त्वतां । वेदाचें तात्पर्य नाहींच ॥ ३४ ॥ किंवा जो अर्थ अधिकारी पुरुषाचें । पुरुषार्थ-

कारण होतसे साचें । त्या अर्थासीच बोधितसे वचन वेदाचें । ऐसा वेदवेत्ते पुरुषांचा सिद्धांत आहे ॥ ३५ ॥ आणि चैतन्यात्मा जड जगद्रूप । आहे जड जगत् चैतन्यात्मारूप । ऐशा अर्थज्ञानानें देखील अल्प । पुरुषार्थप्राप्ति होत नसे ॥ ३६ ॥ म्हणूनि त्या निष्फळ अर्थाच्या बोधाविषयीं । वेदभगवानाचें तात्पर्य मुळींच नाहीं । किंवा जैसें प्रिय पदार्थाचे दर्शनार्थ पाहीं । उन्मीलन केलेले नेत्र ते ॥ ३७ ॥ ते चक्षु अप्रिय पदार्थांसिही प्रकाशती । तैसें पुरुषार्थरहित अर्थासि वेदश्रुति । कधींही न कथन करिती । अपुरुषार्थ-अर्थासि ॥ ३८ ॥ पुरुषार्थरहित अर्थासि जरी । वेद भगवान् कथन करी । मग 'वेद' या शब्दाचा अर्थ वेदामाझारीं । घटणार नाहीं सर्वथा ॥ ३९ ॥ कारण जे यथार्थ पुरुषार्थासि जाणविती । ऐशा अधिकारी पुरुषांप्रति । वेद-श्रुति ऐसें म्हणती । बुद्धिमान् तत्त्वज्ञ पुरुष ते ॥ ४० ॥ किंवा व्याकरणरीत करितां ग्रहण । 'विद्' धातुयोगेंकरून । वेद-शब्दाची सिद्धि होऊन । विद् धातूचा 'ज्ञान' अर्थ होतसे ॥ ४१ ॥ आणि पुरुषार्थंही असती दोन । एक 'मुख्य' पुरुषार्थ दुसरा 'गौण' । येथें मुख्य पुरुषार्थ 'सुखरूप' फल असून । त्या सुखाचें 'साधन' गौण पुरुषार्थ असे ॥ ४२ ॥ आणि आत्म्याविषयीं जडजगद्रूपता । तैशी जड जगतासि चेतनात्मरूपता । हे दोन्ही प्रकारचे अर्थ तत्त्वतां । सुखरूप नाहींत कदापि ॥ ४३ ॥ हे दोन्ही अर्थ 'सुखरूप' नसून । कोणत्याही सुखाचें नाहींत साधन । उलटें जन्म-मरणादिक दुःखाचें कारण । आहेत दोन्ही अर्थ ते ॥ ४४ ॥ ऐशा अपुरुषार्थ-अर्थाविषयीं । अधिकारी पुरुषासि कधींही । वेद भगवान् प्रेरणा करणार नाहीं । यदर्थीं दृष्टांत परिसावा ॥ ४५ ॥ पुत्राच्या हिताची इच्छा करणारा पिता । पुत्रासि अपुरुषार्थरूप अर्थाकरितां । प्रेरणा करित नाहीं सर्वथा । तैसा वेद भगवान् दयाल ॥ ४६ ॥ सर्व जीवांची कल्याणेच्छा जया जाण । ऐसा अनादि अपौरुषेय जो वेद भगवान् । तो वेद जीवांसि अपुरुषार्थ-अर्थाविषयीं प्रेरण । करणार नाहीं सर्वथा ॥ ४७ ॥ जर अपुरुष-अर्थाविषयीं वेद बोधील ।

तर मग वेद अप्रमाणरूपता पावेल । म्हणून वेद प्रमाणरूप सिद्ध चिरकाल । सत्य पुरुषार्थास्तव प्रेरणा करितो ॥ ४८ ॥ हें सर्व जगत् चैतन्यात्मारूप असे । वेद-श्रुतीच्या वचनाचें ऐसें । जड-चेतनाच्या अभेदार्थीं तात्पर्य नसे । तर मग कोणत्या अर्थीं तात्पर्य आहे ॥ ४९ ॥ ऐशी वादीची शंका झाल्यावरून । सिद्धांती करिती योग्य समाधान । जो अर्थ प्रत्यक्षादि-प्रमाणेंकरून । पूर्व ज्ञात होत नसे ॥ ५० ॥ तथा ज्या अर्थाचा अन्य प्रमाणेंकरूनही । कदाकालीं बोध होतच नाहीं । तथा ज्या अर्थानें फलप्राप्ति होतसे पाही । ऐशा अर्थ-बोधनार्थ वेदतात्पर्य आहे ॥ ५१ ॥ ऐसा अर्थ स्वप्रकाश अद्वितीय । आनंदस्वरूप आत्मा आहे एक अक्षय । यास्तव अद्वितीय आत्म्याचें बोधनार्थीं तात्पर्य । आहेच वेदभगवानाचें ॥ ५२ ॥ प्रपंचरूप द्वैतासि देखणारे । जे कुतर्की ते अनंत जन्म घेऊनिही सारे । परमात्म्यासि जाणूं न शकती वादी रे । कोणत्याही प्रकारें कधींही ॥ ५३ ॥ जर कदाचित् वेदप्रमाणाहूनि भिन्न । कोणत्याही प्रमाणेंकरून । आत्म्याचें यथार्थ होईल जरी स्वरूपज्ञान । तरीं तार्किक जे नैय्यायिकादिक ॥ ५४ ॥ ते जरी असती बहुत कुशल । तथापि आत्मस्वरूप यथार्थ जाणूं न शकती निश्चल । यावरूनि हें जाणिलें जातें निर्मल । कीं एक्या वेदार्थज्ञानेंचि आत्मप्राप्ति होते ॥ ५५ ॥ आणि श्रुतिप्रमाणाहूनि भिन्न । केवल तर्क-कुतर्कैंकरून । आत्मस्वरूपाचें यथार्थ ज्ञान । कदा जाणिलें जाणार नाहींच ॥ ५६ ॥ आणि मुमुक्षु जनांच्या बुद्धीच्या ठायीं । प्रपंचाचे अभावासि आरूढ करावया पाहीं । श्रुति भगवती यथान्यायीं । मुमुक्षुजनां प्रबोधी ॥ ५७ ॥ ज्यापरी अज्ञानेंकरूनि रज्जूंत । सर्प दंड जलधारा माला इत्यादि द्वैत । अज्ञानेंकरूनि होय प्रतीत । परी सत्य ज्ञानें एक रज्जूच असे ॥ ५८ ॥ तैसें परमात्म्याहूनि भिन्न । हा मायिक दृश्य द्वैत प्रपंच संपूर्ण । तिन्ही कालांत मुळींच नसून । आत्माचि एक नांदतसे ॥ ५९ ॥ याप्रकारें द्वैतप्रपंचाचा निषेध करून । मुमुक्षूसि अद्वितीय आत्म्याचें बोधन । सर्वदा करितसे वेद भगवान् । मातेच्यासमान

कृपालुत्वें ॥ ६० ॥ यास्तव अद्वितीय आत्म्याविषयींच । त्या वेद-श्रुति-वचनाचें तात्पर्य आहे साच । या अर्थाविषयीं संशय कल्पना कधींच । नसावी हें विहित आहे ॥ ६१ ॥; ऐसा वेदोनारायण साक्षात् । श्रीमद्दत्तात्रेय स्वामी अवधूत । त्या परमात्मगुरूचें लीलामृत । श्रोतीं हर्षयुक्त परिसावें ॥ ६२ ॥ नळदुर्ग तालुक्यांत केसे-गांव । म्हणून आहे तयाचें नांव । तें अक्कलकोटापासून आठ नव । कोश आहे समीप ॥ ६३ ॥ त्या केसे-गांवचा पाटील जंगम वाणी । अप्पाराव नामें सद्धर्मपरायणी । एके वेळीं स्वामिराजशिरोमणि । सोलापुरच्या मार्गांत कुंभारीसमीप ॥ ६४ ॥ रामपुर नामक ग्रामीं लोकाग्रहें । जाऊनि राहिले लवलाहें । तेथें अत्यंत प्रेमपूर्वक जनसमुदायें । आदरातिथ्य केलें समर्थांचें ॥ ६५ ॥ त्या कालीं तेथें केसे-गांवचा पाटील । अप्पाराव येऊनि विनवी प्रांजल । श्रीमद्दत्तात्रेय-स्वामींचीं चरणकमलें निर्मल । विराजित व्हावीं मम सदनीं ॥ ६६ ॥ केसे-गांवीं चरणरज गृहीं । लागल्याविना मी अन्न खात नाहीं । ऐसा शुचिर्भूत गुरुभक्त आग्रही । उपोषणें करित बैसला ॥ ६७ ॥ तेव्हां अक्कलकोटाहून नरसिंहराव भोंसले । मेणा भोई घेऊन आले । तैसेंचि समीप ग्रामींचे भक्त भले । स्वग्रामीं येण्या विनविती ॥ ६८ ॥ नंतर स्वामिराज भगवान् । अप्पा पाटलाचे स्वप्नांत जाऊन । त्यास सांगती उशाकडे बसून । त्रय जन्मही तव प्रारब्धोदय नसे ॥ ६९ ॥ परी तव सुवर्तणूक भक्ति । जाणूनि आम्हांस वाटे प्रीति । तुज दोन पुत्र एक कन्या संतति । थोडे दिवसांत प्राप्त होईल ॥ ७० ॥ आम्ही प्रातःकालीं उदयिक । मेण्यांत बसून अक्कलकोट मार्गें तात्कालिक । जात असतां आडवें पडावें क्षणेक । म्हणजे तुमचे ग्रामीं येऊं ॥ ७१ ॥ आतां तुम्हीं संशय टाकून । करावें स्वस्थ भोजन । ऐसें आशीर्वचन अर्पून । अदृश्य झाले समर्थ ते ॥ ७२ ॥ परंतु स्वामीसमर्थांचे हातांतील । भगवें मुखवस्त्र प्रासादिक निर्मल । भूमीवरी राहिलें तें तात्काल । जागृत होऊनि पाटलानें वंदिलें ॥ ७३ ॥ म्हणे हें स्वप्न अथवा जागृति । स्वामिराज तर दूर गृहांत असती । मजला बोधून

वस्त्र-प्रसाद प्रीतीं । अर्पिला तें आश्चर्य वाटतसे ॥ ७४ ॥ मग गुरुआज्ञेनुसार स्नान-पूजन । करूनि स्वल्प उपहार भजन । करितां उगवला दिन । तेव्हां शौच-स्नानादि आटोपिलें ॥ ७५ ॥ स्वामीसमर्थांचें दर्शन सन्मुख । घेत उभा राहिला भक्त प्रमुख । समर्थांचें मंगलस्नान आरती सुरेख । होऊन भक्त गुरुनामें गर्जती ॥ ७६ ॥ दर्शनार्थ लोकांची जाहली दाटी । इतक्यांत दत्तात्रेयगुरु जगजेठी । अप्पा पाटलास म्हणती ऐक गोष्टी । आमचें मुखवस्त्र कोठें असे ॥ ७७ ॥ हें परिसूनि लोक पडले विचारांत । मग अप्पानें निवेदला स्वप्न-वृत्तान्त । तेव्हां सर्वांसि वाटलें आश्चर्य बहुत । म्हणती हे परमेश्वर प्रत्यक्ष असती ॥ ७८ ॥ इतुक्यांत मेण्यांत झाले विराजित । विश्वेश्वर सद्गुरु दत्तावधूत । सर्व लोक आपापल्या ग्रामांत । नेण्याकरितां प्रार्थिती ॥ ७९ ॥ एकचि गर्जला जयजयकार । 'दत्तात्रेयस्वाामिसमर्थ'नामाचा गजर । लोक नमन करिती वारंवार । तों मेणावाहक चालले ॥ ८० ॥ धोत्री आरळी कुंभारी । इत्यादि ग्रामींचे जन उदास झाले भारी । म्हणती करुणार्णवा दीनावरी । कृपा असावी सदोदित ॥ ८१ ॥ भालीं भस्म केशरी सुगंध । मस्तकीं टोपी भरजरीची शुद्ध । अंगीं सुगंध उटी चर्चिली अगाध । काषायवस्त्र प्रकाश करी ॥ ८२ ॥ दिव्य मनोहर भगवन्मूर्ति । प्रसन्नवदनें आशीर्वचन अर्पिती । सुखें नांदा जाऊन सदनाप्रति । दया सर्व भूतीं असो द्या ॥ ८३ ॥ चरणकमलें अति कोमल आरक्त । पायीं पादुका सुंदर सुशोभित । दर्शनेंचि आकर्षण होई चित्त । समाधान वाटे सर्वोपरी ॥ ८४ ॥ भागीरथी गाय वत्ससहित । दत्तात्रेय-स्वामीसमीप विराजित । अक्कलकोटमार्गें वाहक त्वरित । चालूं लागले मेणा घेऊनि ॥ ८५ ॥ चोळाप्पा कृष्णाप्पा श्रीपादांनीं । संतोषविलें लोकांसि प्रसाद देऊनि । आप्पाराव पाटील निराश होऊनि । आडवा पडला मार्गांत ॥ ८६ ॥ पाटील रडून तळमळ करी । म्हणे भगवंता चला मम ग्रामीं लौकरी । कृपा व्हावी दीन दासावरी । उपेक्षूं नका हो दीनबंधु ॥ ८७ ॥ बालार्क-प्रतिबिंब श्रीमुखावरी । प्रकाशलें तेव्हां श्रीमुख-

बिंबामाझारीं । तो परमानंदस्वरूप प्रकाश चराचरीं । हृदयानंदकारक व्यापला ॥ ८८ ॥ तों अकस्मात् दत्तात्रेय वदती । जन हो आपण संतुष्टयुक्त जावें गृहाप्रति । सुखी असावें करूनि महेश्वरभक्ति । आम्ही जातों केसे-गांवीं ॥ ८९ ॥ नंतर योगीश्वराचें आशीर्वचन । संपादुन स्वगृहीं गेले सर्व जन । गुरुलीला श्रद्धाभक्तियुक्त गायन । करिती सर्वदा तारक ॥ ९० ॥ मग नरसिंहराव भोंसल्यासह भक्तजन । केसे-गांवासमीप पातले गुरु निरंजन । तेव्हां मंगलवाद्यें वाजवीत जन । समस्त सामोरे घ्यावया आले ॥ ९१ ॥ मग गुरुगिरिनारी भक्तजनांसमवेत । प्रवेशले अप्पाराव पाटलाचे गृहांत । उत्तम सिंहासनारूढ दत्तावधूत । विराजित झाले शुभलग्नीं ॥ ९२ ॥ तदा ग्रामांतील बालक नर नारी । पंचारति मंगल आरति घेऊनि करीं । समर्थांसि ओंवाळिती, वाद्यें भारी । वाजती मनोल्हादकारक ॥ ९३ ॥ जंगमाचे मठांत मंडळीसहवर्तमान । समर्थांचें मंगलस्नानादि भोजन । उत्तम प्रकारें आनंदयुक्त होऊन । वामकुक्षी घेती विश्रांति ते ॥ ९४ ॥ मग अप्पाराव पाटिलें कुटुंबासह । श्रीदत्तात्रेय-प्रभूंचें तारक परत्र इह । तीर्थ-प्रसाद उच्छिष्ट घेऊनि निर्मोह । पारणें सोडिलें सुखरूप ॥ ९५ ॥ म्हणे देवाधिदेव अवतारिक । पुरुषार्चीं अंघ्रिकमलें भवसंसारतारक । महद्भाग्यें आम्हांसि लाधलीं जीवोद्धारक । तेणें कृतकृत्य आजि झालों ॥ ९६ ॥ नरजन्मासि येऊनि परमात्मा सदाशिव । जोडिला सखा हृदयस्थ सदैव । तेंचि सार्थक यथार्थ वैभव । फलित जाहलें मजलागीं ॥ ९७ ॥ वेदशास्त्रपुराणाचा मथितार्थ । मजला फलद्रूप झाला परमार्थ । सुदिन विजयप्रद उगवला यथार्थ । धन्य धन्य शिवगुरुकृपें ॥ ९८ ॥ पाटलाचे घरापासून मठापर्यंत । कर्दलीस्तंभ पंचपल्लव शास्त्रयुक्त । दोहों बाजूंनीं लाविले दीप शोभिवंत । मार्ग रमणीय दिसे तो ॥ ९९ ॥ मग दत्तात्रेय गिरिजारमण । सुंदरपालखींत स्थित होऊन । दोहों बाजूंस पूजारी भक्त सेवकजन । चामरें ढाळिती ॥ १०० ॥ पुढें वाद्यें गर्जती अपार । गीत गाती ग्रामस्थ जन सुंदर । दत्तात्रेय-स्वामीनामें जयजयकार । सुटती सुंदर चंद्रज्योति नळे ॥ १ ॥ भेरी मृदंग रुद्रवीणे

चौघडे वादिंत्र । वाजती सुस्वर सारमंडळ एकतंत्र । शंख झर्झरी करताल चंग एकत्र । गाती राग मधुर आलापासह ॥ २ ॥ इक्षुदंड आणि नाना सुगंधीपुष्प । वनस्पतिवेष्टित द्राक्षाचे मंडप । परिमल दाटला बकुल मालती चंपक । करवीर जाति कल्हारादिक ॥ ३ ॥ जिकडे तिकडे जयजयकार । दत्तात्रेयस्वामिनामाचा अखंड गजर । दत्तात्रेयस्वरूप चराचर । भासूं लागलें सर्वांसि ॥ ४ ॥ रेवड्या शेंगादिक पदार्थ उधळिती । जंगम मंडळी एकसारखें भजन करिती । शुभ मंगलकालीं अप्पारावाचे सदनाप्रति । प्रवेशले अनंत जगद्गुरु ॥ ५ ॥ उत्तम सिंहासनीं सन्मानपूर्वक । विराजित जाहले जगन्नायक । करद्वय जोडून उभे ठेले लोक । पूजनादिक पाटील करी ॥ ६ ॥ ब्रह्मवृंद वेद-मंत्रांचे घोष करिती । कुंकुमयुक्त तंदुल मंत्राक्षता वर्षती । जलभरित कुंकुम श्रीफलादिकसह कुंभ शोभती । सौभाग्यवती स्त्रियांचे कटीवरी ॥ ७ ॥ ऐसें सर्वोत्कृष्ट समारंभयुक्त । पूजनादिक फलाहार सद्धर्म-विध्युक्त । होऊनि सर्वजन निमग्न महानंदांत । कीर्तन पुराण चाललें ॥ ८ ॥ दत्तात्रेयस्वामि-समर्थांवरी । चामरें व्यजन वारिती नानापरी । परमानंदांत गेली रात्र झडकरी । पुन्हां समारंभें जंगममठांत पातले ॥ ९ ॥ ब्राह्मणादिक भक्त-सेवकांस । मिळे नित्य पक्वान्न भोजनास । तैसेंच जंगम-मंडळीस । भोजन तांबुलादि मिळे ॥ ११० ॥ ऐसा उत्तम समारंभ सप्त दिन । अप्पापाटलानें करविला विपुल धन वेंचून । वस्त्रालंकारादिक यथायोग्य अर्पून । संतुष्ट केलें सर्वांसि ॥ ११ ॥ नंतर अप्पारावानें मानसिक प्रार्थना । केली कीं मला व्हावी सत्कृत्यसेवेची आज्ञा । सर्वज्ञ सर्वसाक्षी आदिनारायणा । कळलें हृद्गत पाटलाचें ॥ १२ ॥ मग वदती यतींद्रतिलक । तुमचा सत्संकल्प सिद्ध होईल मानसिक । तुमचे गृहासमीप अलौकिक । देवालयसहित शिवलिंग स्थापावें ॥ १३ ॥ तैसेंचि श्रीक्षेत्र काशीपुरींत । गोकर्ण-महाबलेश्वर-स्थानांत । श्रीशैल्य मल्लिकार्जुन-क्षेत्रांत । सेतुबंध-रामेश्वरींही लिंगें स्थापावीं ॥ १४ ॥ पाटलाचा सत्यसंकल्प मनांतील । जाणूनि प्रकट

वदले सिद्ध होईल । नंतर दुसरे दिवशीं समर्थ दयाल । भोजनोत्तर निघाले ॥ १५ ॥ एक योजनपर्यंत लोक सर्व । पोहोंचविण्यास पातले सह-रथ-अश्व । कित्येक संभावितांसुद्धां अप्पाराव । अक्कलकोटास पातले ॥ १६ ॥ पुढें लवकरचि समर्थांनीं प्रासादिक । अप्पारावासि दिधलें शिवबाणलिंग सम्यक् । नंतर यतीश्वरासि सन्मानपूर्वक । केसे-गांवीं नेऊन स्थापिलें बाणलिंग ॥ १७ ॥ सुंदर देवालय दृढ रचवून । त्यांत स्थापिलें सदाशिव उमारमण । ठेविलें शिवलिंगाचें नामाभिधान । ‘श्रीगुरुदत्तात्रेयस्वामीसमर्थ’ ॥ १८ ॥ यथासांग लिंगप्रतिष्ठा-स्थापन । करूनि सर्वांसि घातलें भोजन । वस्त्रालंकार दक्षिणा योग्य देऊन । लहान-थोरांतें बोळविलें ॥ १९ ॥ समर्थांच्या आशीर्वचनानुसार । पाटीलस्त्रियेसि प्राप्त होती कन्याद्वयपुत्र । पाटलाचे मनोरथ पूर्ण झाल्यावर । कुटुंबपरिवारसुद्धां काशीस जाती ॥ १२० ॥ यथाविधि त्रिस्थली यात्रा करून । काशींत ‘स्वामिराज’नामें लिंग स्थापून । तेथून गोकर्णमहाबळेश्वरीं जाऊन । यात्रा आटोपूनि ‘गुरुलिंग’ स्थापविलें ॥ २१ ॥ तेथून श्रीशैल्य-मल्लिकार्जुन क्षेत्रीं । जाऊनि श्रीसेतुबंधरामेश्वरीं । यथाविधि यात्रा करून दोन्ही क्षेत्रीं । स्थापिलीं लिंगें समर्थ-नामें ॥ २२ ॥ मग सर्व मंडळीसहित प्रज्ञापुरीं । येऊनि भागीरथी घातली गुरुचरणावरी । प्रत्येक स्थानचे प्रिय पदार्थ हितकारी । दत्तात्रेय-स्वामींसि अर्पिले ॥ २३ ॥ दत्तात्रेयस्वामिपूजन ब्राह्मणभोजन । करविलें पुष्कळ धन खर्चून । तैसेंचि जंगम-मंडळीस भोजन घालून । संतुष्ट केलें सकलांसि ॥ २४ ॥ मग केसे-ग्रामीं आले होऊन विजयी । शिवलिंगावरी गंगा घालूनि हर्षमयी । जंगममंडळी आणि इतर कांहीं । सर्वांसि यथेच्छ भोजन घातलें ॥ २५ ॥ हे अप्पाराव जंगम जातीचे असून । ज्यांस नव्हता द्वेष मत्सर अभिमान । शुद्धमानस गुरुभक्तिमान् । वैराग्य-ज्ञान-संपन्न होते ॥ २६ ॥ उदार सात्त्विक शुचिर्भूत । काम-राग-निंदा-द्वेष विरहित । सद्गृहस्थ दयालु एकनिष्ठ निःसीम भक्त । प्रसिद्ध होते अप्पाराव ॥ २७ ॥ त्यांचे चिरंजीव भीमराव

नामक । अक्कलकोटासि वारी नित्य नैमिक । येती वडिलासारिखे भाविक । लौकिकवान् योग्य ते ॥ २८ ॥ तेही गृहस्थाश्रमीं सुखरूप नांदती । स्वामिसमर्थांचें भजन भक्ति करिती । दिवसेंदिवस ज्यांचे सुखार्थ वृद्धि पावती । स्वामी समर्थकृपेनें ॥ २९ ॥; एके समयीं दत्तात्रेय-यतीश्वर । अक्कलकोट ग्रामाबाहेर । श्रीरामचंद्र-देवालयांत एक प्रहर । बैसून तेथून पादचारी ॥ १३० ॥ वाहनादिक सिद्ध असून । त्यांत न बैसतां पायांनीं स्वतः चालून । आंब्याचे वाडींत आम्रवृक्षतळीं जाऊन । जगज्जीवन बैसले ॥ ३१ ॥ पूजारी सेवेकरी सर्व मंडळ । वाहनादिसहित तेथें पातलें सकळ । त्या वाडींत वापिका असून त्यांत जल । मधुर रुचिकर स्वच्छ असे ॥ ३२ ॥ तेथें भोजनाची व्यवस्था नाहीं । म्हणून प्रार्थिती प्रभूंस सर्वही । येथें वायुवेगें अंधारांत मुळींही । दीप राहणारे नाहींत ॥ ३३ ॥ म्हणूनि चलावें अक्कलकोटांत । तेव्हां सर्वांसि सांगती श्रीभगवंत । कन्या येणार आहेत त्वरित । परी वाक्यार्थ कोणा उमजेना ॥ ३४ ॥ पुनरपि समर्थ वदती वचन । चोरांच्या मंडळीचें व्हावें निवारण । यास्तव चार भुजंग महान । पातले तुमच्या संरक्षणार्थ ॥ ३५ ॥ हें खरें अथवा खोटें असावें । म्हणून कांचेचे दीप लाविले बरवें । तों मोठे भुजंग पाहूनि अघवें । भ्याले शंकितमानसें ॥ ३६ ॥ मध्यान्हीं रजनीचा भर । सर्वांसि निद्रा लागली घोर । ऐशी संधि पाहून चोर । पदार्थ उचलण्याचा विचार करिती ॥ ३७ ॥ तों महा भुजंग शीघ्र धांवले । दुष्ट चोरांच्या पाठीस लागले । तेव्हां कित्येक सेवेकरी जागृत झाले । आश्चर्य देखिलें तयांनीं ॥ ३८ ॥ चोरटे थरथर कांपती । जीव घेऊनि दूर पलायन करिती । श्रीगुरु परमेश अगाध गति । अगम्य आहे प्राणिमात्रा ॥ ३९ ॥ असो जाहला आदित्य-उदय । जागृत जाहले श्रीगुरुवर्य । जमला दर्शनासि जनसमुदाय । वांदिती पाय समर्थांचे ॥ १४० ॥ इतक्यांत कोल्हापुरच्या राजपत्नी । श्रीमंत खाशीबाई नामाभिधानी । आणि बडोद्याच्या धायबर पत्नी । श्रीमंत बबई नामक ॥ ४१ ॥ उभयतां बैसूनि अश्वरथांत ।

दर्शनासि पातल्या भृत्यसहित । तयांसि शोध लागला कीं अवधूत । प्रभु आम्रवृक्षतळीं विराजती ॥ ४२ ॥ रथांतूनि उतरूनि उभयतां । शुद्धमानसपूर्वक लीनता । श्रीमद्दत्तात्रेय-चरणकमलें वंदितां । प्रभूंनीं वस्त्र काढिलें मुखावरचें ॥ ४३ ॥ सर्वांसि सांगती श्रीयोगिराज । पहा आमच्या कन्या पातल्या आज । मग चोळाप्पा म्हणे प्रणतवत्सल भक्तकाज । आपल्यासाठीं येथें राहिल्या ॥ ४४ ॥ तेव्हां दोघीहि प्रेमें विनविती । अक्कलकोटीं चलावें महाराज जगत्पति । मग रथांत बैसूनि श्रीवरदमूर्ति । सकलही मंडळ निघालें ॥ ४५ ॥ अक्कलकोटच्या खासबागेंत । उतरल्या साध्वी प्रख्यात । संस्थानांतून उत्तम व्यवस्था यथास्थित । ठेविली सन्मानपूर्वक ॥ ४६ ॥ उभयतां बायांनीं मंगलस्नान । घालूनि केलें दत्तात्रेय-पूजन । वस्त्रालंकार अर्पिले शुद्धभावेंकरून । ब्राह्मणभोजन करविलें ॥ ४७ ॥ सेवेकऱ्यांसि वस्त्रें वांटिलीं । नंतर योगीश्वरें मनींची खूण सांगितली । त्या बोधें दोघीसही दृढतर बाणली । समाधान वृत्ति पारमार्थिक ॥ ४८ ॥ हेचि साक्षात् जगदीश हरि । परमात्मा सदाशिव तिष्ठती सर्वांतरीं । धन्य भाग्य जनांचें प्रज्ञापुरीं । उदेलें पूर्णब्रह्म साक्षात् ॥ ४९ ॥ श्रीचरणीं त्रिरात्र वास करूनि । प्रसाद आशीर्वचन आज्ञा घेऊनि । सदाचारी विवेकी बबई आणि राजपत्नी । सुप्रसन्न होऊनि निघाल्या ॥ १५० ॥ सद्धर्मरत उदार शांत गंभीर । दया क्षमा वसे अंगीं निरंतर । चातुर्य धर्मशील सत्य वचन मधुर । श्रीमंत खाशीबाई योग्य शोभती ॥ ५१ ॥ स्वनगरासि गेल्या आनंदयुक्त । सत्कीर्तिवान् परमेश्वरभक्त । श्रीगुरुलीलामृतपानें सदोदित । सकल मनोरथ सिद्ध होती ॥ ५२ ॥; असो अक्कलकोटापासून वेद योजन । दूर असे मोंगलाईंत अबदुलपुर म्हणून । तेथील जहागिरदार ऋग्वेदी ब्राह्मण । देशपांडे उपनांव जयांचें ॥ ५३ ॥ साठ वर्षांचें जाहलें वृद्ध वय । ज्यांसि विवाहित स्त्रिया असूनि त्रय । पुत्र-संतानार्थ त्यांनीं बहुत उपाय । केले श्रम धन वेंचूनि ॥ ५४ ॥ गाणगापुरास प्रति संवत्सरीं । देशपांडे दर्शनासि जाती सुज्ञ विचारी । एकेवेळीं

असतां गाणगापुरीं । स्वप्नीं नरहरि येऊनि सांगती ॥५५॥ आम्ही प्रत्यक्ष अक्कलकोटांत । यतिवेषें जगद्धितार्थ
वसत आहोंत । तेथें दर्शनें मनोरथ पूर्ण होतील खचित । म्हणून हातांत वस्तू दाविली ॥ ५६ ॥ मग देशपांडे जागृत
होऊन । सकलांसि निवेदिती शुभ स्वप्न । देवासि नैवेद्य ब्राह्मणभोजन करून । मंडळीसहित निघाले ॥ ५७ ॥
पातले गुरुक्षेत्र-अक्कलकोटांत । तेव्हां भक्त भगवंता सुताराचे गृहांत । योगिराज श्रीगुरु दत्तावधूत । प्रसन्नवदन स्थित
होते ॥ ५८ ॥ स्त्रियांसह देशपांडेरावांनीं । साष्टांगीं नमिलें करद्वय जोडूनि । स्वप्नांत विलोकिले गाणगाभुवनीं । तेचि
मूर्तिमंत दिसले ॥५९॥ प्रभु-हातांत वस्तु स्वप्नींची देखिली । तेव्हां विश्वास दृढ अनुभूति जाहली । ते स्वप्नकथा
सर्वांसि निवेदिली । देशपांड्यांनीं शुद्ध मनें ॥ १६० ॥ तेव्हां मनांत प्रश्न आणिला असे । कीं पुत्रावीण जहागीर वाया
जातसे । माझा घटिका दिवस उरलासे । आयुष्यांतील अंतींचा ॥ ६१ ॥ नंतर सर्वसाक्षी यतीश्वर सर्वज्ञ । देशपांड्यांस
बोधिती मंगल वचन । शत मुद्रिका घाल तर होईल बैंगण । आणि सहस्त्र घाल तर गज होय ॥ ६२ ॥ ऐसा अमृत आशीर्वाद
होऊनि तत्काल । देशपांड्यांच्या ज्येष्ठ स्त्रियेच्या पदरांत फल । जें स्वप्नांत दाविलें तेंचि निर्मल । अर्पिलें कृपासागरें ॥६३॥
ज्येष्ठ स्त्रियेच्या हातून देवाधिदेवें । कनिष्ठ स्त्रियेच्या पदरांत घातलें मानवैभवें । नंतर गुरुपूजन ब्राह्मणभोजन बरवें ।
करिती देशपांडे उत्तम ॥ ६४ ॥ गुरुआज्ञा घेऊनि गेले स्वनगरांत । पुढें स्वामिराजकृपें एक वर्षांत । देशपांड्यांचे
कनिष्ठ स्त्रियेसि प्राप्त । सुपुत्र-संतान जाहलें ॥ ६५ ॥ कन्या लाधली दुसरे वत्सरीं । मग देशपांडे येऊनि प्रज्ञापुरीं ।
पुत्र कन्या घालूनि श्रीचरणांवरी । यथोक्त पूजन ब्राह्मणभोजन करिती ॥ ६६ ॥ नंतर देशपांडे लवकर । जाहले
कैलासवासी निरंतर । त्यांच्या दोन्ही स्त्रिया आणि पुत्र । प्रतिवर्षीं प्रज्ञापुरीं येत असती ॥ ६७ ॥ चैत्र वद्य चतुर्दशीस
स्वामिरायाची । पुण्यतिथि उत्तम प्रकारची । द्रव्य खर्चूनि अबदुलपुरासचि । करिती शुद्ध भक्तियुक्त ॥ ६८ ॥

श्रीमद्दत्तात्रेयगुरुलीलामृत- । पानें सर्व सौख्यार्थ प्राप्त होत ।; एकदां माघ वद्य गुरुप्रतिपदेच्या उत्साहांत । मल्लु गौळ्यानें दुग्ध दिलें ॥ ६९ ॥ तयांत पाणी मिसळलें । म्हणूनि दुग्ध बिघडलें । ऐसें असून मोल द्विगुणित घेतलें । तेणें कापट्य फळलें तयास ॥ १७० ॥ मल्लाप्पाच्या पंधरा वीस महिषी । तेव्हांपासून हात लावूं देईनात स्तनासि । स्तनांतून दुग्ध न निघतां रक्तप्रवाहासि । देखूनि सर्व दचकले ॥ ७१ ॥ मग मल्लाप्पा जाहला चिंताक्रांत । बोभाट पसरला सर्व ग्रामांत । दुग्धांत कापट्य केल्यानें प्रायश्चित्त । मल्लु गौळयास तत्काळ घडलें ॥ ७२ ॥ अन्य उपाय बहुत केले । तथापि किंचित् मात्र गुणावह न झाले । मग पश्चात्तापें शरण येऊनि धरिले । श्रीसमर्थचरण गौळ्यानें ॥ ७३ ॥ चरणतीर्थ अंगारा स्तनांसि लावितां । पूर्ववत् दुग्ध निघूं लागलें त्वरितां । गुरुलीलेचें आश्चर्य जनांचे चित्ता । वाटलें अतर्क्य अगाध तें ॥ ७४ ॥ नंतर मल्लु दश वर्षपर्यंत नित्य । पेठेंतील मठांत अर्ध शेर दुग्ध सत्य । आणूनि देत होता अगत्य । ऐशा गुरुलीला सुखप्रद असती ॥ ७५ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । द्विचत्वारिंशाध्याय गोड हा ॥ १७६ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे द्विचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ॥ ४२ ॥

श्रीगुरुदेवदत्त-स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय त्रेचाळिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्तात्रेय-गुरवे नमः ॥ ॥ अधिकारी शिष्यासि गुरु बोधित । बृहदारण्यीं याज्ञवल्क्य
वेदप्रमाणभूत । नाना वचनीं व्हावें जीवांचें हित । यथार्थ म्हणून उपदेशिती ॥ १ ॥ देहादिक प्रपंचाचें ‘मूल’ कारण ।
तथा दुसरें ‘बीजरूप’ कारण । यांचें झालें पाहिजे अवश्य ज्ञान । तें दृष्टांतेंकरून सांगती ॥ २ ॥ जैसें प्रथम बीजापासून ।
अंकुर होतसे उत्पन्न । आणि त्या अंकुरापासून । वृक्ष उत्पन्न होतसे ॥ ३ ॥ म्हणून बीजांकुर-द्वारें । वृक्षाचें
कारण आहे खरें । आणि अंकुर साक्षात् शिष्या बा रे । वृक्षाचें कारण असतसे ॥ ४ ॥ मायाविशिष्ट परमात्मा तैसें ।
हिरण्यगर्भद्वारा प्रपंचाचें कारण असे । आणि हिरण्यगर्भ साक्षात्कारण असे । आकाशादि स्थूल पंचभूतांचें ॥ ५ ॥
तथा पंचभूतांचें कार्य । स्थूल शरीरादिक असे अवश्य । त्याचें ‘साक्षात्’ कारण होय । हा हिरण्यगर्भ भगवान् ॥ ६ ॥
अथवा तुम्ही सर्व द्विजवर्य । ऐसें म्हणाल जो पदार्थ एकदां उत्पन्न होय । तो पदार्थ पुन्हां उत्पन्न अवश्य । होणार नाहीं
कदापि ॥ ७ ॥ किंतु स्वभावरूप-कारणापासून । अपूर्व पदार्थ होती उत्पन्न । म्हणून मूल-कारणाचें विचारप्रयोजन ।
म्हणजे विचार करणें नको ॥ ८ ॥ ऐसें तुमचें वचन नाहीं संभवत । कां तरी जे एकवेळ उत्पन्न झालेले पदार्थ ।
त्या पदार्थांची पुन्हां उत्पत्ति नाहीं होत । ऐसें अंगिकारिलें असतां ॥ ९ ॥ ‘कृतनाश-अकृताभ्यागमरूप’ दोष दोन ।
प्राप्त होतील विप्र हो म्हणून । त्या दोन दोषांचें सांगूं लक्षण । श्रोतेजनीं परिसावें ॥ १० ॥ केलेल्या पापपुण्यरूप
कर्मांचें फल । तें भोगिल्यावांचूनि नाश होईल । आणि न केलेल्या पुण्यपाप कर्मांचें फल । भोगावें लागेल सुखदुःख

॥ ११ ॥ आणि पूर्वीं उत्पन्न झालेल्या पदार्थांची । पुन्हां उत्पत्ति अंगिकारावी साची । म्हणजे कृतनाश-अकृताभ्यगम
दोषाची । प्राप्ति होणार नाहींच ॥ १२ ॥ कां तरी पूर्वजन्मांत या जीवानें । जीं केलीं पुण्यपापाचरणें । त्यांचें सुखदुःखरूप
फल भोगणें । तें या जन्मांत जीव भोगितो ॥ १३ ॥ आणि या जन्मांत जीं जीं पुण्यपाप कर्में करी । त्यांचें
फल भोगणें जन्मांतरीं । म्हणून पूर्वीं उत्पन्न झालेल्या पदार्थांमाझारीं । पुण्यपापरूप अदृष्ट राहत नसे ॥ १४ ॥ तसेंच
जे पदार्थ असत्य नरशृंगवत् । जे पूर्वीं कधींही उत्पन्न झाले नाहींत । त्या पदार्थांसि नाहीं संभवत । पुण्यपापरूप अदृष्ट
तें ॥ १५ ॥ तात्पर्य पूर्वीं उत्पन्न झालेल्या पदार्थांची । उत्पत्ति मानिली पाहिजे अवश्यचि । जैसें मातृगर्भांतून निघालेल्या
बालकाची । प्रवृत्ति होते स्तनपानीं ॥ १६ ॥ हे पदार्थ माझ्या सुखाचें साधन । आहेत ऐसें सुखसाधनता-ज्ञान ।
जीवांचें प्रवृत्तीविषयीं आहे, कारण । सुखसाधन-ज्ञानावीण प्रवृत्ति नसे ॥ १७ ॥ आतां स्वप्रकाश चिद्रूप आत्म्यासि ।
कुंठित प्रकाशता आली कैशी । किंवा असंग उदासीन आत्म्यासि । आकाशादि प्रपंचजनकत्व कैसें आलें ॥ १८ ॥ या
प्रकारचा महाविरोध परिहार । व्हावया अज्ञानाचे दोन शक्ति प्रकार । एक आवरण दुजा विक्षेप शीघ्र । सांगतों परिसा
श्रोते हो ॥१९॥ सच्चिदानंद-आत्मस्वरूपाप्रति । आच्छादिते ती 'आवरण-शक्ति' । दुसरी अज्ञानाची 'विक्षेप-शक्ति' । परिसावी
स्पष्ट कळावया ॥ २० ॥ ब्रह्मादि स्थावरान्त जें जगत् । नामरूपात्मक जलबुद्बुदवत् । जी उत्पन्न करिते तिला म्हणतात ।
'विक्षेपशक्ति' अज्ञानाची ॥ २१ ॥ अपरिछिन्न स्वप्रकाश चिद्रूप । अखंड परिपूर्ण जें आत्मस्वरूप । त्यासि परिच्छिन्न अनित्य-
जड-तमोरूप । अव्यापक अज्ञानशक्तीनें वेष्टिलें कैसें ॥ २२ ॥ वस्तुतः अज्ञानासि आत्माच्छादकत्व अभाव असून । प्रमातृ-
बुद्धिमात्राच्छादकपणेंकरून । अज्ञान आत्म्यासि करितें आच्छादन । हें उपचारें म्हणावें ॥ २३ ॥ जैसें अत्यल्प मेघ अनेक
योजनें विस्तीर्ण । आदित्य-मंडलासि करणारे अवलोकन । पुरुष दृष्टिमात्राच्छादकपणेंकरून । आच्छादिती मेघ उपचारें

॥ २४ ॥ तैसें अति तुच्छ परिछिन्न अज्ञान । प्रमातृबुद्धिमात्राच्छादकपणेंकरून । अपरिछिन्न आत्म्यासि करितें वेष्टन । हें उपचारें लक्षण जाणावें ॥ २५ ॥ ‘उपहित’ पदार्थाच्या समीप स्थित । होऊनि जी वस्तु आपले धर्मांचा त्या उपहित- । पदार्थावरी आरोपण करित । त्या वस्तूचें नाम ‘उपाधि’ असे ॥ २६ ॥ आत्मानंदाच्या समीप स्थित होऊनि जैशी । बुद्धि आपले न्यूनाधिकतेसि । आत्मस्वरूपानंदासि । आरोपण करितसे ॥ २७ ॥ म्हणूनि ती बुद्धि उपाधिरूप असे । उपाधिवान् पदार्थासि ‘उपहित’ नाम वदतसे । शास्त्रामाजीं उपाधि-शब्दाचे ऐसे । अर्थ सांगितले आहेत ॥ २८ ॥ तैसेंचि क्षुधा पिपासा निद्रा भय । प्रिय वस्तूंविषयीं प्रीति अक्षय । अप्रिय वस्तूचा द्वेष होय । आत्म्यासि आवरण करणारा मोह सातवा ॥ २९ ॥ विष्ठा-मूत्राचे त्यागापूर्वीं विषम- । दशा प्राप्त होते तोच अष्टम । हे अष्ट दोष जीवाचे प्रथम । सुखदुःखाचे कारणरूप असती ॥ ३० ॥; आतां संक्षेपें ‘त्रिविधताप’ शिष्या ऐक । प्रथम बोलिजे ‘आध्यात्मिक’ । दुसरा म्हणजे ‘आधिभौतिक’ । ‘आधिदैविक’ तिसरा असे ॥ ३१ ॥ आध्यात्म्याचे दोन प्रकार । एक मानसिक दुजा शारीर । मनीं कामादिक अनेक होती विकार । तो ‘मानसिक’ ताप बोलिजे ॥ ३२ ॥ शरीरांत होती व्यथा अनेक । देहसंबंधीं पीडा-रोगादिक । तो ताप बोलिजे ‘कायिक’ । शास्त्रग्रंथीं कथिलें जे ॥ ३३ ॥ व्याघ्र-वृश्चिक-सर्पादिकांचे ताप । भूतापासूनि जे जे होती भय कंप । शत्रुनिंदकादिकांपासूनि दुःख कोप । होती शाप द्विजादिकांचे ॥ ३४ ॥ श्वान घूस कीट मूषकादि उपद्रव । ढेंकूण चिलटें मत्सरादि जीव ॥ मनुष्यादि तृणचर वनचर जलचर सर्व । पशुपक्ष्यादिकांपासूनि दुःखें होतीं ॥ ३५ ॥ उपकार न जाणूनि कृतघ्न । आपल्या कार्यासि करिती विघ्न । सर्व भूतांपासूनि होतें दुःखजनन । ते ‘आधिभौतिक’ बोलिजे ॥ ३६ ॥ नवग्रहांपासूनि पीडा । देवाचे नवस मानता फेडा । देव लागला संचरूनि नाचवी झेंडा । अंगांत येऊनि मागतसे ॥ ३७ ॥ सटवाई चंडी

म्हसोबा भैरव । नानाप्रकारचे लहान मोठे देव । दुःख त्रास देऊनि नेती जीव । ते ‘आधिदैविक’ ताप म्हणावे
॥ ३८ ॥ वृष्टि अनावृष्टि आवर्षण । न पिके न मिळे धान्यादि कण । दुष्काळ सुकाळ होय उदकान्न । ते
‘आधिदैविक’ ताप बोलिजे ॥ ३९ ॥ महान् दुःख सुख रोग अकस्मात् । सहस्रावधि प्राणी मरती क्षणांत । वायु
अग्नि सूर्य इंद्र चंद्रादि दैवत- । कोपें नाश होती जे ॥ ४० ॥ तात्पर्य देवादिकांपासूनि क्लेश । जेणें होतसे
सर्वस्वीं नाश । ते सर्व आधिदैविक तापविशेष । बोलती शास्त्रें पुराणादि ॥ ४१ ॥ उल्कापात नक्षत्रपात ।
भूकंपादिक होती अकस्मात् । महापूर येऊनि गांवें बुडतात । वृक्षादिक कोसळती पर्वत ते ॥ ४२ ॥ हे पूर्वोक्त सर्व
ताप दोष उपाधि । आत्मसाक्षात्कारें हरती निरवधि । म्हणूनि हिततम आत्मज्ञान आधीं । संपादिजे शीघ्र गुरुकृपें
॥ ४३ ॥ आणि अग्न्यादिक देवतोपासनें ते । ब्रह्मलोकाची प्राप्ति होते । परंतु ब्रह्मलोकाची इच्छा बाधते । आत्मज्ञानाचे
‘भावी’ प्रतिबंधक असे ॥ ४४ ॥ तैसेंचि राज्यादिक पदार्थांत । विषयासक्ति लक्षण जें असत । तें आत्मज्ञानाचें अवश्य होत ।
‘वर्तमान’ प्रतिबंधक ॥ ४५ ॥ प्रतिबंध असतां विद्यमान । आत्मज्ञानकार्य न होय उत्पन्न । म्हणून ब्रह्मलोक-विषयेच्छा
त्यागून । प्रतिबंधरहित व्हावेंचि ॥ ४६ ॥ श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ गुरुवर- । सेवनें श्रवणादिक साधनतत्पर । ब्रह्माभ्यासें निरंतर ।
प्रतिबंध जाती लयासि ॥ ४७ ॥ यदर्थीं स्वप्नींही नसावा संशय । ब्रह्माकारांतःकरणवृत्ति अक्षय । सजातीय-विजातीय-
स्वगत-भेद अवश्य । टाकूनि ब्रह्माभ्यास करावाचि ॥ ४८ ॥; ऐसे अभ्यासी विरक्त शांत । सारासार विवेकी गुरुभक्त ।
अक्कलकोटचे महीधर श्रीमंत । मालोजी महाराज भोसले ॥ ४९ ॥ एकेवेळीं अक्कलकोट संस्थान । इंग्रज सरकार बहादुर
विद्यमान । जप्त जाहलें वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून । म्हणून मालोजीराजे साहेब ॥ ५० ॥ सोलापुरास मासत्रयपर्यंत ।
राहिले होते कार्यास्तव श्रीमंत । त्याकालीं सोलापुरानजिक असत । कुंभारी-नामक ग्राम तो ॥ ५१ ॥ त्या कुंभारी ग्रामाचे

मळ्यांत । जगद्धितार्थ स्वेच्छें संचार करित । श्रीमद्दत्तात्रेय योगिराज अवधूत । येऊनि राहिले होते तदा ॥ ५२ ॥ श्रीमंत तात्यासाहेब पटवर्धन । सांगली जयाचें असे संस्थान । ते श्रीमद्दत्तात्रेयस्वामी-दर्शन । करावयासि पातले त्या स्थानीं ॥ ५३ ॥ मेण्यांतूनि उतरूनि पालखींत । मोठ्या थाटानें छत्र-चामरेंसहित । बैसूनि राज्यमदयुक्त । आले मळ्यांत श्रीदर्शनासि ॥ ५४ ॥ फलादिक नमूनि अर्पिलें । माझें राज्य-ऐश्वर्य आहे चांगलें । तें मीं अवतारिक पुरुषापुढें दाविलें । ऐसा गर्व पटवर्धनासि ॥ ५५ ॥ म्हणून वदती अंतर्साक्षी श्रेष्ठ । कां रे हा कोणाचा आहे मोठा थाट । हें जाणतोसि काय पूर्वोक्त नीट । पहिली वाट भुललाशी ॥ ५६ ॥ ऐसें श्रीसमर्थांचें बोधवचन । परिसूनि विस्मित झाले पटवर्धन । अंतरीं पटली प्रतीति खूण । मग अति लीन होऊनि ॥ ५७ ॥ हिऱ्याच्या सुवर्णयुक्त आंगठ्या दोन । पेढे-बर्फीच्या खालीं स्वयें घालून । पुनरपि परीक्षा पहावी म्हणून । पुढें ठेविती समर्थांच्या ॥ ५८ ॥ मग हांसून यतीश्वर वदती । आमची काय परीक्षा पाहशी चित्तीं । पाषाणाच्या आंगठ्या परत घ्याव्या निश्चितीं । येथें न चाले दांभिकपण ॥ ५९ ॥ आम्हां यतीसि सुवर्णादिक रत्न । आणि मृत्तिका दगड दिसती समान । गृहीं नेईं अथवा देईं फेंकून । गरज नाहीं आम्हांसि ॥ ६० ॥ मग तात्यासाहेब होऊनि विस्मित । प्रभूंसि साष्टांग नमस्कार घालित । म्हणे हे इतर संन्याशासारखे नाहींत । अवतारिक साक्षात् भगवंत असती ॥ ६१ ॥ सर्वज्ञ सर्वसाक्षी जितेंद्रिय निःस्पृह । ज्यांच्या दर्शनें निमाले मद दुराग्रह । आणि कुतर्क संशय-संग्रह । नष्ट जाहले क्षणमात्रें ॥ ६२ ॥ कित्येक कार्यें जीं इष्ट अनिष्ट । त्यांचा सहज निर्णय जाहला स्पष्ट । परमात्मा चिन्मूर्ति दिसूनि संतुष्ट । झालों शरणागत समर्थपदीं ॥ ६३ ॥ मग प्रेमें घालूनि लोटांगण । प्रसाद-आज्ञा स्वीकारून । सोलापुरासि पातले पटवर्धन । तात्यासाहेब सांगलीकर ॥ ६४ ॥ तेथें श्रीमंत मालोजीरायास । भेटूनि निवेदिलें योगींद्रवृत्तास । योगीश्वरपदीं जडला विश्वास । पूर्ण अनुभवास आल्यावरी

॥ ६५ ॥ तदनंतर मालोजीरायास वाटलें । त्रय मासांत प्रभुदर्शन न झालें । तेव्हां भृत्यजन मेणा घेऊनि निघाले । समर्थांसि आणाया राजाज्ञें ॥ ६६ ॥ श्रीमद्दत्तात्रेय-सुरेश्वरांप्रति । कारकुनानें नम्रपणें केली विनंति । प्रभु-दर्शनास फार तळमळती । मालोजी भूपति गुरुभक्त ॥ ६७ ॥ कृपा करूनि सोलापुरीं चलावें । दर्शन देऊनि सकलां कृतार्थ करावें । जननीनें बालकाचे लळे पुरवावे । येथें व्हावें त्याप्रकारें ॥ ६८ ॥ मग चोळाप्पा कृष्णाप्पा श्रीपाद पुजारी । आणि सर्व जातीचे सेवेकरी । जनांसहित त्रैमूर्ति-अवतारी । स्वयें बैसले मेण्यांत ॥ ६९ ॥ सोलापुरास आनंदें गेले । मालोजी भूपति पटवर्धन सामोरे आले । अनेक लोक दर्शनार्थ उभे राहिले । उतरले नृपाचे मुक्कामीं ॥ ७० ॥ समर्थांचें पूजनादिक होऊन । सर्वांचें उरकलें यथास्थित भोजन । इतुक्यांत सोलापुरीं शुभ वर्तमान । पसरलें समर्थागमनाचें ॥ ७१ ॥ यद्यपि खदिर वृक्षाचे अरण्यांत । चंपकवृक्ष वसतसे गुप्त । तथापि अतुल परिमल वायु कथित । दशदिशांचे ठायीं जसा ॥ ७२ ॥ तद्वत् श्रीमत्परमहंस नृसिंहभान । मालोजी नृपाचे मुक्कामीं गुप्त असून । अघहरणीं शुद्ध कीर्तिरूप समीरण । कथितसे जाऊन सर्व स्थलीं ॥ ७३ ॥ ऐशी रजनी तेथें गेल्यानंतर । दुसरे दिवशीं सोलापुराहूनि अर्ध कोशावर । धर्मराव थोबडे यांचा बाग सुंदर । शोभायमान् वृक्षयुक्त ॥ ७४ ॥ नारिकेल वट पिंपल औदुंबर । कपित्थ फणस आम्रवृक्ष जंबीर । जंबु रामफल सीताफल डाडिंब तरुवर । नारिंग विविध फलान्वित ॥ ७५ ॥ घन आंबराईंत वापी भरपूर । स्वच्छोदक जींत भरलें मधुर । सोप्या पायऱ्या उतरून नीर । घेतां येतें ऐशी जी ॥ ७६ ॥ ऐशा उद्यानीं आंबराईंत । अत्युच्च सिंहासन करूनि विराजित । मालोजीरायें घातल्या प्रभूच्या कंठांत । रत्नमौक्तिक मालिका ॥ ७७ ॥ कर्णभूषणें रत्नमौक्तिकजडित । मस्तकीं टोपी प्रकाशित । भरजरीचें महावस्त्र लखलखित । शोभतसे अंगावरी गुरूंच्या ॥ ७८ ॥ करीं कमंडलु पायीं पादुका । केशर कस्तुरीची अंगीं उटी सुगंधिका । ऐशा नारायण-यतिनायका । त्या उत्तम सिंहासनीं बैसविलें ॥ ७९ ॥ वरी सघन पुष्पलतांचा मंडप ।

सुगंध चहुंकडे पसरला अमुप । प्रकाशमान् करविले दीप । अत्यंत मनोहर शोभा फांकली ॥ ८० ॥ सभोंवतीं वृक्ष घनदाट । येतसे सुगंध वायूची लाट । भक्त पूजारीं सेवक निकट । छत्र चामरें ढाळिती ॥ ८१ ॥ दर्शनार्थ महाजनसमुदाय । नारीनर उभे जोडूनि करद्वय । संपूर्ण मुखें गर्जती ‘जयजय । श्रीगुरुदेवदत्त’ स्वामींचा ॥ ८२ ॥ लक्षावधि लोकांचें व्हावें संरक्षण । म्हणून इंग्रज सरकारची पलटण । ठेविली नृपें तिच्यांतील सैनिकजन । मधुर वाद्यें वाजविती ॥ ८३ ॥ त्या स्थानिक प्रभूंची मुखश्री फांकली । तेव्हां वनश्री ओंवाळावया आली । प्रफुल्लितपणें ओंवाळूं लागली । पंचतत्त्व नीरांजनें आरतिक्य ॥ ८४ ॥ अति सुगंध चंदनाचे सडे । वनदेवतांनीं घातले चोहोंकडे । परमानंदस्वरूप जिकडे तिकडे । दत्तात्रेयस्वामी व्यापिले ॥ ८५ ॥ नारिकेल आणि आम्रवृक्षाचीं फलें । उत्तम तोरणादिक सुशोभलें । त्याखालीं लक्षावधि लोक उभे राहिले । ईश्वरदर्शनाकारणें ॥ ८६ ॥ सर्वांच्या देहेंद्रियांसि आनंदोत्सव । समाधानप्रद व्यापला सदैव । अंतर्बाह्य श्रीगुरुदत्तदेव । संपूर्ण वैभवयुक्त भरला ॥ ८७ ॥ क्षणांत लोकांसि इंद्रसभा भासे । क्षणांत विश्वकर्म्यानें स्थल निर्मिलें दिसे । अथवा देवमयसभा दिसतसे । अत्यंत सुखकारक ते ॥ ८८ ॥ किंवा ब्रह्मा विष्णु महेश्वर । आपल्या ऐश्वर्यासह सुरवर । मृत्युलोकीं या स्थानीं जगदोद्धार । करावयासि पातले काय ॥ ८९ ॥ प्रत्येकाचे हातांत श्रीफल पुष्पहार । पेढे-बर्फीचे पुडे आणि कर्पूर । अर्पूनि नमन करिती वारंवार । जेणें परमेश्वर संतुष्ट होतसे ॥ ९० ॥ श्रीफलादिकांचा लहानसा डोंगर । नारिकेल वृक्षाखालीं दिसे सुंदर । तेव्हां सुवर्णपात्रीं मालोजी नृपवर । आरती ओंवाळी जगद्गुरूसि ॥ ९१ ॥ अनेक वाद्यांचे होती गजर । आनंदस्वरूप भरलें चराचर । नारिकेल फलें आणि आम्रफलें वारंवार । वृक्षीं संतोषें डोलतीं ॥ ९२ ॥ कोणी वेदघोष करिती ब्राह्मण । कोणी कीर्तन भजन पुराण । कोणी गाती सुस्वर रागगायन । कोणी नमिती प्रार्थिती ॥ ९३ ॥ एकचि गाजला जयजयकार । धन्य धन्य

भाग्योदयकाल सुखकर । राव रंक सकळ अखंड दर्शनातुर । तृप्ति न वाटे म्हणून पुन्हां देखती ॥ ९४ ॥ मग
श्रीदत्तात्रेयस्वामी कृपासागर । सर्वांसि हाक मारूनि अभयकर । संज्ञें वदती व्हावें शांत स्थिर । अवघे निरंतर सुखी
असा ॥ ९५ ॥ आशीर्वचन मंगलकारक । मान्य करूनि शांत स्थिरावले लोक । लक्षावधि संख्या असूनि
देख । एकसमयावच्छेदें स्तब्ध झाले ॥ ९६ ॥ अनेक नक्षत्रयुक्त निशाकर । शुक्लपक्षीं सर्वांसि वाटे प्रियकर ।
त्यापेक्षां अधिक स्वप्रकाशक ईश्वर । यतीश्वर प्रिय सदा असती जनां ॥ ९७ ॥ सोलापुर ग्रामांत त्या कालीं । बहुधा
मनुष्यें नव्हतीं राहिलीं । एक श्रीफलास एक रौप्य मुद्रा घेतली । लोभी दुकानदारांनीं ॥ ९८ ॥ त्याकालीं सोलापुरांतील
धनिक । जंगम वाणी चनबसअप्पा निंदक । दुसरा गुरुसिद्धअप्पा कारंजे नामक । भाविक सावकार असे ॥ ९९ ॥
तयास चनबसअप्पा सावकार । म्हणे आज सर्व व्यापारी दुकानदार । सोलापुरचीं मुलें लेंकरें नारीनर । गेले संन्याशासी
बघावया ॥ १०० ॥ केवढे हे मूर्ख अविवेकी जन । सिद्धेश्वरादि देवदर्शन सोडून । संन्याशाचे छंदांत पडले जाऊन ।
देहभान संसार टाकूनि ॥ १ ॥ किंवा अक्कलकोटच्या नृपवर्यास । गेले सगळे पहावयास । ऐसा चनबसअप्पा
उपहास । करूं लागला धनमदें ॥ २ ॥ नंतर गुरुसिद्धाप्पा बोले सम्यक् । देव-गुरु-साधु-निंदेचें असे अति पातक ।
आपण प्रत्यक्ष जाऊन पाहूं कौतुक । म्हणूनि निघाले झडकरी ॥ ३ ॥ गेले धर्मरावाचे बागेंत । यात्रा पाहूनि झाले
भयचकित । गुरुसिद्धाप्पानें साष्टांग दंडवत । घातले भक्तियुक्त देवाधिदेवांसि ॥ ४ ॥ आनंद मावेना सिद्धाप्पाचे
चित्तीं । म्हणे पूर्वपुण्य फळलें दर्शनप्राप्तीं । साक्षात् परमात्मा जगत्पति । देखिला आजीं मायबाप ॥ ५ ॥
चनबसअप्पा सावकार निंदक । जवळ जाऊनि पाहे तों तात्कालिक । पार्वतीसह सिद्धेश्वर कैलासनायक । दिसले
प्रत्यक्ष तयासि ॥ ६ ॥ पंचमुखी मायावी महेश्वर । ऐश्वर्य सर्व गणांसहित सिद्धेश्वर । देखूनि प्रत्यक्ष प्रमाण शिव

शंकर । लाजला फार जंगम वाणी ॥ ७ ॥ स्वकरें मुखावरी करी ताडण । चिमटे घेऊनि रक्ताळले कर्ण । म्हणे जिव्हा
शस्त्रें टाकूं छेदून । काय कामाची दुष्ट ही ॥ ८ ॥ भयें शरीर कांपे थरथरां । म्हणे अहो साक्षात् शिवहर शंकरा ।
मी महापातकी खरा । सूकर-श्वानाहूनि नीच आहें ॥ ९ ॥ आपलें भगवत्स्वरूप नोळखून । धनमदें ताडिलें कठोर
वचन । आज लक्षावधि लोक घरदार सोडून । झाले तल्लीन कृतार्थ ते ॥ ११० ॥ त्या सर्व लोकांस मीं दूषिलें । या
महान् अपराधामुळें । आतां देहान्त प्रायश्चित्त मिळालें । पाहिजे मजलागीं समर्था ॥ ११ ॥ मग बोलिले त्रैमूर्ति सगुण-
रूप । तुजला जाहला खचित पश्चात्ताप । या मुख्य प्रायश्चित्तें जळतें पाप । अनुतापें चित्त शुद्ध होतें ॥ १२ ॥ समूळ
दुर्वासनांचा क्षय । झाल्यानेंचि होतो अनायासें मनोजय । संसार-प्रपंचाचा अनुताप होय । तेंचि वैराग्य जाणावें
॥ १३ ॥ आश्चर्य करिती सकल जन । म्हणती समर्थांसि निंदक वंदक समान । धन्य करुणार्णव भगवान् । न्यूनाधिकपण
स्पर्शेना ॥ १४ ॥ अति निंदकावरी करितां कृपा । मग भक्तावरी कराल हें उघड बाप्पा । दया क्षमा सामर्थ्य
प्रतापा । न कळे महिमा कोणासि ॥ १५ ॥ असो चनबसअप्पा झाला शरण । त्यानें केलें उत्तम शिवलिंग पिंडीसह
अर्पण । तें बुधवार-पेठेंतील स्थानांत स्थापन । केलें स्वामिरायांनीं स्वहस्तें ॥ १६ ॥ आणि दत्तात्रेयस्वामीचरण ।
पादुका अत्त्युत्तम कृष्णवर्ण । अर्पण केलेल्या स्थापिल्या जाण । आद्य प्रिय मठांत समर्थांनीं ॥ १७ ॥ पूर्वीं स्वामिराज
धनिकासि वदले । चरवी दिल्यासि समज कार्य झालें । मग तीर्थप्रसादा उभयतांनीं भक्षिलें । गेले सदनीं आनंदयुक्त ॥ १८ ॥
पुढें दत्तात्रेय-कृपेंकरून । चनबसअप्पासि झालें पुत्रसंतान । मल्लिकार्जुन त्याचें नामाभिधान । ठेविलें योगिराज-आज्ञेनें
॥ १९ ॥ मुलगा आणून प्रज्ञापुरीं । घातला श्रीस्वामिराजांचे चरणावरी । एक सहस्र रौप्य मुद्रिका सत्वरी । अर्पण केल्या
समर्थांसि ॥ १२० ॥ तैसेंचि चरवी शब्दाचा अर्थ कैसा । तांब्याचा फार मोठा हंडा ऐसा । ज्यांत चाळीस घागरी मोठ्याशा ।

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

* * *

भरपूर पाणी राहतसे ॥ २१ ॥ ऐसा हंडा देवकार्यासाठीं । अर्पिला सावकारें धरूनि प्रेम पोटीं । चनबसअप्पाची गुरुपदीं
मिठी। जडली भक्ति निरंतर ॥ २२ ॥ चनबसअप्पा सावकार । लौकिकवान् नामांकित मोठा व्यापार । राजदरबारांत मान
फार । लोक मानिती योग्यत्वें ॥ २३ ॥ त्यांचे चिरंजीव मल्लिकार्जुन । योग्य चनबसअप्पासमान । प्रतिवर्षीं दोन चार वेळां
दर्शन । करावया येती प्रज्ञापुरीं ॥ २४ ॥ श्रीस्वामिराय कृपाकटाक्षानें । अक्कलकोट संस्थान इंग्रज-बहादुरानें । जप्तींतून
सोडिल्यावरी आनंदानें । मालोजीराय आले अक्कलकोटासि ॥ २५ ॥ स्वराजधानींत आल्यावरी नृपवर्य । वंदिले पूजिले
स्वामी दत्तात्रेय । मालोजीमहाराज धुरंधर-राजकार्य । दक्ष न्यायी विराजित ॥ २६ ॥ अक्कलकोट संस्थानांत रीजंट ।
श्रीमंत दादासाहेब विंचुरकर होते श्रेष्ठ । त्यांची योगीश्वरपदीं एकनिष्ठ । भक्ति दृढतर जडली असे ॥ २७ ॥ वारंवार
प्रभूंसि सदनीं नेऊन । घालिती प्रेमें स्नान भोजन । निरभिमानें करिती पादसेवन । चोळाप्पाचाही मान ठेविती ॥ २८ ॥
चोळाप्पाचा ज्येष्ठ पुत्र नीलकंठ । लोक म्हणती कृष्णाप्पा सात्त्विक धीट । तो वरचेवर प्रभूंकरितां नीट । विंचुरकर गृहीं
जात असे ॥ २९ ॥ एके दिवशीं श्रीगुरु कैवल्यखनी । दादासाहेबांचे हातचा कागद घेऊनि । कृष्णाप्पाचे हातांत
देऊनि । चमत्कार विलोकिती ॥ १३० ॥ मग कृष्णाप्पास विंचुरकर । वदती कागद वाचा सविस्तर । परंतु वाचनारंभ
अक्षर । करविला होता नवीन ॥ ३१ ॥ कागद येईना वाचावयास । म्हणून दादासाहेब रागें भरले कृष्णाप्पास।
तेव्हां कृष्णाप्पा गृहीं येऊनि मस्तकास । ताडण करूं लागला ॥ ३२ ॥ पुन्हां कृष्णाप्पा एके दिवशीं । बैसला पाहून समर्थ-चरणापाशीं
। अभ्यासास्तव विंचुरकर तयासि । रागें भरूनि बोलिले ॥ ३३ ॥ तेव्हां देवाधिदेव गालिप्रदान । अर्पूनि
विंचुरकरांचे बोधिती ज्ञान । वेदवेदांगसार्थसहित पढून । ज्योतिर्वैद्य धर्मशास्त्र पुराणादिक ॥ ३४ ॥ न्यायमीमांसादि
विद्याभ्यासन । करावें सेवन हरिपाद निरभिमान । नित्य स्ववर्णाश्रम-धर्माचरण । व्हावें दयादान यथाशक्ति ॥ ३५ ॥

तात्पर्य चतुर्दशविद्या अभ्यासिजे । चतुःषष्ठीकला-निपुण होईजे । यावांचूनि इतर अभ्यास म्हणजे । तैलचर्मादि विक्रयकारक ॥ ३६ ॥ तेव्हांपासूनि विंचुरकर । कृष्णाप्पासि मानूं लागले फार । असो पूर्वीं दादासाहेबांचे मांडीवर । कुष्टरोग उद्भवला होता ॥ ३७ ॥ तो कुष्टरोग नष्ट व्हावया । त्यांनीं विनविलें श्रीस्वामीदत्तात्रेया । शमेल रत्नमुद्रिका अर्पिलिया । ऐसें बोलिले कृपासिंधु ॥ ३८ ॥ ऐकतांचि रत्नमुद्रिका काढूनि तात्काल । समर्थांसन्मुख ठेविली मनें सरल । विंचुरकर श्रीमंत उदार धर्मशील । जहागिरदार प्रसिद्ध असती ॥ ३९ ॥ पुढें तीन दिवसांत रोग कुष्ट । दादासाहेबांचा समूल झाला नष्ट । परमेश्वरकृपें सकल कार्यें इष्ट । सद्यःसिद्ध होती सहज ॥ १४० ॥ विंचुरकरांसि वाटलें अत्यंत आश्चर्य । म्हणती हे प्रत्यक्ष परमेश्वर विश्ववर्य । विश्वोद्भव-स्थिति-प्रलय । कर्तें अकर्तें अन्यथाकर्तें ॥ ४१ ॥ ती रत्नमुद्रिका विक्रय करून । कृष्णाप्पाचें झालें समारंभें लग्न । भक्तकार्यकल्पद्रुम नारायण । अनन्याचा योगक्षेम वाहणारे ॥ ४२ ॥ भोळ्या दीनदुर्बळांचे ऋणी । अंध पंगु बधिरादिकांचे जनक जननी । ज्यांची अगम्य अघटित करणी । सर्वांचा सांभाळ करिती जे ॥ ४३ ॥; असो खेडसमीप मणुर ग्रामांत । रामचंद्र सराफ सुखें नांदत । दुष्ट लोकांच्या त्रासानें होऊनि त्रस्त । पुढें कैलासवासी जाहले ॥ ४४ ॥ यजुर्वेदी प्रथमशाखी द्विज कण्व । त्यांस असती दोन चिरंजीव । अनुक्रमें चोळाप्पा आबाजीआप्पा नांव । आणि तिसरी कन्यका होती ॥ ४५ ॥ शेषुबाई नामें चोळाप्पाची माता । आणि येसुबाई चोळाप्पाची कांता । अक्कलकोटीं येऊनि प्रपंचाकरितां । राहती बुधवार-पेठेंत ॥ ४६ ॥ पुढें स्वामिराज दत्तदिगंबर । महीवरी स्वच्छंदें करित संचार । आले अक्कलकोटीं साचार । स्वलीलें जगदुद्धार करावया ॥ ४७ ॥ सप्त जन्मांचें आप्त गणगोत । मुख्यत्वें चोळाप्पा भाविक शांत । तयाचे सदनीं वसूनि केला प्रख्यात । पेठेंत आद्यस्थानीं प्रियभक्त तो ॥ ४८॥ चोळाप्पास दोन कुमार । कृष्णाप्पा ज्येष्ठ अप्पा धाकटा पुत्र ॥ ४९ ॥ कन्या उपवर सुलक्षण सुंदर । तिचा योजिती विवाह

विचार । कृष्णातीरीं गोटे ग्रामींचे राहणार । अनंतभट द्विजासि ॥ १५० ॥ यजुर्वेदी कण्वशाखी विप्र । त्यास कन्या आणि सप्त पुत्र । विद्वान् वैदिक चतुर । सद्वंशी असती ते ॥ ५१ ॥ त्यांतील श्रीपादभट वैदिक । टाकूनि गृह संसार लौकिक । चौदा वर्षांचा असतां निष्ठें एक । धीपुरीं राहिला समर्थपदीं ॥ ५२ ॥ स्वामीरायाची दासी सरस्वती । भोळी भाविक स्त्री शूद्रजाती । दोन संवत्सर जातां पुढती । तिचें भविष्य पटलें तें ॥ ५३ ॥ म्हणजे चोळाप्पांनीं विध्युक्त । कन्या श्रीपादास अर्पिली विवाहांत । श्रीपाद जीवापाड सेवा करित । मठकार्यार्थ अति कष्ट करी ॥ ५४ ॥ कृष्णाप्पाची मुंजी झाल्यावर । पंधरा दिवसांनीं महामारीचा विकार । होऊनि कृष्णाप्पास उतरले भूमीवर । तेव्हां सर्व आक्रोश करूं लागले ॥ ५५ ॥ कृष्णाप्पा बाळपणापासून । शांत स्वभावी व्यवहारदक्ष असून । स्वामी समर्थ नीलकंठ नामेंकरून । पाचारित होते तयासि ॥ ५६ ॥ चोळाप्पासि म्हणती जैन । श्रीपादासि लट्ठेश्वर पंडित नामें पाचारण । केव्हां केव्हां आमचे गुमास्ते स्थान । सांभाळावें प्रभु म्हणती ॥ ५७ ॥ असो कृष्णाप्पाचे समीप घरमंडल । आक्रोश करितसे अमंगल । इतुक्यांत श्रीदत्त दिगंबर दयाल । पातले कृष्णाप्पाचे जवळीं ॥ ५८ ॥ म्हणती मूर्खहो रडतां काय । याचें व्हावयाचें आहे विवाह शुभकार्य । अरे नीलकंठा ऊठ शब्दद्वय । बोल रे बालका आम्हांसि ॥ ५९ ॥ समर्थांचें अमृत संजीवन वचन ऐकिलें । तेव्हां कृष्णाप्पास जागृत झालोंसें वाटलें । शरीरांत पुन्हां जीव प्राण संचरले । उष्णता आली हस्तपादादि इंद्रियांसि ॥ १६० ॥ कृष्णप्पाचा पुनर्जन्म झाला । तेणें सर्वांसि साश्चर्य आनंद वाटला । म्हणती अगम्य अद्भुत श्रीगुरुलीला । अतुल सामर्थ्य भरलेली ॥ ६१ ॥ कृष्णाप्पा आरोग्य झाल्यानंतर । त्याचा विवाहसमारंभ झाला लवकर । त्या नीळकंठास कन्या आणि पुत्र । लाधले तैसेचि श्रीपादास ॥ ६२ ॥ कृष्णतनय नामें रामचंद्र । श्रीपादतनय असे चिदंबर । बुद्धिमान् प्रभुसेवेसी तत्पर । संस्कृतादिक भाषा शिकलेले ॥ ६३ ॥ अप्पासीही कन्या पुत्र

असती । रंगनाथ दत्तु त्यांस म्हणती ।; असो कथा परिसावी श्रोतीं । राजुबाई चौल-कन्या ।। ६४ ।। तिजला क्षयरोग लागला तदा । चोळाप्पा विनवी स्वामिराजपदां । तेव्हां शेणाच्या शुभा दुःखप्रदा । समर्थें दिधल्या चोळाप्पासि ।। ६५ ।। दुश्चिन्ह दाविल्यावरी एक पक्षांत । राजुबाई पावली अंत । अनंतब्रह्मांडांचें शुभाशुभ जाणत । परमात्मा अवधूत दिगंबर ।। ६६ ।।; एकदां चंद्रभागेतीरीं क्षेत्र मणुर । तेथें अश्विन मासांत भीमेसि आला मोठा पूर । त्याकालीं सेवकांसह दत्तदिगंबर । अलीकडच्या कांठीं स्थित होते ।। ६७ ।। दोन्ही थडीं भरून अपार पाणी चाललें । तदा योगिराज स्वच्छंदें नाविकेंत बैसले । नावाड्यांनीं शीघ्र परतीरा नेलें । धाकटे मणुरास पर्जन्य फार होता ।। ६८ ।। कोणीं कांहीं केलें न भक्षण । धाकटे मणुरास यतिवर्य राहून । दुजे दिनीं आनंदें करिती गायन । घाटावरी बसूनियां ।। ६९ ।। स्नान भोजन उरकल्यावरती । चोळाप्पा योगींद्रासि करी विनंति । गाई वत्सादि हंबरडे फोडिती । चलावें कांठीं पलीकडे ।। १७० ।। ऐकून प्रभु वदती शब्द मंजुल । भीमाबाई वाट देईल तर जाणें होईल । इतर म्हणाले पैल तीरीं नौका विशाल । आहे तींत बसून जाऊं ।। ७१ ।। प्रभु उत्तर देती नौका अलीकडे । कोण जाऊनि आणितो हेंचि सांकडें । चोळाप्पा वदे आज्ञा व्हावी दुःख न पडे । गुरु वदती वेड लागलें तुम्हांसि ।। ७२ ।। जर लष्ठेश्वर पंडित श्रीपाद जाईल । तर अवश्य नौका घेऊनि येईल । चोळाप्पा म्हणे अपार भरलेलें जल । सांगडी भोंपळे नाहींत ।। ७३ ।। नौकेविण अफाट जलांत उडी घालणें । हें भयंकर साहस कृत्य करणें । श्रीपाद म्हणे समर्थाज्ञा शिरीं मानणें । देहाचें होणें तें होईल ।। ७४ ।। अंगावरचीं वस्त्रें काढून । पंचा नेसला श्रीपाद ब्राह्मण । दत्तस्वामी-नांवाची गर्जना करून । उडी घातली श्रीपादें ।। ७५ ।। तत्काल समर्थांचे आज्ञेनुसार । अहंममत्व टाकूनि देहावरी उदार । महापुरांत उडी निर्भय घातली सत्वर । धन्य गुरुभक्त श्रीपादभट ।। ७६ ।। श्रीपादभट पोहून जातात । ऐसें पाहूनि सुईवाले बळवंत । त्यांनींही उडी घातली

भर पुरांत । आणि कृष्णा शिपायानें उडी टाकिली ॥ ७७ ॥ मोठ्या धैर्य प्रयास कष्टबलें । तिघांनीं नौकेसि अलीकडे आणिलें । मग मंडळीसह योगींद्र नौकेंत बैसले । चौघडे वाद्यें वाजतीं ॥ ७८ ॥ 'भीमा-गंगाकी जय' म्हणत । थोरल्या मणुरास गेले उल्हासयुक्त । त्यावेळीं चोळाप्पा बावडेकर नाविकेंत । बाबा यादवादि वैरागचे नागाप्पा होते ॥ ७९ ॥ नावाडी सर्व करिती महदाश्चर्य । धन्य धन्य श्रीपादभट पट्टशिष्य । पट्टशिष्य म्हणविणारे पळती भय । धरूनि देहलोभें दूर दूर ॥ १८० ॥ दाढी जटा पंचकेशी भगवें वस्त्रधारी । जगांत पट्टशिष्यत्व मिरविती वरी । जैशी पळी स्वयंपाकाभीतरी । केवळ कोरडी अन्नांत असूनि ॥ ८१ ॥ असो उतरले एल्लम्माचे देवालयांत । त्याकालीं महामारीचा उपद्रव फार गांवांत । पाटील येऊनि प्रार्थना करित । मत्पुत्र हनुमंत भूमीवरी उतरिला ॥ ८२ ॥ अण्णा पाटलाचें वचन ऐकून । कळवळूनि निःशंक उठले जनार्दन । अण्णाचे सदनीं सोप्यांत जाऊन । बैसले जगज्जनक योगीश्वर ॥ ८३ ॥ समर्थांसि देखूनि सर्व रडती । आक्रोशें 'हा पुत्र' म्हणून वक्षस्थळ पिटिती । प्रभुरायांसि शिवूं नका म्हणती । विटाळ होईल म्हणूनियां ॥ ८४ ॥ चोळाप्पा म्हणे प्रभु देवळांत चलावें । हा प्रसंग पाहवेना आम्हां बरवें । अण्णा पाटील झाले आडवे । म्हणती कृपा करावी याकालीं ॥ ८५ ॥ मुलगा निरोप घेऊनि चालला । स्वामिराज वदती कोण निरोप देतो त्याला । वाटूनि कडुनिंबाचा पाला । लावा शरीराला मुलाच्या ॥ ८६ ॥ त्या पाल्यांत पाणी घालून । सत्वर मुलासि करवा प्राशन । पाटलानें आज्ञा शिरीं मानून । केलें तैसें तात्कालिक ॥ ८७ ॥ तों मुलगा हनुमंत सावध होऊन । मनुष्यांकडे पाहे नेत्र उघडून । हस्तपादादिकांचें चलनवलन । होऊं लागलें मंदगतीं ॥ ८८ ॥ आनंदाचा सुदिन उगवला । मृत पुत्र संजीवन तत्काल झाला । दुसरे दिवशीं अण्णा पाटलानें केला । पूजा ब्राह्मणभोजनसमारंभ ॥ ८९ ॥ हनुमंत शुद्ध आरोग्य जाहला । महामारीचा उपद्रव निमाला । समर्थ पातले अक्कलकोटाला ।

अगाध लीला जयांची ॥ १९० ॥ ते परमात्मा स्वामी काय न करिती । क्षणमात्र ब्रह्मांड मोडिती रचिती । जगदुद्धरणार्थप्रज्ञापुरीं वसती । लीला दाविती अनंत ॥ ९१ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदशास्त्रपुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ-वामन-विरचित । त्रयचत्वारिंशाध्याय गोड हा ॥ १९२ ॥ इति श्रीगुरुलीलामृ गुरुशिष्यसंवादे त्रयचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ॥ ४३ ॥ श्रीगुरुदेवदत्त-स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय चव्वेचाळिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ।। श्रीमद्दत्तात्रेय-स्वामिने नमः ।। ।। गुरु सांगती शिष्या करीं श्रवण । छांदोग्योपनिषदाचे तृतीयाध्यायीं वर्णन । जें हृदयकमलाचें ध्यान । तें निरूपण करित आहे ।। १ ।। पुरुष-हृदयांत पंच छिद्रें साचार । पूर्व दक्षिण पश्चिम उत्तर । या चारी दिशेस छिद्रें चार । हृदयकमलांत आहेत ।। २ ।। आणि हृदयकमलाचे ऊर्ध्व भागांत । पांचवें छिद्र असे विराजित । तेथें अधिदैवरूप आदित्ययुक्त । चक्षुरिंद्रिय जें आहे ।। ३ ।। त्या चक्षुरिंद्रियाचा अध्यात्मरूप प्राण आश्रय । आणि त्या अध्यात्मरूप प्राणाचा आश्रय हृदय । कमलाचे पूर्व दिशेचें होय । छिद्र सत्यत्वें जाणावें ।। ४ ।। आणि अग्निरूप-अधिदैवयुक्त । जें वाक्-इंद्रिय असत । त्या वाक्-इंद्रियाचा अध्यात्मरूप शोभत । आश्रय अपान वायु तो ।। ५ ।। या अध्यात्मरूप अपानाचें । हृदयकमलाचे दक्षिण दिशेचें । छिद्र आश्रय आहे साचें । छांदोग्योपनिषदांत कथा ते ।। ६ ।। आणि अधिदैवरूप जें श्रोत्रेंद्रिय । त्या श्रोत्रेंद्रियाचा अध्यात्मरूप व्यान आश्रय । त्या अध्यात्मरूप व्यानाचा आश्रय । हृदयकमलाचे पश्चिम दिशेचें छिद्र आहे ।। ७ ।। आणि अधिदैवरूप पर्जन्ययुक्त जें मन । त्या मनाचा आश्रय असे अध्यात्मरूप समान । त्या अध्यात्मरूप समानाचा आश्रय जाण । हृदयकमलाचे उत्तर दिशेचें छिद्र आहे ।। ८ ।। आणि अधिदैवरूप आकाशयुक्त जो समीरण । तयाचा आश्रय असे अध्यात्मरूप उदान । त्या अध्यात्मरूप उदानाचा आश्रय जाण । हृदयकमलाचें ऊर्ध्व छिद्र असे ।। ९ ।। ऐसें पंचछिद्रयुक्त हृदयकमल जें असे । त्या हृदयकमलीं सगुणब्रह्म वसतसे । तें सत्यकाम-सत्यसंकल्पादि-गुणविशिष्ट विलसे । त्याचे ध्याते

ब्रह्मलोकासि पावती ॥ १० ॥ निर्गुणब्रह्माचे ध्यानापेक्षां जाण । अत्यंत सुगम सगुणब्रह्माचें असें ध्यान । तथापि निर्गुणब्रह्मसाक्षात्कारें जन्ममरण- । आदिक संसारदुःख किंचित्‌ही न होय ॥ ११ ॥ आणि पर्यंक-विद्यारूप उपासनादिक । जेवढ्या असती अहंग्रह-उपासना सम्यक् । त्या अंतर्मुख दृष्टीनें सिद्ध होती अवश्यक । तथापि अत्यंत कठीण असती ॥ १२ ॥ त्या अहंग्रह-उपासनादिकेंकरून । ब्रह्मलोकासि प्राप्त झालेले अधिकारी जन । पुन्हां मृत्यु लोकीं येत नसून । ब्रह्मलोकांतचि मोक्षासि पावती ॥ १३ ॥ आतां बाह्य दृष्टीनें सिद्ध होणारी । जी पंचाग्निरूप उपासना अत्यंत सुगम भारी । त्या पंचाग्नि-विद्येनें ब्रह्मलोकासि पावती अधिकारी । ते पुन्हां भूलोकासि येती ॥ १४ ॥ त्या पंचाग्नि-विद्येचें करूं निरूपण । जे ब्रह्मलोक-प्राप्तीचे असती इच्छावान् । तथा ज्यांचे सदनीं अग्निहोत्र आहे ऐसे जन । पंचाग्नि-विद्येचे अधिकारी असती ॥१५॥ त्यांनीं स्वर्ग मेघ मनुष्यलोक पुरुष योषित । या पांचांचें अग्निरूप ध्यान करावें सतत । आतां त्या स्वर्गादि पंचाग्निविषयीं निरोपित । लोकप्रसिद्ध अग्निसमान धर्म ते ॥ १६ ॥ जैसें लोकप्रसिद्ध अग्नीस । काष्ठादिकीं प्रज्वलित करिती खास । म्हणूनि लोकप्रसिद्ध अग्नीस । काष्ठादिक समिध तें ॥ १७ ॥ तैसें स्वर्गलोक प्राप्तीचें साधन । जें पुण्य कर्म त्या पुण्यकर्मीं आदित्य भगवान् । सर्व जीवांसि करवितसे प्रवर्तन । म्हणून सूर्य स्वर्गरूप अग्नीचें समिध आहे ॥१८॥ आणि संवत्सरयोगें जलाचें संग्रह करणारे । जे मेघ ते वृष्टि करण्यांत समर्थ सारे । या कारणानें तें संवत्सर शिष्या बा रे । मेघरूप अग्नीचें समिध असती ॥१९॥ आणि संपूर्ण लोकांचा आधार जी पृथ्वी असे । त्या पृथ्वीनें मनुष्य लोक शोभतसे । म्हणूनि मनुष्यलोक अग्नीचे असे । ती पृथ्वी समिध ॥२०॥ आणि हा पुरुष संभाषण कालांत । प्रसारित मुखें शोभायमान् दिसत । म्हणून पुरुषरूप अग्नीचें असत । प्रसारित मुख समिध तें ॥ २१ ॥ आणि जेथूनि पुत्रादिक संतान निर्गमन होतें । ऐसें जें योषितांचें उपस्थ-इंद्रिय तें । त्यायोगें योषिता शोभिवंत दिसते । म्हणून उपस्थ योषिताग्नीचें समिध

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

आहे ॥ २२ ॥ आतां स्वर्गादिक-पंचाग्नीचे । धूमरूपें करूं योग्य ध्यान करण्याचे । जे पदार्थ असती त्यांचें । निरूपण करूनि दावूं ॥ २३ ॥ जैशी लोकप्रसिद्ध अग्नींत काष्ठरूप समिधानें । धूमोत्पत्ति होते तैशी आदित्यरूप समिधानें । किरणांची उत्पत्ति होते या कारणानें । किरणें स्वर्गाग्नीचा धूम असे ॥ २४ ॥ आणि संवत्सररूप समिधें-करून । श्वेत मेघांचें होतसे जनन । म्हणून ते संवत्सर श्वेत मेघयोगेंकरून । मेघरूप अग्नीचा धूम आहे ॥ २५ ॥ आणि काष्ठमय पृथ्वीरूप समिधांनीं । उत्पन्न होतो लोकप्रसिद्ध अग्नि । या कारणानें तो अग्नि- । लोक मनुष्यरूप अग्नीचा धूम आहे ॥ २६ ॥ प्रसारित मुखरूप समिधानें । प्राणरूप वायूची उत्पत्ति समजणें । म्हणून तो प्राणरूप वायु जाणणें । पुरुषरूप अग्नीचा धूम ॥ २७ ॥ 'आणि उपस्थरूप समिधेंकरून । लोम होती उत्पन्न । ते लोम येणेंकरून । योषिद्रूप अग्नीचा धूम आहे ॥ २८ ॥ आतां स्वर्गादिक पंचाग्नीचे । ज्वालारूपें जे योग्य पदार्थ ध्यान करण्याचे । निरूपण करूं त्या पदार्थांचें । समिधजन्य प्रकाशजन्याचें नाम 'ज्वाला' आहे ॥ २९ ॥ जैसें प्रसिद्ध अग्नीची ज्वाला काष्ठसमिधेंकरून । प्रकाशक-तथा आहे समिधजन्य । तैसे दिन आदित्य समिधजन्य प्रकाशक असती म्हणून । ते दिन स्वर्गाग्नीची ज्वाला आहे ॥ ३० ॥ आणि विद्युत् संवत्सररूप समिधजन्य । तथा प्रकाशक आहे म्हणून । विद्युत् मेघरूप अग्नीची ज्वाला जाण । ऐसें प्रमाण उपनिषदीं ॥ ३१ ॥ तथा अंधःकारमय रात्री कृष्णवर्ण । पृथ्वीरूप समिधजन्य । तथा निशा जीवासि प्रकाशक आहे म्हणून । ती रात्री मनुष्यलोकाग्नीची ज्वाला असे ॥ ३२ ॥ आणि वागिंद्रिय-प्रसारित सुखरूप समिधजन्य । तथा अर्थप्रकाशक आहे म्हणून । तें वागिंद्रिय पुरुषरूप शोभायमान् । अग्नीची ज्वाला आहे ॥ ३३ ॥ आणि गोलकरूप योनि उपस्थ इंद्रिय समिधजन्य । तथा अग्निज्वालेसमान रक्तवर्ण । प्रकाशमान् आहे म्हणून । ती योनि योषिताग्नीची ज्वाला आहे ॥ ३४ ॥ आतां स्वर्गादि पंचाग्नीचें अंगाररूपेंकरून । ध्यानायोग्य

पदार्थांचें निरूपण । लोकप्रसिद्ध अग्निज्वालेचें उपशमन- । कालीं अंगार प्रकाशमान् होती जैसे ॥ ३५ ॥ तैसे दिनरूप ज्वालेचे उपशम संध्याकालांत । पूर्वादिक चारी दिशा बहुत । प्रकाशमान् होती म्हणून चारी दिशा आहेत। स्वर्गरूप अग्नीचे अंगार ॥ ३६ ॥ आणि विद्युत्‌रूप ज्वाला उपशम कालांत वज्ररूप । 'अशनि' होतें प्रकाशवंत । या कारणानें ते अशनि विराजित । मेघरूप अग्नीचे अंगार ॥ ३७ ॥ आणि रात्रीरूप ज्वालेचे उपशम-कालांत । मंदप्रभावानें चंद्रमा होतो प्रकाशित । या कारणानें तो चंद्रमा असत । मनुष्यलोकाग्नीचे अंगार ॥ ३८ ॥ तथा वागिंद्रियरूप ज्वालेचे उपशमकालांत । चक्षुइंद्रिय प्रकाश करित । म्हणून ते चक्षुइंद्रिय शोभत । पुरुषरूप अग्नीचे अंगार ॥ ३९ ॥ आणि योनीरूप ज्वालेचे उपशमकालांत । मैथुनाच्या मध्यकालीं जो आनंद होत । तो आनंद होय योषित्- । रूप अग्नीचे अंगार ॥ ४० ॥ आतां स्वर्गादिक पंचाग्नीचें । विस्फुल्लिंगरूपें ध्यान करणाचें । योग्य जे पदार्थ तयांचें । निरूपण करितों श्रोते हो ॥ ४१ ॥ जैसें लोकप्रसिद्ध अग्नीचें विस्फुल्लिंग । तैसें ईशानकोणादि चारी उपदिशा अव्यंग । त्या उपदिशा असती विस्फुल्लिंग । स्वर्गरूप अग्नीच्या ॥ ४२ ॥ आणि मेघांचे गर्जनारूप जे शब्द । ते शब्द मेघाग्नीचें विस्फुल्लिंग विशद । आणि यज्ञादि कर्मकर्ते मनुष्यलोकीं प्रसिद्ध । तारागणरूप परिणामासि पावती ॥ ४३ ॥ म्हणून तें नक्षत्ररूप तारांगण । मनुष्य लोकाग्नीचें विस्फुल्लिंग विराजमान् । आणि श्रोत्रियजन्य शब्दाकार वृत्ति म्हणून । त्या वृत्ति पुरुषाग्नीचें विस्फुल्लिंग असती ॥ ४४ ॥ आणि आलिंगनादिकापासून । जो आनंद होय उत्पन्न । तो आनंद योषित्‌रूप अग्नीचें प्रकाशमान् । विस्फुल्लिंग असे हो ॥ ४५ ॥ आतां स्वर्गादि पंचाग्नीचे । आहुतिरूपें ध्यान करण्याचे । जे योग्य पदार्थ तयांचें । निरूपण करुनि दावूं ॥ ४६ ॥ जैसे प्रसिद्ध अग्नीच्या यव-घृतादिक । पदार्थ आहुति होती अनेक । तैसी श्रद्धारूप आहुति सम्यक् । स्वर्गरूप अग्नीची विराजे ॥ ४७ ॥ येथें 'श्रद्धा' शब्दें श्रद्धायुक्त केलेलें । जे अग्निहोत्रादिक

कर्म चांगलें। त्या कर्मापासून उत्पन्न झालेलें। जें धर्मरूप 'अपूर्व' ॥ ४८ ॥ तें धर्मरूप 'अपूर्व' या जीवात्म्याचे। समागमें जातसे ठायीं परलोकाचे। त्या धर्मरूप अपूर्वाचें। येथें ग्रहण करावें ॥ ४९ ॥ आणि ती धर्मरूप श्रद्धा जाऊनि स्वर्गातें। त्या कर्मी पुरुषाच्या सोममय शरीरास रचिते। भोगाच्या समाप्ति-कालीं तेथें। शोकरूप अग्नीनें ॥ ५० ॥ तें सोममय शरीर द्रवीभावासि प्राप्त। होऊनि मेघामाजीं असे मिळत। म्हणूनि जीवमिश्रित सोम असत। मेघरूप अग्नीची आहुति ॥ ५१ ॥ आणि त्या मेघानंतर वृष्टिरूपेंकरून। जीव मनुष्यलोकासि प्राप्त होती म्हणून। जीवमिश्रित वृष्टि आहे जाण। मनुष्यलोकाग्नीची आहुति ॥ ५२ ॥ आणि त्या वृष्टीनंतर अन्नरूपेंकरून। ते जीव पुरुषाचे ठायीं प्राप्त होती म्हणून। तें जीवमिश्रित अन्न। पुरुषरूप अग्नीची आहुति असे ॥ ५३ ॥ आणि त्या पुरुषानंतर रेतरूपेंकरून। योषितेचे ठायीं जीव प्राप्त होती म्हणून। तें जीवमिश्रित रेत जाण। योषितरूप अग्नीची आहुति असे ॥ ५४ ॥ आणि यजमान-पुरुषाचे इंद्रियादि करणाचे। अधिष्ठातारूप जे इंद्रादिक देव साचे। ते स्वर्गादिक पंचाग्नींत श्रद्धादि पांचांचे। आहुतीसि हवन करणारे असती ॥ ५५ ॥ याप्रकारें स्वर्गादिक पांचांस। अग्निरूपानें ध्यान करणारे पुरुष। ते प्राप्त होती ब्रह्मलोकास। ऐशी पंचाग्निविद्या उपनिषदीं कथिली ॥ ५६ ॥; आतां परिसावी स्वामिलीला। जेणें भय-संकट-रोगादि जाती लयाला। मोगलाईंत नळदुर्ग नामें ग्राम चांगला। अक्कलकोटाहूनि नव कोश ॥ ५७ ॥ तेथें गोपाळ आणि मारुती नायिक। त्यांसि तिसरा सापत्न बंधु एक। ऐसे राहत होते सुखी धनिक। त्यांतील धाकट्या तिसऱ्यानें ॥ ५८ ॥ दत्तात्रेय-स्वामिरायांस। भागसंबंधीं केला नवस। कीं पहिल्या मातुश्रीच्या वडील मुलास। म्हणजे मारुतीस भाग मिळेल जरी ॥ ५९ ॥ तरी मजला सारखा भाग येईल। तेव्हां चतुर्थांश धन त्यांतील। दत्तात्रेय-स्वामींस अर्पीन तात्काळ। सारखी वांटणी मिळाल्यास ॥ ६० ॥ दत्तात्रेयकृपें त्यास सारखा भाग। प्राप्त झाला

मनाप्रमाणें योग्य ॥ चतुर्थांश धन अर्पणाचा त्याग । केला तयानें नवसाचा ॥ ६१ ॥ धनलोभें देव-गुरु-संतांसि उच्छेदिती । धनलोभें माता-पितादिकांस मारिती । धनलोभें निर्दयी दुसऱ्याचे प्राण घेती । धनलोभें करिती चौर्य कर्म ॥ ६२ ॥ धनलोभी होती जाति-भ्रष्ट । धनलोभी अनुचित कर्मैं करिती दुष्ट । धनलोभी नोळखिती मित्र इष्ट । सखे सोयरे बांधवादि ॥ ६३ ॥ धनलोभें वाढे व्यभिचार । धनलोभें नुपजे सारासार विचार । धनलोभें होतसे दुराचार । कुलाचार वृद्धाचार सुटतसे ॥ ६४ ॥ धनलोभी असती अति कृपण । वरी वरी बोलती मिष्ट भाषण । धनलोभी जरी गेला प्राण । तरी कवडीही न खर्चिती ॥ ६५ ॥ धन-संपादनीं होती अति क्लेश । तैसें संरक्षितांही दुःख विशेष । होतसे होतां धन-व्यय नाश । ऐशा क्लेशकारी धनासि धिक्कार असो ॥ ६६ ॥ धन-द्रव्यांत सकल अनर्थ वसती । धन-द्रव्यांत भेद-कपट-घात क्रीडती । धन-द्रव्यांत प्राणिमात्र गुंतती । ऐशा अनर्थकारक अर्थासि धिक्कार असो ॥ ६७ ॥ धन-अर्थांत काम-राग-क्रोध- । दंभ-द्वेष-मद-मत्सर-अहंकार-विरोध । विश्वासघात हे अधिकारी सावध । नांदती भृत्यबंधुवधादिक ॥ ६८ ॥ धनलोभें सुटती वर्णाश्रम-धर्म । धनलोभें सुटती दया-क्षमा-शांति-विश्राम । धनलोभें होतसे वायु-चित्तभ्रम । केवल धन दुःखरूप आहे ॥ ६९ ॥ धनलोभी धिक्कारिती पुण्यकर्म योगयाग । धनादिकांचा न घेती उपभोग । किंवा दानधर्म परोपकारी उपयोग । न करिती सहसाही ॥ ७० ॥ म्हणून सुज्ञें अर्थसंग्रह न करितां । दानधर्म करूनि धनोपभोग घ्यावा तत्त्वतां । नातरी घडे संचित अर्था । मधुमक्षिका-न्याय उघड हो ॥ ७१ ॥ असो दशसहस्र रौप्य-मुद्रिका प्राप्त । आणि गृहादिकाचाही वांटा मिळत । तरी दत्तात्रेय-स्वामींचा नवस धनलोभांत । बुद्धिपुरःसर विसरला ॥ ७२ ॥ पुष्कळ लोकांनीं सत्य सांगितलें । कीं नवस देवाचे पाहिजेत फेडिले । तथापि त्या धनलोभ्यानें धिक्कारिलें । समस्तांचें हितकर वचन ॥ ७३ ॥ धनलोभें

तयाची बुद्धि भ्रष्ट झाली । दुर्वासना वृद्धीस पावली । 'वासना तैशी फळें' अवश्य भोगिलीं । पाहिजेत स्वकर्मकृतीचीं ॥ ७४ ॥ विनोदें हांसत हांसत कर्म करावें । रडत रडत तें परिणामीं भोगावें । हें उघडचि जाणती लोक अघवे । 'द्यावें तैसें घ्यावें' तें ॥ ७५ ॥ पुढें नवल वर्तलें स्वल्प कालांत । नायिकानें जें द्रव्य ठेविलें होतें पृथ्वींत । त्या सर्व द्रव्याचे कोळसे झाले त्वरित । परमेश्वरचरित्र अगम्य असे ॥ ७६ ॥ एके दिवशीं पृथ्वींतील स्वधन । नायिक पाहूं लागला गुप्तपणेंकरून । तो त्याचे कोळसे झाले कृष्णवर्ण । देखूनि भयचकित जाहला ॥ ७७ ॥ नंतर प्रज्ञापुरीं येऊनि तत्काल । उभा राहूनि स्वामिसमर्थांजवळ । आक्रोशानें पिटी वक्षस्थळ । कपाळ फोडूं लागला ॥ ७८ ॥ होऊनि नायिक शरणागत । वारंवार घाली समर्थांसि दंडवत । झाला अतिशय शोकाकुलित । धनलोभी मधुमक्षिकेसारिखा ॥ ७९ ॥ तेव्हां स्वामिराज हांसले । म्हणती देवांनीं मनासारिखें बहु धन दिलें । तें त्या देवांनीं स्वयें परत नेलें । आतां कांहीं न चाले उपाय तेथें ॥ ८० ॥ यास्तव आमचेकडे यदर्थी कांहीं । विचारणें सांगणें उरलें नाहीं । प्राण दिलास तरी उपयोग लेशही । होणें नसे म्हणूनि गृहीं जावें ॥ ८१ ॥ जैसें आम्हांसि भजती । तयासि तैशी होतसे फलप्राप्ति । भावनेसारखी सिद्धि होय ती । तस्मात् भावना शुद्ध असावी ॥ ८२ ॥ धातु-काष्ठ-पाषाण-मृत्तिकेंत । वास्तविक देव नाहीं वसत । शुद्ध भावेंकरून देव पावत । म्हणून भावचि मुख्य कारण असे ॥ ८३ ॥ असो नायिक होऊनि खिन्नचित्त । गेला आपल्या नळदुर्ग ग्रामांत । श्रीगुरुलीला अपरिमित । परिसा माशाळ ग्रामांतील ॥ ८४ ॥ अक्कलकोटापासून सहा कोशांवर । माशाळ ग्रामीं सिंदगीकर । जगप्पा स्वामींचे शिष्य आहेत फार । स्वामींचा मठ दूर असे ॥ ८५ ॥ ग्रामांतील एका देवालयांत । एकत्र होऊनि ब्रह्मवृंद पुण्यतिथि करित । संप्रदायें मध्यरात्रीस आराधना होत । नंतर ब्राह्मणभोजनादिक होतसे ॥ ८६ ॥ त्या आराधनेकालीं माशाळ गांवीं । स्वामी समर्थ त्रिभुवनगोसावी । दुसरे

देवालयांत मंडळी बरवी । सहित उतरले होते ॥ ८७ ॥ हें वृत्त कळलें तेथील ब्रह्मवृंदांस । मग ते आले प्रभूंसि पाचारणास । सेवेकरी सकळ पूजारी मंडळींस । भोजनास चलावें म्हणती ॥ ८८ ॥ परंतु मध्यरात्रीस देव दिगंबर । भोजनास येतील कीं नाहीं हा विचार । म्हणून सेवेकरी मंडळ सत्वर । जेवूनि पातले समर्थपदीं ॥ ८९ ॥ तेव्हां दत्तदिगंबर जागृत होऊन । शिष्यवर्गास सांगती आज्ञाप्रमाण । ब्राह्मणांचीं उच्छिष्ट-पात्रें आणून । दाखवा सर्व आम्हांसि ॥ ९० ॥ सेवेकरी यांनीं जाऊनि त्याकालीं । ब्राह्मणांच्या स्वल्प आणिल्या उच्छिष्ट पत्रावली । तें पाहून पुन्हां आज्ञापिती चंद्रमौलि । संपूर्णोच्छिष्ट-पात्रें आणावीं ॥ ९१ ॥ त्या सर्व उच्छिष्ट पत्रावलि स्वकरें । अश्वाच्या रिकिबींतून काढिल्या एकसरें । त्या पात्रांचा होम करविला यतिवरें । सेवेकऱ्यांचे हस्तांनीं ॥ ९२ ॥ त्या ब्रह्मवृंदांतील श्रेष्ठ ब्राह्मण । त्यांचें इतर द्विज करिती पादप्रक्षालन । त्यांत दत्तात्रेय-स्वामी समर्थांचें चरण । प्रक्षालितां देखिलें द्विजांनीं ॥ ९३ ॥ सर्वांसि वाटलें विशेष कौतुक । हें खरें खोटें परीक्षा पहावया लोक । दुसऱ्या देवालयीं शोधिती यतिनायक । तों बैसले होम करूनियां ॥ ९४ ॥ संपूर्ण ब्राह्मणादिकांची झाली खात्री । म्हणती उद्धराया धरित्री । ज्यास गाइलें वेदपुराणादि-शास्त्रीं । आदि नारायण तेचि साक्षात् अवतरले ॥ ९५ ॥ या परमपुरुषाची अतर्क्य लीला । आम्ही मंदमति नेणों सामर्थ्याला । पूर्णब्रह्म परमात्मा प्रकटला । प्रज्ञापुर-पंचकोशांत ॥ ९६ ॥ केवल निर्विकार निरुपाधिक । परमार्थ-दृष्टीनें पाहतां वास्तविक । अद्वितीय परमानंदस्वरूप अलौकिक । जगदुद्धारक अवतरलें ॥ ९७ ॥; पुणें शहरांत तुळशीबागेसमीप । राहणारे वामन राजाराम घोलप । यजुर्वेदी ब्राह्मण सुखरूप । गृहस्थाश्रमीं वर्तती ॥ ९८ ॥ त्यांस कराची शहरांत नौकरी । होती इंग्रज सरकारचे दरबारीं । शहरांतील मार्गांचे कामावरी । असतां भारी त्रासविलें लोकां ॥ ९९ ॥ पुष्कळ द्रव्य त्यांनीं संपादिलें । नंतर अनुचित कर्म करूं

लागलें । सुंदर परस्त्रीलंपट झाले । सद्गृहस्थ सुशिक्षित असूनि ॥ १०० ॥ त्या स्त्रीच्या भ्रतारासि कळलें पाप । तो अतिशय धरूनि संताप । संधि साधूनि पोलिस साक्षी गुपचूप । ठेवूनि काम चालविलें ॥ १ ॥ दुसरीं कामेंही निघालीं घोलपावर । तेव्हां रागावले सरकारी कामदार । त्यांनीं उभयतांस ठेविलें तीव्र । अटकावांत उघडपणें ॥ २ ॥ घोलपावरी ओढवला घोर प्रसंग । तदा दत्तात्रेयस्वामींचें स्मरण अभंग । करित वदती धांव धांव बा श्रीरंग । दत्तात्रेय स्वामी कृपार्णवा ॥ ३ ॥ निद्रा न येई मोठी काळजी । भय कंपादि उद्भवती काळजी । म्हणती श्रीपादवल्लभ नरहरि गोपाळजी । सांभाळा जी मला पापिष्ठा ॥ ४ ॥ माय माझी दत्तात्रेय-माउली । जैशी वत्सार्थ धेनु त्वरें ये धांवत पाउलीं । त्यापरी येऊनि करीं कृपेची साउली । तुजविण त्राता अन्य नसे ॥ ५ ॥ जरी पातकी आहे त्वच्चरणदास । तरी महत्संकटीं सांभाळिलें पाहिजे तयास । दीन-प्रणतवत्सल जगन्निवास । आपल्या ब्रीदास संरक्षावें ॥ ६ ॥ तुजविण इतर नसे त्राता । एक दत्तगुरु स्वामी सखा मातापिता । बालकासि संकटांतून काढीं आतां । ऐसें प्रार्थितां कृपानिधि धांवले ॥ ७ ॥ वामनराव घोलपाचे समोर । दत्तात्रेय ईश्वर उभे ठेले सत्वर । म्हणती भिऊं नये संकट होईल दूर । ऐकूनि नमस्कार घोलप घाली ॥ ८ ॥ अभयवचन देऊनि दत्तदिगंबर । फकीरवेषें गेले त्या स्त्रीसमोर । देऊनि वचन अभयकर । गुरुवर्य झाले अदृश्य तदा ॥ ९ ॥ दुसरे दिवशीं न्याय-कचेरींत । काम चाललें जें विपरीत । घोलप आणि त्या स्त्रीस कामांत । न्यायाधीश प्रश्न विचारिती ॥ ११० ॥ पाहूनि तें काम इत्थंभूत । न्यायी कामदारें न्यायरीतीं उक्त । घोलप आणि त्या स्त्रीस दोषमुक्त । निर्णय करूनि सोडिलें ॥ ११ ॥ नंतर ते वामन राजाराम । सोडूनि सर्व सरकारी काम । गाणगापुरास येऊनि सप्रेम । पूजन नैवेद्यादिक करिती ॥ १२ ॥ दत्तात्रेयस्वामींनीं पूर्वींची ओळख । प्रज्ञापुरीं दिधली

चोख । तेव्हां घोलप विस्मित होऊनि सुखरूप । आले पुण्यासि स्वगृहीं ॥ १३ ॥ दुसरे दिवशीं प्रातःकाळीं ग्रामाबाहेर । जाऊनि विलोकिती शोधिती वारंवार । तों न दिसले जगदीश्वर । स्वामीसमर्थ अवतारिक ॥ १४ ॥ म्हणूनि पुन्हां घोलप विलोकिती । तों न दिसे योगिराज मूर्ति । यास्तव अक्कलकोटीं शीघ्रगतीं । केलें पत्रलेखन पूजाऱ्यासि ॥ १५ ॥ अक्कलकोटाहूनि आलें पत्रोत्तर । श्रीगुरु स्वामीसमर्थ अवतार । कृत्य संपवूनि निजानंदीं निरंतर । पांच दिवसांपूर्वीं स्थित झाले ॥ १६ ॥ चैत्र वद्य चतुर्दशी भौमवारीं । शके अठराशें बहुधान्य संवत्सरीं । श्रीस्वामिराज दत्तावतारी । विदेह-समाधिस्थ जाहले ॥ १७ ॥ ऐसें अक्कलकोटचें पत्र पाहून । आश्चर्य मानिती घोलपादिकरून । काल आमचे येथें येऊन दर्शन । प्रत्यक्ष दिधलें योगीश्वरें ॥ १८ ॥ हा मोठा विलक्षण चमत्कार । पत्रद्वारें कळविला प्रज्ञापुरीं सत्वर । समाधिस्थ झाले असूनि वारंवार । भेटती भक्तांसि सगुणरूपें ॥ १९ ॥ हैद्राबादेस प्रिय भक्तांसि भेटती । मुंबई पुणें नगरीं जनांस दर्शन देती । बडोदें आणि काठेवाडांत प्रगटती । भक्तकार्यार्थ स्वामिराज ॥ १२० ॥ लखतरचा द्विज दवे-उपनाम । प्रसिद्ध चिमणलाल गणपतराम । तयासि सगुण दर्शन दिधलें प्रथम । कलकत्त्यास यतीश्वरें ॥ २१ ॥ प्रपंच लौकिकमार्गें अदृश्य जाहले । परी सर्वांतर्यामीं असती संचरले । साकार किंवा निराकार स्वलीलें । दर्शन देती दासासि ॥ २२ ॥ हे घोलप वामनराव । गाणगापुरीं अक्कलकोटीं युक्तभाव । दर्शनासि येऊनि पूजनादि सर्व । उत्तम प्रकारें सेवा करिती ॥ २३ ॥ समर्थांच्या उत्साहाकरितां पुण्याहून । शाका-फल-पुष्पादि धान्य । अक्कलकोटीं पाठविती अगत्य करून । सद्गृहस्थ गुरुभक्त ते ॥ २४ ॥ हे वामनराव घोलप लौकिकवान् । व्यवहारकुशल बुद्धिमान् । सदाचारी पुण्यास सुखेंकरून । नांदती गृहस्थाश्रमांत ॥ २५ ॥; मोरेश्वर हरि नागर ब्राह्मण । ब्र्हाणपुरनिवासी जाण । इंदूरचे प्रसिद्ध सावकार श्रीमान् ।

'किबे' म्हणून ब्राह्मण आहेत ॥ २६ ॥ त्यांचे पदरीं असे आश्रित । त्यानें द्रव्य मिळविलें बहुत । यजमानाचा केला विश्वासघात । त्यायोगें दुर्घट प्रसंग पातला ॥ २७ ॥ जाहला चिंताग्रस्त मानस । कांहीं व्यवहार सुचेना तयास । तेव्हां अक्कलकोटच्या स्वामिरायांस । केला नवस अनन्यत्वें ॥ २८ ॥ संकट प्रसंग हा टळेल जरी । पन्नास रुपयांनीं पादुका मढवून देईन तरी । त्याप्रमाणें कार्यभाग खरोखरी । मनासारिखा जाहला ॥ २९ ॥ मनासारिखें निर्भय झाल्यावर । अक्कलकोटीं येऊन राहिला मोरेश्वर । म्हणे समर्थांनीं स्वतः मागितल्यावर । देतों ऐशा द्रव्यमदें ॥ १३० ॥ प्रज्ञापुरीं मास त्रय राहिला जाण । एके दिवशीं समर्थांसंनिध बैसून । सावकारीच्या गोष्टी साभिमान । करूं लागला नागर विप्र ॥ ३१ ॥ त्या कालीं नृसिंह मुनीश्वर वदती । धन्याचें द्रव्य पचविलेंस अभिलाष-मतीं । आणि सावकारी थाट आम्हांप्रति । दाखवितोसि काय मदांधा ॥ ३२ ॥ हें अनुभविक परिसूनि वचन । मोरेश्वर अधोवदन होऊन । म्हणे हे परमेश्वर सर्वसाक्षी सर्वज्ञ । सर्वशक्तिमान् आहेत ॥ ३३ ॥ या प्रभूनें माझा अति धनमद । अंतरींचे बोलून शब्द । खरकन् उतरिला विषाद । या गोविंद-मुचकुंदोद्धारकें ॥ ३४ ॥ माझा प्रापंचिक कपटी निंद्यपणा । त्याच्या पटल्या उघड सर्व खुणा । लौकिक व्यवहाराची विदारणा । करूनि नारायणा मज बोधिलें ॥ ३५ ॥ नंतर काष्ठ खडावा घेऊन । गेला पुण्यास तो नागर जाति ब्राह्मण । शुद्ध रौप्याचे पत्रे करवून । काष्ठ-पादुका मढविल्या ॥ ३६ ॥ सारख्या होईनात खडावा । हें देखूनि शरण आला देवाधिदेवा । तथापि खडावांचा धरूनि हेवा । जुनी खुंटी काढून घेतली ॥ ३७ ॥ दक्षिण पाद-खडावाची खुंटी । नवी करवून मढवून बसविली गोमटी । सात्त्विक जाति ब्राह्मण असूनि कपटी । मोठा खटपटी नागर तो ॥ ३८ ॥ खडावा घेऊनि अक्कलकोटीं । आला मोरेश्वर हरि लटपटी । प्रभूंसि साष्टांग नमूनि शेवटीं । खडावा पुढें ठेविल्या

॥ ३९ ॥ खडावा विलोकूनि मोरेश्वरा । योगींद्र वदती कां रे कपटी तस्करा । दक्षिण पादाचा नखसहित खरा । अंगुष्ट काढून घेतलासि ॥ १४० ॥ सावकारी जीवावर । उन्मत्त झालासि काय रे विप्रा नागर । अनुचित कर्माचा परिणाम सुंदर । नाहीं सर्वथा होणार ॥ ४१ ॥ परिसूनि योगीश्वर वचनाला । मृत्तिकेच्या लोष्ठासारखा विरघळला । कृत कर्माचा पश्चात्ताप वाटला । येता झाला शुद्धीवर तो ॥ ४२ ॥ हिराबाई सात्त्विक तयाची पत्नी । साध्वी धर्मशील तिनें पुण्यास जाऊनि । दिधला दक्षिण पादांगुष्ठ आणूनि । लोळती चरणीं उभयतां ॥ ४३ ॥ म्हणती मायबापा जगज्जीवना । अपराध क्षमा व्हावे पतितपावना । अनुचित पापकर्म-क्षयार्थ जाणा । उदयिक प्रायश्चित्त घेतसों ॥ ४४ ॥ मग विद्वान् वैदिक द्विज पाचारिले । यथाशास्त्र मोरेश्वरें प्रायश्चित्त घेतलें । दत्तात्रेयस्वामींचें यथासांग केलें । पूजन आणि ब्राह्मणभोजन ॥ ४५ ॥ त्यांना पुत्रसंतान मुळींच नव्हतें । म्हणूनि करिती विनंतीतें । श्रीमद्दत्तात्रेय-जगद्गुरूतें । स्त्री-पुरुष अति लीन होऊनि ॥ ४६ ॥ आमचा जन्म पुत्रावीण वृथैव । आपण कृपासागर देवाचेही देव । जगज्जनका सुरासुर मानव । सकल पूजिती आपणांसि ॥ ४७ ॥ अपराध्यावरती क्षमा व्हावी । पुत्रसंतान-कामना पूर्ण करावी । भक्तवत्सला दीनबंधु उपेक्षा न करावी । शरणागत दीन दासांची ॥ ४८ ॥ तेव्हां प्रभूनें श्रीफल अर्पिलें । एक वर्षांत पुत्ररत्न प्राप्त झालें । तदा उभयतां स्त्री-पुरुष अति हर्षले । मानिती उपकार श्रीगुरूचा ॥ ४९ ॥ पुत्राचें नाम ठेविलें 'दत्तात्रेय'। पुढें मुलाचें जावळ काढण्यास हर्षमय । अक्कलकोटीं येऊन द्विजवर्य । स्वामीसमर्थ-चरणां वंदितसे ॥ १५० ॥ शुभ मुहूर्तीं मुलाचें जावळ । काढविलें पाहूनि शुभ ग्रह-बळ । ब्राह्मणभोजनादि दक्षिणा तांबूल । अर्पिलें सर्व सेवेकऱ्यांसि ॥ ५१ ॥ आशीर्वचन-प्रसाद घेऊनि । गेले ब्रह्मणपुरीं स्वसदनीं । पुढें मोरेश्वर प्रकृति बिघडूनि । कैलासवासी जाहले

॥ ५२ ॥ पुत्र दत्तात्रेय व्यवहारकुशल निघाला । स्वामीसमर्थांचे भक्तीस लागला । अक्कलकोटीं समाधीचे दर्शनाला । येतसे वारंवार श्रद्धायुक्त ॥ ५३ ॥; असो जंगम मल्लिकार्जुन- । आप्पा नामें अथणीचा मूळचा असून । जंगममंडळीच्या आग्रहेंकरून । भगवंताचे बारशीस राहिला ॥ ५४ ॥ कीर्तन करी मराठी भाषेंत । ज्ञानेश्वरी गीता भागवत त्यासि अवगत । तो एके वेळीं येऊनि प्रज्ञापुरांत । कीर्तन करूं लागला ॥ ५५ ॥ पाठीमागें त्याचे चिरंजीव चार । वीणा मृदंगादि वाद्यें वाजविती गाती सुस्वर । श्रीमंत मालोजी नृपवर्यासमोर । राजवाड्यांत कीर्तन चाललें ॥ ५६ ॥ कीर्तन आटोपल्या उपरांत । मल्लिकार्जुन येऊं लागले जंगमाचे मठांत । तों मार्गांत फाटकाचे वेशींत । गुरुदेवदत्त स्वामी स्थित होते ॥ ५७ ॥ प्रियभक्त चोळाप्पासंगें खेळती । मल्लिकार्जुन पुसे तदा लोकांप्रति । हेच असती अवतारिक यति । लोक सांगती हेच कीं ॥ ५८ ॥ सुप्रसन्नवदन महा तेजःपुंज । देखिले आप्पानें विश्वगुरु योगिराज । काषायवस्त्र दिव्य आजानुभुज । पायीं पादुका विराजती ॥ ५९ ॥ मल्लिकार्जुन गर्वें मनीं म्हणे । पादसंवाहन काढून पायां पडणें किंवा न पडणें । जे लोकांत आपणांस म्हणविती शहाणे । त्यांस गर्व संशय असणें योग्यचि ॥ १६० ॥ तदा विश्वात्मा वदती आप्पास । आमची पंचाईत करितोसि कशास । पायां पडलास अथवा न पडलास । तरी गरज आम्हां नसे ॥ ६१ ॥ अंतरीचें जाणिलें खरें हृद्गत । पाहूनि मल्लिकार्जुन झाला अति विस्मित । मृत्तिकेच्या ढेंकळासारिखा विरमत । शरणागत जाहला ॥ ६२ ॥ प्रार्थितसे आपण सदाशिव शंकर । साक्षात् आहां सत्य ईश्वर । म्हणून घातलें दंडवत नमस्कार । म्हणे अन्यायी दासास क्षमा व्हावी ॥ ६३ ॥ चलावें आमच्या जंगमाचे मठांत । उद्धरावें मज होऊनि कृपावंत । त्याचें शुद्ध मन पाहूनि भक्तांसहित । गेले अवधूत जंगम-मठीं ॥ ६४ ॥ देवता-मनुष्यादिकां देई जो गतीस । त्या परमात्म्यास घातलें स्नानभोजनास । निःसंशय

उच्छिष्टान्न-प्रसादास । मल्लिकार्जुनें भक्षिलें प्रेमें ॥ ६५ ॥ त्रयोदशगुणी तांबूल-चूर्ण । स्वामीमहाराजांस केलें अर्पण । नंतर अनन्य करद्वय जोडून । देवाधिदेवांस विनवीतसे ॥ ६६ ॥ माझ्या कन्येस तीन वर्षांचा गर्भ असे । तो वाढेना किंवा पतन होत नसे । गांजलीसे फार त्रासें । तंव समर्थ म्हणती गर्भ वाढेल ॥ ६७ ॥ मग चोळाप्पानें स्वामिरायांचा । तीर्थप्रसाद त्या मुलीस दिधला सुखाचा । त्यायोगें गर्भ वाढला जंगमकन्येचा । तेणें विश्वास पूर्ण प्रभुपदीं जडला ॥ ६८ ॥ बारशीस जातेवेळीं मल्लिकार्जुन । म्हणे प्रसाद द्यावा हो गिरिजारमण । जगद्गुरूंनीं मुखवस्त्र दिधलें फेंकून । मल्लिकार्जुनाचे आंगावरी ॥ ६९ ॥ त्या प्रसादवस्त्राचे पूजनें नित्य । स्वामीसमर्थ-नामाचा भस्म अंगारा सत्य । लोकांसि देतसे तेणें अगत्य । गुणावह होऊं लागलें ॥ १७० ॥ पुढें त्या नवसाच्या द्रव्येंकरून । श्रावणमासभर जंगमासि घातलें भोजन । त्याकाळीं राजवाड्यांत यतींद्र असून । सात दिवस अन्न घेत नव्हते ॥ ७१ ॥ तेव्हां मालोजी नृपवरें विनविलें । जगन्नाथा आपण अन्न कां त्यागिलें । तैसें इतर लोकांनीं विचारिलें । तंव बोलिले विश्वंभर चैतन्यघन ॥ ७२ ॥ बारशीस भगवंताचे पुण्य-नगरीं । जंगमाचीं भोजनें चाललीं श्रावणमासभरी । तेथें आम्ही मल्लिकार्जुन भक्ताचे घरीं । तृप्त होऊनि प्रज्ञापुरीं असतों ॥ ७३ ॥ ऐसें विश्वव्यापकांनीं सांगितल्यावर । श्रीमंत मालोजी नृपवरें देऊनि पत्र । बारशीस पाठविले उंट घोडेस्वार । खरोखर वृत्तांत कळावया ॥ ७४ ॥ स्वार बारशीस जाऊनि करिती शोध । तंव जंगम सांगती शपथ शुद्ध । येथें दत्तात्रेयस्वामी पूर्ण अगाध । सात दिवस होते जंगमाश्रमांत ॥ ७५ ॥ स्वारास भोजनादिक घातलें । मल्लिकार्जुनें महीवरास पत्र दिधलें । तैसें सर्वांनीं चोळाप्पासही कळविलें । प्रत्यक्ष मनुष्यें पाठवूनि ॥ ७६ ॥ त्या स्वारांनीं त्वरें अक्कलकोटीं । येऊनि नृपवरास पत्र दिधलें सत्य गोष्टी । आणि चोळाप्पांनींही मनुष्यद्वारें झटपटीं । बारशीचें वृत्त काढविलें ॥ ७७ ॥ तें श्रीमंत मालोजीरायास कळविलें । तेव्हां सर्वत्रांसि अत्यंत

आश्चर्य वाटलें । म्हणती हे साक्षात् परमात्मा अवतरले । विश्वव्यापक निःसंशय ॥ ७८ ॥ चैतन्यात्मरूपें सर्वत्र सर्वदा वसती । आम्हांसि वेषधारी संन्यासी दिसती । यांची न कळे कोणा सामर्थ्यगति । अवतारकृति लीलेची ॥ ७९ ॥ जयाचें लीलामृत कर्णद्वारें प्राशन । करितां भय-संकट-रोग होती नष्ट जाण । संसारभान सुटे जरा-जन्ममरण । तुटे बंधन सत्य तें ॥ १८० ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । चतुश्चत्वारिंशाध्याय गोड हा ॥ १८१ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे चतुश्चत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ॥ ४४ ॥ श्रीगुरुदेवदत्त-स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय पंचेचाळिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ गुरु वदती शिष्या निर्विवाद । जें बृहदारण्य उपनिषद । त्यांतील याज्ञवल्क्य-जनक-संवाद- । रूप निरूपण परिसावें ॥ १ ॥ प्रमाण अप्रमाणाची । सिद्धि अंगिकार कराल साची । तरी जैसें मिथ्या रज्जु-सर्प तथा शुक्तीची । म्हणजे शुक्ति-रजतासि विषय करणारें ज्ञान ॥ २ ॥ रज्जुसर्पासि तथा शुक्तिरजताला । विषय करणारें जें ज्ञान त्याला । अप्रमाणपणा आला । ऐसें मानण्यानें ॥ ३ ॥ तैसें अप्रमाणासि विषय करणारें । प्रमाणही अप्रमाण होईल बा रे । म्हणून प्रमाणयोगें संभवत नसे रे । अप्रमाणाची सिद्धि शिष्या ॥ ४ ॥ जैसें अप्रमाण अप्रमाणानें । सिद्ध होत नसे जैसें प्रमाणानें । तैसें प्रमाणही प्रमाणानें । अप्रमाणानें सिद्ध होत नाहीं ॥ ५ ॥ जर प्रमाणाचें प्रमाणानें होईल ग्रहण । तरी तें ग्राहक प्रमाण । प्रथम ग्राह्य-प्रमाणाहून । अभिन्न किंवा भिन्न असे ॥ ६ ॥ तें ग्राहक प्रमाण आद्य ग्राह्य प्रमाणाहून । जरी म्हणशी आहे अभिन्न । तरी आपल्या ग्रहणास्तव आपला जाण । अपेक्षारूप ‘आत्माश्रय’-दोष येतसे ॥ ७ ॥ आणि तें ग्राहक प्रमाण ग्राह्य प्रमाणाहून । जरी म्हणशी आहे भिन्न । तरी त्या ग्राहक प्रमाणाचें सिद्धिजनन । कोणत्या प्रमाणानें होईल ॥ ८ ॥ आपल्यायोगें त्या ग्राहकप्रमाणाची । सिद्धि होईल जरी म्हणशी साची । तरी आपल्या सिद्धीस्तव निज अपेक्षारूपचि । आत्माश्रय दोष प्राप्त ॥ ९ ॥ आणि प्रथम ग्राह्य प्रमाणानें होईल । त्या ग्राहक प्रमाणाची सिद्धि ऐसें म्हणशील । तरी प्रथम प्रमाणासि स्वसिद्ध्यर्थ येईल । अपेक्षा दुसऱ्या प्रमाणाची ॥ १० ॥ आणि दुसऱ्या प्रमाणासि निजसिद्ध्यर्थ । प्रथम प्रमाणाची अपेक्षा येत । तेव्हां ‘अन्योन्याश्रय’-

दोष खचित । या रीतीं प्राप्त होईल वादीस ॥ ११ ॥ आणि तें दुसरें प्रमाण आपल्या सिद्धीस । तिसरे प्रमाणाचे करील अपेक्षेस । तर त्या तिसरे प्रमाणाचे सिद्धीस । स्वप्रमाणानें किंवा अन्यप्रमाणानें सिद्धि आहे ॥ १२ ॥ अथवा प्रथम प्रमाणानें सिद्धि असे । जरी म्हणशी तिसऱ्या प्रमाणासि ऐसें । आपल्यायोगें सिद्धि होतसे । तरी येतसे आत्माश्रय-दोष ॥ १३ ॥ आणि दुसऱ्या प्रमाणानें तिसरे । प्रमाणाची सिद्धि मानिशी जरी वादी रे । तरी अन्योन्याश्रय-दोषप्राप्ति बा रे । होईल तुझिया मनांत ॥ १४ ॥ आणि प्रथम प्रमाणानें जर । तिसरे प्रमाणाची सिद्धि मानिशी तर । प्रथम प्रमाणाची सिद्धि इतर । प्रमाणानें मानावी लागे ॥ १५ ॥ दुसऱ्या प्रमाणाची सिद्धि तिसरे प्रमाणानें । आणि तिसऱ्या प्रमाणाची सिद्धि प्रथम प्रमाणानें । पुन्हां ऐसें चक्रन्याय मानण्यानें । भ्रमणरूप 'चक्रका-' दोष येतसे ॥ १६ ॥ आणि तिसरे प्रमाणाचे सिद्धीकारणें । जर चौथें प्रमाण अंगीकारणें । आणि चतुर्थ प्रमाण सिद्धीस्तव करणें । पंचम प्रमाणाचा अंगीकार ॥ १७ ॥ ऐशी प्रमाणाची सिद्धि जर मानिली । तर 'अनवस्था'-दोषाची प्राप्ति आली । या कारणानें नाहीं संभवली । प्रमाणानें प्रमाणाची सिद्धि ॥ १८ ॥ म्हणूनि प्रमाणानें प्रमाणाची । सिद्धि कदा न संभवेचि । आणि अप्रमाणानें प्रमाणाची । सिद्धि आहे ऐसें म्हणाल ॥ १९ ॥ तरी अप्रमाणाचा विषय प्रमाण । तोही होईल अप्रमाण । यास्तव अप्रमाणेंकरून । प्रमाणाची सिद्धी संभवत नसे ॥ २० ॥ जैसें प्रमाणाची तथा अप्रमाणाची । स्वरूप-सिद्धि होत नसेचि । तैशी प्रज्ञा आणि अप्रज्ञेची । स्वरूपसिद्धि होत नसे ॥ २१ ॥ म्हणूनि सर्व प्रमाणाचें मुख्य जाण । अनादि स्वतःसिद्ध वेद-प्रमाण । ज्याचेयोगें जगत्कार्य कारण । सिद्ध होतसे सुलभ सरल ॥ २२ ॥; असो कोणी एक गोसावी प्रामाणिक । जटाधारी तपस्वी यात्रा अनेक । तैसेंचि श्रीसेतुबंधरामेश्वर-दर्शन भाविक । करित असतां पादचारी ॥ २३ ॥ दैववशात् त्या गोसाव्यास । जलोदर व्याधि

उद्भवला त्रास । परंतु शरीरदृढतेमुळें विशेष । कांहीं त्यास वाटलें नसे ॥ २४ ॥ तथापि रोगवृद्धि दिवसेंदिवस । तेणें उदर पावलें वृद्धीस । स्वाद न लागे अन्नाचा तयास । चालण्याची शक्ति न्यून झाली ॥ २५ ॥ त्याचे मनांत द्वारका पश्चिमधाम- । यात्रा करावी ऐसें उपजलें प्रेम । चतुर्भुज श्रीकृष्णमूर्तिदर्शन निष्काम । व्हावें मला मनोहर ॥ २६ ॥ ऐसा शुभ संकल्प वारंवार । मानसीं उद्भवे दृढतर । परंतु प्रबल व्याधि जलोदर । शरीरसामर्थ्य नसेचि तेणें ॥ २७ ॥ गोसावी यति साधु बैरागी । मनःसंयमी उदासी देहभोगी । अतित अभ्यागत संत योगी । यांस जागचेजागीं मिळणें काय ॥ २८ ॥ फिरल्यावांचून भिक्षा मिळणें दुर्लभ । कोण आणून देतो अन्नलाभ । म्हणून मंदगतीं भिक्षारंभ । करी गोसावी निरुपायें ॥ २९ ॥ पुढें हळूंहळूं मार्गें पादचारी । येऊनि पोहोंचला श्रीगाणगापुरीं । दत्तात्रेय श्रीपाद श्रीनरहरि- । चरणपादुकांचें दर्शन करी ॥ ३० ॥ चार पांच दिवस घेतली विश्रांति । तेव्हां तेथें कोणी वर्णन करिती । कीं अक्कलकोटास अवतारिक यति । परमहंसपुरुष आहेत ॥ ३१ ॥ त्यांचेंही दर्शन अवश्य घ्यावें । ऐसें गोसाव्यासि सांगती जन बरवें । आतां मंद गतीनें चलावें । म्हणूनि निघाला गोसावी ॥ ३२ ॥ गाणगापुराहूनि दहा दिवसांत । जलोदर व्याधिस्त पातला प्रज्ञापुरांत । दत्तात्रेय-गुरूंचा शोध करित । मुरलीधराचे देवळांत उतरला ॥ ३३ ॥ तेव्हां नव्या विहिरीचे कांठावर । स्थित होते त्रैमूर्ति अवतार । ऐसें गोसाव्यास कळतांच सत्वर । ईश्वरदर्शनार्थ पातला ॥ ३४ ॥ त्याकाळीं प्रभुरायाजवळ । उभे होते लोक पुष्कळ । त्यांना सांगती योगींद्र दयाळ । या बैराग्यासि मार्ग द्या हो ॥ ३५ ॥ बैराग्यांचा तुम्हीं धरूनि कर । व्यवस्थेनें आणावें तयासि येथवर । जगद्गुरूंच्या आज्ञेनुसार । हातीं धरूनि तयास आणिलें ॥ ३६ ॥ नृसिंह-मुनींच्या समोर उभें केलें । मुनीश्वर बैराग्यास देखूनि हांसले । गोसाव्यानें चरणारविंद नमिलें । तदा वदले विश्वप्रिय गुरु ॥ ३७ ॥ कां हो बैरागीबुवा तुमची । इच्छा आहे ना द्वारकेसि जाण्याची । श्रीकृष्णभगवंत-दर्शनाची । सगुण

मूर्ति मनोहर ॥ ३८ ॥ शंखचक्रगदापद्मयुक्त । कौस्तुभवनमालादि अलंकारसहित । पीतांबरधारी किरीट कुंडलान्वित । चतुर्भुज मेघवर्ण ध्यान तें ॥ ३९ ॥ तुमची ती कृष्णदर्शन-लालसा । पूर्ण होईल असूं द्या भरंवसा । हें प्रभुवाक्य परिसूनि प्रबल ठसा । अंतरीं पटला बैराग्यास ॥ ४० ॥ अंतरखूण पटतांचि बैरागी । म्हणे कोण ऐसा अंतसाक्षी जगीं । प्रत्यक्ष परमेश्वर सामर्थ्य अंगीं । अतुल अगम्य जयाचें ॥ ४१ ॥ मनाचा झाला निःसंदेह निश्चय । हे साक्षात् परब्रह्म परमात्मा अद्वितीय । मग विश्वेश्वर वदती गरज काय । कोणी आम्ही असोंत ॥ ४२ ॥ त्या कडुनिंब-वृक्षाचीं पर्णें जाण । त्वां निःशंक करावीं सद्यः भक्षण । प्रभूचें अमृतमय वचन श्रवण करून । निंबपत्रें भक्षिलीं त्यानें ॥ ४३ ॥ परंतु मुख अतिशय कडु झालें । म्हणून बैराग्यानें थुंकून टाकिलें । म्हणे प्रभु हें कडु औषध बोलिलें । भक्षण करवत नाहीं मला ॥ ४४ ॥ कंटाळतों मी कडु औषधासि । नको तेंचि येतें प्रारब्ध-भोगासि । देह आतां विसर्जन झालिया मानसीं । खेद नसे हो पुरुषोत्तमा ॥ ४५ ॥ परमपुरुष आपण योगिराज । दर्शनासि पातलों मी दीन सहज । कृतार्थ करावें शरणागता मज । अज अव्यय जगदीशा ॥ ४६ ॥ तेव्हां जगद्गुरु हास्यवदनें वदती । या निंबाची दुसरी शाखा जे दिसे तीं । कोमल पानें भक्षावीं अति प्रीतीं । कडुत्व नाहीं तयांस ॥ ४७ ॥ मग भगवदाज्ञानुसार । त्याच वृक्षाची शाखा इतर । शाखेची काढवूनि पत्रें सुंदर । भक्षूं लागला गोसावी तो ॥ ४८ ॥ तों वर्तला अपूर्व चमत्कार । कडु निंबाचीं पानें झालीं मधुर । गोसाव्यासि वाटलें नवल फार । म्हणे ईश्वरकृत्य असे हें ॥ ४९ ॥ बैराग्यासि अधिकचि लागली गोडी । तेव्हां लोकही भक्षूं लागले आवडीं । म्हणती पूर्व पुण्याची सत्य जोडी । म्हणूनि पूर्णब्रह्म प्रगटलें ॥ ५० ॥ अहो कडुनिंबपत्रें मुखीं न घालवती । तीं मधुशर्कराधिक गोड लागतीं । भक्षूनियां आश्चर्य मानिती । बैरागी आणि सर्वत्र लोक ॥ ५१ ॥ अमृततुल्य स्वाद अनुभवून ।

गेले ऐसे दिवस तीन । तेव्हां गोसाव्याचें उदर अगदीं लहान । हलकें झालें व्याधिहीन ।। ५२ ।। उदरांतील जडत्व रोगभार गेला । त्यायोगें आरोग्य सावधपणा पावला । स्वप्नासारिखा चमत्कार घडला । जलोदर नामही उरलें नसे ।। ५३ ।। गोसावी दिसूं लागला तेजस्वी । लोक विस्मित झाले मनस्वी । म्हणती योगीश्वर महान् यशस्वी । दत्तात्रेय स्वामी समर्थ ।। ५४ ।। बैराग्याचे आनंदास नसे पारावार । ऐसा वरद भक्तवत्सल सुरेश्वर । गोसावी घाली साष्टांगनमस्कार । बसूं लागला समीप तो ।। ५५ ।।; एके दिवशीं योगींद्रतिलक । पूजारी भक्त गुरुदास सेवक । दर्शनासि आलेले बाहेरगांवचे लोक । यांसहित आनंदमूर्ति स्थित होती ।। ५६ ।। मेहेंदरगीचा पांडुरंग सोनार । त्यानें सुवर्णांत मौक्तिकें जडवूनि चार चार । कुंडलें मनोहर सुंदर । सिद्ध करूनि आणिलीं ।। ५७ ।। स्वामीसमर्थांच्या घातलीं कर्णीं । कंठीं रौद्र स्फटिक प्रवाल माला मणि । प्रकाशे मौक्तिकयुक्त सुवर्णी । अंगीं दिव्यसुगंधउटी ।। ५८ ।। भालीं विराजमान् सुवासिक । अष्टगंध रेखिला तिलक । पुष्पहार श्रीफल-कर्पूरादिक अनेक । करीं घेऊनि लोक तिष्ठती ।। ५९ ।। भावें अर्पिती नमिती श्रीचरण । स्तुतिस्तोत्र गायन चाललें पुराण । उत्तमासन स्थित आदिनारायण । वटपत्रशयनी मूळपुरुष ।। ६० ।। आरोग्य झालेला गोसावी जोडूनि कर । उभा त्या सर्वांतर्यामीसमोर । दत्तात्रेय-नामाचा उच्चस्वरें गजर । त्रैलोक्यभर गाजला ।। ६१ ।। भक्तकार्यकल्पद्रुम चिरंतन । सुप्रसन्न वदन अभय वरदान । जगाचा हितकारी भगवान् । संतोषरूप परमलाभकालीं ।। ६२ ।। परोपकारार्थ अपार लीलाधारी । सच्चिदानंद परब्रह्मस्वरूप निर्विकारी । बैराग्यास विलोकूनि झडकरी । स्वच्छंदें व्यवहार दाविती ।। ६३ ।। अकस्मात श्रीकृष्ण भगवंत । चतुर्भुज सायुध पद्मनाभ शांत । पीतांबरधारी कौस्तुभ-वनमालासहित । घनश्याम सुंदर मनोहर ।। ६४ ।। द्वारकाधीशाचें स्वरूप यथासांग । दिव्य तेजस्वी सांवळा श्रीरंग । बनले कृष्णपरमात्मा अव्यंग । भक्त

कार्यार्थ त्या कालीं ॥ ६५ ॥ गोजीरवाणीमूर्ति लहान । द्वारकाधीशाचें रूप धरिलें सगुण । ज्यांची करणी न कळे जाण । ब्रह्मादिक देवांसि ॥ ६६ ॥ बैराग्याचे अनन्य भक्तीस्तव । द्वारकाधीशाचें रूप धरिलें अपूर्व । प्रणतभक्तवत्सल करुणार्णव । देवाधिदेव विश्वपति ॥ ६७ ॥ श्रीकृष्ण भगवन्मूर्ति परमानंद । सच्चिद्घन नारायण गोविंद । वासुदेव भक्ताभीष्ट वरप्रद । उभा राहिला तिष्ठत ॥ ६८ ॥ दीनबंधु अत्यंत कृपाल । ज्ञानसागर नित्य विशाल । ज्याच्या दर्शनें संसारजाल । तुटे सर्वथा जीवांचा ॥ ६९ ॥ न पाही सेवा उच्च नीच अधिकार । श्रीकृष्ण परमात्मा परात्पर । भक्तभावार्थीं गुंतला श्रीधर । त्रैमूर्तिस्वरूप जगद्गुरु ॥ ७० ॥ अनेक दिव्य सहस्र संवत्सर । अनुष्ठान जप तप कर्म निरंतर । करितां करितां थकती नर । परी तें दर्शन दुर्लभ असे ॥ ७१ ॥ व्हावया परमात्मादर्शन । नाना प्रकारें करिती साधनें जाण । वेंचिती अपरिमित जरी धन । तरी तें दर्शन दुर्लभ असे ॥ ७२ ॥ केलिया तीर्थयात्रा बहुत धाम । ब्रह्मचर्य गृहस्थ वनस्थ आचरितां धर्म । धारण करितां संन्यास चतुर्थाश्रम । तथापि दर्शन दुर्लभ तें ॥ ७३ ॥ तीव्र तपें तपती पर्वतीं । तीर्थाटणें बहुत करित हिंडती । सर्वदा वेद शास्त्रें पढती । परी भगवद्दर्शन दुर्लभ आहे ॥ ७४ ॥ यज्ञयागादिक करिती जन । अनेक मत पंथें विवाद घालून । ताल मृदंगवीणादि वाद्यें भजन । केलें जरी जन्मभरी ॥ ७५ ॥ तथापि श्रीहरि सद्गुरु दयाघन । तच्चरण-सेवनावांचून । श्रीगुरुकृपा-प्रसादावीण । अप्राप्त दर्शन देवाचें ॥ ७६ ॥ तें परमात्मदर्शन सहज गतीं । अनायासें महात्मापुरुषसंगतीं । तात्कालिक सर्व जीव पावती । प्रत्यक्ष प्रतीति सगुण निर्गुण ॥ ७७ ॥ ऐशा त्या बैराग्यास श्रीकृष्ण । कळवळूनि त्रयमूर्ति आपण । महाविष्णु वासुदेव चतुर्भुजरूप धरून । देती दर्शन त्याकालीं ॥ ७८ ॥ कृष्णपाषाणशिलामय मनोहर । द्वारकानाथमूर्ति अतिसुंदर । गगनसदृश घनश्याम । शांताकार । लक्ष्मीकांत देखतसे बैरागी ॥ ७९ ॥ श्रीकृष्णमूर्ति द्वारकेंतील । गोमती-तटीं घाटावरील मंदिरीं विशाल ।

यथा साजिरी लहान दिसे कोमल । तथा तेचि निर्मल अव्यंग दिसतसे ॥ ८० ॥ तैशींच भूषणें सकलअलंकार । जनार्दनपरमात्मा श्रीधर । न्यूनाधिक किंचितही अंतर । नसे थारा कल्पनेसि ॥ ८१ ॥ ज्यांनीं देखिली पुरी द्वारावती । आणि रमाधव-द्वारकाधीशमूर्ति । तेचि अक्कलकोटीं यथावत्स्थितीं । स्वानुभवयुक्त विलोकिली ॥ ८२ ॥ बैराग्यादिक घालिती लोटांगण । प्रार्थिती विश्वोद्भवस्थितिप्रलयकारण । भक्तजनार्ति सकल हरण । नारायणा शेषशायी ॥ ८३ ॥ सर्वज्ञ सर्वसाक्षी सर्वांतरीं नियंता । चतुर्विध मुक्तींचा स्वामी प्रदाता । केवल परब्रह्म उपाधिविरहित तत्त्वतां । सगुणावतार आपण आहां ॥ ८४ ॥ न चळतां निर्विकल्पस्थिति-निर्गुण । जगताचें अभिन्नविवर्तोपादानकारण । तेंचि योगमाया आदिशक्ति अंगिकारून । विश्वोद्धारार्थ सगुण झालें ॥ ८५ ॥ तेंचि विज्ञानमय मायाविशिष्ट उपाधि-गुणें । करणें अकरणें अन्यथा करणें । जें ब्रह्मादि देवां कधीं न होणें । तें अघटित करणें आपलें आहे ॥ ८६ ॥ त्याकालीं सर्वत्र जाहले तन्मय । श्रीकृष्णपरमात्मा-दत्तात्रेय । नृसिंहयोगाधीश्वर यतिवर्य । अभेदस्वरूप एकलें ॥ ८७ ॥ कृष्ण शिलामयमूर्ति प्रसन्नवदन । पाहूनि दचकले संपूर्ण । म्हणती हें आश्चर्य वर्तलें महान् । अवतारकृत्य अमानुषिक ॥ ८८ ॥ सर्वत्र शुद्धांतःकरणभावें । वदती हें दर्शन नित्य असावें । द्वारकानाथा येथें सर्वदा वसावें । हेचि पुरवावे मनोरथ ॥ ८९ ॥ ह्या दर्शनरूप परमानंदकालीं । देहस्मृति अहंकृति सर्वांची गळाली । श्रीकृष्णयोगींद्रस्वरूपप्रवृत्ति झाली । संसारभान उडालें ॥ ९० ॥ जिकडे पहावें तिकडे । द्वारकाधीश दिसे चोहोंकडे । बैराग्यासि वेड भरूनि उडे । नाचे मोठ्या आनंदें ॥ ९१ ॥ म्हणे अहो गुरु विश्वंभरा । महाविष्णु महेश्वरा । दत्तात्रेय स्वामी दयासागरा । अज्ञानअविद्यातीत मज केलें ॥ ९२ ॥ अनेकप्रकारचे ब्रह्मांडांत । आपणच एक चिद्रूप आहां व्याप्त । निःसंशय ब्रह्मांडनायक अनंत । व्याप्त व्यापक वर्जित आहां ॥ ९३ ॥ काय व्हावें आपले उतराई । द्यावा ऐसा पदार्थचि नाहीं ।

* * *

लक्ष्मी लोळे सर्वदा निजपायीं । कोणतें धन द्यावया योग्य ॥ ९४ ॥ कमलपद्म प्रभुचरणीं विराजे । तेथें कोणतें पुष्प उरलें अर्पाया शिळें ताजें । त्वच्चरणांपासूनि निघाली जे । जगत्पावनी भागीरथी ॥ ९५ ॥ म्हणूनि कोणत्या उदकें स्नाना । घालावें आपणां जनार्दना । कोणत्या प्रयत्नें रिझवावें जगत्पावना । सकलसिद्धिदायका ॥ ९६ ॥ नखांची शोभा दीप्ति अनेक । कोटिसूर्यचंद्रांहूनि अधिक । तेथें कोणते धूप दीप दाखवावे अमोलिक । स्वयंप्रकाशी निरांजना ॥ ९७ ॥ अखंड वाजे अनुहत ध्वनि । तेथें कोणतीं वाद्यें वाजवूनि । संतोषवावें देव चक्रपाणि । हें नकळे मजलागीं ॥ ९८ ॥ जेथूनि निघाले चार वेद । त्यासि स्तोत्रादिक पठणें तुष्टिप्रद । एक स्वतःसिद्ध प्रभु स्वसंवेद । परिच्छेदरहितासि कैसें व्हावें ॥ ९९ ॥ आनंदस्वरूप अद्वितीय निर्विकल्पासि । कोणत्या प्रकारें करावें पूजनासि । आवाहन कोठें परिपूर्णासि । सर्वाधारासि कैचें आसन ॥ १०० ॥ अति स्वच्छासि अर्घ्य पाद्य जाण । शुद्ध परम्यात्म्यासि कैंचें आचमन । निर्मलासि कोठें स्नान । विश्वोदरासि वस्त्र कैचें ॥ १ ॥ निरालंबासि यज्ञोपवीत अर्पण । नित्योपरमासि आभरण । निर्लेपासि सुगंध चंदन । कैसें पुष्प अर्पावें निर्वासनासि ॥ २ ॥ निर्गंध आत्म्यासि सुगंध धूप । स्वयंप्रकाशमानासि निरांजन दीप । नित्यतृप्तासि नैवेद्य पदार्थ अमुप । निष्कामासि फल काय अर्पावें ॥ ३ ॥ त्रयोदशगुणी तांबूल विशुपरमात्म्यासि । दक्षिणा द्यावी कोठें नित्यानंदासि । स्वप्रकाशक एक आत्म्यासि । आर्तिक्यनिरांजन कैसें ओवाळावें ॥ ४ ॥ अनंतासि पुष्पांजलि कैशी प्रदक्षिणा । अद्वितीयासि कैशी करावी प्रार्थना । अंतर्बाह्यवर्ती परिपूर्णा । उद्वासन कोठें करावें ॥ ५ ॥ हीच पूजा अमित तेजस । करिती श्रेष्ठ ब्रह्मानुभवी विद्वांस । भोगिती जीवन्मुक्ति-ब्रह्मसुखास । वेदांतीं आचार्यें कथिली असे ॥ ६ ॥ देह हेंच देवालय असे । त्यांत जीवात्मा सदाशिव वसतसे । त्यासि सोहंभावें पूजावें ऐक्य समरसें । अज्ञान निर्माल्य टाकूनियां ॥ ७ ॥ त्यागूनि मी-तूं-द्वैतपणासि । अभिन्नत्वें पूजावें सदाशिवा

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

मानसीं । देवाधिदेव गुरु परमात्म्यासि । नमावें यजावें शिव होऊनि ॥ ८ ॥ देहाभिमानी होती योगीवर । भोगी कर्माचे ठायीं वर्तती तत्पर । ज्ञानी मानिती मोक्ष अहंकार । द्वेष मानिती उपासक ॥ ९ ॥ ब्रह्मस्वरूपानुभवी तत्तज्ञ पुरुष । निर्विकल्प निरभिमानी युक्त-संतोष । तेचि सर्वांत श्रेष्ठ महात्मे विशेष । वेदतत्त्ववेत्ते वर्णिती ॥ ११० ॥ सर्वचि परमेश्वरनिर्मित । तेथें न चालती जीवसंकेत । म्हणूनि उतराई व्हावया पदार्थ किंचित् । स्वतंत्रपणें नसती कांहीं ॥ ११ ॥ काय करावें कोठें जावें । काय घ्यावें काय टाकावें । महाकल्पांबुसारिखें अघवें । आत्माचि परिपूर्ण भरलासे ॥ १२ ॥ तस्मात् अनन्यभावें शरण । सेवावें हरिगुरूचे नित्य चरण । तेणें प्राप्त होई सगुणनिर्गुण । परमात्मा ब्रह्मसाक्षात्कार सदा ॥ १३ ॥ ऐसें प्रार्थूनि बैरागी घाली लोटांगण । सकल करिती दंडवत नमन । समर्था आपण उद्धरितां जन । 'पतितपावन' नाम आपलें ॥ १४ ॥ ऐसें प्रार्थितां द्वारकाधीश । तों वर्तला चमत्कार कर्तव्यईश । पूर्ववत् संन्यासवेष स्पष्ट प्रकाश । दिसला सर्व जनांसि ॥ १५ ॥ परंतु विशेष एक नवल घडत । तें श्रोते परिसा भक्तियुक्त । सुवर्ण-मौक्तिकयुक्त कर्णभूषणें पाषाणवत् । दिसूं लागलीं यतींद्राचीं ॥ १६ ॥ चोळाप्पा पूजारी इतर भक्त । आणि पुष्कळ लोक पाहूनि झाले विस्मित । म्हणती दत्तात्रेय हरिकृष्णभगवंत । स्वामी समर्थ साक्षात् ॥ १७ ॥ सामर्थ्यातिशय विलक्षण । सुवर्ण-मौक्तिकांचे जाहले पाषाण । लोकांनीं प्रत्यक्ष पाहूनि जाण । कर्णांतून कुंडलें काढिलीं तीं ॥ १८ ॥ तदनंतर चार मौक्तिकें सुवर्णयुक्त । पुन्हां घातलीं समर्थांच्या कर्णांत । याप्रकारें श्रीगुरुदेव दत्त- । स्वामीसमर्थ लीला अपार ॥ १९ ॥ बैरागी जलोदररहित झाला जाण । घडलें द्वारकाधीशदर्शन । झाले सोन्या-मोत्यांचे पाषाण । नेत्रें अनुभव देखिला सर्वांनीं ॥ १२० ॥ धन्य धन्य नृसिंहगुरुमुनि । अक्कलकोटीं स्वेच्छें वसूनि । प्राणिमात्रांसि संतोषवूनि । कृतकार्य केलें सहज कीं ॥ २१ ॥ अनंत अमृतरूप श्रीगुरुलीला । दावूनि

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

निरुपाधिक वेगळा । धन्य भाग्य धीपुरींचा सोहोळा । वर्णिला न जाय सुखाब्धि ॥ २२ ॥ पूर्णावतारी परमहंस । परमात्मा स्वामी परमपुरुष । तच्चरणांचे जन्मोजन्मीं दास । व्हावें हीच आस असे ॥ २३ ॥ देहबुद्धीनें तुमचा दास आहें । जीवबुद्धीनें तुमचा अंश पाहें । ब्रह्मबुद्धीनें तूंच मी निःसंदेहें । आहेच ऐशी माझी निश्चल मति ॥ २४ ॥; तो दत्तात्रेय स्वामी हृदयस्थ प्रकटून । करवी श्रीगुरुलीला वर्णन । एके वर्षीं पर्जन्य नव्हता म्हणून । लोक प्रार्थिती योगिराजा ॥ २५ ॥ ऐकूनि सांगती पुराणपुरुषोत्तम । पर्जन्यसूक्त आणि रेणुकासहस्रनाम । पठण केलिया नित्य नियम । पर्जन्यवृष्टि होईल ॥ २६ ॥ चोळांप्पानें ऐशा आज्ञेनुसार । बाळकृष्णभट बावडेकर । यांस पाचारूनि दिधली सुपारी शीघ्र । पर्जन्यसूक्त पाठाची ॥ २७ ॥ आणि रेणुकासहस्रनाम-पाठाची । बावडेकर पुराणिक बुवांस त्वरेंचि । सुपारी दिधली समर्थ आज्ञेंचि । निजप्रियभक्त चोळाप्पानें ॥ २८ ॥ पर्जन्यानुष्ठान आरंभविलें । पुढें दोन तीन दिवसांनीं स्वलीलें । श्रीस्वामीसमर्थ सेवकांसह गेले । तीन कोशांवरी जेउरास ॥ २९ ॥ तेथें काशीविश्वेश्वराचें उत्तमलिंग । मंदिरीं सुंदर प्रतिष्ठित अभंग । मध्यान्हरात्रीं त्या स्थानीं पुरुष अव्यंग । उतरले भृत्यजनयुक्त ते ॥ १३० ॥ देवळांत जाऊनि ईश्वरलिंगाप्रति । असंग पुरुष संभाषण करिती । बाहेर निघतांना रागें वदती । तुम्ही वृष्टि करवित कां नाहीं ॥ ३१ ॥ दुसरे दिवशीं तेथून समीप । हंजग्री ग्रामास गेले आनंदस्वरूप । तेथें शिवलिंगस्थानीं जाऊनि ज्ञानप्रदीप । रागें भरूनि विचारिती ॥ ३२ ॥ तुम्ही सदाशिव पार्वती उभयतां । पर्जन्यवृष्टि कां न करितां । ऐसें योगिराज बोलत असतां । पुष्कळ लोक जमले तेथें ॥ ३३ ॥ योगाधीश्वरचरणीं होऊनि लीन । प्रार्थिती येथें रहावें म्हणून । सध्यां राहणें नाहीं ऐसें यतीश्वर बोलून । वळसंग ग्रामीं पातले ॥ ३४ ॥ तेथें सहस्रावधि लोक येऊनि सामोरा । सन्मानें घेऊनि गेले त्रिभुवनेश्वरा । त्यांतील मुख्य ग्रामस्थ जोडूनि करा । पुसती

केव्हां वृष्टि होईल ॥ ३५ ॥ लोकांसह उठून जगदीश्वर । गेले शिवमंदिरीं सत्वर । शिवगौरीगणेशहनुमंतादि निर्जर । तयांसि गालिप्रदानें अर्पूनि ॥ ३६ ॥ पुसती काय हरबरे तुम्हां पाहिजेत । मग हरबरे आणवूनि त्वरित । सर्व देवांवरी स्वकरें उधळूनि अवधूत । धर्मशाळेंत स्थित झाले ॥ ३७ ॥ इतक्यांत वायु सुटला प्रचंड । आकाशांत ढग उपजून शब्द कडकड । होऊन मेघोदक पडूं लागलें धडधड । दिवस उगवेपर्यंत बहु ॥ ३८ ॥ चोहोंकडे जाहलें पाणी पाणी । पंचवीस कोशांत वर्षाव झाला दिनरजनीं । सकल लोक संतुष्ट समाधानी । होऊनि धांवले दर्शनासि ॥ ३९ ॥ त्यापूर्वींच स्वामिराय गांवाबाहेर । जाऊनि जलमय जागेंत एक प्रहर । बैसले तेथें ग्रामोग्रामींचे नारीनर । पायीं लोळती येऊनि ॥ १४० ॥ म्हणती कैंचे हो देव सकळ । हरबरे स्वकरें उधळितांचि तात्काळ । पर्जन्यवृष्टि झाली पुष्कळ । हरपला दुष्काळ मायबापा ॥ ४१ ॥ आपणचि सर्व देवांचे देव । प्रत्यक्ष आहां परमात्मा सदाशिव । प्रत्यक्ष-प्रमाण आम्हांसि अनुभव । घडला पूर्ण अमानुषिक ॥ ४२ ॥ आम्ही प्रापंचिक अज्ञानी मंदमति । मोहें गुंतलों विषयासक्ति । नेणों आपलें स्वरूप अगाधगति । सामर्थ्यातिशय पारमार्थिक ॥ ४३ ॥ आम्हांसि आणि संसारासि असो धिक्कार । जन्मलों वृथैव नृदेहीं साचार । आम्हांपेक्षां उत्तम खर श्वान सूकर । घरदार संसार नाहीं तयां ॥ ४४ ॥ अज अव्यय पुराणपुरुषोत्तमा । श्रुतिस्मृतिपुराणादिक गाती तवमहिमा । जगन्नायका व्हावे अपराध क्षमा । सत्यकामसत्यसंकल्पप्रदाता असती ॥ ४५ ॥ मुखें गर्जती प्रभूचा जयजयकार । 'श्रीगुरुदेवदत्तस्वामीसमर्थ' नामें निरंतर । श्रीफळें फोडूनि उजळिती कर्पूर । वांटिती प्रसाद शर्करादिक ॥ ४६ ॥ समर्थ आले अक्कलकोटासि । संपूर्ण लोक भजती अहर्निशीं । दक्षिणा देऊनि पाठक विप्रांसि । करविलें नैवेद्य भोजनादिक ॥ ४७ ॥; असो पुणें प्रांतीं जुन्नर ग्रामची एक । मराठे जातीची शूद्र स्त्री सखू नामक । पूर्वकर्मवशात् तिचे अंगावरी शोक- । प्रद श्वेत कुष्ट उद्भवला ॥ ४८ ॥ सर्व शरीर

* * *

विशोभित बिलक्षण । दिसूं लागलें लज्जायमान् । पुष्कळ केले उपाय प्रयत्न । परी गुण नसतां अधिकचि वाढे ॥ ४९ ॥ शक्त्यनुसार द्रव्य वेंचिलें । औषधोपचार आंगारे धुपारे केले । देवासि प्रदिक्षणा पाणी घातलें । बहुत दिवसपर्यंत परी गुण नाहीं ॥ १५० ॥ एके समयीं एक साधु आला भिक्षेस । तयाचें नाम असे चरणदास । सखूनें भिक्षा घालूनि केलें नमनास । कुष्टरोग-नाशार्थ उपाय विचारिला ॥ ५१ ॥ तो म्हणे गुरुनाथ अक्कलकोटांत । वसती दत्तात्रेय अलख निरंजन अवधूत । गिरिधारी ध्वजाधारी पाळिती जगत । भरंवसा भारी जयांचा ॥ ५२ ॥ त्या महापुरुषांचें दर्शन एकवार । झालिया नाशक भवसंसार दुर्धर । अथवा स्मरणें रोग संकटें दूर । होती निःसंशय माय गे ॥ ५३ ॥ नंतर कन्येसहित सखुबाई । अक्कलकोटासि आली त्वरें पाहीं । तेधवां स्वामिराज खंडोबाचे देवालयीं । पुष्कळ जनांसह स्थित होते ॥ ५४ ॥ श्रीफलादि अर्पून दंडवत । घातलें सखूबाईनें कन्येसहित । अष्टभाव उदेले कंठ सद्गदित । अंगीं रोमांच उभे राहिले ॥ ५५ ॥ नंतर समर्थ वदती बाई सखे । दुःख भोगितेस पर्वतासारिखें । ऐकूनि वृत्त चरणदासमुखें । पातलीस सुखें जाशील ॥ ५६ ॥ बरें हा पांढरा दगड घेऊन । नित्य अंगासि लावित जा उगाळून । यापरी आशीर्वचन देऊन । रोग-शमनार्थ पाषाण समर्पिला ॥ ५७ ॥ ऐसा या ब्रह्मांडांत कृपाळु कोण । दीनदुर्बळांचें करी संरक्षण । एक परमेश्वरचि साक्षात् नारायण । असे श्रीगुरु-स्वामीसमर्थ ॥ ५८ ॥ एक मास लावितां उगाळून । कुष्टरोग गेला नष्ट होऊन । पूर्ववत् शरीर आरोग्य गौरवर्ण । जाहलें दत्तकृपेनें ॥ ५९ ॥ मग सखूनें समर्थांचें पूजन । केलें शक्त्यनुसार विप्र-समाराधन । कृतकार्य आरोग्य होऊन । गेली स्वनगरास संतोषित ॥ १६० ॥; तैसेचि जुन्नरचे उपनाम काळविट । कृष्णाजी लक्ष्मण गुरुभक्त ज्ञानी श्रेष्ठ । तयांसि बहुत साक्षात्कार झाले इष्ट । सांप्रत बडोद्यास असती ते ॥ ६१ ॥ वेदविहित नित्य सदाचरण । वेदांत ग्रंथ सार्थ श्रवण पठण । करिती दत्तात्रेय-स्वामींचें पूजन ।

भक्तिज्ञानवैराग्यसंपन्न ते ॥ ६२ ॥ सत्यवादी निष्कपटी रहितहर्षशोक । वेदवेदान्त-गुरुसंप्रदायवर्धक । प्रेमळ दत्तात्रेय-स्वामीवीण आणिक । नेणती इतर साधन तें ॥ ६३ ॥ लौकिकन्याय धर्मकर्म रीतीं । सर्वदा संतुष्टपणें वर्तती । सहज बोलतां चालतां ब्रह्मस्थिति । भोगूनि दिसती व्यावहारिक ॥ ६४ ॥ अक्कलकोटनिवासी स्वामिरायांचें । दर्शन प्रज्ञापुरीं जाऊन घेतलें हिताचें । स्वामिराज बोधिती ब्रह्मविद्येचें । स्वात्मानुभवाचें रहस्य तें ॥ ६५ ॥ काशीस जावें ऐसें वचन त्रिवार । कृष्णाजी काळविटास वदती कृपासागर । त्या समर्थ-महावाक्याचा विचार । अनुभवांतीं उमजतसे ॥ ६६ ॥ महत्पुरुषाचें शब्दार्थ ज्ञान । कदा न कळे अनुभवावांचून । जैसें स्वर्गलोकीं राहिल्यावीण । स्वर्गसुख कळत नसे ॥ ६७ ॥ 'मेल्यावांचून स्वर्ग न दिसे'। लोक व्यवहारीं बोलती ऐसें । तैसें वेदगुरुवाक्यार्थानुभवावीण नसे । ब्रह्मज्ञान कोणासि ॥ ६८ ॥ अथवा एरंडाचें गुऱ्हाळ । कोरडाच इक्षुरस नुपजे गूळ । तैसें गुरुवीण शुष्क शब्दजाल वाचाल । चित्तभ्रमणकारक असे ॥ ६९ ॥; असो विनायकराव भिकोबा चित्रे । यांस संतानसुख नव्हतें प्रारब्धतंत्रें । ज्योतिषी साधु वैद्य मंत्रादि सारे । उपाय करूनि थकले ते ॥ १७० ॥ तथापि संतान दुर्लभ अप्राप्त । परी श्रीदत्तात्रेय स्वामीसमर्थ अवधूत । चरणसेवेनें स्वल्पकालांत । कन्या पुत्र संतान लाधलें योग्य ॥ ७१ ॥ हे चित्रे गुरुभक्त शांत ज्ञानी । भोळे शुद्धचित्त दयाळु निरभिमानी । यांस प्रज्ञापुरीं येण्यापूर्वीं समर्थांनीं । दर्शनप्रसाद दिधलासे ॥ ७२ ॥ हे राजकोटचे राहणार गृहस्थ । कुलवान् कुटुंबवत्सल परोपकारार्थ । झटती जैसे जुन्नरकर राजारामपंत । तैसेचि हेही यथायोग्य ॥ ७३ ॥ राजाराम नीलकंठास पुत्र सप्त असती । ते योग्य सुशील सदाचारें वर्तती । त्या सप्त पुत्रांत बलवंतराव अति । सुशिक्षित उदार कुटुंबी ॥ ७४ ॥; तैसाचि गुरुभक्त जिऊबा वामन । दया-शांतियुक्त ज्ञान-वैराग्य-संपन्न । गृहस्थाश्रमीं सात्त्विक कुलीन । भक्त निःसीम दत्तस्वामींचा ॥ ७५ ॥; तैसेचि योग्य गुरुभक्ति-

प्रवर्तक । महादेव रघुनाथ गोडबोले नामक । वेदांतज्ञानी सदाचारपूर्वक । अंतर्निष्ठ स्थितीनें वर्तत होते ॥ ७६ ॥; सुरत प्रांतीं सरस ग्रामींचे । लक्ष्मीनारायण जोशी योग्य द्विजकुलींचे । अवलोकन सार्थ वेदांतग्रंथांचें । पुष्कळ दिवस सत्संग केलेले ॥ ७७ ॥ ब्रह्मचारी योगी संत संन्यासी । महात्मा-संगें चर्चा श्रवणादि अहर्निशीं । बहुत केलें पारमार्थिक अभ्यासासि । परंतु ब्रह्मसाक्षात्कार होईना ॥ ७८ ॥ थकूनि शेवटीं लक्ष्मीनारायण । अक्कलकोटनिवासी योगीश्वर भगवान् । चरणीं होतांचि विध्युक्त शरण । तुटूनि गेले प्रतिबंध ॥ ७९ ॥ मग जीवब्रह्मैक्य-साक्षात्कार । निःसंशय अभिन्न ब्रह्मस्थिति निरंतर । भोगूनि आत्मसुख जीवन्मुक्ति थोर । स्वामी समर्थांचे कृपेनें ॥ १८० ॥ जन्ममरणरहित होऊनि निर्विकार । पुढें विदेहकैवल्यासि पावले अशरीर । हे लक्ष्मीनारायण ठाणेदार । काठेवाड प्रांतीं प्रसिद्ध होते ॥ ८१ ॥; तैसे लिंबडीचे राहणार द्विजवर्य । जयशंकर पुरुषोत्तम आचार्य । दत्तात्रेय-स्वामींचे सद्भक्त अक्षय । ज्ञानवैराग्यसंपन्न असती ॥ ८२ ॥ यांस दत्तात्रेय-स्वामींचें दर्शन बहुवार । होऊनि घडले सगुणनिर्गुण साक्षात्कार । परोपकारी सद्धर्मी युक्त-सदाचार । दयाक्षमाशांतियुक्त विराजती ॥ ८३ ॥; निष्कपट प्रेमळ सत्य मृदुभाषण । करिती सर्वभूतीं लीन होऊन । तैसे आपटेकर लक्ष्मण माधव नामेंकरून । लोक म्हणती बाळाभाई ॥ ८४ ॥; स्वामिराजांचे असती दृढभक्त । उमियाशंकर मूळजी ओझा ज्ञानी विरक्त । लखतरची गंगाबाई काशी शुद्धचित्त । गुरुभक्त जानकी धाकूबाई लक्ष्मीबाई आदिक ॥ ८५ ॥; तैसा चतुर्भुज जेठा तपोधन । गुरु-दत्तात्रेयस्वामि-भक्तिपरायण । ऐसे अनेक भक्त श्रीगुरुलीला-प्राशनेंकरून । उद्धरले उद्धरती उद्धरतील ॥ ८६ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृति-पुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । पंचचत्वारिंशाध्याय गोड हा ॥ १८७ ॥ इति श्री[illegible]लीलामृते गुरुशिष्य-संवादे पंचचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ॥ ४५ ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय सेहचाळिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुदेव-दिगंबर-स्वामिने नमः ॥ ॥ श्रीगुरु म्हणती शिष्या ऐक । पर्यंक-विद्यारूप अहंग्रहउपासना सम्यक् । कौषीतकी उपनिषदाचे प्रथमाध्यायीं अलौकिक । कथिली अनेक उपनिषदीं ॥ १ ॥ पापी जीवांसि व्हावया उद्वेग । पितृलोकाचा ‘पितृयाण’ नामक मार्ग । त्या पितृयाण-मार्गासि यथासांग । उपनिषदीं कथिलें तेंचि वर्णूं ॥ २ ॥ या मनुष्यलोकीं जे शास्त्ररीतीं । यज्ञादिक पुण्य कर्में करिती । ते मनुष्य शरीर त्यागूनि प्राप्त होती । प्रथम धूमासि ॥ ३ ॥ त्या धूमानंतर ते कर्मी पुरुष । प्राप्त होती रात्रीस । त्या रात्रीनंतर कृष्णपक्षास । ते कर्मी पुरुष प्राप्त होती ॥ ४ ॥ त्या कृष्णपक्षानंतर ते कर्मी पुरुष । पावती षण्मासरूप दक्षिणायनास । दक्षिणायनानंतर पितृलोकास । प्राप्त होती कर्मी ते ॥ ५ ॥ त्या पितृलोकानंतर ते । पावती अंतरिक्षलोकातें । अंतरिक्षलोकानंतर चंद्रलोकातें । ते कर्मीजन प्राप्त होती ॥ ६ ॥ त्या चंद्रलोकीं देवतांनीं प्राप्त । केलेले जे नाना प्रकारें भोग बहुत । त्या भोगांसि चिरकालपर्यंत । ते कर्मी पुरुष भोगिती ॥ ७ ॥ येथें धूम-रात्री-कृष्णपक्षादि शब्देंकरून । धूमादिकांचे अभिमानी देवतांचें करावें ग्रहण । आणि स्वर्गादि लोकप्राप्तीचें साधन । जीं यज्ञादिक कर्में असतीं ॥ ८ ॥ तीं कर्में या स्थूल शरीरानें सिद्ध होतीं । म्हणून त्या यज्ञादिकासि ‘शरीरकर्म’ म्हणती । आणि ब्रह्मलोकप्राप्तीचें साधन उपासना ती । मनेंकरून सिद्ध होतसे ॥ ९ ॥ यास्तव ते उपासना ‘मानसकर्म’ असे । शारीरिक कर्मांपेक्षां मानस कर्म अति कठिण दिसे । आतां ब्रह्मलोकाचे अधिकारी कोण कसे । तें निरूपण करूं ॥ १० ॥ या भरतखंडांत पूर्वपुण्येंकरून ।

* * *

अधिकारी मनुष्यशरीरासि प्राप्त होऊन । जे पुरुष विषयसुख परित्यागून । होती विरक्त जितेंद्रिय ॥ ११ ॥ तथा यमनियमादिक साधन संपन्न । ऐसे अधिकारी गुरुशास्त्रोपदेशेंकरून । नाना प्रकारच्या उपासनांसि जाणून । शुद्धचित्तें वर्तती ॥ १२ ॥ पर्यंक-विद्यारूप उपासना करून । किंवा पंचाग्नि-विद्यारूप उपासना जाणून । अथवा अन्य उपायें ते उपासक जन । ब्रह्मलोकांसि प्राप्त होती ॥ १३ ॥ आतां ब्रह्मलोकींच्या स्वरूपासि । तथा ब्रह्मलोकींच्या 'देवयानमार्ग' रूपासि । निरूपण करितों कळावयासि । सर्वत्रांसि सुलभपणें ॥ १४ ॥ या मनुष्यलोकांत जे पंचाग्नि आदिक । उपासनांसि करिती ते पुरुष उपासक । सुषुम्नानाडी-मार्गद्वारा दशम-द्वारें सम्यक् । बाहेर निघूनि प्रथम अर्चिषासि पावती ॥ १५ ॥ त्या अर्चिषानंतर उपासक ते । प्राप्त होती दिवसातें । त्या दिनानंतर शुक्लपक्षातें । प्राप्त होती उपासक ॥ १६ ॥ त्या शुक्लपक्षानंतर ते उपासक । षण्मासरूप उत्तरायणासि पावती आवश्यक । त्या उत्तरायणानंतर उपासक । संवत्सरासि पावती ॥ १७ ॥ त्या संवत्सरानंतर देवलोकासि । पावती देवलोकानंतर वायूसि । जैसे छिद्र असतें रथाचे चक्रासि । तैसें वायु स्वशरीरांत छिद्र देतो तयां ॥ १८ ॥ त्या वायूनंतर उपासक पुरुष । प्राप्त होती आदित्यास । जैसे डंबर नामें वाद्य विशेषाचे छिद्र-मध्यास । तैसें आदित्य आपल्यांत देतो छिद्र ॥ १९ ॥ त्या आदित्यानंतर चंद्रमासि पावती ते । जैसें दुंदुभी वाद्यांत मध्य छिद्र असतें । तैसें छिद्र चंद्र आपल्या शरीरांत तें । उपासकांसि देतसे ॥ २० ॥ त्या चंद्रमानंतर पावती विद्युतास । ते विद्युत् 'अमानव' नामें पुरुष । येऊनि घेऊनि जाती ब्रह्मलोकास । त्या उपासक पुरुषांसि ॥ २१ ॥ येथें अर्चिष-दिन शुक्ल-पक्षादि शब्देंकरून । करावें अर्चिषादिकांचे अभिमानी देवतांचें ग्रहण । आणि मानवी सृष्टींत जें होत नसे उत्पन्न । त्याचें नाम 'अमानव' असे ॥ २२ ॥ वरुणलोक इंद्रलोक विराट् लोक । या तीन लोकांहून परस्थित ब्रह्मलोक । तो 'आर' नामें ह्रद एक । तथा 'विजरा' नामक नदीनें युक्त

आहे ॥ २३ ॥ ऐशा ब्रह्मलोकीं ते अमानव । त्या उपासकांसि घेऊनि जाती सवैभव । तेथें विद्युत् लोकानंतर ते उपासक जंव । आर-ह्रदाचे ऐल तीरीं जाती ॥ २४ ॥ तेव्हां ब्रह्मदेवाची आज्ञा घेऊन । पंचशत दिव्य अप्सरा जाण । हातांत नाना प्रकारचे पदार्थ घेऊन । त्या उपासकांचे समीप उभ्या राहती ॥ २५ ॥ त्यांत एकशत अप्सरा आपापले हातीं । सुगंध पुष्पमाला घेऊनि तिष्ठती । आणि दुसऱ्या अप्सरा एकशती । त्या उपासक पुरुषांसि मर्दनार्थ ॥ २६ ॥ कस्तुरी कर्पूरादियुक्त सुगंधी तैल सुपात्रांत । घेऊनि उभ्या असती आनंदांत । आणि तिसऱ्या अप्सरा एक शत । त्या उपासकांसि भोजन करावया ॥ २७ ॥ नाना प्रकारच्या दिव्य फलांसि । घेऊनि हातीं उभ्या लगबगीसि । आणि चवथ्या एकशत अप्सरा त्या उपासकांसि । अंगासि लावण्याकरितां ॥ २८ ॥ नाना प्रकारचें सुवासिक चूर्ण । उभ्या ठाकती करीं घेऊन । आणि पांचव्या शत अप्सरा प्रेमेंकरून । ल्यावया उपासकांसि ॥ २९ ॥ नाना प्रकारचीं वस्त्रभूषणें जाण । विराजती करीं घेऊन । उत्सुकपणें परिपूर्ण । उपासकांसि शोभायमान् करिती ॥ ३० ॥ याप्रकारें होऊनि अलंकारयुक्त । पुष्पमाला घालूनि कंठांत । ते उपासक होऊनि सुशोभित । नंतर एक क्षणमात्रांत ॥ ३१ ॥ मनाचे संकल्पें आर-ह्रदपरतीरीं होती स्थित । त्या ह्रदाचे परतीरीं जे तीस मुहूर्त । त्या मुहूर्तांसि कथिलें श्रुतींत । 'येष्टिह' नामेंकरूनि ॥ ३२ ॥ त्या तीस मुहूर्तांचे समीप आगमन पाहून । ते येष्टिह तीस मुहूर्त करिती पलायन । तेथें ब्रह्मलोकप्राप्तीचे इच्छावान् । जे उपासक जन असती ॥ ३३ ॥ त्यांच्या उपासनेसि अनेक विघ्नें जाण । करिती जीं संकल्प-उत्पत्तीचें हनन । 'येष्टिह' तयांचें नामाभिधान । श्रुतीनें कथन केलें आहे ॥ ३४ ॥ त्या आर नामक ह्रदानंतर । 'विजरा' नामें नदीस पावती उपासक नर । त्या विजरा-नदीच्या ऐल तीरावर । उभे असलेले उपासक ते ॥ ३५ ॥ आपलें पूर्ण पापकर्म देती द्वेष्ट्यासि । आणि पुण्यकर्म अर्पिती सुहृज्जनांसि । धनादिक पदार्थ देऊनि पुत्रांसि ।

पापपुण्यादि उपाधीरहित होती ॥ ३६ ॥ त्या पुण्य-पाप-कर्मांच्या लयानंतर । जरा-मरणरहित होऊनि उपासक नर । त्या 'विजरा' नदीस एकक्षण मात्र । मनःसंकल्पें तरूनि जाती ॥ ३७ ॥ त्या विजरा-नदीनंतर । 'इल्य' नामें वृक्षासि पावती उपासक नर । तेथें ब्रह्माचें प्राप्त होणें योग्य दिव्य सुगंध शीघ्र । उपासकांसि प्राप्त होती ॥ ३८ ॥ त्या इल्य-वृक्षानंतर ते उपासक । 'शालज्य' नामें स्थानासि पावती अवश्यक । तेथें ब्रह्माचें प्राप्त होणें योग्य दिव्य रस सम्यक् । प्राप्त होती तयांसि ॥ ३९ ॥ त्या शालज्य-स्थानानंतर । देवाचें 'अपराजित' नामें मंदिर । त्या मंदिरासि ते उपासक नर । प्राप्त होती त्या काळीं ॥ ४० ॥ त्या उपासकांमाजीं ब्रह्मदेवाचें । तेज प्रवेश करितें त्यायोगें ब्रह्म्याचे । समान उपासक तेजस्वी होती साचे । उपनिषदीं स्पष्ट असे ॥ ४१ ॥ त्या अपराजित-मंदिरीं द्वारावरती । इंद्र तथा प्रजापति हे दोन द्वारपाल असती । ते उपासकांसि अपराजित मंदिरीं नेती । अत्यादरें भयभीत होऊनि ॥ ४२ ॥ त्यानंतर ते उपासक पुरुष । ब्रह्म्याचे 'विभुप्रमित' नामें पावती सभामंडपास । तेथें ब्रह्मदेवाचें यश । उपासकांत प्रवेशतें ॥ ४३ ॥ त्या ब्रह्मयश-प्रवेशेंकरून । ते उपासक होती यशस्वी ब्रह्मदेवासमान । नंतर ते उपासक त्या सभामंडपांतून । ब्रह्म्याचे बुद्धिमय वेदिकेसि पावती ॥ ४४ ॥ ज्या वेदिकेस श्रुतीनें 'आसंदी' नाम केलें कथन । येथें रचित जें काष्ठादिकेंकरून । चतुष्पाद उच्च आसन । त्याचें नाम वेदिका असे ॥ ४५ ॥ त्या वेदिकेसि होऊनि प्राप्त । ते उपासक ब्रह्म्याचे समान होती बुद्धिमंत । कैशी आहे ती वेदिका तें स्वरूपसहित । करितों कथन श्रुतियुक्त तें ॥ ४६ ॥ 'बृहत्' नामा सामवेद । तथा 'रथंतर' नामा सामवेद । त्या वेदिकेचे हे दोन पाद । पूर्वदिशेकडील आहेत ॥ ४७ ॥ आणि 'श्यैत' नामा वेद । तथा 'नाधस' नामा सामवेद । हे दोन असती ज्या वेदिकेचे पाद । पश्चिम-दिशेकडील ते ॥ ४८ ॥ त्या वेदिकेचे वरचे चतुष्कोण । त्यांत 'वैरूप' नामा सामवेद दक्षिण कोण । आणि वैराज नामा सामवेद

उत्तर कोण । पूर्व कोण ‘शाक्कर’ नामा सामवेद आहे ॥ ४९ ॥ तथा ‘रैवत’ नामा सामवेद पश्चिम कोणरूप शोभत । या प्रकारची वेदिका त्या सभामंडपांत असे स्थित । त्या वेदिकेनंतर ते उपासक होती प्राप्त । ब्रह्मदेवाचे पर्यंकासि ॥ ५० ॥ तो पर्यंक त्या वेदिकेवरी असे स्थित । आणि नानाप्रकारच्या विचित्रता युक्त । तथा प्राणरूप असूनि त्या पर्यंकाचे वर्णित । अमित ‘औजस’ नाम तें ॥ ५१ ॥ भूत-भविष्य-वर्तमान । या त्रिकालीं स्थित तें जगत् संपूर्ण । पूर्व दिशेचे दोन्ही चरण । असती ज्या पर्यंकाचे ॥ ५२ ॥ आणि पृथ्वी तथा लक्ष्मी हे दोन । त्या पर्यंकाचे पश्चिम दिशेचे आहेत चरण । तथा ‘बृहत्’ नामा सामवेद असे जाण । दक्षिण दिशेची काष्ठमय दीर्घ पटिका ॥ ५३ ॥ आणि ‘रथंतर’ नामा सामवेद ज्या पर्यंकाची । काष्ठमय दीर्घ पटिका उत्तर दिशेची । तथा ‘भद्र’ नामें सामवेद पूर्व दिशेची । काष्ठमय लघु पटिका आहे ॥ ५४ ॥ आणि ‘यज्ञायज्ञीय’ सामवेद ज्या पर्यंकाची । काष्ठमय लघु पटिका पश्चिमेची । आणि गाती सामवेदयुक्त छंदोबद्ध ऋचा साची । पूर्व-पश्चिमेची सूत्रमय दीर्घ पाटिया असे ॥ ५५ ॥ आणि मंत्ररूप यजुर्वेदाचा दक्षिणोत्तर । दिशांच्या सूत्रमय लघु पाटिया असती सुंदर । ऐशा त्या ब्रह्मदेवाचे पर्यंकावर । तूलयुक्त जें उपस्तर्ण म्हणजे गदेला ॥ ५६ ॥ चंद्राचे किरणरूप तें उपस्तर्ण । त्यावरी जें श्वेत वस्त्र वेष्टण । तें श्वेतवस्त्र ‘उद्गीथ’ सामदेवरूप जाण । असे त्या पर्यंकावरी ॥ ५७ ॥ मस्तक ठेवण्याचा शिरणा म्हणजे उशी । ती लक्ष्मीरूप आहे मृदु ऐशी । यद्यपि पूर्वीं त्या पर्यंकाचे पादरूप लक्ष्मीसी । कथन केलेलें असूनियां ॥ ५८ ॥ पुन्हा लक्ष्मी उशी केलें कथन । तथापि तें लौकिक लक्ष्मीचें वर्णन । आणि आतां वैदिक लक्ष्मीचें केलें कथन । यास्तव पूर्वोत्तर ग्रंथाचा विरोध नाहीं ॥ ५९ ॥ ऐशा पर्यंकावरी हिरण्यगर्भ ब्रह्मा विराजित । ज्याचा विषयजन्य आनंदाहून कोणत्याही लोकांत । अधिक आनंद नाहीं ऐशा ब्रह्मलोकांत । ‘सोमसवन’ नामा अश्वत्थ वृक्ष आहे ॥ ६० ॥ ज्या

वृक्षांतून सर्वदा अमृत स्रवतें । म्हणून त्या वृक्षासि सोमसवन म्हणिजे तें । त्या ब्रह्मलोकांत ब्रह्मयाचे प्रीतीस करणारे ते । ‘अर’ तथा ‘ण्य’-नामें समुद्र असती ॥ ६१ ॥ आणि मनाची जननी सर्व जगत्कारण जी अविद्या- । शक्ति ब्रह्मदेवाची प्रिय भार्या । तथा चक्षु-इंद्रियोपादनकारण या । जें सत्त्वगुणप्रधान तेज असे ॥ ६२ ॥ तें तेज ब्रह्मयाची प्रतिबिंबरूप छाया । आणि संपूर्ण जगत्कारण वेद श्रुति ज्या । त्या श्रुतिजन्य जें शब्दबोधरूप ज्ञान त्या । संपूर्ण अप्सरारूप ब्रह्मयापुढें वसती ॥ ६३ ॥ येथें वेदश्रुतीसि म्हटलें जगत्कारण । त्याचा ऐसा अभिप्राय आहे जाण । सृष्टीच्या आदिकालीं परमात्मा पदार्थांचें नामोच्चारण । करूनि पदार्थ उत्पन्न करितसे ॥ ६४ ॥ ‘स भूरित्युक्त्वा भूवमसृजत्’ । म्हणजे सृष्टीचे आदिकालांत । तो परमात्मा ‘देवभू’ या नामासि उच्चारूनि करित । पृथ्वीरूप अर्थासि उत्पन्न ॥ ६५ ॥ याप्रकारचें वेद शब्दोच्चारण करून । आकाशादि सर्व पदार्थ करिता झाला उत्पन्न । तयासि प्रमाण असे स्मृतिवचन । तें अर्थासह श्रवण करावें ॥ ६६ ॥ ‘वेद शब्देभ्य एवादौ निर्ममे महेश्वरः सः’तो । महेश्वर परमात्मा नारायण । सृष्टीच्या आदिकालीं वेद शब्देंचि करून । संपूर्ण जगतासि उत्पन्न करिता झाला ॥ ६७ ॥ इत्यादि श्रुति-स्मृतिप्रमाणेंकरून ते । वेदभगवानासि जगत्कारणता सिद्ध होते । आणि त्या हिरण्यगर्भ-ब्रह्माचे देशांत नदी वाहते । सगुण-निर्गुण ब्रह्मज्ञान जलधारीं ॥ ६८ ॥ आणि स्थूल सूक्ष्म संपूर्ण जगत् । त्या ब्रह्मदेवाचें पुष्प किंवा वस्त्र विराजित । या प्रकारें ‘देवयान’ मार्गादि वस्त्रपर्यंत । जेवढ्या ब्रह्मदेवाच्या विभूति वर्णिल्या ॥ ६९ ॥ त्या विभूति-विशिष्ट ब्रह्माची । ‘अहंग्रहउपासना’ करूनि साची । ते उपासक ब्रह्मयाचे आसनावरी पुत्रासारिखेचि । निःशंक होऊनि बैसती ॥ ७० ॥ त्या उपासकांसि ब्रह्मदेव पुसे । हे पुत्रा तूं कोण असे । तुझें भोगाचें साधन कोठें वसे । ऐसें ब्रह्मवचन परिसूनि ॥ ७१ ॥ ते उपासक देती उत्तर । ‘हे भगवान् जो तूं तोच मी आहें’ ऐसा निर्धार । ‘आपुलें भोगसाधन तेंचि

आमचें खरोखर । असे ब्रह्मदेवा रे'॥ ७२ ॥ ऐसा संवाद ब्रह्मदेवासंगें करून । ते उपासक ब्रह्मयाची आज्ञा घेऊन । हिरण्यगर्भ
ब्रह्मासमान । भोगासि भोगिती आनंदें ॥ ७३ ॥ आणि जेव्हां ब्रह्मयाची होय आयुष्य-समाप्ति । तेव्हां ते उपासक
पुरुष मोक्षासि पावती । ऐशी पर्यंक-विद्यारूप अहंग्रह-उपासना वर्णिती । कौषीतकी उपनिषदाचे प्रथमाध्यायीं ॥ ७४ ॥
तथा अन्य उपनिषदांत । नाना प्रकारची अहंग्रह-उपासना यथास्थित । श्रुतीनें कथिली व्हावया जनहित । तैशीच येथें
वर्णिली असे ॥ ७५ ॥ आतां श्रीगुरुलीलामृत- । पान कराहो विद्वज्जन साधु संत । जेणें प्राप्त होतें यथेप्सित । जगदात्मा
अनंत भेटतो ॥ ७६ ॥ ; मोगलाईंत नळदुर्ग प्रसिद्ध नगर । तालुक्याचें शोभिवंत सुंदर । तेथें बहुत दिवसांचा महाल धुरंधर ।
दृढतर मनोहर रचिलेला ॥ ७७ ॥ त्या महालावरून बोरी नदी । खालीं उतरविली आहे पूर्व कारकीर्दीं । सर्व लोक
पाहूनि होती आनंदी । बहु कुशलता दिसते ॥ ७८ ॥ महालावरून बोरी नदी वाहते । महालांत बसून पाहतां ते ।
मनोल्हादकारक चमत्कृति दिसते । मति गुंग होते जनांची ॥ ७९ ॥ हिंदुस्थानांतील मनोहर देवालयें विशाल । अनेक
गाभारे भुयारें सुंदर प्रबल । महाल मनोरे घाट निर्मल । महानदीस बांधिलेलें ॥ ८० ॥ जैशी वेरूळचीं कोरीव लेणीं ।
अति चातुर्यें कोरलेलीं एक पाषाणीं । ऐशीं सुंदर कामें अन्य देशीं इतर ठिकाणीं । क्वचित् असतील उघड हें ॥ ८१ ॥
हैद्राबाद विजापुर अहमदनगर । इत्यादि स्थानीं जुन्या इमारती धुरंधर । तैशीं म्हैसूर प्रांतीं कामें दृढतर । अति जुनीं
असूनि नवीन दिसतीं ॥ ८२ ॥ गोकुळ वृंदावन मथुरा नगर । काशी प्रयाग हस्तिनापुर । तैशीं श्रीरामेश्वराकडे थोर
थोर । मंदिरें मनोरे आदिक असती ॥ ८३ ॥ असो नळदुर्गांतील जलमहाल । विलोकनासि योग्य भव्य केवल । तेथें
तालुकदार कचेरी विशाल । आहेत अधिकारी वर्ग ते ॥ ८४ ॥ त्या कालीं तालुकदार पारशी । बैरामजी शेठ असतां
कारकुनांसि । जाऊं देत नसे अक्कलकोटासि । गुरुदर्शनासि अटकाव करी ॥ ८५ ॥ एके समयीं नळदुर्गाचे अलीकडे ।

केसे सराटी ग्रामीं दिवस थोडे । दत्तात्रेयस्वामी राहिले होते कोडें । लोकप्रिय महापुरुष ।। ८६ ।। तेव्हां प्रभु-दर्शनार्थ
कारकून । आपापलीं सर्व कामें योग्य आटोपून । बैरामजीस जावें म्हणती विचारून । म्हणून पुसती सर्व तयासि
।। ८७ ।। तदा बैरामजी क्रोधावेशेंकरून । म्हणे तुम्ही जंगली मूर्ख जन । मनुष्याचें दर्शन घेऊन । काय लाभ होतसे
तुम्हां ।। ८८ ।। कैसे तुम्ही लोक अतिमंद । साधुसंतांचा न धरावा नाद । मनुष्य संन्याशाचे कधींही पद । वंदूं नयेत
सहसाही ।। ८९ ।। ऐसा अधिकारें मदोन्मत्त होऊन । करी निंदा धिक्कारी तो दुर्जन । दर्शनेच्छूंचें शुद्धांतःकरण ।
पाहून समर्थ नळदुर्गासि पातले ।। ९० ।। सामोरे जाती लहान थोर । आदरातिथ्यपूर्वक आणिले दत्तदिगंबर ।
त्या कालीं तेथें सर सालरजंग दिवाणबहादूर । हैद्राबादचे आले होते ।। ९१ ।। त्यांचें दत्तात्रेयस्वामि-पदांवर । भक्तिपूर्वक
प्रेम होतें फार । ते अवतारिक पुरुषाचें सत्वर । दर्शन घेउनि संतोषले ।। ९२ ।। कांहीं भाषणें स्वानुभविक
झाल्यावरी । दिवाण आनंदित होउनि भारी । म्हणती धन्य जगदुद्धारी । पूर्णावतारी ईश्वर आहां ।। ९३ ।। दिवाण-
बहादुरांचें सहज झालें आगमन । त्यामुळें सर्व कारकुनांसि झालें प्रभु-दर्शन । हे सालरजंग फार योग्य न्यायमार्गें जाण ।
निःपक्षपात वागत होते ।। ९४ ।। संभावित दयाळु धर्मशील । विद्वान् समस्तराजकार्यकुशल । राजा-प्रजेसि आवडती
सर्वकाल । पुरुष विचारशील धुरंधर ते ।। ९५ ।। कुलवान् सद्धर्मी थोर । गेले हैद्राबादेस कार्यार्थ शीघ्र । पुढें स्वामि-
दर्शनार्थ गेलेल्या कारकुनां तालुकदार । बैरामजी दंड करितसे ।। ९६ ।। त्यांतील योग्य हिंदु-मुसलमान । बैरामजीस
सांगती काम आटोपून । धर्मसंबंधीं कामांत विनाकारण । बोलण्याचा अधिकार तुम्हांस नाहीं ।। ९७ ।। आम्ही नोकरी
मुळींच सोडून जातों । न्यायमार्गें चालून भय न मानितों । तुम्हींही चलावें ऐसें विनवितों । एकवार मौज पहावया
।। ९८ ।। कारकुनांच्या पुष्कळ आग्रहें । बैरामजी गेला चमत्कार पहावया लवलाहें । श्रीफळें फुटती कर्पूर जळतो

आहे । उभे तिष्ठती भक्तजन ॥ ९९ ॥ हिंदु-मुसलमान प्रेमानें गजर । करिती दत्तात्रेयस्वामिनामें वारंवार । अतुल तेजस्वी योगींद्र दयासागर । भजती रागद्वेष टाकूनि ॥ १०० ॥ एक आनंदरूप सर्वांची वृत्ति । जाहली दर्शनें श्रीभगवन्मूर्ति । हें पाहतांचि बैरामजीची शक्ति । नष्ट होऊनि घाबरला ॥ १ ॥ शक्तिपात झाला बोबडी वळली । दत्तात्रेयस्वामी वदती त्या काळीं । त्वां फार अनुचित निंद्य कर्में केलीं । जीवहिंसादि भयंकर ॥ २ ॥ तुमच्या देवधर्म-शास्त्रीय ग्रंथांत । आज्ञा काय करावे व्यर्थ प्राणघात । किंवा अति निंद्य अन्यायी कर्में अनुचित । करावीं ऐशी शास्त्राज्ञा आहे कां ॥ ३ ॥ महत्पुरुषाचें वाक्य बोधरूप । परिसूनि तयासि झाला पश्चात्ताप । म्हणे हें माझें निंद्य जन्मारभ्य पाप । कैसें जाणिलें या पुरुषांनीं ॥ ४ ॥ हे त्रिकाल अंतर्साक्षी ज्ञानी खचित । निर्भय निःस्पृह जितेंद्रिय असती अद्भुत । निःसंशय ईश्वरावतार साक्षात् आहेत । ऐशी प्रतीति मज घडली ॥ ५ ॥ वारंवार घाली दंडवत लोटांगण । बैरामजी जाहला अनन्य शरण । म्हणे मायबापा कृपार्णव आपण । अपराध क्षमा करावे ॥ ६ ॥ कचेरी आठ दिवस बंद ठेविली । मध्यान्ह रात्रीपर्यंत योगीश्वराजवळी । लीन होऊनि बैसे सर्व निमाली । देह-अहंकृति समर्थकृपें ॥ ७ ॥ एके समयीं रात्रीं एकांतीं । बैरामजी विनवी स्वामीप्रति । मजला उपदेश द्यावा ऐशी विनंति । शरण होऊनि करितसे ॥ ८ ॥ परित्यागूनि निंद्य अभिमान दुराग्रह । म्हणे मजवरी व्हावा समर्थांचा अनुग्रह । या प्रकारचा त्यानें फार धरिला आग्रह । मग अपरिग्रह यतीश्वर बोलती ॥ ९ ॥ अनेक धर्मांचें हेंचि असे तात्पर्य । आणि हाच उपदेश करणारा कृतकार्य । परोपकारार्थ परिश्रम अनिवार्य । करावे धैर्य धरूनियां ॥ ११० ॥ कधीं करूं नये जीव-हिंसा । विनास्वार्थ दुसऱ्यासि पीडूं नये सहसा । मोठा अधिकार संपत्ति यांचा भरंवसा । चिरकालींचा मानूं नये ॥ ११ ॥ पक्षापक्ष निंदा द्वेष त्यागून । सत्य न्यायधर्म मार्गें असावें सद्वर्तन । सर्वदा

करावें परमेश्वर-भजन । दुर्व्यसन कोणतेंही नसावें ॥ १२ ॥ असावा योग्यायोग्य सारासार-विवेक । अतीत-अभ्यागतासि अर्पावें अन्नोदक । स्वहित न्यायार्जित धनें अबाधक । साधावें परहित अवश्य तें ॥ १३ ॥ बांधावे परोपकारार्थ वापी कूप तडाग । धर्मशाला विश्राम पथिकांसि उपयोग । जगीं सत्कीर्ति वाढवूनि देहत्याग । होतां ईश्वर पावतो शुद्ध भक्तीनें ॥ १४ ॥ सर्व धर्मांचें हेचि उपदेश-रहस्य जाणावें । प्रपंच परमार्थ साधूनि बंधमुक्त व्हावें । दया-क्षमा-शांतीसह शुद्धचित्त असावें । जन्माचें सार्थक होतें तेणें ॥ १५ ॥ श्रीगुरु-दत्तात्रेयमुखें बोधामृत । श्रवणद्वारें प्राशन करूनि शुद्धचित्त । बैरामजी शेठ शांत होऊनि संतोषित । लोटांगण दंडवत घालितसे ॥ १६ ॥ स्वामीसमर्थांच्या आज्ञेनुसार । बैरामजी शेठ वागले निरंतर । त्यायोगें सर्व जातींचे नारीनर । त्यांस योग्य थोर मानित होते ॥ १७ ॥; त्याकालीं नळदुर्गांत ब्राह्मण एक । दक्षिण रामेश्वराकडील पुराणिक । विद्वान् म्हणविणारा गायक । वीणा वाजवूनि पुराण सांगे ॥ १८ ॥ आपलें पुराण नळदुर्गांत व्हावें । म्हणूनि त्यानें प्रयत्न केले बरवे । परंतु स्वामिरायांच्या सेवेंत अघवे । लोक तत्पर होते सदा ॥ १९ ॥ त्यायोगें पुराणिकाची शिजेना डाळ । आणि मूळचे तामसी गर्विष्ठ वाचाळ । गांजा भांग अफू आदि सर्वकाळ । सेवूनि धुंद अमलांत असती ॥ १२० ॥ त्यांत अंगांत क्रोध संचरला । परिसूनि स्वामीसमर्थलीला । पुराणिकाचा तिळपापड झाला । आंगठ्याची आग मस्तकास लागली ॥ २१ ॥ मुखांतूनि शब्दज्वाला भयंकर । अमर्याद निघती वरचेवर । जैसा देवांचा उत्कर्ष विजय अपार । देखूनि असुर तरफडती ॥ २२ ॥ पृथ्वीपतीचें संपूर्ण वैभव । विलोकूनि तस्करांचा जळतो जीव । महा साध्वी पतिव्रता सौभाग्य सदैव । पाहूनि जारिणी व्याकुल होते ॥ २३ ॥ सज्जनांची जयजयकार कीर्ति । परिसूनि दुर्जन दीर्घद्वेषें तडफडती । सूर्यासि देखूनि उफराटें टांगून घेती । उलूक पक्षी आपणांसि

स्वयें ॥ २४ ॥ करीर वृक्षासि पत्रें न होतीं उत्पन्न । यास्तव वसंतऋतूसि व्यर्थ काय दूषण । चातक-मुखांत धारा न होती पतन । मेघासि दूषण काय तें ॥ २५ ॥ तैसें प्रारब्धदशें पुराणिकासि झालें । संतापवायु प्रकोपें वेष्टिलें । शरीर द्वेषज्वरें फणफणलें । फिरलें मस्तक तयाचें ॥ २६ ॥ तेव्हां प्रभु दयाळु सांगती लोकांसि । चित्तभ्रम झाला त्या द्वेषी पुराणिकासि । पुराण करवून धनें तयासि । शांत करावें यथाशक्ति ॥ २७ ॥ दुराचरणी अप्रौढ पुराणिक । पाहूनि मुखें मुरडिती सर्व लोक । पुराणिक समदृष्टीचें अलौकिक । कृपावाक्य परिसूनि लाजला ॥ २८ ॥ म्हणे हे अंतर्साक्षि सर्वज्ञ ईश्वर । यांसि कोणताही स्पर्शेना विकार । द्वेषी निंदक दुर्जन अधमावर । अपराध्यावरही कृपा करिती ॥ २९ ॥ हे खचित अवतारिक पुरुष महान् । दयाक्षमाशांतिज्ञानसमुद्रपूर्ण । मजसारिखा दुष्ट अभागी कोण । केलें छलन विनास्वार्थ म्यां ॥ १३० ॥ असो योगिराज आज्ञेनुसार । श्रीगुरुदेवदत्त-स्वामीसमोर । दुसरे दिवशीं लोकांनीं जमूनि एकत्र । पुराण मांडविलें तयाचें ॥ ३१ ॥ पुराणास प्रारंभ जाहला । शिष्य वाजवी वीणा थोरला । मंगलाचरण करूनि चालविला । पुत्रविषय तयानें ॥ ३२ ॥ ‘अपुत्रस्य गतिर्नास्ति’ । पुत्रानेंच जय आणि पुण्यलोक प्राप्ति । इत्यादि वाक्येंकरून मोक्षगति । निपुत्रिकासि नाहीं ऐसें बोले ॥ ३३ ॥ विद्याभिमानें ऐसा विषय काढून । पाहिजे तें बोले पोकळ पंडितपण । शिष्टपरंपरा पुराणपद्धति सोडून । करिती मनरंजन ते ॥ ३४ ॥ ‘पुत्रावांचूनि नाहीं गति’ । ऐशा थाटाचीं भाषणें पुराणिक बोलती । तेव्हां देवदत्त महाराज पुसती । तया विद्वान पुराणिकासि ॥ ३५ ॥ पोपटासि पुत्र आहे काय । वीणा-धारकासि आहे का तनय । वामदेवादिक व्यासाचार्य । यांस पुत्र होते का ॥ ३६ ॥ संपूर्ण महर्षींसि पुत्रवंश । किंवा असती काय शिष्यवंश । हें तुजला विदित आहे काय लवलेश । मिथ्यात्मा-गौण-मुख्यात्मा ॥ ३७ ॥ तूं देखील निपुत्रिक आहेस । म्हणून जाशील काय अधोगतीस । सोडूनि परमेश्वरगुणवर्णनास । भलतेंच काय बरळशी ॥ ३८ ॥ पुत्र-

रहित पुरुषांसि गति । तथा होत नसे स्वर्गप्राप्ति । हें वचन विषयी रागी जनांप्रति । घेऊनि सांगती शास्त्रांश ॥ ३९ ॥ यास्तव तें अनुवादरूप अर्थवचन । मोक्षप्राप्ति नसेचि पुत्रेंकरून । यदाकदाचित् पुत्र-प्रजेंकरूनि जाण । पित्यासि मोक्ष होईल ॥ १४० ॥ तरी सूकरादिक पशूंसि मनुष्यांहून । अधिक होती पुत्र उत्पन्न । म्हणून त्या सूकरादिकांचाही पुत्रेंकरून । मोक्ष झाला पाहिजे ॥ ४१ ॥ यास्तव पुत्रादि-प्रजेनें खचित । पित्यासि मोक्ष वा स्वर्गप्राप्ति नसत । उलट पिता पुत्रपोषणार्थ पापें करित । त्यायोगें नरकास जातसे ॥ ४२ ॥ ऐसें वेदमूर्ति साक्षान्नारायण । परमात्मा मुखें सत्यज्ञान-श्रवण । झाल्यावरी पुराणिकाचा उतरला दुरभिमान । ताठा-थाट-प्रतिष्ठितपणा ॥ ४३ ॥ धुंदनेत्रीं खोंचलें विवेकांजन । तेणें अहंकारवायु-प्रकोप झाला न्यून । डोळ्यांवरचा धूर उतरून । सावध झाले पुराणिक ॥ ४४ ॥ ‘कायेन वाचा’ श्लोक म्हणून । संपविलें त्यांनीं एकदाचें पुराण । नंतर घाईघाईनें उठून । मस्तक ठेविलें समर्थ-पदीं ॥ ४५ ॥ अनेक शिरसाष्टांग प्रणिपात । घातले होऊनि शरणागत । म्हणे पुत्राचे अपराध झालिया बहुत । जननी खेद मानित नसे ॥ ४६ ॥ मी पढतमूर्ख केवल अविवेकी । भांग गांजा अफू सेवूनि मादकी । वीणा वाजवूनि शुष्क गायकी । पाहिजे तैसें बोलतों ॥ ४७ ॥ लोक-मनरंजन करितों भलतसें । पुष्कळ द्रव्य धान्य मिळतसे । गौ महिषी दुग्ध पिऊनि देहपुष्टि होतसे । अश्वही रक्षितों बैसावया ॥ ४८ ॥ माझा विपरीत दांभिक स्वभाव । अति तामसी गर्विष्ठ म्हणूनि सर्व । मनापासूनि कंटाळती तें माझें दुर्दैव । जेथें तेथें पीडितसे ॥ ४९ ॥ आपण परमात्मा सच्चिदानंद । साक्षात् पूर्णब्रह्मस्वरूप करुणाकंद । मज दुष्ट-पापिष्टावरी कृपाप्रसाद । उत्तम गतिप्रद करा जी ॥ १५० ॥ मग भक्त चोळाप्पासि तो पुसे । पोपट वीणाधारक कोण असे । गुरु-प्रासादिक चोळाप्पा अर्थ सांगतसे । तया पुराणिकबुवासि ॥ ५१ ॥ पोपट म्हणजे शुकाचार्य । वीणाधारक नारद ऋषिवर्य । वामदेव वेदव्यासादि भीष्माचार्य । महा

ब्रह्मवेत्ते वेदवेदांगार्थसंपन्न ते ॥ ५२ ॥ नसतांही पुत्रसंतान । अनेक ऋषि मुनि योगिजन । श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ
आचार्यवान् । झाले तारक जगासि ॥ ५३ ॥ कलियुगीं जगद्गुरु शंकराचार्य । अवतरले केवल वेदांतसूर्य । सद्धर्मसंस्थापक
यतिवर्य । साक्षात् शंकरस्वरूप असे ॥ ५४ ॥ जगदुद्धरार्थ त्रयमूर्तींचे अवतार । श्रीपादवल्लभ नृसिंहसरस्वती
गुरुवर । विद्यारण्य श्रेष्ठ संन्यासी वेदभाष्यकार । जगन्मान्य विख्यात झालेले ॥ ५५ ॥ महात्मा सत्पुरुष साधु
संत । भोगी विरागी भगवद्भक्त । महाजन विद्वज्जन पंडित । आणि भोळे भाविक शुद्धमति ॥ ५६ ॥ ते पुत्रसंतानावांचूनि
सहज । ब्रह्मसाक्षात्कारी महाराज । जगासि तारूनि तरले योगिराज । गुरु परमेश्वरस्वरूप ॥ ५७ ॥ आतां
मुख्यात्मा विश्वव्यापक । सत्यज्ञान-अनंतस्वरूप अलौकिक । कूटस्थ साक्षी अक्षर तत्पदार्थ एक । नियामक 'मुख्यात्मा'
जाणिजे ॥ ५८ ॥ दुसरा 'गौणात्मा' पुत्र म्हणती । परी मातापित्यासि पुत्र जाळिती । आणि मातापिता पुत्रासि दहन
करिती । जिवंत असतांही परस्परां ॥ ५९ ॥ तेणें होय ब्रह्महत्यादि पातक । ऐसे पुत्र गौणात्म्यासि दोष अनेक ।
दिसती प्रत्यक्ष जाणती लोक । म्हणूनि पुत्र गौणात्माचि आहे ॥ १६० ॥ पंचभूतात्मक स्थूल शरीर । मिथ्या जड दृश्य
नाशिवंत साकार । जराजन्ममरणधर्मी क्षणभंगुर । तयासि 'मिथ्यात्मा' बोलती ॥ ६१ ॥ म्हणूनि गौणात्मा मिथ्यात्मा
दोन्ही । सत्यात्म-दृष्टीनें परित्यागूनि । 'मुख्यात्मा' निर्विकार अविनाशी जाणूनि । ब्रह्मविद्येनें मुक्त होती ॥ ६२ ॥
गुरुप्रज्ञा-प्रसादेंकरून । मूर्ख असोत किंवा पंडितजन । तरताति भवसागरापासून । अनुभवूनि ब्रह्मात्मतत्त्व ॥ ६३ ॥
रागद्वेषादिक-विनिर्मुक्त । सर्वभूतांच्या हितीं रत । जयांसि दृढबोध झाला प्राप्त । परमपदासि ते जाती ॥ ६४ ॥
घटाकाश घटाहून भिन्न होऊन । महदाकाशांत होतें लीन । तैसे योगी देहअभावें होती संलग्न । अभिन्न परमात्मास्वरूपीं ॥ ६५ ॥ कर्मयुक्तांसि देहांतीं जे मति । तैशीच होय तयांसि गति । आणि पिंड अर्पितां जे होय

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

मुक्ति । ते श्वान-सूकरांसिही होतसे ॥ ६६ ॥ पिंडपातेंकरून जे गति । ती श्वान-सूकरांसिही होते प्राप्ति । आणि
कर्मिष्ठांसि जे गति होय ती । बोलण्यापुरती वाणीनें ॥ ६७ ॥ अंतीं जैशी मति तैसी गति । ती उक्त नाहीं
योगीजनांप्रति । कारण ते संकल्प-विकल्पवर्जित होऊनि भोगिती । निर्विकल्प ब्रह्मस्थिति अखंड ॥ ६८ ॥ जे
योगी निर्विकल्प ब्रह्मस्वरूप स्वतःसिद्ध । भेदाभेद-कल्पना संशय नानाविध । ज्यांसि स्वप्नींही स्पर्शंत नसती ऐसें
शुद्ध । आत्मतत्त्व प्रबुद्ध संत योगी ॥ ६९ ॥ मग त्यांचा देह तीर्थक्षेत्रीं पडो । अथवा चांडाल-श्वपचगृहीं सांपडो ।
ज्ञानी-योग्यांचा कोठेंही मृत्यु घडो । पाहिजे त्याकालीं पडो देह जड ॥ १७० ॥ तथापि तयांसि गर्भाचा स्पर्श ।
कधींही नाहीं दोष-लेश । परब्रह्मस्वरूपीं निर्विशेष । लीन असती सर्वदा ते ॥ ७१ ॥ शाश्वत परब्रह्मस्वरूप अज ।
ज्यांनीं एकवार देखिलें हृदयस्थ सहज । तयांसि जरी यथेष्टाचरण घडलें काज । तथापि दोष लिप्त होतचि नसे ॥ ७२ ॥
जे आत्मतपस्वीयुक्त आत्मसंयम । त्यांनीं न केलें जरी वर्णाश्रमकर्म । तथापि कदा बद्ध होत नसती निष्काम ।
परब्रह्म-परंधाम-निवासी ते ॥ ७३ ॥ देह-जातीसंबंधीं वर्णाश्रम-प्रकार । अथवा वागणें वेदशास्त्रानुसार । त्यांना
कोणतेही न स्पर्शती विकार । निर्विकार ब्रह्मज्ञानी ते ॥ ७४ ॥ अंतःकरणाचे सकल जड धर्म । आहेत धर्माधर्मकर्म ।
जड-चित्तवृत्तीचे साक्षी योगी परम । जड-दृश्यादि संबंध तयां नसे ॥ ७५ ॥ ऐसे पूर्णब्रह्म सच्चिदानंद । दत्तात्रेय-
स्वामी करुणाकंद । यापरी चोळाप्पामुखें सद्बोध । ऐकूनि पुराणिक आनंदला ॥ ७६ ॥ आत्मज्ञानावांचून । सर्व
कर्म निरर्थक असे जाण । म्हणूनि हृदयस्थ परमात्मा स्वामी दयाघन । आत्मज्ञानेंचि ओळखूनि कृतार्थ होती ॥ ७७ ॥
‘ब्रह्म आहे’ ऐसें शास्त्रीय परोक्षज्ञान । आणि ‘मी ब्रह्म आहें’ ऐसा अनुभव जो जाण । तोचि साक्षात्कार प्रत्यक्ष आपण ।
आपलें चित्स्वरूप ओळखिलें ॥ ७८ ॥ त्या श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ गुरुमुखें । वेदांतार्थ-श्रवणमननें अभ्यास सुखें । करितां

निदिध्यासन नित्य सारिखें । साक्षात्कार अवश्य होतसे ॥ ७९ ॥ परी विद्याधनादि-अहंकारमद । देहबुद्धीचें ब्रिऱ्हाड अति दुःखप्रद । म्हणून अहं-ममाध्यास टाकूनि अंतरीं गोविंद । सन्निकर्ष-स्थित ओळखावा ॥ १८० ॥ व्रतें कर्मे तपादि नियमांत अनेक । गुंतले संदेहें बापडे सकामनिक । ते कैसा जाणती आत्मा अलौकिक । सद्गुरुकृपेवांचून ॥ ८१ ॥ तस्मात् कर्म अवघें ईश्वरार्पण । करावें अवश्य फलेच्छा त्यागून । ब्रह्मवेत्ता सद्गुरूंसि शरण होऊन । कृतकार्य व्हावें शहाण्यानें ॥ ८२ ॥ ऐसा पुराणिक अनुतापयुक्त । विद्याधनमददुराग्रह-रहित । झालेला अनन्य शरणागत । पावन झाला एक्या दर्शनेंचि ॥ ८३ ॥ त्या पुराणिकाची अंगना । दुःखी होती पुत्रसंतानाविना । पन्नास वर्षांची वृद्ध पतिआज्ञा- । तत्पर होती सर्वदा ॥ ८४ ॥ श्रीस्वामिराज-कृपेंकरून । तियेस लाधलें पुत्रसंतान । ऐसें गुरुलीलामृत गहन । यथेप्सित-प्रापक ॥ ८५ ॥ स्वामीसमर्थांचे निःसीम भक्त । होऊनि पुराणिक वर्तती आनंदानें गृहस्थाश्रमांत । स्वदेशीं राहिले श्रीगुरुलीलामृत । पान करीत सर्वदा ॥ ८६ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदोपनिषदार्थमथित । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । षट्चत्वारिंशाध्याय गोड हा ॥ १८७ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे षट्चत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ॥ ४६ ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय सत्तेचाळिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्गुरुदेवदत्तदिगंबर-स्वामिने नमः ॥ ॥ गुरु म्हणतीं शिष्या करीं श्रवण । गौतम-ऋषिकृत न्यायशास्त्र-पदार्थनिरूपण । तेथें प्रतिज्ञा हेतू उदाहरण ह्या तीन । अवयवांच्या समुदायरूप जें वाक्य आहे ॥ १ ॥ त्यायोगें होतसे पदार्थ-अनुमान । मीमांसक मानिती याप्रकारेंकरून । आणि उदाहरण उपनय ह्या दोन । अवयवांचे समुदायरूप जें वाक्य आहे ॥ २ ॥ त्यायोगें पदार्थ-अनुमान होतसे । याप्रकारें बौद्ध मानितसे । हीं दोन्ही मतें असंगत परिसे । विशद करूनि सांगतों ॥ ३ ॥ प्रतिज्ञा-हेतु-उदाहरण-उपनय- । -निर्गमन ह्या पांच अवयवांचा समुदाय । त्या अवयव-समुदायरूप जें वाक्य । त्या वाक्यानें पदार्थ-अनुमान होतसे ॥ ४ ॥ आणि ते नैय्यायिक दुसऱ्या शास्त्रमतांत । या प्रकारचीं दूषणें देतात । हा ‘आत्माश्रयरूप’ तर्क प्राप्त । तुमच्या मतांत होत आहे ॥ ५ ॥ हा ‘अन्योन्याश्रयरूप’ तर्क प्राप्त । होतसे तुमच्या शास्त्रमतांत । हा ‘चक्रकारूप’ तर्क प्राप्त तुमच्या मतांत । होतो ऐसें नैय्यायिक म्हणती ते ॥ ६ ॥ हा ‘अनवस्थारूप’ तर्क प्राप्त । तुमच्या शास्त्रमतांत होत । आणि हा ‘व्याघातरूप’ तर्क येत । तुमच्या शास्त्र-मतामाजीं ॥ ७ ॥ तुमच्या मतांत हा ‘प्रतिबंदीरूप’ तर्क । प्राप्त होऊनि तुमचे तर्क सम्यक् । ‘इष्टापत्तिरूप’ दूषणें ग्रस्त म्हणूनि अलिक । म्हणजे असती असत्य ते ॥ ८ ॥ तुमचें मत प्रतिवादीचें अनिष्ट । करित नसे म्हणून असत्य झालें स्पष्ट । हा तुमचा तर्क व्याप्तीरहित असे प्रकट । म्हणूनि खोटा होतोचि ॥ ९ ॥ हा तुमचा तर्क विपरित असे । या कारणानें असत्य ठरतसे । हा तर्क अनुग्राहक प्रमाणरहित दिसे । म्हणूनि आहे अप्रयोजक ॥ १० ॥ हा हेतु-व्याप्ति-

पक्ष-धर्मतारहित । यास्तव हेत्वाभास असत । हा तुमचा हेतु साध्याश्रयरहित । आहे अप्रसिद्ध तैसाचि ॥ ११ ॥
ह्या तुमच्या शास्त्र-अनुमानांत । नाहीं कोणताही समीचीन दृष्टांत । तुम्ही ह्या तुमच्या अनुमानांत । उदाहरण व्यर्थ
कथियेलें ॥ १२ ॥ या अनुमानांत निर्गमन । व्यर्थ कथियेले आपण । इत्यादि अनेक अनात्म पदार्थ जाण । न्यायशास्त्रांत
कथियेले ॥ १३ ॥ याप्रकारें व्याकरण-शास्त्रांत । तथा पूर्वमीमांसेंत आणि न्यायशास्त्रांत । अनेक प्रकारचे अनात्म-
पदार्थ । असती कथन केलेले ॥ १४ ॥ त्या अनात्म-पदार्थीं आसक्ति धरून । सांप्रतकालचे बहिर्मुख ऐसें
बोलती वचन । त्या संपूर्ण अर्थासि आम्हीच जाणतों पूर्ण । आम्हांविण इतर न जाणती ॥ १५ ॥ ऐसें
आपल्याशीं सर्वांहूनि । ते बहिर्मुख उत्कृष्ट मानूनि । व्यर्थचि कारणावांचूनि । प्राप्त होती क्रोधासि ॥ १६ ॥ जैसें
अनेक श्वानांनीं वेष्टित । झालेलें श्वान क्रोधें आपले दाखवी दांत । तैसे ते बहिर्मुख गर्विष्ठ क्रोधयुक्त । होऊनि
दांत दाखविती ॥ १७ ॥ वेदांतशास्त्रविचार परित्यागून । पूर्वोक्त अनात्मशास्त्र जन्मभरी पढून । लोकांत
यद्यपि म्हणविती विद्वान् । साभिमानें प्रतिष्ठित ॥ १८ ॥ तथापि त्या बहिर्मुख पंडितांत । इतर जीवांहून विशेषता
नाहीं किंचित् । क्षुधा-पिपासा निद्रा-भय इत्यादि धर्म सतत । सर्व देहधारी जीवांत समान असती ॥ १९ ॥ जरी म्हणाल
अनात्म-शास्त्राचे विद्वान् । इतर जीवांपेक्षां करिती अधिक संभाषण । तरी बहुत शब्द बोलण्याचे योगेंकरून ।
'क्रोष्टु' नामासि पावलेले शृगाल जसे ॥ २० ॥ बहुत भाषण करणारे ते अनात्मवित् । या शृगालासारिखेचि आहेत ।
ते विना प्रयोजनें निरादर करितात । ब्रह्मचिंतक विद्वज्जनांचा ॥ २१ ॥ शास्त्र-व्याख्यान करणाऱ्या महात्मा जनांस ।
ते बहिर्मुख दूषणें देऊनि करिती उपहास । जैसे कोणी दुर्जन पिशुन आरोपिती दोष । निर्दोष माहात्मा जनांवरी ॥ २२ ॥ तैसे
अनात्म पदार्थ पढून । अत्यंत अभिमानी ते बहिर्मुख विद्वान् । महर्षींवरीही दोषारोपण । उन्मत्तपणें करिताति ॥२३॥ पाणिनी

ऋषीनें जें सूत्र रचिलें । आणि जैमिनी ऋषीनें जें सूत्र निर्मिलें । तैसेंचि वेदव्यासांनीं जें सूत्र कथिलें । तीं सर्व विचाररहित रचिलीं आहेत ॥ २४ ॥ कारण पूर्वसूत्रें किंवा उत्तरसूत्रेंकरून । या अर्थाची सिद्धि होते म्हणून । हीं सूत्रें ऋषींनीं विनाकारण । व्यर्थचि रचिलीं आहेत ॥ २५ ॥ तैसें हें वेदाचें वचन । उन्मत्त पुरुषाच्या वचनासमान । असंगत प्रतीत होई म्हणून । ऐसें जाणिलें जातसे ॥ २६ ॥ हीं वचनें नसतीं परमेश्वर-रचित । कोणी तरी धूर्तानें घातलीं वेदांत । यास्तव तीं व्यर्थ दिसतात । अथवा परमेश्वर-रचित असतीं ॥ २७ ॥ या कारणानें व्यर्थ नसून आहेत सार्थक । परंतु त्या वचनांचा अर्थ जाणता मीच एक । माझ्या वांचूनि न जाणे कोणी आणिक । ऐसें वेदांसि ऋषींसि दूषिती ॥ २८ ॥ वेदमंत्र पाठासि श्रवण करून । येथें हा स्वर पाहिजे होता हा वर्ण । येथें हें पद हा क्रम पाहिजे म्हणून । ते स्वर-वर्णादि हे द्विज न उच्चारिती ॥ २९ ॥ यास्तव या ब्राह्मणांनीं वेदासि । नष्ट केलें म्हणती बहिर्मुख गर्वेंसीं । वेदपाठक साधु ब्राह्मणांसि । निंदिती आढ्यता धरूनियां ॥ ३० ॥ म्हणती शास्त्रांत आमची बुद्धि तीक्ष्ण । तैशी आमच्या गुरूची नाहीं जाण । ब्रह्मदेवाचीही आमच्यासमान । तीक्ष्ण बुद्धि नसेचि ॥ ३१ ॥ पूर्वीं न झालें वर्तमानीं न दिसे । पुढेंही होणार नाहींत आम्हासरिसे । समुद्रीं नाना लहरी उपजती तैसें । माझ्या मुखरूपीं समुद्रांतून ॥ ३२ ॥ व्याकरण मीमांसा न्याय शास्त्रानुसार । विचित्र बोल निघती नाना प्रकार । ऐशी आपली आपण वारंवार । स्तुति करिती लोकांमध्यें ॥ ३३ ॥ भारानें आतुर झालेलें गाढव जैसें । ओरडूनि नाना शब्द भोंकितसे । अनात्म-शास्त्रभारानें युक्त तैसें । भलतेसें वाचाळ बरळती ते ॥ ३४ ॥ ऐसे ते बहिर्मुख मदोन्मत्त । असती दुष्ट दुर्जन अत्यंत । त्यांची कदापिही नसावी संगत । ऐसें उपनिषदांत कथियेलें ॥ ३५ ॥ आणि स्त्रीपुत्रधनादि पदार्थांचा । त्याग करणें फार कठिण ईषणांचा । तथापि कोणी त्याग करूनि सर्व संगाचा । संन्यासाश्रम धारण करिती ॥ ३६ ॥ असंग संन्यासाश्रम धरून । न सांडिती

विद्यादि-अभिमान । ज्योतिषादि आणि वैद्यक्रिया करून । लौकिक धन मिळविती ॥ ३७ ॥ जैसें कोणी आपल्या मस्तकावर । वाही दधि ओदनादि अन्नाचा भार । ज्या अन्नभक्षणें इतर क्षुधातुर । तृप्त होती यथेच्छ ॥ ३८ ॥ ही क्षुधारूप पिशाच्चिणी । सत्य शौच श्री धैर्य बल वीर्य पराक्रम आणि । यश धर्म दयादि गुणांची हानि । करिते सर्व जीवांची ॥ ३९ ॥ ऐशी अनिवार क्षुधा अन्न भक्षणें । निवृत्त होई भोजनीं तत्क्षणें । त्या अन्नाचा भार त्यागूनि घेणें । पाषाण भार मस्तकावरी ॥ ४० ॥ ते भारवाहक अत्यंत मूढमति । तैसे सर्वसंग टाकूनि धरूनि वेष यति । विद्या श्रमादि अभिमान भार वाहती । ते अत्यंत मूढमति जाणावे ॥ ४१ ॥ यास्तव ज्या मुमुक्षु अधिकारियातें । आपल्या कल्याणाची शुभेच्छा होते । त्यानें करूनि वेदांतशास्त्र विवेकातें । ब्रह्माभ्यास करावा ॥ ४२ ॥ परंतु इतर अनात्म-शास्त्रांचा विचार । कधींही करूं नये हो शहाणे चतुर । केवल कंठ ऊरु वाणीसि कष्ट आणि अहंकार । उत्पत्तिच करितसे ॥ ४३ ॥ बहुत अनात्म शास्त्राचें चिंतन । करितां वाकादिक इंद्रियांसि परिश्रम होती जाण । याकरितां अनात्म-पदार्थांचें अध्ययन । कधींही न करावें मुमुक्षूनें ॥ ४४ ॥ ब्रह्मानुभवी सद्गुरुमुखेंकरून । निरंतर करावें वेदान्त-श्रवण मनन । वृत्तिप्रवाहरूप निदिध्यासन । केलिया ब्रह्मात्मसाक्षात्कार होतोच ॥ ४५ ॥ आणि जैसे लोकप्रसिद्ध गौ आपण । आपल्या चारी स्तनें करून । वत्साची तृप्ति करिते त्या प्रकारेंकरून । वेदवाणीरूप कामधेनु आहे ॥ ४६ ॥ त्या वेदवाणी कामधेनूचीं स्तनें चार । स्वाहाकार वषट्कार । स्वधाकार चौथें हंतकार । यापरी असती ॥ ४७ ॥ त्यांतील स्वाहाकार वषट्कार । या दोन स्तनें देवता ऋषि तृप्तीस पावती फार । स्वधाकार स्तनें तृप्त होती पितर । हंतकार स्तनें मनुष्यें तृप्त होती ॥ ४८ ॥ ऐशा चारी स्तनेंकरून । ऋषि देवता पितर मनुष्यादि संपूर्ण । त्या सर्वांची तृप्ति करणारी महान् । ही वेदवाणीरूप कामधेनु असे ॥ ४९ ॥ त्या वाणीरूप कामधेनूसि जे

नर । त्यागूनि अभिमानादि सर्व विकार । जगज्जननीस प्रसन्न करिती निरंतर । उपासना करूनियां ॥ ५० ॥ त्या अधिकारी पुरुषांप्रति । वेदवाणीरूप कामधेनु दयालु होय ती । मोक्षरूप दुग्धाची प्राप्ति । करूनि देते जननीवत् ॥ ५१ ॥ प्राण ऋषभ आणि मन वत्स आहे । ऐशी जगन्माता वेदवाणी कामधेनु पाहे । अभिमान विकारयुक्तासि नोहे । फलद्रूप होणारी ॥ ५२ ॥ जे बहिर्मुख आत्मविचाररहित । वेदवाचारूप कामधेनूसि शिणवीत । त्यासि प्राप्त होत नाहीं मोक्षामृत । आणि प्रपंचसुख न लाभे ॥ ५३ ॥ त्या श्रुति-वाक्रूप कामधेनूची । प्रसन्नता व्हावया उपाय हाचि । अद्वितीय ब्रह्मात्म्यांत आपल्या मनाची । एकाग्रता करावी ॥ ५४ ॥ नेत्रादिक बाह्येंद्रियांचे संपूर्ण । इंद्रियव्यापार परित्यागून । ब्रह्मरूप धेनूचें करावें ध्यान । म्हणजे ती प्रसन्न होईल ॥ ५५ ॥ वेदवाणी कामधेनु प्रसन्न झाल्यावरी । मोक्षसुखासी पावती अधिकारी । एवढ्यानें निर्गुण ब्रह्मांत सुखाकारी । मनाची एकाग्रता निरूपिली ॥ ५६ ॥ आतां बहिर्मुख पुरुषावरी अनुग्रह करून । निरोपिती सगुणब्रह्माचें ध्यान । परमात्मा देव सेतुसमान । सर्व जगद्मर्यादेसि व्यवस्थापन करितो ॥ ५७ ॥ तेंचि मायाविशिष्ट ब्रह्म सगुण । जाणिलें जात नाहीं बहिर्मुख जनांकडून । ऐसें बोलूंचि नये वचन । मनासि अंतर्मुख करावें ॥ ५८ ॥ मनाचे अंतर्मुखतेचे उपाय । विद्वान् पुरुषांनीं कथिले ते अक्षय । जैसें बहिर्मुख मन बाह्य विषय । इच्छूनि विषयांत प्रवृत्त होतें ॥ ५९ ॥ तैसें अंतरात्म्याच्या इच्छेनें हें मन । अंतरात्म्यांत होतें प्रवृत्त संलग्न । ऐसें जाणिलें जातें यावरून । अंतर्बाह्य मनाची जी प्रवृत्ति आहे ॥ ६० ॥ त्या प्रवृत्तीचें कारण इच्छाचि असे । आणि हा पदार्थ सर्व दोषरहित सुंदर विलसे । ऐशा ज्या ज्या सुंदर पदार्थांसि मन जाणतसे । त्या त्या पदार्थांची इच्छा होते ॥ ६१ ॥ यावरूनि हें उघड जाणिलें जातें । पदार्थाचें सौंदर्य-ज्ञान इच्छेचें कारण असतें । पापी जीवासि पूर्व पापकर्मानें होतें । सिंह-सर्पादि अप्रिय पदार्थांचें ज्ञान ॥ ६२ ॥ तें पापकर्म अप्रिय पदार्थांचे । ज्ञानाचें

कारण होतें साचें । तथा पुण्यवानांसि धनादि प्रिय पदार्थांचें । ज्ञान होतें पूर्वपुण्य-प्रभावानें ॥ ६३ ॥ तें पुण्यकर्म प्रिय
पदार्थ ज्ञानकारण । आहे असें सिद्ध झालें यावरून । आत्मसाक्षात्काराचे इच्छावान । जे अधिकारी असतील ॥ ६४ ॥
त्यांनीं यज्ञ दान तप अनाशक । पुण्यकर्मैं करून यज्ञादिक । त्या पुण्यकर्मेंकरून त्यांना अलौकिक । आत्मसौंदर्यतेचें ज्ञान
होतें ॥ ६५ ॥ त्या आत्मसौंदर्य-ज्ञानानंतर । तयांसि इच्छा होते व्हावा स्वात्मसाक्षात्कार । त्या इच्छेनंतर त्यांचें मन
परमेश्वर । परमात्मा-स्वरूपीं प्रवृत्त होतें ॥ ६६ ॥ तात्पर्य यज्ञादिक कर्म सकल । आत्मज्ञानार्थ परंपरेनें केवल ।
उपयोगी आहे यास्तव चिरकाल । फलेच्छा त्यागूनि सर्व कर्में करावीं ॥ ६७ ॥ फलेच्छारहित कर्में ईश्वरार्पण । केल्यानें
शुद्ध होतें अंतःकरण । गुरुमुखें वेदांतज्ञान-योगेंकरून । ब्रह्मस्थिति अभिन्न भोगिती ते ॥ ६८ ॥ ‘निषिद्धकर्म’
‘काम्यकर्म’ । ‘नित्यकर्म’ ‘नैमित्तिककर्म’ । या प्रकारचीं चतुष्कर्में धर्म- । शास्त्रीं कथिलीं असतीं ॥ ६९ ॥ ब्रह्महत्यादिक पातकांचें ।
नाम ‘निषिद्धकर्म’ आहे साचें । आणि स्वर्गादिक फलप्राप्तीचें । शास्त्रानें विधान केलेलें ॥ ७० ॥ तें ज्योतिष्टोमादिक यागकर्म ।
तयाचें ‘काम्यकर्म’ असे नाम । तथा संध्या-अग्निहोत्रादिक कर्माचें नाम । ‘नित्यकर्म’ आहे तें ॥ ७१ ॥ आणि सूर्यचंद्रग्रहणांत ।
अर्धोदय महोदय गजच्छायादि कपिलाषष्ठींत । या पर्वणीमाजीं स्नानश्राद्धादि कर्में होत । त्यांचें नाम ‘नैमित्तिक’ कर्म आहे
॥ ७२ ॥ स्थूल-सूक्ष्म-शरीराध्यासयुक्त । जे बहिर्मुख त्यांसि भोग अनुकूल असत । ते निषिद्ध-काम्यकर्मांसि त्यागित ।
नाहींत सर्वथा प्रापंचिक ॥ ७३ ॥ शास्त्रविचारयुक्त जे ब्रह्मचारी । गृहस्थ वानप्रस्थ हे आश्रमाधिकारी । निषिद्ध
तथा काम्यकर्म त्यागिती विचारी । परंतु नित्य-नैमित्तिक कर्में त्यागूं न शकती ॥ ७४ ॥ तीं नित्य नैमित्तिक कर्में
शास्त्रविध्युक्त । संन्यासाश्रमाविण त्यागिलीं न जात । प्रमाद किंवा आलस्यानें नाचरितां अमित । पातकत्रय आश्रमीयांसि
लागतसे ॥ ७५ ॥ आपापल्या आश्रमांत राहून । करिती नित्य-नैमित्तिक-कर्माचरण । तेणें चित्तैकाग्र आत्मत्वीं होत

नसून । तीं कर्मैं त्यागितां पाप होतें ॥ ७६ ॥ जे संन्यासाश्रम-ग्रहणाविण । प्रमादरूप मोहें तथा आलस्येंकरून । नित्य नैमित्तिक कर्में देती टाकून । तो कर्मत्याग 'तामस' असे ॥ ७७ ॥ त्या तामसी कर्मत्यागेंकरून । किंचितही फलप्राप्ति नसून । उलटें पाप घडतें म्हणून । संन्यास घेईतोंपर्यंत तें कर्म करावें ॥ ७८ ॥ वैराग्यपूर्वक विध्युक्त संन्यास घेतलिया । कर्मत्यागाचें पाप नाहीं तया । उलटें कर्मसंन्यासें महत्पुण्य संन्यासिया । परमानंद प्राप्त होतसे ॥ ७९ ॥ स्रक्-चंदन-स्त्री-धन-पुत्रादि विषयांत । ज्यांचें चित्त होतसे अत्यंत आसक्त । ते विषयासक्त रागी प्राप्त न होत । ब्रह्मात्म-साक्षात्कारासि ॥ ८० ॥ म्हणूनि त्यांनीं करावें नित्य नैमित्तिक कर्म । तैसाचि पाळावा अवश्य वर्णाश्रम धर्म । आणि जो विषयेच्छारहित झाला परम । त्यानें पुन्हां कर्मांचा भार उचलूं नये ॥ ८१ ॥ सर्व कर्में परित्यागून । संन्यासाश्रम करावा धारण । कां तरी स्वर्गादिक फलेच्छावानासि वेदभगवान् । यज्ञादि कर्मांचें विधान सांगतसे ॥ ८२ ॥ जे स्वर्गादिक फलेच्छारहित असती । यज्ञादि कर्मांचें विधान त्यांजप्रति । वेद भगवान् न सांगती उलटें निवारिती । कीं निष्कामी पुरुषानें कर्म करूं नये ॥ ८३ ॥ विषयासक्त रागीच कर्माधिकारी असे । निर्विषयी विरागी कर्माधिकारी नसे । ऐसें वेद भगवान् स्वयें सांगतसे । स्पष्टत्वें दोन्ही अधिकार ॥ ८४ ॥ चित्त शुद्ध नाहीं झालें जोंपर्यंत । त्यानें नित्य नैमित्तिक कर्में करावीं तोंपर्यंत । चित्तशुद्ध झालियावरी न करावींत । पुन्हां कर्में भ्रामक तीं ॥ ८५ ॥ म्हणूनि निष्काम अधिकारी पुरुषानें । सर्व कर्मांचा अवश्य त्याग करणें । आणि निरंतर वेदांत-शास्त्राभ्यासीं असणें । ऐसें सर्व शास्त्रें सांगतीं ॥ ८६ ॥ जैसें वर्षाकालांत मेघ जलवृष्टि-कार्य सिद्ध करून । वर्षाकालाचे शेवटीं लय पावती आपण । तैशीं नित्य नैमित्तिक कर्मेंही जाण । चित्तशुद्धिद्वारें लयासि जातीं ॥ ८७ ॥ आत्माकार बुद्धि झाली जयाची । त्यासि कर्म करण्यानें हानि कोणची । ऐशी शंका झाली असतां शिष्याची । सयुक्तिक समाधान गुरु करिती ॥ ८८ ॥ आत्मविचारी तत्पर झालेल्या बुद्धीस । स्रक्-चंदन-स्त्री-पुत्रादि विषय आणिती बहिर्मुखतेस । तैशी

नित्य नैमित्तिक कर्मेंही त्या शुद्ध बुद्धीस । बहिर्मुख करिती अवश्य ॥ ८९ ॥ म्हणूनि चित्तशुद्धीपर्यंत कर्मोपयोग जाणा । चित्तशुद्धीनंतर त्या कर्मांस ये बाधकपणा । उलट प्रतिबंधक होती आत्मज्ञाना । म्हणूनि कर्मपरित्याग उचित आहे ॥ ९० ॥ निस्त्रैगुण्य परब्रह्म-पंथांत । जे विचरती ज्ञानी महात्मा साधु संत । तयांसि मुळींच नाहीं उरत । विधिनिषेधाचें कर्मकचाट ॥ ९१ ॥ जे परमात्मास्वरूप होऊनि स्वतःसिद्ध । जगदुद्धरण करिती अगाध । ज्यांतें वर्णिती वेदस्मृति बहुविध । ते विधिनिषेध कर्मांहूनि भिन्न साक्षी असती ॥ ९२ ॥; ऐसे नवनाथ योगीश्वर । मत्स्येंद्र-गोरक्षकादिक विवेकचतुर । त्या नाथसांप्रदायांतील एक नर । कानफाट्या नाथबुवा ॥ ९३ ॥ अक्कलकोटांत येऊनि राहिला । दत्तात्रेय-स्वामींच्या सेवेस लागला । सशक्त निर्भय असलेला । मुखीं गुरुनाम उच्चारी ॥ ९४ ॥ शके सत्राशें त्र्याण्णवांत । फाल्गुन शुक्लीं सिंहस्थ पर्वांत । गेलों होतों नासिक त्र्यंबक क्षेत्रांत । यात्रेसि मी वामनबुवा वैद्य ॥ ९५ ॥ गंगास्नानादि सर्व विधि आटोपून । सप्तशृंगीजगदंबेचें दर्शन । जाऊनि तेथें केलें यथासांग पूजन । कुलदेवतेचें अल्हादें ॥ ९६ ॥ नैवेद्य ब्राह्मणभोजन केलें यथाशक्तीं । केलें स्नानें रामकुंडीं तांबुलतीर्थीं । अष्ट तीर्थे करूनि शुद्ध भक्तीं । समाधान वाटलें ॥ ९७ ॥ सप्तशृंगी देवी स्थान अनादि अपूर्व । अगणित यात्रा येई धरूनि भाव । मनोरथ सिद्ध होत्साते सर्व । सेवा करूनि जाती ते ॥ ९८ ॥ अष्टादश भुजा विक्राल स्वरूप । पाहूनि अंगीं उठे भय कंप । जगज्जननीचें श्रीमुख सुंदर असंताप- । कारक प्रसन्नता विराजे ॥ ९९ ॥ तेथें ब्राह्मण भोपे पूजारी असती । तयांसि ब्रह्मनिष्ठ वामनें केली विनंति । कीं आदिमायेच्या श्रीमुखांतील मजप्रति । तांबूल प्रसाद प्राप्त व्हावा ॥ १०० ॥ पूजारी यांनीं ऐकूनि धिकारिलें । म्हणती फुकट प्रसाद कोणासि न मिळे । मग मी परमेश्वरीस विनविलें । आई आमच्या वंशासि प्रसन्न आहां ॥ १ ॥ आपली कृपा वंशांत सत्य असेल । तरी मातुश्री स्वमुखांतील । माझे हातांत पडावा प्रसाद

तांबूल । अनायासें सहज गतीं ॥ २ ॥ अर्धमात्रा चिच्छक्ति अति कृपाल । आपल्या आपण श्रीमुखांतील केवल ।
माझे हस्तांजलींत प्रसाद तत्काल । पडला तांबूल उच्छिष्ट तो ॥ ३ ॥ पूजारी भोपे लाजूनि देखती टकमकां ।
आश्चर्य वाटलें सकल लोकां । म्यां प्रेमानें प्रसाद भक्षूनि जगदंबिका । वंदिली अनन्य शुद्धमतीं ॥ ४ ॥ तेव्हां
निःस्पृह विरक्त ब्रह्मचारी । मज संगें होता परमार्थाधिकारी । पुढें सटाण्यास गेलों सत्वरी । यशवंतराव साधूंच्या
दर्शना ॥ ५ ॥ यशवंतराव महादेव भोसेकर । सटाण्यास होते देवमामलेदार । त्या कचेरींत जाऊनि शांताकार ।
सत्पुरुष वंदिले आदरें ॥ ६ ॥ त्याकालीं कचेरींत वरिष्ठाधिकारी । हिशेबें द्रव्य मोजित होते सरकारी । हिशेब
ताळा धनयुक्त मिळाल्यावरी । सर्वांसि आश्चर्य वाटलें ॥ ७ ॥ कारण सरकारी शिलकेंतील धन । परोपकारार्थ घेतलें
म्हणून । यशवंतरावावरी झालेलें आरोपण । तें निवारण होऊन गेलें ॥ ८ ॥ मामलेदार म्हणती मजला । आम्हीं
जाऊनि अक्कलकोटाला । गुरुदत्तात्रेयस्वामी-चरणकमलां । शरण होऊनि आलोंत ॥ ९ ॥ आमचे सांगा साष्टांग
नमस्कार । विनवूनि परमात्मा कृपासागर । सर्वभूतीं लीन दया शांति परोपकार- । कर्ते भोसेकर देवरूप ॥ ११० ॥
तेथें सप्तरात्र राहून । सप्तशृंगासि पातलों परतून । श्रीजगदंबेचें पूजनादि करून । आलों नासिक-क्षेत्रांत ॥ ११ ॥
सिंहस्थांतील भागीरथीचें जल । शुद्ध पात्रांत भरूनि विपुल । पांडुरंग-क्षेत्रांत येऊनि तत्काल । श्रीविठ्ठलदर्शन
घेतलें ॥ १२ ॥ तों विटेवरी दत्तात्रेय स्वामी । गुरु गिरिनारी सर्वांतर्यामी । प्रत्यक्ष देखिले स्मर्तृगामी । तेणें समाधानाश्चर्य
वाटलें ॥ १३ ॥ श्रीविठ्ठल पांडुरंग देव । तेचि दत्तात्रेय स्वामी ऐक्यभाव । हें ब्रह्मानुभव अद्वैत वैभव ।
महात्मा संत जाणती ॥ १४ ॥ असो पांडुरंगावरी गंगा घालून । पूजनादि ब्राह्मणभोजन करून । एक मास श्रीपांडुरंग-
दर्शन । चंद्रभागा-स्नानादि आचरिलें ॥ १५ ॥ एकनाथ बडवे यांचे सदनीं । पंढरींत आनंदें राहूनि । पादचारी मार्गें

प्रज्ञापुरीं येऊनि । वंदिलें साष्टांग गुरुराया ॥ १६ ॥ श्रीफलादिक समर्पिलें । तों दत्तदिगंबर वदती चांगलें । मामलेदारानें काय दिधलें । पंढरीस भेटलें प्रथम कोण ॥ १७ ॥ भाजिलें असून कच्चें मडकें । कां तासावें फिरावें बोडकें । इच्छा संकल्प झालेले मोडके । दग्धबीजासारिखे ॥ १८ ॥ स्वस्थ परमानंदांत असतां सदा । शिणूनि कां भोगाव्या आपदा । उदईक प्रातःस्नानकालीं गुरुपदां । भागीरथी अर्पिजे ॥ १९ ॥ गुरुमुखें ऐसें बोधामृत । कर्णद्वारें प्राशूनि झालों संतोषित । पेठेंत विरूपाक्ष मोदीच्या सदनांत । उघड्या जागेंत प्रभु स्थित होते ॥ १२० ॥ गंगा घेऊनि सायंकाळीं । निजावयास गेलों जेथें होती गुरु माउली । सेवेकऱ्यांत भांडणें चाललीं । आरती झाली समर्थांची ॥ २१ ॥ विश्वंभरबुवासह बळवंत । आणि कानफाट्या क्रोधीनाथ । यांचा कलह चालला विपरित । कारण त्याचें विशेष नसूनि ॥२२॥ कानफाट्या म्हणे ऐसें गर्जा अक्षय । 'अलख-गुरुनाथ-दत्तात्रेय' । म्हणूं नका 'स्वामीमहाराजकी जय' । हेंचि कारण कलहासि ॥ २३ ॥ यासंबंधानें पूर्वीं विश्वंभराचें मस्तक । कानफाट्यानें फोडिलें होतें अचूक । उघड्या जागेंत आम्ही सर्व सेवक । निद्रिस्त झालों तेथेंच ॥ २४ ॥ समर्थ निजले चौकाच्या खणांत । श्रीपाद चोळाप्पा सुंदराबाई तेथ । होते इतर सेवक निद्रिस्त । तों मध्यरात्री सरल्यावरी ॥ २५ ॥ कानफाट्यानें अविचारें । बळवंताचें डोकें दगडाच्या कपरें । फोडूनि रक्त काढिलें तेव्हां सारे । जागृत झाले भयभीत ॥ २६ ॥ एकचि झाला हाःहाःकार । तेव्हां कानफाट्यानें सुंदराबाईचे पाठीवर । प्रबल ताडिले लत्ताप्रहार । अति बावरा झाला तो ॥ २७ ॥ विश्वंभरबुवा मी आणि बळवंत । शेजारींच होतों निद्रिस्त । परंतु कानफाट्यानें प्रघात । केला नसल्यानें वांचलों ॥ २८ ॥ गलबला झाला लोक जमले । मग धाकूजी फौजदार जमादार आले । स्वामिराजांसि नमूनि त्यांनीं विनविलें । आम्हांसि आज्ञा काय आहे ॥ २९ ॥ समर्थ म्हणती कानफाट्या पोर । फारचि झाला शिरजोर । तुम्हांस

योग्य दिसेल तें शीघ्र । करावें न्यायविचारें ॥ १३० ॥ मग कानफाट्यास युक्तीनें धरून । तुरुंगांत नेलें हात बांधून । ऐसें होतां दिनोदय होऊन । शौचमुखमार्जन जाहलें ॥ ३१ ॥ स्नानासि बैसले दत्तदिगंबर । तेव्हां करीं घेऊन गंगाजल पात्र । युक्तीनें समर्थांच्या अंगावर । गंगा घातली निर्विघ्नपणें ॥ ३२ ॥ पूजा करूनि रेशमी काषाय वस्त्र । घातलें सद्गुरुनाथाचे अंगावर । धूपदीप नैवेद्यादिक पुष्पहार । समर्पण केले विश्वेश्वरा ॥ ३३ ॥ तीर्थ-प्रसादादि घेतलें । स्वामीसमर्थ मंचकीं आडवे झाले । नंतर मी आलों बिऱ्हाडीं आपले । निर्विघ्न कृतकार्य होऊनि ॥ ३४ ॥ कारागृहांतून कानफाट्यासि । नित्य आणित होते स्वामिदर्शनासि । समर्थाज्ञानुसार बळवंताचे मस्तकासि । राताळूं घासूनि लाविलें ॥ ३५ ॥ मी प्रज्ञापुरीं समर्थसेवेंत । राहूनि कांहीं दिवस आलों बडोद्यांत । पुढें घडला प्रसंग विपरीत । नाथ-कानफाट्याचे हातून ॥ ३६ ॥ एके दिवशीं दत्तावधूत । अक्कलकोट ग्राम सन्निहित । लंडोरबुवांचे समाधीपाशीं स्थित । उच्च कमानींत विराजती ॥ ३७ ॥ पलीकडे एक वारकरी ब्राह्मण । बैसला होता ध्यानस्थ मुखेंकरून । भुजंगा श्रीपादभट कल्लाप्पादि सेवकजन । समीप होते समर्थांच्या ॥ ३८ ॥ तेव्हां कैदी कारागृहांतील । कामकाज करित होते तेथें जवळ । अशी संधि देखूनि कानफाट्यानें तात्काळ । शिपायाचे हातची तरवार घेतली ॥ ३९ ॥ घाईं घाईं येऊनि तो समर्थांसमोर । क्रोधें हातांत घेऊनि नागवी तलवार । मारावयास्तव ओट्यावरी चढणार । तों प्रभु रागें भरूनि बोलले ॥ १४० ॥ कानफाट्या उन्मत्त अति क्रोधकारी । त्यासि वाटलें माझा शत्रु ध्यान करी । ऐसें जाणूनि ध्यानस्थ ब्राह्मणावरी । घाव घातले तरवारीनें ॥ ४१ ॥ त्या कालीं त्याच्या मागें पुढें जाण्यास । धीर नये कोणा मनुष्यास । पुन्हां बांधिला तेव्हां मारावयास । हात उगारी समर्थांपुढें ॥ ४२ ॥ तें पाहूनि समर्थ तयासि वदले । ओट्यावर चढूं नको तुझें दैव फुटलें । समर्थांनीं अघटित करविलें । तें परिसावें कौतुक ॥ ४३ ॥

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

कानफाट्याचे हातची तलवार । वेगें निष्टून गेली फार दूर । तरवारीची मूठ राहिली, नाहीं तरवार । ऐशी संधि
विलोकूनि ॥ ४४ ॥ कल्लाप्पा आणि भुजंगानें । कानफाट्यासि धरिलें धैर्यानें । पाठीवर दांडके मारिले बलानें ।
तथापि गणीना कानफाट्या ॥ ४५ ॥ तेव्हां एक आचार्य वैष्णव आणि श्रीपादभटानें । पुष्कळ मारिलें त्यासि दांडक्यानें ।
चक्कर येऊनि खालीं पडला तेणें । इतुक्यांत फौजदार शिपाई धांवले ॥ ४६ ॥ त्यांनीं हातांत बिड्या घालून
लोखंडी । जखडून बांधिला तो धरूनि मुंडी । पाहती लोकांच्या पुष्कळ झुंडी । मोठा प्रचंड प्रसंग तो ॥ ४७ ॥
कानफाट्यासि कारागृहांत नेलें । पुढें तयावरी काम चाललें । न्यायरीतीनें यथार्थ निर्णित झालें । शहाजी नृपाज्ञेनुसार
तें ॥ ४८ ॥ सप्तवर्षांची कानफाट्यासि । सक्त शिक्षा झाली प्रतिबंध-कैदेसि । त्यापूर्वीं मृततुल्य झालेल्या ब्राह्मणासि ।
योगीश्वरें कथियेलें ॥ ४९ ॥ महिषीचें उष्ण उष्ण शेण । लावावें खड्ग-घायावरी प्रतिदिन । त्या समर्थांच्या
उपायेंकरून । जखमा बुजून गेल्या त्या ॥ १५० ॥ बरा जाहला द्विज वारकरी । स्वामीसमर्थांची नित्य स्तुति करी ।
सात्त्विक ब्राह्मण निर्विकारी । समर्थकृपें वांचला ॥ ५१ ॥ पुढें पांच सहा वर्षांनंतर । कैलासवासी जाहला तो द्विजवर ।
कृतकर्मांचा पश्चात्ताप फार । कानफाट्यासि उपजला ॥ ५२ ॥ हा बलाढ्य कानफाटी नाथ । जेव्हां होता
समर्थसेवेंत । तेव्हां समर्थांच्या गाडीपुढें चालत । उफराटा कोश दोन तीन ॥ ५३ ॥ मस्तकावरी घेऊनि जड
मंचक । समर्थांचे सामानासुद्धां निःशंक । समर्थांचे श्रीमुख भवतारक । पहात पहात उफराटा चाले ॥ ५४ ॥ स्वामिराजांचे
चरणकमलीं । कानफाट्याची दृढतर भक्ति सर्व कालीं । जडलेली खरी परंतु एककल्ली । अति तामसी
साहसकर्मी होता ॥ ५५ ॥ म्हणून न घडला त्यासि उपयोग । असूनि नवनाथ-सांप्रदायी योग । धन्य धन्य स्वामी
समर्थ श्रीरंग । क्षमा-धैर्याचे समुद्र महा ॥ ५६ ॥ जरी आकाश डळमळून पडलें । वायु प्रकोपला मेघ कोसळले ।

पृथ्वी उचंबलित होऊनि ब्रह्मांड हाललें । प्रज्वलित झाले अग्न्यादिक ॥ ५७ ॥ तथापि ढळेना अंतःकरणवृत्ति । निर्भय निःशंक निर्विकार ब्रह्मस्थिति । भय-विकारादिकांचे स्पर्शचि नसती । शांति-कृपार्णव नित्य भरलेले ॥ ५८ ॥ ब्राह्मण वांचूनि पावला कैलासीं । कानफाट्या कारागृह शिक्षेसि । भोगूनि मुक्त होऊनि स्वदेशीं । गेला पश्चात्तापी तो ॥ ५९ ॥ अक्कलकोटचा परमपुरुष गोसावी । ज्याची अजरामर परमात्मा पदवी । त्याच्या लीलामृताची चवी । श्रवणद्वारें प्राशितां ॥ १६० ॥ दग्ध होती संपूर्ण पातकराशी । संकटें टळती अति बाधक क्षणेंसीं । रोगी आरोग्य होऊनि सुखासि । भोगिती यथेप्सित सगळे जन ॥ ६१ ॥ भूत-प्रेत-पिशाच्चादि संबंध । नासती नाना संसारिक बंध । देखती नेत्र येऊनि जन्मांध । पंगु गिरि उल्लंघिती ॥ ६२ ॥ मुके होती पंडित वाचाल । विषयासक्त पावती विरक्ति केवल । दुर्जन ते सज्जन होती तात्काल । निंदक द्वेषी भवजाल तरती ॥ ६३ ॥; असो श्रीक्षेत्र पंढरपुरांत । खासगीवाल्यांच्या सदनांत । श्रीदत्तात्रेय-पादुका आहेत स्थापित । त्यांची पूजा ऋग्वेदी ब्राह्मण करितसे ॥ ६४ ॥ पंढरीनाथ गणेश म्हणून । त्यासि एक कनिष्ठ बंधु असून । वेगळे झाल्यावरी करिती भांडण । पूजेकरितां बंधु बंधु ॥ ६५ ॥ वडील बंधु पंढरीनाथाप्रति । दोन पुत्र आणि एक असे कन्या संतति । गोविंदा आणि गोपाळा हीं पुत्रनामें असती । कन्या चंद्रभागा नामक ॥ ६६ ॥ पादुकापूजा कनिष्ठ बंधुकडे । पंढरीनाथ आणि कुटुंबासि दुःख पडे । संसारिक भोळे उभयतां जैसे वेडे । निर्धन झाले कुटुंबी ॥ ६७ ॥ पंढरीनाथासि अफू-गांजा-व्यसन । होतें परंतु कांहीं नसे उत्पन्न । बहु त्रासल्यावरी गाणगापुरीं जाऊन । राहिले सेवा करीत ॥ ६८ ॥ मधुकरी भिक्षान्न मागून । सर्व कुटुंबाचें करिती पोषण । पुढें कांहीं दिवसानंतर येऊन । अक्कलकोटीं राहिले ॥ ६९ ॥ श्रीगुरुदत्त-दर्शन नित्य करिती । भिक्षान्नें उपजीविका चालविती । दोन तीन संवत्सर राहूनि सेविती । श्रीगुरुस्वामी-योगिराजा

॥ १७० ॥ एके दिवशीं सुप्रसन्नवदनमूर्ति । विलोकूनि पंढरीनाथ करी विनंति । तों कृपासागर त्यासि विचारिती । काय पाहिजे तुजलागीं ॥ ७१ ॥ तो म्हणे पंढरपुरच्या श्रीदत्तपादुकांची पूजा । मजकडे असावी हो महाराजा । बंधु आणि त्याचा पुत्र दुजा । मृत झाल्यावीण कार्य न घडे हें ॥ ७२ ॥ हास्यवदनें बोलती दत्तात्रेय । पंढरीनाथा तूं आणि तुझा तनय । स्वर्गस्थ झालां तरी दोष काय । परकीय अनिष्टचिंतन करूं नये ॥ ७३ ॥ नंतर थोडक्या दिवसांत । कनिष्ठ बंधु मृत झाला पुत्रसहित । हें कळल्यावरी अशुभ वृत्त । आज्ञा घेऊनि गृहीं गेले ॥ ७४ ॥ दत्तपादुकांची पूजा घरीं जाऊनि । करूं लागले निर्वाह सुखेंकरूनि । तों पंढरीनाथ त्याची स्त्री आणि । ज्येष्ठ पुत्र या त्रिवर्गां ॥ ७५ ॥ अकस्मात् काळें झडपिलें । अनिष्ट चिंतनाचें फल प्राप्त झालें । कनिष्ठ पुत्र गोविंद भले । कुटुंबसह नांदती ॥ ७६ ॥ अक्कलकोटीं भक्तिपुरःसर । दर्शनासि येती उभयतां वारंवार । श्रीगुरुलीला अनंत अपार । श्रोतीं परिसाव्या प्रेमभरें ॥ ७७ ॥; अक्कलकोटचा मोरोबा कुळकर्णी । कधीं कधीं त्याचे सदनीं । स्वामीमहाराज बसती स्वेच्छेंकरूनि । एके दिनीं आंगणांत निजलेले ॥ ७८ ॥ सर्व सेवेकरी निद्रिस्त झाले । तों मोरोबाच्या स्त्रीचें पोट फार दुखूं लागलें । फारचि व्याकुल झाल्यामुळें । माध्यान्हरात्री-उपरांत ॥ ७९ ॥ ती उठूनि गेली विहिरीवर । प्राणत्यागार्थ सिद्ध झाली सत्वर । आवेशें आंत उडी टाकणार । तों इतक्यांत श्रीस्वामिरायें ॥ १८० ॥ जागृत होऊनि सेवकांसि शीघ्र उठविलें । म्हणती विहिरींत कोण जीव देतो या वेळे । त्यास सत्वरें आणावें ऐसें आज्ञापिलें । तों सेवक म्हणे महाराजा ॥ ८१ ॥ मध्यान्ह रात्र होऊनि गेली । ऐशा घोर अपरात्रकालीं । विहिरींत जाऊनि कोण आपली । व्यर्थ तनु त्यागील ॥ ८२ ॥ आपण स्वस्थ निजावें आतां । तेव्हां योगिराज म्हणती

अरण्यपंडिता । आम्हीं खरें सांगितलें असतां । मानित नाहींस मूर्खा कां ॥ ८३ ॥ मग तात्काळ विहिरीवर गेला । तिच्या उडी टाकण्याचे समयाला । युक्तीनें हात धरूनि ओढिलें तिजला । धैर्यबलानें त्या कालीं ॥ ८४ ॥ उचलूनि आणिली समर्थांजवळ । तों जागृत झालें मोरोबाचें मंडळ । घाईघाईनें उठूनि तात्काल । जगद्गुरुचरणांसमीप पातलें ॥ ८५ ॥ मोरोबाच्या स्त्रीस ओळखिलें सर्वांनीं । म्हणती आत्महत्या करित होतीस कां जीव देऊनि । कृष्ण-अमावास्येसम घोर रजनीं । साहसास प्रवर्तलीस कां ॥ ८६ ॥ देवरायें पाहिलें कृपादृष्टीनें । पळून गेलें पोटदुखणें । सर्व म्हणती समर्थांचें अघटित करणें । जीवदान दिधलें आज ॥ ८७ ॥ सर्वज्ञ सर्वसाक्षी सर्वांतरीं । व्यापक परमात्मा आपण चराचरीं । लोकानुग्रहार्थ बसूनि प्रज्ञापुरीं । तारितां जीव असंख्यात ॥ ८८ ॥ अगम्य अतर्क्य समर्थ लीला । काय समजे मंदमतीला । शरणागत नम्र दीनांला । सांभाळावें परोपरी ॥ ८९ ॥ वारकरी द्विजासि जीवदान दिलें । विप्रस्त्रियेसि वांचविलें । वामनदासासि दर्शन घडलें । विठ्ठलस्थानीं पंढरींत ॥ १९० ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदवेदांतरहस्यमथित । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । सप्तचत्वारिंशाध्याय गोड हा ॥ १९१ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे सप्तचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ॥ ४७ ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय अठ्ठेचाळिसावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीदत्तात्रेय-स्वामीसमर्थाय नमः ॥ ॥ गुरु बोधिती अधिकारी शिष्यासि । मागिले अध्यायीं कथिलें व्याकरण-पदार्थांसि । आतां जैमिनीकृत पूर्वमीमांसेसि । श्रवण करावें सावधानें ॥ १ ॥ ककारादिक वर्णसमुदायाचें नाम ‘पद’ असे । त्या पदाच्या समुदायासि म्हणती ‘वाक्य’ ऐसें । आणि ‘ज्योतिष्टोमेन यजेत् स्वर्गकामः’ या वाक्यांत परिसे । जीं विशद पदें असतीं ॥ २ ॥ तीं पदें एकमेकांचा परित्याग करून । शब्दबोधासि न करिती उत्पन्न । परस्पर तीं पदें येणेंकरून । आकांक्षायुक्त असतीं ॥ ३ ॥ आणि ‘ज्योतिष्टोमेन यजेत् स्वर्गकामः’ हें वाक्य परिसे । यांत जो पदांचा समूह असे । तथा ‘उद्भिदा यजेत्’ या वाक्यांत जो पदसमूह वसे । त्या दोन्ही समूहांसि परस्पर आकांक्षा नाहीं ॥ ४ ॥ तीं दोन्ही वाक्यें भिन्न असती । आणि एकवेळ पद तथा वाक्यें तीं । केलेल्या उच्चारणासि बोधिती । एकाचि अर्थाकारणें ॥ ५ ॥ तें पद तथा वाक्य ज्या स्थलांत । दुसऱ्या अर्थासि बोधन करित । त्या वाक्यांत होतसे प्राप्त । वाक्यभेद कैसा तो ॥ ६ ॥ जैशीं मायाविशिष्टपरमात्म्यापासून । आकाशादि भूतें होतीं उत्पन्न । तैसेच ककार-खकारादिक वर्ण- । समुदाय उत्पन्न होतसे ॥ ७ ॥ ऐसें उत्तरमीमांसक कथिती । आणि पूर्वमीमांसक तर या प्रकारें वदती । कीं ककारादिक वर्ण नित्य असती । म्हणूनि तयांस उत्पत्ति-नाश संभवत नसे ॥ ८ ॥ शिष्य म्हणे ककारादिक वर्ण नित्य असती । तर त्या वर्णांची सर्वदा झाली पाहिजे प्रतीति । या शिष्यशंकेचें समाधान करिती । गुरुवर्य उघड तें ॥ ९ ॥ जैसें आकाशीं विद्यमान असलेले तारकगण । दिवसां न दिसती सर्वत्र जाण । उदय

पावती होतांचि रजनी आगमन । म्हणून रजनी त्या नक्षत्रांची अभिव्यंजक आहे ॥ १० ॥ तैसे विद्यमान असलेले ककारादि वर्ण । प्रतीत न होती कंठ तालु आदि संबंधावांचून । कंठ तालु आदिक संबंध झाल्यावरी जाण । ते ककारादि वर्ण प्रतीत होती ॥ ११ ॥ अंतर्वायूनें ते संबद्ध । ऊरु कंठ शिर जिव्हामूल शुद्ध । दंत नासिक ओष्ठ तालु हीं स्थान अष्टविध । असती वर्णोच्चारासि ॥ १२ ॥ तीं सगळीं त्या ककारादि वर्णाचीं अभिव्यंजक आहेत । ऐसें त्या स्थानानें अभिव्यक्तीस झालेले प्राप्त । ते वर्ण जेव्हां प्राप्त होती श्रोत्यांचे श्रवणांत । तेव्हां ते पद वाक्य संज्ञेसि पावती ॥ १३ ॥ या पदाचे तथा वाक्याचे अंतस्थित जे वर्ण । ते वर्ण पूर्ववर्णानुभवजन्य संस्कारेंकरून । सहकृत झालेल्या पदार्थ-ज्ञानाचें कारण । होती वाक्यार्थ-ज्ञानाचेंही ॥ १४ ॥ त्या पदाचे तथा वाक्याचे संगें जो अर्थाचा । बोध्यबोधकभाव नित्यसंबंध साचा । तो बोध्यबोधकभाव-संबंध घटादि पदांचा । घटत्वादि जातींत राहतसे ॥ १५ ॥ यास्तव घटादिक शब्दांपासून । घटत्वादि जातींचा शब्दबोध होऊन । घटत्वादि व्यक्तीचें ज्ञान । 'अर्थापत्तिरूप' आक्षेपें होतसे ॥ १६ ॥ आणि 'ज्योतिष्टोमेन यजेत् स्वर्गकामः' परिसे । इत्यादि वाक्यांत जें पद असे । तें आपापल्या अर्थाचें स्मरण करवितसे । म्हणूनि तें पद अभिधायक असे ॥ १७ ॥ वाक्यार्थाच्या ज्ञानास्तव यद्यपि । त्या पदाची प्रवृत्ति होते तथापि । पदार्थाच्या ज्ञानावांचून कदापि । वाक्यार्थ-ज्ञान होत नसे ॥ १८ ॥ म्हणूनि तें पद आपापले अर्थाचें करितें बोधन । आणि 'सच्चिदानंदरूप आत्मा' इत्यादिक वचन । या वाक्यांत ज्या पदानें करविलें स्मरण । तें स्वार्थबोधनही करितसे ॥ १९ ॥ परस्पर-संबंधरूप वाक्यार्थासि बोधिती । आणि जेवढ्या पदार्थांची परस्पर आकांक्षा होय ती । त्या संपूर्ण पदार्थांचा त्या वाक्यमध्यवर्ती । होत असे संबंध ॥ २० ॥ कर्ता-कर्मादिक पदार्थ असलेले विद्यमान । तरी क्रियापदार्थावांचून वाक्यार्थ पूर्ण । होत नाहीं कधींही म्हणून । क्रियापद पूर्णता करितसे

॥ २१ ॥ आणि जें वाक्य दुसऱ्या वाक्याची अपेक्षा न करित । त्यासीच 'वाक्य' म्हणिजेत । म्हणूनि एक वाक्यांत एकचि क्रियापद वसत । अनेक क्रियापदें नसतीं ॥ २२ ॥ आणखी एक वाक्य जेथें । दुसरे वाक्याची अपेक्षा करितें । 'प्रकरण' रूप तेथें । होत आहे प्रमाण ॥ २३ ॥ त्या क्रियापद-घटित वाक्यांत । लिङ् लोट्-लेट्-तव्यादिक कृत्-प्रत्यय येत । ते संपूर्ण प्रत्यय करित । विधीचें बोधन सर्वदा ॥ २४ ॥ लोकांमध्यें तथा वेदामध्यें जे पदार्थ । प्रत्यक्षादिक-प्रमाणानें ज्ञात नाहींत । ते अज्ञात पदार्थही होतात । लिङादि विधि-प्रत्ययांचा अर्थ ॥ २५ ॥ आणि 'अपौरुषेय' वाक्यसमूहाचें नाम 'वेद' असे । तो वेदही दोन प्रकारचा असतसे । एक तर 'मंत्रभाग'रूप वेद वसे । दुसरा 'ब्राह्मणभाग'रूप असे ॥ २६ ॥ विधिवाक्याचें यज्ञादिरूप अर्थाची स्तुति । करून जें वेदवाक्य अधिकारी पुरुषाप्रति । त्या यज्ञादि कर्मीं प्रवृत्त करितें निश्चितीं । तें वेदवाक्य 'अर्थवाद'रूप असे ॥ २७ ॥ तीन प्रकारचे असती अर्थवाद । पहिला 'गुणवाद' दुसरा 'अनुवाद' । तिसरा असे 'भूतार्थवाद' । हे तीन वाद सांगितले ॥ २८ ॥ आणि ज्या वाक्यांत क्रियापद नाहीं । त्या वाक्यांत पूर्व वाक्यानें पाहीं । अथवा उत्तर वाक्येंकरूनही । क्रियापदाचा अनुषंग करावा ॥ २९ ॥ या प्रकारें वाक्यांत । कर्ताकर्मादिक कारकांचें वाचकपद नसत । तरी पूर्वोत्तर वाक्यानें त्या वाक्यांत । त्या पदांचा अनुषंग करावा ॥ ३० ॥ ज्या वाक्यांत जें पद अपेक्षित असे । तें पद कदाचित् पूर्वोत्तर वाक्यांत नसे । त्या वाक्यामाजीं त्या पदाचा लागतसे । 'अध्याहार' करावा ॥ ३१ ॥ आकांक्षा-योग्यतादिकांचे । वशेंकरून पदांचे । तथा परस्पर वाक्यांचे । व्यत्यय-भाव करावे ॥ ३२ ॥ पदांचा अर्थसंगें जो संबंध असे । तो लोकांत वृद्धपुरुषांच्या व्यवहारानें जाणिला जातसे । यास्तव जे 'लौकिक' शब्द आहेत तसे । 'वैदिक' शब्द असती ॥ ३३ ॥ यद्यपि लोकांत तथा वेदांत । पदाची तथा पदार्थाची समानता असत । तथापि वेदाच्या वाक्यांत । वाक्यार्थ

अपूर्वंचि वसतसे ॥ ३४ ॥ वेदाचे पूर्वकांड-वाक्यांचा 'धर्मजिज्ञासारूप' अर्थ असे । आणि उपनिषद्रूप उत्तर कांडाचा 'ब्रह्मजिज्ञासा-ब्रह्मरूप' अर्थ वसे । ते दोन्ही प्रत्यक्षादिक लौकिक प्रमाणानें ज्ञात न परिसे । म्हणूनि दोन्ही अपूर्व असती ॥ ३५ ॥ विधिवाक्यांच्या यज्ञादिरूप अर्थाची स्तुति करून । तथा त्या अर्थाहून भिन्नार्थाची निंदा करून । त्या अर्थाविषयीं अर्थवादरूप वचन । अधिकारी पुरुषाची प्रवृत्ति करवितसे ॥ ३६ ॥ मंत्ररूप जीं असतीं वचनें । तीं देवतादिकांचें करविती स्मरण समजणें । यास्तव ते अर्थवाद तथा मंत्र-प्रमाणें । विधि वाक्यार्थांत आहेत ॥ ३७ ॥ तीं विधिवाक्येंही चार प्रकारचीं असतीं । एक 'विनियोगविधि' दुसरा 'प्रयोगविधि' म्हणती । तिसरा 'उत्पत्तिविधि' वर्णिती । चौथा 'अधिक्रियाविधि' असे तो ॥ ३८ ॥ भावनेचें प्रतिपादक जें विधिवाक्य । त्या वाक्यार्थामाजीं 'साधन-साध्य-। इतिकर्तव्यता' ऐशीं त्रय । उपयोगी असती ॥ ३९ ॥ 'स्वर्गकामो यजेत्' या वाक्याचे । अर्थज्ञानानंतर त्या यज्ञादि कर्मांचें । अनुष्ठानानें उत्पन्न होतें साचें । 'धर्मरूप-अपूर्व' तें ॥ ४० ॥ ज्या धर्मरूप-अपूर्वेंकरून । या पुरुषासि स्वर्गप्राप्ति होते जाण । तीं वेदप्रतिपादित कर्में दोन । प्रकारचीं असतीं श्रोते हो ॥ ४१ ॥ एक 'प्राकृत' कर्म दुसरें 'वैकृत' । त्यांत हें कर्म या प्रकारें करिजेत । ऐसें विधान केलेलें कर्म बोलिजेत । 'प्राकृतकर्म' या नामें ॥ ४२ ॥ आणि हें कर्म या कर्मासमान । करावें ऐसें केलेलें विधान । त्या कर्मासि वेदवेत्ते ऋषिजन । 'वैकृतकर्म' म्हणताति ॥ ४३ ॥ शब्दांतर-अभ्यास-संज्ञा-संख्या-गुण । -प्रकरणांतर या षट्प्रकारेंकरून । कर्में होतीं भिन्न भिन्न । त्यांत कांहीं अंग आणि अंगीरूप असतीं ॥ ४४ ॥ त्या कर्माच्या अंग-अंगी भावांत । श्रुति-लिंग-वाक्य-प्रकरण-स्थान-समाख्या हीं षट् प्रमाणें असत । त्या कर्माच्या अंग-अंगीभाव-निश्चयाच्या शेवटांत । 'इयत्तारूप' परिमाण असे ॥ ४५ ॥ श्रुति-अर्थ-पाठ-स्थान-मुख-प्रवृत्ति । या षट्प्रमाणानें तीं जाणिलीं जातीं । कर्मांचें परिमाण कैसें त्याप्रति । श्रोतीं आदरें परिसावें ॥ ४६ ॥ पत्नीयुक्त जे अधिकारी त्रैवर्णिक । त्यांत एकानें किंवा

अनेकांनीं व्यवस्थापूर्वक । करण्यासि योग्य जें कर्मयज्ञादिक । त्या यज्ञकर्मोपयोगी जें द्रव्य आहे ॥ ४७ ॥ तथा देवता असती त्यांना देखूनि । हें कर्म या कर्माची विकृति आहे ऐसा विवेकी पुरुषांनीं । यज्ञादि कर्माचा परस्पर प्रकृतिभाव जाणूनि । निश्चय करावा आवश्यक ॥ ४८ ॥ विकृति यज्ञांत बुद्धिमानांनीं पदादिकांची । ऊहा करावी आणि पूर्णता झाल्यावरी सर्व कर्मांची । त्या विकृति कर्मांत प्रकृति-कर्मांगाची । निवृत्तिरूप बाध्यता जाणावी ॥ ४९ ॥ जेथें दुसऱ्यासाठीं केलें जें अंग । त्या अंगानें होतसे परोपकारीं उपयोग । तयाचें नाम आहे ‘प्रसंग’ । श्रुत्यर्थवेत्ते म्हणतात ॥ ५० ॥ आणि एकवार केलेलें कर्म जें तें । नाना कर्मांगरूप होत तन्नाम ‘तंत्र’ बोलिजेते । इत्यादि अनेक प्रकारचे पदार्थ कथिले ते । पूर्वमीमांसेंत जैमिनीऋषींनीं ॥ ५१ ॥ त्या पदार्थांचा अभ्यास करून । सांप्रतकालीं आपणासि पंडित मानून । विद्वानांचे सभेंत जे स्थित होऊन । पूर्वमीमांसेचे पदार्थ कथितात ॥ ५२ ॥ ते अभिमानें बोलती वचनें ऐशीं । आम्हीच जाणतों उत्तरमीमांसेसि । त्यांत ब्रह्मज्ञानें मोक्षप्राप्तीसि । कथिलें आहे साच कीं ॥ ५३ ॥ आणि त्या ब्रह्मज्ञान-प्राप्त्यर्थ यज्ञादि कर्मादिक । साधनें कथिलीं असतीं अनेक । त्या संपूर्णांसि आम्हीच एक । उत्तम प्रकारें जाणतों ॥ ५४ ॥ ऐसें मीमांसा-शास्त्राभ्यासें अभिमान धरून । अनात्म-पदार्थांचें करिती चिंतन विवरण । ते बहिर्मुख अनात्मवादी मोहेंकरून । प्राप्त होती बंधनासि ॥ ५५ ॥ ते संसारभवसमुद्रांत बुडती । त्यांना वारंवार जन्ममरण होते संसृति । त्याहीपेक्षां विद्वान नसून तरती । गणिका वेश्या आदिक ॥ ५६ ॥; असो अक्कलकोट संस्थानांत । एक अधिकारी होते परदेशीय श्रीमंत । त्यांचेजवळ एक गणिका वसत । रूपयौवनसंपन्न ॥ ५७ ॥ तिचें नांव तान्ही-नायकीण । चतुर मोहक गुणसंपन्न । तिनें परदेशीय अधिकाऱ्यांकडून । पुष्कळ द्रव्य संपादिलें ॥ ५८ ॥ ते अधिकारी तेथून गेल्यावर । तान्ही गणिकेनें सोडिला वेश्याव्यवहार । तीर्थयात्रा करी श्रीक्षेत्र पंढरपुर । गाणगापुर तुळजापुरादिक ॥ ५९ ॥ अनेक

तीर्थक्षेत्रीं जाऊन । देवपूजन नैवेद्य ब्राह्मणभोजन । मंत्रजागरण कीर्तनपुराण । पुष्कळ धन खर्चून करितसे ॥ ६० ॥
ही ऐळमेह्ली ग्रामाची राहणारी । वैराग्यसंपन्न सदाचारी । अनेक यात्रा करून स्वनगरीं । ऐळमेह्लीस राहिली ॥ ६१ ॥
तेथें एक सद्‌गृहस्थ ब्राह्मण । देशपांडे ईश्वरभक्तिपरायण । देवपूजन करिती भजन । कालक्रमण करित होते ॥ ६२ ॥
आल्यागेल्याचा सत्कार । आपल्या शक्त्यनुसार परोपकार । करित होते त्यांजकडे वारंवार । तान्ही गणिका श्रवणास
जातसे ॥ ६३ ॥ एके समयीं देवाधिदेव यतीश्वर । ऐळमेह्ली ग्रामीं सेवक फार । समागमें असूनि सुखकर । उतरले
सदनीं देशपांड्यांचे ॥ ६४ ॥ वारंवार लोकांचा समुदाय ॥ दर्शनासि येऊन वंदिती प्रभुपाय । ग्रामींचे सर्व नारीनर
आनंदमय । दर्शनें भाग्योदय मानिती ॥ ६५ ॥ दिवसा रात्रीं लोकांची दाटी । दर्शन पूजन समर्थांच्या गोष्टी । तान्ही
निरंतर शुद्धभावें भेटी । घेऊनि घाली मिठी दत्तचरणीं ॥ ६६ ॥ परगांवचे लोक फार येऊं लागले । म्हणूनि समर्थांनीं
भोजन न केलें । शिष्यवर्गांनीं बहुत विनविलें । तथापि न भक्षिलें कांहींच ॥ ६७ ॥ अगदीं कोणाचें ऐकत
नाहींत । असें पाहून श्रीपादभट अनंत । हे तान्ही गणिकेस म्हणत । तुम्ही तरी कांहीं युक्तीनें ॥ ६८ ॥ श्रीसमर्थ
गुरुनाथ । विनवूनि घालावें भोजनास । ती म्हणे म्यां गणिकेनें संन्याशास । कैसें भोजन घालावें ॥ ६९ ॥ श्रीपादभट
सांगे बर्फी पेढे । अथवा फळफळावळ पदार्थ जेवढे । मिळतील या ऋतुकालीं तेवढे । आणून खाऊं घालावे
॥ ७० ॥ तेव्हां ते पदार्थ तिनें आणविले । प्रार्थना करूनि प्रभूपुढें नेले । तेव्हां जगद्वंद्य दत्तात्रेय म्हणाले । तूं बाटवितेस
काय आम्हांसि ॥ ७१ ॥ तान्ही गणिकेच्या मनांतील । ओळखूनि कल्पना विटाळ । नाहीं म्हणाले देव जगत्पाल ।
पूर्ण ब्रह्मस्वरूप अवतारी ॥ ७२ ॥ तेधवां गणिकेचा पूर्ण विश्वास । जडला प्रभुपदीं जे तारक विश्वास ।
साक्षात भुक्तिमुक्तिदायक ज्यांचे निःश्वास- । रूप वेद प्रकटले ज्यांपासूनि ॥ ७३ ॥ पुढें दुसरे दिवशीं तेथून । निघाले

भक्ताभीष्ट-प्रदाते महान् । कोनळी ग्रामाच्या रानांतून । हिंडत खेळत चालले ।। ७४ ।। दोन अडीच कोश गेल्यावरी ।
अस्तमानासि गेला तमारि । समागमें एक शत सेवेकरी । गौवृषभअश्वादिक होते ।। ७५ ।। सूर्यास्तमानापर्यंत । सर्व
उपवासी अन्नोदक अप्राप्त । क्षुधेनें व्याकुळ झालेले चालवत । नसे तयांसि कंटकवनीं ।। ७६ ।। दोहों बाजूंनीं कांट्यांचें
कुंपण । त्यांतून समर्थ करिती गमन । कटंक मार्गीं चालणें अति कठिण । तथापि समर्थ कोठें बसेनात ।। ७७ ।।
त्याकालीं अल्पवयी श्रीपादभट । त्यानें कंटक काढून थोडा मार्ग केला नीट । शेतांत जाण्यास करूनि वाट । पडला
मार्गांत आडवा तो ।। ७८ ।। समर्थांसि म्हणे मी लेंकरूं लहान । आम्ही सर्व क्षुधातुर अन्नाविण । आमचे घेऊनि जीव
प्राण । करावें गमन वाटेल तिकडे ।। ७९ ।। नाहीं तरी या वृक्षाचे तळीं । स्वस्थ आपण बसा हो चंद्रमौळी । हें पाहून
सद्गुरु हांसून कळवळले त्या कालीं । शेतांत जाऊनि बैसले ।। ८० ।। श्रीपादानें घातला नमस्कार । म्हणे कोठून तरी
आणितों नीर । तेव्हां कोणीं सांगितलें अर्ध कोशावर । पाणी मधुर स्वच्छ आहे ।। ८१ ।। मग धोंडीबा मालबा खेमदास ।
काशीकरबुवा गोंविंद पुराणिकास । संगें श्रीपादास घेऊनि जल आणावयास । घागरी घेऊन गेले ते ।। ८२ ।।
पाणी आणून स्वामिरायासि । घातलें युक्तीनें फलाहारासि । सर्व क्षुधेनें व्याकुल झालेले प्रभूंसि । भोजनार्थ विनविती
।। ८३ ।। तेव्हां सुराध्यक्ष सांगती बरवें । त्या आम्रवृक्षाखालीं जावें । लोक म्हणती तेथें वाढूनि ठेविलें असावें । म्हणून
जावें कीं काय ।। ८४ ।। जाण्याचें नाकारिलें कित्येकांनीं । परंतु श्रीपादें विश्वास ठेवूनि गुरुवचनीं । परशुरामादिकांस
घेऊनि । गेला सत्वर आम्रवृक्षतळीं ।। ८५ ।। तों तेथें एक स्त्री सुवासिन । उभी होती वृद्ध प्रसन्नवदन । त्या वृद्ध
स्त्रीस करूनि नमन । श्रीपादभट पुसतसे ।। ८६ ।। माय तुम्ही कोठील कोण । येथें एकट्या असण्याचें काय कारण ।
आपल्यापाशीं फलादि अन्न । आहे काय स्वल्प बहु ।। ८७ ।। ती म्हणे आज या शेतांत आम्रतळीं । भोजनासि यावयाची

आमची मंडळी । सिद्धान्नें आणूनि उत्तम ठेविलीं । परंतु मंडळी अद्यापि आली नसती ॥ ८८ ॥ अस्तमान होऊनि गेला काय करावें । आतां त्यांचें मार्गप्रतीक्षेस कोठवर तिष्ठावें । तुम्हीं हें सर्व सिद्धान्न घेऊनि जावें । उदकपूरित घटांसह ॥ ८९ ॥ त्या अन्नपूर्णा-मातुश्रीनें । श्रीपादास दिधलीं सकल सिद्धान्नें । धातुपात्र पूर्ण भरलेलें दुधानें । भांडें घृताचें आमटीचें ॥ ९० ॥ पोळ्यांचें मोठें भरलेलें टोपलें । भाकरीचें टोपलें पुष्कळ भरलेलें । तिळाच्या भाकरीचें मोठेंसें चांगलें । भरलें पात्र काष्ठाचें ॥ ९१ ॥ हरबऱ्याच्या वाटल्या दाळीचें । टोपलें दिधलें दोन तीन शाकांचें । टोपलें थालिपीठ कोडबुळ्यांचें । चटण्या कोशिंबिरीसहित तें ॥ ९२ ॥ फोडणीचे तांदुळ परिपक्क सुंदर । थोरलें तपेलें भरलेलें भरपूर । ब्राह्मण सेवेकऱ्यांनीं मस्तकावर । भांडीं टोपलीं घेतलीं तीं ॥ ९३ ॥ श्रीपादानें स्वमस्तकावर । तांदुळाचें भांडें घेतलें थोर । हातांत मृत्तिकेची जलमय घागर । एक घेतली श्रीपादभटें ॥ ९४ ॥ दुसरी मृत्तिकेची घागर जलमय । गोविंद पुराणिकानें घेतली निर्भय । बाईस म्हणती चलावें तुम्हीं माय । दत्तात्रेयस्वामींचे दर्शनासि ॥ ९५ ॥ गुरुप्रसाद घ्यावा हो माते । आपण दुर्घट प्रसंगीं आम्हांतें । पुष्कळ अन्न भोजनातें । दिधलें कृपा करूनियां ॥ ९६ ॥ बाई म्हणे आतां तुम्हीं चला । मागाहून मीही येतें दर्शनाला । आपण सर्व क्षुधाकुल जाहलां । त्वरेनें जावें आळसूं नये ॥ ९७ ॥ अनेक सिद्धान्नें मस्तकावरी । घेऊनि पातले विप्र सेवेकरी । आम्रपत्रें आणिलीं खांद्यावरी । शूद्र सेवेकऱ्यांनीं ॥ ९८ ॥ स्वामी समर्थांच्या समोर । अन्नें ठेविलीं बहु सुंदर । समर्थ म्हणती पत्रावळी लावा झटकर । द्रोणासहित भक्तहो ॥ ९९ ॥ लाविल्या मशाली कांहीं दीप । पात्रें मांडिलीं समर्थांसमीप । वाढिती द्विज सिद्धान्नें अमूप । झाली सिद्धता भोजनाची ॥ १०० ॥ सर्व जातींचे सेवेकरी । मर्यादेनें समीप दूर पात्रावरी । बैसूनि 'दत्तात्रेय' नामोच्चारीं । संकल्प विकल्प सुटले तदा ॥ १ ॥ गुरुरायांनीं कांहीं न सेविलें । सर्वांनीं यथेच्छ भोजन केलें । तृप्त होऊनि ढेंकर दिधले । श्लोक म्हणती समर्थांचे ॥ २ ॥

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

सर्वांचें भोजन झालें अमर्याद । पोट फुगलें आली अन्नाची धुंद । म्हणती धन्य परमात्मा गोविंद । सच्चिदानंद जगद्गुरु
॥ ३ ॥ अरण्यांत यत्किंचित् पदार्थ नसून । अन्नपूर्णा-हस्तें अपार अन्न । अशा दुर्घट प्रसंगीं देववून । घातलें
भोजन यथास्थित ॥ ४ ॥ अघटित अपार सद्गुरुलीला । अगम्य आहे ब्रह्मादिक-देव-असुर-मानवांला । मग आम्हा
उदरार्थी मंदमतीला । न कळे यांत नवल काय ॥ ५ ॥ सर्व निद्रिस्त झाले थकलेले । स्वामिराज स्वतंत्र जागृत एकले ।
दुसरे दिवशीं सर्व उठले । टाकिलीं काष्ठें टोपलीं ॥ ६ ॥ धातूचीं अन्नपूर्णेचीं प्रासादिक । भांडीं घेऊनि सिद्ध झाले
सेवक । गाडींत बसूनि जगन्नायक । निघूनि पातले प्रज्ञापुरीं ॥ ७ ॥ अन्नपूर्णा परिपूर्णा । सदाशिव शंकराची प्राणवल्लभा
अपर्णा । आम्रवृक्षातळीं मूर्तिकरुणा । देखिली भाग्यें थोडक्यांनीं ॥ ८ ॥ पुनरपि अन्नपूर्णा जगज्जननी ।
कोठें प्रत्यक्ष न देखिली कोणीं । जी ज्ञान वैराग्य सिद्धि कृपा करूनि । भिक्षा मुमुक्षूसि देतसे ॥ ९ ॥ अन्न पुष्कळ
देते म्हणूनि अन्नपूर्णा । दत्तात्रेयस्वामींची सिद्धि जाणा । धांवूनि समर्थांचीं कार्यें नाना । करी माता प्रेमानें ॥ ११० ॥
एकशत भक्त सेवेकऱ्यांसि । गुरुपरमात्म्याचे आज्ञेसि । अन्नपूर्णेनें अर्पूनि बहुत अन्नासि । दाविला प्रसंगीं अनुभव तो
॥ ११ ॥ ऐसें अपार श्रीगुरुलीलामृत । श्रवणद्वारें प्राशन करा हो भक्तियुक्त । सकल सिद्धिदायक सदोदित । असे
निश्चित निःसंशय ॥ १२ ॥; असो अक्कलकोटचे मालोजी महीपति । निघाले जावया सोलापुराप्रति । दत्तात्रेय स्वामींसि
नमूनि विनविती । गव्हरनर साहेबांचे भेटीस जातों ॥ १३ ॥ तेव्हां दत्तात्रेय-स्वामींनीं । नृपतीच्या डावे हातांत
दिधली पिकदाणी । उजवे हातांत तरवार देऊनि । जावें म्हणूनि सांगितलें ॥ १४ ॥ श्रीमंत मालोजी नृप भोंसले ।
सोलापुरीं जाऊनि गव्हरनर साहेबांसि भेटले । संस्थानांत हत्यारें बाळगणें केलें । होतें बंद इंग्रजांनीं ॥ १५ ॥ त्या
संबंधीं साहेबांसि सुचविलें । परंतु भूपतीस तयांकडून ते वेळे । तोफांची सरबत्ती आणि मिळाले । नाहींत इतर मानपान

॥ १६ ॥ तथापि हत्यारें बाळगण्याची । आज्ञापत्रिका मिळाली इंग्रजबहादुराची । आणि कांहीं इतर कार्यांची । प्राप्ती जाहली भूपतीस ॥ १७ ॥ गव्हरनर साहेब गेल्यानंतर । अक्कलकोटासि पातले मालोजी नृपवर । बुधवार पेठेंत जाऊनि सत्वर । वंदिले ईश्वर दत्तगुरु ॥ १८ ॥ मालोजी नृपति करी विनंति । आपण तरवार दिधली होती हातीं । त्याचा अनुभव मिळाला मजप्रति । मोकळिक जाहली हत्यारांची ॥ १९ ॥ हातांत दिधली पिकदाणी । तो चमत्कार आला घडूनि । आम्हांसि याकालीं साहेबांनीं । सरबत्ती मानपाना न दिलें ॥ १२० ॥ आपण साक्षात् आहां भगवान् । एके कालींच शुभ आणि अपमान । होण्याचें पूर्वींच केलें सूचन । तैसेंचि ते अनुभविलें ॥ २१ ॥ तेव्हांपासून उत्तरोत्तर । श्रीपाद-दत्तात्रेयपदीं भक्ति दृढतर । नृपवराची जडली श्रेयस्कर । चोळाप्पावरीही प्रेम जडलें ॥ २२ ॥ समर्थांच्या शुश्रुषेप्रीत्यर्थ । चोळाप्पा काया मन वाणी झिजवित । हें जाणूनि नृपवरें प्रत्येक मासांत । चोळाप्पासि नेमणूक पांच रुपये ॥ २३ ॥ करूनि दिधली स्वामिभक्तासि । ते स्वामिराय जगत्कल्याणासि । संगें घेऊनि भक्त-सेवकांसि । पाहिजे तिकडे संचरती ॥ २४ ॥ वाटेल तेथें वसती देवराय । वाटेल त्याचे सदनीं जाती निर्भय । वाटेल त्याचें भोजन अद्वय । करिती भेदाभेदरहित ॥ २५ ॥ सर्व जातींच्या प्राणीमात्रांवरी । समान दृष्टीनें श्रीगुरु नरहरि । दया करिती प्रेमभरीं । चालतां वृक्षांसि भेटती ॥ २६ ॥ गुरुगोडी ओढित मार्गें चालावें । आपल्याशींच बोलावें हंसावें । झाडांवरून दगडांवरून पाय फिरवावे । म्हणावें काय पाहिजे तुम्हां ॥ २७ ॥ हंसताना हलावें सर्वांग । भलत्याचे मनांतील प्रश्नाचें उत्तर द्यावें साङ्ग । वेदमंत्र श्लोक दोहरे अभंग । मुखें म्हणावे बोधक ॥ २८ ॥ ब्रह्मानंदांत नित्य निमग्न असावें । तिकडे भूत प्रेत पिशाच अंगांत यावें । त्याकडे पाहतां म्हणावें । खांबासि मिठी घाल रे ॥ २९ ॥ एकदां संबंधानें खांबासि मिठी । घातली ती सुटण्याची नसे गोष्टी । सोडविण्यास पुष्कळांनीं केल्या खटपटी । तरीही

मिठी सुटेना ॥ १३० ॥ मग पिशाच्चानें आक्रोशें ओरडावे । मला फार मारितात तें न सोसवे । मी जातों पुन्हां येणार
नाहीं म्हणावें । सोडवावें दुःखांतूनि ॥ ३१ ॥ स्वामीसमर्थ म्हणतील जेधवां । पिशाच्चाचे हातासि हात लावा ।
त्याप्रमाणें करितां सुटावा । स्तंभाचा संबंध मिठीरूप ॥ ३२ ॥ मंत्र तंत्र यंत्र धूप अंगारे दोरे । अन्नवस्त्र फलादिक सर्व
उतारे । न लगती पंचाक्षरी भूत काढणारे । द्रव्य घेणारे फसवूनि ॥ ३३ ॥ अंगांत आणणें बोलविणें । हें कांहींच
न लगे करणें । केवळ दत्तात्रेयस्वामिदर्शनें । पिशाच्चादि पावती सुगतीस ॥ ३४ ॥ केवल समर्थांच्या दर्शनेंकरून ।
महारोग संबंध विघ्नें दारुण । लयासि पावती द्रव्य-औषधाविण । हें अनुभविलें असंख्य जनांनीं ॥ ३५ ॥ दत्तात्रेयस्वामींचें सहज दर्शन । केवल सत्य विजय वचन प्रमाण । तेणेंचि होतीं कार्यें सिद्ध संपूर्ण । संशय-कारण नलगेचि
॥ ३६ ॥ नेत्ररोगासि दुग्ध मेंढी बकरीचें । नेत्रांत घालितां निर्मूळ होई नेत्ररोगाचें । नारू बरे व्हावयासि म्हशीचें ।
उष्ण शेण बांधावें तयावरी ॥ ३७ ॥ दुधांत शेंदूर खलूनि केलिया मर्दन । संधिवायूचें होत निरसन । प्रसूति होण्यास
विलंब अडचण । प्राप्त झाली असतांना ॥ ३८ ॥ गाईचें प्यालेलें उच्छिष्ट उदक । किंवा निंबाचा गर्भ उगाळूनि कर्ष
एक । प्राशन केलिया कार्य निःशंक । होई प्रसूति समर्थनामें ॥ ३९ ॥ निंब-वृक्षाच्या पत्राच्या रसांत । सैंधव
घालूनि प्राशितां खचित । पोटशूल रोग होती निवृत्त । समर्थवचन-औषधीनें ॥ १४० ॥ राताळु लावितां उगाळून
घासून । जखमादिकांचें होतसे निरसन । उष्ण दुग्ध शर्करायुक्त चिनी पात्रांतून । प्राशितां खोकले जाती ॥ ४१ ॥
हरबरे फेंकितां देवतांवरी । पर्जन्य पडतसे पुष्कळ भारी । निर्जन घोर वनांत अन्नपूर्णा नारी । येऊनि सिद्धान्नें पुरवितसे
॥ ४२ ॥ हें समर्थांचें सामर्थ्यातिशय । वचनेंचि होई सहज कार्य । मृत देहासि संजीवन स्वामिराय । करिती
सहज स्वलीलें ॥ ४३ ॥; एके दिवशीं स्वच्छंदें फिरत । श्रीमद्दत्तात्रेयस्वामी अवधूत । मालोजी रायाच्या राजमंदिरांत ।

जाऊनि विश्रांतीस बैसले ॥ ४४ ॥ नृपति सामोरे येऊन । झोंपाळ्यावरी बैसविले पुरुषोत्तम जाण । उभयतांचें चाललें
संभाषण । इकडे देवघरांत वर्तलें तें परिसा ॥ ४५ ॥ देवघरांत अप्पा सलबत्या ब्राह्मण । उगाळित होता
सुगंध चंदन । तेव्हां एक मूषक येऊन । निराजनांतील फूलवाती भक्षूं लागला ॥ ४६ ॥ तें अप्पा सलबत्यानें देखिलें ।
देवगृहांतील पदार्थ सगळे । मूषक वारंवार भक्षूं लागले । त्रासविलें उंदिरांनीं ॥ ४७ ॥ उंदरांचा अप्पास आला
राग । चंदनाचें खोड मारिलें त्यानें सवेग । त्यायोगें एका उंदिरें केला प्राणत्याग । तें लपूनि देखती अन्य मूषक
॥ ४८ ॥ मूषक एकत्र बिळांत जमले । म्हणती देवा आम्हांसि दुःख झालें । आपण मूषकयोनींत कां घातलें ।
जन्मासि आम्हांकारणें ॥ ४९ ॥ आमचा असे हा चोर-स्वभाव । आम्ही लोकांसि देतों फार उपद्रव । त्यामुळें
आमचा घेती जीव । यदर्थ उपाय सुचेना ॥ १५० ॥ आम्हीं आतां जावें तरी कोठें । लोकगृहींचे पदार्थ लहान
मोठे । अल्प स्वल्प भक्षूनि आम्ही चोर गट्टे । दिवस काढितों उपद्रव-स्वभावें ॥ ५१ ॥ खातों नाशितों फोडितों । या
जन्मस्वभावें आम्ही दुःख भोगितों । अन्यायावांचूनि उपद्रव देतों । त्रासवितों सर्व लोकांसि ॥ ५२ ॥ आम्ही मूषक
चोर दुष्ट ओढाळ । आमचा तुज ईश्वरावीण सांभाळ । कोण करी नारायणा दयाळ । तूंचि चिरकाळ संरक्षिता ॥ ५३ ॥
ऐशी मूषकांची पाहूनि गडबड । अप्पा सलबत्यानें न ठेवितां चाड । मृत मूषकाचें शेपूट द्वाड । धरूनि फेंकावयास
जात असतां ॥ ५४ ॥ दत्तात्रेयस्वामींनीं तें विलोकिलें । अप्पासि तेव्हां आज्ञापिलें । तें मृत मूषकाचें जीव गेलेलें ।
द्यावें शव आम्हांसि आतां ॥ ५५ ॥ मग अप्पानें दीनबंधूचे हातांत । मृत मूषकासि दिधलें त्वरित । कामासि गेला
देवघरांत । तों समर्थ मूषक-शवासि ॥ ५६ ॥ झोंपाळ्याच्या कड्यांतून । वारंवार त्यास घालून काढून । मग
आपल्या हातीं घेऊन । पुसती काय तुज झालें ॥ ५७ ॥ श्रीमंत मालोजी भोंसले नृपति । इतर मंडळी पाहूनि

हांसती । तेव्हां समर्थ मूषकास आज्ञापिती । जावें सदनीं जातींत ॥ ५८ ॥ ऐसें म्हणतांच तो मृत मूषक । सजीव होऊनि तात्कालिक । उड्डाण करूनि गेला हें कौतुक । पाहूनि मानिती आश्चर्य नृपादिक ॥ ५९ ॥ श्रीमद्दतात्रेयस्वामी अवधूत । शके सत्राशें एकूणऐशींत । आल्यानंतर अक्कलकोटांत । विशेष प्रसिद्धि पुढें झाली ॥ १६० ॥ शके सत्राशें पंचायशींत । मार्गशीर्ष मासीं शुक्ल पक्षांत । षष्ठीस अक्कलकोटीं शरणागत । होऊनि मी वामन गेलों ॥ ६१ ॥ समर्थांची ऐकिलेली कीर्ति । त्यांत स्वप्नीं येऊनि श्रीदत्तमूर्ति । दृष्टांत देती कीं मी प्रत्यक्ष नरवेषें यति । अक्कलकोटीं प्रकटलों गुरुदासा ॥ ६२ ॥ त्वां तेथें जाऊनि दर्शनादि करावें । तेणें शंकेचें समाधान होईल अघवें । मग स्वस्थ परमानंदांत वसावें । वेदविहित मार्गें सर्वदा ॥ ६३ ॥ श्रीगुरु आणि पितराज्ञा घेऊन । वामोरीहून नगरास पायमार्गें येऊन । तेथून गारदौंडासि पोहोंचून । लोहमार्गें आगगाडींत बसूनियां ॥ ६४ ॥ कुरुडूची वाडी बारशी-स्टेशनांत । उतरून पादचारी गेलों सोलापुरांत । तेथून पायमार्गें अक्कलकोटांत । जाऊनि शोधिलें समर्थांसि ॥ ६५ ॥ ते अवतारिक पुरुष स्वामी । येथें आहेत किंवा दुसरे ग्रामीं । ऐसें पुसिलें चोळाप्पा द्विजासि प्रेमें मीं । त्यांचे सदनीं जाऊनि ॥ ६६ ॥ केला सद्भावें नमस्कार । ते म्हणती येथून परवां स्वामी दिगंबर । चोळाप्पासहित नागणसुर । ग्रामासि गेले तिकडे जावें ॥ ६७ ॥ ऐकूनि गेलों नागणसुरास । तों तेथून श्रीगुरु गेले पुढचे ग्रामास । मग मीं कोतवालाचे हद्दरास । जाऊनि मुक्काम केला तेथें ॥ ६८ ॥ नदीतीरीं स्नान करून । तेथेंच शिजवूनि स्वल्प अन्न । एका साधूसहित करूनि भोजन । दुकानांत निजलों एकाच्या ॥ ६९ ॥ दुसरे दिवशीं उठून गुरुवारीं । ख्वाजा-पिरास वंदूनि सत्वरीं । गेलों सवेगें पुढच्या नगरीं । तेथें दत्तात्रेयाचा शोध केला ॥ १७० ॥ तों लोक म्हणती ते स्वामी चालले । त्या शेतांत आहेत उभे राहिले । मीं शीघ्रवेगें जाऊनि धरिले । चरण दृढ प्रभूंचे ॥ ७१ ॥ प्रसन्नवदनें स्वामिराय । म्हणती

कळला सर्व अभिप्राय । आम्हींच स्वप्नीं दाविला प्रत्यय । स्वस्थ आनंदमय असावें ॥ ७२ ॥ समागमें चार पांच सेवक ।
दर्शनासि आलेले थोडे लोक । मग संगमीं पयोनदींत याम एक । उतरले जगद्गुरु त्या कालीं ॥ ७३ ॥ जाऊनि बैसले
उदकांतरीं । तें पाहूनि मीही समीप जाऊनि सत्वरीं । सुगंध द्रव्य प्रभु-अंगासि प्रेमभरीं । लावूनि स्नान घातलें ॥ ७४ ॥
अंग पुसूनि दुसरी कौपीन । आणून दिधली चोळाप्पाकडून । भाळीं लाविलें सुगंध चंदन । काषाय वस्त्र अंगीं पांघरविलें
॥ ७५ ॥ यथा ऋतुकाल वनपुष्पेंकरून । यथाशक्ति केलें पूजन । मुखांत स्वल्प ग्रास घालून । साष्टांग नमिले सुरवर
॥ ७६ ॥ मग स्वामीसमर्थ हास्यवदन करून । महामंत्र उपदेशिती उच्च स्वरें मजलागून । मनांत बहुत दिवसांचें प्रमाण ।
होतें तैसेंच प्राप्त झालें ॥ ७७ ॥ मंत्राचे न्यास ध्यानादिक । दत्तात्रेय-गुरूंनीं विधिपूर्वक । सांगूनि अवधूतगीता तारक ।
टाकिली माझे अंगावरी ॥ ७८ ॥ माझें सर्व सामान गाठोडें । मीं ठेविलें अवधूतांचे पुढें । पाणी भरून माझें
सामान भांडें । दिधलें मजला नदींत ॥ ७९ ॥ म्हणती ब्रह्मनिष्ठ होशील बाळा । भिणें कधींच नाहीं कलिकाळा ।
आमची सेवा करूनि सांभाळा । वैदिकमर्यादा सर्वत्र ॥ १८० ॥ तेव्हां कोणी गुरुसि पुसिली ज्ञाती । तयास श्रीगुरुदत्त
वदती । मूळपुरुष दत्तनगर वटवृक्ष वसती । पुन्हां तुम्हीं हें विचारूं नये ॥ ८१ ॥ आम्ही यजुर्वेदी ब्राह्मण ।
काश्यप गोत्री राशी मीन । आमचें नाम आहे ‘नृसिंहभान’ । मग वेदमंत्र म्हणून दाखविती ॥ ८२ ॥ लोक म्हणती
हो देवराया । आपण अवतरलां जग ताराया ।; असो हंचनाळ ग्रामीं गुरुवर्या- । सहित उतरलों द्विजगृहीं ॥ ८३ ॥
तेथून आज्ञानुसार गाणगापुरीं । जाऊनि गुरुचरित्र-सप्ताह केला तदा नरहरि । पोथी देऊनि सांगती प्रज्ञापुरीं । आम्हीच
निःसंशय आहोंत ॥ ८४ ॥ दत्तजयंती करून आलों अक्कलकोटीं । वंदिले परमात्मा जगजेठी । प्रसन्नत्वें प्रसादादि
देऊनि उठाउठी । आज्ञा दिधली गमनार्थ ॥ ८५ ॥ आनंदें पातलों स्वनगरीं । वडिलांस वंदूनि हकीकत निवेदिली सारी ।

अद्भुत श्रीगुरुलीलावतारी । पावन केलें मजलागीं ॥ ८६ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदवेदांगशास्त्रार्थमथित । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । अष्टचत्वारिंशाध्याय गोड हा ॥ १८७ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे अष्टचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ॥ ४८ ॥ श्रीगुरुदेवदत्त-स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय एकूणपन्नासावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्त-दिगंबराय नमः ॥ ॥ शिष्य विनवी हो गुरुमूर्ति । धनानें संपूर्ण कार्यें होतीं । ऐसें असूनि मोक्षार्थ अन्य रीतीं । ज्ञानादिक उपायाची काय गरज ॥ १ ॥ गुरु म्हणती सुवर्णादि नाशिवंत धनेंकरून । जीवासि मोक्षरूप अमृतभाव प्राप्ति नसून । उलटें या सुवर्णादि धनेंकरून । मरण पावती जीव हो ॥ २ ॥ आतां अन्वय-व्यतिरेकेंकरून । धनामाजीं राहे मृत्यूचें कारण । परिसावें करितों निरूपण । जेवढे धनवान् पुरुष असती ॥ ३ ॥ ते धनिक नृपति स्तेनांकडून । तथा इतर दुष्ट अथवा आप्त सोयऱ्याहस्तें जाण । अनेक प्रकारचीं दुःखें भोगून । पावती मरण धनिक ते ॥ ४ ॥ ऐसा कोणीही धनवान् नाहीं । कीं चिंताविरहित होऊनि राही । स्वप्नावस्थेंत देखील तो वाही । चिंता भय राजादिकांचें ॥ ५ ॥ मग जागृत अवस्थेंत । धनसंरक्षणार्थ चिंता-भयरहित । कोणत्याही प्रकारें क्षण न राहत । यांत नवल काय तें ॥ ६ ॥ आणि निर्धन गरीब बिचारे । सशक्त असून रोगादिक त्यांसि विशेष प्रकारें । कधीं उपद्रव न करिती म्हणून राही रे । जठराग्नि प्रदीप्त तयांचा ॥ ७ ॥ यावरूनि ऐसें जाणिलें जातें । कीं दरिद्र्यासि दैव अनुकूल होतें । आणि धनिकावरी प्रतिकूलता दावितें । दैव तथा अग्न्यादि दैवतें ॥ ८ ॥ विशेषेंकरून धनवान् रोगी । असल्यानें वैद्य ज्योतिषी पंचाक्षरी योगी । यांचे द्वारें रोगनाशक व्हावया जोगीं । औषध साधनें करिती धनें ॥ ९ ॥ कापट्यादि अनुचित कर्में करून । बहुत धन मिळविलें असून । तृप्ति नसे जयां ते नर जाण । होती बहुधा अल्पायुषी ॥ १० ॥ आपल्या पुत्रादि बांधवांसंगें । धनिक द्वेष राखिती धनानुरागें । श्वानासारखे लोभ-

क्रोधवेगें । ओरडती दुसऱ्यांचे अंगावरी ॥ ११ ॥ हें कार्य करावें किंवा न करावें । पुष्कळ धन कशानें घरांत यावें । येणें चिंताग्रस्त सर्वदा रहावें । ऐशांत कशानें व्हावें सुख प्राप्त ॥ १२ ॥ महात्मा योगी साधु संत । निर्धनावरी कृपा करिती स्नेहयुक्त । तैसें मदोन्मत्त धनिकांवरी नसत । विरक्त पुरुषांचें लक्ष कदा ॥ १३ ॥ धनमदें निःशंक पापकर्में करिती । देव-धर्म-राजासि न भीती । देवतादिकांसि धिक्कारिती । अवज्ञा करिती गुरूची सदा ॥ १४ ॥ वेदवेत्ते पंडित वैदिक । धर्मशास्त्री वैद्य ज्योतिषी गणिक । पुरोहित प्रतिष्ठित याज्ञिक । त्यांची अवज्ञा हेळसांड करिती धनमदें ॥ १५ ॥ आपल्या पक्षाचे संभावित लोक । अथवा परपक्षाचे सज्जन अनेक । त्यांसि उपद्रव देती धनिक । म्हणून बहु दुःखासि पावती ॥ १६ ॥ निर्धन आणि दरिद्री सदाचरणी । समर्थ नसती पीडावया जनीं । न दुखविती कोणासि निर्धनी । भिऊनि नम्रत्वें वर्तती ॥ १७ ॥ म्हणून धनिकांपेक्षां अधिक । दरिद्र्याचा परामर्ष घेती लोक । यथाशक्ति देऊनि अन्नवस्त्रादिक । कार्यें करूनि घेती न्यायें ॥ १८ ॥ धनासक्तीनें चित्त चलायमान । होती व्यग्र पुरुष धनवान् । त्यांसि मोक्षरूप अमृत किंवा आत्मज्ञान । प्राप्त होण्याची आशा नसे ॥ १९ ॥ ब्रह्मभावप्राप्तिरूप मोक्ष । तयासि 'अमृत' म्हणती वेदज्ञानी दक्ष । अहं-मम देहाभिमान घातकपक्ष । त्या अहंममतेची निवृत्ति झाली पाहिजे ॥ २० ॥ देहादिक अहंममता नष्ट झाल्याविण । तें मोक्षरूप अमृत प्राप्त नोहे जाण । म्हणूनि अहंममता-निरसन । हें मोक्षामृतप्राप्तीचें कारण आहे ॥ २१ ॥ अहंममाभिमान-निवृत्तीवीण । अज्ञानाची निवृत्ति होत नाहीं जाण । म्हणून अहंममाभिमान निवृत्तीचें कारण । असे अज्ञाननिवृत्ति ॥ २२ ॥ आणि त्या अज्ञानाची निवृत्ति । आत्मज्ञानावांचून होत नसे ती । यास्तव आत्मज्ञानचि एक निश्चितीं । अज्ञाननिवृत्तीचें कारण आहे ॥ २३ ॥ धनासक्तीनें असे विक्षिप्त चित्त । त्या धनिकांसि आत्मज्ञान उत्पन्नचि नसे होत । आणि त्या आत्मज्ञान-अभावें

कदाचित् । अज्ञान निवृत्त होत नसे ॥ २४ ॥ तें अज्ञान असतां अज्ञानाचें कार्य । सूक्ष्म-शरीर निवृत्त न होय । तें सूक्ष्म-शरीर असतां तदाश्रित पुण्य- । पापकर्मे न लय पावतीं ॥ २५ ॥ तीं पुण्यपापकर्मे असतां स्थित । स्थूल शरीर अवश्य होई प्राप्त । तें स्थूल शरीर असल्यानें जीव भोगित । पूर्वकर्मानुसार सुखदुःखें ॥ २६ ॥ पूर्वसंस्कारवशें हा जीव । पुन्हां पुण्यपाप-कर्मे करी सदैव । तें प्रारब्धकर्म भोगूनि स्वयमेव । पुन्हा मरणासि प्राप्त होतसे ॥ २७ ॥ मरणानंतर तो जीव अज्ञानी । पुन्हां जन्मासि येई स्वकर्मांनीं । ऐसे आत्मज्ञानरहित निरंतर ते धनी । घटियंत्रासारखे संसारांत भ्रमती ॥ २८ ॥ जीवासि सदा धनादिक आशा । तैशी मोक्षामृत-प्राप्तीची नसे परिसा । परी सुवर्णादि धनें मोक्ष सहसा । प्राप्त नाहीं ऐसा अर्थ सिद्ध झाला ॥ २९ ॥ या सुवर्णादिक धनेंकरून । मोक्षप्राप्तीची आशा नसून । उलटें प्राप्त होई जन्ममरण । सर्व दुःखासि कारण धन आहे ॥ ३० ॥ विषयासक्त जनांची दृष्टि घेऊन । विषयजन्य सुख धनासि मानावें कारण । तरी श्वानादि पशु धनरहित असून । स्त्रीसंभोगें विषय-सुख भोगिती ॥ ३१ ॥ यास्तव स्त्रीसंभोग विषय-सुखांत । धनासि कारणता नाहीं संभवत । आणि निर्धन भ्रमर ते होती सुखासि प्राप्त । नाना-पुष्पगंधासि घेऊनि ॥ ३२ ॥ म्हणूनि गंधरूप विषयजन्य सुखांतही । धनासि कारणता संभवत नाहीं । धनहीन जे शुक कोकिलादिक पक्षी पाहीं । आम्रादि फलांचे रस घेऊनि सुखी होती ॥ ३३ ॥ म्हणूनि रस-विषयजन्य सुखांत । धनासि कारणता नाहीं संभवत ।; आतां सांगूं शब्द-विषयांत । धनाचें कारण नसे तें ॥ ३४ ॥ शिव विष्णु देवी आदि देवतामंदिरीं । जे गौ वृषभ अश्व तथा निर्धन नरनारी । वसती ते गीत वाद्यादि शब्दांस नाना प्रकारीं । श्रवण करूनि सुखी होती ॥ ३५ ॥ म्हणूनि शब्दजन्य विषयांतही । धनाचें कारण मुळींच नाहीं ।; आणि वारांगनादि सुंदर स्त्रियांचें रूप देखूनिही । दरिद्री पावती आनंदासि ॥ ३६ ॥ या कारणानें रूप-विषयजन्य

सुखांत । धनासि कारणता नाहीं संभवत ।; निर्धन मक्षिका राजस्त्रीच्या अंगावरी होऊनि स्थित । स्पर्शसुखासि प्राप्त होती ॥ ३७ ॥ यास्तव स्पर्श-विषयजन्य सुखांत । धनासि कारणत्व नाहीं येत । तथापि धनानें कोणा मनुष्यासि यत्किंचित् । सुख प्राप्त असेल जरी ॥ ३८ ॥ तरी व्यक्तीचीं संपूर्ण कार्यें ज्या वस्तूपासून । होतीं त्या वस्तूस येई जनकपण । त्या जनकवस्तूसि शास्त्र म्हणे जाण । 'कारण' ऐशा प्रकारें ॥ ३९ ॥ आणि जी वस्तु कोणे कार्याची जनक होय । तथा कोण्या कार्याची जनक न होय । त्या वस्तूसि शास्त्रें आणि विद्वद्वर्य । न म्हणती 'कारण' ऐसें ॥ ४० ॥ जैसें मृत्तिका दंड चक्र कुलाल हीं चारी । नियमें सर्व घटाचे जनक असती निर्धारीं । यास्तव मृत्तिकादिक चत्वारी । घटाचें कारण असती ॥ ४१ ॥ त्या कुलालसदनीं रासभ स्थित । तें घटाचें जनक यत्किंचित् होत । परी संपूर्णपणें घटाचें जनक नसत । म्हणून तें घट कारण नसून अन्यथा सिद्ध आहे ॥ ४२ ॥ तैसें हें धन यत्किंचित् सुखाचें जनक असे । तथापि सर्व विषयसुखाचें जनक नसे । यास्तव हें धन रासभासारिखें दिसे । अन्यथा सिद्ध असल्यानें ॥ ४३ ॥ धनिक यत्किंचित् विषयसुखासि प्राप्त होतो । तैसा निर्धनही अल्प विषयसुखासि भोगितो । म्हणून विषयसुखांत नसतो । कारणपणा धनासि ॥ ४४ ॥ तैसें स्वर्गादिक सुखासि हेतु जे धर्म । त्या धर्मांत धनासि कारणता न संभवे नियम । कां तरी करूनि अतिथि-सेवनादि कर्म । मुद्गलादि निर्धन ब्राह्मण स्वर्गसुख भोगिती ॥ ४५ ॥ यास्तव धनवान् स्वर्गासि जाती । या प्रकारचे नियम नसती । उलटें धनमदें धनिक प्राप्त होती । सर्वदा नरकवासासि ॥ ४६ ॥ स्वर्गप्राप्तीचें साधन अश्वमेधादिक यज्ञ । ते यज्ञ सिद्ध न होती धनाविण । तरी धनचि आहे स्वर्गप्राप्तीचें साधन । या शंकेचें समाधान परिसावें ॥ ४७ ॥ अश्वमेधादिक यज्ञावांचून जाणे । दुसरीं स्वर्गप्राप्तीचीं जर नसतीं साधनें । तरी स्वर्गप्राप्तीचीं कारणत्व सहजपणें । धनासि येतें शिष्या रे ॥ ४८ ॥ परंतु स्वर्गप्राप्त्यर्थ साधनें शास्त्रीं

अनेक । जीं जप तप व्रत नियम अनुष्ठानादिक । अनेक उपाय यत्न देख । कथन केलीं शास्त्रादिकीं ॥ ४९ ॥ त्या जपादि साधनानें जीवातें । स्वर्गप्राप्ती अवश्य होऊं शकते । यास्तव धनासि कारणता न येते । स्वर्गादिकांचे प्राप्तीची ॥ ५० ॥ जे वादी धनासि मानिती मोक्षकारण । ते साक्षात् धनचि मानित नसून । यज्ञादिक कर्मद्वारें तें धन । मोक्षासि कारण मानिती ॥ ५१ ॥ त्या यज्ञादि कर्मांत देखील । मोक्षकारणता संभवत नसेल । मग धनासि मोक्षता येईल । हें बोलणेंचि फोल सर्वथा ॥ ५२ ॥ आणि स्वर्गप्राप्त्यर्थ यज्ञादि कर्मासि कारणता । तैशीच आहे जपतपादि अनुष्ठान व्रता । यावरूनि ऐसा अर्थ सिद्ध झाला तत्त्वतां । धनानें यद्यपि यज्ञादि होतात ॥ ५३ ॥ तथापि धनानें कोणत्याही प्रकारें । तैसेंच कर्मानें पुत्र-प्रजेनें बा रे । मोक्षप्राप्ति नाहीं ऐसें खरें । श्रुति प्रतिपादित असे ॥ ५४ ॥ अनेक कर्मोपासनेंकरून । तथा पुत्रादि प्रजेकडून । आणि सुवर्णादि धनापासून । मोक्ष प्राप्त होत नाहीं ॥ ५५ ॥ एक सर्वसंगपरित्यागेंकरून । मोक्षरूप अमृत प्राप्त होतें जाण । ते सर्व ह्या गुरुलीलामृत ग्रंथांत वर्णन । यथामति केलें असे ॥ ५६ ॥; आतां 'आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति'। ऐशी बृहदारण्य श्रुति । तेंही संक्षेपें यथामति । निरूपण परिसावें ॥ ५७ ॥ आपल्या सुखाचें साधन । पति जाया पुत्र सुवर्णादिक धन । गवादि पशु आणि पक्ष्यादि संपूर्ण । आपल्या सुखार्थ प्रिय होती ॥ ५८ ॥ ब्राह्मणत्व क्षत्रियत्वादि जाती । भू आदिक चतुर्दश लोक जे असती । ऋग्वेद यजुर्वेद अर्थवणादि वेद श्रुति । स्थावर जंगम सकल प्राणिमात्र ॥ ५९ ॥ जगतांतील पदार्थ जेवढे । जीवांच्या प्रीतीचे असती तेवढे । पुत्रादि पदार्थांच्या सुखार्थ न आवडे । केवळ स्वसुखार्थ परस्पर प्रिय होती ॥ ६० ॥ आपल्यासि अनुकूल जे पदार्थ । त्यांवरीच जीवांची प्रीति राहे सतत । आपल्यासि प्रतिकूल पदार्थांवरी प्रीत । कोणीही न करिती जीव ते ॥ ६१ ॥ अनुकूल पुत्रादिक पदार्थांवरी । आपल्या सुखाकरितां सर्व जीव प्रीति करिती भारी । त्या पुत्रादिकांच्या प्रीतीस्तव न करिती खरोखरी ।

प्रतिकूल परस्पर त्यागिती ॥ ६२ ॥ जायेच्या सुखार्थ पति प्रिय । पतीच्या सुखार्थ जाया प्रिय होय । परस्पर अनुकूल प्रतिकूलतेचें तात्पर्य । आपल्या सुखाकरितां सर्व प्रिय होती ॥ ६३ ॥ म्हणूनियां सर्व जीवासि स्वाभाविक । आपला आत्मा प्रियतम असे त्रैकालिक । जेवढे जगत् पुत्र जायादिक । परस्पर आपापल्या सुखार्थ प्रिय होती ॥ ६४ ॥ ते पति जायादिक अनात्म पदार्थ । आपल्या संयोगें अनुकूलकालीं प्रिय होत । आणि वियोगें प्रतिकूल-ज्ञानकालांत । होती परम दुःखरूप ॥ ६५ ॥ पति-पुत्र-जायादि जेवढें जगत् तें यद्यपि । प्रतिकूल असले जीवांचें सुख-हेतु नसे कदापि । तथापि अनुकूल जगत् जीवांचें सुख-हेतूरूपी । आत्म्याचा संबंध घेऊनि ॥ ६६ ॥ हें जगत् आत्मसंबंधें प्रियरूप नसे । परी स्वाभाविक प्रियरूप असे । या शंकेचें समाधान करितसें । तें श्रोतीं आदरें परिसावें ॥ ६७ ॥ एक आनंदस्वरूप आत्म्यावांचून । पति जाया पुत्रादिक अनात्म पदार्थ संपूर्ण । ते सर्व पदार्थ स्वभावेंकरून । प्रिय किंवा अप्रियरूप नाहींत ॥ ६८ ॥ कां तरी ते पदार्थ आमच्या सुखाचें साधन । या प्रकारें अनुकूलता-ज्ञान । ज्या जीवासि ज्या पदार्थीं होतें जाण । त्या जीवासि ते पदार्थ प्रिय होती ॥ ६९ ॥ आणि हे पदार्थ आमच्या दुःखाचें साधन । या प्रकारें प्रतिकूलता-ज्ञान । ज्या जीवासि ज्या पदार्थास्तव होतें जाण । त्या जीवासि ते पदार्थ अप्रिय होती ॥ ७० ॥ तात्पर्य अनात्म-पदार्थ प्रिय अप्रिय नसून । प्रिय अप्रिय जीवास होण्याचें कारण । अनुकूलता तथा प्रतिकूलता-ज्ञान । हेंचि कारण मुख्य आहे ॥ ७१ ॥ जैसा वायु स्वाभाविक शीतोष्ण नाहीं । परंतु अग्नीसंबंधें उष्ण प्रतीत होई । आणि जलसंबंधें शीतल प्रतीतीस येई । तैसे हे अनात्म पदार्थ स्वाभाविक प्रियाप्रिय नसती ॥ ७२ ॥ तथापि अनुकूलज्ञानें ते प्रिय वाटती । प्रतिकूलज्ञानें नकोसे होती । किंवा पदार्थांची स्वभाव-निवृत्ति । कोणत्याही कालीं होत नसे ॥ ७३ ॥ अग्नीचा उष्ण स्वभाव जैसा । तो निवृत्त होत नाहीं सहसा । पति जायादिक अनात्म पदार्थीं तैसा । प्रियपणा स्वाभाविक

नाहींच ॥ ७४ ॥ त्या अनात्म-पदार्थीं प्रियता असती । तर त्या पदार्थांची सदा प्रिय व्हावी प्रतीति । परी अनात्मप्रियता प्रतीति । सर्वदा होत नाहींच ॥ ७५ ॥ कां तरी आपल्या संयोगस्थितिकालांत । ते पति-जायादिक अनात्म पदार्थ । या जीवासि करिती सुख प्राप्त । अनुकूलता-ज्ञानकालीं ॥ ७६ ॥ ते पति-जायादिक अनात्म पदार्थ । आपल्या वियोगकालांत । तथा प्रतिकूलता-ज्ञानकालांत । जीवासि परम दुःख करिती ॥ ७७ ॥ म्हणून आनंदस्वरूप आत्म्याहून भिन्न । पति जायादिक अनात्म पदार्थ संपूर्ण । त्या अनात्म-पदार्थ-स्वभावेंकरून । प्रियरूपता नाहींच ॥ ७८ ॥ कां तरी ज्या कालांत या जीवातें । पति जायादिक पदार्थांविषयीं इच्छा होते । आणि अनुकूलता-ज्ञान कळतें । तेव्हां जीवासि ते पदार्थ प्रिय लागती ॥ ७९ ॥ यावरूनि ऐसें झालें सिद्ध । जो आनंदस्वरूप आत्मा शुद्ध । तो अप्रिय पदार्थांसीही करितो प्रिय बहुविध । आपल्या सत्तासंबंधेंकरूनि ॥ ८० ॥ तो आनंदस्वरूप आत्मा परम । सर्व जीवांचा आहे प्रियतम । येथें 'प्रिय' शब्दाहून अधिकांचें नाम । 'प्रियतर' ऐसें आहे तें ॥ ८१ ॥ आणि प्रियतराहून जें अधिक प्रिय । तयाचें नाम 'प्रियतम' आहे अक्षय । ऐसा प्रियतम आत्माचि अद्वितीय । आत्मानंदाचा लेश मात्र घेऊनि ॥ ८२ ॥ ब्रह्मादिक लोकही आनंदासि पावती । सर्व आनंदापेक्षां अत्याधिकस्थिति । या कारणानें आत्मानंद उत्कृष्ट वेदादि म्हणती । तोचि अनुभवती महात्मादिक ॥ ८३ ॥ स्वर्गलोकादि घेऊन । ब्रह्मलोकपर्यंत जेवढे आनंद विषयजन्य जाण । त्या सर्व आनंदापेक्षां अधिक महान् । द्वैतरहित 'ब्रह्मानंद' एक आहे ॥ ८४ ॥ तो ब्रह्मानंद या जीवात्म्याहून भिन्न नाहीं । कां तरी सर्व जीवांचा असे आत्मारूपही । म्हणून आत्मास्वरूप आनंद सर्वदाही । जीवाचा 'परमपुरुषार्थरूप' आहे ॥ ८५ ॥; ऐसा सर्व जीवांचा परमात्मा परमपुरुष । ध्याती सर्वदा परब्रह्म निर्विशेष । तो दत्तात्रेयस्वामी धरूनि नरवेष । प्रज्ञापुरीं वसतसे ॥ ८६ ॥ अक्कलकोटच्या भाग्योदयाला । पार नसे जेथें प्रकटला । जगदुद्धार करावयाला । दत्तात्रेय-

स्वामिराज ॥ ८७ ॥ श्रीकृष्णलीला गोकुलांत । 'अहोभाग्य' पावलें उदयाप्रत । पूर्णब्रह्म सनातन मित्र जोडिला सतत । नंदगोपव्रजादिकांनीं ॥ ८८ ॥ तैसे परमानंद पूर्णब्रह्म सनातन । दत्तात्रेयस्वामी जगज्जीवन । महीवरी संचार करित येऊन । वसले प्रज्ञापुरांत ॥ ८९ ॥ अक्कलकोटच्या सकल जनांचें । अहोभाग्य उदयासि पावलें साचें । सख्यत्वा पावलें परमात्म्याचे । श्रीमंत मालोजी महीपति ॥ ९० ॥ श्रीशहाजी-महाराज भूपति । कैलासवासी झाल्यावरती । त्यांचे चिरंजीव मालोजी नृपति । राज्यपदारूढ जाहले ॥ ९१ ॥ सोलापुरीं स्वामिराज असतां । अक्कलकोटीं यावयाकरितां । चिंतोपंत टोळांनीं प्रार्थितां । म्हणाले 'उष्णता' सरल्यावरी येऊं ॥ ९२ ॥ 'उष्णता' शब्दें समर्थांचा आशय । शहाजी नृप कैलासीं पावतील सायुज्य । सकल प्रजादिक दुःख शोकमय । असतां येणें प्रशस्त नव्हे ॥ ९३ ॥ राज्यपदारूढ होऊनि नृपतनय । प्रजाजनादिक होतील आनंदमय । मग अक्कलकोटास जाऊं पडेल पर्जन्य । हा अभिप्राय समर्थांचा ॥ ९४ ॥ ईश्वरकृपें मालोजी नृपवर । राज्यपदारूढ झाले प्राप्त सर्वाधिकार । मग आश्विन मासांत दत्तदिगंबर । अक्कलकोटास विराजले ॥ ९५ ॥ तो प्रवेशकथाभाग साद्यंत । वर्णिला असे या गुरुलीलामृत ग्रंथांत । उष्णता-शब्दार्थें समर्थांचा संकेत । स्पष्ट कळावयासि कथियेला ॥ ९६ ॥ असो स्वामिराज-वरप्रसादेंकरून । मालोजीरावास सुपुत्रसंतान । प्राप्त झालें अमोलिक रत्न । 'शहाजी' नाम राजपुत्राचें ॥ ९७ ॥ 'बाबासाहेब राजे' ऐसें प्रजाजन । म्हणती प्रेमभावेंकरून । जैसें लोकांत पुत्र कन्या संतान । पित्यासि बाबा म्हणती तसें ॥ ९८ ॥ यथा ईश्वर जगज्जनक । तया राजपुत्र शोभे सुखदायक । मालोजी भूपतीचा योग्य लौकिक । सद्धर्म न्यायादिक सर्व जाणती ॥ ९९ ॥ राजपुत्र बाल्यावस्थेपासून । शांत गंभीर धैर्यवान् । अंगीं चातुर्य सारासार ज्ञान । शौर्यौदार्यसंपन्न शोभतसे ॥ १०० ॥ शहाजीरायाचे जननी जनक । पावल्यावरी विदेह स्वर्गलोक । होऊनि विद्याभ्यास सम्यक् । विवाह पुढें नेमिला ॥ १ ॥ तेव्हां नारायण वासुदेव

कारभारी । होते न्यायी सद्धर्म सदाचारी । देव ब्राह्मण विद्वान संत विचारी । येणारे जाणारे संस्थानांत ॥ २ ॥ त्या
सर्वांचें आदरातिथ्य सतत । करित होते ते यथोचित । त्यांनीं जाऊनि बडोदें राजधानींत । कन्या सुरत्न शोधिलें
॥ ३ ॥ श्रीमंत खंडेराव महाराज नृपवर । गायकवाड सरकार समशेर बहादुर । त्यांची कन्या हंसाबाई सुलक्षण
सुंदर । विवाहीं अर्पिली धायबरातें ॥ ४ ॥ नारायणराव राजे किल्लेदार । त्यांची बाळूबाई सुकुमार । रूपसौंदर्यगुण-
गंभीर । विवेक चतुर मतियुता ॥ ५ ॥ करूनि विवाह-निश्चय । रामकृष्ण राजोपाध्याय । बर्वे कारभारी घेऊनि
आले जय । लग्नसामुग्री सिद्ध झाली ॥ ६ ॥ बडोद्याचे वऱ्हाडी कन्यारत्न घेऊन । पातले मग सुमुहूर्तावरी सावधान ।
मंगलकारक समारंभें झालें लग्न । दक्षिणादानादिक वांटिलें ॥ ७ ॥ श्रीमंत राजपत्नी लक्ष्मीबाई । कुलीन सुशील गुणमयी ।
पतिव्रता देवधर्मादिकीं अक्षयीं । भक्ति प्रेम जडलेलें ॥ ८ ॥ या आमुच्या शहाजीरायें । श्रीमंत शिंदे-होळकरांसि
उत्तमाशयें । बाल्यावस्थेंत शौर्य-धैर्य-चातुर्यें । संतुष्ट केलें प्रज्ञापुरीं ॥ ९ ॥ तैसेंचि इंग्रज राजकीय कामदारांसंगें ।
समयोचित प्रौढ भाषण अंगें । बोलूनि संतुष्टचित्त सानुरागें । करित होते नृपवर्य ॥ ११० ॥ पुढें राज्याधिकार
झाला प्राप्त । समारंभपूर्वक स्वराज्यांत । तथापि शहाजीराजे शांतचित्त । क्षमायुक्त विराजती ॥ ११ ॥ शहाजी
महाराज बाल्यावस्थेपासूनि । बुधवार–पेठेंतील आद्यप्रिय स्थानीं । प्रत्येक गुरुवारीं प्रेमें येऊनि । दर्शन घेती दत्तात्रेयस्वामींचें
॥ १२ ॥ तैसेंचि ग्रामदेवता इतर । तयांसि जाऊनि वंदिती यथाचार । निरालस्य राजपत्नी आणि नृपवर ।
कुलपरंपरें चालती ॥ १३ ॥ सुंदर रूप सदृढ राजकाया । वस्त्रालंकर शोभती राया । तेजस्वी कांति पाहून पायां ।
पडती जन देवासम ॥ १४ ॥ रायासि असे त्रय कन्या-संतति । पुढें विलक्षण प्रारब्धगति । नृपेंद्राच्या प्रकृतीस विकृति ।
अकस्मात उद्भवली ॥ १५ ॥ पूर्वींचे सारासार विचारी । जे संस्थानचे मुख्य कारभारी । विठ्ठल टिकाजी हितकारी ।

राज्याचे आणि प्रजेचे ॥ १६ ॥ ज्यांनीं सुधारलें अक्कलकोट संस्थान । राजमंदिरें धर्मशाळा विद्याशाळा बांधवून । उभय सरकारचे इच्छेस अनुसरून । उत्तम राजकामें केलीं ॥ १७ ॥ त्यांनीं शहाजीरायासि आरोग्य । व्हावया केले उपाय योग्य । परंतु आयुष्य सरलें भोग्य । दुर्घट प्रसंग पातला ॥ १८ ॥ शालिवाहन शके अठराशें अठरावरी । प्लवंगनाम संवत्सरीं । मार्गशीर्ष वद्य त्रयोदशी गुरुवारीं । कैलासवासी जाहले ॥ १९ ॥ ते शहाजीराजे मृत्युलोक त्यागून । कैलासवासी राहिले शिवरूप होऊन । ज्यांची सत्कीर्ति सर्वदा जन । देवासमान गात असती ॥ १२० ॥ ज्यांचें एकूणतीस वर्षांचें अल्पवय । म्हणूनि सर्वांसि वियोगजन्यदुःख होय । परंतु बलवान् ईश्वरेच्छेपुढें उपाय । कधीं न चालती कोणाचेही ॥ २१ ॥ रायाचें शौर्यऔदार्यादि सद्गुण । त्या गुणसद्यशाचें अखंड स्मरण । सर्वत्रांसि रहावया कारण । प्रधानें अपूर्वस्थान करविलें ॥ २२ ॥ थडगें बागेंत हें समाधि विश्रांतिस्थान । देवालय रचविलें सुरेख शोभायमान । त्या देवालयांत शिवलिंग स्थापवून । पूजनादिक चाललें ॥ २३ ॥ तेथें चालतसे भजनपुराणादिक । दर्शनास येती सकळिक । अवलोकूनि रमणीय सुमोदक । सर्वांसि समाधान वाटतसे ॥ २४ ॥ इंग्रज सरकारचे विद्यमान । संस्थान पूर्ववत् चालावें म्हणून । दत्तकपुत्र राजपत्नीचे अंकीं घेऊन । सशास्त्र दत्तविधान करविलें ॥ २५ ॥; असो सोलापूर पत्तन नामक । तेथें कुलिन सद्गृहस्थ एक । टिकाजी नामें वसती स्थायिक । निःसीम भक्त श्रीपांडुरंगाचे ॥ २६ ॥ सद्वासनेचें उत्तम फल । तयासि पुत्र कन्या संतति विपुल । संसार-मार्गांत दक्ष कुशल । बुद्धिमान पुत्रादिक असती ॥ २७ ॥ त्यांत ज्येष्ठ पुत्र पिराजीराव । द्वितीय पुत्र विठ्ठलराव । विद्या चातुर्ययुक्त सरल स्वभाव । करिती संसार एकचित्तें ॥ २८ ॥ ते पिराजीराव एके कालांत । अक्कलकोटीं पातले प्रेमभावयुक्त । श्रीस्वामीसमर्थ गुरुदेवदत्त । तत्पाददर्शनाकारणें ॥ २९ ॥ पटवर्धनाचे गणेश-मंदिरांत । योगींद्र अवधूत होते स्थित । दर्शनासि

* * *

येऊनि लोक बहुत । सुगंध पुष्पहार कंठीं घालिती ॥ १३० ॥ वारंवार करिती नमस्कार । श्रीफलें फोडिती उजळिती कर्पूर । कीर्तन पुराण भजन गाती सुस्वर । नाचती डोलती प्रेमभरें ॥ ३१ ॥ ऐशा महदानंद-समयीं । पिराजीरावें त्या गणेश-देवालयीं । येऊनि साष्टांग दंडवत घातलें पायीं । दत्तात्रेय-स्वामीसमर्थांच्या ॥ ३२ ॥ उभे ठाकले जोडून पाणि । तों दैदीप्यमान् मौक्तिकें कर्णीं । ऐसे प्रत्यक्ष विठ्ठल चक्रपाणि- । रूप निरखूनि विस्मित जाहले ॥ ३३ ॥ पिराजीरावाचें अंतःकरण । श्रीगुरुस्वामिरायें ओळखून । यांचा वंश विठ्ठलभक्तिपरायण । आहे ऐसें जनांसि प्रभु सांगती ॥ ३४ ॥ मग स्वामिराज-चरणकमलीं । पिराजीराव दंडवत घाली । प्रार्थी आपण प्रत्यक्ष विठ्ठल-माउली । कृपा केली दीनावर ॥ ३५ ॥ यतीश्वरें स्वकंठांतील पुष्पहार । पिराजीरावाचे गळ्यांत घातला कल्याणकर । आशीर्वचन प्रसाद घेतल्यावर । दंडवत करूनि गेले ते ॥ ३६ ॥ त्या दिवसापासून । या घराण्याचें होत चाललें कल्याण । वृद्धीस पावले अनुदिन । स्वामिराजकृपेनें ॥ ३७ ॥ पिराजीचे बंधु राव-विठ्ठल । इंग्रजी राज्यांत विद्याकुशल । मामलतीचें काम करूनि सबल । पुढें भाग्यें वाढले ॥ ३८ ॥ अक्कलकोट-राजदरबारीं । श्रीमंत शहाजीरायाचे पदरीं । विठ्ठलराव झाले मुख्य कारभारी । रावबहादुरी मिळविली ॥ ३९ ॥ उभय सरकारांची राज्यपद्धति । तदन्वयें राजकीय् कार्यें करिती । प्रजाजनासि संतोषविती । मृदु प्रिय भाषणेंकरूनियां ॥ १४० ॥ दत्तात्रेयस्वामींचें आद्यप्रियस्थान । जेथें समाधीचें होतसे दर्शन । त्या स्थानीं उत्साह नैवेद्यादि करून । संरक्षून तया वाढविलें ॥ ४१ ॥ अक्कलकोट-ग्रामांत । पाण्याचें दुःख पेठेंत बहुत । तें यांनीं परिश्रम करूनि उक्त । उदकदुःख दूर केलें ॥ ४२ ॥ खासबागेंतील वापीचें । जल लोखंडी नळमार्गें स्वच्छ रीतीचें । विशाल दगडी टाकींत भरूनि त्याचे । जागोजागीं नळ दिधले ॥ ४३ ॥ तात्पर्य यांचे कारकीर्दींत । धर्मशाला विद्याशाला राजमंदिरें उज्ज्वलित । झालीं उद्यानें स्वच्छ शोभिवंत् । नूतन आणि जोर्णोद्धार

॥ ४४ ॥ त्यांत मुख्यत्वें उदकसंबंधीं दुःखरहित । होऊनि लोकांसि जल झालें प्राप्त । विठ्ठल टिकाजींनीं या संस्थानांत । कीर्ति सुख धन संपादिलें ॥ ४५ ॥ हें विठ्ठलभक्त कुलिन घराणें । गोकुळासारिखे पुत्रपौत्रादि सुखानें । श्रीमद्दत्तात्रेय-स्वामींच्या प्रसाद वरदानें । आनंदयुक्त नांदती ॥ ४६ ॥; एकेवेळीं अक्कलकोटास । श्रीस्वामीमहाराजांचे दर्शनास । वृद्ध बसाप्पा तेली शुद्ध मानस । त्रय पुत्रांसह आला होता ॥ ४७ ॥ द्रव्यहीन दरिद्री स्थितींत । वृद्धावस्थेंत पत्नी झाली मृत । त्यायोगें बसाप्पा अति क्लेशाप्रत । पावला अन्नवस्त्राविण ॥ ४८ ॥ ऐसा संसारत्रासें गांजलेला । दत्तात्रेय-स्वामींच्या दर्शनास पावला । त्याच दिवशीं कोणी ब्राह्मण आला । पत्नीसह कोंकणांतून ॥ ४९ ॥ त्याकालीं स्वामिराज दयाल । शेख नुरुद्दिन साहेबांचे दर्ग्याजवळ । विराजित होते तदा दर्शनासि पुष्कळ । नारीनर-समूह जमला ॥ १५० ॥ कोंकणचीं स्त्रीपुरुषें दोन्ही । श्रीसमर्थांस शुद्धांतःकरणीं । साष्टांग प्रणिपात करूनि । उभीं राहिलीं समीप ॥ ५१ ॥ ब्राह्मण वारा घाली श्रीगुरूसि । तद्भार्या रगडितसे श्रीचरणांसि । इतक्यांत वृद्ध तेली येऊनि प्रेमेंसीं । घाली दंडवत बालकांसहित ॥ ५२ ॥ तेव्हां जगद्गुरु हास्यवदनेंकरून । द्विजस्त्री राधाबाईस उक्त वचन । बोलती लिंबे तुझे पूर्वजन्मींचें जाण । हे तैल पुत्रत्रय असती गे ॥ ५३ ॥ हा वृद्ध तेली बसाप्पा म्हातारा । पूर्वजन्मींचा होता तुझा नवरा । जवळ घे गे प्रिय लेंकरां । पाहतेस काय पतिव्रते ॥ ५४ ॥ ऐसे श्रीमुखांतील चमत्कारिक शब्द । परिसूनि ब्राह्मणस्त्री पावली लज्जा-खेद । इतुक्यांत ते तैलपुत्र विनोद । करिती पूर्वजन्मींचे मातेसि ॥ ५५ ॥ आई रुसलीस काय आम्हांवरी । जाणूनि आम्ही अज्ञानी दरिद्री । आम्हां त्यागूनि गेलीस देवाचे घरीं । भेटलीस भाग्यें पुनरपि तूं ॥ ५६ ॥ मग राधाबाईस उपजली माया । कुरवाळूनि आलिंगिलें तनयां । कधीं न देखिलें ऐशा आश्चर्या । म्हणती लोक सर्वत्र ॥ ५७ ॥ अघटित ईश्वराची करणी । उच्च वृक्षीं नारळांत वसतें पाणी ।

पूर्वजन्मींचीं पुरुष पत्नी । इह जन्मीं विलक्षण देखिलीं ॥ ५८ ॥ तो तेली जातीचा पूर्वभ्रतार । इहजन्मीं स्त्री जाति विप्र । आलिंगिती पूर्वजन्मींचे पुत्र । काय कौतुक ईश्वरी मायेचें ॥ ५९ ॥ तदा अंतर्साक्षी सर्वांतर्यामी । श्रीगुरुदेवदत्तस्वामी । राधेस आज्ञापिती तेल्याचे ग्रामीं । सत्वर जा वेगें ॥ १६० ॥ पूर्वसदनीं पश्चिमेच्या रंगीत स्तंभाखालीं । तुझे हस्तीं पुरून ठेविलेली । मोठी हंडी पुष्कळ द्रव्यानें भरलेली । ती उकरून काढीं स्वहस्तें ॥ ६१ ॥ त्वां निर्लोभ बुद्धीनें तें सर्व धन । तेल्यास द्यावें म्हणजे तो दरिद्रविच्छिन्न । होऊनि तुजला पुत्रसंतान । प्राप्त होईल सत्य मानीं ॥ ६२ ॥ ऐशी समर्थांची आज्ञा होतां । सपुत्र तेली आणि द्विज स्त्री-पुरुषें उभयतां । प्रज्ञापुराहूनि चार योजनें त्या ग्रामीं तत्त्वतां । जाती समागमें लोकही ॥ ६३ ॥ दत्तात्रेय-आज्ञेनुसार । त्या स्तंभाखालीं निघालें धनपात्र । लोकांस वाटला चमत्कार । म्हणती ईश्वरावतारी स्वामी असती ॥ ६४ ॥ पात्रासह सर्व धन तेल्यास दिधलें । तेव्हां त्याचें जन्माचें दरिद्र गेलें । द्विजदंपत्य स्वग्रामीं पातलें । पुढें एक संवत्सरांत ॥ ६५ ॥ स्वामीमहाराजांच्या आशीर्वादेंकरून । द्विजस्त्रीस प्राप्त झालें पुत्रसंतान । पुढें त्या पुत्रासह तें दंपत्य जाण । अक्कलकोटीं पातलें ॥ ६६ ॥ समर्थांचें पूजन यथास्थित । ब्राह्मणभोजन करूनि उक्त । गुरुआज्ञा प्रसाद घेऊनि आनंदभरित । गेलें कोंकणांत परतूनि ॥ ६७ ॥; बडोद्यांतील गृहस्थ प्रसिद्ध । भाऊ खेडकर ब्राह्मण शुद्ध । त्यांसि बडोदें सोडण्याचा प्रारब्धयोगें प्रसंग पातला ॥ ६८ ॥ वेदविहित आचारसंपन्न । चतुर उदार विद्वान । वेदांतग्रंथश्रवण भगवद्भजन । करित होते सर्वदा ॥ ६९ ॥ ते भाऊसाहेब अक्कलकोटास । गेले स्वामीमहाराजांच्या दर्शनास । त्याकालीं दत्तदिगंबर जगन्निवास । गणेशमंदिराजवळ बैसले होते ॥ १७० ॥ श्रीचरणीं मस्तक ठेवून । प्रेमाश्रु वाहती नेत्रांतून । तेव्हां योगीश्वरें कृपाकरून । चणकाचे कुचके सात दाणे ॥ ७१ ॥ भाऊ खेडकरांस दिधले । म्हणती खुशाल रहाल गांवीं आपले । पदरांत त्यांच्या

फलादिक टाकिलें । धनसुखसंतानकारक ॥ ७२ ॥ त्याकालीं समर्थांपाशीं चोळाप्पा भक्त । ब्रह्मनिष्ठ वामनबुवा श्रीपादसहित । होते इतर लोक बहुत । धर्मराव मराठे ॥ ७३ ॥ आशीर्वाद प्रसाद प्राप्त झाला । तेणें भाऊस अत्यानंद वाटला । समर्थांचें पूजन ब्राह्मणभोजनाला । उत्तम प्रकारें केलें त्यांनीं ॥ ७४ ॥ पुढें थोडे दिवसांत खेडकर । स्वामिराजकृपेनें अनायासें सत्वर । सन्मानें बडोद्यास जाऊनि चांगला अधिकार । प्राप्त होऊनि सुखें राहिले ॥ ७५ ॥ नंतर कांहीं दिवस गेल्यावर । भाऊसाहेबांस संतान सुपुत्र । लाधलें दत्तात्रेयस्वामींचे वर- । सुप्रसादेंकरूनियां ॥ ७६ ॥ त्यांचे शत्रु सात जण कुचके । निर्बल होऊनि हलके । भाऊसाहेबांशीं प्रेमें मित्रासारिखे । वागूं लागले कालमानें ॥ ७७ ॥ भाऊंची कामकाजांत । स्मरणशक्ति होती बहुत । यांचे चिरंजीव बुद्धिमंत । कुटुंबादि आनंदें वर्तती ॥ ७८ ॥; बडोद्यांतील श्रीमंत घोरपडे राजे । रामचंद्रराव व्यंकटराव नाम गाजे । ज्याचें कोल्हापुरासमीप साजे । जहागीर-संस्थान यथायोग्य ॥ ७९ ॥ दतवाड दानवाड सप्तसागर । आणि नगर जिल्ह्यांत हिंगणी नगर । इत्यादि ग्रामांची जहागीर । प्राप्त आहे बहु दिवसांची ॥ १८० ॥ बडोद्यास योग्य नेमणूक । आहे ग्राम मंदुसर नामक । उत्तम प्रकारचा लौकिक । प्रसिद्ध सर्वत्र आहे यांचा ॥ ८१ ॥ श्रीमंत भाऊसाहेबांस । इंग्रजी राज्यांतून पदवी खास । 'अमिरुल्‌ उमराव' ऐशी सरस । पूर्वापार प्राप्त आहे ॥ ८२ ॥ दोन स्त्रिया पतिव्रता सुलक्षण । तयांसि नव्हतें पुत्रसंतान । म्हणून अक्कलकोटास कारकून । पाठवूनि शुद्ध भावनेनें ॥ ८३ ॥ श्रीदत्तात्रेयस्वामींस प्रार्थना । करविली व्हावया पुत्रसंताना । तेव्हां योगीश्वरें दिधलें आशीर्वचना । सुपुत्र संतान होईल ॥ ८४ ॥ करावें हरिवंश-ग्रंथश्रवण । तेणें मनोरथ शीघ्र होईल पूर्ण । ऐसें स्पष्ट वदले नारायण । ऐकून कारकून संतोषला ॥ ८५ ॥ येऊनि निवेदिलें त्यानें यजमानासि । मग तत्काळ हरिवंश ग्रंथ-श्रवणासि । आरंभूनि विद्वान द्विजमुखेंसीं । इत्यंभूत

नेमें श्रवण केलें ॥ ८६ ॥ तेव्हां थोरले गंगूबाई नामें पत्नीस । पुत्रसंतान लाधलें खास । सुलक्षण सुखरूप देखूनि सर्वत्रांस । परमानंद जाहला ॥ ८७ ॥ भाऊसाहेब घोरपडे उत्तम कुलवान् । शूर उदार चतुर शुद्धमन । स्वमुखें श्रीदत्तात्रेयस्वामींचें स्मरण । नित्य प्रेमें करित होते ॥ ८८ ॥ सद्धर्मतत्पर चतुर दोन्ही भार्या । भक्तिज्ञान-सदाचारसंपन्न आर्या । पतिसेवा-तत्पर कुशलकार्या । दयालु उदार धार्मिक ॥ ८९ ॥ भाऊसाहेब आणि पत्नी गंगूबाई । कैलासांत शिवरूप झाली अक्षयी । त्याचे पुत्र बाबासाहेब दक्ष बुद्धिमान् तेही । विचारें वर्तती सुखरूप ॥ १९० ॥; एक सातार प्रांतींचा ब्राह्मण । नामें पांडुरंग केशव पटवर्धन । इंग्रजी मराठी गुजराथी विद्या शिकून । बडोदें प्रांतीं मेहेतागिरीवर होता ॥ ९१ ॥ श्रीद्वारका नारायणसरोवर । सुदामापुरी प्रभास क्षेत्र । गुरुगिरिनारी आणि यात्रा इतर । करूनि अक्कलकोटीं गेला तो ॥ ९२ ॥ दत्तात्रेय-गुरूचें दर्शन पूजन । करून नैवेद्य विप्रसंतर्पण । बडोद्यास जातों म्हणून । आज्ञा मागत जगद्गुरूसि ॥ ९३ ॥ दत्तात्रेय म्हणती नर्मदाकांठीं । आम्रवृक्ष असल्यास त्याचीं पानें आम्हांसाठीं । पाठवाल काय सांगा खरी गोष्टी । तुमचे मुखांत दांत किती ॥ ९४ ॥ पांडुरंग विनवी आम्रपर्णें पाठवितों । मुखांत बत्तीस दांत आहेतसें जाणतों । समर्थ म्हणती तितकींच वर्षें वांचतो । पुढें जातो निजधामा ॥ ९५ ॥ आज्ञा-प्रसाद घेऊनि आला डभोईस । नर्मदाकांठचीं आम्रपत्रें पाठविलीं प्रज्ञापुरास । येऊनि मजला कळविली सरस । श्रीगुरुस्वामीलीला ते ॥ ९६ ॥ पुढें पांडुरंग बत्तीस वर्षांचे अंतीं । पावला मृत्यु गेला विदेहकैवल्याप्रति । स्वामिरायांची सर्वज्ञ साक्षी सर्वशक्ति । अगम्य लीला अद्भुत असे ॥ ९७ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदवेदांतसारार्थमथित । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । नवचत्वारिंशाध्याय गोड हा ॥ १९८ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे नवचत्वरिंशोऽध्यायः समाप्तः ॥ ४९ ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

# ॥ अध्याय पन्नासावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्तात्रेय-स्वामिने नमः ॥ ॥ हे शिष्या लोकांत जितके । मनुष्यादिक योनिज देह असती
तितुके । देहाचे कार्मण-मायीय-संज्ञक देखे । मलत्रय कारण आहेत ॥ १ ॥ पित्याचे शुक्रासि 'कार्मण' मल । मातेच्या
शोणितासि 'मायीय' मल । आणि तृतीय 'आणव' नामक मल । त्याजविषयीं तीन मतें आहेत ॥ २ ॥ कोणी शास्त्रवेत्ते
शुक्रशोणित । या दोन मलांच्या संधीस 'आणव' म्हणतात । कोणी पुण्यपापरूप कर्मांसि म्हणतात । 'आणव-मल' शास्त्रवेत्ते ॥ ३ ॥ कोणी विद्वान् शुक्रशोणित । या दोन मलांची विशेष अवस्था जी होत । त्या अवस्थेसि 'आणव-मल' बोलतात ।
हें मत समीचीन असे हो ॥ ४ ॥ काणवर्णाचें नाम 'आणव' असे । हा तिसरा शुक्र शोणिताहून भिन्न नसे ।
शुक्रशोणितयोगानंतर उद्भवतसे । विलक्षण वर्ण तत्काल एक ॥ ५ ॥ त्या मलाचें नाम 'आणव' असे । तो शुक्रशोणिताच्या
अंतर्भूत वसे । शिष्या अविद्यादिकयुक्त पंचक्लेशें । तथा पुण्यपापकर्मांसह ॥ ६ ॥ तथा हा जीवात्मा पूर्ववासनायुक्त ।
या तीन मलसंबंधें ज्या जन्मा येत । तें शरीर जनकजननीचें असत । तयांच्या देहांहून विलक्षण नसतें ॥ ७ ॥ पुरुष
स्त्रीनपुंसक-शरीर उत्पत्ति । निरूपण करूं विशद रीतीं । स्त्री-पुरुषांचे संभोगकालीं जरी शुक्र योनीप्रति । अधिक पतन
होईल ॥ ८ ॥ त्याहून न्यून मातेचें शोणित । तेणें जन्म होय पुत्राप्रत । आणि मातेचें शोणित अधिक पतन होत ।
तेव्हां स्त्री-शरीर उद्भवतसे ॥ ९ ॥ आणि स्त्री-पुरुषांचें शुक्रशोणित समान । संभोगकालीं होय पतन । तेव्हां त्या
दोन मळें होतसे उत्पन्न । नपुंसक शरीर ॥ १० ॥ भोगकालीं चिंतायुक्त नसून । उभयतांचें असत स्वस्थ मन । संभोग

होईल शास्त्रप्रमाण । तरी बालक इंद्रियगुणसंपन्न उपजे ॥ ११ ॥ आणि माता-पिता संभोगकालीं चिंताव्याकुल । अथवा दोघांचें मन शोकाकुल । तेव्हां शुक्रशोणितरूप मल । न निघे सर्व अंगांतूनि ॥ १२ ॥ आणि बाहेर निघाला जरी । निरुद्ध होतसे येतां बाहेरी । किंवा तें वीर्य कफ-धातुयुक्त मिलित होय तरी । कुरूप खंज बालक उद्भवतें ॥ १३ ॥ किंवा तें बालक पंगु होत । अथवा हस्तपाद-अंगुलीविरहित । किंवा न्यूनाधिक अंगुलीयुक्त । अथवा श्यामवर्ण नखांचें ॥ १४ ॥ एक पाद एक हस्त । नेत्रादिक सर्वेंद्रियरहित । अथवा एक इंद्रियविरहित । किंवा लघु वामन होतसे ॥ १५ ॥ अथवा कुब्ज दीर्घ अत्यंत । तें बाल कुरूप भयान्वित । अनेक प्रकारें उत्पन्न होत । सुशोभित नसलेलें ॥ १६ ॥ संभोगकालीं पुरुषाचा । तथा कोणत्याही निमित्तें स्त्रीचा । क्षोभासि प्राप्त होय साचा । अपान वायु जेधवां ॥ १७ ॥ तेव्हां स्त्रीगर्भाशयांत वायु अपान । शुक्रशोणितासि मिळतो जाऊन । करी अपान विभाग दोन । तरी दोन तीन बालें उपजतीं ॥ १८ ॥ याप्रकारें पुण्यपाप-कर्मवशें । तो जीवात्मा मातेच्या उदरविषें । अनेक शरीरांसि प्राप्त होतसे । आतां बाल-वृद्धातें निरूपितों ॥ १९ ॥ स्त्रीउदरीं शुक्रशोणित मल दोन । प्रथम रात्रीं मिळून । उदकाच्या फेनासमान । कलिल-अवस्थेसि पावती ॥ २० ॥ त्या कलिल-अवस्थेचें परिमाण । मातेच्या होतसे अंगुष्ठप्रमाण । सप्त रात्रीनंतर कलिलावस्था त्यागून । बुद्बुदावस्थेस प्राप्त होती ॥ २१ ॥ येथें यत्किंचित् द्रवीभूत अंडासमान । वर्तुलाकार जें मांस त्याचें 'बुद्बुद्' नामाभिधान । तें एक पक्षानंतर बुद्बुदाकार टाकून । आपल्या अग्निवायूच्या संबंधें ॥ २२ ॥ तथा मातेच्या अग्निवायुसंबंधेंकरून । आपल्या पिंडभावासि प्राप्त होऊन । चतुष्कोण पिंडभावासि ते मल दोन । शुक्रशोणित पावती ॥ २३ ॥ त्या चतुष्कोणाहून द्वय अंडकोशास । पावती जेव्हां पृथक्भावास । तेव्हां अंतर प्राणवायूनें उपरी प्रेरणेस । केलेले ते मल दोन्ही ॥ २४ ॥ त्या दोन मलांपासून । प्रथम सुषुम्ना नाडी होते उत्पन्न । ती वर्तुलाकार अत्यंत

सरल असून । नाभी-हृदय-गल-तालु-भ्रूमध्यें ॥ २५ ॥ या पंचस्थानभेदें ‘पंचपर्वा’ नामें कथिली । सुषुम्ना वृक्षासारखी अधो झाली । सुषुम्नेच्या दोन भागीं त्याकालीं । दुसऱ्या दोन नाड्या उद्भवती ॥ २६ ॥ त्या दोन्ही नाड्यांत जी जाडी जाण । वामनाडी-भागींच्या अंडकोशांतून उठून । सुषुम्नेच्या वामभागें संबंधासि येऊन । सुषुम्नेच्या वामभागें उठूनि ॥ २७ ॥ दक्षिणभागीं स्थित छिद्ररूप मार्गें । हृदयदेशासि प्राप्त होते सवेगें । त्या हृदयांतून उठून वाम स्कंधाचे योगें । वाम जत्रूच्या मध्यछिद्र मार्गें ॥ २८ ॥ सुषुम्नेच्या दक्षिणभागीं होते प्राप्त । आणि सुषुम्नेच्या दक्षिणेकडून उठत । वामभाग स्थित छिद्रमार्गद्वारें प्राप्त । हृदयदेशांत होतसे ॥ २९ ॥ हृदयांतून उठून दक्षिणस्कंधाचे आणि जत्रूचे । मध्य-छिद्ररूप मार्गद्वारें साचें । होई मिळणें नासिकेस दक्षिणेचे । धनुष्यासारख्या वक्रमार्गें ॥ ३० ॥ वाम नासिकेसि होते प्राप्त । धनुष्यासमान वक्रमार्गयुक्त । ‘इडा’ नाडी तिजला म्हणतात । अन्य श्रवण करावें ॥ ३१ ॥ जी प्राप्त झालेली दक्षिण नासिकेंत । तिला ‘पिंगला’ नाडी म्हणतात । आणि गळ्याखालील अस्थीस प्राप्त । तियेस ‘जत्रु’ ऐसें अभिधान ॥ ३२ ॥ शिष्या त्याकालीं त्या गर्भनाभीस्थानांतून । एक ‘आप्यायनी’ नाडी होते उत्पन्न । जिला शास्त्रांत ‘शंखिनी’ नामेंकरून । संबोधिती योगवेत्ते ॥ ३३ ॥ ती आप्यायनी-नाडी गर्भनाभींतून निघून । त्या मातेच्या हृदयदेशांत प्राप्त होई जाण । जैसें कूपाचें जल बांधमार्गें क्षेत्रांत जाऊन । व्रीहियवादिकांची वृद्धि होते ॥ ३४ ॥ तैसें त्या मातेनें भक्षिलेलें जलान्न । त्या जलान्नाचा रस त्या आप्यायनी-द्वारेंकरून । मंदगतीनें गर्भोदरीं जाऊन । त्या गर्भाची वृद्धि करितसे ॥ ३५ ॥ इडा पिंगला अंडकोशाहून उठती । वाम दक्षिण नासिकांत जाती । हें पूर्वीं कथिलेलें पुरुषदेहाप्रति । घटतसे गुरुराया ॥ ३६ ॥ तथापि स्त्री-शरीरीं घटे न । या शिष्यशंकेचें करूं समाधान । त्या नाड्यांचे मूलग्रंथीरूप जे अंडकोश दोन । ते पुरुष-शरीरीं स्पष्ट होती ॥ ३७ ॥ स्त्री-शरीरीं होतीं अस्पष्ट । नपुंसक शरीरीं यत्किंचित् स्पष्ट । यास्तव स्त्री-नपुंसकशरीरीं नीट ।

त्या नाड्या उत्पन्न होतात ॥ ३८ ॥ या प्रकारें झालिया एक पक्ष समाप्त । त्या गर्भांत नाडी उत्पन्न होत । आणि एक
मास झालिया चतुष्कोण गर्भ पिंड प्राप्त । काठिन्यभावासि होतसे ॥ ३९ ॥ त्या मांसपिंडासि दोन मासांनंतर । प्रथम
उत्पन्न होतें शिर । आणि तीन मासांनीं यथाक्रमें दोन्ही पाद कर । त्या चतुष्कोणांतून उद्भवती ॥ ४० ॥ आणि
चार मासांनंतर हस्तपादांप्रति । होतसे अंगुलि उत्पत्ति । कटि ऊर उदर दोन्ही पार्श्व निश्चितीं । कांहीं अस्थि इत्यादि
अवयव उपजती ॥ ४१ ॥ पंचमासांनंतर गर्भाचे पृष्ठदेशांत । दीर्घ अस्थि उत्पन्न होत । आणि षण्मासांनंतर मुखादि
नवद्वार स्थित । वाकादिक इंद्रियें उत्पन्न होतीं ॥ ४२ ॥ सप्तमासांनंतर त्या गर्भांत । प्राणाचे व्यापार स्पष्ट चालत ।
आणि अष्टममासीं तो गर्भ पूर्ण होत । अंतर्बाह्य सर्वांगांनीं ॥ ४३ ॥ परंतु अष्टममासीं गर्भांत । चेतनता प्रकट नसे
होत । म्हणूनि अष्टम मासीं तो गर्भ सुषुप्त । पुरुषासारिखा स्थित होतो ॥ ४४ ॥ त्या अष्टम मासीं वातपित्तादिक ।
धातूंची विषमतारहित सम्यक । कदाचित् मातेच्या उदरांतून निघून बालक । जीवनासि प्राप्त होतसे ॥ ४५ ॥ तो गर्भ
भोग-मोक्ष दोन्ही । समर्थ होतो संपादनीं । प्रणवादिकाची उपासना करूनि । ब्रह्मलोकादि भोगासि प्राप्त होतो
॥ ४६ ॥ आणि आत्मसाक्षात्कारी होऊन । मोक्षासि पावतो पुण्यवान् । या म्हणण्यानें हा अर्थ झाला बोधन । जो
बालक अष्टम मासीं जन्मतो ॥ ४७ ॥ त्या बालजीवनाविषयीं असे संशय । आणि अष्टम मासाची समाप्ति होय । व
नवम मासाचा प्रवेश होय । तेव्हां गर्भ सर्वज्ञ होतो ॥ ४८ ॥ जैसा विवेकादिक साधन चारी । कोणी पुरुष अधिकारी ।
ब्रह्मप्राप्तीची इच्छा करूनि विनय सदाचारी । श्रोत्रियवेत्ता गुरूस शरण होतो ॥ ४९ ॥ तैसा तो गर्भ नवमासांत ।
विनयपूर्वक मात्रोदरीं स्थित होत । तें बाल पूर्वजन्मीचें पुण्य पाप कर्म स्मरत । धिक्कार- मानित आपणासि ॥ ५० ॥
हे शिष्या तें बालक नवम मासीं । पूर्वजन्माच्या पापपुण्य-कर्मांसि । आठवूनि पावतें पश्चात्तापासि । तो प्रकार तूं

श्रवण करीं ॥ ५१ ॥ या दुःखरूप संसारसमुद्रांत । सुखदुःखासि करणारे प्राप्त । मीं जन्म घेतले असंख्यात । शरीर धारण करूनि ॥ ५२ ॥ त्या शरीरीं म्यां अनेकवार । श्वान सूकर उष्ट्र खर । गो अज मृग पक्षी गोधा शरीर । सर्प कीटकादि धरियेलें ॥ ५३ ॥ अनेकवार प्रतिलोम अनुलोम । शरीरासि प्राप्त झालों अधम । उत्तम जातीच्या माते उदरीं जन्म । नीच पुरुषापासूनि ॥ ५४ ॥ तयासि 'प्रतिलोम' म्हणती । आणि नीच स्त्री पुरुष उत्तम जाती । तयांपासून जे पुत्र होती । तयांचें नाम 'अनुलोम' आहे ॥ ५५ ॥ मी अनेकवार उच्च जाति ब्राह्मणादिक । आणि अनेकवार नीच चांडाळादिक । तैसेंचि स्थावर वृक्षादिक । झष-शरीरांसि पावलों ॥ ५६ ॥ एकपाद द्वय त्रय चतुष्पाद । शरीर पावलों रहितपाद । हस्तरहित अनेक पाद । अनेक हस्त शरीरीं जन्मलों ॥ ५७ ॥ अनेक इंद्रियें एक । ब्रह्मलोक स्वर्गलोक । अंतरिक्ष पृथ्वीलोक नरक- । लोकीं पावलों अनेक जन्मां ॥ ५८ ॥ जैसें औदुंबराचें फल । मच्छर-जीवें पूर्ण केवल । तैसें हें ब्रह्मांडरूप औदुंबराचें फल । माझें शरीर मच्छररूप झालें ॥ ५९ ॥ जैसें वायुवेगें उडालेलें तृण । निरंतर वरी करितसे भ्रमण । तैसें पुण्यपाप-कर्मवश मी जीव दीन । अनेक शरीरें ग्रहण केलीं ॥ ६० ॥ अनेक शरीरांचा त्याग करीत । नर्क स्वर्ग मृत्युलोकीं भ्रमत । जैसें वृषभादि पशूंसि रज्जूनें बांधूनि लावित । कार्यासि कृषि करणारे ॥ ६१ ॥ तैसें मायारूप सूत्रें उत्पन्न झालें । जें पापपुण्य-कर्मपाशें बांधिलें । मज पशूला स्त्री पुत्रादि कुटुंबासह पाळिलें । कोणी अंतर्यामी देव-प्रवृत्तीनें ॥ ६२ ॥ परंतु त्या अंतर्यामी देवातें । मीं मूढबुद्धि जीवें जाणिलें नव्हतें । अनेक जातींच्या मातृदुग्धातें । प्राशिलें पूवासमान दुर्गंधि ॥ ६३ ॥ जें दुग्ध विचारवान् पुरुषास । परम दुःखरूप येतें प्रतीतीस । अनेकवार ऐशा निंदित दुग्धास । म्यां दुरात्म्यानें प्राशिलें ॥ ६४ ॥ त्या त्या जातींच्या शरीरांत । निंदित आहार भक्षिले बहुत । ज्या आहारांसि पाहतां महाग्लानि येत । इतर जातींच्या शरीरांसि ॥ ६५ ॥ त्या त्या जन्मांत

पिता माता बांधव । स्त्री पुत्र गृह आहार पदार्थ सर्व । त्या त्या पदार्थीं अत्यंत प्रीति जडली सदैव । आणि तें तें शरीर नष्ट झाल्यावरी ॥ ६६ ॥ या भूमींत जेवढे सूक्ष्म रज । आकाशांत तितुके नक्षत्र समाज । त्याहीपेक्षां अधिक जन्म मज । प्राप्त झाले अति दुःखद ॥ ६७ ॥ जैसें एकवार दळलेले धान्यकण । पुन्हां पिष्ट करित नाहीं कोणी जाण । तैसें एकवार जन्म घेऊन । पुन्हां जन्म घेणें अयुक्त असे ॥ ६८ ॥ यथा कूपवापीदिकावरी घटियंत्र । फिरतें तैशी जन्मावस्था त्यानंतर । बाल्य यौवन मग वृद्धावस्था दुर्धर आल्यावर । मरणावस्था प्राप्त होते ॥ ६९ ॥ मरणावस्थेनंतर । पुन्हां जन्मावस्था येणें सत्वर । जन्मादि अवस्था प्रवाहरूप घटियंत्र । माझे मस्तकावरी सदा फिरतें ॥ ७० ॥ सुखार्थ कोणी दुष्ट ब्रह्महत्या करी । त्यासि इहपरलोकीं दुःख होय भारी । तैशीं मी कर्मे आचरी अविचारीं । सुखाचें साधन मानूनियां ॥ ७१ ॥ तें सर्व कर्म दुःखद अनिवार । पुण्य पाप कदाचित् अत्यंत उग्र । तरी या जन्मीं कर्मकर्त्यासि खरोखर । तदनुसार सुखदुःख-फल देतसे ॥ ७२ ॥ आणि तें कर्म कदाचित् मंद असलें । तर कर्त्यासि जन्मांतरीं मिळती फलें । ऐसें कोणी वचन बोललें । पापकर्म तें प्रथमारंभकालीं ॥ ७३ ॥ तैसें भविष्यकालीं या जीवातें । दुःखाची प्राप्ति करितें । तथापि भविष्यकालीं सुख देतें । ऐसें म्हणणें त्यांचें न संभवे ॥ ७४ ॥ कां तरी त्या पुण्य कर्माचें सुखरूप फल । जेव्हां भोगिल्यानें नाश होईल । तेव्हां या जीवासि परम दुःख मिळेल । आणि इतरांचें सुखाधिक पाहूनि ॥ ७५ ॥ ईर्षा उपजते या जीवासि । तेणें पावे परम दुःखासि । आणि सुखाचे अप्राप्तकालीं सुखेच्छा दुःखासि । बाधक होते सर्वथा ॥ ७६ ॥ ऐशा त्या पुण्यजन्य विषयांत । सर्वथा दुःखें आलों भोगित । म्हणून हा संसार केवल दुःखाब्धि असत । तन्निवृत्ति-उपाय दिसेना ॥ ७७ ॥ या अज्ञानरूप संसारांत । हे पंचविषय जुवा खेळणारे वसत । ते मज मूढाचा अनेक जन्मांत । पराजयकर्ते जाहले ॥ ७८ ॥ त्या विषय-जुवेबाजांचा पराजय । करणारा अधिकारी मनुष्यदेह होय । तो प्राप्त

होऊनि मी मूढ इंद्रिय । पाश-निरोधें कुशलतारहित झालों ॥ ७९ ॥ म्हणूनि मी मूढबुद्धि जीव । त्या विषय-जुवेबाजांचा
पराभव । न करूनि उलटें त्यांनीं मला सदैव । छळूनि पराभविलें हो ॥ ८० ॥ आतां कोण्या पुण्यकर्म-प्रभावेंकरूनि ।
मी या मातृउदरांतून बाहेर निघेन । बाहेर निघाल्यावरी पूर्वशरीरसमान । प्रमाद कधीं करणार नाहीं ॥ ८१ ॥ जन्म-
मरणादिक दुःखाचें नाशक । जें ब्रह्मात्मज्ञान मोक्षदायक । त्या ब्रह्मात्मज्ञानासि मी अष्टांग योगादिक । उपायें संपादन
करीन ॥ ८२ ॥ आणि जर आत्मसाक्षात्कार-संपादन । न होईल तरी उमारमण । तथा लक्ष्मीपति नारायण । त्यांचें
आराधन सदा करीन मी ॥ ८३ ॥ परंतु या मातेच्या उदराबाहेर । निघून मी पूर्ववत् कुटुंब-स्त्री-पुत्र- । पालनांत निज
आयुष्य व्यर्थ घालविणार । नाहीं कधींही सर्वथा ॥ ८४ ॥ या मायामय प्रपंचांत । कधींही होणार नाहीं आसक्त ।
वैराग्यावरी सदाचित्त । निःसंशय ठेवीन मी ॥ ८५ ॥ जैसे सगळे आपले घरांतून । अमंगल विष्ठा बाहेर त्वरें देती
टाकून । तैसें स्त्रीपुत्रादिक बांधव मला त्वरेंकरून । मरणानंतर मला काढिती बाहेरी ॥ ८६ ॥ मी जिवंत असतां तीं
स्त्रीपुत्रादिक । माझे पायांवर ठेवून मस्तक । वारंवार नमित होती तैसेच लोक । तेही स्पर्श करीनात ॥ ८७ ॥ मला अशुद्ध
मानून । त्या अशुद्धिनिवृत्यर्थ करिती स्नान । सजीव देहीं चंदन लेपन । सुगंधी लावित होते जे ॥ ८८ ॥ ते मृत्यूनंतर
निर्दयत्वें मजला । महान अग्नींत ठेवून जाती सदनाला । कुटुंब-पोषणार्थ केलेलें कर्म एकला । भोगितो कोणी कोणाचें
नसेचि ॥ ८९ ॥ ऐसे आगमापायी कृतघ्न बांधवसंगीं । स्नेह ठेवणें अनुचित निरुपयोगी । जैशी अंतर-स्नेहरहित वेश्या
भोगी । बाह्यप्रेमें धनिकासि ॥ ९० ॥ तैशीच हावभावें वेश्या स्वार्थ साधून । मज मूढासि मोहें निर्धन करून । विपत्कालीं
गेली टाकून । आणि स्त्रीपुत्रांनींहि त्यागिलें ॥ ९१ ॥ शिष्या याप्रकारें नवम मासांत । तें बालक मातेच्या उदर स्थित ।
पूर्व अनेक जन्मांसि स्मरण करित । पश्चात्तापें तळमळी ॥ ९२ ॥ नंतर प्रसुति वायु त्या बालाचें । अधोमुख घालून

पायावर ठेवी साचें । त्याकालीं वात पित्त धातु बालाचें । क्षोभासि पावती तिन्ही ते ॥ ९३ ॥ त्या धातुक्षोभें बालक बहुत । आपपर न जाणतां दुःखें भोगित । शहाण्णव अंगुल परिमित । मातेचें शरीर असूनि ॥ ९४ ॥ चार अंगुल प्रमाण योनिस्थान । ऐशा संकीर्ण योनि-यंत्रांतून । प्रसूतिवायु वेगें आगमन होऊन । बालक जन्म पावतसे ॥ ९५ ॥ मूत्राचें बस्तिस्थान मातेच्या उदरांत । विष्ठेचें स्थान संग्रहणी-नामें असत । तीं दोन्ही प्रसूति वायु क्षोभें चालून टाकित । बालकमस्तकीं विष्ठामूत्र ॥ ९६ ॥ जैसें तीक्ष्ण क्रकचें उदर छेदण्यानें । आपणां जीवासि दुःख भोगणें । तैसें गर्भत्यागकालीं पीडणें । गर्भिणी आणि बालासि होय ॥ ९७ ॥ लोहाचें तीक्ष्ण शस्त्र जैसें । अजादि पशुयोनीस विदारी तैसे । मातायोनिस्थानासि विदारण तैसें । बालक करी त्याकालीं ॥ ९८ ॥ जैसें राजाचे अपराधी चोरास । राजाचे; भृत्य घालिती दोन क्रकच मध्यास । तैसें प्रसूतिकालाचा वायु त्या बालास । बलात्कारें योनियंत्रांत घालितो ॥ ९९ ॥ त्या प्रसूतिकालीं ‘जरायु’ नाम । पटरहित होऊनि कोमल बालासि परम । दाह करी अग्निस्पर्शासम । त्या योनियंत्राच्या स्पर्शानें ॥ १०० ॥ या प्रकारें दुःखें अनुभवूनि अनेक । नवममासीं किंवा दशममासीं बालक । पूर्वकर्म-फल भोगावया सुखदुःख । योनियंत्रें बाहेर येतसे ॥ १ ॥ जैसा दुर्गंध व्रणांतून बाहेर । कीट निघून पतन होत भूमीवर । तैसें तें बालक मातायोनियंत्रांतून बाहेर । निघूनि पडे भूमीवरी ॥ २ ॥ अनेक तीक्ष्ण कंटकांचें टोचणें । तथा लोहक्रकचें अंग छेदन होण्यानें । आपणा जीवासि दुःख भोगणें । योनींतून निघण्यानें बालासि तैसें ॥ ३ ॥ ऐसा प्रसूतिवायूनें चाललेला बालक । योनियंत्रांतून निघण्याकालीं दुःख अनेक । पावून आपण भोगून मातेसि दुःख । देऊनि पडतसे भूमीवरी ॥ ४ ॥ त्याकालीं मूर्च्छाअवस्थासि बालक । किंचित्‌मात्रही न जाणे ज्ञान । मूर्च्छेनंतर हा वैष्णवी वायु स्वसंबंधेंकरून । बालकासि पूर्वविस्मरण करवितसे ॥ ५ ॥ मातेच्या उदराबाहेर । वैष्णवी वायु असे व्यापक

सर्वत्र । जीवांचे व्यामोहद्वार या संसार- । चक्राचा निर्वाह करण्यासि ॥ ६ ॥ विष्णूनें उत्पन्न केलें त्या वायूस ।
या कारणानें शास्त्रवेत्ते पुरुष । त्या बाह्य वायूचे ‘वैष्णवी वायु’ नामास । कथन करिती ॥ ७ ॥ या वैष्णवी-वायुभयें
पूर्व । व्यासभगवान्-पुत्र शुकदेव । माता उदरीं प्रसूतिवायूस योगप्रभाव- । बलें जिंकून बहुकाल राहिले ॥ ८ ॥
जैसें सर्वांचा अभिप्राय जाणणारे । जे कोणी बुद्धिमान् सर्वज्ञ नर । पापीकृत दुष्ट औषधी मंत्र । तेणें शीघ्र मूढावस्थेसि
पावतो ॥ ९ ॥ तैसा या वैष्णवी वायूचा स्पर्श झाला । कीं सर्वज्ञ पुरुषही पावतो मूढावस्थेला । हे शिष्या मातृ
उदरांत या बाला । नवम मासीं ज्या मनें होतो विचार ॥ ११० ॥ त्या मनासि जेव्हां वैष्णवी वायु स्पर्श । करी तेव्हां
तें मन पूर्वोक्त विचारास । परित्यागूनि वक्रभावास । श्वान-पुच्छासारिखें प्राप्त होई ॥ ११ ॥ जैसें अग्नीनें दग्ध केलेले
काष्ठास । भ्रमविण्यानें अग्निही भ्रमतो खास । तैसें त्या वक्र मनाचा तादात्म्य-अध्यास । तेणें आत्माही वक्र होई ॥ १२ ॥
त्यानंतर अत्यंत दुःखी झालेलें बालक । विस्मरूनि पूर्वविचार अनेक । ‘कोहं कोहं’ ऐसे शब्द मायिक । उच्चारण
करितसे ॥ १३ ॥ याप्रकारें गर्भोपनिषदांत । या जीवाचे जन्मविचार कथिले आहेत । त्या जन्माचे विचार करून
प्राप्त होत । अधिकारी पुरुषासि वैराग्य ॥ १४ ॥ म्हणूनि वैराग्यप्राप्तीस्तव या अधिकाऱ्यांनीं । त्या गर्भोपनिषदाच्या
रीतींनीं । आपले जन्माचा विचार अवश्य करूनि । मोक्षार्थ वैराग्य संपादावें ॥ १५ ॥; तो मोक्षप्रदाता परमेश्वर ।
प्रज्ञापुरीं वसूनि दीनांवर । जनकजननीहूनि अधिक निरंतर । प्राणीमात्रावरी दया करी ॥ १६ ॥ ते एकेकालीं
अक्कलकोटांत । देशमुखांच्या वाड्यांत । श्रीगुरुगिरिनारी अवधूत । बैसले होते आनंदें ॥ १७ ॥ समर्थांजवळ बाबा
सबनीस । बाबा यादवबुवा रामदास । चोळाप्पा श्रीपादभट कृष्णाप्पा दास । सुंदराबाई आदिक ॥ १८ ॥ तेथें
एक द्विजनारी पतिव्रता । आपल्या जन्मांध पुत्रासह तत्त्वतां । बैसूनि करीत होती वार्ता । तेव्हां शिवुबाईनें समर्थांसि

॥ १९ ॥ लीनपणें केली प्रार्थना । हे भगवान् पार्वतीरमणा । या साध्वीचे दीन मुलास दिसेना । जन्म झाल्यापासूनि ॥ १२० ॥ तरी कृपा करूनि उपाय । सांगावा हो गुरु बाप माय । तेव्हां बोलती देवराय । पांच राक्षस येताहेत ॥ २१ ॥ इतक्यांत मस्तकीं शालजोड्या भूषण । बांधलेले पंच वैष्णव ब्राह्मण । यथेच्छ उत्तमान्न भोजन करून । मोठ्या थाटानें पातले ॥ २२ ॥ यतींद्रांसि न करितां वंदनादिक । कर्णाटकी आणि संस्कृत भाषेंत एकमेक । म्हणती प्रश्नाचें उत्तर समाधानकारक । मनोमय मिळालें तरीच मानूं ॥ २३ ॥ तदा आणखी वैष्णव विप्र । येऊनि करूनि साष्टांग नमस्कार । बैसले असतां पुष्कळ नारीनर । जमले भगवद्दर्शनासि ॥ २४ ॥ तेव्हां जगज्जीवन भगवंत । द्विज अंधपुत्रास रागें भरित । वदले कीं गणेशा इकडे ये त्वरित । या गर्विष्ठांचे मनांतील प्रश्नांचें ॥ २५ ॥ उत्तर वेद स्मृति पुराण- । वचनीं करीं रे यथार्थ समाधान । निर्भयपणें त्यांचे मनींचें भाषण । अर्थ मंत्र श्लोकादिक ॥ २६ ॥ नंतर तो द्विजपुत्र गुरुपदीं मस्तक । ठेवूनि वदे दयाळा मजला एक । अक्षर देखील येत नसे वेदादिक । काय सांगूं न कळेचि ॥ २७ ॥ तेव्हां ते जगदीश्वर कृपाल । स्वकंठांतील काढूनि माळ । अंधाचे कंठांत घालूनि तात्काळ । नेत्रांसि सुगंध पुष्प स्पर्शिती ॥ २८ ॥ नेत्रांसि स्पर्शतांचि कृपाकर । जन्मांध उघडून सहज नेत्र । वैष्णव-ब्राह्मणांसमोर । उभा राहिला आवेशें ॥ २९ ॥ ऋग्वेदादिकांतील अर्थ मंत्र । अर्थसहित उत्तरें देत द्विजपुत्र । भगवद्गीतेंतील वाक्यें यथाशास्त्र । भागवतांतीलही अनेक तीं ॥ १३० ॥ जन्मांध द्विजपुत्र निरक्षर । असतां स्पष्ट दिधलें प्रश्नोत्तर । हें दत्तात्रेयस्वामींचें सामर्थ्य अपार । पाहूनि वैष्णव विस्मित झाले ॥ ३१ ॥ अंतरीं पोहोंचतांच अनुभवखूण । वैष्णवांनीं सोडिला अभिमान । होऊनि तदा अनन्य शरण । करिती नमन साष्टांगीं ॥ ३२ ॥ म्हणती विद्याभिमानें भुललों । देह गेह संसार धनें माजलों । लोभादिकें हे विसरलों । भगवच्चरण भावतारक ॥ ३३ ॥ गडबडा लोळती चरणीं ।

म्हणती परमेश्वर चक्रपाणि । त्वच्चरणांवीण त्राता कोणी । समर्थ नसे हो विश्वगुरु ॥ ३४ ॥ अपराध सर्व
क्षमा करा । पतितपावना दीनोद्धारा । मग योगीश्वर अर्पिती उत्तरा । आमचे जाती-आश्रम-भ्रष्टत्व ॥ ३५ ॥
असलें तरी चिंता नसे । परंतु तुमच्या मातेनें कामवशें । यवनासवें व्यभिचार-कर्म कैसें । करूनि पोट वाढविलें
॥ ३६ ॥ तुम्ही त्या यवनाचे खुद्द कुमर । आम्हांसि काय देतां प्रायश्चित्त प्रचुर । तुम्हींच प्रायश्चित्त आचरूनि
अहो विप्र । शुद्ध व्हावें झडकरी ॥ ३७ ॥ हें परिसूनि अहंकार-पराङ्मुख । होऊनि वैष्णव घालिती अधोमुख । पूर्वींचें
कृतकर्म आठवूनि सुख दुःख । पश्चात्तापें पोळलेले ॥ ३८ ॥ श्रीमुखें आपलें जन्म कथन । वैष्णव द्विजांनीं श्रवण
केल्यावरून । अत्यंत अनुताप प्राप्त होऊन । लज्जायमान जाहले ॥ ३९ ॥ मग दत्तात्रेय-चरणपादुका । करीं घेऊनि
भवतारका । वारंवार ताडिती मस्तका । सांगती वृत्त सर्व तें ॥ १४० ॥ या गांवांत पंढरीनाथ पागे सज्जन । गृहस्थ
सदाचारसंपन्न । वैष्णव ब्राह्मण कुलवान् । त्यांनीं आम्हांस बोधिलें ॥ ४१ ॥ कीं या महत्-अवतारिक । पुरुषाचे
कदापि होऊं नये निंदक । छलनाचा परिणाम चमत्कारिक । होईल जाणा सर्वथा ॥ ४२ ॥ होईल तितकी करावी
सेवा । निंदा द्वेष स्वप्नीं देखिल नसावा । पूर्णब्रह्म सनातन देवाधिदेवा । या परमपुरुषासि भजावें ॥ ४३ ॥
देहाभिमान विद्या धन मद । परित्यागूनि वादविवाद । उपहास परापमान सहज विनोद । अति दुःखद सांडावें ॥ ४४ ॥
शहाण्यानें सर्वदा सर्वोपरी । अंतःकरणपूर्वक झटावें परोपकारीं । यथाशक्ति धनादिकें निरहंकारीं । स्वशरीरीं झिजावें
॥ ४५ ॥ धनादि नसतां सानुकूल । अथवा शरीर असलिया दुर्बल । तरी निष्कपट सत्य मृदु निर्मल । भाषणें
सर्वांसि संतोषवावें ॥ ४६ ॥ कारण अन्यायावांचून । विरुद्ध कां बोलावें कठिण वचन । सर्वभूतीं होऊनि लीन ।
परमेश्वर कृपा संपादावी ॥ ४७ ॥ अवतारिक जे प्रत्यक्ष भगवंत । त्यांत महात्मा पुरुष साधुसंत । योगीजन अवधूत

विरक्त । भगवद्भक्त निर्मल जे ॥ ४८ ॥ वेदशास्त्रवेत्ते ब्राह्मण । क्षमा-शांति अंगीं वसे पूर्ण । काम-क्रोध-लोभ-दंभादि-रहित :जाण । अभिमानशून्य प्रेमळ जे ॥ ४९ ॥ ब्रह्मचर्यादिक व्रतसंपन्न । गृहस्थाश्रमी सदाचारी सज्जन । देव-गुरुभक्तिपरायण । वानप्रस्थाश्रमयुक्त जे ॥ १५० ॥ कुटीचक-बहूदक-हंस-परमहंस । ईश्वराचें 'चलस्वरूप' संन्यास । 'अचलस्वरूप' प्रतिमामूर्ति खास । शिव-विष्णु-ब्रह्मादि देवता ॥ ५१ ॥ इत्यादिक देव गुरु संत । यांचे ठिकाणीं नित्य भक्तियुक्त । असावें शुद्ध-मानसविहित । शुचिर्भूतपणें वंदावें ॥ ५२ ॥ यांतचि इहपरकल्याण असे । यापरी समजूनि मदांधासरिसे । विद्याभिमानें मतवाद निंदा-द्वेषें । गुंतलों सर्वस्वीं भ्रमांत ॥ ५३ ॥ ऐसें केलें सद्गुरु-छलन । आतां आलों श्रीपदीं अनन्य शरण । पातक्यांसि उद्धरावें हो श्रीकृष्ण भगवान । क्षमादान देऊनि ॥ ५४ ॥ पूर्व सुकृत पदरीं स्वल्प असेल । म्हणूनि सुदुर्लभ चरण विमल । कोण्या संस्कारें तारक भवजाल । प्राप्त जाहले आम्हांसि ॥ ५५ ॥ 'द्यावें त्या प्रकारें घ्यावें । शुभाशुभ करावें तैसें भोगावें' । भाग्य उदयासि पावलें बरवें । तारक भगवंत भेटले ॥ ५६ ॥ आतां आम्हांसि उत्तम गति । निज कृपाकटाक्षें होईल प्राप्ति । प्रेरणा करून आणवून मंदमति । उद्धरिलें हो कृपार्णवा ॥ ५७ ॥ पश्चात्तापें वैष्णवांचें शुद्धचित्त । झालेलें ओळखूनि योगीश्वर दयावंत । कळवळूनि आशीर्वाद विहित । कल्याणप्रद अर्पिती ॥ ५८ ॥ गंगास्नान करून वेदमार्गें । सत्कर्म आचरावें श्रद्धायोगें । निर्विकल्पस्थिति प्रारब्धभोगें । पावाल सायुज्य मुक्तीस ॥ ५९ ॥ सकलांसि वाटलें आश्चर्य । ऐसे कृपासागर जगद्गुरु । चिंतामणि कल्पद्रुम भक्तकार्य । राजाधिराज गुरुनाथ ॥ १६० ॥ अभाविक अथवा भाविकांला । निंदा स्तुति करणारांला । परमात्मा समान देतसे फलाला । अपार लीला जयाची ॥ ६१ ॥ नैष्ठुर्य विषमता स्वप्नीं नसे । दयाप्रवाह अखंड

विलसे । उद्धरिलें वैष्णव स्वलीलें असे । श्रीगुरुस्वामी समर्थांनीं ॥ ६२ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । गर्भोपनिषदार्थमथित । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । पंचाशत्तमाध्याय गोड हा ॥ १६३ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे पंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः ॥ ५० ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय एकावन्नावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ।। श्रीमद्दत्तदिगंबर-स्वामिने नमः ।। ।। शिष्या त्या गर्भ-जन्मावस्थेचा विचार । केल्यानें वैराग्य अवश्य प्राप्त होतें मोक्षकर । तैसें आपल्या मरणावस्थेचा विचार । केल्यानें वैराग्य होतें ।। १ ।। यास्तव त्या वैराग्य-प्राप्तीकारणें । अवश्य अधिकारी जनानें । आपल्या मरणावस्थेसि जाणणें । नृदेह दुर्लभ समजूनि ।। २ ।। आपले मरणाचें ज्ञान या जीवास । ‘जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्यच’ । इत्यादि शास्त्रवचनें होतें खास । तथा या लोकीं प्राणी जन्म पावती ।। ३ ।। त्या त्या प्राण्यांचें मरण अवश्य होतें । जैसे आमचे मातापितादि चुलते । मातुल-बांधवादि जन्मले होते । ते मृत्यु पावले निश्चयात्मक ।। ४ ।। तैसा जन्म झाला आम्हांसि । म्हणून मृत्यु येईल नियमेंसीं । याप्रकारें अनुमान-प्रमाणानें जीवासी । स्वमृत्यूचा निश्चय होतसे ।। ५ ।। परंतु तो मृत्यु किती दिवसांत । हा निश्चय योगाभ्यासविरहित । पुरुषास होऊं न शकत । तो मरणकाल निश्चय व्हावया ।। ६ ।। ऋग्वेदांत कौषीतकी मुनीनें । कथिलीं अनेक प्रकारें मृत्युचिन्हें । तशीं वशिष्ठसंहितेंत लक्षणें । वशिष्ठ ऋषींनीं कथियेलीं ।। ७ ।। त्या मृत्युचिन्हांचे ज्ञानेंकरून । सर्वांनीं जाणावें आपलें मरण । ऋग्वेदाचे कौषितकी शाखेंतलें चिन्ह । जागृदवस्थेंत देखणें योग्य ।। ८ ।। जें मरणाचें कथिलें लक्षण । त्याचें करितों यथार्थ निरूपण- । सूर्य नभोमंडलांत तथा पुरुषाचे दक्षिण । नेत्रांत एक अंतर्यामी वसतो द्वयरूपें ।। ९ ।। त्या दोन स्वरूपांचा नाडीरूपकरण- । द्वारें परस्पर संबंध श्रुतींत केला कथन । आणि या पुरुषास जेव्हां मरण । समीप प्राप्त होतसे ।। १० ।। तेव्हां त्या दोन्ही स्वरूपांचा संबंध तो । निवृत्त होऊनियां जातो ।

त्याकालीं सूर्य भगवान् न दिसतो । पूर्ववत् त्या मरणारासि ॥ ११ ॥ तो सूर्य चंद्रमासारिखा शीतल । झालेला त्यासि
दिसतो त्रिकाल । अथवा त्या पुरुषासि मध्यान्हकाल । संध्याकालासारिखा दिसे ॥ १२ ॥ सूर्यभगवान् किरणरहित।
झालेला तयासि होतसे प्रतीत । अथवा छिद्रयुक्त मंजिष्ठ । रक्तवर्ण आकाशांत दिसतो ॥ १३ ॥ ऐसा सूर्यासि देखणारा
विपरित । तो मरण पावतसे थोडे कालांत । जो पूर्वादि दिशा उपदिशा अंतरिक्ष लोक रक्त-। वर्ण तारागणांसि पाहतो
॥ १४ ॥ तो मृत्यु पावे थोडे कालांत । आणि जैसें मलपरित्याग समयांत । वायुद्वार होतें सदा संकोचरहित । तो थोडे
कालांत मरतसे ॥ १५ ॥ जैशी अंडयुक्त काकगृहांत दुर्गंधि । तैशी ज्याच्या मस्तकांत सुटे गंधि । त्याची थोडी मरणावधि।
राहिली ऐसें जाणावें ॥ १६ ॥ जो आपल्या छायेंत छिद्र पाहे । तो थोडे कालांत मरताहे । जो दर्पणांत 'जलांत प्रतिबिंब
पाहे । मस्तकाविण आपणासि ॥ १७ ॥ भूमिस्थित छाया प्रतिबिंबांत । आपले मस्तकाचा संशय वाटत । किंवा जयासि
मस्तकाचा अभाव निश्चित होत । तो थोडे कालांत मृत्यु पावे ॥ १८ ॥ दुसऱ्याचे नेत्राचे कनीनिकेंत । स्वप्रतिबिंबाचे
पाद वरती देखत । आणि मस्तक अधोभागांत । जो पुरुष विपरित पाही ऐसें ॥ १९ ॥ दर्पणस्थित प्रतिबिंबामाजीं ।
प्रतिबिंबाचें मस्तक उपरी सहजी । अथवा आहे अधोभागामाजीं । ऐसा संशयी लवकर मृत्यु पावतो ॥ २० ॥ अंगुलीनें
पीडितां आपले नेत्रासि । किरणयुक्त तेज येतें प्रतीतीसि । तें तेज नेत्रपीडनें न दिसे जयासि । तो थोडे कालांत मरतसे
॥ २१ ॥ दोन्ही हातांच्या अंगुलींनीं जाणे । आपलीं दोन्हीं कर्णद्वारें निरोधल्यानें । जो प्राणांचा ध्वनिरूप
शब्द ऐकणें । होतें सर्व जीवांसि ॥ २२ ॥ त्या आपल्या प्राणांच्या शब्दास । जो श्रवण न करी तो
पुरुष । थोडे कालांतचि मृत्यूस । प्राप्त होतसे निश्चयें ॥ २३ ॥ जो मयूराचे कंठासमान । अग्नीसि देखतसे
नीलवर्ण । किंवा जो मेघावांचून । विद्युल्लता पाहे आकाशीं ॥ २४ ॥ अथवा असतां विद्यमान । त्या विद्युल्लतेसि

न करी अवलोकन । तो पुरुषही मरण । थोडे कालांत पावतसे ॥ २५ ॥ जो वर्षाकालयुक्त मेघांत । सूर्याचे किरणासि देखत । अथवा जी भूमि अग्निरहित । ती अग्नीनें प्रज्वलित देखतसे ॥ २६ ॥ तो मृत्यु पावे थोडे कालांत । हीं मृत्युचिन्हें कौषीतकीमुनि-उक्त । ऋग्वेदीय उपनिषदांत । कथिलीं तीं निरूपिलीं ॥ २७ ॥; आतां वशिष्ठमुनिउक्त मृत्युचिन्हांचें जाण । साद्यंत करूं निरूपण । शिष्या परिसावें त्वरेंकरून । परार्थहित साधावया ॥ २८ ॥ एकचि दिवसांत प्रातःकालीं । तथा जो पुरुष संध्याकालीं । स्वमस्तकांतून धूमपंक्ति निघालेली । पाही तो पावे महान् भय किंवा मरण ॥ २९ ॥ जो सायंकालीं तथा प्रातःकालांत । मस्तकांतील धूम पंचदिनपर्यंत । अवलोकन करितो तो पावत । मृत्यु तीन वर्षांनंतर ॥ ३० ॥ जो त्या मस्तकींच्या धूमास । चार दिनपर्यंत विलोकनास । करितो तो पावतसे मृत्यूस । दोन वर्षांनंतर ॥ ३१ ॥ जो मस्तकींचा धूम तीन दिनपर्यंत । पाहे तो एक वर्षानंतर होई मृत । जो दोन्ही हस्तांच्या अंगुलींत निरोधित । दोन्ही कर्णद्वारें ॥ ३२ ॥ शब्दनिरोध प्राणाचा ध्वनि । ऐकूं नये जयासि श्रवणीं । तो पुरुष द्वादश मासांनीं । मृत्यूस प्राप्त होतसे ॥ ३३ ॥ ज्याचें पूर्वीं शरीर होतें कृश । तें कांहीं निमित्तावीण पावतें स्थूलतेस । किंवा ज्याचें शरीर असूनि स्थूल विशेष । निमित्तावांचूनि कृश होय ॥ ३४ ॥ तो एक वर्षानंतर । मरण पावतसे नर । जो पूर्वीं क्रोधस्वभावी असूनि नंतर । अकस्मात् होय शांत स्वभावी ॥ ३५ ॥ अथवा पूर्वीं शांत असून । अकस्मात् होतो क्रोधी स्वभाववान् । तो पुरुषही पावे मरण । एक वर्षानंतर ॥ ३६ ॥ आणि ज्या दिवशीं विष्ठा-मूत्र दोहोंचा । परित्याग एकचि कालीं होतो साचा । किंवा क्षुधा-पिपासा या दोहोंचा । एकचि कालीं प्रसंग येतो ॥ ३७ ॥ आणि विष्ठामूत्र-परित्यागकालांत । तथा क्षुधा-पिपासा एक वेळेंत । जयासि होतसे व्यामोह प्राप्त । त्या दिवसापासून तो एक वर्षानें मरतो ॥ ३८ ॥ जो अकस्मात् वृक्षांचे अग्रभागीं । गंधर्वनगर देखे अनुरागी ।

किंवा कृष्णवर्ण तथा पिंगलवर्ण अंगीं । आपल्या आहे हें देखतसे ॥ ३९ ॥ तोही एक वर्षानंतर । मृत्यु पावतसे नर । आणि काक गोमायु सारस गृध्र । इत्यादि पक्षी मांसभक्षक जे ॥ ४० ॥ तथा जे असती उष्ट्र खर । तथा दंतविरहित वृश्चिकही प्रखर । तथा भूतपिशाच्च निशाचर । जेवढे मांसभक्षक दुष्ट ॥ ४१ ॥ त्यांतील जीव कोणी एक । अथवा मांसभक्षणार्थ अनेक । ज्याकडे धांवती तो एक । वर्षानंतर मरतसे ॥ ४२ ॥ याप्रकारें स्वप्नांत । जो त्या गृध्रादिकांसि देखत । तो पुरुष होतसे मृत । एक वर्षानंतर ॥ ४३ ॥ ज्याला दुसरे अरुंधती तारा । अथवा दाखविती ध्रुव तारा । किंवा त्या रजनीनाथ चंद्रा । मध्यें श्यामता दाखविती ॥ ४४ ॥ अथवा निर्मल आकाशांत । दक्षिण-उत्तर दिशांमाजीं स्थित । दीर्घ मंद प्रभा दाखवितात । तथापि ज्यास दिसेना ॥ ४५ ॥ तो एक वर्षानंतर पावे मृत । किंवा एक वर्षापूर्वीं मरत । परंतु ज्या तिथीस देखे तें निमित्त । पुन्हां त्या मास तिथीस देखेना ॥ ४६ ॥ एवढ्यानें एक वर्षांतील । मृत्युचिन्हें निरूपिलीं सकल ।; आतां सांगूं षण्मासीं प्रांजल । मरण-लक्षणें शास्त्रोक्त ॥ ४७ ॥ जो श्याम वस्त्रासि देखे श्वेत । अथवा श्वेतासि श्याम देखत । तो षण्मासांनीं पावे मृत । हें निश्चित जाणावें ॥ ४८ ॥ जो सूर्यास अथवा चंद्रास । आकाशांतून पडलेले भूमीस । किंवा भूमिस्थित पदार्थांस । आकाशांत देखतसे ॥ ४९ ॥ किंवा आकाशस्थित पदार्थ । भूमीवरी आहे ऐसें विलोकित । तो पुरुषही होतो मृत । सहा मासांनंतर ॥ ५० ॥ रोगादिक कारणांवांचून । ज्याचें ओष्ठ तालु जाती शुष्क होऊन । अथवा ज्याचें शरीर चक्रासमान । करितसे भ्रमण सर्वदा ॥ ५१ ॥ किंवा जो पर्वतादिक स्थावर । पदार्थांचें भ्रमण देखे नर । चालणारे पदार्थ पाहे स्थिर । तो षण्मासांनीं मरतसे ॥ ५२ ॥ घंटेचा शब्द ऐकूं नये ज्यासि । किंवा पंकयुक्त तथा रजयुक्त भूमीसी । ज्याच्या पायाचीं चिन्हें खंडितपणासि । वारंवार पावतात ॥ ५३ ॥ तो षण्मासांत मृत्यु पावे ।; आतां तीन मासांचे बरवें । मृत्युकारक चिन्ह

परिसावें. । शिष्या सर्वांस कळावया ॥ ५४ ॥ अंगुलीनें केलिया नेत्रपीडन । अस्मदादिक जीवासि खद्योतासमान । दिसतात जे तेजाचे सूक्ष्म कण । ते नेत्रपीडनें ज्यासि न दिसती ॥ ५५ ॥ तो तीन मासानंतर मरे ।; आतां एकमासीं मृत्यु करणारें । चिन्हांचें निरूपण करूं बा रे । श्रवण करीं तें शिष्यराया ॥ ५६ ॥ ज्याचे नेत्रादिक इंद्रियेंकरून । शब्द-स्पर्श-रूप-रस-गंधादि विषय जाण । पूर्वींसारखे यथार्थ न होय ग्रहण । तो एक मासानंतर मरतसे ॥ ५७ ॥ आणि देवतादिकांचें शरीर । प्रत्यक्ष प्रतीत कोठून होणार । त्या देवता वचन कथिती जर । तरी तो मासानें मृत्यु पावे ॥ ५८ ॥ ज्याचें मस्तक अग्निज्वालायुक्त । राहे तो एक मासानें पावे मृत । जो दिवसा देखे उल्कापात । किंवा रात्रीं इंद्रधनुष्य पाहे ॥ ५९ ॥ मेघविरहित आकाशांत । जो विलोकीतसे तेज विद्युत् । अथवा मेघयुक्त आकाशीं विद्युत् । नाहीं दिसत जयासि ॥ ६० ॥ तो मासानें पावे मरण । आणि दर्पणादिकांत आपलें आपण । प्रतिबिंब ज्यासि दिसत नसून । काकमैथुन जो देखतसे ॥ ६१ ॥ अथवा पाहे हंसाचें मैथुन । किंवा देखे मयूरमैथुन जाण । तो एक मासानंतर मरण । तो पुरुष पावतसे ॥ ६२ ॥ अथवा जो रुक्ष पदार्थांस स्निग्ध । देखे शीतल पदार्थ उष्णविध । किंवा उष्ण पदार्थांसि शीतलप्रद । देखे तो एक मासानें मृत्यु पावे ॥ ६३ ॥ स्नान केलियानंतर । जलयुक्त आर्द्र होतें सर्वांग इतर । आणि हृदय पाद दोन्ही अंगें शीघ्र । शुष्क होती तो मासांत मरतसे ॥ ६४ ॥; आतां अर्धमासांत मरण । करणारीं चिन्हें करूं निरूपण । जो अकस्मात् भूमीस छिद्र देखे आपण । किंवा भूमिछिद्रांतूनि ॥ ६५ ॥ उद्भवलेले शब्द श्रवण करी । तो पुरुष अर्धमासानंतरीं । किंवा अर्धमासांत खरोखरी । मृत्युसदनीं जातसे ॥ ६६ ॥ जयासि सूर्यकिरण शीतल वाटती । चंद्रकिरणांची उष्ण प्रतीति । किंवा रक्तकमलासमान मुखस्थिति । जया नराची होतसे ॥ ६७ ॥ अथवा ज्याची जिव्हा प्रज्वलित । अग्नीचे वर्णासारखी होत । किंवा ज्याचे दोन्ही कर्ण

* * *

तटस्थ । अश्वकर्णवत् स्तब्ध होती ॥ ६८ ॥ अथवा ज्याचे नाभीं तथा हृदयीं । आणि तालुस्थानीं कंप होई । तो अर्धमासांत जाई । मृत्युसदनीं अवश्य ॥ ६९ ॥; आतां सप्त दिवसांत मरण । करणारीं चिन्हें करितों निरूपण । अकस्मात् ज्याचे शरीरांतून । अग्निज्वाला प्रकट होती ॥ ७० ॥ तो पुरुष सप्त दिवसांत होय मृत । जो सप्तर्षि तारा आदित्यादि केतूपर्यंत । नवग्रहांसि जो न देखत । तो सप्त दिवसांत मरतसे ॥ ७१ ॥ जो न देखे स्वजिव्हा नासिकासि । जो कार्य करितां पावे कार्य-विस्मृतीसि । उष्णता ज्याचे पूर्वार्धे शरीरासि । राहे शीतलता उत्तरार्धा ॥ ७२ ॥ ज्याचे अत्यंत विकासानें नेत्र । सर्वदा होतात मंडलाकार । शिथिलता पावून ज्याचे द्वय श्रोत्र । स्थानच्युत होत गेले ॥ ७३ ॥ किंवा ज्याचें नासिक वक्र होतें । तो सप्त दिवसांत पावे मरणातें ।; आतां एक दिवसांतील मृत्युचिन्हातें । निरूपण करीतसें ॥ ७४ ॥ दक्षिणेस सूर्य स्थित झालिया । नियमेंकरून आपुली छाया । उत्तर दिशास्थित होतां जया । दक्षिणेस दिसतसे ॥ ७५ ॥ त्याच दिवशीं शस्त्रादिकेंकरून । तो पुरुष पावे मरण । आणि भोजनार्थ सिद्ध केलेलें अन्न । जो अपूर्व स्त्री भक्षितां देखे ॥ ७६ ॥ त्याच दिवशीं त्याचें होय मरण । आणि वृषभीं किंवा महिषावरी बैसून । ज्याचे हातीं दंड ऐसा भयानक रक्तवर्ण । केश मोकळे सोडलेला पुरुष ॥ ७७ ॥ अथवा मोकळे सोडून रक्तकेश । जिनें हातांत ग्रहण केले पाश । ऐशी भयानक स्त्री भोजनकालीं जो पुरुष । पाहे तो तद्दिनीं मृत होतो ॥ ७८ ॥ या प्रकारें तीन दोन एक वर्षाचीं । षण्मास एक मास अर्धमासाचीं । सप्त दिवस एक दिवसाचीं । जेवढीं मृत्युचिन्हें कथियेलीं ॥ ७९ ॥ त्यांतील एक दोन किंवा बहुत । ज्या तिथीस जो पुरुष विलोकित । त्या तिथीस वर्षादि काल अवधींत । पुनरपि देखत नसे तो ॥ ८० ॥ याप्रकारें जागृत अवस्थेंतलीं । मरणचिन्हें स्पष्ट निरूपिलीं ।; आतां स्वप्नावस्थेंत चिन्हें सांगूं प्राकृत बोलीं । वशिष्ठसंहितेंतील तीं ॥ ८१ ॥ जो स्वप्नांत कृष्णदंताचा पुरुष । किंवा देखे कृष्णवर्णाचा विशेष । तो स्वप्नद्रष्टा मरणास ।

पावतो थोडे कालांत ॥ ८२ ॥ स्वप्नांत ज्याच्या शरीराप्रति । वराह मर्कट नेती किंवा भक्षिती । तो स्वप्नद्रष्टा षण्मासाअंतीं । मरण पावतसे निश्चयें ॥ ८३ ॥ जो स्वप्नांत पदार्थ पीतवर्ण । भक्षी अथवा करी वमन । अथवा भक्षी मधुयुक्त अन्न । तें दुःस्वप्न जाणावें ॥ ८४ ॥ तो स्वप्नद्रष्टा षण्मासीं होय मृत । जो स्वप्नीं कमल श्वेत । आपल्या मस्तकीं किंवा कंठादिकांत । धारण करितसे ॥ ८५ ॥ जो स्वप्नीं गर्दभ-वराह-उष्ट्रयुक्त । रथावरी आरूढ होत । किंवा गर्दभ-वराह-उष्ट्र-पृष्ठीं बैसत । षण्मासांत मरतसे तो ॥ ८६ ॥ जो कृष्णवर्ण सवत्स कृष्ण गायीस। फिरतां देखे दक्षिण दिशेस । तो स्वप्नद्रष्टा मरणास । षण्मासांत पावतसे ॥ ८७ ॥ रक्तवर्ण जपाकुसुममालेसि । किंवा शेवाळाची धरिली माळ कंठासि । जो तैल मर्दूनि नग्न दक्षिणेसि । एकला जाई तो अष्टममासीं मरतसे ॥ ८८ ॥ जो स्वप्नांत आपल्या हस्तस्थित । देखे गृध्र काकादिक आलेले भक्षणार्थ । रक्तवस्त्रें झालेला प्रसन्नयुक्त । रक्तगंध रेखिलेला ॥ ८९ ॥ तैलांगीं झालेला क्षुधापिपासातुर । श्वानादि क्रूर जीवें भय पावला शीघ्र । दक्षिण दिशेस गमन करी तो नर । षण्मासांत मृत्यु पावे ॥ ९० ॥ जो स्वप्नीं कृकलास म्हणजे सरठाला । पाहे आपलें वाहन झालेला । तो पुरुष मरणाला । षण्मासांत पावतो ॥ ९१ ॥ आणि स्वप्नीं धरिलेले लोहदंडाला । ऐसे कृष्णवर्ण पुरुषाला । देखे तो पुरुष पंचत्वाला । तीन दिवसांत पावतो ॥ ९२ ॥ कृष्णवस्त्रें केलेलीं परिधान । कृष्णगंधयुक्त स्नेहेंकरून । कोणी स्त्री स्वप्नीं देई आलिंगन । तो दश दिवसांत मरतसे ॥ ९३ ॥ किंवा त्या दिवशीं अरुणोदयकालीं । अथवा मरे सूर्योदय वेळीं । याप्रकारें स्वप्नींचीं कथिलीं । मृत्युकारक लक्षणें ॥ ९४ ॥; तीं स्वप्नें दोन प्रकारचीं असत । एक पुण्यपापादि अदृष्ट सामग्रीजनित । दुसरें कफ-वात-पित्त-दोषत्रयजनित । विषमता दृष्ट-सामग्रीचें ॥ ९५ ॥ तथा काम क्रोध लोभ भय । चिंतनादि दृष्ट-सामग्रीनें होय । त्या दोन्ही स्वप्नांत दृष्ट-सामग्रीविण होय । केवल अदृष्ट-सामग्रीजन्य जें ॥ ९६ ॥ त्या स्वप्नांत पाहिलेलीं

चिन्हें पूर्वोक्त । स्वप्नद्रष्ट्यासि अवश्य मृत्युफल देत । आणि दृष्टसामग्रीजन्य स्वप्नांत । पूर्वोक्त चिन्हें मृत्युफल न देती ॥ ९७ ॥ म्हणून तें स्वप्न जाणावें निष्फळ । आणि वातपित्तादि दृष्ट-सामग्रीवांचून केवल । पुण्यपापादि अदृष्ट-सामग्रीनें होईल । जें स्वप्न रात्रीं चार प्रहरभेदें ॥ ९८ ॥ पडे स्वप्न प्रथम प्रहरांत । त्याचें फल होय वर्षें किंवा एक वर्षांत । द्वितीय प्रहरीं स्वप्न देखे रजनींत । त्याचें फल होत षण्मासीं ॥ ९९ ॥ तृतीय प्रहरांत स्वप्न पाहे । त्याचें फल तीन मासें लाहे । चतुर्थ प्रहरीं स्वप्न देखताहे । दोन दोन घटिका भेदानें ॥ १०० ॥ प्रथम दोन घटींतील फल । एकमासीं स्वप्नद्रष्ट्यासि होईल । दुसऱ्या दोन घटिकेंतील । स्वप्नफल एकपक्षांत होतसे ॥ १ ॥ चतुर्थ प्रहराच्या तिसऱ्या घटिका दोन्ही । त्यांत स्वप्नद्रष्टा जें देखे स्वप्नीं । त्याचें फल होतें दशदिनीं । आणि शेवटच्या दोन घटिकेंतलें ॥ २ ॥ स्वप्नाचें त्याच दिवशीं होतें फल । आणि वात पित्त कफ काम क्रोध जाल । इत्यादि दृष्ट-सामग्रीजन्य निष्फळ । स्वप्नद्रष्ट्यासि होतसे ॥ ३ ॥ ज्या स्वप्नाचें उत्तर कालांत । दुसरें स्वप्न झालिया प्राप्त । प्रथम स्वप्न तें निष्फल होत । अनेक दोषवशें स्वप्न तेंही निष्फल ॥ ४ ॥ म्हणूनि वातपित्तादि दृष्ट-सामग्रीजन्य । किंवा पुण्यपापादि अदृष्टजन्य । स्वप्न आहे ऐसा विचार केल्याविण । नियमें फलद्रूप होत नसे ॥ ५ ॥ आणि जागृतावस्थेंतील मृत्युचिन्हें जाण । जीं पूर्वोक्त केलेलीं कथन । त्यांचें फल निःसंशय नियमेंकरून । त्या द्रष्ट्या पुरुषास प्राप्त होतें ॥ ६ ॥ याप्रकारें कौषितकी ऋषीनें । तथा वशिष्ठें कथिलीं मृत्युलक्षणें । जागृत् तथा स्वप्नींचीं जाणणें । फलव्यवस्था शिष्या रे ॥ ७ ॥ जो विषयासक्त असे अत्यंत । त्यासि मृत्युचिन्हांचे दर्शनें खचित । अवश्य वैराग्य होतें प्राप्त । म्हणूनि कथिलें ऋषिवर्यें ॥ ८ ॥ जैसें गर्भोपनिषदाचे विचारें । तथा मृत्युचिन्हांचे दर्शनें बा रे । पुरुषासि वैराग्य होतें खरें । तैसें हंसादिक उपनिषदांत ॥ ९ ॥ कथिलेल्या अष्टांगयोगेंकरून । परम वैराग्य होतें उत्पन्न । म्हणून वैराग्यार्थ

योग कीजे संपादन । अधिकारी यानें अवश्य तो ॥ ११० ॥ वैराग्यानंतर गुरूपदिष्टासि । सहज प्राप्त होणें मोक्षसुखासि । तो अमृतत्व मोक्ष कर्म-धनेंसीं । अप्राप्त असे पुत्रादि प्रजें ॥ ११ ॥ श्रुतिकर्मैंकरून तथा पुत्रादि-प्रजेंकरून । आणि सुवर्णादि धनें जाण । अमृतभावाची प्राप्ति शिष्या सुजाण । होत नाहीं सर्वथा ॥ १२ ॥ कां तरी पूर्वपुरुष पूर्वविद्वान् । कर्म प्रजा धन सर्वथा त्यागून । त्या त्यागरूप संन्यासेंकरून । अमृतभावासि प्राप्त होते झाले ॥ १३ ॥ आतां ज्यांचेठायीं ईषणा तीन । विद्यमान वर्तती त्यांनीं 'परमहंस-संन्यास' ग्रहण । कधीं करूं नये प्रथम ब्रह्मचर्याश्रम ग्रहण । करूनि नंतर गृहस्थाश्रम करावा ॥ १४ ॥ गृहस्थाश्रमानंतर वानप्रस्थ स्वीकार । तदनंतर-कुटीचक-बहूदक हंस निर्धार । या तीहींतील एक संन्यास घ्यावा सत्वर । परंतु ईषणावानानें संकल्पही न कीजे ॥ १५ ॥ इहपरलोक-विषयेच्छा-सुखास । ज्यानें सर्वथैव त्यागिलें खास । त्यानें घ्यावा अवश्य परमहंस-संन्यास । ईषणात्रयरहित होऊनि ॥ १६ ॥ ईषणाविरहित मोक्षेच्छावान् जो असत । त्या वैराग्यसंपन्नानें सेवूनि ब्रह्मचर्य व्रत । संन्यास घ्यावा किंवा ग्रहस्थाश्रमीं निरंतर त्वरित । अथवा वानप्रस्थाश्रमानंतर ॥ १७ ॥ घ्यावा परमहंस-संन्यासाश्रम् । त्याविषयीं कांहीं नाहीं नियम । परंतु विरक्तानें ब्रह्मचर्यापूर्वीं यतिआश्रम । सहसा ग्रहण करूं नये ॥ १८ ॥ स्ववर्णाश्रमधर्मैं ज्यासि तीव्र वैराग्य । संपन्न असूनि नेत्रादिक इंद्रिय । किंवा स्ववर्णाश्रमरहित नेत्रादि इंद्रिय । तोचि परमहंस-संन्यासाधिकारी योग्य असे ॥ १९ ॥ वेदविद्येची प्राप्ति करणारे । ब्रह्मवेत्ता गुरुकुलवासादि धर्म सारे । त्या धर्मवानाचें 'व्रती' नाम आहे रे । त्याहूनि भिन्न ते 'अव्रती' ॥ १२० ॥ गुरुसमीप निवास करून । एक दोन चार ज्यानें केलें वेदाध्ययन । ब्रह्मचर्याश्रम संपविला त्याचें नामाभिधान । 'स्नातक' ऐसें जाणावें ॥ २१ ॥ अल्पवेद-अंशाचें ज्यानें केलें अध्ययन । तयासि 'अस्नात' म्हणती जाण । ज्यानें पूर्वीं श्रौतस्मार्ताग्नि केला ग्रहण । तो अग्नि स्त्रीमरणादि-निमित्तें नष्ट होतो

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

॥ २२ ॥ त्याचें नाम आहे 'उत्सन्नाग्नि' । ज्यानें घेतला नाहीं श्रौतस्मार्ताग्नि । धनादि पदार्थ न करी ग्रहण असूनि ।
तोही 'अनग्निक' जाणावा ॥ २३ ॥ व्रती-अव्रती-स्नातक-अस्नातक । उत्सन्नाग्निक-अनग्निक । या षट्प्रकारें तीव्र
वैराग्य ज्यासि सम्यक् । प्राप्त होतें त्यांनीं परमहंस-संन्यास घ्यावा ॥ २४ ॥ आणि 'कुटीचक' 'बहूदक' 'हंस' । तीव्र
वैराग्य प्राप्त झालियास तरी 'परमहंस'-संन्यास । त्यांनीं ग्रहण करावा ॥ २५ ॥ परंतु तीव्र वैराग्यावांचून । कोणींही
कोणत्या कालीं जन । तो परमहंस-संन्यास ग्रहण । सर्वथा करूं नये ॥ २६ ॥ जाबालोपनिषदाचें चतुर्थ खंडांत ।
परमहंस ग्रहणकाल अधिकारीसहित । निरूपिला तो सांगूं विहित । सर्वांसि सुलभ समजावया ॥ २७ ॥ सर्व अवस्थांत
त्या संन्यासाचें । मुख्य कारण वैराग्यचि असे साचें । त्या वैराग्यावीण ग्रहण संन्यासाचें । कोणत्याही अवस्थेंत
होत नाहीं ॥ २८ ॥ म्हणूनि संन्यासग्रहणाचा काल । वैराग्यचि आहे मुख्य केवल । वैराग्यभाग्योदयावीण फोल ।
सगळेंचि निरर्थक जाणावें ॥ २९ ॥ अधिकारीपुरुषांस उक्त । बाल्य-युवा-वृद्धावस्थेंत । ज्या दिवशीं ज्या क्षणांत ।
तीव्र वैराग्य प्राप्त होय ॥ १३० ॥ त्या अधिकारी पुरुषांनीं । त्या अवस्थेंत त्या दिनीं क्षणीं । संपूर्ण कर्मांचा
परित्याग करूनि । संन्यास-आश्रम घ्यावा तो ॥ ३१ ॥ गुरु सांगती शिष्यासि । ऐसें सर्वोत्कृष्ट सर्वोत्तम विश्वंभर
संन्यासी । दत्तात्रेयस्वामी पूर्णब्रह्मस्वरूपासि । दावूनि करिती जगत्पावन ॥ ३२ ॥ धीपुरांत प्रकट असूनि ।
विश्वोद्भवस्थितिलय करिती अनुदिनीं । परमेश्वर करणी न जाणती अज्ञानी । प्रपंचमोहांत गुंतले ॥ ३३ ॥ यदर्थीं
ऐका श्रीगुरुलीलामृत । शालिवाहन शके सत्राशें त्र्याण्णवांत । मी ब्रह्मनिष्ठ वामन गुरुभक्त । कडपगांवां स्टेशनावर
उतरूनि ॥ ३४ ॥ शौचमुखमार्जनादि आटोपून । अक्कलकोटीं श्रीदत्तात्रेयदर्शन । करावया टांग्यांत बसून ।
नासिकांतील स्वर पाहिला ॥ ३५ ॥ तेव्हां सूर्यस्वर उदयसहित । पृथ्वीतत्त्व-संयुक्त स्पष्ट होता वाहत । आणि

श्रीमद्गुरुदर्शन चंद्रस्वरांत पृथ्वी । किंवा जलतत्त्व असतां व्हावें ॥ ३६ ॥ दिवसां चालतसे चंद्रस्वर । सूर्य वाहे रात्रभर । ऐसा स्वरोदय-अभ्यास उक्त निरंतर । नियमाप्रमाणें असूनि ॥ ३७ ॥ वायु वाहे कृष्ण-पिंगलात्मक । तो निरोधार्थ प्रयत्न केले अनेक । परंतु शुक्ल इडात्मक स्वर सम्यक् । होईना ऐसें जाणूनि ॥ ३८ ॥ अक्कलकोट ग्रामासमीप । श्रीरामचंद्राचें देवालय भव्यरूप । ज्या श्रीसीतारामदर्शनें त्रिविधताप । निरसती सर्वथा समूल ॥ ३९ ॥ त्या श्रीसीतारामाचें दर्शन घेऊन । करूनि रामपदां नमन । उजवे नासिकेंत बोळा बसवून । मृदु सूक्ष्म कापसाचा ॥ १४० ॥ बळेंचि युक्तीनें केला चंद्रस्वर । तेकालीं अक्कलकोटीं दयासागर । राजवाड्यासमीप श्रीगुरुविश्वाधार । भांडारखान्यांत बैसलेले ॥ ४१ ॥ तेथें गेलों मी तात्काल । घेऊनि नागवल्ली पानें श्रीफल । सोप्यांत विराजित दत्तदयाळ । साष्टांग नमिले अनन्य ॥ ४२ ॥ सर्व पदार्थ प्रभुपुढें ठेविले । पुष्कळ लोक दर्शनार्थ उभे राहिले । स्वामीसमर्थांच्या नामें चाले । जयजयकार प्रवाह ॥ ४३ ॥ पुष्पहार अर्पिती सुगंध । तेणें चोहोंकडे परिमल भरला अगाध । त्याकालीं जगदात्मा अनेकविध । सूर्यनासिकेस निरोधिती ॥ ४४ ॥ म्हणती आतां करावें काय । गुरुदर्शनार्थ चंद्रस्वर अमृतमय । पाहिजे असूनि चंद्रस्वरोदय । काम होतसे प्रियभक्ता ॥ ४५ ॥ नासिकांत वायु निरोधिला जरी । तथापि प्राणव्यापक सर्व शरीरीं । इंद्रिय व्यापार चालविती निर्धारीं । अंतःकरणसहित ते ॥ ४६ ॥ प्राणनिरोध पातंजलशास्त्रमत । हटयोगें शरीर आणि शुद्ध व्हावें चित्त । यास्तव साधनें अष्टांगयोगविहित । आहेत प्रसिद्ध पुष्कळ तीं ॥ ४७ ॥ अनेक स्वरोदय-अभ्यास । साधनें असतीं बहुवस । तूं प्राप्त होऊनि ब्रह्मात्मा-साक्षात्कारास । नाकांत बोळा कां ठेविला ॥ ४८ ॥ नाकांतील काढीं रे कापूस । हें दृश्य शरीर कापसासम खास । अग्नि वायु स्पर्श पावेल यास । केवल क्षणभंगुर नाशिवंत ॥ ४९ ॥ भवतारक गुरुपादुका असतां । ब्रह्मात्मतत्त्व ओळखूनि बैसतां । ऐसें असूनि पुनरपि शीणतां ।

साधनप्रयासीं कासया ॥ १५० ॥ अनेक श्रुतियुक्त सिद्धांत । मी परमात्मा उपाधिरहित । प्रकट होऊनि राहिलों तव हृदयांत । तथापि नाकांत बोळे घालिसी ॥ ५१ ॥ समर्थमुखींचें बोधरूपी पीयूष । श्रवण करूनि सविशेष निर्विशेष । नाकांतील बोळा निःशेष । काढूनि टाकिला सर्वथा ॥ ५२ ॥ म्हणती तो कार्पासबोळा पाहूनि जन । आश्चर्य मानिती विलक्षण । म्हणती स्वामिराज अंतर्साक्षी नारायण । सर्वज्ञ ब्रह्मरूप सनातन हे ॥ ५३ ॥ अस्तिभातिप्रिय-रूप परमात्मा व्यापक । स्वलीलें एक असूनि अनेक । धारण करी रूपें अलौकिक । जगच्चालक जगद्गुरु ॥ ५४ ॥ या अव्यय प्रभूचा न लागे अंत । यास्तव म्हणती संपूर्ण अनंत । सच्चिदानंदस्वरूप अखंडित । सर्वांतर्यामीं नांदतसे ॥ ५५ ॥ संशयोपाधिरूप कार्पास बोळा । अंतरसाक्षित्वें सहज ओळखिला । सद्बोध शब्दीं दूर केला । तात्काळ सद्गुरु-माऊलीनें ॥ ५६ ॥ तेचि परमेश्वर सद्गुरु दीनदयाल । अवतरूनि जीव सकल । तेच समर्थ कालाचेही काल । मायबाप गुरु म्हणावे ॥ ५७ ॥; शके सत्राशें चव्ऱ्याणव संवत्सरीं । मी ब्रह्मनिष्ठ वामनबुवा प्रज्ञापुरीं । गेलों तेव्हां पटवर्धनाचे गणेशमंदिरीं । नृसिंहमूर्ति विराजित होती ॥ ५८ ॥ मी श्रीफलादि पदार्थ पुढें ठेवून । अनन्यभावें केलें साष्टांग नमन । उभा राहिलों करद्वय जोडून । तों कडकडून बोलले ॥ ५९ ॥ कच्चें मडकें भाजून दिधलें । परमार्थ आत्मसाक्षात्कार घडले । ऐसें असतां येणें कां झालें । प्रतिवर्षीं नियम धरिला ॥ १६० ॥ तरी आतांचें आतां जावें परत । राहूं नये क्षणभरी प्रज्ञापुरांत । हें समर्थवचन ऐकूनि शोकाकुलित । जाहलों अकस्मात् ते कालीं ॥ ६१ ॥ मनीं म्हटलें भक्तीनें तीनशें कोसांवरून । येतों द्रव्याची अडचण सोसून । दिनत्रय मार्गीं उपोषण जागरण । झाल्यानें कैसें जाववेल ॥ ६२ ॥ मजकडून काय घडला अन्याय । म्हणूनि रुष्ट जाहले भगवान् दत्तात्रेय । नाहीं झालें स्नानभोजनादि नेम नित्य । असो जैसी सद्गुरुइच्छा ॥ ६३ ॥ गुरुआज्ञा शिरसा मानून । दत्तात्रेयस्वामींस करूनि नमन । सामान बिछाना हातीं घेऊन ।

आलों सावकार विहिरीपाशीं ॥ ६४ ॥ शौचमुखमार्जनादि केलें । स्वच्छोदकानें चूळ भरिलें । आतां स्टेशनाकडे पाहिजे गेलें । परंतु तांग्याची वेळ नाहीं ॥ ६५ ॥ तांगे वाहनें गाड्या जाती तृतीयप्रहरीं । या वेळीं आपणास पादचारी । आज्ञेप्रमाणें जाणें सत्वरीं । विलंब कासया पाहिजे ॥ ६६ ॥ मग मोठ्या बाजारमार्गें । न जातां राजवाड्याच्या दिंडींतून वेगें । निघून गेलों श्रीराम-देवळामागें । लागलों स्टेशनाच्या मार्गासि ॥ ६७ ॥ प्रत्येक वर्षीं निघतेवेळीं । श्रीदत्तात्रेय-गुरुमाउली । उत्तम प्रसादद्वय पूगीफलीं । बोळवित होते नियमानें ॥ ६८ ॥ तोही प्रसाद या समयास । मिळाला नाहीं प्रभूचा खास । तराजु दांडीचा पैसा मज दुर्बळास । दाखवूनि दिधला नाहीं तो ॥ ६९ ॥ इकडे श्रीदत्तात्रेय-स्वामींचें मन । कळवळलें परिक्षून । मला परत आणण्यास मनुष्यें दोन । पाठविलीं त्वरेनें ॥ १७० ॥ तीं मजला मारिती हांका । अहो बुवा पुढें जाऊं नका । दत्तगुरूची आज्ञा ऐका । म्हणूनि आले समीप ॥ ७१ ॥ स्वामीमहाराजांनीं अति सत्वरीं । आपणास पाचारिलें खरोखरी । निःसंशय चला माघारीं । विचार करणें नकोच ॥ ७२ ॥ मग मजला धरूनि करीं । नेलें सत्वर गणपतिमंदिरीं । म्यां साष्टांगीं सद्गुरूस प्रेमभरीं । नमिलें त्या आनंदासि पार नसे ॥ ७३ ॥ तेव्हां स्वामिराज बोलती हांसून । तुझी पक्की परीक्षा झाली पाहिलें मन । या खेपेस योगशास्त्राचे प्रश्न । आम्हांस विचारावयासि ॥ ७४ ॥ आला असूनि आज्ञें गेलास परत । तेणें आम्ही झालों संतोषित । आतां रहावें स्वस्थ-चित्त । एकमास अवश्य येथें ॥ ७५ ॥ चोळाप्पासि योगीश्वर आज्ञापिती । पाहतोसि काय त्वरितगति । स्नानादि करवून वेदपद्धती । आमचें पूजन करवावें ॥ ७६ ॥ उत्तमान्नें भरलेलें पात्र । स्वच्छोदक तयासि अर्पावें लौकर । दें दत्तवचन परिसूनि आनंद फार । जाहला मजला श्रोते हो ॥ ७७ ॥ नंतर करूनि स्नानसंध्यावंदन । दत्तात्रेय-स्वामींचें केलें पूजन । आज्ञेनुसार प्रासादिक भोजन । जाहलें यथेच्छ श्रीकृपें ॥ ७८ ॥ नंतर योगशास्त्रांतील प्रश्नोत्तरें । सर्वोत्कृष्ट अनुभवसह युक्तिप्रकारें । बोधिलीं स्वयें

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

गुरु-दत्तदिगंबरें । ब्रह्मानंदलहरीचीं ॥ ७९ ॥ सर्वज्ञ सर्वसाक्षी स्वयंप्रकाश । हृदयीं प्रकटूनि अर्पिलें निजयश । करवूनि मुक्त मायाअविद्यापाश । निजात्मस्वरूपीं स्थिर केलें ॥ १८० ॥ रोग्याचा प्राण परत आला जैसा । मग चोहोंकडे आयुरारोग्य विश्वासा । आनंदाब्धि उचंबळे जैसा । तैसें जाहलें मज वामनासि ॥ ८१ ॥ दत्तात्रेय-गुरुलीला-सामर्थ्य अपार । तोचि तारिता पूर्णब्रह्म परमेश्वर । त्या चरणांविण दासासि संरक्षणार । ब्रह्मांडांत कोणी इतर नसे ॥ ८२ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । एकपंचाशत्तमाध्याय गोड हा ॥ १८३ ॥

इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे एकपंचाशत्तमोध्यायः समाप्तः ॥ ५१ ॥ श्रीगुरुदेवदत्त-स्वामीसमर्थ ॥ ॥

# ॥ अध्याय बावन्नावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्तदिगंबर-स्वामिने नमः ॥ ॥ गर्भोपनिषदांत कथिलेले । या शरीरव्यवस्थेचे विचार चांगले । सावधान होऊनि शिष्या भले । वैराग्यास्तव श्रवण करीं ॥ १ ॥ ब्रह्मदेवाच्या शरीरापासून । तों श्वानापर्यंत असतीं शरीरें संपूर्ण । तीं सकल पंचभूतरूप असून । त्या भूतांचें कार्य श्रोत्रादिकांसि आश्रय आहे ॥ २ ॥ आकाश-वायु-तेज-जल-पृथ्वीस । पंचमहाभूतें म्हणती बुद्धिमान पुरुष :। तीं भूतें सर्व प्राणियांचे देहीं वास । करिती स्थूल सूक्ष्म समानरूपें ॥ ३ ॥ त्या सूक्ष्म भूतांपासून । सूक्ष्म शरीर होतें उत्पन्न । प्रथम आकाशाचे सात्त्विक अंशेंकरून । श्रोत्रेंद्रियें उत्पन्न होतीं ॥ ४ ॥ वायूच्या सात्त्विकांशें त्वचा-इंद्रिय । तेजाच्या सात्त्विकांशें चक्षु-इंद्रिय । जलाच्या सात्त्विकांशें रसनेंद्रिय । आणि पृथ्वीच्या सात्त्विकांशें घ्राणेंद्रिय ॥ ५ ॥ हीं श्रोत्रादिक पंचइंद्रियें जाण । शब्दादि विषय-ज्ञानाचें कारण । यास्तव शास्त्रवेत्ते तयांसि ‘ज्ञानेंद्रियें’ अभिधान । स्पष्टपणें कथन करिती ॥ ६ ॥ आकाशाचे राजसांशें वाणी । वायूच्या राजसांशें इंद्रिय-पाणि । पाद तेजाचे राजसांशेंकरूनि । जलाच्या राजसांशें उपस्थ-इंद्रिय ॥ ७ ॥ आणि पृथ्वीचे राजसांशें गुद-इंद्रिय । उत्पन्न होतीं हें वाकादि पंचक-इंद्रिय । शब्दोच्चारादि क्रियेचें कारण होय । म्हणून त्यांसि ‘कर्मेंद्रियें’ म्हणती ॥ ८ ॥ आकाशादि पंचभूतांचे सात्त्विकांशेंकरून । उद्भवतें ज्ञानशक्तिवान् अंतःकरण । आणि राजसांशें क्रियाशक्तिवान् । प्राण उत्पन्न होतसे ॥ ९ ॥ प्राण-अपान-व्यान-उदान-समान । या पंचप्रकारें ओळखिला जातो प्राण । नाग-कूर्म-कृकल-देवदत्त-धनंजय जाण । ऐसे प्राण दश प्रकारचे असती ॥ १० ॥ सर्व देहधारी

जीवांचें हृदयकमलस्थित । ज्ञानशक्तीचें अंतःकरण असत । तें मन-बुद्धि-अहंकार-चित्त । ऐशा चार प्रकारें होतसे ॥ ११ ॥ ऐशीं पंच ज्ञानेंद्रियें आणि पंच कर्मेंद्रियें जाण । अंतःकरण-चतुष्टय आणि पंचप्राण । ह्या संपूर्ण समुदायास 'सूक्ष्म-लिंगमय' विद्वान् । शास्त्रवेत्ते म्हणतात ॥ १२ ॥ हें सूक्ष्म-शरीर अपंचीकृत । सूक्ष्म भूतांचें कार्य असत । तथा नेत्रादि इंद्रियांचा अविषय होत । म्हणून त्यासि 'सूक्ष्मशरीर' म्हणती ॥ १३ ॥ आणि हें स्थूल शरीर पंचीकृत । स्थूल भूतांचें कार्य असत । नेत्रादि इंद्रियांचा विषय होत । म्हणून त्यास 'स्थूलशरीर' म्हणती ॥ १४ ॥ तें स्थूलशरीर दोन प्रकारचें । अध्यात्म आणि अधिदैव साचें । तसेंच सूक्ष्म शरीरही द्वयभेदाचें । अध्यात्म आणि अधिदैव ॥ १५ ॥ प्रथम तत्पदार्थरूप अधिदैव-स्वरूपास । श्रवण करावें स्थिरमानस । समष्टि-सूक्ष्मरूप 'हिरण्यगर्भ' खास । अधिदैव-सूक्ष्मशरीर असे ॥ १६ ॥ आणि समष्टि-स्थूलरूप 'विराट' असे । अधिदैवरूप स्थूल शरीर वसे । अतल वितल सुतल तलातल ऐसें । महीतल रसातल पाताल सप्त प्रकारें ॥ १७ ॥ हे सप्त अधोलोक त्या विराटाचे । दोन पाद आहेत साचे । ऊर्ध्व भूलोक विराट् भगवानाचे । जघनस्थान असे हो ॥ १८ ॥ अंतरिक्षलोक नाभीस्थान । स्वर्गलोक हृदयभुवन । कंठापासून मुखापर्यंत स्थानासि जाण । महर्लोक अभिधान ॥ १९ ॥ मुखापासून नेत्रापर्यंत । जनोलोक विराटस्थान शोभत । तपोलोक ललाट असत । सत्य शिरस्थान आहे ॥ २० ॥ याप्रकारें विराट-भगवान् । त्या चतुर्दशलोकांचें आहे स्थान । हें तत्पदार्थ स्थूल सूक्ष्म केलें निरूपण । अध्यात्म-अधिदैव-शरीराचें ॥ २१ ॥ आतां त्वंपदार्थरूप अध्यात्म सूक्ष्म शरीर । आणि परिसावें अध्यात्म स्थूल शरीर साचार । अहं-मम अभिमानाचा विषय प्रकार । जी सूक्ष्मव्यष्टि व्यक्ति असे ॥ २२ ॥ त्याचें नाम अध्यात्म-सूक्ष्मशरीर । जयासि 'तैजस' म्हणती तत्त्ववेत्ते नर । आणि अहं-ममाभिमान विषयेतर । जी स्थूलव्यष्टि व्यक्ति असे ॥ २३ ॥ त्याचें नाम अध्यात्म

स्थूल शरीर । त्यासिच 'विश्व' नामें कथिती चतुर । शिष्य विनवी अध्यात्म-अधिदैव-अधिभूत तर । शास्त्रीं कथिलें तीन भेदें ॥ २४ ॥ येथें अध्यात्म अधिदैव हे दोन । भेद असंगत होतील केलेले कथन । या शंकेचें गुरु करिती समाधान । तें स्थूल सूक्ष्म शरीर हें ॥ २५ ॥ ज्याकालीं अध्यात्म अवस्थेसमान । प्रतीत होतें अपरोक्षरूपें करून । त्याकालीं स्थूल-सूक्ष्मासि बुद्धिमान् । 'अधिभूत' या नामें कथितात ॥ २६ ॥ म्हणूनि त्या स्थूल सूक्ष्म शरीरांत । अधिभूत-पदार्थांचा अंतर्भाव होत । आणि त्या स्थूल सूक्ष्माचा अध्यात्म अधिभूत । द्वय मिळून व्यवहार विषय होतो ॥ २७ ॥ तेव्हां स्थावर-जंगम हा भेद । स्थूल सूदिमांत असे अभेद । तीं स्थावर जंगम अंतर्भूत निर्विवाद । होती त्या स्थूल सूक्ष्म शरीरीं ॥ २८ ॥ तात्पर्य स्थावर जंगम देह सगळे । अभिमानी जीव-अपेक्षाबळें । अध्यात्मभावासि पावले । अन्यद्रष्टापेक्षेनें अधिभावासि ॥ २९ ॥ चैत्रनामा पुरुषाचें शरीर जैसें । चैत्राचे अपेक्षेनें अध्यात्मरूप असे । आणि दुसरें मैत्रनामा पुरुषाचे अपेक्षें । अधिभूतरूप आहेच ॥ ३० ॥ याप्रकारें सर्व शरीराविषयीं जाणावें । आणि तें व्यष्टिस्थूल शरीर सर्वं । जरायुज-अंडज-स्वेदज-उद्भिज नांवें । चार प्रकारचें असे ॥ ३१ ॥ मातेच्या उदरीं बालासि आवरण । करणाऱ्या जरायु-चर्मेंकरून । जें शरीर होतसे उत्पन्न । त्याचें नाम 'जरायुज' आहे ॥ ३२ ॥ मनुष्य गाय अश्व जैसें । अजा आदिक शरीर असे ।; आणि अंडापासून जें शरीर उत्पन्न होतसे । त्याचें नाम 'अंडज' आहे ॥ ३३ ॥ पक्षी सर्प मत्स्य जैसे । पिपीलिकादि शरीर असे ।; आणि स्वेदरूप मलापासून होतसे । ज्या शरीराची उत्पत्ति ॥ ३४ ॥ त्याचें नाम 'स्वेदज' आहे । जैसें मत्कुण यूकादि शरीर पाहें ।; आणि ज्या देहाचें बीज उर्ध्वाकार परिणामास लाहे । त्याचें नाम 'उद्भिज' असे ॥ ३५ ॥ त्या उद्भिजाचे प्रकार द्वय । एक असे पापकर्मजन्य । द्वितीय असे पुण्यकर्मजन्य । या भूमिलोकांमाझारीं ॥ ३६ ॥ ते वृक्षलतादिक आहेत । तथा यमयातनेचें शरीर नरकस्थित ।

तीं दोन्हीं उद्भिज शरीरें होत । पापकर्मजनित कीं ॥ ३७॥ आणि जें देवताशरीर स्वर्गलोकीं स्थित । तें पुण्यकर्मजन्य उद्भिज असत । ऐसे चार प्रकारचे देह कथित । केले सर्वांसि कळावया ॥ ३८ ॥; आतां पंचभूतांचे सांगूं व्यापार । अवकाश देणें हा आकाश-व्यवहार । संयोग विभाग करणें पदार्थांचा परस्पर । हा व्यापार वायूचा आहे ॥ ३९ ॥ तेजाचा व्यापार अन्न शिजविणें । जलाचा वस्त्रादि शुद्ध आर्द्र करणें । संपूर्ण पदार्थांसि धरणें । हा व्यापार पृथ्वीचा असे ॥ ४० ॥; आतां पंचज्ञानेंद्रियांचें कर्म ऐकणें । श्रोत्राचें ‘शब्द’ ग्रहण करणें । त्वचेंद्रियें ‘स्पर्श’ घेणें । ‘रूप’ पाहणें नेत्रव्यापार आहे ॥ ४१ ॥ रसनेंद्रियें ‘रस’ चाखणें । घ्राणेंद्रियानें ‘गंध’ ग्रहण करणें । आतां पंचकर्मेंद्रिय व्यापार श्रवणें । परिसावें श्रोतीं आदरें ॥ ४२ ॥ ‘वचन उच्चारणें’ हें वाचेचें । ‘वस्तु घेणें देणें’ हें कर्म हाताचें । ‘जाणें येणें’ हें पादइंद्रियांचें । कर्म उघड होतसे ॥ ४३ ॥ पुत्रादिक प्रजोत्पत्तीचें कारण । जो ‘विषयानंद’ आहे जाण । तो उपस्थेंद्रियव्यापार गुण । ‘मलपरित्याग’ गुदकर्म असे ॥ ४४ ॥; आतां प्राणाचे व्यापार करा श्रवण । मुख-नासिकाद्वारें या शरीरांतून । आंत बाहेर करणें गमनागमन । हा ‘प्राणवायूचा’ व्यापार असे ॥ ४५ ॥ मलादिकासि खालीं नेणें । हा ‘अपान’ वायूचा व्यापार जाणणें । अन्नाचें सूक्ष्म रस सर्व नाडींत पोहोंचविणें । हा व्यापार ‘व्यानाचा’ असे ॥ ४६ ॥ अन्नादिकांसि ऊर्ध्व नेणें । हा “उदान’ वायूचा व्यापार जाणणें । भोजनान्न परिपाक व्हावया कारणें । जठराग्नीसि प्रज्वलित करी ‘समान’ ॥ ४७ ॥ उद्गार ढेकर व्यापार ‘नाग’ वायूचे । नेत्रोन्मीलन व्यापार ‘कूर्माचे’ । छिंका शिंका ‘कृकल’-वायूचे । ‘देवदत्ताचे’ विजृंभण जांभई ॥ ४८ ॥ शरीर फुगविणें ‘धनंजय’ व्यापार । आणि जीवन तथा मरणकालीं शरीर । लोकांतरीं उत्क्रमण करणें हे दोन्ही व्यापार । सर्व प्राण्यांचे साधारण असती ॥ ४९ ॥; आतां सांगूं व्यापार अंतःकरण-चतुष्टयाचे । संशयरूप मनन व्यापार ‘मनाचे’ । पदार्थाचा निश्चय करणें हे ‘बुद्धीचे’ । ‘चित्ताचे’ वस्तुस्मरणरूप सामान्य ज्ञान ॥ ५० ॥

* * *

‘अहंकाराचे’ करणें अभिमान ।; आतां आकाशादि भूतांचें स्वरूपलक्षण । करितसें तथा रीतीं निरूपण । श्रोतीं श्रवण करावें ॥ ५१ ॥ अवकाशरूप छिद्र तथा प्रतिध्वनि । ‘आकाशस्वरूप’ जाणावें लक्षणीं । चलितपणा तथा बीसि शब्दांनीं । ‘वायुस्वरूप’ लक्षण समजावें ॥ ५२ ॥ उष्णपणा प्रकाशपण । भुगुभुगु-ध्वनींत ज्याचें लक्षण । बुलबुलु-ध्वनी द्रवीपण स्नेहपण । शुक्ल माधुर्य लक्षण ‘जलाचें’ असे ॥ ५३ ॥ कडकडा शब्द कठीणपण । ‘पृथ्वीचें’ जाणावें स्वरूपलक्षण । आतां पंचभूतांचें तटस्थ-लक्षण । निरूपण करितसें ॥ ५४ ॥ शब्द-गुण आकाशाचें तटस्थ- । लक्षण, वायूचें शब्द-स्पर्श तटस्थ । शब्द-स्पर्श-रूप हीं तीन तटस्थ । तेजाचीं लक्षणें जाणावीं ॥ ५५ ॥ शब्द-स्पर्श-रूप-रस हे चार गुण । जलाचें असे तटस्थ लक्षण । शब्द-पर्श-रूप-रस-गंध हे पंच गुण । पृथ्वीचें तटस्थ-लक्षण समजावें ॥ ५६ ॥; आतां श्रोत्रादि इंद्रियांचे सांगूं विषय । शब्द-गुणवंत आकाश श्रोत्राचा विषय । शब्द-स्पर्श दोन गुणीं वायुत्वचेचा विषय । शब्द-स्पर्श-रूप त्रिगुणीं तेज-चक्षूविषय जाणिजे ॥ ५७ ॥ शब्द-स्पर्श-रूप-रस चारगुणी जल । रसनेंद्रियाचा विषय केवल । शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध पंचगुणी पृथ्वी निर्मल । घ्राणेंद्रियाचा विषय आहे ॥ ५८ ॥ येथें आकाश-जल-पृथ्वी ह्या तिन्हींत । क्रमें शब्द-रस-गंध गुणांचें तादात्म्य- । संबंध अंगिकारून यथार्थ । कथन केले विशद ॥ ५९ ॥ श्रोत्र-रसन-घ्राण हीं इंद्रियत्रय । क्रमें शब्द-रस-गंध गुणासि करिती विषय । परंतु त्या गुणांचे आश्रय । द्रव्यासि विषय करूं न शकती ॥ ६० ॥ आणि त्वचा-चक्षुरिंद्रिय द्वय ऐशीं । तरी रूप-स्पर्शादि गुणासि । तथा त्या रूपादि गुणाचे आश्रय-द्रव्यासि । या दोहोंसि विषय करिती ॥ ६१ ॥ नियमें जीं आकाशादि भूतें जाण । श्रोत्रादि इंद्रियांचे विषय होती आपण । तींच भूतें नियमावांचून । वाकादि इंद्रियांचेही विषय होती ॥ ६२ ॥ जैसें हस्तेंद्रियें नियमेंकरून । पृथ्वीचे करित नाहीं ग्रहण । तथापि उदकाचें मात्र ग्रहण ।

हस्तेंद्रियें करितीं ॥ ६३ ॥ आकाशादि पंच सूक्ष्म भूतें जाण । तथा त्या भूतांचें कार्यरूप इंद्रिय प्राण । अंतःकरणादि व्यष्टिरूपें संचरण । करिती अध्यात्म सूक्ष्मदेहीं सर्व ॥ ६४ ॥ आणि समष्टिरूपेंकरून । वर्तती अधिदैव सूक्ष्म देहांतून । तीं संपूर्ण अत्यंत सूक्ष्म आहेत म्हणून । नेत्रादिकीं त्यांचें ज्ञान होत नाहीं ॥ ६५ ॥ त्या भूतांचे सूक्ष्मतेचें कारण काय । तरी व्यष्टिसमष्टि-सूक्ष्मदेहाचें घटक होय । जें त्या आकाशादिकांत पंचीकरण लय । सूक्ष्मतेचें कारण असे ॥ ६६ ॥; शिष्य म्हणे ज्या पंचीकरणाच्या अभावें । आकाशादि भूतां सूक्ष्मत्व यावें । आणि ज्या पंचीकरणें भूतांत स्थूलत्व यावें । त्या पंचीकरणाचें स्वरूप सांगा ॥ ६७ ॥ गुरु म्हणती शिष्या पंचीकरणविभाग ऐक । आकाश वायु तेज पृथ्वी उदक । या पंचभूतांतील एकेक । भूताचे पांच पांच विभाग होती जे ॥ ६८ ॥ त्यांत एक एक भूताचे चार चार । विभाग पृथक् करावे बा चतुर । आणि पांचवा पांचवा विभाग दूर । अवश्य ठेविला पाहिजे ॥ ६९ ॥ मग त्या एक एक भूताचे । पांचव्या पांचव्या विभागाचे । पुन्हां पांच पांच विभाग करावयाचे । त्या पंच विभागांतील एकेक विभाग ॥ ७० ॥ तो एक एक यथाक्रमेंकरून । एकेक भूताचे चारी भागांत जातो मिळून । त्यायोगें एकेक भूताचे आपापले म्हणून । एकवीस भाग होतात ॥ ७१ ॥ आणि चारी चारी विभाग अन्य । अन्य भूतांचे होती ते करा श्रवण । जैसें एक आकाशाचे पंचविभाग केले समान । त्या पांचांतील चार विभाग पृथक् ठेविले ॥ ७२ ॥ त्या पांचव्या विभागासि ठेविलें वेगळें । तयाचे पुन्हां पंच विभाग केले । त्या पांचांतील एक विभागासि मिळविलें । आकाशाचे चारी विभागांमध्यें ॥ ७३ ॥ दुसरा विभाग वायूंत मिळविला । तिसरा भाग तो तेजांत जोडला । चतुर्थ विभाग जलांत संयुक्त केला । आणि पांचवा मिळविला पृथ्वींत ॥ ७४ ॥ ऐसेंच जाणावें वायूवादिकांचे । तात्पर्य हे आकाशाच्या पांचव्या विभागाचे । जे पंच विभाग केले त्यांतून साचे । एक विभाग आकाशासि मिळालेला ॥ ७५ ॥ त्या एक

विभागाचे । समान विभाग आकाशाचे । पूर्वींच्या चारी विभागांचे । एकविंशति भाग होतात ॥ ७६ ॥ या अभिप्रायें-करून । त्या आकाशादिकांचे आपापले जाण । एकविंशति एकविशंति कथन । विभाग केलेले समजावें ॥ ७७ ॥ शिष्य विनवी हो गुरु दयावंत । पंचीकरणयोगें जो एकेक भूतांत । पंचभूतांचा अंश कराल अंगीकृत । तर एकाच आकाशांत वायुपणा ॥ ७८ ॥ तेज जल पृथ्वीपणा खचित । झाले पाहिजेत प्रतीत । तैशींच तीं पंचभूतें वायूवादिकांत । प्रतीत झालीं पाहिजेत ॥ ७९ ॥ या शंकेचें समाधान गुरु करिती प्रशस्त । तें पंचीकरण झाल्यानें आकाशादि भूतांत । आपापले जर विभाग होताहेत । एकविंशति एकविंशति ॥ ८० ॥ आणि वायूवादिक भूतांचा । एक एक विभाग आहे साचा । म्हणून एकविंशति तोळे हेमांत ताम्रादिकांचा । एक तोळा विभाग असे ॥ ८१ ॥ तो मिळविल्यानें त्या सुवर्णामधीं । होत नसेचि ताम्रबुद्धि । सुवर्णचि निश्चयात्मक असे कधीं । ताम्रादिक दिसेना ॥ ८२ ॥ आपल्या अंशाच्या अधिकतेनें तद्वत् । त्या आकाशादिकांत वायूवादिकांची नसे प्रतीत । कां तर आकाशपणा वसे आकाशांत । वायूंत दिसे वायुपणा ॥ ८३ ॥ तेजीं तेजत्व पृथ्वींत पृथ्वीपण । ऐसें ब्रह्मसूत्रीं वेदव्यासें केलें कथन । तया सूत्राचें अर्थवचन । विशद करूनि सांगतों ॥ ८४ ॥ आकाशादि भूतांचें यद्यपि पंचीकरण- । रीतीनें परस्पर विभाग झाले मेलन । तथापि त्या आकाशादि भूतांचा जाण । आपापला अंश अधिक आहे ॥ ८५ ॥ म्हणून लोकांत ही पृथ्वी हें नीर । इत्यादि भिन्न भिन्न होतो व्यवहार । ऐसें पंचीकृत पंचभूतांचें कार्य स्थूल शरीर । त्यानें अनेक रूप गुण अंगीं धरिले ॥ ८६ ॥ ते शुक्ल रक्त कृष्ण पीत । कपिल पांडुर रौप्य असती वर्ण सप्त । आणि कोमल कठिण मध्यम उष्ण शीत । अनुष्णशीत हे षट् स्पर्श ॥ ८७ ॥ ऐशा शरीरीं सुगंध दुर्गंध हे दोन वसत । सुगंध पुण्यवान् भोग्यासि प्रत्यक्ष प्राप्त । आणि अन्य सर्व जीव मुख नासिकादि अंग-स्थित । त्या दुर्गंधासि नित्य भोगिती ॥ ८८ ॥ या शरीरांत

कटु तीष्ण कषाय । क्षार आम्ल मधुर हे षड्रस वसती अक्षय ।; तैसे ध्वनिरूप शब्द वर्णरूप शब्दद्वय । नांदती ते
ध्वनि परिसावे ॥ ८९ ॥ निषाद ऋषभ गांधार षड्ज मध्यम । सहावा धैवत सातवा असे पंचम । यदर्थीं नारदमुनींचें
वचन सुगम । सदृष्टांत श्लोक ऐका ते ॥ ९० ॥ षड्ज स्वर उच्चारितो पक्षी मयूर । गायी उच्चारिती ऋषभ स्वर ।
अजा अवि हे दोन्ही उच्चारिती गांधार स्वर । आणि क्रौंचपक्षी मध्यम उच्चारितसे ॥ ९१ ॥ कोकीलपक्षी पंचम स्वर
उच्चारी । अश्व धैवताचा उच्चार करी । कुंजर निषादस्वर उच्चारी । हे कथिले सप्तस्वर दृष्टांतसह ॥ ९२ ॥; आतां
श्रीराग वसंत पंचम । भैरव मेघनाद नटनारायण नाम । हे षट् प्रकारचे राग उत्तम । त्या एकेकाचे निषादादि
स्वर होती ॥ ९३ ॥ एकेक रागासि षट् स्त्रिया असती । त्यांत गौडी कोलाहासि युवती । द्रविडी मालव कौशिका
गांधारी शोभती । श्रीरागाच्या बायका ॥ ९४ ॥ आदोली कौशिकी रामगिरी । पुरमंजिरी देशाख्या आणि गुंगरी ।
ह्या वसंत-रागाच्या षट् प्रकारीं । कामिनी असती शास्त्रोक्त ॥ ९५ ॥ भैरवी गुर्जरी भाषा वेलीवती । कर्णाटी
रक्तसिंहा ह्या पंचमाच्या शोभती । त्रिगुणा स्तंभतीर्था आभीरी ककुभा युवती । विराडी सोमेरी भैरवाच्या ॥ ९६ ॥
मधुरा कामदा बंगाला । चोकमादिका कंबुग्रीवा देवाला । या सुंदर स्त्रिया शोभल्या । मेघनाद-रागाच्या ॥ ९७ ॥
आणि त्रोटकी गांधारी । शुद्ध मुदगारी इत्यादि स्त्रिया सुंदरी । नटनारायणाच्या ऐशा छत्तीस प्रकारीं । राग-
रागिणींसि कथिलें ॥ ९८ ॥ त्या राग आणि रागिणींचा सप्तस्वरसहित । सर्व जीवांसि प्रत्यक्षानुभव नाहीं होत ।
जैसें या देहीं उत्तम सुगंध निश्चित । जाणती योगी पुण्यवान् ॥ ९९ ॥ तैसें सप्त स्वरांसि पुण्यवान् । अनाहद-
शब्दादिरूपेंकरून । अनुभविती योगी पुरुष सज्जन । गायकमुखें प्रकट करिती ॥ १०० ॥ ते ध्वनिरूप
शब्द अनेक । तैसे वर्ण क ख ग इत्यादिक । ते सर्व या शरीरीं योगाभ्यासी सम्यक् । पंचाशत मातृका

जाणती ॥ १ ॥; आणि रस रुधिर मेद मांस अस्थि । मज्जा वीर्य हे सप्तधातु देहीं वसती । त्या सप्त धातूंची उत्पत्ति । अन्न-जलापासून होतसे ॥ २ ॥ जीवांनीं भक्षिलेलें उदकान्न । तें पित्ताच्या तेजानें परिपक्क होऊन । राहिलिया प्रथम चार दिन । रस-धातूरूप होतें ॥ ३ ॥ तो रसधातु पित्ततेजें परिपक्क । चार दिवसांनंतर रुधिररूप होत । तें रुधिर पित्तांचे तेजें परिपक्क होऊन येत । चार दिवसांनंतर मांसरूपासि ॥ ४ ॥ मांस चार दिवसांनंतर तें । पित्त तेज परिपक्क होऊन मेदरूपा पावतें । तें मेद पित्ततेजें परिपक्क होऊन होतें । चार दिवसांनंतर अस्थिरूपा ॥ ५ ॥ त्या अस्थि पित्ततेजें परिपक्क होऊनि । मज्जारूप होती चार दिवसांनीं । ती मज्जा पित्ततेजें परिपक्कतेस येऊनि । चार दिवसांनीं वीर्यरूप होते ॥ ६ ॥ आणि बत्तीस दंतरूप अस्थि । या शरीरीं मुखांत राहती । पायापासून मस्तकापर्यंत वसती । एकशेंसात मर्मस्थानें ॥ ७ ॥ मांस मर्म शिरा मर्म । स्नायु मर्म अस्थि मर्म संधि मर्म । ऐशीं पांच प्रकारचीं श्रेष्ठतम । मर्में असतीं जाणपां ॥ ८ ॥ मांसमर्म-प्रकार असती एकादश । शिरामर्म-प्रकार एकेचाळीस । स्नायुमर्म-प्रकार सत्तावीस । अस्थिमर्म-प्रकार अष्ट ते ॥ ९ ॥ आणि विंशति संधि-मर्में संधिस्थानें जाण । त्या मर्मस्थानांत कित्येक तर क्षणेंकरून । शस्त्रादिकें झालिया भेदन । जीवांचें मृत्यु-कारण होतें ॥ ११० ॥ आणि कित्येक मर्मस्थानें जाण । भेदन झालिया शस्त्रेंकरून । कालांतरीं होतें मृत्यु-कारण । कित्येक शस्त्रादिकें असाध्य होतीं ॥ ११ ॥; अस्थींच्या संधि एकशत असती । या शरीरीं स्नायु नवशत राहती । अष्टसहस्त्रकोटि केश रोम गणति । शास्त्रांत कथिती साडेतीनकोटि ॥ १२ ॥ त्या रोमकेशांचें रोमकूपस्थान असत । या शरीरीं जिव्हा असे मुखांत । ती जिव्हा द्वादशपल असे परिमित । शरीरीं रक्तवर्ण जें हृदयमध्य ॥ १३ ॥ ज्या हृदयमध्यासि शास्त्रें ‘हार्दपद्म’ म्हणती । तें हृदय असे अष्टपल-परिमिती । आणि

एकप्रस्थ पित्तधातु हृदयाप्रति । वसतसे या शरीरांत ॥ १४ ॥ येथें पंचगुंजा प्रमाण माष । त्या षोडश माषांचा
असे एक कर्ष। त्या चार कर्षांचें नाम पल विशेष। त्या चार पलांचा कुडव होतो॥ १५ ॥ त्या चार कुडवांसि नाम
एक प्रस्थ आहे। आणि कंठदेशस्थित जो कफ राहे। तो कफ धातु चार प्रस्थ पाहे। आणि वीर्यरूप सप्तम धातु
॥ १६ ॥ तें वीर्य कंठ-हृदय-मूर्द्धस्थानांत । कुडव-परिमाण असे वसत । मेद-धातु दोन प्रस्थ परिमित । ऐसें
उपनिषदीं कथिलें असे ॥ १७ ॥ या देहीं बस्ति-स्थानीं जें मूत्र असे। संग्रहणी-स्थानांत पुरीष वसे । त्या दोहोंची क्षय
वृद्धि होतसे। न्यूनाधिक अन्नजलें ॥ १८ ॥; या देहाचें जिव्हादिक अंग-प्रमाण। गर्भोपनिषदीं पिप्पलाद-ऋषीनें केलें
कथन ।.आणि रक्त-रुधिरादि नव अंगुली प्रमाण। कथिलें याज्ञवल्क्य-योगीश्वरें ॥ १९ ॥ सर्व जीवांचें शरीर-प्रमाण ।
पायांपासून मस्तकींच्या केशांपर्यंत जाण। आपापले हस्तें गणन। शहाण्णव अंगुल दीर्घ असे॥ १२० ॥ शरीराच्या
दोन्ही भागीं धनुष्यवत्। षोडश षोडश अस्थि आहेत । जैशा पिप्पलांतून स्थूल सूक्ष्म अनेक । शाखा उपजती त्या
प्रकारें ॥ २१ ॥ या हृदयांतून सुषुम्ना नाडी निघे पहिली । त्या सुषुम्नेपासून एकशत नाडी संख्या निघाली । त्या
शत नाड्यांतून एकेक शत संख्या उद्भवली। एकेकींतून बाहात्तर सहस्र निघाल्या॥ २२॥ त्या संपूर्ण नाड्या मिळून
एकत्र। संख्या बाहत्तर कोटि दश सहस्र। एक शताधिक एक नाडी विस्तार । ज्यांनीं सर्व शरीर व्यापिलें ॥ २३ ॥
ऐसें प्रश्नोपनिषदांत नाडीचें प्रमाण कथिलें। हें शरीर आहे शहाण्णव अंगुलें । त्यांतून प्राणवायू बाहेर द्वादश अंगुलें ।
जातो म्हणून अष्टोत्तर-शतांगुलें होतसे ॥ २४ ॥ पादाग्र किंवा शिखाग्रापासून । शरीर-मध्यदेश अठ्ठेचाळीस अंगुल-
परिमाण। त्यांत सतेज चतुष्कोण अग्नीचें स्थान । असे तप्त सुवर्णासारिखें ॥ २५ ॥ तें अग्नितेज नाडीद्वारें सर्व
शरीरांत। व्याप्त होऊन राहिलें असत । मस्तक स्थित चंद्रमंडलपर्यंत । व्याप्त होऊन राहिलें ॥ २६ ॥ सर्व जीवांच्या

मूर्द्धस्थानीं चंद्र राहत । अधोभागांत सूर्य वसत । मरणकालीं चंद्र खालीं जात । मूर्द्धस्थानीं सूर्य तो ॥ २७ ॥ ऐसें महेश्वरें आगमशास्त्रीं कथिलें । त्या चतुष्कोण कुंडांत अग्नितेज असलेलें । त्या तेजें शरीरेंद्रियासि सामर्थ्य मिळालें । म्हणून त्या तेजास 'शक्ति' म्हणती ॥ २८ ॥ तें तेज जीवास नाहीं जाणवत । स्वउष्णतेनें प्राण्यासि जीवन कारण होत । त्या अग्नितेजाचें स्थान शोभत । एक अंगुल परिमाण ॥ २९ ॥ वायुस्थानाहून ऊर्ध्व अंगुलें दोन । तथा उपस्थानाहून खालीं अंगुलें दोन । मध्यें चतुष्कोण एकांगुल अग्निस्थान । शरीराचे मध्यदेशांत आहे ॥ १३० ॥ त्या मध्यदेशांत नव अंगुल अवकाश असून । त्यांत चार अंगुल दीर्घ रुंद मांसपिंड कंदासमान । त्या मांसकंदाहून एक नाभिचक्र कमलनाल उत्पन्न । होतो दंडवत् नवांगुल ॥ ३१ ॥ रसादि सप्तधातूंनीं वेष्टित । या देहावयवाचें मूलरूप वसत । ऐशा नालमध्यें एक नाभिचक्र राहत । द्वादश अरायुक्त रथासारिखें ॥ ३२ ॥ जैसें ऊर्णनाभिजंतु तंतूंत भ्रमत । तैसें पुण्यपाप कर्मरूप तंतूंसि आश्रित । होऊनि हा जीवात्मा भ्रमतसे नाभिचक्रांत । यद्यपि सर्व शरीरीं जीवात्मा वसे ॥ ३३ ॥ तथापि नाभि-हृदय-कंठ-चक्षु-मूर्द्धादि स्थानीं । जीवात्म्याची अभिव्यक्ति होत विशेषेंकरूनि । म्हणूनि शास्त्रवेत्ते नाभि आदिक स्थानीं । जीवात्मा स्थिति कथितात ॥ ३४ ॥ त्या स्थानांतही प्रथम चतुष्कोण । मूलाधार चक्र केलें कथन । त्या आधारचक्रांत हा जीव सप्राण । सर्वदा निवास करितसे ॥ ३५ ॥ आधारचक्रावरी आणि नाभिचक्राखालीं । सर्पासम वक्र एक कुंडलिनी शक्ति असे राहिली । ती शक्ति कारणस्वरूप ब्रह्माची मूर्ति शोभली । जी प्रकृतीचें कारण आहे ॥ ३६ ॥ भूमि जल अग्नि वायु आकाश । मन बुद्धि अहंकार मिळून विशेष । अष्टधा प्रकृतीचें कारण खास । ही कुंडलिनी शक्ति विराजे ॥ ३७ ॥ ही शक्ति प्राणवायूनें केलेली ताऊन । सर्व शब्दांसि करिते उत्पन्न । प्राणासि ब्रह्मलोकीं करावया गमन । प्रतिबंधक आहे शक्ति ही ॥ ३८ ॥ जीवांचें उदरस्थित जो प्राण । तो ऊर्ध्व दशमद्वारीं

जाऊन । बाहेर ब्रह्मलोकीं व्हावया गमन । उद्योग करी परंतु निघूं न शके ॥ ३९ ॥ निघण्याचा मार्ग सुषुम्ना
नाडी असे । तिलाही कुंडलिनी स्वमुखें निरोधून स्वस्थानीं निजतसे । म्हणून प्राणवायु समर्थ नसे । ब्रह्मलोकांत
जावया ॥ १४० ॥ योगसाधनें प्राण झालेला स्खलित । त्या प्राणें जेव्हां कुंडलिनी होत जागृत । तेव्हां हृदयाकाशास
व्यापून स्फुरून जात । दशम द्वारापर्यंत शेषासम उज्ज्वल ॥ ४१ ॥ योगें प्राण चव्हून अंतराग्नीसहित । सुषुम्ना मुखद्वारें
शरीरामध्यें प्रवेशत । कुंडलिनी तेव्हां होऊनि जागृत । न करी निरोध सुषुम्नेचा ॥ ४२ ॥; आतां आधारचक्रादिकांत ।
प्राणाचा स्थितिरूप प्रत्याहार असत । तो सांगण्यासाठीं तदुपयोगी कथित । आरंभीं नाडीचें स्वरूप
॥ ४३ ॥ या शरीरामधील मांसरूप कंदांत । सुषुम्ना नाडीच्या आसमंत-भागांत । दुसऱ्या अनेक नाड्या वसतात ।
त्यांत चतुर्दश नाड्या प्रधान त्या ॥ ४४ ॥ सुषुम्ना इडा पिंगला सरस्वती । कुहू वारणा यशस्विनी पूषा शोभती ।
पयस्विनी शंखिनी गांधारी हस्तिजिव्हा असती । विश्वोदरा अलंबुषा ॥ ४५ ॥ त्या चतुर्दश नाड्यांत प्रधान । सुषुम्ना
इडा पिंगला ऐशा तीन । त्या तिहींत सुषुम्ना आहे प्रधान । ब्रह्मलोकद्वारें मुक्तिमार्ग ॥ ४६ ॥; सर्व विश्वासि करिते
धारण । त्या नाडीस्थानाचें करितों निरूपण । त्या नाडीकंदामध्यें सुषुम्ना असून । या शरीराचे पृष्ठमध्यें दीर्घ अस्थि
असे ॥ ४७ ॥ त्या अस्थिरूप मार्गद्वारें सुषुम्ना ते । मूर्द्धस्थानासि प्राप्त होते । त्या सुषुम्नेच्या वामभागीं राहते ।
इडा नामें नाडी ती ॥ ४८ ॥ सुषुम्नेच्या दक्षिणभागीं पिंगला राहे । सुषुम्ना इडा-पिंगलेच्या पुढें मागें एकेक वसे
पाहें । सुषुम्नेच्या पृष्ठभागीं सरस्वती वसताहे । अग्रभागीं कुहू नाडी ॥ ४९ ॥ इडेच्या पृष्ठभागीं गांधारी । इडेच्या
अग्रभागीं हस्तिजिव्हा वसणारी । पिंगलेच्या पृष्ठभागीं पूषा नाडी असणारी । पिंगलेच्या अग्रभागीं यशस्विनी ॥ १५० ॥
ऐशा नवनाडींच्या पंक्तित्रय । एकतर अग्रभाग स्थितपंक्ति होय । दुसरी नाडी पंक्ति वसे मध्य । तिसरी पृष्ठभागीं

स्थित असे ॥ ५१ ॥ त्यांत सुषुम्नेच्या वामवायूच्या नाडीची । गणति केल्यानें सिद्धि होते हा क्रमचि । हस्तिजिव्हा कुहू यशस्विनी ह्या तीन नाड्यांची । प्रथमपंक्ति अग्रभागाची आहे ॥ ५२ ॥ आणि इडा सुषुम्ना पिंगला ह्या नाड्या तीन । मध्यभागाची दुसरी पंक्ति असून । गांधारी सरस्वती पूषा ह्या नाड्या तीन । पृष्ठभागाची तिसरी पंक्ति आहे ॥ ५३ ॥ ऐशीं नवनाड्यांचीं स्थानें वर्णिलीं । आतां शेष पंचनाड्यांचीं स्थानें सांगूं भलीं । प्रथम पंक्तींत हस्तिजिव्हा कुहू ह्या दोन नाड्यांत शोभली । मध्यभागीं विश्वोदरा नाडी ॥ ५४ ॥ आणि त्या प्रथमपंक्तींत कुहू यशस्विनी । ह्या दोंहोमध्यें वारणा नाडी असूनि । तिसऱ्या पंक्तींत गांधारी सरस्वती ह्या दोन्ही । मध्यें पयस्विनी नाडी राहते ॥ ५५ ॥ त्या तिसऱ्या पंक्तींत सरस्वती पूषेच्या मध्यांत । शंखिनी नामें नाडी वसत । आणि अलंबुषा असते त्या कंदाच्या अधोभागांत । म्हणून चतुर्दश नाड्यांचा हा क्रम सिद्ध झाला ॥ ५६ ॥ हस्तिजिव्हा विश्वोदरा कुहू वारणा । यशस्विनी ह्या पांच प्रथम अग्रपंक्तिस्थित जाणा । आणि तीन इडा पिंगला सुषुम्ना । दुसरे मध्यपंक्तित राहती ॥ ५७ ॥ गांधारी पयस्विनी सरस्वती शंखिनी । पूषा ह्या पांच नाड्या तृतीय पृष्ठपंक्तींत असूनि । एक अलंबुषा कंदाच्या अधोभागीं निवासिनी । ऐशी कंदांतील नाडीस्थिति वर्णिली ॥ ५८ ॥; आतां सुषुम्नादि त्या कंदापासून निघून । ज्या ज्या स्थानामध्यें जाऊन । जे जे व्यापार करिती ते श्रवण । करावें श्रोतीं सादरें ॥ ५९ ॥ कंदांतून सुषुम्ना निघून मूर्द्धस्थानांत । जाऊन सर्व विश्वधारण व्यापार करित । इडा पिंगला क्रमें वाम दक्षिण नासिकांत । जाऊन गंध ग्रहण व्यापार करिती ॥ १६० ॥ गांधारी पूषा वाम दक्षिण नेत्रांत जाऊन । रूप-व्यापारासि करिती ग्रहण । शंखिनी यशस्विनी वाम दक्षिण कर्णीं जाऊन । शब्दग्रहण-व्यापार करिताति ॥ ६१ ॥ रसनेंत जाऊन नाडी सरस्वती । रसग्रहण-व्यापार करी ती । हस्तिजिव्हा पयस्विनी वाम दक्षिण पादांगुष्ठीं जाती । करिती गमन-व्यापार त्या ॥ ६२ ॥ अलंबुषा पायुस्थानीं जाऊन । करितसे

मलादिकांचें विसर्जन । कुहू उपस्थस्थानीं जाऊन । विषयानंद घेतसे ॥ ६३ ॥ विश्वोदरा वारणा वाम दक्षिण हस्तीं । जाऊनि वस्तूंचें ग्रहण करिती । ऐशा असंख्यात नाड्या शरीरीं वसती । त्या सर्व नाड्यांत प्राण भ्रमतसे ॥ ६४ ॥ म्हणून प्राणाची गमनरूपता । त्या सर्व नाड्यांत असे व्यापार साधारणता । त्या नाड्यांत संचरणारीं प्राणस्थानें आतां । मुख्य मुख्य निरूपितों ॥ ६५ ॥ प्राणवायु नाडी-कंदाखालीं राहे । तो मुख नासिका नामि हृदय पाहे । पादांगुष्ठ या स्थानीं वसताहे । आतां अपानस्थान परिसावें ॥ ६६ ॥ या देहीं नाभीपासून जंघांपर्यंत । देशांत अपान वायु राहत । त्या देशांतही पायु उपस्थ या दोन स्थानांत । विशेषें अपान राहतसे ॥ ६७ ॥ दोन श्रोत्र नेत्र दोन पाद हस्त । दोन्ही पायांचे गुल्फ पृष्ठदेश स्थित । दीर्घ अस्थि कर्ण ऊर या स्थानांत । व्यान वायु राहतसे ॥ ६८ ॥ या शरीराचे सर्व संधींत । तथा हस्तपादांत उदान वायु वसत । आणि समान वायु व्यापूनि राहत । या सर्व शरीरासि ॥ ६९ ॥ अंतराग्नीसह तो समान । शरीरीं पोहोंचवितो भक्षिलेलें रस अन्न । पूर्वोक्त सर्व नाड्यांमाजीं वेगवान् । समान वायु संचरतो ॥ १७० ॥ आणि नागवायु त्वचेंत राहे । कूर्म रुधिरगत असताहे । कृकल मांसांत फिरताहे । देवदत्त वायु मेदांत ॥ ७१ ॥ धनंजय अस्थींत वसे जाण । ऐशीं प्राणाचीं स्थानें निरूपिलीं तुजलागून । आतां त्या प्राणाचे व्यापार श्रवण । शिष्या एकचित्तें करीं रे ॥ ७२ ॥ मुख-नासिकाद्वारें वायूस । बाहेर सोडणें त्याचें नाम 'श्वास'। शरीरांत वायूस आणणें तो 'प्रश्वास'। हे दोन व्यापार प्राणाचे ॥ ७३ ॥ मलमूत्रादिकांचा त्याग करणें । हा अपान वायूचा व्यापार म्हणणें । ग्रहण त्यागादि बलें चेष्टा होणें । तो व्यान वायूचा व्यापार असे ॥ ७४ ॥ या शरीराचें उत्थानादिक । आणि सर्व शरीरामाजीं व्यापक । जे प्राणाचें चालणें सम्यक् । तो व्यापार समान वायूचा आहे ॥ ७५ ॥ उद्गार काढणें कर्म नागाचें । नेत्राचें निमील-उन्मीलन कूर्माचें । छिंका शिंका व्यापार कृकलाचे । देवदत्ताचे विजृंभण जांभई ॥ ७६ ॥

शरीर सुजणें धनंजय-व्यापार । हे दश प्राणांचे कथिले सविस्तर ।; आतां प्राणनिरोधरूप 'प्रत्याहार' । योगी
पुरुषासि करणें योग्य ॥ ७७ ॥ प्रत्याहारोपयोगी अष्टादश स्थानें । जाण वशिष्ठऋषींनीं केलेलीं कथन । त्या
स्थानांचें करा श्रवण । श्रोते सज्जन सादरें ॥ ७८ ॥ पादांगुष्ठ गुल्फ जंघा मध्य । चित्तिमूल जानु-उरूचें
मध्य । पायु-मूल शरीराचें मध्य । उपस्थ मध्य नववें तें ॥ ७९ ॥ नाभि हृदय कंठकूप तालुमूल ।
दोन्ही नेत्रांचा मध्य नासिकेचें मूल । दोन्ही भ्रूमध्य ललाट मूर्द्धा प्रांजल । हीं अष्टादशस्थानें प्रत्याहाराचीं ॥ १८० ॥
आणि पूर्वीं जीं एकशें सात । मर्मस्थानें सांगितलीं आहेत । तीं मर्मस्थानें ह्या अष्टदशाचे अंतर्भूत । समीपवर्तीच
नांदती ॥ ८१ ॥ येथें जंघांचें पृष्ठदेशचें मांस । ज्या स्थानापासून पावतें वृद्धीस । 'चित्तिमूल' ऐसें म्हणती त्यास ।
शास्त्रकार स्पष्टत्वें ॥ ८२ ॥ आणि कंठस्थित घंटिकेचे अधोदेशास । 'कंठकूप' म्हणती वेदविद्वांस । पायांपासून शिखाग्रापर्यंत
देहास । शहाण्णव अंगुलें कथियेलीं ॥ ८३ ॥; आतां वशिष्ठ ऋषींनीं ज्या प्रकारें । शरीराचें परिमाण कथिलें
बरें । तें श्रवण करावें श्रोतीं सादरें । पादांगुष्ठापासून ॥ ८४ ॥ त्या पादांगुष्ठापासून या शरीराचें । पृथक् परिमाण
वर्णन न संभवे साचें । कारण अंगुष्ठापासून जेवढे पायांचे । सर्वावयव पाद-शब्दें ते घ्यावे ॥ ८५ ॥ म्हणूनि पायांपासून
शरीराचें परिमाण । उचित असें करणें वर्णन । त्यांत पादांपासून साडेचार अंगुल परिमाण । वरती गुल्फ राहतसे
॥ ८६ ॥ त्या गुल्फापासून दशांगुल । परिमाण उपरी जंघांचा मध्य केवल । त्या जंघांपासून एकादशांगुल ।
वरती चित्तिमूल असे हो ॥ ८७ ॥ चित्तिमूलाहून अंगुलें दोन । उपरी जानु असे विराजमान् । जानूपासून नवांगुल
परिमाण । उपरी ऊरूचा मध्य असे ॥ ८८ ॥ त्या ऊरूपासून परिमाण नवांगुल । वरती राहतसे पायुमूल । पायुपासून
उपरी अडीच अंगुल । या शरीराचा मध्य दिसे ॥ ८९ ॥ शरीरमध्याहून अडीच अंगुल परिमाण । उपरी भागांत

उपस्थ असून । उपस्थाहून साडेदशांगुल परिमाण । उपरी नाभी असतसे ॥ १९० ॥ त्या नाभीपासून चतुर्दश अंगुलें ।
वरती हृदयमध्य शोभलें । हृदयापासून उपरी षडंगुलें । कंठकूप शोभतसे ॥ ९१ ॥ त्या कंठकूपाहून परिमाण चतुरंगुल ।
उपरी असे जिव्हा मूल । जिव्हेहून उपरी चतुरंगुल । नासिका-मूल वसतसे ॥ ९२ ॥ नासिकेहून अर्धांगुल
परिमाण । उपरी देशांत चक्षु मध्य असून । चक्षुंहूनि अर्धांगुल परिमाण । उपरी भ्रूमध्य वसतसे ॥ ९३ ॥ भ्रूपासून
तीन अंगुलें उपरी । ललाट शोभे त्या ललाटानंतरीं । तीन अंगुलें परिमाण उपरी । मूर्द्धास्थान शोभतसे ॥ ९४ ॥
ऐसें पायापासून मूर्द्धेपर्यंत । हें सर्व शरीर शहाण्णव अंगुलें परिमित । वशिष्ठें कथिलें ऐशा देहीं विपरित । जीव करिती
अहंबुद्धि ॥ ९५ ॥ पिप्पलाद-ऋषीनें गर्भोपनिषदांतून । या शरीराचें भूत-भौतिकत्वें केलें वर्णन । ते अवयव करा
श्रवण । आकाशादि पंचमहाभूतें ॥ ९६ ॥ तथा श्रोत्रादिक दशेंद्रियें योग्य । आणि त्या इंद्रियांचे शब्दादि दश विषय ।
पंचप्राण अंतःकरण-चतुष्टय । तथा त्वगादिक सप्तधातु ॥ ९७ ॥ असंख्यात नाड्या एकशेंसात मर्मस्थानें जाण । तथा
पित्तादिक दोष तीन । कंठ हृदयकमल विष्ठा-मूत्रस्थान । अनंत केश लोमादिक ॥ ९८ ॥ ऐशा अवयव समुदायाचें
नाम ‘शरीर’ । अवयवाहून भिन्न केलिया किंचित् मात्र । स्वरूप सिद्ध होऊं न शकणार । ऐशा निषिद्ध शरीरीं ॥ ९९ ॥
विष्ठामूत्रादि मलिन वस्तूंचा संचय । अशुचि अमंगळ जड दृश्य क्षय । नख-केश-श्लेष्मा-नरकादिमय । तात्काल त्यागिती
सर्वत्र ॥ २०० ॥ या शरीराहून जे बाह्यस्थित दंत । विष्ठा मूत्र रुधिर मांस अस्थि आदिक पदार्थ । त्या बाह्य पदार्थीं
कोणी आत्मबुद्धि न करित । चिळस मानिती उलटें ॥ १ ॥ त्या अशुचि पदार्थांचें दर्शन-स्पर्शनें । उलटे लोक करिती
स्नानदानें । ऐशा शरीरीं आत्मबुद्धि न करणें । तिरस्कृति वाटणें हेंचि योग्य आहे ॥ २ ॥ मूर्च्छा-मरण-सुषुप्त्यावस्थेंत ।
कोणासिही आत्मबुद्धि नाहीं होत । म्हणून या जीवासि जागृतींत । आत्मबुद्धि होते ती मिथ्या असे ॥ ३ ॥ जो

पदार्थ कधीं आहे कधीं नाहीं। तो केवल मिथ्या नाशिवंत होई। जैसें मृगतृष्णाजल मिथ्या पाहीं। तैशी या शरीरीं
आत्मबुद्धि ॥ ४ ॥ व्याधि किंवा शस्त्रें शरीरीं व्रण उद्भवे । त्यांत कृमि पूय दुर्गंध अघवे। पाहूनि ग्लानि चिळसें
थुंकावें । तिरस्कारावें सर्वांनीं ॥ ५ ॥ अन्नाचे विकार विष्ठा मूत्र वमन। तथा दुर्गंधीयुक्त विटलेलें अन्न। देखूनि
पावती ग्लानि सर्व जन । ते सर्व पदार्थ या देहीं असतांही ॥ ६ ॥ कां न व्हावा ग्लानि-दोषातिशय-विचार।
अवश्य सोडावा देह-ममत्वाहंकार । श्रीगुरुपदसेवनें निरंतर । ब्रह्मसाक्षात्कार तरीच होय ॥ ७ ॥ तरीच जन्ममरणादि
सुटतील । माया अज्ञान अविद्या सबीज जळतील । भवसंसारसागर निःशेष अटेल । फिरतील संशय
आत्मज्ञानें ॥ ८ ॥ ते श्रीदत्तात्रेय स्वामीसमर्थ । भक्तिमुक्तिप्रदाते स्वार्थ परमार्थ । तच्चरणारविंदीं भ्रमर होऊनि
यथार्थ। ब्रह्मानंद-मकरंद भोगिजे ॥ ९ ॥ तें श्रीगुरुलीलामृत कर्णें प्राशन। करा हो शुद्धमनें सज्जन। येथें निःसंशय
सर्व 'होती पावन । हें अनुभवूनि पहावें ॥ २१० ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । गर्भोपनिषदार्थ-रहस्यसंमत । ब्रह्मनिष्ठवामनविरचित
। द्विपंचाशत्तमाध्याय गोड हा '॥ २११ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे द्विपंचाशत्तमोऽध्यायः
समाप्तः ॥ ५२ ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय त्रेपन्नावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्तात्रेय-दिगंबराय नमः ॥ ॥ श्रीमच्छंकराचार्य कृत । अपरोक्षानुभूति ग्रंथांत । राजयोग पंचदश अंगसहित । कथिला तो शिष्या श्रवण करीं ॥ १ ॥ वैराग्यादि-साधनचतुष्टयपूर्वक । मुख्याधिकारी वेदांतवाक्यविचार प्रत्यक् । अभिन्न ब्रह्म-अपरोक्ष-ज्ञानद्वारें मुख्य । मोक्षासि कारण स्वीकारलेलें ॥ २ ॥ तो विचार करित असतां वारंवार । बुद्धिमांद्य विषयासक्त्यादि जर । ‘वर्तमान-प्रतिबंध’ असतील तर । मंदाधिकाऱ्यासि अपरोक्ष ज्ञान उपजत नाहीं ॥ ३ ॥ त्या मंदाधिकारियालागून । निर्गुण ब्रह्माचें उपासनचि मुख्य साधन । शंकराचार्यें केलेलें कथन । निदिध्यासन प्रतिज्ञापूर्वक ॥ ४ ॥ स्वरूपावस्थान-लक्षण । मोक्षसिद्ध्यर्थ केलेलें तें कथन । तूष्णीं-अवस्था परित्यागून । अभ्यास केला पाहिजे ॥ ५ ॥ परंतु अष्टांगयोग-प्रतिपादक । विलक्षण पातंजलमत अवैदिक । तैसेंचि अन्यमतें वैशेषादिक । सर्वथैव त्यागावीं ॥ ६ ॥ सर्व कर्में आणि सगुणोपासन-साधन । मंदाधिकाऱ्यानें टाकून । निर्गुण ब्रह्माचें नित्य करावें उपासन । श्रद्धायुक्त गुरुमुखें ॥ ७ ॥ तीं पंचदश अंगें करावीं श्रवण । यम-नियम-त्याग-मौन । देश-कालता-मूलबंध-आसन । देहसाम्य-दृष्टिस्थिति-प्राण-. । संयमन-प्रत्याहार-धारणा ॥ ८ ॥ आत्मज्ञान आणि समाधि । हीं पंचदश अंगें करिती मोक्षसिद्धि । तें लक्षणसह यथार्थ विधीं । सावधानें परिसावें ॥ ९ ॥ विज्ञान सर्वब्रह्म-निश्चयेंकरून उत्तम । श्रोत्रादिक एकादश करणांचें ग्राम । इंद्रियसमूहाचा सम्यक् संयम । शब्दादिक विषयांचा ॥ १० ॥ विनाशित्व सातिशयत्व । दुःखत्वादिक दोषदर्शनें उक्त । विषयापासून निवारण करिजेत । तयासि ‘यम’ बोलती ॥ ११ ॥

हाचि यम असे संप्रोक्त। केवल अहिंसेसारिखा नसत। मुमुक्षूंनीं वारंवार अभ्यास करिजेत। हाचि उत्तम 'यम' असे ॥ १२ ॥; आतां नियमाचें ऐका लक्षण। सजातीय परब्रह्म प्रत्यगभिन्न। तदाकारवृत्तिप्रवाह करणें जाण। तोचि 'नियम' म्हणावा ॥ १३ ॥ अथवा सजातीय म्हणजे मी असंग अविक्रिय। इत्यादि प्रत्यगभिन्न-प्रत्यय। त्या प्रत्ययाचा प्रवाह तो 'सजातीय'। तयासि 'नियम' बोलिजे ॥ १४ ॥ ब्रह्मात्मत्व तें विलक्षण। जगत् पूर्वसंस्कारें जायमान्। तदाकार वृत्तीस 'विजातीय' म्हणती विद्वज्जन। तियेसि त्यागिलें पाहिजे ॥ १५ ॥ त्या विजातीय-वृत्तीचा धिक्कार। करावाचि अवश्य अगोदर। तो उपनिषत्-प्रसिद्ध नियम साचार। परमानंददायक असे ॥ १६ ॥; आतां त्यागाचें करूं वर्णन। प्रपंच नामरूप-लक्षण। हा घट हा पट इत्यादि प्रकाशवान्। ज्याच्यायोगें होतसे ॥ १७ ॥ तें सर्व प्रपंचाधिष्ठानभूत। पदार्थस्फुरण त्यायोगें होत। तें चिदात्मत्वावलोकनें चिज्जड स्वतः। प्रकाशमान् ब्रह्मात्म-स्वरूप जें ॥ १८ ॥ त्याचें 'अवलोकन' म्हणजे अनुसंधान। नामरूप प्रपंचाची उपेक्षा करोन। तोचि 'त्याग' विद्वदनुभव प्रसिद्ध जाण। महतासि पूज्य ऐसा असे ॥ १९ ॥ हा त्याग सद्यानुसंधानकाल मोक्षमय। परमानंदस्वरूपावस्थान होय। म्हणूनि आत्मतत्त्व-विदासि अति प्रिय। असलेला मुमुक्षुंनीं करावा ॥ २० ॥ या त्यागाहूनि केवल इतर। स्वकर्मादि अकरणरूप दुर्धर। सर्व श्रुतिप्रतिपादित निरंतर। साधकें तोचि अभ्यासिजे ॥ २१ ॥; आतां बोलूं मौनाचें लक्षण। शब्दप्रवृत्ति-निमित्त जाति भिन्न। क्रियादिकांच्या अभावेंकरून। मनवाणीसि अगोचर जें ॥ २२ ॥ सांगण्यासि अशक्य जें ब्रह्म। ज्ञानयोग्यासि गम्य परम। प्रत्यगभिन्नत्वें प्रसिद्ध परब्रह्म-। रूप 'मौन' सर्वदा ॥ २३ ॥ तें ब्रह्मस्वरूप मौन। 'अहमस्मि' ऐशा अनुसंधानें-करून। स्वानुभवती विवेकी जन। ब्रह्मरूप मौनचि इतर नव्हे ॥ २४ ॥ प्रत्यगभिन्न-ब्रह्मानुसंधान ध्यानरूप। कैसें अनुभवास येईल याचें स्वरूप। स्वारस्य प्रकारांत ज्ञानदीप। सांगती आचार्य शंकरस्वामी ॥ २५ ॥

शब्दप्रवृत्ति-निमित्ताभावें ब्रह्म साच । जैसें वाचाविषय नामरूप जात्यादि प्रपंच । सदसदादि विकल्पसह वाचातीत उगाच । तें निःशब्दस्वरूप ब्रह्म ‘मौन’ बोलिजे ॥ २६ ॥ याप्रकारें ब्रह्म आणि जगताचें । किंवा विवादत्यागरूप मौन ब्रह्मरूपाचें । हें ‘मौन’ कोणासाठीं आहे या शंकेचें । समाधान सत्य सांगती ॥ २७ ॥ या मौनाचे अधिकारी सम्यक् । सहजस्थितीचे सत्पुरुष देख । त्यांहूनि इतर हट्टी अनेक । या राजयोगासि योग्य नसती ॥ २८ ॥ वाचेचें मौन असतां प्रसिद्ध । ब्रह्मरूप मौनाचा वाटेल विरोध । म्हणून वदती वाचेचें मौन बालकासि निरोध। तें ब्रह्मवादियासि स्पर्शेना ॥ २९ ॥; जेथें आदि अंतीं मध्यकालीं । जनांचा क्षणमात्र संबंध नसे त्रिकालीं । हें ब्रह्म सतत व्याप्त असे चिरकालीं । तोचि ‘विजन’ देश म्हणतात ॥ ३० ॥ हा स्वप्रतीतीचा अनुभविक । नाहीं नाहीं शास्त्रीय प्रतीति लौकिक । जनांचा अभाव जेथें त्रैकालिक । तोचि ‘देश’ म्हणावा ॥ ३१ ॥; आतां परिसा काललक्षण । ब्रह्माचे निमेषारभ्य कलनापासून । स्वर्ग-स्थिति-प्रलयासि आधारपण । अखंडानंद अद्वय तो ‘काल’ जाणावा ॥ ३२ ॥ सर्व भूतांचे ब्रह्मादिकांचे । निमेषारंभें काल-शब्दें निर्दिष्ट योग ज्याचे । त्या अखंडानंद-अद्वयासि जाणायाचें । काल-शब्दानें मुख्यत्वें ॥ ३३ ॥; अजस्त्र ब्रह्मचिंतन । होतें निश्चयें सुखेंकरून । तेंचि जाणावें यथार्थ ‘आसन’। त्याहूनि इतर आसनें दुःखप्रद ॥ ३४ ॥ म्हणजे कर्तव्याकर्तव्य-चिंता नसून । कालत्रयावस्थायी सुखरूप ब्रह्मचिंतन । तेंचि जाणावें ब्रह्मासन । अत्यंत सौख्यकारक ॥ ३५ ॥ प्रसंगें आसन विशेष करा श्रवण । जें सर्वभूतादि सिद्ध किंवा सिद्धांचें आसन । निर्विकार अव्यय विश्वाधिष्ठान । तेंचि ‘सिद्धासन’ जाणावें ॥ ३६ ॥; आकाशादि सर्वभूतांचें जें मूल । आदिकारण परब्रह्म निर्मल । चित्ताच्या बंध-कारणाचें मूल अज्ञान म्हणाल । तेंही रहस्य परिसावें ॥ ३७ ॥ ज्या मूलाज्ञानासि पृथक् सत्ता नसून । जें वसतें ब्रह्माचा आश्रय धरून । अथवा ज्या ब्रह्मप्राप्तिनिमित्त करणें जाण । विषम चित्ताचा निग्रह अभ्यासें

॥ ३८ ॥ तो ‘मूलबंध’ राजयोगीजनांचा जाण। म्हणजे व्यवहारांत ज्याचें अविक्षिप्तचि अंतःकरण। त्या ज्ञानपरिपक्वयुक्ताचें
करा सदा सेवन । हठादि मूलबंध वर्जूनि ॥ ३९ ॥; आतां देह-समानत्वाचें लक्षण ऐकावें । स्वभाव विषम
अध्यस्त त्या ब्रह्माचे ठायीं अघवे । अधिष्ठान-समत्व दृष्टीनें जाणावें । ‘अंग वैषम्यरहित’ तें ॥ ४० ॥ शुष्क वृक्षांगासारखें
सरल । अंग वैषम्य-स्वभावरहित जें अचंचल । ब्रह्मीं तिष्ठतें सर्वकाल । तेंचि ‘अंग-समानत्व’ समजावें ॥ ४१ ॥; ज्ञानमयी
दृष्टि करून । ब्रह्ममय जगत् करावें अवलोकन । ती दृष्टि परमोदारा वर्णिती म्हणून । नासाग्र दृष्टि टाकूनि ॥ ४२ ॥
ब्रह्मीं फलव्यापकत्वाचा अभाव जरी । तथापि वृत्तिव्यापकत्व पाहिजे वेदांतशास्त्रीं । दृष्टि म्हणजे अंतःकरणवृत्ति
ब्रह्माकारी । अखंड ज्ञानमयी करून ॥ ४३ ॥ सर्व जगत् ब्रह्ममय पुसावें । सर्व ब्रह्म वेद तोंपर्यंत अभ्यासावे । परंतु
नासाग्र दृष्टि अभ्यासा टाकून द्यावें । घ्यावी हीच परमोदार दृष्टि ॥ ४४ ॥ दृष्टि-दर्शन-दृश्य त्रिपुटीचा विराम । जेथें
होतो ती दृष्टि करावी नेम । नासाग्रावलोकिनी दृष्टीचें काम । स्वप्नींही नको शिष्या रे ॥ ४५ ॥ ब्रह्मीं वृत्ति प्रवृत्ति
निमित्त । जात्यादि अभावें ईंद्रियांसहित । प्रत्यक्ष विषयाचें जगत् । ब्रह्मरूपें दर्शन कैसें होय ॥ ४६ ॥ स्वारस्य पक्षांतरें-
करून । दृष्टि म्हणजे श्रोत्रादि सर्व करण । त्यांत त्रिपुटीचें जेथें उपलक्षण । ज्या परब्रह्मस्वरूपीं ॥ ४७ ॥ दृष्टयादि
सर्व त्रिपुटींचा लय । जेथें होतो ती प्रपंचातीत अद्वय । दृष्टि म्हणजे ब्रह्माकारांतःकरणवृत्ति अक्षय । करावी नासाग्र
पाहणें त्यागूनि ॥ ४८ ॥; आतां ऐका प्राणायामाचें लक्षण । सर्व चित्तवृत्तींचा निरोध करून । चित्तादि सर्वभावीं जाण।
ब्रह्माचीच भावना करावी ॥ ४९ ॥ म्हणजे प्राण आहेत मनाच्या आधीन । त्या मननिरोधेंचि सहज होतें ‘प्राणनिरोधन’।
मग पातंजलाभिमतें प्राणनिरोधन । करण्याचें कारण नलगेचि ॥ ५० ॥ प्रपंचाचा त्याग निषेधेंकरून । करिती तोचि
बोलिजे ‘रेचकाख्य’ समीरण । ब्रह्मचि आहे ऐशा वृत्तीचा अभ्यास जाण । ‘पूरक’ वायु तोचि बोलिला ॥ ५१ ॥ अनात्मदेहाची

उपेक्षा करून । दृढतर बोधिती आत्मानुसंधान । रेचक-पूरक-कुंभकादि शब्दें करून । भावार्थ स्पष्ट कथिलासे ॥ ५२ ॥ ऐसा प्राणायाम कोठें न ऐकिला । या शंकेचें सांग समाधान कळायाला । उक्त लक्षणें प्राणायाम भेदत्रयाला । विशद करूनि सांगतों ॥ ५३ ॥ प्रकर्षेण असंभावना-विपरितभावनारहित । प्रबुद्ध तेचि आत्मप्रबोधयुक्त । तेचि अपरोक्ष योग्य ज्ञानी बोलिजेत । निःसंशय ब्रह्मानुभवी ॥ ५४ ॥ ब्रह्मरूप जी निश्चल वृत्ति । तोचि ‘ कुंभक ’ प्राणसंयम बोलती । हाचि योग्य प्रबुद्धाचा वर्णिती । ‘ प्राणायाम ’ राजयोग ॥ ५५ ॥ व्यर्थ नासिकासि पीडा करणें जाण । केवळ अज्ञानाचें लक्षण । जन्मभरी प्राण हटें निरोधून । आत्मलाभ होतचि नाहीं ॥ ५६ ॥; घटादिकीं अथवा शब्दादि पंच विषयांत । अन्वय-व्यतिरेकें आत्मता विलोकित । सत्ता-स्फुरता-प्रियता मात्र सतत । अनुसंधानयुक्त पाहूनि ॥ ५७ ॥ अंतःकरणाचे चित्तीं मज्जन म्हणिजेत । नामरूप-क्रियानुसंधान-विरहित । चित्स्वरूपें अवस्थान अभ्यासिजेत । तोचि ‘ प्रत्याहार ’ जाणावा ॥ ५८ ॥; जेथें जेथें ज्या ज्या पदार्थांत । मन धांवतें तेथें तेथें ब्रह्ममात्र सत्तादियुक्त । नामरूपादि उपेक्षूनि मनानें धारण होत । ब्रह्मदर्शन सर्वत्र तें ॥ ५९ ॥ ब्रह्मामाजीं करणें मनःस्थिरपणा । तीच उत्तम मानलेली ‘ धारणा ’ । परोक्ष तत्त्व बोधवान् जनां । सर्वदा प्रिय असलेली ॥ ६० ॥ आणि मूलाधारादि षट्चक्रांत एकत्र मन । पातंजलाभिमतें धारण । प्राणायाम घ्राणपीडणासमान । हेंही अन्यथा जाणावें ॥ ६१ ॥; आत्मज्ञान परिसावें श्रोतीं । प्रमाणांतरबोधायोग्य सद्वृत्ति । ब्रह्मचि आहे ऐशी निरालंब स्थिति । परमानंददायक विख्यात जाणावी ॥ ६२ ॥ देहादि-अनुसंधानरहित । निरालंबस्थिति ब्रह्म अखंडित । तें ‘ ध्यान ’ शब्दें वर्णिली प्रख्यात । परमानंद देणारी ॥ ६३ ॥; आतां ‘ समाधिरूप ’ पंधरावें अंग सांगती । विषयानुसंधानरहित कारणवृत्ति । निर्विकार ब्रह्माकार सम्यक् असे ती । प्रपंचसंस्काररहित जी ॥ ६४ ॥ ध्याता-ध्यान-ध्येयाकारवृत्तिशून्य । द्वैतानुसंधान-वृत्तीचें विस्मरण । तयासि ‘ ज्ञान ’

संज्ञक समाधि जाण । म्हणती शंकराचार्य जगद्गुरु ।। ६५ ।। अज्ञानवृत्ति-विस्मरणेंकरून । समाधि कैशी ऐशा शंकेचें सांगूं समाधान । ब्रह्मात्म्यैक्यबोधाच्या अभावें जाण । वृत्तिविस्मरण होत नसे अज्ञानियां ।। ६६ ।। द्वैतानुसंधानरहित समाधि । ब्रह्मज्ञान-सहितासि अतिप्रिय निरवधि । ब्रह्माकारें स्फुरणरूप यथाविधीं । ज्ञानसंज्ञक निरूपिली ।। ६७ ।। ब्रह्मात्म्यैक्य निर्विकारवृत्ति । उक्त समाधि संविदुत्पत्ति । परंजीवैकता ब्रह्मप्रतीति । वर्णिली असे आचार्यें ।। ६८ ।। याकरितां सांगतां निदिध्यासन उक्त । अकृत्रिमानंदस्वरूपभूत । आनंदाभिव्यंजक निदिध्यासन वेदान्त । साधकें सम्यक् अभ्यासिजे ।। ६९ ।। साधनाभ्यासरहित सर्वकाल । ह्या वेदांतप्रसिद्ध समाधि-अभ्यासाचें फल । योगी ब्रह्मस्वरूप होती केवल । सद्गुरूच्या कृपानुग्रहें ।। ७० ।। अखंडैकरस-ब्रह्मस्वरूपेंकरून उक्त । अवस्थान लक्षण मोक्षफलप्रद ह्या समाधीपर्यंत । सद्गुरूच्या अनुग्रहवंतासि सुलभ असत । हा योग सुखकर तथापि ।। ७१ ।। सुलभ म्हणून करूं नये अनादर । करावा अनुसंधानसहित समाधि-अभ्यास निरंतर । नाहीं तरी आळसें भोगलालसें दुःखकर । विघ्नबाहुल्य उपजेल ।। ७२ ।। लय-तम-विक्षेप-रसास्वाद-कषाय । हें विघ्नबाहुल्य त्यागावें शहाण्यानें अवश्य । तोचि स्पष्टार्थ अभ्यासास्तव अभिप्राय । श्रोतीं श्रवण करावा ।। ७३ ।। ‘लय’ म्हणजे निद्रा हे समाधीस बाधक । ‘तम’ म्हणजे कार्याकार्यांचा अविवेक । ‘विक्षेप’ म्हणजे विषयस्फुरण तें असें घातक । ‘रसास्वाद’ म्हणजे मीं धन्य आहें ।। ७४ ।। इत्यादि आनंदाकारवृत्ति चित्तदोष । तीव्र वासनें उपजती रागादि द्वेष । तेणें चित्त स्तब्धीभावें खवळते विशेष । तोचि ‘कषाय’ म्हणावा ।। ७५ ।। तात्पर्य मनोवृत्तिच बंधमोक्षासि कारण । घटादि पदार्थाकार वृत्तीचें होतें तन्मयपण । शून्य म्हणजे अभाववृत्तीनें जड-शून्यपण । आणि ब्रह्मवृत्तीनें पूर्णत्व प्राप्त होतें ।। ७६ ।। ब्रह्माकार-वृत्तीनें पूर्णत्व प्रसिद्ध । अभ्यासावें ब्रह्मेच्छूनें निरालस्य शुद्ध । तेणें सर्व विघ्नें नाशतीं हें सिद्ध । संशय लेश न धरावा ।। ७७ ।। ही ‘ब्रह्माख्यावृत्ति’ करणारी पावन ।

तिचा जे त्याग करिती धिक्कारून । ते केवल निरर्थक वांचती अज्ञान । पशु-पक्ष्यांहूनि अधिक मूढ ॥ ७८ ॥ ही ब्रह्मवृत्ति अनुभवूनि जे वाढविती । साधकांसि बोधिती तेचि सत्पुरुष धन्य असती । त्रिभुवनांत ते महात्मे पूज्य वंद्यार्ह तिष्ठती । लोकानुग्रहाकारणें सर्वदा ॥ ७९ ॥ ज्यांची ही ब्रह्मवृत्ति परिपक्व वृद्धिंगत पावली । ते ब्रह्म निःशब्द मुक्तिसुख भोगिती सर्वकालीं । त्यांहून इतर जे शब्दवाचाली । ते फाल्गुनांतील बालकांसारिखे ॥ ८० ॥ ब्रह्माच्या गोष्टींमाजीं कुशल । विषयासक्त आणि रागद्वेषी अज्ञानी केवल । वारंवार जन्मती मरती खल । पावती फल दुःखरूप सदा ॥ ८१ ॥ म्हणूनि प्राज्ञपुरुषें ब्रह्मनिष्ठ-। वृत्तीवांचून अर्धक्षण फुकट । न जाऊं द्यावा हें नीट । तत्त्व ध्यानीं धरावें ॥ ८२ ॥ ब्रह्मा शुक सनकादिकांनीं श्रेष्ठ सेवित । सर्वदा राजयोग समाधीपर्यंत । मुमुक्षूंनीं सेवावा अवश्य वेदमत । संतत मोक्ष सुखदायक जो ॥ ८३ ॥; ऐसा पूर्ण परम राजयोगी । परमहंस परात्पर पुरुष त्यागी । श्रीमद्दत्तात्रेय स्वामी असंगी । जगत्पालक गुरुनाथ ॥ ८४ ॥ आपल्या सत्तास्फुर्तीकरून । अनंतब्रह्मांडनायक चालक पूर्ण । अनादि वटपत्रशायी नारायण । महेश्वर मायिन जो ॥ ८५ ॥ जगतासाठीं धरी नाना वेष । धर्मसंस्थापनार्थ अवतार विशेष । परमात्मा विराट हिरण्यगर्भपुरुष । सर्वांतर्यामी चिद्घनानंद ॥ ८६ ॥ दुर्बळ दीन दुःखीजनांस । आणि भोळे भाविक शुद्ध मानस । यांस आशीर्वचनें पाववी सुखास । श्रीपादवल्लभ नरहरि ॥ ८७ ॥ त्रयमूर्तीचा अवतार साक्षात् । कारुण्यसिंधु आनंदभरित । स्वच्छंद-व्यवहारी सद्गुरुनाथ । जगन्नायक जनार्दन ॥ ८८ ॥ ज्याचे लीलामृत-श्रवणें । उठे संसाराचें धरणें । नाना संकट पीडा टळणें । गंडांतर अपमृत्यु ॥ ८९ ॥ भक्तकार्यार्थ जेथें तेथें उभा । सर्वाधिष्ठान चैतन्यगाभा । जो हृदयस्थ असल्यानें मंगलशोभा । परिसावें चरित्र तयाचें ॥ ९० ॥ ते श्रीगुरु स्वामी दिगंबर । अक्कलकोटीं स्वेच्छाचार । अंत्यज-वाड्यांत चिदंबर । विराजित होते एके कालीं ॥ ९१ ॥ अंत्यजादिक प्राणीमात्र जन । पाहती चैतन्य अभेदें समान । उच्च नीच

* * *

न्यूनाधिकपण। नेणती मुळींच भगवान् ते ॥ ९२ ॥ अंत्यजवाड्यांत सहस्रावधि लोक। दर्शनाकरितां होऊनि निःशंक। येती जाती तेव्हां यतिनायक। दिसती हास्यवदन प्रसन्न ॥ ९३ ॥; असो एक दरिद्रें पीडिलेला ब्राह्मण। कोंकण देशाचा राहणार असून। कर्मिष्ठ अक्कलकोटीं येऊन। राहिला होता संशयीं ॥ ९४ ॥ तैसाच एक मराठे जातीचा नर। गलितकुष्ट रोगें व्यापलेला फार। भिक्षान्न मागूनि भरी उदर। गरीब सात्त्विक शाहणा ॥ ९५ ॥ तो पूर्वी देह गेह क्षेत्रादिक-। संपन्न होता मोठा धनिक। गृहस्थाश्रमी व्यवहारिक। चतुर भाविक लौकिकीं ॥ ९६ ॥ पुढें गेला क्षेत्र वाराणशीस। तेथें प्रवर्तला अनुचित कर्मास। आणि विशेषें व्यभिचारास। रात्रंदिवस आसक्त झाला ॥ ९७ ॥ मद्यप्राशनें उन्मत्त धुंद। न जाणे कुलधर्म करी विनोद। धिक्कारितसे सज्जनवृंद। तीर्थक्षेत्र देवस्थान ॥ ९८ ॥ जाहला निर्धन भिकारी। भिक्षा मागे दारोदारीं। निंदिती तयासि नरनारी। काशीपुरीचे जन सर्व ॥ ९९ ॥ तेथेंचि जाहला जातिभ्रष्ट। प्रारब्धयोगें उद्भवला गलितकुष्ट। मग तेथून नासिक त्र्यंबक श्रेष्ठ। क्षेत्रीं राहिला येऊनि ॥ १०० ॥ तेथेंही गुर्गुर करी श्वानवत्। लोकांसि गालिप्रदानें अर्पित। तेथून पादचारी पंढरपुरांत। पातला शूद्रकुलनाशी ॥ १ ॥ तेथें पांडुरंगाचें करी दर्शन। निर्वाह करी भिक्षा मागून। तोंड टाकूनि वसवसां वचन। क्रोधाविष्ट बोले मराठा ॥ २ ॥ प्रकृति उग्र अति तामसी। मुकला स्त्री-पुत्र-ग्राम-सदनासि। अनुचित कर्मफलासि। भोगितसे दुर्धर तो ॥ ३ ॥ त्या पांडुरंग-क्षेत्रीं एक सात्त्विक संत। तयासि करूनि साष्टांग दंडवत। म्हणे भोग दुर्धर सोसवत। नाहीं नाहीं आतां हो ॥ ४ ॥ साधु म्हणे ‘हांसत कर्म करावें। तेंचि परिणामीं रडत भोगावें’। दूषण कोणावरी ठेवावें। भोगिल्याविण सुटका नसे ॥ ५ ॥ तथापि सांगूं सुलभ उपाय। सांप्रत अक्कलकोटीं अद्वितीय। परमहंस परमपुरुष दत्तात्रेय। अवतारिक नांदती ॥ ६ ॥ असंख्य लोक दर्शनास। जाती पावती इष्टसिद्धीस।

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

मला अतिशय कास श्वास । झाला होता तेधवां ॥ ७ ॥ अनेक औषधोपचार । करूनि थकलों झालों जर्जर ।
शेवटीं पांडुरंगासि प्रार्थिलें फार । कृपा करावी मजलागीं ॥ ८ ॥ आपल्या चरणांवांचून । सर्व प्रकारें नसे संरक्षण ।
पंढरीराया आलों शरण । शरणागतासि मरण चिंतूं नका ॥ ९ ॥ अन्न न होय पचन । नये निद्रा विश्रांति एक
क्षण । आपण भगवंत सगुण । दया करितां काय न होय ॥ ११० ॥ तुम्ही जरी उपेक्षा कराल । तरी उद्यांचें मरण
आज येईल । दर्शन भजनादि अंतरतील । विठ्ठल माउली मजलागीं ॥ ११ ॥ तेव्हां रजनीमाजीं स्वप्नांत । येऊनि
सांगे रुक्मिणीकांत । जावें अक्कलकोटीं त्वरित । दर्शनें रोग जाईल ॥ १२ ॥ पुढें पांडुरंग-आज्ञेनुसार । गेलों राहिलों
दर्शनातुर । दत्तात्रेय-स्वामींस वारंवार । विनवितां बोलले जगद्गुरु ॥ १३ ॥ राताळीं भाजून तीन दिवस । भक्षण
करावीं तेणें कास श्वास । पावतील तात्काल नाशास । भिऊं नको साधुराया ॥ १४ ॥ मग राताळीं भक्षिलीं तीन दिवस ।
तेणें समूळ गेले कास श्वास । मग केलें प्रभूंचे पूजनास । नैवेद्य अर्पिला यथाशक्तीं ॥ १५ ॥ तरी त्वांही तेथें जावें ।
परमात्मा-पायीं शरण व्हावें । दर्शनें आरोग्य होईल बरवें । संशय नसावा मनांत ॥ १६ ॥ येथून पादमार्गें फार ।
अक्कलकोट नाहीं दूर । तुम्हीं सिद्ध होऊनि प्रज्ञापुर । मार्गासि चालतें व्हावें जी ॥ १७ ॥ गलितकुष्टयानें शुभवचन
ऐकून । संतुष्ट झालें त्याचें अंतःकरण । नंतर विठ्ठल-मूर्तीचें दर्शन घेऊन । साधूच्या आज्ञेनुसार निघाला ॥ १८ ॥
पादचारी मंदगतीं । पातला अक्कलकोटाप्रति । खंडोबाचे देवळाजवळ वस्ती । केली मठांत तयानें ॥ १९ ॥ दुसरे
दिवशीं खासबागेंत । जाऊनि साक्षात् देखिले भगवंत । घातलें चरणीं दंडवत । शरणागत होऊनि ॥ १२० ॥ भिक्षान्न
मागूनि उदरपूर्ति । करूं लागला मंदमति । समर्थ तयासि म्हणती । साधु-आज्ञेनें आलासि ॥ २१ ॥ पुढें अक्षयी
स्वामिरायाजवळ । गलितकुष्टी करी तळमळ । दूर बसून सर्वकाळ । समर्थनाम स्मरतसे ॥ २२ ॥ जगदीश्वर आनंदयुक्त ।

बैसले होते अंत्यजवाड्यांत । गलितकुष्टी उभा तिष्ठत । नामाचा गजर करूनियां ॥ २३ ॥ अस्थींच्या पडल्या राशी । त्या अस्थि-भांडारखान्यासि । टेकून बैसले निःशंकेंसीं । दत्तात्रेय-जगदात्मा ॥ २४ ॥ हातांत घेऊनि मोठीं हाडकें । खेळती अभेदें कौतुकें । निर्भयपणें तुटकीं हाडकें देखे । फेंकती मागविती पुनरपि ॥ २५ ॥ दरिद्री कर्मिष्ठ ब्राह्मणास । पाहूनि वाटे चिळस । दूर उभा राहून लोकांस । म्हणे विटाळ होईल हो ॥ २६ ॥ त्यांत एक सेवेकरी । ब्राह्मणासि म्हणे सोंवळें भारी । ऐशींच हाडकें तुमच्या शरीरीं । खिळिलीं आहेत सर्वांगीं ॥ २७ ॥ अस्थिमांसादिकांचें भांडार । आहे हें स्थूल शरीर । वासनामय सूक्ष्म संचार । अमंगल अशुचि जड ॥ २८ ॥ तेव्हां बोलती दत्तात्रेय-स्वामिराय । यांतून नेववेल तितुक्या अस्थि घेऊनि जाय । दरिद्र समूळ पावेल क्षय । मानसीं संशय नसावा ॥ २९ ॥ ब्राह्मण निरुपाय होऊन । सदाशिव प्रभूची आज्ञा मानून । त्यांतून कांहीं हाडकें घेऊन । निघाला कोंकणांत जावया ॥ १३० ॥ दत्तात्रेयांसि करूनि साष्टांग नमस्कार । आशीवर्चन संपादून सत्वर । कोंकणांत घरीं गेला विप्र । कांतेसि वृत्त कळविलें ॥ ३१ ॥ कांता विनवी पतिराया । श्रीगुरुदेव-दत्तात्रेया । आपणा दुर्बळांची येऊनि दया । हाडें दिधलीं प्रसाद ॥ ३२ ॥ त्यांचा करूं नका त्याग । अवतारिक पुरुषांचा अनुराग । आणा घरांत पाहूं उपयोग । आतांचि काय होतसे ॥ ३३ ॥ मग हाडकांचीं आणूनि गाठोडी । गुप्तपणें सोडिली तांतडी । टाकूनि विटाळबुद्धि कुडीं । पाहूं लागलीं उभयतां ॥ ३४ ॥ तों उत्तम प्रकारचें सुवर्ण दिसलें । अस्थींचें नामचि नाहीं उरलें । दत्तात्रेय गुरु प्रसन्न झाले । दरिद्र गेलें जन्माचें ॥ ३५ ॥ नंतर कुटुंबासह ब्राह्मण । अक्कलकोटीं येऊन । श्रीगुरूचें यथासांग पूजन । करी ब्राह्मणभोजनातें ॥ ३६ ॥ साक्षात् परमेश्वर-अवतार । ज्यांच्या भाषणें सहज प्रकार । हाडकाचें सुवर्ण झालें चमत्कार । अपार लीला अगम्य ज्यांची ॥ ३७ ॥ तो ब्राह्मण कांहीं दिवस । समर्थचरणीं करूनि

वास । आज्ञा घेऊनि गेला स्वदेशास । सुख संतुष्ट होऊनि ॥ ३८ ॥ अस्थींचें उत्तम सुवर्ण झालेलें । पाहूनि लोकांस
अपूर्व वाटलें । म्हणती ऐसें देखिलें न ऐकिलें । अघटित करणें अलौकिक ॥ ३९ ॥ आम्हांसि दिसती देहधारी मानव ।
परंतु प्रत्यक्ष देवाधिदेव । असती परमात्मा सदाशिव । निःसंशय उघडपणें ॥ १४० ॥ हजारों लोक घेती दर्शन ।
श्रीफलादिक पुढें ठेवून । श्रीमद्गुरुवर्य अत्रिनंदन । एक विप्रासि पुसती ॥ ४१ ॥ तुमच्या सदनांत परम । सुगंधी चंदन-
वृक्ष वसे उत्तम । त्या चंदनाचें जुनें खोड सप्रेम । आम्हांसि आणूनि द्यावें ॥ ४२ ॥ ब्राह्मणासि वाटलें आश्चर्य ।
म्हणे अंतर्साक्षी धुरंधर जगत्कार्य । प्रत्यक्ष परमेश्वर जगद्वर्य । कैसें जाणिलें समर्थांनीं ॥ ४३ ॥ आमचें ग्राम आणि
सदन । मागिले द्वारीं वृक्ष चंदन । त्या चंदनाचें खोड जीर्ण । दोन योजनांवर ग्राम तें ॥ ४४ ॥ त्या ब्राह्मणानें आपले
ग्रामीं । त्वरें जाऊनि शीघ्रगामी । चंदन वृक्ष होता जो आपुले धामीं । तयाचें खोड कापिलें ॥ ४५ ॥ तें आणून
दिधलें गुरुराया । समर्थांनीं करीं घेऊनि तया । गलितकुष्टीयासि पाचारूनियां । अर्पिलें कृपाकटाक्षें ॥ ४६ ॥ म्हणती
उदकांत करूनि घर्षण । अंगासि नित्य करावें मर्दन । गलित कुष्टीयाचें भाग्य उदेलें म्हणून । आशीर्वचन मिळालें
॥ ४७ ॥ मास पक्ष अंगासि सुगंध । उगाळूनि लावितां रोगनिरोध । होऊनि शरीर कुष्टरहित शुद्ध । दिसूं लागलें
निरामय । ४८ ॥ जयासि पूर्ण गुरुकृपा लाधे । तयासि रोग गंडांतर अपमृत्यु न बाधे । साहजिक तयाचें कार्य साधे ।
कृतार्थता पावे नर ॥ ४९ ॥ गलित कुष्टी अति दुःखी नर । तयाचें आरोग्य झालें दिव्य शरीर । दंडवत घाली वारंवार ।
दत्तात्रेय-स्वामिराया ॥ १५० ॥ शुष्क भिक्षा मागूनि थोडी । गलितकुष्टीयानें अनेक परवडी । सद्गुरुनाथासि नैवेद्य
आवडीं । करविला चोळाप्पाचे गृहीं ॥ ५१ ॥ समर्थांसि मंगलस्नान घालून । प्रेमभरें केलें पूजन । यथाशक्तीं नैवेद्य
समर्पण । करूनि फल-तांबुलादि दिधलें ॥ ५२ ॥ दोन मनुष्यांचे अन्नसामग्रींत । जेविले सेवेकरी यथेच्छ एकशत ।

शूद्र प्रसाद घेऊनि आनंदयुक्त । संतोषित जाहला ॥ ५३ ॥ म्हणे जन्माचें सार्थक जाहलें । उमारमणकृपें देहआरोग्य लाधलें । धन्य धन्य भाग्य उदेलें । स्वामिराज वळले मजलागीं ॥ ५४ ॥ जन्मपर्यंत सेवा करून । महारोग जाणें अति कठीण । तो सहज दर्शनेंकरून । मास-पक्षांत व्याधि समूळ गेला ॥ ५५ ॥ हे नव्हे वेषधारी मानव । प्रत्यक्ष परमेश्वर देवाधिदेव । मला सप्रमाण दृढानुभव । प्राप्त झाला तत्काल ॥ ५६ ॥ मग गुरुआज्ञेनुसार । गेला आपले ग्रामीं सत्वर । स्त्रीपुत्रांसि भेटतांचि आनंद थोर । जाहला तयांचे मानसीं ॥ ५७ ॥ भेटती येऊनि ग्रामींचे लोक । म्हणती तुम्हांसि प्रसन्न जगन्नायक । एकत्र होऊनि स्त्रीपुत्रादिक । सुखाचे दिवस पाहिले ॥ ५८ ॥ जयासि प्रसन्न नारायण । गुरुदेवदत्त अनसूयानंदन । तयासि ब्रह्मांडांत कांहीं न्यून । पडणार नाहीं सर्वोपरी ॥ ५९ ॥ दरिद्री कोंकणचा कर्मिष्ठ द्विज । जाहला श्रीमंत सुखी सहज । महारोगी पाप्यासि अधोक्षज । अर्पिती उत्तम काय कांतिप्रद ॥ १६० ॥ पुढें तो शूद्र कुटुंब-स्त्रीपुत्रादिक- । सह येऊनि प्रज्ञापुरीं वंदी गुरुनायक । ब्राह्मणसमाराधना अवश्यक । यथासांग करी सद्भावें ॥ ६१ ॥ विश्वाधारी सर्वांतरींचे । त्रिकालज्ञानी जगद्गुरु साचे । शुद्ध प्रेम देखूनि शूद्राचें । आज्ञा देती तयासि ॥ ६२ ॥ तुझ्या सदनांत औदुंबर । कल्पतरु वाढला अति सुंदर । त्याचेखालीं यथाविधीं यथाशास्त्र । गुरुपादुका स्थापाव्या ॥ ६३ ॥ मग सुरेख पादुका विराजमान । केल्या भक्तासि समर्पण । त्यानें अत्यंत उल्लासेंकरून । जमविले विद्वान् वैदिक ॥ ६४ ॥ ग्रामीं जाऊनि सामग्री सिद्ध । करूनि सुमुहूर्त पाहिला शुद्ध । सुस्वर वाद्यें गर्जती नानाविध । द्विजमंत्रघोष चालला ॥ ६५ ॥ गुरुपादुका स्थापिल्यानंतर । ब्राह्मणभोजन आणि इतर । भोजनीं बैसती नारीनर । तों शूद्र म्हणे गुरुनाथ कोठें न दिसती ॥ ६६ ॥ शूद्र जाहला चिंताग्रस्त । तळमळती गुरुनाथाविण समस्त । म्हणती धांव धांव रे उदयास्त- । रहित स्वयंप्रकाश सद्गुरु ॥ ६७ ॥ इतुक्यांत त्या पुण्य नगरांत

महद्भाग्योदयें स्वामिराज अवधूत । अकस्मात् पातले भक्तसदनांत । तदा परमानंद-गर्जना जाहली ॥ ६८ ॥ ध्वजा
पताका लाविलीं तोरणें । पल्लव फलें सुगंधसुमनें । वाद्यें वाजतीं सुस्वर गायनें । उत्तम सिंहासनीं स्थित झाले ॥ ६९ ॥
आरती पूजन समारंभसहित । जाहले अन्नें सर्व तृप्त । जिकडे तिकडे आनंदपूरित । समर्थदर्शनें जन होती ॥ १७० ॥
श्रीफलादिक पुढें पुष्पहार । नाना वाद्यें भजन थोर । कीर्तन पुराण प्रभुरायासमोर । होतसे प्रेमभावानें ॥ ७१ ॥
नगर श्रृंगारिलें शोभायमान । एकचि दाटला आनंदघन । सर्वत्र व्यापला ब्रह्मानंद महान् । गुरुदर्शन-स्वरूपभूत
॥ ७२ ॥ इकडे मुंबई-हैद्राबादेकडील । दर्शनासि आलेले लोक पुष्कळ । त्याकालीं खासबागेंत पुरुषोत्तम कृपाल ।
सिंहासनारूढ स्थित होते ॥ ७३ ॥ बागेंत जनांची एकचि दाटी । कोणी बोलती चमत्कार गोष्टी । इकडे दत्तात्रेय-स्वामी
जगजेठी । मोगलाईंत भक्तग्रामींही असती ॥ ७४ ॥ पादुका-स्थापनार्थ गेलेले । अकस्मात् लोक अति हर्षले ।
ब्राह्मणभोजन यथास्थित झालें । कथापुराणभजनादिक ॥ ७५ ॥ इकडे भक्तमनोरथ करिती पूर्ण । तिकडे
खासबागेंत प्रज्ञापुरीं जन । असंख्य घेती दर्शन । श्रीफलादिक अर्पिती ॥ ७६ ॥ सर्वत्र चैतन्यस्वरूप व्यापक । प्रज्ञापुरीं
संतोषती लोक । तिकडे भक्तग्रामीं सदनीं अलौकिक । समारंभ चालला ॥ ७७ ॥ कित्येक जन पटावा विश्वास ।
म्हणूनि प्रत्यक्ष गेले पहावयास । आश्चर्य वाटलें त्या सर्वांस । दोन्ही ठिकाणीं विलोकूनि ॥ ७८ ॥ जो सर्वत्र सर्वांतर्यामी
पूर्ण वसे । सच्चिदानंदपरब्रह्मस्वरूपें तिष्ठतसे । अनंतकोटिब्रह्मांडें स्वेच्छेसरिसें । क्षणमात्रें उपजवी लय करी
॥ ७९ ॥ दिसे काषायवस्त्र-वेषधारी । परी व्यापूनियां चराचरीं । उरला दशांगुल हृदयीं प्रकारीं । उपलक्षणमात्रें-करूनि
॥ १८० ॥ अगम्य लीला तर्करहित । अस्तिभातिप्रियरूप आत्मा अखंडित । नामरूपाहून अतीत । तो
हृदयस्थ सर्वदा भेटे ॥ ८१ ॥ अक्कलकोटीं भक्तसारथी । उभा त्रिकाल जगदुद्धारार्थी । परमात्मा परम पुरुषार्थी ।

****************************************

परमार्थप्रदाता संपूर्ण ॥ ८२ ॥ तयाचें अद्भुत लीलामृत । होऊनि अंतरीं उल्हासित । वामनदास करी मथित । सद्गुरुकृपा-वरदानें ॥ ८३ ॥ जे भक्तिभावें तयाप्रत । श्रवणद्वारें प्राशिती सदोदित । तयांचीं सर्व कार्यें सिद्ध होत । संदेहरहित बापहो ॥ ८४ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । त्रयपंचाशत्तमाध्याय गोड हा ॥ १८५ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे त्रयपंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः ॥ ५३ ॥

श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय चौपन्नावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्गुरुदेव-दत्तात्रेयस्वामिने नमः ॥ ॥ शिष्य विनवी गुरुराया । अद्वितीय-ब्रह्मसाक्षात्कार व्हावया । काय काय सोडावें ऐशा उपाया । कृपा करूनि सांगावें ॥ १ ॥ शिष्या बृहदारण्योपनिषदांत । याज्ञवल्क्य-जनक संवाद अद्भुत । श्रवण करीं बा सत्यात्महित । साधावया अवश्य तें ॥ २ ॥ अद्वितीय-ब्रह्मसाक्षात्काराची । इच्छा आहे ज्या उत्तम साधकाची । तयानें साधनें या प्रकारचीं । करावींत अवश्य निरालस्य ॥ ३ ॥ अनात्म पदार्थांसि प्रतिपादक । जेवढीं शास्त्रें व्याकरणादिक । तेवढीं परित्यागूनियां देख । श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ-गुरुमुखें ॥ ४ ॥ केवल वेदांतशास्त्र श्रवण । करूनि एकान्त देशांत राहून । श्रवण केलेल्या अर्थाचें मनन । एकाग्र होऊनि करावें ॥ ५ ॥ मननें केला जो निश्चय । ब्रह्मरूप अर्थ अद्वितीय । त्या अर्थांत चित्तवृत्तींच्या प्रवाहरूप अक्षय । निदिध्यासन करावें ॥ ६ ॥ तथा बालकासारिखें रागद्वेषादिरहित । असावें ब्रह्मचर्यादिक साधनयुक्त । आणि श्रवणादिक साधनसंपन्न असूनि सदोदित । स्वमनाचा लय अंतरात्म्यांत करावा ॥ ७ ॥ हा मनोलयचि सर्व दुःखनिवृत्तीचें । आहे कारण जगतीं साचें । आतां अनात्मपदार्थांच्या निवृत्तीचें । निरूपण करीत आहें ॥ ८ ॥ अद्वितीयआत्म्याहूनि भिन्न जितुके । लोकप्रसिद्ध अनात्म पदार्थ तितुके । प्रतिपादन करणारीं शास्त्रें देखें । जितुकीं असतीं ॥ ९ ॥ तथा त्या अनात्म पदार्थ-प्राप्तीचें । जेवढें साधन आहे साचें । ते सर्व पदार्थ जरी शास्त्राचे । विरुद्ध लेशही नसतील ॥ १० ॥ तरी देखील अनात्म पदार्थ ते । चिंतन करणाराच्या वाकादिक इंद्रियांतें । परिश्रमरूप दुःख प्राप्त होतें । वाणीसि व्यर्थ विग्लापन कंठऊरु-शोष ॥ ११ ॥

म्हणूनि त्या अनात्म-पदार्थांचा । तथा अनात्मपदार्थ-प्रतिपादक शास्त्रांचा । मुमुक्षूनें करावयाचा । परित्यागचि अवश्य
॥ १२ ॥ जैसें गर्दभ भार वाही । अति दुःखी होतें सर्वदाही । तैसें वर्तमानविषय-चिंताव्याकुल पाहीं । परम दुःखासि
कारण ॥ १३ ॥ तात्पर्य वर्तमानविषय-चिंताग्रस्त । अति दुःखासि होती प्राप्त । मग भूतभविष्यविषय-चिंताक्रांत । दुःखी
होती यांत आश्चर्य कोणतें ॥ १४ ॥ परमात्माचिंतन परित्यागून । ज्या ज्या विषयांचें करिती चिंतन । ते विषय कदाचित्
शास्त्रेंकरून । निषिद्धही नसतील ॥ १५ ॥ तथापि ते विषय प्रवृत्तिद्वारें । वाकादिक इंद्रियांसि सारे । दुःखप्रद
होती बा रे । म्हणूनि सर्व प्रकारें त्यजावे ते ॥ १६ ॥ शास्त्रानें विधान केलेले । पाणिग्रहित स्त्रीसंभोगादि विषय असलेले ।
तेही दुःखचि देती आगळे । मग शास्त्रनिषिद्ध दुःखदायी उघडचि ॥ १७ ॥ परस्त्रीभोगादि शास्त्रनिषिद्ध विषय ।
तेही होती अति दुःखद अनिवार्य । याविषयीं सांगणें पाहिजे काय । दुःख-डोंगर उघड दिसती ॥ १८ ॥ तें दुःख
पुन्हां प्राप्त न व्हावें । म्हणूनि सर्व विषय परित्यागावे । मन अंतरात्म्यांत एकाग्र करावें । हेंचि सर्व दुःखनिवृत्तीचें
साधन आहे ॥ १९ ॥ जे शमदमादियुक्त साधन । तथा श्रवणादिक साधनसंपन्न । शास्त्रमर्यादा पंचकोशविवेचन ।
आत्म्यांत मन लीन केलेलें ज्यांनीं ॥ २० ॥ ते अद्वितीय-आत्मसाक्षात्कारासि लाधले । यावरूनि उघड ऐसें सिद्ध झालें ।
कीं अनात्म-पदार्थ त्यागूनि मन आत्माकार केलें । म्हणजे चित्तैकाग्रता आत्मसाक्षात्कार-साधन आहे ॥ २१ ॥ आतां
व्याकरणादिक शास्त्रांनीं केलेलें कथन । जे अनात्म-पदार्थ त्यांचें करूं निरूपण । जैसें रोग्यासि कुपथ्य अन्नाचें भक्षण ।
दोषाचें कारण होतसे ॥ २२ ॥ तैसें व्याकरणादिक अनात्मशास्त्रांचें अध्ययन । अधिकारी जे मुमुक्षुजन । तयांसि
बहिर्मुखतेचें कारण । होतें भ्रमण बंधनप्रद ॥ २३ ॥ पाणिनिऋषिकृत अष्टाध्यायी आदिक । जे व्याकरणाचे ग्रंथ असती
अनेक । त्यांत व्याकरणशास्त्रपदार्थ अवश्यक । निरूपण केलेले सांगतों ॥ २४ ॥ त्यांत शक्ति-गौणी-लक्षणा ऐशा तीन ।

प्रकारच्या वृत्ती असून । पदाचा आपापले अर्थसंगें जो संबंध जाण । त्या संबंधाचें नाम 'वृत्ति' आहे ॥ २५ ॥ त्या दोन प्रकारच्या शक्ति-वृत्ति । एक 'योगाशक्ति' दुसरी 'रूढीशक्ति' । त्यांत पदाचे अवयवांत जे शक्ति वसे ती । 'योग' नामक शक्ति असे ॥ २६ ॥ त्या योगाशक्तिवान् पदाचें नाम 'यौगिक' असे । पाचक या पदांत दोन अवयव आहेत जैसे । एक पच्-धातुरूप अवयव विलसे । दुसरा अक्-प्रत्ययरूप अवयव आहे ॥ २७ ॥ त्यांत पच् धातुरूप अवयवाची । पाकरूप अर्थांत शक्ति आहे साची । आणि अक्-प्रत्ययरूप अवयवाची । कर्तारूप अर्थांत शक्ति वसे ॥ २८ ॥ तीं पच्-अक दोन्ही पदें मिळून । पाककर्त्या पुरुषाचें होतें बोधन । आणि पदाचे अवयवांत रूढी-शक्ति असून । त्या रूढी-शक्तिवान् पदाचें नाम रूढ आहे ॥ २९ ॥ जैसें विप्र-घट-गौ इत्यादिक पदांचे । जे अवयव त्या अवयव-समुदायीं साचें । ब्राह्मणादिक अर्थबोधन करण्याचें । सामर्थ्य राहतें त्या शक्तिवान् पदाचें नाम 'शक्त' आहे ॥ ३० ॥ आणि पदाच्या वाच्यार्थांत जो वर्तमान गुण असे । त्या गुणद्वारें त्या पदाचा अवाच्य-अर्थसंगें जो संबंध वसे । त्या संबंधाचें नाम 'गौणीवृत्ति' विलसे । त्या गौणी-वृत्तिमान् पदाचें नाम 'गौण' आहे ॥ ३१ ॥ जैसें कोणी म्हणे हा बालक अग्नि आहे । या वचनांत अग्नि-शब्दाचा वाच्यार्थ लोकप्रसिद्ध अग्नि पाहे । त्या अग्नीमाजीं तेजस्वीपणा गुण राहे । तो तेजस्वी गुण बालकामध्यें वसतसे ॥ ३२ ॥ म्हणून अग्नि-पदाची बालकांत । जी गौणीवृत्ति तिष्ठत । आणि पदाचे वाच्यार्थाच्या समागमें जो संबंध राहत । अवाच्य-अर्थाचा ॥ ३३ ॥ त्या संबंधाचें नाम 'लक्षणावृत्ति' । त्या लक्षणावान् पदासि 'लाक्षणिकपद' म्हणती । त्या तीन प्रकारच्या लक्षणा असती । परिसाव्या श्रोतीं आदरें ॥ ३४ ॥ 'जहत्' लक्षणा असे पहिली । दुसरी 'अजहत्' लक्षणा बोलिली । आणि तिसरी 'लक्षितलक्षणा' कथिली । व्याकरणशास्त्र-ग्रंथांत ॥ ३५ ॥ ज्या स्थलांत पदाचा वाच्यार्थ परित्याग करून । अवाच्य अर्थाचें होतसे ग्रहण । तेथें जहत्लक्षणा होते जाण । अवाच्यार्थ म्हणजे लक्ष्यार्थ असे ॥ ३६ ॥

जैसें कोणीं पुरुषानें वचन । ‘गंगेंत ग्राम आहे’ ऐसें केलें उच्चारण । या वचनांत गंगा-पदाचा वाच्यार्थ जलप्रवाह म्हणून ।
त्या प्रवाहांत ग्रामस्थिति संभवत नसे ॥ ३७ ॥ याकरितां जलप्रवाहरूप वाच्यार्थ त्यागून । त्या प्रवाहसंबंधीं जें तीर
असे जाण । त्या तीरामाजीं गंगा-पदाची लक्षणा ग्रहण । करावी ‘जहत्’ नामें ती ॥ ३८ ॥; आणि ज्या स्थलांत पदाच्या
वाच्यार्थाचें । परित्याग न करूनि अवाच्यार्थाचें । ग्रहण होतें तेथें जाणावयाचें । ‘अजहत्’लक्षणास्वरूप तें ॥ ३९ ॥
जैसें कोणीं पुरुषानें दुसऱ्यास सांगितलें । कीं काकापासून दधि संरक्षण करावें भलें । तयें ऐकूनि काक-श्वानादि पशु-
पक्षी हांकिले । दधिप्राशक सगळे ते ॥ ४० ॥ त्या संपूर्णांस जाणावी काक-शब्दाची लक्षणा । वाच्यार्थ टाकूनि करणें
अवाच्यार्थ-पद ग्रहणा । तेच्चि बोलिली ‘अजहत्’लक्षणा । उदाहरणासहित ॥ ४१ ॥; आणि पदाचे वाच्यार्थाचा ।
अवाच्य अर्थाचे संगें जो परंपरा-संबंध साचा । त्या संबंधाचें नाम ‘लक्षितलक्षणा’ जियेचा । व्याकरणशास्त्रीं कथिला
भाग ॥ ४२ ॥ जैसें कोणी पुरुषानें वचन । ‘द्विरेफ’ या शब्दाचें केलें उच्चारण । या वचनांत द्विरेफ-पद-वाच्यअर्थ जाण ।
दोन रकार आहेत ॥ ४३ ॥ त्या वर्णरूप दोन रकारांत । शब्दाची कारणता न संभवत । म्हणूनि द्विरेफ-पदाची
मधुकर-व्यक्तींत । लक्षणा होत आहे ॥ ४४ ॥ द्विरेफ-पदाचा वाच्यार्थरूप येथ । दोन रकारांचा मधुकर-व्यक्तिसंगें
संबंध साक्षात् । न संभवे, परंतु स्वघटितपद-वाच्यत्व । परंपरा-संबंध संभवे ॥ ४५ ॥ येथें स्वशब्दें दोन रकारांचें ग्रहण
कीजे । त्या दोन रकारीं घटित भ्रमर पद जें । त्या भ्रमर-पदाचा वाच्यार्थ जाणिजे । मधुकर-व्यक्तिच निश्चयें ॥ ४६ ॥
याप्रकारें व्याकरणशास्त्रांत पाचकादिक पदांत । शक्तिआदिक वृत्ति कथन केल्या आहेत । ते व्याकरणशास्त्रकर्ते पुन्हां
सांगत । पदाचे अर्थ अनेक ॥ ४७ ॥ श्वकः इत्यादिक पदांत । प्रकृतिअर्थ प्रधान होतात । आणि पाचक
इत्यादिक पदांत । प्रत्ययाचा अर्थ प्रधान होतो ॥ ४८ ॥ आणि कर्ता-कर्म-करण । संप्रदान-अपादान

* * *

अधिकरण । ऐसे षट्प्रकारचे ‘कारक’ असून । पचादि धात्वर्थाचें नाम ‘क्रिया’ आहे ॥ ४९ ॥ आणि तंडुलादिक पदार्थांचें नाम ‘कर्म’ आहे । तथा पचादिक धातु सकर्मक राहे । आणि भूवादिक धातु पाहे । अकर्मक असती ते ॥ ५० ॥ आणि कित्येक प्रत्यय प्रयोजक पुरुषाचें । कथन करिती त्याच्या व्यापाराचें । तथा कित्येक प्रत्यय प्रयोज्य पुरुषाचे । व्यापार कथन करिती ॥ ५१ ॥ आणि प्रकृति-प्रत्यय दोन । एकत्र केले जाती उच्चारण । तथा सु औ जस् इत्यादिक प्रत्ययांचें नामाभिधान । आहे सुप्-प्रत्यय ॥ ५२ ॥ तो सुप्-प्रत्यय येई ज्या पदाचे अंतीं । त्या पदाचें नाम ‘सुबंत’पद म्हणती । आणि तिप् तस् झि इत्यादि प्रत्यय ओळखले जाती । ‘तिङ्’ प्रत्यय नामानें ॥ ५३ ॥ तो तिङ्-प्रत्यय येई ज्या पदाचे अंतीं । त्या पदासि तिङंतपद म्हणती । आणि हे सुप् तिङ् प्रत्यय जेथें विद्यमान असती । तेथें दुसरे प्रत्यय येऊं न शकती ॥ ५४ ॥ आणि हा तद्धित प्रत्यय असे । तथा हा कृदंत प्रत्यय वसे । तथा हाचि कृत् प्रत्यय विलसे । ऐसे प्रत्यय आहेत ॥ ५५ ॥ आणि अव्ययीभाव तत्पुरुष । द्विगु द्वंद्व कर्मधारय बहुव्रीहि ऐसे षट् समास । तथा हें नाम धातु आहे खास । हा स्त्री प्रत्यय असतसे ॥ ५६ ॥ आणि हा प्रत्यय भावविशेष असे । हा प्रत्यय कर्त्यामाजीं वसे । इत्यादिक व्याकरणशास्त्रांत ऐसे । अनेक शब्द कथिलेले ॥ ५७ ॥ ते संपूर्ण शब्द अनात्म-पदार्थांचें । बोधन करिती म्हणून त्या शब्दांचे । चिंतनाभ्यासें अधिकारी मुमुक्षूचें । चित्त परममोह पावतसे ॥ ५८ ॥ यास्तव त्या बहु शब्दांचें करूं नये अध्ययन । कंठ ऊरु शोष होतसे वाचेसि विग्लापन । धान्यार्थी देतो टरफल भूस टाकून । तैसें त्यजावें ग्रंथ अशेषतः ते ॥ ५९ ॥ ग्रंथचि काय प्रपंच संसारा पाणी । देती अधिकारी मुमुक्षु ज्ञानी । सर्वसंग-परित्यागावांचूनि । आत्मा असंग पुरुष भेटेल कैसा ॥ ६० ॥ अनात्म सर्व ग्रंथांचा करावा निःशेष त्याग । जो परमार्थासि बाधक दुःसंग । तत्सेवनें न विटाळावें अंग । गुरुकृपें निःसंग सुख भोगावें ॥ ६१ ॥; असो एकेवेळीं

* * *

श्रीस्वामी समर्थ । अक्कलकोटच्या खासबागेंत । विहिरीजवळचे छपरांत । निद्रित होते सहजस्थितीं ॥ ६२ ॥ समीप चोळाप्पा पूजारी । कृष्णाप्पा श्रीपादभट आणि सेवेकरी । होते त्यापूर्वीं एक वणिक् स्त्री । कलबुर्ग्याची राहणारी ॥ ६३ ॥ श्रीमद्दत्तात्रेय-स्वामींच्या दर्शनास । आली होती फेडावया नवस । करून दंडवत नमनास । रात्रीं नवस कसा फेडूं म्हणे ॥ ६४ ॥ उदयिक नवस फेडीन । परिश्रमानें फार गेली होती थकून । एके बाजूस निजली जाऊन । नामस्मरण करित सुखें ॥ ६५ ॥ बावडेकर पुराणिक त्यावेळीं । उभे होते स्वामिरायाजवळी । त्यांना पाहून श्रीपादभटानें केली । प्रार्थना श्रीसमर्थांसि ॥ ६६ ॥ पुराणिकांची खर्चाची अडचण । फार झाली स्वामी करुणाघन । तेव्हां पुराणिक म्हणे प्रमाण । खर्चाची तारांबळ जाहली ॥ ६७ ॥ ऐकूनि बोलती देवराय । आम्हा संन्याशापाशीं आहे काय । ती बाई आलेली नवससाङ्गता होय । तिचे जवळ एक रुपया आहे ॥ ६८ ॥ पाहिजे तर तो मागून घ्यावा । श्रीपाद म्हणे बाई आतांच नवस फेडावा । बाईनें रुपया अर्पिला देवाधिदेवा । मग औदुंबरास भेटले प्रभु ॥ ६९ ॥ पुराणिकासि दिधला रुपया एक । वदती डाळभात खाऊन स्वस्थ असां ठीक । त्या दिवसापासून न्यूनता देख । पडली नाहीं अन्नासि ॥ ७० ॥; अक्कलकोटीं बुधवार-पेठेंत । विरूपाक्ष मोदीच्या सदनांत । एकदां बैसले होते दत्तावधूत । तेव्हां ताबूत निघाले मिरविण्यास ॥ ७१ ॥ भुजंगा म्हणे समर्थांसि । ताबुताची मौज पहावयासि । घेऊनि जातों कृष्णाप्पा श्रीपादादिकांसि । समर्थ वदती आज्ञा नाहीं ॥ ७२ ॥ मग मुकाट्या चोळाप्पासि सांगून । गुरु-समर्थाज्ञा उल्लंघून । गेला मंडळीस भुजंगा घेऊन । नव्या विहिरीजवळ उभे राहिले ॥ ७३ ॥ भुईमुगाच्या शेंगा आणि रेवड्या । ताबुतावरी कृष्णाप्पा फेंकी थोडथोड्या । कोणी शर्करा पेढे बर्फीच्या वड्या । कोणी कवड्या पैसे उधळिती ॥ ७४ ॥ श्रीपादभटानें आपल्या बोटांतलें । उत्तम सुवर्णाचें जोडवें थोरलें । भुजंगापाशीं ठेवण्यास दिधलें । भुजंगानें ठेविलें

बोटांत ॥ ७५ ॥ भुजंगा रेवड्या शेंगा । फेकूं लागला मिरवित ढंगा । फेंकितां देखतां ताबुतांतल्या सोंगा । सुवर्ण जोडवें गेलें निसटून ॥ ७६ ॥ भान नसे पाहण्याचे नादांत । सोंगें खेळ गायन वाद्यें वाजतात । ताबुत गेल्यावरी भुजंगा पाहे बोटांत । तों जोडवें पडून गेलें कोठें ॥ ७७ ॥ तदा घाबरून सांगे श्रीपाद-कृष्णासि । जोडवें हरवलें, नाहीं स्मरणासि । आतां कोण प्रयत्न युक्ति कैशी । करावी हो स्वामिराया ॥ ७८ ॥ इकडे स्वामिराज ग्रामाबाहेर । श्रीरामचंद्राचे देवळांत सत्वर । जाऊनि बैसले सुखें स्थिर । स्वच्छंद व्यवहारी त्रिकालज्ञानी ॥ ७९ ॥ चोळाप्पाचे घरांत सर्वांस कळलें । कीं भुजंगाप्पानें जोडवें हरवलें । तेव्हां पाहिजे तैसे तर्क चालले । हानी झाली म्हणूनियां ॥ ८० ॥ इतुक्यांत चोळाप्पा समर्थाजवळ । पुसे करीत मोठी हळहळ । समर्थ म्हणती भुज्या फिरंगी केवळ । मस्ती ताठ्यानें भरलेला ॥ ८१ ॥ फ़ौजदाराजवळ जोडवें आहे । मिळेल काळजीचें कारण नोहे । चोळ्या याजला कोठवरी पाहे । सांभाळावें पदोपदीं ॥ ८२ ॥ सर्वांसि कळतांचि आनंदले । धाकूजी फौजदार संभावित चांगले । त्यांनीं समर्थांपुढें आणून ठेविलें । थोरलें जोडवें सुवर्णाचें ॥ ८३ ॥ भुजंगा घेऊनि समर्थांसि म्हणे । म्यां आज्ञा उल्लंघिली मदांधपणें । त्याचें प्रायश्चित्त लाजीरवाणें । मिळालें उघड मजलागीं ॥ ८४ ॥ अर्थात् गुरु-समर्थाज्ञा उल्लंघन । सर्वथैव दुःखासि असे कारण । म्हणून आज्ञा मानूनि वचन प्रमाण । वर्तावें कल्याण त्यांत आहे ॥ ८५ ॥ ; असो परमात्मा सद्गुरुनाथ । श्रीमद्दत्तात्रेय स्वामीसमर्थ । खेडमणुराहून गमनार्थ । अक्कलकोटीं प्रियभुवनीं ॥ ८६ ॥ निघाले भृत्यजनांसहित । पर्जन्य फार पडून मार्गांत । कठिण चिकट चिखल बहुत । झाला होता या कारणानें ॥ ८७ ॥ त्या मार्गानें मनुष्यें अश्वादि शकट । वागत नव्हतीं मार्गीं कष्ट । एल्लाम्माचे स्थानांत असतां योगविद्वरिष्ठ । मेणावाहक मनुष्यांसि ॥ ८८ ॥ पटकीचा उपद्रव झाला होता । कोणीं उचलावा मेणा आतां । आधींच मेण्याची फार जडता । मूळचीच होती सद्दढ ॥ ८९ ॥ तथापि

गुरुभक्त मंडळी । श्रीपादभट आण्णा पेंडशे महादेवादि त्या काळीं । समर्थांसि मेण्यांत बसवूनि निघाली । उचलूनि मेणा
धीरपणें ॥ ९० ॥ मेणा वाहणारे सहाजण । ते सगळेचि असलेले ब्राह्मण । चालूं लागले परंतु मार्ग कठिण । अति
कष्टदायक जाहला ॥ ९१ ॥ तीन कोश एकसारखा चिखल । ते कष्ट पाहूनि दत्तदयाल । मेण्यांतूनि उतरले तात्काळ ।
मग सेवक विनविती ॥ ९२ ॥ या लहान श्यामकर्णावरी । आरूढ व्हावें जी त्रिपुरारि । तदा अश्वारूढ होती जनहितकारी ।
चालूं लागले सकल ते ॥ ९३ ॥ चालतां स्वामिराजांचे चरण । भूमीस लागूं लागले त्याचीं कारणें दोन । एक
तर लहान ठेंगणा श्यामकर्ण । त्यायोगें भूमीस चरण लागती ॥ ९४ ॥ दुसरें पृथ्वीस लागली फार तळमळ । हे तारक
भगवच्चरण केवल । पूर्वसुकृतें मजवरी अल्पकाल । स्पर्शतील या भाग्यकालीं ॥ ९५ ॥ तरी मी पृथ्वी नाशिवंत जड ।
गांजिलें जनपातकभार प्रचंड । अवतारिक महात्मा-चरणांची आवड । म्हणूनि करी वंदन ॥ ९६ ॥ त्यायोगें कांहीं
पातकभार न्यून । झाल्यानें अकष्ट समाधान । पृथ्वी म्हणे मी जाहलें पावन । कठिण स्वभावा त्यागूनि मृदु होतें ॥ ९७ ॥
हे तारक श्रीगुरु परमात्मचरण । तेणें व्यापिलें विश्व संपूर्ण । वामनावतारीं त्रिपाद भूदान । बळीराजापासून घेतलें
॥ ९८ ॥ त्या महाविष्णूच्या त्रिपाद-गणनेंकरून । क्षणें त्रैलोक्य आटलें संपूर्ण । तेंचि वामन गुरु तारक चरण ।
लागतां आतां कृतार्थ झालें ॥ ९९ ॥ असो पृथ्वीची झाली कांहीं मृदुता । सहा जणांसि नुसता मेणा उचलितां । परिश्रम
झालेले स्वामींस निवेदिती तत्त्वतां । चोळाप्पा श्रीपाद कृष्णादि विनयपूर्वक ॥ १०० ॥ अहो देवाधिदेवा नारायणा ।
श्रीभगवंता पार्वतीरमणा । येऊं द्या दीनाची करुणा । वासुदेव श्रीकृष्णा दयाब्धे ॥ १ ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर ऐक्यरूप
आपण । धरूनि अवतार ब्रह्मसगुण । स्वतंत्र लीलें करितां जगदुद्धरण । सामर्थ्यातिशयें समर्था ॥ २ ॥ कृपा
करूनि मेण्यांत बसावें । पुष्पासारिखें सूक्ष्म व्हावें । तर आम्ही उदार होऊनि जीवें । कठिण पंकांतही मेणा वाहतों ॥ ३ ॥

जर आपण जड दीर्घ स्थूल । स्वरूप मेण्यांत बसूनि धारण कराल । तर आमचे उपाय प्रबल । पलमात्रही चालणार नाहींत ।। ४।। ऐसें प्रणतभक्त-वचन श्रवण केलें । पोट धरूनि गदागदा हासूं लागले । कठिण प्रसंग देखूनि जगदात्मा कळवळले । जाऊनि बैसले मेण्यांत ।।५।। मंचकादिक पदार्थ सामान । इतरांच्या मस्तकीं देऊन । नारायण-जगद्गुरूसि वंदून । मेणा उचलिला सहा ब्राह्मणांहीं ।। ६ ।। श्रीपादभट अण्णा पेंडशे । महादेवादिक षट् द्विज चालती सावकाशें । तों मेण्यासह विश्वंभर योगवशें । पुष्पासारिखे सूक्ष्म झाले ।। ७ ।। सहा ब्राह्मण स्कंधावरी । मेणा घेऊनि चालती कठिण मार्गांतरीं । तेव्हां सर्वांसि वाटलें आश्चर्य भारी । म्हणती पूर्णावतारी पुरुष हे ।। ८ ।। दत्तात्रेयस्वामिनामाची गजर । विप्र करीत मुखें जयजयकार । नागणसुर ग्रामापर्यंत शीघ्र । पोहोंचले येऊनि सकलही ।। ९ ।। नागणसुरचे लोक धांवले । योगीश्वरांचीं चरणकमलें । वंदिती भावें मग त्यांनीं परिसिलें । कठिण मार्गाचें वृत्त तदा ।। ११० ।। मार्ग कठिण त्यांना होता विदित । तथापि योगीश्वरांचें सामर्थ्य अद्भुत । मेण्यासुद्धां आपण यामद्वयपर्यंत । पुष्पासारिखे सूक्ष्म झाले ।। ११ ।। अति कठिण मार्गीं पीडा त्रास । रतिमात्र पडला नाहीं कोणास । धन्य धन्य रक्षिता जगन्निवास । स्वामीसमर्थ श्रीगुरु ।। १२ ।। दुसरे दिवशीं नागणसुराहून । आले वाडीग्रामासि जन । तेथें धान्यादिक मिळेना म्हणून । बाजरी भरडून आणिली ।। १३ ।। तें धान्य शिजवून सर्वांनीं भक्षिलें । दुसरे दिवशीं भगवंतासि विनविलें । येथें अन्नही मिळणें दुर्लभ झालें । काय करावें प्रभुराया ।। १४ ।। तेव्हां समर्थ सांगती सकळिक । घृत-शर्करायुक्त पक्वान्नें अनेक । आज उद्यां भोजन करा क्षण एक । येतसे भक्त तुम्हांसाठीं ।। १५ ।। इतुक्यांत मोगलाई प्रांतांतील । केजधारूरचे देशपांडे तत्काल । महारुद्रराव नानासाहेब निर्मल । खटल्यासहित पातले ।। १६ ।। दत्तात्रेय-स्वामिपदां प्रणिपात । केला त्यांनीं कुटुंब-मुलांलेंकरांसहित । प्रयोजन समाराधनार्थ बहुत । अन्नादि सिद्ध सामग्री आणिली

॥ १७ ॥ स्वयंपाकास प्रारंभ होऊन । सिद्ध झालें नानाविध अन्न । सायंकालीं शताधिक पात्रें वाढून । अनेक प्रकारचे पदार्थ वाढिले ॥ १८ ॥ पात्रीं सर्वत्र भोजनीं बैसले । नाना पदार्थ यथेच्छ आवडीनें भक्षिले । दोन दिवस क्षुधातुर असलेले । तृप्त झाले सुग्रासें ॥ ११ ॥ घेऊनियां दक्षिणा तांबुल । आनंदें बैसले सर्व जातींचें मंडल । तेथें देवीचें होतें अत्युग्र स्थल । त्या स्थलांत संकोच बहु ॥ १२० ॥ देवीनें धरिलें उग्र रूपास । तेणेंकरूनि होतसे लोकांसि त्रास । समर्थ म्हणती देवीला उशास । उचलूनि घेतों आतांचि ॥ २१ ॥ अशा संकोचित स्थलांत । निद्रित जाहले चोळाप्पासहित । त्रिकालज्ञानी अंतर्साक्षी अनंत । दत्तावधूत असती ते ॥ २२ ॥ प्रिय भक्त चोळाप्पाचें भविष्य । समर्थांनीं पूर्वींच कथिलेलें भय । त्याप्रमाणें मध्यान्हरात्रीचा समय । त्या कालीं चोळाप्पास उपद्रव झाला ॥ २३ ॥ चोळाप्पा घाबरलेले पाहूनि । मंडळीही घाबरली भयाभित होऊनि । दत्तात्रेय-स्वामींसि सांगतां त्यांनीं । शेवटचीं दुश्चिन्हें दाविलीं ॥ २४ ॥ चोळाप्पाचे प्रेमाकरितां । ज्वर भरला भारी स्वामीसमर्थां । दुसरे दिवशीं सूर्योदय होतां । मंडळींनीं पोक्त विचारें ॥ २५ ॥ नानासाहेब देशपांडे केजकर । यांचे गाडींत बसवूनि सत्वर । स्वामीसमर्थांसि भयंकर । प्रसंगांतून नेलें प्रज्ञापुरीं ॥ २६ ॥ इकडे चोळाप्पास अधिक । उपद्रव झाला मरणदायक । शालिवाहनाचा असे शक । सत्राशें नव्याण्णव ॥ २७ ॥ आश्विन शुक्ल नवमी तिथीस । चोळाप्पा सत्पुरुष दिवसास । देह त्यागूनि निजधामास । पावले दत्तात्रेय-महाराजांच्या ॥ २८ ॥ परब्रह्मस्वरूपीं एकत्वें समरस । निमग्न झाले विश्रांतीस । पार नाहीं चोळाप्पाचे पुण्यास । धन्य धन्य महाभक्त भोळा ॥ २९ ॥ गुरु-समर्थांच्या चरणसेवेंत । जन्मभरी देह झिजविला सतत । गुरुसेवेंतचि साधला देहान्त । गुरुमूर्ति हृदयीं सांठवूनि ॥ १३० ॥ अंतर्बाह्य स्वामीमहाराज । वियोगचि नाहीं कधीं सहज । प्रपंचपरमार्थाचें हितगुज । सद्गुरुचि एक जाणिलेले ॥ ३१ ॥ परित्यागूनि सर्व साधन-उपाय । अखंड सेविले गुरु-समर्थपाय । शेवटही साधिला न येतां

अपाय । देह त्यागूनि कीर्ति पसरली ॥ ३२ ॥ आंत एक कपट बाहेर एक । हें चोळाप्पासि स्वप्नींही नाहीं ठाऊक । होऊनि विरहित-रागहर्ष शोक । अलौकिक परमपदासि पावला ॥ ३३ ॥ चोळाप्पाविरुद्ध यत्न केले कित्येकांनीं । परंतु शुद्ध गुरुभक्ताची कांहीं हानि । झाली नसूनि प्रत्यक्ष मोक्षदानी । प्रसन्नत्वें योगक्षेम वाहती ॥ ३४ ॥ असो चोळाप्पाचा शरीरविधी । आटोपूनि मंडळींनीं शोकामधीं । अक्कलकोटीं येऊनि निरवधि । वंदिले गुरुसमर्थ पदाब्ज ॥ ३५ ॥ थोरल्या राजपत्नी शुद्धचित्त । त्यांनीं देव-दत्तांसि नेऊनि राजवाड्यांत । उत्तमासनीं करूनि विराजित । साष्टांग दंडवत घातलें ॥ ३६ ॥ राजपत्नींनीं विनयपूर्वक विनंति । केली दत्तात्रेय-स्वामिरायाप्रति । आपल्यास चैन नसून उदास वृत्ति । काय म्हणून जाहली ॥ ३७ ॥ दत्तात्रेयस्वामी मंदगतीनें सांगती । सप्तजन्मींचा पितापुत्र संबंध ज्या रीतीं । तद्वत् चोळाप्पाची तुटली संगती । तो वियोग सहन होत नसे ॥ ३८ ॥ यास्तव आम्हीही लौकर जाऊं । कोणी कोणाचें नाहीं सखे सोयरे भाऊ । चोळाप्पाविण कोठें धांवूं । लीला दावूं कोणाला ॥ ३९ ॥ भक्तिप्रिय श्रीपतीचें हें वाक्य ऐकिलें । राजपत्नीचें चित्त व्याकुळ जाहलें । अंगावरी रोमांच उभे राहिले । कंठ दाटला त्या कालीं ॥ १४० ॥ सर्वपरी दुःखदायक । गुरुवियोगवाक्य शोककारक । परिसूनि साध्वी शुद्ध भाविक । देवाधिदेवा पुसतसे ॥ ४१ ॥ सप्तजन्म प्रीतीचा आपला । सत्पुरुष चोळाप्पा विदेहगति पावला । आपणही शीघ्र जाऊं म्हणतां मला । टाकूनि मायबापाजी ॥ ४२ ॥ आपल्या चरणदर्शनावांचून । अक्कलकोट आणि जगत्संपूर्ण । आम्हां सर्वांसि शून्य उदासीन । वाटेल देवळांत देव नसतां ॥ ४३ ॥ देवावांचूनि देवालय । नृपतीविण राजधानी वृथा होय । भ्रताराविरहित सौभाग्य । पत्नीवांचूनि संसार जसा ॥ ४४ ॥ प्राणावांचूनि इंद्रिय देह । सत्यप्रीतिरहित स्नेह । बालकरत्नाविण सुंदर गृह । ज्ञानरहित ऊहापोह जैसा व्यर्थ ॥ ४५ ॥ नदी वापी कूप जल हीन कोरडीं । मुलांलेंकरादिकाविण

थेरडीं। शेतांत धान्याविण पक्ष्यादिक बापुडीं। पिळाविण दोरडी वृथैव जैशी ॥ ४६ ॥ विद्याविरहित ब्राह्मण। श्रद्धाभक्तिविरहित अंतःकरण। विनयावांचूनि शास्त्रज्ञान। दुःखासि कारण होतसे ॥ ४७ ॥ द्रव्यांवाचूनि संसार। शरीरावांचूनि संस्कार। गरजेवांचूनि नमस्कार। दयेविण उपकार न घडे ॥ ४८ ॥ शौर्यावांचूनि संग्राम युद्ध। सदाचाराविरहित शुद्ध। औदार्याविण धन वृद्ध। ब्रह्मविद्येविण सिद्ध नसती ते ॥ ४९ ॥ पदार्थावांचूनि संग्रह। दुर्जनाविरहित दुराग्रह। संन्याशाविण अपरिग्रह। ईश्वरावताराविण लीलाविग्रह होत नसे ॥ १५० ॥ तैसें आपणा परमात्मावांचून। सर्वचि व्यर्थ गमे उदासीन। मग बोलिले जगज्जीवन। ऐका सज्जन श्रोते हो ॥ ५१ ॥ तुम्ही पुढें जावें खचित त्वरें। आम्हीही येतोंच काळजी करूं नका बरें। शरीर मिथ्या नाशिवंत न खरें। त्यागिलेंच पाहिजे अवश्य तें ॥ ५२ ॥ भरंवसा नाहीं क्षणभंगुर। उत्पन्न झालेलें सर्व लय पावणार। म्हणून विसर्जन करूनि शरीर। विदेह-कैवल्यांत बसावें ॥ ५३ ॥ जन्ममरणादिक संसृति। मग नाहींच पुनरावृत्ति। 'ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति'। ऐशी श्रुति ब्रह्मानुभूति कथितसे ॥ ५४ ॥ नंतर त्या राजपत्नी भगवद्भक्त। महा साध्वी स्वधर्म-निष्णात। श्रीमद्दत्तात्रेय-मुखें ज्ञानामृत। पान करूनि तृप्त झाल्या ॥ ५५ ॥ आश्विन शुद्ध एकादशीस। देह विसर्जन करूनि असंग ब्रह्मस्वरूपास। प्राप्त झाल्या विदेह-कैवल्यास। स्वामीसमर्थ-पूर्णकृपें ॥ ५६ ॥ धन्य ज्यांची पूर्व सुकृताची जोडी। गुरुभक्तिमान् ज्ञानी वैराग्याची आवडी। सत्कीर्तीची सदा उभारूनि गुढी। विदेह-मोक्षसुखांत तिष्ठल्या ॥ ५७ ॥; समर्थांची लीला असे अपार। अक्कलकोटापासून दीड कोशावर। महांतनळी लहान नगर। तेथें श्रावण मासांत एकदां ॥ ५८ ॥ अंधारी रात्र काळोख फार। पर्जन्य येत होता भुरभुर। तदा श्रीमद्दत्तात्रेय-योगीश्वर। वाडींत उतरले होते ॥ ५९ ॥ संगें वस्त्रालंकार-भूषणें। गाडी घोडे वृषभ गाई वाहनें। पात्रें सामग्री पदार्थ अन्नें। होती

मंडळी सेवेकरी ॥ १६० ॥ मध्यान्ह रजनी होऊनि गेली । सर्वांसि गाढ निद्रा लागली । दत्तात्रेय मूर्ति सिंहासनीं बसलेली । हास्य करी अकस्मात ॥ ६१ ॥ मग मंडळी होऊन हळू हळू जागृत । दत्तात्रेय-स्वामींसि विनवित । अपरात्रीं कां हसतां बहुत । तंव समर्थ सांगती तयांसि ॥ ६२ ॥ तुमचें सकळ सामान । चोर येऊनि गेले घेऊन । आतां स्वस्थ बसूनि करा भजन । हें ऐकूनि सगळे घाबरले ॥ ६३ ॥ दीप लावूनि पाहती सेवकजन । तों वस्त्रपात्रादिक पदार्थ सामान । चोरटे पळाले घेऊन । मग फार धांदल उडाली ॥ ६४ ॥ श्रीपादभटानें केली प्रार्थना । अहो सर्वांतर्यामी जनार्दना । चोर कोठें असतील काय ठिकाणा । सांपडेल सर्व सामान कसें ॥ ६५ ॥ हें सांगावें आतां कृपा करून । समर्थ वदती आमच्या पोराला घेऊन । शोध करा म्हणजे सर्व सामान । सांपडेल त्वरा करा ॥ ६६ ॥ तेव्हां पाटलासि आणविलें । रामोशी भिल्लादि शोधक चांगले । संगें सेवेकरी घेऊनि निघाले । श्रीपादभट शीघ्रगतीं ॥ ६७ ॥ नंतर वासल-गांवचे कुळकर्णी । भवानीराव देशपांडे यांचे सदनीं जाऊनि । वृत्तांत निवेदिला श्रीपादभटांनीं । कीं सामान सर्व चोरीस गेलें ॥ ६८ ॥ समर्थांनीं सांगितलें प्रमाण । आमच्या पोरांसि जावें घेऊन । म्हणजे शोध लागूनि सर्व सामान । सांपडेल तुम्हांसि ॥ ६९ ॥ ते परिसूनि भवानीरावानें तात्काल । मांग रामोशी बोलावूनि सकल । त्यांचे हस्त-पाद-मुखकमल । न्याहाळूनि विचार युक्तीनें ॥ १७० ॥ त्यांतूनि निवडले दोन चोर । चौदावें रत्न दाखविलें प्रखर । तदा ते चोर कबूल झाले सत्वर । म्हणती आम्हीं चोरिलें खरें ॥ ७१ ॥ परंतु सामान घेऊन दुसरी मंडळी । किण्ही गांवांत असती गेली । सर्व सामानाचे भाग त्या स्थळीं । उदयिक होणार आहेत ॥ ७२ ॥ तेव्हां भवानीराव कुळकर्णी । आणि मंडळी चोरांसि घेऊनि । किण्ही गांवांत चपलत्वें जाऊनि । धरिले तेथले चोरटे ॥ ७३ ॥ ठेवलेल्या ठिकाणांहून । चोरांकडून आणविलें सामान । तें सगळें गणून घेऊन । अधिकाऱ्याकडे काम चालविलें ॥ ७४ ॥ विठु मांग

आणि त्याचे सोबत्यांसी । शिक्षा मिळाली न्यायेंसीं । त्यांत नवल वर्तलेलें सावधानेंसीं । श्रवण करावें श्रोते हो
॥ ७५ ॥ ज्यांनीं सामान सोप्यांतून चोरून नेलें । त्यांनीं शिक्षा दंड भोगिले । आणि ज्यांनीं स्वामिचरणांजवळून
चोरिलें । ते सुटले हा चमत्कार ॥ ७६ ॥; सकल पदार्थांसहित । सेवेकरी पूजारी मंडळयुक्त । भवानीराव सद्गृहस्थ
गुरुभक्त । समर्थांसि घेऊनि प्रज्ञापुरीं आले ॥ ७७ ॥ अक्कलकोटीं नव्या विहिरीचे । वेशीबाहेर सावकार-विहिरीचे ।
समीप तलाव जलमय आहे त्याचें । स्वच्छ उदकांत लोक धूती ॥ ७८ ॥ तेव्हां तटाकतीरीं दत्तदिगंबर । सेवकांसह
स्थित होते जगद्धितकर । एक विप्र स्त्री धूत होती वस्त्र । जवळ तांब्याची घागर ठेवूनि ॥ ७९ ॥ स्वामीसमर्थ अद्भुत-
लीलाधारी । घागर लोटिली बहु उदकांतरीं । विप्र स्त्री पाहे होऊनि घाबरी । तों घागर न दिसे कोठेंही ॥ १८० ॥
मग मोठ्यानें करी रुदन । म्हणे सदनीं भ्रतार करील ताडण । घरांत होईल मोठें भांडण । येईल दूषण मजवरी ॥ ८१ ॥
पोहणारे चांगले पाचारूनि । तलावांत पाहिलें सर्व ठिकाणीं । अति-प्रयासें शोधितां त्यांनीं । घागर सांपडली नसे कोठें
॥ ८२ ॥ सहस्रावधि देखती लोक । गलबला गाजला खेदकारक । हांसूनि बोलती जगन्नायक । कां गे आळ घालिशी
॥ ८३ ॥ तुझे पायांजवळी घागर असून । कां रडतेस थोतांड करून । लोक पाहती जवळ जाऊन । तों घागर दिसे
बाईपाशीं ॥ ८४ ॥ सर्वांसि वाटलें महदाश्चर्य । म्हणती प्रत्यक्ष परमेश्वर यतिवर्य । जगदुद्धारक कल्पद्रुम भक्तकार्य ।
प्रकटले गुरुवर्य अवतारिक ॥ ८५ ॥ विप्रस्त्री फारचि लाजली । समर्थांची महत्कीर्ति गाजली । गुरुलीलामृतपानें
तिलांजुलि । देती कल्पित प्रपंचासि ॥ ८६ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ-वामन-
विरचित । चतुःपंचाशत्तमाध्याय गोड हा ॥ १८७ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे चतुःपंचाशत्तमोऽध्यायः
समाप्तः ॥ ५४ ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

# ॥ अध्याय पंचावन्नावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्तात्रेय-गुरवे नमः ॥ ॥ गुरु म्हणती शिष्या ऐक हिताचें । ईश्वर उच्चारित अपौरुषेय वेदविभागाचें । निरूपण करितों सकलांचे । संशय जावया कारणें ॥ १ ॥ प्रत्यक्षादिक सर्व प्रमाणांत । राजारूप वेदप्रमाण विराजित । तो वेद दोन प्रकारें असत । मंत्ररूप आणि ब्राह्मणरूप ॥ २ ॥ प्रथम मंत्ररूप वेद भगवान् । ऋग् यजुष् साम अथर्वण । या भेदें चार प्रकारेंकरून । मंत्ररूप वेद आहे ॥ ३ ॥ आणि दुसरा ब्राह्मणरूप वेद । इतिहास पुराण विद्या उपनिषद । श्लोक सूत्र व्याख्यान अनुव्याख्यान ऐसा भेद । अष्टविध ब्राह्मण-रूप वेद आहे ॥ ४ ॥ जीं वेदवचनें जनक राजादिकांचे । कथा प्रसंगासि बोधिती साचें । त्या वेदवचनांचें । नाम 'इतिहास' आहे ॥ ५ ॥ आणि जें वेदाचें वचन । मायाविशिष्ट परमात्म्यापासून । जगदुत्पत्ति-स्थिति-लयासि कथन । करिती तथा पौतिमाष्यादिक ऋषिवंशासि ॥ ६ ॥ तथा विराटाचा पुत्र स्वायंभुव मनु असे । त्या मनूची उत्पत्ति कथन करितसे । आणि त्या मनुसृष्टींत उत्पन्न झालेले परिसे । जे ब्राह्मणादिक चार वर्ग ॥ ७ ॥ तथा ब्रह्मचर्यादिक आश्रम चारी । त्या सर्वांचे भिन्न भिन्न कर्मांचें कथन करी । त्या वेदवचनांसि वेदवेत्ते अधिकारी । 'पुराण' ऐसें म्हणतात ॥ ८ ॥ आणि जें वेदांचें वचन । 'उपासित' इत्यादिक शब्देंकरून । ब्रह्मादि देवांचें कथितें उपासन । त्या वेदवचनासि 'विद्या' म्हणती ॥ ९ ॥ आणि जें वेदवचन सत्याचेंही सत्य असे । ब्रह्माचे रहस्य-नामासि कथितसे । त्या वेदवचनाचें नाम विलसे । 'उपनिषद' या प्रकारें ॥ १० ॥ वेदाचे ब्राह्मण-भागांत मंत्र कथिले । त्या मंत्रांचें नाम श्लोक बोलिजेलें । संक्षेपें आणि अनेक अर्थांसि कथणारें भलें । वेदवाक्यास 'सूत्र' म्हणती

॥११॥ मंत्रांसि कथन करणारे जे ब्राह्मणभाग वेद। तयांचें नाम ‘व्याख्यान’ आहे विशद। आणि सूत्रांसि मंत्रार्थवादादिसह विस्तरें कथिती जीं वाक्यें वेद। त्या वेदवचनांचें नाम ‘अनुव्याख्यान’ आहे॥ १२॥ जैसें भूमिरूप क्षेत्रांतून। वेदरूप कल्पवृक्ष होती उत्पन्न। तैसें परब्रह्मरूप क्षेत्रांतून। हे वेदरूप कल्पवृक्ष उत्पन्न होती॥ १३॥ ऐसा वेदरूप वृक्ष महान्। ऋग्-यजुष्-साम-अथर्वण। या चार स्कंदेंकरून। तथा नाना प्रकारच्या शाखादिकीं शोभे॥ १४॥ परब्रह्माचे हे वेद निःश्वसित। म्हणून वेदोनारायणासि सर्व शास्त्रांत। अनादि ‘अपौरुषेय’ ब्रह्मरूप साक्षात्। आहे कथन केलेलें॥ १५॥ त्या मायाविशिष्ट ब्रह्मापासून। जैसे हे शब्दरूप वेद झाले उत्पन्न। तैसे त्या वेदांचे अर्थही परमात्म्यापासून। उत्पन्न झालेले आहेत॥ १६॥ ज्ञानयोग कर्मयोग हे दोन। आणि नानाप्रकारचीं दानें जाण। तथा इहपरलोकीं जीवासि प्राप्तीस योग्य म्हणून। सुखदुःखरूप फळें असतीं जीं॥ १७॥ तीं फळें भोगण्याचें साधनद्वार। असें जें स्थावर जंगम शरीर। तथा आकाश भूमि तेज वायु नीर। वाकादि एकादश इंद्रियें असतीं जीं॥ १८॥ प्राण-अपान-व्यान-उदान-समान हे पंचप्राण। तथा वाकादि इंद्रियाभिमानी देवतादिकरून। हें जगत् आणि प्रपंच संपूर्ण। त्या परमात्म्यापासून उद्भवे॥ १९॥ जैशी जगदुत्पत्ति-स्थिति-कालांत। जगदुत्पत्तीपूर्वीं ब्रह्माद्वितीयता सिद्ध असत। तैशी जगत्प्रपंचाचे प्रलयकालांत। पूर्व अद्वितीयरूपता सिद्ध असतसे॥ २०॥ जैसें गंगादिक नद्यांतील पाणी। तथा मेघांतील नीर वर्षूनि। तें सर्वही साक्षात् किंवा परंपरा-संबंधेंकरूनि। महान समुद्रासि प्राप्त होतें॥ २१॥ तैसें प्रलयकालीं हें संपूर्ण। स्थावर जंगम जगत् साक्षात्संबंधेंकरून। अथवा परंपरासंबंधें जाण। परमात्मा देवासि प्राप्त होतें॥ २२॥ अथवा अल्प नद्यादिकांचें पाणी। गंगादि महानद्यांस प्राप्त होऊनि। त्या गंगादिक नद्यांसंगें जाऊनि। महान् समुद्रासि मिळतसे॥ २३॥ तैसें प्रलयकालीं हें कार्य संपूर्ण। प्रथम आपापल्या कारणांत मिळून। तें कारणसह कार्य परमकारण-। रूप

परमात्म्यांत लय पावतें ॥ २४ ॥ आणि जैसा लवणपिंड त्रिकालांत । समुद्रोदकाहून भिन्न नसत । तैसा हा जीवात्मा वास्तव
तिन्ही कालांत । ब्रह्मात्म्याहूनि भिन्न नसेचि ॥ २५ ॥ लवणपिंडांतील घनीभावता नाशवान् असे । आणि लवणांत
समुद्रजल नाशरहित वसतसे । तैसा आत्म्यांत जीवपणा नाशवान् असे । ब्रह्मरूपता तिष्ठतसे अविनाशी ॥ २६ ॥
लवणपिंडाचा घनीभाव नष्ट होय जेव्हां । लवणपिंडही नाश पावे तेव्हां । तैशी मोक्षावस्थेंत अविद्या नष्ट होऊनि गेलिया ।
जीवपणाही नासतसे ॥ २७ ॥ जैसा लवणपिंड आपल्या उत्पत्ति-स्थिति-कालांत । सर्व बाजूंनीं असे क्षाररसयुक्त ।
तैसा हा जीवात्माही त्रिकालांत । स्वयंप्रकाश चैतन्यरूप आहे ॥ २८ ॥ ऐसा स्वयंप्रकाश-आनंदात्मा असतांही । सर्व
जीवांसि प्रतीत कां होत नाहीं । या शंकेचें समाधान लवलाहीं । संतोषकारक परिसावें ॥ २९ ॥ जैसा अत्यंत समीप
वर्तमान । सूर्यादिकांचा प्रकाश असून । त्या प्रकाशासि आंधळे नेत्रहीन । देखूं न शकती कदापि ॥ ३० ॥ तैसें
अज्ञान-अंधःकारेंकरून । आवृत होय ज्यांचें मन बुद्धि नेत्रादिकरून । ते अज्ञानी जीव अत्यंत समीप वर्तमान ।
स्वयंज्योति आत्म्यासि देखूं न शकती ॥ ३१ ॥ जैसा मृतावस्थेंत आणि सुषुप्तींत । हा जीव होतो सर्व विशेष-ज्ञानरहित ।
तैसा मी मनुष्य आहें इत्यादि विशेष-ज्ञानरहित । मोक्षावस्थेंत होतसे ॥ ३२ ॥ परंतु निद्रेंतून जागृत झाल्यावर । पुन्हां
जीव भोगी दुःख अनिवार । म्हणून मरणाचा दृष्टांत खरोखर । कथिला तो समजावया ॥ ३३ ॥ जैसा या स्थूल
शरीराच्या नाशानंतर । संपूर्ण विशेष-ज्ञानरहित झालेला जीव शरीर । जन्मदुःखांसि पुन्हां खरोखर । प्राप्त होत नाहीं तो
॥ ३४ ॥ तैसा आत्मसाक्षात्कारें अविद्या नष्ट झाल्यावर । सर्व विशेष-ज्ञानरहित होऊनि पुन्हां शरीर- । संबंधीं दुःखासि
जीवात्मा न पावे वारंवार । स्वयंज्योति आत्म्यांत अभिन्न वसे ॥ ३५ ॥ यद्यपि मरणकालीं पूर्वशरीर-दुःख नसे ।
तथापि भावी शरीराचें पुण्यपाप अदृष्ट असे । तथा शरीरकारण अविद्या उरतसे । मरणकालीं जीवाचे ॥ ३६ ॥ तीं

दोन्ही अज्ञानी जीवाचे मरणकालांत। विद्यमान असतीं म्हणून पापपुण्यकर्में बद्ध होत । ते अज्ञानी जीव दुसरे जन्मासि होऊनि प्राप्त। अनेक दुःखें भोगिती ॥ ३७ ॥ आणि मुक्तपुरुषाचें आत्मज्ञानेंकरून। अविद्या तथा पुण्यपाप अदृष्ट जातें नष्ट होऊन। म्हणून त्या मुक्तपुरुषास पुन्हां जन्मादि होत नसून। शरीरदुःखें प्राप्त न होतीं ॥ ३८ ॥ कां तरी घटस्थित आकाशाचा स्वभाविक नाश नसून। घट-नाशानंतर घटाकाशाविषयीं जाण । मूढ पुरुष करितसे आरोपण । घटाकाशाचा नाश जसा ॥ ३९ ॥ तैसा आत्मा स्वाभाविक अविनाशी असून । स्थूलदेहोपाधि-नाशानंतर त्या देहनाशासि जाण । आत्म्याचे ठायीं आरोपण करून । अविवेकी आत्म्याचा नाश मानिती ॥ ४० ॥ जर आत्म्याचा नाश अंगिकार कराल । तर केलेल्या पुण्य-पाप-कर्मांचें सुखदुःख-फल। भोगिल्यावांचून नाशरूप होईल। ‘ कृतनाश ’-दोषें प्राप्त तो ॥ ४१ ॥ तथा न केलेल्या पापपुण्याचें सुखदुःख-फल । भोगणें तो ‘अकृताभ्यागम’-दोष प्राप्त होईल । म्हणूनि बुद्धिमानांनीं अविनाशी केवल। आत्मा सर्वदा जाणावा ॥ ४२ ॥ हें परिसूनि शिष्य विनवी गुरूलागून । आत्मसाक्षात्कार झाल्यापासून। कोणतें फल प्राप्त होतें निराकरण। समाधानप्रद सांगा जी ॥ ४३ ॥ गुरु म्हणती करीं बा हें श्रवण । आत्मसाक्षात्कार झाल्यापासून। अज्ञानरूप अविद्येची निवृत्ति होऊन । कर्तृत्वभोक्तृत्वादि दुःख-निवृत्ति होते ॥ ४४ ॥ ऐशी कार्यसह अविद्या नष्ट झाल्यावरी । मुमुक्षु जनांच्या हृदयांतरीं । स्वयंज्योति-आनंदात्मा निर्विकारी । प्रादुर्भूत होतसे ॥ ४५ ॥ जैसे मेघ झालिया निवृत्त। केवल शुद्ध आकाश होय प्रतीत । तैसा कार्यसह अविद्या होतां निवृत्त । स्वात्मा प्रतीत होतसे ॥४६॥ जागृत झालेला स्वप्नासि मिथ्या मानी । तैसा आत्मसाक्षात्कारेंकरूनि। अविद्या-निद्रेंतून जागृत झालेला ज्ञानी। मिथ्या मानी सर्व दृश्य प्रपंचासि ॥ ४७ ॥ जैसा भयरहित भूप-चक्रवर्ती। स्वप्नावस्थेंत पावे भय अति। आणि स्वप्नांतून जागृत झाल्यावरती। स्वप्न-भयासि मिथ्या मानितसे ॥ ४८ ॥ तैसें वास्तव सर्वदुःखरहित असून। आपल्या

स्वरूपाचे अज्ञानेंकरून । नाना प्रकारच्या दुःखांसि मानून । जीव भोगिती दुःख तें ॥ ४९ ॥ आणि आत्मसाक्षात्कार झाल्यावरी । विद्वान् पुरुष जो मोक्षाधिकारी । आपल्या आत्मस्वरूपीं निर्विकारी । सर्व दुःखांसि मिथ्या मानितसे ॥ ५० ॥ हेंचि आत्मसाक्षात्काराचें फल । करूनि सांगितलें वास्तविक प्रांजल । त्या निःसंशय ब्रह्मसुख-स्थितीसि केवल । भोगिती सर्वकाल जीवन्मुक्त ते ॥ ५१ ॥ कोणी वदे पंचभूतें जग नाशिती । परी तीं मिथ्या दृश्य नाशिवंत असतीं । कल्पांतींही न समर्थ होती । निरवयव आत्म्याप्रति वधावया ॥ ५२ ॥ परमात्म्याची अविनाश स्थिति । श्रीकृष्ण बोधिती अर्जुनाप्रति । ऐकावी ते गीतेंतील भगवदुक्ति । 'नैनं छिंदंति' दोन श्लोकीं ॥ ५३ ॥ शस्त्रें न तोडिती आत्म्यातें । वन्हि कदापि दग्ध करीना त्यातें । शिथिल न करीच पाणी आत्म्यातें । वायूच्यानें शोषवेना ॥ ५४ ॥ कोणत्याही प्रकारें योग्य नव्हे छेदावया । दग्ध करावया भिजवाया । आत्मा नसे योग्य शोषावया । परिसा हेतु श्लोकार्थ तो ॥ ५५ ॥ निरवयवत्व म्हणूनि 'अच्छेद्य' । 'अक्लेद्य' अमूर्तत्वात् 'अदाह्य' । द्रवत्वाभावात् 'अशोष्य' । 'सर्वत्रगत' अविनाशी आहे म्हणून ॥ ५६ ॥ 'स्थिरस्वभाव' परिपूर्ण । रूपांतर-आपत्तिशून्य । पूर्वस्वरूप त्यागीना म्हणून । 'अचल' 'अनादि' श्रुति वर्णी जया ॥ ५७ ॥ याप्रकारें निर्विकार स्वप्रकाशक । विशुद्धात्मा पूर्ण शाश्वत एक । अविनाशी कालातीत अलौकिक । साक्षात्कारानें कृतार्थता येतसे ॥ ५८ ॥ घटशरावादिक अनेक कार्यरूपेंकरून । स्थित होतें एकचि मृत्तिका-कारण । तैसा एक परमात्मा अज्ञानसंबंधें जाण । नाना जगद्रूप प्रतीत होतो ॥ ५९ ॥ जैसें घटशरावादिक कार्य । मृत्तिका-कारणांत होय लय । आणि हें संपूर्ण जगत् पावे प्रलय । अधिष्ठान-कारण परमात्म्यामाजीं ॥ ६० ॥ मालेच्या पुष्पांत सूत्राचा अन्वय असत । आणि पुष्पांचा परस्पर व्यतिरेक होत । तैसा जागृत्-स्वप्न-निद्रा-बालयौवन-वृद्धावस्थेंत । आत्म्याचा अन्वय असून परस्पर व्यतिरेक आहे ॥ ६१ ॥ अलंकारांत सुवर्णाचा अन्वय । आणि अलंकाराचा परस्पर व्यतिरेक होय । भिन्नत्व आणि

व्यापकत्व सत्य । हें अन्वयव्यतिरेक निरूपिलें ॥ ६२ ॥ हें शरीर मातेच्या उदरस्थानीं रहातें । तथापि पिता-मातेच्या शुक्र-शोणित-बीजें उद्भवतें । तथा अन्नपानादि-रसांचें परिणामरूप असतें । नेत्रादिक नवद्वारयुक्त ॥ ६३ ॥ नेत्रादिक नवद्वारें ज्याचा मल वाहे । तसें शरीर अशुचिपणाचें कारण आहे । स्वाभाविक शुद्धपणाहून विरहित हें । विष्ठामूत्रादिकांचें कोठार ॥ ६४ ॥ या कारणानें त्यागी विरक्त । महात्मा योगी विवेकयुक्त । या अमंगल शरीरास खचित । अशुचिच जाणती सर्वदा ॥ ६५ ॥ तैसेंच परस्त्री-परधनेच्छावान् । करिती दुसऱ्याचें अनिष्ट चिंतन । वेदविरुद्ध पाखंड-मतेंकरून । दुराग्रहानें वर्तती ॥ ६६ ॥ ते मरून चांडाळ-देहासि पावती । ऐशा दुष्ट-अमंगलांची संगति । सर्वपरी बाधक म्हणूनि त्यागिती । विरक्त विवेकी संत सदा ॥ ६७ ॥ स्त्रीधनादिक पदार्थांच्या संगाची । परित्यागरूप जी निःसंगता साची । ती निःसंगताच संन्यासी-विरक्तांची । मोक्षमार्ग-पथिका आहे ॥ ६८ ॥ कां तरी स्त्रियादिकांचे संगें पुरुषास । प्राप्त होती संपूर्ण दोष । जे योगारूढ झालेले तयांस । स्त्रीसंग नेतसे अधोगतीला ॥ ६९ ॥ मग योगारूढेच्छा नसणारासि । स्त्रीसंग पाडितो अधोभूमीसि । यांचें आश्चर्य काय म्हणूनि विरक्त संन्यासी । त्यांनीं स्त्रीधनादि संग त्यागावा ॥ ७० ॥ यद्यपि सर्पादिकांचे विषनिवृत्ति- । उपाय शास्त्रांत कथिले असती । तथापि स्त्रीरूप सर्पविषाची निवृत्ति । एक्याच उपायें शास्त्र सांगे ॥ ७१ ॥ शरीरानें स्त्रीचा स्पर्शही करूं नये । मनानें स्त्रीस्मरण कदा चिंतूं नये । वाकादि-इंद्रियानें स्त्रीसंगें बोलूं नये । हाचि उपाय स्त्रीविषनिवृत्तीचा ॥ ७२ ॥ ऐसे जे सर्वसंगपरित्यागी झालेले । ब्रह्मचारी संन्यासी विरक्त साधु भले । योगी विषय-तीव्रविरागी संत सगळे । सद्गुरु-आश्रयें मोक्ष पावती ॥ ७३ ॥ ; ते श्रीमत्सद्गुरुनाथ गिरिनारी । दत्तात्रेय स्वामी वेदांतार्थज्ञान-ध्वजाधारी । जगदुद्धारक पूर्णावतारी । प्रज्ञापुरीं प्रकाशित असती ॥ ७४ ॥ ज्यांचे सामर्थ्यातिशय सहज लीला । ऐकतां गातां समाधान बाणे चित्ताला । जाती अघौघ विघ्नें संकटें लयाला । आणि सर्वार्थ सौख्य प्राप्त

होई ॥ ७५ ॥ असो एकदां अक्कलकोटासभोंवतीं । पूजारी सेवकसहित सहजगतीं । फिरत होते योगींद्र यतियूथपति । केसेगांव नळदुर्गादि ग्रामांत ॥ ७६ ॥ नीलेगांव समीप असून । श्रीमंत भाऊसाहेब जहागिरदार सज्जन । वारंवार प्रार्थिती प्रभूंलागून । आमचे नीलेगांवीं चलावें ॥ ७७ ॥ एके दिवशीं श्रीमद्गुरुदत्तावधूत । सेवेकरी गौअश्ववासरांसहित । नीलेगांवासमीप स्वच्छंदयुक्त । उतरले होते साहजिक ॥ ७८ ॥ हें वृत्त भाऊसाहेबांस कळलें । मग ते अत्यंत प्रेमें धांवूनि आले । स्वामिराज-चरणांबुजा वंदिलें । अश्ववाहनादि आणवूनि ॥ ७९ ॥ सकल कुटुंबासह भाऊसाहेब । विनविती सद्गुरु सदाशिव सांब । पार्वतीपति जनक-हेरंब । कृपा करूनि नीलेगांवीं चलावें ॥ ८० ॥ श्रीफलादि आणि सुवर्ण पुतळी । देवाधिदेवाचे अग्रभागीं ठेविली । अनन्य शरण होऊनि केली । विनवणी विशेष गुरुनाथा ॥ ८१ ॥ तेव्हां बाळाप्पा कृष्णाप्पा श्रीपादभट । सुंदराबाई विश्वंभरबुवा अवीट । दत्तात्रेयगुरुवरांसि नीट । विनविती चला नीलेगांवीं ॥ ८२ ॥ आजपर्यंत नीलेगांवीं आपण । गेला नाहींत हो नारायण । कृपासागरा मनोरथ पूर्ण । करावे भाऊसाहेबांचे ॥ ८३ ॥ मग भाऊसाहेबांस वदती भक्तजनकैवारी । तुमचे गांवास येऊं शनिवारीं । हें परिसूनि जहागिरदारास भारी । आनंद चित्तीं जाहलासे ॥ ८४ ॥ फलादिक प्रसाद घेऊन । नीलेगांवीं कुटुंबसह गेले श्रीमान् । नंतर कांहीं गेलिया दिन । स्वामीसमर्थ साहजिक ॥ ८५ ॥ पूजारी भक्त सेवेकरी । सेवेंत संगें घेऊनि त्रैमूर्ति-अवतारी । निघाले यावया नीलेग्रामा सत्वरी । तें शुभवृत्त कळलें जहागिरदारा ॥ ८६ ॥ सामोरें पाचारणास श्रीमंत । पातले अश्वरथ पुष्कळ जनसहित । विद्वान् वैदिक आणि व्यापारी संभावित । नरनारी धांवती दर्शनासि ॥ ८७ ॥ दर्शन घेऊनि अत्यादरें स्वसदनीं नेलें । प्रभूंसि उत्तम सिंहासनीं बैसविलें । पुष्कळ लोक दर्शनासि पातले । महद्दर्शनें आनंदले सर्वत्र ॥ ८८ ॥ जहागिरदार म्हणे हो श्रीपद्मनाभ । जन्मोजन्मीं हें भगवद्दर्शन अति दुर्लभ । तो कृपाघनांनीं दिधला आत्मलाभ ।

याहूनि अन्य लाभ निरर्थक असे ॥ ८९ ॥ गांवांतील ब्राह्मणादिक सगळे । भोजनप्रसादासि पाचारिले । दत्तात्रेयासि अभ्यंग सुगंध तैलें । घालिती अंग मर्दन करूनियां ॥ ९० ॥ अनेक वादिंत्रें सुस्वर वाजती । ब्राह्मण वेदमंत्र पठण करिती । उभयतां दंपत्य समर्थांसि स्नान घालिती । विध्युक्त समारंभेंकरूनि ॥ ९१ ॥ मंगलस्नान झाल्यानंतर । उत्तम सिंहासनीं बैसविले दत्तदिगंबर । लेवविले वस्त्रालंकार । सुगंध चंदन तिलक उटी लाविली ॥ ९२ ॥ पुष्पहार कंठीं भालीं कस्तुरी तिलक । त्यावरी तंदुलाक्षता शुभदायक । धूप दीप नीरांजन नैवेद्यादिक । षोडशोपचारें पूजिले देव ॥ ९३ ॥ भालींच्या अक्षतांतील तीन । पडले कुंकुमोक्त तंदुल कण । ते समर्थांनीं तत्काल केले अर्पण । भाऊसाहेबांसि प्रसादरूप ॥ ९४ ॥ भाऊसाहेबांनीं दोन तंदुल भक्षिले । स्त्रीनें एक तंदुला भक्षण केलें । समर्थांसि वंदूनि पात्र मांडिलें । पाट रंगवल्ल्यादि सुशोभित ॥ ९५ ॥ पदार्थ पात्रीं वाढिले अनेक । पाटावरी येऊनि बैसले ब्राह्मणादिक । पूजारी भक्त समर्थांचे सेवक । द्विजादिक यथायोग्य पूजिले ॥ ९६ ॥ उत्तम प्रकारें पक्वान्न-भोजन । नानाविध पदार्थ स्वादिष्ट मधुरान्न । यथास्थित ब्राह्मणादिक जन । जेवूनि तृप्त जाहले ॥ ९७ ॥ त्रयोदशगुणी तांबूल दक्षिणा । अर्पिली योग्यतेनुरूप ब्राह्मणां । स्वामिरायांसि आणि सेवेकरी जनां । उत्तम वस्त्रें भूषणें दिधलीं ॥ ९८ ॥ दोन दिवस नीलेगांवीं राहून । तिसरे दिवशीं सर्वांचें स्नान भोजन । झाल्यावरी निघाले जनार्दन । भक्तसेवक-पूजाऱ्यासहित ॥९९॥ भाऊसाहेब जाहागिरदार । संभावित व्यापारी आणि कामदार । नीलेग्रामवासी सर्व नारीनर । पोहोंचविण्यासि दोन कोश आले होते ॥ १०० ॥ भाऊसाहेबांनीं केली प्रार्थना । पुन्हां दर्शन द्यावें अनादि नारायणा । योगाधीश्वर वदले तुमची भावना । साच फलद्रूप होईल ॥ १ ॥ पुनरपि आमुचें दर्शन । होईल निश्चयें तुम्हांलागून । करूनियां स्वस्थ मन । आनंदांत असावें ॥ २ ॥ दत्तदिगंबर अलख निरंजन । पातले प्रज्ञापुरासि नीलेग्रामाहून । मंडळी परत गेली आनंदयुक्त मन । समर्थांचे गुणानुवाद गात

ती ॥ ३ ॥ भाऊसाहेबांचे प्रियपत्नीस। ऋतु प्राप्त होऊनि षोडश वर्ष-। पर्यंत संतान प्राप्त नव्हतें तें जगन्निवास। यतिराजकृपें प्राप्त झालें ॥ ४ ॥ कन्या द्वय एक सुंदर तनय। तीन वर्षांत लाधलीं ऐशीं त्रय। सर्वत्र जाहले तदा हर्षमय। दत्तात्रेय-आराधनें ॥ ५ ॥ नंतर त्या भाऊसाहेबांस। दर्शनाचा फारचि लागला निदिध्यास। मार्गशीर्षांत दत्तजयंतीचे उत्साहास। सहपरिवार अक्कलकोटीं पातले ॥ ६ ॥ साष्टांगीं नमिलें स्वामी-दत्तात्रेया। पायांवरी घातलें कन्या-तनयां। उभयतां जोडूनि करद्वया। स्तविले देव विश्वंभर ॥ ७ ॥ देवाधिदेवा कृपाघना। वटपत्र शयनीं नारायणा। दीनावरी करूनि करुणा। मनोरथ पूर्ण केले मायबापा ॥ ८ ॥ जयासि व्हाल ताता प्रसन्न। तयासि इहपर कांहीं न पडे न्यून। आपल्या दयार्द्र-दृष्टीवांचून। कोणतेंही साध्य होत नसे ॥ ९ ॥ जगत्कल्याणास्तव अवतार। पूर्णब्रह्म स्वामी परमेश्वर। आम्ही अज्ञानी नेणों पामर। महिमा अपार समर्थांचा ॥ ११० ॥ दिसतां यतिवेषधारी नर। परी आहां परमपुरुष परात्पर। सत्तास्फूर्तित्वें व्यापक निरंतर। सर्वांतर्यामीं वसतां सदा ॥ ११ ॥ तुमच्या आज्ञा-सत्तेवांचून। न हाले एकही वृक्षाचें पान। आपल्या दयें सकल देवगण। नेमें नित्य वर्तती निजकार्यीं ॥ १२ ॥ आपली वास्तविक करितां स्तुति। स्तब्ध होती वेद-श्रुति-स्मृति। महात्मा योगी मुनि साधु थकती। खंडींत पाव रती आमुचा पाड काय ॥ १३ ॥ समुद्रांत काय गणावी खसखस। आम्ही मंदमति भुललों संसारास। नेणों आपल्या यथार्थ स्वरूपास। अगम्य लीला श्रीगुरूची ॥ १४ ॥ दिधला प्रसाद तंदुल त्रय कण। त्या त्रय वर्षांत तीन बालकें मजलागून। लाधलीं नेणों अगम्य अतर्क्य महिमान। म्हणूनि लोटांगण घातलें ॥ १५ ॥ दत्तजयंतीचे ब्राह्मण-भोजनांत। भाऊसाहेबांनीं दहा घागरी दिलें घृत। उत्साहसमारंभ झाला यथास्थित। जाहले तृप्त सर्वजन ॥ १६ ॥ समर्थांचें पूजन नैवेद्यादिक। आटोपून भाऊसाहेब सात्त्विक। प्रार्थिती अनंतकोटि-ब्रह्मांडनायक। आपला क्षणही वियोग

नसावा ॥ १७ ॥ पुन्हां नीलेगांवीं भगवंत आगमन । व्हावें सर्वत्रांसि मंगलप्रद दर्शन । पतितपावना करुणाघन ।
भक्तप्रार्थना मान्य व्हावी ॥ १८ ॥ तेव्हां आज्ञापिती गुरुदत्तात्रेय । तुमचे ग्रामीं शनिवारीं येऊं सनिश्चय । भाऊसाहेबांस
आशीर्वचन अभय । प्रसादसहित प्राप्त झालें ॥ १९ ॥; असो पुढें शके सतराशें नव्याणवांत । माघ कृष्ण
द्वितीयेस बुधवार-पेठेंत । जंगमांचे मठांत श्रीदत्तावधूत । अद्भुत चमत्कार दाविती ॥ १२० ॥ प्रतिपदेस जंगमांचे
मठांत । जाऊन बैसले स्वामी दत्तावधूत । माघ वद्य गुरुप्रतिपदेचा होत । उत्साह-समारंभ ब्राह्मणभोजनादि ॥ २१ ॥
त्या जंगमांचे मठांत लहान । शिवलिंग स्थापित आहे शोभायमान । त्या लिंगासमीप स्थित होऊन । दत्तात्रेयस्वामी
विराजती ॥ २२ ॥ नृसिंहावताराचें दिव्य तेज । पाहूनि दचके लोकसमाज । म्हणती दिसतो प्रसंग निराळा आज ।
परी सद्भावें नमिती चरणांबुज ॥ २३ ॥ श्रीफल अन्य फलादिक । पुष्पहार वस्त्रालंकार अनेक । जितके अर्पण करिती
लोक । तितुके सकल पदार्थही ॥ २४ ॥ त्या शिवलिंग-बाणावरी । ठेवूनि अग्नि लावूनि झडकरी । प्रज्वलित करूनि
भारी । होम करिती जगदीश ॥ २५ ॥ तीळ तांदूळ घृतादिक । फलें पुष्पें तांबूल पैसे रुपये अनेक । स्वहस्तें आहूति
टाकूनि जगन्नायक । मुखें मंत्रादि ‘स्वाहा’ म्हणती ॥ २६ ॥ हा दुश्चिन्ह-सूचनाकारक होम । आटोपल्यावरी सर्व जंगम ।
रागावूनि पूजाऱ्यावरी परम । लेखी फिर्याद करिती ॥ २७ ॥ नारायणराव वासुदेव बर्वे कारभारी । यांजकडे फिर्याद केली
पूजाऱ्यावरी । कीं आमचे लहान शिवालयांत पिंडीवरी । होम केल्यानें हानि फार झाली ॥ २८ ॥ मग बर्वे कारभारी यांनीं ।
कृष्णाप्पा श्रीपादभटांस पाचारूनि । म्हणती जंगमांची झाली असेल खरी हानि । तरी बंदोबस्त करावा ॥ २९ ॥ दुसरे
दिवशीं संस्थानचे कारभारी । आणि पेठेंतील पुष्कळ लोक आद्यप्रहरीं । जंगमांचे मठांत आले पूजारी । तैसेच जंगम लोकही
सर्वत्र ॥ १३० ॥ शोधपूर्वक करावा न्याय । म्हणूनि सर्व देखती शिवलिंग देवालय । तों त्यांत कोठेंही किंचित् हानि

अपाय । जाहला नाहीं सर्वथा ॥ ३१ ॥ जंगमांची पूर्वदिवशींची पूजा साग्र । असे पिंडीसह बाणलिंग यथा पूर्व प्रकार । कोठेंही होम-धूमाची कृष्णवर्णता दृष्टिगोचर । नसून पूर्ववत् सर्वांनीं स्वच्छ देखिलें ॥ ३२ ॥ पूर्व दिवशीं यज्ञ सायंकाळपर्यंत । झालेला देखिला लोकांनीं बहुत । परी दुसरे दिवशीं चिन्ह यत्किंचित् । दिसलें नाहीं होमाचें ॥ ३३ ॥ पूर्वदिवशींची पूजा गंधपुष्पादियुक्त । पाहूनि सर्व जंगम झाले भय-लज्जित । सर्वत्रांस वाटलें आश्चर्य अद्भुत । म्हणती सदाशिव शंकर प्रत्यक्ष स्वामी ॥ ३४ ॥ या यज्ञकालापूर्वीं चार दिवस । ब्रह्मनिष्ठ वामनबुवाचे ज्येष्ठबंधु खास । वेणीमाधव रावजी वैद्य गुरुदर्शनास । बडोद्याहून आले होते ॥ ३५ ॥ स्वामिरायाचें दर्शन । यथाशक्ति नैवेद्य सुवासिनी-ब्राह्मणभोजन । करूनि गुरुप्रतिपदेचा उत्साह दर्शन । होमही अवलोकन केला त्यांनीं ॥ ३६ ॥ मोरोपंत सेवेकऱ्याचे घरीं । उतरले होते वेणीमाधव जन्मब्रह्मचारी । ऐसें समर्थ म्हणाले शुद्धांतरीं । वामन-मूर्ति लहान काया आहे ॥ ३७ ॥ स्वकरें दत्तात्रेय-योगिराजें । श्रीफलपूगीफलादि प्रसाद आप्त काजें । वेणीमाधवासि दिधला सहजें । सहज ब्रह्मस्थिति व्हावया ॥ ३८ ॥ त्यानीं यज्ञ होमाचा चमत्कार । जंगम मठींचा अवलोकिला साग्र । नंतर समर्थ आज्ञेनुसार । पुण्यास येऊनि यशवंतराव-साधूंचें ॥ ३९ ॥ दर्शन करूनि आले बडोद्यास । स्वामिरायांच्या लीला वृत्तांतास । निवेदिती सर्व लोकांस । शुद्ध मानसेंकरूनि ॥ १४० ॥ असो जंगमांचें तें लहान शिवालय । बाणलिंगासह पूर्ववत् यथायोग्य । जशाचें तसें पूर्वलक्षणमय । अद्यापपर्यंत आहे तें ॥ ४१ ॥ जंगमां पूर्ण प्रतीति आली । कीं दत्तात्रेय-स्वामींची अभंग चिरकालीं । व्यापकता चैतन्यस्वरूपें व्यापिली । लीला सत्कीर्ति इत्थंभूत ॥ ४२ ॥ योगीश्वरें यज्ञरूपें भविष्य । दाखवूनि सुचविलें अवतारकृत्य । पूर्ण करूनि राहूं अक्षय । निजानंदीं येथेंचि ॥ ४३ ॥ पुढें अक्कलकोट पंचक्रोशींत । पूजारी-भक्त-सेवेकरी-जनांसहित । संचरती जगद्गुरु अवधूत । तेणें प्रकृति अस्वस्थ राहूं लागली ॥ ४४ ॥ शालिवाहन

शके अठराशें पूर्णांत । बहुधान्य संवत्सरीं चैत्र मासांत । वद्य प्रतिपदेस अक्कलकोटांत । पातले अनंत विश्वेश्वर ॥ ४५ ॥ तीन चार दिवसांनंतर । ग्रामांत वडाचे झाडाखालीं छप्पर । त्यांत स्थित आनंदप्रचुर । असतां ज्वर उद्भवे शरीरीं ॥ ४६ ॥ कारभारी मानकरी सावकार । दर्शनासि येती वैद्य गणक द्विजवर । म्हणती गोप्रदानें दानें इतर । ग्रह-पीडा-शांत्यर्थ करावीं ॥ ४७ ॥ आपल्या मीन राशीस साडेसाती शनि । त्याची पीडा जप-ग्रह-दानीं । निरसन होईल म्हणूनि । ग्रहदानजपादि करविलें ॥ ४८ ॥ जो जगदुत्पत्ति-स्थिति-प्रलयकारण । ज्यानें देवता सुरासुर नर पशु पक्ष्यादिकरून । स्थावर जंगम केलें निर्माण । सकल ग्रहगणसहित ॥ ४९ ॥ जो सर्वज्ञ सर्वशक्तिमंत । तयासि जग लौकिक व्यवहार-संमत । ग्रह पीडा करतील हें नवल खचित । नव्हे काय उघड हें ॥ १५० ॥ ज्याच्या आज्ञाभयें समीरण । सूर्य चंद्र अग्नि मृत्यु वरुण । निरालस्य निजकार्यें देवगण । करिती नित्य नियमानें ॥ ५१ ॥ तयासि ज्वरपीडार्थ ग्रह-दान । हें संसारिक माया-प्रेम लक्षण । वास्तविक पहातां योगीश्वर निर्विकार परिपूर्ण । त्रिकालाबाध्य विदेही सदा वसे ॥ ५२ ॥ कृष्णाप्पा श्रीपादभट पूजारी । भक्त दास साधुसंत सेवेकरी । सर्व म्हणती समर्था त्रिपुरारी । आम्हांसि टाकूनि कोठें जातां ॥ ५३ ॥ सोडूनि देश ग्राम प्रपंच संसार । प्रज्ञापुरीं येऊनि राहिलों समग्र । श्रीगुरुचरण-दर्शनें सेवनें निरंतर । सुखाचे दिवस घालवितों ॥ ५४ ॥ नित्य श्रीगुरु भगवन्मूर्ति । विलोकूनि राहतों आनंदचित्तीं । समर्थांची अतिशय प्रकृति । अस्वस्थ झाली काय करावें ॥ ५५ ॥ आम्ही उदरार्थी केवल । एकचि आपणां सेविलें चिरकाल । आतां आमचे काय होतील हाल । हें न कळे हो नारायणा ॥ ५६ ॥ आपले सहस्रावधि भक्त सेवक । नेणती समर्थांविण आणिक । सर्वांसि समागमें न्यावें हो ब्रह्मांडनायक । ठेवावें चरणकमलीं सदा ॥ ५७ ॥ मायबाप सखे सोयरे इष्ट । काय ते मुख्य श्रीगुरु स्वामी श्रेष्ठ । त्याहून माया

* * *

प्रपंच जगत् नाशिवंत कनिष्ठ । एकचि परब्रह्म सद्गुरु सत्य असे ॥ ५८ ॥ कृष्णाप्पा श्रीपाद्भट पूजारी । दत्तंभट
गणपतराव बाळाप्पा सेवेकरी । बाबुराव मामलतदार आणि बर्वे कारभारी । खाजगी कारभारी रंगराव पागे ॥ ५९ ॥
रामाचार्य अवधानी आदिक । होते विद्वान ब्राह्मण वैदिक । वैद्य आणि बाळकृष्ण ग्रामजोशी गणक । राजोपाध्ये राजजोशादि
॥ १६० ॥ समर्थांच्या समोर समस्त । उभे अनन्य असती चिंताग्रस्त । कृष्णाप्पा पुजाऱ्या हस्तें प्रायश्चित्त ।
समर्थांकरितां सोडविलें ॥ ६१ ॥ तेव्हां यतीश्वर बोधिती सर्वांसि । श्रुत्यर्थरूप भगवद्गीता श्लोकत्रयांसि । जे जैसें भजती
मज परब्रह्मासि । त्यासि तैसें भजतों आम्ही ॥ ६२ ॥ याहून नित्य वेदमंत्र श्लोक । म्हणत होते दोहरे अभंगादिक ।
पदें भजन सुस्वरें बोधक । स्वेच्छें पाहिजे ते पाठ म्हणत होते ॥ ६३ ॥ "शिवहर शंकर नमामि शंकर । शंभो शिव
शंकर । हे गिरिजापते भवानीशंकर । शिव शंकर शंभो" ॥ ६४ ॥ ऐसें भजन आणि जगदंबेची आरती । उपनिषद
महावाक्यें मुखें म्हणती । संज्ञार्थें बोध ,व्हावा सर्वांप्रति । ऐशीं सुलभ स्वच्छंदें ॥ ६५ ॥ असो चैत्र कृष्ण एकादशीस । समर्थांनीं
बोधिले श्लोकत्रय सर्वांस । लोक जाहले अत्यंत उदास । शहाजी राजांचें सर्व गोतादि ॥ ६६ ॥ असो पूर्वींच्या अनेक
दुश्चिन्हानुसार । शालिवाहन शके अठराशें पूर्ण बहुधान्य संवत्सर । चैत्रमास कृष्णपक्षीं भौमवार । त्रयोदशीनंतर चतुर्दशी ॥ ६७ ॥
उदगयन वसंत ऋतूंत । प्रीतियोग रेवती-नक्षत्रीं विष्टी-करणांत । चतुर्थ प्रहरीं बुध-ग्रहाचे होऱ्यांत । शुभ वेळीं शुभ लग्नीं
सुमुहूर्तीं ॥ ६८ ॥ कन्यालग्नीं स्थिर सिंह नवमांशीं । शुभादि उच्च ग्रह केंद्री त्रिकोण स्थानांसि । चंद्र ग्रह समर्थांच्या
मीनराशीसि । यथायोग्य स्थानापन्न होते ॥ ६९ ॥ इष्टकाल शुभघटि सत्तावीस । वरी पळें होतीं अठ्ठेचाळीस ।
ऐशा उत्कृष्ट जगत्कल्याणकालीं जगन्निवास । प्रसन्नवदन स्थित अभयप्रद होते ॥ १७० ॥ शुद्ध स्वस्तिकासन घालूनि ।
सुगंध पुष्पहार वस्त्रभूषणीं । संपूर्ण जनांसि सौख्याशीर्वचनीं । परमानंदरूपें संतोषविती ॥ ७१ ॥ शुभमंगल सावधान ।

चाललें वेद्घोष कीर्तन भजन । श्रीगुरुदेवदत्त स्वामिराजांचा जयजयकार जन । गर्जती प्रेमें सर्वत्र ॥ ७२ ॥ कृष्णाप्पा श्रीपाद पूजारी । पूजा आरती करिती भक्त सेवेकरी । इतुक्यांत स्वामीसमर्थ पूर्णावतारी । कैवल्य-निजानंदीं निमग्न झाले ॥ ७३ ॥ दिव्य दैदीप्यमान् प्रकाशित कांति । देखतांचि वाटे समाधान शांति । पूर्णब्रह्म सनातन सगुणमूर्ति । स्वस्वरूपीं समाधिस्थ जहाले ॥ ७४ ॥ एकचि जाहला हाःहाःकार । आक्रोश करिती नारीनर । वक्षस्थल कपाल फार । पिटिती सकल महादुःखें ॥ ७५ ॥ गाई वांसरें फोडिती हांबरडे । शोक-दुःखाग्नि व्यापला चोहोंकडे । सकलही म्हणती स्वामीसमर्थांवीण गडे । आतां काय करावें ॥ ७६ ॥ आम्हांसि स्वामीसमर्थांवीण । त्राता दाता त्रैलोक्यांत दुजा कोण । आतां कोणाचें घ्यावें दर्शन । कल्याण-समाधानकारक तें ॥ ७७ ॥ राजवाड्यांत ग्रामांत सर्व स्थलीं । वियोगजन्य दुःख सर्व मंडळी । हाःहाःकार आक्रोशातिकुल झाली । मग कारभारी आदिकांनीं सत्वरें ॥ ७८ ॥ उत्तम प्रकारचें सुशोभित विमान । कर्दलीस्तंभ पंचपल्लवेंकरून । सुगंध पुष्पादिक आंत मृदु सिंहासन । स्थापूनियां सिद्ध केलें ॥ ७९ ॥ पूजारी कारभारी आदिकांनीं । योगीश्वर-पादपूजा विध्युक्त करूनि । सुशोभित विमानांत बैसवूनि । अनेक वाद्यें वाजवित ॥ १८० ॥ समर्थांचे आज्ञायुक्त । बुधवार-पेठेंतील चोळाप्पाचे स्थानांत । समाधिस्थल विवर विराजित । केलेलें पूर्वींचेंच सिद्ध होतें ॥ ८१ ॥ ज्या ब्रह्मानंद-समाधिगुहेंत । बहुत वेळां बैसले होते अवधूत । त्या पूज्य स्थानाकडे त्वरित । परम समारंभें निघाले ॥ ८२ ॥ कित्येक उदरार्थी कपटी । त्यांनीं बहुत केल्या खटपटी । वडाखालीं किंवा रायराजांच्या मठीं । समाधि करवावी म्हणून ॥ ८३ ॥ परंतु त्या खटपटी मंडळीचे । धनादिक प्रयत्न बल युक्तीचे । सिद्धीस न गेले म्हणूनि त्यांचे । द्वेषानें मस्तक फिरे ॥ ८४ ॥ त्यांचे दीर्घ द्वेष प्रयत्न प्रबल । जुने नवे चालू असती सर्वकाल । आल्या गेल्याचें कर्णयुगुल । अंतःकरण भ्रष्ट करिती ॥ ८५ ॥

कित्येक पोटार्थी विघ्नसंतोषी । उघड द्वेषिती पेठेंतील समाधिस्थानासि । वरी वरी दांभिकभक्ति-वैराग्यासि । दाविती
परी अंतरीं रागद्वेषें भरलेले ॥ ८६ ॥ दाढी जटा वाढवूनि मालाभूषणें । जनांसि असत्य ढोंग दाखविणें । करूनि
न कर्तें ऐशा संभावितपणें । प्रतिष्ठा मिरविती लोकांत ॥ ८७ ॥ कलिरायाच्या प्रबल युगांत । अशा दांभिकांसिच धन
मान प्राप्त होत । योग्यायोग्य सत्याची परीक्षा सांप्रत । लोपली, असत्य ढोंग वाढलें ॥ ८८ ॥ परी सत्य तें सत्यचि
राहील । सत्याचा परिणाम सत्यचि होईल । क्रयविक्रयकालीं परीक्षक जाणतील । कांच आणि मणि भिन्न ते ॥ ८९ ॥
असो नाना वाद्यें वाजवित । सुस्वर गायन भजन प्रेमभरित । रथाश्व-गज-भेरी-मृदंगसहित । सैन्ययुक्त
नृपवर्यासह ॥ १९० ॥ स्वामी समर्थांच्या स्वारीची शेवट । प्रसन्नकारक साधावी भेट । म्हणून संगें उदमी सावकार
शेट । अगणित लोकसमूह निघाला ॥ ९१ ॥ हवया नळे चंद्रज्योति । दारू सोडित समारंभें अति । समर्थांस
विमानांत बैसवून प्रीतीं । सगळे चालले पेठेंत ॥ ९२ ॥ तें शेवटचें सगुण भगवद्दर्शन । म्हणून रेवड्या पेढे फळें पैसे जन ।
विमानावरी फेंकती भावेंकरून । गर्जती नाम समर्थांचें ॥ ९३ ॥ ऐशा निरुपम वैभवें मंद मंद गतीं । सर्वत्र पातले
पेठेप्रति । विध्युक्त समर्थांसि देवगाभाऱ्यांत नेती । सर्वत्र असंख्यजन दुःखित ॥ ९४ ॥ दिव्य अमोलिक
वस्त्रभूषणीं । पूजन उत्तम प्रकारें होऊनि । ब्रह्मानंद प्रिय गुहेंत उत्तमासनीं । बैसविलें स्वामि-समर्थां ॥ ९५ ॥ चौघडे
वाद्यादिकांचे गजर । आरती मंत्रपुष्पांजलीचा उच्च स्वर । प्रसाद वाटिल्यावरी जन समग्र । परतले सदनीं महद्दुःखें
॥ ९६ ॥ तो दुःखाचा वियोगजन्य कठीण डोंगर । किंवा उचंबळला दुःखरूप सागर । वर्णितां हृदय इंद्रियें शरीर ।
तटस्थ होती वियोगदुःखें ॥ ९७ ॥ म्हणती माता-पिता सर्व संसारिक गोत । गेल्याचें संसार भंगल्याचें किंचित् ।
कांहींच देहाचेंही दुःख न वाटत । आम्हांसि स्वामी-समर्थाश्रयें ॥ ९८ ॥ परंतु स्वामिरायांचें वियोगजन्य । दुःख

जात नसे अंतःकरणांतून । गुरुस्वरूप-ज्ञानें नित्य समाधान । मानूनि स्वस्थ रहावें निरुपायें ॥ ९९ ॥ स्वामिरायांचें
वियोगजन्य स्मरण । करितसे तें मन व्याकुल प्राण । भक्तिमुक्तिसाधक भगवन्मूर्ति सगुण । सुदुर्लभ दर्शन
जाहलें ॥ २०० ॥ मज वामनास पूर्वींची सूचना । आतां विसरा रे सगुणभेट-दर्शना । तद्वत् निजानंदीं स्थितपणा ।
झाल्यावरी तृतीयदिनीं तेथें पोंहोंचलों ॥ १ ॥ पेठेंत उतरलों दर्शनास । तों जिकडे तिकडे पसरला रौद्ररस । वन
जन पशुपक्ष्यादिक उदास । शून्यरूप वाटती तदा ॥ २ ॥ जैसें देवाविण शून्य मंदिर । नृपतिविण राजधानी नगर ।
वस्ती-व्यवहाराविण मोठें शहर । निरर्थक दिसतसे ॥ ३ ॥ श्रीकृष्ण-देवाविण गोकुल मथुरा । श्रीरामचंद्राविण
अयोध्यापुरा । श्रीविश्वेश्वरावांचूनि काशी क्षेत्रा । शोभा न दिसे कदापि ॥ ४ ॥ ब्राह्मणावांचून वेदपठण । न होय युद्ध
क्षत्रियाविण । वैश्याविण वाणिज्यपण । शूद्राविण धान्यादि होत नसे ॥ ५ ॥ तैसें पूर्णब्रह्म स्वामिराजांविण । शून्य
भासे विश्व संपूर्ण । अक्कलकोट दिसे भयानक जाण । अंतर्यामी स्वामिवांचून ॥ ६ ॥ तें वर्णितां न पुरे धरणी । लौकिक
देहबुद्धीच्या दृष्टींकरूनि । गेले ऐसें भासतें जनीं । परी चैतन्यात्मस्वरूपें आहेत ॥ ७ ॥ परमात्मस्वरूपें अखंड । भरलें
अंतबाह्यवर्ती अनंतब्रह्मांड । भरूनि परमात्मा उरला उदंड । दशांगुलें उपलक्षणें ॥ ८ ॥ देहबुद्धि अहंकार गलित होतां ।
गुरुकृपें हृदयीं प्रकाशे तत्त्वतां । ब्रह्मज्ञान-दृष्टीनें वास्तव पाहतां । वियोग सर्वथा नसेचि ॥ ९ ॥ असो द्वादश त्रयोदश
दिनीं । पूजाअर्चा विध्युक्त प्रेमें करूनि । ब्राह्मणभोजनादिक होऊनि । सर्व जाती भोजनें तृप्त झाल्या ॥ २१० ॥
स्वामीमहाराजांचीं अमूल्य वस्त्रें । विद्वान् ब्राह्मणांसि दिधलीं आदरें । दान-दक्षिणा-प्रसादादि उत्तम प्रकारें । यथायोग्य
जाहलें ॥ ११ ॥ कीर्तन-पुराण-भजन । समाधीपुढें चाललें जाण । तात्पर्य उत्साहसमारंभ पूर्ण । उत्कृष्ट झाला
एकपक्ष ॥ १२ ॥ धन्य धन्य अक्कलकोटचें भाग्य । धन्य पवित्र चोळाप्पाचें स्थान योग्य । धन्य धन्य ब्रह्मानंदगुहा

वैराग्य । ब्रह्मविद्येनें व्यापिली असे ॥ १३ ॥ धन्य पूजारी भक्तसेवक । धन्य धन्य प्रज्ञापुरचे लोक । जेथें अखंड तिष्ठे जगन्नायक । विश्वव्यापक जगद्गुरु ॥ १४ ॥ धन्य शहाजी नृपवर भोंसले । ज्यांच्या पूर्वसुकृतें अनायासें लाधले । विश्वोद्धारार्थ नित्य राहिले । श्रीगुरु स्वामिराज प्रज्ञापुरीं ॥ १५ ॥ लौकिक प्रपंचदृष्टीनें अदृश्य दिसती । परी परमार्थ-ब्रह्मरूपें सर्वत्र वसती । वाटेल तेथें भक्तांसि दर्शन देती । सगुण निर्गुण अधिकारपरत्वें ॥ १६ ॥ शुद्धभक्तिप्रिय ते श्रीपति । पूर्ववचनाची ठेवूनि स्मृति । समाधीनंतर नीलेगांवीं प्रकटती । भाऊसाहेबांस दर्शन द्यावया ॥ १७ ॥ मंगळवारीं निजानंदीं बैसले । पुढें पांचवे दिवशीं अद्भुत नवल झालें । शनिवारीं पुरुषोत्तम स्वामिराज पातले । नीलेगांवीं भक्तसेवकांसह ॥ १८ ॥ सेवक भक्त पूजारीसहवर्तमान । विश्वव्यापक सच्चिदानंदघन । श्रीगुरु दत्तात्रेस्वामी विराजमान् । ग्रामाबाहेर वृक्षतलीं जाहले ॥ १९ ॥ गांवांत विस्तारलें शुभवृत्त । कीं ग्रामाबाहेर वृक्षतळीं अकस्मात् । श्रीगुरुस्वामी दत्तावधूत । उतरले भक्तसहित ते ॥ २२० ॥ हें भाऊसाहेबांस कळतांक्षणीं । आले त्वरें सर्वत्र धांवूनि । साष्टांग प्रणिपात करूनि सर्वांनीं । विनविलें सदनीं चलावें कीं ॥ २१ ॥ उदयिक येऊं म्हणती जगद्गुरु तदा । आज्ञेनुसार सर्व पावले आनंदा । पुन्हां पुन्हां वंदिती प्रभुपदां । भाऊसाहेब सहपरिवार ॥ २२ ॥ सायंकाल झाला म्हणून । आपापले सदनीं गेले जन । भोजनादिक आटोपून । पातले लोक दर्शनार्थ ॥ २३ ॥ तों कोणी नसे त्या वृक्षतळीं । शोधितां कोठेंही न दिसे समर्थमाउली । तेव्हां भाऊसाहेबांची वृत्ति उदास झाली । तळमळ करिती सर्वही ॥ २४ ॥ दुसरे दिवशीं प्रातःकाळीं । भाऊसाहेबादिक जाऊनि वृक्षतळीं । पुन्हां शोधिती परी योगींद्र चंद्रमौलि । मुळींच तेथें न दिसती ॥ २५ ॥ शोध केला बहुतप्रकारें । परंतु दर्शन न दिधलें योगीश्वरें । मग अक्कलकोटास पत्रें लिहून सत्वरें । चार जासुदां करीं पाठविलीं ॥ २६ ॥ अक्कलकोटास जासूद येऊनि । पत्रें देती ज्यांचीं त्यांस नेऊनि । पत्रांतील मजकूर

वाचतांक्षणीं । आश्चर्य वाटलें सकलिकां ॥ २७ ॥ दत्तात्रेयस्वामिराज भौमवारीं । समाधिस्थ जाहले चतुर्थप्रहरीं ।
ऐसें असून पांचवे दिनीं शनिवारीं । सेवेकऱ्यांसहित नीलेगांवीं गेले ॥ २८ ॥ भाऊसाहेबांसि दिधलें होतें वचन ।
शनिवारीं येऊं देऊं दर्शन । त्याप्रमाणें ग्रामाबाहेर वृक्षतळीं उतरून । दिधलें दर्शन शनिवारीं सर्वांसि ॥ २९ ॥ अघटित
अपूर्व ज्यांची करणी । लीला वर्णितां वाग्देवी जाई श्रमूनि । लिहितां न पुरे अखिल धरणी । प्रत्यक्ष परमेश्वर
व्यापक असे ॥ २३० ॥ पुजारी आणि इतरांनीं पत्रोत्तर । पाठविलें कीं चैत्र वद्य चतुर्दशी मंगळवार । ते दिनीं सायंकालीं
स्वामी दिगंबर । निजानंदीं बैसले समाधिस्थ ॥ ३१ ॥ आज झाले सात दिवस । आम्हीं भोगिलें बहुतादिन
दर्शनसुखास । आतां समर्थांविण जाहलों शून्य उदास । वियोगजन्य दुःखाकुल ॥ ३२ ॥ तुमचें आहे भाग्य
विशाल । म्हणून भेटलें परब्रह्म केवळ । आम्हांसि ऐसा सुदर्शन काल । येईल तो सुदिन मानूं ॥ ३३ ॥ ऐसें पत्रोत्तर
ज्याचें त्यानें लिहिलें । चारी जासूद घेऊनि गेले । त्यापूर्वीं रविवारीं नवल वर्तलें । तें ऐकावें सावधानें ॥ ३४ ॥
रविवारीं प्रातःकाळीं । भाऊसाहेबादिक बहुत मंडळी । समर्थांचा शोध नसल्यानें गेली । सदनीं गुंतली भोजनादिकीं
॥ ३५ ॥ भाऊसाहेब थकूनि बैसले भोजनासि । तों अकस्मात् अक्कलकोटनिवासी । परमात्मा वेषधारी संन्यासी ।
उभे राहिले सर्वांसमोर ॥ ३६ ॥ भाऊसाहेबें बैसावया आसन दिधलें । नमस्कार करूनि पात्र अन्नें
भरलें । त्यावरी भोजना बैसावया विनविलें । श्रीसद्गुरु स्वामीसमर्था ॥ ३७ ॥ परी ते सद्गुरु दत्तावधूत । संभाषण
न करितां झाले गुप्त । शोधितां कोठेंही दिसेनात । ही अघटित मात सर्वत्र पसरली ॥ ३८ ॥ भाऊसाहेब सांगती
सर्व लोकांसी । केवळ शुद्ध पूर्णब्रह्म अवतारासि । घेऊनि लाविती सर्व जीवांसि । वेदविहित सद्धर्म-मार्गातें ॥ ३९ ॥
सर्व लोक सर्वदा सुखी व्हावे । सर्व भूतांचें कल्याण असावें । परस्परांत प्रेम ऐक्य वसावें । कपटद्वेषादिरहित तें ॥ २४० ॥

आपले अनादि व्यवहार । उमजावे जगतासि सहज सुखकर । जेणें साधे अनायासें इहपर । तेंचि बोधिती संज्ञार्थ
सरल ॥ ४१ ॥ लोकानुग्रही परोपकार । स्वामीसमर्थ लीला दावूनि अपार । करिती करुणाघन निरंतर । भेदाभेदरहित
स्वभक्तां ॥ ४२ ॥ आम्ही काय जाणों देवचरित्र । अगम्य तारक परमपवित्र । समर्थलीला अतर्क्य विचित्र ।
सुरासुर मानवादिकांसिही कळेना ॥ ४३ ॥ सत्य स्वरूप सत्य भाषण । सत्य भक्तप्रतिज्ञा सदा करिती पूर्ण । म्हणूनच
दोन वेळां शनिवारीं येऊन । दर्शनें मनोरथ पुरविले ॥ ४४ ॥ उद्यां गृहीं येऊं म्हणाले । त्याप्रमाणें आज येऊनि उभे
राहिले । सत्यज्ञानअनंत-ब्रह्मस्वरूपें दिधलें । दर्शन, गुप्त जाहले तत्काल ॥ ४५ ॥ सकल ग्रामस्थ लोक । मानिती
सामर्थ्यातिशय कौतुक । ‘कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं’ ब्रह्मांडनायक । करणें अगाध स्वच्छंदें ॥ ४६ ॥ पुढें अक्कलकोटचीं
पत्रें घेऊन । जासूद येऊनि करिती निवेदन । मंगळवारींच स्वामिराज भगवान् । समाधिस्थ जाहले ॥ ४७ ॥ दुःखरूप
पत्र वाचूनि सकल । झाले वियोगजन्य दुःखें व्याकुल । शोक करिती म्हणती स्वामी दयाल । टाकूनि गेले सकलांसि
॥ ४८ ॥ आतां अक्कलकोटीं जाऊन । कोणाचे दृढ धरावे तारक चरण । आम्हां शरणागतांचें संरक्षण । स्वामीसमर्थांविण
कोण करी ॥ ४९ ॥ चालता बोलता सुखदाता देव । लोपला आमुचें फुटलें दैव । ऐसें परमोदार अवतार-
वैभव । कलींत न देखिलें न ऐकिलें सर्वथा ॥ २५० ॥ धन्य स्वामी समर्थांची लीला । धन्य प्रज्ञापुरच्या नित्य-श्री-
नित्य-मंगला । साष्टांग नमन असो त्या दयाला । कृपा असावी आम्हांवरी ॥ ५१ ॥ या प्रकारें सकल तळमळती ।
स्वामी-गुरुनाथाची शुद्धमती । अखंड भोळे भाविक भक्ति करिती । प्रज्ञापुरीं येती समाधि-दर्शनासि ॥ ५२ ॥
श्रीगुरुस्वामी देव दिगंबर । निजानंदीं निमग्न झाल्यावर । वारंवार भक्तांसि कृपासागर । पूर्ववत् सगुण दर्शन देती
॥ ५३ ॥ समाधीचें दर्शन पूजन अर्चन । प्रेमें करिती जे सेवन । त्या सर्वांचे मनोरथ सिद्ध होऊन । होती पावन निःसंशयें

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

।। ५४ ।। स्वामीसमर्थांच्या समाधीसमोर । जे पुराण कीर्तन भजन गाती सुखकर । प्रदक्षिणा स्तोत्रें नमस्कार ।
सप्ताह पारायण करिती विध्युक्त जे ।। ५५ ।। समाधीवर दत्त-चरणांवरी । पुरुषसूक्त रुद्राभिषेक प्रेमभरीं । लघुरुद्र
महारुद्रादि वेदमंत्रीं । करिती ते सर्व भोगिती सुख इहपर ।। ५६ ।। दत्तात्रेय-चरणारविंदां संनिध । वेदघोष वेदपारायण
भक्तियुक्त शुद्ध । करिती तयांचे मनोरथ सिद्ध । अवश्य होती निश्चयात्मक ।। ५७ ।। त्या समाधिस्थानाच्या सेवनेंकरून
। भूत प्रेत पिशाच्चादि होती सर्व बाधा प्रशमन । कुष्टरोग महारोगादि व्याधि संपूर्ण । होती निरसन सत्य सत्य
।। ५८ ।। विद्यार्थीयांसि विद्या प्राप्ति । धनार्थी यांसि धनलाभ निश्चिती । पुत्रार्थी यांसि पुत्रफलें लाधतीं । दत्तचरण-पादुका
सेवनानें ।। ५९ ।। स्वामीसमर्थांच्या स्वहस्तें स्थापित । महादेव गणपति आदि देवतायुक्त । चरण-पादुका
संप्रतिष्ठित । असती सर्वार्थदायक सकलांसि ।। २६० ।। करतलामलक-न्यायीं अविलंब । अनुभवूनि पहावें सदाशिव
सांब । दत्तात्रेय-पादुका आणि हेरंब । आदिक देवता मठ संप्रतिष्ठित ।। ६१ ।। दर्पणांत दिसे जैसें असेल मुख ।
तैसेंचि मुख्यत्वें पाहिजे शुद्धचित्त सुरेख । संशयापन्नासि न मिळे सुख । ‘संशयात्मा विनश्यति’ ।। ६२ ।।
संशयें या प्रपंचीं जाण । सर्वदा मन राही उद्विग्न । सौख्यप्राप्ति लेशही न । संशयापन्न नरासि ।। ६३ ।।
अतएव संशय कुतर्क परित्यागून । सेवावे भगवान् सद्गुरूचे चरण । शुद्ध करूनि अंतःकरण । पावावें ज्ञान निर्मल
।। ६४ ।। अंतःकरण शुद्ध झाल्याविण । आणि शुद्ध भक्ति बाणल्यावांचून । परमात्मा-कृपेची किल्ली जाण । न लाधे
बाह्य रंगानें ।। ६५ ।। समर्थांच्या आद्य प्रिय स्थानांत । एकनिष्ठपणें सेवनीं रत । तयांसि धर्मार्थ-काम-मोक्ष प्राप्त ।
होती चतुर्विध पुरुषार्थ ते ।। ६६ ।। हें विशेष सांगणेंचि नलगे । घटिकाभर समाधी समीप उगे । निवांत शांत उभे
राहतां लागे । आनंदलहरी-स्पर्श मनासि ।। ६७ ।। अथवा लोटांगण प्रदक्षिणा करितां । समाधान वाटे चित्ता । तेथें नसे

मुळींच बहिर्मुखता । अंतर्मुखता तिष्ठतसे ॥ ६८ ॥ हें गुरुभक्तिरहस्य अनुभवी जाणती । अनुभवणारांसि येते प्रतीति । सगुण निर्गुण साक्षात्कार पावती । पावले चोळाप्पादिक पुष्कळ ॥ ६९ ॥ अनेक जनांच्या मनकामना पूर्ण । करिती स्वामिराज कृपाघन । याविषयीं अनेक इतिहासांचें कथन । केलें या ग्रंथांतरीं ॥ २७० ॥ असो स्थानासमीप किंवा अति दूर । राहणारे सेवक भावनेनुसार । फलसिद्धि पावती निरंतर । गुरुस्वामी-दिगंबर-वरदानें ॥ ७१ ॥ दत्तात्रेय स्वामिसमर्थांचें दर्शन । झालेले किंवा न झालेले जन । केलेलें अथवा न केलेलें सेवन । समर्थांसि समान वाटती ते ॥ ७२ ॥ न्यूनाधिक उच्चनीच भेदाभेद । जेथें स्वप्नीं न स्पर्शती खेदाखेद । प्रियअप्रिय-हर्षामर्षादिविरहित-विषाद । पूर्णब्रह्म गुरु स्वामी संप्रतिष्ठती ॥ ७३ ॥ हें नाहीं नाहीं स्वकपोलकल्पित । वेदशास्त्रपुराणार्थरहस्यमथित । हृदयस्थ परमात्मा दत्तावधूत । त्यांचे तेचि वदविती सर्व ॥ ७४ ॥ तच्चरणदास मी ब्रह्मनिष्ठ-वामन । नाहीं नोहे किंचित् देखील कारण । सर्वांतर्यामी नियंते व्यापक पूर्ण । दत्तात्रेय-स्वामी वदविती स्वलीला ॥ ७५ ॥ त्यांचें कृपावरदान होऊनि फलित । हा श्रेष्ठ ग्रंथ गुरुलीलामृत । पंचावन अध्यायपर्यंत होऊनि ग्रथित । संपूर्ण येथें जाहला ॥ ७६ ॥ ह्या स्थलीं ही ग्रंथलेखनी । कर्तृत्वाहंकाररहित होऊनि । श्रीसद्गुरु स्वामिराज-चरणीं । ब्रह्मनिष्ठ वामनें अर्पिली ॥ २७७ ॥

## ॥ उपसंहार ॥

यानंतरीं वामनबुवांचे शरीरीं अस्वस्थता । ईशसंकल्पें प्राप्त झाली तत्त्वतां । निर्याणसमय ओळखूनि चित्ता । संन्यासदीक्षेच्छा उद्भवली ॥ ७८ ॥ ग्रंथमुद्रण-व्यवस्था सांगूनि शिष्यवृंदां । वरिली संन्यासदीक्षा परमार्थदा । चिंतूनियां श्रीस्वामिराज-पदां । समाधियोगा साधिती ॥ ७९ ॥ त्यागूनियां जड कलेवर । स्वस्वरूपीं मिळाले ब्रह्मविद्वर । प्लवनाम शुभ संवत्सर । शके अठराशें तेवीस ॥ २८० ॥ चैत्र शुक्ल पंचमी शुभदिन । ते दिनीं झालें बुवांचें निर्याण ।

जवळ होती जी मंडळी सुजाण । नामें त्यांचीं परिसावीं ।। ८१ ।। कृष्णाजी लक्ष्मण काळविट । जे परमार्थीं रंगले अवीट । बाळशास्त्री तैलंग श्रेष्ठ । आणि नारायणराव आबाजी पुरंदरे ।। ८२ ।। तैसेचि महाराजांचे कृपेंतील । गोविंदराव मांडे वकील । माधवरावबुवा वणीकर विमल । भक्त शंकरराव पट्टणकर ।। ८३ ।। बापूराव बडवे आणि आरेकर । नारायणराव चतुर्भुज वैद्य प्राणशंकर । इत्यादि सर्व मंडळीस बुवांचा वियोग दुर्धर । परम दुःसह वाटला ।। ८४ ।। असो पुढती यथाशास्त्र पद्धती । समाधि-समारंभ मंडळी उरकिती । ऋणमुक्तेश्वर महादेवाजवळ ती । समाधि-स्थापना जाहली ।। ८५ ।। समाराधना वगैरे कृत्य । यथापद्धतीं उरकलें स्तुत्य । समाधि पूजा नैवेद्य होतसे नित्य । अद्यापवरी यथासांग ।। ८६ ।। त्यापरीच बुवांच्या राहत्या संस्थानीं । सद्गुरुपूजन नैवेद्यादि करूनि । उत्तम बंदोबस्त ठेविलासे शिष्यजनीं । लेशही न्यून नसेचि ।। ८७ ।। प्रतिवत्सरीं दत्तजयंति- । उत्साह आणि बुवांची पुण्यतिथि । तैसेंचि स्वामीसमर्थांच्या महोत्साहप्रति । यथायोग्य करिती शिष्यजन ।। ८८ ।। असो बुवांचे आज्ञेनुसार । शिष्यवृंदें योजिला ग्रंथमुद्रण-विचार । श्रीस्वामिराज-प्रेरणेनें साचार । व्यवस्थापकांसि एकें योजिलें ।। ८९ ।। तोचि एकनाथसांप्रदायी किंकर । नामें विनायक सदाशिव लिमगांवकर । ज्याच्या हृदयीं विराजूनि श्रीगुरुवर । ग्रंथसंशोधन सेवा घेतसे ।। २९० ।। तैशीच उपसंहार आणि मुद्रणसेवाही । यत्करींच घे श्रीगुरुमाई । तत्सत्तेविण न घडे कांहीं । सर्वही कर्तृत्व तयाचें ।। ९१ ।। यत्सत्तेविण पर्णही न हाले । तेथें मानवी कर्तृत्व काय चाले । गुरुसत्तेनेंच ग्रंथकार्य सिद्धीस गेलें । हाचि सिद्धांत निश्चित ।। ९२ ।।; असो आतां प्रथमाध्यायापासून । संक्षेपें करूं सिंहावलोकन । जें उपयोगी नित्यपाठालागून । मुमुक्षु जनांच्या येईल ।। ९३ ।। प्रथमाध्यायीं मंगलाचरण । गणेश सरस्वती कुलदेवी देवगण । महर्षि योगी संत सद्गुरुवंदन । आणि वामनबुवांची वंशावलि ।। ९४ ।। ग्रंथसिद्ध्यर्थ श्रीमत्सद्गुरु-वरदान । तैसेंचि साधन अनुबंध-चतुष्टय-निरूपण । वैराग्य

शमादि-षट्क जाण । मुमुक्षु-लक्षण निरूपिलें ॥ ९५ ॥; द्वितीयाध्यायीं आदिनारायणापासून । केलीसे गुरुपीठिका
निवेदन । आणि श्रीदत्तात्रेय-जन्मकथन । साकल्येंकरून वर्णिलें ॥ ९६ ॥; तृतीयाध्यायीं परमेश्वराचे बावीस अवतार ।
चतुर्युग-प्रमाण चतुर्दश मनु साचार । नवखंड पृथ्वी द्वीपें आणि सप्तसमुद्र । चतुर्दशलोक कथियेले ॥ ९७ ॥
तैसेंच चौऱ्यांशींलक्ष योनि-विवरण । आणि मानव-पशु-पक्ष्यादिकांचें आयुःप्रमाण । चतुर्युगोत्पत्ति शक निरूपण ।
विस्तारपूर्वक निवेदिलें ॥ ९८ ॥; चतुर्थाध्यायीं हिमालयीं श्रीस्वामिराज दत्त । संचरतां चीन देशींचीं स्त्रीपुरुषें चेष्टायुक्त ।
निंदूनि यतिराया काम्यक्रीडोद्युक्त । होतां चमत्कार दाविला ॥ ९९ ॥ आणि कुरंगशिशु-संरक्षण । करूनि चमत्कार
दाविला व्याधालागून । मृग-मृगींस पूर्वजन्म-ज्ञान । होऊनि आशीर्वचन लाधलें ॥ ३०० ॥; पांचव्यांत जयंत्या वर्णन ।
एकादशी-पौर्णिमा-निर्णय जाण । कपिलाषष्ठी आणि गजच्छाया महान् । पर्वनिर्णय केलासे ॥ १ ॥ त्यापरीच महेश्वरावतार
द्वादशादित्य-वर्णन । अष्टवसु जगदंबावतार कथन । सप्तर्षि आणि सप्त तारे संपूर्ण । याच अध्यायीं कथियेले
॥ २ ॥; सहाव्यांत अलवणीबुवांचें आख्यान । जन्मांध विप्रास दिव्यदृष्टि-दान । वृद्ध शूद्रास पूर्वजन्म-ज्ञान ।
होऊनि स्त्री-बालक भेटविलीं ॥ ३ ॥; सातव्यांत तपस्व्यांस हिमालय-गुहेंत । ज्ञानामृत-कथन आणि द्वय व्याघ्रांप्रत ।
पूर्वजन्म-स्मृति होऊनि प्राप्त । उद्धार तयांचा केलासे ॥ ४ ॥ तैसेंच हिमालयाच्या पायथ्याशीं । वसे एक तपस्वी
संन्याशी । त्यास दत्तस्वरूप-दर्शनासि । देऊनि हेतु सफल केले ॥ ५ ॥; आठव्यांत हरिद्वारचे दोन मल्ल । द्विज जाति
दुर्जन प्रबल । 'ग्रासिले महारोगें दुर्धर । मग शरण आले यतिवरा ॥ ६ ॥ अनन्यभावें करितां स्तुति । पाद-स्पर्शें
अर्पिली दिव्य कांति । तैसेंचि एका कुटिल द्विजाप्रति । पूर्वजन्म कथन केलें ॥ ७ ॥ तयांचें गौहत्या पाप उघड
केलें । पादोदकें मृत धेनूसि उठविलें । आणि स्वनाम कथूनि चतुर्वेद पठण केले । वेदांगासहित यतींद्रें ॥ ८ ॥;

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

नवव्यांत कच्छदेशीं त्रिविक्रम-मंदिर । आणि तीर्थ नारायण-सरोवर । तेथे घडलेलें वृत्त समग्र । रसाळपणें कथियेलें
॥ ९ ॥; दहाव्यांत द्वारका धामांत । भुन्याबुवा वसती संत । तयांसि श्रीमद्दत्तावधूत । देती सगुण दर्शन ॥ ३१० ॥
तयासंगें करिती सद्बोध संभाषण । तत्त्वमसि महावाक्यार्थ विवरण । आणि साङ्ग लक्षणा निरूपण । शास्त्रयुक्त कथियेलें
॥ ११ ॥; अकराव्यांत भुन्याबुवांचे सदनीं । अंध सुरदासास दिव्यचक्षु अर्पूनि । ब्रह्मज्ञानी होशील ऐशा आशीर्वचनीं ।
तोषविती स्वामिराज ॥ १२ ॥ आणि तेथेंच रावजी वैद्यालागून । काशीक्षेत्रीं भेटल्याची ओळख देऊन । त्रय पुत्राचें
भविष्य कथन । केलें यतिरायें साहजिक ॥ १३ ॥ त्यांत कनिष्ठ पुत्र वामन । याचे हस्तें गुरुलीलामृत ग्रंथ लेखन ।
होईल ऐसें आशीर्वचन । समर्पिलें त्याच कालीं ॥ १४ ॥; बाराव्यांत गिरनार-पर्वतीं । गौमुख तीर्थीं यतियूथपति ।
वसूनि पुढें हनुमानधारीप्रति । द्वयरजनी राहिले ॥ १५ ॥ त्या हनुमानधारी स्थानांत । एक पांगळा गणेशपुरी संत ।
त्यास कृपावलोकनें त्वरित । चरण अव्यंग दिधले ॥ १६ ॥ पुढें अंबाजीचें घेऊन दर्शन । गोरक्षनाथ अवघडनाथादि
विलोकून । कमंडलुतीर्थीं पातले यतींद्र नारायण । शिष्यजनांसहित ॥ १७ ॥ तेथें साधु रामदास सेवादास कृष्णदास ।
यांचे मनीं श्रीदत्तदर्शनाची आस । त्यांतें श्रीस्वामिरायें दत्तस्वरूप-दर्शनास । देऊनि कृतार्थता अर्पिली ॥ १८ ॥; तेराव्यांत
पंचज्ञानेंद्रियें पंचविषय । आणि सद्भावनिरूपण रसमय । चरणदास-मनींचा चित्तनिग्रह-संशय । दूर होय चंचलभारती-
मुखें ॥ १९ ॥; चौदाव्यांत जोगाईचें आंबें नामक । ग्रामींची कन्यका गोरक्षक । तियेसि पुरुषत्व अर्पिलें चमत्कारिक ।
तें कथानक वर्णिलें ॥ ३२० ॥ आणि अन्नसत्रावरील कारकुनाचें चमत्कारिक । वृत्त निवेदन कोटिकूप तीर्थींचे
देख । तैसेंचि शिवकांची-विष्णूकांचीचे ॥ २१ ॥; सोळाव्यांत राजुरमठींचा वृत्तांत । आणि भीमेच्या महापुरावरुनि
पंढरींत । पादचारी यतिराज गेले चालत । तो चमत्कार वर्णिला ॥ २२ ॥ पुढें अक्कलकोटीं करिती वास । तेथें लालभारतीस

ज्ञानोपदेश । आणि दाजीपिराजी भोंसल्यास । दर्शन देती मुंबईस ॥ २३ ॥ नागनळी-दुधनीचा वृत्तांत । आणि गौडगांवीं उठविला वृषभ मृत । लोहारगांवच्या बापू कुळकरण्याची होत । कंठछिद्रव्यथा निर्मूल ॥ २४ ॥; सतराव्यांत मंगळवेढ्यांत । कृष्णंभट कापशीकराचे सदनांत । आटलेल्या धेनूप्रत । दुग्धदोहन करविलें ॥ २५ ॥ शूद्रस्त्री जनाबाईचें वृत्त । बसाप्पा तेल्यास सर्पमय सुवर्ण प्राप्त । आणि गुप्त धन मिळे कोष्टयाप्रत । वृद्ध शूद्र स्त्रियेसि पुत्र लाधे ॥ २६ ॥ बाबाजीभटाचे गृहीं कूप-चमत्कार । तैसाच चळआंब्यास श्रीयतिवर । रामदासी बुवाचे मठीं साचार । अपूर्व चमत्कार दाविती ॥ २७ ॥ साधुत्व पावला एक अंत्यज । दुसरा उद्धरिला भ्रष्ट द्विज । तिसरा म्लेंछ सिद्ध होय सहज । आणि मृत श्वान संजीवन होई ॥ २८ ॥; अठराव्यांत पुन्हां क्षेत्र पंढरपुरांत । शके सतराशें पंचाहत्तरांत । चंद्रभागेच्या महापुरावरूनि यतिनाथ । चालत गेले पादसंवाहनासह ॥ २९ ॥ मोहोळग्रामीं वसती आनंदगुहेंत । तेथील गृहस्थ-पुत्रास प्राणदान मिळत । गवेस्वामी-वृत्त आणि शिल्पकाराप्रत । मल्लारिरूप यतींद्र दाविती ॥ ३३० ॥; एकूणविसाव्यांत पिंडब्रह्मांड-विवरण । आणि सोलापुरीं सुब्रराव-मंदिरचें वृत्तकथन । चिंतोपंत टोळ-गृहींचा जाण । भोजन-प्रसंग वर्णिला ॥ ३१ ॥ शुष्क सिद्धेश्वर सरोवर- । तटीं लघुशंका करिती यतिवर । द्वितीयदिनीं पर्जन्यवृष्टि भरपूर । होऊनि लोक आनंदले ॥ ३२ ॥ मुकुंद मौनीबुवांचे रसाळ आख्यान । तैसेंच अक्कलकोटीं पांडुरंग पुराणिक भाऊराव जोशी जाण । त्यांचे गृहींचें यतिराज भोजनवृत्त कथन । आणि यवन रिसालदार चौल द्विजवृत्त वर्णिलें ॥ ३३ ॥; विसाव्यांत अक्कलकोट भूपतींची वंशावली । आणि शके सतराशें एकूणऐंशीं सालीं । श्रीस्वामिराजमूर्ति पातली । अक्कलकोट-नगरांत ॥ ३४ ॥ अक्कलकोटासभोंवतालचीं तीर्थें क्षेत्रें समस्त । वर्णिलीं असतीं इत्थंभूत । आणि अक्कलकोट या शब्दाचा विशद अर्थ । परमार्थमार्गं दाविला ॥ ३५ ॥; एकविसाव्यांत चौलगृहींचा

यतिराजनिवास । आणि नाना चमत्कारी वृद्धिंगत सयश । नृसिंहवाडीच्या द्विजाच्या पोटशूलास । करस्पर्शें दूर करिती
॥ ३६ ॥; बाविसाव्यांत गुरु-महत्त्व आणि गुरु-शब्दार्थ विवेचन । तैसेंचि मोगलाईंत ग्राम कल्याण । तेथील मनोहर
नाईकाचे उदरीं जाण । श्रीदत्त माणिकप्रभु नामें अवतरले ॥ ३७ ॥ तयांचें संक्षेपें चरित्र वर्णन । आणि श्रीस्वामिराजांचें
माणिकनगरीं आगमन । त्या समयीं स्वामिराज-आशीर्वचन । आणि प्रसाद लाभ वामनबुवास झाला ॥ ३८ ॥;
तेविसाव्यांत चिदंबर दीक्षितांचें आख्यान । तयांच्या यज्ञसमारंभामाजीं यज्ञदत्त ब्राह्मण । आमटीचे हौदीं पडून होई
गतप्राण । तो स्वामिराजकृपें संजीवन होई ॥ ३९ ॥; चोविसाव्यांत ब्रह्मोपनिषदांतील जाण । जें शुद्ध वेदान्त-विज्ञान ।
तयाचें विस्तृत रीतीनें निरूपण । शिष्यालागीं बोधिलें ॥ ३४० ॥; पंचविसाव्यांत प्रारब्ध-प्रयत्ननिरूपण । आणि बाबासबनीस
विश्वनाथ वैद्यांचें गमन । माणिकप्रभुस्थानीं स्वामि-प्रसादाशीर्वचन । विश्वनाथ वैद्या लाधलें ॥ ४१ ॥ नंतर
रावजी वैद्यांचे सदनांत । दर्शन देती श्रीमद्दत्तावधूत । पुढें सोलापुराहूनि अक्कलकोटांत । पातले श्रीस्वामिराज ॥ ४२ ॥
तदा सत्पुरुष बाबासबनीस । आणि हरिबाई रामदासीण स्वामिसेवेस । येऊनि वसती पुढें बाबांचा इतिहास । निर्याणादि
उल्लेख असे ॥ ४३ ॥; सव्विसाव्यांत मुंडी गोसावी गिरी पुरी भारती । यांची स्वामिराज करिती गर्वनिवृत्ति । आणि आळंदीचे
स्वामी-नृसिंहसरस्वती । यांचें चरित्र वर्णिलें ॥ ४४ ॥ यशवंतराव महादेव देवमामलतदार । आणि नासिकचे
बाबा घोलप द्विजवर । तैसेंचि विष्णुबुवा ब्रह्मचारी आणि काळबुवा संतप्रवर । यांचीं कथानकें वर्णिलीं ॥ ४५ ॥;
सत्ताविसाव्यांत निरूपिलें संन्यासलक्षण । आणि राधागणिकेचें आख्यान । हदरग्रामीं घडलें गोसाव्यास दत्तदर्शन ।
तैसेंचि सय्यद यवन-चरित्र वर्णिलें ॥ ४६ ॥; अठ्ठाविसाव्यांत इचलकरंजीकर ब्राह्मण । श्रीपादभटाचें सुरस आख्यान ।
बाबाफडणीस काशीनाथ म्हसवडे यांलागून । चमत्कारें अनुताप जाहला ॥ ४७ ॥ तैसेंचि बंबगार्डन साहेबांचें चरणदुःख ।

* * *

दूर झालें तात्कालिक । वाणी पावला मन्याबा मूक । श्रीस्वामिराजकृपेनें ॥ ४८ ॥; एकूणतिसाव्यांत ‘उपादान’ कारण-निरूपण । आणि काशीकर बहिरेशास्त्री यांचें आख्यान । तैसेंच पैठणकर नथुराव विदुराचें जाण । संकट दूर होय स्वामिकृपें ॥ ४९ ॥ शके संतराशें अठ्याण्णवाचे दुष्काळीं । दत्तजयंती खर्चाची पंचांसि चिंता पडली । परी शंकरराव विदुरें आणि एका सावकारें तत्कालीं । येऊनि समारंभ थोर केला ॥ ३५० ॥ बीड-पत्तनचा गुर्जर नागर ब्राह्मण । नारायणदास स्वामिनिंदक जाण । तयासि स्वामिरायें चमत्कार दावून । कृपा केली तयावरी ॥ ५१ ॥; तिसाव्यांत देशकालवस्तुपरिच्छेद-निरूपण । आणि हैद्राबादचे शंकररायराजे यांचें आख्यान । त्यांनीं समर्थांचा विशाल मठ बांधवून । मोरोपंत म्हैसकर पूजारी नेमिलें ॥ ५२ ॥ तैसेंचि हट्टी संन्याशाचें घडलेलें वृत्त । आणि रामदास गणपतराव दत्तंभट । बाबा सबनिसादिकांचा उल्लेख होत । परमार्थाधिकारी म्हणूनि ॥ ५३ ॥; एकतिसाव्यांत गोविंदभट जोशी यांचें चरित्र । आणि राचाप्पाचा स्वामिकवनपर वृत्तांत । तैसाच तैलंगद्विज आणि माधवाचार्यांचा रसयुक्त । कथाभाग वर्णिला ॥ ५४ ॥; बत्तिसाव्यांत रहिमतपुरचे आप्पासाहेब माने सरदार । तत्कन्या जमनाबाई महाराणी चतुर । यांचें वर्णिलें इतिहाससार । आणि सुंदरी नामक वानरीचें ॥ ५५ ॥ तैशीच दिनकरराव आनंद नवरोजी पारशाची हकीकत । आणि श्रीमद्दत्तावधूत स्वामिरायांप्रत । श्रीमंत मल्हारराव महाराज गायकवाडकडील पाचारण-वृत्त । इत्थंभूत वर्णिलें ॥ ५६ ॥; तेहतिसाव्यांत विठ्ठल तिर्गुळ आणि ठाकुरदासबुवांचें वृत्त । तैशीच त्रिविक्रमयति आणि रामाचार्यांची हकीकत । लालासाहेब आणि मुंबईकर भाऊ रसूल भक्त । यांचीं रसाळ चरित्रें वर्णिलीं ॥ ५७ ॥; चौतिसाव्यांत माया-प्रपंचमिथ्यात्व-विवेचन । आणि महारुद्रराव देशपांड्यांचें चरित्र-वर्णन । श्रीमंत जयाजीराव शिंद्यांचें धीपुरीं आगमन । तैसेंचि श्रीमंत तुकोजीराव होळकरांचेंही ॥ ५८ ॥ बेलापुरचें केशव-गोविंदस्थान । तेथील प्रख्यात

संन्यासी महान् । आणि हंसराजयोगी परम सज्जन । स्वामिदर्शनार्थ येती धीपुरीं ॥ ५९ ॥; पस्तिसाव्यांत श्रीमद्दत्तावधूत निरंजन । यांचें मठसंस्थानादि-स्थापन । सभामंडप-चरणपादुकादि-वर्णन । आनंदगुहेसहित ग्रथियलें ॥ ३६० ॥; छत्तिसाव्यांत मायेचें स्वरूप-विवेचन । गणपतराव हुकिरे आणि गजेंद्रचरित्र वर्णन । बाबा यादव तैसा तेरढोकीचा बाळाप्पा ब्राह्मण । यांचीं कथानकें ग्रथियलीं ॥ ६१ ॥; सदतिसाव्यांत मायेच्या चतुरर्थाचें निरूपण । आणि एकेकालीं अनावृष्टीमुळें गांजले जन । तदा खासबागेंतल्या विहिरींत चणक फेंकून । स्वामिराज उदक उत्पन्न करिती ॥ ६२ ॥ याच विहिरीचें उत्तम जळ । लोहयंत्रें लावूनि नळ । विठ्ठल टिकाजींनीं लोकांसि विपुल । मिळण्याची योजना केली ॥ ६३ ॥ हैद्राबादच्या यवन शिपायाचा चमत्कार । आणि रामशास्त्री बडोदकरासि यतिवर । कार्तिकस्वामिरूपें दर्शन देऊनि साचार । तयांची मनकामना पुरविती ॥ ६४ ॥ मुंबईकर हरिभाऊ भक्ताचें रसाळ आख्यान । आणि नगरचे नाना रेखी भाऊ जोशी यांचा उल्लेख जाण । सोलापुरच्या गणेश बल्लाळें स्वामिचरित्र छापवून । प्रख्यात केलें सर्वत्र ॥ ६५ ॥ मुंबईचे बळवंत भेंडे रोगें क्षीण । ते श्रीस्वामिरायास येती शरण । तयांस प्रसाद आशीर्वचन । देऊनि अर्पिती आरोग्य ॥ ६६ ॥; अडतिसाव्यांत ईषणास्वरूप-विवेचन । आणि गुरुसिद्धाप्पांचें आख्यान । रामाचार्यादि वैष्णवां स्वामी-सच्चिद्घन । परीक्षा चमत्कार दाविती ॥ ६७ ॥ तैसेंचि रामाचार्य-स्त्रीचें व्याधि-निरसन । आणि मदर जमादाराचें शासन निवारण । हदर आणि उंबरसगी ग्रामींचा जाण । पर्जन्य चमत्कार वर्णिला ॥ ६८ ॥; एकूणचाळिसाव्यांत आत्म्याचें शुद्ध स्वरूप निरूपण । आणि नंदराम सुंदरजीचें मूत्रकृच्छ्र व्याधि-निरसन । तयास शिवलिंगस्थानीं आणि मंचकीं जाण । एकाच कालीं यतींद्र दर्शन देती ॥ ६९ ॥ तैसेंच भार्येसह आप्पासाहेब हसबनिसालागून । पिशाचसंबंध लागला दारुण । तो दूर होय स्वामिराज-कृपेंकरून । आणि सुंदर कन्यारत्नही लाधे ॥ ३७० ॥

****************************************

श्रीसमर्थांच्या शिष्यवृंदांचा उल्लेख जाण। तैसेच वामनबुवांच्या तीर्थयात्रा आणि अक्कलकोटीं गमन। तेथें घडलेल्या स्वामिलीला
आणि संपूर्ण। गोविंदराव मोहित्याचें वृत्त वर्णिलें ॥७१॥; चाळिसाव्यांत आत्मस्वरूपानंद-विवेचन। तैसेंचि मोरोपंत बापट आणि
गोविंदपंत कुळकरण्याचें निरूपण । आणि एका दत्तजयंतीस महर्गतेसमयीं जाण । तीनशत पात्रान्नांत चतुःसहस्र पात्रें
जेविलीं ॥ ७२ ॥ माघ वद्य गुरुप्रतिपदेसमयीं। विप्रभोजन-वेळीं मार्गांत पाहीं । वृषभ भडकूनि उदक रथ उलथून
जाई। परी स्वामिराजकृपें संकट टळे ॥ ७३ ॥ तैसेंचि आणखी एका माघी गुरुप्रतिपदा-दिनीं । जंगमाचे वापींतील
जल आटलें असूनि। कांठीं स्वामिरायें लघुशंका करितांक्षणीं। वापी तुडुंब भरलीसे ॥ ७४ ॥ एकेकालीं वामनबुवा
वैद्य असतां बडोद्यासि । शरीरव्याधीनें त्रासून मध्यरात्रीसि । सुरसागरीं गेले जीव देण्यासि । परी स्वामिरायें
प्रगटूनि प्रसंग टाळिला ॥ ७५ ॥ आणखी एका दत्तजयंतीस । महर्गतेमुळें विप्र-भोजनाची चिंता पंचांस । ती
स्वामिराजकृपेनें खास। एका भक्तें येऊनि दूर केली ॥ ७६ ॥ त्यासमयीं मराठे जातीची एक वृद्ध बाई। पतीसह पातली ते
ठायीं। तियेसि श्रीफल आशीर्वाद अर्पितां पाहीं । एक वर्षांत पुत्ररत्न लाधलें ॥७७॥; एकेचाळिसाव्यांत स्वरूप
आणि तटस्थ-लक्षण। आणि लक्ष्मण कोळी खलाशाचें जहाज तरण। एक मारवाडी भक्त आणि निर्धन द्विजालागून।
यतिराज अस्थिरूपें सुवर्ण अर्पिती ॥ ७८ ॥ नर्मदातीरचे ब्रह्मानंद साधु सत्त्वस्थ । आणि हैद्राबादच्या विठ्ठल
जमादारचें वृत्त। तैसेंच श्रीशंकराचार्यांचें आगमन अक्कलकोटांत। होय तो अपूर्व कथाभाग वर्णिला ॥ ७९ ॥ द्विज-
विधवा चिमेचें वापीतरण। आणि शूद्र गोविंदा वेड्याचे विक्षिप्ताचरण । त्यापरी मुंबई-पुण्याच्या सुधारकांलागून ।
दर्शन-चमत्कार दाविला ॥ ३८० ॥; बेचाळिसाव्यांत लक्षण अनुवाद आणि विधिरूप श्रुत्यर्थ कथन । तैसेंचि केसेगांवच्या
अप्पा पाटलाचें रसाळ वृत्त कथन । आणि अक्कलकोटानजीकच्या आंबेवाडींत तस्करांलागून । समर्थें महाभुजंग पाठीं

लावून पळविलें ॥ ८१ ॥ त्या स्थलीं कोल्हापुरच्या राजपत्नी श्रीमंत खाशीबाई । आणि बडोद्याच्या किल्लेदारपत्नी श्रीमंत बबई । उभयतांचें लवाजम्यानिशीं आगमन होई । तो कथाभाग वर्णिला ॥ ८२ ॥ तैसेंच अबदुलपुरचे देशपांडे जहागिरदार । तयांस स्वामिकृपें पुत्र-कन्याप्राप्ति साचार । आणि मलु गौळ्याचा दुग्ध कापट्यप्रकार । जाणूनि यतिराज चमत्कार दाविती ॥ ८३ ॥; त्रेचाळिसाव्यांत देहादिक प्रपंचाचें मूळ आणि बीज कारण । तैसेंच कथिलें तात्यासाहेब सांगलीकरांचें गर्वनिरसन । आणि जप्त झाल्यामुळें अक्कलकोट-संस्थान । मालोजी भूप सोलापुरीं गेलेले ॥ ८४ ॥ तेथें घडे यतींद्र-गमनोत्साह मनोरम । त्यांत एक निंदक चनबसाप्पा नाम । त्यास उमारमणरूपें यति परंधाम । दर्शन देऊनि स्वभक्त करिती ॥ ८५ ॥ श्रीस्वामिरायांच्या कृपेंकरून । मुक्त झालें अक्कलकोट संस्थान जप्तींतून । नंतर मालोजीभूप होऊन हर्षायमान । अक्कलकोटीं पातले ॥ ८६ ॥ या संस्थानचे रीजंट । श्रीमंत दादासाहेब विंचुरकर श्रेष्ठ । तयांचा कुष्टरोग होय नष्ट । श्रीयतिराजकृपेनें ॥ ८७ ॥ चोळाप्पाचा कुटुंबविस्तार-कथन । आणि मणूरच्या महापुरींचें नौकाआरोहण । आण्णा पाटलाच्या पुत्रास महामारी-उपद्रवापासून । कृपाळुपणें श्रीस्वामिराज वांचविती ॥ ८८ ॥; चव्वेचाळिसाव्यांत हृदयकमल-ध्याननिरूपण । आणि नळदुर्गींच्या नाईकाचें लोभिष्टपण । जकप्पा स्वामींच्या पुण्यतिथीसमयीं जाण । यतींद्र चमत्कार दाविती ॥ ८९ ॥ वामन राजाराम घोलप पुणेकर । आणि बऱ्हाणपुरचे मोरेश्वर हरी नागर । यांचीं संकटें होतीं दूर । श्रीस्वामिराजकृपेनें ॥ ३९० ॥ मोरेश्वरा दत्तात्रेय-नामें पुत्र प्राप्त । आणि मल्लिकार्जुन जंगम कीर्तनकाराप्रत । गर्वहत करूनि तत्कन्येचा गर्भ श्रीसमर्थ । वृद्धिंगत करिती तीन वर्षांचा ॥ ९१ ॥ पुढें मल्लिकार्जुन श्रावणमासभरी । विप्रभोजन घाली परमादरीं । श्रीस्वामिराज असूनि प्रज्ञापुरीं । बारशीसही तद्गृहीं होते ॥ ९२ ॥; पंचेचाळिसाव्यांत याज्ञवल्क्य-जनक-संवादनिरूपण । आणि यात्रेकरी गोसाव्याचा

जलोदर व्याधि होय निरसन । तयास श्रीगुरु द्वारकाधीशाचें रूप दावून । दर्शनहेतु पुरविती ॥ ९३ ॥ पांडुरंग सोनारें कर्णकुंडलें अर्पिल्याचा चमत्कार । आणि अनावृष्टि-समयीं पर्जन्यवृष्टि करविती यतीश्वर । जुन्नरच्या शूद्र सकूबाईचा कुष्ट दूर । होय श्रीसमर्थकृपेनें ॥ ९४ ॥ तैसेंच जुन्नरचे कृष्णाजी लक्ष्मण काळविट । तयावरी श्रीसमर्थकृपा होत । आणि भिकोबा चित्र्यास पुत्रसंतान प्राप्त । यतींद्र-प्रसादें होतसे ॥ ९५ ॥ जुन्नरकर राजाराम नीलकंठ । आणि महादेव रघुनाथ गोडबोले गृहस्थ । सरसचे लक्ष्मीनारायण स्वामिभक्त । आणि लिंबडीचे जयशंकर पुरुषोत्तम ॥ ९६ ॥ लक्ष्मण माधव आपटेकर । उमियाशंकर मूळजी भाविक नर । चतुर्भुज जेठा आणि जिऊबा वामन पवित्र । इत्यादि स्वामिसेवक असती ॥ ९७ ॥ आणि लखतरची गंगाबाई । काशी जानकी धाकू लक्ष्मी आदिक पाही । निष्ठापूर्वक श्रीसमर्थपायीं । शरण होती अनन्य ॥ ९८ ॥; सेहचाळिसाव्यांत कौषीतकी-उपनिषदांतील जाण । पर्यंक-विद्यारूप अहंग्रह-उपासना वर्णन । नळदुर्ग तालुकदार बैरामजीचें निरूपण । आणि गायक पुराणिकाचा वृत्तांत वर्णिला ॥ ९९ ॥; सत्तेचाळिसाव्यांत गौतमऋषीकृत जाण । न्यायशास्त्र-पदार्थ-निरूपण । वामनबुवा नासिक-त्र्यंबक-सप्तशृंगालागून । जाती शके सतराशें त्र्याणवांत ॥ ४०० ॥ सप्तशृंगीदेवी मुखींचा वामनबुवास । कृपायुक्त तांबुल-प्रसाद मिळे खास । पुढें सटाण्यास यशवंतराव-साधुदर्शनास । गमन करिती वामनबुवा ॥ १ ॥ पुन्हां सप्तशृंगास येऊन केलें देवीपूजन । आणि नासिकास घेतलें गंगोदक भरून । नंतर पंढरीस जाऊन श्रीविठ्ठल-दर्शन । घेतां विटेवरी श्रीस्वामिराज दिसती ॥ २ ॥ त्याउपरी धीपुरीं येऊनि जाण । वामनबुवांनीं समर्थांस घातलें गंगास्नान । इत्यादि इतिहास आणि कानफाट्याचें उद्धट वर्तन । तैसेचि वारकरी द्विजवृत्त निवेदिलें ॥ ३ ॥ पंढरीनाथ गणेशाचा स्वार्थपर इतिहास । आणि मोरोबा कुळकरण्याची स्त्री त्रासूनि उदर-दुःखास । जीव देतां यतींद्रें वांचवूनि व्याधीस । दूर केल्याचें वृत्त ग्रथियलें

॥ ४ ॥; अठ्ठेचाळिसाव्यांत जैमिनीकृत पूर्वमीमांसेचा उल्लेख। आणि तान्ही-गणिकेचें कथानक। कोनळी ग्रामींच्या रानीं
असतां यतींद्रतिलक। अन्नपूर्णादेवी अन्न पुरवी ॥ ५ ॥ मालोजी भूपास गव्हर्नरसाहेबांकडून। शस्त्र-परवाना
मिळाल्याचें कथन। आणि लोकांचें पिशाच्च-संबंधादि-व्याधिनिरसन। तैसाच मूषकप्राणदान-कथाभाग ॥ ६ ॥
शके सतराशें पंचायशींत वामनबुवांस। पयोनदी-संगमीं घडे महामंत्रोपदेश। ब्रह्मनिष्ठ होशील ऐसा आशीर्वादास।
यतींद्रतिलक अर्पिती ॥ ७ ॥ पुढें वामनबुवा गाणगापुरास। करिती गुरुचरित्रपारायणास। तेथूनि येऊनि धीपुरास।
प्रसादाज्ञा घेऊनि वामोरीस जाती ॥ ८ ॥; एकूणपन्नासाव्यांत मोक्षार्थ धन-अकारणता-निरूपण। आणि प्रज्ञापुरीच्या भूपतीचें
कथन। पिराजीराव टिकाजींस श्रीविठ्ठलरूपें दर्शन। देती यतिराज कृपालुत्वें ॥ ९ ॥ तैसाचि विठ्ठलराव टिकाजींचा
अभ्युदय। अक्कलकोट दरबारीं होय। बसाप्पा तेली आणि कोंकणस्थ द्विज दंपत्य। यांचा इतिहास वर्णिला ॥ ४१० ॥
बडोद्याचे भाऊ खेडकर। आणि घोरपडे राजे सरदार। सातार प्रांतींचा पांडुरंग केशव विप्र। यांचीं कथानकें ग्रथियलीं
॥ ११ ॥; पन्नासाव्यांत मलत्रयरूप योनिज शरीर-निरूपण। आणि अहंकारी पांच वैष्णव ब्राह्मण। त्यांचा दर्प उतरिला
जन्मांध-द्विजपुत्राकडून। तयास नेत्र आणि ज्ञान अर्पूनि ॥ १२ ॥; एकावन्नाव्यांत मृत्यु आणि संन्यास प्रकरण। तैसेंचि
वामनबुवांचें धीपुरीं गमन। गुरुदर्शनार्थ चंद्रस्वर उक्त जाणून। सव्य नासिकेंत बोळा बसविती ॥ १३ ॥ तयांचें
निराकरण यतिराज करिती। पुन्हां दुसरे वर्षीं प्रज्ञापुराप्रति। वामनबुवा जातां परीक्षणार्थ सद्गुरु रागावती। नंतर सुदयें
करिती योगप्रश्न-समाधान ॥ १४ ॥; बावन्नाव्यांत गर्भोपनिषदांतील जाण। शरीरव्यवस्था-विचाराचें निरूपण।
विस्तारपूर्वक केलें ग्रथन। मुमुक्षूंलागीं कळावया ॥ १५ ॥; त्रेपन्नाव्यांत राजयोग-कथन। आणि दरिद्र्यास अस्थिरूपें
प्राप्त सुवर्ण। तैसाचि गलितकुष्ट शूद्राचा व्याधि निरसन। होय श्रीसमर्थकृपेनें ॥ १६ ॥ पुढें त्याच शूद्राचे गृहीं।

गुरुपादुका-स्थापनसमयीं । सद्गुरु अकस्मित् प्रकटती पाहीं । आणि धीपुरींही असती ॥ १७ ॥; चोपन्नाव्यांत
ब्रह्मसाक्षात्कारार्थ त्याज्य विष्य । तयांचें निरूपण केलें यथायोग्य । बावडेकर पुराणिकाची व्यय अडचण दूर होय।
श्रीस्वामिसमर्थकृपेनें ॥ १८ ॥ ताबूत पाहण्यास समर्थाज्ञा नसतां । भुजंगा श्रीपादासह गेला न कळतां । गर्दींत सुवर्ण
जोडवें हरवतां । धाकूजी फौजदाराजवळ सांपडे ॥ १९ ॥ खेडमणूरच्या मार्गांत । मेणा वाहण्याची अडचण होत।
तदा श्रीस्वामिराज समर्थ । पुष्पवत् सूक्ष्म होती ॥ ४२० ॥ वाडी-ग्रामीं भोजनाची अडचण। तदा अकस्मित् महारुद्र
देशपांडे भोजन । समारंभ चांगला करून । संतोषविती सर्वांसि ॥ २१ ॥ तेथें देवीचें होतें अत्युग्र स्थल । चोळाप्पास
उपद्रव झाला तात्काल । शके सतराशें नव्याण्णव अश्विन शुक्ल । नवमीसि चोळाप्पा गेले निजधामा ॥ २२ ॥ थोरल्या
राजपत्नीचें देहावसान । आणि महांतनळी ग्रामीं घडे चोरी जाण। तैशीच द्विजस्त्रीची घागर तलावांत लोटून । यतींद्रें
दिधली तो चमत्कार वर्णिला ॥ २३ ॥; पंचावन्नाव्यांत अपौरुषेय वेद-कथन। आणि जंगम-शिवलिंग-होमवर्णन।
वेणीमाधव वैद्यांस यतींद्र नारायण । पूगीफल प्रसाद अर्पिती ॥ २४ ॥ नीलेगांवीं श्रीसमर्थांचें गमन । आणि
श्रीसमर्थसमाधिवृत्त निरूपण। समाधीनंतर पंचम षष्ठदिनीं जाण । नीलेगांवीं भाऊसाहेबांस पुनर्दर्शन घडे ॥ २५ ॥; या
अध्यायीं होय ग्रंथलेखन पूर्ण। आणि वामनबुवा वैद्यांचें निर्याण। नंतर ग्रंथसंशोधन-उपसंहारलेखन। विनायक सदाशिव-
हस्तीं घडे ॥ २६ ॥ येणेंपरी हे अध्याय पंचावन। यांतील ज्ञानामृत-पान। सद्भावें करितां मुमुक्षुजन । परमार्थ-सुखा
लाधती ॥ २७ ॥ ही पंचावन अध्यायमयी रत्नमालिका। मुमुक्षुकंठीं विलसो देखा। तेणें पावती परमार्थसुखा। सत्य सत्य
त्रिवाचा ॥ २८ ॥ या ग्रंथाचें करितां सप्ताह-पारायण । जन्मांतरींचे दोष होती निरसन। ब्रह्महत्या गोहत्यादि पापें
संपूर्ण । पठणमात्रें दग्ध होती ॥ २९ ॥ भूतप्रेत-संबंधबाधा। नाना रोगादि आपदा। बाधूं न शकती लेशही कदा।

* * *

या ग्रंथपठणेंकरूनि ॥ ४३० ॥ धनार्थी यांसि धन । पुत्रार्थी यांसि पुत्ररत्न । अनेक कामना होती पूर्ण । ग्रंथपठणें निश्चित ॥ ३१ ॥ शतावर्तनें करी जो नर । तयासि होय आत्मसाक्षात्कार । अंतीं कैवल्यपद साचार । पावे तो नर निश्चयें ॥ ३२ ॥ येथें जो धरील अविश्वास । तो परमार्थसुखा आंचवे खास । म्हणूनि अंतरीं धरूनि उल्लास । ग्रंथपठण करावें ॥ ३३ ॥ नित्यशः एक अध्याय तरी । सद्भावें वाचावा निर्धारीं । तयांचे सकल मनोरथ पूर्ण करी । श्रीसद्गुरुस्वामी निश्चयें ॥ ३४ ॥ येथें भावचि मुख्य कारण । 'भावेन विद्यते देवः' ऐसें शास्त्रवचन । पूर्ण विश्वासें ग्रंथपठण । करितां फल तात्काल ॥ ३५ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचित । विनायक सदाशिव संशोधित । पंचाशत्तमाध्याय गोड हा ॥ ४३६ ॥ इति श्रीगुरुलीलामृते । ब्रह्मनिष्ठ-वामनविरचिते । विनायक सदाशिव-संशोधिते । पंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः ॥ इति श्रीगुरुलीलामृतं संपूर्णम् ॥ श्रीसद्गुरु स्वामीराज चरणारविंदार्पणमस्तु ॥ ॥ ॥

* * *

**सप्ताह-पारायणाचे अध्याय—** पहिल्या दिवशीं १ ते ८; दुसऱ्या दिवशीं ९ ते १[illegible] तिसऱ्या दिवशीं १८ ते २६; चौथ्या दिवशीं २७ ते ३४; पांचव्या दिवशीं ३५ ते ४२; सहाव्या दिवशीं ४३ ते ५०; सातव्या दिवशीं ५१ ते ५५ याप्रमाणें. ( [illegible] दिवशीं ओंव्यांची संख्या पडते ती अनुक्रमें-१-१५३०; २-१४१५; ३-१४२९; ४-१३६४; ५-१४३२; ६-१४८५; ७-१२०२ )

**सप्ताह-पारायण विधि**—स्नानानंतर भोजनाचे पूर्वीं शुचिर्भूतपणें वाचणें; वाचण्यास आरंभ करण्यापूर्वीं [illegible] ब्राह्मण-वडिलांस वंदन करून श्रीस्वामीसमर्थांच्या मूर्तीची व पोथीची पूजा करणें; वाचून झाल्यावरही उत्तरांग पूजन करणें; देवाकडे सात दिवस अखंड दीप ठेवणें व एकभुक्त आणि ब्रह्मचर्य व्रत पाळणें, साङ्गते प्रीत्यर्थ यथाशक्ति ब्राह्मण-सुवासिनी संतर्पण करणें.

## भूपाळी

उठा उठा श्रीगुरुवरा । बापा त्रिभुवनसुंदरा ॥ महाराज करा त्वरा । व्यथा हरा भक्तांची ॥ ध्रु० ॥ हरिहरब्रह्म आले । तुझी इच्छिती पाउलें ॥ दर्शन देऊनियां मुलें । आतां करा सुखरूप ॥ १ ॥ मुनिजन निरंजनीं । श्रमती जाण सदा वनीं । लक्ष ठेवुनी तव चरणीं । म्हणती निर्गुणी सोईरा ॥ २ ॥ आनंद म्हणे दीनानाथा । रविउदय झाला ताता ॥ तव चरणीं ठेवुनि माथा । नाहीं व्यथा भवाची ॥ उठा० ॥ ३ ॥

## श्रीस्वामीसमर्थांची आरती

जयदेव जयदेव जय श्रीस्वामिसमर्था । आरति ओंवाळूं चरणीं, ठेवुनियां माथा ॥ ध्रु० ॥ छेली-खेडेग्रामीं, तूं अवतरलासी । जगदुद्धारासाठीं, राया तूं फिरसी ॥ भक्तवत्सल खरा, तूं एक होसी । म्हणुनि शरण आलों, तूझ चरणासी ॥ जय० ॥ १ ॥ त्रैगुण-परब्रह्म, तूझा अवतार । त्याची काय वर्णूं, लीला पामर ॥ शेषादिक शिणले, नलगे त्या पार । तेथें जडमूढ कसा, करुं मी विस्तार ॥ जय० ॥२॥ देवादी देव, तूं स्वामीराया । निर्जर मुनिजन ध्याती, भावें तव पाया ॥ तुजसी अर्पण केली, आपुली ही काया । शरणागता तारीं, तूं स्वामीराया ॥ जय० ॥ ३ ॥ अघटित लीला करुनी जडमूढ उद्धरिले । कीर्ती ऐकुनि कानीं, चरणीं मी लोळें ॥ चरणप्रसाद मोठा, मज हें अनुभवलें । तूझ्या सुता नलगे, चरणा वेगळें ॥ जयदेव० ॥ ४ ॥

## अर्जी ( प्रार्थना )

दीनदयाळा श्रीगुरुराया अर्जी ही ऐका । जोडुनि कर हे विनवितसें तुज न मागे पैका ॥ ध्रु० ॥ आत्मस्वरुपीं ध्यान निरंतर हें द्यावें मजला । प्रेमानंदेंकरुन खरा हा देह अर्पिला तुजला ॥ १ ॥ विश्वारंगीं रंग खरा हा एकचि मजला भासो । सदया सदय हृदय निरंतर तुजला बा असो ॥ २ ॥ देहा-देहीं देह विराला मग जीरावा पर पाहे । आत्मस्वरूपीं रूप निरंतर रंगुनियां राहे ॥ ३ ॥ अनंतभुवनीं भरा भरली अवघी तव सत्ता । नाम वाणिनें घेतां जगिं हे हरली भवव्यथा ॥ ४ ॥ आनंदानें अर्जी केली घ्या पायापाशीं । नाम तुझें बा खरें बळें हें तारी जगतासी ॥ दीनदयाळा० ॥ ५ ॥

# अध्याय व ओव्यांचा अनुक्रमवार तपशील

| अध्याय | ओंव्या | अध्याय | ओंव्या | अध्याय | ओंव्या | अध्याय | ओंव्या | अध्याय | ओंव्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १८२ | १२ | १५५ | २३ | १४९ | ३४ | १७९ | ४५ | १८७ |
| २ | २३० | १३ | १५७ | २४ | १७० | ३५ | १८१ | ४६ | १८७ |
| ३ | १५७ | १४ | १३८ | २५ | १६० | ३६ | १७९ | ४७ | १९१ |
| ४ | १५३ | १५ | १५६ | २६ | १६४ | ३७ | १७३ | ४८ | १८७ |
| ५ | ३७१ | १६ | १७२ | २७ | १५० | ३८ | १८२ | ४९ | १९८ |
| ६ | १४० | १७ | १५६ | २८ | १५३ | ३९ | १८२ | ५० | १६३ |
| ७ | १४३ | १८ | १५३ | २९ | १६६ | ४० | १८८ | ५१ | १८३ |
| ८ | १५४ | १९ | १७५ | ३० | १५७ | ४१ | १७१ | ५२ | २११ |
| ९ | १४१ | २० | १४९ | ३१ | १५० | ४२ | १७६ | ५३ | १८५ |
| १० | १८८ | २१ | १५० | ३२ | १५५ | ४३ | १९१ | ५४ | १८७ |
| ११ | १५२ | २२ | १५९ | ३३ | १५४ | ४४ | १८१ | ५५ | ४३६ |

एकंदर अध्याय ५५

एकंदर ओंवीसंख्या ९७५७

ॐ श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ ॐ

ॐ श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ ॐ

मुद्रक — बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २

# श्रीगुरुलीलामृत समाप्त

प्रकाशक — केशव भिकाजी ढवळे, कर्नाटक हाउस, चिराबाजार, मुंबई २

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ ॐ

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

```
[OrderDescription]
,CREATED=23.06.20 10:30
,TRANSFERRED=2020/06/23 at 11:53:00
,PAGES=723
,TYPE=STD
,NAME=S0003202
,Book Name=M-2516-SHRIGURULILA MRIT
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF
,FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
```

```
FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF
,FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
,FILE22=00000022.TIF
,FILE23=00000023.TIF
,FILE24=00000024.TIF
,FILE25=00000025.TIF
,FILE26=00000026.TIF
,FILE27=00000027.TIF
,FILE28=00000028.TIF
,FILE29=00000029.TIF
```

```
FILE30=00000030.TIF
,FILE31=00000031.TIF
,FILE32=00000032.TIF
,FILE33=00000033.TIF
,FILE34=00000034.TIF
,FILE35=00000035.TIF
,FILE36=00000036.TIF
,FILE37=00000037.TIF
,FILE38=00000038.TIF
,FILE39=00000039.TIF
,FILE40=00000040.TIF
,FILE41=00000041.TIF
,FILE42=00000042.TIF
,FILE43=00000043.TIF
,FILE44=00000044.TIF
,FILE45=00000045.TIF
,FILE46=00000046.TIF
,FILE47=00000047.TIF
,FILE48=00000048.TIF
```

```
FILE49=00000049.TIF
,FILE50=00000050.TIF
,FILE51=00000051.TIF
,FILE52=00000052.TIF
,FILE53=00000053.TIF
,FILE54=00000054.TIF
,FILE55=00000055.TIF
,FILE56=00000056.TIF
,FILE57=00000057.TIF
,FILE58=00000058.TIF
,FILE59=00000059.TIF
,FILE60=00000060.TIF
,FILE61=00000061.TIF
,FILE62=00000062.TIF
,FILE63=00000063.TIF
,FILE64=00000064.TIF
,FILE65=00000065.TIF
,FILE66=00000066.TIF
,FILE67=00000067.TIF
```

```
FILE68=00000068.TIF
,FILE69=00000069.TIF
,FILE70=00000070.TIF
,FILE71=00000071.TIF
,FILE72=00000072.TIF
,FILE73=00000073.TIF
,FILE74=00000074.TIF
,FILE75=00000075.TIF
,FILE76=00000076.TIF
,FILE77=00000077.TIF
,FILE78=00000078.TIF
,FILE79=00000079.TIF
,FILE80=00000080.TIF
,FILE81=00000081.TIF
,FILE82=00000082.TIF
,FILE83=00000083.TIF
,FILE84=00000084.TIF
,FILE85=00000085.TIF
,FILE86=00000086.TIF
```

FILE87=00000087.TIF
,FILE88=00000088.TIF
,FILE89=00000089.TIF
,FILE90=00000090.TIF
,FILE91=00000091.TIF
,FILE92=00000092.TIF
,FILE93=00000093.TIF
,FILE94=00000094.TIF
,FILE95=00000095.TIF
,FILE96=00000096.TIF
,FILE97=00000097.TIF
,FILE98=00000098.TIF
,FILE99=00000099.TIF
,FILE100=00000100.TIF
,FILE101=00000101.TIF
,FILE102=00000102.TIF
,FILE103=00000103.TIF
,FILE104=00000104.TIF
,FILE105=00000105.TIF

```
FILE106=00000106.TIF
,FILE107=00000107.TIF
,FILE108=00000108.TIF
,FILE109=00000109.TIF
,FILE110=00000110.TIF
,FILE111=00000111.TIF
,FILE112=00000112.TIF
,FILE113=00000113.TIF
,FILE114=00000114.TIF
,FILE115=00000115.TIF
,FILE116=00000116.TIF
,FILE117=00000117.TIF
,FILE118=00000118.TIF
,FILE119=00000119.TIF
,FILE120=00000120.TIF
,FILE121=00000121.TIF
,FILE122=00000122.TIF
,FILE123=00000123.TIF
,FILE124=00000124.TIF
```

```
FILE125=00000125.TIF
,FILE126=00000126.TIF
,FILE127=00000127.TIF
,FILE128=00000128.TIF
,FILE129=00000129.TIF
,FILE130=00000130.TIF
,FILE131=00000131.TIF
,FILE132=00000132.TIF
,FILE133=00000133.TIF
,FILE134=00000134.TIF
,FILE135=00000135.TIF
,FILE136=00000136.TIF
,FILE137=00000137.TIF
,FILE138=00000138.TIF
,FILE139=00000139.TIF
,FILE140=00000140.TIF
,FILE141=00000141.TIF
,FILE142=00000142.TIF
,FILE143=00000143.TIF
```

```
FILE144=00000144.TIF
,FILE145=00000145.TIF
,FILE146=00000146.TIF
,FILE147=00000147.TIF
,FILE148=00000148.TIF
,FILE149=00000149.TIF
,FILE150=00000150.TIF
,FILE151=00000151.TIF
,FILE152=00000152.TIF
,FILE153=00000153.TIF
,FILE154=00000154.TIF
,FILE155=00000155.TIF
,FILE156=00000156.TIF
,FILE157=00000157.TIF
,FILE158=00000158.TIF
,FILE159=00000159.TIF
,FILE160=00000160.TIF
,FILE161=00000161.TIF
,FILE162=00000162.TIF
```

```
FILE163=00000163.TIF
,FILE164=00000164.TIF
,FILE165=00000165.TIF
,FILE166=00000166.TIF
,FILE167=00000167.TIF
,FILE168=00000168.TIF
,FILE169=00000169.TIF
,FILE170=00000170.TIF
,FILE171=00000171.TIF
,FILE172=00000172.TIF
,FILE173=00000173.TIF
,FILE174=00000174.TIF
,FILE175=00000175.TIF
,FILE176=00000176.TIF
,FILE177=00000177.TIF
,FILE178=00000178.TIF
,FILE179=00000179.TIF
,FILE180=00000180.TIF
,FILE181=00000181.TIF
```

```
FILE182=00000182.TIF
,FILE183=00000183.TIF
,FILE184=00000184.TIF
,FILE185=00000185.TIF
,FILE186=00000186.TIF
,FILE187=00000187.TIF
,FILE188=00000188.TIF
,FILE189=00000189.TIF
,FILE190=00000190.TIF
,FILE191=00000191.TIF
,FILE192=00000192.TIF
,FILE193=00000193.TIF
,FILE194=00000194.TIF
,FILE195=00000195.TIF
,FILE196=00000196.TIF
,FILE197=00000197.TIF
,FILE198=00000198.TIF
,FILE199=00000199.TIF
,FILE200=00000200.TIF
```

```
FILE201=00000201.TIF
,FILE202=00000202.TIF
,FILE203=00000203.TIF
,FILE204=00000204.TIF
,FILE205=00000205.TIF
,FILE206=00000206.TIF
,FILE207=00000207.TIF
,FILE208=00000208.TIF
,FILE209=00000209.TIF
,FILE210=00000210.TIF
,FILE211=00000211.TIF
,FILE212=00000212.TIF
,FILE213=00000213.TIF
,FILE214=00000214.TIF
,FILE215=00000215.TIF
,FILE216=00000216.TIF
,FILE217=00000217.TIF
,FILE218=00000218.TIF
,FILE219=00000219.TIF
```

```
FILE220=00000220.TIF
,FILE221=00000221.TIF
,FILE222=00000222.TIF
,FILE223=00000223.TIF
,FILE224=00000224.TIF
,FILE225=00000225.TIF
,FILE226=00000226.TIF
,FILE227=00000227.TIF
,FILE228=00000228.TIF
,FILE229=00000229.TIF
,FILE230=00000230.TIF
,FILE231=00000231.TIF
,FILE232=00000232.TIF
,FILE233=00000233.TIF
,FILE234=00000234.TIF
,FILE235=00000235.TIF
,FILE236=00000236.TIF
,FILE237=00000237.TIF
,FILE238=00000238.TIF
```

```
FILE239=00000239.TIF
,FILE240=00000240.TIF
,FILE241=00000241.TIF
,FILE242=00000242.TIF
,FILE243=00000243.TIF
,FILE244=00000244.TIF
,FILE245=00000245.TIF
,FILE246=00000246.TIF
,FILE247=00000247.TIF
,FILE248=00000248.TIF
,FILE249=00000249.TIF
,FILE250=00000250.TIF
,FILE251=00000251.TIF
,FILE252=00000252.TIF
,FILE253=00000253.TIF
,FILE254=00000254.TIF
,FILE255=00000255.TIF
,FILE256=00000256.TIF
,FILE257=00000257.TIF
```

```
FILE258=00000258.TIF
,FILE259=00000259.TIF
,FILE260=00000260.TIF
,FILE261=00000261.TIF
,FILE262=00000262.TIF
,FILE263=00000263.TIF
,FILE264=00000264.TIF
,FILE265=00000265.TIF
,FILE266=00000266.TIF
,FILE267=00000267.TIF
,FILE268=00000268.TIF
,FILE269=00000269.TIF
,FILE270=00000270.TIF
,FILE271=00000271.TIF
,FILE272=00000272.TIF
,FILE273=00000273.TIF
,FILE274=00000274.TIF
,FILE275=00000275.TIF
,FILE276=00000276.TIF
```

```
FILE277=00000277.TIF
,FILE278=00000278.TIF
,FILE279=00000279.TIF
,FILE280=00000280.TIF
,FILE281=00000281.TIF
,FILE282=00000282.TIF
,FILE283=00000283.TIF
,FILE284=00000284.TIF
,FILE285=00000285.TIF
,FILE286=00000286.TIF
,FILE287=00000287.TIF
,FILE288=00000288.TIF
,FILE289=00000289.TIF
,FILE290=00000290.TIF
,FILE291=00000291.TIF
,FILE292=00000292.TIF
,FILE293=00000293.TIF
,FILE294=00000294.TIF
,FILE295=00000295.TIF
```

```
FILE296=00000296.TIF
,FILE297=00000297.TIF
,FILE298=00000298.TIF
,FILE299=00000299.TIF
,FILE300=00000300.TIF
,FILE301=00000301.TIF
,FILE302=00000302.TIF
,FILE303=00000303.TIF
,FILE304=00000304.TIF
,FILE305=00000305.TIF
,FILE306=00000306.TIF
,FILE307=00000307.TIF
,FILE308=00000308.TIF
,FILE309=00000309.TIF
,FILE310=00000310.TIF
,FILE311=00000311.TIF
,FILE312=00000312.TIF
,FILE313=00000313.TIF
,FILE314=00000314.TIF
```

```
FILE315=00000315.TIF
,FILE316=00000316.TIF
,FILE317=00000317.TIF
,FILE318=00000318.TIF
,FILE319=00000319.TIF
,FILE320=00000320.TIF
,FILE321=00000321.TIF
,FILE322=00000322.TIF
,FILE323=00000323.TIF
,FILE324=00000324.TIF
,FILE325=00000325.TIF
,FILE326=00000326.TIF
,FILE327=00000327.TIF
,FILE328=00000328.TIF
,FILE329=00000329.TIF
,FILE330=00000330.TIF
,FILE331=00000331.TIF
,FILE332=00000332.TIF
,FILE333=00000333.TIF
```

```
FILE334=00000334.TIF
,FILE335=00000335.TIF
,FILE336=00000336.TIF
,FILE337=00000337.TIF
,FILE338=00000338.TIF
,FILE339=00000339.TIF
,FILE340=00000340.TIF
,FILE341=00000341.TIF
,FILE342=00000342.TIF
,FILE343=00000343.TIF
,FILE344=00000344.TIF
,FILE345=00000345.TIF
,FILE346=00000346.TIF
,FILE347=00000347.TIF
,FILE348=00000348.TIF
,FILE349=00000349.TIF
,FILE350=00000350.TIF
,FILE351=00000351.TIF
,FILE352=00000352.TIF
```

FILE353=00000353.TIF
,FILE354=00000354.TIF
,FILE355=00000355.TIF
,FILE356=00000356.TIF
,FILE357=00000357.TIF
,FILE358=00000358.TIF
,FILE359=00000359.TIF
,FILE360=00000360.TIF
,FILE361=00000361.TIF
,FILE362=00000362.TIF
,FILE363=00000363.TIF
,FILE364=00000364.TIF
,FILE365=00000365.TIF
,FILE366=00000366.TIF
,FILE367=00000367.TIF
,FILE368=00000368.TIF
,FILE369=00000369.TIF
,FILE370=00000370.TIF
,FILE371=00000371.TIF

```
FILE372=00000372.TIF
,FILE373=00000373.TIF
,FILE374=00000374.TIF
,FILE375=00000375.TIF
,FILE376=00000376.TIF
,FILE377=00000377.TIF
,FILE378=00000378.TIF
,FILE379=00000379.TIF
,FILE380=00000380.TIF
,FILE381=00000381.TIF
,FILE382=00000382.TIF
,FILE383=00000383.TIF
,FILE384=00000384.TIF
,FILE385=00000385.TIF
,FILE386=00000386.TIF
,FILE387=00000387.TIF
,FILE388=00000388.TIF
,FILE389=00000389.TIF
,FILE390=00000390.TIF
```

```
FILE391=00000391.TIF
,FILE392=00000392.TIF
,FILE393=00000393.TIF
,FILE394=00000394.TIF
,FILE395=00000395.TIF
,FILE396=00000396.TIF
,FILE397=00000397.TIF
,FILE398=00000398.TIF
,FILE399=00000399.TIF
,FILE400=00000400.TIF
,FILE401=00000401.TIF
,FILE402=00000402.TIF
,FILE403=00000403.TIF
,FILE404=00000404.TIF
,FILE405=00000405.TIF
,FILE406=00000406.TIF
,FILE407=00000407.TIF
,FILE408=00000408.TIF
,FILE409=00000409.TIF
```

```
FILE410=00000410.TIF
,FILE411=00000411.TIF
,FILE412=00000412.TIF
,FILE413=00000413.TIF
,FILE414=00000414.TIF
,FILE415=00000415.TIF
,FILE416=00000416.TIF
,FILE417=00000417.TIF
,FILE418=00000418.TIF
,FILE419=00000419.TIF
,FILE420=00000420.TIF
,FILE421=00000421.TIF
,FILE422=00000422.TIF
,FILE423=00000423.TIF
,FILE424=00000424.TIF
,FILE425=00000425.TIF
,FILE426=00000426.TIF
,FILE427=00000427.TIF
,FILE428=00000428.TIF
```

```
FILE429=00000429.TIF
,FILE430=00000430.TIF
,FILE431=00000431.TIF
,FILE432=00000432.TIF
,FILE433=00000433.TIF
,FILE434=00000434.TIF
,FILE435=00000435.TIF
,FILE436=00000436.TIF
,FILE437=00000437.TIF
,FILE438=00000438.TIF
,FILE439=00000439.TIF
,FILE440=00000440.TIF
,FILE441=00000441.TIF
,FILE442=00000442.TIF
,FILE443=00000443.TIF
,FILE444=00000444.TIF
,FILE445=00000445.TIF
,FILE446=00000446.TIF
,FILE447=00000447.TIF
```

```
FILE448=00000448.TIF
,FILE449=00000449.TIF
,FILE450=00000450.TIF
,FILE451=00000451.TIF
,FILE452=00000452.TIF
,FILE453=00000453.TIF
,FILE454=00000454.TIF
,FILE455=00000455.TIF
,FILE456=00000456.TIF
,FILE457=00000457.TIF
,FILE458=00000458.TIF
,FILE459=00000459.TIF
,FILE460=00000460.TIF
,FILE461=00000461.TIF
,FILE462=00000462.TIF
,FILE463=00000463.TIF
,FILE464=00000464.TIF
,FILE465=00000465.TIF
,FILE466=00000466.TIF
```

```
FILE467=00000467.TIF
,FILE468=00000468.TIF
,FILE469=00000469.TIF
,FILE470=00000470.TIF
,FILE471=00000471.TIF
,FILE472=00000472.TIF
,FILE473=00000473.TIF
,FILE474=00000474.TIF
,FILE475=00000475.TIF
,FILE476=00000476.TIF
,FILE477=00000477.TIF
,FILE478=00000478.TIF
,FILE479=00000479.TIF
,FILE480=00000480.TIF
,FILE481=00000481.TIF
,FILE482=00000482.TIF
,FILE483=00000483.TIF
,FILE484=00000484.TIF
,FILE485=00000485.TIF
```

FILE486=00000486.TIF
,FILE487=00000487.TIF
,FILE488=00000488.TIF
,FILE489=00000489.TIF
,FILE490=00000490.TIF
,FILE491=00000491.TIF
,FILE492=00000492.TIF
,FILE493=00000493.TIF
,FILE494=00000494.TIF
,FILE495=00000495.TIF
,FILE496=00000496.TIF
,FILE497=00000497.TIF
,FILE498=00000498.TIF
,FILE499=00000499.TIF
,FILE500=00000500.TIF
,FILE501=00000501.TIF
,FILE502=00000502.TIF
,FILE503=00000503.TIF
,FILE504=00000504.TIF

```
FILE505=00000505.TIF
,FILE506=00000506.TIF
,FILE507=00000507.TIF
,FILE508=00000508.TIF
,FILE509=00000509.TIF
,FILE510=00000510.TIF
,FILE511=00000511.TIF
,FILE512=00000512.TIF
,FILE513=00000513.TIF
,FILE514=00000514.TIF
,FILE515=00000515.TIF
,FILE516=00000516.TIF
,FILE517=00000517.TIF
,FILE518=00000518.TIF
,FILE519=00000519.TIF
,FILE520=00000520.TIF
,FILE521=00000521.TIF
,FILE522=00000522.TIF
,FILE523=00000523.TIF
```

```
FILE524=00000524.TIF
,FILE525=00000525.TIF
,FILE526=00000526.TIF
,FILE527=00000527.TIF
,FILE528=00000528.TIF
,FILE529=00000529.TIF
,FILE530=00000530.TIF
,FILE531=00000531.TIF
,FILE532=00000532.TIF
,FILE533=00000533.TIF
,FILE534=00000534.TIF
,FILE535=00000535.TIF
,FILE536=00000536.TIF
,FILE537=00000537.TIF
,FILE538=00000538.TIF
,FILE539=00000539.TIF
,FILE540=00000540.TIF
,FILE541=00000541.TIF
,FILE542=00000542.TIF
```

```
FILE543=00000543.TIF
,FILE544=00000544.TIF
,FILE545=00000545.TIF
,FILE546=00000546.TIF
,FILE547=00000547.TIF
,FILE548=00000548.TIF
,FILE549=00000549.TIF
,FILE550=00000550.TIF
,FILE551=00000551.TIF
,FILE552=00000552.TIF
,FILE553=00000553.TIF
,FILE554=00000554.TIF
,FILE555=00000555.TIF
,FILE556=00000556.TIF
,FILE557=00000557.TIF
,FILE558=00000558.TIF
,FILE559=00000559.TIF
,FILE560=00000560.TIF
,FILE561=00000561.TIF
```

```
FILE562=00000562.TIF
,FILE563=00000563.TIF
,FILE564=00000564.TIF
,FILE565=00000565.TIF
,FILE566=00000566.TIF
,FILE567=00000567.TIF
,FILE568=00000568.TIF
,FILE569=00000569.TIF
,FILE570=00000570.TIF
,FILE571=00000571.TIF
,FILE572=00000572.TIF
,FILE573=00000573.TIF
,FILE574=00000574.TIF
,FILE575=00000575.TIF
,FILE576=00000576.TIF
,FILE577=00000577.TIF
,FILE578=00000578.TIF
,FILE579=00000579.TIF
,FILE580=00000580.TIF
```

```
FILE581=00000581.TIF
,FILE582=00000582.TIF
,FILE583=00000583.TIF
,FILE584=00000584.TIF
,FILE585=00000585.TIF
,FILE586=00000586.TIF
,FILE587=00000587.TIF
,FILE588=00000588.TIF
,FILE589=00000589.TIF
,FILE590=00000590.TIF
,FILE591=00000591.TIF
,FILE592=00000592.TIF
,FILE593=00000593.TIF
,FILE594=00000594.TIF
,FILE595=00000595.TIF
,FILE596=00000596.TIF
,FILE597=00000597.TIF
,FILE598=00000598.TIF
,FILE599=00000599.TIF
```

```
FILE600=00000600.TIF
,FILE601=00000601.TIF
,FILE602=00000602.TIF
,FILE603=00000603.TIF
,FILE604=00000604.TIF
,FILE605=00000605.TIF
,FILE606=00000606.TIF
,FILE607=00000607.TIF
,FILE608=00000608.TIF
,FILE609=00000609.TIF
,FILE610=00000610.TIF
,FILE611=00000611.TIF
,FILE612=00000612.TIF
,FILE613=00000613.TIF
,FILE614=00000614.TIF
,FILE615=00000615.TIF
,FILE616=00000616.TIF
,FILE617=00000617.TIF
,FILE618=00000618.TIF
```

```
FILE619=00000619.TIF
,FILE620=00000620.TIF
,FILE621=00000621.TIF
,FILE622=00000622.TIF
,FILE623=00000623.TIF
,FILE624=00000624.TIF
,FILE625=00000625.TIF
,FILE626=00000626.TIF
,FILE627=00000627.TIF
,FILE628=00000628.TIF
,FILE629=00000629.TIF
,FILE630=00000630.TIF
,FILE631=00000631.TIF
,FILE632=00000632.TIF
,FILE633=00000633.TIF
,FILE634=00000634.TIF
,FILE635=00000635.TIF
,FILE636=00000636.TIF
,FILE637=00000637.TIF
```

```
FILE638=00000638.TIF
,FILE639=00000639.TIF
,FILE640=00000640.TIF
,FILE641=00000641.TIF
,FILE642=00000642.TIF
,FILE643=00000643.TIF
,FILE644=00000644.TIF
,FILE645=00000645.TIF
,FILE646=00000646.TIF
,FILE647=00000647.TIF
,FILE648=00000648.TIF
,FILE649=00000649.TIF
,FILE650=00000650.TIF
,FILE651=00000651.TIF
,FILE652=00000652.TIF
,FILE653=00000653.TIF
,FILE654=00000654.TIF
,FILE655=00000655.TIF
,FILE656=00000656.TIF
```

```
FILE657=00000657.TIF
,FILE658=00000658.TIF
,FILE659=00000659.TIF
,FILE660=00000660.TIF
,FILE661=00000661.TIF
,FILE662=00000662.TIF
,FILE663=00000663.TIF
,FILE664=00000664.TIF
,FILE665=00000665.TIF
,FILE666=00000666.TIF
,FILE667=00000667.TIF
,FILE668=00000668.TIF
,FILE669=00000669.TIF
,FILE670=00000670.TIF
,FILE671=00000671.TIF
,FILE672=00000672.TIF
,FILE673=00000673.TIF
,FILE674=00000674.TIF
,FILE675=00000675.TIF
```

```
FILE676=00000676.TIF
,FILE677=00000677.TIF
,FILE678=00000678.TIF
,FILE679=00000679.TIF
,FILE680=00000680.TIF
,FILE681=00000681.TIF
,FILE682=00000682.TIF
,FILE683=00000683.TIF
,FILE684=00000684.TIF
,FILE685=00000685.TIF
,FILE686=00000686.TIF
,FILE687=00000687.TIF
,FILE688=00000688.TIF
,FILE689=00000689.TIF
,FILE690=00000690.TIF
,FILE691=00000691.TIF
,FILE692=00000692.TIF
,FILE693=00000693.TIF
,FILE694=00000694.TIF
```

```
FILE695=00000695.TIF
,FILE696=00000696.TIF
,FILE697=00000697.TIF
,FILE698=00000698.TIF
,FILE699=00000699.TIF
,FILE700=00000700.TIF
,FILE701=00000701.TIF
,FILE702=00000702.TIF
,FILE703=00000703.TIF
,FILE704=00000704.TIF
,FILE705=00000705.TIF
,FILE706=00000706.TIF
,FILE707=00000707.TIF
,FILE708=00000708.TIF
,FILE709=00000709.TIF
,FILE710=00000710.TIF
,FILE711=00000711.TIF
,FILE712=00000712.TIF
,FILE713=00000713.TIF
```

```
FILE714=00000714.TIF
,FILE715=00000715.TIF
,FILE716=00000716.TIF
,FILE717=00000717.TIF
,FILE718=00000718.TIF
,FILE719=00000719.TIF
,FILE720=00000720.TIF
,FILE721=00000721.TIF
,FILE722=00000722.TIF
,FILE723=00000723.TIF
,
```